ओ३म

# सत्यार्थ प्रकाश

15/2/90
गुरु विरजानन्द दण्डी
सन्दर्भ पुस्तकालय
पु परिग्रहण क्रमांक . 577
दयानन्द महिला महा.

अनुवादक :

पं० दामोदर सातवलेकर

प्रकाशक :

आर्य प्रतिनिधि सभा मध्य प्रदेश व विदर्भ
दयानन्द भवन, मंगलवारी बाजार, सदर, नागपुर (महाराष्ट्र)

प्रधान सम्पादक :

ब्र० नन्दकिशोर एम.ए. विद्यावाचस्पति

दसवां संस्करण

मूल्य : २४ रुपये

ओ३म
गुरु विरजानन्द दण्डी
संदर्भ पुस्तकालय
दयानंद महिला महाविद्यालय
कुरुक्षेत्र
वर्गीकरण नम्बर ..............................
पु. परिग्रहण क्रमांक . 577

# निवेदन

☆

मराठी सत्यार्थ प्रकाश का अनुवाद पं० दामोदर सातवलेकर ने १९१० से प्रकाशित करके स्वर्णिम कार्य किया है, सन् ५० के बाद श्री पं० लक्ष्मण राव ओघले और सार्वदेशिक सभा दिल्ली ने मराठी सत्यार्थ प्रकाश को प्रकाशित किया, पुनः श्री सत्यवीर शास्त्री अमरावती ने आर्य प्रतिनिधि सभा विदर्भ मध्य प्रदेश के सहयोग से छपवाया। सार्वदेशिक सभा, इन सब महानुभावों ने पं० सातवलेकर का अनुवादक में से नाम को हटा दिया। पुनः मैंने पं० दामोदर सातवलेकर का नाम मराठी सत्यार्थ प्रकाश में छाप दिया हैं, जिससे पाठकों को अनुवादक का पता चल सके। मैंने आर्य समाज के इतिहास की खोज में सन् १९८४-१९८५ में महाराष्ट्र, कर्नाटक, आन्ध्र प्रदेश का भ्रमण किया। आर्य समाज का साहित्य के क्षेत्र में किन महानुभावों ने कितना कार्य किया है, इसी कारण मैंने महाराष्ट्र के सभी आर्य समाजों में गया। मैंने तेलगू, कन्नड़, मलयालम में महर्षि दयानन्द और आर्य समाज का साहित्य अनुदित प्रचुर मात्रा में देखा, परन्तु मराठी नागरी लिपि होते हुए भी आर्य समाज का साहित्य मराठी भाषा में नगण्य रहा। कारण यह है महाराष्ट्र के आर्य समाज के लेखक, विद्वान्, धनिक लोग आलसी प्रमादी हैं। अपने समय में पं० दामोदर सातवलेकर, पं० हरिसखा राम तुँगार और पं० सत्यव्रत स्नातक बम्बे ने मराठी भाषा में कार्य किया है। सन् १९८८ मई में गुरुकुल होशंगाबाद की हीरक जयन्ति मनायी जा रही थी उसमें हजारों नर-नारी महाराष्ट्र विदर्भ क्षेत्र के गुरुकुल में आये। सभी लोग मराठी भाषा में सत्यार्थ प्रकाश का मांग कर रहे थे। मैंने मन ही मन प्रतिज्ञा कि दस हजार मराठी भाषा में वैदिक साहित्य छापूंगा। मैंने आर्य प्रतिनिधि सभा विदर्भ मध्य प्रदेश के प्रधान रमेश चन्द श्री वास्तव जी से विचार-विमर्श किया कि मराठी सत्यार्थ प्रकाश मैं छापूंगा। उन्होंने सब प्रकार से सहयोग दिया इसी प्रकार अन्य सज्जनों ने भी सदयोग देने का वचन दिया। मैंने दिल्ली में कागज और छपाई का भाव देखकर दंग रह गया, इस कार्य में कोई सभा, ट्रस्ट, त्यागी पुरुष, संन्यासी कर सकता है, साधारण पुरुषों के वश का नहीं है। मराठी सत्यार्थ प्रकाश के अधिक माँग पर छपवाई जा रही है, अब पाठकों के हाथ में है। जिन सज्जनों ने हमारा उत्साह वर्द्धन किया है, मैं हृदय से उनका अत्यन्त आभारी हैं।

आपका शुभ चिन्तक
**ब्र० नन्दकिशोर एम.ए. विद्यावाचस्पति**

ओ३म्

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य

# महर्षि श्री स्वामी दयानंद सरस्वती

कृत

# सत्यार्थप्रकाश

( मराठी )

[illegible]

नागपुर


पुढप

प्रकाशक

वेद प्रचारक मण्डल

रामजस रोड, ६०/१३ करौलबाग, नई दिल्ली-५

खारी बावली, दिल्ली-६

ओ३म्

## ।। सच्चिदानन्देश्वराय नमो नमः ।।

सत्यार्थप्रकाश

# भूमिका

ज्यावेळीं मी हा ' **सत्यार्थप्रकाश** ' नामक ग्रन्थ प्रथमतः लिहिला, तेव्हां व त्याच्या पूर्वी मला संस्कृत भाषेंतच बोलण्याची व पठनपाठनाच्या वेळींहि संस्कृतच बोलण्याची संवय असल्यामुळें व माझी जन्मभाष गुजराथी असल्यामुळें व मला या हिंदीभाषेचें ज्ञान नसल्यामुळें त्या ग्रंथाची भाषा अशुद्ध झाली होती. आतां (हिंदी) भाषा बोलण्याचा व लिहिण्याचा अभ्यास झाला असल्यामुळें हा ग्रंन्थ व्याकरणदृष्ट्या शुद्ध करून पु छापला आहे. कोठें कोठें शुद्ध व वाक्यरचना यांमध्यें बराच फेरबदल झाला आहे, कारण तसें केल्याशिव गत्यन्तर नव्हतें, तसा फरक केल्याशिवाय भाषेच्या अशुद्धि सुधारणें अशक्य झालें असतें. या ग्रंन्थांत वाक रचनेमध्यें जरी भेद केला आहे तथापि मूळच्या भावार्थांमध्ये कोणत्याहि तऱ्हेची हानी झाली नाहीं, परंतु कित्ये ठिकाणीं अर्थाचा खुलासा जास्तच झाला आहे. जेथें जेथें पहिल्या आवृत्तींत चुका होत्या तेथें या आवृत्तीं सुधारणा केली आहे.

ह्या ग्रन्थाचे १४ समुल्लास अर्थात् विभाग केले आहेत. त्यांपैकीं दहा समुल्लास पूर्वार्धांत आले व पुढचे चार समुल्लास उत्तरार्धामध्यें आले आहेत. शेवटचे दोन समुल्लास व स्वसिध्दान्त कांहीं कारण प्रथमावृत्तीमध्यें छापतां आले नव्हते ते यांत छापले आहेत.


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | **प्रथमसमुल्लासः**—ईश्वरनामव्याख्या, मंगलाचरण. ... ... | |
| २. | **द्वितीयसमुल्लासः**—बालशिक्षा. ... ... ... | |
| ३. | **तृतीयसमुल्लासः**—अध्ययन व अध्यापन. ... ... | |
| ४. | **चतुर्थसमुल्लासः**—विवाह व गृहस्थाश्रमव्यवहार. ... ... ... | |
| ५. | **पञ्चमसमुल्लासः**—वानप्रस्थ संन्यासाश्रमाचे विधि. ... ... | |
| ६. | **षष्ठसमुल्लासः**—राजधर्म. ... ... ... ... | ८९ — |
| ७. | **सप्तमसमुल्लासः**—वेद व ईश्वर या संबंधाचा विषय. ... ... | १११—१ |
| ८. | **अष्टमसमुल्लासः**—जगताची उत्पत्ति, स्थिति व प्रलय ... ... | १३२—१ |
| ९. | **नवमसमुल्लासः**—विद्या, अविद्या, बंध व मोक्ष यांची व्याख्या. ... ... | १४९—१ |
| १०. | **दशमसमुल्लासः**—आचार, अनाचार, भक्ष्य व अभक्ष्य. ... ... | १६४—१ |
| ११. | **एकादशसमुल्लासः**—आर्यावर्ती मतमतान्तरांचें खंडनमंडन. ... ... | १७५—२ |
| १२. | **द्वादशसमुल्लासः**—चार्वाक, बौद्ध, व जैनमतांचें परीक्षण. ... ... | २६८—३ |
| १३. | **त्रयोदशसमुल्लासः**—ख्रिस्तीयमत परीक्षण. ... ... ... | ३०७—३ |
| १४. | **चतुर्दशसमुल्लासः**—मुसलमानीमताचें परीक्षण. ... ... ... | ३४७—३ |

चतुर्दश समुल्लासाच्या अंतीं सनातन वेदविहितमताची विशेष व्याख्या लिहिली आहे, जी मला पूर्णपणें आहे.

हा ग्रन्थ लिहिण्याचा माझा मुख्य उद्देश हाच आहे कीं, सत्य अर्थाचा प्रकाश करावा, अर्थात् जें खरें आहे त्याला सत्य व जें खोटें आहे त्याला असत्य ठरवणें हा माझा मुख्य उद्देश आहे व यालाच मी सत्य र्थाचा प्रकाश समजत आहे. जो सत्याच्या ठिकाणीं असत्य व असत्याच्या ठिकाणीं सत्य बोलेल त्याला सत्यनिष्ठ सें म्हणतां येणार नाहीं; पण जो जसें असेल तसेंच लिहील, बोलेल व मानील त्यालाच सत्यनिष्ठ म्हणतां येईल. जो ुष्य पक्षपाती असतो तो आपल्या असत्यमताला सत्य भासवितो व प्रतिपक्षाच्या सत्यमतालाहि असत्य भास- गस प्रवृत्त होतो; म्हणून त्याला सत्य मताची प्राप्ती होऊं शकत नाहीं. याकरितां विद्वान् आप्तपुरुषांचें हें काम आहे कीं, यांनीं उपदेश व लेख यांच्याद्वारें सर्व मनुष्यांपुढें सत्यासत्याचा निर्णय मांडावा. त्यावरुन आपलें हिताहित पाहून सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग करून सदोदित आनंदाचा उपभोग घेतील. चा आत्मा सत्यसत्याला जाणणारा आहे. परंतु आपल्या स्वार्थासाठीं तो हठ, दुराग्रह व अविद्यादिदोष यामुळें सत्याला सोडून असत्याच्या बाजूला झुकतो; पण या ग्रंथामध्यें अशी गोष्ट आणली नाही व कोणाचें दुखविण्याचा किंवा कोणाची हानी करण्याचाहि प्रयत्न केलेला नाहीं. सत्योपदेशावांचून दुसऱ्या कोणत्याहि मनुष्यांची उन्नति होणार नाहीं; म्हणून ज्याच्या योगानें मनुष्यजातीची उन्नति व उपकार होईल त्या त्याचा निर्णय करून मनुष्यांनीं सत्याचें ग्रहण व असत्याचा परित्याग करावा; एवढ्यासाठीं आहे.

ग्रंथामध्यें जर कोठें अशुद्धि, लिहिण्याच्या किंवा छापण्याच्या दोषामुळें झाली असेल, तर ती कळतां- त्य असल्यास त्याप्रमाणें ताबडतोब शुद्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल; पण जर कोणी पक्षपातानें करण्याची खटपट करील तर त्याच्याकडे मात्र लक्ष दिलें जाणार नाहीं. हा जर कोणी मनुष्यमात्रांच्या सुधारणा करावयासाठीं सुचवील तर त्या खऱ्या असल्यास त्यांचाहि संग्रह केला जाईल. ामध्येंहि बरेच विद्वान पुरुष आजकाल असलेले दिसतात; तर ते पक्षपात सोडून सर्वतन्त्रसिद्धांतांचें गोष्टी सर्वांला अनुकूल व सत्य आहेत, त्यांचें-ग्रहण व ज्या विरुद्ध असून असत्य आहेत न परस्परांमध्यें प्रीतिपूर्वक वर्तन करतील तर जगताचें पूर्ण हित होईल; कारण विद्वानामध्यें विरोध विद्वानांतहि विरोध वाढतो व त्यामुळें दुःख वाढतें व सुख कमी होत जातें. स्वार्थी लोकांना प्रिय या हानीमुळेंच सर्व लोक दुःखसागरामध्यें बुडत चालले आहेत ! जेव्हां जेव्हां हितावर दृष्टि ठेवून कोणीं उच्चतम काम करण्यास प्रवृत्त होतो तेव्हां हेच स्वार्थी लोक त्याचा विरोध करुन त्याला अनेक प्रकारें विघ्न गतात. पण—

**सत्यमेव जयते नानृतम् । सत्येन पन्था विततो देवयानः ॥**

सर्वदा सत्याचा विजय होऊन असत्याचा पराजय होत असतो, व सत्याच्याच योगानें विद्वानांचा मार्ग तृत होत असतो; या वचनावर दृढ निश्चय ठेवून आप्त लोक परोपकारापासून व सत्य अर्थाचा प्रकाश ण्यापासून परावृत्त होत आहींत. पहा—

यत्तदग्रे विषमिव परीणामेऽमृतोपमम् ।। गीता ।।

हा सिद्धान्त अचल आहे. विद्यावृद्धि व धर्मप्राप्ति यांचीं जीं कामें असतात तीं प्रथमतः विषतुल्य भासतात. पण शेवटीं अमृतासारखीं होतात. या सर्व गोष्टी चित्तांत ठेवूनच मी हा ग्रन्थ लिहिला आहे.

श्रोत्यांनीं व वाचकांनीं या ग्रन्थाकडे प्रेमपूर्वक पाहून या ग्रन्थांतील सत्यभाव जाणून उचित वाटेल तें करावें. या ग्रन्थामध्यें असा प्रकार ठेवला आहे कीं, ज्या ज्या गोष्टी सर्व मतांमध्यें सत्य आहेत, त्या त्या सर्वांना अविरोधी असल्यामुळें त्याचा स्वीकार करुन ज्या ज्या मतमतांतरांतील मिथ्या गोष्टी आहेत त्यांचें खंडन केले आहे. सर्व मतमतांतरांतील गुप्त व प्रकट वाईट गोष्टीहि यांत दाखविण्याचें व त्या सर्व विद्वान व अविद्वान् यांच्यापुढें माडण्याचें कारण इतकेंच कीं, सर्वांनीं त्यावर विचार करुन सर्वांनीं प्रेमानें सत्याचेंच ग्रहण करुन सत्यामतावलम्बी बनावें. जरी मी आर्यावर्त्त देशांत उत्पन्न झालो आहे व येथेंच राहत आहे तथापि या ग्रन्थांत जसें या देशांतील मतमतांतराचा पक्षपात सोडून त्यांतील सत्यासत्याचा प्रकाश केला आहे. जसा मी स्वदेशीय मनुष्यांशीं देशांतील मतांचेंहि परीक्षण करून त्यांच्याशीं तसेंच निःपक्षपाती मी वर्तन ठेवीत आहे. जसा मी स्वदेशीय मनुष्यांशीं मनुष्योन्नति विषयांसंबंधानें वर्ताव करतों, त्याचप्रमाणें विदेशीयांशींहि वर्ताव ठेवतों व तसाच सर्व सज्जनांनींहि ठेवला पाहिजे. कारण जर मीहि कोणत्यातरी एकाच मताचा पक्षपाती झालों असतों तर आजकालच्या स्वमताची स्तुति व मंडन करून त्याचा प्रसार करणाऱ्या व दुसऱ्या मतांची हानी, निंदा व बंदी करण्यांत तत्पर होणाऱ्या लोकांप्रमाणेंच मीहि एक बनलों असतो, पण असें करणें मनुष्यपणाच्या बाहेरचें आहे. कारण पशू बलवान् झाले तर निर्बलांला दुःख देऊं लागतात तसें करणें मनुष्याला योग्य नाहीं. जर मनुष्यहि तसेंच करूं लागला, तर तो स्वभावयुक्त नसून पशुच होय. जो बलवान् होऊन निर्बलांचें रक्षण करतो त्यालाच मनुष्य म्हणतां येईल; पण जो स्वार्थी होऊन दुसऱ्याची हानी करण्यांत तत्पर होतो तो पशूंचा थोरला भाऊ आहे असें समजावें.

या पुस्तकांत आर्यावर्तीयांच्या मतांविषयीं अकराव्या समुल्लासापर्यन्त लिहिलें आहे. या समुल्लासांमध्यें जें सत्य मत प्रकाशित केलें आहे तें वेदानुकूल असल्यामुळें मला पूर्णपणें ग्राह्य आहे व नवीन पुराणतन्त्रादि ग्रन्थांचें खण्डन केलें आहे तें माझ्यामतें त्यक्तव्य आहे. बाराव्या समुल्लासामध्यें चार्वाकाच्या मतांचें परीक्षण केलें आहे. यद्यपि हें मत सध्यां प्रायः लुप्त झाल्यासारखें आहे, तथापि याचा बौद्ध व जैन मतांशीं निकट संबंध असल्यामुळें व तो निरीश्वरवादाचा प्रवर्तक असल्यामुळें व पक्का नास्तिक असल्यामुळें, त्याच्या मताला प्रतिबंध करणें आवश्यक आहे; जर असत्य गोष्टींना प्रतिबन्ध केला नाहीं तर त्यांचा जगांत प्रसार होऊन त्या मोठ्या अनर्थाला कारणीभूत होत असतात. म्हणूनच चार्वाक व तसेंच बौद्ध व जैन यांच्या मतांचें परीक्षण या समुल्लासामध्यें केलें आहे. चार्वाकाशीं या इतर बौद्ध व जैन मतांचा कांहीं बाबतींत विरोध आहे व कांहींमध्यें मेळ आहे व जैनहि बहुत अंशामध्यें चार्वाक व बौद्ध यांच्याशीं ऐकमत्य ठेवतात, पण कांहीं गोष्टींत त्यांचा परस्पर भेद आहे; म्हणून जैन ही मित्रशाखा आहे असें मानलें आहे. हे यांचे सर्व भेद बाराव्या समुल्लासामध्यें दाखविले आहेत. त्यांच्यांतील सर्व भेद व साम्य त्याच समुल्लासामध्यें पहावें व जैनमताविषयींहि तेथेंच पहावें. बौद्धांच्या दीपवंशादि प्राचीन ग्रन्थांतील, बौद्धमतसंग्रह, सर्वदर्शनसंग्रह या ग्रंथांतील जीं मतें आहेत, त्यांतूनच परीक्षणार्थ या पुस्तकांत उतारे घेतले आहेत; व जैनांच्या ज्या पुस्तकांतून उतारे घेतलें आहेत त्यांपैकीं चार मुख्य आहेत. १ आवश्यकसूत्र, २ विशेष आवश्यकसूत्र, ३ दशवैकालिकसूत्र, ४ पाक्षिकसूत्र, हे मूळ चार

सूत्र ग्रन्थ होत. यांची अकरा अङ्गें आहेत. १ आचाराङ्गसूत्र, २ सुयडाङ्गसूत्र, ३ थाणाङ्गसूत्र, ४ समवायाङ्गसूत्र, ५ भगवतीसूत्र, ६ ज्ञाताधर्मकथासूत्र, ७ उपासकदशासूत्र, ८ अंतगडदशासूत्र, ९ अनुत्तरोववाईसूत्र, १० निपाकसूत्र. व ११ प्रश्नाव्याकरणसूत्र, बारा उपाङ्गे आहेत, तीं हीं ; १ उपावाईसूत्र, २ रायप्सेनीसूत्र, ३ जीवाभिगमसूत्र, ४ पन्नगणासूत्र ५ जम्बुद्धिपपन्नतिसूत्र, ६ चन्दपन्नतिसूत्र, ७ सूरपन्नतिसूत्र; ८ निरयावलीसूत्र ९ कप्पियासूत्र, १० कप्पवडीसयासूत्र, ११ पूप्पियासूत्र, व १२ पप्पचूलियासूत्र, **कल्पसूत्रें** पांच आहेतः— १ उत्तराध्ययनसूत्र, २ निशीथसूत्र, कल्पसूत्र, ४ व्यवहारसूत्र, ५ जीतकल्पसूत्र. **छेद** सहा आहेतः— १ महानिशीथबृहद्वाचनासूत्र, २ महानिशीथलघुवाचनासूत्र, ३ मध्यमवाचनासूत्र, ४ पिंडनिरुक्तिसूत्र, ५ औघनिरुक्तिसूत्र, ६ पर्यूषणासूत्र. **पयम्नसूत्रें** दहा आहेतः— १ चतुःस्सरणासूत्र, २ पंचखाणसूत्र, ३ तदुलवयालिकसूत्र, ४ भक्तिपरिज्ञासूत्र, ५ महाप्रयाख्यनसूत्र, ६ चंदाविजयसूत्र, ७ गुणीविजयसूत्र, ८ मरणसमाधिसूत्र, ९ देवेन्द्रस्तनसूत्र, १० संसारसूत्र, हे लोक या ग्रन्थाप्रमाणेंच नन्दीसूत्र व योगोद्धारसूत्र हेहि ग्रंथ प्रमाण मानतात यांच्या ग्रंथांचीं पंचअङ्गें १ पूर्व सर्व ग्रन्थांच्या टीका, २ निरुक्ति, ३ चरणी, ४ भाष्य व ५ मूलग्रन्थ हीं होत. यांमधील ढूंडिया अवयवांला ( अङ्गाला ) मानीत नाहींत. याशिवायहि असे आणखी पुष्कळ ग्रन्थ आहेत कीं, ज्याला जैन लोक प्रमाण समजतात. या त्यांच्या मतावर विशेष विचार बाराव्या समुल्लासांत केलेला आहे. जैनांच्या ग्रन्थांमध्यें पुनरुक्तीचे दोष लाखो आहेत व या लोकांचा असा एक विलक्षण स्वभाव आहे कीं यांचाच ग्रन्थ जर अन्यमतावलम्बी पुरुषाजवळ असला किंवा तोच छापलेला असला तर यांच्यांतील कांहीं कांहीं लोक त्याला अप्रमाण मानतात हा त्यांचा समज खोटा आहे कारण कोणी मानतात व कोणी नाहीं. एवढ्यानेंच तो ग्रन्थ जैन मताचा नाहीं असें होत नाहीं हां, ज्या ग्रन्थाला कधींहि कोणी जैनी माणसानें प्रमाण मानलें नाहीं त्याला अग्राह्य मानता येईल. पण असा कोणताहि ग्रन्थ नाहीं कीं, त्याला कोणताहि जैन मानीत नाहीं; म्हणून जो मनुष्य जो ग्रन्थ मानीत असेल त्या ग्रन्थांतील विषयाचें खंडन मंडन त्या माणसासाठींच आहे असें समजावें कित्येक पुरुष असे आहेत कीं ' ते कांहीं ग्रन्थांना प्रमाण पण समजतात पण सभेमध्यें किंवा वादविवादाच्या वेळीं भिन्न मत देतात ! हें ठीक नाहीं. जैन लोक आपल्या ग्रन्थांना अगदी गुप्त ठेवतात कोणा दुसऱ्या माणसाला दाखवीतहि नाहींत. देत नाहींत, ऐकवीत नाहींत व शिकवीतहि नाहींत ! याचें कारण इतकेंच कीं. त्यामध्यें अशा असंभवनीय गोष्टी भरलेल्या आहेत कीं, त्यांचें त्यांचें उत्तर कोणीहि जैन दउं शकत नाहीं. असत्य गोष्टीला सोडणें हेंच उत्तर आहे.

तेराव्या समुल्लासामध्यें ख्रिस्तीयन लोकांचें मत लिहिलें आहे. हे लोक बायबलाला आपलें धर्मपुस्तक मानतात. याचे विशेष परीक्षण तेराव्या समुल्लासामध्यें पहा. १४ व्या समुल्लासामध्यें मुसलमानांच्या मताचें परीक्षण केलें आहे. हे लोक कुराणाला आपलें धर्मपुस्तक समजतात. यांचें विशेष निरीक्षण चवदाव्या समुल्लासामध्यें पहावें. या पुस्तकाच्या शेवटीं वैदिक मत दिलेलें आहे. याप्रमाणें या ग्रन्थाची व्यवस्था आहे. जो कोणी मुद्दाम विरोध करण्यासाठींच या ग्रन्थाकडे पाहील त्याला या ग्रन्थापासून विशेष लाभ होणार नाहीं; कारण **१ आकाङ्क्षा, २ योग्यता, ३ आसत्ति व ४ तात्पर्य** या चार कारणांनीं वाक्यार्थाचा बोध होत असतो. जेव्हां या चारहि गोष्टीवर ध्यान देऊन कोणी मनुष्य ग्रन्थावलोकन करतो तेव्हांच त्याला त्याचा यथार्थ अभिप्राय विदित होत असतो. पहा—१ आकाङ्क्षा कोणत्या विषयावर वक्त्याची व वाक्यांची परस्पर काय आकाङ्क्षा आहे तें पाहणें, २ योग्यता— ज्याच्यापासून जें होऊं शकतें ती योग्यता जसें

पाण्यापासून सिंचन होऊं शकतें ( तसें ज्ञान्यापासून उत्तम ग्रन्थ बनूं शकतात. ) ३ **आसत्ति**—ज्या शब्दाशीं ज्या पदाचा संबंध असेल त्याच्याशींच तें पद लिहिणें किंवा बोलणें. ४ **तात्पर्य**—ज्या कारणासाठीं वक्त्यानें शब्दोच्चारण किंवा लेखन केले असेल त्याच्यांशींच त्याच्या शब्दांचा व लेखाचा संबंध जोडणें.

पुष्कळ हट्टी व दुराग्रही लोक असे असतात कीं, ते वक्त्याच्या अभिप्रायाच्या विरुद्धच कल्पना करीत असतात. विशेषत: मताभिमानी लोक हट्टी असतात, कारण स्वमताच्या अभिमानानें त्यांची बुद्धि अंधकारांत नष्ट झालेली असते. यासाठीं ज्याप्रमाणें, मी पुराणें, जैनांचें ग्रन्थ, बायबल, कुराण वगैरे ग्रन्थांना प्रथमत:च वाईट दृष्टीनें पाहून त्यांचा अव्हेर केला नाहीं. तर त्यांतील गुणांचे ग्रहण करुन दोषांचा त्याग केला व सर्व मनुष्यजातीच्या उद्धारासाठीं मी प्रयत्न करीत आहे, त्याचप्रमाणें सर्वांनीं करावा हें उत्तम.

या मतांतील थोडयोड्या दोषांचाच प्रकाश येथें केलेला आहे. त्यावरुन सत्यासत्याचा निर्णय करून असत्याचा त्याग व सत्याचें ग्रहण करण्यास सुज्ञांनीं तयार व्हावें. मनुष्याला भ्रमांत पाडून, त्याची बुद्धी भ्रष्ट करून, एकमेकांत शत्रुत्व उत्पन्न करुन, मनुष्यांत दुही उत्पन्न करणें हें विद्वानांचें काम नव्हे. जरी हा ग्रंथ पाहून अविद्वानांच्या मनांत अन्यथा विचार येतील, तथापि बुद्धिमान् लोक याचा यथायोग्य अभिप्राय जाणतील. एवढ्यानें मी माझे परिश्रम सफल झाले असें समजून हे प्रयत्न सर्व सज्जनांच्या पुढें ठेवीत आहे. यांना पाहून व लोकांला दाखवून माझ्या श्रमांचें सार्थक्य करावें. याचप्रमाणें पक्षपात सोडून सत्य अर्थाचा प्रकाश करणें हें जसें माझें, तसेंच तें इतर महाशयांचेंहि मुख्य कर्तव्य आहे. सर्वात्मा सर्वांतर्यामी सच्चिदानंद परमात्मा आपल्या कृपादृष्टीनें या आशयाला विस्तृत व चिरस्थायी करो.

॥ अलमतिविस्तरेण बुद्धिमद्वरशिरोमणिषु ॥

॥ इति भूमिका ॥

स्थान, महाराणाजींचें
उदयपुर, भाद्रपद
शुक्लपक्ष संवत् १९३९

**(स्वामी ) दयानन्द सरस्वती**

# सत्यार्थप्रकाश

## अनुक्रमणिका

### प्रथमसमुल्लास

ईश्वरनामव्याख्या, मंगलाचरण:— ... ... ... ... ... पान १३–२४

### द्वितीयसमुल्लास

बालशिक्षा:— ... ... ... ... ... ... पान २५–३०

**आईबापांचीं कर्तव्यें**:—भाग्यवान् पुत्र, धन्यकुल, श्रेष्ठमाता, भक्ष्य व अभक्ष्य पदार्थ, ऋतुदानाला योग्य रात्रीं कोणत्या ? स्त्रीपुरुषांचें प्रसन्नचित्त, स्त्रीप्रसूतीनंतर करण्याची व्यवस्था, दाई व गाई, स्त्रीपुरुषांच्या ब्रह्मचर्याशीं पुत्रांच्या दीर्घायुत्वाचा संबन्ध, मुलांचें प्राथमिक शिक्षण, वर्णोच्चाराकडें लक्ष्य पुरविणें, सदाचरण व उच्चमनोवृत्ति मुलांत उत्पन्न करणें, भूतप्रेत , पंचाक्षरीबुवाचें प्रस्थांतील सत्यासत्यतेचा विचार. फलज्योतिष, जोशीबुवांची पद्धति व लोकांचा भोळेपणा. मन्त्रतन्त्र, मांत्रिक लोक व अशिक्षित लोक. वीर्यरक्षण, शिक्षा. मुलांच्या हिताच्या गोष्टी, नियमित वेळीं काम करण्याची संवय, कृतघ्नता, त्याग दुसऱ्याचा सन्मान, थोरांचें अनुकरण विचारानें ठरवणें व धैर्यानें करणें, मुलांना सुशिक्षण व आईबापांचें मुख्य कर्तव्य.

### तृतीयसमुल्लास

अध्ययन व अध्यापन:—... ... ... ... ... ... पान ३१–३०

**विद्या हेंच खरें भूषण**:—दागदागिनें व विद्या यांचीं तुलना, स्त्रीपुरुषांना विद्या हवी, आचार्यकुल ब्रह्मचर्य, पाठशाला कोठें स्थापाव्या ? गायत्रीमन्त्र, गायत्रीमन्त्राचा अर्थ, शरीरशुद्धि, प्राणायामाचें फल, प्राणायामाचा विधी, आचमन, मार्जन, अघमर्षण, गायत्रीमन्त्राचा जप, देवयज्ञ, हवनकुंड, समिधा, प्रोक्षणीपात्र, प्रणीतापात्र, आज्यस्थाली, चमस, हवनमन्त्र होमाचें फल, वायुशुद्धि, रोगनिवारण, आरोग्य, दुःखनिवृत्ति, **उपनयनसंस्कार, ब्रह्मचर्याची मर्यादा, विवाहाचा काल, यम व नियम, गुरूचा उपदेश**, सत्यभाषण, निंद्याचरणाचा त्याग, दान व परोपकार यांची योग्यता व आवश्यकता, सदाचरणाचें श्रेष्ठत्व, नास्तिकाचें लक्षण, धर्माचें चतुर्विधलक्षण, धर्मग्रहणाला योग्य मनुष्य, **चारहि वर्णांना शिक्षणाची आवश्यकता, पंचविधप्रमाण–परीक्षा, अष्टविधप्रमाणांची व्याख्या**:— ( १ ) प्रत्यक्ष, ( २ ) अनुमान, पूर्ववत् शेषवत् व सामान्यतः दृष्ट अनुमान ( ३ ) उपमान, ( ४ ) शब्दप्रमाण, ( ५ ) ऐतिह्य, ( ६ ) अर्थापत्ति, ( ७ ) संभव व ( ८ ) अभाव, षट्तत्वांचें ज्ञान:—( १ द्रव्यतत्व, पृथ्वी आप, तेज, वायु, आकाश, काल दिशा, आत्मा व मन यांचीं लक्षणें व त्यांचे गुण, ( २ ) गुणतत्व, चोवीस गुण, ( ३ ) कर्मतत्व, पांच तत्वांचीं पांच कर्में, ( ४ ) सामान्यतत्व, ( ५ ) विशेषतत्व व ( ६ ) समवायतत्व, कार्यकारणसंबंध, परिमाण, सत्ता, अभावाचें पांच प्रकार, प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अन्योन्याभाव, अत्यन्ताभाव व संसर्गभाव, **विद्या व अविद्या, नित्यत्व व अनित्यत्व, समवायसंबन्ध**, संयोगसंबन्ध, एकार्थसमवायसम्बन्ध व विरोधसंबन्ध, व्याप्ति, वस्तुसिद्धि अध्ययन व अध्यापन, शिक्षा व्याकरण शिकविण्याची रीती, धातुपाठ, निघण्टु, निरुक्त. छन्द, मनुस्मृति, रामायण, महाभारत, षड्दर्शनें, दशोपनिषद्, चारवेद व चार ब्राह्मण ग्रंथ, अर्थज्ञानाशिवाय वेदपाठ उपयोगी नाही, ग्रंथप्रामाण्य, आदरणीय ग्रन्थ व त्याज्य ग्रन्थ, ब्राह्मण, कल्प, गाथा, नाराशंसी, इतिहास, पुराण, षड्दर्शनांतील विरोधाचें निराकरण, विघ्नें, वेदाध्ययनाचा अधिकार, सर्व वर्णांतील स्त्रीपुरुषांना वेदाध्ययनाचा अधिकार, विद्यादानाचें महत्व.

### चतुर्थसमुल्लास

समावर्तन, विवाह व गृहस्थाश्रम:— ... ... ... ... ... पान ५५–८०

**समावर्तनसंस्कार** विवाहसंस्कार, असपिण्डांत विवाह होण्याची आवश्यकता, दूर देशांतील वधूवरांचा संबन्ध व्हावा, कोणत्या कुमारिकांशीं विवाह करूं नये, **विवाहाचा समय** कोणता, स्त्रीपुरुषांचें ब्रह्मचर्य

व विवाह, बालविवाहाबद्दल शास्त्रार्थ, प्रौढविवाहाला वैद्यशास्त्राचीं सम्मति, ऋतु प्राप्त झाल्या नंतरहि तीन वर्षेपर्यंत अविवाहित राहण्यास मनुची सम्मति, विवाहास वधुवरांची सम्मति, ब्रह्मचर्य व उन्नति, श्रीमंतांनीं व गरीबांनी त पाळले पाहिजे. वर्णव्यवस्था:—गुणकर्मानुसार वर्णव्यवस्था असण्याबद्दल धर्मशास्त्राचे आधार, ब्राह्मणाचे गुणकर्मस्वभाव, क्षत्रियाचे गुणकर्मस्वभाव, वैश्याचे गुणकर्मस्वभाव, शूद्राचे गुणकर्मस्वभाव, विवाहांचें प्रकार व त्यांचीं लक्षणें :— ( १ ) ब्राह्म, ( २ ) दैव, ( ३ ) आर्ष, ( ४ ) प्राजापत्य, ( ५ ) आसुर, ( ६ ) गान्धर्व, ( ७ ) राक्षस, ( ८ ) पैशाच, विवाहाचे आठ प्रकार, गुरुकुलांत राहाणाऱ्या वधुवरांचा विवाह करण्यांची रीति, गर्भाधान, गर्भधारणानंतर स्त्रीपुरुषांनीं व्रतस्थ राहणें, बाळंतपण, पुंसवन, सीमन्तोन्नयन, नालछेदन, हवन, नामकरण, ऋतुकालीं स्त्रीगमन, स्त्रियांची घरामध्यें योग्यता, स्त्रियांशीं घरांतील पुरुषांचें वर्तन, सर्वदेशांतून स्त्रिया, विद्या, धन व कलाकौशल्य आणावें, अप्रिय पण पथ्यकारक भाषण, स्तुति व निन्दा, पंचमहायज्ञ, ब्रह्मयज्ञ व देवयज्ञ,पितृयज्ञ देवतर्पण, ऋषितर्पण, पितृतर्पण, वैश्वदेव, अतिथियज्ञ, पंचमहायज्ञाचें फल, सामान्यनियम, प्रातःकाळीं उठणें, धर्माचरण व अधर्माचरण, वैदिकधर्माचें अवलंबन, कोणाशीं वादविवाद करूं नये व कोणाशीं करावा, दान कोणास देऊं नये ? :— सत्पात्र व कुपात्र यांचा विचार व दान देण्याचें महत्व, पाखण्डी कोण ? धर्माची आवश्यकता, सुखदुःखलक्षण, अध्यापक कसे असावे ? मूर्खाचीं लक्षणें, विद्यार्थ्याचें लक्षण, पूर्ण विद्वान होण्याचा उपाय, स्त्रिया विघडण्याचें कारण, पुनर्विवाह व नियोग, अक्षतयोनि स्त्रीचा पुनर्विवाह, अन्य पुनर्विवाहाचा निषेध, नियोग, पुनर्विवाह व नियोग यांतील भेद, आमरणान्त ब्रह्मचर्य व त्याचें श्रेष्ठत्व, संततीची संख्या, जितेन्द्रियता, एकपत्नी व एक पतिव्रत, नियोगाबद्दल वैदिक आधार, वेश्यागमन, परस्त्रीगमन, वीर्यरक्षण, गृहस्थाश्रमाचें श्रेष्ठत्व, गृहस्थाश्रम व ब्रह्मचर्य.

### पञ्चमसमुल्लास

**वानप्रस्थ संन्यासाश्रमाचे विधी:—** ... ... ... ... पान ८१—८८

वानप्रस्थविधी, संन्यासविधी, विशेषधर्म, धर्माचीं दहा लक्षणें, संन्यास धर्म, अविवाहित कोणी रहावे, विद्वत्व व नृपत्व.

### षष्ठसमुल्लास

**राजधर्म:—** ... ... ... ... ... ... पान ८९—११०

तीन सभांची योजना, अनियन्त्रित राजा प्रजेला घातक, शूर राजा, राष्ट्राची उन्नति व राजाचें कर्तव्य, सभापतिचे गुण, खरा राजा कोण ? दंड व शिक्षा, विद्वान अधिकारी, दशावरा परिषद, विद्वानांचीं परिषद, राजपुरुषांना अवश्य लागणारे गुण, दुर्व्यसनांचा परिणाम, काममूलक व्यसनें, क्रोधमूलक व्यसनें, मन्त्री राजसभेचे सभासद, दूतांचें लक्षण, अधिकारव्यवस्था, राज्यरक्षणाचे उपाय, दुर्ग कसा असावा ? राज्यव्यवस्थेचे सामान्य नियम, युद्धव्यवस्था, पुरुषार्थाची पराकाष्टा, दक्षता, राष्ट्राची स्वस्थता व राज्यक्रांतीचीं कारणें, राष्ट्राचें रक्षण, करग्रहण, राजाची दीनचर्या, सन्धि व विग्रह, संक्षिप्त राजनीति, लढाईची तयारी, शत्रु, मित्र व उदासीन, दुपारचा कार्यक्रम, करांचें प्रमाण, न्यायव्यवस्था, साक्षी, अपराध्यास दण्ड, व्यभिचाऱ्याला शिक्षा, जकात, तपासणी.

### सप्तमसमुल्लास

**वेद व ईश्वर:—** ... ... ... ... ... ... पान १११—१३१

देवता व परमेश्वर, परमेश्वराचें व्यापकत्व, ईश्वराचें अस्तित्व, ईश्वराची स्तुति, सगुणस्तुति व निर्गुण स्तुति,

प्रार्थना, उपासना, परमेश्वराच्या गुणांचें वर्णन, अवतार, जीवांची स्वतन्त्रता, द्वैत व अद्वैतवाद, परमेश्वराचें सगुणत्व, वेदांची उत्पत्ति व त्यांचे नित्यत्व.

अष्टमसमुल्लास

**जगताची उत्पत्ति, स्थिति व प्रलयः—** ... ... ... ... पान १३२—१४८

सृष्टीच्या पूर्वीचें तमःस्वरूप, हिरण्यगर्भ, प्रकृति, जीव व परमेश्वर, प्रकृतीचे तीन भेद, सत्व, रज व तम हे तीन गुण, अद्वैतवाद, जगताचीं तीन कारणें, गौडपादाचार्यांचें मत, सृष्टि कां उत्पन्न केली ? निराकार ईश्वरच सृष्टीकर्ता आहे, शून्यवादखंडन, अभाववाद, अनिमित्तवाद, व नित्यवाद, भूतनित्यवाद व पृथक्वाद षड्दर्शनांचा एकविषय, सृष्टीचा प्रारंभ व माणसें, सृष्टियुत्पत्ति मनुष्य कोठें उत्पन्न झाला ? त्रिविष्टप, मेरु, दस्यु व आर्य, आर्यावर्ताची मर्यादा, देव व असुर, पृथ्वीचा आधार, आकर्षण, इतर गोलांवर प्राण्यांची वस्ती, वेद.

नवमसमुल्लास

**विद्या, अविद्या, बन्ध व मोक्ष यांच्या व्याख्या:—** ... ... ... पान १४९—१६३

अविद्येचें लक्षण, बन्धमोक्षाची नित्यनैमित्तिकता, चिदाभास, अध्यारोप, अद्वैतवाद मुक्ति व बन्ध मुक्ती—मधील जीवाचें सुख, जीवाची शक्ति, मुक्तींतून पुनरावृत्ति, मुक्तीचें साधन, वैराग्य, षट् संपत्ति, वाममार्गी लोकांच्या मुक्तीच्या कल्पना, चार प्रकारची मुक्ति, पुनर्जन्म, मृत्यु, यमलोक, मुक्तीमध्यें परमेश्वराचा आधार, स्वर्ग व नरक, पाप व शिक्षा, सत्व, रज व तम, त्रिविधगति, साधनांतील तत्व.

दशमसमुल्लास

**आचार अनाचार, भक्ष्य व अभक्ष्यः—** .. ... ... ... पान १६४—१७३

आचार व अनाचार, खराधर्म, धर्माचे आधार, आत्मतुष्टि, श्रौत व स्मार्तधर्म नास्तिकाची व्याख्या, धर्माचें लक्षण, संस्कार, केशान्तसंस्कार, मुंडन, शिखा, आत्मसंयमन, जितेन्द्रिय, उपदेश, मान्यता वाढविणारीं स्थानें, थोरपणा, शरीराचे वृद्धत्व व ज्ञान, कल्याणाचा उपदेश, धर्मवृद्धि, स्वच्छता, आरोग्य व पुरुषार्थ, वडिलांशीं करावयाचें कर्तव्य, परदेशगमन, व्यासांचें अमेरीकेंत गमन, शुक्राचें मिथिला नगरींत आगमन, मेरुवर्ष, हरिवर्ष, (युरोप), हूण, चीन, पाताल ( अमेरिका ) इत्यादि, देशान्तरीं जाण्यानें उन्नति, वेश्यागमन, व्यापार, राज्य वगैरेची उन्नति, स्पृष्टास्पृष्टतेचा बखेडा, मांसादिपदार्थभक्षण वर्ज्य करणें, स्पर्शास्पर्श निर्लेप, कच्ची व पक्की रोटी, स्वतः अन्न शिजविणें, शूद्र व भोजनादि व्यवहार साक्षात् व परम्परेनें स्पर्शास्पर्श, छूही, आर्यावर्ताचे दुःख, भक्ष्याभक्ष्य, मांस व मधु वर्ज्य, गाई व म्हैशी आदि उपयोगी पशूंचें पालन, हिंस्र पशू, उच्छिष्टान्नभक्षण निषेध, अभक्ष्यान्न, गाईचें शेण, चौका.

एकादशसमुल्लास

**आर्यावर्तीय मतांचें खण्डनमण्डनः—** १७५—२६६

द्वादशसमुल्लास

**चार्वाक, बौद्ध व जैनमतांचें परीक्षणः—** २६८—३०५


त्रयोदशसमुल्लास

**ख्रिस्तीमत परीक्षणः—** ३०७—३४५

चतुर्दशसमुल्लास

**मुसलमानीमत परीक्षण :—** ३४७—३९२

**स्वमन्तव्यामंतव्य प्रकाशः** ३९३—३९८



# सत्यार्थप्रकाशाच्या

## सत्कार

मी सत्यार्थप्रकाश कमींत कमी ३८ वेळां वाचला जितक्या वेळां वाचत होतो, मला तन, मन तथा आत्म्याला नवीनच आनंद होत होता. पुस्तक गूढ तत्वांनीं व सत्यतेनें भरलेलें आहे

—मुनिवर पं. गुरुदत्त जी विद्यार्थी एम. ए.

हिंदुजातीच्या थंडशा रोमरोमांत उष्ण रक्ताचा संचार करणारा हा ग्रंथ अमर होवो अशी माझी कामना आहे सत्यार्थप्रकाशाच्या विद्यमानतेंत कोणी विधर्मी आपल्या पंथाची शेखी मारूं शकत नाहीं

—स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

गुरुदेवरचित सत्यार्थप्रकाश माझ्या जीवनांत प्रकाश देणाऱ्या सूर्यासारखा आहे

—लाला लाजपतराय

ऋषिदयानंदांनीं अन्य धर्मांवर केव्हां व कोठें घृणास्पद दृष्टि केली आहे ? मला तर याचा पत्ता लागत नाहीं; त्यानीं असें तर कुठें सांगितलें नाहीं कीं अमुक धर्म वाईट व घृणास्पद आहे आणि म्हणून अनुयायांनीं तो सोडावा; त्यांनीं सत्यार्थ-प्रकाशांत अन्यधर्म संबंधीं ज्या ग्रंथांची आलोचना केली आहे तें त्यांच्या विचारस्वातंत्र्याचें एक सुंदर उदाहरण आहे. विचास्वतंत्र्याला घाबरणें केवळ कायरता आहे. जर ऋषींनीं सत्यार्थप्रकाशांत स्वतंत्र आलोचना केली आहे तर तें एक पुण्यकारक कार्य केलें आहे. अन्यधर्मीयांनीं त्यावर स्थिरचित्तानें विचार केला पाहिजे. जर ऋषींनीं सांगितलेले दोष ठीक वाटतील तर प्रसन्नतापूर्वक त्यांनीं आपल्या धर्माचा संस्कार करावा. ऋषीच्या हृदयांत विश्वप्रेमाची विमलधारा प्रवाहित होत होती. वसुधैव–कुटुंबक त्यांची प्रधान नीति हो ा.

भले ! त्यावेळीं त्यांच्या संदेशाचा विशेष प्रभाव देशावर पडला नसेल, पण आज त्यांच्या संदेशाचें मूर्तिमान स्वरूप दिसत आहे; स्वराज्याचा स्वर ऊंच होत आहे; समाजावर संस्कार होत आहेत; धर्माच्या वाईट चाली दूर केल्या जात आहेत; या सर्वाचें श्रेय स्वामी दयानंदांना आहे

—प्रो. जहूर बक्ष ( इरा )

मला भारतांत येऊन खऱ्या हिंदुधर्माचा परिचय सत्यार्थप्रकाशाच्या स्वाध्यायानें झाला आहे कारण मार्गानें भटकणाऱ्यांना हा पथ–प्रदर्शक आहे.

—पाद्री सी. एफ्. अँड्रूज.

ऋषि दयानंदांनीं आपल्या सत्यार्थप्रकाशांत एकाबाजूनें तर युक्तिप्रमाणांनीं वैदिक सिद्धान्ताची स्थापना केली व दुसऱ्या बाजूनें विविध मतमतांतरांची न्यायपूर्ण युक्तियुक्त समीक्षादेखील केली. तुलनात्मक व निष्पक्ष धार्मिक विचारांचा आदर्श स्वामी दयानंद होते. सत्यार्थप्रकाशावर जे लोक चिडतात आणि या करितां आर्यसमाजाला दोष देतात ते विसरतात कीं, हें युग तुलनात्मक विचाराचेंच आहे. सत्यार्थप्रकाशानें धार्मिक जगतांत क्रांति उत्पन्न केली आहे. सत्यार्थप्रकाश संसाराचें दिग्दर्शक-यंत्र आहे.

—प्रो. रमेशचंद्र बानर्जी एम्. ए.

जर कोणी सत्याचा प्रेमी सत्यार्थप्रकाशाच्या त्या समुल्लासांवर रुष्ट असेल, ज्याच्यांत स्वामीजींनीं अन्तर्दृष्टि व उपयुक्त भाषेंत सर्वधर्मांच्या व मतांच्या रूढिवादांची व अन्धपरम्परेची आपल्या दृष्टिकोणांतून आलोचना केली आहे, तर मला खेद होईल. कुठलाही धर्म व धर्मसुधारक एकाचवेळीं कोमल व प्रभावशाली होऊं शकत नाहीं

—सर सीताराम युक्तप्रान्ताच्या ( कौंसिलचे भूतपूर्व अध्यक्ष )

॥ ओ३म् ॥

# आर्यसमाजाचे नियम.

-:०:-

१. सर्व सत्यविद्या व जे पदार्थ विद्येनें जाणले जातात त्या सर्वांचें आदिमूळ परमेश्वर होय.

२. ईश्वर सच्चिदानंदस्वरूप, निराकार, सर्वशक्तिमान्, न्यायकारी, दयाळू, अजन्मा, अनंत निर्विकार, अनादि, अनुपम, सर्वाधार, सर्वेश्वर, सर्वव्यापक, सर्वान्तर्यामी, अजर, अमर, अभय, नित्य, पवित्र व सृष्टिकर्ता आहे; त्याचीच उपासना करणें योग्य आहे.

३. वेद सत्यविद्येचें पवित्र शास्त्र आहे. वेद शिकणें, शिकविणें, ऐकणें व आणि ऐकविणें हा प्रत्येक आर्यांचा परम धर्म आहे.

४. सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग करण्यास सर्वदा तत्पर असावे.

५. सर्व कामें धर्मानुसार अर्थात् सत्यासत्यांचा विचार करून वर्तन केलीं पाहिजेत.

६. जगावर उपकार करणें हा या समाजाचा मुख्य उद्देश आहे; अर्थात् शारीरिक, आत्मिक व सामाजिक उन्नति करणें.

७. सर्वांबरोबर प्रीतिपूर्वक, धर्मानुसार, यथायोग्य वर्तन केलें पाहिजे.

८. अविद्येचा नाश व विद्येची वृद्धि केली पाहिजे.

९. प्रत्येकानें आपल्या स्वतःच्याच उन्नतिमध्यें संतुष्ट राहतां सर्वांच्या उन्नतिमध्यें आपली उन्नति समजावी.

१०. सर्व सामाजिक हितकारी नियम पाळण्यात सर्व मनुष्यांनीं परतंत्र असलें पाहिजे व प्रत्येक हितकारी नियम पाळण्यांत त्यांनीं स्वतंत्र असावें.

ओ३म्

सच्चिदानन्देश्वराय नमो नमः ।

# ईश्वरनामव्याख्या

**ओ३म् । शन्नो मित्रः शं वरुणः शन्नो भवत्वर्यमा । शन्न इन्द्रो बृहस्पतिः शन्नो विष्णुरुरुक्रमः । नमो ब्रह्मणे । नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वामेव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि । ऋतं वदिष्यामि । सत्यं वदिष्यामि । तन्मामवतु तद्वक्तारमवतु । अवतु मामवतु वक्तारम् । ओ३म् शान्तिः शान्तिः शान्तिः ॥** तैत्तिरी० प्र० अ० १.

(ओ३म्) हा ओम् शब्द परमेश्वरवाचक आहे. परमेश्वराच्या इतर नांवापेक्षां हें नांव सर्वांत उत्तम आहे. कारण, ओंकारांतील "अ-उ-म्" या तीन अक्षरांपासूनच परमेश्वराच्या इतर पुष्कळ नांवांचा बोध होतो. अकारापासून **विराट्, अग्नि, विश्व** यांचा, **उकारापासून हिरण्यगर्भ, वायु, तैजस** यांचा व मकारापासून **ईश्वर, आदित्य, प्राज्ञ** यांचा, बोध होतो. प्रकरणानुसार हीं सर्व नांवें परमेश्वराचींच आहेत असें वेदादि सत्यशास्त्रामध्यें प्रतिपादन केलेलें आहे. (**पूर्वपक्ष्याचा प्रश्न**) ही वरील नांवें परमेश्वराशिवाय इतर पदार्थांची वाचक आहेत कीं नाहींत? ब्रह्मांड, पृथिवी वगैरे भूतें, इन्द्रादिक देवता व वैद्यशास्त्रांत सुंठ वगैरे पदार्थ यांनाही हेच शब्द वापरण्यांत येतात कीं नाहीं? (**सिद्धांत्याचें उत्तर**) होय, पण ते आणखी परमेश्वराचेही वाचक आहेत. (प्र.) केवळ देवांचेंच ग्रहण या नांवानें कां करूं नये? (उ) तुम्ही ह्मणतां तसें ग्रहण करण्यास काय प्रमाण आहे? (प्र) देव प्रसिद्ध आहेत व ते उत्तमही आहेत. ह्मणून आम्ही विराट् वगैरे शब्दानीं त्यांचेंच ग्रहण करतों. असें करणें चूक आहे काय? (उ) परमेश्वरही प्रसिद्ध आहे व सर्वोत्तमही तोच आहे, मग ही नांवें त्याचींच आहेत असें कां मानीत नाहीं? परमेश्वर अप्रसिद्ध नाहीं व त्याहून दुसरा कोणी उत्तमही नाहीं; अर्थात् तोच सर्वांहून श्रेष्ठ आहे ह्मणून तुमचें म्हणणें स्वीकारल्यास पुष्कळ दोष उत्पन्न होतात. पहा—**उपस्थितं परित्यज्यानुपस्थितं याचत इति बाधितन्यायः ।** तयार असलेलें भोजन टाकून जो तयार नसलेल्याची इच्छा करतो किंवा तत्प्रीत्यर्थ श्रम करतो त्याला कोणीही सुज्ञ असें म्हणणार नाहीं. त्याचप्रमाणें **विराटादिक** नांवाच्या योगानें प्रसिद्ध व प्रमाणसिद्ध परमेश्वर व ब्रह्मांडादिक पदार्थ यांचें ग्रहण न करतां, अनुपस्थित व असंभव अशा अन्य कल्पित देवांचें ग्रहण करणें हेंही वरच्याप्रमाणेंच जाणावें. **विराटादिक** शब्दांनी परमेश्वरव्यतिरिक्त अन्य देवांचें ग्रहण करण्याल कोणतेंही प्रमाण किंवा युक्तिही नाहीं. जर तुम्ही असें म्हणाल कीं, प्रकरणानुसार वरील शब्दांचे अर्थ केले पाहिजेत. तर तें आह्मांला मान्य आहे. "हे भृत्य! त्वं सैंधवमानय" असें जर कोणीं मनुष्यानें आपल्या नोकरास सांगितलें तर त्याचा अर्थ नोकरानें प्रकरणानुकूलच केला पाहिजे. कारण "हे नोकरा! तूं सैंधव घेऊन ये" अशी जी धन्याची आज्ञा झाली आहे ती कोणत्या वेळीं झाली आहे याचा त्यानें विचार केला पाहिजे. सैंधव शब्दाचे "मीठ व घोडा" असें दोन अर्थ आहेत, त्यांपैकीं कोणता घ्यावयाचा याचा विचार पूर्वापारसंबंध पाहूनच झाला पाहिजे. धनी जेवीत असतां, सैंधव शब्दाचा मीठ असा अर्थ समजावयाचा, व बाहेर हिंडायास जात असतां, घोडा असा त्याचा अर्थ घ्यावयाचा; इत्यादि प्रकारांप्रमाणें जर तो नोकर अर्थ समजला नाहीं, तर त्याला व्यवहार समजत नाहीं ह्मणून त्याचा धनी त्याला नोकरीवर ठेवणार नाहीं. याचें तात्पर्य इतकेंच कीं, जरी शब्दाचे अर्थ अनेक असले तरी त्यांचा अर्थ पूर्वापार संबंध पाहून जो योग्य असेल तोच घेतला पाहिजे. ही गोष्ट सर्वांनीं मान्य करण्यासारखी आहे. वरील मंत्राचा अर्थ करण्यास लागणारीं प्रमाणें:—

**ओ३म् खं ब्रह्म ॥ १ ॥** यजु० ४०।१७ ॥ **ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत ॥ २ ॥** छाँ उ० ॥ १ ॥ **ओमित्येतदक्षरमिदँ सर्वं तस्योपव्याख्यानम् ॥ ३ ॥** मां० उ० ॥ १ ॥ **सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपाँसि सर्वाणि च यद्वदन्ति । यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण ब्रवीम्योमित्येतत् ॥ ४ ॥** क० उ० २।१५ ॥ **प्रशासितारं सर्वेषामणीयांसमणोरपि । रुक्माभं स्वप्नधीगम्यं विद्यात्तं पुरुषं परम् ॥५॥ एतमेके वदन्त्यग्निं मनुमन्ये प्रजापतिम् ॥ इन्द्रमेके परे प्राणमपरे ब्रह्म शाश्वतम् ॥६॥** मनु १२. १२२-१२३ ॥ **स ब्रह्मा स विष्णुः स रुद्रस्स शिवस्सोक्षरः स परमः स्वराट् । स इन्द्रस्स कालाग्निस्स चन्द्रमाः ॥७॥** कै०उ० ॥ **इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यस्स सुपर्णो गरुत्मान् । एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥८॥** ऋ० १।१६४।४६ ॥ **भूरसि भूमिरस्यदितिरसि विश्वधाया विश्वस्य भुवनस्य धर्त्री । पृथिवीं यच्छ पृथिवीं दृँह पृथिवीं मा हिँसीः ॥९॥** यजु० १३।१८ ॥ **इन्द्रो मह्ना रोदसी पप्रथच्छव इन्द्रः सूर्यमरोचयत् । इन्द्रेह विश्वा भुवनानि येमिरे इन्द्रे स्वानास इन्दवः ॥ १० ॥** सामवेद ७।३।९ ॥ २ ॥ **प्राणाय नमो यस्य सर्वमिदं वशे । यो भूतः सर्वस्येश्वरो यस्मिन्सर्वं प्रतिष्ठितम् ॥ ११ ॥** अथर्व० ११।२।४।१ ॥

ओंकारादि नामें परमेश्वराचीं वाचक आहेत हें दाखविण्यासाठीं हे वरील आधार दिलेले आहेत. परमेश्वराला जीं नांवें वेदामध्यें दिलीं आहेत. तीं सर्व अन्वर्थक आहेत. कोणा मनुष्याचें नांव धनपति असूनहि तो दरिद्री असतो. तसा प्रकार परमेश्वराच्या नांवासंबंधानें नाहीं. परमेश्वराचीं नामें त्याचे गुणकर्मस्वभाव दाखवितात. कांहीं नामें त्याचे गुण दाखवितात, कांही त्याचीं कर्में दाखवितात, व कांही त्याचा स्वभाव दाखवितात. ह्मणून त्याच्या नामांचे गौणिक, कार्मिक व स्वाभाविक असे तीन भेद आहेत. पहा:—**ओम्-खं-ब्रह्म** हीं तीन नांवें परमेश्वराचे तीन गुण दाखवितात, (**अवति इति ओम्**); रक्षण करणारा ओम् जाणावा. (**आकाशमिव व्यापकत्वात् खम्**); आकाशाप्रमाणें सर्वव्यापक जो आहे ह्मणून त्याला खं असें नांव आहे. (**सर्वेभ्यो बृहत्वात् ब्रह्म**); सर्वांहून तो थोर आहे ह्मणून त्याला ब्रह्म असें म्हणतात. याप्रमाणें हीं तीन नावें परमेश्वराचीं वाचक आहेत.॥१॥ ओ३म् हें ज्याचें नांव आहे व जो (अक्षरम्) कधींही नाश पावत नाहीं त्या परमेश्वराचीच सर्वांनीं .(उपासीत) उपासना करणें योग्य आहे. ॥२॥ (ओम् इत्येतत्) सर्व वेदादि सच्छास्त्रामध्ये परमेश्वराचें प्रधान व निजनाम "ओम्" हेंच सांगितलेलें आहे, बाकीचीं सर्व नांवें गौण आहेत. ॥३॥ (सर्वे वेदा०) सर्व वेद ज्याचें वर्णन करीत आहेत, (तपांसि सर्वा०) धर्मानुष्ठानरूपी तप हें ज्याच्यासाठीं आहे व (यद् इच्छन्तो०) ज्याच्या प्राप्तीसाठीं ब्रह्मचर्याचें पालन करतात, त्या परमेश्वराचें नांव "ओम्" हें आहे. ॥४॥ (प्रशासि०) जो सर्वांना शिक्षा देणारा व सूक्ष्माहून सूक्ष्म असल्यामुळें ज्याचें ज्ञान समाधींतील प्रज्ञेनेंच होतें त्यालाच परमपुरुष असें म्हणतात. ॥५॥ स्वप्रकाशक असल्यामुळें अग्नि[1], विज्ञानस्वरूप असल्यामुळें मनु[2], सर्वांचा पालन करणारा व परम ऐश्वर्यवान् असल्यामुळें इन्द्र, सर्वांच्या जीवनाला आधारभूत असल्यामुळें प्राण व निरंतर सर्वव्यापक असल्यामुळें ब्रह्म, अशीं नांवें त्या परमेश्वरालाच आहेत. ॥ ६ ॥ (स ब्रह्मा० ) तो सर्व जग उत्पन्न करतो म्हणून त्याला ब्रह्म, सर्वत्र व्यापून राहातो म्हणून विष्णु, दुष्टांना दण्ड करून रडावयास लावतो म्हणून रुद्र, तो मंगलमय व कल्याणकर्ता आहे म्हणून शिव, असें त्यालाच म्हणतात. (**यः सर्वमश्नुते न क्षरति न विनश्यति तदक्षरम्**) परमेश्वर सर्वत्र व्यापक आहे व तो अविनाशी आहे म्हणून त्याला अक्षर असें म्हणतात. (**यः स्वयं राजते स स्वराट्**) तो स्वतः प्रकाश-स्वरूप आहे म्हणून त्याला स्वराट् असें म्हणतात. (**योऽग्निरिव कालः कलयिता प्रलयकर्ता स कालाग्निरीश्वरः**) तो प्रलयकालीं सर्वांचा प्रलय करतो, कालाचाही काल तो आहे म्हणून त्याला कालाग्नि असें म्हणतात. ॥७॥ (इन्द्रं मित्रं) जे अद्वितीय सत्य ब्रह्म आहे त्याला इन्द्रादिक सर्व नांवें दिलेलीं आहेत. (**द्युषु शुद्धेषुपदार्थेषु भवो दिव्यः**) प्रकृत्यादि दिव्य पदार्थांत व्याप्त आहे म्हणून दिव्य. (**शोभनानि पर्णानि पालनानि पूर्णानि कर्माणि वा यस्य सः**) उत्तम प्रकारें पालन करतो व उत्तम कर्में करतो म्हणून सुपर्णः, (**गरुत्मान्**) तो स्वरूपतः महान् आहे म्हणून त्याला गरुत्मान् व (**मातरिश्वा**)

१. अगि—ज्ञानगतिप्राप्तिषु । २. मन—विज्ञाने । ३. इदि—परमैश्वर्ये । या धातूं वरून हे शब्द झालेले आहेत.

वायुप्रमाणें अत्यंत बलिष्ठ असल्यामुळें त्याला मातरिश्वा असें म्हणतात. हीं नांवें परमेश्वाराचें पृथक् पृथक् गुण दाखविणारीं आहेत, [इतर नामांचा अर्थ पुढें दिला जाईल.] ।।८।। [भूमिरसि०] (**भवन्ति भूतानि यस्यां सा भूमिः**) परमेश्वरामध्यें सर्व भूतें—प्राणिमात्र-उत्पन्न होतात म्हणून त्याला भूमि असें म्हणतात. [या मंत्रांतील शेष नामांचा अर्थ पुढें केला जाईल. ] ।।९।। [इन्द्रो मह्ना] या मंत्रांत इन्द्र हा परमेश्वराचा वाचक शब्द आहे. ।।१०।। [ प्राणाय० ] ज्याप्रमाणें शरीर प्राणाच्या स्वाधीन असतें त्याचप्रमाणें परमेश्वराच्या स्वाधीन हें विश्व आहे. म्हणून त्याला प्राण असें म्हणतात. ।।११।। इत्यादि प्रमाणांवरून अग्नि इत्यादि शब्द परमेश्वराचे वाचक आहेत असें स्पष्ट दिसेल. व्याकरण, निरुक्त, ब्राह्मण, सूत्रग्रंथ इत्यादि ऋषिमुनिप्रणीत ग्रंथामध्यें ओम्, अग्नि इत्यादिक शब्द परमेश्वराचे वाचक लिहिलेले आहेत म्हणून त्याचा तसाच अर्थ घेणें सर्वांना योग्य आहे. 'ओम्' हें नांव केवळ परमात्म्याचेंच आहे व अग्नि, विराट् वगैरे नांवें प्रकरणानुसार परमेश्वराचीं वाचक होतात, एवढाच काय तो भेद आहे. म्हणून ज्या ठिकाणीं सर्वत्र, व्यापक, शुद्ध, सनातन, सृष्टिकर्ता इत्यादि विशेषणें लाविलीं असतील व त्याची स्तुति, प्रार्थना व उपासना करावी म्हणून सांगितलें असेल त्या ठिकाणीं अग्न्यादिक शब्दांनीं परमेश्वर असा अर्थ समजावा ज्या ठिकाणीं—

**ततो विराडजायत विराजो अधिपूरुषः । श्रोत्राद्वायुश्च प्राणश्च मुखादग्निरजायत । तेन देवा अजयन्त । पश्चाद्भूमिमथो पुरः ।।** यजु० अ० ३१ **तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः । आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी । पृथिव्या औषधयः । ओषधिभ्योऽन्नम् । अन्नाद्रेतः । रेतसः पुरुषः । स वा एष पुरुषोऽन्नरसमयः ।।** तै० अ० १.

या प्रकारच्या वचनांमध्यें "विराट्, पुरुष, देव, आकाश, वायु, अग्नि जल, भूमि," वगैरे नांवें लौकिक पदार्थांचीं आहेत असें समजावें, ज्या ठिकाणीं "उत्पत्ति, स्थिति, प्रलय, जडत्व, अल्पज्ञता, दृश्य, वगैरे प्रकारचे शब्द योजले असतील तेथें ईश्वराचें ग्रहण होत नाहीं. कारण, उत्पत्ति, वगैरे शब्द परमेश्वराला-तो अजन्म असल्यानें लागू शकत नाहींत, ह्मणून अशा तऱ्हेचें वर्णन जेथें असेल तेथें तेथें 'विराट्' वगैरे शब्दांनीं लौकिक विश्वांतील पदार्थांचें ग्रहण केलें पाहिजे. तसेंच ज्या ठिकाणीं सर्वज्ञत्वादि विशेषणें लाविलीं असतील तेथें परमेश्वराचें ग्रहण करावें व जेथें इच्छा, द्वेष, प्रयत्न, सुख, दुःख इत्यादि गुण व अल्पज्ञत्व यांचें वर्णन असेल तेथें जीवाचें ग्रहण करावें परमेश्वर अज असल्यामुळें त्याला जन्मादिक विशेषणें लागू शकत नाहींत. म्हणून जन्ममरणाचा संबंध असेल तेथें जीव किंवा सृष्टींतील इतर पदार्थ यांचा बोध घ्यावा, ही व्यवस्था सर्वांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे. आतां 'विराट' वगैरे नांवांनीं परमेश्वराचें ग्रहण कसें होतें हें पुढें दिलें आहे. ओंकाराचे 'विराट्' वगैरे अर्थ पूर्वी दिले आहेत, त्यांचा अर्थ पुढें दिल्याप्रमाणें आहे. [ राजृ दीप्तौ ] या धातूला 'वि' हा उपसर्ग लावून त्याहून 'क्विप्' हा प्रत्यय केला असतां 'विराट्' हा शब्द सिद्ध होतो. (**यो विविधं चराचरं जगद्राजयति प्रकाशयति स विराट्**) परमेश्वर अनंतप्रकारच्या जगताला प्रकाशित करतो म्हणून त्याला विराट् असें म्हणतात. (अञ्चु गतिपूजनयोः । अग, अगि, इण गत्यर्थाः) या धातूवरुन अग्नि शब्द सिद्ध होतो. गत्यर्थक धातूंचे "ज्ञान, गमन व प्राप्ति" असे तीन अर्थ प्रसिद्ध आहेत. म्हणून (**योऽञ्चति अच्यते अगति अङ्गति एति सोऽग्निः**) जो ज्ञानस्वरुप सर्वज्ञ आहे व जो जाणण्यास व पूजा-सत्कार करण्यास योग्य आहे, अशा परमेश्वराला अग्नि असे म्हणतात. (विश-प्रवेशने) या धातूवरून विश्व हा शब्द सिद्ध होतो. (**विशन्ति सर्वाण्याकाशादीनि भूतानि यस्मिन् यो वा आकाशादिषु सर्वेषु भूतेषु प्रविष्टः स विश्वः ईश्वरः**) ईश्वरामध्यें आकाशादिक सर्व भूतें आहेत व तो आकाशादिभूतांत भरलेला आहे म्हणून त्याला विश्व असें म्हणतात. हे अर्थ ओंकरांतील अकाराचें झाले. आतां उकाराचे अर्थ करावयाचे. **ज्योतिर्वै हिरण्यं तेजो वै हिरण्यमिति** (ऐतरेये शतपथे च ब्राह्मणे) (**यो हिरण्यानां सूर्यादीनां तेजसां गर्भ उत्पत्तिनिमित्तमधिकरणं स हिरण्यगर्भः**) ज्याच्यामध्यें सूर्यादिक तेजोगोल उत्पन्न होऊन राहातात व जो सूर्यादि तेजोगोलांचें उत्पत्ति व निवासस्थान आहे, त्या परमेश्वराला "हिरण्यगर्भ" असें म्हणतात पाहा:—

**हिरण्यगर्भः समवर्त्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ।।**
**स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ।।** यजु० १३।४।।

अशा स्थळीं 'हिरण्यगर्भ' शब्द परमेश्वरवाचक आहे असो, ( वा-गतिगन्धनयोः ) या धातूवरून 'वायु' शब्द सिद्ध झाला आहे. (गन्धनं हिंसनम् । **यो वाति चराचरं जगद्धरति बलिनां बलिष्ठ स वायुः**) तो चराचर जगताचें धारण, पोषण व प्रलय करतो व तो बलवानाहूनही बलिष्ठ आहे म्हणून परमेश्वराला 'वायु' हें नांव आहे. (तिज-निशाने) या धातूवरून 'तेजः' हा शब्द झाला आहे व त्यावरून तद्धित प्रत्यय करून 'तैजस' हा शब्द सिद्ध होतो. तो स्वतः स्वयंप्रकाश आहे व तो सूर्यादि प्रकाशित करतो म्हणून परमेश्वराला 'तैजस' हें नांव आहे. इत्यादि अर्थ उकारानें दाखविले जातात. ( ईश-ऐश्वर्ये ) या धातूवरून 'ईश्वर' शब्द बनला आहे. (**यः ईष्टे सर्वैश्वर्यवान् वर्तते स ईश्वर** ) ज्याचें ज्ञान सत्य आहे व जो अनंत ऐश्वर्यानें युक्त आहे. त्या परमात्म्याला 'ईश्वर' असें म्हणतात, (दो-अवखण्डने ) या धातूवरून 'अदिति' शब्द साधला जातो व यावरून तद्धित प्रत्यय केला असतां, 'आदित्य' शब्द सिद्ध होतो. (**न विद्यते विनाशः यस्य सोऽयमदितिः । अदितिरेव आदित्यः**) ज्याचा कधीही नाश होत नाहीं, त्या परमेश्वराला 'आदित्य' असें म्हणतात. (ज्ञा अवबोधने) 'प्र' उपसर्गपूर्वक 'ज्ञा' धातूवरून 'प्रज्ञ' हा शब्द होतो व त्यावरून तद्धित प्रत्यय केला असतां 'प्राज्ञ' हा शब्द साधतो. [**यः प्रकृष्टतया चराचरस्य जगतो व्यवहारं जानाति स प्रज्ञः । प्रज्ञ एव प्राज्ञः** ] ईश्वर सर्वज्ञतापूर्वक निर्भ्रांतवृत्तीनें सर्व चराचराच्या व्यवहाराला जाणतो म्हणून त्याला 'प्राज्ञ' असें म्हणतात. हे अर्थ 'म' कराचे आहेत. याप्रमाणें हे ओंकारापासून होणारे अर्थ आहेत. ज्याप्रमाणें ओंकाराच्या प्रत्येकीं एकएक मात्रेचे या ठिकाणीं तीन तीन अर्थ दाखविले, त्याचप्रमाणें अन्य नामेंहि ओंकारापासूनच झालेली आहेत. **शन्नो मित्रः शं वरुणः** या मंत्रांत आलेलीं मित्रादिक नावेंहि परमेश्वराचीच वाचक आहेत. या मंत्रांत स्तुति-प्रार्थना-उपासना सांगितली आहे. म्हणून परमेश्वर हाच अर्थ या ठिकाणीं इष्ट आहे. स्तुति, प्रार्थना ही श्रेष्ठाची करावयाची असते. जो गुण, कर्म, स्वभाव व सत्य व्यवहार, यांत अधिक असेल तोच श्रेष्ठ होय. या गुणांनीं युक्त असणाऱ्या सर्व श्रेष्ठांमध्येंहि जो श्रेष्ठ आहे त्याला परमेश्वर असें म्हणतात. परमेश्वराशीं समान कोणी झाला नाहीं. सध्यां नाहीं व पुढेंहि कोणी होऊं शकणार नाहीं. ज्याअर्थी त्याच्याशीं तुल्य कोणीहि नाहीं त्याअर्थी त्याहून श्रेष्ठ कोण असूं शकणार ? परमेश्वरामध्यें जसें सत्य, न्याय, दया, सर्वशक्तिमत्व, सर्वज्ञत्व वगैरे गुण आहेत तसें दुसऱ्या कोणत्याहि जड पदार्थामध्यें किंवा जीवामध्यें नाहींत. जो पदार्थ सत्य व नित्य असतो त्यांतील गुणहि सत्य व नित्य असतात; म्हणून परमेश्वरांतील गुण सत्य आहेत. याकरितां सर्व मनुष्यांनीं त्या परमेश्वराचीच उपासना करावी. पूर्वीच्या विद्वान् मुनींनीं, साधारण माणसांनीं व दैत्यदानवादिक माणसांनीं-अर्थात् सर्वांनीं-ब्रह्मा, विष्णु, महादेव या नांवांनीं त्या एका जगन्नियन्त्याचीच उपासना केली होती व दुसऱ्या कोणाचीहि नव्हती; म्हणून त्यांच्याप्रमाणें सर्वांनीं करणें योग्य आहे. याचा विशेष विचार पुढें 'मुक्ति व उपासना' या प्रकरणांत केला जाईल.

[**प्रश्न**] मित्रादिक शब्दांच्या योगानें, स्नेही किंवा इन्द्रसूर्यादिक देवता यांचें ग्रहण केलें जातें, तसें येथें कां करूं नये ? ( **उत्तर** ) या ठिकाणीं त्यांचें ग्रहण करतां कामा नये. कारण, जो मनुष्य एकाचा मित्र असतो तोच दुसऱ्याचा शत्रु व तिसऱ्याशीं उदासीन असतो. म्हणून मनुष्यांमध्यें पूर्ण मित्रत्व संभवत नाहीं. मित्र शब्दांतील पूर्ण अर्थ परमेश्वरामध्येंच लागतो. परमेश्वर सर्वांचा मित्र आहे. तो कोणाचा शत्रु नाहीं व कोणाशीं उदासीनही नाही. गौण अर्थानें मित्र वगैरे शब्द मनुष्यांनां लागू शकतात. पण पूर्णार्थी ते परमेश्वराचेच वाचक आहेत ञिमिदा-स्नेहने-या धातूला औणादिक क्त प्रत्यय लावला असतां 'मित्र' शब्द सिद्ध होतो. [**मेद्यति स्निह्यति स्निह्यते वा तत् मित्रम्**] ईश्वर सर्वांहून जास्त स्नेह करणारा व सर्वांनीं प्रीति करण्यास योग्य आहे म्हणून त्याला 'मित्र असें म्हणतात. 'वृञ्-वरणे वर-ईप्सायाम्' या धातूंना औणादिक 'उनन्' प्रत्यय लावला असतां, 'वरुण' हा शब्द सिद्ध होतो. (**यःसर्वान् शिष्टान् मुमुक्षून् धर्मात्मनो वृणोति अथवा यः शिष्टैर्मुमुक्षुभिर्धर्मात्माभिर्व्रियते वर्यते वा स वरुणः परमेश्वरः**) परमेश्वर शिष्ट, मुमुक्षु व धर्मात्मे यांना आपला आधार देतो किंवा सर्व शिष्ट, मुमुक्षु व धर्मात्मे हे त्यालाच वरतात-श्रेष्ठ मान-

मात म्हणून त्यालाच वरुण असें म्हणतात. [**वरुणो नाम वरः श्रेष्ठः**] श्रेष्ठत्व दाखविणारा वरुण हा शब्द आहे. परमेश्वर सर्वात श्रेष्ठ आहे म्हणून त्याला वरुण असें म्हणतात. 'ऋ-गतिप्रापणयोः' या धातूला यत प्रत्यय लावून 'अर्य्य' हा शब्द साधला जातो. अर्य्य शब्दापुढें 'माङ्-माने' या धातूवरून 'कनिन्' प्रत्यय केला म्हणजे 'अर्य्यमा' हा शब्द सिद्ध होतो. (**य आर्यान् स्वामिनो न्यायाधीशान मीमीते मान्यान् करोति सोऽर्य्यमा**) ज्याला सत्यप्रिय व न्यायकारी मनुष्य आवडतात व जो दुराचारी माणसांना यथायोग्य शासन करतो, अशा सत्यनियमकर्त्या परमेश्वराला 'अर्य्यमा' असं म्हणतात. 'इदि-परमैश्वर्ये' या धातूवरून रन् प्रत्यय केला असतां, इन्द्र शब्द सिद्ध होतो. (**य इन्दति परमैश्वर्यवान् भवति स इन्द्रः**) परमात्मा अखिल ऐश्वर्यानें युक्त आहे म्हणून त्याला इन्द्र असें म्हणतात. 'बृहत्' शब्दपूर्वक 'पा-रक्षणें' या धातूवरून डति प्रत्यय करून व बृहत् शब्दांतील 'त्' काराचा लोप व सुडागम झाल्यानें 'बृहस्पति' शब्द होतो. [**यो बृहतामाकाशादीनां पतिः स्वामी पालयिता स बृहस्पतिः**] जो महान् ब्रह्मांडाचा व आकाशादिक भूतांचा स्वामी व रक्षक आहे त्या परमात्म्याला बृहस्पति असें म्हणतात.

'विष्लृ-व्याप्तौ' या धातूला 'नु' हा प्रत्यय लावला असतां 'विष्णु' हा शब्द होतो. [**वेवेष्टि व्याप्नोति चराचरं जगत् स विष्णुः**] चराचर जगतामध्यें व्यापक असल्यामुळें परमेश्वराला 'विष्णु' असें म्हणतात. [**उरुः महान् क्रमः पराक्रमः यस्य स उरुक्रमः परमेश्वरः**] अनंत आश्चर्यकारक महत् कृत्यें करणारा असल्यामुळें परमेश्वराला 'उरुक्रम' असें नांव पडलें आहे. हे अर्थ लक्षांत घेतले असतां '**शंनो मित्रः**' या पहिल्या मंत्राचा अर्थ पुढें दिल्याप्रमाणें होतोः—"परमेश्वर [उरुक्रमः] महापराक्रमयुक्त (मित्रः) सर्वांचा सखा आहे, तो [शम्] सुख देणारा होवो. तो [वरुणः] सर्वोत्तम, [शम्] सुखस्वरूप. [अर्य्यमा] न्यायाधीश, [शम्] सुखप्रचारक, [इन्द्रः] सकल ऐश्वर्यवान्, [शम्] मंगल व ऐश्वर्य यांना देणारा, [बृहस्पतिः] सर्वांचा अधिष्ठाता, [शम्] विद्याप्रद, [विष्णुः] सर्वांत व्यापून असणारा असा आहे; तो [नः] आम्हाला [शम्] सुखदायक [भवतु] होवो."

[वायो ते ब्रह्मणे नमोऽस्तु] जो सर्वांत श्रेष्ठ, सर्वांहून थोर व अनन्तबलयुक्त परमात्मा आहे त्याला आमचा नमस्कार असो. 'बृह् बृहि-वृद्धौ' या धातूवरून 'ब्रह्म' शब्द सिद्ध झाला आहे. परमात्मा सर्वांहून थोर असल्यामुळें त्याला ब्रह्म असें म्हणतात. "परमेश्वरा ! [त्वम् एव] तूंच खरोखर [प्रत्यक्षम्] प्रत्यक्ष (ब्रह्म असि) 'ब्रह्म' आहेस. (त्वाम् एव) तुलाच मी प्रत्यक्ष (ब्रह्म वदिष्यामि) ब्रह्म मानतो व तसेंच तूं ब्रह्म आहेस असें मी बोलेन; कारण तूंच सर्व जगतांमध्यें व्याप्त आहेस व सर्वांना त्यामुळें प्राप्त झालेला आहेस. (**ऋतं वदिष्यामि**) जी तुझी वेदांमध्यें यथार्थ आज्ञा आहे, तिचा मी सर्वांना उपदेश करीन व त्याचप्रमाणें मी वागेन. [सत्यं वदिष्यामि] मी खरें बोलेन, सत्य मानीन व सत्य असेल तेंच करीन. (तत् माम् अवतु) म्हणून माझें रक्षण कर. (तत् वक्तारम् अवतु) सत्यनिष्ट व सत्यवक्ता यांचें रक्षण कर. ज्याच्या योगानें माझी बुद्धी तुझ्या वेदाज्ञेमध्यें स्थिर होईल व त्याच्या विरुद्ध कधींही न जाईल असें कर. कारण, तुझी आज्ञा आहे कीं, वेदप्रणित हाच खरा धर्म व तद्विरुद्ध सर्व अधर्म आहे. (**अवतु माम् अवतु वक्तारम्**) हे ईश्वरा ! त्या अधर्मापासून मी दूर होऊन धर्मामध्येंच सदैव स्थिर राहीन अशा प्रकारें माझें तूं रक्षण कर." [या ठिकाणीं 'अवतु०' या वाक्याची द्विरुक्ति केली आहे, ती दृढीकरणासाठीं होय. 'त्वं ग्रामं गच्छ' या वाक्यांत 'गच्छ' क्रियापदाची द्विरुक्ति गमनक्रिया सत्वर करण्याविषयींचा बोध करते. त्याचप्रमाणें 'अवतु०' या वाक्याची द्विरुक्ति शीघ्रता व अवश्यकता यांचा बोध करीत आहे असें समजावें. ] (ओम् शान्तिः शान्तिः शान्तिः) या ठिकाणीं शान्ति शब्दाचा त्रिवार उच्चार करण्याचें कारण; तीन प्रकारच्या दुःखांचें निवारण व्हावें हें आहे. आध्यात्मिक आधिभौतिक आणि आधिदैविक असें तीन प्रकारचें दुःख आहे. जे अविद्या, द्वेष, प्रीति, मूर्खता, ज्वरादि, पीडा यांच्यापासून दुःख होतें तें आध्यात्मिक दुःख; जें शत्रु, व्याघ्र, सर्प इत्यादिकापासून होतें तें आधिभौतिक दुःख व जें अतिवृष्टि, अनावृष्टि, अतिशीत, अतिउष्ण, मानसिक व इन्द्रियासंबंधीं अशांति यांपासून होतें तें आधिदैविक दुःख होय. "या तीन प्रकारच्या दुःखांपासून आम्हांला दूर करून कल्याणकारक कर्मामध्यें आमची सदैव योजना कर. कारण

हे ईश्वरा ! तूं कल्याणस्वरूप आहेस; मुमुक्षूंता आनंद देणारा तूंच आहेस. म्हणून तूं सर्वांच्या अंतःकरणांत प्रकाशित होऊन, सर्व लोक अधर्माला टाकून धर्मप्रमाणें आचरण करतील व त्यायोगें आनंदाचे भागी होतील असें कर."

**सूर्य्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥** यजु० ॥

परमेश्वर स्थावरजंगमात्मक सर्व सृष्टीचा आत्मा आहे. तो स्वतः प्रकाशस्वरूप असल्यामुळें व तो सर्वांना प्रकाश देत असल्यामुळें त्याला (सूर्य) असें म्हणतात. 'अत-सातत्यागमने' या धातूवरून आत्मा शब्द सिद्ध होतो (**योऽतति व्याप्नोति स आत्मा**) जो सर्व जीवादिक जगतांमध्यें व्यापलेला आहे त्याला 'आत्मा असें म्हणतात. (**परमश्चासौ आत्मा च य आत्मभ्यो जीवेभ्यः सूक्ष्मेभ्यः परमोऽतिसूक्ष्मः स परमात्मा**) जो जीवादिकांपेक्षां उत्कृष्ट **व** जीव, प्रकृति व आकाश यांहून अतिसूक्ष्म व सर्वांतर्यामी आहे, त्या ईश्वराला 'परमात्मा' असें म्हणतात. 'ईश्वर' म्हणजे सामर्थ्यवान् व (**य ईश्वरेषु समर्थेषु परमः श्रेष्ठः स परमेश्वरः**) जो सर्व सामर्थ्यवानांमध्येंहि श्रेष्ठ, ज्याच्याशीं कोणाचीहि तुलना होऊ शकत नाहीं, तो परमेश्वर होय. 'षुञ् अभिषवे; षूङ् प्राणिगर्भविमोचने' या धातूंवरून सविता हा शब्द सिद्ध होतो. (अभिषवः प्राणिगर्भविमोचनं चोत्पादनम् । **यश्चराचरं जगत् सुनोति सूते चोत्पादयति स सविता परमेश्वरः**) सर्व जगाची उत्पत्ति करतो म्हणून परमेश्वराला 'सविता' असें नांव आहे. 'दिवु-क्रीडा-विजि-गीषा-व्यवहार-द्युति-स्तुति मोद-मद-स्वप्न-कान्ति-गतिषु' या धातूवरून 'देव शब्द होतो. याचे दहा अर्थ आहेत. (**क्रीडा**) ज्याची क्रीडा हें जगत् आहे, (विजिगीषा) धर्माचा विजय व्हावा असें इच्छिणारा, (व्यवहार) सर्वांना व्यवहाराचीं साधनें देणारा, (द्युति) स्वयंप्रकाश य दूसऱ्यांना प्रकाश देणारा, स्तुति प्रशंसा करण्यास योग्य (मोद) आनंदमय य दुसऱ्यांस सुख देणारा, (मद) मदोन्मत्तांचें ताडन करणारा, (स्वप्न) सर्वांच्या विश्रांतीसाठीं रात्रि व प्रलय करणारा, (कान्ति) सर्वांनीं त्याच्या प्राप्तीची इच्छा करण्यास योग्य, (गति ज्ञानस्वरूप, असा तो परमेश्वर आहे, म्हणून त्याला 'देव' असें म्हणतात.) देव शब्दांचे हे अर्थ आहेत. किंवा (यो दीव्यति क्रीडति स देवः) जो स्वस्वरूपाच्या आनंदानेंच क्रीड करतो, किंवा लीलेनें सहज जगत् उत्पन्न करतो व जो सर्व क्रीडांचा आधार आहे, (विजिगीषते स देवः) जो सर्वांना जिंकणारा व जो स्वतः अजिंक्य, (व्यवहारयति स देवः) जो न्याय व अन्यायादिक व्यवहारांना जाणतो व जो उपदेष्टा आहे, यश्चराचरं जगद् द्योतयति) जो सर्वांचा प्रकाशक, (यःस्तूयते स देवः) जो सर्वांनीं प्रशंसा करण्यास योग्य, (यो मोदयति स देवः जो स्वतः आनंदस्वरूप व दुसऱ्याला आनंद देणारा, ज्याला दुःखाचा लेशहि नाहीं, यो माद्यति स देवः) जो सदा हर्षित, शोकरहित व दुसऱ्यांस दुःखरहित व आनंदयुक्त करणारा (यः स्वापयति स देवः) जो प्रलयकालीं सर्व जीवांना विश्रांतिरूप निद्रा देतो, (यः काम्यते, कामयते वा स देवः) ज्याची कामना सत्य असते व ज्याच्या प्राप्तीची शिष्ट लोक इच्छा करतात, (यो गच्छति गम्यते वा स देवः) जो सर्वत्र व्याप्त व सर्वांनीं प्राप्त करून घेण्यास योग्य आहे त्या परमेश्वराला 'देव' हें नांव आहे. 'कुबि आच्छादने' या धातूवरून 'कुबेर' शब्द सिद्ध होतो (**यः सर्वं कुम्बति स्वव्याप्त्याऽऽच्छादयति स कुबेरो जगदीश्वरः**) आपल्या व्याप्तीच्या योगानें सर्व जग व्यापतो म्हणून परमेश्वराला 'कुबेर' असें नांव आहे. प्रथ्-विस्तारे' या धातूवरून 'पृथिवी' शब्द होतो. (**यः प्रथते सर्वं जगद् विस्तृणाति पृथिवी**) सर्व जगाचा विस्तार करतो म्हणून ईश्वराला 'पृथिवी' असें म्हणतात. जल्-घातने' या धातूवरून 'जल' शब्द सिद्ध होतो. (**जलति घातयति दुष्टान्, सङ्घातयति अव्यक्तपरमाण्वादीन्) तद् ब्रह्म जलम्**) दुष्टांना शासन करतो व परमाणूंचें एकीकरण करतो म्हणून परमेश्वराला 'जल' असें म्हणतात. 'काशृ-दीप्तौ' या धातूवरून 'आकाश' शब्द सिद्ध होतो. (**यः सर्वतः सर्वं जगत् प्रकाशयति स आकाशः**) जगताला सर्व बाजूंनीं प्रकाशित करतो म्हणून परमेश्वराला 'आकाश' असें नांव आहे. (अद्-भक्षणे या धातूवरून 'अन्न' शब्द सिद्ध होतो.)

**अद्यतेऽत्ति च भूतानि तस्मादन्नं तदुच्यते ॥ १ ॥**

**अहमन्नमहमन्नमहन्नम् । अहमन्नादोऽहमन्नादोऽहमन्नादः ॥** २ ॥ तैत्तिरी० २।१० ॥

**अत्ता चराचरग्रहणात ॥** वेदान्तदर्शन १।२।९ ॥

## १. ईश्वरनामव्याख्या

परमेश्वर सर्वांना आपल्या आंत ठेवतो, सर्वांनीं त्याच ग्रहण करण्यास योग्य आहे व तो सर्व जगाचें ग्रहण करतो म्हणून त्याला 'अन्न, अन्नाद, अत्ता' हीं नांवें आहेत. [या वरील वाक्यांत अन्नादिक शब्दांचा त्रिवार पाठ केला आहे तो आदरार्थ आहे] ज्याप्रमाणें फळांत किडे उत्पन्न होतात, कांहीं दिवस तेथें जगतात व नंतर तेथेंच नाश पावतात त्याचप्रमाणें परमेश्वराच्या आधारानें सृष्टी नाश पावते. 'वस-निवासे' या धातूवरून, वसु हा शब्द सिद्ध झाला आहे. [ **वसन्ति भूतानि यस्मिन् अथवा यः सर्वेषु भूतेषु वसति स वसुरीश्वरः** ] परमेश्वरामध्यें आकाशादि सर्व भूतें राहतात व तो सर्वांमध्ये व्यापून राहतो म्हणून 'वसु' हें नांव आहे. 'रुदिर्-अश्रुविमोचने' या धातूवरून 'णिच' व 'र' प्रत्यय होऊन 'रुद्र' हा शब्द सिद्ध झाला आहे. [ **यो रोदयति अन्यायकारिणो जनान् स रुद्रः** ] दुराचारी मनुष्यांना शिक्षा करून त्यांस रडावयास लावतो म्हणून ईश्वराला 'रुद्र' म्हणतात.

**यन्मनसा ध्यायति तद्वाचा वदति यद्वाचा तत्कर्मणा ।**
**करोति यत्कर्मणा करोति तदभिसंपद्यते ॥** यजु० ब्राह्मण.

"जीव मनानें ज्याचें ध्यान करतो ते वाणीनें बोलतो, तसें वाणीने बोलतो तसें कर्म करतो, जसें कर्म करतो तसें फल प्राप्त होतें." ज्याप्रमाणें काम करतो त्याप्रमाणें त्याला फल प्राप्त होणें हाच ईश्वराचा नियम आहे. दुष्ट कर्म करणाऱ्या जीवाला, ईश्वराच्या न्यायरूपी व्यवस्थेनें दुःखरूपी फल प्राप्त होतें, त्यामुळे तो रडतो व याप्रमाणे त्याला रडवितो म्हणून त्याला 'रुद्र' असें म्हणतात.

**आपो नारा इति प्रोक्ता आपो वै नरसूनवः । ता यदस्यायनं पूर्वं तेन नारायण : स्मृतः ॥** मनु० १ । १० ॥

प्रकृति, जल व जीव यांना 'नारा' असे म्हणतात. त्यांत परमेश्वराचें 'अयन' अर्थात् 'व्यापून' राहणें आहे म्हणून त्याला 'नारायण' असे म्हणतात. 'चदि आल्हादे' या धातूवरून 'चन्द्र' शब्द झाला आहे [**यश्चन्दति चन्दयति स चन्द्रः**] स्वतः आनंदस्वरूप व सर्वांना आनंद देणारा परमेश्वर आहे म्हणून त्याला 'चन्द्र' असे म्हणतात. 'मगि-गत्यर्थः' या धातूवरून 'मंगल' शब्द बनला आहे. (**यो मङ्गति मङ्गयति वा मङ्गलः**) स्वतः मंगलस्वरूप व दुसऱ्यांना मंगल देणारा म्हणून ईश्वराला 'मंगल' असे म्हणतात. 'बुध्–अवगमने' या धातूवरून 'बुध' हा शब्द झाला आहे. (**यो बुध्यते बोधयति वा स बुधः**) स्वतः बोधस्वरूप असून दुसऱ्यांना बोध करणारा म्हणून ईश्वराया 'बुध' असे म्हणतात. 'बृहस्पति' शब्दाचा अर्थ पूर्वी दिला आहे. 'शुचिर्–पूतीभावे' या धातूवरून 'शुक्र' शब्द झाला (**यः शुच्यति शोचयति वा स शुक्रः**] तो स्वतः अत्यंत पवित्र आहे व दुसऱ्याला पवित्र करतो म्हणून ईश्वराला 'शुक्र' असे म्हणतात. 'चर-गति-भक्षणयोः' या धातूला 'शनैस्' अव्यय उपपद होऊन 'शनैश्चर' शब्द होतो. [ **यः शनैश्चरति स शनैश्चरः** ] सर्वत्र सहजस्थितीनें प्राप्त असलेला व धैर्यवान् असल्यामुळें त्याला 'शनैश्चर' असे म्हणतात. 'रह-त्यागे' या धातूवरून 'राहू' शब्द साधला जातो. [ **यो रहति परित्यजति दुष्टान् रहयति त्याजयति वा स राहुः**] तो एकरूप, त्यामध्यें दुसरा पदार्थ नाहीं, तो दुष्टांचा त्याग करतो व दुसऱ्यांना दुष्टांच्या त्रासांतून सोडवितो म्हणून त्या ईश्वराला 'राहु' असें म्हणतात. 'कित-निवासे रोगापनयने च' या धातूवरून 'केतु' शब्द सिद्ध होतो. [ **यः केतयति चिकित्सति वा स केतुरीश्वरः** ] तो सर्वांचें निवासस्थान व सर्वांना-मुमुक्षूंना-रोगांपासून व दुःखापासून मुक्त करितो म्हणून त्या ईश्वराला 'केतु' असें म्हणतात. 'यज देवपूजासंगतिकरणदानेषु' या धातूवरून 'यज्ञ' शब्द सिद्ध होतो. 'यज्ञो वै विष्णुः' असें ब्राह्मणग्रंथांत म्हटलें आहे. [**यो यजति विद्वद्भिरिज्यते वा स यज्ञः** ] जो सर्व जगांतील पदार्थांना संयुक्त करतो व ब्रह्मापासून सर्व ऋषि, मुनि, विद्वान् वगैरे सर्वांना जो पूज्य आहे व सदैव पूज्यच असणार त्या परमेश्वराला 'यज्ञ' हें नांव आहे. तो सर्वत्र व्यापक आहे म्हणूनहि त्याला 'यज्ञ' असें म्हणतात. 'हु-दानादनयोः, आदाने चेत्येके' या धातूवरून 'होता' शब्द सिद्ध होतो. [ **यो जुहोति स होता** ] जीवांना देण्यास योग्य असे पदार्थ त्यांस देतो व ग्रहण करण्यास योग्य पदार्थांचे ग्रहण करतो म्हणून ईश्वराला 'होता' असे म्हणतात. 'बन्ध-बन्धने' या धातूवरून 'बन्धु' शब्द झाला आहे. (**यः स्वस्मिन् चराचरं जगद्बध्नाति बन्धुवद्धर्मात्मनां सुखाय सहायो वा वर्त्तते स बन्धुः** ) ईश्वरानें आपणामध्यें सर्व लोकलोकान्तरांना नियमांनी असें बांधून टाकलें आहे कीं, ते लोक आपापल्या

परिधीचे व नियमांचे उल्लंघन करूं शकत नाहींत; व तो भावाप्रमाणें सर्वांना सुख देणारा आहे म्हणून त्याला 'बंधु' असें म्हणतात. 'पा-रक्षणे' या धातूवरून 'पिता' हा शब्द सिद्ध होतो' **(यः पाति सर्वान् स पिता)** ज्याप्रमाणें बाप आपल्या संतानांची उन्नति इच्छितो व त्यांचे संरक्षण करतो त्याचप्रमाणें परमेश्वर सर्व जीवांची उन्नति चाहतो व त्यांचे संरक्षण करतो म्हणून त्याला 'पिता' असे म्हणतात. **(य पितॄणां पिता स पितामहः)** तो पालकांचा पालक आहे म्हणून 'पितामह' हें नांव ईश्वराला दिलेलें आहे. **( यः पितामहानां पिता स प्रपितामहः )** ईश्वर पितामहांचाहि पिता आहे म्हणून त्याला 'प्रपितामह' असें म्हणतात. **(य मिमीते मानयति सर्वान् जीवान् स माता** ज्याप्रमाणें आई आपल्या मुलाचें सुख चाहते, त्याच्या उन्नतीची इच्छा करते, त्याचप्रमाणे सर्व जीवांची ईश्वर उन्नति इच्छितो म्हणून त्याला 'माता' असें म्हणतात. 'आङ्' उपसर्गपूर्वक 'चर-गतिभक्षणयोः' या धातूवरून 'आचार्य' शब्द सिद्ध होतो. **(य आचारं ग्राहयति सर्वा विद्या वा बोधयति स आचार्य ईश्वरः)** लोकांना सदाचारसंपन्न करणारा व सद्विद्याप्राप्तीचा हेतु ईश्वर असल्यामुळें त्याला 'आचार्य' असें म्हणतात. 'गृ-शब्दे' या धातूवरून 'गुरु' शब्द झाला आहे. **(यधर्म्यं शब्दान् गृणत्युपदिशति स गुरुः)**

**स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ॥ योग० समा० २६ ॥**

परमेश्वर सत्यधर्मप्रतिपादक, सर्वविद्यायुक्त, वेदांचा उपदेश करणारा, सृष्टीच्या प्रारंभीं अग्नि, वायु, आदित्य अंगिरा, व ब्रह्मादि गुरूंचाहि गुरु, व सदैव अविनाशी आहे म्हणून त्याला 'गुरु' हें नांव आहे. 'अज-गतिक्षेपणयोः, जनी-प्रादुर्भावे' यांवरून 'अज' हा शब्द सिद्ध होतो. **(योऽजति सृष्टिं प्रति सर्वान् प्रकृत्यादीन् पदार्थान् प्रक्षिपति जानाति वा कदाचिन्न जायते सोऽजः)** परमेश्वर प्रकृत्यादि पदार्थांना यथायोग्य रीतीनें मिळवून सृष्टि करतो, जीवांचा शरीरांशीं संबंध करतो व स्वतः कधींहि जन्मास येत नाहीं म्हणून त्याला 'अज' असे म्हणतात. 'बृहि-वृद्धौ' या धातूवरून 'ब्रह्मा' शब्द सिद्ध होतो. **(यो अखिलं जगन्निर्माणेन बृहति वर्धयति स ब्रह्मा)** परमेश्वर संपूर्ण जगत् रचून त्याला वाढवितो म्हणून त्याला 'ब्रह्मा' असे म्हणतात. **'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म'** हें तैत्तिरीयोपनिषदाचें वचन आहे. यामध्यें "सत्य, ज्ञान, अनंत, व ब्रह्म' असें चार शब्द ईश्वरवाचक आहेत. यांचा अर्थ पुढें दिला आहे. **(सन्तीति सन्तः तेषु सत्सु साधु तत्सत्यम्)** ज्या पदार्थांना अस्तित्व आहे ते पदार्थ 'सत्' होत. त्या सर्वांत उत्तम पदार्थ परमेश्वर आहे म्हणून त्याला 'सत्य' असें म्हणतात. **(यज्जानाति चराऽचरं जगत्तज्ज्ञानम्)** परमेश्वर सर्व चराचर जगाला जाणतो म्हणून त्यालाच 'ज्ञान' असें म्हणतात. **(न विद्यतेऽन्तोऽवधिर्मर्यादा यस्य तदनन्तम्** परमेश्वराला आकार नसल्यामुळें तो अमुक एवढ्या परिमाणाचा आहे असें म्हणतां येत नाहीं;- म्हणून त्याला 'अनंत' असें म्हणतात. **( सर्वेभ्यो बृहत्त्वाद्ब्रह्म)** परमेश्वर सर्वांहून मोठा असल्यामुळें त्याला 'ब्रह्म' असें म्हणतात. 'आङ्' उपसर्गपूर्वक 'डुदाञ् दाने' या धातूवरून 'आदि' शब्द सिद्ध होतो. त्याला 'नञ्' हा निषेध लावला असतां 'अनादि' असें रूप बनते. **(यस्मात्पूर्वं नास्ति परं चास्ति स आदिरुच्यते । न विद्यते आदिः कारणं यस्य सोऽनादिरीश्वरः)** ज्याच्यापूर्वी कांहीं नसते पण पुढें असतें त्याला आदि असें म्हणतात. परमेश्वराला 'आदि' (कारण) कांहीं नसल्यामुळें त्याला 'अनादि' असें म्हणतात. 'आङ्' उपसर्गपूर्वक 'टुनदि-समृद्धौ' या धातूवरून 'आनन्द' शब्द झाला आहे. **(आनन्दन्ति सर्वे मुक्ता यस्मिन् यद्वा यः सर्वान् जीवानानन्दयति स आनन्दः)** ईश्वराच्या सान्निध्यानें मुक्त जीव आनंदित होतात किंवा तो सर्व धर्मात्म्यांना आनंद देतो म्हणून त्याला 'आनंद' असे म्हणतात. 'अस-भुवि' या धातूवरून 'सत्' शब्द सिद्ध होतो. **(यदस्ति त्रिषु कालेषु न बाध्यते तत्सद्ब्रह्म)** परमेश्वर भूत, भविष्य व वर्तमान या तीनहि कालांमध्यें अबाधित एकसारखा असतो म्हणून त्याला 'सत्' असे म्हणतात. 'चिति-संज्ञाने' या धातूवरून 'चित्' हा शब्द झाला आहे. **(यश्चेतति चेतयति संज्ञापयति सर्वान् सज्जनान् योगिनस्तच्चित्परं ब्रह्म)** परमेश्वर स्वतः चैतन्यस्वरूप आहे व तो जीवांना चैतन्य देतो म्हणून त्याला 'चित्' हें नांव आहे. हे तीनहि शब्द मिळून 'सच्चिदानंद' हें परमेश्वराचें नांव होतें. **(यो ध्रुवोऽचलोऽविनाशी स नित्यः)** परमेश्वर ध्रुव, अविनाशी ; व अचल असल्यामुळें त्याला 'नित्य' असें म्हणतात. 'शुन्ध-शुद्धौ' या धातूवरून

'शुद्ध' हा शब्द होतो. (**यः शुन्धति सर्वान् शोधयति वा स ईश्वरः**) ईश्वर स्वतः पवित्र व अशुद्धीहून दूर आहे व तो दुसऱ्यांस पवित्र करतो म्हणून त्याला 'शुद्ध, असें म्हणतात. 'बुध–अवगमनें' या धातूवरून क्त प्रत्यय केला असतां 'बुद्ध' शब्द सिद्ध होतो. (**यो बुद्धवान् सदैव ज्ञाताऽस्ति स बुद्धो: जगदीश्वरः**) परमात्मा सदैव सर्वांना जाणतो म्हणून त्याला 'बुद्ध' असें म्हणतात. 'मुच्लृ-मोचने' या धातूवरून 'मुक्त' हा शब्द होतो. **यो:मुञ्चति मोचयति वा मुमुक्षून् स मुक्तो जगदीश्वरः**) सदैव क्लेशांपासून दूर असतो व तो मुमुक्षूंचे सर्व क्लेश दूर करतो म्हणून त्याला 'मुक्त' असें म्हणतात; म्हणूनच त्याला 'नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्त-स्वभाव' असें म्हणतात. 'निर् व आङ्' उपसर्गपूर्वक (डुकृञ्-करणें) या धातूवरून 'निराकार' शब्द झाला आहे. (**निर्गत आकारात् स निराकारः**) परमेश्वराला आकार नाहीं, तो कधींही शरीर धारण करीत नाहीं, म्हणून त्याला 'निराकार' असें म्हणतात 'अञ्जू व्यक्तिम्लक्षणकान्तिगतिषु' या धातूवरून 'अञ्जन्' शब्द सिद्ध झाला आहे. याला 'निर्' हा उपसर्ग लावला असतां 'निरञ्जन' हा शब्द सिद्ध होतो. (**अञ्जनं व्यक्तिम्लेंछणं कुकाम इन्द्रियैः प्राप्तिश्चेत्यस्माद्यो निर्गतः पृथग्भूतः स निरञ्जनः**) परमेश्वर हा आवृत्ति, व्यक्तता, म्लेंच्छाचार, दुष्कामना, व इन्द्रियांचे विषय यांहून पृथक् आहे म्हणून त्याला 'निरंजन' असें म्हणतात. 'गण-सङ्ख्यानें' या धातूवरून 'गण' शब्द सिद्ध होतो. याच्यापुढें 'ईश' किंवा 'पति' शब्द लावला म्हणजे 'गणेश' किंवा 'गणपति' हे शब्द सिद्ध होतात. [**ये प्रकृत्यादयो जडा जीवा गण्यन्ते संख्यायन्ते तेषामीशः स्वामी पतिः पालको वा**] परमेश्वर सर्व प्रकृत्यादिक पदार्थांचा व जीवांचा पालक व स्वामी आहे म्हणून त्याला 'गणपति' किंवा 'गणेश' असें म्हणतात. (**यो विश्वमीष्टे स विश्वेश्वरः**) ईश्वर सर्व संसाराचा अधिष्ठाता असल्यामुळें त्याला 'विश्वेश्वर, असें म्हणतात (**यः कूटेऽनेकविधव्यवहारे स्वस्वरूपेणैव तिष्ठति स कूटस्थः परमेश्वरः**) ईश्वर सर्व व्यवहारामध्यें व्याप्त व सर्व व्यवहारामध्यें आधार आहे. तथापि कोणताहि व्यवहार चालला असतां त्याच्या स्वस्वरूपांत बदल होत नाहीं, म्हणून त्याला 'कूटस्थ' असें म्हणतात. पूर्वी 'देव' शब्दाचे अर्थ दिले आहेत, तेच 'देवी' शब्दाचे जाणवे. परमेश्वराचीं नांवें तीनहि लिंगांतध्यें आहेत. 'ब्रह्म' (नपुंसकलिंगी), 'चितिः' (स्त्रीलिंगी), व 'ईश्वरः' (पुल्लिंगी), ज्यावेळीं 'ईश्वर' शब्दाचें विशेषण असतें तेव्हां 'देवः' असें व जेव्हां 'चिति' शब्दाचें विशेषण असतें तेव्हां 'देवी' असें रूप होतें. तात्पर्य कोणत्याहि लिंगीं शब्द असला तरी तो ईश्वराचाच वाचक होतो. 'शक्लृ-शक्तौ' या धातूवरून 'शक्ति' शब्द होतो. (**यः सर्वं जगत् कर्तुं शक्नोति स शक्तिः**) सर्व जग बनविण्याचें याला सामर्थ्य आहे म्हणून त्याला 'शक्ति' असें म्हणतात. 'श्रिञ् सेवायाम्' या धातूवरून 'श्री' शब्द झाला आहे [**यः श्रीयते सेव्यते सर्वेण जगता विद्वद्भिर्योगिभिश्च स श्रीरीश्वरः**] परमेश्वराचें सेवन सर्व जग, योगी, व विद्वान् हे करतात म्हणू याला 'श्री' असें म्हणतात.

'लक्ष-दर्शनांकनयोः' या धातूवरून 'लक्ष्मी' शब्द सिद्ध होतो. (**यो लक्षयति पश्यत्यङ्कते चिह्नयति चराचरं जगदथवा वेदैराप्तैर्योगिभिश्च यो लक्ष्यते स लक्ष्मीः सर्वप्रियेश्वरः**) परमेश्वर सर्व चराचराला पाहतो व जगत्-म्हणजेच शरीरांतील नेत्र, नासिकावगैरे, झाडाचीं पानें, फुलें, फळें, मुळें, व पृथिवी, जल, कृष्ण, श्वेत, मृत्तिका, पाषाण, चंद्र, सूर्य, आदिकरून सर्व बनवितो, व तो वेदादिशास्त्रांनीं, योगी, मुनी व आप्त यांनीं ल (जाणण्यास योग्य) असा मानला आहे म्हणून त्याला 'लक्ष्मी' हें नांव आहे. [सृ-गतौ] या धातूवरून 'सरस्' श झाला आहे व त्याला मतुप् व ङीप् हे प्रत्यय लाविले असतां 'सरस्वती' शब्द बनतो. [**सरो विविधं ज्ञानं विद्यते यस्यां चितौ सा सरस्वती**] परमेश्वराला विविधज्ञान अर्थात् शब्द, अर्थ, संबंध, प्रयोजन यांचें ज्ञान यथावत् होत असल्यामुळें त्याला 'सरस्वती' असें म्हणतात. [**सर्वाः शक्तयो विद्यन्ते यस्मिन् स सर्वशक्तिमानीश्वरः**] जो आपलें कार्य करावयाचें असतां कोणाचेंहि साहाय्य घेत नाहीं, ज्याला कोणच्याहि सामर्थ्याची गरज नाहीं, आपल्याच सामर्थ्यानें जो आपलीं सर्व जगत्संबंधीं कार्यें सहज आयासावांचून करतो, इतकें ज्याचें अगाध सामर्थ्य आहे त्या सर्वेश्वराला 'सर्वशक्तिमान्' असें म्हणतात. 'णीञ् प्रापणे' या धातूवरून 'न्याय' हा शब्द होतो. (**प्रमाणैरर्थपरीक्षणं न्यायः**) असें गौतमाचें न्यायदर्शनांत सूत्र आहे व त्यावर '**पक्षपातराहित्याचरणं न्यायः**' असें वात्स्यायनमुनिकृत भाष्य आहे.

जो प्रत्यक्षादिप्रमाणांनीं सिद्ध झाला आहे व जो पक्षपातरहित धर्माचरणानुकूल आहे त्याला 'न्याय' असें म्हणतात. **(न्यायं कर्तुं शीलमस्य स न्यायकारीश्वरः)** परमेश्वराचा स्वभावच पक्षपातरहित, धर्म, न्याय, करणारा असल्यामुळें त्याला 'न्यायकारी' असें म्हणतात. 'दय–दानगतिरक्षणहिंसादानेषु' या धातूवरून 'दया' शब्द साधला जातो. **(दयते ददाति जानाति गच्छति रक्षति हिनस्ति यया सा दया, बह्वी दया विद्यते यस्य स दयालुः परमेश्वरः)** परमेश्वर अभय देणारा, सत्यासत्यविद्यांचा-सत्य-अध्यात्मिक ब्रह्मविद्या व असत्य-पदार्थविद्या-ह्यांचा ज्ञाता, सज्जनांचें रक्षण करून दुष्टांना शासन करणारा आहे, म्हणून त्याला 'दयालु' असें नांव आहे. [**द्वयोर्भावो द्वाभ्यामितं सा द्विता द्वीतं वा सैव तदेव वा द्वैतम्, न विद्यते द्वैतं द्वितीयेश्वरभावो यस्मिंस्तदद्वैतम्**] अर्थात् [सजातीय-विजातीय-स्वगत-भेदशून्यं ब्रह्म] दोन पदार्थांचें अस्तित्व नसणें याला 'अद्वैत' असें म्हणतात. त्याचप्रमाणें सजातीय भेद [एका मनुष्याचा दुसऱ्या मनुष्याशीं दिसणारा] विजातीय भेद [मनुष्याचा वृक्षपाषाणादिकांशीं दिसणारा], व स्वगतभेद [शरीरांतील डोळे कान वगैरे यांत दिसणारा] हे तीन प्रकारचे भेद परमेश्वरामध्यें नाहींत. तो एकरस आहे म्हणून त्याला 'अद्वैत' असें म्हणतात **(गण्यन्ते ये ते गुणाः वा यैर्गणयन्ति ते गुणाः। यो गुणेभ्यो निर्गतः स निर्गुण ईश्वरः)** यालाच **अशब्दमस्पर्शमरूपमव्ययम्** इत्यादि विशेषणें उपनिषदांमध्यें दिलेलीं आहेत. परमेश्वर हा सत्व, रज, तम, रूप, रस, स्पर्श, गंध इत्यादि जडाचे गुण व अविद्या, अल्पज्ञता, राग, द्वेष, क्लेश वगैरे जीवाच्या गुणांहूनहि पृथक आहे, म्हणून त्याला 'निर्गुण' असें म्हणतात. [**यो गुणैः सह वर्तते स सगुणः**] परमेश्वर हा सर्वज्ञत्व, आनंदमयत्व, शुद्धता, सर्वशक्तिमत्व, इत्यादि गुणांनीं युक्त आहे म्हणून त्यालाच 'सगुण' असें म्हणतात. ज्याप्रमाणें पृथिवींत गंध हा गुण असल्यामुळें ती सगुण आहे व इच्छावगैरे गुण नसल्यामुळें निर्गुण आहे, त्याचप्रमाणें परमेश्वरहि प्रकृति व जीव यांच्या गुणांनीं विरहित असल्यामुळें 'निर्गुण' व सर्वज्ञत्वादि गुण त्यामध्यें स्वभावतः असल्यामुळें तोच 'सगुण' आहे. असा कोणताहि पदार्थ नाहीं कीं जो सगुणता व निर्गुणता यांहून पृथक् असूं शकेल. जडामध्यें चैतन्याचे गुण नाहींत या दृष्टीनें जड निर्गुण आहे पण जडाचे नैसर्गिक गुण जडांत असतात म्हणून तें सगुणहि आहे. तसेंच जीवामध्यें जडाचे गुण नसल्यामुळें तो निर्गुण व त्यामध्यें नैसर्गिक इच्छा द्वेषादिक गुण असल्यामुळें तोच सगुण आहे. त्याचप्रमाणें परमेश्वराविषयीं जाणावें [**अन्तर्यन्तुं नियन्तुं शीलं यस्य सोऽयमन्तर्यामी**] परमेश्वर प्राणी व अप्राणीरूप जगतांत व्यापून त्याचें नियमन करतो म्हणून त्याला 'अन्तर्यामी' असें म्हणतात. [**यो धर्मे राजते स धर्मराजः**] परमेश्वर अधर्मरहित व धर्मामध्येंच असून धर्माचा प्रकाश करणारा आहे म्हणून त्याला 'धर्मराज' असें म्हणतात. 'यमु-उपरमे' या धातूवरून 'यम' शब्द सिद्ध होतो. **(यः सर्वान् प्राणिनो नियच्छति स यमः)** जो सर्व प्राण्यांना कर्मफल देतो व जो सर्व अन्यायाहून पृथक् राहतो म्हणून त्या ईश्वराला 'यम' असें म्हणतात. 'भज-सेवायाम्' या धातूवरून 'भग' हा शब्द होतो व त्यावरून 'मतुप्' प्रत्यय केला म्हणजे 'भगवान्' शब्द सिद्ध होतो. **(भगः सकलैश्वर्यं सेवनं विद्यते यस्य स भगवान्)** परमेश्वर सकल ऐश्वर्यानें युक्त व भजन, सेवन करण्यास योग्य आहे म्हणून त्याला 'भगवान्' असें म्हणतात. 'मन-ज्ञाने' या धातूवरून 'मनु' शब्द झाला आहे. [**यो मन्यते मनुः**] परमेश्वर विज्ञानशील व मान देण्यास योग्य आहे म्हणून त्याला 'मनु' असें म्हणतात. 'पृ-पालनपूरणयोः' या धातूवरून 'पुरुष' शब्द होतो. **(यः स्वव्याप्त्या चराचरं जगत्पृणाति पूरयति वा स पुरुषः)** परमेश्वर सर्व जगांत पूर्ण भरला आहे म्हणून त्यास 'पुरुष' असें म्हणतात. 'डुभृञ्-धारणपोषणयोः या धातूचें 'भर' असें रूप होतें. त्याच्यापूर्वी 'विश्व' शब्द लावला असतां 'विश्वंभर' हा शब्द सिद्ध होतो, [**यो विश्वं बिभर्ति धरति पुष्णाति वा स विश्वंभरो जगदीश्वरः**] परमेश्वर जगाचें धारण व पोषण करतो म्हणून त्याला 'विश्वंभर' असें म्हणतात. 'कल-सङ्ख्याने' या धातूवरून 'काल' शब्द झाला आहे. [**कलयति वा सङ्ख्याति सर्वान्पदार्थान् स कालः**] परमेश्वर सर्व पदार्थ व जीव यांची संख्या जाणतो म्हणून त्यास 'काल' म्हणतात. 'शिष्लृ-विशेषणें' या धातूवरून 'शेष' शब्द सिद्ध झाला आहे. [**यः शिष्यते स शेषः**] परमेश्वर उत्पत्ति व प्रलय यांहून शेष म्हणजे यांत न येणारा असल्यामुळें त्याला 'शेष' असें म्हणतात. 'आप्लृ-व्याप्तौ' या धातूवरून 'आप्त' हा शब्द सिद्ध होतो. **(यः सर्वान्धर्मात्मन**

**आप्नोति वा सर्वधर्मात्मभिराप्यते छलादिरहितः स आप्तः)** परमेश्वर सत्योपदेशक, सर्वविद्यायुक्त, धर्मात्म्यांना प्राप्त होणारा, धर्मात्म्यांनीं प्राप्त करून घेण्यास योग्य, छलकपटादि दोषरहित आहे म्हणून त्याला 'आप्त' असें म्हणतात. 'शं' पूर्वक 'डुकृञ्-करणें' या धातूवरून 'शंकर' शब्द झाला आहे. (यः **शं कल्याणं सुखं करोति स शङ्करः)** परमेश्वर कल्याणकारक व सुखदाता आहे म्हणून त्याला 'शंकर' असें म्हणतात. 'महत्' शब्दापुढें 'देव' शब्दाचा योग केला असतां 'महादेव' हा शब्द सिद्ध होतो. **(यो महतां देवः स महादेवः)** परमेश्वर हा देवांचा देव, विद्वानांमध्येंहि उत्तम विद्वान्, सूर्यादि प्रकाशमान् पदार्थांनाहि प्रकाश देणारा आहे, म्हणून त्याला महादेव असें म्हणतात. 'प्रीञ् तर्पणे कान्तौ च' या धातूवरून 'प्रिय' शब्द सिद्ध होतो. **(यः प्रीणाति प्रीयते वा स प्रियः)** परमेश्वर सर्व शिष्ट, धर्मात्मे, व मुमुक्षु यांना आनंद देणारा व सर्वांनीं दर्शनाची इच्छा करण्यास योग्य असा असल्यामुळें त्याला 'प्रिय' असें म्हणतात. 'स्वयं' शब्दपूर्वक 'भू-सत्तायाम्' या धातूवरून 'स्वयम्भू' शब्द सिद्ध होतो. **(यः स्वयं भवति स स्वयम्भूरीश्वरः)** जो स्वतः आहेच, कधींहि उत्पन्न झाली नाहीं, तो स्वयंभू परमेश्वर होय. 'कु-शब्दे' या धातूवरून 'कवि' शब्द झाला आहे. **(यः कौति शब्दयति सर्वा विद्याः स कविरीश्वरः)** परमेश्वर वेदद्वारा सर्व विद्यांचा उपदेश करतो म्हणून त्याला 'कवि' असें नांव आहे. 'शिवु-कल्याणें' या धातूवरून 'शिव' हा शब्द झाला आहे. 'बहुलमेतन्निदर्शनम्' या वचनप्रामाण्यावरून 'शिव' हा धातू मानण्यांत येतो. परमेश्वर कल्याणस्वरूप व कल्याण करणारा असल्यामुळें त्याला 'शिव' असें म्हणतात.

परमेश्वराचीं ही शंभर नामें आहेत. वास्तविक परमेश्वराचीं असंख्य नावें आहेत. त्याचे गुण अनंत असल्यामुळें त्यांवरून पडलेलीं त्याचीं नांवेंहि आहेत. त्याच्या गुणकर्मस्वभावावरून त्याचीं अनंत नामें होतात. त्यांतील अंशमात्र नामें येथें दिलीं आहेत. वेदादि सच्छास्त्रामध्यें परमेश्वराच्या असंख्या गुणांचें वर्णन आहे. त्याच्या अनंत गुणांचा व नामांचा बोध तर होईलच पण अन्य पदार्थांचेंहि पूर्ण ज्ञान होईल. हा वेदाध्ययनापासून दुहेरी लाभ आहे.

## मंगलाचरण.

[प्रश्न] अन्य ग्रन्थकार ज्याप्रकारचें आदि, मध्य व अंत यांमध्यें मंगलाचरण करतात त्याप्रकारचें तुम्ही या ग्रंथांत कां केलें नाहीं ? [उत्तर] वैदिक आर्षग्रंथाची शैली श्रेष्ठ मानणारांना तसें करणें योग्य नव्हे. कारण जो आदि, मध्य व अंत या तीन ठिकाणींच मात्र मंगलाचरण करील त्याचा या तीन ठिकाणाशिवाय असलेला इतर लेख अमंगल असेल. वास्तविक जी पक्षपातरहित, सत्य व वेदोक्त ईश्वराज्ञा आहे तिचें सदैव आचरण करणें हेंच मंगलाचरण होय. [**शिष्टाचारात् फलदर्शनात्श्रुतितश्चेति**। साङ्ख्य ५।१] ग्रंथाच्या आरंभापासून शेवटपर्यंत सत्य आचाराचें कथन करणें हेंच मंगलाचरण आहे व तेंच या ग्रंथामध्यें केलेलें आहे. कांहीं ठिकाणीं मंगलशब्द व कांहीं ठिकाणीं अमंगल लिहिणें हें योग्य नव्हें. पहा महर्षी काय लिहितात तेः—

**यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि ॥** तैत्ति० उ० ७।११।

हे लोकहो ! जी वेदप्रतिपादित, अनिंदनीय, व धर्मयुक्त कृत्यें असतील तींच तुम्ही आचरावींत. वेदविरुद्ध धर्मयुक्त कृत्यांचें कधींहि आचरण करूं नये. आधुनिक ग्रंथामध्यें 'श्रीगणेशाय नमः, सीतारामाभ्यां नमः, राधाकृष्णाभ्यां नमः, श्रीगुरुचरणारविन्दाभ्यां नमः, हनुमते नमः, दुर्गायै नमः, बटुकाय नमः, भैरवाय नमः, सरस्वत्यै नमः, नारायणाय नमः,' इत्यादि प्रकारें मंगलाचरण केलें जातें. याप्रमाणें लिहिणें हें वेदादि सच्छास्त्रांप्रमाणें विरुद्ध आहे म्हणून बुद्धिवान् लोक तें अग्राह्य असें समजतात; कारण वेद व ऋषिप्रणित ग्रंथ यांमध्यें असें मंगलाचरण कोठेंहि पहाण्यांत येत नाहीं. आर्षग्रंथांच्या आरंभी 'ओ३म्' किंवा 'अथ' हे शब्द येतात. पहा :—

**'अथ शब्दानुशासनम्'। अथेत्ययं शब्दोऽधिकारार्थः प्रयुज्यते** ।व्याकरणमहाभाष्ये ।

**'अथातो धर्मजिज्ञासा'। अथेत्यानन्तर्ये वेदाध्ययनानन्तरम्** । पूर्वमीमांसायाम् ।

**'अथातो धर्मं व्याख्यास्यामः'। अथेति धर्मकथनानन्तरम् धर्मलक्षणंविशेषेणव्याख्यास्यामः** । वैशेषिकदर्शने।

**अथ योगानुशासनम्** । **अथेत्ययमधिकारार्थः** । योगशास्त्रे ।
**'अथ त्रिविधदुःखात्यन्तनिवृत्तिरत्यन्तपुरुषार्थः'** ॥ **सांसारिकविषयभोगानन्तरं त्रिविधदुःखात्यन्तनिवृत्यर्थः प्रयत्नः कर्त्तव्यः** । साङ्ख्यशास्त्रे ।
**ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत** । छान्दोग्योपनिषदि ।
**ओमित्येतदक्षरमिदँ सर्वं तस्योपव्याख्यनम्** । माण्डूक्ये ।

हीं त्या त्या शास्त्रांतील आरंभीचीं बचनें आहेत. यांवरून उघड दिसेल कीं, ऋषिलोक ग्रंथारंभीं 'ओम्, किंवा 'अथ' या शब्दांचा प्रयोग करीत. याचप्रमाणें सर्व आर्षग्रथांची पद्धत आहे. 'अग्नि, इट्, अग्नि, ये त्रिषप्ता परियन्ति०' या शब्दांनींच चारहि वेदांचा प्रारंभ झाला आहे. त्यांच्या आरभी 'श्रीगणेशाय नमः' इत्यादि शब्द नाहींत. त्याचप्रमाणें 'हरिः ओ३म्' हें लिहिणेंहि आधुनिक व पौराणिक तांत्रिक लोकांनींच उपस्थित केलें आहे. अर्थात् **'ओ३म्'** किंवा **'अथ'** हे शब्द ग्रंथप्रारभीं लिहिले पाहिजेत. याप्रमाणें ईश्वराविषयीं या समुल्लासमध्यें किंचिन्मात्र दिग्दर्शन केलें आहे.

**इति सुभाषाविभूषित ईश्वरनामविषये प्रथमः समुल्लासः संपूर्णः ।**

गुरु विरजानन्द दण्डी
सन्दर्भ पुस्तकालय
पु परिग्रहण क्रमांक ... 577
दयानन्द महिला महावि.

# अथ द्वितीयसमुल्लासः

**अथ शिक्षां प्रवक्ष्यामः ।**

**मातृमान् पितृमानाचार्यवान् पुरुषो वेद ।**—शतपथब्राह्मण.

## [१] आईबापांचीं कर्तव्ये.

ज्याला माता, पिता, व गुरु हे तीनहि शिक्षक उत्तम मिळतात, तो मनुष्य विद्वान् होतो. असा पुरुष ज्या कुलांत उत्पन्न होतो, ते कुल धन्य होय ! ज्याचे मातापिता धार्मिक व विद्वान् असतात तो पुत्र महाभाग्यावान् ! जसें आईकडून मुलाला शिक्षण मिळते व त्याला वळण लागते तसें दुसऱ्या कोणाकडूनहि लागत नाहीं. आपल्या संतानाचे हित करावें अशा हेतुनें जसें मातेच्या अंतःकरणांत प्रेम असतें तसें दुसऱ्या कोणाच्याहि असुं शकत नाहीं. (**'मातृ-मान-'प्रशस्ता धार्मिकी माता विद्यते यस्य स मातृमान्)** म्हणून 'मातृमान्' असें पद वरील ब्राह्मणवचनांत घातलें आहे. ज्याला धर्म जाणणारी व मुलाचें हित जाणणारी माता असते तो 'मातृमान्' होय. जी आई गर्भ-धारणापासून मुलाचीं विद्या पुरी होईपर्यंत त्याला उत्तम उपदेश करते ती खरोखरच धन्य होय !

आईबापांनीं गर्भधारणाच्या पूर्वी, गर्भ राहिला असता, व नंतर, मादक द्रव्यें, मद्य, दुर्गंधयुक्त, रुक्ष व बुद्धि-नाशक पदार्थ खाऊं नयेत. शान्ति, आरोग्य, बल, बुद्धि, पराक्रम व सुशीलता इत्यादि सद्गुण अंगीं आणून, तूप, दूध व मिष्ट अन्नपान इत्यादि श्रेष्ठ पदार्थांचें सेवन करावें. याच्या योगानें रज व वीर्य दोषरहित व अत्युत्तम गुणयुक्त होऊन त्यापासून होणारी प्रजाहि सुदृढ व पराक्रमी होईल. ऋतुकालींच स्त्रीसमागम करावा. रजोदर्शनाच्या पांचव्या दिवसापासून सोळाव्या दिवसापर्यंत बारा दिवस ऋतुदान देण्यास योग्य आहेत. या बारा दिवसांत अकरावी व तेरावी रात्र वर्ज्य समजावी. शिल्लक दहा रात्री राहिल्या. या ऋतुदानाला योग्य आहेत. रजोदर्शनापासून सोळाव्या रात्रीच्या पुढें स्त्रीसमागम करूं नये. पुनः रजोदर्शन होऊन पूर्वोक्त ऋतुदानाचा समय आल्यानंतर अथवा गर्भस्थितीनंतर एक वर्षानें समागम करावा. दोघांच्याहि शरीरामध्यें आरोग्य, प्रसन्नता व आनंदी वृत्ति असेल व कोणत्याहि प्रकारचा शोक नसेल अशा वेळींच समागम व्हावा. चरक-सुश्रुतामध्यें ज्याप्रमाणें भोजनाच्छादनाचा प्रकार सांगितला आहे व मनुस्मृतीमध्यें ज्याप्रमाणें स्त्रीपुरुषांची प्रसन्नता राखण्याची रीत सांगितली आहे. त्याप्रमाणें वागावें. गर्भधारण झाल्यावर भोजनाच्छादनाची व्यवस्था फारस सावधगिरीनें ठेविली पाहिजे. नंतर एक वर्षपर्यंत स्त्रीपुरुषांनीं समागम करूं नये. बुद्धि, बल, रूप, आरोग्य, पराक्रम, शान्ति इत्यादि गुण वाढविणाऱ्या द्रव्यांचेंच स्त्रीनें गर्भवती असेपर्यंत सेवन करावें.

गर्भिणी स्त्री बाळंत झाल्यावर बालकाला उत्तम सुगंधियुक्त पाण्यानें स्नान घालून, नालच्छेदन वगैरे करून, उत्तम सुगंधियुक्त घृतादि पदार्थांचें हवन करावें. [बालकाच्या जन्मसमयीं "जातकर्मसंस्कार" करावयाचा असतो. हा वेदोक्त संस्कार आहे. यांत करावयाचे गृह्यसूत्रांतील हवनादि प्रकार संस्कारविधींत सांगितले आहेत त्याप्रमाणें करावेत.] स्त्रियेच्याहि स्नान, पान, भोजनाच्छादनाविषयीं अशी व्यवस्था करावी कीं, ज्याच्या योगानें बालक व स्त्री यांच्या शरीरांत आरोग्य व पुष्टि क्रमशः येत जाईल. आईला किंवा दाईला असे पदार्थ खावयास घालावे कीं, ज्यांच्या योगानें ह्यांचें दूध बालकाला हितकारक होऊन त्याच्या अंगांत उत्तम गुण उत्पन्न होतील. आईनें सहा दिवसपर्यंत आपलें दूध मुलाला पाजावें व नंतर दाईचें पाजावें; पण दाईच्या खाण्यापिण्याची व्यवस्था आईबापांनीं करावी. जर कोणाला दाई ठेवण्यास सामर्थ्य नसेल तर त्यांनीं गाईचें किंवा शेळीचें उत्तम दूध-त्यांत बुद्धि, पराक्रम व आरोग्य वाढविणाऱ्या वनस्पतीचें शुद्ध जलांत भिजवुन काढलेलें सत्व समभाग पाण्यांत किंवा तसेंच मिसळून मुलास पाजावें. संतानोत्पत्तीनंतर बालकाला व आईला रमणीय, उदात्त, भव्य व शुद्ध हवेच्या ठिकाणीं नेऊन ठेवावें व त्यांच्या सन्निध उत्तम, रमणीय, सुगंधित व आरोग्य वाढविणारे पदार्थ ठेवावे. जो प्रदेश उत्तम वायुनें युक्त व आरोग्यकारक असेल त्याच प्रदेशांत फिरावयास जावें.

तात्पर्य, दोघांचें आरोग्य राहाण्यास आवश्यक असतील ते उपचार यथाशास्त्र करावे. जेथें दाई, गाय, बकरी मिळणें शक्य नसेल तेथें देशकालपरत्वें योग्य असेल तें करावें. बाळंतपणामुळें प्रसूता स्त्री निर्बल होते म्हणून तिनें आपलें दूध बालकांना पाजूं नये. निर्बलता गेल्यावर पाजण्याला निषेध नाहीं. स्तनाच्या छिद्रांवर अशा औषधींचा लेप लावावा कीं ज्याच्या योगानें दुग्धस्त्राव बंद होईल. असें करण्यापासून एक महिन्याच्या आंत ती स्त्री पुनः पूर्ववत् युवती होते. याप्रमाणें एक वर्षाचा काल जाईपर्यंत पुरुषानेंहि ब्रह्मचर्य धारण करून व यथोचित् अन्न सेवन करून वीर्याचा निग्रह करून ठेवावा. याप्रमाणें वागणाऱ्या स्त्रीपुरुषांपासून उत्पन्न होणारीं बालकें दीर्घायु, बलवान्, पराक्रमी होतील यांत मुळींच शंका नाहीं. स्त्री व पुरुष दोघेही ब्रह्मचर्यादि नियमांप्रमाणें वागल्यास जीं मुलें होतील तीं सर्व उत्तमच होतील.

### [२] मुलांचें प्राथमिक शिक्षण.

बालकांना आईनें असें शिक्षण द्यावें कीं, तें सभ्यपणानें वागून कोणत्याहि प्रकारें कुचेष्टा करणार नाहींत. ज्यावेळीं मूल बोलूं लागेल त्यावेळीं आईनें त्याचें वर्णोच्चार स्पष्ट व शुद्ध होतील असें करावें. मुलांची जिव्हा कोमल होऊन त्यांतून सर्व वर्ण, ऱ्हस्व, दीर्घ व प्लुत अक्षरांचा जसा करावयाचा असेल तसाच उच्चार निघेल असें करावें. जसें, 'प' हें अक्षर ओष्ठस्थानांतून उच्चारलें जातें व त्याचा स्पष्ट प्रयत्न आहे म्हणून तें उच्चारावयाचें असतांना दोनीहि ओंठ मिळविले पाहिजेत. या सर्वांकडे नीट लक्ष्य देऊन त्याची वाणी मधुर, गंभीर व सुंदर होईल व स्वर, अक्षर, मात्रा, वाक्य, संहिता, अवसान यांचा सहज व नीट उच्चार होईल असें त्यास शिकवावें. ज्यावेळीं त्याला साधारण बोलतां येऊं लागेल व बरें वाईट समजूं लागेल, तेव्हां त्याला लहान, थोर, मान्य, माता, राजा, विद्वान् यांच्याशीं कसें भाषण करावें, गोड कसें बोलावें, त्यांच्याशीं कसें वर्तन करावें, त्यांच्याजवळ कसें बसावें याविषयीं शिक्षण द्यावें. याच्या योगानें त्याच्याकडून कधींहि अयोग्य व्यवहार होणार नाहीं. तसेंच त्याला असें शिक्षण द्यावें कीं, त्याच्या योगानें तो जितेंद्रिय, विद्याप्रिय, व सत्संगतीची इच्छा करणारा होऊन सदाचरणी बनेल. व्यर्थ क्रीडा, रोदन, हास्य, लढाई, हर्ष, शोक, लोलुपता, ईर्ष्या, द्वेष वगैरे दुर्गुण उत्पन्न होतील असें वर्तन मुलांशीं करूं नये, तसेंच उपस्थ इंद्रियाला स्पर्श करण्यापासून किंवा त्याला घर्षण करण्याने वीर्यक्षीणता व नपुंसकत्व उत्पन्न होतें व हस्तहि दुर्गंधयुक्त होतो म्हणून त्या इंद्रियाला स्पर्श करूं देऊं नये. ज्या आचरणानें सत्यप्रियता, शौर्य, धैर्य, प्रसन्नता वगैरे गुण उत्पन्न होतील तें आचरण मुलांशीं ठेवावें व त्याचें त्यांना शिक्षणहि द्यावें. मुलें पांच वर्षांच्या वयाचीं झालीं म्हणजे त्यांना देवनागरीं अक्षरें शिकविण्यास आरंभ करावा. इच्छा असल्यास अन्य भाषेच्या अक्षरांचीही ओळख करून द्यावी. नंतर ज्यामध्यें विद्या, धर्म, परमेश्वर, माता, पिता, आचार्य, विद्वान्, अतिथि, राजा, प्रजा, कुटुंब, बंधु, भगिनी, नोकरचाकर वगैरे लोकांशीं कसें वागावें हें सांगितलें असेल, असे मंत्र, श्लोक, सूत्र, गद्य वगैरे त्यांच्याकडून हलके हलके अर्थासह पाठ करवून घ्यावे. या शिक्षणाच्या योगानें मुलें लबाड मनुष्याच्या फसवणुकीला फसलीं जाणार नाहींत. तसेंच त्यांना विद्या व धर्म यांच्या विरुद्ध जे जे भ्रांतिजालांत पाडणारे व्यवहार आहेत त्यांपासून आपणांस कसें दूर ठेवावें याचाहि प्रसंगविशेषीं उपदेश करावा. त्याच्या योगाने तीं मुलें पुढें भूतप्रेतादि करणाऱ्यांच्या मिथ्या वाग्जालानें फसलीं जाणार नाहींत.

### [३] भूतप्रेत.

***गुरोः प्रेतस्य शिष्यस्तु पितृमेधं समाचरन्। प्रेतहारैः समं तत्र दशरात्रेण शुध्यति ॥मनु० ५।६५॥**

मृत-शरीराला 'प्रेत' असें म्हणतात. 'जेव्हां गुरूचा प्राणान्त होतो, तेव्हां त्याच्या प्रेताला (मृतशरीराला) जो शिष्य इतरांबरोबर उचलून नेतो, तो दहा रात्रींनीं शुद्ध होतो.' ज्यावेळीं शरीर अग्नीनें जळून जातें, तेव्हां त्याला 'भूत' असें म्हणतात. 'भूत' आहे, म्हणजे सध्यां नाहीं इतकेंच. ब्रह्मद्यापासून आजपर्यंत झालेल्या सर्व विद्वानांचें मतहि असेंच आहे; पण जन्मापासून होत असलेले कुसंस्कार, कुसंग यांच्यायोगानें मुलांची मनोवृत्ति साशंक होऊन तीं भूत, प्रेत, पिशाच्चा, शाकिनी, डाकिनी इत्यादि कल्पित व अनिश्चित गोष्टींपासून भयभीत व दुःखित होतात. हे लहानपणचे संस्कार मग जाण्यास कठीण पडतात म्हणून तसले कुसंस्कार व भयजनक वर्तन त्यांच्याशीं करूं नयें. मुलें धीट, शूर

---

* हा श्लोक येथें फक्त 'प्रेत' शब्दाच्या अर्थासाठीं घेतला आहे.

व सत्यप्रिय निपजतील असच वळण त्यांस लावावें. ज्यावेळीं कोणीं मनुष्य मरतो तेव्हां त्याचा जीव पापपुण्याच्या अनुरोधानें सुखदु:ख भोगण्यासाठीं परमेश्वराच्या न्यायी व्यवस्थेनें दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो-दुसरा जन्म धारण करतो. अविनाशी परमेश्वराच्या व न्यायी व्यवस्थेचा कोणी तरी नाश करूं शकेल काय ? मग दुसऱ्या शरीरांत गेलेला जीव येथें येऊन त्रास कसा देईल? पण याचा विचार न करतां अज्ञानी लोक वैद्यशास्त्र, मानसशास्त्र, शारीरशास्त्र, प्राणविद्या, स्थूल व सूक्ष्म भूतविद्या या पदार्थविद्या यांचें ज्ञान नसल्यामुळें, सन्निपातादिक ज्वर व उन्मादादिक मानसिक विकार यांनाच भूतप्रेत समजून योग्य उपचार न करतां, धूर्त, पाखंडी, महामूर्ख, अनाचारी, स्वार्थी, ढोंगी, कपटी, अशा नीच मनोवृत्तीच्या माणसांच्या व मंत्र तंत्र करण्याचा आव आणणाऱ्या भंगी, चांभार, शूद्र, म्लेंच्छ इत्यादि धर्महीन व नीच मनुष्यांच्या तावडींत सांपडतात, त्यांच्या लबाडीच्या बोलण्यास फसतात, व उच्छिष्ट भोजन, धागादोरा, यंत्रमंत्रतंत्र इत्यादि करीत फिरतात! या मूर्खपणाच्या आचरणानें द्रव्याचा नाश, संतानाची दुर्दशा, व रोगाची वाढ होऊन सर्वतोपरी त्यांना दु:ख होतें. मग ते 'दैव' म्हणतात ! जेव्हां डोळे असून आंधळे झालेले लोक दुर्बुद्धि, स्वार्थी व पापी लोकांच्या भ्रमजालांत सांपडतात तेव्हां अंध होऊन त्या मंत्र्याला म्हणतात, 'महाराज! या मुलाला काय झालें आहे हो ?' तेव्हां तो ढोंगी म्हणतो कीं, 'पहा हो ! याच्या शरीरांत भूतसंचार झालेला आहे. वेळींच उपाय केला तर बरें; नाहीं तर हें जबरदस्त पिशाच्च याचे प्राणहि हरण करील; अमूक वस्तु व अमूक पैसे द्याल तर मीहि यावरचा मांत्रिक उपचार करीन व पिशाच्चाला दूर करीन.' (हें ऐकून ते अंध लोक म्हणतात कीं, 'महाराज! काय पाहिजे तें घ्या पण ही भूतबाधा बंद करा व याला आराम वाटेल असें करा.) अशीं बोलणीं ऐकल्यावर तर मग त्या ढोंगी लोकांची चैनच होते. मग तेही अमूक सामुग्री, इतकी दक्षिणा, ही भेट, इत्यादि ठराविक पदार्थांची मागणी करतात व झांज, ढोल, मृदंग वगैरे वाजवून मोठा कल्होळ करतात. इतक्यांत त्यांचाच कोणी तरी साथीदार नाचूं लागतो व तोंडानें म्हणतो कीं, 'मी याचा प्राणहि घेईन.' हें ऐकल्याबरोबर ते लोक घाबरून त्या नीच लोकांच्या पायां पडतात व त्यांची प्रार्थना करतात कीं, 'तुला काय पाहिजे तें घे पण याच्या प्राणाला धक्का लाऊं नको' हें ऐकून तो ढोंगी म्हणतो कीं, 'मी हनुमान् आहे. मला मिठाई, तेल, सिंदूर, सव्वामण रोट व लाल लंगोट इतकें द्या.' किंवा 'मी देव, भैरव किंवा पिशाच्च आहे; मला कोंबड्या वीस, दारूचे शिसे पांच, पांच बकरे, मिठाई एक मण व अमूक वस्त्रें इतकें द्या.' हें त्या नाचणाऱ्याचें भाषण ऐकून 'तुला पाहिजे तें घे' असें जवळचे लोक म्हणतात. तेव्हां तो आणखी थोडेसें नाचून आपलें काम झालें असें मनांत समजून उगी राहतो. यावेळीं कोणी हुशार मनुष्य हजर असेल व जर त्यास चांगला खरपूस मार देईल तर सर्व भूतें एकदम नाहींशीं होतील; कारण हा सर्व खेळ पैसे उपटण्यासाठीं असतो. म्हणून असल्या मांत्रिक ढोंगी लोकांच्या नादीं कोणी लागूं नये. आपल्या मुलांस असें शिक्षण द्यावें कीं, त्याच्या योगानें तीं या लोकांना फसणार नाहींत.

### [४] फलज्योतिष.

रोगी किंवा दु:खित मनुष्याचे नातलग जसें भूतांविषयींच्या अज्ञानानें फसतात, तद्वत् ते ज्योतिर्विद्याभ्यासी व ग्रहज्योतिष्यांच्या नादीं लागून फसतात. ते अशा लोकांकडे जाऊन म्हणतात कीं, 'महाराज ! याला काय होतें आहे तें पहा' तेव्हां तो जोशी म्हणतो कीं, 'अहो याच्यावर तर सूर्यादि क्रूर ग्रहांची दृष्टी अनिष्ट झालेली आहे. याबद्दल तुम्हांला शांति, पाठ, पूजा, दान वगैरे केलें पाहिजे. तरच त्या ग्रहांची शांति होऊन याला बरें वाटेल, नाहींतर कदाचित् मृत्युचाहि संभव आहे.' (प्रश्न) तुम्ही फलज्योतिष खोटें असें समजतां काय? (उत्तर) होय. पहा, पृथ्वीप्रमाणें सूर्यादिक नऊहि ग्रह जड आहेत, चेतन नाहींत; त्यांची आपआपल्यापरी प्रकाश देणें, शीतोष्णता देणें, आकर्षण करणें, भरती ओहोटी करणें वगैरे कामें आहेत. ते चेतन पदार्थांप्रमाणें क्रोधित किंवा शांत होऊन दु:ख किंवा सुख देतील हें संभवत नाहीं. (प्र०) या संसारांत राजापासून रंकापर्यंत सर्व लोक दु:खी होत आहेत ते ग्रहपीडेपासून नव्हे कीं काय? (उ०) नाहीं. तें त्यांचें दु:ख ग्रहांच्या योगानें होत नसून पूर्व पापपुण्याच्या योगानेंच होत असतें. (प्र०) तर मग ज्योतिषशास्त्र खोटें कीं काय? (उ०) नाहीं. अंक, बीज व रेखागणित (भूगोल, खगोलविद्या) हा जो गणिताचा भाग आहे तेंच खरें ज्योतिष व ते सर्व खरे आहे. पण त्याशिवाय ग्रहफलें देण्याचीं जीं लीला कोणी माजविली आहे ती सर्व खोटी आहे.

(प्र०) मग ह्या जन्मपत्रिका वगैरे सर्व खोट्याच कीं काय ? (उ०) होय. त्यांना जन्मपत्रिका न म्हणतां शोकपत्रिका म्हटल्या पाहिजेत. मुलाचा जन्म होतो तेव्हां आनंद होतो पण जेव्हां जोशीबुवा जन्मपत्रिका घेऊन येतात व वाचतात तेव्हांपासून काळजीला सुरवात होते. धनाढ्य पुरुषाची जन्मपत्रिका करावयाची असली म्हणजे चक्रें, वेलबुट्या वगैरे वरीच शोभा करून तयार करतात व निर्धनाची साधारणपणेंच तयार केली जाते. जेव्हां जन्मपत्रिका जोशीबुवा घेऊन येतात, तेव्हां घरचीं सर्व मनुष्यें आतुरतेनें विचारतात कीं, 'काय जोशीबुवा ! पत्रिका तर चांगली आहे ना ?' जोशी म्हणतो, 'अहो! जें आहे तें मी आपणास वाचून दाखवितों. पहा ! याचे जन्मग्रह तर फारच उत्तम आहेत. मित्रग्रहहि फार चांगले पडले आहेत. हा धनाढ्य व प्रतिष्ठावान् होऊन बसेल तेथें आपलें तेज पाडील व सुलक्षणी निपजेल.' इतकें ऐकल्यावर आईबापांना आनंद होतो व तीं म्हणतात, 'वा: जोशीबुवा ! फार चांगलें !' धूर्त जोशीबुवाची पक्की खात्री असतें कीं, अशा बोलण्यानें आपला कार्यभाग होणार नाहीं; म्हणून तो लगेच म्हणतो, 'सर्व ग्रह चांगले आहेत खरें, पण याला आठव्या वर्षी एक कुयोग आहे. त्यावेळीं क्रूर ग्रहांचा योग असल्यामुळें कदाचित् मृत्युहि होण्याचा संभव आहे' हें एकून त्याच्या आईबापांचा पुत्रजन्मापासून झालेला आनंद नष्ट होऊन तीं शोकाकुल होतात व म्हणतात 'जोशीबुवा! याला कांही उपाय आहे कीं नाहीं? जोशी म्हणतो :—'हो हो, हीं हीं दानें करावीं, या मंत्रांचा जप करावा व अमूक ब्राह्मणभोजनें करावीं म्हणजे नवग्रहशांति होऊन अपमृत्यूची बाधा बहुधा टळेल.' या लोकांच्या शब्दांवर विश्वास ठेऊन ते सांगतील त्याप्रमाणें अज्ञानी लोक करतात, गुण आला तर जोशीबुवा म्हणतात कीं, 'पहा, मंत्र, ब्राह्मण, व देवता यांची शक्ती कशी आहे ती! मंत्रासामर्थ्यानें तुमच्या मुलाचे प्राण वांचले. इ०' पण जर गुण आला नाहीं तर म्हणतात की, 'आम्ही पुष्कळ यत्न केला व तुम्ही पुष्कळ दानधर्म केला, पर परमेश्वरसत्तेपुढें कोणाचें चालणार आहे ? आम्ही तरी काय करावें ? त्याचे कर्मच तसें होतें, इ०.' या ठिकाणीं अशी व्यवस्था झाली पाहिजे कीं मंत्रतंत्रानें व्हावयाचें तें कार्य जर झालें नाहीं तर मंत्रिकाकडून दुप्पट तिप्पट पैसे परत घेतां यावे व जर तो वांचला तरीहि त्याजकडून ते पैसे परत घेतलेच पाहिजेत, कारण परमेश्वराच्या नियमानुसार व आपल्या कर्मानुसार तो बरा झाला, यांत जोशानें काय केलें ? अवगुण झाला तर मात्र जोशानें म्हणावें कीं, त्याचे कर्मच तसें होतें, ईश्वरी नियम तोडण्यास कोण समर्थ आहे ?' मग बरा झाला असतां आईबापांनी कां न सांगावे कीं, 'अहो जोशीबुवा ! हा आपल्या कर्मानुसार व परमेश्वराच्या नियमानुसार वांचला त्यांत तुम्ही काय केलें?' त्याचप्रमाणें कांही लोक गुरु बनून लोकांकडून दानें* करवून अनेक पदार्थ उपटतात. त्यांसही याच प्रकारचीं उत्तरें दिलीं पाहिजेत. वास्तविक या कृत्यांचा व धर्माचा कांहीं संबंध नाहीं.

### [५] मंत्रतंत्र

मंत्रतंत्र व शीतलादिक देवता यांसंबंधानेंहि लोकांनीं अशींच ढोंगें माजविलीं आहेत. कोणी सांगतात कीं, 'आम्ही मंत्र जपून दोरा बांधला कीं, त्या मंत्रसामर्थ्यानें त्या देवतेच्या प्रतापानें किंवा पीराच्या प्रतापानें कोणतेंहि विघ्न उत्पन्न होणार नाहीं.' या लोकाना असें विचारलें पाहिजे कीं, 'तुम्ही परमेश्वराचे नियम, मृत्यूची वेळ व कर्मफल हीं बदलू शकतां कीं काय? तुम्ही हा प्रकार करूनहि कितीतरी मुलें मेलीं आहेत व तुमच्या घरचे लोकहि मेले आहेत, त्यांना तुम्हीं कां वांचविले नाहींत? तुमच्या घरच्या लोकांना वांचविणें तुमच्या हातून होत नाहीं, मग तुम्ही इतरांना काय

* लुब्धैर्वित्तपरैर्ब्रह्मन् नास्तिकैः सम्प्रवर्तितम् । वेदवादानविज्ञाय सत्याभासमिवानृतम् ॥६॥
इदं देयमिदं देयमिति चायं प्रशस्यते । अत स्तैन्यं प्रभवति विकर्माणि च जाजले ॥७॥ भारत.शां अ. २६४॥

'हें दान द्यावें. तें दान करणें चांगलें.' असें जें लिहिलें आहे, तें लोभी, पैसा मिळविण्यासाठीं धडपडणाऱ्या, नास्तिक व वेदार्थ न जाणणाऱ्या अशा लोकांनीच लिहिलें आहे. तें खरें नाहीं. परद्रव्यापहार करण्याची ही संभावित शैली आहे. (?) दानें सत्कर्मांत न गणितां कुकर्मांत गणिलीं न पाहिजेत. या महाभारतकार व्यासजींच्या वाणीचा जर कोणी विचार करील, तर जनतेला आळसी बनवून देशाच्या हानीला कारण झालेल्या या दानलीलेचें अनिष्ट स्वरूप दिसून येईल. हा खुळसट दानप्रकार सोडून जर लोक राष्ट्रीय उन्नतीकडे या धनाचा सदुपयोग करूं लागले तर भारत-राष्ट्रोन्नति होणार नाहीं काय ?

वांचविणार ? स्वतः तुम्ही तरी मृत्यूपासून सुटाल असें तुम्हांला वाटते काय ?' असें विचारलें म्हणजे ते धूर्त समजतात कीं, या ठिकाणीं आमची डाळ शिजणार नाहीं. या प्रकारचीं दुराचरणें लोकांनीं सोडून दिलीं पाहिजेत व इतर धार्मिक, विद्वान्, निष्कपटी, परोपकारी लोक ज्याप्रमाणें हित करतात त्याप्रमाणें करण्यास लागलें पाहिजे. वरील प्रकारचे मंत्रतंत्रादिक मिथ्या व्यवहार टाकून व धार्मिक वृत्तीनें राहून देशहित करणें, निष्कपटतापूर्वक विद्या शिकविणें, उत्तम विद्वानांना साहाय्य करणें, व ज्याप्रमाणें ते लोकोपकार करतात त्याप्रमाणें आपण करणें या गोष्टी सदैव केल्या पाहिजेत. जे लोक रसायन (किमया), मारण, मोहन, उच्चाटन, वशीकरण करतात, त्यांना महा नीच समजावें. या प्रकारचा उपदेश लहानपणींच मुलांना केला पाहिजे; म्हणजे त्याच्या योगानें तीं मुलें पुढें तशा भ्रमजालांत फसणार नाहींत व त्या योगानें दुःखहि भोगणार नाहींत. त्याचप्रमाणें त्यांना असें शिक्षण द्यावें कीं, ज्याच्या योगानें त्यांना वीर्यरक्षणानें आनंद व वीर्यनाशानें दुःखप्राप्ति होते हें समजेल. यायोगें अर्थातच ते पूर्ण ब्रह्मचारी राहतील.

[६] **वीर्यरक्षण.**

ज्याच्या शरीरांत वीर्य सुरक्षित राहिलेलें असतें, तो निरोगी, बुद्धिवान्, बलिष्ठ, पराक्रमी, व उत्साही असल्यामुळें सदैव सुखी असतो. वीर्यरक्षण करावयाचें असेल तर स्त्रियादि विषयांविषयीं गोष्टी, विषयी लोकांची संगति, विषयांचें ध्यान, स्त्रियांना कुदृष्टीनें पाहणें, एकान्तांत राहणें, स्त्रियांशीं वारंवार भाषण करणें व स्पर्शादि करणें इत्यादि कृत्य सोडलीं पाहिजेत. ज्याला पूर्ण ब्रह्मचर्य पाळावयाचें असेल, त्यानें हीं वरील दुष्कृत्यें टाकून द्यावीं व उत्तम गुरुच्या सन्निध अध्ययन करून पूर्ण विद्या प्राप्त करून घ्यावी. ज्यांचें शरीर निर्वीर्य-वीर्यक्षीण असतें व ज्याला प्रमेहादिक विकार असतात तो महाकुलक्षयी, दुर्बल, निस्तेज, निरुत्साही, साहस करण्यास असमर्थ, धैर्यहीन, पराक्रम करण्यास असमर्थ व नपुंसक होतो. जर तुम्ही वयाच्या पहिल्या भागांत ब्रह्मचर्यानें वीर्यरक्षण, सुशिक्षण, व उत्तम विद्येची प्राप्ति केली नाहीं, तर पुनः या जन्मांत तुम्हांला असा अमूल्य समय मिळणार नाहीं. 'जोंपर्यंत आम्ही गृहकार्यें करणारे लोक जीवंत आहों तोंपर्यंत तुम्ही [मुलांनीं] विद्येचें ग्रहण करून शारीरिक शक्ति वाढविली पाहिजे.' या प्रकारचा बोध आईबापांनीं मुलांना करावा, त्याचप्रमाणें अन्यहि उपयुक्त उपदेश करावा व त्यांच्याकडून योग्य आचरण करवून घ्यावें; म्हणूनच वरील वाक्यांत 'मातृमान् पितृमान्' अशीं पदें घातलीं आहेत. अर्थात् पांच वर्षांपर्यंत बालकाला मातेनें शिक्षण द्यावें, सहाव्या वर्षांपासून आठ वर्षें होईपर्यंत बापानें शिकवावें व नंतर उपनयन करून ज्या ठिकाणीं पूर्ण विद्वान् शिक्षक आहेत अशा **'आचार्यकुलांत'** त्याला पाठवून विद्याभ्यास पूर्ण होईपर्यंत तेथेंच ठेवावें. तसेंच ज्याठिकाणीं विदुषी स्त्रिया शिक्षकिणी आहेत, त्या ठिकाणीं मुलींना पाठवून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था तेथें करावी. शूद्र वर्णाच्या मुलांना उपनयन केल्यावांचून **'गुरुकुलांत'** विद्याभ्यासासाठीं पाठवावें. विद्यार्थी पुढें विद्वान्, सभ्य, व सुशिक्षित व्हावे म्हणून त्यांना योग्य प्रसंगीं ताडणहि केलेंच पाहिजे. पहा :—

[७] **शिक्षा.**

**सामृतैः पाणिभिर्घ्नन्ति गुरवो न विषोक्षितैः । लालनाश्रयिणो दोषास्ताडनाश्रयिणो गुणाः ॥**

अ० ८।१।८ व्या. म. भाष्य.

[अर्थ] माता, पिता व आचार्य जे आपल्या मुलांना मारतात, ते त्यांचें हित व्हावें म्हणूनच. यामुळें ते अमृतच पाजतात असें समजावें. जे आईबाप फाजील लाड करतात ते वीष पाजतात असे जाणावें; कारण लालनापासून दोष व ताडणापासून गुण उत्पन्न होतात. * म्हणून शिष्यांनींहि ताडनानें प्रसन्न व लालनानें अप्रसन्न व्हावें. कारण, सध्यां होत असलेल्या शिक्षेपासुन त्यांचाच पुढें नफा आहे. परंतु आई, बाप व अध्यापक यांनीं ईर्ष्या, द्वेष, क्रौर्य यांना वश होऊन शिष्यांना किंवा मुलांना कधींहि ताडन करूं नये; वरून भय दाखवून आंतून कृपादृष्टी ठेवावी. ज्याप्रमाणें अन्य प्रमादासाठीं, त्याचप्रमाणें चोरी, चहाडी, जारकर्म, आळस, प्रमाद, मादक द्रव्यांचें सेवन, मिथ्याभाषण, हिंसा, क्रूरता, ईर्ष्या, द्वेष, मोह इत्यादि दोष नाहींसे व्हावे, म्हणूनहि शिक्षा करून त्यांच्याकडून सत्याचाराचें ग्रहण करवावें. कारण,

* फाजील क्रूरतेनें शिष्यांना मारणाऱ्या गुरूचें तें क्रूरपणाचें कृत्य योग्य आहे, असा याचा अर्थ नव्हे. प्रसंगीं योग्य शिक्षा केली असतां फायदा होतो हाच वरील श्लोकाचा भावार्थ आहे.

ज्या पुरुषाच्या समक्ष चोरी वगैरे कृत्यें केलीं आहेत त्याच्यापुढें आपली अब्रु कधींहि राहणार नाहीं. असत्य प्रतिज्ञा करणाराची जशी हानि होते तशी दुसऱ्या कोणाचीहि नाहीं; म्हणन ज्याच्याशीं जशी प्रतिज्ञा केली असेल तसेंच वर्तन त्याच्याशीं करावें. जर कोणी कोणाला सांगितलें कीं, 'मी तुला अमूक वेळीं भेटेन किंवा अमूक वस्तु अमूक वेळीं देईन,' तर ही प्रतिज्ञा जशीच्या तशीच त्यानें पुरी केली पाहिजे; नाहींतर त्याच्या भाषणावर कोणीहि विश्वास ठेवणार नाहीं. म्हणून सत्यप्रतिज्ञ, सत्यभाषणी व सर्व अभिमान सोडून वागावें. आंत एक असणें, बाहेर एक भासविणें व त्यामुळें दुसऱ्याला फसवून, त्याच्या हानीची काळजी मुळींच न करितां आपल्या स्वार्थाबद्दलच काळजी करणें याला छल किंवा कपट असें म्हणतात. या करण्यापासून स्वतःलाहि त्रास होतो मग दुसऱ्याला किती होत असेल ? म्हणून असलें कपटी आचरण कोणी करूं नये. दुसऱ्यानें केलेल्या उपकारांना न मानतां ते विसरणें याला कृतघ्नता असें म्हणतात. हाहि फार मोटा दुर्गुण आहे; म्हणून तो सर्वांनीं सोडावा. क्रोधादिक दोष सोडून देऊन सर्वांनीं शांत व मधुर भाषण करावें व तेंहि मित असावें. उगीच बडबडत बसूं नये. जितकें बोललें पाहिजे त्याहिपेक्षां थोडें कमी भाषण करावें. थोरांना मान द्यावा, ते आले असतां, त्यांना मान देण्यासाठीं उठून, 'नमस्ते' करून म्हणजे 'मी आपला सत्कार करतों' असें म्हणून त्यांना उत्तम आसन द्यावें. आपण उच्च आसनावर बसून त्यांना खालीं बसावयास लावूं नये. सभेमध्यें आपली योग्यता असेल अशाच ठिकाणीं बसावे म्हणजे तिथून आपणांस कोणी घालवून देणार नाहीं. कोणाशीं विरोध करूं नये. संपन्न बनून गुणाचा स्वीकार व दोषांचा सदैव त्याग करावा. नेहमीं सज्जनांचा संग करून दूर्जनांपासून दूर रहावे. माता, पिता व आचार्य यांची तन, मन व धनानें प्रीतिपूर्वक उत्तम पदार्थांनीं सेवा करावी.

**यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि ॥ तै॰प्र॰ ७।११ ॥**

याचा अभिप्राय असा आहे कीं, आई, बाप व गुरु यांनी आपल्या मुलांना व शिष्यांना सदैव उत्तम उपदेश करावा व असें सांगावें कीं, "हे मुलांनो ! आपल्या आचरणांत जें जें उत्तम धर्माचरण असेल त्यांचेंच तुम्ही अनुकरण करा, पण आमच्यांत जें जें दुराचरण असेल तें तें तुम्ही टाकून द्या." जें सत्य असेल त्याचा सदैव स्वीकार करून दुसऱ्यांमध्यें त्याचा प्रकाश करावा. कोणीहि पाखंडी व दुराचारी मनुष्यावर कधींहि विश्वास ठेवूं नये. माता, पिता व आचार्य जें उत्तम कर्म करण्यास आज्ञा करतील तें उत्तम प्रकारें पुरें करावें. आईबापांनीं जीं जीं उपदेशपर वाक्यें, सूत्रें व जे जे उपदेशपर वेदमंत्र, श्लोक वगैरे पाठ करून घेतले असतील त्यांचे शिक्षकांनीं पुनः त्यांस स्मरण करून द्यावें. ज्याप्रमाणें 'प्रथम समुल्लास' मध्यें परमेश्वरविषयक व्याख्यान केलें आहे, त्याचप्रमाणें परमेश्वराचे स्वरूप मानून त्याचीच उपासना करावी. त्याच्या योगानें आरोग्य, बुद्धि, बल, विद्या हीं वाढतील. त्याचप्रमाणें भोजन, आच्छादन व व्यवहार करावे, जेवढी भूक लागली असेल त्याहून थोडें कमी खावें; मद्य, मांस व धूम्रपानादिक व्यसनें यांचें सेवन कधींहि करूं नये. पाण्याची खोली माहीत नसेल तेथें पोहण्याचा प्रयत्न करूं नये. कारण जलचर प्राणी व अन्यपदार्थ यांच्यापासून तेथें दुःख प्राप्त होण्याचा संभव असतो. चांगले पोहतां येत नसेल तर बुडून मरण्याचेंहि भय असतें. म्हणून 'नाविज्ञाते जलाशये' इत्यादि मनुवचनांत अविज्ञात जलाशयामध्यें प्रविष्ट होऊन स्नानादिक करूं नये असें सांगितलें आहे. तसेंच:—

**दृष्टिपूतं न्यसेत्पादं, वस्त्रपूतं, जलं पिबेत् । सत्यपूतां वदेद्वाचं, मनःपूतं समाचरेत् ॥ मनु॰ ६।४६ ॥**

'उंच सखल जमीन पाहून चालावें, वस्त्रानें गाळून पाणी प्यावें, सत्यानें पवित्र असलेलें भाषण करावें व मनानें विचार करून जें उत्तम ठरेल तें कृत्य करावें.'

**माता शत्रुः पिता वैरी येन बालो न पाठितः । न शोभते सभामध्ये हंसमध्ये बको यथा ॥** चाण॰अ॰ २।११॥

'ज्यांनीं आपल्या मुलांना योग्य शिक्षण दिलें नाहीं, ते आईबाप त्या मुलांचे शत्रु होत. ज्याप्रमाणें हंसांमध्यें बगळा शोभत नाहीं त्याप्रमाणें विद्वानांमध्यें अविद्वानांची स्थिति होते.' म्हणून. आपल्या संतानाला तन, मन, धन यांच्यायोगानें विद्या, धर्म व सभ्यता यांचे उत्तम शिक्षा देणें हें आईबापांचें कर्तव्य, परम धर्म व कीर्ती वाढविणारें काम आहे. याप्रमाणें बालशिक्षणाविषयीं थोडक्यांत लिहिलें आहे, यावरून सूज्ञांनीं सर्व जाणावें.

**इति सुभाषाविभूषिते बालशिक्षाविषये द्वितीयः समुल्लासः संपूर्णः ॥२॥**

# अथ तृतीयसमुल्लासः

**अथाऽध्ययनाध्यापनविधिं व्याख्यास्यामः ।**

आतां ह्या तिसऱ्या समुल्लासामध्यें पठणपाठनाचा प्रकार सांगावयाचा आहे. आपल्या मुलाबाळांना उत्तम विद्या, सुशिक्षण, सद्‌गुण, सत्कर्म, व सत्स्वभावरूप आभरणांनीं भूषित करणें हें माता, पिता, आचार्य, व संबंधी यांचे मुख्य कर्तव्य आहे. सुवर्ण, चांदी, माणीक, मोती वगैरे प्रकारचे दागिने घातल्यानें मनुष्याचा आत्मा कधींहि सुभूषित होऊं शकत नाहीं. असलीं सुवर्णादिक आभरणें घातल्यानें वृथा देहाभिमान, विषयासक्ति, चोरादिकांपासून मृत्यूचें भय वगैरे अनिष्ट फलें प्राप्त होतात. दागिने अंगावर असल्यामुळें मुलें दुष्टांच्या हातांनी मरण पावलीं आहेत. अशीं उदाहरणें अनेक आहेत.

**विद्याविलासमनसो धृतशीलशिक्षाः सत्यव्रता रहितमानमलापहाराः ।**
**संसारदुःखदलनेन सुभूषिता ये धन्या नरा विहितकर्मपरोपकाराः ॥१॥**

(**अर्थ**) 'ज्यांचें मन विद्येच्या विलासांत तत्पर असतें' जे उत्तम शील व शिक्षण यांनीं युक्त असतात. जे नेहमीं सत्यभाषण करितात, अभिमान व अपवित्रता ही ज्यांच्याजवळ नाहींत, सत्योपदेश व विद्यादान यायोगें संसारी लोकांचें दुःख नाहींसें करून जे सुभूषित होतात, व वेदविहित कर्में करून जे दुसऱ्यावर उपकार करितात ते पुरुष धन्य होत.' याप्रमाणें विद्येचें महत्व आहे. म्हणून आठ वर्षानंतर मुलांना किंवा मुलींना शिक्षणासाठीं पाठशाळेंत अवश्य पाठवून द्यावें. जे पुरुष किंवा ज्या स्त्रिया दुर्वर्तन करणाऱ्या असतील, त्यांच्याकडून कधींही मुलांना शिक्षण देऊं नये. जे विद्वान् व धार्मिक असतील त्यांच्याकडून शिक्षण देण्यांत यावें. द्विजांनीं आपल्या मुलांचा उपनयन—(यज्ञोपवीत) संस्कार यथातथ्य करून [कन्यांचाहि यथायोग्य संस्कार करून] त्यांना **'आचार्यकुलांत'** पाठवून द्यावें. ह्या पाठशाला एकान्तजागीं [शहरापासून दूर] असाव्या, मुलांच्या व मुलींच्या शाळेमध्यें अंतर निदान दोन कोसांचे तरी असावें. मुलांच्या पाठशाळेंमध्यें शिकविण्यासाठीं व इतर कामें करण्यासाठीं पुरुष असावे व कन्यांच्या पाठशाळेमध्यें तीं कामें करण्यासाठीं स्त्रिया असाव्या. स्त्रियांच्या पाठशाळेमध्यें पांच वर्षाच्याहि मुलांनें व मुलांच्या पाठशाळेंत पांच वर्षाच्याहि मुलीनें जाऊं नये अशी व्यवस्था केलेली असावी. अर्थात् दोघेंहि जोपर्यंत ब्रह्मचर्यावस्थेंत आहेत तोपर्यंत दर्शन, स्पर्शन, एकान्तसेवन, भाषण, विषयकथा, परस्परक्रीडा, विषयांचें ध्यान, व संग या आठ प्रकारच्या मैथुनांपासून त्यानीं दूर असलें पाहिजे, तसेंच अध्यापक लोकांनींहि त्या दुष्ट आचरणापासून स्वतः दूर असावें. यामुळें ते उत्तम विद्वान्, सुशिक्षित, सुशील, सुस्वभावी, शारीरिक व आत्मिक बलानें युक्त, व नेहमीं आनंद वाढविणारे होतील. पाठशाळा नगरापासून किंवा गांवापासून चार कोस दूर असावी. त्याठिकाणीं वस्त्र, पात्र, खाणेंपिणें आसन, शयन हीं राजकुमारा-पासून ते दरिद्री लोकांच्या मुलापर्यंत सर्वांना सारखी दिलीं जावीं. सर्वांनीं घराकडची चैन सोडून तपस्व्याप्रमाणें तेथें राहून ब्रह्मचर्य पालन केलें पाहिजे. आईबाप व मुलें यांची परस्पर भेट ब्रह्मचर्य संपेपर्यंत होऊं देऊं नये व एकमेकांचा एकमेकांशी पत्रव्यवहारहि ठेवण्याची मनाई असावी. कारण त्यापासून गृहसंबंधी चिंता विद्यार्थ्यांच्या मनामध्यें उत्पन्न होऊन विद्या शिकण्यांत विघ्नें उत्पन्न होण्याचा संभव आहे. विद्यार्थ्यांना फक्त विद्या वाढविण्याचीच चिंता असावी. ज्यावेळीं मुलें फिरावयास जातील तेव्हां त्यांच्याबरोबर अध्यापकानें असावे, म्हणजे ती कोणत्याहि प्रकारची कुचेष्टा व आलस्यादि प्रमाद करूं शकणार नाहींत.

**कन्यानां संप्रदानं च कुमाराणां च रक्षणम् ॥** मनु० अ० ७।१५२ ॥

राजनियम व जातिनियम असा झाला पाहिजे कीं, लोकांनीं आपल्या मुलांना व मुलीना पांचव्या वर्षापासून तों आठव्या वर्षापयत पाठशाळेंत अवश्य पाठविलेच पाहिजे असा याचा अभिप्राय आहे. जे न पाठवितील ते दंडनीय

होतील. मुलांचा पहिला यज्ञोपवीतसंस्कार घरीं होऊन दुसरा पाठशाळेमध्यें किंवा आचार्यकुलांत व्हावा. माता, पिता, किंवा आचार्य यांनीं आपल्या मुलांना व मुलींना अर्थासह **गायत्रीमंत्राचा** उपदेश करावा. तो मंत्र असा:—

**ओ३म् भूर्भुवः स्वः । तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ॥** यजु० ३६।३ ॥

'ओ३म्' या शब्दाचा अर्थ प्रथमसमुल्लासामध्यें केला आहे. तो तेथें पहावा. आतां तीन महाव्याहृतींचे अर्थ संक्षेपानें येथें देतों. (**भूरिति वै प्राणः । यः प्राणयति चराऽचरं जगत् स भूः स्वयंभूरीश्वरः**) परमेश्वर सर्व जगाच्या जीवनाला आधार आहे, स्वयंभू व प्राणाहूनही प्रिय आहे म्हणून त्याला प्राण किंवा 'भू' असें म्हणतात. (**भुवरित्यपानः । यः सर्वं दुःखमपानयति सोऽपानः**) परमेश्वर स्वतः दुःखरहित आहे व जे जीव त्याचा आश्रय करतात, त्यांचींहि दुःखें तो नाहींशीं करतो म्हणून त्यालाच अपान किंवा 'भुवः' असें नांव आहे. (**स्वरिति व्यानः । यो विविधं जगद् व्याप्नोति व्यानयति स व्यानः**) परमेश्वर सर्वत्र व्याप्त व सर्वांचें धारण करणारा आहे म्हणून त्याला व्यान किंवा 'स्वः' असें म्हणतात. हीं वरील तीनहि वचनें तैत्तिरीय आरण्यक प्रपा० ७।५ मध्यें आहेत. (**सवितुः । यः सुनोत्युत्पादयति सर्वं जगत् स सविता तस्य**) जो सर्व जग उत्पन्न करणारा व सर्वांना ऐश्वर्य देणारा आहे तो 'सविता' समजावा. (**देवस्य । यो दीव्यति दीव्यते वा स देवः**) सर्व सुखें प्राप्त करून देणाऱ्या व ज्याच्या प्राप्तीची इच्छा सर्व करीत आहेत, अशा परमात्म्याचें [ **वरेण्यम् वर्तुमर्हम्** ] स्वीकार करण्यास योग्य असें अतिश्रेष्ठ [ **भर्गः शुद्धस्वरूपम्** ] शुद्ध स्वरूप अथवा सर्वांना पवित्र करणारें चेतनब्रह्मस्वरूप जें आहे, [ **तत्** ] त्याचें आम्ही [ **धीमहि धरेमहि**] धारण करितों. [ **यः जगदीश्वरः** ] तो जगदुत्पादक परमात्मा [**नः**] आमच्या (**धियः**) बुद्धीला [ **प्रचोदयात् प्रेरयेत्** ] प्रेरणा करो. अर्थात् त्यानें आम्हांला वाईट कर्मांपासून दूर करून सत्कर्माकडे प्रवृत्त करावें.

**"हे परमेश्वर ! हे सच्चिदानंदानन्तस्वरूप ! हे नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाव ! हे अज निरंजन निर्विकार ! हे सर्वान्तर्यामिन् ! हे सर्वाधार जगत्पते ! सकलजगदुत्पादक ! हे अनादे ! विश्वंभर सर्वव्यापिन् ! हे करुणामृतवारिधे ! सवितुः देवस्य तव यदोंभूर्भुवः स्ववरेण्यं भर्गोऽस्ति तद्वयंधीमहि दधीमहि धरेमहि ध्यायेम वा कस्मै प्रयोजनायेत्यत्राह । हे भगवन् ! यः सविता देवः परमेश्वरो भवानस्माकं धियः प्रचोदयात् । स एवास्माकं पूज्य उपासनीय इष्टदेवो भवतु नातोऽन्यं भवत्तुल्यं भवतोऽधिकं च कंचित् कदाचिन्मन्यामहे."**

(**अर्थ**) "हे मनुष्यहो ! जो सर्व समर्थांमध्यें समर्थ, सच्चिदानंदानन्तस्वरूप, नित्य शुद्ध, नित्य बुद्ध, नित्य मुक्त आहे व जो कृपासागर, योग्य न्याय करणारा, जन्ममरणादि क्लेशरहित, आकाररहित, सर्वज्ञ, सर्वांचा धर्मपिता, सर्वांना उत्पन्न करणारा, अन्नादिकांनीं सर्वांचे पोषण करणारा, सकल ऐश्वर्ययुक्त, जगत्कर्ता, शुद्धस्वरूप व प्राप्ति करून घेण्यास योग्य असा शुद्ध चेतनस्वरूप परमात्मा आहे. त्याचीच आम्ही धारणा किंवा ध्यान करितो; कारण तो परमात्मा आमच्या आत्म्यांमध्यें व बुद्धीमध्येंहि व्यापक असल्यामुळें आम्हांला अधर्मयुक्त मार्ग व दुराचार यांपासून दूर करून संयुक्त व श्रेष्ठ मार्गानें जाण्याविषयीं प्रेरणा करील. या परमात्म्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाचें ध्यान करण्यांत आम्ही कधींहि लागूं नये; कारण, त्याच्याशीं तुल्यहि दुसरा कोणी नाहीं मग त्याहून मोठा कोण असणार ? तोच सर्वांतर्यामी परमात्मा आमचा पिता, राजा, न्यायाधीश व आम्हांला सर्व सुखें प्राप्त करून देणारा आहे. याप्रमाणें अर्थासह गायत्रीमंत्राचा उपदेश करावा आणि स्नान, आचमन, प्राणायाम व मार्जनादि क्रिया असलेलें **संध्योपासनहि** त्याला शिकवावें. प्रातःकाळीं स्नान करावें. स्नानापासून बाह्य अवयवांची शुद्धि व त्यामुळें आरोग्य प्राप्त होतें. पहा—

**अद्भिर्गात्राणि शुध्यन्ति, मनः सत्येन शुध्यति । विद्यातपोभ्यां भूतात्मा, बुद्धिर्ज्ञानेन शुध्यति ॥** मनु० ५।१०९.

(**अर्थ**) पाण्यानें शरीराच्या बाहेरील अवयवांची शुद्धि होते; सत्याचरणानें मन निर्मल होतें; विद्या व तप म्हणजे सर्व प्रकारचे कष्ट सहन करून धर्माचरण केल्यानें जीवात्मा शुद्ध होतो; व पृथिवीपासून परमेश्वरापर्यंत असलेल्या सर्व पदार्थांच्या ज्ञानानें बुद्धि शुद्ध होते. म्हणून शरीरशुद्धिसाठीं स्नान करणें फार आवश्यक आहे. आतां प्राणायामाविषयीं :—

**योगाङ्गानुष्ठानादशुद्धिक्षये ज्ञानदीप्तिराविवेकख्यातेः ॥** योगदर्शन साधन० २८ ॥

**(अर्थ)** मनुष्य जसजसा प्राणायाम करतो त्या त्या प्रमाणें त्याच्या अशुद्धींचा नाश होऊन, त्याच्यामध्यें ज्ञानाचा प्रकाश पडूं लागतो व मुक्ति प्राप्त होईपर्यंत आत्मज्ञान प्रतिक्षणीं वाढत जातें. तसेंच—

**दह्यन्ते ध्मायमानानां धातूनां हि यथा मलाः । तथेंद्रियाणां दह्यन्ते दोषाः प्राणस्य निग्रहात् ॥मनु० ६।७१.**

**(अर्थ)** ज्याप्रमाणें अग्नीमध्यें तापवून सुवर्णादिक धातूंचे मल नाहींसे होतात त्याचप्रमाणें प्राणायामाच्या योगानें इंद्रियांतील दोष नाहींसे होऊन तीं निर्मल होतात. प्राणायामाचें महत्व इतकें मोठें आहे. आतां त्याचा विधी कसा असावा हें पहा.

**प्रच्छर्दनविधारणाभ्यां वा प्राणस्य ॥ योगद० समाधि० ३४ ॥**

ज्याप्रमाणें ओकतांना कोठ्यांतून अन्न, जल, वगैरे जोरानें बाहेर पडतें, त्याचप्रमाणें प्राणवायूला बाहेर फेकणें व यथाशक्ति बाहेरच स्थिर करणें, ही प्राणायामाची एक रीत आहे. याप्रमाणें ज्यावेळीं प्राणवायूला बाहेर रेचक करावयाचा असेल तेव्हां मूलेंद्रियाला वर आकर्षित करावें लागतें; तरच वायु बाहेर स्थिर होतो. याप्रमाणें रेचक करून प्राणवायु बाहेरच स्थिर केला म्हणजे जीव थोड्याच वेळांत घाबरा होऊं लागतो. असें होण्यापूर्वीच हळू हळू प्राणवायुला पुनः आंत घ्यावा व पुनः पूर्ववत् रेचक करावा. आपल्या सामर्थ्याप्रमाणें हे प्राणायाम करतांना मनांत 'ओ३म्' काराचा जप करावा. याप्रमाणें केल्यानें आत्मा व मन यांची पवित्रता होऊन स्थिरता होते. यालाच 'बाह्यविषय' प्राणायाम असें म्हणतात. दुसरा 'अभ्यंतर' प्राणायाम. यांत प्राणवायूचें आंतच स्थिरीकरण-कुंभक-होईल तितकें करावयाचें असतें. तिसरा 'स्तंभवृत्ति' प्राणयाम म्हणजे एकाच वेळीं प्राणवायु आंतला आंत व बाहेरचा बाहेर स्थिर करणें. चौथा बाह्याभ्यन्तराक्षेपी, प्राणायाम म्हणजे जेव्हां प्राणवायु आंतून बाहेर निघूं लागेल तेव्हां त्याला बाहेर जाऊं न देतां बाहेरून प्राणवयु आंत घेणें व ज्यावेळीं प्राणवायु बाहेरून आंत येऊं लागेल तेव्हां त्याला आंत येऊं न देतां आंतून बाहेरच्या वायूला धक्का देऊन रोखून धरणें. याप्रमाणें परस्परविरुद्ध क्रिया केल्या असतां प्राण आपल्याला वश होतो व त्यायोगें मन व इंद्रियेंहि आपल्या स्वाधीन होतात. प्राणायामाच्या योगानें बल व पुरुषार्थ वाढून, बुद्धि तीव्र व सूक्ष्म होते; त्यायोगें अति कठीण विषयाचेंहि ज्ञान सहज होऊं शकतें. प्राणायामाच्या योगानें शरीरांत वीर्य वाढून तें स्थिर होतें व बल, बुद्धि, पराक्रम, व जितेन्द्रियता हे गुण अंगीं येऊन अनेक शास्त्रांचें थोडक्या अवधींत अध्ययन करतां येतें व केलेलें अध्ययन विसरलें जात नाहीं. स्त्रियांनींहि याप्रमाणें प्राणायामादि योगांचा अभ्यास करावा. या शिक्षणाप्रमाणेंच भोजन, आच्छादन, बसणें, उठणें, चालणें, लहानमोठें व्यवहार योग्य रीतीनें करणें, इत्यादि व्यावहारिक शिक्षणहि विद्यार्थ्यांस द्यावें । संध्योपासनेला ब्रह्मयज्ञ असेंहि म्हणतात. त्यामध्यें **'आचमन'** विधि आहे, तो असा, तळहातावर पाणी घेऊन त्याच्या मूल व मध्य प्रदेशांत ओठ लावून तें कंठाच्या खालीं हृदयापर्यंत पोंचेल आशा बेतानें पिणें. हें पाणी हृदयापर्यंत पोंचेल या बेतानेंच घेतलेलें असावें. जास्तहि घेऊं नये व कमीहि घेऊं नये. आचमनाच्या योगानें कंठस्थ कफ व पित्त यांची थोडीशी निवृत्ति होते. नंतर **'मार्जन'** विधि सांगितला आहे. मार्जन करावयाचें वेळीं मध्यमा व अनामिका या बोटांनीं पाणी घेऊन नेत्रादिक अवयवावर थेंब पडतील अशा बेतानें फेंकावें. मार्जनाच्या योगानें आळस नाहींसा होतो. पाणी नसेल तर हे विधि करुं नयेत पण संध्या करावी. हे विधि विद्यार्थ्यांना शिकवून झाले म्हणजे मग समंत्रक **प्राणायाम, मनसा परिक्रम, उपस्थान** हीं शिकवून नंतर परमेश्वराची **'स्तुति, प्रार्थना, व उपासना'** ह्यांची रीति शिकवावी. नंतर **'अघमर्षण'** शिकवावें अघमर्षण म्हणजे पापनाशन-पाप करण्याची इच्छाहि न करणें हें संध्योपासन एकान्त स्थलीं एकाग्रचित्त करून दररोज करावें.

**अपां समीपे नियतो नैत्यिकं विधिमास्थितः । सावित्रीमप्यधीयीत गत्वारण्यं समाहितः ॥**

मनु० २।१०४

**(अर्थ)** अरण्यांत एकान्त प्रदेशांत जाऊन, जलाशयाजवळ बसून, सावधान चित्तानें नित्यकर्म करून गायत्री-मंत्राचें उच्चारण अर्थज्ञानपूर्वक करावें. त्याप्रमाणें आपली वर्तणूकहि ठेवावी. गायत्रीमंत्राचें अध्ययन करणें व मनानें जप करणें अत्यंत उत्तम आहे असें जाणावें.

पंचमहायज्ञापैकीं संध्योपासन किंवा ब्रह्मयज्ञ हा पहिला असून **'देवयज्ञ'** हा दुसरा यज्ञ आहे. हे दोनहि यज्ञ सकाळीं केलेच पाहिजेत. या संधीसमयीं निदान एक एक तासपर्यंत तरी परमेश्वराचें ध्यान एकाग्र अंतःकरणानें करावें. ज्याप्रमाणें योगी लोक समाधिस्थ होऊन परमात्मध्यान करतात, त्याचप्रमाणें संध्योपासनहि एकाग्रचित्तनें केलें पाहिजे. अग्निहोत्रालाच 'देवयज्ञ' असें म्हणतात. तो सकाळीं सूर्योदयानंतर व संध्याकाळीं सूर्यास्तापूर्वी करावा. अग्निहोत्रासाठीं एक धातूचें किंवा मातीचें 'अग्निकुंड' असावें व त्याच्या तोंडाची लांबीरुंदी १२ किंवा १६ अंगुळें असून त्याच्या तळाची लांबीरुंदी ३ किंवा ४ अंगुळें असावी. हें कुंड चौरस असावें. त्याचप्रमाणें वेदी करावयाची असेल तर तीहि तोंडाच्या आकाराच्या चतुर्थांश तळाचा आकार या प्रमाणांत असावी. हवनासाठीं चंदन, पलाश, आम्र, खदिर, रुई वगैरे श्रेष्ठ लांकडाच्या समिधा वेदीच्या व कुंडाच्या प्रमाणानें लहान मोठ्या असाव्या. कुंडांमध्यें पूर्वोक्त समिधा कांहीं घालून वर अग्नि स्थापन करावा व त्यावर पुनः समिधा ठेवाव्या.

एक **प्रोक्षणीपात्र**, एक **प्रणीतापात्र**, एक **आज्यस्थाली**, व एक **चमस** इतकीं पात्रें घ्यावीं. आज्यपात्र हें तूप ठेवण्यासाठीं सोईचें भांडें आहे. चमस हा सोनें, चांदी, किंवा लांकूड यांपैकीं कशाचाहि असला तरी हरकत नाहीं. असा, याप्रमाणें यज्ञाचीं उपकरणें घेऊन प्रणीता व प्रोक्षणीपात्रांत पाणी घालावें व आज्यस्थालीमध्यें तूप घालावें. तूप तापवून पातळ करावें. प्रणीतादि पात्रांतून हात वगैरे धुण्यासाठीं पाणी घेण्यास सोईचें होईल अशा बेतानें तीं पात्रें मांडावी. नंतर तें तूप सन्निध ठेवून पुढील मंत्रांनीं हवन करावें.

**ओम् भूरग्नये प्राणाय स्वाहा । भुवर्वायवेऽपानाय स्वाहा । स्वरादित्याय व्यानाय स्वाहा । भूर्भुवःस्वरग्निर्वाय्वादित्येभ्यः प्राणापानव्यानेभ्यः स्वाहा ॥**

इत्यादि अग्निहोत्राच्या मंत्रानीं एक एक आहुति देऊन अधिक आहुति देणें असेल तर,

**विश्वानि देव सवितर्दुरितानि परासुव । यद्भद्रं तन्न आसुव ॥** यजु० अ० ३०।३॥

या मंत्रानें किंवा पूर्वी लिहलेल्या 'तत्सवितु०' या सावित्री मंत्रानें द्याव्या. 'ओम्' 'भूः' 'प्राणः' वगैरे परमेश्वराच्या नांवांचें अर्थ पूर्वी दिलेले आहेतच. ज्या मंत्रानें हवन केलें जातें त्याच्या शेवटीं 'स्वाहा' हा शब्द म्हटला पाहिजे. 'स्वाहा' शब्दाचा अर्थ 'आत्म्यामध्यें जसें सत्यज्ञान असेल तसेंच बोलावें व परमेश्वरानें जगतावर प्राण्यांच्या सुखासाठीं जसें अनंत उपकार केलें आहेत तसेंच मनुष्यानेंहि करावें' असा आहे.

**(प्रश्न)** होमापासून काय फायदा होतो ? **(उत्तर)** सर्व लोकांस हें माहित आहे कीं, बिघडलेला किंवा दुर्गंधयुक्त वायू व जल यांच्यायोगानें रोग उत्पन्न होतात व त्यांच्यायोगानें मनुष्यांना दुःख होतें; म्हणून सुगंधयुक्त वायु व जल यांच्यायोगानें आरोग्य वाढून रोगनिवृत्ति होते व त्यामुळें सुखप्राप्ति होते. **[प्रश्न]** चंदन उगाळून चहूंकडे लावावें व तूप वगैरे पदार्थ मनुष्यांना खाण्यासाठीं द्यावे म्हणजेहि आपण म्हणतां ते फायदे होतील. मग ते सर्व पदार्थ अग्नीत जाळून कां व्यर्थ घालवितां ? **(उत्तर)** जर तुम्हांला पदार्थविद्येची माहिती असती तर तुम्ही असें कधींहि म्हटलें नसतें. वास्तविक पाहतां कोणत्याहि द्रव्याचा अभाव होत नाहीं. ज्या ठिकाणीं हवन होत असतें त्या ठिकाणाहून दूर स्थळीं असणाऱ्या मनुष्यालाहि त्या त्या हवनीय द्रव्यांचा जसा वास येतो, त्याचप्रमाणें एकेठिकाणीं असणाऱ्या दुर्गंधाचाहि येतो. या एका गष्टीवरून समजा कीं, हवन करण्यासाठीं अग्नींत घातलेला पदार्थ सूक्ष्म होऊन वायूंत मिसळतो व आसापासच्या सर्व प्रदेशांतील हवा स्वच्छ करून तेथील रोगोत्पादक दुर्गंधाची निवृत्ति करतो. **(प्र०)** जर असें असेल तर केशर, कस्तुरी, अत्तर, सुगंधित फुलें घरांत ठेवावी म्हणजे वायु सुगंधित होऊन सुखकारक होईल. **(उ०)** नुसत्या सुगंधामध्यें भेदकशक्ति नसल्यामुळें, घरांतील बिघडलेली व दुर्गंधि हवा बाहेर घालवून त्या ठिकाणीं स्वच्छ व सुगंधित हवा आणणें,

हें काम त्याच्याकडून होऊं शकत नांहीं. ही भेदकशक्ति अग्निमध्यें आहे. अग्नीच्या योगानें घरांतील किंवा प्रदेशांतील बिघडलेला वायु पृथक्करणापासून हलका होतो व तो वर जातो व तेथील प्रदेशीं दुसऱ्या ठिकाणचा स्वच्छ वायु येतो. त्या योगानें तेथील आरोग्य वाढतें व रोगराई कमी होते. (प्र०) असें असल्यास हवनाच्या वेळीं मंत्र म्हणण्याचें काय प्रयोजन आहे ? (उ०) हवनमंत्रामध्यें होमापासून काय काय लाभ * होतात तें सांगितलें आहे. पुनः पुनः मंत्र म्हटल्यामुळें तें कंठस्थ होतात व वेदांचें पठनपाठण व रक्षणहि होण्यास साहाय्य होतें.

**(प्रश्न)** होम केला नाहीं तर पाप होतें काय ? **(उत्तर)** होय. कारण मनुष्याच्या शरीरापासून अनेक प्रकारचा रोगोत्पादक दुर्गंध उत्पन्न होतो व त्यामुळें प्रत्यहीं हवा व पाणी बिघडत असतात; याकारणनें अनेक प्रकारचे रोग उत्पन्न होऊन प्राणिमात्राला दुःखें भोगावीं लागतात. हें सर्व पाप मनुष्यालाच लागतें. तें नाहींसें करण्यासाठीं जितका वायु आपणांकडून बिघडला जात असेल तितका किंवा त्याहून जास्त स्वच्छ करणें व त्या ठिकाणीं सुगंधाचा फैलाव करणें हें मनुष्याचें अत्याज्य कर्तव्य आहे. हें सर्व प्रत्यहीं हवन केल्यानें सहज होतें. आतां कोणी म्हणेंल कीं, एकालाच ते पदार्थ खावयास दिले तर तो लाभ होईल कीं नाहीं ? नाहीं. कारण त्यापासून त्या एकाच व्यक्तीला लाभ होईल, पण हवन केल्यानें त्याचा सुपरिणाम हवेंत रहात असल्यामुळें लाखो लोकांना लाभ होऊं शकतो. घृतादि पदार्थ खाऊं नयेत असें आमचें म्हणणें नाहीं. शरीरामध्यें बल उत्पन्न करण्यासाठीं ते अवश्य खाल्लेच पाहिजेत. तसेंच होम करण्यापासून आरोग्य वाढतें म्हणून तेहि केलेच पाहिजेत. (प्र०) प्रत्येक मनुष्यानें किती आहुति द्याव्या व प्रत्येक आहुतीचें प्रमाण किती असावें ? (उ०) प्रत्येक मनुष्यानें एक वेळ निदान सोळा तरी आहुति दिल्या पाहिजेत व प्रत्येक आहुतीमध्यें निदान सहा मासे वजन तूप असलें पाहिजे. यापेक्षां जास्त केलें तर फारच चांगलें. म्हणूनच पूर्वकालीन आर्यवरशिरोमणिमहाशय, ऋषिमहर्षि व राजेमहाराजे स्वतः मोठमोठे होम करून दुसऱ्याकडूनहि करवीत असत. जोपर्यंत या हवनांचा क्रम अबाधित चालत होता तोपर्यंत या आर्यावर्तदेशांत रोग नव्हते व सर्व लोक सुखी होते. जर पुनः होमहवनें सुरू होतील तर तसेंच आरोग्य पुन्हांहि प्राप्त होईल यांत शंका नाहीं. असो. याप्रमाणें हे दोन यज्ञ आहेत. पहिला 'ब्रह्मयज्ञ' यांत विद्या शिकणें व शिकविणें, संध्योपासन, ईश्वराची स्तुति, प्रार्थना व उपासना करणें यांचा अंतर्भाव होतो. दुसरा 'देवयज्ञ' यांत अग्निहोत्रापासून अश्वमेधापर्यंत सर्व यज्ञ, विद्वानांची सेवा व संगति, आणि परोपकार यांचा अंतर्भाव होतो. पण ब्रह्मचर्यामध्यें केवल ब्रह्मयज्ञ व अग्निहोत्र हींच कर्मे करावयाचीं असतात.

**ब्राह्मणस्त्रयाणां वर्णानामुपनयनं कर्तुमर्हति । राजन्यो द्वयस्य । वैश्यो वैश्यस्यैवेति ।**
**शूद्रमपि कुलगुणसंपन्नं मन्त्रवर्जमनुपनीतमध्यापयेदित्येके ॥** सुश्रुत सूत्रस्थान अ. २ ॥

**(अर्थ)** 'ब्राह्मणानें ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य या तीन वर्णाचें, क्षत्रियानें क्षत्रिय व वैश्य याचें, व वैश्यानें फक्त वैश्यांचें उपनयन करावें व त्यांना शिकवावें. तसेंच जो कुलगुणसंपन्न शूद्र असेल, त्याचें उपनयन न करतां वेदमंत्रांशिवाय इतर शास्त्रें त्याला शिकवावीत असें अनेक आचार्यांचें मत आहे.' पांचव्या किंवा आठव्या वर्षी मुलांना व मुलींनां त्यांच्या शाळेंत पाठवून द्यावें' पाठशाळेमध्यें पुढें दिल्याप्रमाणें अध्ययनाचा क्रम असावा.

**षट्त्रिंशदाब्दिकं चर्यं गुरौ त्रैवेदिकं व्रतम् । तदर्धिकं पादिकं वा ग्रहणान्तिकमेव वा ॥** मनु० ३।१.

**(अर्थ)** गुरुकुलामध्यें राहून सांगोपांग तीनहि वेदांचें अध्ययन करावें. प्रत्येक वेदाच्या अध्ययनाला बारा वर्षें याप्रमाणें तीनहि वेदांच्या अध्ययनाला छत्तीस वर्षें लागतात. उपनयन आठव्या वर्षी झालें असल्यास तीन वेदाचें

---

* होमाच्या बाह्य कर्मापासून स्थूलदृष्ट्या होणारा हवाशुद्धि वगैरे लाभ सर्वांस समाजण्यासारखा आहे. परंतु बाह्य कर्माबरोबर जें अन्तर्गत कर्म करावयाचें असतें, तें त्या त्या मंत्राचा अर्थ समजल्यानेंच कळूं लागतें. म्हणून अग्निहोत्रापासून अश्वमेधापर्यंत कोणत्याहि प्रकारचा होम करणें असेल, तेव्हां त्या कर्मांत येणाऱ्या मंत्रांचें प्रथम अर्थज्ञान करून घेऊन मग तें करावें. या योगानें बाह्य अग्नीबरोबरच अभ्यन्तर ज्ञानाग्नि प्रज्वलित होऊन दृष्टान्तात्मक, बाह्य कर्माबरोबर अभ्यन्तर सत्कर्में कशीं करावयाचीं असतात याचा बोध होईल.

अध्ययन संपेपर्यंत (३६+८) चव्वेचाळीस वर्षांचें वय होतें; त्याचप्रमाणें हें पूर्ण ब्रह्मचर्य पाळलें जाणें शक्य नसल्यास अठरा वर्षांचें अर्धे ब्रह्मचर्य पालन करावें. हें संपेपर्यंत (१८+८) सव्वीस वर्षांचें वय होतें. किंवा निदान नऊ वर्षांचें ब्रह्मचर्य तरी धारण करावें. अथवा विद्या समाप्त होईपर्यंत ब्रह्मचर्य धारण करावें.

**पुरुषो वाव यज्ञस्तस्य यानि चतुर्विं शति वर्षाणि तत्प्रातःसवनं, चतुर्विं शत्यक्षरा गायत्री गायत्रं प्रातः सवनं तदस्य वसमोऽन्वायत्ताः प्राणा वाव वसव एते हीदं सर्वं वासयन्ति ॥ १ ॥ तञ्चेदेतस्मिन्वयसि किञ्चदुपतपेत्स ब्रूयात्प्राणा वसव इदं मे प्रातः सवनं माध्यन्दिनं सवनमनुसंतनुतेति माहं प्राणानां वसूनां मध्ये यज्ञो विलोप्सीयेत्युद्धैव तत एत्यगदो ह भवति ॥ २ ॥ अथ यानि चतुश्चत्वारिं शद्वर्षाणि तन्माध्यन्दिनं सवनं चतुश्चत्वारिं शदक्षरा त्रिष्टुप् त्रैष्टुभं माध्यन्दिनं सवनं तदस्य रुद्रा अन्वायत्ताः प्राणा वाव रुद्रा एते हीदं सर्वं रोदयन्ति ॥ ३ ॥ तं चेदेतस्मिन्वयसि किंचिदुपतपेत्स ब्रूयात्प्राणा रुद्रा इदं मे माध्यंदिनं सवनं तृतीयसवनमनुसंतनुतेति माहं प्राणानां रुद्राणां मध्ये यज्ञो विलोप्सीयेत्युद्धैव तत एत्यगदो ह भवति ॥ ४ ॥ अथ यान्यष्टाचत्वारिं शद्वर्षाणि तत्तृतीयसवनमष्टाचत्वारिं शदक्षरा जगती जागतं तृतीयसवनं तदस्यादित्यान्वायत्ताः प्राणा वावादित्या एते हीदं सर्वमाददते ॥ ५ ॥ तं चेदेतस्मिन्वयसि किंचिदुपतपेत्स ब्रूयात्प्राणा आदित्या इदं मे तृतीयसवनमायुरनुसंतनुतेति माहं प्राणानामादित्यानां मध्ये यज्ञो विलोप्सीयेत्युद्धैव तत एत्यगदो हैव भवति ॥ ६ ॥**

—छान्दोग्योप० प्रपा० ३ खं० १६.

ब्रह्मचर्य तीन प्रकारचें आहे, कनिष्ठ, मध्यम, व उत्तम. चोवीस वर्षांचें हें कनिष्ठ ब्रह्मचर्य होय. जो पुरुष चोवीस वर्षेपर्यंत जितेंद्रिय राहून, विषयलंपटतावगैरे कुविचार व दुराचरणें न करतां सदाचरणानें राहून वेदादि विद्यांचें व सुशिक्षणाचें ग्रहण करतो, त्याच्या अन्नरसमय शरीरामध्यें वीर्य स्थिर राहिल्यानें तें बलवान् होतें, प्राण बलवान् होतात व शरीरांत असणारा जीवात्मा-जो शुभगुणयुक्त असल्यामुळें सत्कारार्ह, यजनीय आहे व ज्याला 'यज्ञ' असें म्हणतात-तोहि सुसंस्कृत होतो किंवा शुभगुणयुक्त होतो. या प्रथम वयामध्यें जो आचार्य ब्रह्मचाऱ्याला विद्यारूपी तपानें तपवितो-शुद्ध करतो, त्यानें त्याला तसाच उत्तम उपदेश करावा. ब्रह्मचाऱ्यानें मनांत असा निश्चय करावा कीं, जर मी या प्रथम वयामध्यें नियमांप्रमाणें ब्रह्मचर्याचें पालन केलें, तर माझें शरीर व आत्मा आरोग्ययुक्त व बलवान् होऊन, माझ्यामध्यें शुभगुण उत्पन्न होतील व माझे प्राणहि शुभगुणयुक्त व बलवान् होतील. हे मनुष्यहो ! तुम्हीहि याप्रमाणें आपलीं सुखें वाढवा. तुम्ही जर ब्रह्मचर्याचा चोवीस वर्षेपर्यंत लोप केला नाहीं, व चोवीस वर्षें ब्रह्मचर्य पाळून मग गृहस्थाश्रम स्वीकारला तर तुम्ही निरोगी राहून ७० किंवा ८० वर्षें जगाल. मध्यम ब्रह्मचर्य म्हणजे चव्वेचाळीस वर्षेपर्यंत ब्रह्मचारी राहून वेदाभ्यास व विद्याध्ययन करणें. या ब्रह्मचर्याच्या सामर्थ्यानें प्राण, इंद्रियें, अंतःकरण, व आत्माहि बलवान् होऊन तो मध्यम ब्रह्मचारी दुष्टांना रडविणारा व सज्जनांचें पालन करणारा होतो. शिष्यानें असें समजावें कीं, 'जर मी या प्रथम वयामध्यें गुरूच्या सांगण्याप्रमाणें ब्रह्मचर्यरूपी तप करीन तर रुद्ररूपी प्राणयुक्त माझें मध्यम ब्रह्मचर्य पूर्ण होईल.' 'हे ब्रह्मचारी लोकहो ! ज्याप्रमाणें ब्रह्मचर्याचा लोप न करतां यज्ञस्वरूप होऊन, आचार्यकुलामध्यें विद्याध्ययन करून, व सत्कर्म करून मी बलवान् व रोगरहित झालों आहे, त्याचप्रमाणें तुम्हीहि ब्रह्मचर्य धारण करून रहा.' उत्तम ब्रह्मचर्य अठ्ठेचाळीस वर्षांचें आहे. ज्याप्रमाणें ४८ अक्षरांचें जगतीवृत्त असतें तसेंच हें अठ्ठेचाळीस वर्षांचें ब्रह्मचर्य आहे. जो याचें पालन करतो त्याचे प्राण त्याच्या स्वाधीन होऊन, तो सर्व विद्या जाणणारा होऊं शकतो. आचार्य माता व पिता यांनीं आपल्या मुलांना प्रथम वयामध्यें, त्यांनीं विद्वान् व सद्गुणी व्हावें म्हणून गुरुकुलांत पाठवून त्यांच्याकडून ब्रह्मचर्य व अध्ययनरूपी तप करवून त्यांना तपस्वी बनवावे व त्यांना असा उपदेश करावा कीं, ते अखंडित उत्तम ब्रह्मचर्याचें पालन करून पूर्णायुषी-म्हणजे चारशें वर्षेपर्यंत जगणारे-होतील. जे या पूर्ण ब्रह्मचर्याचें नियमपूर्वक पालन करतात, मध्यें केव्हांहि लोप करीत नाहींत, त्यांना कधींहि रोगवगैरे होत नाहींत. अर्थात् ते सदैव उत्साही राहून धर्म, अर्थ, काम, व मोक्ष यांना प्राप्त करून घेतात.

चतस्त्रोऽवस्था: शरीरस्य वृद्धिर्यौवनं सम्पूर्णता किञ्चित्परिहाणिश्चेति । आषोडशाद्वृद्धिः ।
आपञ्चविंशतेर्यौवनम् । आचत्वारिंशतः सम्पूर्णता । ततः किञ्चित्परिहाणिश्चेति ।।
पञ्चविंशे ततो वर्षे पुमान् नारी तु षोडशे । समत्वागतवीर्यौ तौ जानीयात्कुशलो भिषक् ।।

—सुश्रुत सूत्रस्था० ३५.

शरीराच्या चार अवस्था आहेत. (१) सोळा वर्षांपासून पंचवीस वर्षांपर्यंत सप्त धातूंची वृद्धि होते, म्हणून या पहिल्या अवस्थेला 'वृद्धि' असें म्हणतात. (२) पंचवीस वर्षापासून पुढें 'यौवन' अवस्था येते. (३) तिसरी 'संपूर्णता' अवस्था होय. ही पंचविसाव्या वर्षांपासून चाळीसाव्या वर्षांपर्यंत असते. या मुदतींत शरीरांतील सप्त धातूंची पूर्णता-पुष्टि-होते म्हणून हिला 'संपूर्णता' असें म्हणतात. (४) चवथी अवस्था 'किंचित्परिहाणि' ही आहे. चाळीस वर्षेपर्यंत सर्व शरीर उत्तम रीतीनें पुष्ट झाल्यानंतर जे धातु बनतात ते स्थिर रहात नाहींत; स्वप्न, प्रस्वेदादिकांच्या द्वारानें ते बाहेर पडतात म्हणून या अवस्थेला 'परिहाणि' असें म्हणतात. चाळीसाव्या वर्षी सर्व शरीर वाढून पूर्ण अवस्थेला प्राप्त होतें; म्हणून विवाह करण्यास हें वय उत्तम आहे. अठ्ठेचाळीसाव्या वर्षी विवाह करणें हें सर्वोत्तम होय. **(प्रश्न)** हा ब्रह्मचर्याचा नियम स्त्री व पुरुष या दोघांनाहि तुल्य आहे काय ? **(उत्तर)** नाहीं. पुरुषानें २५ वर्षेपर्यंत ब्रह्मचर्य पालन केलें तर स्त्रीनें १६ वर्षेपर्यंत, पुरुष ३० वर्षेपर्यंत ब्रह्मचारी राहील तर स्त्रीनें १७ वर्षेपर्यंत, पुरुष ३३ वर्षेपर्यंत राहिला तर स्त्रीनें १८ वर्षेपर्यंत, पुरुष ४० वर्षेपर्यंत राहिला तर स्त्रीनें २० वर्षेपर्यंत, पुरुष ४४ वर्षेपर्यंत राहिला तर स्त्रीनें २२ वर्षेपर्यंत, व पुरुष ४८ वर्षेपर्यंत राहिला तर स्त्रीनें २४ वर्षेपर्यंत रहावें. ज्या स्त्रीपुरुषांना विवाह करावयाचा असेल त्यांनीं, ४८ वर्षांपुढें पुरुषानें व २४ वर्षांपुढें स्त्रीनें ब्रह्मचर्यव्रत धरूं नये; विवाह करावा. पण ज्यांना आजन्म ब्रह्मचारी राहावयाचें असेल त्यांनीं ब्रह्मचर्यव्रतानेंच रहावें. असें आजन्म अविवाहित राहणें हें पूर्णविद्वान्, जितेंद्रिय निर्दोष, सदाचरणी, व योगी स्त्रीपुरुषांचेंच काम आहे. कारण, कामविकाराला ताब्यांत ठेवून जितेंद्रियता कायम ठेवणें हें फार कठीण आहे.

**ऋतं च स्वाध्यायप्रवचने च । सत्यं च स्वाध्यायप्रवचने च । तपश्च स्वाध्यायप्रवचने च । दमश्च स्वाध्यायप्रवचने च । शमश्च स्वाध्यायप्रवचने च । अग्नयश्च स्वाध्यायप्रवचने च । अग्निहोत्रश्च स्वाध्यायप्रवचने च । अतिथयश्च स्वाध्यायप्रवचने च । मानुषं च स्वाध्यायप्रवचने च । प्रजा च स्वाध्यायप्रवचने च । प्रजनश्च स्वाध्यायप्रवचने च । प्रजातिश्च स्वाध्यायप्रवचने च ।।**

—तैत्तिरीयोपनिषद् प्रपा० ७।९.

हे पठणपाठन करणाऱ्यांचे नियम आहेत. **(अर्थ)** (ऋतं०) यथार्थ आचरणपूर्वक शिकावें व शिकवावें, (सत्यं०) सत्याचारपूर्वक सत्य विद्या शिकाव्या व शिकवाव्या, (तप०) धर्मानुष्ठानरूपी तप करून वेदादि शास्त्रें शिकावीं व शिकवावीं, (दम:०) बाह्य इंद्रियांना वाईट कामें व दुराचरणें यांतून परावृत्त करून विद्या शिकावी व शिकवावी, (शम०) मनाला सर्व दोषांपासून दूर ठेवून शिकावें व शिकवावें, (अग्नय०) आहवनीय व विद्युत् वगैरे अग्नीला जाणून शिकावें व शिकवावें, (अग्निहोत्रं०) अग्निहोत्र करून पठणपाठन करावें, (अतिथय०) अतिथींचा सत्कार करून, (प्रजा०) संतान व राज्यांतील प्रजा यांचें पालन करून, (मानुषं०) मनुष्यसंबंधीं सर्व व्यवहार करून, (प्रजन०) वीर्याचें रक्षण व त्याची वृद्धि करून, व (प्रजाति०) आपले पुत्र व शिष्य यांचें पालन करून शिकावें व शिकवावें.

**यमान् सेवेत सततं न नियमान् केवलान् बुधः । यमान्पतत्यकुर्वाणो नियमान् केवलान् भजन् ।।** मनु. अ० ४।२०४
**तत्राहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः । शौचसन्तोषतपः स्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः ।।**

—योगदर्शने साधनपादे. ३० व ३२.

(अहिंसा) वैरत्याग, (सत्य) सत्य मानणें, सत्य बोलणें, व सत्य आचरण करणें, (अस्तेय) कायावाचामनेंकरून चोरी न करणें, (ब्रह्मचर्य) उपस्थ इंद्रियाचा संयम, (अपरिग्रह) अत्यंत लोलुपता सोडून स्वत्याभिमानरहित होणें, हे पांच 'यम' आहेत. यांचे सेवन मनुष्यमात्रानें सदैव करावें. तसेंच (शौच) स्नानादिकांनीं होणारी पवित्रता,

(संतोष) निरुद्योगीपणाचा अवलंब करून प्रसन्न राहणें हा संतोष नव्हे, तर जितका पुरुषार्थ होणें शक्य असेल तितका करून, हानि किंवा लाभ यांत शोक किंवा हर्ष न मानणें व मनाचा समतोलपणा ठेवणें हा संतोष होय. (तप) धर्मानुष्ठान करण्यांत कष्ट झालें तरी तें सहन करणें, (स्वाध्याय) अध्ययन व अध्यापन, व (ईश्वरप्रणिधान) ईश्वराच्या भक्तीमध्यें आत्म्याला अर्पण करणें हे पांच 'नियम' आहेत. यांचेंहि सेवन केलें पाहिजे. वरील यमांचें सेवन न करितां फक्त या नियमांचेंच सेवन करूं नये. दोहोंचेंहि सारख्याप्रमाणानें सेवन करावें. जो यम सोडून नियमांचेंच पालन करतो त्याची उन्नत्ति होत नाहीं, इतकेंच नव्हे तर तर त्याची संसारामध्यें अधोगति होते:—

**कामात्मता न प्रशस्ता न चैवेहास्त्यकामता । काम्यो हि वेदाधिगमः कर्मयोगश्च वैदिकः ॥** मनु० २।२.

**(अर्थ)** अत्यंत कामातुरता किंवा अगदी निष्कामता कोणालाहि लाभदायक होणार नाहीं. कारण जर कामना नसेल तर वेदांचें ज्ञान व वैदिक कर्में कोणीहि करणार नाहीं.

**स्वाध्यायेन व्रतैर्होमैस्त्रैविद्येनेज्यया सुतैः । महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः ॥** मनु० २।२८.

**(अर्थ)** [स्वाध्यायेन] सकल वेदांचें अध्ययन व अध्यापन, [व्रत] ब्रह्मचर्य व सत्यभाषणादि नियम, [होम] अग्निहोत्र; सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग, सत्यविद्यांचें दान, [त्रैविद्येन] वेदांतील ज्ञान, कर्म व उपासना, [इज्यया] पक्षांतील इष्टि, [सुतैः] सुसंतानोत्पत्ति, [महायज्ञैः] ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ व नृयज्ञ हे पंचमहायज्ञ [यज्ञैः] अग्निष्टोम व शिल्पविद्या विज्ञानादि यज्ञ या सर्व साधनांच्या योगानें [ब्राह्मीयं तनु] ब्रह्मप्राप्तीला अनुकूल असें मनुष्यशरीर तयार [क्रियते] केलें जातें.

**इन्द्रियाणां विचरतां विषयेष्वपहारिषु । संयमे यत्नमातिष्ठेत् विद्वान् यन्तेव वाजिनाम् ॥** मनु० २।८८.

**(अर्थ)** 'ज्याप्रमाणें उत्तम सारथी घोड्यांना आपल्या ताब्यांत ठेवतो, त्याप्रमाणें विद्वानानें मन व आत्मा यांना नीच कामांमध्यें घेऊन जाणाऱ्या विषयांत आपलीं इंद्रियें लागत आहेत असें पाहतांच, त्यांचा त्वरित निग्रह करण्याचा प्रयत्न करावा.' कारण—

**इन्द्रियाणां प्रसङ्गेन दोषमृच्छत्यसंशयम् । सन्नियम्य तु तान्येव ततः सिद्धिं नियच्छति ॥**
**वेदास्त्यागश्च यज्ञाश्च नियमाश्च तपांसि च । न विप्रदुष्टभावस्य सिद्धिं गच्छन्ति कर्हिचित् ॥**

मनु० २।९३ व ९७

**(अर्थ)** ज्यावेळीं जीवात्मा इंद्रियांच्या आधीन होतो तेव्हां त्याला फार दोष लागतात व जेव्हां तो इंद्रियें आपल्या ताब्यांत ठेवतो तेव्हां त्याला सिद्धि प्राप्त होते. दुराचारी व अजितेन्द्रिय पुरुषांनीं वेदाध्ययन, दान, यज्ञ, नियम, तप, व अन्य कृत्यें जरी केलीं तरी त्यांना त्यापासून मिळणारी सिद्धि प्राप्त होत नाहीं.

**वेदोपकरणे चैव स्वाध्याये चैव नैत्यिके । नानुरोधोऽस्त्यनध्याये होममन्त्रेषु चैव हि ।**
**नैत्यिके नास्त्यनध्यायो ब्रह्मसत्रं हि तत्स्मृतम् । ब्रह्माहुतिहुतं पुण्यमनध्यायवषट्कृतम् ॥** मनु० २।१०५ व १०६.

**(अर्थ)** वेदांचें अध्ययन व अध्यापन, संध्योपासनादि पंचमहायज्ञ, होमहवन या कृत्यांना कधींहि अनध्याय [प्रतिबंध] नाहीं; कारण नित्यकर्में करण्यास कधींहि अनध्याय नसतो. श्वासोच्छ्वास जसे सदासर्वदा चालू असतात त्याचप्रमाणें नित्यकर्मेंहि केलींच पाहिजेत; कोणत्याहि दिवशीं तीं सोडूं नयेत. ज्याप्रमाणें सदोदित अग्निहोत्रादिक कृत्यें करून पुण्य मिळतें, त्याचप्रमाणें असत्य भाषण वगैरे दोष केल्यानें सदैव पाप लागतें. म्हणून वाईट कर्माला सदैव अनध्याय व चांगल्या कर्माला सदैव स्वाध्याय आहे असें समजावें. अर्थात् सत्कर्में सदैव करीत रहावें.

**अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः । चत्वारि तस्य वर्धन्त आयुर्विद्या यशो बलम् ॥** मनु० २।१२१.

**(अर्थ)** जो सदा नम्र, सुशील आणि विद्वान् व वृद्ध यांची सेवा करणारा असतो त्याचें आयुष्य, विद्या, कीर्ति व बल हीं वाढतात व जो वरील प्रकारचें आचरण करीत नाहीं, त्याला वरील फळेंहि मिळत नाहींत.

**अहिंसयैव भूतानां कार्यं श्रेयोनुशासनम् । वाक्चैव मधुरा श्लक्ष्णा प्रयोज्या धर्ममिच्छता ।**
**यस्य वाङ्मनसि शुद्धे सम्यग्गुप्ते च सर्वदा । स वै सर्वमवाप्नोति वेदान्तोपगतं फलम् ॥** मनु० २।१५९ व १६०.

**(अर्थ)** विद्वान् व विद्यार्थी यांनीं वैरभाव व हिंसाबुद्धि सोडून सर्व मनुष्यांना कल्याणकारक मार्गाचा उपदेश करावा, व सदैव मधुर व सुशीलतायुक्त वाणीनें बोलावें. धर्माची उन्नति करण्याची इच्छा धरून सदैव सत्याप्रमाणें आचरण ठेऊन सत्याचाच उपदेश करावा. ज्या मनुष्याची वाणी व मन शुद्ध व सुरक्षित असतात, त्यालाच वेदान्तानें म्हणजे वेदांच्या सिद्धांतानें सांगितलेलें फल प्राप्त होतें.

**संमानाद्ब्राह्मणो नित्यमुद्विजेत विषादिव । अमृतस्येव चाकाङ्क्षेदवमानस्य सर्वदा ॥ मनु० २।१६२.**

**(अर्थ)** जो विषाप्रमाणें प्रतिष्ठेला भितो व आपमानाला अमृताप्रमाणें मानतो तोच ब्राह्मण वेद व परमेश्वर यांना जाणूं शकतो.

**अनेन क्रमयोगेन संस्कृतात्मा द्विजः शनैः । गुरौ वसन्संचिनुयाद् ब्रह्माधिगमिकं तपः ॥**
**योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् । स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥**

—मनु० अ० २।१६४ व १६८.

**(अर्थ)** याप्रमाणें उपनयनादि करून ब्रह्मचारी द्विजकुमार व ब्रह्मचारिणी द्विजकुमारिका यांनीं हलके हलके वेदांच्या अर्थज्ञानरूपी तपाला वाढवावें. कारण जो ब्राह्मण वेद न शिकतां अन्यत्र श्रम करतो, तो आपल्या पुत्रपौत्रांसह शूद्रत्वाला प्राप्त होतो.

**वर्जयेन्मधु मांसञ्च गन्धं माल्यं रसान् स्त्रियः । शुक्तानि यानि सर्वाणि प्राणिनां चैव हिंसनम् ॥**
**अभ्यङ्गमंजनं चाक्ष्णोरुपानच्छत्रधारणम् । कामं क्रोधं च लोभं च नर्तनं गीतवादनम् ॥**
**द्यूतं च जनवादं च परिवादं तथाऽनृतम् । स्त्रीणां च प्रेक्षणालम्भमुपघातं परस्य च ॥**
**एकः शयीत सर्वत्र न रेतः स्कन्दयेत्क्वचित् । कामाद्धि स्कन्दयन्रेतो हिनस्ति व्रतमात्मनः ॥**

—मनु २।१७७–१८०.

**(अर्थ)** मद्य, मांस, गंध, माळा, व रस यांचें सेवन, स्त्रीपुरुषांचा संग, आंबट व तिखट पदार्थ, प्राण्यांची हिंसा, अंगांचें मर्दन, उपस्थेंद्रियाला स्पर्श करणें, डोळ्यांत अंजन घालणें, पादत्राण व छत्री यांचा उपयोग करणें, काम, क्रोध, लोभ, मोह, भय, शोक, ईर्ष्या, व द्वेष यांचा अवलंब करणें, नाचणें, गाणें बजावणें, द्यूत खेळणें, वाईट गोष्टी, निंदा, मिथ्याभाषण, स्त्रियांना पाहणें व सान्निध्य करणें, व इतर हानिकारक कुमार्ग यांचा ब्रह्मचारी व ब्रह्मचारिणी यांनीं सदैव त्याग करावा. सर्वत्र एकटें निजावें. वीर्यस्खलन कधींहि करूं नये. जो कामनापूर्वक वीर्याचें स्खलन करतो त्याचें ब्रह्मचर्य भ्रष्ट झालें असें समजावें.

**वेदमनूच्याचार्योऽन्तेवासिनमनुशास्ति । सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातंतुं मा व्यवच्छेत्सीः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् ॥१॥ देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव । यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि ॥ २ ॥ यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि । ये के चास्मच्छ्रेयांसो ब्राह्मणास्तेषां त्वयाऽऽसनेन प्रश्वसितव्यम् । श्रद्धया देयम् । अश्रद्धयादेयम् । श्रिया देयम् । ह्रिया देयम् । भिया देयम् । संविदा देयम् । अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् ॥ ३ ॥ ये तत्र ब्राह्मणाः सम्मर्शिनो युक्ता अयुक्ता अलूक्षा धर्मकामास्स्युर्यथा ते तत्र वर्तेरन् । तथा तत्र वर्तेथाः । एष आदेशः एष उपदेशः एषा वेदोपनिषत् । एतदनुशासनम् । एवमुपासितव्यम् । एवमुचैतदुपास्यम् ॥ ४ ॥**

—तैत्तिरीय० प्रपा० ७ अनु० ११ क० १।२।३।४.

**(अर्थ)** आचार्यानें आपल्या शिष्यांना असा उपदेश करावा कीं, तूं खरें बोल; धर्माचरण कर; प्रमादरहित होऊन व ब्रह्मचर्याच्या नियमांचें पालन करून सर्व विद्यांचें अध्ययन कर; विद्याग्रहण झाल्यानंतर आचार्याला इष्ट धन दे व विवाह करून संतानोत्पत्ति कर; चुकीनेहि कधीं खोटें बोलूं नको; धर्माचाहि प्रमादानें त्याग करूं नको; प्रमाद करून

आरोग्य व चतुराई यांचा त्याग करूं नको; उत्तम ऐश्वर्याची वृद्धि होत असतां चुकीनेंहि हानि करून घेऊं नको; प्रमाद करून, अध्ययन व अध्यापन यांत विघ्न आणूं नको; विद्वान् व मातापिता यांची सेवा करण्यांत प्रमाद करूं नको; मातापिता, विद्वान्, व अतिथि यांचा सत्कार कर; जीं सत्यभाषणादिक अनिंदित कर्मे असतील तींच कर व मिथ्याभाषणादिक निंदित कर्मे कधींहि करूं नको; आमचीं जीं कांहीं धर्मयुक्त आचरणें असतील त्यांचा अंगिकार तूं करून आमचीं जीं कांहीं पापाचरणें असतील तीं सोडून दे; जो कोणी आमच्यामध्यें उत्तम विद्वान् ब्राह्मण असेल त्याच्याजवळ जाऊन बैस व त्याच्यावरच विश्वास ठेव; श्रद्धेनें द्यावें; अश्रद्धेनें द्यावें; शोभेसाठीं द्यावें; लज्जेनें द्यावें; भयानें द्यावें; किंवा प्रतिज्ञेचें उल्लंघन होऊं नये म्हणून द्यावें. ज्यावेळीं तुम्हांला कर्म, शील, उपासना, व ज्ञान इत्यादिकाविषयीं संशय उत्पन्न होईल, त्यावेळीं तेथें जे योगी, आर्द्रचित्त, धर्मात्मे, पक्षपातरहित व विचारशील असे लोक असतील व ते जसे वागत असतील व सांगत असतील त्याप्रमाणेंतूं वाग; हीच आमची आज्ञा; हाच आमचा उपदेश; व हेंच वेदांतील उपनिषद् आहे. हेंच तुला उत्तम शिक्षण आहे व याचप्रमाणें तूं आपलें वर्तन ठेवावें, म्हणजे तुझें कल्याण होईल.

**अकामस्य क्रिया काचिद् दृश्यते नेह कर्हिचित । यद्यद्धि कुरुते किंचित् तत्तत्कामस्य चेष्टितम् ॥** मनु० २।४.

**(अर्थ)** जें जें कांहीं मनुष्य करतो तें तें कांहींतरी प्रेरक इच्छेवांचून करीत नाहीं; कारण निष्काम पुरुषाचे नेत्रहि संकोच व विकास पावूं शकणार नाहींत मग त्याकडून कार्य होणें तर फारच कठीण.

**आचारः प्रथमो धर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एव च । तस्मादस्मिन्सदा युक्तो नित्यं स्यादात्मवान् द्विजः ॥**
**आचाराद्धि च्युतो विप्रो न वेदफलमश्नुते । आचारेण तु संयुक्तः संपूर्णफलभाग्भवेत् ॥** मनु० १।१०८ व १०९.

**(अर्थ)** वेद व वेदानुकूल स्मृतिग्रंथ यांत सांगितलेला जो आचार तोच खरा धर्म होय. (हेंच श्रवण, मनन, अध्ययन, व अध्यापन यांचें फल आहे.) अशा वेदप्रणित धर्माचें आचरण सर्वांनीं सर्वदा करावें. जो मनुष्य सदाचार सोडतो त्याला वेदप्रणित धर्मापासून मिळणारें सुखमय फल मिळत नाहीं; पण जो सदाचारसंपन्न असतो त्याला तें संपूर्ण फल मिळतें

**योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद्द्विजः । स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः ॥**
**वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः । एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥**

—मनु० २।११ व १२.

**(अर्थ)** जो मनुष्य वेद व वेदानुकूल आप्तपुरुषप्रणित शास्त्रें यांचें प्रमाण मानीत नाहीं, त्यांचा अपमान करतो, तो वेदनिंदक असल्यामुळें नास्तिक आहे असें समजावें. त्याला जातींतून, पंक्तींतून किंवा देशांतून सदाचरणी पुरुषांनीं बाहेर घालवावा. वेद, वेदानुकूल आप्तपुरुषप्रणित मनुस्मृत्यादिक शास्त्रें, सदाचार सत्पुरुषांचा आचार वेदद्वारा परमेश्वरप्रतिपादित सनातन सदाचार व आत्म्याला प्रिय अशा सत्यभाषण वगैरे गोष्टी हीं धर्माचीं चार लक्षणें आहेत. पक्षपातरहित, न्यायानुसार व सत्याला अनुलक्षून जो आचार असेल तोच धर्म जाणावा; व याच्या उलट म्हणजे पक्षपातयुक्त, न्यायरहित व सत्याला सोडून जें आचरण असेल, तो अधर्म असें जाणावें.

**अर्थकामेष्वसक्तानां धर्मज्ञानं विधीयते । धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः ॥** मनु० २।१३

**(अर्थ)** जो पुरुष द्रव्य व विषय यांत फसलेला-नसतो, त्यालाच धर्माचें ज्ञान प्राप्त होतें; ज्यांना धर्म जाणावयाचा असेल त्यांनीं वेदांच्या द्वारानें धर्म जाणावा, कारण त्यवेदांतच धर्म व अधर्म यांचा योग्य निश्चय केलेला आहे.

याप्रमाणें गुरूनें आपल्या शिष्याला उपदेश करावा. ज्याप्रमाणें ब्राह्मणांना विद्येची आवश्यकता आहे त्याच-प्रमाणें राजेलोक, क्षत्रिय, वैश्य, व उत्तम शूद्र यांनाहि आहेच; म्हणून त्यांनाहि विद्याभ्यास करूं द्यावा. केवळ ब्राह्म-णांनींच विद्याभ्यास केला व इतरांनीं न केला तर राज्यरक्षण, धनसमृद्धि वगैरे इतर वर्णांचीं कामें त्यास करतां येणार नाहींत व त्यामुळें विद्या व धर्म ही वाढणार नाहींत. ब्राह्मण तर अध्ययन व अध्यापन करून क्षत्रियांदिकांकडून उपजीविका

मिळवून असतात. जीविकसाठी क्षत्रियादिकांच्या आज्ञेप्रमाणें सध्यां ते वागत आहेत व दिवसानुदिवस पाखंडी बनत आहेत. जर क्षत्रियादिक वर्ग सज्ञान व यथावत्परीक्षक असतील तर ब्राह्मणांनाहि उत्तम विद्याभ्यास करून, विद्वान् व सदाचरणी बनून राहावेंच लागेल; कारण इतर सज्ञान जातीपुढें त्यांचें पाखंड मग चालणार नाहीं. पण जर तोच वर्ग अविद्वान् असेल तर हे ब्राह्मण मन मानेल तसें त्यांना समजावून सरंगतीलव तसें त्यांच्याकडून करवून घेतील. म्हणून ब्राह्मणांना जर आपल्या कल्याणाची इच्छा असेल तर त्यांनीं स्वत: क्षत्रियादिकांकडून वेदाभ्यास व शास्त्राभ्यास करविणें अवश्य आहे; कारण क्षत्रियादिक वर्ग हे विद्या, धर्म, राज्य, लक्ष्मी इत्यादिकांची वृद्धि करणारे आहेत. त्यांनीं कधींहि भिक्षावृत्ति किंवा पक्षपातयुक्त व्यवहारहि करतां कामा नये. ज्यावेळीं सर्व वर्ण सुशिक्षित होतील तेव्हां कोणाचाहि पाखंड-युक्त मिथ्याव्यवहार चालूं शकणार नाहीं. यावरून उघड ठरतें कीं, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र यांना उपदेश करून सुनियमांनीं चालावयास लावणें हें संन्यासी व ब्राह्मण यांचे हातीं. व तसेंच ब्राह्मण, संन्यासी वगैरेंना सुनियमाप्रमाणें वर्तन ठेवण्यास लावणें क्षत्रियादिकांच्या हातीं आहे. म्हणून सर्व वर्णांच्या स्त्रीपुरुषांनीं विद्या शिकून धर्माचा प्रसार केलाच पाहिजे.

जें जें शिकावयाचें असेल तें नीट परीक्षा करून शिकावें किंवा शिकवावें. परीक्षा पांच प्रकारांनीं होत असते. [१] वेद व ईश्वराचे गुण, कर्म, स्वभाव यांना जें अनुकूल असेल तें सत्य व त्याच्या विरुद्ध जें असेल तें असत्य समजावें. [२] सृष्टिक्रमाला अनुकूल जें असेल तें सत्य व त्याच्याविरुद्ध सर्व असत्य; उदाहरणार्थ 'आईबापांशिवाय मुलगा झाला' असें जर कोणी सांगितलें तर तें असत्य आहे असें समजावें. [३] धार्मिक, विद्वान्, सत्यवादी, निष्कपटी व आप्तपुरुषांच्या उपदेशाला अनुकूल जें असेल तें सत्य व प्रतिकूल असेल तें असत्य समजावें. [४] आपल्या आत्म्याची पवित्रता व विद्या ह्यांस जें अनुकूल तें सत्य. म्हणजे आपणांस जसें सुख प्रिय व दु:ख अप्रिय वाटतें. तसें इतरांसहि वाटतें अशा आत्मप्रिय बुद्धीनें जें योग्य तें खरें व अयोग्य तें असत्य होय. [५] प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, ऐतिह्य, अर्थापत्ति, संभव व अभाव या आठ प्रमाणांनीं जें ठरेल तें सत्य व इतर असत्य आहे असें समजावें.

आतां ह्या आठ प्रमाणांच्या व्याख्या पाहूंया.

**इन्द्रियार्थसन्निकर्षोत्पन्नं ज्ञानमव्यपदेश्यमव्यभिचारि व्यवसायात्मकं प्रत्यक्षम् ॥** न्यायदर्श० १।१।४.

(१) **'प्रत्यक्षप्रमाण'**—श्रोत्र; त्वचा, नेत्र, जिव्हा व नासिका या ज्ञानेन्द्रियांचा शब्द, स्पर्श रूप, रस व गंध या विषयांशीं अव्यवहित म्हणजे आवरण रहित संबंध होऊन व तत्कालींच इंद्रियांचा मनाशीं व मनाचा आत्म्याशीं संबंध होऊन जें ज्ञान प्राप्त होतें तें 'प्रत्यक्ष' ज्ञान होय, पण तें व्यपदेश्य म्हणजे संज्ञासंज्ञीच्या संबंधानें उत्पन्न होणारें नसावें. जसें:—कोणी एकानें दुसऱ्याला सांगितलें कीं, 'पाणी घेऊन ये.' त्यानें त्याप्रमाणें पाणी आणून पुढें ठेवलें व म्हणाला कीं, 'हें पाणी आहे.' या आणलेल्या पाण्याचे ठिकाणीं 'पाणी ही अक्षरयुक्त संज्ञा पाणी मागणारा किंवा आणणारा पहात नसून ज्या पदार्थाची पाणी ही संज्ञा आहे तेंच प्रत्यक्ष आहे. अशा ज्ञानाला 'प्रत्यक्ष ज्ञान' असें म्हणतात. परंतु शब्दापासून जें ज्ञान उत्पन्न होतें त्याचा शब्दप्रमाणांत अंतर्भाव होतो. **अव्यभिचारी**—जरी कोणी रात्रीच्या वेळीं पुढें दिसलेल्या खांबालाच मनुष्य असें जाणलें तरी उजेडल्यानंतर हा मनुष्य नव्हे, खांब आहे असें त्याला समजतें; या प्रकारच्या विनाशी ज्ञानाला 'व्यभिचारी ज्ञान' असें म्हणतात. प्रत्यक्ष ज्ञान असें नसतें म्हणून त्याला 'अव्यभिचारि' असें म्हणतात. **व्यवसायात्मकम्**—नदीच्या काठांवरील वाळू पाहून दुरून बरोबर न समजल्यामुळें धोतरें आहेत अशी कल्पना जर कोणी केली व म्हटलें, 'तीं पहा धोतरें वाळत घातलीं आहेत' तर ही चुकीची कल्पना किंवा 'हा देवदत्त उभा आहे कीं यज्ञदत्त' अशा तऱ्हेचें अनिश्चयात्मक ज्ञान हें 'प्रत्यक्ष ज्ञान' नव्हे. ज्यामध्यें व्यपदेश व व्यभिचार हे दोष नसून जें अव्यपदेश, अव्यभिचारी व निश्चयात्मक असेल त्यालाच प्रत्यक्ष ज्ञान असें म्हणतात.

**अथ तत्पूर्वकं त्रिविधमनुमानं पूर्ववच्छेषवत्सामान्यतो दृष्टं च ॥** न्यायद० १।१।५ ॥

(२) **'अनुमान प्रमाण'**—प्रत्यक्षपूर्वक अप्रत्यक्षाचें ज्ञान होणें याचें नांव 'अनुमान.' पदार्थाचा एखादा देश किंवा अवयव कोणत्याहि स्थलीं किंवा कोणत्याहि कालीं प्रत्यक्ष पाहिला असतां त्यावरून दुसऱ्या अदृष्ट अवयवाचें ज्ञान होतें तें 'अनुमान' होय. जसें: पुत्र पाहून बाप असला पाहिजे, पर्वतावर धूर पाहून अग्नि असला पाहिजे, व

[ मनुष्याला होत असलेलें दुःख पाहून पूर्वजन्म असला पाहिजे असें म्हणणें हें अनुमान समजावें. याचे तीन भेद आहेत **(अ) पूर्ववत्**–कारणाला पाहून जेथें कार्याचें अनुमान होतें तें 'पूर्ववत् अनुमान' होय. जसें–मेघ पाहून वृष्टी होईल, विवाहित स्त्रीपुरुषें पाहून संतती होईल, शिकत असलेला विद्यार्थी पाहून तो विद्वान् होईल, वगैरे. **(ब) शेषवत्** म्हणजे कार्याला पाहून कारणाचें ज्ञान होतें. जसें:—नदीचें पाणी वाढलेलें पाहून वर वृष्टि झाली असावी, पुत्राला पाहून बाप असला पाहिजे, सृष्टीला पाहून तिचें अनादिकारण व कर्ता ईश्वर असला पाहिजे, पापपुण्यांवरून सुखदुःखाचें ज्ञान, इत्यादि उदाहरणें 'शेषवत्' अनुमानाची आहेत. **(क) सामान्यतो दृष्ट**–दोहोंमध्यें कार्यकारणभाव नसून साधर्म्य मात्र असतें तें 'सामान्यतो दृष्ट' अनुमान होय. जसें:—चालल्याशिवाय स्थलांतर होऊं शकत नाहीं, स्थलांतर झालेलें पाहून गमनाचें अनुमान करणें हें सामान्यतो दृष्ट अनुमान जाणावें. **(अनु अर्थात् प्रत्यक्षस्य पश्चान्मीयते ज्ञायते येन तदनुमानम्)** जें प्रत्यक्ष ज्ञानापासून उत्पन्न होतें तें अनुमान होय. धुराचें ज्ञान प्रत्यक्ष झालें तर अप्रत्यक्ष अग्नीचें अनुमान होईल. जर धूरच दिसला नाहीं तर अनुमान तरी कसलें होणार ? अर्थात् अनुमानाला प्रत्यक्षाची आवश्यकता आहे.

**प्रसिद्धसाधर्म्यात्साध्यसाधनमुपमानम्** ॥ न्यायद० १।१।६.

(३) '**उपमान प्रमाण–प्रसिद्ध** अशा प्रत्यक्ष पदार्थाच्या साधर्म्यानें साध्य करावयाच्या पदार्थाच्या ज्ञानाची सिद्धि करण्यास जें साधन होतें तें 'उपमान' होय **(उपमीयते येन तदुपमानम्)** 'ज्यानें उपमा दिली जाते तें उपमान.' जसें:–कोणी आपल्या चाकराला सांगितलें कीं, 'तूं विष्णुमित्राला बोलावून आण.' तेव्हां तो म्हणतो, 'मला तो माहीत नाहीं.' तेव्हां त्याला समजावें म्हणून धनी म्हणतो, 'जसा हा यज्ञदत्त आहे तसाच अगदीं विष्णुमित्रहि आहे.' या ठिकाणीं विष्णुमित्राला यज्ञदत्ताची उपमा दिली. तसेंच 'गाईप्रमाणेंच नीलगाय असतें' या उदाहरणांत प्रत्यक्ष असलेल्या गाईंतील साधर्म्यानें साध्य निलगाईचें ज्ञान करून दिलें; त्यामुळें जंगलामध्यें गाईसारखाच पशु पाहून ही नीलगाय असली पाहिजे असा निश्चय करतां येईल.

**आप्तोपदेशः शब्दः** ॥ न्यायाद० १।१।७.

(४) '**शब्द प्रमाण**'—जो कोणी पूर्ण विद्वान्, धार्मिक, परोपकारी सत्यवादी, पुरुषार्थी, जितेंद्रिय व आत्म्यामध्यें स्वतः ज्याचा अनुभव घेतला आहे व तें हितकारक आहे अशाबद्दल खात्री झाली आहे अशाच ज्ञानाचा लोककल्याणार्थ उपदेश करणारा असेल तो 'आप्त' होय. आप्त पुरुषाला पृथिवीपासून परमेश्वरापर्यंत असणाऱ्या सर्व पदार्थाचें ज्ञान यथावत् झालेलें असतें. म्हणून अशा पुरुषाचे उपदेश प्रमाण मानावेत. तसेंच परमेश्वर हा पूर्ण आप्तपुरुष आहे. त्यानें केलेला उपदेश म्हणजे वेदहि प्रमाण मानावेत.

**न चतुष्ट्वमैतिह्यार्थापत्तिसंभवाभावप्रामाण्यात्** ॥ न्यायद० २।२।१.

(५) '**ऐतिह्य प्रमाण**'—'इति ह' म्हणजे 'असें खरोखर झालें' किंवा 'असें त्यानें केलें.' याचप्रमाणें सर्व जीवनवृत्तान्त या प्रमाणांत अंतर्भूत होतात. 'ऐतिह्य' म्हणजे 'इतिहास'.

(६) '**अर्थापत्ति प्रमाण**'—**(अर्थादापद्यते सा अर्थापत्तिः)** कोणी म्हटलें कीं, मेघ असले तरच वृष्टि होईल, किंवा कारण असलें तरच कार्य होईल, तर या म्हणण्यावरून 'मेघाशिवाय वर्षाव होणार नाहीं व कारणाशिवाय कार्य होणार नाहीं.' हा जो अर्थ निघतो त्याला 'अर्थापत्ति' असें म्हणतात.

(७) **संभव प्रमाण**'—**(संभवति यस्मिन् स संभवः)** जें सृष्टिक्रमाप्रमाणें संभवतें तें 'संभव प्रमाण' होय. कोणी सांगितलें कीं 'मातापित्यावांचून संतानोत्पत्ति झाली, मेलेल्यांस जिवंत केलें, डोंगर उचलले, दगड तरंगले, चंद्राचे तुकडे केले, सर्वव्यापक परमेश्वराचा अवतार झाला, मनुष्याला शिंग फुटलें, वंध्येला मुलगा झाला' तर या सर्व गोष्टी सृष्टिक्रमाविरुद्ध असल्यामुळें असंभवनीय आहेत. त्या प्रमाण मानूं नयेत. जी गोष्ट संभवनीय असेल तीच प्रमाण मानावी.

(८) **'अभाव प्रमाण'—(न भवन्ति यस्मिन् सोऽभावः)** विद्यमान नसणें याचें नांव 'अभाव' होय. कोणी कोणाला सांगितलें कीं 'हत्ती घेऊन ये,' तर त्या ठिकाणीं हत्तीचा अभाव पाहून जेथें हत्ती असेल तेथून तो घेऊन येतो. याप्रमाणें हीं आठ **प्रमाणें आहेत. कोणी** शब्दप्रमाणांत ऐतिह्यप्रमाणाचा व अनुमानामध्यें अर्थापत्ति, संभव व अभाव यांचा अंतर्भाव **करतात; त्यांच्या मतें मुख्य** चारच प्रमाणें आहेत. या प्रमाणांनीं सत्यासत्यतेविषयीं मनुष्यांनीं निर्णय करावा व **सत्याचें ग्रहण करून असत्याचा त्याग** करावा.

**धर्मविशेषप्रसूताद् द्रव्यगुणकर्मसामान्यविशेषसमवायानां पदार्थानां साधर्म्यवैधर्म्याभ्यां तत्त्वज्ञानान्निःश्रेयसम् ॥** —वैशेषिक दर्शन० १।१।४.

**(अर्थ)** 'जो मनुष्य धर्मानुष्ठानानें पवित्र **होऊन, साधर्म्य** व वैधर्म्य यांच्या योगानें द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष व समवाय या सहा तत्त्वांना जाणतो-म्हणजे त्यांचें स्वरूपज्ञान प्राप्त करून घेतो-तेव्हां त्याला मोक्ष प्राप्त होतो' साधर्म्य म्हणजे समानधर्म असणें व वैधर्म्य म्हणजे विरुद्ध धर्म असणें. जलामध्यें व पृथिवीमध्यें 'जडत्व' हें साधर्म्य आहे. पण पृथिवीमध्यें 'कठोरपणा' व जलामध्यें 'कोमलपण' हें वैधर्म्य आहे. या सहा तत्त्वांचें स्पष्टीकरणा पुढें दिलें आहे:—

**क्रियागुणवत् समवायिकारणमिति द्रव्यलक्षणम् ॥** वैशेषिक० १।१।५.

**पृथिव्यापस्तेजोवायुराकाशं कालो दिगात्मा मन इति द्रव्याणि ॥ वैशेषिक० १।१।१५.**

(१) **'द्रव्यतत्त्वम्'–(क्रियाश्च गुणाश्चविद्यन्ते यस्मिन् तत् क्रियागुणवत्)** ज्यामध्यें क्रिया व गुण असतात, अथवा ज्यांत केवळ गुण असतात त्यांना 'द्रव्य' असें म्हणावें. पृथिवी, जल, तेज, वायु, मन व आत्मा हीं सहा द्रव्यें क्रिया व गुण यांनीं युक्त आहेत व आकाश, काल व दिशा हीं तीन द्रव्यें क्रियारहित व गुणयुक्त आहेत. **(समवेतुं शीलं यस्य तत् समवायि । प्राग्वृत्तित्वं कारणं समवायि च तत्कारणं च समवायिकारणम्, लक्ष्यते तेन तल्लक्षणम्)** तसेंच ज्याच परस्पर मिळण्याचा स्वभाव असेल तें समवायि, व कार्याचें जें पूर्वकालीं कारण असेल त्याला समवायिकारण असें म्हणतात. हीं दोनहि द्रव्याचीं लक्षणें आहेत. ज्याच्या योगानें लक्ष्य जाणलें जातें तें लक्षण या नऊ द्रव्यांचीं लक्षणें पुढें दिलीं आहेत:—

**रूपरसगन्धस्पर्शवती पृथिवी ॥** वैशेषिक २।१।१. **व्यवस्थितः पृथिव्यां गन्धः ॥ वैशे० २।२।२.**

**(अर्थ)** रूप, रस, गंध व स्पर्श हे गुण जीमध्यें आहेत ती पृथ्वी होय. पृथ्वीमध्यें जलापासून रस, अग्नीपासून रूप व वायूपासून स्पर्श असें तीन द्रव्यांपासून तीन गुण आलेले आहेत. पृथ्वीमध्यें गंध हा गुण स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणें जलामध्यें रस, अग्नीमध्यें रूप, वायुमध्यें स्पर्श व आकाशांत शब्द हे स्वाभाविक गुण आहेत.

**रूपरसस्पर्शवत्या आपो द्रवाः स्निग्धाः ॥ वैशे० २।१।२ अप्सु शीतता ॥ वैशे० २।२।४.**

**(अर्थ)** रूप, रस व स्पर्श हे गुण ज्यांत आहेत व जें द्रवीभूत व स्निग्ध आहेतें 'जल' होय. जलाचा स्वाभाविक गुण रस हा आहे. रूप व स्पर्श हे अग्नि व वायूच्या योगानें आले आहेत. जलमध्यें शीतता हा गुणहि स्वाभाविक आहे.

**तेजो रूपस्पर्शवत् ॥ वैशे० २।१।३. स्पर्शवान् वायुः ॥ वैशे० २।२।४.**

**(अर्थ)** रूप व स्पर्श हे गुण ज्यांत आहेत त्याला 'तेज' असें म्हणतात. तेजामध्यें रूप हा स्वाभाविक गुण असून, स्पर्श हा वायूच्या योगानें नैमित्तक गुण आलेला आहे. ज्याचा गुण स्पर्श आहे त्याला 'वायु' असें म्हणतात. यामध्येंहि उष्णता व शीतता हे नैमित्तिक गुण, तेज व जल या तत्त्वांपासून उत्पन्न होतात.

**त आकाशे न विद्यन्ते ॥ वैशे० २।१।५. निष्क्रमणं प्रवेशनमित्याकाशस्य लिङ्गम् ॥ वैशे० २।१।२०.**

**कार्यान्तराप्रादुर्भावाच्च शब्दः स्पर्शवतामगुणः ॥ वैशे० २।१।२५.**

**(अर्थ)** रूप, रस, गंध व स्पर्श हे चार गुण आकाशांत नाहींत. आकाशाचा 'शब्द' हा स्वाभाविक गुण आहे. ज्याच्या योगानें प्रवेश व बाहेर येणें (निष्क्रमण) होतें त्याला 'आकाश' असें म्हणतात. तसेंच स्पर्शगुणानें युक्त असणाऱ्या पृथिव्यादिक कार्यांमध्यें शब्द प्रगट होत नाहीं म्हणून पृथिव्यादिकांचा तो गुण नव्हे. शब्द आकाशाचा गुण आहे.

**अपरस्मिन्नपरं युगपच्चिरं क्षिप्रमिति काललिङ्गानि ।।** वैशे० २।२।६.

**नित्येष्वभावादनित्येषु भावात्कारणे कालाख्येति ।।** वैशे० २।२।९.

**(अर्थ)** ज्यामध्यें (अपर) नंतर, (युगपद्) एकवार, (चिरम्) फार वेळ, (क्षिप्रम्) शीघ्र, इत्यादि प्रयोग होतात त्याला 'काल' असे म्हणतात. जो नित्य पदार्थामध्यें असत नाहीं व अनित्य पदार्थांच्या कारणामध्यें असतो म्हणून त्याला काल ही संज्ञा लावतात.

**इत इदमिति यतस्तद् दिश्यं लिङ्गम् ।।** वैशे० २।२।१०.

**आदित्यसंयोगाद् भूतपूर्वाद् भविष्यतो भूताच्च प्राची ।।** वैशे० २।२।१४.

**एतेन दिगन्तरालानि व्याख्यातानि ।।** वैशे० २।२।१६.

**(अर्थ)** ज्यामध्यें वर, खालीं, पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर इत्यादि व्यवहार होतात तिला 'दिशा' असें म्हणतात. ज्या दिशेला प्रथम अदित्याचें दर्शन झालें, सध्यां होत आहे व पुढें होईल त्या दिशेला 'पूर्व' असें म्हणतात. ज्या दिशेला सूर्यास्त होतो ती पश्चिम दिशा समजावी. पूर्व दिशेला तोंड करून उभें राहिलें असतां समोरची पूर्व, पाठीमागची पश्चिम, उजव्या हाताची दक्षिण, व डाव्या हाताची उत्तर दिशा जाणावी. यावरून इतर दिशा जाणाव्या. पूर्व व दक्षिण यांमध्यें आग्नेयी, दक्षिण व पश्चिम यांमध्यें नैऋत्य, पश्चिम व उत्तर यांत वायव्य, उत्तर व पूर्व यांत ऐशानी याप्रमाणें उपदिशा आहेत.

**इच्छाद्वेषप्रयत्नसुखदुःखज्ञानान्यात्मनो लिङ्गमिति ।।**न्यायद० १।१०.

**(अर्थ)** ज्यामध्यें (इच्छा) प्रीति, (द्वेष) वैर, (प्रयत्न) पुरुषार्थ, सुख, दुःख व ज्ञान, हे गुण आहेत त्यांला 'जीवात्मा' असें म्हणतात. तसेंच—

**प्राणाऽपाननिमेषोन्मेषजीवनमनोगतीन्द्रियान्तर्विकाराः सुखदुःखेच्छाद्वेषप्रयत्नाश्चात्मनो लिङ्गानि ।।**

—वैशे० ३।२।४.

**(अर्थ)** [प्राण] बाहेरचा वायु आंत घेणें, [अपान] आंतला वायु बाहेर फेकणें, [निमेष] डोळे मिटणें [उन्मेष] डोळे उघडणें, [जीवन] प्राणधारणकरणें, [मनः] मनन, विचार करणें [गति] यथेच्छ गमन करणें, [इन्द्रिय] इद्रियांनीं विषयांचें ग्रहण करणें, [अन्तर्विकाराः] क्षुधा, तृषा, ज्वर, पीडा इत्यादि विकार होणें, तसेंच सुख, दुःख, इच्छा, द्वेष व प्रयत्न हे गुण ज्याच्यामुळें होतात तो 'आत्मा' होय असें कणाद महर्षि म्हणतात.

**युगपज्ज्ञानानुत्पत्तिर्मनसो लिङ्गम् ।।** न्याय० १।१।१६.

**(अर्थ)** एकाच वेळीं अनेक पदार्थांचें ज्ञान उत्पन्न न होणें हें मनाचें लक्षण आहे. ज्याच्या योगानें एकाच कालीं दोन पदार्थांचें ज्ञान होत नाहीं त्याला 'मन' असें म्हणतात. याप्रमाणें नऊ द्रव्यांचें वर्णन झालें. आतां गुणांचें वर्णण पुढें दिलें आहे.

**रूपरसगन्धस्पर्शाः सङ्ख्यापरिमाणानि पृथक्त्वं संयोगविभागौ परत्वाऽपरत्वे बुद्धयः सुखदुःखे इच्छाद्वेषौ प्रयत्नाश्च गुणाः ।।** वैशे० १।१।६.

(२) **'गुण'**—रूप, रस, गंध, स्पर्श, संख्या, परिमाण, पृथकत्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, बुद्धि, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, प्रयत्न, (व सूत्रांतील 'च' कारामुळें समावेश केलेले) गुरुत्व, द्रवत्व, स्नेह, संस्कार, धर्म, अधर्म, व शब्द हे चोवीस गुण आहेत.

**द्रव्याश्रय्यगुणवान् संयोगविभागेष्वकारणमनपेक्ष इति गुणलक्षणम् ।।** वैशे० १।१।१६'

**(अर्थ)** जो द्रव्याच्या आश्रयानें असतो, ज्याला अन्य गुणांचा आश्रय नसतो, संयोग व विभाग याना जो कारणीभूत नसतो व जो दुसऱ्या कशाची अपेक्षा करीत नाहीं त्याला **'गुण'** असें म्हणतात. गुण चोवीस आहेत. ते वर दिलेले आहेत. (**श्रोत्रोपलब्धिर्बुद्धिनिर्ग्राह्यः प्रयोगेणाभिज्वलित आकाशदेशः शब्दः ।** महाभाष्ये) 'जो श्रोत्रेंणायाला समजतो,' बुद्धीनें ज्याचें ग्रहण होतें, जो प्रयोगानें प्रकाशित होतो व आकाश हें ज्याचें स्थान आहे त्याला शब्द असें

म्हणतात.' अशी पतंजलि महामुनींनीं शब्दाची व्याख्या दिली आहे. नेत्रांनीं ज्याचें ग्रहण होतें तें रूप; जिव्हेनें ज्या मिष्टान्नादिकांचें ग्रहण होतें तो रस; नाकानें ज्याचें ग्रहण होतें तो गंध; त्वचेनें ज्याचें ग्रहण होतें तो स्पर्श; जिच्या योगानें एक, दोन इत्यादि गणना होते ती संख्या; ज्यानें हलकेपणाचा किंवा वजनदारपणाचा बोध होतो तें परिमाण; एक दुसऱ्यापासून भिन्न होणें हें पृथकत्व; एक दुसऱ्याशीं मिळणें हा संयोग; मिसळून बनलेल्याचे अनेक तुकडे होणें हा विभाग; पर म्हणजे पलीकडे; अपर म्हणजे अलीकडे; सत् व असत् यांचा जिच्या योगानें निश्चय होतो ती बुद्धि; सुख म्हणजे आनंद; क्लेश म्हणजे दुःख; इच्छा किंवा राग म्हणजे प्रीति; द्वेष म्हणजे विरोध; तसेंच प्रयत्न म्हणजे अनेक प्रकारचा बलयुक्त पुरुषार्थ; गुरुत्व म्हणजे भारीपणा; द्रवत्व म्हणजे पातळपणा; स्नेह म्हणजे प्रीति, चिकणपणा, संस्कार म्हणजे दुसऱ्याच्या योगानें वासना होणें; धर्म म्हणजे न्याययाचरण, कठिनत्व वगैरे; अधर्म म्हणजे धर्माच्या विरुद्ध वर्तन; याप्रमाणें हे चोवीस गुण व त्यांचे अर्थ आहेत.

**एकद्रव्यमगुणं संयोगविभागेष्वनपेक्षकारणमिति कर्मलक्षणम् ॥** वैशे० १।१।१७.

**उत्क्षेपणमवक्षेपणमाकुञ्चनं प्रसारणं गमनमिति कर्माणि ॥**वैशे० १।१।७.

(३) **'कर्म'**—(**एकद्रव्यमाश्रयो यस्य तदेकद्रव्यं । न विद्यते गुणो यस्मिन् तदगुणम् । संयोगेषु विभागेषु चाऽपेक्षारहितं कारणं तत्कर्मलक्षणम्**) अथवा (**यत्क्रियते तत्कर्म । लक्ष्यते येन तत् लक्षणम् । कर्मणो लक्षणं कर्मलक्षणम्**) जे द्रव्याच्या आश्रयानें असतें; ज्यामध्यें गुण नसतात, संयोग व विभाग होण्यामध्यें जें अपेक्षारहित कारण असतें त्याला **'कर्म'** असें म्हणतात. हीं कर्में पांच आहेतः—(१) उत्क्षेपणम् म्हणजे वर फेकणें, (२) अवक्षेपणम् म्हणजे खालीं लोटणें, (३) आकुंचनम् म्हणजे संकुचित होणें, (४) प्रसारणम् म्हणजे विस्तार होणें, व (५) गमनम् म्हणजे येणें, जाणें, फिरणें वगैरे. पृथिवीचें अवक्षेपण, जलाचें आकुंचन, तेजाचें उत्क्षेपण, वायूचें प्रसारण व आकाशाचें गमन या प्रमाणें पंचमहाभूतांचीं पांच कर्में जाणावीत.

**द्रव्यगुणकर्मणां द्रव्यं कारणं सामान्यम् ॥** वैशे० १।१।१८.

**द्रव्याणां द्रव्यं कार्यं सामान्यम् ॥** वैशे० १।१।२३.

(४) **'सामान्य'**—जें द्रव्य, गुण, व कर्म या कार्यांचें कारण द्रव्य आहे तें 'सामान्य' होय. जें द्रव्यांपासून झालेलें कार्य द्रव्य आहे तें कार्यत्व या दृष्टीनें सर्व कार्यांमध्यें सामान्य आहे.

**द्रव्यत्वं गुणत्वं कर्मत्वं च सामान्यानि विशेषाश्च ॥** वैशे० १।२।५.

**सामान्यं विशेष इति बुद्ध्यपेक्षम् ॥** वैशे० १।२।३.

(५) **'विशेष'**—द्रव्यांमध्यें द्रव्यपणा, गुणामध्यें गुणपणा, व कर्मामध्यें कर्मपणा सामान्य आहे; द्रव्यांमध्यें द्रव्यत्व सामान्य आहे पण गुणत्व व कर्मत्व यांच्याहून द्रव्यत्व विशेष आहे. याप्रमाणें सर्वत्र जाणावें. 'सामान्य व विशेष हें बुद्धीच्या पेअक्षेनें सिद्ध होतें.' जसें—मनुष्यांमध्यें मनुष्यत्व सामान्य आहे पण पशुत्वाहून तें विशेष आहे. तसेंच स्त्रियांमध्यें स्त्रीत्व व पुरुषांमध्यें पुरुषत्व हीं सामान्य आहेत; पण ब्राह्मणत्व, क्षत्रियत्व, वैश्यत्व व शूद्रत्व हें विशेष आहे. ब्राह्मणव्यक्तींमध्यें ब्राह्मणत्व सामान्य आहे पण तें क्षत्रियादिकांहून विशेष आहे. याप्रमाणें सर्व जाणावें.

**इहेदमिति यतः कार्यकारणयोः स समवायः ॥** वैशेषिक ७।२।२६.

(६) **'समवाय'**—अवयवांमध्यें अवयवी, कार्यामध्यें क्रिया क्रियावान्, गुणगुणी, जातिव्यक्ती कार्य—कारण, अवयवअवयवी यांचा नित्य संबंध असतो म्हणून त्याला 'समवाय' असें म्हणतात. जो दुसऱ्या द्रव्यांचा परस्परसंबंध होतो त्याला 'संयोग' असें म्हणतात. संयोगसंबंध हा अनित्य असून समवायिसंबंध हा नित्य असतो.

**द्रव्यगुणयोः सजातीयारम्भकत्वं साधर्म्यम् ॥** वैशेषिक १।१।९.

(**अर्थ**) 'द्रव्य व गुण यांपासून समानजातीय कार्याचा आरंभ होणें' याला 'साधर्म्य' असें म्हणतात. जस पृथ्वीमध्यें जडत्वधर्म, व घटादि स्वसदृश कार्योत्पादकत्व धर्म आहे; त्याचप्रमाणें, जलामध्येंहि जडत्व व हिम (बर्फ) वगैरे स्वसदृशकार्योत्पादकत्व आहे; म्हणून पृथ्वी व जल यांचें परस्पर साधर्म्य आहे. (**द्रव्यगुणयोर्विजातीयारम्भकत्वं**

**वैधर्म्यम्)** जेथें द्रव्य व गुण यांपासून विजातीय धर्म व कार्य उत्पन्न होतें त्याला 'वैधर्म्य' असें म्हणतात. जसें— पृथ्वीमध्यें कठिनत्व, शुष्कत्व, व गंधत्व हे धर्म जलाच्या धर्माशीं विरुद्ध आहेत व जलाचें द्रवत्व कोमलत्व व रसगुणयुक्तत्व हे गुण पृथ्वीतत्वाच्या विरुद्ध आहेत या बाबतींत या दोन द्रव्यांमध्यें वैधर्म्य आहे. या प्रमाणें इतर तत्त्वा-विषयीं जाणावें

## (१५) कार्यकारणसंबंध

**कारणभावात्कार्यभावः ॥** वैशे० ४।१।३।। **न तु कार्याभावात्कारणाभावः ॥** वैशे० १।२।२.

**(अर्थ)** कारण असलें तरच त्यापासून कार्याची उत्पत्ति होईल. पण कार्याचा अभाव असला तर कारणाचा अभाव असलाच पाहिजे असें नाहीं. कार्याशिवायहि कारण असूं शकेल.

**कारणाभावात्कार्याभावः ।** वैशे० १।२।१।। **कारणगुणपूर्वकः कार्यगुणो दृष्टः ।।** वैशे० २।१.२४.

**(अर्थ)** कारण नसलें तर कार्य कधींहि होणार नाहीं. कारणामध्यें जसे गुण असतात तसेंच कार्यामध्यें येतात. परिणाम दोन प्रकारचे आहेत.

**अणुमहदिति तस्मिन्विशेषभावाद्विशेषाभावाच्च ।।** वैशे० ७।१।११.

**(अर्थ)** (अणु) सूक्ष्म व (महत्) मोठें असें दोन प्रकारचे **परिणाम** आहेत. जसें लिक्षेहून त्रसरेणु लहान व द्वयणुकापेक्षां तो मोठा आहे. तसेंच पर्वत पृथ्वीपेक्षां लहान व झाडापेक्षां मोठा आहे.

**सदिति यतो द्रव्यगुणकर्मसु सा सत्ता ।।** वै० १।२।७.

**(अर्थ)** द्रव्य, गुण, कर्म, याचें वर्तमानत्व—अस्तित्व—यालाच 'सत्ता' असें म्हणतात. द्रव्य आहे, कर्म आहे, गुण आहे, याप्रमाणें वर्तमानकालवाचक शब्दाचा अन्वय सर्वांशीं असतो. या लाच सत्ता म्हणतात सत्ता म्ह० अस्तित्व आहेपणा

**भावोऽनुवृत्तेरेव हेतुत्वात्सामान्यमेव ।।** वैशे० १।२।४.

**(अर्थ)** जो सत्तारूप भाव-अर्थात् अस्तित्व—सर्वांशीं युक्त असतो त्याला 'महासामान्य' असें म्हणतात. हे विवेचन भावरूप द्रव्यांविषयीं झालें. अभावाचे प्रकार पंस्प आहेत.

**क्रियागुणव्यपदेशाभावात्प्रागसत् ॥१॥ सदसत् ॥२ सच्चासत् ॥४॥ यच्चान्यदसदतस्तदसत् ॥५॥ नास्ति घटो गेहे इति सतो घटस्य गेहसंसर्गप्रतिषेधः ॥१०॥** वैशेषि० ९।१.

**(अर्थ)** 'क्रिया व गुण यांचें विशेष निमित्त होण्यापूर्वी कार्य असत नाहीं.' जसें–घट किंवा वस्त्र हीं उत्पत्तिपूर्वी नसतात. यांला **प्रागभाव** असें म्हणतात. 'जें होऊन नाश पावतें' त्याला **'प्रध्वंसभाव'** असें म्हणतात. जसें–घट उत्पन्न होऊन नाश पावतो. 'जें असून नसतें' त्याला **'अन्योन्याभाव'** असें म्हणतात. जसें–'अगौरश्वोऽनश्वो गौः' हा घोडा गाय नव्हे व ही गाय घोडा नव्हे. अर्थात् गाईमध्यें घोडेपणाचा व घोड्यामध्यें गायपणाचा अभाव आहे. जो पूर्वींच्या तीनहि अभावांहून अन्य अभाव आहे त्याला **'अत्यन्ताभाव'** असें म्हणतात. जसें नरशृंग, खपुष्प वंध्यापुत्र वगैरे, हे पदार्थ असूं शकतच नाहींत म्हणून त्यांना अत्यंताभाव असें म्हणतात. 'घरांत घट नाहीं' अर्थात् 'घराशीं घटाचा सध्यां संबंध नाहीं' याला **'संसर्गाभाव'** असें म्हणतात. म्हणजे घट अन्यत्र असेल पण तो घरांत नाहीं याप्रमाणें हे पांच प्रकारचे अभाव आहेत.

**इन्द्रियदोषात्संस्कारदोषाच्चाविद्या । तद्दुष्टज्ञानम् ।।** वैशे० ९।२।११.

**(अर्थ)** इंद्रियें व संस्कार यांच्या दोषांपासून 'अविद्या' उत्पन्न होते. जे दुष्ट म्हणजे विपरीतज्ञान असतें, त्यालाहि अविद्या असें म्हणतात.

**अदुष्टं विद्या ।।** वै ९।२।१२.

**(अर्थ)** जें अदुष्ट म्हणजे यथार्थ ज्ञान असतें त्याला 'विद्या' असें म्हणतात.

**पृथिव्यादिरूपरसगंधस्पर्शा द्रव्यानित्यत्वादनित्याश्च ।।** वैशे० ७।१।२.

**एतेन नित्येषु नित्यत्वमुक्तम् ।।** वैशे० ७।१।३.

(अर्थ) पृथ्वी, जल, वगैरे कार्य पदार्थ व त्यांचे गंध, रस, रूप व स्पर्श हे गुण अनित्य आहेत; कारण तीं तीं द्रव्येंच अनित्य असल्यामुळें त्यांचे गुणहि अनित्य आहेत. पण जे कारणरूप पृथिव्यादि नित्य पदार्थ आहेत त्याचे गंधादिक गुणहि नित्यच आहेत.

सदकारणवन्नित्यम् ।। वैशे० ४।१।१

(अर्थ) ज्याला अस्तित्व आहे पण जें कशापासूनहि उत्पन्न झालें नाहीं म्हणजे ज्याला कारण नाहीं तें नित्य आहे असें समजावें. 'सत्कारणवदनित्यम्' म्हणजे ज्याला अस्तित्व आहे पण जें दुसऱ्या कशापासून तरी उत्पन्न झालें आहे, ते सकारण असल्यामुळें अनित्य जाणावें.

अस्येदं कार्यं कारणं संयोगि विरोधि समवायि चेति लैङ्गिकम् ।। वैशे० ९।२।१

(अर्थ) 'यांचें हें कार्य किंवा कारण आहे'. इत्यादि 'लिङ्गलिङ्गी' संबंध चार प्रकारचा आहे:—समवायि, संयोगि, *एकार्थसमवाई कारणान्तरेषु दृष्टवात् वै. ।। १०।१।६ । एकार्थसमवायि व विरोधि. आकाश परिमाणगुणयुक्त आहे हा समवायिसंबंध; शरीर त्वचायुक्त आहे हा संयोगिसंबंध; एका अर्थामध्यें दोहोचें अस्तित्व असणें याला एकार्थ-समवायिसंबंध असें म्हणतात. जसें–कार्यरूप स्पर्श कार्याचें लिंग अर्थात् कार्याला जाणणारा असतो .तसेंच विरोधी संबंध झालेल्या वृष्टीच्या चिन्हांचा होणाऱ्या वृष्टीच्या चिन्हांशीं विरोधिसंबंध असतो. य प्रमाणें चार प्रकारचे लिंगलिंगीसंबंध जाणावें.

नियतधर्मसाहित्यमुभयोरेकतरस्य वा व्याप्तिः ।। ३९ ।। निजशक्त्युद्भवमित्याचार्याः ।। ३१ ।।
आधेयशक्तियोग इति पञ्चशिखः ।। ३२ ।। सांख्यदर्शन अ० ५

(अर्थ) जें सिद्ध करावयाचें तें साध्य ज्याच्यायोगानें सिद्ध केलें जातें तें साधन होय. साध्य व साधन या दोहोंमध्यें किंवा एकामध्यें जें नियतधर्माचें साहचर्य असतें त्याला 'व्याप्ति' असं म्हणतात. धुराशीं अग्नीचें साहचर्य आहे. कारण, जेथें धूर असतो तेथें अग्नि असतो. तसेंच व्याप्य जो धूर तो स्वतःच्या शक्तीनें उत्पन्न होत असतो. अर्थात् जेव्हां धूर अन्य स्थलीं जातो तेव्हां तो अग्नीच्या संयोगाशिवायहि राहूं शकतो. याचें नांव 'व्याप्ति' असें आचार्य म्हणतात. अग्नीच्या छेदन व भेदन या सामर्थ्यानें जलादि पदार्थांपासूनहि धूर उत्पन्न होतो. पंचशिखाचार्य आधेय शक्तीच्या योगाला 'व्याप्ति' असें म्हणतात. जसें—मूलप्रकृतीची महत्तत्वामध्यें व्याप्ति किंवा व्यापकताधर्माची बुद्धीमध्यें व्याप्ति आहे. शक्तिमान् आधाररूप व शक्ति आधेयरूप यांचा संबंध तीच व्याप्ति असें समजावें.

इत्यादि शास्त्रांच्या प्रमाणांनीं परीक्षा करून शिकावें व शिकवावें. नाहींतर हवा तो ग्रंथ शिकविल्यानें विद्यार्थ्यांना सत्यासत्यतेचा विचार करतां येणार नाहीं; म्हणून जो ग्रंथ शिकवावयाचा असेल त्याची पूर्वोक्त ग्रंथाच्या प्रमाणांनीं परीक्षा करून जर तो उत्तम ठरला तरच तो विद्यार्थ्यांस शिकवावा. या प्रमाणांच्या कसोटीस जो उतरला नसेल तो ग्रंथ कधींहि शिकवूं नये; कारण (लक्षणप्रमाणाभ्यां वस्तुसिद्धिः) 'गंधगुणयुक्त' जी आहे ती पृथ्वी' इत्यादि प्रकारचीं लक्षणें व प्रत्यक्ष, अनुमान, शब्द, वगैरे प्रमाणें यांच्या योगानेंच यथार्थ विचार होऊन सत्यासत्याचा व सत्यपदार्थांचा निर्णय होतो. लक्षणें व प्रमाणें याशिवाय तो होणें शक्य नाहीं. म्हणून अशारीतीनें परीक्षित व योग्य अशा ग्रंथाचेंच अध्ययन विद्यार्थ्यांकडून करवावें, म्हणजे त्यांना मोठा लाभ होईल.

## *(१८) अध्ययन व अध्यापन

अध्ययन व अध्यापनाचा प्रकार पुढें लिहिल्याप्रमाणें असावा. प्रथमतः पाणिनिमुनिकृत शिक्षा माता, पिता किंवा आचार्य यांनीं शिकवावी. या ग्रंथामध्यें अक्षरांचें स्थान, प्रयत्न व करण वगैरेविषयीं सूत्ररूपानें व्याख्यान आहे. जसें 'प' या अक्षराचें ओष्ठस्थान, स्पष्ट प्रयत्न, व प्राण व जिव्हा यांची क्रिया हें करण आहे. याप्रमाणें विद्यार्थ्यांना सर्व अक्षरांचा उच्चार कसा करावयाचा तें शिकवून पाणिनीय शिक्षेंतील सर्व सूत्रांचा अर्थ व उपयोग यांचें सविवरण स्पष्टीकरण शिकवावें. नंतर व्याकरण शिकवावें. पाणिनीचें अष्टाध्यायीसूत्रपाठ हें सर्वोत्कृष्ट व्याकरण आहे. प्रथम यांतील सूत्रें पाठ करवून घ्यावीत व मग अर्थ सांगावा. 'वृद्धिरादैच्' हें प्रथमसूत्र आहे. यामध्यें वृद्धि + आत् + ऐच् किंवा आदैच् अशीं पदें आहेत. त्यांचा समास 'आच्च ऐच्च आदैच' असा आहे, व अर्थ 'आ, ऐ, औ' यांना वृद्धि म्हणावे असा आहे. (आदैचां वृद्धिसंज्ञा क्रियते) या सूत्रामध्यें 'आत' या पदामध्यें आकाराच्या

पुढें 'त्' या व्यंजनाचा उपयोग केला आहे; त्याचें कारण ऱ्हस्व किंवा प्लुत 'आ' काराचें ग्रहण होऊं नये हें आहे. ( तः परो यस्मात् स तपरस्तादपि परस्तपरः ) 'त्' आहे पुढें ज्याच्या तो तपर, किंवा 'त्' काराच्या पुढें जो असतो तो 'तपर' समजावा; याप्रमाणें जो तपर असतो तो त्या उच्चारलेल्याचाच बोधक होतो. 'आदैच्' यामध्यें 'आ' काराच्या पुढें 'त'कार आहे व 'त'काराच्या पुढें 'ऐच्' आहे म्हणून आ, ऐ व औ हीं तपर अक्षरें जाणावीं. या तपर कारणापासून 'आ, ऐ, औ' यांचाच बोध होतो व 'अ, आ, इ' वगैरेंचा बोध होत नाहीं. अ, आ, व इ यांना ऱ्हस्व, दीर्घ व प्लुत अशा स्वतंत्र संज्ञा आहेत. या सूत्रानें 'आ, ऐ, औ' या तीन स्वरांना 'वृद्धि' ही संज्ञा केली आहे. इ० उदाहरणार्थ 'भागः' हा शब्द 'भज्' धातूला 'घञ् प्रत्यय लावून केला आहे. 'घञ्' प्रत्ययामध्यें 'घ्, ञ्' हे इत्संज्ञक आहेत म्हणून त्यांचा लोप होतो, व शिल्लक 'अ' हा प्रत्यय राहतो. 'भज्+अ' अशी स्थिति झाल्यानंतर 'भ' कारांतील 'अ'काराला वृद्धि होते व 'ज्'काराच्या ठिकाणीं 'ग्' कार होतो; व 'भाग्+अ' मिळून 'भागः' असा शब्द सिद्ध होतो. त्याचप्रमाणें 'अध्यायः' हा शब्द 'अधि' उपसर्गपूर्वक 'इङ्' धातूवरून ऱ्हस्वान्त असल्यामुळें 'घञ्' प्रत्यय होऊन, 'इ' काराच्या ठिकाणीं 'ऐ' अशी वृद्धि होऊन 'अधि+ऐ+अ' अशी स्थिति झाल्यावर 'ऐ'काराच्या ठिकाणीं 'आय्' असा आदेश होऊन 'अध्यायः' हा शब्द सिद्ध झाला आहे. तसेंच 'नायकः' हा शब्द, 'नीञ्' धातु दीर्घान्त असल्यामुळें 'ण्वुल्' प्रत्यय पुढें आला व 'ई' काराच्या ठिकाणीं 'ऐ' अशी वृद्धि होऊन 'वु' च्या ठिकाणीं अक असा आदेश होऊन 'नै+अक' अथवा 'नायकः' असें रूप झालें. 'स्तु' व धातूवरून 'ण्वुल्' प्रत्यय होऊन धात्वंतीच्या 'उ' काराला 'औ' अशी वृद्धि होऊन 'स्तौ+अक' अशी स्थिति झाल्यावर 'स्तावकः' असें पद बनलें. तसेंच 'कृञ्' धातूवरून 'ण्वुल' प्रत्यय करून, 'ण्, ल्' या प्रत्ययस्थ इतांचा लोप केल्यानंतर शेष राहिलेल्या 'वु' प्रत्ययाला 'अक' असा आदेश झाल्यावर धात्वंतीच्या ऋकाराला 'आर्' अशी वृद्धि होऊन (कार्+अक) 'कारकः' हें रूप सिद्ध झालें.

याप्रमाणें सूत्रार्थ शिकवित असतांना त्यांचें प्रयोजन व उदाहरणेंहि तेथच्या तेथें दाखवून द्यावी. सूत्रांचा मागचा पुढचा संबंधहि वेळच्यावेळीं सांगावा व रूपें कशीं होतात तें, तीं सिद्ध करावयाच्या वेळींच, लिहून दाखवावीं, जसें :— 'भज्+घञ्+सु' अशी स्थिति प्रथमतः होती. प्रत्ययांतील 'घ्, ञ्' या इतांचा लोप झाल्यावर 'भज्+अ+सु' अशी स्थिति झाली. 'भ' या अक्षरांतील 'अ' काराची 'आ' ही वृद्धि व 'ज्' काराच्या ठिकाणीं 'ग्' कार होऊन 'भाग्+अ+सु' अशी स्थिति झाली, त्यांचा मिलाफ केला असतां 'भाग+सु' असें झाल्यावर 'सु' मधील उकाराला इतसंज्ञा व त्याचा लोप केल्यावर शेष राहिलेल्या सकाराच्या ठिकाणीं 'रु' होऊन 'भाग+रु' असें झाल्यावर 'रु' मधील उकाराला इत्संज्ञा व लोप केल्यावर शेष राहिलेल्या रेफाच्या ठिकाणीं ( : ) विसर्जनीय होऊन 'भागः' हें रूप सिद्ध झालें. ज्या ज्या सूत्रानें जें कार्य करावयाचें असेल तें तें करतेवेळीं तें तें सूत्र उच्चारण व तें तें कार्य लिहून वेळच्यावेळीं विद्यार्थ्यास शिकवावें. असें केलें असतां विषय सुगम होऊन तो त्यांस शीघ्र समजतो. अशा प्रकारें अष्टाध्यायी, धातुपाठ हीं अर्थासह झाल्यावर दशलकारांचीं रूपेंहि उत्तमरितीनें करवून घ्यावीं. नंतर उत्सर्गसूत्रें अर्थात् सामान्य सूत्रें शिकवून त्यांचीं अपवादसूत्रें स्पष्टीकरणासह शिकवावीं जसें — 'कर्मण्यण्' हें उत्सर्गसूत्र आहे. याचा अर्थ 'कर्म उपपद असतां धातूवरून अण् प्रत्यय होतो' असा आहे. जसें—कुंभ हें कर्म उपपद असतां 'कृ' धातूवरून अण प्रत्यय होऊन ' कुम्भकारः ' हें रूप सिद्ध झालें. याला अपवादसूत्र 'अतोऽनुसर्गे कः' म्हणजे 'उपसर्गभिन्न कर्म उपपद असतांना आकारान्त धातूवरून 'क' प्रत्यय होतो.' हें आहे 'कर्मण्यण्' या सूत्रानें सर्व धातूंवरून 'अण्' प्रत्यय प्राप्त झाला होता पण त्याला वरील सूत्रानें तो आकारान्त धातूंवरून होत नाहीं असें सांगितलें. आकारान्तवरून 'क' होतो व इतर धातूवरून 'अण्' होतो असें झालें. याप्रमाणें उपसर्ग व अपवादसूत्रांची व्यवस्था सांगावी. चक्रवर्तीराजाच्या राज्यांत ज्याप्रमाणें मांडलिकराजे असतात पण मांडलिकांच्या राज्यांत चक्रवर्ती नसतात त्याचप्रमाणें उत्सर्गसूत्रांमध्यें अपवादसूत्रें प्रवृत्त होतात; पण अपवादसूत्रांच्या विषयांत उत्सर्गसूत्रें प्रवृत्त होत नाहींत. या प्रकाराच्या सूत्रव्यवस्थेनें पाणिनिमुनीनें सहस्र श्लोकांमध्यें अखिल शब्द, अर्थ व संबंध यांची व्यवस्था उत्तमप्रकारें प्रतिपादन केलेली आहे. अष्टाध्यायी झाल्यानंतर धातुपाठ शिकवून झाला म्हणजे मग उणादिगण शिकवावा व तो शिकवितांना सुबन्ताचा विषय उत्तम रीतीनें

शिकवून पाणिनीय अष्टाध्यायींतील शंका, समाधान, वार्तिक, कारिका, परिभाषा वगैरेविषयींची घटना शिकवून अष्टाध्यायीची दुसरी आवृत्ति पुरी करावी. याप्रमाणें अष्टाध्यायी शिकून झाल्यावर महाभाष्य शिकवावें. जर गुरु व विद्यार्थी हे दोघेहि बुद्धिमान्, पुरुषार्थी निष्कपटी, विद्याव्यासंगी, व सतत परिश्रम करणारे असतील तर दीड वर्षांत पुर्वी सांगितल्याप्रमाणें अष्टाध्यायी शिकून दीड वर्षांत महाभाष्य शिकतां येतें. याप्रमाणें तीन वर्षांत उत्तम वैय्याकरणी होऊन लौकिक व वैदिक शब्दांचें व्याकरण उत्तम रीतीनें समजल्यामुळें अन्य शास्त्रांमध्येंहि अतिशीघ्र गति होऊं शकते. एकदां व्याकरण चांगलें समजलें म्हणजे इतर शास्त्रें समजण्यास फार कठिण जात नाहींत व व्याकरण जसें वर सांगितलेल्या आर्षपद्धतीनें लवकर व उत्तम समजतें तसें तें सारस्वत, चंद्रिका, कोमुदी, मनोरमा इत्यादि कुग्रंथ (अनार्षग्रन्थ) पन्नास वर्षें शिकल्यानेंहि समजणार नाहीं. कारण महर्षींनीं महान् विषयाचें आकलन जसें सहज व सोप्या रीतीनें केलें आहे तसें तें सामान्यमनुष्यकृत कल्पित ग्रंथांमध्यें कोठून असणार ? महर्षिप्रणित ग्रंथांमध्यें सहज, थोडक्यांत व थोडया परिश्रमानें पुष्कळ विषय समजेल अशा बेतानें विषयरचना केलेली असते; म्हणून तेच ग्रंथ त्या पद्धतीनें शिकल्यास सत्वर ज्ञान होतें. पण आधुनिक ग्रंथांमध्यें विषयप्रतिपादनाची पद्धति व लिहिण्याची तऱ्हा मुद्दाम बिकट केल्यामुळें डोंगर पोखरून कवडीचा लाभ व्हावा, त्याप्रमाणें पुष्कळ परिश्रम करून स्वल्पविषयाचें ज्ञान होतें. समुद्रांत एक बुडी मारून जशीं शंभर मोत्यें मिळावींत तसा लाभ आर्षग्रंथ आर्षपद्धतीनें शिकण्यापासून होतो; हें लक्षांत ठेऊन तेच ग्रंथ शिकविण्याकडे शिक्षकांनीं लक्ष द्यावें.

व्याकरण शिकून झाल्यावर यास्काचार्यकृत **निघण्टु व निरुक्त** हे दोनहि ग्रंथ सहा किंवा आठ महिण्यांत अर्थासह शिकवावे. अन्य अमरकोशादिक ग्रंथांमध्यें वर्षेंच्या वर्षें घालविण्याचें कांहीं कारण नाहीं. नंतर पिंगलाचार्यकृत **छन्दग्रन्थ** अर्थासह चार महिन्यांत शिकवावा. या ग्रंथाच्या अध्ययनानें वैदिक व लौकिक छंदांचें ज्ञान होऊन नवीन पद्यरचना कशी करावी तेंहि सहज समजेल. वृत्तरत्नाकरासारखे ग्रंथ पढविण्यांत कालक्षेप मुळींच करूं नये. नंतर **मनुस्मृति, वाल्मिकी रामायण, महाभारत,** किंवा उद्योगपर्वान्तर्गत **विदुरनीति** यांसारखे म्हणजे ज्यांच्यापासून विद्यार्थ्यांना नीतीचा बोध होउन ते दुष्ट व्यसनांपासून दूर रहातील असे ग्रन्थ शिकवावे. हे पद्यग्रन्थ काव्य शिकविण्याच्या पद्धतीनें शिकवावे. पदच्छेद, पदार्थोक्ति, अन्वय, विशेष्यविशेषणसंबंध व भावार्थ इत्यादि प्रकारें मागील ग्रन्थ एक वर्षांत सहज शिकून होतील. नंतर पूर्वमीमांसा, वैशेषिक, न्याय, योग, सांख्य व वेदान्त हीं दर्शनें–शक्य असल्यास ऋषिप्रणित भाष्यांसह व न जुळल्यास उत्तम विद्वानांनीं सूत्रांच्या आशयाला धरून केलेल्या सरळ व्याख्येसह-शिकवावींत. वेदान्तदर्शन शिकविण्यापूर्वी ईश, केन, कठ, प्रश्न, मुण्डक, मांडूक्य, ऐतरेय, तैत्तिरीय, छान्दोग्य व बृहदारण्यक हीं दहा उपनिषदें शिकवावीं. हीं उपनिषदें व सूत्रवृत्तीसह षट्दर्शनें शिकण्यास दोन वर्षें पुरी आहेत. नंतर सहा वर्षांमध्यें ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद, हे चार वेद व त्यांचीं ऐतरेय, शतपथ, साम व गोपथ हीं ब्राह्मणें स्वर, शब्द अर्थ, संबंध व क्रिया यांसह शिकवावी म्हणजे अशारीतीनें जो शिकून तयार होईल तो खरा दशग्रन्थी होईल. वेद **अर्थासहच शिकले पाहिजेत** याबद्दल कांहीं प्रमाणें खालीं दिलीं आहेत.

**स्थाणुरयं भारहारः किलाभूदधीत्य वेदं न विजानाति योऽर्थम् ।**

**योऽर्थज्ञ इत्सकलं भद्रमश्नुते नाकमेति ज्ञानविधूतपाप्मा ॥** निरुक्त० १।१८.

(**अर्थ**) जो मनुष्य वेद नुसते पाठ करतो व त्यांचा अर्थ जाणत नाहीं, तो खरोखर भार उचलणारा खांब आहे असें जाणावें. ज्याप्रमाणें एखादा खांब किंवा पशु भार उचलणारा असतो त्याचप्रमाणें तो मनुष्यहि भारवाहक आहे असें जाणावें. पण जो वेदांचा अर्थ जाणतो त्याला सर्व प्रकारचें कल्याण प्राप्त होतें. त्याचीं पापें ज्ञानानें साफ धुवून नाहींशीं होतात व तो मोक्षरूपी सर्वानंदाला देहपातानंतर प्राप्त होतो. तसेंच—

**उतत्वः पश्यन्न ददर्श वाचमुत त्वः शृण्वन्न शृणोत्येनाम् ।**

**उतो त्वस्मै तन्वं विसस्त्रे जायेव पत्य उशती सुवासाः ॥** ऋ० मं० १०।७१।१४.

(**अर्थ**) जो अविद्वान मनुष्य पहात असूनहि आंधळा, ऐकत असतांहि बहिरा व बोलतां येत असूनहि मुका असतो अर्थात् वेद शिकूनाहि अर्थ न समजल्यामुळें ज्याला ते न शिकल्याप्रमाणें झाले आहेत त्याचें जिणें व्यर्थ होय. अविद्वान् लोक वेदांच्या अर्थापासून लाभ करून घेऊं शकत नाहींत. पण जे अर्थ जाणणारे विद्वान् असतात त्यांना, जशी एखादी उत्तम वस्त्र नेसलेली सुंदर स्त्री पतीची इच्छा धरून, पतीला सुख देते, तद्वत् विद्या आपल्या स्वरूपाचा प्रकाश करून सुख देते. तसेंच—

**ऋचो अक्षरे परमे व्योमन् यस्मिन् देवा अधिविश्वे निषेदुः ।**

**यस्तन्न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुस्त इमे समासते ॥** ऋ० मं० १।१६४।३९.

(**अर्थ**) ज्या सर्वव्यापक परमात्म्यामध्यें सूर्यचंद्रादिक सर्व लोकलोकांतरें आहेत त्या अविनाशी परमेश्वरामध्येंच सर्व वेदांचें तात्पर्य आहे. असें असतां जो मनुष्य परमेष्श्वराला जाणत नाहीं त्याला त्या वेदपठणाचा काय उपयोग ? पण जे अर्थज्ञानपूर्वक वेद शिकून परमेश्वराला जाणतात त्यांनाच खऱ्या आनंदाची प्राप्ति होते.

नरील आधारांवरून नुसत्या वेदपाठाचा कांहीं उपयोग नाहीं हें ध्यानीं येईल. वेदांचें अर्थासह अध्ययन करून, धर्माचरणपूर्वक योगाभ्यास करून, व ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेऊन आनंदमय परमेश्वरामध्यें स्थित व्हावें. तात्पर्य, या सर्व सुखप्राप्तीला अर्थासहित केलेल्या वेदाध्ययनाची आवश्यकता आहे म्हणून वेदांचें अर्थज्ञानपूर्वक अध्ययन करावें. वेदांचें अध्ययन झाल्यावर **आयुर्वेद** म्हणजे चरक, सुश्रुत, वगैरे ऋषिमुनिप्रणित वैद्यशास्त्रग्रंथांचे अर्थ, क्रिया, शस्त्र, छेदन, भेदन, लेप, चिकित्सा, निदान, औषध, पथ्य, शारीर, देश, काल व वस्तुगुणपरीक्षण शिकावे. या आयुर्वेदाच्या अध्ययनाला चार वर्षें पुरेत. नंतर **धनुर्वेदाचें** अध्ययन करावें. धनुर्वेदामध्यें राजासंबंधीं सर्व विद्या आहेत. यांत दोन भेद आहेत. एक राजासंबंधीं व दुसरा प्रजेसंबंधीं. तसेंच यांत सैन्याची रचना, शस्त्रास्त्रविद्या, व्यूहरचना, सैन्यांची कवाईत, युद्ध करण्याची पद्धति वगैरे सर्वांचा समावेश होतो. या सर्व विद्या योग्य रीतीनें शिकाव्या. तसेंच प्रजापालन, न्याय करणें, प्रजावृद्धि, दुष्टांना दंड करून सुष्टांचा प्रतिपाल करणें वगैरे प्रजेच्या हिताचे सर्व व्यवहार शिकाव्या. याचें अध्ययन करण्यास दोन वर्षें पुरेत. नंतर **गांधर्ववेदाला** आरंभ करावा. यांत गानविद्येचा समावेश होतो. स्वर, राग, रागिणी, समय, ताल, ग्राम, तान, वादित्र, नृत्य, गीत इत्यादि सर्व योग्य रीतीनें शिकून तयार व्हावे. गानविद्येमध्यें **नारदसंहिता** नामक आर्यग्रंथ आहे त्याचें अध्ययन करावें व सामवेदाचें तालसुरांत गायन करतां येईल इतकी तयारी करावी. पण वेश्या, भडवे व विषयासक्तींत मग्न असणारे पुरुष यांचा संग करूं नये; किंवा त्यांच्याप्रमाणें गर्दभवत् व्यर्थ आलाप काढूं नयेत. गायन सशास्त्रपद्धतीनें शिकावें. नंतर **अर्थवेदाच्या** अध्ययनाला आरंभ करावा. यामध्यें शिल्पविद्या, पदार्थगुणविज्ञान, क्रियाकौशल्यादिकांनीं नानाविध पदार्थ निर्माण करणें वगैरेचा समावेश होतो: पृथिवीपासून आकाशापर्यंत सर्व पदार्थविद्या यांत समाविष्ट होते, तिचें पद्धतशीर अध्ययन करावें. अर्थवेदाचें अध्ययन करून तदनुसार उद्योग केल्यास ऐश्वर्य वाढतें. म्हणून त्याचें परिशीलन चांगलें करावें. नंतर दोन वर्षांमध्यें सूर्यसिद्धांतादिक ज्योतिष ग्रंथ, बीजगणित, अंकगणित, भूगोल, खगोलविद्या, भूगर्भविद्या योग्य रीतीनें शिकाव्या. नंतर हस्तक्रिया व यंत्ररचना यांविषयीं शक्य तेवढें ज्ञान मिळवावें. पण जे ग्रह, नक्षत्र, जन्मपत्रिका, राशि, मुहूर्त वगैरे फलविधायक ग्रंथ आहेत, ते सर्व मिथ्या असल्यामुळें त्यांचें अध्ययन मुळींच करूं नये व ते शिकवूंहि नयेत. अशा रीतीनें शिकण्याचा व शिकविण्याचा प्रयत्न केल्यास वीस किंवा एकवीस वर्षें अध्ययन करून मनुष्य उत्तम विद्वान् व सुशिक्षित मनुष्य होऊन, तो कृत्यकृत्य होत्साता आनंदानें राहील. या पद्धतीनें जितकी विद्या वीस किंवा एकवीस वर्षांत येऊं शकते तेवढी अन्य पद्धतीनें अन्य पुस्तकें शिकवून शंभर वर्षांमध्यें येणार नाहीं.

## (१०) ग्रंथप्रामाण्य

ऋषि महा विद्वान्, शास्त्रज्ञ व धर्मात्मे असल्यामुळें त्यांनीं केलेले ग्रंथहि तसेच सद्विचारानें ओतप्रोत भरलेले असतात, म्हणून त्यांचेंच अध्ययन अध्यापन करावें. व पण जे लोक अल्पज्ञ, थोडेंसें शास्त्र शिकलेले, पक्षपातसहित, असतात अर्थात् यांच्यात ऋषियोग्यता नसूने त्यांचे ग्रंथहि अल्पगुणयुक्तच असल्यामुळें ते शिकवूं नयेत.

पूर्वमीमांसेवर व्यासमुनिकृत व्याख्या, वैशेषिकदर्शनावर गौतममुनिकृत भाष्य, न्यायसूत्रावर वात्स्यायनभाष्य, योगदर्शनावर व्यासभाष्य, कपिलमुनिकृत सांख्यदर्शनावर भागुरिमुनिकृत भाष्य, व्यासमुनिकृत वेदान्तसूत्रांवर वात्स्यायन-मुनिकृत भाष्य अथवा बौधायनमुनिकृत भाष्यवृत्ति यांसहित वरील दर्शनें शिकावींत व शिकवावींत. कल्पग्रंथांचाही अंगांत समावेश होतो. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद हे जसे ईश्वरप्रणित ग्रंथ आहेत, तसेच ऐतरेय, शतपथ, साम व गोपथ हीं चार ब्राह्मणें; शिक्षा, कल्प, व्याकरण, निघण्टु, निरुक्त, छन्द व ज्योतिष हीं वेदांचीं सहा अंगें; पूर्वमीमांसादि सहा उपांगें; आयुर्वेद, धनुर्वेद, गान्धर्ववेद व अर्थवेद हे चार उपवेद हे सर्व ऋषिमुनिप्रणित ग्रंथ आहेत, यांमध्यें जें जें वेदविरुद्ध असेल तें तें सर्व त्याज्य समजावें; कारण ईशप्रणित वेद निर्भ्रांत व स्वतःप्रमाण आहेत; पण ब्राह्मणादि सर्व ग्रंथ 'परतःप्रमाण' आहेत-म्हणजे यांचें प्रमाण वेदाधीन आहे. वेदांविषयीं जास्त विस्तारपूर्वक ऋग्वेदादि भाष्यभूमिका नामक ग्रंथांत लिहिलें आहे तें तेथें पहावें, व या ग्रंथामध्येंहि पुढें लिहिण्यांत येईल.

आतां येथें अनार्ष असल्यामुळें अल्पभाव देणारे परित्यागहि कोणते ग्रंथ आहेत याचा संक्षेपानें निर्देश करतों. पुढील ग्रंथ त्या त्या शास्त्रांत भ्रमजाल माजवणारे ग्रंथ आहेत असें समजावें (१) **व्याकरणांमध्यें** कातंत्र, सारस्वत, चन्द्रिका, मुग्धबोध, कौमुदी, शेखर, मनोरमा इत्यादि; (२) **कोशांमध्यें** अमरकोश वगैरे; (३) **छन्दोग्रंथांमध्यें** वृत्तरत्नाकरादिक; (४) **शिक्षाग्रंथांमध्यें** 'अथ शिक्षां प्रवक्ष्यामि पाणिनीयं मतं यथा' इत्यादि अपाणिनीय शिक्षा; (५) **ज्योतिषग्रंथांमध्यें** शीघ्रबोध, मुहूर्तचिंतामणि इत्यादि; (६) **काव्यांमध्यें** नायिकाभेद, कुवलयानंद, रघुवंश, माघ, किरातार्जुनीयादिक; (७) **मीमांसाग्रंथामध्यें** धर्मसिंधु, व्रतार्क इत्यादि; (८) **वैशेषिकांमध्यें** तर्कसंग्रह वगैरे; (९ **न्यायामध्यें** जगदीशी वगैरे; (१०) **योगामध्यें** हटयोगप्रदीपिकादिक; (११ **सांख्यग्रंथांमध्यें** सांख्यतत्वकौमुदि वगैरे; (१२) **वेदांतामध्यें** योगवासिष्ठ, पंचदशी इ०; (१३) **वैद्यकामध्यें** शार्ङ्गधरादिक; (१४) **स्मृतिग्रंथांमध्यें** मनुस्मृतींतील प्रक्षिप्त श्लोक व अन्य स्मृतिग्रंथ; (१५) सर्व तंत्रग्रंथ; (१६) सर्व पुराणें; (१७) सर्व उपपुराणें, (१८) तुळसीदासकृत भाषारामायण, रुक्मिणीमंगलादिक भाषाग्रंथ, हे सर्व कपोलकल्पित मिथ्याग्रंथ आहेत.

(**प्रश्न**) या वरील ग्रंथांत थोडेंही सत्य नाहीं काय ? (**उत्तर**) आहे. पण त्या स्वल्प सत्याबरोबर असत्याचा भाग त्यांत अतिशय आहे म्हणून विषयुक्त अन्नाप्रमाणें ते सर्व ग्रंथ त्याज्या होत. (**प्र०**) तुम्ही पुराणें व इतिहास यांना मानीत नाहीं काय ? (**उ०**) आम्ही सत्याला मानतों व मिथ्याला मानीत नाहीं. (**प्र०**) सत्य कोणतें व मिथ्या कोणतें ? (**उ०**) '**ब्राह्मणानीतिहासान्पुराणानि कल्पान्गाथानाराशंसीरिति.**' हें गृह्यसूत्रांतील वचन आहे. पूर्वी ऐतरेय, शतपथ इत्यादि ब्राह्मणग्रंथ सांगितले आहेत त्यांनाच इतिहास, पुराण, कल्प, गाथा व नाराशंसी हीं पांच नांवें आहेत. श्रीमद्भागवतादि ग्रंथांला पुराण हें नांव नाहीं. (**प्र०**) वरील त्याज्य ग्रंथांमध्यें जो जो सत्याचा अंश आहे त्याचें तुम्ही कां ग्रहण करीत नाहीं ? (**उ०**) जें जें सत्य या भागवतादि ग्रंथांत आहे तें वेदादि सत्यशास्त्रांतील आहे व जें असत्य आहे तें त्यांचें स्वतःचें आहे. आम्ही वेदाला प्रमाण मानतों तेव्हां आम्ही सर्व सत्याला मानतोंच, मग या असत्य-कथायुक्त ग्रंथांतून सत्य हुडकण्याची काय गरज आहे ? जर कोणी हे असत्य ग्रंथ शोधूं लागेल तर त्याच्या मनावर त्यांतील असत्याचा डाग लागल्याशिवाय राहाणार नाहीं. (**असत्यमिश्रं सत्यं दूरतस्त्याज्यम्**) असत्यमिश्रित सत्यहि सोडलेंच पाहिजे; कारण त्यापासून कोणताहि लाभ नाहीं. (**प्र०**) बरें जर पुराणें असत्य आहेत तर तुम्हीं कोणते ग्रंथ सत्य मानतां ? तुमचें मत काय ? (**उ०**) आम्ही वेदांना प्रमाण मानतों. वेदांमध्यें जें करावयाचें म्हणून सांगितलें आहे तें योग्य व ज्याचा निषेध सांगितला आहे तें अयोग्य असें आम्ही मानतों. ज्याअर्थी वेद आम्हाला मान्य आहेत त्याअर्थीं वेद हेंच आमचें मत आहे. वेदच प्रमाण मानून सर्वांनीं एकमतानें राहिले पाहिजे. (**प्र०**) अहो, जसा सत्यासत्याविषयीं अन्य ग्रंथांमध्यें विरोध आहे त्याचप्रमाणें तो सहा दर्शनांमध्येंहि आहे. पहा-मीमांसा कर्मापासून, वैशेषिक कालापासून, न्याय परमाणुपासून, योग पुरुषार्थापासून, सांख्य प्रकृतीपासून व वेदान्त ब्रह्मापासून सृष्टीची उत्पत्ति मानतात. हा विरोध नव्हे काय ? (**उ०**) सांख्य किंवा वेदान्त या दोन शास्त्रांशिवाय इतर चार शास्त्रांत स्पष्टपणें सृष्टीची उत्पत्ति सांगितलीच नाहीं व जो तुम्हीं विरोध दाखविला तो मुळींच विरोध नव्हे; कारण विरोध व अविरोध यांचें तुम्हांस ज्ञान नाही असें वाटते. आम्ही तुम्हांला असें विचारतों कीं, "विरोध एका विषयात होतो कीं

भिन्न भिन्न विषयांत ?' (प्र०) एका विषयांत अनेकांचें परस्परविरुद्ध कथन असलें तर त्यास विरोध असें म्हणतात. वरील सहाहि दर्शनांत सृष्टि हा एकच विषय आहे व त्यांत परस्परविरोध. आहे. नाहीं काय ? (उ०) पहा-विद्या जरी एक आहे तथापि व्याकरण, वैद्यक,ज्योतिष इत्यादि भिन्न भिन्न अवयवीभूत विषयांचें भिन्न भिन्न ग्रंथांमध्यें निरनिराळें प्रतिपादन आहे. म्हणून त्याला विरोध असें म्हणतां येणार नाहीं. सृष्टिविद्येविषयीं भिन्न भिन्न सहा शास्त्रांनीं प्रतिपादन केलें असल्यामुळें त्यांत परस्परविरोध मुळींच नाहीं. पहा, एक घट बनवावयाचा असतां त्याला (१) कर्म, (२) काल, (३) माति, (४) विचार, संयोग, वियोगादिक) पुरुषार्थ, (५) प्रकृतीचे गुण, व (६)कुंभार अशीं सहा कारणें लागतातच. याचप्रमाणें सृष्टीच्या **कर्म** या कारणाविषयीं मीमांसेमध्यें, **काला**विषयीं, वैशेषिकामध्यें उपादानकारण प्रकृति**परमाणू**विषयीं न्यायदर्शनामध्यें, **पुरुषार्था**विषयीं योगामध्यें, **तत्वांच्या** परिगणनाविषयीं सांख्यामध्यें व निमित्तकारण **परमेश्वरा**विषयीं वेदान्त दर्श-नामध्यें विस्तारानें सांगितलें आहे. यांमध्यें विरोध मुळींच नाहीं. ज्याप्रमाणें वैद्यशास्त्रामध्यें निदान, चिकित्सा, औषध-दान, पथ्य वगैरे भिन्न भिन्न प्रकरणें लिहिलेलीं असतात, पण सर्वांचा सिद्धांत रोगनिवारण हाच एक असतो, त्याच-प्रमाणें वरील षड्दर्शनांमध्यें जगताच्या एका एका कारणाची व्याख्या केलेली आहे; त्यामुळें त्यांत परस्परविरोध कोठेंहि नाहीं. याविषयीं जास्त पुढें, 'सृष्टिप्रकरणांत' लिहूं.

### (२० विघ्नें)

अध्ययनामध्यें विघ्नें येतील तीं सोडून द्यावीं व नेटानें अभ्यास करावा. (१) दुष्ट विषयी लोकांची संगति; (२) मद्यपान, वेश्यागमन, परस्त्रीगमन वगैरे व्यसनें; (३) पुरुषाचा पंचवीस वर्षापूर्वी व स्त्रीचा सोळा वर्षापूर्वी विवाह होणें; (४) ब्रह्मचर्याचें पालन न होणें; (५) राजा, माता, पिता, व विद्वान् यांचें वेदादि शास्त्रांच्या प्रचारामध्यें प्रेम नसणें; (६) अतिभोजन, अति-जागरण, इ० (७) शिकण्या शिकवण्याच्या अथवा परीक्षा देण्याघेण्याच्या वेळी आळस, कपट, वगैरे करणें; (८) विद्येपासूनच उत्कृष्ट लाभ होतो असें न मानणें; (९) ब्रह्मचर्यानें बल, बुद्धि, पराक्रम, आरोग्य, राज्य, धन, वगैरे मिळतात असें न मानणे; (१०) सर्वव्यापक ईश्वराला उपास्य देव न मानतां ईश्वराचें ठिकाणीं अन्य पाषणादि जड मूर्तींचें दर्शन व पूजन यांत कालक्षेप करणें; (११) माता, पिता, अतिथि आचार्य, व विद्वान् याच खऱ्या पूज्य मूर्ति आहेत असें मानून त्यांची सेवा व सत्संग न करणें; (१२) वर्णाश्रमधर्म सोडून ऊर्ध्वपुंड्र, त्रिपुंड्र, तिलक, कंठी, मालाधारण, एकादशी, त्रयोदशी इत्यादि व्रतें करणें; (१३) काशी आदिक तीर्थांच्या स्नानानें व राम, कृष्ण, नारायण, शिव, भगवती, गणेश इत्यादि नामोच्चारणानें पापें दूर होतात असें मानणें; (१४) पाखंडी लोकांवर विश्वास ठेवून विद्या शिकण्यांत अश्रद्धाळु होणें; (१५) विद्या, धर्म, योगाभ्यास, व परमेश्वरोपासना यांनीं मुक्ति होते असें न मानतां भागवतादिक भ्रामक ग्रंथांतील गोष्टी ऐकून मुक्ति होते असें मानणें; (१६) लोभानें धनप्राप्तीच्या पाठीमागें लागणें व विद्येमध्यें प्रीति न ठेवणें; (१७) इकडे तिकडे फिरून व्यर्थ कालक्षेप करणें, इत्यादि मिथ्या व्यवहारामध्यें फसून, लोक ब्रह्मचर्यापासून व विद्येपासून होणाऱ्या लाभांना मुकतात व त्यामुळें रोगी व मूर्ख होतात. म्हणून या विघ्नापासून दूर रहावें व विद्या शिकावी.

### (२१) वेदाध्यनाचा आधिकार

सध्यांचे सांप्रदायी व कांहीं स्वार्थी ब्राह्मण अज्ञानामुळें असें समजतात कीं, क्षत्रियादिक लोकांनीं विद्याव्यासंग करूं नये, जर त्यांनीं सत्संग व विद्याव्यासंग केला तर आमचें भ्रमजाल चालणार नाहीं व ते लोक आमचा अपमान करूं लागतील; म्हणून त्यांनीं वेदादिकांचें अध्ययनच करूं नये. अशारीतीनें हे लोक क्षत्रियादिकांना अज्ञानांत ठेवून त्याचें तन, मन व धन यांचा नाश करतात. हें त्यांस उचित नाहीं. म्हणून राजानें व प्रजेनें अशा लोकांचें न ऐकतां आपल्या मुलांना विद्वान् करण्यास तन, मन व धन या साधनांनीं झटावें. (प्रश्न) स्त्री व शूद्र यांस वेद पढण्याचा अधिकार आहे काय ? जर यांनीं वेद पढावयाचे तर मग आम्ही काय करावें ? **स्त्रीशूद्रौ नाधीयतामिति श्रुतः'** असे अनेक निषेध आहेत कीं, ज्याच्या योगानें स्त्री व शूद्र यांस वेदाचा अधिकार नाहीं असें ठरतें, त्याची वाट काय ? (उ०) सर्व स्त्रीपुरुषांना-मनुष्यमात्राला-वेद शिकण्याचा अधिकार आहे. तुम्हीं वर दिलेलें वाक्य श्रुतीमध्यें नाहीं म्हणून तें प्रमाण नाहीं. यजुर्वेदामध्यें सर्व मनुष्यांनीं वेद शिकावे म्हणून ते निर्माण केलें आहेत असें लिहिलें आहे. (**यथेमां वाचं कल्याणीमावदानि जनेभ्यः। ब्रह्मराजन्याभ्यां शूद्राय चार्याय च स्वाय चारणाय ॥ यजु०**

२६।२) 'परमेश्वर म्हणत आहे कीं ज्याप्रमाणें मी सर्व मनुष्यांसाठीं संसार व मुक्ति यांतील सुखें प्राप्त करून देणारी जी ऋग्वेदादि चारहि वेदरूपी वाणी आहे, तिचा सर्वांस उपदेश केला, त्याचप्रमाणें तुम्हीहि करावा. (या ठिकाणीं कोणी अशी शंका विचारील कीं स्मृतिग्रंथांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य या तीन वर्गांतील लोकांस वेदांचा अधिकार आहे असें सांगितलें आहे. पण शूद्रादिकांना तो कोठें आहे ? (उ०) परमेश्वर स्वतः म्हणतो कीं, मी (ब्रह्मराजन्याभ्याम्) ब्राह्मण, क्षत्रिय, (अर्याय) वैश्य, (शूद्राय) शूद्र (स्वाय) भृत्य, स्त्री इत्यादिक व (अरणाय) अतिशूद्रादिक यांच्यासाठीं या सर्वांसाठीं, वेदांचा प्रकाश केला आहे. म्हणून सर्वांनीं वेदांचें अध्ययन व अध्यापन करून आपलें ज्ञान वाढवावें. त्याचप्रमाणें वेदमंत्रार्थाचें श्रवण, मननहि सर्वांनीं करावें. सर्वांनीं चांगल्याचें ग्रहण व वाईटाचा त्याग करून, दुःखापासून मुक्त होऊन आनंदीत व्हावें. आतां सांगा बरें परमेश्वराचा उपदेश आम्ही मानावा कीं तुमचें मत ? परमेश्वराचा उपदेश अवश्य मानला पाहिजे. जर वेदांतील परमेश्वराचा उपदेश कोणी मानला नाहीं तर त्याला नास्तिक असें म्हणावें (**नास्तिको वेदनिन्दकः**) वेदांची निंदा करणारा, व त्यांना प्रमाण न मानणारा नास्तिक आहे असें समजावें. परमेश्वर शूद्रांचें हित व्हावें असें इच्छित नाहीं काय ? परमेश्वर पक्षपाती आहे काय कीं तो द्विजानींच वेद शिकावें व शूद्रांनीं शिकूं नये असें म्हणेल ? परमेश्वराचा अभिप्राय शूद्रांनीं शिकूं नये असा जर असता तर शूद्रांना त्यानें वागिन्द्रिय, कान वगैरे अवयव कशाला दिले असते ? परमेश्वरानें ज्याप्रमाणें पृथिवी, जल, अग्नि, वायु, चंद्र, सूर्य, अन्न, वगैरे पदार्थ सर्वांसाठीं केले आहेत त्याचप्रमाणें त्यानें वेद हेहि सर्वांसाठींच प्रसिद्ध केले आहेत. ज्या कोणत्या ग्रंथांत 'शूद्रांनीं वेद म्हणूं नये' असा निषेध केला असेल, तेथें त्याचा असा अभिप्राय समजावयाचा कीं, 'शिकलें व शिकविलें असतां ज्याला कांहींच ज्ञान होत नाहीं अशा निर्बुद्ध शूद्राला शिकविणें व्यर्थ आहे म्हणून त्यांना ते शिकवूं नयेत.' ज्यांना ज्ञानग्रहणशक्ति आहे अशा स्त्रीशूद्रांना न शिकविणे ही शिकविणाऱ्यांची मूर्खता, स्वार्थपरायणता व निर्बुद्धिता आहे असें समजावें. (**ब्रह्मचर्येण कन्या युवानं विन्दते पतिम्** ॥ अथर्व० ११।२४।३।१८) '(कन्या) कुमारिका (ब्रह्मचर्येण) ब्रह्मचर्यसेवन करून व वेदादि शास्त्रें शिकून, पूर्ण विदुषी होऊन, सुशिक्षित बनून आपल्या युवावस्थेमध्यें स्वसदृश विद्वान् (युवानम्) व पूर्ण युवावस्थेला प्राप्त झालेल्या (पतिम्) पतिला (विन्दते) मिळवते.' तात्पर्य ब्रह्मचर्यसेवन करून, पूर्ण विद्या व सुशिक्षा यांना प्राप्त करून घेऊन विदुषी, कुमारिका स्वसदृश पूर्ण ब्रह्मचर्य धारण केलेल्या व विद्वान् पतीशीं विवाह करतात. अर्थात् स्त्रियांनाहि मुलांप्रमाणेंच ब्रह्मचर्य व विद्याध्ययन यांची आवश्यकता आहे. (**प्रश्न**) स्त्रियांनींहि वेद शिकावे ? (**उत्तर**) अवश्य शिकावे. (**इमं मन्त्रं पत्नी पठेत्** । श्रौत सूत्रम्) 'स्त्रीनें यज्ञामध्यें हा मंत्र म्हणावा' असें श्रौतसूत्रांत लिहिलेलें आहे. जर वेदादि शास्त्रांचा अभ्यास तिनें केला नसेल तर यज्ञामध्यें तिला स्वरसहित मंत्रांचें उच्चारण कसें करतां येईल ? पूर्वी वेदादि शास्त्रांचा अभ्यास करून गार्गी वगैरे स्त्रिया महान् विदुषी झाल्या होत्या असा शतपथ ब्राह्मणांत स्पष्ट उल्लेख केलेला आहे. शिवाय पुरुष विद्वान् व स्त्री अविदुषी किंवा स्त्री विदुषी व पुरुष अविद्वान् असला तर त्या स्त्रीपुरुषांमध्यें नित्य देवासुरसंग्राम होऊन त्या घरांत कशाचेहि सुख होणार नाहीं. स्त्रिया सुशिक्षित नसल्या तर कन्यापाठशालांमध्यें अध्यापिकांच्या जागीं कोणाची योजना करणार ? म्हणून स्त्रियांना अवश्य सुशिक्षण दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें राज्यप्रबंध, न्यायाधीशत्वादि राजकार्यें सुशिक्षित पुरुष असल्याशिवाय होणार नाहींत म्हणून पुरुषहि सुशिक्षित असले पाहिजेत. गृहस्थाश्रमांतील कार्यें पति स्त्रीशीं व स्त्री पतीशीं जर प्रसन्न असली तरच निर्विघ्न पार पडतील. नाहीं तर नाहीं घरांतील सर्व कामांची व्यवस्था बायकांकडेच असते, तेव्हां त्या सुशिक्षित नसल्या तर तीहि व्यवस्था नीट राहणार नाहीं. यासाठीं स्त्रीपुरुष सर्व सुशिक्षित असलेच पाहिजेत.

या आर्यावर्तातील प्राचीन स्त्रिया धनुर्वेदांत-युद्धविद्येमध्येंहि निष्णात होत्या. कैकेयीसारख्या स्त्रिया राजा दशरथाबरोबर समरभूमींमध्यें जाऊन साहाय्य करीत असत. ब्राह्मणांच्या व क्षत्रियांच्या स्त्रियांना सर्व विद्या आल्या पाहिजेत, वैश्यांच्या स्त्रियांना सर्व व्यवहारविद्या, व शूद्रस्त्रियांना पाकादिक सेवाविद्या अवश्य आल्या पाहिजेत. ज्याप्रमाणें

पुरुषांना व्याकरण, न्याय, धर्म व इतर व्यवहारविद्या आल्याच पाहिजेत, त्याचप्रमाणें स्त्रियांनाहि व्याकरण, धर्म, वैद्यक, गणित, शिल्पविद्या, पाकविद्या इत्यादि अवश्य आल्याच पाहिजेत. कारण विद्येवाचून सत्यासत्यनिर्णय, पतीशीं अनुकूल वर्तन, संतानाची यथायोग्य व्यवस्था करणें, त्यांचें योग्य पालनपोषण करणें, घरांतील सर्व कार्यें यथायोग्य करणें, घरांतील सामान्य औषधोपचार करणें, ऋतुमानपरत्वें यथायोग्य अन्नपान करणें किंवा करविणें, वैद्यशास्त्राच्या ज्ञानावांचून घरांतील माणसांचें आरोग्य राखणें व त्यांस आनंदित ठेवणें, शिल्पविद्येवांचून घरांतील टापटीप, वस्त्रादिक आभरणें करणें किंवा करविणें, गणितज्ञानावांचून हिशोब ठेवणें, किंवा दुसऱ्यास सांगणें, व वेदादिशास्त्रांच्या ज्ञानांवाचून धर्म जाणून त्याप्रमाणें आचरण करणें व अधर्माच्या बाजूलाहि न जाणें या गोष्टी घरामध्यें स्त्रियांना करतां येणार नाहींत. त्याचप्रमाणें पुरुषहि शास्त्राध्ययनावाचून उत्तम व्यवहार करूं शकणार नाहींत. ह्मणून सर्वांनीं आपल्या मुलांना व मुलींना ब्रह्मचर्य पाळावयास लावावें व त्यांना सुशिक्षित करावें; ब्रह्मचर्य, सुशिक्षण व विद्या यांच्या योगानें त्याचें शरीर, बुद्धि व आत्मा यांमध्यें बल उत्पन्न करावें. असें करणारीं जीं आईबापें आसतील तींच धन्य होत. मुलांना असें शिक्षण द्यावें कीं, ज्या योगानें तीं माता, पिता, पति, सासू, श्वशुर, स्त्री, राजा, प्रजा, नातलग, शेजारी, इष्टमित्र व सन्तान यांच्याशीं धर्माप्रमाणें योग्य रीतीनें वागतील. विद्या हा अविनाशी कोश आहे. जितका याचा व्यय करावा तितका तो वाढतो. अन्य खजिने खर्च केल्यानें संपतात व त्यांना चोरांची व वारसांची भीति असते; पण विद्या ही दान केल्यानें वाढते व चोर व वारस यांपासून तिला मुळींच भीति नाहीं. या विद्यारूपी धनाची वाढ व रक्षण करणार जसा राजा आहे त्याचप्रमाणें प्रजाहि आहे.

**कन्यानां संप्रदानं च कुमाराणां च रक्षणम् ॥** मनु० ७।१५२ ॥

कुमार व कुमारिका यांना पूर्वोक्त समयापासून ब्रह्मचर्य पाळावयास लावणें व त्यांना विद्वान् करणें हें राजाचें कर्तव्य आहे. ही राजाज्ञा जो मोडील त्या मातापित्यांना राजानें दंड करणें योग्य आहे. आठ वर्षानंतर मुलामुलींना घरीं ठेवूं नये. त्यांना राजा परधर्मी असल्यामुळें जर गुरुकुलें स्थापन करण्याचें काम त्याचे कडून होत नाहींतर लोकसमूहानें आपस्यात व्यवस्थितपणें संघशक्ति तयार करून विद्यावृद्धिकरितां ठिकठिकानीं गुरुकुलें स्थापन करण्याचा निर्बन्ध करा. आचार्यकुलामध्यें पाठवून द्यावें व तेथेंच समावर्तनसंस्काराचा समय होईपर्यंत ठेवावें व तोंपर्यंत कोणाचा विवाह करूं नये. हें सर्व लोकांनीं करावें किंवा राजानें करवावें.

**सर्वेषामेव दानानां ब्रह्मदानं विशिष्यते । वार्यन्नगोमहीवासस्तिलकांचनसर्पिषाम् ॥** मनु० ४।२२३ ॥

( अर्थ ) जल, अन्न, गाय, पृथ्वी, वस्त्र, तिल, सुवर्ण, व घृत इत्यादि सर्व इतर दानांपेक्षां (वेद) विद्यादानाचें श्रेष्ठत्व अतिशय आहे. म्हणुन विद्या वृद्धीसाठीं शक्य तेवढा प्रयत्न, तन, मन, व धन यांच्या सहाय्यानें करावा. ज्या देशांत ब्रह्मचर्य, विद्याज्ञान, व वेदोक्तकर्म यांचा प्रचार होतो तो देश सौभाग्ययुक्त होतो. या प्रकरणांत ब्रह्मचर्या-विषयीं संक्षेपानें वर्णन दिले आहे. पुढें चवथ्या समुल्लासांत समावर्तन व गृहस्थाश्रम या विषयीं लिहिण्यांत येईल.

**इति सुभाषाविभूषितो बालशिक्षाविषयः तृतीयः समुल्लासः सम्पूर्णः ।**

# अथ चतुर्थसमुल्लासः

**अथ समावर्त्तनविवाहगृहाश्रमविधिं वक्ष्यामः ॥**

**वेदानधीत्य वेदौ वा वेदं वापि यथाक्रमम् । अविप्लुतब्रह्मचर्यो गृहस्थाश्रममाविशेत् ॥** मनु० ३।२ ॥

(अर्थ) गुरुकुलांत ब्रह्मचर्यानें राहून, आचार्याच्या अनुकूल वर्तन करून, चार, तीन, दोन किंवा एक वेदाचें सांगोपांग अध्ययन करून, जो पूर्ण ब्रह्मचारी राहिला असेल अर्थात् त्याचें ब्रह्मचर्य भ्रष्ट झाले नसेल त्याच पुरुषानें (किंवा त्याच स्त्रीनें) गृहस्थाश्रमामध्यें प्रवेश करावा.

**तं प्रतीतं स्वधर्मेण ब्रह्मदायहरं पितुः । स्रग्विणं तल्प आसीनमर्हयेत् प्रथमं गवा ॥** मनु० ३।३ ॥

*(अर्थ) जो स्वधर्मानें युक्त आहे, ज्यानें पिता किंवा गुरु यांच्यापासून विद्या ग्रहण केली आहे, व जो माला धारण* करून आपल्या पलंगावर बसलेला आहे, अशा शिष्याचा सत्कार, पिता, आचार्य इत्यादि लोकांनीं गोप्रदान करून करावा. त्याचप्रमाणें वरील लक्षणांनीं युक्त असणाऱ्या विद्यार्थिनींचाहि तिच्या पित्यानें गोप्रदान करून सत्कार करावा.

**गुरुणानुमतः स्नात्वा समावृत्तो यथाविधि । उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्विताम् ॥** मनु० ३।४ ॥

(अर्थ) गुरुची आज्ञा घेऊन, व्रतस्नान करून, गुरुकुलांतून घरीं यावें व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या द्विजांनीं आपल्या वर्णानुकुल सुंदर लक्षणांनी युक्त असणाऱ्या कन्येशीं विवाह करावा.

**असपिण्डा च या मातुरसगोत्रा च या पितुः । सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुने ॥** मनु० ३।५.

(अर्थ) जी कन्या मातेच्या सहा पिढ्यांमध्यें येत नसेल, अर्थात् जी मातेशीं सपिंडा नसेल व जी पित्याच्या गोत्रांतील नसेल, त्या कन्येशीं द्विजांनीं विवाह करावा. याला कारणें अनेक आहेत. (**परोक्षप्रिया इव हि देवाः प्रत्यक्षद्विषः** शतपथ०) विद्वानाला परोक्ष वस्तु विशेष प्रिय असते हा नियम सार्वत्रिक आहे. मनुष्यमात्राची जशी परोक्षपदार्थावर प्रीति असते त्याप्रमाणें प्रत्यक्ष पदार्थावर नसते. ज्या गोष्टीचे गुण आपण ऐकलेले असतील ती प्रत्यक्ष व्हावी असें वारंवार वाटत असतें; पण जी वस्तु जवळ असते तिच्यासंबंधानें मनामध्यें तितकी उत्कंठा नसते. यास्तव सपिंडांत व स्वगोत्रांत न येणाऱ्या कन्येशीं विवाह केल्यानें पुढील लाभ होतात.

(१) जीं बालकें बाल्यावस्थेपासून एकत्र राहिलेलीं असतात, जवळ राहिल्यामुळे ज्यांच्यांत लहानपणापासून प्रेम व द्वेष शहिजे आहेत, ज्यामध्यें खेळ, भांडणें किंवा बाल्यावस्थेंत विपरीत आचरण झालेलें असते, व ज्यांनीं एकमेकांस उघडें नागवें पाहिलेले असते त्या स्त्रीपुरुषांमध्यें विवाह झाला तर त्यांच्यांत परस्पर प्रेम उत्पन्न होत नाहीं. पण तींच जर दूरचीं असलीं तर त्यांच्यांत परस्पर प्रेम उत्पन्न होऊं शकते. (२) ज्याप्रमाणें पाण्यांत पाणी मिसळल्यानें कांहीं विशेष गुण उत्पन्न होत नाहीं, त्याचप्रमाणें सपिंडा व सगोत्रांत विवाह केल्यानें संततीमध्यें विशेष गुण उत्पन्न होत नाहींत. (३) ज्याप्रमाणें दुधामध्यें मिश्री वगैरे औषधी मिसळल्यानें फार उत्तम गुण त्या मिश्रणांत उत्पन्न होतात त्याचप्रमाणें भिन्न कुल व भिन्न गोत्रांतील मुलीशीं विवाह केल्यानें फार लाभ होतात. (४) ज्यामाणें एका देशांत असलेला रोगी दुसऱ्या देशांत व दुसऱ्या हवेंत गेल्यावर चांगला निरोगी होतो, त्याचप्रमाणें दूरदेशस्थांचा अन्यगोत्रोत्पन्नांशीं विवाह केल्यानें उत्तम लाभ होतो. (५) विवाहित स्त्रीपुरुषांची घरें जवळ असल्यानें भांडण, तंटे, विरोध व दुःख एकमेकांत होण्याचा संभव जास्त आहे. तसा दूर असणाऱ्यांमध्यें नाहीं. त्याचप्रमाणें दूर देशीं असणाऱ्यासंबंधी लोकांमध्यें प्रेमहि वाढत्या प्रमाणावर असतें तसें जवळ असणाऱ्यामध्यें नसतें. (६) दूर देशांतील मुलीशीं विवाह केल्यानें त्या देशांतील लोकांशीं संबंध जडतो व त्यामुळें त्या देशांतील वर्तमान समजतें व तद्देशीय पदार्थहि प्राप्त होतात. जवळच्या लोकांशीं संबंध झाल्यानें हा लाभ होत नाहीं. मुलीला 'दुहिता' असें म्हणतात; तें

यासाठींच होय. ( दुहिता दुर्हिता दूरेहिता दोग्धेर्वा ॥ निरु० ३।४ ) कन्येचा दूर देशांतील वराशीं विवाह झाल्यानें फार हित होतें म्हणून तिला दुहिता असें म्हणतात. (७) घर जवळ असलें तर कन्या बापाच्या घरीं वारंवार येईल व प्रत्येक खेपेस बापाच्या घरांतील कांहीं तरी पदार्थ घेऊन जाईल; अशा अनेक प्रकारांनीं बापाला दारिद्रय येण्याचा संभव आहे, म्हणून विवाह दूर देशस्थाशीं झालेला चांगला. (८) स्त्रीचें माहेर जवळ असल्यानें तिला आपल्या माहेरच्या माणसाबद्दल जास्त घमेंड होईल व पतीच्या घरीं थोडेंसें कांहीं निमित्त झालें कीं तेथें भांडण करून ती माहेरीं चालती होईल. व सासऱ्याची पर्वा करणार नाहीं, यामुळें व आणखी अनेक कारणांनीं दोनहि कुलांमध्यें वितुष्ट येण्याचा फार संभव आहे. म्हणून दूरदेशांतील मुलीशीं व त्याप्रमाणें असपिंडा व असगोत्र अशा मुलीशींच विवाह करावा. तसेंच—

**महान्त्यपि समृद्धानि गोऽजाविधनधान्यतः । स्त्रीसम्बन्धे दशैतानि कुलानि परिवर्जयेत् ॥** मनु० ३।६.

**हीनक्रियं निष्पुरुषं निश्छन्दो रोमशार्शसम् । क्षय्यामयाव्यपस्मारिश्वित्रिकुष्ठिकुलानि च ॥** मनु० ३।७.

( अर्थ ) धन, धान्य, गाई, बकरीं, हत्ती, घोडे इत्यादि पदार्थांच्या योगानें कुलें कितीहि श्रीमंत असलीं तरी सदाचारहीन, ज्यांत सत्पुरुष नाहींत, वेदाध्ययनरहित, ज्याच्या शरीरावर केश फार आहेत, ज्याज्या कुलांत क्षय, दमा, आमरोग, अपस्मार, श्वेतकुष्ट, गलितकुष्ट हे रोग आहेत, अशादहा कुलांतील कन्येशीं किंवा वराशीं विवाह करूं नये. कारण अशा कुलांतील कन्या किंवा वर यांशीं विवाह करण्यानें ते ते रोग स्वकुलांत उत्पन्न होतात; म्हणून नेहमीं उत्तम कुलांतील कन्या किंवा पुत्र यांशींच विवाह करावा तसेंच.

**नोद्वहेत्कपिलां कन्यां नाधिकाङ्गीं न रोगिणीम् । नालोमिकां नातिलोमां न वाचाटां न पिङ्गलाम् ॥** मनु० ३।८.

**नक्षत्रवृक्षनदीनाम्नीं नान्त्यपर्वतनामिकाम् । न पक्ष्यहिप्रेष्यनाम्नीं न च भीषणनामिकाम् ॥** मनु० ३।९.

**अव्यङ्गाङ्गीं सौम्यनाम्नीं हंसवारणगामिनीम् । तनुलोमकेशदशनां मृद्वङ्गीमुद्वहेत्स्त्रियम् ॥** मनु० ३।१०.

(अर्थ) रंगानें पिवळी, पुरुषापेक्षां अधिक लठ्ठ, उंच किंवा बलिष्ट, रोगी, केशरहित किंवा जिच्या सर्व शरिरावर केश आहेत अशी, बडबडणारी व पिंगट डोळयांची अशा स्त्रीशीं विवाह करूं नये. रोहिणीदेवी, रेवतीबाई इत्यादि नक्षत्रांचीं नांवें; तुलसी, गुलाबी, चंपा वगैरे वृक्षांचीं नांवें; गंगा, यमुना वगैरे नद्यांचीं नांवें; चांडाली इत्यादि अंत्य-वर्णाचीं नांवें; हिमालय, पार्वती, विंध्या वगैरे पर्वतांचीं नांवें; मैना, कोकिला वगैरे पक्ष्यांचीं नांवें; नागुबाई, भुजंगी इत्यादि सर्पांचीं नांवें; दासांचीं नांवें चण्डिका, काली, इत्यादि भितीदायक नांवें ज्यांचीं असतील, अशा कन्यांशीं विवाह करूं नये. परंतु जिचे सर्व अवयव सप्रमाण व सरळ आहेत, नांव चांगलें सुन्दर आहे, जिची चालचालणूक हंस व हत्तीप्रमाणें आहे, जिचे लोम, केश व दांत सूक्ष्म आहेत व जिचें अंग कोमल आहे अशा कन्येशी विवाह करावा.

## विवाहाचा समय कोणता ?

सोळाव्या वर्षापासून चोवीस वर्षापर्यंत कन्येचें लग्न करावें व पंचविसाव्या वर्षापासून अठ्ठेचाळीसाव्या वर्षापर्यंत पुरुषांचें लग्न करावें. चोवीस वर्षाच्या स्त्रीनें अठ्ठेचालीस वर्षाच्या पुरुषांशीं विवाह करणें उत्तम, अठरा वर्षाच्या स्त्रीन पस्तीस वर्षाच्या पुरुषाशी विवाह करणें मध्यम; व सोळा वर्षाच्या स्त्रीनें पंचत्रीस वर्षाच्या पुरुषाशीं विवाह करणें कनिष्ठ होय. (यापेक्षां कमी वयांत विवाह करणें हीनतर आहे असें समजावें.) ज्या देशांत याप्रमाणें श्रेष्ठ प्रौढ विवाह होतात व विद्याभ्यास आणि ब्रह्मचर्य यांविषयीं जास्त प्रेम रहातें त्या देशांतील मनुष्यें सुखी असतात, ज्या देशांतील लोक ब्रह्मचर्य पाळीत नाहींत, विद्याभ्यास करीत नाहींत व बाल्यावस्थेंत विवाह करतात तो देश दुःखामध्यें बुडून जातो; कारण ब्रह्मचर्य व विद्याभ्यास यावरच लोकांचीं सर्व सुखें अवलंबून आहेत. (प्रश्न) अहो, आपण वयाची इयत्ता फार वाढविली ! पाराशरी प्रमाणें मुलीचा विवाह आठव्या वर्षी करावा लागतो. पहा—

**अष्टवर्षा भवेद् गौरी नववर्षा च रोहिणी । दशवर्षा भवेत्कन्या तत ऊर्ध्वं रजस्वला ॥**

**माता चैव पिता तस्या ज्येष्ठो भ्राता तथैव च । त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम् ॥**

हे श्लोक पाराशरी व शीघ्रबोध इत्यादि ग्रंथांत आहेत. यांचा अर्थ 'मुलीला आठव्या वर्षी गौरी; नवव्या वर्षी रोहिणी. दहाव्या वर्षी कन्या व यापुढें रजस्वला म्हणतात.' दहाव्या वर्षापर्यंत जे आईबाप मुलीचे लग्न करीत नाहींत व

दहा वर्षानंतर अविवाहित स्थितींत तिला पाहतात तें नरकांत जातात' असा आहे. या श्लोकांच्या आधारानें विवाहकाल तर अगदीं बालपणींच येतो, मग तुम्हीं म्हणतां तें खरें कशावरून ? (**उत्तर**) अहो, तुम्ही म्हणतां त्याचप्रमाणें आणखीहि दोन श्लोक आहेत ते आधीं पहा.—

**ब्रह्मोवाच-एकक्षणा भवेद्गौरी द्विक्षणेयन्तु रोहिणी । त्रिक्षणा सा भवेत्कन्या ह्यत ऊर्ध्वं रजस्वला ॥**
**माता पिता तथा भ्राता मातुलो भगिनी स्वका । सर्वे ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम् ॥**

हे सद्योनिर्मित ब्रह्मपुराणांतर्गत वचन आहे. परमाणूला स्वतःच्या आंसाभोवतीं फिरण्यास जेवढा वेळ लागतो त्याला 'क्षण' असें म्हणतात. 'मुलगी जन्मल्याबरोबर पहिल्या क्षणीं गौरी, दुसऱ्या क्षणीं रोहिणी, तिसऱ्या क्षणीं कन्या व यापुढें रजस्वला होते. तीन क्षणानंतर जे आई, बाप, भाऊ, मामा, बहीण या मुलीला अविवाहित स्थितींत पाहतात ते नरकांत जातात.' या श्लोकांवरून तर विवाहकाल जन्मल्याबरोबरच प्राप्त झाला. हे श्लोक खरे कीं तुमचे खरे ? (**प्रश्न**) तुमचे श्लोक प्रमाण नाहींत, आम्ही दिलेलेच प्रमाणभूत आहेत. (**उत्तर**) कां प्रमाण नाहींत ? जर ब्रह्मदेवानें सांगितलेले श्लोक प्रमाण नाहींत तर तुमचेहि प्रमाण नाहींत. (**प्रश्न**) काय पाराशरीचे व काशिनाथशास्त्रीबुवांचे श्लोक तुम्ही प्रमाण मानीत नाहीं ? (**उत्तर**) तुम्ही ब्रह्मदेवाच्या श्लोकांना प्रमाण मानीत नाहींत व पाराशरी त्यापेक्षां जास्त प्रमाण मानतां ! ज्या अर्थी तुम्ही ब्रह्मदेवाचे श्लोक प्रमाण मानीत नाहीं त्या अर्थी आम्ही पाराशरीचेहि प्रमाण मानीत नाहीं. (**प्रश्न**) तुमचे श्लोक असंभवनीय असल्या कारणानें प्रमाण मानतां येत नाहींत. जन्मतांच जरी विवाहाची तयारी केली तथापि हजारों क्षण व्यतीत होणार चार क्षणांमध्येंच विवाह व्हावा तरी कसा ? व तसा विवाह करण्यापासून लाभ तरी काय ? (**उत्तर**) जर आमचे श्लोक असंभवनीय आहेत तर तुमचेहि तसेच आहेत. दहा वर्षापूर्वी विवाह करून तरी लाभ काय ? पहा, सोळा वर्षानंतर स्त्रीच्या गर्भाशयाची वाढ पुरी होते व शरीर बलयुक्त होतें. त्याचप्रमाणें पुरुषाचें शरीर वाढून चोवीस वर्षानंतर पूर्ण होतें व वीर्य परिपक्क व बलिष्ठ होतें. आठव्या वर्षी कन्येच्या ठिकाणीं संतानोत्पत्ति होणें असंभव आहे.*

ज्याप्रमाणें अकालीं-अकराव्या वर्षी-मुलीला रजस्वला मानणें हें अप्रयोजक आहे. त्याचप्रमाणें सर्वांना सरसकट गौरी व रोहिणी अशीं नांवें देणें हेंहि फार अयोग्य आहे. महादेवाच्या स्त्रीला गौरी व वसुदेवाच्या स्त्रीला रोहिणी अशीं नावें आहेत. पौराणिक लोक यांना आपल्या माता असें समजत असूनहि प्रत्येक मुलीला त्यांची नावें देऊन त्यांच्याशीं विवाह करणें कसें बरें धार्मिक होईल ? जर हीं नांवें शारिरीक गुणांवरून आहेत म्हणावें तर एखाद्या काळया मुलीला 'गौरी' असें कसें म्हणतां येईल ? हे सर्व श्लोक आपमतलबी लोकांनीं रचलेलें आहेत. ज्याप्रमाणें आम्ही पुर्वी दिलेले श्लोक ब्रह्माच्या नांवावर लादले आहेत त्याचप्रमाणें तुमचेहि श्लोक कोणी पाराशराच्या नांवावर लादले आहेत यांत शंका नाहीं. कारण—

**त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती । उर्ध्वं तु कालादेतस्माद् विन्देत सदृशं पतिम् ॥** मनु० ९।९०.

(**अर्थ**) कन्या ऋतुमती झाल्यानंतर तिला योग्य पति मिळावा म्हणून तीन वर्षेपर्यंत योग्य वराचा शोध करून नंतर योग्य पतीशीं तिचा विवाह करून द्यावा. प्रतिमासाला एक वेळ याप्रमाणें तीन वर्षांतील छत्तीस महिन्यांमध्यें

---

* धन्वंतरीनें सुश्रुतांत म्हटलें आहे कीं—

**ऊनषोडशवर्षायामप्राप्तः पंचविंशतिम् । यद्याधत्ते पुमान् गर्भं कुक्षिस्थः स विपद्यते ॥**
**जातो वा न चिरंजीवेत् जीवेद्वा दुर्बलेंद्रियः । तस्मादत्यन्तबालायां गर्भाधानं न कारयेत् ॥**

सुश्रुत शारीरस्थाने अ० १० श्लोक ४७।४८.

(**अर्थ**) जर सोळा वर्षांहून कमी वयाच्या स्त्रीच्या ठिकाणीं, पंचवीस वर्षांहून कमी वयाच्या पुरुषाकडून गर्भ राहिला तर तो पतन पावतो व जर तो जगला तर अगदींच रोगी व अशक्त असा होतो. म्हणून लहानपणीं विवाह होणें इष्ट नाहीं

छत्तीस वेळ रजोदर्शन झाल्यावर कन्या विवाह करण्यास योग्य होते. एवढेंच नव्हें; तर

**काममामरणतिष्ठेद् गृहे कन्युर्त्तुमत्यपि । न चैवेनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित ।** मनु० ९।८९.

(**अर्थ**) पाहिजे तर मुलींनीं घरीं मरेपर्यंत अविवाहित रहावें, पण कांहीं झालें तरीं गुणकर्मस्वभाव यांनीं विरुद्ध व अयोग्य असणाऱ्या मुलांशीं केव्हांहि विवाह करूं नये। यावरून इतकें ठरलें कीं, बालपणीं विवाह करूं नये व अयोग्य स्त्रीपुरुषांमध्यें विवाह होऊं नये.

(**प्रश्न**) विवाह करणें मातापित्यांच्या आधीन असावें कीं, वधुवरांच्या आधीन असावे ? (**उत्तर**) विवाह करणें वधूवरांच्या स्वाधीन असणें चांगलें. मायापित्यांच्या मनांत जर आपल्या मुलामुलींचा विवाह करावयाचें असेल तर त्यांच्या सल्यानें करावा, पण त्यांच्यावर जुलूम करूं नये. वधूवरांमध्यें प्रेम वृद्धिंगत झालें पाहिजे. तें कधींहि जबरीनें होणार नाहीं. वधूवरें जर अप्रसन्न असली तर संतानहि अशक्त उत्पन्न होतें. विवाहमध्यें वधूवरांचा संबंध मुख्य आहे तसा मातापित्यांचा नाहीं. जर त्यामध्यें प्रसन्नता असली तरच ती सुखी होतील, नाहींतर त्यांच्या दुःखास पारावार नाहींसा होईल. पहा—

**संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैवच । यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥** मनु० ३।६०

(**अर्थ**) ज्या कुलांमधील स्त्री व पुरुष सदोदित प्रसन्न असतात, त्या कुलामध्यें आनंद, लक्ष्मी व कीर्ति सदैव निवास करतात. व ज्याठिकाणी स्त्रीपुरुषांमध्यें कलह वास करतो, त्यां कुलामध्यें दुःख, दारिद्रय, व निंदा यांचे वास्तव्य असतें. यासाठीं पूर्वापार चालत आलेली स्वयंवर पद्धतीच अम्मलांत आणणें उत्तम होय. जेव्हां स्त्रीपुरुष विवाह करूं इच्छितील, तेव्हां त्यांनीं विद्या, विनय, शील, रूप, आयु, बल, कुल व शरीर यांचें यथायोग्य प्रमाण पाहून विवाह करावा. या वरील गुणांमध्यें वधूवरांची परीक्षा करून त्यांचा विवाह होणें उत्तम. विजोड वधूवरांमध्यें विवाह होण्यापासून कांहींएक फायदा नाहीं; त्याचप्रमाणें बालपणीं विवाह करणेंहि घातकच आहे. पहा—

**युवाः सुवासाः परिवीत आगात् स उ श्रेयान् भवति जायमानः । तं धीरासः कवय उन्नयन्ति स्वाध्यो मनसा देवयन्तः ॥१॥** [ऋ. मं. ३।८।४] **आधेनवो धुनयन्तामशिश्वीः शबर्दुधाः शशया अप्रदुग्धाः ॥ नव्यानव्या युवतयो भवन्तीर्महद् देवानामसुरत्वमेकम् ॥२॥** (ऋ. मं. ३।५५।१६) **पूर्वीरहं शरदः शश्रमाणा दोषावस्तोरुषसो जरयन्तीः । मिनाति श्रियं जरिमा तनूनामप्यू नु पत्नीर्वृषणो जगम्युः ॥३॥** [ऋ. मं. १।१७९।१]

(**अर्थ**) जो पुरुष (परिवीत) यज्ञोपवीत धारण केलेला, पूर्ण ब्रह्मचर्य सेवन करून उत्तम विद्या शिकलेला (सुवासाः) सुन्दर शरीर व सुन्दर वस्त्र धारण करणारा, ब्रह्मचर्यानें युक्त, (युवा) तरुण असा जो पुरुष विद्या पूर्णपणें ग्रहण करून गृहस्थाश्रमामध्यें (आगात्) येतो, ( स उ ) तोच खरोखर या दुसऱ्या-विद्येचें ठिकाणीं झालेल्या जन्मामध्यें (जायमानः) प्रसिद्ध होऊन (श्रेयान्) मंगलयुक्त (भवति) होतो, व त्याचें कल्याण होतें. (स्वाध्यः) उत्तम ध्यानानें युक्त असणाऱ्या (मनसा) विज्ञानाच्या योगानें (देवयन्तः) विद्यावृद्धीची कामना धारण करणारे (धीरासः) धैर्यवान् (कवयः) विद्वान् लोक (तम्) त्या पुरुषाला (उन्नयन्ति) उन्नतीनें युक्त समजून मान देतात, व त्याची प्रतिष्ठा वाढवितात; पण जो पुरुष ब्रह्मचर्य धारण करीत नाहीं, उत्तम विद्या व सुशिक्षण यांचे ग्रहण करीत नाहीं व बालपणीं विवाह करतो, त्या स्त्रीपुरुषांचा नाश होतो व विद्वानांमध्यें त्यांना मान मिळत नाहीं.

( अप्रदुग्धाः ) कधींहि न दोहन केलेल्या (धेनवः) गाईप्रमाणें पूर्ण ब्रह्मचारिणी असणाऱ्या, (अशिश्वी) बाल्यावस्थेला सोडून तारुण्य प्राप्त झालेल्या, (शबर्दुघाः) सर्व प्रकारच्या उत्तम व्यवहारांला जाणणाऱ्या व सांगणाऱ्या (शशयाः) कौमर्याचें उल्लंघण करणाऱ्या, (नव्यानव्याः) नवीन नवीन शिक्षण व अवस्था ज्यांना प्राप्त झालेल्या आहेत अशा (भवन्तीः) व (युवतयः) पूर्ण युवावस्थेमध्यें असणाऱ्या स्त्रिया (देवानाम्) ब्रह्मचर्य व उत्तम नियम यांचे पालन करून विद्वान् बनलेल्या पुरुषापासून [ एकम् ] एका [ महत् ] महान् [ असुरत्वम् ] प्रज्ञाशास्त्रांच्या उत्तम शिक्षेला प्राप्त होऊन, तरुण पतीला प्राप्त होतात व [ आधुनयन्ताम् ] त्यांपासून गर्भ धारण करतात. चुकून सुद्धां

स्त्रियांनीं बालपणीं मनानेंहि पुरुषांचें ध्यान करूं नये. असें केल्यानेंच इहपरलोकीं सुख प्राप्त होतें. बालविवाहाच्या योगानें जितकें नुकसान पुरुषांचें होतें त्यापेक्षां स्त्रियांचें नुकसान फार होतें. म्हणून नेहमी प्रौढविवाह करावा.

ज्याप्राणें (नु) शीघ्र (शश्रमाणाः) अत्यंत श्रम करणारे-पुरुषार्थ करणारे-(वृषणः) वीर्यसिंचन करण्यास समर्थ, असणारे पूर्ण युवावस्थेमध्यें असणारे पुरुष (पत्नीः) मनोहर दिसणाऱ्या व यौवनामध्ये असणाऱ्या स्त्रियांना (जगम्युः) प्राप्त होऊन, पूर्ण शंभर वर्षें किंवा याहिपेक्षां जास्त आयुषाचा आनंदानें उपभोग घेऊन पुत्रपौत्रादिकांसह सुखानें राहातात. त्याचप्रमाणें इतर स्त्रीपुरुषांनींहि सदोदित रहावें. तसेंच (पूर्वीः) पूर्वी व हल्लीं असणारे (शरदः) शरद् ऋतु व (उषसः) प्रभातकाळच्या वेळा (जरयन्तीः) ज्याप्रमाणें वृद्धावस्थेला प्राप्त करितात व नाहींसेहि करितात, किंव (दोषा) रात्री व (वस्तोः) दिवस हे ज्याप्रमाणें (तनूनाम्) शरीराच्या (श्रियम्) शोभेची (जरिमा) अतिशय वृद्धि करवितात किंवा शरीरशोभेला दूर करवितात त्यचप्रमाणें (अहम्) मी-स्त्री किंवा पुरुष-(उ) चांगल्याप्रकारें निश्चयानें ब्रह्मचर्याचें पालन करून, उत्तम विद्या व सुशिक्षा प्राप्त करून घेऊन शरीर व आत्मा यांचें बल वाढवून, तारुण्य प्राप्त झाल्यावरच विवाह करीन तरच मला सुख मिळेल; व जर आम्ही याच्या विरुद्ध वागलों व विवाह केला तर तें आचरण वेदाच्या विरुद्ध असल्यामुळें आम्हाला दुःखदायकच होईल. ॥ ३ ॥

याप्रमाणें जोंपर्यंत सर्व ऋषीमुनी, राजेमहाराजे व इतर आर्यलोक हे ब्रह्मचर्य पालन करून, विद्या पूर्णपणें शिकून, यौवनदशेमध्येंच विवाह करीत होते, तोंपर्यंत हा देश उन्नतावस्थेमध्यें होता; पण जेव्हांपासून ब्रह्मचर्याकडे दुर्लक्ष, विद्येचा अभाव व पराधीन अशा बाल्यावस्थेमध्येंच आईबाप लहान अर्भकाचा विवाह करूं लागले तेव्हांपासून या आर्यावर्त देशाला अवनति लागलेली दिसते. म्हणून सर्व सज्जनांनीं हे बालविवाहादिक दुष्ट आचार सोडून, पूर्वीप्रमाणेंच प्रौढपणीं स्वयंवर करण्याची पद्धत सुरू करावी.

विवाह सवर्ण कन्येशीं व्हावा व वर्णव्यवस्था गुण, कर्म व स्वभाव यांच्यावरून ठरवावी. [प्रश्न] ब्राह्मण मातापित्यापासून मुलगा होतो तोहि ब्राह्मणच होतो हें आम्ही जाणतो; पण तुम्ही म्हणतां कीं गुणकर्मावरून वर्ण ठरवावे, हें कसें ? एका वर्णाच्या स्त्रीपुरुषांपासून अन्य वर्णाची उत्पत्ति होते कीं काय ? अन्य वर्णाच्या आईबापांपासून कधींतरी ब्राह्मण उत्पन्न होईल काय ? [उत्तर] होय, होतात. पूर्वीहि पुष्कळ झाले आहेत, सध्यां होत आहेत व पुढेंहि होतील. छांदोग्य उपनिषदामध्यें अज्ञातकुल जाबाल, क्षत्रिय कुलांत उत्पन्न झालेला विश्वामित्र, व चांडाल कुलांत उत्पन्न झालेला मातंग ऋषि हे सर्व ब्राह्मण झाले. सध्यांहि तुमच्यांत जे उत्तम विद्या, स्वभाव, व आचरण यांनीं युक्त असतील ते ब्राह्मणच होत व जे मूर्ख दुराचारी असतील ते शूद्र होत. याचप्रमाणें भविष्यकालींहि ज्ञानी लोक मानणार. (प्रश्न) जें शरीर ज्या वर्णाच्या रजोवीर्यापासून उत्पन्न झालें आहे तें बदलून तेथें दुसरा वर्ण कसा बरें उत्पन्न होईल ? (उत्तर) रजोवीर्याच्या योगानें ब्राह्मणशरीर होत नाहीं पहा.

**स्वाध्यायेन जपैर्होमैस्त्रैविद्येनेज्यया सुतैः । महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः ॥** मनु० २।२८.

[अर्थ] ' (स्वाध्यायेन ) अध्ययन व अध्यापन, (जपैः) विचार करणें व करविणें, नानाप्रकारचें होम करणें, संपूर्ण वेद, शब्द, अर्थ, संबंध, व स्वरोच्चारसहित शिकणें व शिकविणें, (इज्यया) पौर्णिमासेष्टि वगैरे करणें, [ सुतैः ] पूर्वोक्त विधिपूर्वक सन्तानोत्पत्ति करणें, (महायज्ञैश्च) ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, वैश्वदेव, व अतिथियज्ञ करणें (यज्ञैः) अग्निष्टोमादि यज्ञ, विद्वानांचा सत्कार, संगति, सत्यभाषण, व परोपकार करणें, संपूर्ण शिल्पविद्या शिकणें व शिकविणें, आणि दुष्टाचार सोडून श्रेष्ठाचाराप्रमाणें वर्तन करणें ह्या आचारांच्या योगानें [इयम्] हें (तनुः) शरीर [ब्राह्मीयम्] ब्राह्मणवर्णाचें [ क्रियते ] केलें जातें' हें मनूचें मत आहे व तें तुम्हाला मान्य आहे, असें असतांहि तुम्ही केवळ रजोवीर्याच्या योगानेंच वर्णव्यवस्था कां मानतां ? गुणकर्मस्वभावानुसार वर्ण मानणें हीच ऋषीपरंपरेनें आलेली व्यवस्था आहे. (प्रश्न) काय तुम्ही परंपरेचेंहि खंडन करणार ? [उत्तर] नाहीं. आर्षपरंपरा आम्ही मानतों पण तुमची कल्पित व उलटी व्यवस्था मानीत नाहीं. [ प्रश्न ] आमची उलटी व तुमची व्यवस्था सरळ आहे याला प्रमाण काय ? (उत्तर) आमचें मत सृष्टीच्या प्रारंभापासून चालत आलेल्या वैदिक परंपरेप्रमाणें आहे व तुमचे पांच सात

पिढ्यांत कोणी तरी उपस्थित केलें आहे. यावरून तुमचें उलट व आमचें मत सरळ आहे असें ठरतें. जर आई-बापाप्रमाणेंच संतान उत्पन्न होत असतें, तर सज्जनाला दुर्जनपुत्र, दुर्जनाच्या पोटीं सज्जनाची उत्पत्ति अशा तऱ्हेची स्थिति केव्हांहि दिसली नसती. ही स्थिति प्रत्यक्ष पहात असूनहि तुम्ही भ्रमांत पडत आहांत हे आश्चर्य आहे. पहा मनूनें काय म्हटलें आहे—

**येनास्य पितरो याता येन याताः पितामहाः । तेन यायात्सतां मार्गं तेन गच्छन्न रिष्यते ।।** मनु० ४।१७८.

ज्या मार्गानें आईबाप, आजेपणजे गेले असतील त्या मार्गानें मुलानें जावें, मात्र तो ( सताम् ) सज्जनांचा मार्ग असला पाहिजे. सज्जन वाडवडील ज्या मार्गानें गेले असतील त्या मार्गानें जावें, पण त्यांचें आचरण जर वाईट असेल तर त्याचा अवलंब करूं नये. धर्मात्मे व सज्जन यांच्याप्रमाणें आचरण केलें असतां कधींहि दुःख प्राप्त होत नाहीं हें सर्व जाणतात. त्याचप्रमाणें वेदामध्यें सांगितलेला धर्म तेवढाच सनातन असून, वेदाज्ञेच्या विरुद्ध असलेला धर्म कधींहि सनातन होऊं शकत नाहीं, हेंहि सर्वप्रसिद्ध आहे. जे लोक या धर्माला मानीत नसतील त्यांनीं आपला पिता दरिद्री असला तर दारिद्र्यांत राहून मिळालेली संपत्ति खुशाल फेकून द्यावी. ज्याप्रमाणें पिता दरिद्री, आंधळा व कुकर्मी असला तर मुलानेंहि दरिद्री, अंध व कुकर्मी झालें पाहिजे असें नाहीं, तद्वतच वर्णव्यवस्थेसंबंधानें आहे. ज्या पुरुषांमध्यें जे उत्तम गुण असतील त्या गुणांची वाढ करून घेऊन दुष्ट गुणांचा त्याग करणें हें सर्वांस योग्य आहे. जे कोणी रजोवीर्याच्या आधारानें वर्णव्यवस्था मानीत असतील त्यांना असा प्रश्न विचारावा कीं, जो आपला वैदिक धर्म सोडून ख्रिस्ती किंवा मुसलमान होतो. त्यांचे धर्मांतर झाल्यावरहि पूर्ववर्ण कायम रहातो कीं काय ? धर्मांतर केल्याबरोबर रजोवीर्याचें शरीर बदलत नाहीं; असें असतांहि वैदिक कर्में सोडल्यामुळें त्याच्या ठिकाणीं पूर्व ब्राह्मणादि वर्णाचा लोप झाला असें सर्व मानतात. यावरून हें सिद्ध होतें कीं, उत्तम गुणकर्मांच्या योगानेंच ब्राह्मणादि वर्ण मानले जातात व नीच गुणकर्मांच्या योगानेंच शूद्रवर्ण मानला जातो. अर्थात् नीच कुलांत उत्पन्न झाला तरीहि जर तो उत्तम गुण, कर्म व स्वभाव यांनीं युक्त असेल तर त्याला ब्राह्मण समजावें व उत्तम कुलांत उत्पन्न होऊन जो हीन कर्मे करतो त्याची नीच वर्णांत गणना करावी.

**ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहू राजन्यः कृतः । ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ।।** यजु० ३१।११.

**(प्रश्न)** 'परमेश्वराच्या तोंडापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, ऊरूंपासून वैश्य व पायांपासून शूद्र उत्पन्न झाले, असें वेदांत म्हटलें आहे. ज्याप्रमाणें मुख बाहू होत नाहींत व बाहू मुख होऊं शकत नाहीं त्याचप्रमाणें ब्राह्मणाचें क्षत्रिय होऊं शकत नाहींत व क्षत्रियांचे ब्राह्मणहि होऊं शकत नाहींत; असें असतांहि तुम्ही गुणकर्मावरून वर्ण कसें मानतां ? **(उत्तर)** वरील **'ब्राह्मणोस्य'** या मंत्राचा तुम्ही केलेला अर्थ बरोबर नाहीं. कारण त्या मंत्रांत **'पुरुष'** या शब्दाची पूर्व मंत्रांतून अनुवृत्ति आहे. **'पुरुष'** शब्दाचा अर्थ 'सर्वव्यापक, निराकार परमेश्वर' असा आहे निराकाराला मुखादि अवयव असूं शकत नाहींत व ज्याला मुखादि अवयव आहेत तो **'पुरुष'** अर्थात् सर्वव्यापक असूं शकणार नाहीं. ( **यः पुरि जगति शेते सर्वं व्याप्नोति सः पुरुषः** ) परमेश्वर सर्वव्यापक असल्यामुळेंच त्याला ' **पुरुष** ' असें म्हणतात व तो निराकार असल्यामुळेंच सर्वत्र व्याप्त आहे. साकार वस्तु सर्वव्यापक होऊं शकत नाहीं. अर्थात् साकारपदार्थ सर्वव्यापक, सर्वशक्तिमान्, जगताचा उत्पादक, धारक व प्रलयकर्ता, जीवांच्या पापपुण्याची व्यवस्था करणारा, सर्वज्ञ, अजन्मा, मृत्युरहित असा होऊं शकत नाहीं. हीं विशेषणें निराकार परमेश्वरालाच लागूं शकतात. म्हणून मंत्राचा अर्थ पुढें लिहिल्याप्रमाणें होतो—**(अस्य)** या सर्वव्यापक परमेश्वराचा सृष्टीमध्यें मुखाप्रमाणें जो सर्वांत मुख्य व उत्तम गुणयुक्त असेल तो [ ब्राह्मणः ] ब्राह्मण होय. [**बाहुर्वै बलं बाहुर्वै वीर्यम्** । शतपथे ] बल व वीर्य यांना 'बाहु' असें म्हणतात बल व वीर्य यांमध्यें जो अधिक असतो तो [राजन्यः] क्षत्रिय समजावा. **(उरू)** कंबरेच्या खालचा भाग व जानूच्या वरचा भाग याला 'उरू' म्हणतात. उरूंच्या बलानें जो सर्व देशदेशांतरीं व्यापारासाठीं जातो व तेथें उत्तम व्यापार करून परत येतो त्याला **(वैश्यः)** वैश्य असें म्हणतात. व [पद्भ्याम्] नीचेंद्रिय जे पाय त्याप्रमाणें जो नीच असतो—म्हणजे मूर्खत्वादि गुणानीं युक्त, बुद्धिरहीत, केवळ श्रम करणारा असतो—त्याला शूद्र

असें म्हणतात. इत्यादि शतपथादि-ब्राह्मणग्रंथांमध्यें या मंत्राचा असाच अर्थ केला आहे. [**यस्मादेते मुख्यास्तस्मान्मुखतो ह्यसृज्यन्त**] ज्या अर्थी हे मुख्य आहेत त्या अर्थी ते मुखापासून उत्पन्न झाले असें म्हटलें आहे व हें म्हणणें सयुक्तिकहि आहे. ज्याप्रमाणें मुख हें श्रेष्ठ आहे त्याचप्रमाणें मनुष्यांमध्यें जो पूर्ण विद्वान् व उत्तम गुणकर्मस्वभावानें युक्त असतो त्याला 'ब्राह्मण' असें म्हणतात. परमेश्वर निराकार असल्यामुळें त्याच्या मुखापासून ब्राह्मण उत्पन्न झाले हें म्हणणें सर्वथा असंभवनीय आहे. हें वंध्यास्त्रीला पुत्र झाला असें म्हणण्याप्रमाणें निर्मूल आहे. जर मुखापासून ब्राह्मणाची उत्पत्ति झाली तर मुखाप्रमाणेंच गोलगोल ब्राह्मणाचें शरीर असतें, कारण उपादान कारणाचे गुण कार्यामध्यें येतात. याचप्रमाणें क्षत्रियांचें शरीर बाहूंप्रमाणें, वैश्यांचें उरूंप्रमाणें व शूद्राचें पायाप्रमाणें असलें पाहिजे होतें. पण असें असलेलें दिसत नाहीं. बरें, जे मुखापासून उत्पन्न झाले होते त्यांची ब्राह्मण ही संज्ञा आहे असें जे कोणी म्हणत असतील त्यांना सांगावें कीं, ज्या अर्थी तुम्हीं गर्भाशयांतून उत्पन्न होत आहांत व मुखापासून नाहीं त्या अर्थी तुम्ही ब्राह्मण नव्हे.' असो. वरील मंत्रांचा जो आम्ही अर्थ केला त्याचप्रमाणें शतपथांतहि आहे व त्याच आधारावरून मनुमध्येंहि पुढचा श्लोक आलेला आहे:—

**शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम् । क्षत्रियाज्जातमेवन्तु विद्याद्वैश्यात्तथैव च ॥** मनु. १०।६५.

(**अर्थ**) शूद्र कुलांत उत्पन्न होऊनहि ज्यांच्या अंगीं ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य यांच्याप्रमाणें गुण, कर्म, व स्वभाव असतील ते ब्राह्मण, क्षत्रिय, किंवा वैश्य आहेत असें समजावें. त्याचप्रमाणें जो ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्यांच्या कुलांत उत्पन्न होऊन त्या त्या वर्णाप्रमाणें गुणकर्मस्वभावानें युक्त नसेल व शूद्राचे गुणकर्मस्वभाव त्याच्या अंगीं असतील तर त्याला शूद्र असें समजावें. त्याचप्रमाणें क्षत्रिय व वैश्य कुलांत उत्पन्न झालेल्या संबंधानें समजावें. अर्थात् या कुलांत उत्पन्न झालेलेहि अन्य गुणकर्मानें युक्त असले तर अन्य वर्णाला प्राप्त होतात. अर्थात् ज्या मनुष्याच्या अंगी जे गुण-कर्म-स्वभाव असतील त्याप्रमाणें त्याचा वर्ण समजावा. तसेंच—

**धर्मचर्यया जघन्यो वर्णः पूर्वं पूर्वं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ ॥१॥**
**अधर्मचर्यया पूर्वो वर्णो जघन्यं जघन्यं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ ॥२॥** आप. ध. सू.

(**अर्थ**) धर्माप्रमाणें आचरण करून निकृष्ट वर्णात उत्पन्न झालेला मनुष्य उच्च वर्णात जाऊ शकतो व अधर्माचरणानें उत्तम वर्णांतील मनुष्य हीन वर्णाचा होतो. ज्याप्रमाणें गुणकर्मस्वभावानें युक्त असणाऱ्या पुरुषांचे ते ते वर्ण समजावयाचे त्याचप्रमाणें स्त्रियांचेहि समजावें. असें झाल्यानें सर्व वर्ण आपआपल्या गुणकर्मस्वभावानें युक्त होऊन शुद्ध राहतील व ब्राह्मणांमध्यें क्षत्रिय, वैश्य व शूद्रासारखे पुरुष दिसणार नाहींत, व क्षत्रिय वैश्य व शूद्र हे वर्णहि शुद्ध राहतील व त्यांच्यांत वर्णसंकर होणार नाहीं. असे सर्व वर्ण शुद्ध असले म्हणजे कोणत्याहि वर्णाची निंदा होणार नाहीं व त्याचा अयोग्यपणाहि दिसणार नाहीं.

(**प्रश्न**) समजा कीं, एकाला एकच मुलगा किंवा मुलगी आहे व ती आपल्या म्हणण्याप्रमाणें गुणकर्म स्वभावानें अन्य वर्णाची ठरली तर तिचा अन्य वर्णांमध्यें प्रवेश होणार, मग या आईबापांची सेवा कोणीं करावी ? व वंशच्छेद झाल्यासारखें होणार त्याची वाट काय ? (**उत्तर**) सेवाभंग किंवा वंशच्छेद होण्याची मुळींच भीति नाहीं, कारण विद्यासभा व राजसभा या दोन सभांच्या व्यवस्थेनें ज्यांना त्यांना आपल्या असवर्ण मुलामुलींबद्दल स्ववर्णाला योग्य असे मुलगे किंवा अशा मुली मिळणार. पूर्वोक्त दोन सभांच्या व्यवस्थेनें कांहींहि अव्यवस्था होणार नाहीं. गुणकर्मस्वभावावरून जो वर्ण ठरवावयाचा तो कन्यांचा सोळाव्या वर्षीं व पुत्रांचा पंचविसाव्या वर्षीं परीक्षा करून निश्चय करावा. अशा प्रमाणें वर्ण निश्चय झाल्यावर ब्राह्मणाशीं ब्राह्मणणीचा, क्षत्रियाशीं क्षत्रियेचा, वैश्याशी वैश्येचा व शूद्राशीं शूद्रीचा विवाह करावा. असे सवर्ण विवाह झाले तरच स्त्रीपुरुषामध्यें परस्पर प्रीति योग्य प्रकारें राहील. या चार वर्णांचीं कर्तव्यें व गुण पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

### ब्राह्मणांचे गुण, कर्मे व स्वभाव

**अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा । दानं प्रतिग्रहश्चैव ब्राह्मणानामकल्पयत् ।।** मनु. १।८८.

**शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।।** भ. गी. १८।४२.

**(अर्थ)** शिकणें, शिकविणें, यज्ञ करणें व करविणें, दान देणें व घेणें हीं सहा ब्राह्मणाची कर्मे आहेत. यांत **(परिग्रहः प्रत्यवरः ।** मनु.) दान घेणें हें अत्यंत नीच कर्म आहे असें मनूनेंच पुढें सांगितलें आहे. तसेंच (शमः) मनामध्यें वाईट कामाची इच्छा केव्हांहि न आणणें व त्याला दुराचरणामध्यें केव्हांहि प्रवृत्त न करणें, (दमः) श्रोत्रादि इंद्रियांना अन्यायाचारापासून परावृत्त करून धर्ममार्गानें चालविणें, (तपः) सदा ब्रह्मचारी व जितेंद्रिय होऊन धर्मानुष्ठान करणें, (शौचम्) बाह्य व अभ्यंतर पवित्रता, [पान ३२ वरील मनु. ५।१०९ हा श्लोक पहा.] (क्षान्तिः) निंदा, स्तुति, सुख, दुःख, शीतोष्ण, क्षुधा, तृषा, हानि, लाभ, मानापमान, हर्ष, शोक इत्यादिकांचा त्याग करणें व धर्मामध्यें दृढ निश्चय ठेवणें, (आर्जवम्) कोमलता निरभिमानता, सरलता व सरळ स्वभाव धरणें, कौटिल्यादि दोष सोडणें, (ज्ञानम्) वेदादि शास्त्रें सांगोपांग शिकून तीं दुसऱ्यास शिकवण्याचें सामर्थ्य अंगीं आणणें, विवेक वाढविणें, सत्याचा निर्णय करता येणें जी वस्तु जशी असेल तशीच जाणून सांगणें म्हणजेच जडाला जड मानणें व चेतनाला चेतन मानणें, (विज्ञानम्) पृथिवीपासून परमेश्वरापर्यंत असणाऱ्या सर्व पदार्थांना पूर्णपणें जाणून त्या सर्वांचा यथायोग्य उपयोग करणें, (आस्तिक्यम्) वेद, ईश्वर, पूर्वजन्म, पुढचा जन्म, धर्म, विद्या, सत्संग, माता, पिता, आचार्य व अतिथि यांवर केव्हांहि अविश्वास न दाखविणें, त्यांची निंदा न करतां सेवा करण्यास जे योग्य आहेत त्यांची सेवा करणें, हे पंधरा ब्राह्मणाचे गुण, कर्म व स्वभाव आहेत.

### क्षत्रियांचे गुण, कर्मे व स्वभाव

**प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च । विषयेष्वप्रसक्तिश्च क्षत्रियस्य समासतः ।।** मनु. १।८९.

**शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् । दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ।।** भ. गी. १८।४३.

(अर्थ) न्यायानें प्रजेचें रक्षण करणें, पक्षपात सोडून श्रेष्ठांचा सत्कार व दुष्टांचा तिरस्कार करणें, सर्व प्रकारें सर्वांचें पालन करणें, (दानम्) विद्या, धर्मप्रवृत्ति, व सत्पात्रसेवा यांसाठीं धनादि पदार्थांचा व्यय करणें (इज्या) अग्निहोत्रादि यज्ञ करणें, (अध्ययनम्) वेदादि शास्त्रें शिकणें, (विषयेषु अप्रसक्तिः) विषयांमध्यें न फसतां, जितेंद्रिय होऊन सदोदित शरीर व आत्मा यांचें बल वाढविणें, (शौर्यम्) हजारों मनुष्यांशीं युद्ध करीत असतांहि भयभीत न होणें, (तेजः) सदा तेजस्वी, दीनतारहित, व प्रगल्भतायुक्त राहणें, (धृतिः) धैर्य न खचवणें, (दाक्ष्यम्) राजा व प्रजा या संबंधाच्या कर्तव्यामध्यें व सर्व शास्त्रांमध्यें अत्यंत चतुर असणें, (युध्दे अपलायनम्) युद्धांमध्यें दृढतेनें निःशंक राहून, केव्हाहि पळून न जाणें, अर्थात् पूर्ण विजय मिळेल अशा रीतीनें लढणें, पळण्यानें किंवा शत्रुला धोका देऊन, हुलकावणी दाखवून जर आपलें हित होत असेल तर तसें करणें, (दानम्) दानशील असणें, (ईश्वरभावः) पक्षपातरहित होऊन सर्वांबरोबर यथायोग्य वर्तन करणें, विचार करून देणें, प्रतिज्ञा पुरी करणें व वचनभंग कधींहि न करणें. हे अकरा गुण, कर्म व स्वभाव क्षत्रियाचे आहेत.

### वैश्याचे गुण कर्मे व स्वभाव

**पशूनां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च । वणिक्पथं कुसीदं च वैश्यस्य कृषिमेव च ।।** मनु. १।९० ।।

(अर्थ) [पशुरक्षणम्] गाई, बैल, वगैरे पशूचें पालन व वर्धन करणें, [दानम्] विद्या व धर्म यांची वृद्धि करण्यासाठीं धनादि पदार्थांचा व्यय करणें, [इज्या] अग्निहोत्रादि यज्ञ करणें, [अध्ययनम्] वेदादि शास्त्रांचें अध्ययन करणें [वणिक्पथं] सर्व प्रकारचा व्यापार करणें, [कुसीदम्] व्याजबट्टा करणें, पण एका शेंकड्याला चार, सहा, आठ, बारा, सोळा, किंवा वीस आणे यांपेक्षां अधिक व्याज न घेणें व मुद्दलाच्या दुप्पटीपेक्षां जास्त रकम शेंकडों वर्षांनींहि न घेणें आणि [कृषिम्] शेती करणें, हे वैश्याचे गुण, कर्म, व स्वभाव आहेत.

### शूद्राचे गुण कर्मे व स्वभाव

**एकमेव तु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत् । एतेषामेव वर्णानां शुश्रूषामनसूयया ।।** मनु. १।९१ ।।

**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ।।** गीता १८।४४।

**(अर्थ)** शूद्रानें निंदा, ईर्ष्या, अभिमान आदिक दोष सोडून ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य यांची **सेवा** योग्य प्रकारें करावी व तीवरच त्यानें आपला निर्वाह करावा. हें एकच शूद्राचें कार्म आहे व तदनुरूपच त्याच्या अंगीं गुण व **स्वभाव असतात.**

याप्रमाणें संक्षेपानें चारहि वर्णांचे गुण, कर्म व स्वभाव लिहिले आहेत. ज्या ज्या पुरुषामध्यें जे जे गुण दिसतील त्या त्या मानानें त्याचा वर्ण समजावा. अशारीतीनें गुणकमर्वारून वर्णव्यवस्था पूर्वीप्रमाणें मानीत गेल्यास मनुष्य लवकरच उन्नतीनें युक्त होईल. कारण त्यापासून उत्तम वर्णाला भीति उत्पन्न होईल कीं, जर आपलीं मुलें मूर्ख निघालीं तर तीं शूद्रांत गणलीं जातील. व मुलानांहि भीति वाटेल कीं, जर आपण दुर्वर्तन केलें तर आमचा उत्तम वर्ण जाऊन आम्हांला हीनवर्ण प्राप्त होईल. व नीच वर्णातील लोकांना उत्तम वर्णयुक्त होण्यास उत्साह येईल. विद्या व धर्मप्रसार यांचें काम पूर्णपणें ब्राह्मणांकडे असावें; कारण ते विद्वान् व धार्मिक असल्यानें तीं कामें उत्तम रीतीनें चालवूं शकतात. क्षत्रियांकडे राज्याचा अधिकार पूर्णपणें असावा, कारण तेच युद्धादि विद्या जाणत असल्यानें राज्याचें रक्षण करूं शकतात. पशुपालनादि अधिकार वैश्यांजवळ असावे. कारण ले तें काम उत्तम प्रकारें करूं शकतात. शूद्र मूर्ख असल्यानें त्यांजकडून विद्येसंबंधीं जीं जीं करावयाचीं कामें असतात तीं तीं होऊं शकत नाहींत म्हणून त्यांना सेवा करण्याशिवाय दुसरें कोणतेंहि काम देणें उचित नाहीं, त्यांजकडून अंगमेहनतीचें काम करवून घ्यावें. या प्रमाणें चारहि वर्णांना आपआपल्या कर्मांमध्यें प्रवृत्त करणें हे राजा व सभ्यजन यांचें काम आहे.

### विवाहाचे प्रकार व लक्षणें

**ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथाऽसुरः । गान्धर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥** मनु. ३।२१.

विवाहाचे आठ प्रकार आहेत. ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस व पैशाच. (१) **ब्राह्मः**–वधू व वर हीं दोनहि पूर्ण ब्रह्मचर्यानें, विद्वत्तेनें धार्मिकतेनें व सुशीलतेनें युक्त असून, त्यांचा परस्पर प्रसन्नतापूर्वक जो **विवाह** होतो त्याला **'ब्राह्म'** असें म्हणतात. (२) **दैवः**–विस्तृत यज्ञ करीत असतां ऋत्विजाचें काम करणाऱ्या विद्वानाला **अलंकार**-युक्त कन्या देणें याला **'दैव'** विवाह असें म्हणतात. (३) **आर्षः**–वराकडून कांहीं घेऊन मुलीचा विवाह करणें हा **'आर्ष'** विवाह समजावा. (४) **प्राजापत्यः**–केवळ धर्मवृद्धिसाठीं वधूवरांचा विवाह होणें हा **'प्राजापत्य'** होय. (५) **आसुरः**–वर व कन्या यांना कांहीं देऊन जबरदस्तीनें त्यांचा विवाह होणें 'हा**आसुर**' विवाह समजावा. (६) **गांधर्वः**–नियम व समय याला सोडून कांहीं आकस्मिक कारणांनीं वर व कन्या यांचा इच्छापूर्वक संयोग होणें हा **'गांधर्व'** विवाह **होय.** (७) **राक्षसः**–लढाई करून, बलात्कारानें किंवा कपटानें कन्येचें ग्रहण करून जो विवाह केला जातो तो **'राक्षस'** विवाह **होय.** (८) **पैशाचः**–निजलेल्या किंवा मद्य पिऊन गुंग झालेल्या कन्येला बलात्कारानें संयुक्त करणें हा **'पैशाच'** विवाह समजावा. यामध्यें ब्राह्म विवाह सर्वोत्कृष्ट, दैव व प्राजापत्य मध्यम, आर्ष, आसुर व गांधर्व हे तीन निकृष्ट व राक्षस आणि पैशाच हे महाभ्रष्ट आहेत असें समजावें.

विवाह होण्यापूर्वीं कन्या व वर यांची एकांतांत गांठ पडूं नये, कारण यौवनावस्थेमध्यें अविवाहित स्त्रीपुरुष एकान्तात असणें फार दूषणावह आहे. पण जेव्हां वर व कन्या यांच्या विवाहाचा वेळ जवळ येईल अर्थात् जेव्हां दोघांचाहि ब्रह्मचर्याश्रम व विद्याभ्यास संपण्यास सहा महिने किंवा एक वर्षाचा अवकाश असेल, तेव्हां कन्या व कुमार यांचीं चित्रें काढून कन्येचें चित्र व तिचें जीवनवृत्त कुमाराच्या अध्यापकाकडे पाठवावें व कुमाराचें चित्र व त्याचें जीवनवृत्त कन्येच्या अध्यापिकेकडे पाठवावें. ज्या कुमाराचें स्वरूप व ज्याचे जीवनवृत्तांतील गुण ज्या कन्येशीं जुळतील तिच्याशीं त्याचा विवाह करण्याचें ठरवावें. व त्याप्रमाणें कन्या व कुमार यांना परस्परांचें चित्र व जीवनवृत्त दाखवावें व त्यांचें मत विचारावें. जर त्या दोघांच्याहि मनांत परस्पर विवाह करावयाचा असेल तर दोघांचा समावर्तन संस्कार एकवेळीं करावा. जर त्यांचीं इच्छा अध्यापकांचे समक्ष विवाह करण्याची असेल तर तसें करावें किंवा आपल्या आईबापांच्या घरीं विवाह करणें असल्यास तसें करावें. अध्यापक, आईबाप व इतर भद्र पुरुष यांच्या समक्ष या विवाहेच्छु स्त्रीपुरुषांनीं एकमेकांस काय प्रश्न करावयाचे ते करावे, शास्त्रार्थ करावा किंवा कांहीं गुप्त गोष्ट विचारावयाची असेल तर लिहून विचारावी. जेव्हां अशा तऱ्हेनें परस्परांचें विवाह करण्याविषयीं प्रेम दृढ होईल, व विवाह करण्याचा निश्चय होईल तेव्हांपासून त्यांच्या खाण्यापिण्याचा उत्तम बंदोबस्त ठेवावा. पूर्वीं ब्रह्मचर्यामध्यें असतांना विद्याप्राप्तिरूपीं तप करून झालेल्या कष्टांच्या योगानें क्षीणलेलें शरीर चंद्राच्या कलेप्रमाणें थोड्याच दिवसांत वाढून पुष्ट होईल अशी खाण्यापिण्याची व्यवस्था असावी. नंतर ती कन्या रजस्वला होऊन शुद्ध झाल्यावरवेदी व मंडप रचून, त्या ठिकाणीं

अनेक सुगंध्यादि द्रव्यांचा व घृतादिकांचा होम करून, त्या मंडपामध्यें अनेक विद्वान् स्त्रीपुरुषांचा सत्कार करावा. नंतर जो दिवस ऋतुदान देण्यास योग्य असेल त्या दिवशीं *'संस्कारविधि' या ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें सर्व कर्मे करून मध्यरात्रीच्या समयीं किंवा रात्रीचे दहा वाजण्याच्या सुमारास, सर्वासमक्ष पाणिग्रहणपूर्वक विवाहाचा विधि पुरा केल्यानंतर, अतिशय प्रसन्नतापूर्वक एकान्त सेवन करावा. वीर्यस्थापनाच्या विधिप्रमाणें पुरुषानें व वीर्याकर्षणाच्या विधिप्रमाणें स्त्रीनें आचारण करावें. ब्रह्मचर्यानें प्राप्त झालेल्या वीर्याचा व्यर्थ व्यय करूं नये. अशा पूर्ण ब्रह्मचर्यानें युक्त असणाऱ्या स्त्रीपुरुषापासून जें संतान उत्पन्न होतें तें फारच उत्तम असतें. वीर्य गर्भाशयामध्यें स्खलन होण्याच्या वेळीं स्त्रीपुरुषांनीं अत्यंत प्रसन्न व सरळ रहावें. शरीरामध्यें तेढेपणा असूं नये. पुरुषानें आपलें शरीर ढिलें करावें व स्त्रीनें वीर्यप्राप्तींच्या समयीं अपान वायूला वर खेंचून, योनीचा वर संकोच करून, वीर्याचें वर आकर्षण करावें व त्याला गर्भाशयांत स्थिर करावें. नंतर दोघांनींहि शुद्ध पाण्याचें स्नान करावें. गर्भ धारण झाला कीं नाहीं हें चतुर स्त्री तेव्हांच जाणूं शकते, पण सामान्य स्त्रिया पुढच्या महिन्यांत रजोदर्शन न झाल्यावरून गर्भधारण झालें असें म्हणतात, नंतर स्त्रीपुरुषांनीं दूध गरम करून, त्यांत सुंठ, केशर, असगंध, इलाची सालममिश्रि मिसळून, तें थंड झाल्यावर यथाभिरुचि पिऊन पृथक् शय्येवर शयन करावें. जेव्हां जेव्हां गर्भाधान केलें जाईल तेव्हां तेव्हां असें करणें योग्य आहे. एक महिन्यानंतर रजस्वला न झाल्यानें जेव्हां गर्भधारणा झाली अशी पक्की खात्री होईल तेव्हांपासून एक वर्षपर्यंत स्त्रीपुरुषांनीं समागम करूं नये. अशा रीतीनें ब्रह्मचारी राहिल्यानें दुसरें संतानहि उत्तम बलवान् उत्पन्न होईल. नाहींतर वीर्य फुकट घालवण्यानें दोघांचें आयुष्य कमी कमी होऊन संतानेंहि अशक्त होतात व सर्व रोगग्रस्त होतात. दोघांनीं भाषणें प्रेमयुक्त करावीं पण समागम करूं नये. पुरुषानें वीर्य रक्षण करावें व स्त्रीनें गर्भरक्षण करावें. भोजनाच्छादनांची अशी व्यवस्था करावी कीं ज्याच्या योगानें पुरुषाचें स्वप्नामध्येंहि वीर्यस्खलन होऊं नये व स्त्रीच्या गर्भामध्यें बालकाचें शरीर अत्युत्तम लावण्ययुक्त, पुष्ट, बलवान्, पराक्रमयुक्त बनून दहाव्या महिन्यांत त्याचा जन्म व्हावा. चौथ्या महिन्यानंतर व विशेषतः आठव्यानंतर गर्भाला फार जपले पाहिजे. गर्भवतीस्त्रीनें रेचक, रुक्ष, मादक व बलनाशक असले पदार्थ भक्षणकरूंनयेत. दूध, तूप, उत्तम तांदूळ, गहूं, मूग, उडीद इत्यादि पदार्थ देशकालाचा विचार करून भक्षण करावें. गर्भाच्या चवथ्या महिन्यांत **'पुंसवन'** व आठव्या महिन्यांत **'सीमन्तोन्नयन'** हे संस्कार विधिप्रमाणें करावे.

जेव्हां बालकाचा जन्म होईल तेव्हां त्याच्या व मातेच्या शरीराची जोपासना करणें फार अगत्याचें आहे. स्त्रीं प्रसूत होण्यापूर्वींच तिच्यासाठीं सुंठपाक किंवा सौभाग्य-सुंठिपाक तयार करून ठेवावा. बाळंतिणीला किंचित् उष्ण व सुगंधयुक्त पाणी स्नानाला असावें व तशाच पाण्यानें बालकालाहि स्नान घालीत जावें. नंतर नालच्छेदन करावें. तें करण्यापूर्वी नाभीजवळ एक नरम सूत बांधून त्यापुढें चार अंगुळें सोडून बाकीचा भाग कापून टाकावा. नाभीपुढें ठेवलेल्या भागाला अशारीतीनें बांधावें कीं त्यायोगानें बालकाच्या शरीरांतील रक्ताचा एकहि बिंदु न वाहील. नंतर तें सूतिकागृह स्वच्छ करून त्या ठिकाणीं सुगंधियुक्त घृतादिकांचा होम करावा. नंतर बालकाच्या कानामध्यें **'वेदोसि'** म्हणजे 'तुझें नांव वेद आहे' असें म्हणावें. नंतर तूप व मध एकत्र करून सुवर्णाच्या सळईनें बालकाच्या जिभेवर **'ओ३म्'** अशीं अक्षरें लिहावीं व त्या सळईनें मध व तूप त्याच्या जिभेला लावावें व नंतर तें त्याच्या आईला द्यावें. मुलाला आईनें दूध पाजावें. जर आईला दूध नसेल तर कोणत्या तरी दुसऱ्या दाईची परीक्षा करून तिचें दूध त्याला पाजावें नंतर दुसऱ्या एका शुद्ध हवेच्या खोलीमध्यें सकाळीं व संध्याकाळीं सुगंधित तुपाचें हवन करावें व तेथें हवन होईपर्यंत मुलासह मातेला बसवावे. सहा दिवसपर्यंत तरी आईनें आपलें दूध मुलाला पाजावें. स्त्रीनें आपणास हितकर व पुष्टीकारक असे पदार्थ भक्षण करावें, व योनिसंकोचनादि व्यवहार योग्य रीतीनें करावे. सहाव्या दिवशीं स्त्रीनें बाहेर हिंडावे व बालकासाठीं एक दाई ठेवावी. त्या दाईच्या खाण्यापिण्याची व्यवस्था नीट ठेवावी. तिनें बालकाचें पालनपोषण उत्तम करावें. बालकाच्या आईनें पूर्ण काळजी घ्यावी व त्याच्या पालनपोषणामध्यें अनुचित व्यवहार न होईल असें करावें. स्तनाच्या अग्रावर विशेष प्रकारच्या वनस्पतीचा लेप देऊन दुधाचा स्राव बंद करावा व आपली व बालकाची सर्व प्रकारें योग्य व्यवस्था राहील असें करावें. **'संस्कारविधि'** च्या रीतीप्रमाणें नामकरण संस्कार करावा. नंतर जेव्हां स्त्री पुनः रजस्वला होऊन शुद्ध होईल तेव्हां पूर्वीप्रमाणें ऋतुदान करावें.

---

***मराठी संस्कारविधि** ४९ रिखी भुवन नप्पू रोड माटुंगा मुंबई १९ येथें मिळेल (मूल्य दोन रुपये)

ऋतुकालाभिगामी स्यात् स्वदारनिरतः सदा । पर्ववर्जं व्रजेच्चैनां तद्व्रतो रतिकाम्यया ॥ मनु० ३।४५॥
निन्द्यास्वष्टासु चान्यासु स्त्रियो रात्रिषु वर्जयन् ॥ ब्रह्मचर्येव भवति यत्र तत्राश्रमे वसन् ॥मनु. ३।५० ॥

(अर्थ) जो आपल्या स्त्रीशिवाय दुसऱ्या स्त्रीशीं संबंध ठेवित नाहीं, निषिद्ध रात्रींमध्यें स्त्रीपासून पृथक् राहतो व तिच्याशीं ऋतुकालींच गमन करतो तो गृहस्थ असला तरीहि ब्रह्मचारीच समजावा.

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्राभार्या तथैव च । यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥
यदि हि स्त्री न रोचेत पुमांसं न प्रमोदयेत् । अप्रमोदात्पुनः पुंसः प्रजनं न प्रवर्तते ॥
स्त्रियां तु रोचमानायां सर्वं तद्रोचते कुलम् । तस्यां त्वरोचमानायां सर्वमेव न रोचते ॥ मनु ३।६०-६२

(अर्थ) ज्या कुलामध्यें पत्नीच्या सहवासानें पति व पतीच्या सहवासानें पत्नी आनंदित होते त्या कुलामध्यें निरंतर सौभाग्य व ऐश्वर्य निवास करते. जेथें कलह होत असतो तेथें दौर्भाग्य व दारिद्र्य वास करतें. जी स्त्री पतीशीं संतुष्ट नसते व पतीला संतुष्ट ठेवित नाहीं, तिच्या ठिकाणीं पति अप्रसन्न रहात असल्यामुळें त्याला काम उत्पन्न होत नाहीं. स्त्रिया प्रसन्न असतां सर्व कुल सुखमय होतें व स्त्रिया अप्रसन्न असतांना सर्व कुल दुःखमय होतें.

पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा । पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥
यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः । यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥
शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम् । न शोचन्ति तु यत्रैता वर्द्धते तद्धि सर्वदा ॥
तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः । भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषु च ॥ मनु. ३ । ५५-५७ व ५९.

(अर्थ) ज्यांना आपलें पुष्कळ कल्याण व्हावें असें वाटत असेल अशा, पिता, भ्राता, पति व दीर यानीं स्त्रियांचा भूषणादिकांनीं सत्कार करावा. ज्या घरामध्ये स्त्रियांचा सत्कार होतो, त्या घरीं विद्यायुक्त पुरुष देव या संज्ञेला प्राप्त होऊन ते आनंदानें क्रीडा करतात. पण ज्या घरीं स्त्रियांचा सत्कार होत नाहीं तेथें केलेल्या सर्व क्रिया निष्फळ होतात. ज्या कुलांतील स्त्रिया शोकग्रस्त होतात त्या कुलाचा तत्काल नाश होतो. पण ज्या कुलांत स्त्रिया शोकग्रस्त होत नाहींत त्या कुलाची अभिवृद्धि होते. म्हणून ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या मनुष्यांनीं, भूषणें, वस्त्रें व भोजनादिक यांच्या योगानें, स्त्रियांचा सत्कार उत्सवसमयीं व प्रत्यहीं करावा.

पुजा करणें म्हणजे सत्कार करणें होय. जेव्हां दिवसा किंवा रात्रौ स्नेह्यांची किंवा स्त्रीपुरुषांची प्रथमतः गांठ पडेल किंवा ते पृथक् होतील तेव्हां एकमेकांनीं 'नमस्ते' (मी आपला सत्कार करतों.) असें म्हणावें. तसेंच—

सदा प्रहृष्टया भाव्यं गृहकार्येषु दक्षया । सुसंस्कृतोपस्करया व्यये चामुक्तहस्तया ॥ मनु. ५।१५०.

(अर्थ) घरामध्यें स्त्रीनें सदोदित प्रसन्न असावें. गृहकृत्यांमध्यें दक्ष असावें; सर्व कामें चातुर्यानें करावीं; सर्व पदार्थ उत्तम रीतीनें सुसंस्कृत करावेत; घर स्वच्छ ठेवावें, खर्च करतेवेळीं फार उदार होऊं नये. अर्थात् यथायोग्य खर्च करावा. सर्व पदार्थ व भक्ष्यभोज्ये अशीं शुद्ध व स्वादिष्ट बनवावीं कीं ज्याच्या योगानें शरीरांस रोग उत्पन्न न होतां आत्मा व शरीर यांचें बल वाढेल. जो जो खर्च होईल त्याचा सर्व हिशोब गृहिणीनें ठेवावा व तो पतीला दाखवावा. घरांतील नोकरचाकरांकडून यथायोग्य काम करून घ्यावें व घरांतील कोणत्याहि कामांत कमतरता न पडेल असें करावें.

स्त्रियो रत्नान्यथो विद्या सत्यं शौचं सुभाषितम् । विविधानि च रत्नानि समादेयानि सर्वतः ॥ मनु. २।२४०

(अर्थ) उत्तम स्त्री, नानाप्रकारचीं रत्नें विद्या, सत्य, पवित्रता, सुभाषित व सर्व प्रकारचीं शिल्पें, सर्व देशांपासून व सर्व लोकांहासून ग्रहण करावीं.

सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात्सत्यमप्रियम् । प्रियं च नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः ॥ मनु. ४।१३८
भद्रं भद्रमिति ब्रूयाद् भद्रमित्येव वा वदेत् । शुष्कवैरं विवादं च न कुर्यात्केनचित् सह ॥ मनु. ४।१३९

(अर्थ) प्रिय, सत्य व दुसऱ्याला हितकारक असेंच सदोदित बोलावें. अप्रिय असून जें सत्य असेल तें बोलूं नये. (काण्याला काणा म्हणून निंदूं नये.) खोटें व प्रिय असें भाषण कधींहि करूं नये. सदोदित भद्र अर्थात् सर्वांना

हितकारक असेल तेंच बोलावें. कोणाशींहि शुष्क वैर व वादविवाद करूं नये. आराधावांचून कोणाशींहि विरोध करूं नये. जें दुसऱ्याच्या हिताचें असेल पण त्याला ऐकण्यास वाईट वाटत असेल तरी निर्भीडपणानें सांगावें.

**पुरुषा बहवो राजन् सततं प्रियवादिनः । अप्रियस्य तु पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ॥** भा० उद्योग. विदुरनीति.

(**अर्थ**) 'हे धृतराष्ट्रा ! या संसारामध्यें दुसऱ्यास खूष करण्यासाठीं गोड बोलणारे लोक पुष्कळ आहेत. पण अप्रिय असून परिणामीं हितकारक असें भाषण करणारे व तें शांतपणानें ऐकणारे लोक फारच विरळा.' सत्पुरुष जे असतात ते तोंडावर स्पष्टपणें दुसऱ्याचे दोष सांगतात व आपले दोष शांतपणें ऐकत असतात. त्याचप्रमाणें दुसऱ्याच्या परोक्ष त्याचे गुण वाखाणीत असतात. पण दुष्ट लोकांची अशी रीति असते कीं, ते तोंडावर गोड बोलतात व मागून सारखी निंदा करीत असतात. जोंपर्यंत मनुष्याला आपले दोष दुसऱ्याकडून समजत नाहींत, तोंपर्यंत त्याच्यांत सुधारणा होणें शक्य नाहीं; म्हणून दोषाच्या अविष्करणाची आवश्यकता आहे. पण ते दाखवतांना कधींहि कोणाची निंदा करूं नये. (**गुणेषु दोषारोपणमसूया । दोषेषु गुणारोपणमप्यसूया । गुणेषु गुणारोपणं दोषेषु दोषारोपणं च स्तुतिः**) गुणांच्या ठिकाणीं दोषाचा आरोप करणें किंवा दोषांच्या ठिकाणीं गुणाचा आरोप करणें ही निंदा होय. असलेल्या गुणांचें कथन करणें, त्याचप्रमाणें असलेल्या दोषांचेंहि यथावत् कथन करणें ही स्तुति समजावी. अर्थात् मिथ्या भाषणाला निंदा व सत्यभाषणाला स्तुति असें म्हणतात. तसेंच—

**बुद्धिवृद्धिकराण्याशु धन्यानि च हितानि च । नित्यं शास्त्राण्यवेक्षेत निगमांश्चैव वैदिकान् ॥**

**यथा यथा हि पुरुषः शास्त्रं समधिगच्छति । तथा तथा विजानाति विज्ञानं चास्य रोचते ॥** मनु. ४।१९ व २०.

(**अर्थ**) बुद्धि, धन, हित यांची वृद्धि करणारीं शास्त्रें व वेदादि पुस्तकें आहेत. म्हणून त्यांचें श्रवण व श्रावण प्रत्यहीं करावें. ब्रह्मचर्याश्रमामध्यें ज्यांचें पठण केलें असेल त्यांच्यावर पुनः पुनः विचार करून तीं लोकांना शिकवावीं. जसजसा मनुष्य शास्त्रामध्यें पारंगत होत जातो, तसतसें त्याचें विज्ञान वाढत जातें व अध्ययनांत त्याची रुचि वाढते.

### पंचमहायज्ञ

**[illegible]ज्ञं भूतयज्ञं च सर्वदा । नृयज्ञं पितृयज्ञं च यथाशक्ति न हापयेत् ॥** मनु. ४।२१.

**अध्यापनं ब्रह्मयज्ञः पितृयज्ञस्तु तर्पणम् । होमो दैवो बलिर्भौतो नृयज्ञोऽतिथिपूजनम् ॥**

**स्वाध्यायेनार्चयेदृषीन् होमैर्देवान् यथाविधि । पितॄन् श्राद्धैश्च नॄनन्नैर्भूतानि बलिकर्मणा ॥** मनु. ३।७० व ८१.

(**अर्थ**) ऋषियज्ञ, देवयज्ञ, भूतयज्ञ, नृयज्ञ व पितृयज्ञ हे पंचमहायज्ञ आहेत. अध्यापन हा ब्रह्मयज्ञ आहे अध्ययन व अध्यापन यांच्या योगानें ऋषींची तृप्ति करावी. पितरांची तृप्ति हा पितृयज्ञ आहे. श्रद्धेनें पितरांची तृप्ति करणें हेंच श्राद्ध होय. होमानें देवयज्ञ होतो. अन्नदानानें नृयज्ञ होतो व बलिदानानें भूतयज्ञ होतो.

यांपैकीं पहिले दोन यज्ञ पूर्वीच्या ब्रह्मचर्यप्रकरणामध्यें लिहिले आहेत. पहिल्यामध्यें वेदादि सत्यशास्त्रांचें अध्ययन व अध्यापन करणें, संध्योपासन व योगाभ्यास करणें यांचा समावेश होतो. दुसऱ्यांत विद्वानांचा सहवास, त्यांची सेवा करणें, पवित्रता धारण करणें दिव्यगुण अंगीं आणणें, दान देणें, विद्येची वृद्धि करणें यांचा समावेश होतो. हे दोनहि यज्ञ दररोज प्रातःकालीं व सायंकालीं केले पाहिजेत.

**सायं सायं गृहपतिर्नो अग्निः प्रातः प्रातः सौमनस्य दाता ॥ १ ॥**

**प्रातः प्रातर्गृहपतिर्नो अग्निः सायं सायं सौमनस्य दाता ॥ २ ॥** अथर्व. १९।७।३-४

**तस्मादहोरात्रस्य संयोगे ब्राह्मणः सन्ध्यामुपासीत । उद्यन्तमस्तं यान्तमादित्यमभिध्यायन् ॥** षड्विंश. ब्रा० ४।५

**न तिष्ठति तु यः पूर्वां नोपास्ते यस्तु पश्चिमाम् । सशूद्रवद्बहिष्कार्यः सर्वस्माद्द्विजकर्मणः ॥** मनु. २।१०३

(**अर्थ**) प्रत्येक संध्याकाळीं हवन केलेलें द्रव्य दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत वायूला शुद्ध राखून हितकारक होतें. त्याचप्रमाणें प्रत्येक सकाळीं अग्नींत हवन केलेलें द्रव्य सायंकाळ पर्यंत वायूला शुद्ध राखून आरोग्यकारक होतें. म्हणून दिवस व रात्रि यांच्या संधीच्यावेळीं अर्थात् सकाळीं व संध्याकाळीं परमेश्वराचें ध्यान व अग्निहोत्र अवश्यमेव करावें. ज्याप्रकारें सकाळसंध्याकाळ जे संध्या व अग्निहोत्र करीत नाहींत त्यांना शूद्राप्रमाणें समजून, सर्व द्विजांच्या कर्मांतूने [illegible]र घालवावें.

**(प्रश्न)** त्रिकाळ संध्या कां करूं नये ? **(उत्तर)** संध्या दोनच आहेत तीन नाहींत. दिवस व रात्र यांचा संधि सकाळीं व संध्याकाळी होत असतो. जो हें न मानतां दिवसाच्या मध्यसमयीं आणखी संध्या करतो त्यानें मध्यरात्रींहि कां करूं नये ? व मध्यरात्रींहि जर करावयाची असेल तर प्रत्येक प्रहराला, प्रत्येक घटकेला व प्रत्येक पळाला कां संध्या करूं नये ? अशा रीतीनें मध्यान्हसंध्या करावयाला कोणत्याहि शास्त्राचें प्रमाण नाहीं. म्हणून सर्व शास्त्रसंमत अशा दोनच वेळीं संध्या व अग्निहोत्र करणें हें चांगलें. तीनदां करूं नये. तीन कालांची जी शास्त्रकारांनीं गणना केली आहे ती भूत, भविष्य व वर्तमान अशी आहे. संध्योपासनेचे काल कोणीहि मानलेले नाहींत.

पितृयज्ञामध्यें पितरांची सेवा करण्याचा अंतर्भाव होतो. **'पितर'** ही संज्ञा देव, विद्वान् ऋषि, शिक्षक, माता पिता, ज्ञानी, योगी व वृद्ध पुरुष यांना लागू आहे. यांची सेवा करणें हाच पितृयज्ञ होय. पितृयज्ञामध्यें दोन भेद आहेत; एक श्राद्ध व दुसरें तर्पण. **(श्रत्सत्यं दधाति यया क्रियया सा श्रद्धा श्रद्धया यत् क्रियते तत् श्राद्धम्)** ज्या क्रियेच्या योगानें सत्याचें ग्रहण होतें तिला श्रद्धा असें म्हणतात. श्रद्धेनें जें केलें जातें तें श्राद्ध समजावें; तसेंच **(तृप्यन्ति तर्पयन्ति येन पितॄन् तत्तर्पणम्)** ज्या कर्माच्या योगानें विद्यमान् मातापितर प्रसन्न होतात किंवा प्रसन्न केलें जातात त्याला 'तर्पण' असें म्हणतात. हा दोनहि प्रकारचा पितृयज्ञ जिवंत पितरासंबंधानेंच करावयाचा असतो; मेलेल्याच्या संबंधानें नाहीं.

**ओम् ब्रह्मादयो देवास्तृप्यन्ताम् ॥ ब्रह्मादिदेवपत्न्यस्तृप्यन्ताम् ॥ ब्रह्मादिदेवसुतास्तृप्यन्ताम् ॥**
**ब्रह्मादिदेवगणास्तृप्यन्ताम्** ॥ इति देवतर्पणम् ॥

**(विद्वांसो हि देवाः)** विद्वानांला देव म्हणतात, असें शतपथ ब्राह्मणांत सांगितलें आहे. जो चारहि वेदांचें सांगोपांग अध्ययन करतो त्याला **'ब्रह्मा'** असें म्हणतात. या ब्रह्मपदवीधरांपेक्षां जे कमी विद्वान् असतात त्यांना **'देव'** असें म्हणतात. त्याचप्रमाणें त्यांच्या विदुषी स्त्रियांना **'ब्राह्मणी'** व **'देवी'** असें म्हणतात. यांच्याप्रमाणें जे यांचे **पुत्र** किंवा शिष्य असतील व जे यांचे गण असतील त्या सर्वांची सेवा करणें हेंच खरें श्राद्ध व तर्पण आहे.

**ओम् मरीच्यादय ऋषयस्तृप्यन्ताम् ॥ मरीच्याद्यृषिपत्न्यस्तृप्यन्ताम् ॥ मरीच्याद्यृषिसुतास्तृप्यन्ताम् । मरीच्याद्यृषिगणास्तृप्यन्ताम्** ॥ इति ऋषितर्पणम् ॥

ब्रह्याचे प्रपौत्र मरीचि होत. जे यांच्याप्रमाणें विद्वान् होतात व दुसऱ्यांना शिकवितात, त्यांची सेवा करावी. त्यांच्याप्रमाणें ज्या स्त्रिया विद्वान् असतात, ज्या कन्यांना शिकवितात त्यांची सेवा करावी. तसेंच त्यांचे विद्वान् पुत्र व सेवक यांचीहि सेवा व त्या सर्वांचा सत्कार करावा. हेंच खरें ऋषितर्पण आहे.

**ओम् सोमसदः पितरस्तृप्यन्ताम् ॥ अग्निष्वात्ताः पितरस्तृप्यन्ताम् ॥ बर्हिषदः पितरस्तृप्यन्ताम् ॥ सोमपाः पितरस्तृप्यन्ताम् ॥ हविर्भुजः पितरस्तृप्यन्ताम् ॥ आज्यपाः पितरस्तृप्यन्ताम् ॥ सुकालिनः पितरस्तृप्यन्ताम् ॥ यमादिभ्यो नमः यमादींस्तर्पयामि ॥ पित्रे स्वधा नमः पितरं तर्पयामि ॥ पितामहाय स्वधा नमः पितामहं तर्पयामि ॥ प्रपितामहाय स्वधा नमः प्रपितामहं तर्पयामि ॥ मात्रे स्वधा नमः मातरं तर्पयामि ॥ पितामह्यै स्वधा नमः पितामहीं तर्पयामि ॥ प्रपितामह्यै स्वधा नमः प्रपितामहीं तर्पयामि ॥ स्वपत्न्यै स्वधा नमः स्वपत्नीं तर्पयामि ॥ सम्बन्धिभ्यः स्वधा नमः सम्बन्धिनस्तर्पयामि ॥ सगोत्रेभ्यः स्वधा नमः सगोत्रांस्तर्पयामि** ॥ इति पितृतर्पणम् ॥

[**ये सोमे जगदीश्वरे पदार्थविद्यायां च सीदन्ति ते सोमसदः**] जे परमात्म्यामध्यें लीन व पदार्थविद्येमध्यें निपुणअसतात त्यांना 'सोमसद' असें म्हणतात [**यैरग्नेर्विद्युतो विद्या गृहीता ते अग्निष्वात्ताः**] जे अग्नि व विद्युत यासंबंधींच्या सर्व विद्यांमध्यें प्रवीण असतात ते 'अग्निष्वात्त' समजावे. [**ये बर्हिषि उत्तमे व्यवहारे सीदन्ति ते बर्हिषदः**] जे विद्यावृद्धिसारख्या उत्तम व्यवहारामध्यें स्थित होतात ते 'बर्हिषद' होत. [**ये सोममैश्वर्यमोषधिरसं वा पान्ति पिबन्ति वा ते सोमपाः**] जे ऐश्वर्याचे रक्षक व सोमवल्ल्यादिक महौषधिरसांचें पान करून रोगरहित झालेले,

तसेंच दुसऱ्यांच्या ऐश्वर्याचें रक्षण करणारे व दुसऱ्यांस औषधी देऊन दुसऱ्यांचे रोग नाहींसें करणारे ते 'सोमप' होत. [**ये हविर्होतुमत्तुमर्हं भुञ्जते भोजयन्ति वा ते हविर्भुजः**] मादक व हिंसायुक्त द्रव्यांना सोडून उत्तम पदार्थांचें भोजन करणारे व उत्तम पदार्थ दुसऱ्यांस खावयास देणारे ते 'हविर्भुज' समजावे. [**ये आज्यं ज्ञातुं प्राप्तुं वा योग्यं रक्षन्ति वा पिबन्ति ते आज्यपाः**] जाणण्यास व प्राप्त करून घेण्यास योग्य अशा वस्तूंचें रक्षण जे करतात व जे घृतादि पदार्थ खातात त्यांना 'आज्यप' असें म्हणतात. (**शोभनः कालो विद्यते येषान्ते सुकालिनः**) धर्मकृत्यें करण्यास ज्यांना सदोदित उत्तम समय असतो त्यांस 'सुकालीन' असें म्हणतात. (**ये दुष्टान् यच्छन्ति निगृह्णन्ति ते यमा न्यायाधीशाः**) जे दुष्टांना शासन करतात व सज्जनांचें रक्षण करतात त्या न्यायधिशांना 'यम' असें म्हणतात. (**यः पाति स पिता**) जो मुलांचें अन्नवस्त्रादिकांच्या योगानें सत्कारपूर्वक रक्षण व पालन करतो किंवा जो त्यांचा उत्पन्नकर्ता असतो त्याला 'पिता' असें म्हणतात. (**पितुः पिता पितामहः । पितामहस्य पिता प्रपितामहः**) पित्याच्या पित्याला 'पितामह' व पितामहाच्या पित्याला 'प्रपितामह' असें म्हणतात. (**या मानयति सा माता**) जी अन्नानें व सत्कारानें संतानाचें हित करते तिला 'माता' असें म्हणतात. (**या पितुर्माता सा पितामही, पितामहस्य माता प्रपितामही**) बापाच्या मातेला 'पितामही' व आजाच्या मातेला 'प्रपितामही' असें म्हणतात. आपली स्त्री, बहीण, संबंधी जन, स्वगोत्रज व अन्य कोणी भद्रपुरुष किंवा वृद्ध पुरुष या सर्वांना अन्न वस्त्र, सुंदर यान इत्यादि देऊन त्यांची तृप्ति उत्तम प्रकारें करावी. जें सदाचरण केलें असतां त्यांचा आत्मा तृप्त होईल व त्यांचें शरीर स्वस्थ होईल तें कृत्य प्रीतिपूर्वक त्यांच्या प्रीत्यर्थ करणें यालाच श्राद्ध व तर्पण असें म्हणतात,

चवथा यज्ञ वैश्वदेव. याचा विधि असा:—जेव्हां भोजनासाठीं तयार करावयाचें अन्न सिद्ध होईल तेव्हां त्यांतून आंबट, खारट, असले पदार्थ बाजूला करून घृतयुक्त व मिष्टान्न घेऊन त्याचें हवन पुढील मंत्रांनीं करावें. हवन करण्यासाठीं चुलींतून अग्नि निराळा काढून घ्यावा.

**वैश्वदेवस्य सिद्धस्य गृह्येऽग्नौ विधिपूर्वकम् ॥ आभ्यः कुर्याद्देवताभ्यो ब्राह्मणो होममन्वहम् ॥**मनु.३।८४

जें कांहीं पाकशाळेमध्यें भोजनासाठीं तयार केलेलें अन्न असेल, त्याचा दिव्यगुणांसाठीं, त्या पाकाग्नीमध्यें खालीं लिहिलेल्या मंत्रांनीं विधिपूर्वक नित्य होम करावा:—

**ओं अग्नये स्वाहा । सोमाय स्वाहा । अग्नीषोमाभ्यां स्वाहा । विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा । धन्वन्तरये स्वाहा । कुह्वै स्वाहा । अनुमत्यै स्वाहा । प्रजापतये स्वाहा । सहद्यावापृथिवीभ्यां स्वाहा । स्विष्टकृते स्वाहा ॥**

या प्रत्येक मंत्रानें एक एक आहुति प्रज्वलित अग्निमध्यें सोडावी. नंतर स्थालीमध्यें किंवा भूमीवर पान ठेऊन त्याच्यावर पूर्वदिशादि क्रमानुसार यथाक्रम या मंत्रानें भाग ठेवावे.

**ओं सानुगायेन्द्राय नमः । सानुगाय यमाय नमः । सानुगाय वरुणाय नमः । सानुगाय सोमाय नमः । मरुद्भ्यो नमः । अद्भ्यो नमः । वनस्पतिभ्यो नमः । श्रियै नमः । भद्रकाल्यै नमः । ब्रह्मपतये नमः । वास्तुपतये नमः । विश्वेभ्यो देवेभ्यो नमः । दिवाचरेभ्यो नमः । पितृभ्यो नमः । नक्तञ्चारिभ्यो नमः । सर्वात्मभूतये नमः ॥**

पानांवर किंवा थाळयामध्यें ठेवलेल्या भागांना एकत्र करून जो अतिथी आला असेल त्याला ते भाग खावयास घालावे किंवा अग्नीमध्यें त्यांचें हवन करावें. यानंतर लवणान्न म्हणजे डाळ, भात, शाकभाजी, पोळी वगैरेचे सहा भाग जमिनीवर ठेवावे.

**शुनां च पतितानां च श्वपचां पापरोगिणाम् । वायसानां कृमीणां च शनकैर्निर्वपेद्भुवि ॥** मनु. ३।९२.

या प्रकारें 'श्वभ्यो नमः । पतितेभ्यो नमः । श्वपग्भ्यो नमः । पापरोगिभ्यो नमः । वायसेभ्यो नमः । कृमिभ्यो नमः।' असे सहा भाग जमिनीवर ठेवावे व नंतर ते भाग जो कोणी दुःखी, बुभुक्षित, कुत्रा, कावळा वगैरे असेल त्याला द्यावे. या मंत्रातील 'नमः' या शब्दाचा 'अर्थ' अन्न असा आहे. कुत्रे, पापी, चांडाल, पापरोगी, कावळे, कृमी, मुंग्या

वगैरेंना अन्न द्यावें असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे. पाकशाळेमध्यें पूर्वोक्त पद्धतीनें हवन करण्यापासून पाकशाळेंतील वायु शुद्ध होतो व पाक करण्यापासून जी अज्ञात अदृष्ट जीवांची हत्या होत असते तिच्याबद्दल त्यांच्यावर प्रत्युपकार होतो.

### अथितियज्ञ

ज्याच्या येण्याची तिथि निश्चित झालेली नसते त्याला अतिथि असें म्हणतात. धार्मिक, सत्योपदेशक, सर्वांवर उपकार करण्यासाठीं देशदेशांतरीं फिरणारा, पूर्ण विद्वान्, परम-योगी, संन्यासी असा जो पुरुष एकाएकी गृहस्थाच्या घरीं येतो त्याला 'अतिथि' असें म्हणतात. तो आल्याबरोबर त्याला पाद्य, अर्घ्य व आचमनीय (पाय धुण्यास, अंगस्पर्शास व पिण्यास पाणी) देऊन त्याला सत्कारपूर्वक आसनावर बसवावें व त्याचा अन्नदानानें सत्कार करावा. नंतर त्याला कुशल प्रश्न वगैरे विचारून तदनंतर त्याच्या उपदेशापासून ज्ञान व विज्ञान प्राप्त करून घ्यावें. याच्या योगानें धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांची प्राप्ति होते. तो ज्याप्रमाणें उपदेश करील त्याप्रमाणें आपल्या आचरणामध्यें बदल करावा. समयानुसार गृहस्थ व राजा हे देखील अतिथीप्रमाणें सत्कार करण्यास योग्य आहेत. परंतु—

**पाखण्डिनो विकर्मस्थान् बैडालव्रतिकाञ्छठान् । हैतुकान् बकवृत्तींश्च वाङ्मात्रेणापि नार्चयेत् ॥ मनु. ४।३०**

(अर्थ) (पाखण्डी) वेदांची निंदा करणारे वेदविरुद्ध आचरण करणारे, (विकर्मस्थ) वाईट, वेदविरुद्ध कर्मे करणारे, मिथ्याभाषणादि दुर्गुणयुक्त (बैडाल०) ज्याप्रमाणें उंदीर पकडण्यासाठीं मांजर लपून बसते त्याप्रमाणें लपून छपून हीन कृत्य करणारे, (शठ) हट्टी, दुराग्रही, अभिमानी, स्वतः समजत नाहीं व जे दुसऱ्यांचें ऐकत नाहींत (हैतुक) कुतर्की, व्यर्थ बडबड करणारे म्हणजे मी ब्रह्म आहे, जग मिथ्या आहे, शास्त्रें व ईश्वर हीं कल्पित आहेत, अशाप्रकारें गप्पा मारणारे, (बकवृत्ति) ज्याप्रमाणें बगळा एका पायावर उभा राहून डोळे झांकून ध्यानस्थ राहतो व पुढें मासा आल्याबरोबर गट्ट करतो त्याचप्रमाणें स्वार्थासाठीं टपून बसणारे आणि संन्यासी व बैरागी यांचा वेष घेऊन लोकांना नागविणारे अशाप्रकारच्या सर्व दुष्ट लोकांचा केवळ वाणीनेंहि सत्कार करूं नये. कारण जर अशा दुष्टांचा सत्कार होऊं लागला तर अशा लोकांची संख्या वाढून ते सर्व दुनियेला अधर्मयुक्त व दुःखमय करून सोडतील. ते स्वतः तर अवनतीचें काम करीतच असतात पण जे त्यांच्या पाठीमागून जातात त्यांनाहि अवनतीमध्यें ते बुडवितात.

### पंचमहायज्ञफल

ब्रह्मयज्ञाच्या योगानें विद्या, सुशिक्षण, धर्म, सभ्यता इत्यादि गुणांची वृद्धि होते. अग्निहोत्रांतील हवनानें वायु वृष्टि व जल यांची शुद्धि होते व वृष्टीच्या द्वारें सर्व संसारभर सुख पसरतें. वायु शुद्ध झाल्यानें त्यामध्यें श्वासोश्वास करणाऱ्या व स्तनपानादि सर्व व्यवहार करणाऱ्या सर्वांचें आरोग्य, बुद्धि, बल व पराक्रम वाढतात, आणि त्यायोगानें धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांचें अनुष्ठान पुरें होतें, म्हणून त्याला देवयज्ञ म्हणतात. पितृयज्ञामध्यें माता, पिता, ज्ञानी व महात्मे यांची सेवा करावयाची असते; या सेवेच्या योगानें सेवकाचें ज्ञान वाढतें व सत्यासत्याचा विचार होतो. यामुळें तो असत्याचा त्याग करून सत्याचें ग्रहण करतो व सुखी होतो. त्याचप्रमाणें मातापिता व आचार्य यांनीं जें कष्ट मुलांसंबंधानें घेतलेलें असतात, त्यांचें स्मरण ठेवून त्यांच्यावर प्रत्युपकार करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. तेंहि केल्यासारखें होतें. बलिवैश्वदेवाचें फल पूर्वी सांगितलेंच आहे. यांत कृमिकीटकांनाहि अन्न मिळतें व ते सुखी होतात. अतिथियज्ञामध्यें धार्मिक उपदेशकांचा सत्कार केला जातो. जर उत्तम अतिथि नसतील तर मनुष्यांची उन्नतीहि होणार नाहीं धार्मिक पुरुष जेव्हां सर्व देशभर फिरून सत्याचा उपदेश करितात तेव्हां सर्व पाखंडमतांचा नाश होतो, व गृहस्थांना सहज सत्य विज्ञान प्राप्त होतें. सर्व मनुष्यांमध्यें एक धर्म जागृत व स्थिर राहतो. अर्थात् अशा धार्मिक व विद्वान् अतिथीशिवा य संदेहवृत्तीचा विनाश होत नाहीं संशय दूर झाल्याशिवाय धर्मावर दृढ निश्चय होत नाहीं व निश्चयावांचून सुखहि प्राप्त होत नाहीं. अर्थात् अतिथियज्ञापासून परंपरेनें सर्व सुखी होतात.

### सामान्यनियम

**ब्राह्मे मुहूर्ते बुध्येत धर्मार्थौ चानुचिन्तयेत् । कायक्लेशांश्च तन्मूलान् वेदतत्त्वार्थमेव च ॥ मनु० ॥ ४।९२.**

(अर्थ) रात्रीच्या चवथ्या प्रहरीं अर्थात् चार घटका रात्र असतां उठावें; अवश्य कर्तव्यें केल्यानंतर धर्म व अर्थ यांसंबंधीं विचार करावा; शारीरिक रोगाचें निदान करावें; परमात्म्याचें ध्यान करावें; आणि केव्हांहि अधर्माचें आचरण करूं नये.

नाधर्मश्चरितो लोके सद्यः फलति गौरिव । शनैरावर्तमानस्तु कर्तुर्मूलानि कृन्तति ।। मनु. ४।१७२.

अधर्मेणैधते तावत्ततो भद्राणि पश्यति । ततः सपत्नाञ्जयति समूलस्तु विनश्यति ।। मनु. ४।१७४.

(अर्थ) केलेला अधर्म दुःख दिल्याशिवाय रहात नाहीं अधर्माचरण केल्याबरोबरच त्याचें फल मिळतें असें नाहीं, म्हणून अज्ञानी लोक अधर्म करण्यास भीत नाहींत. पण हें निश्चयानें जाणवें कीं अधर्माचरण हळूहळू सर्व सुखांचा नाश करीत असतें. अधर्म करणारा मनुष्य प्रथमतः धर्ममर्यादा सोडून, मिथ्या भाषण, कपट पाखंड वगैरे करून, सर्वरक्षक अशा वेदांचें खंडन करून, विश्वासघात वगैरे नीच कर्में करून वाढतो. नंतर त्याला धन, धान्य, ऐश्वर्य, खानपान, वस्त्र, आभूषण, यान, स्थान, मान, प्रतिष्ठा वगैरे क्रमानें प्राप्त होतात. अन्याय करून तो सर्वांना पायाक्रांत करतो व शेवटीं अकल्पित संकटांनीं ग्रस्त होऊन स्वतः जसा मूळापासून कापलेला वृक्ष नाश पावतो तसा नाश पावतो.

सत्यधर्मार्यवृत्तेषु शौचे चैवारमेत्सदा । शिष्यांश्च शिष्याद्धर्मेण वाग्बाहूदरसंयतः ।। मनु. ४।१७५.

(अर्थ) सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग करावा; पक्षपातरहित होऊन वेदोक्त सत्य धर्माचें अवलंबन करावें; आर्यपुरुष कसें वर्तन ठेवतात तें जाणवें, स्वच्छता ठेवावी व हात, बाहू व पोट यांचा संयम करून-- अर्थात् अन्याय न करतां शिष्यांना उत्तम रीतीनें सर्व विद्या शिकवावी.

ऋत्विक् पुरोहिताचार्यैर्मातुलातिथिसंश्रितैः । बालवृद्धातुरैर्वैद्यैर्ज्ञातिसम्बन्धि-बान्धवैः ।। मनु. ४।१७९.

मातापितृभ्यां यामीभिर्भ्रात्रा पुत्रेण भार्यया । दुहित्रा दासवर्गेण विवादं न समाचरेत् ।। मनु. ४।१८०.

(अर्थ) [ऋत्विक्] यज्ञ कारणारा, [पुरोहित] सदोदित उत्तम चालीरीतींचें शिक्षण देणारा, [आचार्य] विद्या शिकविणारा, [मातुल] मामा, [अतिथि] ज्याच्या आगमनाची तिथि ठरलेली नसते तो, [संश्रित] आपले आश्रित, [बाल] बालक, [वृध्दि] म्हातारे, [आतुर] रोगपीडित, [वैद्य] आयुर्वेद जाणणारे, [ज्ञाति] स्ववर्णस्थ व स्वगोत्रस्थ जन, [संबन्धि] श्वशुरादिक, [बान्धव] मित्र, [माता] आई, [पिता] बाप, [यामी] बहीण, [भ्राता] भाऊ, [भार्या] स्त्री, [दुहिता] मुलगी, व [दास] सेवक यांच्याशीं वादविवाद करूं नये. अर्थात् यांच्याबरोबर तंटा, बखेडा, भांडण करूं नये.

अतपास्त्वनधीयानः प्रतिग्रहरुचिर्द्विजः । अम्भस्यश्मप्लवेनेव सह तेनैव मज्जति ।। ४।१९०.

त्रिष्वप्येतेषु दत्तं हि विधिनाप्यर्जितं धनम् । दातुर्भवत्यनर्थाय परत्रादातुरेव च ।। मनु. ४।९३.

यथा प्लवेनौपलेन निमज्जत्युदके तरन् । तथा निमज्जतोऽधस्तादज्ञौ दातृप्रतीच्छकौ ।। मनु. ४।१९४.

(अर्थ) (अतपाः) ब्रह्मचर्य, सत्यभाषणादि तप न करणारा, (अनधीयानः) अध्ययन न करणारा, व (प्रतिग्रहरुचिः) दुसऱ्यांकडून दान घेण्यांत अत्यंत तत्पर, असे जे तीन प्रकारचे लोक असतात ते समुद्रांत दगडाच्या नौकेंतून तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या मनुष्याप्रमाणें स्वतःच्या दुष्कर्मासह दुःखसागरामध्यें बुडतात. हे स्वतः तर बुडतातच पण ते आपल्या बरोबर दान देणाऱ्यांनाहि बुडवितात ! कारण धर्मानें प्राप्त केलेल्या द्रव्याचें दान जो पूर्वोक्त तीन प्रकारच्या पुरुषांना करतो, त्याचें तें दानदात्याचा या जन्मीं नाश करतेच; पण दान घेणाऱ्याचा परजन्मींहि नाश करितें. ज्याप्रमाणें दगडाच्या नौकेंत बसणारा बुडतो त्याचप्रमाणें अज्ञानी दाता व अज्ञानी दान घेणारा हे दोघेहि अधोगतीला जातात.

धर्मध्वजी सदालुब्धश्छाद्मिको लोकदम्भकः । बैडालव्रतिको ज्ञेयो हिंस्रः सर्वाभिसन्धकः ।। ४।१९५.

अधोदृष्टिर्नैष्कृतिकः स्वार्थसाधनतत्परः । शठो मिथ्याविनीतश्च बकव्रतचरो द्विजः ।। मनु. ४।१९६.

(अर्थ) (धर्मध्वजी) धर्म न आचरतां धर्माच्या नांवावर लोकांना ठकविणारा, (सदालुब्धः) सर्वदा लोभी, (छाद्मिकः) कपटी, (लोकदम्भकः) संसारी सामान्य मनुष्यापुढें आपली बढाई मारणारा, ढोंगी, (हिंस्रः) प्राण्यांचा घात करणारा व इतरांशीं वैर धरणारा, (सर्वाभिसन्धकः) चांगल्या व वाईट अशा सर्व लोकांत मिसळणारा (बैडालव्रतिकः) मांजराप्रमाणें कपटी, (अधोदृष्टिः) कीर्तीसाठीं नजर खालीं लावणारा, (नैष्कृतिकः) कोणी त्याचा थोडासा अपराध केला तर त्याचा उलट प्राणहि घेण्याची इच्छा करणारा, (स्वार्थसाधन०) कपट, विश्वासघात, किंवा अधर्म इत्यादि हवीं तीं दुष्कृत्यें करून आपला स्वार्थ साधणारा, (शठः) आपली गोष्ट खोटी असतांहि हट्ट न सोडणारा (मिथ्याविनीतः)

वरून आपण सुशील, संतुष्ट, व साधु असें दाखविणारा, व (बकव्रतचरः) बगळ्याप्रमाणें फसवणारा हे सर्व पाखंडी लोक आहेत. अशा लोकांवर विश्वास ठेवूं नये व त्यांची सेवाहि करूं नये.

**धर्मं शनैः संचिनुयाद्वल्मीकमिव पुत्तिकाः । परलोकसहायार्थं सर्वभूतान्यपीडयन् ॥** मनु. ४।२३८.

**नामुत्र हि सहायार्थं पिता माता च तिष्ठतः । न पुत्रदारं न ज्ञातिर्धर्मस्तिष्ठति केवलः ॥** मनु. ४।२३९.

**एकः प्रजायते जन्तुरेक एव प्रलीयते । एकोनु-भुङ्क्ते सुकृतमेक एव च दुष्कृतम् ॥** मनु. ४।२४०.

**एकः पापानि कुरुते फलं भुङ्क्ते महाजनः । भोक्तारो विप्रमुच्यन्ते कर्ता दोषेण लिप्यते ॥** महाभा. उद्योगप. ३२.

**मृतं शरीरमुत्सृज्य काष्ठलोष्ठसमं क्षितौ । विमुखा बान्धवा यान्ति धर्मस्तमनुगच्छति ॥** मनु. ४।२४१.

**(अर्थ)** ज्याप्रमाणें हळु हळु प्रयत्न करून, मुंग्या वारूळ बनवितात, त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषांनीं प्रयत्न करून, कोणालाहि पीडा न देतां परलोक म्हणजे परजन्मामध्यें सहाय्य व्हावें म्हणून धर्माचा संचय करावा. कारण कीं, परलोकामध्यें माता, पिता, पुत्र, स्त्री, व स्वज्ञातीचे लोक सहाय्य करूं शकत नाहींत, त्यावेळीं फक्त धर्मच काय तो सहाय्य करूं शकतो . मनुष्य एकटाच उत्पन्न होतो व एकटाच मरण पावतो, आणि एकटाच धर्माचें किंवा अधर्माचें अनुक्रमें सुख किंवा दुःख हें फल भोगतो. हेंहि ध्यानांत ठेवावें कीं, कुटुंबांतील एक मनुष्य पाप करून धन मिळवितो व त्याचा इतर सर्व लोक उपभोग घेतात. ते उपभोग घेणारे दोषाचे भागीदार होत नाहींत. पण जो अधर्म करणारा असतो त्यालाच दोषाचें फल भोगावें लागतें. जेव्हां कोणीं मनुष्य मरतो तेव्हां त्याचें मातीच्या ढेकळाप्रमाणें असणारें शरीर जमिनीवर फेकून त्याचे बंधुवर्ग मागें फिरतात, व त्याच्याबरोबर धर्मच एकटा जातो.

**तस्माद्धर्मं सहायार्थं नित्यं संचिनुयाच्छनैः । धर्मेण हि सहायेन तमस्तरति दुस्तरम् ॥** मनु. ४।२४२.

**धर्मप्रधानं पुरुषं तपसा हतकिल्बिषम् । परलोकं नयत्याशु भास्वन्तं खशरीरिणम् ॥** मनु. ४।२४३.

**(अर्थ)** यांसाठीं परलोकीं अर्थात् परजन्मीं सहाय्य व सुख व्हावें म्हणून धर्माचा संचय नित्य करीत असावें. जीव धर्माच्याच सहाय्यानें दुस्तर दुःखसागरांतून सहज तरून जातो. जो पुरुष धर्मलाच प्रधान समजतो, ज्याचें धर्माच्या अनुष्ठानानें पाप दूर झालें आहे, त्याला त्यानें केलेला धर्म, (भास्वन्तम्) जो स्वयंप्रकाश आहे व (स्वशरीरिणम्) ज्याला आकाश हें शरीराप्रमाणें आहे अशा (पर-लोकम्) परमदर्शनीय परमात्म्याला शीघ्र प्राप्त करून देतो. म्हणून-

**दृढकारी मृदुर्दान्तः क्रूराचारैरसंवसन् । अहिंस्रो दमदानाभ्यां जयेत्स्वर्गं तथा व्रतः ॥** मनु. ४।२४६.

**वाच्यर्था नियताः सर्वे वाङ्मूला वाग्विनिःसृताः । तान्तु यःस्तेनयेद्वाचं स सर्वस्तेयकृन्नरः** मनु. ४।२५६.

**आचाराल्लभते ह्यायुराचारादीप्सिताः प्रजाः । आचाराद्धनमक्षय्यमाचारो हन्त्यलक्षणम् ॥** मनु. ४।१५६.

**(अर्थ)** जो पुरुष प्रयत्न करणारा, कोमल स्वभावयुक्त, जितेंद्रिय, हिंसक व दुराचरणीं पुरुषांपासून दूर राहणारा, धर्मात्मा, मनाला स्वाधीन ठेवणारा, व विद्यादान करणारा असतो त्याला सुख प्राप्त होतें. सर्व अर्थ व व्यवहार वाणीनें निश्चित होतात, सर्वांचें मूळ वाचाच आहे व तीपासूनच सर्व व्यवहार सिद्ध होतात. अशा सर्वार्थसाधक वाणीची जो चोरी करतो, म्हणजे खोटें बोलतो, तो सर्व पदार्थांची चोरी करतो असें समजावें. धर्माप्रमाणें म्हणजे ब्रह्मचर्य, जितेंद्रिय इत्यादि नियमाप्रमाणें वागलें असतां आयुष्य वाढतें, उत्तम संतति होते, अक्षय्य धन प्राप्त होतें. व धर्माचरणानें सर्व दुष्ट लक्षणांचा नाश होतो. कारण—

**दुराचारो हि पुरुषो लोके भवति निन्दितः । दुःखभागी च सततं व्याधितोऽल्पायुरेव च ॥** मनु. ४।१५७.

**यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत् । यद्यदात्मवशं तु स्यात्तत्तत्सेवेत यत्नतः ॥** मनु. ४।१५९.

**सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् । एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥** मनु. ४।१६०.

**(अर्थ)** जो दुराचारी पुरुष असतो त्याची सदाचरणी लोकांत निंदा होते; तो नेहमीं व्याधिग्रस्त व दुःखित असतो व अल्पायु होतो. म्हणून जें पराधीन कर्म असेल तें सोडून द्यावें व जें कर्म स्वाधीन असेल तें प्रयत्नानें करावें.

कारण कीं, जी जी परवशता आहे ती ती सर्व दुःखकारक आहे व जी जी स्वतंत्रता आहे ती ती सर्व सुखकारक आहे. हेंच सुख व दुःख यांचें लक्षण आहे.

पण कांहीं कर्तव्यें अशीं असतात कीं, जीं आधीनतेनेंच केलीं पाहिजेत तीं तशीं करावीं. उदाहरणार्थ स्त्रीपुरुषांचीं परस्पर कर्तव्यें. हीं एकमेकांवर अवलंबून आहेत व तीं त्या स्थितींत प्रत्येकानें केलींच पाहिजेत. दोघांचें परस्पर प्रिय व अनुकूल आचरण झालें पाहिजे. कोणीहि व्यभिचार किंवा विरोध कधींहि करतां नये. घरांतील सर्व कार्यें पुरुषाच्या आज्ञेप्रमाणें स्त्रीनें पहावीं व पुरुषानें बाहेरचीं करावीं. जेव्हां दोघांतून एक व्यसनांत फसूं लागेल तेव्हां त्याला उपदेश करून मागें हटविणें हें दुसऱ्याचें कर्तव्य आहे. सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावें कीं, विवाह झाल्याबरोबरच स्त्रीचें पुरुषावर व पुरुषाचें स्त्रीवर स्वाधीनत्व झालें. यामुळें परस्परांचे हावभाव किंवा परस्परांपाशीं नखशिखाग्रापर्यंत जें कांहीं आहे त्यावर परस्परांची पूर्ण सत्ता असते. म्हणून पुरुषानेंहि आपल्या स्त्रीच्या विरुद्ध व तिला अप्रिय असलेलें परस्त्रीगमन किंवा वेश्यागमन व अशासारखीं दुसरीं कोणतींहि कृत्यें करूं नयेत. त्याचप्रमाणें स्त्रीनेंहि परपुरुषगमनादि कृत्यें करूं नयेत. स्त्रीपुरुषांनी परस्परांवर नेहमीं प्रसन्न रहावें. जे वर्णानें ब्राह्मण असतील त्यांनीं मुलांनां विद्या शिकवावी व ज्या सुशिक्षित स्त्रिया असतील त्यांनीं मुलींना शिकवावें. नानाप्रकारचे उपदेश व व्याख्यानें देऊन सर्व लोकांना सुशिक्षित करावें. स्त्रियांनीं आपल्या पतीला पूजनीय देव असें मानावें व पुरुषानें आपल्या स्त्रीला पूजनीय देवी असें मानावें. जोंपर्यंत कन्या व पुत्र गुरुकुलामध्यें राहतील तोंपर्यंत त्यांनीं आपल्या अध्यापकांस आपल्या आईबापांच्या ठिकाणीं मानावें व अध्यापकांनीं आपल्या शिष्यांना आपल्या संतानांप्रमाणें मानावें.

आत्मज्ञानं समारम्भस्तितिक्षा धर्मनित्यता । यमर्था नापकर्षन्ति स वै पण्डित उच्यते ।। १ ।।
निषेवते प्रशस्तानि निन्दितानि न सेवते । अनास्तिकः श्रद्दधान एतत्पण्डितलक्षणम् ।। २ ।।
क्षिप्रं विजानाति चिरं शृणोति विज्ञाय चार्थं भजते न कामात् ।
नासम्पृष्टो ह्युपयुङ्क्ते परार्थे तत्प्रज्ञानं प्रथमं पण्डितस्य ।। ३ ।।
नाप्राप्यमभिवाञ्छन्ति नष्टं नेच्छन्ति शोचितुम् । आपत्सु च न मुह्यन्ति नराः पण्डितबुद्धयः ।। ४ ।।
प्रवृत्तवाक् चित्रकथ ऊहवान् प्रतिभानवान् । आशु ग्रंथस्य वक्ता च यः स पण्डित उच्यते ।। ५ ।।
श्रुतं प्रज्ञानुगं यस्य प्रज्ञा चैव श्रुतानुगा । असम्भिन्नार्यमर्यादः पण्डिताख्यां लभेत सः ।। ६ ।।

—महाभारत विदुरप्रजागर अ० ३२.

(अर्थ) ज्याला आत्मज्ञान झालें आहे, जो उद्योगी आहे, व कधींहि आळस करीत नाहीं, जो सुखदुःख, हानि, लाभ, मानापमान, निंदा, स्तुति यांमध्यें हर्ष किंवा शोक करीत नाहीं, जो नेहमी धर्मामध्यें स्थिर असतो, व ज्याचें मन विषयसंबंधीं पदार्थांनीं आकर्षित होत नाहीं, त्याला पंडित असें म्हणतात. जो सदोदित धर्मयुक्त कामें करतो, अधर्मयुक्त कृत्यांचा त्याग करतो, ईश्वर, वेद, व सदाचार यांची निंदा करीत नाहीं, व ईश्वरावर अत्यंत श्रद्धा ठेवतो त्याला पंडित असें म्हणतात: ज्याला कठीण विषय लवकर समजतो, जो पुष्कळ काळपर्यंत शास्त्रांचें अध्ययन, श्रवण, व मनन करतो, जें कांहीं ज्ञान प्राप्त झालें असेल त्याचा परोपकारार्थ व्यय करतो, कोणात्याहि कामास स्वार्थानें प्रेरित हौत नाहीं, कोणी न विचारतां किंवा अयोग्य वेळीं दुसऱ्याच्या कार्यांत प्रविष्ट होत नाहीं, त्याला पंडित असें म्हणतात. जो अप्राप्य वस्तूची इच्छा करीत नाहीं, व नष्ट झालेल्याबद्दल शोक करीत नाहीं, आपत्कालीं मोह पावत नाहीं किंवा व्याकुळ होत नाहीं, त्या बुद्धिमानांला पंडित असें म्हणतात. ज्याची वाणी सर्व विद्यांमध्यें व प्रश्नोत्तरें करण्यांत निपुण असते, जो अनेक प्रकारच्या शास्त्रप्रकरणांचें विवरण करूं शकतो, तर्क व स्मृतिग्रंथांचें जो यथार्थ व शीघ्र स्पष्टीकरण करतो त्याला पंडित असें म्हणतात. ज्याची बुद्धि ऐकलेल्या सत्य अर्थाला अनुकूल असतें, ज्याचें श्रवण बुध्दिला अनुकूल असतें, व जो केव्हांहि आर्यांच्या-म्हणजें श्रेष्ठ पुरुषांच्या-मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं, त्याला पंडित असें म्हणतात. ज्या गुरुकुलामध्यें असें अध्यापक असतात, तेथें विद्या, धर्म, व उत्तमाचार यांची वृद्धि हौते, व त्यामुळें प्रतिदिवशीं आनंद वाढत असतो.

अश्रुतश्च समुन्नद्धो दरिद्रश्च महामनाः । अर्थांश्चाकर्मणा प्रेप्सुर्मूढ इत्युच्यते बुधैः ॥ १ ॥
अनाहूतः प्रविशति ह्यपृष्टो बहु भाषते । अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधमः ॥ २ ॥

महाभारत विदुरप्रजागर अ० ३२.

(अर्थ) ज्यानें कोणतेंहि शास्त्र म्हटलें नाहीं व ऐकलेंहि नाहीं, ज्याला घमेंड फार आहे, जो दरिद्री असतांहि मोठे मनोरथ करीत असतो, कर्म केल्यावांचून जो फल व्हावें असें इच्छितो, त्याला बुद्धिमान् लोक मूर्ख असें म्हणतात. जो न बोलावतां सभेंत किंवा कोणाच्या घरीं जातो, व तेथें मोठ्या आसनावर बसतो, कोणी न विचारतांहि पुष्कळ वटवटतो, अविश्वासू मनुष्यावर विश्वास ठेवतो, त्याला मूर्ख असें म्हणतात. हा सर्व मनुष्यांत हीन योग्यतेचा समजावा. ज्या ठिकाणीं अशा तऱ्हेचे मूर्ख अध्यापक असतात, तेथील लोकांत अविद्या, अधर्म, असभ्यता, कलह, विरोध व दुही हीं वाढतात व त्यायोगानें सर्वांस दुःख भोगावें लागतें.

आलस्यं मदमोहौ च चापलं गोष्ठिरेव च ॥ स्तब्धता चाभिमानित्वं तथाऽत्यागित्वमेव च ॥
एते वै सप्त दोषाः स्युः सदा विद्यार्थिनां मताः ॥
सुखार्थिनः कुतोविद्याकुतोविद्यार्थिनः सुखम् । सुखार्थी वा त्यजेद्विद्यां विद्यार्थी वा त्यजेत्सुखम् ॥

महा. विदुरप्रजागर अ० ३९.

(अर्थ) [आलस्यं] शरीरिक व मानसिक जडत्व, [मदमोहौ] कैफ म्हणजे कोणत्याहि वस्तूसंबंधानें मन फसून जाणें, अस्थिरपणा, इकडच्या तिकडच्या व्यर्थ गोष्टी करणें व ऐकणें, शिकण्याशिकवण्यांत थांबणें, अभिमान, स्वार्थी असणें हे सात दोष विद्यार्थ्यांमध्यें नसावें. जे विद्यार्थी या सात दोषांनीं युक्त असतील त्यांना विद्या येत नाहीं. चैन करण्याची इच्छा करणाराला विद्या कशी येणार ? व विद्या शिकूं इच्छिणाराला चैन कशी भोगतां येणार ? विषयसुखाची जो इच्छा करीत असेल त्यानें विद्या सोडावी व विद्या शिकणारानें विषयसुख सोडावें.

सत्ये रतानां सततं दान्तानामूर्ध्वरेतसाम् । ब्रह्मचर्यं दहेद्राजन् सर्वपापान्युपासितम् ॥ १ ॥

(अर्थ) 'जे सदाचारामध्यें प्रवृत्त असतात, ज्यांचीं इंद्रियें स्वाधीन झालीं आहेत, ज्यांचें वीर्य स्खलन झालेलें नाहीं, त्यांचेंच ब्रह्मचर्य पूर्ण होतें व तेच पूर्ण विद्वान् होऊं शकतात.' यासाठीं अध्यापक व अध्यापिका यांनीं आपलें आचरण उत्तम ठेवावें व आपल्या अंगांत पंडितत्वाचीं सर्व लक्षणें वास करतील असें करावें. अध्यापक लोकांनीं आपल्या शिष्यांना असें शिक्षण द्यावें कीं, ते सत्यवादी, सत्याभिमानी, सत्यकारी, सभ्य, जितेंद्रिय, सुशील, शारीरिक व आत्मिकबलानें युक्त, सर्व वेदादिशास्त्रांमध्यें प्रवीण, सर्व उत्तम गुणांनीं युक्त होतील. ज्यांच्या साहचर्यानें कुचेष्टा नाहींशा होऊन शिकण्यांत आनंद मानणारे विद्यार्थी होतील असे सदाचारी व दीर्घोद्योगी अध्यापक असले पाहिजेत. विद्यार्थ्यांनींहि स्वतः जितेंद्रिय, शांत, विचारशील, प्रयत्नशील, सद्गुणी व शिक्षकांवर प्रीति करणारे असें व्हावें व त्यांनीं ब्रह्मचर्यानें पूर्णायुष्य संपादन करावें, पूर्ण विद्या मिळवावी. धर्माचें पूर्ण ज्ञान मिळवावें व पुरुषार्थ करण्याची इच्छा वाढवावी; हीं ब्राह्मणवर्णाचीं कामें आहेत. क्षत्रियांचीं कामें पुढें राजधर्म प्रकरणांत सांगण्यांत येतील. ब्रह्मचर्याच्या नियमांचें पालन करून वेदादि शास्त्रांचें अध्ययन करणें, विद्या पुरी जाहल्यावर विवाह करणें, नाना देशांच्या भाषा शिकणें, नाना प्रकारच्या व्यापाराची रीति शिकणें, व्यापारांतील भाव समजून घेणें, खरेदीविक्रीच्या सर्व खुब्या शिकणें, द्वीपद्वीपांतरी व देशदेशांतरीं जाणें येणें, लाभ व्हावा म्हणून निरनिराळीं कार्यें आरंभणें, पशूंचें पालन करणें, शेती करणें व ती सुधारण्याचे सर्व उपाय करणें, शेती दुसऱ्यांकडून करविणें, द्रव्य वाढविणें, विद्या व धर्म यांची वाढ करण्यासाठीं द्रव्याचा व्यय करणें, सत्यवादी व निष्कपटी होऊन सचोटीनें व्यापार करणें, सर्व पदार्थांचें नाश न होईल अशा रीतीनें रक्षण करणें इत्यादि कर्तव्यें वैश्यांचीं आहेत. शूद्र सेवा करण्यांत, चतुर पाकविद्येमध्यें निपुण, द्विजांची सेवा प्रेमानें करणारे असे असावेत. या सेवेवर त्यांनीं आपली उपजीविका करावी. या शूद्रांना खाणें, पिणें, वस्त्रपात्र, स्थान विवाह वगैरेसाठीं जो खर्च लागतो तो सर्व द्विजांनीं द्यावा, किंवा मासिक वेतन

त्यांना द्यावें; तात्पर्य चारहि वर्णनीं परस्परांत प्रीतिपूर्वक व सज्जनतापूर्वक वागावें. तसेंच सर्वांनीं सुख, दुःख, हानी, लाभ वगैरेमध्यें एकमतानें राहून राज्य व प्रजा यांची उन्नति करण्यासाठीं तन, मन व धन यांचा व्यय करण्यास तयार असावें.

**पानं दुर्जनसंसर्गः पत्या च विरहोऽटनम् । स्वप्नोऽन्यगेहवासश्च नारीसन्दूषणानि षट् ॥** मनु० ९।१३.

**(अर्थ)** **'मद्य, भांग आदिक मादक द्रव्यांचें सेवन करणें, दुष्ट पुरुषांशीं सहवास करणें, पतीचा वियोग होणें, इकडे तिकडे [पाखंडी किंवा ढोंगी लोकांचें दर्शन घेण्याच्या मिषानें] व्यर्थ एकटीच फिरणें, दुसऱ्याच्या घरीं वास्तव्य करणें व तेथेंच शयन करणें हे सहा प्रकार स्त्रीला दूषित करणारे आहेत. या स्त्रीदूषणांच्या अनुरोधानें पुरुष कसा दूषित होतो हेंहि जाणावें. स्त्रीपुरुषांचा वियोग दोन प्रकारचा आहे. (१) कांहीं कार्य करण्यासाठीं देशांतरीं पुरुष जातो तेव्हां त्याचा जो स्त्रीशीं वियोग होतो तो साधारण वियोग होय. होतां होईल तों पुरुषानें स्त्रीला आपल्या बरोबर घेऊन जावें हें चांगलें. कारण स्त्रीपुरुषांचा वियोग फार दिवस होणें योग्य नाहीं. (२) मृत्यूनें जो स्त्रीपुरुषांमध्यें** वियोग होतो तो विशेष प्रकारचा वियोग आहे असें समजावें.

**(प्रश्न)** स्त्रीपुरुषांनीं पुष्कळ विवाह करावे कीं नाहीं ? **(उत्तर)** एकाच समयीं स्त्रीपुरुषांनीं पुष्कळ विवाह करूं नयेत. **(प्रश्न)** काय विशिष्ट समयीं केलें तर चालतील ? **(उत्तर)** स्त्री जिवंत असेपर्यंत पुरुषानें व पुरुष जिवंत असेपर्यंत स्त्रीनें दुसरा विवाह करूं नये. **(प्र०)** काय स्त्रियांनीं पुनर्विवाह करावा असें तुम्हीं म्हणतां ? **(उ०)** होय, मनूचें म्हणणें पहा—

**साचेदक्षतयोनिः स्याद् गतप्रत्यागतापि वा । पौनर्भवेन भर्त्रा सा पुनः संस्कारमर्हति ॥** मनु० ९।१७६.

**(अर्थ)** 'ज्या स्त्रीचें पाणिग्रहण मात्र झालें असेल व पुरुषसंयोग झाला नसेल, अशा अक्षत-योनि विधवेचा पुनर्विवाह व्हावा हें योग्य आहे.' त्याचप्रमाणें जो पुरुष अक्षतवीर्य असतां विधुर झाला असेल त्यानेंही आपला विवाह करावा. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या द्विजातींनीं, क्षत-योनि झाल्यावर स्त्रीनें व क्षतवीर्य झाल्यानंतर पुरुषानें पुनर्विवाह करूं नये; करणें असेल तर नियोग करावा. **(प्रश्न)** पुनर्विवाह करण्यांत दोष काय ? **(उत्तर)** पाहिजे तेव्हां स्त्रीपुरुषांनीं एकमेकांस सोडचिठ्ठी देऊन द्वितीय विवाह करणें हें शास्त्रविरुद्ध आहे. असें करण्यापासून परस्परांत प्रीति वाढत नाहीं हा पहिला दोष आहे. दुसरा दोष असा कीं, जेव्हां स्त्री मेल्यानंतर पुरुष किंवा पुरुष मेल्यावर स्त्री पुनर्विवाह करूं लागेल, तेव्हां पहिल्या स्त्रीचे किंवा पुरुषाचे सर्व पदार्थ नाहींसे केले जातात व त्यामुळें त्यांच्या कुटुंबांमध्यें व संबंधीं लोकांमध्यें तंटे उत्पन्न होतात. तिसरा दोष असा कीं, अशा योगानें पुष्कळ भद्रपुरुषांचें नांव, गांव, पत्ता नाहींसा होतो, कारण पुनर्विवाहानें स्त्री दुसऱ्याच्या घरीं जाते व पूर्वीच्या घराशीं तिचा कांहीं संबंध राहत नसल्यामुळें त्या पूर्वपतीच्या सर्व वस्तूंचा नाश होतो. चौथा दोष हा आहे कीं, पतिव्रता व स्त्रीव्रत हे धर्म नष्ट होतात. इत्यादि अनेक दोष उत्पन्न होतात म्हणून द्विजांमध्यें क्षतयोनी स्त्रीचा व क्षतवीर्य पुरुषाचा पुनर्विवाह करीत नाहींत; **(प्रश्न)** संतान नसल्यामुळें निर्वंश होऊन कुल नष्ट होऊं लागलें तरीहि पुनर्विवाह करूं नये काय ? स्त्रीपुरुष व्यभिचार करूं लागतील व त्यांमुळें गर्भपातनादि अनेक दुष्ट कृत्यें सुरू होतील. त्यापेक्षां पुनर्विवाह चांगला आहे कीं नाहीं ? **(उत्तर)** नाहीं; **विधवा स्त्रीनें व त्याचप्रमाणें विधुर पतीनें आमरणान्त ब्रह्मचर्य धारण करून** राहणें हें फारच चांगलें. त्यापासून कांहीं उपद्रव होणार नाहीं. ज्याला आपलें कुल नष्ट होऊं नये असें वाटत असेल, त्यानें हवा तर आपल्या ज्ञातींतील मुलगा दत्तक घ्यावा म्हणजे कुल नाश पावणार नाहीं. पण ज्यांना ब्रह्मचर्य पालन करणें अगदीं अशक्य आहे असें वाटत असेल, त्यांनीं नियोग करून संतान उत्पन्न करावें.

**(प्रश्न)** पुनर्विवाह व नियोग यांत भेद काय ? **(उत्तर)** (१) ज्याप्रमाणें विवाहित कन्या पित्याचें घर सोडून पतीच्या घरीं जाऊन राहते, व पित्याच्या घराशीं कांहीं संबंध ठेवित नाहीं, त्याचप्रमाणें विधवा स्त्रीचा पुनर्विवाह झाल्यावर ती आपल्या दुसऱ्या पतीच्या घरीं जाऊन राहते. (२) पुनर्विवाहित स्त्रीचे पुत्र पुनर्विवाहित पतीच्या मालमत्तेचे हक्कदार प्रथम-विवाहित स्त्रीच्या पुत्रांप्रमाणेंच होतात, पण नियोग केलेल्या स्त्रीचे पुत्र मृतपतीचे वंशज समजले जातात. वीर्यदान करणाऱ्या पुरुषाचें गोत्र त्यांना प्राप्त होत नसून ते पूर्णपणें मृतपतीचे पुत्र व गोत्रज समजले जातात व ते त्याचेच दायभागी होतात

व त्याच्याच घरांत राहतात. (३) विवाहित स्त्रीपुरुषांनीं परस्परांची सेवा करणें आवश्यक असतें, पण नियुक्त स्त्रीपुरुषांचा तसा कांहीं संबंध नसतो. विवाहित स्त्रीपुरुषांचा संबंध मरणापर्यंत असतो पण नियुक्त स्त्रीपुरुषांचा संबंध संतानोत्पत्तीचें कार्य संपेपर्यंत असतो. विवाहित स्त्रीपुरुष एकाच घरांत राहतात व तेथेंच सर्व कार्यें करतात, पण नियुक्त स्त्रीपुरुष आपआपल्या पूर्वीच्या घरींच राहतात व आपआपल्या पूर्वीच्या घरासंबंधीं सर्व कृत्यें करीत असतात. याप्रमाणें पुनर्विवाह व नियोगामध्यें भेद आहेत (प्रश्न) विवाह व नियोग यांचे नियम एकच आहेत कीं त्यांत भिन्नता आहे? (उत्तर) त्यांत थोडासा भेद आहे. कांहीं भेद पूर्वी सांगितले आहेत व आणखी जे आहेत ते येथें सांगतों. विवाहित स्त्रीपुरुषांनीं फार तर दहा मुलेंच उत्पन्न करावीत असा धर्माचा नियम आहे. पण नियुक्त स्त्रीपुरुषांनीं एक पतीस व एक स्त्रीस मिळून दोन किंवा फारतर चार मुलें उत्पन्न करावीं यापेक्षां जास्त करूं नयेत, असा प्रतिबंध आहे. कुमार व कुमारिका यांचा जो लग्नसंबंध होतो त्यास विवाह असें म्हणातात. अक्षतयोनि स्त्री व अक्षतवीर्य पुरुष यांचा जो पुनः लग्नसंबंध होतो त्याला पुनर्विवाह म्हणतात. क्षतयोनी विधवा स्त्री व क्षतवीर्य विधुर पुरुष यांचा विशिष्ट नियमाप्रमाणें संतानोत्पत्तीपर्यंत जो संबंध असतो त्यास नियोग असें म्हणतात. कुमारकुमारिकांचा नियोग होत नाहीं. विवाहित स्त्री व पुरुष ज्याप्रमाणें सदोदित एकमेकांच्या सानिध्यांमध्यें राहतात, त्याप्रमाणें नियुक्त स्त्रीपुरुषांनीं राहूं नये. प्रतिमासीं ऋतुकालीं ऋतुदान समयापुरताच त्या दोघांचा एकत्र वास असावा. दुसऱ्या कोणत्याहि वेळीं त्यांनीं एकत्र होऊं नये. जर स्त्रीनें आपणासाठीं नियोग केला असेल तर दुसरा गर्भ धारण झाल्या दिवसापासून नियुक्त पतीशीं संबंध ठेवूं नये. जर पुरुषानें आपणासाठीं नियोग केला असेल तरी देखील दुसरा गर्भ राहिल्या दिवसापासून त्या स्त्रीशीं त्यानें संबंध ठेवूं नये. स्त्रीनें मात्र दोन तीन वर्षेंपर्यंत त्या मुलाचें पालन करून नंतर तें मूल त्या नियुक्त पुरुषाला द्यावें. याप्रमाणें एक विधवा स्त्री विधुर पुरुषांशीं नियोग करून आपणासाठीं दोन व त्या पुरुषासाठीं जरूर असल्यास दोन याप्रमाणें चार मुलें उत्पन्न करूं शकते. एक विधवा स्त्री जरूर असल्यास फार तर चार नियोग करूं शकते व त्याचप्रमाणें एक विधुर पुरुष चार नियोग करूं शकतो. अर्थात् चार नियुक्त पुरुषापासून ती आपल्या ठिकाणीं दहा मुलें उत्पन्न करूं शकते. दोन आपणाकरितां व चार त्या पुरुषांकरितां प्रत्येकीं दोन दोन मिळून दहा. त्याचप्रमाणें पुरुषहि चार स्त्रियांशीं नियोग करून दहापर्यंत मुलें उत्पन्न करूं शकतो असें जाणावें.

**इमां त्वमिन्द्र मीढ्वः सुपुत्रां सुभगां कृणु । दशास्यां पुत्रानाधेहि पतिमेकादशं कृधि ॥** ऋ. १०।८५।४५.

[**अर्थ**] 'हे (मीढ्व इन्द्र) वीर्य सेचन करण्यास समर्थ व ऐश्वर्ययुक्त पुरुषा, (इमाम्) या विवाहित स्त्रीला व नियुक्त विधवा स्त्रीला (सुपुत्राम्) श्रेष्ठ पुत्रांनीं युक्त व (सुभगाम्) सौभाग्ययुक्त (कृणु) कर. हे पुरुषा ! तूं हिच्या ठिकाणीं दहा पुत्र उत्पन्न कर व नंतर अकरावी स्त्री पुत्रवत् आहे असें समज. तसेंच हे स्त्रिये ! तूंहि या विवाहित अथवा नियुक्त पुरुषापासून दहा पुत्र उत्पन्न कर व नंतर पतीला अकरावा पुत्र समज.' या वेदाच्या आज्ञेप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या द्विजांतील स्त्री–पुरुषांनीं दहापेक्षां जास्त मुलें उत्पन्न करूं नयेत असें ठरतें. कारण जास्त संतती झाल्यानें ती निर्बल, निर्बुद्ध व अल्पायु होते व स्त्रीपुरुषहि निर्बल, अल्पायु व रोगी होतात व त्यांस वार्धक्यामध्यें अनेक रोग होऊन फार दुःख होतें. [**प्रश्न**] हा नियोग व्यभिचारासारखा दिसत नाहीं काय ? [**उत्तर**] ज्याप्रमाणें अविवाहित स्त्रीपुरुषांच्या समागमाला व्यभिचार असें म्हणतात त्याचप्रमाणें अनियुक्त स्त्रीपुरुषांच्या समागमालाहि व्यभिचार असें म्हणतात. विवाहित व नियुक्त स्त्रीपुरुषांच्या समागमाला व्यभिचार म्हणत नाहींत, कारण तसे शास्त्रांत विधि आहेत. जसें शास्त्राप्रमाणें विवाहविधि करून, दुसऱ्याच्या मुलीशीं पाणिग्रहण झाल्यावर संबंध ठेवण्यास कोणासहि लज्जा वाटत नाहीं, त्याचप्रमाणें विधिपूर्वक धर्मशास्त्राप्रमाणें नियोग केल्यास त्यांस पाप किंवा लज्जा वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. [**प्रश्न**] हें ठीक आहे. पण हें वेश्यागमनासारखें दिसत नाहीं काय ? [**उत्तर**] नाहीं, पहा. वेश्यागमनामध्यें निश्चित स्त्रीपुरुषांचाच संबंध नसतो; पण ज्याप्रमाणें विवाहामध्यें त्याचप्रमाणें नियोगामध्येंहि निश्चित स्त्रीपुरुषांचा संबंध घडत असतो. ज्याप्रमाणें विवाह केल्यानंतर आपल्या विवाहित स्त्रीशीं संबंध ठेवण्यास हरकत नाहीं, त्याचप्रमाणें नियोग केल्यानंतरहि जाणावें. ज्यांचा स्वभाव व्यभिचार करावयाचा असेल अशा स्त्रीपुरुषांकडून योग्य पद्धतीनें विवाह

झाल्यावरहि व्यभिचार घडत असतो. तेव्हां नियोगानें असें पाप जास्त वाढेल असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. **(प्रश्न)** आमच्या दृष्टीनें नियोगामध्यें पाप दिसतें तेव्हां कसे ? **(उत्तर)** जर आपणांस विधिपूर्वक नियोग करण्यांत पाप दिसतें तर मग आपण विवाहामध्यें कां नाहीं पाप समजत ? वैराग्यवान् व पूर्ण विद्वान् योगी यांची गोष्ट निराळी; पण साधारण जनतेच्या स्वभावाकडे व सृष्टिक्रमाकडे पाहिलें असतां नियोगाला प्रतिबंध करण्यापासूनच पाप घडतें असें आपणांस आढळेल. गर्भपात, भ्रूणहत्या, विधवा व विधुरापासून होणारीं अनंत संतापजनककृत्यें हीं नियोगाला प्रतिबंध केल्यापासूनच उत्पन्न झालेलीं आहेत. तेव्हां स्त्रीपुरुष तरुण असतात, संतानोत्पत्तीची व विषयोपभोगाची प्रबळ इच्छा त्यांच्या मनांत स्फुरण पावत असते, वैधव्यानें व विधुरतेनें त्यांच्या त्या इच्छांना प्रतिबंध होऊं लागतो व राजव्यवहार व जातिव्यवहाराच्या योगानें त्यांना त्या इच्छा सफल करून घेणें शक्य नसतें तेव्हां गुप्तपणानें पूर्वी लिहिलेलीं कुकर्में करून आपणवर अनेक अनर्थ ते ओढवून घेतात. **जे स्त्रीपुरुष विधवा व विधुर स्थितींत नियोग न करतां जितेंद्रिय राहून आपला काल धर्मार्जनांत घालवतात ते खरोखर धन्य व श्रेष्ठ होत.** पण जे या श्रेष्ठ दर्जाचे लोक नसतात व जे जितेंद्रिय राहूं शकत नाहींत, त्यांना अक्षतयोनी स्त्री व अक्षतवीर्य पुरुष यांचा पुनर्विवाह व इतरांचा आपत्कालच्या धर्मांप्रमाणें नियोग केला तर पूर्वोक्त व्यभिचार व कुकर्में कमीं होतील. मनुष्यांमध्यें प्रेमाची वृद्धि होऊन प्रजावृद्धि होईल. गर्भपातादिक अनर्थ होणार नाहींत. नीच पुरुषांशीं उत्तम स्त्रीचा संबंध व वेश्यादि नीच स्त्रियांशीं उत्तम पुरुषांचा संबंध होण्याचें कमी होईल; कुळ कलंकित, होणें, वंशाचा उच्छेद, स्त्रीपुरुषांमध्यें संताप व भ्रूणहत्या इत्यादि कुकर्में होणार नाहींत. यासाठीं विवाह व नियोग या पद्धती आवश्यक आहेत.

[**प्रश्न**] नियोगामध्यें कोणकोणत्या गोष्टी झाल्या पाहिजेत ? [**उत्तर**] ज्याप्रमाणें विवाह उघड होतो त्याचप्रमाणें नियोगहि प्रसिद्धपणें व्हावा. ज्याप्रमाणें विवाहामध्यें चांगल्या पुरुषांची अनुमति असते आणि वधू व वर प्रसन्न असतात, त्याचप्रमाणें नियोगांतहि असावें. जेव्हां स्त्रीपुरुषांचा नियोग व्हावयाचें ठरेल तेव्हां त्यांनीं आपआपल्या कुटुंबांतील स्त्रीपुरुषांपुढें सांगावें कीं, आम्ही संतानोत्पत्तीसाठीं नियोग करीत आहों. जेव्हां नियोगाचा नियम पूर्ण होईल तेव्हां आमचा परस्पर संबंध मुळींच राहाणार नाहीं व जर नंतर आम्ही संबंध ठेवला, तर आम्ही पापी होऊं व राजा व ज्ञाति यांच्याकडून दंडनीय होऊं. महिन्यांतून एक वेळ ऋतुकाळींच आम्ही गर्भाधान कर्म करूं व गर्भधारणा झाल्यावर एक वर्षपर्यंत पृथक् राहूं. **(प्रश्न)** नियोग आपल्या वर्णामध्येंच व्हावा कीं अन्य वर्णांशींही व्हावा ? **(उत्तर)** आपल्या वर्णांतील व आपल्यापेक्षां उत्तम वर्णस्थ पुरुषाशीं नियोग करावा. वैश्य स्त्रीनें वैश्य, क्षत्रिय किंवा ब्राह्मण पुरुषाशीं, क्षत्रिय स्त्रीनें क्षत्रिय व ब्राह्मण याशीं व ब्राह्मणीनें ब्राह्मणाशींच नियोग करावा. तात्पर्य हें आहे कीं, वीर्य आपणापेक्षां उत्तम किंवा आपल्या समान वर्णाचें असलें पाहिजे. नीच वर्णाचें असूं नये. स्त्रीपुरुषांनीं वेदोक्त धर्माप्रमाणेंच आपले विवाह व नियोग हे विधि करावे हें त्यांस योग्य आहे. **(प्रश्न)** पुरुषाला नियोग करण्याची काय आवश्यकता आहे ? कारण तो दुसरा विवाह करूं शकतो. **(उत्तर)** आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे कीं, **वेदादि शास्त्रांमध्यें द्विज स्त्रीपुरुषांनीं एक वेळच विवाह करावा असें आहे.** त्यांनीं दुसरा विवाह करतां नये. कुमार व कुमारिका यांचा विवाह होणें हा न्याय होय; पण विधवा स्त्रीचा कुमाराशीं व कुमारीचा विधुर पुरुषाशीं विवाह होणें हा अन्याय व अधर्म आहे. ज्याप्रमाणें विधवेशीं पुरुष विवाह करूं इच्छित नाहीं त्याचप्रमाणें विधुराशीं विवाह करावा असें कुमारिकेलाहि वाटत नाहीं. ज्याअर्थी विधवेशीं कुमार व विधुराशीं कुमारिका विवाह करूं इच्छित नाहीं त्याअर्थी विधवा व विधुर यांमध्यें नियोग व्हावा हें उचित आहे. समानधर्मीयांशीं संबंध होणें हाच खरा धर्म आहे. **(प्रश्न)** ज्याप्रमाणें विवाहाविषयीं वेदादि शास्त्रांमध्यें प्रमाणें आहेत त्याचप्रमाणें नियोगाबद्दलहि आहेत काय ? **(उत्तर)** पुष्कळ प्रमाणें आहेत. पहा—

**कुहस्विद्दोषा कुह वस्तोरश्विना कुहाभिपित्वं करतः कुहोषतुः ।।**
**को वां शयुत्रा विधवेव देवरं मर्यं न योषा कृणुते सधस्थ आ ।।** ऋ० मं० १०।४०।२.

**(अर्थ)** हे **(अश्विना)** स्त्रीपुरुषहो ! ज्याप्रमाणें (विधवेव) विधवा (देवरम्) देवराशीं व (योषा) विवाहित स्त्री (मर्यम्) जशी आपल्यापतीशीं (सधस्थे) शय्या व स्थान यांमध्यें एकत्र होऊन संतानोत्पत्ति [आ-कृणुते] करते त्याप्रमाणें तुम्हीहि करावें. (कुहस्वित् दोषा) रात्रीमध्यें कोठें (कुहवस्तोः) व दिवसाला कुठे असतां ? (कुहाभिपित्वं) पदार्थांची प्राप्ति कुठें (करतः) केली ? (कुहोषतुः) कोणत्यावेळीं कोठें होतां ? **(को वां शयुत्रा)** तुमचें शयनस्थान कोठें आहे ? किंवा तुम्ही कोणत्या देशांतील राहणारे आहां ?' या वेदमंत्रांतील प्रश्नांवरून उघड होतें कीं, स्त्री व पुरुष यांनीं स्वदेशीं व विदेशीं एकत्र रहावें. त्याप्रमाणें विधवेनें विवाहित पतिप्रमाणेंच नियुक्त पतीला मानून संतानोत्पत्ति

कोठें आहे ? किंवा तुम्ही कोणत्या देशांतील राहणारे आहां ?' या वेदमंत्रांतील प्रश्नांवरून उघड होतें कीं, स्त्री व पुरुष यांनीं स्वदेशीं व विदेशी एकत्र रहावें. त्याप्रमाणें विधवेनें विवाहित पतिप्रमाणेंच नियुक्त पतीला मानून संतानोत्पत्ति करावी. (प्रश्न) या मंत्रांत देवराशीं नियोग करावा असें आहे पण जिच्या पतीला लहान भाऊ नसेल तिनें कोणाशीं नियोग करावा? (उत्तर) देवर शब्दाचा तुम्ही समजतां तसा अर्थ नाहीं; [**देवरः कस्माद्द्वितीयो वर उच्यते ॥** निरु. ३।१५] द्वितीय वराला 'देवर' असें म्हणतात, मग तो पतीचा लहान भाऊ असो, किंवा मोठा असो, आपल्या वर्णाचा किंवा आपल्याहून उच्च वर्णाचा असो. ज्याच्याशीं नियोग होतो त्याला देवर असें म्हणतात.

**उदीर्ष्व नार्यभिजीवलोकं गतासुमेतमुप शेष एहि। हस्तग्राभस्य दिधिषोस्तवेदं पत्युर्जनि त्वमभि सं बभूथ ॥** ऋ० मं०१० ।१८।८.

[अर्थ] 'हे (नारी) विधवा स्त्रिये, (एतं गतासुम्) मेलेल्या पतीची आशा सोडून (शेषे) बाकी राहिलेल्या पुरुषांमधील (अभि, जीवलोकम्) जिवंत असलेल्या वराला (उपेहि) प्राप्त हो. (उदीर्ष्व) या गोष्टीचा विचार कर कीं, (हस्तग्राभस्य दिधिषोः) तुझें पाणिग्रहण करणाऱ्या नियुक्त पतीसाठीं तुझा नियोग झाला असला तर (इदम्) हें (जनित्वम्) बालक त्या नियुक्त (पत्युः) पतीचें होईल व जर तू तुझ्यासाठीं नियोग करशील तर तें (तव) तुझें होईल. हा नियम मनांत धारण कर व (अभि सम् बभूथ) निश्चययुक्त हो.' याप्रमाणें नियुक्त पुरुषानेंहि या नियमांचें पालन करावें.

**अदेवृघ्न्यपतिघ्नीहैधि शिवा पशुभ्यः सुयमाः सुवर्चाः। प्रजावती वीरसूर्देवृकामा स्योनेममग्निं गार्हपत्यं सपर्य ॥** अथर्व० कांड १४।२।१८.

[अर्थ] 'हे (अपतिघ्नि) पतीला दुःख न देणाऱ्या व (अदेवृघ्नी) देवराला दुःख न देणाऱ्या स्त्रिये (इह) या गृहस्थाश्रमामध्यें (पशुभ्यः) पशुंचें (शिवा) कल्याण करणारी, (सुयमाः) उत्तम प्रकारें नियमाचें पालन करणारी, (सुवर्चाः) सौंदर्ययुक्त व शास्त्र जाणणारी (प्रजावती) उत्तम पुत्रपौत्रादिकांनीं युक्त, (वीरसूः) शूरवीर अशा पुत्रांना उत्पन्न करणारी (देवृकामा) देवराची कामना पुरी करणारी, (स्योना) सुख देणारी अशी तूं पति किंवा देवर यांना (एधि) प्राप्त हो व (इमम्) या (गार्हपत्यं) गृहस्थासंबंधीं (अग्निम्) अग्निहोत्राचें (सपर्य) सेवन कर.

**तामनेन विधानेन निजो विन्देत देवरः ॥** मनु. ९।६९.

[अर्थ] जी अक्षतयोनी स्त्री विधवा झाली असेल, तिच्याशीं तिच्या पतीच्या लहान भावानें विवाह करावा. (प्रश्न) एका स्त्रीनें व एका पुरुषानें किती नियोग करावे ? व विवाहित नियुक्त पतींचीं नांवें काय ? (उत्तर)—

**सोमः प्रथमो विविदे गन्धर्वो विविद उत्तरः। तृतीयो अग्निष्टे पतिस्तुरीयस्ते मनुष्यजाः ॥** ऋ. मं. १०।८५।४०

[अर्थ] 'हे स्त्रिये ! जो (ते) तुला (प्रथमः) पहिला विवाहित (पतिः) पति (विवेद) प्राप्त होतो, त्याला (सोमः) त्याच्या ठिकाणीं सुकुमारत्वादि गुण असल्यामुळें 'सोमः' असें म्हणतात. जो तुला नियोग करून दुसरा पति (विवेद) प्राप्त होतो त्याला, (गंधर्वः) त्यानें स्त्रीशीं पूर्वी संभोग केला असल्यामुळें 'गंधर्वः' असें म्हणतात. जो (तृतीय उत्तरः) या दोहोंनंतर तिसरा पति तुला मिळतो, त्याला (अग्निः) त्याच्या शरीरांत उष्णता फार असल्यामुळें 'अग्नि' असें म्हणतात, व जे (ते) तुला (तुरीयः) चवथ्यापासून अकराव्यापर्यंत पती मिळतील, त्यांना (मनुष्यजाः) 'मनुष्य' असें म्हणतात. **इमां त्वमिन्द्रा०** या मंत्रावरून स्त्रीनें अकरापर्यंत नियोग करावे व त्याचप्रमाणें पुरुषानेंहि अकरा नियोग करावे असें उघड होतें. (प्रश्न) वरील मंत्रांतील 'एकादश' या शब्दाचा अर्थ 'दहा पुत्र व अकरावा पती' असा कां समजूं नये ? (उत्तर) जर असा अर्थ केला तर 'विधवेव देवरम्।' 'देवरः कस्माद् द्वितीयो वर उच्यते।' अदेवृघ्नी' 'गंधर्वो विविद उत्तरः।' इत्यादि वेदवाक्यांच्या विरुद्ध अर्थ होईल. कारण तसा अर्थ केला असतां दुसऱ्या पतीची प्राप्तीच होत नाहीं; मग 'विधवेव देवरं' चा अर्थ कसा होणार ? तसेंच—

**देवराद्वा सपिण्डाद्वा स्त्रिया सम्यङ् नियुक्तया। प्रजेप्सिताधिगन्तव्या सन्तानस्य परिक्षये ॥**
**ज्येष्ठो यवीयसो भार्यां यवीयान् वाग्रजस्त्रियम्। पतितौ भवतो गत्वा नियुक्तावप्यनापदि ॥**
**औरसः क्षेत्रजश्चैव० ॥** मनु० ९।५९।५८।१५९.

(अर्थ) सपिंड म्हणजे पतीच्या सहा पिढ्यांमध्यें येणारा, पतीचा लहान किंवा मोठा भाऊ, स्वजातीय अथवा आपल्यापेक्षां उत्तम जातिस्थ पुरुष यांशीं विधवा स्त्रीचा नियोग व्हावा. विधुर व विधवा यांचा संतानोत्पत्तीसाठींच

नियोग होतो. किंवा पूर्वसंतानाचा नाश झाल्यानंतर नियोग करावा. आपत्काल नसतां अर्थात् संतानादिकांची अपेक्षा नसतां केवळ विषयसुखाच्या अनावर इच्छेनें जे नियोग करतात, मोठ्या भावाच्या स्त्रीशीं लहान भावाचा किंवा लहान भावाच्या स्त्रीशीं मोठ्या भावाचा पुत्र असतांना जो नियोग केला जातो, त्या योगानें ते सर्व पतित होतात. तसेंच नियोगाचें संतानोत्पत्ति हें कार्य संपल्यावर जे नियुक्त स्त्रीपुरुष परस्पर समागम करतात तेहि पतित होतात. दुसरा गर्भधारण होईपर्यंतच एका नियोगाची अवधि आहे. म्हणून दुसरा गर्भ धारण झाल्यावर परस्परांनीं संबंध ठेवूं नये. दोघांनीं जर परस्परांसाठीं नियोग केला अस तर चवथा गर्भ राहीपर्यंत समागम करावा. याप्रमाणें पूर्वोक्त पद्धतीनें वागलें असतां दहा मुलें उत्पन्न होऊं शकतात. यापुढें समागम करणें हें विषयासक्तीचें दर्शक आहे. अर्थात् त्याच्या योगानें मनुष्य पतित होतो. त्याचप्रमाणें विवाहित स्त्रीपुरुष दहापेक्षां जास्त मुलें होईप्रयंत समागम करतील तर तीं कामातुर व निंदनीय आहेत असें समजावें. अर्थात् विवाह किंवा नियोग केवळ संतानोत्पत्तिसाठींच केले जातात. पशूंप्रमाणें क्रीडा करण्यासाठीं नाहीं. **(प्रश्न)** पति मरण पावल्यावरच नियोग केला जातो कीं तो जिवंत असतांनाहि करतां येतो ? **(उत्तर)** पति जिवंत असतांनाहि करतां येतो, पण तो संतानोत्पत्तीला असमर्थ असला पाहिजे. [**अन्यमिच्छस्व सुभगे पतिं मत् ।।** ऋ. मं. १०।१०।१०.] जेव्हां पति संतानोत्पत्ति करण्यास असमर्थ होईल तेव्हां त्यानें आपल्या पत्नीस अशी आज्ञा करावी कीं, 'हे (सुभगे) सौभाग्याची इच्छा करणाऱ्या स्त्रिये ! तूं (मत्) माझ्याहून ( अन्यम् ) दुसऱ्या ( पतिम् ) पतीची ( इच्छस्व ) इच्छा कर. कारण माझ्याकडून आतां संतानोत्पत्ति होणार नाहीं.' अशी आज्ञा झाल्यावर त्या स्त्रीनें दुसऱ्याशीं नियोग करून संतानोत्पत्ति करावी. त्या स्त्रीनें आपल्या विवाहित पतीच्याच सेवेमध्यें सदैव तत्पर असलें पाहिजे. याचप्रमाणें जेव्हां स्त्री रोगादि दोषांनीं ग्रस्त होईल तेव्हां तिनेंहि आपल्या पतीस असें सांगावें कीं, 'हे स्वामिन् ! आपण मजकडून संतानोत्पत्तीची आशा सोडून द्या व दुसऱ्या विधवा स्त्रीशीं नियोग करून संतानोत्पत्ति करा.' या कथनानुसारच पूर्वी **पांडु** राजाच्या **कुंती व माद्री** नामक स्त्रियांनीं नियोग केले होते. त्याचप्रमाणें **व्यास** ऋषींनीं, चित्रांगद व विचित्रवीर्य मरण पावल्यावर, आपल्या भावांच्या स्त्रियांशीं नियोग करून अंबिकेच्या ठिकाणीं **धृतराष्ट्र** व अंबालिकेच्या ठिकाणीं **पांडु** व दासीच्या ठिकाणीं **विदुर** याप्रमाणें पुत्र उत्पन्न केले होते. या इतिहासावरूनहि पूर्वोक्त नियोगविषयक विधान खरें ठरतें.

**प्रप्रोषितो धर्मकार्यार्थं प्रतीक्ष्योऽष्टौ नरः समाः । विद्यार्थं षड् यशोर्थं त्रींस्तु वत्सरान् ।।** मनु. ९।७६.
**वन्ध्याष्टमेऽधिवेद्याब्दे दशमे तु मृतप्रजा । एकादशे स्त्रीजननी सद्यस्त्वप्रियवादिनी ।।** मनु. ९।८१.

**(अर्थ)** विवाहित स्त्रीनें, पति जर धर्मकार्यासाठीं विदेशीं गेला असेल तर आठ वर्षें वाट पहावी, विद्या व कीर्तीसाठीं गेला असेल तर सहा वर्षें वाट पहावी, धनासाठीं गेला असल्यास तीन वर्षें वाट पहावी नंतर नियोग करावा व संतानोत्पत्ति करावी. जेव्हां विवाहित पति येईल तेव्हां नियुक्त पतीशीं संबंध ठेवूं नये. याचप्रमाणें पुरुषानें वंध्या स्त्री असेल तर विवाहापासून आठ वर्षांनीं, मुलें उपजून मरत असतील तर दहा वर्षांनीं, पुत्र मुळींच होत नसेल व कन्याच मात्र होत असतील तर अकरा वर्षांनीं व अप्रिय भाषण करणारी स्त्री असेल तर ताबडतोब दुसऱ्या स्त्रीशीं नियोग करून संतानोत्पत्ति करावी. जर पुरुष अत्यंत दुःखदायक असेल तर स्त्रीनें त्याला सोडून दुसऱ्या पुरुषाशीं नियोग करून संतानोत्पत्ति करावी व त्या विवाहित पतीला दायभाग होणारीं मुलें उत्पन्न करावीं. इत्यादि प्रमाणानुसार व युक्तीला धरून स्वयंवर, विवाह य नियोग करून आपआपल्या कुलाची उन्नति करावी. विवाहित पतीपासून जो मुलगा उत्पन्न होतो त्याला **'औरस'** असें म्हणतात. हा पित्याच्या सर्व मालमत्तेचा स्वामी होतो. नियोग करून उत्पन्न झालेल्या पुत्राला **'क्षेत्रज'** असें म्हणतात. हाहि मृत पित्याचा दायभागी होतो. आतां या ठिकाणीं स्त्रीपुरुषांनीं ध्यानांत ठेवा कीं, आपल्या शरीरांत असलेलें रज व वीर्य हीं अमूल्य आहेत. जे कोणी या अमूल्य पदार्थाचा, वेश्येच्या संगानें किंवा दुष्ट पुरुषांच्या संगानें व्यय करतात, त्यांना महामूर्ख असें समजावें. साधारण शेतकरी किंवा माळीदेखील आपल्याकडे असलेलें बीज आपाल्या शेताखेरीज किंवा बागेखेरीज दुसरीकडे पेरीत नाहीं. जर तो आपलें शेत टाकून दुसरीकडे तें बीज फेंकूं लागला तर त्यास मूर्ख म्हणतात. याप्रमाणें जर साधारण मनुष्याची स्थिति आहे तर मग जो पुरुष आपल्या शरीररूपीं उत्तम वृक्षाच्या बीजाला वेश्यादिक वाईट क्षेत्रांत फेंकून देतो त्याला महामूर्ख म्हटलें तर वावगें

होणार नाहीं; कारण त्या पेरलेल्या बीजाचें फल त्यास मिळत नाहीं. पहा **'आत्मा वै जायते पुत्रः'** असें ब्राह्मण-ग्रंथांत सांगितलें आहे. तसेंच—

**अङ्गादङ्गात्संभवसि हृदयादभिजायसे । आत्मा वै पुत्रनामासि सजीव शरदः शतम् ।।** निरु० ३।४

**[अर्थ]** 'हे पुत्रा ! तूं प्रत्येक अंगामधून उत्पन्न झालेल्या बीर्यापासून व हृदयापासून उत्पन्न होतोस, म्हणून तूं माझा आत्मा आहेस. माझ्यापूर्वी मरूं नको, शंभर वर्षेपर्यंत जिवंत रहा.' ज्या वीर्यापासून मोठमोठे महात्मे व महाशय उत्पन्न होतात त्या वीर्याचा वेश्यादिक दुष्ट क्षेत्रामध्यें नाश करणें, किंवा दुष्ट वर्णांचें बीज-वीर्य-उत्तम क्षेत्रामध्यें पेरणें, हीं दोनहि कृत्यें फारच हानिकारक आहेत. **(प्रश्न)** विवाह कां करावा ? विवाहाच्या योगानें स्त्री व पुरुष बंधनामध्यें पडून, दोघांनाहि फार संकोच होतो व दुःख भोगावें लागतें. म्हणून ज्यांमध्यें प्रीति उत्पन्न होईल त्यानीं इष्ट वाटेल तोंपर्यंत एके ठिकाणीं रहावें व जेव्हां प्रीतीमध्यें बिघाड होईल तेव्हां संबंध सोडून द्यावा. असें केलें असतां बरें कीं वाईट ? **(उत्तर)** असें करणें हा पशुपक्षी यांचा व्यवहार आहे, मनुष्यांचा नाहीं. जर मनुष्यामध्यें विवाहाचा निर्बंध राहणार नाहीं तर गृहस्थाश्रमांतील उत्तम उत्तम व्यवहार नष्ट व भ्रष्ट होऊन जातील. वृद्धावस्थेमध्यें कोणी कोणाची सेवा करणार नाहीं. सर्वत्र व्यभिचार वाढून सर्व लोक रोगी, निर्बल व अल्पायु होतील व शीघ्र नामशेष होऊन जातील. कोणी कोणाला भिणार नाहीं व कसलेंहि कृत्य केलें तरी कोणाला लज्जा वाटणार नाहीं व अनाचार फार वाढला जाऊन सर्व कुलें नष्ट होऊन जातील. कोणी कोणाच्या पदार्थांचा हक्कदार होणार नाहीं व कोणाचीहि कोणत्याहि पदार्थावर दीर्घकालपर्यंत स्वत्व राहणार नाहीं. इत्यादि दोष उत्पन्न होऊं नयेत म्हणून विवाह नियमानुसार व्हावे हें उचित आहे, **(प्रश्न)** विवाह एकदांच केला तर एका पुरुषाला एक स्त्री व एक स्त्रीला एक पुरुष याप्रमाणें ठीक व्यवस्था होईल हे खरें; पण जर दोहोंतून एक दीर्घ रोगानें ग्रस्त झालें व दुसऱ्याची युवावस्था असली तर त्यानें काय करावें ? किंवा स्त्री गर्भवती असेल तर पुरुषानें काय करावें ? **(उत्तर)** याचें प्रत्युत्तर नियोगविषयाचें वेळीं पूर्वींच दिलें आहे. स्त्री गर्भवती असता एक वर्षपर्यंत समागम करूं नये. अशा स्थितींत जर त्या विषयासक्ताला व्रतस्थ राहणें शक्य नसेल तर पूर्वोक्त पद्धतीप्रमाणें नियोग करावा. परंतु वेश्यागमन अथवा व्यभिचार करूं नये. असो.

अप्राप्त धनाची मनुयांनीं इच्छा करावी, मिळविलेल्याचें रक्षण करावें, राखलेल्याची वाढ करावी, व अशा रीतीनें वाढलेल्या धनाचा देशोपकाराच्या कामीं खर्च करावा. आपआपल्या वर्णाश्रमसंबंधीं सर्वप्रकारचे व्यवहार उत्साहानें व दृढनिश्चयानें करून, तन, मन व धन यांच्या योगानें सर्वदा परोपकार करावा. आपल्या माता, पिता, सासू, श्वशुर यांची शुश्रूषा करावी. तसेंच आपले मित्र, शेजारी, संबंधी, राजा, विद्वान् वैद्य व सत्पुरुष यांच्यावर प्रीति करावी. आपल्या मुलांला विद्वान् करविण्यासाठींच धनादि पदार्थांचा व्यय करावा. दुष्ट व अधर्मी लोकांचा द्वेष न करतां त्यांविषयीं उदास रहावें व त्यांची सुधारणा होईल असा यत्न करावा. शक्य असेल त्याप्रमाणें आपल्या मुलांला विद्वान् करविण्यासाठींच धनादि पदार्थांचा व्यय करावा. आपल्या मुलांना विद्वान् व सुशिक्षित करावें. आपण धर्मयुक्त व्यवहार करून मोक्षाचें साधन करीत असावें. असें वागले असतां परम आनंदाची प्राप्ति खात्रीनें होईल. तसेंच पुढें लिहिल्याप्रमाणें कपोलकल्पित पाराशरीचे जे श्लोक असतील ते कोणींहि प्रमाण मानूं नये :—

**पतितोऽपि द्विजः श्रेष्ठो न च शूद्रो जितेन्द्रियः । निर्दुग्धाचापि गौः पूज्या न च दुग्धवती खरी ।।**

**[अर्थ]** 'सदाचारी शूद्रापेक्षांहि दुराचारी ब्राह्मण श्रेष्ठ होय. दूध देणाऱ्या गाढवीपेक्षां दूध न देणारी गाय केव्हांहि श्रेष्ठच.' दुष्ट कर्म करणारा द्विज श्रेष्ठ व सत्कर्म करणारा शूद्र नीच मानणें यापेक्षां दुसरा जास्त अन्याय, पक्षपात, व अधर्म कोणता असणार ? दूध देणारी व न देणारी अशा दोनहि प्रकारच्या गाईंवर गोपालांचें प्रेम सारखेंच असतें काय ? ते दोघांचें पालन सारखेंच करतात काय ? कुंभार लोक गाढवें पाळीत नाहींत काय ? गाय व गाढवी यांमध्यें जसा भेद आहे त्याप्रमाणें द्विज, शूद्र यांमध्यें नसल्यामुळें हा दृष्टांतहि विषम आहे. कदाचित् द्विज व शूद्र जसे एका मनुष्य जातींत आहेत त्याचप्रमाणें गाय व गाढवीहि एकाच पशुजातींत आहेत असें जरी मानलें तरी यांचा आशय अयोग्य व अधर्म वाढवणारा असल्यामुळें असले श्लोक विद्वानांनीं मानण्यास योग्य नाहींत.

**अश्वालंभं गवालंभं संन्यासं पलपैत्रिकम् । देवराच्च सुतोत्पत्तिं कलौ पञ्च विवर्जयेत् ।।**

[ अश्वलम्भ ] घोडा मारून त्याचा होम करणें, [ गवालम्भं ] गाय मारून त्याचा होम करणें हीं कर्मे वेदविहित नाहींत, म्हणून त्यांचा कलियुगापुरताच निषेध करणेंहि वेदाविरुद्धच समजावें. जर कलियुगामध्यें यांचा निषेध केला

तर कृतत्रेतादि युगांमध्यें त्यांचा विधि होईल. अशीं दुष्ट कामें श्रेष्ठ युगामध्यें होण सर्वथा असंभवनीय आहे. वेदादि शास्त्रांमध्यें संन्यास धारण करण्याचा विधि आहे, म्हणून त्याचा निषेध करणें असमंजसपणाचे आहे. मांसाचा निषेध सर्व काळीं सारखाच आहे. देवरापासून पुत्रोत्पत्ति करणे हें वेदामध्यें सांगितलें आहे, त्याचा निषेध करण्याचा या श्लोककर्त्यास मुळींच अधिकार नाहीं.

**नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ । पञ्चस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥**

(नष्टे) पति देशादेशांतरीं गेला असतां घरीं स्त्रीनें नियोग करावा काय ? जर अशा रीतीनें नियोग केला व पति घरीं आला तर ती स्त्री कोणाची समजावी ? आपण विवाहित पतीची असें म्हणाल तर तें खरें, पण असे पराशरीमध्यें कोठेंहि म्हटलें नाहीं. या श्लोकांत लिहिलेले पांचच आपत्काल स्त्रीला येणें शक्य आहेत, आणखी नाहींत ? लढाईमध्यें पती मरणें, रोगानें ग्रस्त होणें हे आणखी अपत्काल नाहींत ? यांची गणना आहे कोठें ? म्हणून असले श्लोक प्रमाण मानण्यास योग्य नाहींत. **(प्रश्न)** तुम्ही पराशर मुनीचें वचनहि मानीत नाहीं काय ! **(उत्तर)** कोणचेंहि वचन जर तें वेदविरुद्ध असेल तर आम्ही मानीत नाहीं. हें तर पराशरांचें वचनहि नाहीं. पुष्कळ ढोंगी लोक, ब्रह्मोवाच, वसिष्ठ उवाच, राम उवाच, शिव उवाच, विष्णुरुवाच, देव्युवाच,' याप्रमाणें श्रेष्ठांचें नांव घालून ग्रंथरचना करतात, ती याकरतां कीं, ते आपले ग्रंथ सर्वमान्य होऊन जगभर त्यांचा प्रसार व्हावा व त्यायोगानें आपली उपजीविका उत्तम प्रकारें चालावीं. या स्वार्थमय क्षुद्र हेतूनें हे अनर्थकारक गाथाग्रंथ बनवितात; सर्व स्मृतींमध्यें मनुस्मृतिच--कांहीं प्रक्षिप्त श्लोक खेरीज करून वेदानुकूल आहे. अन्य स्मृत्या तशा नाहींत. याप्रमाणेंच अन्य भ्रमजाल वाढवणाऱ्या ग्रंथांविषयीं जाणावें, **(प्रश्न)** गृहस्थाश्रम सर्वांत श्रेष्ठ आहे कीं नाहीं ? (उत्तर) आपापल्या कर्तव्यांच्या मानानें सर्व साश्रम श्रेष्ठच आहेत, परंतु:—

**यथा नदीनदाः सर्वे सागरे यान्ति संस्थितिम् । तथैवाश्रमिणः सर्वे गृहस्थे यान्ति संस्थितिम् ॥** मनु. ६।९०.
**यथा वायुं समाश्रित्य वर्तन्ते सर्वजन्तवः । तथा गृहस्थमाश्रित्य वर्तन्ते सर्वे आश्रमाः ॥** मनु. ३।७७.
**यस्मात्त्रयोप्याश्रमिणो दानेनान्नेन चान्वहम् । गृहस्थेनैव धार्यन्ते तस्माज्ज्येष्ठाश्रमो गृही ॥** मनु. ३।७८.
**स संधार्यः प्रयत्नेन स्वर्गमक्षय्यमिच्छता । सुखं चेहेच्छता नित्यं योऽधार्यो दुर्बलेन्द्रियैः ॥** मनु. ३।७९.

**(अर्थ)** ज्याप्रमाणें समुद्र मिळेपर्यंत नदी व नद भ्रमण करीत असतात व समुद्र मिळाला असतां त्याच्या आश्रयानें स्थिर होतात, त्याचप्रमाणें गृहस्थाच्या आश्रयानें इतर आश्रम स्थिर होतात. गृहस्थाच्या सहाय्यावांचून कोणाचेहि व्यवहार नीट चालत नाहींत. ब्रह्मचारी, वानप्रस्थ व संन्यासी या तीनीहि आश्रमांतील माणसांना गृहस्थच प्रतिदिवशीं अनेक पदार्थांचें व अन्नादिकांचें दान करून त्यांचें पोषण व धारण करतो. म्हणून गृहस्थाश्रम हाच सर्वांत श्रेष्ठ व धुरंधर आहे. म्हणून मोक्षाची व संसारसुखाची इच्छा करणाऱ्यानें प्रयत्नानें गृहस्थाश्रमाचें अवलंबन करावे.

दुर्बलेंद्रिय, भीरु व निर्बल पुरुष या गृहस्थाश्रमाचें धारण करूं शकत नाहींत. ज्याला हा स्वीकारावयाचा असेल त्यानें उत्तम प्रकारें धारण व पालन करावें. या सर्व संसारामध्यें जो कांहीं व्यवहार आहे तो सर्व गृहस्थाश्रमावर अवलंबून आहे. जर गृहस्थाश्रम नसता तर संतानोत्पत्ति न झाल्यामुळें ब्रह्मचर्य, वानप्रस्थ व संन्यास हे कसे साधले असते ? जो गृहस्थाश्रमाची निंदा करतो तोच निंदनीय समजावा वा जो प्रशंसा करीत असेल तो प्रशंसनीय समजावा. जेव्हां स्त्री पुरुष ही दोघेंहि परस्परांवर प्रसन्न, विद्वान्, पुरुषार्थी व सर्व प्रकारच्या व्यवहारांना जाणणारीं असतील तेव्हांच गृहस्थाश्रम सुखदायक होतो. गृहस्थाश्रमामध्यें सुख व्हावें, अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं प्रथमतः ब्रह्मचर्य पालन करावें व नंतर स्वयंवरविवाह करून गृहस्थी व्हावें ।

याप्रमाणें संक्षेपानें समावर्तन, विवाह व गृहस्थाश्रम यांविषयीं विवरण झालें; यापुढें वानप्रस्थ व संन्यास या दोन आश्रमांविषयीं लिहावयाचें.

**इति सुभाषाविभूषितः समावर्तन-विवाह-गृहस्थाश्रम-विषये चतुर्थः समुल्लासः संपूर्णः ॥४॥**

# अथ पंचमः समुल्लासः

**अथ वानप्रस्थसंन्यासविधिं वक्ष्यामः**

**ब्रह्मचर्याश्रमं समाप्य गृही भवेत्, गृही भूत्वा वनी भवेत्, वनी भूत्वा प्रव्रजेत् ॥** शत. कां. १४.

मनुष्यांनीं ब्रह्मचर्याश्रम समाप्त केल्यानंतर गृहस्थाश्रम स्वीकारावा, गृहस्थाश्रम संपवून वानप्रस्थाश्रम स्वीकारावा व नतर संन्यास घ्यावा हें त्यांस उचित आहे.

**एवं गृहाश्रमे स्थित्वा विधिवत्स्नातको द्विजः । वने वसेत्तु नियतो यथावद्विजितेंद्रियः ॥१॥**
**गृहस्थस्तु यदा पश्येद् वलीपलितमात्मनः । अपत्यस्यैव चापत्यं तदारण्यं समाश्रयेत् ॥२॥**
**संत्यज्य ग्राम्यमाहारं सर्वं चैव परिच्छदम् । पुत्रेषु भार्यां निक्षिप्य वनं गच्छेत्सहैव वा ॥३॥**
**अग्निहोत्रं समादाय गृहं चाग्निपरिच्छदम् । ग्रामादरण्यं निःसृत्य निवसेन्नियतेन्द्रियः ॥४॥**
**मुन्यन्नैर्विविधैर्मेध्यैः शाकमूलफलेन वा । एतानेव महायज्ञान् निर्वपेद्विधिपूर्वकम् ॥५॥** मनु. अ० ६ ॥

ब्रह्मचर्य समाप्त केल्यानंतर व्रतस्नान होऊन ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य द्विजांनीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार करावा. या गृहस्थाश्रमामध्यें राहून निश्चितात्मा व जितेंद्रिय होऊन ब्रह्मचर्याश्रम समाप्त केल्यावर वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. (१) जेव्हां आपल्या मुलाला मुलगा होईल व आपले केश पांढरे होऊन अंगावरील चामडी ढिली झाल्यामुळें सुरकुत्या पडतील, तेव्हां गृहस्थानें वनामध्यें प्रवेश करावा. (२) शहरांतील सर्व आहार व वस्त्रें प्रावरणें सोडून देऊन व उत्तम उत्तम चैनीच्या पदार्थांचा त्याग करून, आपल्या पत्नीला आपल्या मुलांकडे ठेवून किंवा बरोबर घेऊन वनामध्यें जाऊन रहावें. (३) आपल्या गांवांतून निघतेवेळीं सांगोपांग अग्निहोत्र बरोबर घेऊन, जितेन्द्रिय बनून अरण्यांत जाऊन रहावें. (४) ऋषि, मुनि भक्षण करतात त्या नानाप्रकारच्या पवित्र अन्नाच्या योगानें व सुन्दर शाक, मूळ, फल, फूल व कंद वगैरे प्रकारच्या अन्नानें पंचमहायज्ञ करावें. याच अन्नानें अतिथींची सेवा करावीं व स्वतःचा निर्वाहहि त्यानेंच करावा. (५)

**स्वाध्याये नित्ययुक्तः स्याद्दान्तो मैत्रः समाहितः ॥ दाता नित्यमनादाता सर्वभूतानुकम्पकः ॥८॥**
**अप्रयत्नः सुखार्थेषु ब्रह्मचारी धराशयः । शरीरेष्वममश्चैव वृक्षमूलनिकेतनः ॥२६॥** मनु. अ० ६ ॥

स्वाध्यायामध्यें–शिकण्याशिकविण्यामध्यें–सदोदित तत्पर, आत्मसंयमन करणारा, सर्वांचा मित्र, इंद्रियांचें दमन करणारा, विद्येचें दान करणारा, सर्वांवर दया करणारा व कोणाकडून कांहींहि न घेणारा, अशा प्रकारें वानप्रस्थाश्रमी मनुष्यानें वागावें. (८) शरीरसुखासाठीं फार आयास करूं नयेत, ब्रह्मचारी रहावें स्त्री आपणाजवळ असली तरीहि विषयचेष्टा करूं नयेत. भूमीवर निजावें, आपल्या शरीरावर व त्याचप्रमाणें शरीराच्या आधारानें असणाऱ्या इतर पदार्थांवर ममत्व ठेवूं नये. वृक्षाच्या खालीं वास करावा. ॥ २६ ॥ तसेंच—

**तपःश्रद्धे ये ह्युपवसन्त्यरण्ये शान्ता विद्वांसो भैक्ष्यचर्यां चरन्तः ॥**
**सूर्यद्वारेण ते विरजाः प्रयान्ति यत्रामृतः स पुरुषो ह्यव्ययात्मा ॥** मुण्ड. ॥ २।११ ॥

जे शान्त व विद्वान् लोक वनामध्यें राहून, तप व धर्मानुष्ठान करून व सत्यावर श्रद्धा ठेवून, भिक्षावृत्तीचा अवलंब करून वनामध्यें रहातात, ते त्या ठिकाणीं निर्मल होऊन प्राणाच्या द्वारानें अविनाशी हानिलाभरहित, पूर्ण पुरुष अशा परमात्म्याला प्राप्त करून घेऊन आनंदित होतात. तसेंच—

**अभ्यादधामि समिधमग्ने व्रतपते त्वयि । व्रतञ्च श्रद्धां चोपैमीन्धे त्वा दीक्षितो अहम् ॥** यजु. २०।२४.

वानप्रस्थाश्रमांतील मनुष्यानें असें म्हणावें कीं, 'हे (व्रतपते अग्ने) अग्निहोत्राला साधनीभूत असणाऱ्या अग्ने ! ( त्वयि ) तुझ्यामध्यें अर्थात् अग्नीमध्यें ( समिधम् ) हवनीय पदार्थाचा ( अभ्यादधामि ) होम करून ( अहम् ) मी

(दीक्षितः) दीक्षित होऊन (व्रतम्) सत्यचारणरूपी व्रत व (श्रद्धाम्) श्रद्धा यांना (उपैमी) प्राप्त होईन.' अर्थात् हवन करून मी दीक्षित होईन व सत्याचरण आणि श्रद्धा यांना प्राप्त करून घेईन. अशी इच्छा वानप्रस्थी मनुष्यानें धरावी. तसेंच नानाप्रकारची तपश्चर्या करून, सत्संग धरून, योगाभ्यास करून, सुविचार मनांत बाळगून, ज्ञान व पवित्रता प्राप्त करून घ्यावी. नंतर जेव्हां संन्यास घेण्याची इच्छा होईल तेव्हां स्त्रीला पुत्रांकडे पाठवून देऊन, आपण संन्यास घ्यावा. याप्रमाणें हें संक्षेपानें वानप्रस्थाश्रमाचें व्याख्यान झालें.

**वनेषु च विहृत्यैवं तृतीयं भागमायुषः । चतुर्थमायुषो भागं त्यक्त्वा संगान् परिव्रजेत् ॥** मनु. ६।३३.

**संन्यासविधिः**—याप्रमाणें वनामध्यें आयुष्याचा तिसरा भाग ( पन्नासाव्या वर्षापासून ७५ वर्षाचें वय होईपर्यंत ) वानप्रस्थाश्रमाप्रमाणें घालवून आयुष्याच्या चवथ्या भागामध्यें सर्व-संग-परित्याग करून परिव्राट् अर्थात् संन्यासी व्हावें. (प्रश्न) गृहस्थ व वानप्रस्थ या आश्रमांचा स्वीकार न करतां, एकदम ब्रह्मचर्यांतूनच संन्यास घेतला तर पाप लागतें किंवा कसें ? ( **उत्तर** ) केव्हां लागतें व केव्हां लागत नाहीं. ( **प्रश्न** ) हें कसें ? ( **उत्तर** ) जे ब्रह्मचर्यांतूनच एकदम विरक्त होतात ते जर कांहीं कारणानें विषयामध्यें फसले तर ते महापापी होतात व जर ते न फसले तर महापुण्यात्मे व सत्पुरुष समजले जातात.

**यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत् , वनाद्वा गृहाद्वा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत् ॥**

हें ब्राह्मण ग्रंथांतील वचन आहे 'ज्या दिवशीं वैराग्य प्राप्त होईल त्याच दिवशीं गृहस्थाश्रमांतून किंवा वानप्रस्थाश्रमांतून संन्यास घ्यावा.' या वचनांत प्रथमतः वनांतूनच संन्यास घ्यावा असें सांगून नंतर पाहिजे त्या आश्रमांतून घ्यावा असा विकल्प सांगितला आहे. (१) वानप्रस्थानंतर संन्यास घ्यावा, (२) गृहस्थाश्रमांतूनहि संन्यास घ्यावा ; (३) तसेंच जो पूर्ण विद्वान्, जितेंद्रिय व विषयोपभोगाची इच्छा न धरणारा असेल त्यानें परोपकाराच्या इच्छेनें युक्त होऊन, ब्रह्मचर्याश्रमांतूनहि संन्यासाचें ग्रहण करावें. याचप्रमाणें वेदामध्येंहि '**यतयः, ब्राह्मणस्य विजानतः**' इत्यादि पदांनीं संन्यासाचें ग्रहण केलेलें आहे. पण—

**नाविरतो दुश्चरितान्नाशान्तो नासमाहितः ॥ नाशान्तमानसो वापि प्रज्ञानेनैनमाप्नुयात् ॥** कठ. व. २।२३.

ज्यानें दु[illegible]ण सोडलें नाहीं, ज्याला शांति मिळाली नाहीं, ज्यानें योग साधला नाहीं, ज्याचें मन शांत नाहीं त्यानें संन्यास घेतला तरीहि, प्रज्ञानाच्या योगानें त्याला परमात्मा प्राप्त होत नाहीं. म्हणून—

**यच्छेद्वाङ्मनसी प्राज्ञस्तद्यच्छेद् ज्ञान आत्मनि ॥**

**ज्ञानमात्मनि महति नियच्छेत्तद्यच्छेच्छान्त आत्मनि ॥** कठ. व. ३।१३.

बुद्धिमान् संन्याशानें वाणी व मन यांना अधर्मापासून परावृत्त करून, ज्ञान व आत्मा यांच्या ठिकाणीं लावावें व त्या ज्ञान व आत्मा यांना परमात्म्यामध्यें एकाग्र करावें. या योगानें प्राप्त होणारें विज्ञान आपल्या शान्तस्वरूप आत्म्यामध्यें स्थिर करावें. तसेंच—

**परीक्ष्य लोकान् कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायान् नास्त्यकृतः कृतेन ॥**

**तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥** मुंड. २।१२.

सर्व लोक भोगकर्मानें संचित झालेले आहेत असें पाहून (ब्राह्मणः) संन्याशाला वैराग्य प्राप्त होतें. कारण (अकृतः)—न केलेला असा—परमात्मा (कृतेन) केवळ कर्माच्या योगानें प्राप्त होत नाहीं ; म्हणून तो गुरूला अर्पण करण्यासाठीं कांहीं पदार्थ हातांत घेऊन, वेद व परमेश्वर यांना जाणणाऱ्या गुरूजवळ, परमेश्वरसंबंधीं विज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं जातो व सर्व संदेहांची निवृत्ति करून घेतो. विज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं पुढील प्रकारच्या मनुष्याची संगति सोडून द्यावी.

**अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयं धीराः पण्डितं मन्यमानाः ॥**
**जङ्घन्यमानाः परियन्ति मूढा अन्धेनैव नीयमाना यथान्धाः ॥ ८ ॥**
**अविद्यायां बहुधा वर्तमाना वयं कृतार्था इत्यभिमन्यन्ति बालाः ॥**
**यत्कर्मिणो न प्रवेदयन्ति रागात् तेनातुराः क्षीणलोकाश्च्यवन्ते ॥** ९ मुंडः खं. २ ॥

जे अविद्येंत राहूनहि आपण धीर पंडित आहोंत असें समजतात, ते मूढ नीच गतीला प्राप्त होतात; आंधळयांच्या आश्रयानें जाणारे आंधळे ज्याप्रमाणें खड्डयांत पडतात त्याप्रमाणें त्यांची स्थिति होते. जे मूढ बहुधा अविद्येंमध्यें असतांहि आपण कृतार्थ आहोंत असें अभिमानाने म्हणतात ते, ज्याला केवळ कर्मकांडी लोक रागद्वेषानें मोहित होऊन समजूं किंवां समजावूं शकत नाहींत, त्यापासून ते च्युत होऊन व वारंवार दुःखित होऊन जन्ममरणरूपीं दुःखामध्यें पडतात. म्हणून—

**वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः संन्यासयोगाद्यतयः शुद्धसत्वाः ॥**
**ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः परिमुच्यन्ति सर्वे** ॥ मुंड. ३।२।६.

जे लोक परमेश्वरप्रतिपादक वेदमंत्रांचा अर्थ पूर्णपणें जाणतात व निश्चयानें सदाचाराप्रमाणें वागतात व संन्यास-योगानें ज्यांचें अंतःकरण शुद्ध झालें आहे, तेच खरे संन्यासी होत; ते परमेश्वरामध्यें असलेल्या मुक्तीच्या आनंदाला प्राप्त करून घेऊन, जेव्हां मुक्तिसुखाची अवधि पूर्ण होते तेव्हां तेथून सुटून संसारामध्यें पुनः येतात. मुक्ति प्राप्त झाल्याशिवाय दुःखाचा नाश होत नाहीं. पहा—

**न वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्त्यशरीरं वावसन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः ॥** छान्दो. ८।१२.

जो देहधारी जीव असतो तो सुखदुःखांच्या प्राप्तीपासून निराळा राहूं शकत नाहीं, पण मुक्तीमध्यें जेव्हां जीवात्मा शरीररहित होऊन व शुद्ध होऊन परमेश्वराच्या सन्निद्ध जाऊन राहतो तेव्हांच त्याला सांसारिक सुखदुःखांची प्राप्ति होत नाहीं. म्हणून—

**पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति** ॥ शत. ब्रा. १४।५।२।१.

पुत्र होण्याची इच्छा, धनदौलत मिळण्याची इच्छा, लोकांकडून मान मिळण्याचीं इच्छा या सोडून संन्यासी लोक भिक्षावृत्तीचा अवलंब करून रात्रंदिवस मोक्षाच्या साधनामध्यें तत्पर असतात. तसेंच—

**प्राजापत्यां निरूप्येष्टिं तस्यां सर्ववेदसं हुत्वा ब्राह्मणः प्रव्रजेत्** ॥ १ ॥ यजुर्वेद ब्राह्मणे ॥

(प्राजापत्यम्) प्रजापति परमेश्वराची प्राप्ति व्हावी म्हणून (इष्टिम्) यज्ञ करून, त्या यज्ञामध्यें यज्ञोपवीत, शिखा वगैरे चिन्हांचा त्याग करून, आहवनीयादि पांचहि अग्नीचें प्राण, अपान, व्यान, उदान व समान या पंचप्रांच्या ठिकाणीं आरोपण करून (ब्राह्मणः) ब्रह्म जाणणाऱ्यानें गृहस्थाश्रम सोडून संन्यासी व्हावें. तसेंच—

**प्राजापत्यां निरूप्येष्टिं सर्ववेदसदक्षिणाम् । आत्मन्यग्नीन् समारोप्य ब्राह्मणः प्रव्रजेद् गृहात्** ॥३८॥
**यो दत्वा सर्वभूतेभ्यः प्रव्रजत्यभयं गृहात् । तस्य तेजोमया लोका भवन्ति ब्रह्मवादिनः** ॥ ३९ ॥ मनु. ६.

परमेश्वरप्राप्तीसाठीं यज्ञ करून, त्यामध्यें सर्वस्वाचें दान करून आत्म्यामध्यें पांचहि अग्नीना स्थापित करून, गृह तोडून संन्यास घ्यावा. जो सर्व प्राणिमात्रांना अभय देऊन, घरांतून निघून संन्यासी होतो, त्या (ब्रह्मवादी) परमेश्वरप्रकाशित, वेदोक्तधर्मादि सर्व विद्यांचा उपदेश करणाऱ्या संन्याशाला, सर्व प्रकाशमय अर्थात् मोक्षानंदमय लोक प्राप्त होतात. (प्रश्न) संन्याशाचा धर्म काय आहे? (उत्तर) पक्षापातरहित होऊन न्यायाचरण करणें, सत्याचें ग्रहण करून असत्याचा त्याग करणें, वेदोक्त ईश्वराज्ञेचें पालन करणें, परोपकार करणें, सत्यभाषण करणें वगैरे सर्व आश्रमीयांचें समानच धर्म आहेत. पण त्यांतल्या त्यांत संन्याशानें हे पुढील धर्म पाळिले पाहिजेत.

**विशेष धर्म** (मनु. अध्याय ६ मधून)

**दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं जलं पिबेत् । सत्यपूतां वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत्** ॥ ४६ ॥

जेव्हां संन्यासी मार्गानें चालत असेल तेव्हां त्यानें इकडे तिकडे न पाहतां भूमीवर दृष्टि ठेवून चालावें, वस्त्रानें गाळलेलेंच पाणी प्यावें, निरंतर सत्य बोलावें, सर्वदा मनानें विचार करून सत्याचें ग्रहण करावें व असत्याचा त्याग करावा.

**क्रुध्यन्तं न प्रतिक्रुध्येदाक्रुष्टः कुशलं वदेत् । सप्तद्वारावकीर्णां च न वाचमनृतां वदेत्** ॥ ४८ ॥

जेव्हां, उपदेश करण्याच्या वेळीं किंवा वादविवाद करावयाच्या वेळीं, कोणी मनुष्य संन्याशावर रागावेल किंवा

त्याची निंदा करील, तेव्हां संन्यस्तानें उलट रागावूं नये; पण सदैव त्याच्या हिताचाच उपदेश करावा, (१ मुख, २ नासिकेचीं छिद्रें, २ नेत्र २ कान) या सात द्वारांमध्यें पसरलेल्या वाणीला कोणत्याहि कारणानें असत्यानें बिघडवूं नये.

**अध्यात्मरतिरासीनो निरपेक्षो निरामिषः । आत्मनैव सहाय्येन सुखार्थी विचरेदिह ।। ४९ ।।**

आत्मरत होऊन, कशाचीहि अपेक्षा न करतां, मद्यमांसाचें सेवन न करतां, आत्म्याच्याच सहाय्य नें सुखार्थी होऊन, या संसारमध्यें धर्म व विद्या यांची वृद्धि करण्यासाठीं उपदेश करीत करीत सदासर्वदा फिरावें.

**लुप्तकेशनखश्मश्रुः पात्री दण्डी कुसुम्भवान् । विचरेन्नियतो नित्यं सर्वभूतान्यपीडयन् ।। ५२ ।।**

केश, नखें, दाढी व मिशा काढून, सुंदर पात्र व दण्ड घेऊन, भगवीं वस्त्रें धारण करून, संयमात्मा होऊन, सर्व भूतांना पीडा न देतां सर्वत्र संचार करावा.

**इन्द्रियाणां निरोधेन रागद्वेषक्षये च ।। अहिंसया च भूतानाममृतत्वाय कल्पते ।। ६० ।।**

अधर्माचरणापासून इंद्रियांचा विरोध करून, प्रीति व द्वेष यांचा त्याग करून, सर्व प्राण्यांशीं निर्वैर वर्तन करून, मोक्ष प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य वाढवावें.

**दूषितोऽपि चरेद्धर्मं यत्र तत्राश्रमे रतः ।। समः सर्वेषु भुतेषु न लिङ्गं धर्मकारणम् ।। ३७ ।।**

संसारांतील कोणी मनुष्यानें त्याला दूषण दिलें किंवा चांगलें म्हटलें, तथापि त्याची पर्वा न करतां, त्या त्या आश्रमामध्यें राहणाऱ्या पुरुषानें किंवा संन्याशानें, सर्व प्राण्यांशीं पक्षपातरहित बुध्दीनें वागून, स्वतः धर्मात्मा बनून दुसऱ्यांना धर्मात्मे करण्याचा यत्न करावा. हें आपल्या मनांत निश्चयपूर्वक बाळगावें कीं, दंड, कमंडलु, काषाय-वस्त्रादिक बाह्य चिन्हें हीं धर्माची कारणें नव्हेत. सर्व मनुष्यांना सत्याचा उपदेश करणें, विद्यादान करणें व त्यांच्या उन्नतीचे त्यांना उपाय सुचविणें हें संन्याशाचें मुख्य कर्तव्य आहे.

**फलं कतकवृक्षस्य यद्यप्यम्बुप्रसादकम् ।। न नामग्रहणादेव तस्य वरि प्रसीदति ।। ६८ ।।**

निर्मळी वृक्षाचें फळ पूड करून पाण्यांत टाकलें असतां पाणी शुद्ध करूं शकतें, पण त्या फळाचें नुसतें नामस्मरण केल्यानें पाणी कधीहीं शुद्ध होणार नाहीं. तें फळ जेव्हां पूड करून पाण्यांत घालावें तेव्हांच पाणी शुद्ध होईल.

**प्राणायामा ब्राह्मणस्य त्रयोपि विधिवत्कृताः ।। व्याहृतिप्रणवैर्युक्ता विज्ञेयं परमं तपः ।। ७० ।।**

ब्राह्मज्ञानी संन्याशानें ओंकारसहित सप्तव्याहृतींनीं युक्त विधिपूर्वक प्राणायाम जितकी शक्ति असेल त्याप्रमाणें करावेत, पण कमींत कमी तीन तरी करावे, हें संन्याशाचें परम तप आहे.

**दह्यन्ते ध्मायमानानां धातूनां हि यथा मलाः । तथेंद्रियाणां दह्यन्ते दोषाः प्राणस्य निग्रहात् ।। ७१ ।।**

ज्याप्रमाणें धातूंचे मल अग्नीमध्यें तापवल्यानें व गाळल्यानें नाहींसे होतात, त्याचप्रमाणें प्राणांच्या निग्रहान मन आदिक सर्व इंद्रियांचे दोष भस्म होतात.

**प्राणायामैर्दहेद्दोषान् धारणाभिश्च किल्बिषम् । प्रत्याहारेण संसर्गान् ध्यानेनानीश्वरान् गुणान् ।। ७२ ।।**

संन्यासी लोकांनीं प्राणायामांच्या योगानें आत्मा, अंतःकरण व इंद्रियें यांचे दोष, धारणेच्या योगानें पातक, प्रत्याहाराच्या योगानें संसर्गदोष, ध्यानाच्या योगानें हर्षशोक व अविद्यादि अनीश्वरगुण यांचा नाश करावा.

**उच्चावचेषु भूतेषु दुर्ज्ञेयामकृतात्मभिः । ध्यानयोगेन संपश्येद् गतिमस्यान्तरात्मनः ।। ७३ ।।**

अयोगी व अविद्वान् यांस समजण्यास अशक्य व सर्व लहान थोर पदार्थांत जो व्यापला आहे, अशा परमात्म्याची व्याप्ति ध्यानयोगानें जाणून, आपल्या आत्म्याची व परमेश्वराची गति जाणावी.

**अहिंसयेन्द्रियासङ्गैर्वैदिकैश्चैव कर्मभिः ।। तपसश्चरणैश्चोग्रैः साधयन्तीहि तत्पदम् ।। ७५ ।।**

सर्व भूतांशीं निर्वैर होऊन, इंद्रियांच्या विषयांचा त्याग करून, वेदोक्त कर्में व अत्युग्र तपश्चर्या करून या संसारामध्येंच राहणारा संन्यासी मोक्षपद प्राप्त करून घेतो.

**यदा भावेन भवति सर्वभावेषु निस्पृहः ।। तदा सुखमवाप्नोति प्रेत्य चेह च शाश्वतम् ।। ८० ।।**

जेव्हां संन्यासी सर्व भावांच्या ठिकाणीं-पदार्थांच्या ठिकाणीं-निस्पृह, कांक्षारहित होतो व आंतील व बाहेरील सर्व व्यवहारांमध्यें पवित्र होतो, तेव्हांच त्याला या देहामध्यें व मरणानंतर शाश्वत सुख प्राप्त होतें.

चतुर्भिरपि चैवैतैर्नित्यमाश्रमिभिर्द्विजैः । दशलक्षणको धर्मः सेवितव्यः प्रयत्नतः ॥ ९१ ॥ मनु. ६.

यासाठीं ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी या चारहि आश्रमांत असणाऱ्या लोकांनीं दशलक्षणांनीं युक्त असणाऱ्या धर्माचें पालन करावें.

धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः । धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥ ९२ ॥ मनु. ६.

धर्माचीं दहा लक्षणें:—(१) धृतिः–सदैव धैर्य धरणें; (२) क्षमा:–निंदास्तुति, मानापमान, हानिलाभ, इत्यादि द्वन्द्वें सहन करणें; (३) दमः–मनाला अधर्मापासून परावृत्त करून त्याला धर्मांत प्रवृत्त करणें–अधर्माचरणाची इच्छाहि न करणें; (४) अस्तेय:–चोरी न करणें; मालकाच्या आज्ञेशिवाय छल, कपट, विश्वासघातादिक कृत्यें करून, वेदविरुद्ध उपदेश करून व अशाच अन्य अनन्वित कृत्यांच्या योगानें दुसऱ्याच्या पदार्थाचा अपहार करणें ही चोरी होय. चोरी न करणें हेंच अस्तेय होय. (५) शौच:–रागद्वेष व पक्षपात सोडून आंतरिक शुद्धि करणें व जल, मृत्तिका, मार्जन वगैरे करून बाह्य शुद्धि करणें; (६) इंद्रियनिग्रह:–इंद्रियांचा अधर्माचरणाच्या बाजूनें विरोध करून त्यांना धर्ममार्गानें जाऊं देणें; (७) धी:–मादक द्रव्यें, बुद्धिनाशक अन्यपदार्थ, दुष्टांची संगति, आलस्य, प्रमादादि दोष यांचा त्याग करून, श्रेष्ठ पदार्थांचें सेवन व सज्जनांची संगति करून योगाभ्यासानें बुद्धि वाढवणें. (८) विद्या:–पृथ्वी-पासून परमेश्वरापर्यंत असणाऱ्या सर्व पदार्थांचें यथायोग्य ज्ञान करून घेणें; त्यांच्यापासून यथायोग्य उपकार करून घेणें, ज्याप्रमाणें आत्म्यामध्यें सत्य असेल त्याप्रमाणेंच मनामध्यें विचार करणें, जें सत्य मनांत असेल तसेंच वाणीनें बोलणें; जें वाणीमध्यें सत्य असेल तसेंच आचरण करणें, ही विद्या समजावी. याहून जी विपरीत ती अविद्या होय. (९) सत्य:–जो पदार्थ जसा असेल त्याला तसाच समजणें, तसेंच बोलणें व त्याचप्रमाणें आचरण करणें. अक्रोध:–क्रोधादि दोषाला टाकून शांति वगैरे गुणांचें ग्रहण करणें; ही धर्माचीं दहा लक्षणें आहेत. या धर्माचें चार आश्रमांतील पुरुषांनीं अवलंबन करावें व संन्याशानें असें विशेषतः वागून दुसऱ्यांस हा धर्म समजावून द्यावा, हें त्याचें कर्तव्य आहे.

अनेन विधिना सर्वांस्त्यक्त्वा सङ्गाञ्छनैः शनैः । सर्वद्वन्द्वविनिर्मुक्तो ब्रह्मण्येवावतिष्ठते ॥ ८१ ॥ मनु. ६.

याप्रमाणें हळू हळू सर्व संसर्गदोषांना सोडून, द्वंद्वादि दोषादि टाकून मुक्त होऊन संन्यासी ब्रह्मामध्यें स्थिर होतो.

संन्याशाचें मुख्य कर्तव्य हें आहे कीं, त्यानें तीनहि पूर्व आश्रमांतील लोकांना सर्व प्रकारच्या व्यवहारांचा निश्चया-त्मक उपदेश करावा, त्यांना अधार्मिक व्यवहारांपासून सोडवून त्यांच्या सर्व संशयांचें छेदन करून, त्यांना धर्मयुक्त व्यवहारांमध्यें प्रवृत्त करावें.

[प्रश्न] संन्यासग्रहण करणें हा ब्राह्मणाचा धर्म आहे की क्षत्रियादिकांचाहि आहे? [उत्तर] जो सर्व वर्णांमध्यें पूर्ण विद्वान्, पूर्ण धार्मिक व परोपकारप्रिय असतो त्याला ब्राह्मण असे म्हणतात. अशालाच संन्यास घेण्याचा अधिकार आहे. पूर्ण विद्या, परमेश्वरावर व धर्मावर निष्ठा, वैराग्य व परोपकारबुद्धि या गुणांनीं युक्त नसणाऱ्यानें संन्यास घेतला तरी त्यापासून संसारांत विशेष उपकार होत नाहीं. म्हणून (पूर्वोक्त गुणयुक्त) ब्राह्मणालाच संन्यासाचा अधिकार आहे असे सर्व समजतात. ब्राह्मणेतरांना अधिकार नाहीं. पहा—

एष वोऽभिहितो धर्मो ब्राह्मणस्य चतुर्विधः । पुण्योऽक्षयफलः प्रेत्य राजधर्मान्निबोधत ॥ मनु. ६।९७.

मनु म्हणतो कीं, 'हे ऋषिलोक हो ! हा चार प्रकारचा अर्थात् ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम स्वीकारणें हा ब्राह्मणाचा धर्म आहे. त्यांत संन्यासाश्रम हा या ठिकाणीं पुण्यस्वरूप होऊन व शरीर सुटल्यानंतर मोक्षरूप होऊन अक्षय्य आनंद प्राप्त करून देतो. यापुढें राजांचा धर्म ऐका.' यावरून हें ठरतें कीं, संन्यास ग्रहण करण्याचा मुख्य अधिकार ब्राह्मणाला आहे व ब्रह्मचर्यादि इतर तीनहि आश्रमांचा अधिकार क्षत्रियादिकांना आहे.

[प्रश्न] संन्यास घेण्याची आवश्यकता काय आहे? [उत्तर] ज्याप्रमाणें शरीरामध्यें शिराची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणें आश्रमांमध्यें संन्यासाची आवश्यकता आहे; कारण या आश्रमावांचून विद्या व धर्म यांची वाढ व उन्नति होऊं शकत नाहीं. धर्मोन्नति व धर्मवृद्धि करण्यास इतर आश्रमांतील लोकांना वेळ नसतो; कारण ते विद्याग्रहण, गृहकृत्यें व तपश्चर्यादि स्वकीय आश्रमांतील कृत्यें करण्यांत प्रवृत्त झालेले असतात. संन्यासी जसा पूर्णपणें निःपक्षपाती होऊं शकेल तसा इतर आश्रमस्थ पुरुष होऊं शकणार नाहीं, संन्यासी जसा सर्वतोमुक्त होऊन सर्व जगतावर उपकार करूं शकतो तसा इतर आश्रमांतील मनुष्य करूं शकत नाहीं; कारण संन्याशाला, सत्यविद्यांच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या पदार्थासंबंधीं विज्ञानाची उन्नति करण्यास, जसा वेळ मिळतो तसा इतर आश्रमीयांना, आपआपलीं कर्तव्यें करावयाचीं असल्यामुळें, मिळत नाहीं. [प्रश्न] संन्यास घेणें हें ईश्वरी नियमांच्या विरुद्ध आहे. कारण मनुष्यांची वाढ करणें हें ईश्वराला इष्ट आहे. जर सर्व लोक संन्यासी बनले तर सर्वांचें मूल-छेदन होऊन प्रजोत्पत्ति हा परमेश्वराचा मुख्य उद्देशहि साधणार नाहीं. तेव्हां संन्यास हा श्रेष्ठ आश्रम कसा? [उत्तर] आपला कोटिक्रम ठीक आहे. पण पहा, विवाह करूनहि पुष्कळांना संतानोत्पत्ति होत नाहीं, कित्येकांना होऊन शीघ्र नाहींशी होते; काय यांनाहि तुम्ही परमेश्वराच्या विरुद्ध वागणारे म्हणतां? 'यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः।' यत्न केला असतां फलप्राप्ति झाली नाहीं तर त्यांत कर्त्याचा काय बरें दोष? असें तुम्हीं म्हणाल, तर त्यावर आम्ही असें तुम्हांस विचारतों कीं, कुटुंबामध्यें पुष्कळ मुलें उत्पन्न होऊन तीं एकमेकाशीं विरुद्ध आचरण करून भांडून भांडून मरतात व त्यांचा आणि आपला नाश करून घेतात, हें चांगलें काय? जेव्हां कोणी एखादा संन्यासी वेदोक्त कर्माचा उपदेश करून सर्वांना धर्मामृत पाजतो तेव्हांच त्या परस्परांत प्रीति उत्पन्न होऊन लाखों मनुष्यांचें कलहापासून रक्षण होतें. सहस्त्रों गृहस्थांमध्यें आनंद वाढवून त्यांची तो उन्नति करील. हें काम संन्याशाशिवाय कोण करणार? सर्व मनुष्यें संन्यास घेतील ही भीति बाळगण्याचें कारण नाहीं, कारण विषयांवरील आसक्ति सर्वांची नाश पावणें शक्य नाहीं. जे लोक संन्याशाच्या उपदेशानें धार्मिक होतात ते त्याचे धर्मपुत्र आहेत असें समजावें. [प्रश्न] हल्लींचे पुष्कळ संन्यासी तर असें समजतात कीं, आपणाला कांहीं कर्तव्य नाहीं, जे काय यदृच्छेनें मिळेल त्यांत आनंदानें आम्ही राहूं, उगीच अविद्येमध्यें पडणाऱ्या लोकांशीं डोकेफोड कोण करतो? आम्ही ब्रह्मस्वरूप आहोंत, आम्हांला काय करावयाचें आहे! तूं ब्रह्म आहेस हें दुसऱ्याला सांगावें, कांहीं केलें तरी त्याचें पापपुण्य तुला लागत नाहीं अशी त्याची खात्री करावी, शीतोष्णें शरीराला भासतात, क्षुधातृषा प्राणाला भासतात, सुखदुःख हा मनाचा धर्म आहे, जग मिथ्या असून जगांतील व्यवहारहि सर्व कल्पित व असत्य आहेत, यासाठीं या व्यवहारांच्या पाठीमागें लागणें हें विद्वानांना योग्य नाहीं. जें कांहीं आपणाकडून पापपुण्य घडतें तें सर्व देह व इंद्रियें हींच करतात, आत्म्याचा त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं, अशा प्रकारचा हे संन्यासी उपदेश करतात; असें असतां तुम्ही सांगत अहां सा कांहीं निराळाच धर्म दिसतो, तेव्हां आम्ही खरें तरी काय समजावें? [उत्तर] काय त्यांना उत्तम उत्तम कर्तव्यें करावयाचीं नसतात? मनूनें तर 'वैदिकैश्चैव कर्मभिः।' धर्मयुक्त वैदिक सत्कर्में संन्याशानें अवश्य केलीं पाहिजेत जसें म्हटलें आहे. भोजनाच्छादनादिक कृत्यें ते सोडूं शकतात? जर हीं कर्में सुटत नाहींत तर मग उत्तम कर्में ते न करतील तर पतित व पापभोगी ते होणार नाहींत काय? ज्याअर्थी ते गृहस्थांकडून अन्नवस्त्र घेतात त्या अर्थी गृहयावर धर्मोपदेशद्वारें प्रत्युपकार करणें हें त्यांचें कर्तव्य जर त्यांनीं केलें नाहीं तर ते पापी होणार नाहींत काय? ज्या नाकानें वास येत नाहीं, डोळ्यांनी दिसत नाहीं व कानानें ऐकूं येत नाहीं ते नाक, डोळे व कान असून जसा उपयोग नाहीं, त्याचप्रमाणें सत्योपदेश व वेदादिशास्त्रांचा विचार व प्रचार न करणारे संन्यासी जगांमध्यें व्यर्थ जिवंत राहत असून भाररूप आहेत. लोकांशीं डोकेफोड कोणीं करावी असें म्हणणारे व मिथ्यावादाचा प्रसार करणारे सर्व लोक पापी आहेत असें समजावें. जे शरीरादिकांकडून काम केलें जातें त्याचा प्रेरक आत्माच आहे, व त्या कृतकर्माचा फलभोक्ताहि तोच आहे. जे जीवाला ब्रह्म मानतात ते अविद्येमध्यें बुडलेले असतात असें समजावें; कारण जीव अल्प व अल्पज्ञ आहे व ब्रह्म सर्वव्यापक, सर्वज्ञ, नित्य, शुद्ध, बुद्ध व मुक्तस्वभाव असें आहे. जीव केव्हां बध्दां असतो व केव्हां मुक्त असतो. ब्रह्म सर्वव्यापक व सर्वज्ञ असल्यामुळें त्याला भ्रम किंवा अविद्या

प्राप्त होणें शक्य नाहीं. जीवाला मात्र केव्हां अज्ञान व केव्हां ज्ञान प्राप्त होतें. ब्रह्म जन्ममरण व दुःख यांना केव्हांहि प्राप्त होऊं शकत नाहीं, पण जीवाला मात्र तें प्राप्त होतें. यासाठीं त्यांचा तो उपदेश खोटा आहे असें सर्वांनीं समजावें. [प्रश्न] संन्यासी सर्व कर्मांना सोडतात, अग्नि व धातु यांना स्पर्श करीत नाहींत हें धर्माला धरून आहे कीं काय ? [उ०] नाहीं **'सम्यङ्नियमास्ते यस्मिन् यद्वा सम्यङ्न्यस्यन्ति दुःखानि कर्माणि येन स संन्यासः स प्रशस्तो विद्यते यस्य स संन्यासी ।'** जो दुष्ट कर्माचा त्याग करतो व उत्तम स्वभाव धारण करतो, त्याला संन्यासी असें म्हणतात. संन्यासी हा सुकर्म करणारा व दुष्ट कृत्यांचा प्रतिकार करणारा असतो. [प्रश्न] अध्यापन व उपदेश गृहस्थहि करतात मग संन्याशाची काय आवश्यकता आहे ? [उत्तर] सर्व आश्रमांतील जनांनीं सत्योपदेश करावा व ऐकावा पण संन्याशाला ज्याप्रमाणें अवकाश असतो तसा इतरांना नसतो व तो जसा निःपक्षपातीपणानें हें काम करूं शकतो त्याप्रमाणें गृहस्थी लोकांकडून होणें शक्य नाहीं. विद्वान् ब्राह्मण स्त्री-पुरुषांनीं अनुक्रमें स्त्रीपुरुषांना उपदेश करावा हें त्यांस योग्य आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं अध्यापनाचेंहि काम आपणाकडे घ्यावें हें उत्तम. पण देशोदेशीं फिरून लोकांमध्यें धर्मजागृति करणें हें संन्याशाशिवाय दुसऱ्याकडून होणें शक्य नाहीं. जेव्हां ब्राह्मण वेद-विरुद्ध व धर्मविरुद्ध आचरण करतात तेव्हां त्यांचें नियमन कर्तव्यदक्ष संन्यासीच करूं शकतो. यासाठीं संन्यासी देशांत असणें उचित आहे. [प्रश्न] **'एकरात्रिं वसेद् ग्रामे'** इत्यादि वचनांमध्यें संन्यासानें एका गांवामध्यें एकच रात्र रहावें असें सांगितलें आहे. तें योग्य आहे काय ? [उत्तर] हें कांहीं अंशीं खरें आहे. एके ठिकाणींच संन्यासी राहील तर त्याच्याकडून जगावर जास्त उपकार होणार नाहीं. स्थानविशेषाचा अभिमान व त्यामुळें रागद्वेषहि जास्त होतो. जर एकत्र राहून विशेष जनहित होत असेल तर रहावें, त्याला धर्माचा कांही प्रतिबंध नाहीं. पूर्वी जनक राजाच्या येथें पंचशिखादि संन्यासी चारचार महिने राहिले होते, व दुसरे कांहीं तर अनेक वर्षे राहिले होते. आधु-निक पाखंडी संन्यासी तर एकच जास्त दिवस कां राहात नाहींत याचें कारण निराळें आहे. जर ते एका गांवीं राहिलें तर त्यांचे पाखंड बाहेर फुटेल व अप्रतिष्ठा होईल म्हणून ते एका गांवात फार दिवस राहत नाहींत. [प्रश्न]

**यतीनां काञ्चनं दद्यात्ताम्बूलं ब्रह्मचारिणाम् । चौराणामभयं दद्यात्स नरो नरकं व्रजेत् ॥**

इत्यादि वचनामध्यें संन्याशाला सुवर्णदान करूं नये असें सांगितलें आहे, हें चांगलें कीं वाईट ? [उत्तर] हीं वचनें वर्णाश्रमधर्माच्या विरुद्ध असणाऱ्या सांप्रदायी, स्वार्थसाधू पौराणिक लोकांनीं बनविलेलीं आहेत. या पौराणिक लोकांना असें वाटत असावें कीं, जर संन्यासी लोकांना द्रव्य मिळालें तर ते आपल्या पौराणिक कपोलकल्पित मतांचें फार खंडन करतील व त्यामुळें आपला तोटा होईल; ते आपल्या आधीन राहणार नाहींत, जोपर्यंत संन्यासी भिक्षा-वृत्तीनें राहतील, तोंपर्यंतच ते आपल्या स्वाधीन राहतील व आपलें खंडन करणार नाहींत. आतां असें पहा कीं, जर मूर्ख व स्वार्थी लोकांना दान केलें असतां आपण उत्तम कृत्य केलें असें ते समजतात, तर मग विद्वान् व परोपकारी संन्याशाला दान देण्यापासून हानी कशी व कां होईल ? तसेंच म्हटलें आहेः—

**विविधानि च रत्नानि विविक्तेषूपपादयेत् ॥** मनु. ११।६.

'नानाप्रकारचीं रत्नें (विविक्त) संन्याशाला द्यावीत.' याप्रमाणें मनुस्मृतीमध्यें लिहिलें आहे. तसेच मागच्या श्लोकांत यतीला सुवर्ण देणारा नरकाला जातो असे म्हटलें आहे, त्यावरून चांदी, मोती, हिरे वगैरे देणारा स्वर्गाला जातो असा अर्थ निघतो. असो. तात्पर्य उत्तम कर्तव्यदक्ष संन्याशाला द्रव्य देणें वाईट नाहीं. (प्रश्न) **'यतिहस्ते धनं दद्यात्'** जो संन्याशाच्या हातांत धन देतो तो नरकाला जातो. अशीं वचनें आहेत याची वाट काय ? (उत्तर) हें वचनहि अविद्वानानें बनावट केलें आहे. पहा—जर हातांत धन देऊं नये तर काय पायांवर ठेवावें ? कीं गठळी बांधून द्यावें ? असल्या कल्पना प्रमाण मानणें योग्य नाहीं. ही गोष्ट खरी आहे कीं, जर संन्याशाला जास्त द्रव्य मिळेल तर तो मोहित होईल व चैनी बनून अनेक रोगांनीं व पापवासनांनीं पीडितहि होईल. पण ही गोष्ट अज्ञानी माणसाची झाली. जो मनुष्य विद्वान् व कर्तव्यदक्ष असतो, तो अयुक्त व्यवहार कधींहि करणार नाहीं व मोहांमध्येंहि फसणार नाहीं. जो विद्वान् पुरुष गृहस्थाश्रम पालन करून झाल्यावर संन्यस्त होतो, किंवा ब्रह्मचर्यावस्थेमध्येंच पूर्ण

विरक्त होऊन संन्यास ग्रहण करतो, त्याच्याकडून अयोग्य वर्तन होऊं शकत नाहीं. (प्रश्न) लोक असें म्हणतात कीं, श्राद्धामध्यें जर संन्यासी लोक येऊन जेवले तर जेऊं घालणाऱ्याचे पितर नरकांत जातात. हें खरें काय ? (उत्तर) प्रथमतः मेलेले पितर येणें, श्राद्धांत दिलेलें अन्न त्यांना पोंचणें या गोष्टी सर्वथैव अप्रमाण व वेदाच्या आणि तर्काच्या विरुद्ध आहेत म्हणून या गोष्टी कोणीहि खऱ्या मानूं नयेत. कारण ते जर येऊंच शकत नाहींत, तर मग ते नरकांत जाणें शक्य कसें असणार ? ईश्वराच्या उत्तम व्यवस्थेनें मरणानंतर जीव आपआपल्या पापपुण्यांप्रमाणें अन्य जन्म घेतात. तेथून त्यांचें येणें शक्य कसें होईल ? म्हणून ही गोष्ट पोटार्थी पौराणिकांनी मननानें खोटीच कल्पिली आहे. जेथें संन्यासी जातील तेथें ते मृताचें श्राद्ध करणें हें वेदादि शास्त्रांच्या विरुद्ध आहे असें सर्वांना सांगतील व त्या योगानें हें पाखंड दूर होईल, या भीतीनें स्वार्थी लोकांनी वरील प्रकारचीं वचनें लिहिलीं आहेत. (प्रश्न) जो ब्रह्मचर्यांतून संन्यास घेईल त्याचा निर्वाह होणें कठीण पडेल, व कामविकाराचा प्रतिबंध करणेंहि त्यास कठीण होईल. म्हणून गृहस्थाश्रम व वानप्रस्थाश्रम यांचें पालन झाल्यावरच संन्यास घेणें चांगलें कीं नाहीं ? (उत्तर) जो निर्वाह करूं शकणार नाहीं व ज्याच्यानें इंद्रियांचा निरोध होणार नाहीं त्यानें ब्रह्मचर्यांतून संन्यास घेऊं नये, पण जो इंद्रियांचा संयम करूं शकेल त्यानें कां घेऊं नये ? ज्याला विषयांपासून उत्पन्न होणारे दोष व वीर्यरक्षणाचे गुण समजले आहेत, तो केव्हांहि विषयासक्त होणार नाहीं. त्याचें वीर्य सुविचार वाढवण्याच्या कामीं खर्च होतें. वैद्य व औषधें यांची आवश्यकता रोग्याला असते तशी ती निरोगी मनुष्याला नसते. त्याचप्रमाणें ज्या स्त्रीला किंवा पुरुषाला विद्या व धर्म यांची वृद्धि करावयाची असेल व जगावर उपकार करावयाचा असेल त्यांनीं विवाह करूं नये. याच नियमाला अनुसरून पंचशिखादि पुरुष व गार्गी वगैरे स्त्रिया यांनीं विवाह केला नाहीं. म्हणून योग्य व विद्वान् मनुष्यांनींच संन्यास घ्यावा हें त्यांस उचित आहे. जे अयोग्य व अनधिकारी संन्यास घेतील ते स्वतः पतित होऊन दुसऱ्यालाहि खड्ड्यांत पाडतील. ज्याप्रमाणें राजाला 'सम्राट्' असें म्हणतात; त्याचप्रमाणें संन्याशाला 'परिव्राट्' असें म्हणतात. पण दोहोंमध्यें भेद इतकाच कीं, राजाचा मान त्याच्या देशांतच असतो पण संन्याशाचा मान सर्व देशांत असतो. यथा:—

विद्वत्त्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन ।। स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ।। चाणक्य नीति

विद्वान् व राजा यांची तुलना होऊं शकत नाहीं, कारण राजाचा सत्कार त्याची प्रजाच करते पण विद्वानाचा सत्कार सर्व ठिकाणीं होतो. म्हणून हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें कीं, विद्या, सुशिक्षण व बल ही प्राप्त करून घेण्यासाठीं ब्रह्मचर्याश्रम आहे; सर्व प्रकारचे सामाजिक, राष्ट्रीय, औद्योगिक वगैरे उत्तम व्यवहार सिद्ध करण्यासाठीं गृहस्थाश्रम आहे; विचार, ध्यान व विज्ञान वाढण्यासाठीं व तप करण्यासाठी वानप्रस्थाश्रम आहे व वेदादि सत्य शास्त्रांचा प्रसार, धार्मिक व्यवहाराचा स्वीकार, दुष्ट व्यवहाराचा त्याग व सर्वांस सत्य उपदेश करण्यासाठीं संन्यासाश्रम आहे. जे लोक संन्यास घेऊन सत्योपदेशाचें काम करीत नसतात ते पतित होऊन नरकगामी होतात. म्हणून सर्व संन्याशांनीं प्रयत्न करून सत्योपदेश, शंकासमाधान, वेदादि सत्यशास्त्रांचें अध्यापन, वेदोक्त धर्माची वृद्धि इत्यादि करून सर्व जगाची उन्नति करावी. (प्र.) जे संन्यासी नाहींत, असे साधु वैरागी, गोसावी वगैरे प्रकारचे लोक आहेत त्यांचा समावेश संन्याशांत होतो कीं नाहीं ? (उ.) नाहीं. कारण त्यांच्यांत संन्याशाचें एकहि लक्षण नाहीं. ते वेदविरुद्ध मार्गामध्यें प्रवृत्त होऊन वेदवचनापेक्षा आपल्या संप्रदायांच्या आचार्यांचीं वचनें जास्त प्रमाणभूत समजतात ! आपल्याच मताची प्रशंसा करतात ! स्वतः या प्रपंचामध्यें फसून दुसऱ्यांलहि आपल्या मतामध्यें ओढून फसवितात ! लोकांची सुधारणा करणें तर दूर राहिलें पण सर्वांना खोट्या मार्गानें नेऊन त्याची हे अधोगति करतात व आपला स्वार्थ साधतात. म्हणून यांची संन्यासाश्रमामध्यें गणना करतां येत नाही त्यांची गणना स्वार्थाश्रमांत करावी. जे लोक स्वतः धर्माप्रमाणें चालून, दुसऱ्यांना त्याप्रमाणें चालण्याचा उपदेश करतात व स्वतःसहित सर्व संसाराला या जन्मीं व दुसऱ्या जन्मीं सुखी करतात त्याच धन्य व धार्मिक पुरुषांना संन्यासी असें म्हणतात. याप्रमाणें संक्षेपानें संन्यासाश्रमासंबंधानें विवरण झालें. आतां याच्यापुढें राजा व प्रजा यांच्या धर्माविषयीं लिहिलें जाईल.

इति सुभाषाविभूषिते वानप्रस्थ-संन्यासाश्रमविषये पंचमः समुल्लासः संपूर्णः ।। ५ ।।

# अथ षष्ठसमुल्लासः

अथ राजधर्मान् व्याख्यास्यामः ।

राजधर्मान् प्रवक्ष्यामि यथावृत्तो भवेन्नृपः ॥ संभवश्च यथा तस्य सिद्धिश्च परमा यथा ॥१॥
ब्राह्मं प्राप्तेन संस्कारं क्षत्रियेण यथाविधि ॥ सर्वस्यास्य यथान्यायं कर्तव्यं परिरक्षणम् ॥२॥ मनु. अ. ७

भगवान मनु महर्षींना सांगतात कीं, चार वर्णांच्या व आश्रमांच्या व्यवहाराचें कथन केल्यानंतर 'राजधर्मांचें कथन करतों,' राजानें वर्तन कसें करावें, त्याची उत्पत्ति कशी होते, व त्याला प्रभुतेची परम सिद्धि कशी प्राप्त होते, हें सर्व सांगतों. यथाविधि वेदोक्त संस्कार प्राप्त झालेल्या क्षत्रियानें आपल्या सर्व राज्याचें रक्षण न्यायानें केल्यानें तो खरा राजा होतो. राजानें प्रजेचें रक्षण कसें करावें, तें पुढील वेदमंत्रांत सांगितलें आहे.–

त्रीणि राजाना विदथे पुरूणि परि विश्वानि भूषथः सदांसि ॥ ऋ. मं. ३ सू. ३८ मं. ६

परमेश्वर उपदेश करतो कीं, (राजाना) राजा व प्रजेंतील पुरुष मिळून (विदथे) सुखप्राप्तिकारक व ज्ञानवृद्धि-कारक, राजा व प्रजा यांच्या संबंधानें उत्पन्न होणाऱ्या व्यवहारामध्यें (त्रीणि) तीन (सदांसि) सभा-विद्यार्यसभा, धर्मार्यसभा व राजार्य सभा-नियत करून (पुरूणि) पुष्कळ (विश्वानि) समग्र प्रजासंबंधी मनुष्यांना प्राण्यादि (परिभूषथः) सर्व प्रकारे विद्या, स्वातंत्र्य, धर्म, सुशिक्षा व धन इत्यादि पदार्थांनीं अलंकृत करावें. तसेंच—

तं सभा च समितिश्च सेना च ॥ १ ॥ अथर्व. १५।२।९।२.

सभ्य सभां मे पाहि ये च सभ्याः सभासदः ॥२॥ अथर्व. १९।७।५५।६.

(तम्) त्या राजधर्माचें (सभा च) त्या तीनहि सभांनीं व (समितिश्च) संग्रामव्यवस्था, युद्धकला यांच्या योगानें व (सेना च) सैन्याच्या योगानें रक्षण करावें.

राजानें सर्व सभासदांना अशी आज्ञा करावी कीं, हे (सभ्य) सभाध्यक्षांनीं विराजमान होण्यास योग्य अशा मुख्य सभापते ! तूं (मे) माझ्या (सभाम्) सभेच्या धर्मयुक्त व्यवस्थेचें (पाहि) पालन कर व (ये च) जे (सभ्याः) सभेमध्यें प्रवेश करण्यास योग्य, असे (सभासदः) सभासद असतील त्यांनीं ही पूर्वोक्त सभेची व्यवस्था नीट ठेवावी. याचा अभिप्राय असा आहे कीं, कोणा एका विशिष्ट व्यक्तीला राज्याचा सर्व अधिकार देऊं नये. राजाच्या आधीन सभा, सभेच्या आधीन राजा व प्रजेच्या आधीन राजा व राजसभा अशी व्यवस्था असावी. राजा जेथें स्वतंत्र असतो व त्यावर कोणाचाहि दाब नसतो तेथें कशी विपत्ति होते ती पाहा: —

राष्ट्रमेव विश्याहन्ति तस्माद्राष्ट्री विशं घातुकः । विशमेव राष्ट्रायाद्यां करोति तस्माद्राष्ट्री विशमत्ति न पुष्टं पशुं मन्यत इति ॥ शत. १३।२।३।७-८.

जो अनियंत्रित राजा असतो, (राष्ट्रम् एव विशि आहन्ति) तो राष्ट्रामध्यें प्रवेश करून प्रजेचा नाश करतो, अर्थात् एकटा अनियंत्रित राजा उन्मत्त होऊन (राष्ट्री विशं घातुकः) तो प्रजेचा घात करण्यास कारण होतो. (विशमेव राष्ट्री आद्यां करोति) तो उन्मत्त राजा प्रजेला खाऊन टाकतो, अर्थात् प्रजेला अत्यंत पीडा देतो, म्हणून कोणाच्याहि हातांत अनियंत्रित राजसत्ता असूं नये. ज्याप्रमाणें सिंहव्याघ्रादि हिंस्र पशू (पुष्टं पशुं न मन्यते) दुसऱ्या पुष्ट पशूंना पाहून ते जिवंत रहावेत असें इच्छित नाहींत, तर त्यांना मारून टाकतात, त्याचप्रमाणें अनियंत्रित उन्मत्त राजा (राष्ट्री विशम् अत्ति) प्रजेचा नाश करतो. आपल्या राज्यांत कोणालाहि वाढूं देत नाहीं, श्रीमान् पुरुषांना लुटतो, अनेक अन्याय करतो व आपलें काम साधतो. म्हणून—

इन्द्रो जयाति न परा जयाता अधिराजो राजसु राजयातै ॥ चर्कृत्य ईड्यो वन्द्यश्चोपसद्यो नमस्यो भवेह ॥
अथर्व. ६।१०।९८।१

हे मनुष्य हो ! जो या तुमच्या [ इह ] समुदायामध्यें [ इन्द्रः ] परम ऐश्वर्याचा कर्ता व शत्रूंना [ जयाति ] जिंकणारा व कधींहि [ न पराजयाता ] ज्याचा पराजय होत नाहीं व जो [राजसु] राजांमध्यें [अधिराजः] सर्वांपेक्षां श्रेष्ठ व [ राजयातै ] त्यामध्यें प्रकाशमान् होतो [ चर्कृत्य ] सभापति होण्याला अत्यंत योग्य [ ईड्यः ] प्रशंसनीय गुणकर्मस्वभावयुक्त [वन्द्यः] सत्कार करण्यास योग्य [च उपसद्यः] जवळ जाण्यास व शरण जाण्यास योग्य व [नमस्यः] सर्वांनीं नमस्कार करण्यास योग्य असतो, तोच तुमचा सभापति [भव] होवो. अर्थात् लोकांनीं अशाप्रकारें गुणविशिष्ट पुरुषाला सभापति–लोकनियुक्त राजा करावा. तसेच—

**इमन्देवा असपत्न ँ सुवध्वं महते क्षत्राय महते ज्यैष्ठयाय महते जानराज्यायेन्द्रस्येन्द्रियाय ।।** यजु. ९।४०

हे [देवाः] विद्वान् राजा व प्रजा जन हो ! तुम्ही [इयम्] या प्रकारच्या मनुष्याला [महते-क्षत्राय] महान् चक्रवर्ती राज्यासाठीं [महते ज्यैष्ठयाय] सर्वांहून मोठे होण्यासाठीं [महते जानराज्याय] महान् महान् विद्वानांनीं युक्त अशा राज्याचें पालन करण्यासाठीं [इन्द्रस्य इन्द्रियाय] परम ऐश्वर्ययुक्त राज्याचें व धनाचें रक्षण करण्यासाठीं [असपत्नं सुवध्वम्] सर्व संमति करून पक्षपातरहित, पूर्ण विद्यायुक्त, विनयशील, सर्वांचा मित्र, अशा लोकनियुक्त सभापतीला राजा व सर्वाधीश मानून सर्व भूमंडळावरील शत्रुभाव नाहींसा करावा, व—

**स्थिरा वः सन्त्वायुधा पराणुदे वीळू उत प्रतिष्कभे ॥**
**युष्माकमस्तु तविषी पनीयसी मा मर्त्यस्य मायिनः ॥** ऋ. १।३९।२

ईश्वर उपदेश करीत आहे कीं, हे राजपुरुष हो ! [वः] तुमचीं [अयुधा] आग्नेयादि अस्त्रें, शतघ्नी अर्थात् तोफा, भुशुंडी अर्थात् बंदुका, धनुष्य, बाण, तलवार इत्यादि शस्त्रें शत्रूंचा [पराणुदे] पराजय करण्यासाठीं व [उत प्रतिष्कभे] त्यांचा प्रतीकार करण्यासाठीं [वीळू] प्रशंसित व [स्थिरा] दृढ [सन्तु] असावींत. सदासर्वदा तुम्हीं तुमची शस्त्रास्त्रें तयार ठेवा. व [ युष्माकम् ] तुमची [ तविषी ] सेना [ पनीयसी ] प्रशंसनीय [ अस्तु ] असावी. तुम्ही नेहेमी विजयी व्हाल अशी सैन्याची तयारी ठेवा. [मा मायिनः मर्त्यस्य] पण जो निंदित व अन्यायरूपी कपट-युक्त काम करणारा मनुष्य असेल, त्याला पूर्वोक्त शस्त्रास्त्रें-जीं तुमच्याजवळ आहेत तीं-न लाभोत. जोंपर्यंत मनुष्यें धार्मिक असतात, तोंपर्यंत त्यांच्या राज्याची वृद्धि होत असते, पण जेव्हां अधर्मयुक्त आचरण करूं लागतात, तेव्हां त्यांच्या नाशाला प्रारंभ होतो. महान् विद्वानांना विद्यासभेचा अधिकार द्यावा, धार्मिक विद्वानांना धर्मसभेचा अधिकार द्यावा व प्रशंसनीय धार्मिक पुरुषांना राजसभेचे सभासद बनवाव व त्यांमध्यें सर्वोत्तम गुणांनीं जो उत्तम व मोठा विद्वान् पुरुष असेल त्याला सभापति किंवा लोकनियुक्त राजा करावा व याप्रमाणें सर्वांनीं आपली उन्नति करावी. तीनहि सभांच्या संमतीनें राजनीतीचे नियम करावेत व त्या नियमांच्या आधीन सर्व लोकांनीं वागावें. सर्वांच्या संमतीनें सार्वजनिक हिताची कामें करावींत. सार्वजनिक हितकारी कामांमध्यें मनुष्यानें परतंत्र असावे व स्वकीय हिताचें काम करण्यांत मनुष्यानें स्वतंत्र असावे. सभापतीचे गुण कसे असावे ?

**इन्द्रानिलयमार्काणामग्नेश्च वरुणस्य च । चन्द्रवित्तेशयोश्चैव मात्रा निर्हृत्य शाश्वतीः ॥४॥**
**तपत्यादित्यवच्चैव चक्षूंषि च मनांसि च । न चैनं भुवि शक्नोति कश्चिदप्यभिवीक्षितुम् ॥६॥**
**सोऽग्निर्भवति वायुश्च सोऽर्कः सोमः स धर्मराट् । स कुबेरः स वरुणः स महेन्द्रः प्रभावतः ॥७॥** मनु. अ० ७.

तो सभेश राजा (इन्द्रः) विद्युच्छक्तीप्रमाणें शीघ्र ऐश्वर्य संपादन करणारा, (अनिलः) वायुप्रमाणें सर्वांना प्राणां-सारखा प्रिय व हृदयांतील गोष्ट जाणणारा, (यमः) निःपक्षपाती न्यायाधीशाप्रमाणें वर्तन करणारा (सूर्यः) सूर्यप्रमाणें न्याय, धर्म व विद्या यांचा प्रकाशक व अन्याय, अधर्म व अविद्या यांचा निरोध करणारा (अग्निः) विस्तवाप्रमाणें दुष्टांचें भस्म करणारा, (वरुणः) दुष्टाला अनेक प्रकारें बांधणारा, (चन्द्रः) चंद्राप्रमाणें श्रेष्ठाला आनंद देणारा, (वित्तेश) कुबेराप्रमाणें खजिने भरून ठेवणारा, असा असावा; तो सूर्यप्रमाणें प्रतापी, आपल्या तेजानें सर्वांना बाहेरून व आंतून मनाला तप्त व चकित करणारा, त्याच्याकडे करड्या नजरेनें पाहण्यास कोणीहि समर्थ नसतो. जो अग्नि

वायु, सूर्य व सोम यांच्यांतील गुणांनीं युक्त, धर्माचा प्रकाश करणारा, धनाची वृद्धि करणारा व ऐश्वर्ययुक्त असेल तोच सभाध्यक्ष होण्यास योग्य आहे असें समजावें. आतां खरा राजा कोण तें पाहूं.

**स राजा पुरुषो दण्डः स नेता शासिता च सः। चतुर्णामाश्रमाणां च धर्मस्य प्रतिभूः स्मृतः ॥१७॥ मनु. ७.**

दण्ड हाच पुरुष व राजा, तोच न्यायकर्ता, तोच चार वर्ण व चार आश्रम यांच्या धर्माचा जिम्मेदार असतो.

**दण्डः शास्ति प्रजाः सर्वा दण्ड एवाभिरक्षति। दण्डः सुप्तेषु जागर्ति दण्डं धर्मं विदुर्बुधाः ॥१८॥ मनु. ७.**

दण्ड हाच प्रजांचे शासन करणारा, सर्वांचें रक्षण करणारा, मनुष्य निजले असतां तोच जागतो, म्हणून बुद्धिमान् लोक दण्डालाच धर्म असें मानतात.

**समीक्ष्य स धृतः सम्यक् सर्वा रंजयति प्रजाः। असमीक्ष्य प्रणीतस्तु विनाशयति सर्वतः ॥१९॥ मनु. ७.**

विचार करून जो दण्ड केला जातो त्याच्या योगानें सर्व प्रजा आनंदित होतात, पण अविचारानें केलेल्या दण्डापासून सर्वांचा सर्वप्रकारें नाश होतो. तसेंच—

**दुष्येयुः सर्ववर्णाश्च भिद्येरन् सर्वसेतवः। सर्वलोकप्रकोपश्च भवेद्दण्डस्य विभ्रमात् ॥२४॥ मनु. ७.**

दंड न करण्यापासून सर्व वर्ण दूषित होतील, व सर्व मर्यादा नाहींशा होतील, त्याचप्रमाणें अयोग्य दंड केल्यानें सर्व लोक ग्रस्त व क्षुब्ध होतात.

**यत्र श्यामो लोहिताक्षो दण्डश्चरति पापहा। प्रजास्तत्र न मुह्यन्ति नेता चेत्साधु पश्यति ॥२५॥ मनु. ७.**

ज्या ठिकाणीं कृष्णवर्ण व रक्तनेत्रयुक्त भयंकर पुरुषाप्रमाणें दण्ड सर्वत्र पापांचा नाश करण्यास तयार असतो, त्या ठिकाणीं प्रजा मोहयुक्त होत नाहीं व सदोदित आनंदित असते. जर पक्षपातरहित विद्वान् पुरुष न्याय देणारा असेल तेथेंच अशी स्थिति असते, पण जेथें पक्षपाती राजपुरुष असतो तेथील स्थिति फार भयंकर असते.

**तस्याहुः संप्रणेतारं राजानं सत्यवादिनम्। समीक्ष्य कारिणं प्राज्ञं धर्मकामार्थकोविदम् ॥२६॥ मनु. ७.**

जो राजा सत्यवादी, विचारशील, बुद्धिमान् व धर्म–अर्थ–काम सिद्ध करण्यांत तत्पर असतो तोच दंड देण्यास योग्य आहे असें विद्वान् समजतात.

**तं राजा प्रणयन् सम्यक् त्रिवर्गेणाभिवर्धते। कामात्मा विषमः क्षुद्रो दण्डेनैव निहन्यते ॥२७॥ मनु. ७.**

जो राजा उत्तम प्रकारें विचारानें दंड करतो, तो धर्म, अर्थ व काम यांची वृद्धि करतो, पण जो विषयलंपट, क्षुद्र व अयोग्य असतो त्याचा त्या दंडानेंच नाश होतो.

**दंडो हि सुमहत्तेजो दुर्धरश्चाकृतात्मभिः। धर्माद्विचलितं हन्ति नृपमेव सबान्धवम् ॥२८॥ मनु. ७.**

दंड हा मोठा तेजोमय असल्यामुळें अविद्वान् व अधर्मात्मा पुरुष त्याचें धारण करूं शकत नाहीं; अधार्मिक राजाचा कुलासह तो दंड नाश करतो.

**सोऽसहायेन मूढेन लुब्धेनाकृतबुद्धिना। न शक्यो न्यायतो नेतुं सक्तेन विषयेषु च ॥३०॥ मनु. ७.**

आप्त पुरुषांचें सहाय्य ज्याला नाहीं, जो अशिक्षित, लोभी, विषयलंपट व मूढ असतो तो न्याय करण्यास व दंड देण्यास केव्हांहि योग्य नसतो.

**शुचिना सत्यसंधेन यथा शास्त्रानुसारिणा। प्रणेतुं शक्यते दण्डः सुसहाय्येन धीमता ॥३१॥ मनु. अ. ७.**

जो सदा पवित्र व शुद्ध, सत्याप्रमाणें आमरण वागणारा व सदाचरणी लोकांची संगति धरणारा, नितिशास्त्राप्रमाणें चालणारा, जो श्रेष्ठ पुरुषांच्या सहाय्यानें युक्त असतो व जो स्वतः बुद्धिमान् असतो तोच न्याय करण्यास व दंड देण्यास समर्थ असतो. म्हणून—

**सैनापत्यं च राज्यं च दण्डनेतृत्वमेव च। सर्वं लोकाधिपत्यं च वेदशास्त्रविदर्हति ॥१००॥ मनु. अ. १२**

सैन्यामध्यें सेनापतीच्या जागीं, राज्याच्या अधिकारावर, दंड देण्याच्या न्यायखात्यावर व सर्वाधीशाच्या (राजाच्या) जागेवर, संपूर्ण वेदशास्त्रामध्यें प्रवीण, पूर्ण विद्यायुक्त, धर्मात्मा, जितेंद्रिय, सुशील, अशा लोकांनाच स्थापन

करावें. अर्थात् मुख्य सेनापति, मुख्य राज्याधिकारी, न्यायाधीश, प्रधान, राजा, हे सर्व पूर्ण विद्वान् असलेच पाहिजेत.

दशावरा वा परिषद्यं धर्मं परिकल्पयेत् । त्र्यवरा वापि वृत्तस्था तं धर्मं न विचालयेत् ॥११०॥ मनु. १२.

कमींत कमी दहा किंवा अगदीं हीन पक्षीं, तीन विद्वान् पुरुष ज्या सभेंत असतील, त्या विद्वत्सभेनें केलेले नियम कोणीहि उल्लंघूं नयेत.

त्रैविद्यो हैतुकस्तर्की नैरुक्तो धर्मपाठकः । त्रयश्चाश्रमिणः पूर्वे परिषत्स्याद्दशावरा ॥१११॥
ऋग्वेदविद्यजुर्विच्च सामवेदविदेव च । त्र्यवरा परिषज्ज्ञेया धर्मसंशयनिर्णये ॥११२॥ मनु. अ. १२.

'चार वेदांमध्यें पारंगत झालेले, न्यायशास्त्र, मीमांसात्मक तर्कशास्त्र, निरुक्त व धर्मशास्त्र यांना जाणणारे, असे सभेचे सभासद असावेत. ते ब्रह्मचारी, गृहस्थ किंवा वानप्रस्थी असावेत. सभेमध्यें कमीतकमी दहा तरी सभासद असावेत.' किंवा 'धर्माचा निर्णय करण्यासाठीं ऋग्वेद, यजुर्वेद, व सामवेद जाणणारे निदान तीन तरी सभासद असावेत.' अशा सभेनें केलेले नियम कोणी हि मोडूं नयेत—

एकोऽपि वेदविद्धर्मं यं व्यवस्येद् द्विजोत्तमः ॥ स विज्ञेयः परो धर्मो नाज्ञानामुदितोऽयुतैः ॥११३॥
अव्रतानाममन्त्राणां जातिमात्रोपजीविनाम् ॥ सहस्रशः समेतानां परिषत्त्वं न विद्यते ॥११४॥
यं वदन्ति तमोभूता मूर्खा धर्ममतद्विदः ॥ तत्पापं शतधा भूत्वा तद्वक्तॄननुगच्छति ॥११५॥ मनु. अ. १२.

"सर्व वेद जाणणारा, उत्तम द्विज संन्यासी जो धर्माची व्यवस्था करील ती सर्वांत श्रेष्ठ आहे असें समजावें. कारण तशी धर्मव्यवस्था लाखों अज्ञानी लोक एकत्र मिळाले तरीहि त्यांना करतां येणार नाहीं. व ते अज्ञानी जी करतील ती कोणीहि मानण्यास योग्य नाहीं." 'जे ब्रह्मचर्य, सत्यभाषणादि व्रतें धारण करीत नाहींत, शूद्रवत् वर्तन करतात, असे हजारों पुरुष एकत्र जमले तरी तिला सभा असें म्हणतां येणार नाहीं.' जे अविद्यायुक्त मूढ व वेदांना न जाणणारे असतात, ते जो धर्म सांगतील त्यावर कोणीहि विश्वास ठेवूं नये; कारण जे मूर्खांनीं सांगितलेल्या तत्त्वाप्रमाणें आचरण करतात त्यांच्या पाठीमागें हजारों पातकें लागतात.' यासाठीं विद्यासभा, धर्मसभा व राजसभा यांच्यामध्यें मूर्खांचा प्रवेश होऊं देऊं नये; त्यामध्यें सर्व सभासद पूर्ण विद्वान् व विचारी असावेत. तसेंच राजपुरुषांनां उत्तम लागणारे गुण खालील प्रमाणें आहेत—

त्रैविद्येभ्यस्त्रयीं विद्यां दण्डनीतिं च शाश्वतीम् । आन्वीक्षिकीं चात्मविद्यां वार्तारम्भांश्च लोकतः ॥४३॥
मनु. अ. ७.

जे चारहि वेदांतील कर्म, उपासना व ज्ञान या तीनहि विद्यांना जाणतात, सनातन दण्डनीति न्यायविद्या, आत्मविद्या (अर्थात् परमात्म्याचे गुण, कर्म व स्वभाव जिच्या योगानें जाणले जातात ती ब्रह्मविद्या) लोकांशीं वार्तारंभ अर्थात् प्रश्नोत्तरें करून माहिती काढण्याची विद्या या ज्यांना येत असतील तेच सभांचे सभासद व सभापति होऊं शकतात.

इन्द्रियाणां जये योगं समातिष्ठेद्दिवानिशम् । जितेन्द्रियो हि शक्नोति वशे स्थापयितुं प्रजाः ॥४४॥ मनु. ७.

सर्व सभासद व सभापति यांनीं इन्द्रियनिग्रह करून सदोदित धर्माप्रमाणें वर्तन करावें व अधर्माचा नाश करावा, इन्द्रियांना स्वाधीन ठेवण्यासाठीं त्यांनीं अहोरात्रींमधून नियतसमयीं नियमानें योगाभ्यास करावा. ज्यांच्या ताब्यांत त्यांची मनादि इन्द्रियें व प्राण रहात नाहींत, अर्थात् जो आपल्या शरीरांतील प्रजेला स्वाधीन ठेवूं शकत नाहीं त्याच्या ताब्यामध्यें राज्यांतील लोक येणें सर्वथैव अशक्य आहे. दुर्व्यसनांचा परिणाम—

दश कामसमुत्थानि तथाष्टौ क्रोधजानि च । व्यसनानि दुरन्तानि प्रयत्नेन विवर्जयेत् ॥४५॥
कामजेषु प्रसक्तो हि व्यसनेषु महीपतिः । वियुज्यतेऽर्थधर्माभ्यां क्रोधजेष्वात्मनैव तु ॥४६॥ मनु. अ. ७.

'कामापासून उत्पन्न होणारीं व्यसनें दहा व क्रोधापासून उत्पन्न होणारी व्यसनें आठ आहेत त्यांत जो मनुष्य फसतो त्याचा परिणाम फारच वाईट होतो; त्यांतून सुटणें फार कठीण असतें, म्हणून प्रयत्नानें मनुष्यानें त्यांत सांपडून

फसूं नये.' 'जो राजा कामापासून उत्पन्न झालेल्या दहा दुष्ट व्यसनांत फसतो, तो राज्यादिक धन व धर्म यांना मुकतो व जो क्रोधापासून उत्पन्न झालेल्या आठ व्यसनांत फसला जातो त्याला शरीराला व आत्मोन्नतीलाहि मुकावें लागतें.' कामापासून उत्पन्न होणारीं व्यसनें पुढें लिहिलीं आहेत. काममूलक व्यसनें—

**मृगयाक्षो दिवास्वप्नः परिवादः स्त्रियो मदः तौर्यत्रिकं वृथाट्या च कामजो दशको गणः ॥४७॥** मनु. अ. ७

मृगया म्हणजे शिकार करणें, फासे, जुगार वगैरे खेळणें, दिवसा निजणें, कामविषयासंबंधींच्या गोष्टी व दुसऱ्याची निंदा करणें, अतिशय स्त्रीसंग करणें, मादक द्रव्यांचें-अर्थात् मद्य, अफीन, भांग, गांजा, चरस वगैरे पदार्थांचें-सेवन करणें, गाणे, बजावणें, नाचणें किंवा नाच पाहणें; इकडून तिकडे व्यर्थ भटकणें हीं दहा कामापासून उत्पन्न होणारीं व्यसनें आहेत. क्रोधमूलक व्यसनें —

**पैशुन्यं साहसं द्रोह ईर्ष्यासूयार्थदूषणम् । वाग्दण्डजं च पारुष्यं क्रोधजोऽपि गणोऽष्टकः ॥४८॥** मनु० अ. ७.

(पैशुन्यम्) चहाडी चुगली करणें, (साहसम्) बलात्कारानें कोणत्याहि स्त्रीकडून कुकर्म करविणें व अशा सारखीं भयंकर कृत्यें करणें, द्रोह करणें ( ईर्ष्या ) दुसऱ्याची उन्नति सहन न करणें, (असूया) दोषांवर गुणांचें आरोपण करणें किंवा गुणांवर दोषांचें आरोपण करणें, (अर्थदूषणाम्) अधर्मयुक्त दुष्टकृत्यांमध्यें धनाचा व्यय करणें, नेहमीं कठोर भाषण करणें, अपराधावांचून कठोर भाषण किंवा शिक्षा करणें, हे आठ दुर्गुण क्रोधापासून उत्पन्न होतात.

**द्वयोरप्येतयोर्मूलं यं सर्वे कवयो विदुः । तं यत्नेन जयेल्लोभं तज्जावेतावुभौ गणौ ॥ ४९॥** मनु० अ. ७

लोभापासून हीं दोनहि प्रकारचीं व्यसनें उत्पन्न होतात असें सर्व विद्वान् लोक जाणतात. म्हणून सर्वांनीं लोभापासून दूर राहावें.

**पानमक्षाः स्त्रियश्चैव मृगया च यथाक्रमम् । एतत्कष्टतमं विद्याच्चतुष्कं कामजे गणे ॥५०॥**
**दण्डस्य पातनं चैव वाक्पारुष्यार्थदूषणे । क्रोधजेऽपि गणे विद्यात्कष्टमेतत्त्रिकं सदा ॥५१॥** मनु० अ. ७.

कामापासून उत्पन्न होणाऱ्या दहा दुर्गुणांमध्यें चार तर फारच भयंकर आहेत. (१) मद्यादि मादक द्रव्यांचें सेवन, (२) जुगांर खेळणें, (३) स्त्रीसंग अतिशय करणें. (४) मृगया खेळणें; हीं चार व्यसनें फारच घातक आहेत. तसेंच क्रोधापासून होणाऱ्या आठ दुर्गुणांमध्यें (१) अपराधावांचून दण्ड देणें, (२) कठोर भाषण करणें व (३) दुष्कृत्यांत द्रव्याचा विनियोग करणें हे तीन दुर्गुण फारच घातक आहेत.

**सप्तकस्यास्य वर्गस्य सर्वत्रैवानुषङ्गिणः । पूर्वं पूर्वं गुरुतरं विद्याद्व्यसनमात्मवान् ॥५२ ।**
**व्यसनस्य च मृत्योश्च व्यसनं कष्टमुच्यते । व्यसन्यधोऽधो व्रजति स्वर्यात्यव्यसनी मृतः ॥५३॥** मनु० अ. ७

या पूर्वोक्त सात दुर्गुणांमध्यें पुढच्यापेक्षां मागचा जास्त भयंकर आहे. द्रव्याच्या अपव्ययापेक्षां कठोर भाषण, कठोर व वचनापेक्षां अन्याय करणें व अन्यायानें निरपराध्याला शिक्षा करणें, त्यापेक्षां मृगया खेळणें, मृगयेपेक्षां स्त्रीव्यसन असणें, त्यापेक्षां जुगार खेळणें व जुगारापेक्षां मद्यादिक मादक पदार्थांचें सेवन करणें फार हानिकारक आहे, दुष्ट व्यसनांत फसण्यापेक्षां मरणें चांगले असें सर्वांनीं समजावें; कारण दुराचरणी पुरुष जर जास्त वांचला तर त्याची प्रतिदिवशीं अवनतिच होत जाणार तो जास्त जास्त पातकें करीत राहणार व त्यामुळें दुःखेंच प्राप्त होणार; पण जो व्यसनांमध्यें फसत नाहीं त्याला सदोदित सुख प्राप्त होतें; म्हणून राजा व प्रजा यांनीं अवश्य लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, त्यांनीं मद्यपानादिक दुष्ट व्यसनांपासून दूर राहून धर्मयुक्त कृत्यें आपआपल्या गुणकर्मस्वभावानुरूप सदोदित करावींत.

**मौलान् शास्त्रविदः शूरांल्लब्धलक्षान् कुलोद्गतान् । सचिवान्सप्त चाष्टौ वा प्रकुर्वीत परीक्षितान् ॥५४॥**
मनु. अ. ७.

स्वदेशांत ज्यांचा जन्म झाला आहे, वेदादिशास्त्रें जाणणारे, शूरवीर, ज्यांचें लक्ष व विचार निष्फळ होत नाहींत, जे कुलीन आहेत व ज्यांची सर्वप्रकारें उत्तम परीक्षा केलेली आहे असे धार्मिक सात किंवा आठ मंत्री नेमावेत.

**अपि यत्सुकरं कर्म तदप्येकेन दुष्करम्। विशेषतोऽसहाय्येन किंतु राज्यं महोदयम् ॥५५॥**
**तैः सार्धं चिन्तयेन्नित्यं सामान्यं सन्धिविग्रहम्। स्थानं समुदयं गुप्तिं लब्धप्रशमनानि च ॥५६॥** मनु० अ. ७

मंत्री कशाला पाहिजेत ? असा कोणी प्रश्न विचारील त्याला उत्तर असें कीं, अगदीं साधें काम करावयाचें असलें तरीहि तें एकाला करण्यास फार कठीण जातें, मग कोणाच्याहि सहाय्यावांचून राज्य चालविण्यासारखें मोठें काम एकट्याला कसें बरें होईल ? म्हणून सभापतीनें किंवा राजानें कुशल व विद्वान् मंत्रिमंडळाच्या सल्लयानें विचार करावा व (सन्धिम्) कोणाशीं मित्रता करावी, (विग्रहम्) कोणाशीं विरोध करावा, (स्थानम्) केव्हां व कसा आपल्या राज्याचा बंदोबस्त करून स्वस्थ रहावें, (समुदयम्) आपणाला योग्य समय प्राप्त झाल्याबरोबर दुष्ट शत्रूवर कशी चढाई करावी, (गुप्तिम्) राजसेना व कोश यांचें कसें रक्षण करावें, (लब्धप्रशमनानि) जे जे प्रदेश मिळविले असतील त्यांत शांतता कशी करावी इत्यादि गोष्टींचा विचार मंत्र्यांबरोबर नेहमीं करावा.

**तेषां स्वं स्वमभिप्रायमुपलभ्य पृथक् पृथक्। समस्तानां च कार्येषु विदध्याद्धितमात्मनः ॥५७॥** मनु० अ. ७

मंत्र्याचा त्या प्रत्येक विशिष्ट कार्यामध्यें अभिप्राय पृथक् पृथक् समजून घ्यावा. बहुमतानुसार आपल्याला व दुसऱ्याला हितकारक असा व्यवहार करावा.

**अन्यानपि प्रकुर्वीत शुचीन् प्राज्ञानवस्थितान्। सम्यगर्थसमाहर्तॄनमात्यान् सुपरीक्षितान् ॥६०॥**
**निवर्त्ततास्य यावद्भिरिति कर्तव्यता नृभिः। तावतोऽतन्द्रितान् दक्षान् प्रकुर्वीत विचक्षणान् ॥६१॥**
**तेषामर्थे नियुञ्जीत शूरान् दक्षान् कुलोद्गतान्। शुचीनाकरकर्मान्ते भीरूनन्तर्निवेशने ॥६२॥** मनु० अ. ७.

याचप्रमाणें आणखी जरूर असल्यास पवित्र, बुद्धिमान्, निश्चात्मक बुद्धीनें युक्त अनेक पदार्थांचा संग्रह करण्यांत चतुर असे सुपरीक्षित मंत्री नेमावेत. आपल्या राज्याच्या मानानें व कर्तव्यांच्या मानानें जितके मंत्री आवश्यक असतील तितके उद्योगी, बलवान् व चतुर असे पुरुष मंत्री करावेत; यांच्या आधीन शूरवीर, बलवान्, कुलीन, पवित्र अशा नोकरांना नेमून त्यांच्यावर भांडारखाण्यावरील व रत्नखाणीवरील इत्यादि मोठमोठी कामें सोंपवावीत व जे भीरु असतील त्यांना घरांतील कामांवर नेमावें. दूताचें लक्षणः—

**दूतं चैव प्रकुर्वीत सर्वशास्त्रविशारदम्। इङ्गिताकारचेष्टज्ञं शुचिं दक्षं कुलोद्गतम् ॥६३॥**
**अनुरक्तः शुचिर्दक्षः स्मृतिमान् देशकालवित्। वपुष्मान् वीतभीर्वाग्मी दूतो राज्ञः प्रशस्यते ॥६४॥** म. अ. ७

जो उत्तम कुलांत उत्पन्न झाला आहे, जो चतुर व पवित्र असून मनुष्यांच्या हावभाव व चेष्टा यांवरून अंतःकरणांत काय आहे तें जाणतो व (सद्याच्या परिस्थितीवरून) भविष्यकाळीं काय होणार तें जाणूं शकतो व जो सर्व शास्त्रांमध्यें विशारद असतो त्याला दूत नेमावें. दूत नेहमीं राजकार्य करण्यामध्यें प्रीति करणारा व उत्साही असावा; निष्कपटी, पवित्रात्मा, चतुर, वऱ्याच वेळेपूर्वीं झालेल्या गोष्टींचेंहि स्मरण ठेवणारा, देशकालवर्तमाणनाप्रमाणें काम करणारा, सुंदर व शरीरानें बळकट, निर्भय व उत्तम वक्ता असा राजाचा दूत असावा. अधिकारव्यवस्थाः—

**अमात्ये दण्ड आयत्तो दण्डे वैनयिकी क्रिया। नृपतौ कोशराष्ट्रे च दूते सन्धिविपर्ययौ ॥६५॥** मनु० अ. ७

अमात्याजवळ दण्ड देण्याचा अधिकार असावा. दण्ड देण्याचे वेळीं कोठेंहि अन्याय न होईल असें त्यानें करावें कोश व राजकार्य यांवर नृपतीचा अधिकार असावा व तसेंच सभेच्या आधीन सर्व कार्य असावें. दूताला कोणाशींहि मैत्री किंवा विरोध करण्याचा अधिकार असावा. कारण—

**दूत एव हि संधत्ते भिनत्त्येव च संहतान्। दूतस्तत्कुरुते कर्म भिद्यंते येन मानवाः ॥६६॥** मनु. अ. ७.

दूतच परस्पर राजांमध्यें मैत्री उत्पन्न करतो व तोच ज्यांची एकी झाली असेल त्यांच्यांत फूट उत्पन्न करतो. शत्रू व बंधूंमध्यें फूट उत्पन्न करणें हें दूतांचेंच काम आहे. म्हणून—

**बुद्ध्वा च सर्वं तत्त्वेन परराजचिकीर्षितम्। तथा प्रयत्नमातिष्ठेद्यथात्मानं न पीडयेत् ॥६८॥** मनु० अ. ७.

सभापति व सर्व सभासद यांनीं दूतादि साधनांच्या योगानें दुसऱ्या राजांचा अभिप्राय यथार्थ जाणून त्या राजांपासून आपणांस त्रास न होईल असा प्रयत्न करावा. राजरक्षणाचे उपायः—

**धनुर्दुर्गं महीदुर्गमब्दुर्गं वार्क्षमेव वा । नृदुर्गं गिरिदुर्गं वा समाश्रित्य वसेत्पुरम् ॥७०॥**
**एकः शतं योधयति प्राकारस्थो धनुर्धरः । शतं दशसहस्राणि तस्माद्दुर्गं विधीयते ॥७४॥** मनु. अ. ७.

ज्या ठिकाणीं सुंदर जंगल आहे व धनधान्य उत्तम प्रकारें उत्पन्न होऊं शक्तें अशा ठिकाणीं (धनुर्दुर्गम्) धनुर्धारी पुरुषांनीं युक्त (महीदुर्गम्) भुईकोट किल्ला बांधावा, त्याच्या सभोंवतीं (अद्बदुर्गम्) पाण्यानें पूर्ण भरलेला खंदक असावा. तसेंच (वार्क्षम्) चारहि बाजूंला वन असावें, (नृदुर्गम्) चारहि बाजूंला सेना असावी, (गिरिदुर्गम्) चारहि बाजूंला पहाड असून जी मध्यें जागा असते त्या ठिकाणीं कोट बांधून नगर वसवावें, नगराच्या चारहि बाजूंला प्रकोट किंवा प्राकार असावेत; कारण प्राकाराच्या (प्रकोटाच्या) आश्रयानें धनुर्धारी शक्तियुक्त एक वीर शंभर मनुष्यांशीं लढूं शकतो. शंभर वीर दहा हजारांबरोबर युद्ध करूं शकतात; यासाठीं दुर्ग बांधणें उचित आहे. दुर्ग कसा असावा ?

**तत्स्यादायुधसंपन्नं धनधान्येन वाहनैः । ब्राह्मणैः शिल्पिभिर्यन्त्रैर्यवसेनोदकेन च ॥७५॥**
**तस्य मध्ये सुपर्याप्तं कारयेद्गृहमात्मनः । गुप्तं सर्वर्तुकं शुभ्रं जलवृक्षसमन्वितम् । ७६॥** मनु. अ. ७.

त्या किल्ल्यामध्यें शस्त्रास्त्रें, धन, धान्यें, वाहनें, उपदेश करण्यास योग्य असतील असे ब्राह्मण, शिल्पी-कारागीर, यंत्रें-नानाप्रकारच्या कला, (यवसेन) चारा, गवत वगैरे व त्याचप्रमाणें पाण्याचा पुरवठा इतक्या सर्व गोष्टी असाव्यात. त्याच्या मध्यभागीं जल, वृक्ष, पुष्पादि सर्व पदार्थांनीं युक्त, सर्व ऋतुमध्यें सुखकारक, श्वेतवर्ण व राजकार्य करण्यास पुरेल असें विस्तृत गृह आपणासाठीं तयार करावें.

**तदध्यास्योद्वहेद्भार्यां सवर्णां लक्षणान्विताम् । कुले महति संभूतां हृद्यां रूपगुणान्विताम् ॥७७॥**
**पुरोहितं च कुर्वीत वृणुयादेव चर्त्विजम् । तस्य गृह्याणि कर्माणि कुर्युर्वैतानिकानि च ॥७८॥** मनु. अ. ७.

त्याप्रमाणें ब्रह्मचर्यमध्यें विद्या शिकून इतके राजकार्य केल्यानंतर सौंदर्ययुक्त, गुणयुक्त, आपल्याला प्रिया, उत्तम कुलांत उत्पन्न झालेली, सुंदर लक्षणांनीं युक्त, क्षत्रिय कुलांतील कन्या जी आपल्याप्रमाणेंच विद्यादिगुणांनीं युक्त असेल, अशा एकाच स्त्रीशीं विवाह करावा. दुसऱ्या स्त्रियां संबंध ठेवण्यास अयोग्य समजून त्यांच्याकडे पाहूं नये. राजघरांतील अग्निहोत्र व पक्षेष्टी इत्यादि सर्व धार्मिक कृत्यें करण्याकरितां पुरोहित व ऋत्विज् यांना नेमावें; व आपण सदैव राजकार्यामध्यें तत्पर रहावें. रात्रंदिवस राजकार्यामध्यें प्रवृत्त राहणें व कोणतेंहि राजकार्य विघडूं न देणें, हेंच राजाचें संध्योपासनादि काम आहे. राज्यव्यवस्थेचे सामान्य नियमः—

**सांवत्सरिकमाप्तैश्च राष्ट्रादाहारयेद्बलिम् । स्याच्चाम्नायपरो लोके वर्तेत पितृवन्नृषु ॥८०॥**
**अध्यक्षान् विविधान् कुर्यात् तत्र तत्र विपश्चितः । तेऽस्य सर्वाण्यवेक्षेरन् नृणां कार्याणि कुर्वताम् ॥८१॥**
**आवृत्तानां गुरुकुलाद्विप्राणां पूजको भवेत् । नृपाणामक्षयो ह्येष निधिर्ब्राह्मोऽभिधीयते ॥८२॥** मनु. अ. ७.

राजानें वार्षिक कर आप्त-विद्वान्-पुरुषांच्या द्वारें ग्रहण करावा. सभापति राजानें लोकांमध्यें वेदानुकूल वागावें व लोकांचें पित्याप्रमाणें पालन करावें. राजसभेनें राजकार्य उत्तम रीतीनें करण्यासाठीं अनेक विद्वान् अध्यक्षांची योजना करावी. राजकार्य करण्यास नेमलेले पुरुष आपआपलीं कामें नीट रीतीनें करीत आहेत कीं नाहींत तें पाहणें, जे योग्य रीतीनें कामें करतील त्यांचा सत्कार करणें व जे अयोग्य रीतीनें करतील त्यांस दंड देणें हें या अध्यक्षांचें काम आहे. वेदप्रचार हें राजांचे मुख्य काम आहे, तें करण्यासाठीं राजानें नेहेमीं तयार असावें. जी कोणी ब्रह्मचर्य पालन करून वेदादि शास्त्रें शिकून गुरुकुलांतून येईल त्याचा राजानें सत्कार करावा. त्याचप्रमाणें जो उत्तम रीतीनें शिकवून विद्यार्थ्यांना विद्वान् करतो त्याचाहि सत्कार करावा. अशा व्यवहारानें राज्यांमध्यें विद्येचा प्रसार होतो. युद्धव्यवस्था—

**समोत्तमाधमै राजा त्वाहूतः पालयन् प्रजाः । न निवर्तेत संग्रामात् क्षात्रं धर्ममनुस्मरन् ॥८७॥**
**आहवेषु मिथोऽन्योऽन्यं जिघांसन्तो महीक्षितः । युध्यमानाः परं शक्त्या स्वर्गं यान्त्यपराङ्मुखाः ॥८९॥** मनु. ७

जेव्हां आपल्या प्रजेचें यथायोग्य रीतीनें पालन करणाऱ्या राजाला, त्यापेक्षां लहान, बरोबरीचा किंवा मोठा, युद्धासाठीं आव्हान करील, तेव्हां क्षात्र धर्माचें स्मरण करून, त्यानें युद्धापासून परावृत्त होऊं नये. चातुर्यानें युद्ध करून

आपला विजय होईल असें करावें. संग्रामामध्यें परस्परांला ठार मारण्यास प्रवृत्त होणारे, निर्भय होऊन युद्ध करणारे व केव्हांहि युद्धांतून नपळून जाणारे जे क्षत्रिय असतात, त्यांना सुख प्राप्त होतें. युद्धांतून केव्हांहि पळूं नये; पण केव्हां केव्हां शत्रूला जिंकण्यासाठीं त्याला हुलकावणी देणें उचित असतें अशा प्रसंगीं जें योग्य असेल तें करावें. एकदम पुढें चाल करून जाऊन आपण आपला तोटा करून घेणें योग्य नाहीं. तात्पर्य ज्या रीतीनें आपला विजय होईल त्या रीतीचा अवलंब करावा.

**न च हन्यात्स्थलारूढं न क्लीबं न कृताञ्जलिम् । न मुक्तकेशं नासीनं न तवास्मीति वादिनम् ॥९१॥**
**न सुप्तं न विसन्नाहं न नग्नं न निरायुधम् । नायुध्यमानं पश्यन्तं न परेण समागतम् ॥९२॥**
**नायुधव्यसनं प्राप्तं नार्तं नातिपरिक्षतम् । न भीतं न परावृत्तं सतां धर्ममनुस्मरन् ॥९३॥** मनु. अ. ७.

इकडे तिकडे युद्ध पहात उभे असणारे, क्लीब, हात जोडणारे, डोकीचे केश ज्यांचे सुटले आहेत, बसलेले, 'मी तुला शरण आलों' असें बोलणारे, निजलेले, मूर्छा आलेले, नग्न, शस्त्ररहित, युद्ध न करतां केवळ पाहात असलेले, शत्रूच्या बरोबर आलेले (पण त्याला सहाय्य न करणारे), आयुधांच्या प्रहारानें पीडित, दुःखी, अत्यंत घायाळा झालेले. भ्यालेले, पळत असलेले अशा प्रकारच्या लोकांना, सज्जनांच्या धर्माचें स्मरण करून, वीर पुरुषांनीं मारूं नये; पण त्यांना पकडून नजर कैदेंत ठेवावें व त्यांच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त नीट ठेवावा. जे जखमी झालेले असतील त्यांना चिडवूं नये किंवा दुःखहि देऊं नये पण त्यांच्या औषधपाण्याची नीट व्यवस्था लावावी. त्यांच्या संबंधीं जीं जीं योग्य कामें असतील तीं तीं करावीत. स्त्री, बालक, वृद्ध व आतुर याच्यावर शस्त्र चालवूं नये. कैद केलेल्या शत्रूच्या बालकांना आपल्या संतानाप्रमाणें पाळावें. स्त्रियांना आपल्या भगिनींच्या ठिकाणीं समजून त्यांचा योग्य परिपाल करावा. विषयच्छेनें त्यांच्याकडे कधींहि पाहूं नये. जेव्हां राज्यांत चहूंकडे पुनः शांतता होईल व युद्धाची आशंका राहणार नाहीं, तेव्हां त्यांना सोडून द्यावें. ज्यांच्यापासून पुढें विघ्न उत्पन्न होईल असें वाटेल त्यांना सदैव कारागृहामध्यें ठेवावें

**यस्तु भीतः परावृत्तः सङ्ग्रामे हन्यते परैः । भर्तुर्यद्दुष्कृतं किंचित् तत्सर्वं प्रतिपद्यते ॥९४॥**
**यच्चास्य सुकृतं किंचित् अमुत्रार्थमुपार्जितम् । भर्ता तत्सर्वमादत्ते परावृत्तहतस्य तु ॥९५॥** मनु. अ. ७.

जो समरांगणांतून भिऊन पळतो किंवा पळत असतां मारला जातो, त्याला त्याच्या स्वामीचे अपराध लागतात वत्यामुळें त्याला दंड भोगावा लागतो. तसेंच ज्याच्यापासून त्याला इहपरलोकीं सुख मिळालें असतें, असें त्याचें सुकृत त्याच्या स्वामीला प्राप्त होतें; अर्थात् युद्धांतून पळून जाणाऱ्याला कोणत्याच प्रकारें सुख प्राप्त होत नाही, त्याचें सर्व पुण्यफल नष्ट होऊन जातें, त्यांची प्रतिष्ठा होत नाहीं. पण जो योग्य रीतीनें युद्ध करतो त्याची मान्यमानता वाढते.

**रथाश्वं हस्तिनं छत्रं धनं धान्यं पशून् स्त्रियः । सर्वद्रव्याणि कुप्यं च यो यज्जयति तस्य तत् ॥९६॥**
**राज्ञश्च दद्युरुद्धारमित्येषा वैदिकी श्रुतिः । राज्ञा च सर्वयोधेभ्यो दातव्यमपृथग्जितम् ॥९७॥** मनु. अ. ७.

लढाईमध्यें रथ, घोडे, हत्ती, छत्र, धन, धान्य, पशु, स्त्रिया, सर्वप्रकारचीं द्रव्यें व तेल तुपाचे बुधले इत्यादि पदार्थ जे घ्याला मिळतील ते त्यानें घ्यावें. हा नियम कोणीहि मोडूं नये. सैन्यातील लोकांनींहि आपण जिंकलेल्या पदार्थांपैकीं सोळावा भाग राजाला द्यावा; त्याचप्रमाणें जे धन सर्वांनीं मिळून जिंकून आणलें असेल त्याचा सोळावा हिस्सा राजानें सेनानायकांना द्यावा. जो लढाईमध्यें मरण पावला असेल त्याच्या स्त्रीला अगर पुत्राला त्या मिळालेल्या संपत्तीचा कांहीं भाग द्यावा. त्याच्या स्त्रीचें व अज्ञान अर्भकाचें यथावत् पालन करावें. जेव्हां ती मुलें योग्य व समर्थ होतील तेव्हां त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें अधिकहि द्यावेत. जो आपल्या राज्याची वृद्धि व्हावी, आपला विजय व्हावा व आपला उत्कर्ष व्हावा असें इच्छितो, त्यानें हे वरील नियम पूर्णपणें पाळावेत. पुरुषार्थाची पराकाष्ठा—

**अलब्धं चैव लिप्सेत लब्धं रक्षेत्प्रयत्नतः । रक्षितं वर्धयेच्चैव वृद्धं पात्रेषु निःक्षिपेत् ॥९९॥**
**अलब्धमिच्छेद्दण्डेन लब्धं रक्षेदवेक्षया । रक्षितं वर्धयेद् वृद्ध्या वृद्धं पात्रेषु निक्षिपेत् ॥१०१॥** मनु. अ. ७

राजा, राजसभा व इतर पुरुषार्थी लोक यांनीं अलब्ध वस्तूची प्राप्ति करून घेण्याची इच्छा धरावी; प्राप्त झालेल्याचें प्रयत्नानें रक्षण करावें; रक्षित पदार्थांची वाढ होईल अशी योजना करावी व वाढलेल्या धनाचा विनियोग वेदविद्याप्रचार, धर्मप्रचार, विद्यार्थ्यांला सहाय्य, वैदिकमार्गाचा प्रसार करण्यासाठीं उपदेशक पाठविणें, असमर्थ व अनाथ जे असतील त्यांचें पालन इत्यादि योग्य कृत्यें करण्यांत करावा. हीं आपलीं चार मुख्य कर्तव्यें आहेत, असें समजून व आळस सोडून त्यांचें नित्य अनुष्ठान करीत जावें. दुसऱ्याला दंड करून अप्राप्त वस्तु प्राप्त करून घ्यावी, तीवर नित्य देखरेख करून प्राप्त झालेल्याचें रक्षण करावें, व्याज वगैरे उपायांनीं तिची वृद्धि करावी व अशारीतीनें वाढलेल्या द्रव्यादि पदार्थांचा विनियोग दुसऱ्याला पूर्वोक्त कामांत सहाय्य करण्याकडे करावा. दक्षता:—

**अमाययैव वर्तेत न कथञ्चन मायया । बुध्येतारिप्रयुक्तां च मायां नित्यं स्वसंवृतः ।।१०४।।**
**नास्य छिद्रं परो विद्याच्छिद्रं विद्यात्परस्य तु । गूहेत्कूर्म इवाङ्गानि रक्षेद्विवरमात्मनः ।।१०५।।**
**बकवच्चिन्तयेदर्थान् सिंहवच्च पराक्रमेत् । वृकवच्चावलुम्पेत शशवच्चा विनिष्पतेत् ।।१०६।।**
**एवं विजयमानस्य येऽस्य स्युः परिपन्थिनः । तानानयेद्वशं सर्वान् सामादिभिरुपक्रमैः ।।१०७।।** मनु. अ. ७.

निष्कपटीपणानें सर्वांबरोबर व्यवहार करावा. कोणत्याहि प्रकारचें कपट करूं नये. आपलें रक्षण व्हावे म्हणून नित्य दक्षतेनें शत्रूनें केलेलें कपट जाणावें. आपलीं छिद्रें अर्थात् आपली निर्बलता शत्रूला समजूं देऊं नये; पण शत्रूची मात्र आपण समजून घ्यावीं. ज्याप्रमाणें कांसव आपलीं अंगें झांकून ठेवितो; त्याप्रमाणेंच आपलीं छिद्रें व वर्मस्थानें गुप्त ठेवावीत. ज्याप्रमाणें बगळा ध्यानस्थ होऊन पुढें आलेला मासा पटकन् गिळून टाकतो त्याप्रमाणें द्रव्यसंग्रहासंबंधीं नेहमीं विचार करावा. द्रव्यादि पदार्थांची व बलाची वृद्धि करण्यासाठीं आणि शत्रूला जिंकण्यासाठीं सिंहाप्रमाणें प्रयत्न करावा. लांडगा व चित्ता यांच्याप्रमाणें लपून छपून शत्रूला पकडावें. जर अत्यंत बलवान् शत्रू जवळ आला असेल तर सशाप्रमाणें दूर पळून जावें [ व मग त्यावर एकदम छापा घालावा. ] याप्रमाणें विजय करणाऱ्या सभापतीच्या राज्यांत जे कोणी दुष्ट दरवडेखोर किंवा लुटारू असतील व राजाचे जे कोणी शत्रू असतील, त्यांना सामादि उपायांनीं वश करून घ्यावें. हे उपाय चार आहेत [१] **साम**—शांततेनें स्नेह करून राहणें, [२] **दाम**— कांहीं देऊन त्यांना शांत करणें. [३] **भेद**—फंद, फितुरी, फोड तोड करून शत्रूला वश करणें व जर हे तीनहि उपाय साधले नाहीत तर [४] **दण्ड**—शिक्षा किंवा युद्ध करून त्यांना वश करून घेणें याप्रमाणें हे चार उपाय आहेत. राष्ट्राची स्वस्थता व राज्यक्रांति यांची कारणें:—

**यथोद्धरति निर्दाता कक्षं धान्यं च रक्षति । तथा रक्षेन्नृपो राष्ट्रं हन्याच्च परिपन्थिनः ।।११० ।।**
**मोहाद्राजा स्वराष्ट्रं यः कर्शयत्यनवेक्षया । सोऽचिराद्भ्रश्यते राज्याज्जीविताच्च सबान्धवः ।।१११।।**
**शरीरकर्षणात्प्राणाः क्षीयन्ते प्राणिनां यथा । तथा राज्ञामपि प्राणाः क्षीयन्ते राष्ट्रकर्षणात् ।।११२।।**

**मनु. अ. ७.**

ज्याप्रमाणें धान्याचा व्यापारी खड्यांचा व कोंड्याचा त्याग करून धान्याचें रक्षण करतो, त्याप्रमाणें राजानें दुष्ट लोकांना शिक्षा करून सज्जनांचें व राष्ट्राचें उत्तम रीतीनें पालन करावें म्हणजे राष्ट्र सुस्थितींत राहतें. पण जो राजा अविचारानें आपल्या राष्ट्राला कष्ट देतो व लोकांना त्रास देतो, त्याचा बंधुवर्गासहवर्तमान पूर्ण नाश होतो व त्याच्या हातांतून राजसत्ताहि नाहींशी होते. ज्याप्रमाणें शरीराला दुर्बल करण्यानें व फार त्रास देण्यानें प्राण नाहींसे होतात तद्वतच राज्याला क्षीण करण्यानें किंवा प्रजेला दुःख देण्यानें राजांचे प्राण नाहींसे होतात. राष्ट्राचें रक्षण कसें करावें ?

**राष्ट्रस्य संग्रहे नित्यं विधानमिदमाचरेत् । सुसंगृहीतराष्ट्रो हि पार्थिवः सुखमेधते ।।११३।।**
**द्वयोस्त्रयाणां पञ्चानां मध्ये गुल्ममधिष्ठितम् । तथा ग्रामशतानां च कुर्याद्राष्ट्रस्य संग्रहम् ।।११४।।**
**ग्रामस्याधिपतिं कुर्याद्दशग्रामपतिं तथा । विंशतीशं शतेशं च सहस्रपतिमेव च ।।११५।।** मनु. अ. ७.

ज्याच्या योगानें राज्याचें रक्षण होईल व प्रजेला सुख प्राप्त होईल असा राजा व राजसभा यांनीं राजकार्याविषयीं प्रयत्न करावा. जो राजा राज्यपालनामध्यें तत्पर असतो व ज्याची प्रजा सुखी असते, त्याला अत्यंत सुख मिळतें. राज्याचा बंदोबस्त नीट करण्यासाठीं दोन, तीन, पांच व शंभर गांवांच्या ठिकाणीं राज्यस्थान करून, ग्रामसंख्येप्रमाणें व कामाप्रमाणें योग्य अधिकारीवर्ग नेमून सर्व राज्याचें उत्तम प्रकारें रक्षण करावें. दरएक गांवामध्यें एक एक अधिकारी नेमावा, पुनः दर दहा गांवावर एक नेमावा, पुनः वीस गांवांवर तिसरा नेमावा, पुनः शंभर गांवांवर चवथा नेमावा व हजार गांवांवर पांचवा नेमावा. याप्रमाणें अधिकारी नेमून कारभार चालवावा. सध्यांच्या राज्यव्यवस्थेमध्येंहि असाच प्रकार आहे, दरएक गांवाला एक पाटील व पटवारी असतो, दहा गांवांवर एक ठाणेदार असतो, प्रत्येक दोन ठाण्यांवर एक मोठा ठाणेदार असतो, पांच ठाण्यांवर एक तहसीलदार, दहा तहशीली मिळून एक जिल्हा होतो व प्रत्येक जिल्ह्याला एक मोठा अम्मलदार असतो. ही व्यवस्थाहि मनुस्मृत्यादि धर्मशास्त्रांवरूनच घेतलेली आहे. असो.

**ग्रामदोषात् समुत्पन्नान् ग्रामिकः शतकैः स्वयम् । शंसेद्ग्रामदशेशाय दशेशो विंशतीशिनम् ।।११६।।**
**विंशतीशस्तु तत्सर्वं शतेशाय निवेदयेत् । शंसेद्ग्रामशतेशस्तु सहस्रपतये स्वयम् ।।११७।। मनु. अ. ७.**

पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रबंध करून अशी आज्ञा करावी कीं, जे जे दोष ग्रामांमध्यें उत्पन्न होतील, ते ते गुप्तपणानें ग्रामपतीनें दशग्रामपतीला सांगावे, त्यानें वीस गांवांच्या अधिकाऱ्याला ते कळवावें; त्यानें आपल्या वीस गांवांतील वर्तमान शतग्रामाधिपतीला कळवावें; त्यानें आपल्या शंभर गांवांतील वर्तमान सहस्त्रग्रामाधिपतीला नित्य कळवीत जावें. वीस वीस ग्रामांच्या पांच अधिकाऱ्यावर शंभर गांवांचा एक अधिकारी असतो; म्हणून वीस वीस गांवाच्या पांच अधिकाऱ्यांनीं आपल्या वरिष्ठ शतग्रामपतीला आपल्या गांवांतील वर्तमान कळवावें. शतग्रामपतीनें सहस्रग्रामपतीला विदित करावे; त्यानें दशसहस्रग्रामपतीला कळवावें, त्यांनीं आपलें वृत्त एकलक्ष गांवांवर नेमलेल्या राजसभेला कळवावें व अशा लक्षग्रामाधिष्ठित राजसभांनीं सार्वभौम-चक्रवर्ती-महाराज-सभेला आपआपलें वृत्त विदित करावें; व याप्रमाणें भूमंडलाचें नियंत्रण व प्रतिपालन उत्तम रीतीनें करावें.

**तेषां ग्राम्याणि कार्याणि पृथक्कार्याणि चैव हि । राज्ञोऽन्यः सचिवःस्निग्धस्तानि पश्येदतन्द्रितः ।।१२०।।**
**नगरे नगरे चैकं कुर्यात्सर्वार्थचिन्तकम् । उच्चैःस्थानं घोररूपं नक्षत्राणामिव ग्रहम् ।।१२१।।**
**स ताननुपरिक्रामेत् सर्वानेव सदा स्वयम् । तेषां वृत्तं परिणयेत् सम्यग्राष्ट्रेषु तच्चरैः** ।।१२१।। मनु० अ. ७.

पूर्वी सांगितलेले जे ग्रामाधीशादिक त्यांच्यांवर राजसभेंतील नेमलेला जो राजाचा (प्रतिनिधी) सचिव त्यानें आळस सोडून प्रेमानें सर्व न्यायाधीशादि राजपुरुष आपआपलीं कामें योग्य करीत आहेत कीं नाहींत तें फिरतीवर जाऊन पहावें. प्रत्येक मोठमोठ्या नगरामध्यें एक कार्यविचार करणारी सभा स्थापावी व ती भरण्याचें ठिकाण सुंदर, उंच, विशाल व चंद्राप्रमाणें शोभायमान् असें असावें. या सभेमध्यें जे जे उत्तम विद्वान् असतील व विद्येच्या योगानें कार्याकार्यनिर्णय करण्यास समर्थ असतील, त्यांना नेमावें व त्यांनीं तेथें जमून विचार करावा, राजा व प्रजा यांना काय हितकर आहे तें पहावें व त्यांकरितां तसे नियम करावेत. नित्य फिरतीच्या कामावर ज्या सभापतीला नेमलें असेल त्यांच्या हाताखालीं पुष्कळ गुप्त हेर द्यावेत. हे चार भिन्न भिन्न जातीचे असावेत या हेरांकडून त्यानें सर्व राजपुरुषांचे व प्रजेचे गुणदोष गुप्तपणानें जाणावेत व जे अपराधी असतील त्यांना शिक्षा करावी व जे गुणी असतील त्यांचा सन्मान करावा.

**राज्ञो हि रक्षाधिकृताः परस्वादायिनः शठाः । भृत्या भवन्ति प्रायेण तेभ्यो रक्षेदिमाः प्रजाः ।।१२३।।**
**ये कार्यिकेभ्योऽर्थमेव गृण्हीयुः पापचेतसः । तेषां सर्वस्वमादाय राजा कुर्यात् प्रवासनम्** ।।१२४।। मनु० अ. ७

राजानें धार्मिक, कुलीन व सुपरीक्षित विद्वानांलाच अधिकारी नेमावें; व त्यांच्या हाताखालीं चांगलें लोक नेमावेत. तसेच कांहीं शठ, डाकू किंवा परस्वाचें हरण करणारे लोक असतील त्यांनाहि नेमून त्यांचे दुर्गुण जाऊन ते सद्गुणी होतील असें करावें. अशा रीतीनें प्रजा रक्षण करीत असावें. जे राजपुरुष वादीप्रतिवादींकडून गुप्त रीतीनें लांच

घेऊन अन्याय करतात, त्याचें सर्वस्व हरण करून त्यांना योग्य दंड व हद्दपार करून, त्यांना ज्या ठिकाणाहून ते परत येऊं शकणार नाहींत अशा ठिकाणीं नेऊन ठेवावें. अशा लांचखाऊ दुष्ट पुरुषांना जर दंड दिला नाहीं तर इतर लोकांनाहि तसा अन्याय करण्यास उत्तेजन मिळेल व दुसरे राजपुरुषहि अन्याय करूं लागतील, म्हणून त्यांना योग्य दंड करावा. राजपुरुषांना जें वेतन द्यावयाचें तें असें असावें कीं, त्या योग्यानें त्यांचा योगक्षेम चांगला चालेल व साधारणपणें ते धनाढ्याहि होतील; त्यांना मासिक किंवा वार्षिक वेतन द्यावें किंवा तहाहयात भूमीचें उत्पन्न तोडून द्यावें. राजपुरुष वृद्ध होऊन काम करण्यास असमर्थ झाले म्हणजे त्यांना अर्धा पगार ते जिवंत असेपर्यंत मिळत जावा. त्यांच्या मुलांना त्यांच्या गुणाप्रमाणे नोकरी द्यावी. जर त्यांचे बालक अल्पवयी असतील किंवा त्यांच्या स्त्रिया जिवंत असतील तर त्यांचीही योग्य व्यवस्था सरकारांतून द्रव्य वगैरे देऊन करावी. पण जर त्यांच्या स्त्रिया किंवा मुले कुकर्म करणारी होतील तर त्यांना कांहीं एक देऊं नये. याप्रमाणें राज्याचा बंदोबस्त करावा. करग्रहण:—

**यथा फलेन युज्येत राजा कर्ता च कर्मणाम् । तथावेक्ष्य नृपो राष्ट्रे कल्पयेत्सततं करान् ॥१२८॥**
**यथाल्पाऽल्पमदन्त्याद्यं वार्योकोवत्सषट्पदाः । तथाल्पाल्पो गृहीतव्यो राष्ट्राद्राज्ञाब्दिकः करः ॥१२९॥**
**नोच्छिन्द्यादात्मनो मूलं परेषां चातितृष्णया । उच्छिन्दन्ह्यात्मनो मूलमात्मानं तांश्च पीडयेत् ॥१३९॥** मनु० अ. ७

राजा, राजपुरुष व प्रजाजन यांना योग्य फल मिळून आनंद व्हावा व सुख व्हावें हा उद्देश मनांत धरून राजा व राजसभा यांनीं योग्य विचार करून कर घेण्याचें ठरवावें. ज्याप्रमाणें जळू, वासरूं व भुंगा हे आपल्या भोग्य पदार्थांचें थोडें थोडें ग्रहण करतात; त्याप्रमाणें प्रजेकडून राजानें वार्षिक कर थोडा थोडा घ्यावा. अतिलोभानें दुसऱ्यांच्या व आपल्या सुखाच्या मूलाचा नाश कधींहि करूं नये; कारण जो सुखाचा उच्छेद करतो तो दुसऱ्यांना व आपणा स्वतःला त्रास देतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**तीक्ष्णश्चैव मृदुश्च स्यात्कार्यं वीक्ष्य महीपतिः । तीक्ष्णश्चैव मृदुश्चैव राजा भवति संमतः ॥१४०॥**
**एवं सर्वं विधायेदमितिकर्तव्यमात्मनः । युक्तश्चैवाप्रमत्तश्च परिरक्षेदिमाः प्रजाः ॥१४२॥** मनु. अ. ७.

जो राजा कार्याकार्य पाहून कोमल व तीक्ष्ण होतो तो अपराध्यावर तीक्ष्णता व सज्जनांवर कोमलता करीत असल्यामुळें सर्वांना प्रिय होतो. याप्रमाणें राज्याचा प्रबंध करून सदोदित लक्षपूर्वक आचरण करून व चुका न करतां निरंतर प्रजेचें रक्षण करावें.

**विक्रोशन्त्यो यस्य राष्ट्राद्ध्रियन्ते दस्युभिः प्रजाः । सम्पश्यतः सभृत्यस्य मृतः स न जीवति ॥१४३॥**
**क्षत्रियस्य परो धर्मः प्रजानामेव पालनम् । निर्दिष्टफलभोक्ता हि राजा धर्मेण युज्यते ॥१४४॥** मनु० अ. ७

ज्या राजाच्या राज्यांतील प्रजा रोदन करीत असते व राजा राज्य करीत असतां चोर, लुटारू व डाकू लोक प्रजेच्या सर्वस्वाचें व प्राणांचेंहि हरण करीत असतात तो राजा आपमाल्यगणासहवर्तमान मेलेलाच आहे असें समजावें व तो जिवंत नसून महद्दुःख भोगण्यास योग्य आहे असें समजावें. वास्तविक पाहां प्रजांचें पालन करणें हाच क्षत्रियांचा व राजाचा परम धर्म आहे. मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायामध्यें ज्या रीतीनें कर घ्यावा म्हणून सांगितलें आहे त्या रीतीनें व राजसभा नियत करतील तेवढाच कर घेणारा राजा धार्मिकत्वाला जाऊन सुखी होतो. याशिवाय अन्य प्रकारानीं जास्त कर घेऊन लोकांना त्रास देणारे राजे दुःखाला प्राप्त होतात. राजाची दिनचर्या—

**उत्थाय पश्चिमे यामे कृतशौचः समाहितः । हुताग्निर्ब्राह्मणांश्चार्च्य प्रविशेत्स शुभां सभाम् ॥१४५॥**
**तत्र स्थिताः प्रजाः सर्वाः प्रतिनन्द्य विसर्जयेत् । विसृज्य च प्रजाः सर्वा मंत्रयेत्सह मंत्रिभिः ॥१४६॥** मनु० अ. ७

पहांटेची प्रहर रात्र शेष राहिली म्हणजे उठून शौचमुखमार्जनादि क्रिया कराव्यात नंतर स्नान करून परमेश्वराचें ध्यान, अग्निहोत्र, धार्मिक विद्वानांचा सत्कार वगैरे करून. नंतर राजसभेमध्यें प्रवेश करावा. त्याठिकाणीं आलेल्या प्रजाजनांचा सन्मान करून त्यांस निरोप द्यावा व नंतर मुख्य मन्त्र्यासहवर्तमान राज्यव्यवस्थेविषयीं विचार करावा विचार करण्याच्या वेळीं एकांता जागेमध्यें बसावें. पहा—

**गिरिपृष्ठं समारुह्य प्रासादं वा रहोगतः । अरण्ये निःशलाके वा मंत्रयेदविभावितः ।।१४७।।**
**यस्य मंत्रं न जानन्ति समागम्य पृथग्जनाः । स कृत्स्नां पृथ्वीं भुङ्क्ते कोशहीनोऽपि पार्थिवः ।।१४८।।**
मनु. अ. ७

मंत्र्यासह फिरावयास जावें, डोंगरावर जाऊन बसावें, अरण्यांत जावे किंवा राजवाड्यांत अगदीं एकांतात बसावें. तात्पर्य जेथें एक शलाकाहि नसेल अशा एकांत जागीं मंत्र्यासह विचार करावा. पुष्कळ मंडळीं जमूनसुद्धां ज्या राजाचे गुप्त बेत बाहेर फुटत नाहींत, अर्थात् ज्या राजाचे विचार गंभीर, शुद्ध व परोपकारमय असून नेहेमीं गुप्त असतात, त्या राजाजवळ जरी धन नसलें तरी तो सर्व पृथ्वीचें राज्य उत्तम रीतीनें चालविण्यास योग्य असतो; म्हणून मन्त्र्यांच्या व राजसभेच्या सभासदांच्या एकमतानेंच जें काय करणें तें करावें व सर्व विचार गुप्त ठेवावेत. संधि व विग्रहः—

**आसनं चैव यानं च संधीं विग्रहमेव च । कार्यं वीक्ष्य प्रयुञ्जीत द्वैधं संश्रयमेव च ।।१६१।।**
**संधिं तु द्विविधं विद्याद् राजा विग्रहमेव च । उभे यानासने चैव द्विविधः संश्रयः स्मृतः ।।१६२।।** मनु. अ. ७

राजा व इतर सर्व राजपुरुष यांनीं हे लक्षांत ठेवावें कीं [आसनम्] सैन्यासह स्वस्थ बसणें, [यानम्] शत्रूंवर हल्ला किंवा चढाई करणें, [ सन्धिम् ] मित्रता करणें, [ विग्रहम् ] दुष्ट शत्रूशीं लढाई करणें, [ द्वैधम् ] सैन्याची रचना दोन प्रकारची करून आपला विजय करून घेणें, [ संश्रयम् ] स्वतः निर्बल असतां दुसऱ्या प्रबल राजाचा आश्रय करून आपलें कार्य साधणें, ह्या सहा प्रकारांचा योग्यवेळीं उपयोग करावा. आसन, यान, संधि, विग्रह, द्वैधीभाव व संश्रय या सहा प्रकारांचे प्रत्येकीं दोन दोन भेद आहेत.

**समानयानकर्मा च विपरीतस्तथैव च । तदा त्वायति संयुक्तः संधिर्ज्ञेयो द्विलक्षणः ।।१६३।।**
**स्वयंकृतश्च कार्यार्थमकाले काल एव वा । मित्रस्य चैवापकृते द्विविधो विग्रहः स्मृतः ।।१६४।।** मनु. अ. ७

[ संधिः ] शत्रूशीं मित्रता करावी किंवा विपरीतता करावा, परंतु वर्तमान व भविष्यकाळीं करावयाचीं कामें निर्धास्तपणानें करीत जावें. याला द्विविध संधि असें म्हणतात. [ विग्रहः ] कार्यसिद्धि होण्यासाठीं उचित समयीं किंवा अनुचित समयीं स्वतःच्या शत्रूशीं विरोध, करणें किंवा आपल्या मित्राला त्रास देणाऱ्या शत्रूशीं विरोध करणें हे दोन प्रकारचे विग्रह आहेत.

**एकाकिनश्चात्ययिके कार्ये प्राप्ते यदृच्छया । संहतस्य च मित्रेण द्विविधं यानमुच्यते ।।१६५।।**
**क्षीणस्य चैव क्रमशो दैवात्पूर्वकृतेन वा । मित्रस्य चानुरोधेन द्विविधं स्मृतमासनम् ।।१६६।।** मनु. अ. ७

[ यानम् ] कोणतेंहि कार्य सिद्ध करण्यासाठीं आपण एकट्यानें किंवा मित्राला बरोबर घेऊन शत्रूवर अकस्मात् चाल करणें ही दोन प्रकारची यानें आहेत. [ आसनम् ] स्वतः क्षीण झाल्यानें किंवा बलहीन असल्यामुळें स्वस्थ राहणें, हीं दोन प्रकारचीं आसनें आहेत.

**बलस्य स्वामिनश्चैव स्थितिः कार्यार्थसिद्धये । द्विविधं कीर्त्यते द्वैधं षाड्गुण्यगुणवेदिभिः ।।१६७।।**
**अर्थसंपादनार्थं च पीड्यमानस्य शत्रुभिः । साधुषु व्यपदेशार्थं द्विविधः संश्रयः स्मृतः ।।१६८।।** मनु. अ. ७

[ द्वैधम् ] सेनापति व सेना यांचे दोन विभाग करून आपली कार्यसिद्धि करण्यासाठीं विजय संपादन करणें यालाच दोन प्रकारचें द्वैध असें म्हणतात. [ संश्रयः ] आपल्या इष्ट हेतूंचें साफल्य व्हावें म्हणून बलवान् राजाचा किंवा एकखाद्या महात्म्याचा आश्रय करून राहणें व त्यामुळें शत्रूच्या पीडेपासून सुटणें हा दोन प्रकारचा संश्रय आहे.

**यदावगच्छेदायत्यामाधिक्यं ध्रुवमात्मनः । तदात्वे चाल्पिकां पीडां तदा संधिं समाश्रयेत् ।।१६९।।**
**यदा प्रहृष्टा मन्येत सर्वास्तु प्रकृतीर्भृशम् । अत्युच्छ्रितं तथात्मानं तदा कुर्वीत विग्रहम् ।।१७०।।** मनु. अ. ७

आतां युद्ध केल्यापासून आपला तोटा आहे व मग युद्ध करण्यापासून आपला लाभ खचित होणार आहे असें जर निश्चयात्मक वाटेल तर शत्रूशीं संधि करावा व उचित समयापर्यंत धीर धरून रहावें. [यदा.] जेव्हां आपली प्रजा व सेना अत्यंत प्रसन्न, उन्नतियुक्त व श्रेष्ठ असेल व जेव्हां आपणहि उत्साहयुक्त असेल तेव्हां शत्रूशीं विग्रह [युद्ध] करावें.

**यदा मन्येत भावेन हृष्टं पुष्टं बलं स्वकम् । परस्य विपरीतं च तदा यायाद्रिपुं प्रति ॥१७१॥**
**यदा तु स्यात्परिक्षीणो वाहनेन बलेन च । तदासीत प्रयत्नेन शनकैः सान्त्वयन्नरीन् ॥१७२॥** मनु. अ. ७.

जेव्हां आपलें सैन्य उत्साहयुक्त व पुष्ट आहे व शत्रूचें बल निर्बल आहे असें समजेल तेव्हांच एकदम यान अर्थात् शत्रूवर चाल करून जावें. (यदा.) जेव्हां आपली सेना, बल व वाहनें ईत्यादि क्षीण झाली असतील तेव्हां हर प्रयत्नानें शत्रूचें सांत्वन करीत आपण स्वस्थ रहावें.

**मन्येतारिं यदा राजा सर्वथा बलवत्तरम् । तदा द्विधा बलं कृत्वा साधयेत्कार्यमात्मनः ॥१७३॥**
**यदा परबलानां तु गमनीयतमो भवेत् । तदा तु संश्रयेत्क्षिप्रं धार्मिकं बलिनं नृपम् ॥१७४.** मनु. अ. ७

जेव्हां शत्रु बलवान् आहे असें वाटेल तेव्हां आपल्या सैन्याचे दोन विभाग करून आपलें कार्य साधावें. (यदा.) आपल्यावर शत्रूची चढाई लवकर होईल (व तिचा प्रतिकार करण्याचें आपणाकडे सामर्थ्य नाहीं) असें जेव्हां वाटेल तेव्हां लवकर धार्मिक व बलवान् राजाचा आश्रय करावा.

**निग्रहं प्रकृतीनां च कुर्याद्योऽरिबलस्य च । उपसेवेत तं नित्यं सर्वयत्नैर्गुरुं यथा ॥१७५॥**
**यदि तत्रापि संपश्येद्दोषं संश्रयकारितम् । सुयुद्धमेव तत्रापि निर्विशङ्कः समाचरेत् ॥१७६॥** मनु० अ. ७

जो आपल्या प्रजेचा व शत्रूच्या बलाचा निग्रह करूं शकतो त्या पराक्रमी राजाचीच सेवा गुरुप्रमाणें करावी. (यदि०) ज्याचा आपण आश्रय केला असेल, त्याच्या कृतीमध्यें जर कांहीं दोष दिसत असले तर निःशंकपणानें युद्धाला सुरुवात करावी. जो राजा धार्मिक असेल त्याच्याशीं मैत्री करावी व जो दुष्ट असेल त्याला जिंकण्यास वरील उपाय योजावेत. संक्षिप्त राजनीतिः—

**सर्वोपायैस्तथा कुर्यान्नीतिज्ञः पृथिवीपतिः । यथास्याभ्यधिका न स्युर्मित्रोदासीनशत्रवः ॥१७७॥**
**आयतिं सर्वकार्याणां तदात्वं च विचारयेत् । अतीतानां च सर्वेषां गुणदोषौ च तत्त्वतः ॥१७८॥** मनु. अ. ७

ज्याच्या योगाने आपलें मित्र उदासीन (मध्यस्थ) व शत्रु हे आपणाहून अधिक होणार नाहींत, त्या सर्वच उपाय राजनीति जाणणाऱ्या राजानें योजावेत. सर्व कर्तव्याविषयीं वर्तमानकालीं काय केलें पाहिजे, भविष्यकालीं काय करावें व भूतकालीं केलेल्या कामामध्यें गुणदोष काय आहेत हे विचार करून जाणावें.

**आयत्यां गुणदोषज्ञस्तदात्वे क्षिप्रनिश्चयः । अतीते कार्यशेषज्ञः शत्रुभिर्नाभिभूयते ॥१७९॥**
**यथैनं नाभिसंदध्युर्मित्रोदासीनशत्रवः । तथा सर्वं संविदध्यादेष सामासिको नयः ॥१८०॥** मनु. अ. ७

दोषांचें निवारण व गुणांची स्थिरता करण्याचा प्रयत्न करावा. भविष्यकालीं करावयाच्या कामामध्यें होणारे गुणदोष जाणणारा, वर्तमानकालीं करावयाच्या कामांमध्यें प्रसंगावधान दाखविणारा व भूतकाळीं आरंभलेल्या कामामध्यें करावयाचें शिल्लक काय आहे हें जाणणारा जो राजा असतो, त्याचे शत्रु त्याचे पराजय करूं शकत नाहींत. (यथै०) आपले मित्र, उदासीन व शत्रू हे आपलें कोणत्याहि रीतीनें नुकसान करूं शकणार नाहींत, अशा रीतीची व्यवस्था न चुकतां करावी ही संक्षिप्त राजनीति आहे. लढाईची तयारी कशी करावी ?

**कृत्वा विधानं मूले तु यात्रिकं च यथाविधि । उपगृह्यास्पदं चैव चारान् सम्यग्विधाय च ॥१८४॥**
**संशोध्य त्रिविधं मार्गं षड्विधं बलं स्वकम् । सांपरायिककल्पेन यायादरिपुरं शनैः ॥१८५॥** मनु. अ. ७

जेव्हां राजा शत्रूशीं युद्ध करण्याकरितां जाईल तेव्हां त्यानें प्रथमतः आपल्या राज्याचें रक्षण करण्याची व्यवस्था उत्तम रीतीनें करावी, सेना, यानें, वाहनें, शस्त्रास्त्रें वगैरें शत्रूवर करावयाच्या चढाईची तयारी पूर्ण करावी, गुप्त हेरांना चोहोंकडचा समाचार गुप्तपणानें आणण्यासाठीं नेमावें व मग शत्रूवर चढाई करण्यास उठावें. [ संशो० ] जल, भूमी व आकाश हे तीनही मार्ग नीट आहेत कीं नाहीं तें पहावें. रथ, अश्व, हत्ती, यांच्या साहाय्यानें

भूमार्गावरून, नौकांतून जलमार्गानें व विमानांतून आकाशमार्गानें जावें. पायदळ, घोडेस्वार, हत्तीस्वार शस्त्रवान् व अस्त्रवान्, रथी, कोश व नोकर चाकर या सहा प्रकारच्या बलासह-त्यांची खानपानादि व्यवस्था उत्तम करून-कोणतें तरी एक निमित्त पुढें करून हुलके हुलके शत्रूच्या नगरावर चाल करावी.

शत्रुसेविनि मित्रे च गूढे युक्ततरो भवेत् । गतप्रत्यागते चैव स हि कष्टतरो रिपुः ॥१८६॥
दण्डव्यूहेन तन्मार्गं यायात्तु शकटेन वा । वराहमकराभ्यां वा सूच्या वा गरुडेन वा ॥१८७॥ मनु. अ. ७

जो बाहेरून आपला मित्र आहे असें भासवितो, पण वास्तविक आंतून शत्रूला मिळालेला असतो; व कामावरून दूर केलेला मनुष्य फिरून कामावर आलेला असतो; तोहि फार मोठा शत्रू आहे असें समजावें व त्यांच्याशीं व्यवहार करतांना फारच सावधगिरी ठेवावी. (दण्डव्यूहः) दंडाप्रमाणें सरळ रांगेनें सैन्य उभे करणें किंवा चालविणें (शकटव्यूहः) शकटाप्रमाणें सैन्यरचना करणें, (वराहव्यूहः) एकदम मिळून सर्वांनीं डुकराप्रमाणें दौडत दौडत जाऊन चाल करणे, किंवा डुकराप्रमाणेंच एका मागून दुसऱ्यानें धांवत जाणें (मकरव्यूहः) मगर जसे पाण्यांतून चालतात, त्या त्यांच्या गतिप्रमाणें सैन्यरचना करणें, (सूचीव्यूहः) सुई जशी अग्रभागीं अगदीं सूक्ष्म असते व मागें जाड होत येते तशीच सैन्याची रचना करणें, (गरुडव्यूहः) जसा गरुड वाऱ्यामध्यें वरखालीं उड्डाणें करतो तद्वत् सैन्याची एकदम हालचाल करणें, इत्यादि अनेक व्यूह आहेत. योग्यवेळीं ते ते व्यूह रचून शत्रूशीं लढावें. सर्व राजपुरुषांना व प्रजाजनांना ही युद्धविद्या शिकवावी व आपणहि तींत तरबेज असावें. जे पूर्ण सुशिक्षित योध्दे असतात तेच उत्तम प्रकारें लढून विजय संपादन करतात. असो.

यतश्च भयमाशंकेत् ततो विस्तारयेद्बलम् । पद्मेन चैव व्यूहेन निविशेत सदा स्वयम् ॥१८८॥
सेनापतिबलाध्यक्षौ सर्वदिक्षु निवेशयेत् । यतश्च भयमाशंकेत् प्राचीं तां कल्पयेद्दिशम् ॥१८९॥ मनु. अ. ८

ज्या बाजूनें भय प्राप्त होण्याचा संभव असेल त्या बाजूनें सैन्याचा विस्तार करावा; व पद्मव्यूहाप्रमाणें सैन्याची रचना करून आपण मध्यभागीं रहावें. (सेनाप०) सेनापति व बलाध्यक्ष अर्थात् आज्ञा देणारा व सैन्याबरोबर लढणारा, अशा दोन प्रकारच्या वीरांना आठहि दिशांमध्यें जय्यत तयारीनें ठेवावे. जिकडे लढाई होत असेल तिकडे सैन्याचें मुख करावें. परंतु इतर ठिकाणांचाहि नीट बंदोबस्त ठेवावा. नाहींतर शत्रू मागच्या बाजूंनीं हल्ला करून आपला पराभव करूं शकेल.

गुल्मांश्च स्थापयेदाप्तान् कृतसंज्ञान् समंततः । स्थाने युद्धे च कुशलानभीरूनविकारिणः ॥१९०॥
संहतान् योधयेदल्पान् कामं विस्तारयेद् बहून । सूच्या वज्रेण चैवैतान् व्यूहेन व्यूह्य योधयेत् ॥१९१॥
स्यन्दनाश्वैः समे युध्येदनूपे नौद्विपैस्तथा । वृक्षगुल्मावृत्ते चापैरसिचर्मायुधैः स्थले ॥१९२॥ मनु. अ. ७

गुल्म अर्थात् दृढस्तंभाप्रमाणें युद्धामध्यें स्थिर रहाणारें, युद्धविद्यानिष्णात, धार्मिक, भयरहित, चतुर व ज्यांच्या मनांत कशाचाहि विकार उत्पन्न होत नाहीं असे जे पुरुष असतील त्यांना भिन्नभिन्न नांवें ठेवून सैन्याच्या चारहि बाजूंला ठेवावें. (संह०) जर पुष्कळ सैन्याशीं थोड्या सैन्यानें लढावयाचें असेल तर एकजुटीनें हल्ले करावेत; वेळ पाहून त्यांनाच एकदम पसरूं द्यावें; जर नगरदुर्गांत किंवा शत्रूच्या सैन्यांत प्रवेश करून युद्ध करणें असेल तर सूची-व्यूह अथवा वज्रव्यूह यांची रचना करून युद्ध करावें. ज्याप्रमाणें खड्ग कापित जातें तद्वत् शत्रू सैन्याला एकदम कापित जाणें याला वज्रव्यूह असें म्हणतात. जसजसा आंत प्रवेश होईल त्याप्रमाणें समयोचित व्यूह रचून लढावें; जर समोरून शत्रूची (शतघ्नी) तोफ सुरू असेल किंवा (भुशुंडी) बंदूक सुरू असेल तर (सर्पव्यूहः) भुईसरपट चालून शत्रूच्या तोफांजवळ जाऊन, मारामारी व पकडापकडी करून, त्या तोफा आपल्या स्वाधीन करून घ्याव्यात. मग वाटल्यास त्याच तोफा उलट शत्रूवर सोडण्यास प्रारंभ करावा शत्रूचें सैन्य पळूं लागलें असतां त्यांचा घोडेस्वारांकडून पाठलाग करवावा, त्यांना वाटल्यास पकडावें किंवा पळवून लावावें. (स्यन्द०) पायदळ, रथ व घोडे यांनीं समर-भूमीवर युद्ध करावें, समुद्रामध्यें नौकांनीं, थोडें पाणी असल्यास हत्तींनीं, वृक्ष व झाडी असल्यास बाणांनीं व साधारण वालुमय इतर स्थळीं ढाल तरवार घेऊन युद्ध करावें.

प्रहर्षयेद्बलं व्यूह्य तांश्च सम्यक् परीक्षयन् । चेष्टाश्चैव विजानीयादरीन् योधयतामपि ॥१९४॥
उपरुध्यारिमासीत राष्ट्रं चास्योपपीडयेत् । दूषयेच्चास्य सततं यवसान्नोदकेन्धनम् ॥१९५॥
भिन्द्याच्चैव तडागानि प्राकारपरिखास्तथा । समवस्कन्दयेच्चैनं रात्रौ वित्रासयेत्तथा ॥१९६॥ मनु. अ. ७.

युद्ध चाललें असतांना लढणाऱ्या लोकांना उत्साहित व हर्षित करावें. युद्ध बंद झाल्यानंतर ज्या योगानें त्यांचे शौर्य व लढण्याला उत्साह वाढेल असें भाषण करावें व सर्वांना खानपान, वस्त्रावरण, औषधपाणी इत्यादिकांची नीट व्यवस्था करून प्रसन्न ठेवावें. व्यूह रचल्यावांचून लढाई करूं नये व करवूंहि नये. आपल्या लढणाऱ्या सैन्याच्या हालचाली-वरून ते हुशारीनें लढत आहेत की, कपट करीत आहेत तें जाणावें. (उपरु.) जर वेळ योग्य असेल तर शत्रूला चारहि-बाजूंनीं घेरून त्याला कोंडावें, त्याच्या राजाला त्रास द्यावा व त्याचें चारा, अन्नपाणी व लाकूडफाटें यांचा पुरवठा बंद करावा किंवा दूषित करावा (भिन्द्यात्) शत्रूचे तलाव व कोटकिल्ले व तट तोडूनफोडून त्याच्यावर रात्रीं बेरात्रीं छापे घालुन त्याला त्रास द्यावा व आपला विजय होण्यास जीं साधनें अवश्य असतील त्यांचा अवलंब योग्य वेळ पाहून करावा.

प्रमाणानि च कुर्वीत तेषां धर्म्यान्यथोदितान् । रत्नैश्च पूजयेदेनं प्रधानपुरुषैः सह ॥२०३॥
आदानमप्रियकरं दानं च प्रियकारकम् । अभीप्सितानामर्थानां काले युक्तं प्रशस्यते ॥२०४॥ मनु. अ. ७.

शत्रूला जिंकल्यानंतर त्याशीं करारपत्रें व प्रतिज्ञापत्रें करावीं व उचित वाटल्यास त्याच्या वंशजाला किंवा जवळच्या संबंधीजनाला त्या राजाचा अधिकार सत्कारपूर्वक देऊन त्याच्याकडून अशी प्रतिज्ञा लिहून घ्यावी कीं, त्यानें आपल्या हुकमाप्रमाणें चालावें व धर्मयुक्त राजनीतिप्रमाणें प्रजेचें पालन करावें. असा प्रतिज्ञालेख झाल्यावर त्याला स्वतः उपदेश करावा व त्याच्या जवळ प्रधानादि पुरुष आपण असे नेमावे की त्यांच्याकडून आपणाला पुनः उपद्रव न होईल; ज्याला जिंकलें असेल त्या राजाला प्रधानपुरुषांसह सत्कारपूर्वक भेटून, रत्नें वगैरे देऊन त्याची व्यवस्था नीट ठेवावी. त्याचा योगक्षेम न चालेल असें करूं नये. त्याला जरी कैद केले तरीहि त्याचा शक्य तेवढा सत्कार करावा व त्याला शोकरहित करावें. (आदा.) या संसारामध्यें दुसऱ्याचे पदार्थ हिरावून घेणें हें अप्रीतिकारक असून दान करणें हें प्रीती वाढविणारें आहे. योग्य समय पाहून उचित व्यवहार करणें व या पराजित राजाला योग्य इष्ट पदार्थ देणें हें चांगलें आहे. त्याला चिडवूं नये, त्याची थट्टा करूं नये किंवा त्याला हंसूं नये. मी तुझा पराजय केला आहे असें त्याच्यासमोर म्हणूं नये. आपण माझे बंधु आहांत अशाप्रकारें गोड शब्दांनीं बोलावें. शत्रू, मित्र व उदासीन यांचीं लक्षणें—

हिरण्यभूमिसंप्राप्त्या पार्थिवो न तथैधते । यथा मित्रं ध्रुवं लब्ध्वा कृशमप्यायतिक्षमम् ॥२०८॥
धर्मज्ञं च कृतज्ञं च तुष्टप्रकृतिमेव च । अनुरक्तं स्थिरारंभं लघुमित्रं प्रशस्यते २०९॥
प्राज्ञं कुलीनं शूरं च दक्षं दातारमेव च । कृतज्ञं धृतिमन्तं च कष्टमाहुररिं बुधाः ॥२१०॥
आर्यता पुरुषज्ञानं शौर्यं करुणवेदिता । स्थौललक्ष्यं च सततमुदासीनगुणोदयः ॥२११॥ मनु. अ. ७.

अचल प्रेमयुक्त, भविष्यकालीं होणाऱ्या गोष्टींवर विचार करणारा, कार्य सिद्ध करण्यास समर्थ असे मित्र किंवा साधारण प्रतीचें मित्र असल्यानें जशी राजाची उन्नति होते त्याप्रमाणें सुवर्ण किंवा भूमि प्राप्त झाल्यानेंहि होत नाही. (धर्म०) धर्म जाणणारा, कृतज्ञ, सदा प्रसन्न, अनुरक्त व उत्साही असा जरी लहानसा मित्र असला तरी त्याजपासून फार लाभ होतात. (प्राज्ञं०) बुद्धिमान्, कुलीन, शूरवीर, चतुर, दाता, कृतज्ञ, धैर्यवान् अशा पुरुषांशीं कधींहि वैर करूं नये हें ध्यानांत नेहमीं ठेवावें. जो अशांशीं शत्रुत्व करील त्याला फारच दुःख होईल. (आर्य०) जो मनुष्याचीं परीक्षा करूं शकतो, जो शूर, करुणायुक्त, वरवरच्या गोष्टी निरंतर सांगतो व जो प्रशंसित गुणांनी युक्त आहे; त्याला उदासीन असें म्हणतात. याप्रमाणें मित्र, शत्रू व उदासीन यांची व्याख्या आहे.

एवं सर्वमिदं राजा सह संमन्त्र्य मन्त्रिभिः । व्यायाम्याप्लुत्य मध्याह्ने भोक्तुमन्तःपुरं विशेत् ॥२१६॥ मनु० अ. ७.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रातःकालीं उठून शौचमुखमार्जनादि करून स्नानसंध्योपासना व अग्निहोत्रादिक करून, मंत्र्यांसह विचारविनिमय करून, सैन्यांमध्यें जाऊन, सेनापतीशीं भाषणादि करून, नानाप्रकारची व्यूहरचना-कवायत-

पाहून, त्यांना उत्साहित करून, सर्व हत्ती, घोडे, गाई यांच्या पशुशाला पाहून, शस्त्रास्त्रस्थान, वैद्यालय, धनकोश या सर्वांचें निरीक्षण करून या सर्वांमध्यें जी कांहीं न्यूनता असेल ती दूर करण्याचा उपाय सुचवून, व्यायामशालेंत जाऊन व्यायाम करून, नंतर भोजन करण्यासाठीं अंतःपुरामध्यें ( जेथें पत्नी राहत असेल तेथें ) जावें. तेथें जें भोजन करावयाचें असेल त्याची आधीं चांगल्या रीतीनें परीक्षा करून, बुद्धिबलपराक्रमवर्धक, रोगनाशक, अनेक प्रकारचे व्यंजनपानादिक सुगंधितमिष्टान्नादिक, अनेक रसयुक्त उत्तम अन्नाचें सेवन करावें व सुखी व्हावें. याप्रमाणें राज्यव्यवस्था नीट पाहून राज्याची उन्नति करावी. कराच्या बोजानें प्रजेला त्रास देऊं नये. कराचें प्रमाणः—

**पञ्चाशद्भाग आदेयो राज्ञा पशुहिरण्ययोः । धान्यानामष्टमो भागः षष्ठो द्वादश एव वा ॥१३०॥** मनु० अ. ७.

व्यापार करणारे, शिल्पकार, कारागीर यांना सुवर्णादिकांचा जेवढा लाभ होत असेल त्याचा पन्नासावा भाग कर म्हणून घ्यावा. तांदूळ वगैरे धान्याचा सहावा, आठवा किंवा बारावा भाग घ्यावा. जर धान्य न घेतां धनरूपानें घ्यावयाचा असेल तर तो इतका नियमित घ्यावा कीं त्याच्या योगानें शेतकऱ्यांना खाण्यापिण्याची ददात न पडेल व ते दुःखी न होतील. कारण प्रजाजन धनाढ्य व अन्नादिकांनीं सुसंपन्न असेल तरच राजाची उन्नति होते. राजानें आपल्या मुलांप्रमाणें प्रजेला समजावें व त्यांना सुख द्यावें व प्रजेनेंहि राजाला व राजपुरुषांना पितृवत् समजून तसें वागावें. शेतकरी वगैरे प्रजाजन व परिश्रम करणारे ह्यांचा राजा हा रक्षक आहे. जर प्रजा नसेल तर राजाची काय जरूर आहे ? प्रजा आहे म्हणून राजा आहे. जर राजा नसेल तर प्रजा कोणाची होईल ? राजा व प्रजा हे दोघेहि आपआपल्या कामांमध्यें स्वतंत्र व परस्परसंबंधीं कामामध्यें परतंत्र आहेत. तसेंच प्रजेच्या सर्वसाधारण संमतिविरुद्ध राजा व राजपुरुष यांनीं चालूं नये. राजाज्ञेविरुद्ध राजपुरुषांनीं वर्तन करूं नये व प्रजेनेहि करूं नये. ही संक्षेपानें राजनीति सांगितली आहे. विशेष पहाणें असल्यास महाभारत, मनुस्मृति, शुक्रनीति वगैरे ग्रंथ पहावे पहावे व त्यांवरून राजनीतीचे सर्व मार्ग जाणावेत व त्याप्रमाणें वागून राष्ट्राची उन्नति करावी. न्यायव्यवस्थाः—

**प्रत्यहं देशदृष्टैश्च शास्त्रदृष्टैश्च हेतुभिः । अष्टादशसु मार्गेषु निबद्धानि पृथक् पृथक् ॥३॥** मनु० अ० ८

सभा, राजा व राजपुरुष यांनीं देशाचार व शास्त्रव्यवहार यांच्या सहाय्यानें पुढें लिहिलेल्या अठरा विवादस्थानांच्या प्रतिविषयीं निर्णय करावा. जे नियम पूर्वींच्या शास्त्रांत नसतील व ज्यांची देशकालानुसार आवश्यकता वाटेल ते उत्तमोत्तम नियम करून राजा व प्रजा यांची उन्नति करावी.

**तेषामाद्यमृणादानं निक्षेपोऽस्वामिविक्रयः । संभूय च समुत्थानं दत्तस्यानपकर्म च ॥४॥**
**वेतनस्यैव चादानं संविदश्च व्यतिक्रमः । क्रयविक्रयानुशयो विवादः स्वामिपालयोः ॥५॥**
**सीमाविवादधर्मश्च पारुष्ये दण्डवाचिके । स्तेयं च साहसं चैव स्त्रीसंग्रहणमेव च ॥६॥**
**स्त्रीपुंधर्मो विभागश्च द्यूतमाह्वय एव च । पदान्यष्टादशैतानि व्यवहारस्थिताविह ॥७॥** मनु. अ. ८

विवादस्थानें अठरा आहेत, तीं हीं:—(१) **ऋणादानम्**:—कोणाकडून ऋण घेतलें असलें तर त्यासंबधाचा विवाद; (२) **निक्षेपः**—ठेव किंवा कोणी कोणाकडे कांहीं पदार्थ काहीं कामानिमित्त ठेवलेला असतो, त्यासंबंधीं वाद; (३) **अस्वामिविक्रयः**—एकाचा पदार्थ दुसऱ्यानें मालकाच्या आज्ञेशिवाय विकणें; (४) **संभूय समुत्थानम्**:—सर्वांनीं एकत्र मिळून कांहीं कृत्य करणें; (५) **दत्तस्यानपकर्मः**—दिलेला पदार्थ मागितला असतां पुनः परत न करणें; (६) **वेतनस्यादानम्**:—नोकरी करणाराला जो पगार मिळतो तो कमी करणें किंवा त्यांतील कांहीं भाग आपण घेणें; (७) **संविद्व्यतिक्रमः**—केलेल्या प्रतिज्ञेचें पालन न करणें; (८) **क्रयविक्रयानुशयः**—घेण्यादेण्यांत वादविवाद; (९) **स्वामिपालविवादः**—पशूंचा स्वामी व पालक यांत होणारा वादविवाद; (१०) **सीमाविवादधर्मः**—सीमेच्या संबंधाचा वाद; (११) **पारुष्यम्**:—कठोर शिक्षा करणें; (१२) **दण्डवाक्**:—शिव्यागाळी, बेअब्रू, किंवा कडक भाषण करून दुसऱ्याला दुखविणें; (१३) **स्तेयम्**:—चोरी करणें; दरोडा घालणें; (१४) **साहसम्**:—बलात्कार करून कांहीं काम करणें; (१५) **स्त्रीसंग्रहणम्**:—परस्त्रीशीं व्यभिचार करणें (१६) **स्त्रीपुंधर्मः**—स्त्रीपुरुषादिकांच्या

धर्मामध्यें व्यतिक्रम होणें; (१७) **विभागः**—दायविभागसंबंधीं वादविवाद; (१८) **द्यूतमाह्वयः**—जड व चेतन पदार्थाला डावामध्यें धरून जुगार खेळणें ही अठरा प्रकारचीं परस्पर वादीप्रतिवादीमध्यें उत्पन्न होणारीं विवादस्थानें आहेत.

**एषु स्थानेषु भूयिष्ठं विवादं चरतां नृणाम् । धर्मं शाश्वतमाश्रित्य कुर्यात्कार्यविनिर्णयम् ॥८॥** मनु. अ. ८

या विवादस्थानांमध्यें विवाद करणाऱ्या पुरुषांना शाश्वत धर्माचा आश्रय करून न्याय द्यावा कोणाचाहि केव्हांहि पक्षपात करूं नये.

**धर्मो विद्धस्त्वधर्मेण सभां यत्रोपतिष्ठते । शल्यं चास्य न कृन्तन्ति विद्धास्तत्र सभासदः ॥१२॥**
**सभा वा न प्रवेष्टव्या वक्तव्यं वा समञ्जसम् । अब्रुवन् विब्रुवन्वापि नरो भवति किल्बिषी ॥१३॥** मनु.अ.८

अधर्मानें ग्रस्त झालेला धर्म ज्या सभेमध्यें उपस्थित होतो व जेथील सभासद त्या धर्माचें शल्य काढून टाकीत नाहींत त्या सभेंतील सर्व सभासद त्याच शल्यानें घायाळ होतात. अर्थात् ज्या न्यायसभेकडून पक्षपात होतो, अपराध्याला दंड मिळत नाहीं व निरपराध्याला त्रास होतो, त्या सभेचे सर्व सभासद दुष्कीर्तीनें कलंकित होतात. [ सभा० ] धार्मिक मनुष्यानें इच्छा नसेल तर न्यायसभेला जाऊं नये, पण जर तो एकदां न्यायसभेला गेला तर त्यानें जें काय खरें असेल तेंच बोलावें. कोणत्याहि सभेंत अन्याय होत आहे हें पाहत असतांहि मौन धरणें, किंवा अन्यायाची बाजू संभाळणें या दोनहि गोष्टींच्या योगानें तो मनुष्य महापापी होतो.

**यत्र धर्मो ह्यधर्मेण सत्यं यत्रानृतेन च । हन्यते प्रेक्षमाणानां हतास्तत्र सभासदः ॥१४॥**
**धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः । तस्माद्धर्मो न हन्तव्यो मा नो धर्मो हतोऽवधीत् ॥१५॥** मनु. अ. ८

ज्या सभेमध्यें धर्माचें अधर्मानें व सत्याचें असत्यानें हनन केलें जातें, त्या ठिकाणचे सर्व सभासद मेलेले आहेत असें समजावें. [धर्म.] जो धर्माचें हनन करतो, त्याचा धर्म नाश करतो व जो धर्माचें रक्षण करतो त्याचें रक्षण धर्म करतो. हनन केलेल्या धर्मानें आपलें हनन करूं नये यासाठीं कोणीहि धर्माचें हनन करूं नये. अर्थात् सर्वदा सर्वांनीं धर्माचा व न्यायाचा प्रतिपाल करावा.

**वृषो हि भगवान् धर्मस्तस्य यः कुरुते ह्यलम् । वृषलं तं विदुर्देवास्तस्माद्धर्मं न लोपयेत् ॥१६॥**
**एक एव सुहृद्धर्मो निधनेऽप्यनुयाति यः । शरीरेण समं नाशं सर्वमन्यद्धि गच्छति ॥१७॥** मनु. अ. ८

धर्माला वृष असें म्हणतात, धर्माच्या योगानें ऐश्वर्य व सुख हीं प्राप्त होतात. धर्माचा जो नाश करतो त्याला विद्वान् लोक वृषल-शूद्र असें म्हणतात. म्हणून कोणीहि धर्माचा लोप करूं नये. [एक.] या संसारामध्यें धर्म हाच एक असा मित्र आहे कीं जो मृत्युनंतरहि बरोबर राहतो. बाकीचे सर्व पदार्थ शरीराबरोबरच नाश पावतात. अर्थात् मरणाबरोबर त्यांचा संग सुटतो, पण धर्माचा सुटत नाहीं.

**पादो धर्मस्य कर्तारं पादः साक्षिणमृच्छति । पादः सभासदः सर्वान् पादो राजानमृच्छति ॥१८॥**
**राजा भवत्यनेनास्तु मुच्यन्ते च सभासदः । एनो गच्छति कर्तारं निन्दार्हो यत्र निन्द्यते ॥१९॥** मनु. अ. ८

जेव्हां राजसभेमध्यें पक्षपात होतो व अन्याय केला जातो तेव्हां त्या अधर्माचे चार विभाग होऊन त्यांतील एक कर्त्याला, दुसरा साक्षीला, तिसरा सर्व सभासदांना व चवथा भाग राजाला लागतो. याप्रमाणें सर्व कलंकित होतात. [राजा.] पण ज्या सभेमध्यें निंद्य मनुष्याची निंदा, स्तुतीला योग्य असणाराची स्तुति, अपराध्याला दंड व माननीयाला मान मिळतो त्या ठिकाणचा राजा व सर्व सभासद निष्पाप होतात व सर्व पाप अपराध्यालाच लागतें. साक्षी असे असावेत ?

**आप्ताः सर्वेषु वर्णेषु कार्य्याः कार्य्येषु साक्षिणः । सर्वधर्मविदोऽलुब्धा विपरीतांस्तु वर्जयेत् ॥६३॥**
**स्त्रीणां साक्ष्यं स्त्रियः कुर्युर्द्विजानां सदृशा द्विजाः । शूद्राश्च सन्तः शूद्राणामन्त्यानामन्त्ययोनयः ॥६८॥** मनु. अ. ८

सर्व वर्णांमध्यें जे धार्मिक, विद्वान्, निष्कपटी, सर्वप्रकारें धर्माला जाणणारे लोभरहित, सत्यवादी अशा प्रकारच्या लोकांनीं न्याय करावयाच्यावेळीं साक्षी नेमावेत. याहून विपरीत गुणांनीं जे युक्त असतील त्यांना नेमूं नये. स्त्रियांसाठीं स्त्रिया, द्विजांसाठीं द्विज, शूद्रांसाठीं शूद्र व अंत्यजांसाठीं अंत्यज असे साक्षी असावेत.

**साहसेषु च सर्वेषु स्तेयसंग्रहणेषु च । वाग्दण्डयोश्च पारुष्ये न परीक्षेत साक्षिणः ॥७२॥**
**बहुत्वं परिगृह्णीयात्साक्षिद्वैधे नराधिपः । समेषु तु गुणोत्कृष्टान् गुणिद्वैधे द्विजोत्तमान् ॥७३॥** मनु. अ. ८

साहस, बलात्कार, चोरी, व्यभिचार, कठोर भाषण, निरपराध्याला दंड देणें इत्यादि अपराधांमध्यें साक्षी घेऊं नयेत. कारण हीं कामें गुप्त होतात. (बहु०) दोनहि बाजूंच्या साक्षींमध्यें बहुमतानुसार, दोनहि बाजूला सारखे असतील तर त्यांतील विद्वान् साक्षीप्रमाणें, जर दोनहि बाजूंला गुणी व विद्वान् असतील तर त्यांच्यांत जे द्विजोत्तम, यति, मुनि, ऋषि असतील त्यांच्या मताप्रमाणें न्याय करावा.

**समक्षदर्शनात्साक्ष्यं श्रवणाच्चैव सिद्ध्यति । तत्र सत्यं ब्रुवन् साक्षी धर्मार्थाभ्यां न हीयते ॥७४॥**
**साक्षी दृष्टश्रुतादन्यद् विब्रुवन्नार्यसंसदि । अवाङ्नरकमभ्येति प्रेत्य स्वर्गाच्च हीयते ॥७५॥** मनु. अ. ८

पाहिलेलें सांगणारे व ऐकलेलं सांगणारे असें दोन प्रकाराचे साक्षी असतात. जे साक्षी खरें सांगतात ते धर्म व अर्थ या दृष्टीनें दंडनीय होत नाहींत, पण जे असत्य बोलतात ते दण्ड करण्यास योग्य होत. (साक्षी.) राजसभेमध्यें किंवा विद्वत्सभेमध्यें जे साक्षी पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टी जशाच्या तशाच न सांगतां खोट्या सांगतात; त्यांना (अवाङ्नरकम्) जिव्हाछेदन रूप दुःखानें वर्तमानसमयीं नरक प्राप्त होतो व मेल्यानंतर त्याला मुळींच सुख प्राप्त होत नाहीं.

**स्वभावेनैव यद्ब्रूयुस्तद्ग्राह्यं व्यावहारिकम् । अतो यदन्यद्विब्रूयुर्धर्मार्थं तदपार्थकम् ॥७८॥**
**सभान्तः साक्षिणः प्राप्तानर्थिप्रत्यर्थिसन्निधौ । प्राड्विवाकोऽनुयुञ्जीत विधिनाऽनेन सान्त्वयन् ॥७९॥** मनु. अ. ८

साक्षी जें कांहीं स्वाभाविक रीतीनें व्यवहारासंबंधीं सांगेल तेंच खरें आहे असें मानावें व याशिवाय शिकविलेलें जें कांहीं तो तेथें बोलेल तें सर्व मिथ्या आहे, असें समजावें. जेव्हां (अर्थी) वादी व (प्रत्यर्थी,) प्रतिवादी यांच्या समक्ष साक्षी न्यायसभेपुढें येतील, तेव्हां शांततापूर्वक न्यायाधीश व (प्राड्विवाकः) वकील बॅरिस्टर यांनीं त्याला प्रश्न विचारावेत व सत्यासत्यतेचा निर्णय करावा. तो असा :—

**यद्द्वयोरनयोर्वेत्थ कार्येऽस्मिञ्चेष्टितं मिथः । तद्ब्रूत सर्वं सत्येन युष्माकं ह्यत्र साक्षिता ॥८०॥**
**सत्यं साक्ष्ये ब्रुवन् साक्षी लोकानाप्नोति पुष्कलान् । इह चानुत्तमां कीर्तिं वागेषा ब्रह्मपूजिता ॥८१॥** मनु.अ. ८

'हे साक्षीलोक हो ! या दोघांच्या परस्पर कर्मामध्यें जें तुम्ही जाणत असाल तें सर्व जसें माहित असेल तसें खरें सांगा; कारण तुमची या कामांत साक्ष द्यावयाची आहे. (सत्यं.) जो साक्षी सत्य बोलतो त्याला जन्मजन्मान्तरीं उत्तम लोकांत उत्तम जन्म प्राप्त होतो व सुख मिळतें. या जन्मीं व पुढच्या जन्मीं उत्तम कीर्ति होते; कारण वाणी हीच सत्कार व तिरस्काराला कारण आहे. जो सत्य बोलतो त्याची प्रतिष्ठा व जो मिथ्या बोलतो त्याची अप्रतिष्ठा होते.

**सत्येन पूयते साक्षी धर्मः सत्येन वर्धते । तस्मात्सत्यं हि वक्तव्यं सर्ववर्णेषु साक्षिभिः ॥८३॥**
**आत्मैव ह्यात्मनः साक्षी गतिरात्मा तथात्मनः । मावमंस्थाः स्वमात्मानं नृणां साक्षिणमुत्तमम् ॥८४॥** मनु अ. ८

सत्य बोलण्यानें साक्षी पवित्र होतो व सत्य बोलण्यानें धर्म वाढतो; म्हणून सर्व वर्णांतील साक्षींनीं सत्यच बोलावें. (आत्मै.) आत्म्याचा साक्षी आत्मा व आत्म्याची गतिहि आत्माच आहे. हें जाणून, हे पुरुषा ! तूं सर्व मनुष्यांतील

उत्तम साक्षी आहेस म्हणून तूं आपल्या आत्म्याचा अपमान करूं नकोस. अर्थात् जें सत्य तुला माहित आहे तें तसेंच सांग, असत्य बोलूं नकोस.

**यस्य विद्वान् हि वदतः क्षेत्रज्ञो नाभिशङ्कते । तस्मान्न देवाः श्रेयांसं लोकेऽन्यं पुरुषं विदुः ॥९६॥**
**एकोऽहमस्मीत्यात्मानं यत्त्वं कल्याण मन्यसे । नित्यं स्थितस्ते हृद्येष पुण्यपापेक्षिता मुनिः ॥९१॥ मनु० अ. ८**

बोलत असतां ज्याचा आत्मा शंकित होत नाहीं, तोच पुरुष धन्य होय. विद्वान् लोक त्याहून दुसरा कोणीहि धन्य आहे असें समजत नाहींत. (एक:) हे कल्याणाची इच्छा करणाऱ्या पुरुषा ! जो तूं 'मी एकटा आहें' असें समजून खोटें बोलत आहेस. तें चांगलें नाहीं; पण जो तुझ्या हृदयामध्यें अंतर्यामी पापपुण्य देणारा मुनि (परमेश्वर) दुसरा आहे त्या परमेश्वराला भिऊन तूं सत्य बोल. असा साक्षीला उपदेश करून मग त्याची साक्ष घ्यावी.

**लोभान्मोहाद्भयान्मैत्रात्कामात् क्रोधात्तथैव च । अज्ञानाद्बालभावाच्च साक्ष्यं वितथमुच्यते ॥११८॥**
**एषामन्यतमे स्थाने यः साक्ष्यमनृतं वदेत् । तस्य दण्डविशेषांस्तु प्रवक्ष्याम्यनुपूर्वशः ॥११९॥ मनु० अ. ८**

जो लोभ, मोह, भय, मित्रता, काम, क्रोध, अज्ञान व बालपण या स्थितींत साक्षी देईल ती सर्व खोटी आहे असें समजावें. (एषां) याप्रमाणें जो साक्षी खोटें बोलेल त्याला पुढील शिक्षा करावी:—

**लोभात्सहस्रं दण्ड्यस्तु मोहात्पूर्वं तु साहसम् । भयाद्द्वौ मध्यमौ दण्ड्यौ मैत्रात् पूर्वं चतुर्गुणम् ॥१२०॥**
**कामाद्दशगुणं पूर्वं क्रोधात्तु त्रिगुणं परम् । अज्ञानाद्द्वे शते पूर्णे बालिश्याच्छतमेव तु ॥१२१॥ मनु० अ. ८**

लोभानें खोटी साक्ष देणाऱ्याला उत्तमसाहस म्हणजे सहस्र पण (सुमारें १००० पैसे=पंधरा रु० दहा आणे), मोहानें खोटी साक्ष देणाऱ्याला प्रथमसाहस म्हणजे सार्ध द्विशत पण (सुमारें २५० पैसे=तीन रु. साडेचवदा आणे), भयानें देणाऱ्याला दोन मध्यमसाहस म्हणजे सहस्र पण (सुमारें १००० पैसे=पंधरा रु. दहा आणे), जो मित्रत्वाच्या योगानें खोटी साक्ष देईल त्याचकडून प्रथमसाहसचे चौपट म्हणजे सहस्र पण (सुमारें १००० पैसे=पंधरा रु. दहा आणे), दण्ड घ्यावा. (कामा.) कामनेच्या योगानें जो खोटी साक्ष देईल त्याला प्रथमसाहसचे दसपट म्हणजे (सुमारें २५०० पैसे=एकोनचाळीस रु. एक आणा) दण्ड करावा. क्रोधानें खोटी साक्ष देणाऱ्याला उत्तमसाहसचे तिप्पट म्हणजे (सुमारें ३००० पैसे=शेचाळीस रु. चवदा आणे), अज्ञानानें खोटी साक्ष देणाऱ्याला द्विशत पण म्हणजे (सुमारें २०० पैसे=तीन रु. दो आणे), मूर्खपणानें देणाऱ्याला शतपण म्हणजे (सुमारें १०० पैसे=एक रु. नऊ आणे) दण्ड करावा. "पण" हें परिमाण फार प्राचीन असून सुमारें पैशाच्या वजना इतकें तांब्याचें नाणें होतें असें आढळतें.

**उपस्थमुदरं जिह्वा हस्तौ पादौ च पञ्चमम् । चक्षुर्नासा च कर्णौ च धनं देहस्तथैव च ॥१२५॥**
**अनुबन्धं परिज्ञाय देशकालौ च तत्त्वतः । साराऽपराधौ चालोक्य दण्डं दण्ड्येषु पातयेत् ॥१२६॥ म. अ. ८**

उपस्थेंद्रिय, पोट, जीभ, हात, पाय, डोळे, नाक, कान, धन व देह हीं दहा दण्ड देण्याचीं स्थानें आहेत. यांच्यावर दण्ड केला जातो. (अनु.) देश, काल, व पुरुषाची पात्रता व अपराधाची तीव्रता यांचा विचार करून योग्य तो दंड द्यावा. उदाहरण-लोभानें खोटी साक्ष दिली तर त्याला पंधरा रु दहा आणे दंड करावा असें सांगितलें आहे, पण जर अपराधी मनुष्य अत्यंत गरीब असेल किंवा अतिशय श्रीमान् असेल तर त्याप्रमाणें कमी किंवा दुप्पट तिप्पट चौपट जास्ती दण्ड करावा.

**अधर्मदण्डनं लोके यशोघ्नं कीर्तिनाशनम् । अस्वर्ग्यं च परत्रापि तस्मात्तत्परिवर्जयेत् ॥१२७॥**
**अदण्ड्यान् दण्डयन् राजा दण्ड्यांश्चैवाप्यदण्डयन् । अयशो महदाप्नोति नरकं चैव गच्छति ॥१२८॥**
**वाग्दण्डं प्रथमं कुर्याद्धिग्दण्डं तदनन्तरम् । तृतीयं धनदण्डं तु वधदण्डमतः परम् ॥१२९॥ मनु. अ. ८**

अधर्मानें दंड करण्यापासून वर्तमानकालीं प्रतिष्ठा कमी होते, यश नाहींसें होतें, भविष्यकालीं व परजन्मीं होणारी किर्ति नाश पावते व दुःख होतें; म्हणून कोणालाहि अधर्मानें दंड करूं नये. (अद.) जो राजा निरपराध्याला दंड

देतो व अपराध्यांला दंड करीत नाहीं, त्याची तो जिवंत असेपर्यंत फार निंदा होते व मेल्यानंतर त्याला फार दुःख होतें. म्हणून राजानें अपराधी माणसाला दंड करावा व निरपराध्याला कधींहि दंड करूं नये. (वाग्द.) प्रथम वाणीनें दंड करावा अर्थात् निंदा करावी, नंतर त्याचा धिक्कार करावा, तिसऱ्या वेळीं त्याला द्रव्याचा दंड करावा व नंतर वधदण्ड अर्थात् बांधून वेतानें मारणें, शिरच्छेद करणें वगैरे प्रकारें दंड करावा.

**येन येन यथाङ्गेन स्तेनो नृषु विचेष्टते । तत्तदेव हरेत्तस्य प्रत्यादेशाय पार्थिवः ॥३३४॥**
**पिताचार्यः सुहृन्माता भार्या पुत्रः पुरोहितः । नादण्ड्यो नाम राज्ञोऽस्ति यः स्वधर्मेन तिष्ठति ॥३३५॥** मनु. अ. ८

चोर ज्या ज्या अवयवांनीं समाजामध्यें विरुद्ध चेष्टा करतो अर्थात् चोरी करतो, त्या त्या अंगांचें राजानें छेदन करावें. (पिता.) पिता, आचार्य, माता, मित्र, भार्या, पुत्र, पुरोहित वगैरे जे कोणी स्वधर्माप्रमाणें आचरण करीत नसतील, त्यांना राजानें यथायोग्य दंड करावा. जेव्हां राजा न्यायासनावर बसतो तेव्हां त्यानें कोणाचाहि पक्षपात न करतां सर्वांचा यथायोग्य न्याय करावा.

**कार्षापणं भवेद्दण्ड्यो यत्रान्यः प्राकृतो जनः । तत्र राजा भवेद्दण्ड्यः सहस्रमिति धारणा ॥३३६॥**
**अष्टापाद्यन्तु शूद्रस्य स्तेये भवति किल्बिषम् । षोडशैवतु वैश्यस्य द्वात्रिंशत्क्षत्रियस्य च ॥३३७॥**
**ब्राह्मणस्य चतुःषष्टिः पूर्णं वापि शतं भवेत् । द्विगुणा वा चतुःषष्टिस्तद्दोषगुणविद्धि सः ॥३३८॥** मनु० अ. ८

ज्या अपराधाबद्दल साधारण मनुष्याला सुमारें एक पैसा दंड होतो त्याच अपराधाबद्दल राजाला सुमारें हजार पैसे दंड असावा. साधारण मनुष्याच्या हजार पट राजाला दंड करावा. मंत्री किंवा दिवाण यांना आठशेंपट; याप्रमाणें ज्याची जशी कमी जास्ती योग्यता असेल त्यामानानें त्याला कमी अधिक दंड करावा. साधारण शिपायालाहि सामान्य पुरुषांच्या सात आठ पट दंड करावा. साधारण प्रजाजनांपेक्षां राजपुरुषांला जास्त दंड करणें योग्य होय. असें न केलें तर राजपुरुष सर्व प्रजेला फार त्रास देतील. अधिक दण्ड केल्यानें सिंह वश होतो व थोड्याशा दंडानें बकरी वश होते. याचप्रमाणें प्रजेपेक्षां राजपुरुषांना अधिक दण्ड केला पाहिजे. (अष्टा.) शूद्राला चोरीच्या आठपट, वैश्याला सोळापट, क्षत्रियाला बत्तीसपट, (ब्राह्म.) ब्राह्मणाला चवसष्टपट अधिक दंड झाला पाहिजे किंवा ब्राह्मणाला शतपट किंवा एकशें अठ्ठावीसपट करावा. अर्थात् ज्ञान, प्रतिष्ठा व योग्यता ज्याची जशी असेल तसा त्याला कमी जास्ती दंड करावा.

**ऐन्द्रं स्थानमभिप्रेप्सुर्यशश्चाक्षयमव्ययम् । नोपेक्षेत क्षणमपि राजा साहसिकं नरम् ॥३४४॥**
**वाग्दुष्टात्तस्कराच्चैव दण्डेनैव च हिंसतः । साहसस्य नरः कर्ता विज्ञेयः पापकृत्तमः ॥३४५॥** मनु. अ. ८

राजाचे अधिकारी व धर्म ऐश्वर्य यांची इच्छा करणारा राजा, यांनीं बलात्कारानें आपलें काम साधणाऱ्या चोरांना शिक्षा करण्यास एक क्षणहि उशीर लावूं नये. (वाग्दु०) दुष्ट वचन बोलणारा, चोरी करणारा, अपराधावांचून दण्ड देणारा, या सर्वांपेक्षां बलात्कार करणारा अतिशय दुष्ट होय.

**साहसे वर्त्तमानन्तु यो मर्षयति पार्थिवः । स विनाशं व्रजत्याशु विद्वेषं चाधिगच्छति ॥३४६॥**
**न मित्रकारणाद्राजा विपुलाद्वा धनागमात् । समुत्सृजेत्साहसिकान् सर्वभूतभयावहान् ॥३४७॥** मनु० अ. ८

बलात्कार करणाऱ्या पुरुषाला जो राजा दंड देत नाहीं त्याचा लौकरच नाश होतो व सर्व विद्वान् लोक त्याचा द्वेष करतात. (न मि०) मित्रत्वामुळें किंवा पुष्कळ धन मिळत आहे म्हणून कोणत्याहि राजानें सर्वांना त्रास देणाऱ्या व बलात्कार करणाऱ्या साहसी पुरुषांना दंड दिल्यावांचून कधींहि सोडूं नये.

**गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् । आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ॥३५०॥**
**नाततायिवधे दोषो हन्तुर्भवति कश्चन । प्रकाशं वाऽप्रकाशं वा मन्युस्तन्मन्युमृच्छति ॥३५१॥**
**यस्य स्तेनः पुरे नास्ति नान्यस्त्रीगो न दुष्टवाक् । न साहसिकदण्डघ्नौ स राजा शक्रलोकभाक् ॥३८६॥** मनु० अ० ८

गुरु, पुत्र, वृद्ध, ब्राह्मण किंवा बहुश्रुत कोणीहि असो, जर तो धर्म सोडून अधर्मानें जात असेल व दुसऱ्याला विनाकारण मारीत असेल तर आततायी माणसाला विचार केल्यावांचून ठार मारावा किंवा ठार मारल्यावर मग विचार करावा. (नातता०) दुष्ट पुरुषांना मारल्यानें मारणाराला पाप लागत नाहीं मग त्याचा वध प्रसिद्धपणें झालेला असो किंवा अप्रसिद्धपणें झालेला असो. क्रोधी माणसाला क्रोधी मनुष्यानें ठार मारणें हें क्रोधाची क्रोधाशींच लढाई झाल्यासारखें आहे. (यस्य०) ज्याच्या राज्यांत चोर, परस्त्रीगामी, दुष्टवचन बोलणारे, साहसी व राजाज्ञेचा भंग करणारे इत्यादि प्रकारचे लोक नसतात तो राजा अत्यंत श्रेष्ठ होय.

**भर्तारं लङ्घयेद्या तु स्त्री ज्ञातिगुणदर्पिता । तां श्वभिः खादयेद्राजा संस्थाने बहुसंस्थिते ।।३७१।।**
**पुमांसं दाहयेत्पापं शयने तप्तआयसे । अभ्यादध्युश्च काष्ठानि तत्र दह्येत पापकृत् ।।३७२।।** मनु. अ. ८

जी स्त्री आपल्या बापबान्धवांच्या जोरावर व अंगच्या गुणांच्या घमेंडीनें आपल्या पतीचा त्याग करील व व्यभिचार करील, तिला पुष्कळ स्त्रीपुरुषांच्या समोर, कुत्र्यांकडन खावबून ठार मारावी. (पुमां.) त्याचप्रमाणें जो पुरुष आपल्या स्त्रीला सोडून परस्त्रीगमन अथवा वेश्यागमन करतो, त्याला तापलेल्या लोखंडी पत्र्यावर निजवून, सर्व स्त्रीपुरुषांच्या देखत, त्याच्या देहाचें भस्म करावें, (प्रश्न) राजा, राणी किंवा न्यायाधीश जर व्यभिचारादि कुकर्मे करतील तर त्यांना दंड कोणी करावा ? (उत्तर) लोकनियुक्त सभेनें दंड करावा. सामान्य लोकांपेक्षां त्यांना अधिक दंड झाला पाहिजे. (प्रश्न) राजानें केलेला दण्ड त्यांनीं कां स्वीकारावा ? (उत्तर) राजा हा एक पुण्यात्मा व भाग्यशाली मनुष्य आहे. जर त्याला सभेनें दंड केला असतां त्यानें मान्य केला नाहीं, तर दुसरे मनुष्य तरी राजदंडाला कसे मान देतील ? शिवाय जेव्हां सर्व प्रजा, प्रधान व सभा राजाला धार्मिकपणें दंड करूं लागतील तेव्हां एकट्या राजाचें तरी काय चालेल ? जर अशारीतीनें अपराध्याला दंड दिला नाहीं तर राजा, प्रधान व सर्व राजपुरुष अन्यायांत बुडून, न्याय व धर्म यांचा नाश होतो, व आपणांसहीत सर्व प्रजेचा नाश करून घेतात. न्याययुक्त दंड हाच राजा आहे व तोच धर्म होय; जो त्याचा नाश करतो त्याच्यासारखा दुसरा नीच पुरुष कोण बरें असणार ? (प्रश्न) मनुष्य शरीर बनवूं शकत नाहीं व मृत शरीर जिवंतहि करूं शकत नाहीं, यासाठीं हे वर लिहिलेले कडक दंड करणें मनुष्याला योग्य नाहीं; हें खरें कीं नाहीं ? (उत्तर) जे याला कडक शिक्षा असें समजतात, त्यांना राजनीति मुळींच समजत नाहीं असें म्हणावें लागेल; कारण एका मनुष्याला असा कडक दंड दिला असतां दंडाच्या भीतीनें दुसरे लोक अधर्म करण्यास प्रवृत्त होत नाहींत व सर्व लोक धर्मयुक्त वर्तन करूं लागतात. सौम्य दंड केला तर दुष्ट मनुष्यांना त्याचें कांहींच वाटत नाहीं व ते आपलीं दुष्टकृत्यें नेहमींच चालू ठेवतात व यामुळें राज्यामध्यें दुराचारी पुरुष जास्ती वाढतात. अर्थात् एकाला जास्त दंड करणें हें अनेकाला थोडाथोडा दंड करण्यापेक्षां बरें आहे हें थोड्याशा विचाराअंतीं सर्वांस समजेल.

**दीर्घाध्वनि यथादेशं यथाकालं करो भवेत् । नदीतीरेषु तद्विद्यात्समुद्रे नास्ति लक्षणम् ।।४०६।।** मनु. अ. ८

लांब मार्गामध्यें ज्या मानानें खाड्या, नद्या व नाले असतील व ज्या मानानें देश मोठा असेल त्या मानानें नाकेबंदी करून कर बसवावा. मोठ्या समुद्रांत अशीं नाकीं बसविणें अशक्य आहे, पण त्या संबंधाची व्यवस्था राजा, प्रजा व मोठया नौका ठेवून व्यापार करणारे लोक या सर्वांना सोईची होईल अशी करावी. देशदेशांतरी व द्वीपद्वीपांतरीं नौकांतून जाणाऱ्या आपल्या प्रजेचें सर्व ठिकाणीं उत्तम प्रकारें रक्षण होईल व त्यांना कोठें कोणाकडूनहि दुःख न पोंचेल अशी व्यवस्था करावी. आपल्या देशांत पूर्वी जहाजें नव्हतीं व आपले पूर्वज परदेशगमन करीत नव्हते असें कित्येक लोक समजतात, पण हें खोटें आहे.

**अहन्यहन्यवेक्षेत कर्मान्तान्वाहनानि च । आयव्ययौ तावा च नियतावाकरान्कोषमेव च ।४१९।।**
**एवं सर्वानिमान् राजा व्यवहारान् समापयन् । व्यपोह्य किल्बिषं सर्वं प्राप्नोति परमाङ्गतिम् ।।४२०।।** मनु० अ. ८

राजानें प्रत्येक दिवशीं आपलीं आरंभलेलीं कामें कशीं समाप्त होत आहेत तें पहावें, त्याचप्रमाणें वाहनें, हत्ती, घोड़े, नियत आयव्यय, [ आकर ] रत्नादिकांच्या खाणी, कोश, खजिने, यांची तपासणी करावी. ।एवं।) जो राजा याप्रमाणें सर्व व्यवहार करतो त्याची सर्व पापें नाहींशीं होऊन त्याला परमगति अर्थात् मोक्षसुखाची प्राप्ति होते.

(प्र.) संस्कृतविद्येंत संपूर्ण राजनीति आहे कीं नाहीं ? (उ.) होय. अगदीं पुरी आहे, कारण या सर्व भूमंडलावर जी आज राजनीति चालत आहे व पुढें चालेल ती सर्व संस्कृत ग्रंथांतूनच घेतलेली आहे. तसेंच जे नियम केलेले नाहींत ते नियम राजा व प्रजा यांचें सुख वाढविण्यासाठीं विद्वान् लोक व राजसभा यांनीं करावेत, असें **'प्रत्यहं लोक-दृष्टैश्च शास्त्रदृष्टैश्च हेतुभिः । मनु. ८।३॥'** इत्यादि स्मृतिवचनांत सांगितलें आहे. या सर्वांचा विचार केला असतां आपल्या संस्कृत ग्रंथांत पूर्ण राजनीति आहे असें ठरतें. नित्य ध्यानांत ठेवण्याच्या गोष्टीः—बाल्यावस्थेंमध्यें विवाह न करणें व न करविणें, तारुण्यामध्येंहि नवरानवरीच्या प्रसन्नतेशिवाय विवाह न करणें. पूर्ववयांत ब्रह्मचर्याचें पूर्णपणें पालन करणें, व्यभिचार न करणें व पुष्कळ विवाहहि न करणें इत्यादि नियम पाळून आत्मा व शरीर यांचें बल वाढवावें. शरीर अशक्त राहून विद्या येत असली तरीहि त्यापासून कांहीं लाभ होणें शक्य नाहीं. करितां शरीर व आत्मा यांचें बल सारख्या प्रमाणांत वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एक बलवान् पुरुष शेंकडों ज्ञानी व विद्वान् लोकांना क्षणांत जिंकू शकतो. विद्येकडे दुर्लक्ष करून केवळ शरीराचें बलच जर वाढविलें तरीहि अशा सशक्तांकडून राज्यपालन दिक कांहींएक होऊं शकणार नाहीं. म्हणून राज्यव्यवस्था नीट रहावी व लोकांचें संरक्षण उत्तम तऱ्हेनें होऊन सर्व सुखी व्हावेत म्हणून शरीर व बुद्धि यांना उत्तम शिक्षण मिळून त्यांची जोरदार वाढ होण्याची व्यवस्था केली पाहिजे. व्यभिचार व विषयासक्ति वगैरे बलबुद्धिविनाशक व्यवहार कोणीहि करूं नयेत. विशेषकरून क्षत्रिय लोक अंगानें दृढ व बुद्धीनें तरतरीत असले पाहिजेत. जर क्षत्रिय लोक विषयलोलुप होतील तर राज्याची व्यवस्था बिघडून चोहोंकडे अंदाधुंदी होईल, **'यथा राजा तथा प्रजा ।'** जसा राजा असतो त्याचप्रमाणें प्रजाहि होते, म्हणून राजा व राजपुरुष यांनीं केव्हांहि कुकर्म करूं नये व सदैव न्याययुक्त, धर्मयुक्त वर्तन करावें व सर्वांना अनुकरणीय व्हावें.

हें येथें संक्षेपानें राजनीतीचें वर्णन केलें आहे. यासंबंधानें विशेष विस्तार पाहणें असल्यास वेद, मनुस्मृतीचे सात, आठ व नऊ हे अध्याय, शुक्रनीति, विदुरप्रजागर, महाभारतांतील शांतिपर्वांतर्गत राजधर्म व आपद्धर्म वगैरे पुस्तकें पाहून पूर्ण राजनीति जाणावी व तिचा अवलंब करून मांडलिकांनीं व सार्वभौम राजांनीं आपआपलीं कामें योग्य रीतीनें करावीत. सर्वांनीं **'वयं प्रजापतेः प्रजा अभूम । यजु० ॥'** आम्ही परमेश्वराची प्रजा व परमेश्वर आमचा राजा आहे हें लक्षांत ठेवावें. त्या परमेश्वराच्या राज्यांतील विशिष्ट कर्तव्य करण्यासाठीं आमची नेमणूक झाली आहे असें समजून आपआपलीं कर्तव्यें उत्तम रीतीनें पार पाडावींत व 'परमेश्वरानें दयाळु होऊन आपल्या सृष्टीमध्यें आम्हांला राज्याधिकारावर नियुक्त करावें व आमच्या द्वारें सत्य व न्याय यांची वृद्धि करवावी,' अशी नेहमीं इच्छा करावी. याप्रमाणें साररूपानें राजनीतिविषय येथें समाप्त झाला. पुढील प्रकरणीं ईश्वर व वेद या विषयीं लिहिलें जाईल.

**इति सुभाषाविभूषितराजधर्मविषयः षष्ठसमुल्लासः संपूर्णः ।**

# अथ सप्तमसमुल्लासः

**अथेश्वरवेदविषयं व्याख्यास्याम ॥**

**देवता व परमेश्वर.**

**ऋचो अक्षरे परमे व्योमन् यस्मिन् देवा अधि विश्वे निषेदुः ।**
**यस्तन्न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुस्त इमे समासते ॥** ऋ. १।१६४।३९

जो सर्व दिव्य गुणकर्मस्वभाव व विद्या यांनीं युक्त आहे; ज्याच्या आश्रयानें पृथ्वी व सूर्यादि लोक राहिले आहेत; जो आकाशाप्रमाणें सर्वत्र व्याप्त आहे व जो देवांचाहि देव आहे, त्या परमेश्वराला जे लोक जाणत नाहींत, मानीत नाहींत व त्याचें ध्यानहि करीत नाहींत, ते नास्तिक व मंदमति लोक सर्वदा दुःखसागरामध्यें बुडतात व जे त्याला जाणतात तेच सुखी होतात. [**प्रश्न**] वेदांमध्यें अनेक ईश्वरांची उपासना सांगतली आहे कीं एका ईश्वराची? [**उत्तर**] चारहि वेदामध्यें अनेक ईश्वर सिद्ध होतील असा कांहीं आधार सांपडत नाहीं, इतकेंच नव्हें तर ईश्वर एक आहे असेंच चोहोंकडे लिहिलेलें आहे. [**प्रश्न**] मग वेदांमध्यें अनेक देवता सांगितल्या आहेत त्यांचा काय अभिप्राय आहे? [**उत्तर**] ज्यांमध्यें दिव्यगुण असतात त्यांना **देवता** असें म्हणतात. पृथ्वीमध्यें दिव्यगुण आहेत म्हणून ती देवता आहे खरी, पण तिलाच ईश्वर किंवा उपास्य म्हणून कोठेंहि वेदांमध्यें सांगितलें नाहीं. पहा '**ऋचो अक्षरे०**' या वरच्या मंत्रांत ज्यामध्यें [पृथिव्यादि] देवता राहतात तो जाणण्याला व उपासनेला आहे' असें सांगितलें आहे. यावरून देव व परमेश्वर यांतील भेद स्पष्ट होतो. देव किंवा देवता या शब्दांनीं जे परमेश्वराचें ग्रहण करतात, ती त्यांची चुकी आहे. त्याचप्रमाणें परमेश्वर शब्दानें देवतांचें ग्रहण करणें ही सुद्धां चुकीच आहे. परमेश्वर हा देवांचाहि देव आहे. म्हणूनच त्याला '**महादेव**' असें म्हणतात. तो सर्व जगाची उत्पत्ति, स्थिति व लय करतो व तोच न्यायकर्त्ता व सर्वांचा आधार आहे. '**त्रयस्त्रिंशत् त्रिशता०**' इत्यादि वेदमंत्रांमध्यें व त्यांच्या शतपथादि ब्राह्मणांतील व्याख्यांमध्यें तेहतीस देव आहेत असें सांगितलें आहे. पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आकाश, चन्द्र, सूर्य, नक्षत्रें, हे आठ वसु; प्राण, अपान, व्यान, उदान, समान, नाग, कूर्म कृकल, देवदत्त, धनंजय व जीवात्मा हे अकरा रुद्र; + संवत्सराचे बारा महिने हे बारा आदित्य + इन्द्र म्हणजे विद्युत् व + यज्ञ अर्थात् प्रजापति हे तेहतीस देव आहेत. [सृष्टि ज्यांच्या आधारानें राहते त्यांना '**वसु**' म्हणतात; जे शरीरांतून निघाले असतां रडवितात. त्यांना '**रुद्र**' म्हणतात; जे आयुष्याला घेऊन जातात व कमी करतात त्यांना '**आदित्य**' म्हणतात; इन्द्र म्हणजे परम ऐश्वर्यानें युक्त जो असतो तो; व यज्ञाला प्रजापति असें म्हणतात. कारण हवनाच्या योगानें वायु, वृष्टि, जल व औषधि यांची शुद्धि होते; विद्वानांचा सत्कार व शिल्पविद्या यांचाहि समावेश यज्ञामध्येंच होत असल्यामुळें प्रजांचें पालन यज्ञापासून होतें, म्हणूनच यज्ञाला **प्रजापति** असें म्हणतात]: या तेहेतीस देवांचा स्वामी व सर्वांहून महान् असा जो चोतीसावा परमात्मा आहे, तोच उपास्य आहे असें शतपथाच्या चौदाव्या कांडामध्यें स्पष्ट सांगितलें आहे, याचप्रमाणें अन्यत्रहि सांगितलें आहे. जर लोकांनीं हीं सर्व प्रमाणें पाहिलीं असतीं तर ते अनेक उपास्यांच्या भ्रमजालामध्यें सांपडून भेदधिक्य करण्यास कारणीभूत झालेच नसते.

**ईशा वास्यमिदँ सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् । तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम् ॥**

यजु. अ. ४०।१

'हे मनुष्य हो! जें कांहीं या [जगत्याम्] संसारामध्यें जगत् आहे, त्या सर्वांमध्यें [वास्यम्] व्याप्त होऊन जो त्या सर्वांचें नियमन करतो त्याला ईश्वर असें म्हणतात. त्याला भिवून तूं [कस्य] कोणाच्याहि [धनम्] धनाची अन्यायानें अभिलाषा धरूं नकोस. कोणाच्याहि धनाचा अपहार करूं नकोस. अन्यायाचरणाचा त्याग कर व न्यायरूप धर्माचरणाच्या योगानें आल्या आत्म्यानें आनंदाचा उपभोग कर. या मंत्रांत ईश्वराचें सर्वव्यापित्व दाखविलें आहे.

**अहं भुवं वसुनः पूर्व्यस्पतिरहं धनानि संजयामि शश्वतः ।।**
**मां हवन्ते पितरं न जन्तवोऽहं दाशुषे विभजामि भोजनम् ।।१।।**
**अहमिन्द्रो न पराजिग्य इद्धनं न मृत्यवेऽवतस्थे कदाचन ।।**
**सोममिन्मा सुन्वन्तो याचता वसु न मे पूरवः सख्ये रिषाथन ।।** ऋ. मं० १० सू० ४८ मंत्र १।५

ईश्वर सर्वांना उपदेश करतो कीं, "हे लोकहो ! (अहम्) मी (वसुनः) सर्व जगाच्या (पूर्व्यः) पूर्वी (भुवम्) विद्यमान होतों व या सर्व जगाचा मी (पतिः) पालक आहे. (धनानि) मी सर्व प्रकारचें धन भक्तांला देणारा व (शश्वतः) अनादिकालापासून (संजयामि) मी विजयी असा आहे, मी सनातन जगत्कारण आणि धनांचा विजय करणारा दाता आहे (माम्) मलाच (जन्तवः) सर्व जीवांनीं (पितरं हवन्ते) पित्याप्रमाणें हांक मारावी· (दाशुषे) मी दानशील आहे म्हणून मी सर्वांस सुख देणाऱ्या जगतासाठीं ( भोजनम् ) भोग्य पदार्थांचा ( विभजमि ) विभाग करतों व सर्वांचें पालन करतों. (अहं इंद्रः) मी परमैश्वर्यवान् सूर्याप्रमाणें सर्व जगाला प्रकाश देणारा आहे. ( न पराजिग्ये ) माझा कधींहि पराजय होत नाहीं. (न मृत्यवे ) मी कधीं मृत्युला प्राप्त होत नाहीं. ( इत् धनम् ) मी जगत् रूपीं धनाचा निर्माणकर्ता आहे. मी सर्व जगाची उत्पत्ति करणारा आहे असें समजा. हे जीव हो ! ( सोमम् ) ऐश्वर्यप्राप्तीसाठीं ( सुन्वन्तः ) यत्न करून तुम्ही माझ्याकडे ( वसु याचता ) विज्ञानादि धनाची याचना करा. ( मे सख्ये रिषाथन ) माझ्या मैत्रीपासून तुम्ही दूर होऊं नका. मी सत्यभाषण व स्तुति करणाऱ्या लोकांना सनातन वेदरूपीं ज्ञानधन देतों. मी वेदांचा प्रकाश करणारा आहे व तेच वेद मला यथायोग्य दाखवून देतात त्या वेदानेंच सर्वांच्या ज्ञानाला मी वाढवितों. मी सत्पुरुषांचा प्रेरक, यज्ञ करणाऱ्यांला फल देणारा, विश्वसंबंधी सर्व कार्य करणारा व विश्वाला आधार देणारा आहे. म्हणून हे लोक हो ! तुम्ही उपासनेकरितां माझ्या ठिकाणीं कोणा दुसऱ्याची स्थापना* करून पूजा करूं नका, दुसऱ्याला मानूं नका व जाणूंहि नका,' याप्रमाणें वागण्यानेंच सर्वांचें कल्याण होईल.

**हिरण्यगर्भः समवर्त्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ।**
**स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ।।** यजु. अ. १३।४

हे मनुष्य हो ! [भूतस्य] जो या सृष्टीच्या [ अग्रे ] पूर्वी होता व जो [ हिरण्य-गर्भः ] सूर्यादि तेजोमय गोलांचें उत्पत्तिस्थान आहे तसेंच [ पतिः ] जें सर्व कांहीं आहे त्या सर्वांचा आधार व पालनकर्ता आहे-पूर्वी होता व पुढेंहि असेल [ सः दाधार ] त्यानें पृथ्वीपासून सूर्यापर्यंत सर्व सृष्टि उत्पन्न करून धारण केली आहे. [कस्मै.] आशा त्या सुखमय परमेश्वराची जशी आम्ही उपासक लोक उपासना करितों तशी तुम्हीहि करा.' या मंत्रावरून ईश्वराचें अस्तित्व व अनादित्व सिद्ध होतें.

**ईश्वराचें अस्तित्व**--(प्रश्न) तुम्ही ईश्वर आहे असें म्हणातां, पण त्याचें अस्तित्व सिद्ध कसें करणार ? (उत्तर) प्रत्यक्षादि प्रमाणांनीं आम्ही ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करतों. (प्रश्न) हें अशक्य आहे. ईश्वरामध्यें प्रत्यक्ष प्रमाण कसें लागूं पडेल ? (उ.) पहाः--**इंद्रियार्थसन्निकर्षोत्पन्नं ज्ञानमव्यपदेश्यमव्यभिचारिव्यवसायात्मकं प्रत्यक्षम्** ।।न्या. १।४

* **'न प्रतीके न हि सः '** ब्रह्मसू. अ. ४ पाद १।४ प्रतीकामध्यें ब्रह्मोपासना करणें ठीक नाहीं कारण प्रतीक ब्रह्म नाहीं. ' ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात् ' ब्रह्मध्यानच सर्व श्रेष्ठ ध्यान आहे. याकरितां प्रतीकामध्यें ब्रह्मदृष्टि न करतां ब्रह्मामध्येंच केली पाहिजे व तें ध्यान निर्विषय मन होईल तेव्हांच लाभणारें आहे. कोणतेंहि प्रतीक घेतलें तरी त्याचा विषयान्तर्गत समावेश होणारा आहेच म्हणून स्वामी रामानुज भाष्यामध्यें म्हणतात की ' प्रतीकोपासनं हि नाम अब्रह्मणि ब्रह्मदृष्ट्यानुसन्धानम् ' श्रीभाष्ये । ब्रह्माहून भिन्न वस्तूमध्यें ब्रह्मदृष्टि करणें याला प्रतीकोपासना म्हणतात; परंतु उपासना अधिकारांत ब्रह्माहून भिन्नांत ब्रह्मदृष्टि करता येत नाहीं असा उपदेश आहे. म्हणून प्रतीक म्हणजे परिच्छिन्न पदार्थांमध्यें ब्रह्मदृष्टि करण्याचा शास्त्रांत निषेध आहे असें समजावें.

ही प्रत्यक्षाची व्याख्या महर्षि गौतमांनीं केलेली आहे. श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण व मन यांचा अनुक्रमें शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, सुखदुःख—सत्यासत्य इत्यादि विषयांशीं संबंध होऊन जें ज्ञान उत्पन्न होतें, तें प्रत्यक्ष ज्ञान होय, पण तें निर्भ्रांत (भ्रमरहित) असें असलें पाहिजे. यावरून आपल्या लक्षांत येईल कीं, इंद्रियें व मन यांना गुणांचें प्रत्यक्ष होतें, पण गुणीचें प्रत्यक्ष होत नाहीं. जसें त्वचा वगैरे चारहि इंद्रियांनीं स्पर्श, रूप, रस, व गंध या चारहि गुणांचें प्रत्यक्ष झाल्यावर त्यांच्या सहाय्यानें गुणी–पृथ्वीचें (आत्म्याचा मनाशीं संयोग होऊन) प्रत्यक्ष होतें; याचप्रमाणें या प्रत्यक्ष सृष्टीमधील रचनाविशेषादि गुणांचें प्रत्यक्ष ज्ञान झाल्यानेंच परमेश्वराचेंहि प्रत्यक्ष होतें. तसेंच जेव्हां आत्मा मनाशीं व मन इंद्रियांशीं संयोग पावून चौर्यकर्मादिक वाईट कृत्यें परोपकारादिक उत्तम कृत्यें करण्यास ज्याक्षणीं प्रारंभ करतो, त्याक्षणींच जीवाच्या इच्छा, ज्ञान वगैरे वृत्ति त्या त्या बऱ्या वाईट विषयांकडे झुकतात व त्याबरोबरच करावयाचें काम वाईट असेल तर भय, लज्जा व शंका उत्पन्न होते व काम चांगलें असल्यास निर्भयता, निःशंकपणा आनंद व उत्साह उत्पन्न होतो. या लहरी जीवात्म्याकडून निघत नसून परमात्म्याकडून निघतात. शिवाय जेव्हां जीवात्मा अंतर्बाह्य शुद्ध होऊन परमात्मविचारामध्यें निमग्न होतो तेव्हां त्याला परमात्मा व संसार हीं दोन्हीं प्रत्यक्ष होतात; तात्पर्य युक्ति व अनुभव यांनीं जर परमेश्वर प्रत्यक्ष होतो तर मग अनुमानादि अन्य प्रमाणांनीं परमेश्वराचें ज्ञान झालेंच पाहिजे, यांत संदेह उत्पन्न होण्याचें कांहींच कारण नाहीं; कारण कार्य पाहून कारणाचें अनुमान करतां येतें. (प्र०) परमेश्वर आहे कोठें ? (उ०) परमेश्वर सर्वव्यापक असल्यामुळें तो सर्वत्र आहे. जर तो एक देशी असता तर तो सर्वान्तर्यामी, सर्वद्रष्टा, सर्वज्ञ, सर्वनियन्ता, सर्वस्रष्टा; सर्वाधार व सर्वांचा प्रलय करणारा होऊं शकला नसता. कारण तो जर सर्वत्र नाहीं व कोणत्या तरी विशेष स्थानीं आहे, तर त्या स्थानाशिवाय इतर जी जागा बाकी राहील; त्या ठिकाणांतील कार्यें त्याकडून होणार नाहींत. ईश्वर तर सर्व ठिकाणचीं कामें करीत आहे. म्हणून तो सर्व ठिकाणीं आहे. (प्रश्न) परमेश्वर दयाळू असून न्यायकारीहि आहे काय ? (उत्तर) होय. (प्रश्न) हे दोन गुण परस्परविरुद्ध आहेत व ते एकत्र कसे संभवतील ? जो न्याय करतो तो दयेचा अवलंब कसा करील व जो दयाळू आहे त्याच्याकडुन बरोबर न्याय तरी कसा होईल ? केलेल्या बऱ्यावाईट कृत्यानुरूप बरोबर तंतोतंत सुखदुःख देणें याला न्याय असें म्हणतात; अपराध्याला सोडणें, थोडा दंड करणें इत्यादि प्रकाराला दया म्हणतात. हे दोन गुण एकत्र कसे राहतील ? (उत्तर) वास्तविक न्याय व दया यांमध्यें नाममात्राशिवाय कांहीं भेद नाहीं. कारण जो परिणाम न्यायानें होतो तोच दयेनें दंड दिल्यानें होतो. ज्याच्या योगानें मनुष्यें अपराध करणार नाहींत व दुःखी होणार नाहींत अशा करण्याला दया असें म्हणतात. दया व न्याय या शब्दांचा आपण जो अर्थ केलात तो बरोबर नाहीं, कारण तशा दयेपासून पुढें त्याचें नुकसानच होतें. त्यानें जितकें जसें वाईट काम केलें असेल त्याला बरोबर तितकाच दंड देणें हाच खरा न्याय व हीच खरी दया आहे. अपराध्याला सोडून देणें ही दया नसून निर्दयपणाच आहे. कारण एका दुष्ट पुरुषाला दंड न देतां सोडण्यापासून हजारों सत्पुरुषांना त्रास होतो. एकाला शिक्षा न देतां हजारों माणसांना अप्रत्यक्ष दुःख देणें, ही दया कसली ? दुष्टांना शासन करणें, कारागृहवासांत ठेवून त्यांच्याकडून पुढें होणाऱ्या पापापासून त्यांना बचावणें व त्या दुष्टांच्या त्रासांतून इतर पुरुषांना सोडविणें हीच खरी दया आहे. अपराध्याला सोडणें ही दया नव्हे. (प्रश्न) मग दया व न्याय हे दोन शब्द तरी कशाला पाहिजेत ? जर दोनहि शब्दांचें तात्पर्य एकच असतें तर दोन शब्दांची उत्पत्तिच झाली नसती. यावरून या दोन शब्दांत भेद आहे हें उघड होतें. (उत्तर) एकाच अर्थाचे अनेक शब्द व अनेक अर्थांचा एकच शब्द भाषेमध्यें पुष्कळ असतात. (प्रश्न) असेनात ? पण सर्व लोक दया व न्याय यांत भेद मानतात ना ? (उत्तर) या संसारांत मनुष्यें सत्यासत्याचा गोंधळ करतात, पण विचारानेंच त्यांतील भेद पाहिला पाहिजे. प्रथम ईश्वराची मोठी दया म्हणजे त्यानें सर्व जिवांचें मनोरथ सिद्ध होण्यासाठीं या जगामध्यें सर्व पदार्थ उत्पन्न करून ते मनुष्यांला दान दिले आहेत; यापेक्षां आणखी दुसरी दया कोणती असणार बरें ? परमेश्वराचा न्याय तर प्रत्यक्ष दिसतच आहे, सुखदुःखाचा कमी अधिकपणा यांच्यावरून त्याचें न्यायकारित्व उत्तम व्यक्त होतें. दया ही आंतील वृत्ति आहे व न्याय ही बाह्यवृत्ति

आहे. मनांमध्यें सर्वांला सुख व्हावें व दुःख नाहींसें व्हावें अशी इच्छा करणें दया होय व ती सफल होण्यासाठीं अपराधानुकूल दंड देणें हा न्याय होय. मनुष्यमात्रांला पापापासून दूर करणें हेंच या दोहोंचेंहि प्रयोजन आहे. **(प्रश्न)** ईश्वर साकार आहे कीं निराकार आहे ? **(उत्तर)** ईश्वर निराकार आहे. कारण जो साकार असतो तो सर्वत्र व्यापक असूं शकत नाहीं व जो सर्वव्यापक नसेल तो सर्वज्ञत्वादि गुणांनीं युक्त असूं शकणार नाहीं. साकार वस्तु परिमित असते म्हणून तीमधील गुणहि परिमितच असूं शकतात. त्याप्रमाणें तो देहधारी असेल तर शीतोष्ण, क्षुधातृषा रोग, दोष, छेदनभेदन इत्यादि शरीराचे दोष त्यामध्यें राहणार; अर्थात् ईश्वर निराकारच असला पाहिजे. शिवाय जो देहधारी असतो, त्याचा तो देह उत्पन्न होण्यास दुसऱ्यांचें साहाय्य लागतें, याचप्रमाणें साकार ईश्वराच्या उत्पत्तीला, त्याचें कान, नाक, डोळे करण्यासाठीं दुसऱ्या कोणाची तरी आवश्यकता ही आहेच. जो पदार्थ संयोगापासून उत्पन्न होतो, त्या दोन पदार्थांला संयुक्त करणारा निराकार चेतन निराळा अवश्य असला पाहिजे. परमेश्वरानें स्वकीय इच्छाशक्तीनें आपलें शरीर बनविलें, असें जर कोणी येथें म्हणेल तर तें शरीर बनविण्यापूर्वीं तो निराकार होता हें सिद्ध होतेंच. वरील सर्व विवेचनाचें तात्पर्य म्हणजे परमेश्वर निराकार आहे व म्हणूनच तो जगाच्या सूक्ष्म कारणांमध्यें व्यापून, त्या सूक्ष्मापासून स्थूल जग बनवूं शकतो. **(प्रश्न) ईश्वर सर्वशक्तिमान् आहे कीं नाहीं ? (उत्तर)** आहे, पण सर्वशक्तिमान् शब्दाचा जसा तुम्ही अर्थ समजतां तसा तो नाहीं. परमेश्वर सर्वशक्तिमान् आहे याचा अर्थ एवढाच कीं, तो जगाची उत्पत्ति, स्थिति, लय व जीवांना यथोचित पुण्यपापानुकूल सुखदुःख देण्यांची व्यवस्था इत्यादि आपल्या कामामध्यें थोडेंसुद्धां कोणाचें साहाय्य घेत नाहीं. अर्थात् हीं कृत्यें आपल्या अनंत सामर्थ्यानें तो पूर्ण करतो. **(प्रश्न)** आम्ही तर सर्वशक्तिमान् शब्दाचा असा अर्थ समजतों कीं, तो काय पाहिजे तें करूं शकतो, कारण त्याला विचारणारा त्याच्यावर कोणीच नाहीं. **(उत्तर)** परमेश्वर सर्व कांहीं करूं शकतो असें जें तुम्हीं म्हणतां त्याचा अर्थ तरी काय ? तो आपला स्वतःचा नाश, अनेक ईश्वरांची उत्पत्ति, चोरी व्यभिचारादि पापाचरणें, अविद्वत्तेचा स्वीकार व स्वतः दुःखी होणें इत्यादि गोष्टी तो करूं शकतो कीं काय ? वास्तविक या गोष्टी परमेश्वराच्या गुणकर्मस्वभावाच्या विरुद्ध आहेत, अर्थात् परमेश्वरामध्यें या संभवत नाहींत. यावरून परमेश्वर सर्व कांहीं करूं शकतो, असा सर्वशक्तिमान् शब्दाचा अर्थ नसून त्याचें कृत्य करण्यास त्याला दुसऱ्या कोणाची मदत लागत नाहीं असा आहे हें स्पष्ट होतें. **(प्रश्न)** परमेश्वर सादि (उत्पन्न झालेला) आहे कीं अनादि आहे ? **(उत्तर)** परमेश्वर अनादि आहे. ज्याची उत्पत्ति कोणत्याहि कारणापासून किंवा कोणत्याहि समयीं झालेली नसते, त्याला अनादि असें म्हणतात. हे सर्व अर्थ पूर्वीं प्रथम समुल्लासामध्यें दिलेलेच आहेत. ते तेथें पहावेत. **(प्रश्न)** परमेश्वर काय इच्छितो ? **(उत्तर)** सर्वांचें कल्याण व्हावें, सर्व लोक स्वतंत्र, सुखी, आनंदी असावेत अशी त्याची इच्छा आहे. तो कोणालाहि अपराधावांचून पराधीन करीत नाहीं. **(प्रश्न)** परमेश्वराची स्तुति, प्रार्थना व उपासना केली पाहिजे कीं नाहीं ? **(उत्तर)** सर्वांनीं अवश्य केली पाहिजे. **(प्रश्न)** ईश्वराची जो स्तुति करील, त्याच्या त्या स्तुतीला भुलून तो स्तुति करणारीचें पाप नाहींसें करील काय ? **(उत्तर)** नाहीं. **(प्रश्न)** मग स्तुति-प्रार्थना करण्यापासून लाभ काय ? **(उत्तर)** स्तुतिप्रार्थनेचें फल निराळेंच आहे. **(प्रश्न)** तें कोणतें ? **(उत्तर)** स्तुतीच्या योगानें परमेश्वरावर आपली प्रीति बसते, त्याच्या गुणकर्मस्वभावांच्या योगानें आपले गुणकर्मस्वभाव सुधारतां येतात. प्रार्थनेच्या योगानें निरभिमानता उत्पन्न होऊन उत्साह वाढतो व साहाय्य मिळतें, उपासनेच्या योगानें ब्रह्माशीं एकतानता होऊन त्याचा साक्षात्कार होतो. अशीं फळें आहेत. **(प्रश्न)** यांचें जरा जास्त स्पष्टीकरण करा बरें. **(उत्तर)** ठीक आहे. ईश्वराची स्तुति पहा:—

**स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरँ शुद्धमपापविद्धम् ॥**
**कविर्मनीषी परिभूः स्वयम्भूर्याथातथ्यतोऽर्थान् व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥** यजु. ४०।८

[सः] तो ईश्वर [पर्यगात्] सर्वत्र व्यापक व अनंत बलवान् आहे. तो [शुक्रम्] शुद्ध, [कविः] सर्वज्ञ, [मनीषी] सर्वांतर्यामी, मननशील, [ परिभूः ] सर्वांवर विराजमान्, [ स्वयंभू ] सनातन, स्वयंसिद्ध, असा परमेश्वर [ शाश्वतीभ्यः समाभ्यः ] अनादि कालापासून आपल्या अनादि सनातन जीवरूपी प्रजेला वेदद्वारा [ अर्थान् व्यदधात् ]

संपूर्ण अर्थाचा बोध यथावत् करीत आहे. ही सगुण स्तुति झाली. ज्यामध्यें परमेश्वराच्या गेणांचें वर्णन असतें तिला सगुण स्तुति म्हणतात. तसेंच (अकायम्) तो परमेश्वर कधींहि शरीर धारण करीत नाहीं अर्थात् तो अजन्मा आहे, (अव्रणम्) त्याच्यामध्यें व्रण किंवा छिद्र नाहीं, (अस्नाविरम्) तो नाडीशिरस्नायूंच्या बंधनांत पडत नाहीं, (आपापविद्धम्) तो कधींहि पापाचरण करीत नाहीं, ज्याला क्लेश, दुःख, अज्ञान हीं केव्हांहि होत नाहींत, रागद्वेषादि विकारांहून तो पृथक् आहे; अशातऱ्हेनें जे विकार ईश्वरामध्यें नाहींत ते नाहींत, असें म्हणणें ही निर्गुण स्तुति समजावी. परमेश्वराचे जसे गुणकर्मस्वभाव आहेत, तसेच आपले व्हावे अशी इच्छा बाळगणें हें स्तुतीचें फल आहे. परमेश्वर न्यायकर्ता आहे तसें आपणहि व्हावें असें वाटून त्याप्रमाणें आचरण करणें हें सर्वथैव लाभप्रद आहे; असें न करतां तोंडावाटे भराभर परमेश्वरस्तुतीचे श्लोक म्हणणें व आपलें आचरण सुधारण्याची खटपट न करणें, अशा स्तुतिपाठापासून कांहीं लाभ नाहीं. प्रार्थना—

**यां मेधां देवगणाः पितरश्चोपासते । तया मामद्य मेधयाऽग्ने मेधाविनं कुरु स्वाहा ।।** यजु. ३२।१४

हे (अग्ने) प्रकाशस्वरूप परमेश्वर ! (देवगणाः पितरः) विद्वान्, ज्ञानी व योगी (याम्) ज्या (मेधाम्) बुद्धीची (उपासते) उपासना करतात (तया) त्या (मेधया) बुद्धीच्या योगानें (माम) मला (अद्य) याच जन्मामध्यें (मेधाविनम्) बुद्धिमान् (कुरु) कर. (स्वाहा) त्या बुद्धीनें मी तुला जाणूं शकेन.

**तेजोऽसि तेजो मयि धेहि । वीर्यमसि वीर्यं मयि धेहि । बलमसि बलं मयि धेहि ।**
**ओजोऽस्योजो मयि धेहि । मन्युरसि मन्युं मयि धेहि । सहोऽसि सहो मयि धेहि ।।** यजु. १९।९

हे परमेश्वरा ! तूं प्रकाशस्वरूप आहेस, कृपा करून माझ्यामध्येंहि प्रकाश उत्पन्न कर. तूं अनंतपराक्रमयुक्त आहेस, कृपा करून माझ्यामध्येंहि पराक्रम करण्याचें सामर्थ्य उत्पन्न कर. तूं अनंतबलयुक्त आहेस, माझ्यामध्येंहि बल स्थापन कर. तूं अनंतबुद्धिसामर्थ्यानें युक्त आहेस, माझ्यामध्येंहि तें सामर्थ्य उत्पन्न कर. तूं दुष्टांवर क्रोध करणारा आहेस तसा मलाहि कर. तूं निंदास्तुति यांना सहन करणारा आहेस, करितां मलाहि तसाच कर.

**यज्जाग्रतो दूरमुदैति दैवं तदु सुप्तस्य तथैवैति ।**
**दूरङ्गमं ज्योतिषां ज्योतिरेकन्तन्मे मनः शिवसङ्कल्पमस्तु ।।** यजु. ३४।१

हे परमेश्वरा ! तुझ्या कृपेनें माझें मन जागेपणीं दूर दूर जातें, सदोदित (दैवम्) दिव्यगुणांनीं युक्त असतें. (सुप्तस्य मी निजलों असतां तें सुषुप्तीला प्राप्त होतें, स्वप्नामध्यें तें जणूं काय दूर दूर जाऊन काम करतें, तें सर्व प्रकाशकांचेंहि प्रकाशक आहे, असें तें माझें मन शुभसंकल्पयुक्त होवो. अर्थात् दुसऱ्यांचें हित करण्यांत तत्पर व केव्हांहि कोणाची इच्छेनेंहि हानी न करणारें असें असो.

**येन कर्माण्यपसो मनीषिणो यज्ञे कृण्वन्ति विदथेषु धीराः ।।**
**यदपूर्वं यक्षमन्तः प्रजानां तन्मे मनः शिवसङ्कल्पमस्तु ।।** यजु. ३४।२

हे सर्वांतर्यामि परमात्मन् ! ज्याच्या साहाय्यानें कर्मे करणारे (मनीषिणः) धैर्ययुक्त विद्वान् लोक (यज्ञे) यज्ञ व (विदथेषु कृण्वन्ति) युद्धादि कृत्यें करतात, व जें (अपूर्वम्) अपूर्व, अतर्क्य, (यक्षम्) पूजनीय व (प्रजानां अन्तः) सर्व प्रजांच्या आंत असणारें असें जें माझें मन तें शुभ संकल्पानें युक्त होवो; अर्थात् तें नेहमीं धर्म करण्याची इच्छा करून अधर्माला सोडून देवो.

**यत्प्रज्ञानमुत चेतो धृतिश्च यज्ज्योतिरन्तरमृतं प्रजासु ।।**
**यस्मान्न ऋते किञ्चन कर्म क्रियते तन्मे मनः शिवसङ्कल्पमस्तु ।।** यजु. ३४।३

जें उत्कृष्ट ज्ञान, चित्तवृत्ति, धृति व सर्व प्रजांच्या अंतर्यामी असणारी अविनाशी प्रकाशवृत्ति यांनीं युक्त आहे, ज्याच्यावांचून कोणी कोणतेंहि काम करूं शकत नाहीं, तें माझें मन शुद्ध गुणांनीं युक्त होवो व दुष्ट गुणांपासून दूर राहो.

**येनेदं भूतं भुवनं भविष्यत् परिगृहीतममृतेन सर्वम् ।।**
**येन यज्ञस्तायते सप्त–होता तन्मे मनः शिवसङ्कल्पमस्तु** ।। यजु. ३४।४

हे परमेश्वरा ! ज्याच्या योगानें योगी लोक भूत, भविष्य व वर्तमान काळांतील व्यवहार जाणतात, जें अविनाशी जीवात्म्याशीं संलग्न करून त्याला त्रिकालज्ञ करितें, ज्याच्यामध्यें ज्ञान आहे व ज्याचा (सप्त-होता) पंच ज्ञानेंद्रियें, बुद्धि व आत्मा यांच्याशीं संयोग राहतो, (येन) ज्याच्या योगानें (यज्ञः तायते) योगरूपी यज्ञ वाढविला जातो तें माझें मन योगविज्ञानयुक्त होवो व अविद्यान्धकारापासून दूर राहो.

**यस्मिन्नृचः सामयजूंषि यस्मिन्प्रतिष्ठिता रथनाभाविवाराः ।।**
**यस्मिँश्चित्तं सर्वमोतं प्रजानां तन्मे मनः शिवसङ्कल्पमस्तु** ।। यजु. ३४।५

हे परम विद्वान् परमेश्वरा ! तुझ्या कृपेनें, माझ्या मनामध्यें, रथाच्या चाकाच्या तुम्बयामध्यें जसे आरे बसविलेले असतात, त्याचप्रमाणें ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद यांची स्थापना होत असते, व ज्यामध्यें सर्व प्रजांचें चित्त चेतन आहे असें जाणलें जातें, तें माझें मन विद्याप्रिय होवो व अविद्येपासून दूर राहो.

**सुषारथिरश्वानिव यन्मनुष्यान्नेनीयतेऽभीशुभिर्वाजिन इव ।।**
**हृत्प्रतिष्ठं यदजिरं जविष्ठं तन्मे मनः शिवसङ्कल्पमस्तु** ।। यजु. ३४।६

हे सर्वनियामक ईश्वर ! जें माझें मन उत्तम [ सुषारथिः ] सारथ्याप्रमाणें किंवा लगामानें युक्त असणाऱ्या [अश्वान्] घोड्यांप्रमाणें मनुष्यांना इकडे तिकडे नेऊन आनंद देतें, जें हृदयांत वास करितें जें ( जविष्ठम् ) गतिमान् व वेगवान् आहे, तें माझें मन सर्व इंद्रियांना अधर्माचरणापासून सोडवून धर्माप्रमाणें चालण्यास साहाय्य देईल असें कर.

**अग्ने नय सुपथा राये अस्मान् विश्वानि देव वयुनानि विद्वान् ।।**
**युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नम उक्तिं विधेम** ।। यजु. ४०।१६

हें सुखदायक [अग्ने] स्वप्रकाशस्वरूप सर्वज्ञ परमेश्वर ! आम्हांला तूं [सुपथा] श्रेष्ठमार्गानें ने व सर्व प्रज्ञानांची प्राप्ति करून दे. जें कांहीं आमच्यांत (जुहुराणम्) कुटिल पापचरण असेल त्याचा पूर्ण [युयोधि] नाश कर अर्थात् तें आमच्यापासून दूर राहूं दे. तूं आम्हांला पवित्र करावेंस म्हणून आम्ही तुझी नम्रतापूर्वक स्तुति करतों.

**मा नो महान्तमुत मा नोऽअर्भकं मा न उक्षन्तमुत मा न उक्षितम् ।**
**मा नो वधीः पितरं मोत मातरं मा नः प्रियास्तन्वो रुद्र रीरिषः** ।। यजु. १६।१५

हे [रुद्र] दुष्टांला त्यांच्या पापाबद्दल दण्ड करून त्यांना रोदन करावयास लावणाऱ्या परमेश्वरा ! तूं आमच्या लहानथोर लोक, गर्भ, माता, पिता प्रियजन, बंधुवर्ग व शरीरें यांचा घात आमच्याकडून होईल असें कृत्य आम्हां-कडून करून घेऊं नकोस, अशा मार्गानें आम्हांला चालीव कीं, ज्याच्यायोगानें आम्ही दंडाला योग्य होणार नाहीं.

**असतो मा सद् गमय तमसो मा ज्योतिर्गमय मृत्योर्माऽमृतं गमयेति** ।। शतपथ ब्रा. १४।३।१।३०

हे परमगुरो परमात्मन् ! तूं आम्हांला असत्य मार्गापासून दूर करून सत्य मार्गानें ने. अविद्यान्धकारांतून सोडवून विद्यारूपी सूर्याची प्राप्ती करवून दे व मृत्युरूपी रोगांपासून आम्हांला दूर करून मोक्षरूपी आनंदामृताची प्राप्ती करून दे. ज्या दोषांपासून व दुर्गुणांपासून परमेश्वर पृथक् आहे त्यांपासून आपणहि पृथक् होण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना करणें ही विधिनिषेधमुख असल्यामुळें सगुणनिर्गुणात्मक गणली जाते, जो मनुष्य ज्या गोष्टीची प्रार्थना करीत असेल त्यानें त्याप्रमाणें आपलें वर्तन सुधारण्याची अव्याहत खटपट केली पाहिजे. जसें एखादा मनुष्य आपली बुद्धि उत्तम व्हावी म्हणून प्रार्थना करीत असेल तर त्यानें आपणाकडून होईल तितका विद्याव्यासंग वाढविला पाहिजे. आपल्या पुरुषार्थाची पराकाष्ठा केल्यानंतर मग परमेश्वराची प्रार्थना करणें चांगलें. तसेंच कित्येक लोक अशी प्रार्थना करीत असतात कीं, 'हे ईश्वरा ! माझ्या शत्रूंचा नाश कर, मला सर्वांत मोठा कर, माझी प्रतिष्ठा वाढो, माझ्या आधीन सर्व राहतील असें कर.

'अशा तऱ्हेच्या प्रार्थना करणें वाईट, इतकेंच नव्हे तर अशा प्रार्थनेचा परमेश्वर कधींहि स्वीकार करीत नाहीं. शिवाय या प्रार्थना अशक्यहि आहेत. दोनीहि शत्रू परस्परांचा नाश व्हावा म्हणून परमेश्वराची प्रार्थना करूं लागले म्हणजे परमेश्वरानें गुणावगुणांचा विचार न करतां दोघांचाहि नाश करावा काय ? येथें कोणी असें म्हणतील कीं, ज्यांची भक्ति परमेश्वरावर जास्ती असेल त्यांची प्रार्थना सफल व्हावी. यावर आम्ही असें म्हणतों कीं, ज्याची भक्ति कमी असेल त्याच्या शत्रूचा कमी नाश व्हावा. वाचकांनीं येथें एवढें लक्षांत ठेवावें कीं, या कुतर्कांना सीमाच नसते. जर असल्या प्रार्थना परमेश्वरानें ऐकल्या असत्या तर लोकांनीं अशीहि प्रार्थना केली असती कीं, हे परमेश्वरा, मला माझ्या पोळ्या बनवून माझ्या पोटांत भर; माझ्या घरांतील कचरा झाड; कपडे धुवून टाक; माझी शेती कर' वाहवा भक्त महाराज ! आपण तर खूप भक्तीची पराकाष्ठा केली. अशा प्रार्थना जर परमेश्वर ऐकेल तर सर्व लोक आळशी होऊन पुरुषार्थहीन होतील. परमेश्वर तर लोकांनीं (चतुर्विध) पुरुषार्थ करावे असें इच्छितो व त्याची वेदद्वारा लोकांस आज्ञादेखील तशीच आहे. पहा:—

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छत ँ समाः** ।। यजु. ४०।२ ।।

"हे मनुष्य हो ! तुम्ही शंभर वर्षें जगण्याची इच्छा करा व त्या आयुष्यामध्यें नेहेमीं काम करीत रहा." पाहा सृष्टीमध्यें प्राणी किंवा अप्राणीरूप जे पदार्थ आहेत ते सर्व आपआपलीं कामें करीत आहेत. मुंग्या सदोदित प्रयत्न करीत असतात, पृथिवी सर्वदा फिरत असते, वृक्ष वाढत असतात. या सर्व पदार्थांपासून मनुष्यांनींहि कर्तव्याचा धडा शिकला पाहिजे. जो पुरुष पुरुषार्थ करणारा असतो त्याला दुसरेहि सहाय्य करूं शकतात. धर्मयुक्त पुरुषार्थ करणाऱ्या पुरुषाला परमेश्वरहि सहाय्य करतो कोणाला नोकरीत जरी एखादा पुरुष ठेवावयाचा असेल तरीहि तो उद्योगी माणसालाच ठेवतो, आळशाला कोणीहि जवळ करीत नाहीं. नेत्र असून पाहण्याचा प्रयत्न करणाराला दिसतें प्रयत्न न केला तर तो पूर्ण अंधच होय. याचप्रमाणें परमेश्वरहि परोपकाराच्या कृत्यांत सर्वांस सहाय्य करतो. दुसऱ्याला ज्यापासून त्रास होईल अशा कृत्यांत तो कोणाला सहाय्य करीत नाहीं; गूळ पाहिजे तर तो मिळण्यासाठीं प्रयत्नच केला पाहिजे, तो फार गोड आहे अशी त्यांची स्तुति करीत बसल्यानें तो प्राप्त होणार नाहीं व त्याची रुचिहि समजणार नाहीं. तात्पर्य, पुरुषार्थ करून प्रार्थना केली पाहिजे; तरच परमेश्वराचें सहाय्य मिळेल; नाहींतर कांहीं मिळणार नाहीं। उपासना:—

**समाधिनिर्धूतमलस्य चेतसो निवेशितस्यात्मनि यत्सुखं भवेत् ।**
**न शक्यते वर्णयितुं गिरा तदा स्वयं तदन्तःकरणेन गृह्यते** ।। उपनिषद् ।।

ज्याचे समाधिच्या योगानें अविद्यादि मल नाश पावले आहेत, व आत्मसंस्थ होऊन परमेश्वरामध्यें जो आपलें चित्त लावूं शकतो. त्याला परमात्मसंयोगानें अप्रतिम सुख प्राप्त होतें, त्या सुखाचें वाणीनें वर्णन करतां येत नाहीं, कारण जीवात्मा स्वतःच त्याचें अंतःकरणानें ग्रहण करूं शकतो. 'उपासना' या शब्दाचा अर्थ '(उप) जवळ (आसना) बसणें' असा आहे. अष्टांगयोग करून परमात्मसान्निध्य संपादणें व त्याच्या सर्वव्यापित्व, सर्वांतर्यामित्व इत्यादि गुणांचा साक्षात्कार करून घेण्यासाठीं जीं कृत्यें करावीं लागतात त्या सर्वांचा उपासनेमध्यें समावेश होतो. उपासनेला यमनियमांच्या पालनांची आवश्यकता आहे. ते यमनियम पुढें दिले आहेत:—

**तत्राऽहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः** ।। योग. साध. सू० ३० ।।

उपासना उत्तमरीतीनें सिद्ध व्हावी अशी इच्छा असेल तर त्या उपासकानें (अहिंसा) कोणाशीहि वैरभाव ठेवूं नये. ( सत्यम् ) सदोदित सत्य बोलावें. केव्हांहि खोटें बोलूं नये; सर्वदा सत्य व्यवहारच करावेत. ( अस्तेयम् ) कोणाच्याहि पदार्थांचा अपहार करूं नये व सर्वांवर प्रीति ठेवावी. (ब्रह्मचर्य) जितेंद्रिय असावें, विषयलंपट होऊं नये (अपरिग्रहः) निरभिमानी व निर्लोभी असणें, हे पांच यम मिळून उपासनेचें पहिलें अंग होतें, नंतर—

**शौचसंतोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः ॥ योग. सा. ॥३२॥**

(शौचम्) रागद्वेष सोडून आंतरिक शुद्धि करावी व जलादि साधनांनीं बाहेरची शुद्धि करावी. (सन्तोषः) धर्मयुक्त पुरुषार्थ करून लाभ झाला तर त्यांत आनंद मानूं नये व हानी झाली तर अप्रसन्न होऊं नये. सदोदित आळस सोडून पुरुषार्थ करीत असावें. (तपः) सुखदुःख सहन करण्याची शक्ति प्राप्त करावी व धर्माचें अनुष्ठान करावें, अधर्माचें अवलंबन कधींहि करूं नये. (स्वाध्यायः) सर्वदा वेदादि सत्यशास्त्रांचें अध्ययन व अध्यापन करावें. सत्पुरुषांचा संग करावा. [ईश्वरप्रणिधानम्] 'ओ३म्' या परमेश्वराच्या नांवाचा अर्थविचारपूर्वक जप करावा. व आपल्या आत्म्याला परमेश्वरामध्यें त्याच्या आज्ञेप्रमाणें पूर्ण लीन करावें. हे पांच नियम मिळून उपासनेचें दुसरें अंग होतें. याच्या पुढील सहा अंगाचें वर्णन **ऋग्वेदादि भाष्यभूमिका** नामक ग्रंथामध्यें 'उपासना' प्रकरणामध्यें कलेलें आहे. तेथें ते पहावें किंवा विस्तार पहावयाचा असल्यास पतंजलिमहामुनिकृत योगदर्शन पहावें. उपासना नीट करण्याची इच्छा असल्यास त्यानें शुद्ध अशा एकान्तस्थळीं जाऊन तेथें आसन लावून प्राणायाम करावा व त्या प्राणायामाच्या योगानें मनाला बाह्यविषयांपासून परावृत्त करून त्यांची नाभिप्रदेश, हृदय, कण्ठ, नेत्र, शिखा, पाठीचें मधलें हाड इत्यादि स्थानांपैकीं कोणत्यातरी एका स्थानांवर धारणा करून आत्मा व परमात्मा यांचें विवेचन करून परमात्म्यामध्यें मग्न व्हावें. या मग्नतेला संयम असें म्हणतात व ही जो अनुभवतो तो संयमी होतो. जेव्हां साधक हीं साधनें करतो तेव्हां त्याचा आत्मा व अंतःकरण पवित्र होऊन सत्यपूर्ण होतात, त्यांचें ज्ञान व विज्ञान नित्य वाढून त्याला मुक्ति सहज प्राप्त होते. जो आठ प्रहरांतून एक घटका तरी अशारीतीनें ध्यान करतो त्याची आत्मोन्नति खात्रीनें होते. सर्वज्ञत्वादि गुणांचें चिंतन करून परमेश्वराची उपासना करणें ती सगुण उपासना होय व रागद्वेषरूपरसगंधादि गुणांहून तो पृथक आहे असें त्यांचें चिंतन करणें ही निर्गुणोपासना होय. ज्याप्रमाणें थंडीनें पिडीत झालेला पुरुष अग्नीच्या जवळ गेल्याबरोबर त्याला सुख प्राप्त होतें त्याचप्रमाणें अशारीतीनें उपासना करणाऱ्याला परमेश्वराची प्राप्ति होत असल्यामुळें त्याची सर्व दुखें व दोष नाश पावून त्याच्यामध्यें परमेश्वराप्रमाणें गुणकर्मस्वभाव आविर्भूत होतात; म्हणूनच परमेश्वराची स्तुति, प्रार्थना व उपासना करणें योग्य आहे उपासनेची अन्य फळें जरी दूर राहिलीं तरी उपासकामध्यें आत्मिक बळाची वृद्धि होत असल्यानें पर्वतप्राय दुःख आलें तरी तो घाबरत नाहीं व त्यांतून सहनशीलतेनें पार पडतो ही काय लहान सान गोष्ट आहे ? शिवाय ज्या परमेश्वरानें परमौदार्यानें हें जग उत्पन्न करून जीवाला सुखाचीं साधनें करून दिलीं त्याच्या गुणांचे स्मरण न करणें म्हणजे त्यालाच न मानण्यासारखें कृतघ्नपणाचें व मूर्खपणाचें काम आहे. [**प्रश्न**] परमेश्वराला श्रोत्रादि इंद्रियें नाहींत मग तो सर्व इंद्रियांचीं कामें कशी करतो ? [**उत्तर**] परमेश्वराच्या गुणांचें वर्णनः—

**अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः ।।**
**स वेत्ति वेद्यं न च तस्यास्ति वेत्ता तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम्** ।। श्वेताश्वेतर उपनि० मं० ३।१९ ।।

परमेश्वराला हात नाहींत पण तो आपल्या अतर्क्य शक्तीनें जगद्रचना करतो, त्याला पाय नाहीत पण तो सर्व–व्यापक असल्यामुळें सर्वांहून अधिक वेगवान् आहे, डोळे नसतांहि सर्वांना यथावत् पहातो श्रोत्रेन्द्रिय नसतांहि सर्व ऐकतो, त्याला अंतःकरण नाहीं तरीहि सर्वांला तो जाणतो; अशा त्या परमेश्वराला जाणणारा या जगांत कोणीहि नाहीं, तो सनातन सर्वश्रेष्ठ व पूर्ण असल्यामुळें त्याला पुरुष म्हणतात तो इंद्रियांच्या सहाय्यावाचून आपल्या अतुल सामर्थ्यानें सर्व कामें करतो. [प्रश्न] परमेश्वर निष्क्रिय व निर्गुण आहे असें पुष्कळ लोक समजतात तें खरें आहे काय ? [**उत्तर**]

**न तस्य कार्यं करणं च विद्यते न तत्समश्चाभ्यधिकश्च दृश्यते ।**
**पराऽस्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च** ।। श्वेताश्वेतर उपनिषद् ६।१८ ।।

परमात्म्याच्या तद्रूप कोणतेंहि जगतांत कार्य नाहीं किंवा त्याचें कारणहि नाहीं म्हणजे त्याला उत्पन्न करणारें असें दुसरें कारण नाहीं तोच सर्वांचें कारण आहे त्याच्या बरोबरीचाहि दुसरा कोणी नाहीं व अधिकहि कोणी नाहीं त्याच्यामध्यें अनन्त ज्ञान, अनन्त बल व अनन्त क्रिया अर्थात् सर्वोत्तम शक्ति स्वाभाविक आहे. जर परमेश्वर निष्क्रिय असतां तर

त्याच्याकडून जगाची उत्पत्ति, स्थिति व लय हीं कामें झालीं नसतीं म्हणून तो 'विभू' आहे. तथापि तो चेतन असल्यामुळें त्याच्यांत क्रिया पण आहे. [प्रश्न] जेव्हां तो कोणती तरी क्रिया करतो तेव्हां ती क्रिया अंतयुक्त होते किंवा अनंत होते? [उत्तर] जेवढ्या देशकालामध्यें विशिष्ट क्रिया करणें तो उचित समजतो तेवढ्या देशकालामध्यें तो क्रिया करतो, जास्ती किंवा कमी करीत नाहीं. (प्रश्न) परमेश्वर स्वतःचा अंत जाणतो कीं नाहीं ? (उत्तर) जाणणें म्हणजे जी वस्तु जशी आहे तशीच तिला समजणें. परमात्मा पूर्ण ज्ञानी असल्यामुळें त्याला त्याच्या संबंधानें पूर्ण ज्ञान आहे, परमेश्वर अनंत असल्यानें तो आपणास अनन्त समजतो. परमेश्वर अनन्त असतां जर तो आपणास सान्त समजेल तर तें अज्ञान होईल. अनंताला अनंत समजणें ज्ञान व अनंताला सान्त व सान्ताला अनंत समजणें अज्ञान होय. **'यथार्थदर्शनं ज्ञानमिति ।'** ज्याचा जसा गुणकर्मस्वभाव असेल त्याला तसेंच जाणणें व मानणें हें ज्ञान व विज्ञान होय व तसें न समजणें हें अज्ञान समजावें.

**क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः** ।। योग. समाधि. सू. २४ ।।

जो अविद्यादि क्लेशांपासून व कुशलाकुशल, इष्टानिष्ट व मिश्रफलदायक कर्मांच्या वासनांपासून अलिप्त असतो त्या सर्व जीवांहून भिन्न असणाऱ्या पुरुषाला **ईश्वर** असें म्हणतात. (प्रश्न) **ईश्वरासिद्धेः** सांख्य. १।९२ **प्रमाणाभावान्न तत्सिद्धिः । संबंधाभावान्नानुमानम्** । सांख्य ५।१०,११ ।।

अहो तुम्ही ईश्वर आहे असें म्हणतां पण सांख्यशास्त्रामध्यें काय सांगितलें आहे तें पहा. सांख्यशास्त्र म्हणते कीं, ईश्वर प्रत्यक्ष दिसत नाहीं म्हणून त्याची सिद्धि होणें अशक्य आहे.' ज्याअर्थी त्याची सिद्धि प्रत्यक्ष प्रमाणानें होत नाहीं त्याअर्थी अनुमानादि प्रमाणेंहि लागूं होणार नाहींत.' 'व्याप्तिसंबंध नसल्यामुळें त्याचें अनुमान होऊं शकत नाहीं. अर्थात् प्रत्यक्षानुमान हीं प्रमाणें जेथें लागूं होत नाहींत तेथें शब्दप्रमाणहि लागूं पडत नाहीं अर्थात् ईश्वराची सिद्धि होणें अशक्य आहे.' सांख्य ईश्वराला मानीत नाहींत त्यावर तुमचें काय मत आहे ? (उत्तर) सांख्याचार्य कपिल महामुनींला आपण निरीश्वरवादि म्हणतां, पण त्यांच्या सूत्रांचा आपणास अर्थच नीट समजला नाहीं हें खरें. 'ईश्वर जगाचें उपादान कारण नाहीं म्हणून ईश्वरसिद्धि करण्यासाठीं कोणतेंहि प्रत्यक्ष प्रमाण नाहीं.' असा भाव वरील सूत्रांचा आहे 'ईश्वर नाहीं' असा त्याचा अर्थ नव्हे. परमेश्वर सर्वत्र व्यापक असल्यामळें त्याला 'पुरुष' असें म्हणतात व त्याचप्रमाणें शरीरामध्येंहि जीव शयन करीत असल्यामुळें त्यालाहि 'पुरुष' असें म्हणतात. पहा:—

**प्रधानशक्तियोगाच्चेत्संगापत्तिः । सत्तामात्राच्चेत्सर्वैश्वर्यम् । श्रुतिरपि प्रधानकार्यत्वस्य** । सांख्य ५।८,९ व १२

(प्रधान) जर पुरुषाला प्रधानशक्तीचा योग [परमाणु एकाला एक मिळून वृद्धि पावणें व पुनः मूळस्थितींत येणें] होईल तर त्याचें ठिकाणीं संगापत्ति होईल अर्थात् प्राकृतिक सूक्ष्म परमाणु ज्याप्रमाणें एकत्र जुळल्यानें संगतिरूप कार्यसृष्टि उत्पन्न होते, त्याचप्रमाणें जर परमेश्वरामध्यें तशा प्रधानशक्तीचा योग मानला तर तोहि स्थूल होईल म्हणून परमेश्वर जगाचें उपादान कारण नाहीं, तो निमित्त कारण आहे. (सत्ता.) जर चैतन्यमय परमेश्वर जगाचें उपादान कारण मानलें तर जसा परमेश्वर पूर्ण ऐश्वर्ययुक्त आहे त्याचप्रमाणें हें जगहि असलेंच पाहिजे; पण तसें नाहीं अर्थात् परमेश्वर जगाचें उपादान कारण नसून निमित्त कारण आहे. (श्रुति.) उपनिषदांमध्यें प्रधानप्रकृति हेंच जगाचें उपादान कारण आहे असें सांगितलें आहे. पहा—

**अजामेकां लोहितशुक्लकृष्णां वह्वीः प्रजाः सृजमानां स्वरूपाः** ।। श्वेताश्व. ४।५

अजाम् जी जन्मरहित व (शुक्लाम्) सत्व. (लोहिताम्) रज व (कृष्णाम्) तम या तीन गुणांनीं युक्त प्रकृति आहे, तीच (स्वरूपाः) आपल्या आकाराच्या योगानें बहु प्रजारूपी होत असते; अर्थात् प्रकृति परिमणामिनी असल्यानें अवस्थान्तराला प्राप्त होत असते; त्याचप्रमाणें पुरुष अपरिणामी असल्यामुळें अवस्थान्तर पावून त्याचें रूपान्तर होत नाहीं तो सदोदित कूटस्थ निर्विकार असतो. तात्पर्य कपिलाचार्यांच्या सांख्यदर्शनामध्यें निरीश्वरवाद मुळींच नसतां जे त्यांना निरीश्वरवादी म्हणत असतील तेच खरे नास्तिक होत. तसेंच मीमांसकाच्या धर्मधर्मिवादानें व न्यायवैशेषिकांच्या

आत्मशब्दप्रयोगानेंहि ते निरीश्वरवादी होऊं शकत नाहींत; कारण मीमांसक परमेश्वराला सर्वज्ञत्वादि धर्मयुक्त मानतात, **'अतति सर्वत्र व्याप्नोतीत्यात्मा'** जो सर्वत्र व्यापक आहे तो आत्मा होय. परमेश्वरामध्यें सर्वव्यापीत्व, सर्वज्ञत्व इत्यादि गुण आहेत व तो सर्व जीवांचा आत्मा आहे असें मीमांसक, वैशेषिक व नैयायिक तत्ववेत्ते मानतात. यावरून उघड ठरतें कीं, ते सर्व आस्तिकच आहेत.

अवतारः-[प्रश्न] ईश्वर अवतार घेतो कीं नाहीं ? [उत्तर] नाहीं. कारण वेदांमध्यें **'अज एकपात्' 'स पर्यगाच्छुक्रमकायम्** असें सांगितलें आहे. यावरून परमेश्वर जन्म घेत नाहीं व शरीरहि धारण कारीत नाहीं असें ठरतें. (प्र.) **यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्** ।।' यामध्यें श्रीकृष्ण म्हणतो कीं, 'जेव्हां धर्माचा लोप होतो तेव्हां मी शरीर धारण करतो' हें कसें ? (उ.) परमेश्वर शरीर धारण करतो हें म्हणणें वेदविरुद्ध असल्यामुळें अप्रमाण होय. आतां आपण जें श्रीकृष्णाविषयीं म्हणतां, तर त्याविषयी असें आहे कीं, श्रीकृष्ण हा योगीश्वर व धर्मात्मा होता, धर्मरक्षण करण्याची त्याची इच्छा असल्यामुळें युगायुगामध्यें जेव्हां अधर्म वाढेल तेव्हां आपण उत्पन्न होउन धर्माचें रक्षण करूं असें त्यानें म्हटलें तर त्यांत कांहींच वावगें नाहीं. **'परोपकाराय सतां विभूतयः ।'** परोरकारासाठीं थोर लोक आपलें तनमनधन अर्पण करतात, परोरकारांतच थोरांचें थोरपण आहे. हा अमोलिक गुण श्रीकृष्णामध्यें होता एवढ्यानें श्रीकृष्ण ईश्वर आहे असें ठरत नसून महात्मा व योगीश्वर ठरत आहे. (प्रश्न) जर असें आहे तर या संसारामध्यें ईश्वराचे चोवीस अवतार होतात व मत्स्यादिक हे सर्व अवतार आहेत असें लोक कसें मानतात ? (उ.) वेदांचा अर्थ न जाणल्यामुळें, मतमतांतराभिमानी संप्रदायी लोकांनीं अज्ञानी लोकांना फशीं पाडल्यामुळें अज्ञानी लोक अशीं अप्रामाणिक भाषणें बोलतात व मानतात. (प्रश्न) अहो जर ईश्वरानें अवतार घेतला नसता तर कंस रावणादिक दुष्ट राक्षसांचा नाश कसा झाला असता ? (उ.) ज्य अर्थी कंसादिक जन्माला आलेले होते त्याअर्थी त्यांचा नाश केव्हांतरी झालाच असता. परमेश्वर जगाची उत्पत्ति, स्थिति व प्रलय हीं कामें तो स्वतः निराकार असतांहि करतो. या जगताच्या घडामोडीपुढें कंसादिक किडामुंगीप्रमाणें होत त्यांच्यासाठीं अवतार घेण्याची काय आवश्यकता आहे ? शिवाय परमेश्वर सर्व व्यापक असल्यामुळें तो कंस व रावण इत्यादिकांच्या शरीरामध्येंहि पूर्णपणें भरलेला होताच. त्याची इच्छा असती तर त्यानें मर्मच्छेदन करून तेव्हांच नाश करून टाकला असता. अशा अनंतसामर्थ्ययुक्त परमेश्वराला एकाद्या क्षुद्र जीवाला मारण्यासाठीं शरीरधारी व जरामरण धर्मयुक्त व्हावें लागतें असें मानणें हा मूर्खपणा नव्हे काय? भक्तजनांचा उद्धार करण्यासाठीं तो अवतार घेतो असें जे कोणी म्हणतील, त्यांचें तेंही म्हणणें निर्मूल आहे; कारण भक्तजनांचा उद्धार करण्याचें पूर्ण सामर्थ्य निराकार परमेश्वरांत आहे. सूर्य, चन्द्र, पृथ्वीवगैरे तेजोमयगोलसृष्टीची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करण्यास लागणाऱ्या समार्थ्यापेक्षां कंस रावणादि राक्षसांचा वध करण्यास व गोवर्धन उचलण्यास जास्त सामर्थ्य लागतें काय ? जो कोणी या सृष्टीचा विचार करील त्याला ईश्वराच्या सामर्थ्याची कल्पना होऊन ' न भूतो न भविष्यति' ईश्वरा इतका सामर्थ्यवान् कोणीहि नाहीं असेंच त्याला वाटेल. युक्तीनें पाहिलें असतांहि ईश्वर जन्मधारण करीत नाही असें वाटेल. पहा आकाशाप्रमाणें सर्व व्यापक ईश्वर एखाद्या लहान शरीरांत कसा येऊन राहील ? हें एवढें विस्तीर्ण व व्यापक आकाश एकाद्या लहानशा जागेंत जसें माऊं शकत नाहीं तद्वतच सर्व व्यापक परमेश्वर एखाद्या शरीरांत राहूं शकत नाहीं व गर्भामध्येंहीं येऊं शकत नाहीं. त्याचें येणें जाणेंहि अशक्य आहे, कारण तो सर्व ठिकाणीं-गर्भामध्यें व सर्वांच्या शरीरांत आहेच. जेथें तो नव्हता त्याठिकाणीं तो आला हें म्हणणें योग्य होईल; येणें जाणें हे शब्द एकदेशी पदार्थाला लागूं होतात. तो सर्व व्यापक असल्यामुळें त्याच्याठिकाणीं येणें जाणें हे शब्द योग्य रीतीनें लागूं होत नाहींत. परमेश्वराला विद्याहीनांशिवाय दुसरें कोणीहि असें मानू शकणार नाहींत. तात्पर्य परमेश्वराचें जन्ममरण, येणें जाणें हीं होऊं शकत नाहीत. ज्याप्रमाणें श्रीकृष्ण ईश्वराचा अवतार नव्हे त्याचप्रमाणें 'येशू' हि नव्हे. जेथें जेथें रागद्वेष, क्षुधातृषा, भयशोक, सुखदुःख, जन्ममरण इत्यादि गुण असतात ते ईश्वर नसून मनुष्यच होत हें निश्चयानें समजावें. (प्रश्न) ईश्वर आपल्या भक्तांच्या पापांची क्षमा करतो कीं नाहीं ? (उत्तर)

नाहीं, कारण जर तो पापाची क्षमा करील तर त्याच्या राज्यांतील न्याय नाहींसा होईल. परमेश्वर पापाची क्षमा करतो असें ठरलें तर सर्व लोकांस पाप करण्यास उत्तेजन येईल व ते निर्भयपणानें पापें करूं लागतील. पहा, राजा आपल्या अपराधांची क्षमा करील असें ज्याला माहीत असतें तो मोठमोठीं पातकें करण्यास तयार होतो, तसेंच आपल्या पापाबद्दल आपणाला शिक्षा मिळेल असें ज्याला माहीत असतें; तो मनुष्य पाप करण्यास भितो. तात्पर्य जेथें कर्माचें यथायोग्य फल मिळतें तेथेंच सुव्यवस्थितपणा असतो. परमेश्वराची व्यवस्था पूर्ण असल्यामुळें तो सर्वांना त्यांच्या कर्माप्रमाणें यथायोग्य फल देतो व हेंच त्याचें काम आहे; अपराधांची क्षमा करणें नाहीं.

**जीवाची स्वतन्त्रता—(प्रश्न)** जीव स्वतन्त्र आहे कीं परतंत्र ? (उत्तर) जीव आपलीं कर्तव्यें करण्यास स्वतंत्र व परमेश्वरीय व्यवस्थेमध्यें परतंत्र आहे. 'स्वतन्त्रः कर्ता' । ( पाणिनीयव्याकरणम् ) जो स्वतन्त्र असतो तोच कर्ता असतो. परतंत्र जो असतो तो कर्ता होऊं शकत नाहीं. ( प्र० ) स्वतन्त्र कोणास म्हणावें ? ( उ० ) ज्याच्या ताब्यांत शरीर, प्राण, इंद्रियें व अंतःकरणादि पदार्थ आहेतो. जो, स्वतन्त्र नसतो त्याला त्याच्याकडून घडलेल्या पापपुण्याचें फल मिळत नाहीं. याच नियमाला अनुसरून सेनेंतील लोकांनी सेनापतीच्या तंत्रानें वागत असतां लडाईमध्यें कितीहि जरी लोक मारले तरी ते अपराधी होत नाहींत, कारण ते परवश असतात. जर सर्व जीव परमेश्वराच्या प्रेरणेनें परतन्त्रपणें आपआपलीं कामें करतात असें मानलें, तर जीवाला त्या कर्माचें पापपुण्य सुखदुःखादि फल मिळणार नाहीं, त्या कर्माचा प्रेरक परमेश्वर असल्यामुळें परमेश्वरालाच मिळेल व पापपुण्याप्रमाणें स्वर्गनरक, सुखदुःखादि फल त्यालाच ( परमेश्वरालाच ) प्राप्त होईल. जर एखाद्या शस्त्रानें कोणी कोणाचा वध केला तर त्या वधकरणाऱ्याला शासन करतात त्या शस्त्राला करीत नाहींत, कारण शस्त्र परतन्त्र असतें व तो वधकर्ता स्वतन्त्र व प्रेरक असतो; याचप्रमाणें जर जीव परतन्त्र व परमेश्वर त्याला पराधीन ठेवनू सर्व कर्म करविणारा प्रेरक असेल तर जीव पापपुण्याचा भोगी होणार नाहीं. वास्तविक पाहिलें तर आपल्या सामर्थ्यानुरूप कर्म करण्यामध्यें जीव स्वतंत्र आहे, पण जेव्हां तो पाप करतो तेव्हां ईश्वराच्या सुव्यवस्थेनें पराधीन होऊन त्याचें फल भोगतो, अर्थात् जीव हा कर्म करण्यास स्वतन्त्र व फल भोगण्यास परतन्त्र आहे. (प्र०) जर परमेश्वरानें जीवाला उत्पन्न केलें नसतें व त्याला सामर्थ्यहि दिलें नसतें तर त्यांच्याकडून कांहींच झालें नसतें; म्हणून परमेश्वराच्याच प्रेरणेनें जीव काम करतो असें म्हणण्यास काय हरकत आहे ? (उ०) ईश्वर व जगताचें उपादान कारण अनुत्पन्न आहे व सर्व व्यवहाराचें साधन आहे; त्याचप्रमाणें जीवहि अनादि आहे. त्याला कोणी उत्पन्न केलेलें नाहीं. जीवाचें शरीर व इंद्रियांचे गोलक मात्र परमेश्वरानें बनविलेले आहेत पण तेहि सर्व जीवाच्या आधीन आहेत; म्हणून जो कोणी मन, काया व वाचा यांच्या योगानें पापपुण्य करतो त्याचें त्यालाच फल मिळते, ईश्वराला नाहीं. पहा कोणी एकानें खाणींतून लोखंड काढलें तें एका व्यापाऱ्यानें विकत घेऊन लोहारास विकलें, लोहारानें त्याची तलवार बनवून ती एका मनुष्याला विकली व त्या मनुष्यानें त्या तलवारीच्या योगानें एका मनुष्याचा वध केला तर त्या वधाबद्दल इतर कारखानदार जबाबदार नसून तो वध करणाराच दोषी होतो; याचप्रमाणें शरीरादिकांची उत्पत्ति करणारा परमेश्वर कर्मफलाचा भोक्ता होत नसून तो तीं कर्में करणाऱ्या जीवांना कर्मफल भोगविणारा आहे. जर परमेश्वरच सर्व कर्में करवीत असता तर जीव कधींच पाप न करतें. परमेश्वर ज्ञानपूर्ण धार्मिक व पवित्र आहे; म्हणून जीवांना तो पापकर्म करण्याची प्रेरणा करीत नाहीं. ज्याअर्थी जगामध्यें पापें चाललेलीं आहेत त्याअर्थी त्या पापकर्माचा प्रेरक परमेश्वरच नसून, जीव स्वतंत्र रीतीनें आपआपलीं कर्में करण्यांत समर्थ आहेत असें ठरतें. ज्याप्रमाणें आपणापुरतें काम करण्यास जीव स्वतंत्र आहे त्याचप्रमाणें परमेश्वरहि आपलीं कामें करण्यास पूर्ण स्वतंत्र आहे. (प्र०) जीव व ईश्वर यांचें स्वरूप व गुणकर्मस्वभाव कसे काय आहेत ? (उ०) दोघेहि चेतनस्वरूप आहेत, दोघांचाहि स्वभाव पवित्र, धार्मिक व अविनाशित्वादि गुणविशिष्ट आहे. परमेश्वर सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय करतो, सर्वांना नियमानें चालवितो, जीवांला पापपुण्याचें यथायोग्य फल देतो, हीं सर्व

धर्मयुक्त कामें तोच करतो, जीवहि संततीची उत्पत्ति, तिचें पालन व शिल्पविद्यादिक बरीं वाईट कृत्यें करतो. ईश्वरामध्यें नित्यज्ञान, आनंद, अनंत बल इत्यादि गुण आहेत व जीवामध्यें:—

**इच्छाद्वेषप्रयत्नसुखदुःखज्ञानान्यात्मनो लिङ्गमिति ॥** न्याय. द. १। १। १० ॥

**प्राणापान निमेषोन्मेषमनोगतीन्द्रियान्तरविकाराः सुखदुःखे इच्छाद्वेषौ प्रयत्नाश्चात्मनो लिंगानि ॥**

वैशे. ३।२।४.

(इच्छा) पदार्थ मिळण्याची अभिलाषा, (द्वेषः) वैर अथवा दुःखादिकांविषयीं निरिच्छा, (प्रयत्नः) पुरुषार्थ, बल, (सुखम्) आनंद, (दुःखम्) विलाप, अप्रसन्नता, (ज्ञानम्) विवेक किंवा जाणणें हे गुण न्याय व वैशेषिक या दोनहि दर्शनामध्यें समान आहेत, पण वैशेषिकांमध्यें खालील गुण विशेष आहेत. (प्राणः) प्राणावायूला बाहेरून आंत नेणें, (अपानः) प्राणवायूला बाहेर घालविणें, (निमेषः) डोळे मिटणें, (उन्मेषः) डोळे उघडणें, (मनः) निश्चय, अहंकार व स्मरण करणें, (गति) हालचाल करणें, (इन्द्रियम्) सर्व इन्द्रियांला चालविणें. (अंतरविकारः) क्षुधातृषाहर्ष-शोकादि विकारयुक्त होणें हे ते होत; हे सर्व गुण परमेश्वरामध्यें नाहींत. आत्मा—स्थूल नसल्यामुळे यांच्याच योगानें त्याची प्रतीति करावी लागते. जोंपर्यंत आत्मा शरीरांत राहतो तोंपर्यंत हें गुण शरीरांत दिसतात, पण जेव्हां तो शरीर सोडून जातो तेव्हां शरीरांत हे गुण दिसत नाहींत. अर्थात् या गुणांवरून आत्मा शरीराहून भिन्न आहे असें मनावें लागतें. जो असतांना जे गुण दिसतात व जो नसतांना जे गुण दिसत नाहींत, त्याचे ते गुण आहेत असें ठरतें. जसा सूर्य किंवा दिवा असतांना प्रकाश असतो व तो नसतांना नसतो या अटल नियमावरून जसें प्रकाश पाहून सूर्य किंवा दीप यांचें अनुमान होतें तद्वतच गुणांवरून जीव किंवा परमेश्वर यांचें ज्ञान होतें. (प्रश्न) पहा. परमेश्वर त्रिकालज्ञानी आहे जीव पुढें काय करणार आहे हें परमेश्वराला पूर्वींच समजलेलें असतें. यावरून जीवाचा पुढचा कार्यक्रमहि ठरलेलाच आहे हें उघड होतें, मग जीव स्वतंत्र कसा ? व जीव परतंत्र असल्यामुळें व ईश्वरानें पूर्वींच निश्चित केलेल्या गोष्टी जीवाला करणें भाग असल्यामुळें पराधीनपणानें करीत असलेल्या कामांबद्दल ईश्वर जीवाला दंडहि करूं शकणार नाहीं; हें खरें कीं नाहीं ? (उत्तर) ईश्वराच्या ठिकाणीं तीन काल नाहींत, त्याच्या ठिकाणीं केवळ वर्तमानकालच आहे; म्हणून त्याला त्रिकालज्ञ म्हणणें योग्य नाहीं उत्पन्न होऊन सध्यां नसणाऱ्या कालाला भूतकाल म्हणतात व जो अजून उत्पन्न झाला नाहीं पण होणारे आहे त्याला भविष्यकाल असें म्हणतात. ईश्वराला एकदां झालेलें ज्ञान नाहीसें होत नाहीं व नसलेलें ज्ञान होणार आहे असेंहि नाहीं. त्याच्या ठिकाणीं एकसर अखंडित ज्ञान सदोदित वर्तमानकालाप्रमाणेंच राहतें; म्हणून त्याला त्रिकालयज्ञ म्हणतां येणार नाहीं. जीवांच्या अपेक्षेनें परमेश्वराच्या ठिकाणीं त्रिकालज्ञता कल्पितां येईल. पण वास्तविक ईश्वरामध्यें त्याच्या दृष्टीनें तीन कालच नाहींत हें कोणीहि विसरतां नये. ज्याप्रमाणें स्वतंत्रणानें जीव काम करतो, त्याचप्रमाणें ईश्वर सर्वज्ञ असल्यामुळें तें सर्व जाणतो; जें ईश्वर जाणतो तेंच जीव करतो. जीवाचें कोणतेंच कर्म परमेश्वरापासून गुप्त राहूं शकत नाहीं. कारण परमेश्वराचें ज्ञान पूर्ण आहे अर्थात् जीवानें तीनहि कालांत केलेल्या कर्माचें ज्ञान करून घेण्यास व त्यांचें फल देण्यास ईश्वर स्वतंत्र आहे; पण जीव फक्त थोडे वर्तमानज्ञान व कर्म करण्यास स्वतन्त्र आहे. ईश्वराचें ज्ञान अनादि अनंत असल्यामुळें जसें त्याला कर्माबद्दल फल (दंडादिक) देण्याचें ज्ञानहि अनादि असतें. या दोहोंविषयींचें त्याचें ज्ञान सत्य व निश्चित असतें. एक ज्ञान सत्य व दुसरें मिथ्या असें मानण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. तात्पर्य परमेश्वर सर्वज्ञ असला तरीहि जीवाच्या स्वातंत्र्यांत कांहीं विघाड होऊं शकत नाहीं. (प्रश्न) जीव हा शरीरांत निराळा विभू आहे कीं परिच्छिन्न ? (उत्तर) जीव परिच्छिन्न आहे, जर तो विभू अर्थात् व्यापक असतो तर जागृति, स्वप्न, सुषुप्ति, मरण, संयोग, जाणें, येणें हें होऊं शकलें नसतें. अर्थात् जीव हा स्वरूपतः अल्पज्ञ आहे व अल्प म्हअजे सूक्ष्म आहे: ईश्वर हा सर्व-व्यापक, सुक्ष्मात्सूक्ष्मतर असून, सर्वज्ञ व सर्वव्यापक असा आहे; याकरतां जीव व ईश्वर यांचा व्याप्यव्यापक हा संबंध आहे (प्रश्न) एकाच जागीं एकाचवेळीं दोन वस्तू राहूं शकत नाहींत या सार्वत्रिक सृष्टिनियमाप्रमाणें जीव व ईश्वर

यांचा व्याप्यव्यापकसंबंध असूं शकणार नाहीं; पण त्यांचा संयोगसंबंध असूं शकेल ? हे दोन पदार्थ एकाच जागीं राहूं शकतील तरी कसे ? **(उत्तर)** अहो, हा जो आपण पदार्थविज्ञान शास्त्राचा नियम सांगितलात, हा समान आकारयुक्त पदार्थांलाच लागूं आहे, असमान आकृतींमध्यें लागूं नाहीं; ज्याप्रमाणें लोखंड या स्थूल पदार्थामध्यें अग्नि किंवा विद्युत हे सूक्ष्म पदार्थ शिरून दोनहि एकत्र राहूं शकतात; त्याचप्रमाणें जीवापेक्षां परमेश्वर सूक्ष्म असल्यामुळें तो त्यांत व्यापून राहूं शकतो. अर्थात् हा व्यापक व जीव व्याप्य आहे. ईश्वरजीवामध्यें जसा व्यापकव्याप्य संबंध आहे; त्याचप्रमाणें सेव्यसेवक; आधारआधेय, स्वामीभृत्य, राजाप्रजा, पितापुत्र इत्यादि संबंध आहेत.

**द्वैत व अद्वैतवादः**—**(प्रश्न)** वास्तविक ईश्वर व जीव एकच आहेत. पहाः—**"प्रज्ञानं ब्रह्म ॥१॥ अहं ब्रह्मास्मि ॥२॥ तत्त्वमसि ॥३॥ अयमात्मा ब्रह्म ॥४॥** वेदांमधील या चार महावाक्यांमध्यें जीवब्रह्मैक्यच सांगितलें आहे. मग कसें? **(उत्तर)** हीं **वेदांतील वाक्यें नसून ब्राह्मण ग्रंथांतील वाक्यें आहेत. कोणत्याहि** ऋषिप्रणीतशास्त्रामध्यें यांना **महावाक्यें** असें म्हटलें नाहीं. '(अहम्) मी (ब्रह्म) ब्रह्मस्थ (अस्मि) आहे' असा पहिल्या वाक्याचा अर्थ आहे. **(प्रश्न)** अहो 'ब्रह्म' या पदाचा 'ब्रह्मस्थ'-ब्रह्मामध्यें राहणारा-असा अर्थ आपण कसा केलात ? मी ब्रह्म आहे' असाच त्याचा सरळ अर्थ होत नाहीं काय ? **(उत्तर)** नाहीं, कारण त्या ठिकाणीं **'तात्स्थ्योपाधि'** आहे. ज्याप्रमाणें 'मञ्चाः क्रोशन्ति ।' याचा 'मञ्चक ओरडतात' असा शब्दशः अर्थ करावयाचा नसतो तर मञ्चक जड असल्यामुळें कधीं ओरडत नाहीं 'मञ्चकावर बसलेले पुरुष ओरडतात, असाच करावा लागतो त्याचप्रमाणें येथेंहि समजावें. **(प्रश्न)** अहो, सर्वच पदार्थ ब्रह्मामध्यें आहेत मग जीवाविषयींच विशेषतः सांगण्याचें कारण काय ? **(उत्तर)** सर्व पदार्थ ब्रह्मामध्यें आहेत हें खरें पण ज्याप्रमाणें जीव हा सामर्थ्ययुक्त असून अत्यंत निकट आहे तसे इतर पदार्थ नाहींत. त्याचप्रमाणें जीवाला ब्रह्माचें ज्ञान होऊन तो मुक्तीमध्यें ब्रह्माशीं साक्षात्संबंध ठेवूं शकतो तशी इतर पदार्थांची स्थिति नाहीं; याकरितां जीव हा ब्रह्माबरोबर 'तात्स्थ्य' अथवा तत्सहचरितोपाधि अर्थात् ब्रह्माचा सहचारी आहे. या वाक्यावरून जीव ब्रह्म एक आहे असें ठरत नाहीं. 'मी व तो एकच आहों' असें जर कोणी म्हटलें तर 'माझा व त्याचा विरोध नाहीं' असाच जसा अर्थ समजतात. त्याचप्रमाणें या वाक्यावरूनहि जीव ईश्वर यांचा अविरोधच समजावयाचा आहे. जो जीव समाधिस्त होऊन परमेश्वरामध्यें सप्रेम निमग्न होतो, तो म्हणतो कीं, 'मी व ब्रह्म एक' अर्थात् अविरोधी अथवा एक अवकाशस्थ आहो. जो जीव परमेश्वराच्या गुणकर्मस्वभावाच्या अनुकूल आपलें गुणकर्मस्वभाव बनवून ब्रह्माशीं आपलें साधर्म्य करितो तोच आपली ब्रह्मांशीं एकतां आहे असें म्हणूं शकतों. **( प्रश्न )** बरें **'तत्त्वमसि'** याचा काय हो अर्थ ? "( तत् ) तें ब्रह्म ( त्वम् ) तूं ( असि ) आहेस" या वाक्यावरून जीव व ब्रह्म यांचें ऐक्य ठरत नाहीं काय ? **(उत्तर)** पहा, 'तत्' शब्दाचा तुम्हीं 'ब्रह्म' असा अर्थ केलात, पण जेथें 'ब्रह्म' शब्दाची अनुवृत्तिच नाहीं तेथें ब्रह्म शब्द आला कोठून ? **(प्रश्न) 'सदेव सोम्येदमग्न आसीदेकमेवाद्वितीयं ब्रह्म ।'** या उपनिषदांतील पूर्व वाक्यांतून ब्रह्म शब्दाची अनुवृत्ति आली आहे. **(उत्तर)** अहो असे खोटे पुरावे नको आहेत. आपण छांदोग्योपनिषद् पाहिलेंच नाहीं असें वाटतें.

**सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्** ॥ छांदोग्य० ६।२।१ ॥

छांदोग्योपनिषदाचा पाठ असा आहे व यांत ब्रह्म शब्दच नाहीं व असें असूनहि आपण ब्रह्म शब्द तेथें जोडतां हें विलक्षण आहे. **(प्रश्न)** बरें आपण 'तत्' या शब्दाचा काय अर्थ करतां ? **(उत्तर)** आधीं उपनिषदाचा पाठ पहाः—

**स य एषोऽणिमा ॥ एतदात्म्यमिदं सर्वं तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो ॥** छां. ६-८।६-७.

'तो परमात्मा जाणण्यास योग्य आहे. तो सर्वांहून (अणिमा) सूक्ष्म व सर्व जगताचा व जीवांचाहि ( आत्म्यम् ) आत्मा तोच आहे. तो सत्यस्वरूप असून आपला आत्मा आपणच आहे. हे श्वेतकेतो ! हे प्रियपुत्रा

**(तदात्मकस्तदन्तर्यामी त्वमसि)** त्या अंतर्यामी परमेश्वरानें युक्त असा तूं आहेस'. हा अर्थ इतर उपनिषदांच्या वचनांनाहि बाधक होत नाहीं. पहा:—

**य आत्मनि तिष्ठन्नाऽन्तरो यमात्मा न वेद यस्यात्मा शरीरम् ॥**

**आत्मनोन्तरो यमयति सत आत्मान्तर्याम्यमृतः ॥** बृहदारण्यक उ०

महर्षि याज्ञवल्क्य मैत्रेयी स्त्रीला सांगतात कीं, हे मैत्रेयि ! परमेश्वर (आत्मनि) जीवांमध्यें स्थित आहे आणि (आत्मनोन्तरः) जीवात्म्यांहून भिन्न आहे, पण मूढ जीवात्मा त्या आपणाहून भिन्न असलेल्या परमेश्वराला (न वेद) जाणत नाहीं व तो आपणामध्यें व्यापून आहे हेंहि त्याला समजत नाहीं ज्या परमेश्वराचें (आत्मा) जीव हेंच (शरीरम्) शरीर आहे. (जसा शरीरांत जीव राहतो त्याचप्रमाणें जीवामध्यें परमेश्वर व्यापून राहतो म्हणून जीवात्म्याला परमेश्वराचें शरीर म्हटलें आहे इतकेंच.) जीवामध्यें व्यापक असून जीवाहून भिन्न असणारा, जीवांच्या पापपुण्यांचा साक्षी होऊन त्यांना कर्मानुसार यथायोग्य फल देऊन (यमयति) त्यांचे नियमन करणारा असा जो (अमृतः) अविनाशी परमात्मा आहे तो (ते) तुझ्या (आत्मनः) आत्म्या (अंतरः) मध्यें व्यापक आहे त्याला तूं जाण.' या प्रकारची उपनिषद्वचनें आहेत व त्यांचा दुसरा कांहीं अर्थ होऊं शकत नाहीं; त्याचप्रमाणें जेव्हां समाधिमध्यें योग्याला परमेश्वर प्रत्यक्ष होतो; तेव्हां म्हणतो कीं, **'अयमात्मा ब्रह्म ।'** 'हा जो (आत्मा) माझ्यामध्यें व्यापक आहे त्यालाच ब्रह्म असें म्हणतात व तेंच सर्वत्र व्याप्त आहे' या वाक्यांचा व उपनिषद्वाचनांच्या अर्थावरून जीव ब्रह्म एक नाहींत असें स्पष्ट होतें व जे आधुनिक वेदान्ती यांना एक समजतात त्यांना वेदान्तशास्त्रच समजलेलें नाहीं — म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. (प्रश्न)

**अनेन जीवेनात्मनानुप्रविश्य नामरूपे व्याकरवाणि ॥** छां. ६।३।२.

**तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत् ॥**तैत्ति. ब्रह्मा. अ. ६.

'मी सर्व जग व शरीर यांची रचना करून त्या जगतांमध्यें व्यापक व जीवरूप धारण करून शरीरांत प्रविष्ट होऊन नाम व रूप यांची व्याख्या करीन.' 'जगत् व शरीर उत्पन्न करून परमेश्वर त्यांत प्रविष्ट झाला.' इत्यादि श्रुतीवरून जीव व परमेश्वर यांचें ऐक्य ठरत नाहीं काय ? याचा दुसरा काय अर्थ होणार आहे ? (उत्तर) जर तुम्हांला पद व पदार्थ यांची माहिती असती तर तुम्हीं असा अर्थ कधींहि केलाच नसता; या दोनहि वचनामध्यें 'अनुप्रवेश' हा शब्द विचार करण्यासारखा आहे. 'अनुप्रवेश' म्हणजे 'मागून प्रवेश' अर्थात् प्रथमतः कोणाचा तरी प्रवेश झाला पाहिजे, हें उघड आहे. शरीरामध्यें प्रवेश केलेल्या जीवाबरोबर (अनुप्रविश्य) 'अनुप्रवेश' केल्याप्रमाणें राहून वेदद्वारा नामरूपादि विद्या प्रकट केली; शरीरामध्यें जीवाचा 'प्रवेश' व जीवामध्यें परमेश्वराचा 'अनुप्रवेश' होत असतो. अर्थात् 'अनुप्रवेश' शब्दांतील 'अनु' या उपसर्गांचें महत्त्व जर तुमच्या लक्षांत आलें असतें तर अशी अर्थाची धांदल तुम्हीं केलीच नसती. (प्रश्न) बरें तें असो. आतां दुसरें असें पहा—'सोऽयं देवदत्तो य उष्णकाल काश्यां दृष्टः स इदानीं प्रावृट्समये मथुरायां दृश्यते' जो देवदत्त मी उष्णकालामध्यें काशीमध्यें पाहिला होता त्यालाच मी वर्षाऋतू-मध्यें मथुरेमध्यें पाहत आहे.' या ठिकाणीं काशीदेश व उष्काल इत्यादि उपाधि सोडून केवळ शरीरमात्राकडे लक्ष दिलें असतां दोनहि ठिकाणचा हा एकच देवदत्त आहे असें समजतें. याप्रकारें जाणण्याच्या रीतीला भागत्यागलक्षणा असें म्हणतात. या भागत्याग लक्षणेच्या योगानें जीव व ईश्वर यांचें ऐक्य सिद्ध होतें. कसें त पहा. परमेश्वराच्या परोक्ष देश, काल, अविद्या व अल्पज्ञता या उपाधि सोडून दोघांत समान दिसणाऱ्या चैतन्याकडे लक्ष दिलें म्हणजे दोहोंमध्यें एकच ब्रह्मवस्तु दिसूं लागते. भागत्यागलक्षणेमध्यें सामान्य भाग ग्रहण करून विशेष भाग सोडावयाचा असतो. त्याचप्रमाणें येथेंहि सर्वज्ञत्वादि वाच्यार्थ ईश्वरामधील विशेष व अल्पज्ञत्वादि वाच्यार्थ जीवामधील विशेष हे सोडून. दोहोंमधील सामान्य जें चैतन्य, तेवढयाच लक्ष्यार्थाचें ग्रहण केलें असतां अद्वैत सिद्ध होतें; यावर आंपली काय शंका आहे ? (उ.) प्रथमतः तुम्हीं जीवाला व ईश्वराला नित्य मानीत आहां कीं अनित्य तें सांगा. (प्र.) हे दोनहि भेद उपाधिजन्य कल्पित असल्यामुळें अनित्य आहेत. (उ.) बरें ती उपाधि नित्य आहे कीं अनित्य ? (प्र.) आमचें मत पुढील श्लोकांत स्पष्ट आहे

**जीवेशौ च विशुद्धा चिद्विभेदस्तु तयोर्द्वयोः । अविद्या तच्चितोर्योगः षडस्माकमनादयः ॥**

**कार्योपाधिरयं जीवः कारणोपाधिरीश्वरः । कार्यकारणतां हित्वा पूर्णबोधोऽवशीष्यते ॥**

कारिका—शारीरभाष्य—संक्षेपशारीरिक.

(१) जीव, (२) ईश्वर, (३) ब्रह्म, (४) जीवेश्वरांचा विशेष भेद, (५) अविद्या व (६) अविद्या व चेतन याचा योग हे सहा पदार्थ आम्हां वेदान्त्यांच्या मतानें अनादि आहेत; पण त्यांतहि एक ब्रह्म अनादि अनन्त असून दुसरे पदार्थ प्रागभावाप्रमाणें अनादि सान्त आहेत. जोंपर्यंत अज्ञान असतें तोंपर्यंत हे पांच असतात व तोंपर्यंत यांच्या आदीचें ज्ञान होत नसतें. म्हणून यांना अनादि असें म्हणतात. पण जेव्हां ज्ञान होतें तेव्हां यांचा नाश होतो. म्हणून यांना सान्त (नाशवान्) असें म्हणतात. (उत्तर) हे दोनहि तुमचे श्लोक असंबद्ध आहेत. कारण तुमच्याच मताप्रमाणें कल्पना केली तरीहि अविद्येच्या योगाशिवाय जीव व मायेच्या योगाशिवाय ईश्वर तुमच्या मतानें सिद्ध होत नाहीं. अविद्या माया यांचीं, अनुक्रमें जीव व ईश्वर यांच्याशीं योग होण्यामध्यें चरितार्थता झाल्यामुळें 'तच्चितोर्योगः।' (अविद्या व चेतन यांचा योग) हा जो तुम्ही सहावा पदार्थ मानतां तो राहूंच शकत नाहीं. कारण अविद्या व माया यांची जीव व ईश्वर यांच्यशीं संबंध होऊन सार्थकता झाली. ज्या अर्थी ब्रह्म, माया किंवा अविद्या यांच्या योगाशिवाय ईश्वर बनत नाहीं, त्या अर्थी त्याला ब्रह्म व अविद्या यांच्या शिवाय पृथक् मानणें आवश्यक नाहीं. तात्पर्य इतकेंच कीं, तुमच्या मतानें फक्त दोनच मानावे लागतात. (१) ब्रह्म व (२) अविद्या. तुम्ही सहा पदार्थ मानूं शकत नाहीं, कारण सहा पदार्थांची उत्पत्ति या दोनच पदार्थांत आहे. तसेंच आपण कार्योपाधिपासून जीवाची व कारणोपाधिमुळें ईश्वराची सिद्धि करूं इच्छितां. पण हें जेव्हां आपण नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्तस्वभाव, अनंत अशा सर्वव्यापक ब्रह्मामध्यें अज्ञान आहे असें ठरवाल तेव्हांच सिद्ध होईल. त्या ब्रह्मामध्यें जर स्वाश्रय स्वविषयक अज्ञान सर्वत्र आहे असें मानाल तर तें ब्रह्म शुद्ध राहणार नाहीं व जर त्याच्या एका भागामध्यें अज्ञान आहे असें मानाल तर तें अज्ञान परिच्छिन्न होईल व तें लहान असल्यामुळें इकडून तिकडे तिकडून इकडे जाऊं शकेल. जेथें जेथें तें अज्ञान जाईल तेथें तेथें असलेलें ब्रह्म अज्ञानी होईल. जेथून तें नाहींसें होईल तेथील ब्रह्म ज्ञानी होईल व अशी अनावस्था झाल्यानें कोणत्याहि ठिकाणच्या ब्रह्माला अनादि शुद्ध ज्ञानयुक्त म्हणतां येणार नाहीं. जर एकाच भागांतील ब्रह्मांत कायमचें अज्ञान आहे असें मानाल तर सज्ञानी ब्रह्म व अज्ञानी ब्रह्म असे ब्रह्माचे दोन तुकडे मानावे लागतील व तसे मानलें म्हणजे ब्रह्माची अखंडता नाहींशी होईल. जर अखंड मानलें तर अज्ञानी नाहीं असें मानावें लागेल. ज्ञानाचा अभाव व विपरीत ज्ञान हे गुण आहेत म्हणून ते कोणत्या तरी द्रव्याशीं नित्य संबध्द असणार. हे जर आपण ब्रह्माचे गुण आहेत असें मानाल, तर त्यांचा समवाय संबंध होऊन ते कधींहि अनित्य होणार नाहींत व या गुणांचा ब्रह्माशीं नित्य संबंध झाल्यानें ब्रह्मामध्यें दुःखादि क्लेश नित्य आहेत असें मानावें लागेल. ज्याप्रमाणें शरीराच्या एका भागामध्यें फोड झाला असतां सर्व शरीरभर दुःख पसरतें त्याचप्रमाणें ब्रह्माच्या एका देशांत अज्ञान व दुख असल्यामुळें सर्व ब्रह्मामध्यें दुःखादि क्लेश उत्पन्न होतील. याप्रमाणें सर्व ब्रह्माला दुःखादिकांचा अनुभव येऊं लागला म्हणजे अनुभव येण्याला येथें अंतःकरणाचीहि कल्पना करावी लागेल. अंतःकरणरूपी उपाधीचा योग झाला म्हणजे ब्रह्मालाच जीवत्व येइल. या ठिकाणीं ब्रह्म व्यापक आहे कीं परिच्छिन्न आहे ? असा प्रश्न उत्पन्न होतो. जर ब्रह्म व्यापक मानून उपाधि परिच्छिन्न मानली तर अन्तः करणरूपी उपाधि इकडून तिकडे फिरते असें मानावे लागेल. ब्रह्म स्थिर असून उपाधि चंचल मानल्यावरहि एक आपत्ति येते. ती ही कीं, जेथें जेथें अंतःकरण जाईल तेथील शुद्ध ब्रह्माला अज्ञान उत्पन्न होईल व जेथून तें जाईल तेथील ब्रह्म अज्ञानरहित होईल. एका क्षणांत एके ठिकाणचें ब्रह्म ज्ञानी दुसऱ्या क्षणांत अज्ञानी अशी स्थिति होणें तुमच्या दृष्टीनें शक्य असल्यामुळें बंध व मोक्षहि क्षणभंगुर होऊं लागतील. तसेंच एका प्रदेशांतील एका काळीं पाहिलेल्या वस्तूचें स्मरण दुसऱ्या प्रदेशांत दुसऱ्या काळीं गेल्यावर राहणार नाहीं. कारण ज्या ठिकाणच्या ब्रह्मानें अंतःकरणाच्या सहाय्यानें पाहिलें तें

दुसऱ्या प्रदेशांतील ब्रह्म नव्हे; जर आपण म्हणाल कीं सर्व ठिकाणचें ब्रह्म एकच आहे तर त्याबरोबर हेंहि म्हणावें लागेल कीं, तें पूर्णज्ञानी आहे. अंतःकरणें भिन्नभिन्न असल्यानें ज्ञानहि भिन्नभिन्न होते असेंहि म्हणतांये णार न हीं. कारण अंतःकरण जड असल्यामुळें तें ज्ञानग्रहणाला असमर्थ आहे. केवळ ब्रह्माला किंवा अंतःकरणाला ज्ञान होत नाहीं, तर अंतःकरणस्थ चिदाभासाला ज्ञान होतें, असें जर म्हणाल तर, अंतःकरणद्वारा चैतन्यालाच ज्ञान होतें असें ठरतें. जर पूर्ण चैतन्याला अंतःकरणद्वारा ज्ञान होतें, तर त्याला अंतःकरणद्वारा सर्व ज्ञान न होतां नेत्रादिकांच्या योगानें थोडथोडें ज्ञान कसें होतें ? अशी आपल्या मतामध्यें अनेक प्रकारें अनवस्था उत्पन्न होते. अर्थात् कार्योपाधिकारणोपाधि वांच्या योगानें ब्रह्मच जीवरूप व ईश्वररूप बनतें असें मानतां येत नाहीं; तर **जीव** हा अनादि, अनुत्पन्न व अमृत स्वरूप आहे व त्याहून भिन्न असा **ईश्वर** आहे असें मानणें हेंच योग्य होय. या ईश्वरालाच ब्रह्म असें, म्हणतात. तुम्ही चिदाभासालाच जीव असें मानतां, पण **आभास** हा क्षणभंगुर असल्यामुळें नाश होतो, मग मोक्षसुखाचा अनुभव कोण घेणार ? म्हणून ब्रह्म जीव आणि जीव ब्रह्म झालेला नव्हता, झालेला नाहीं व होणार नाहीं, यांना एक मानणें हा सर्वथैव भ्रम आहे; यांत शंका नाहीं. **(प्रश्न) 'सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् ॥'** या छांदोग्यवचनामध्यें सजातीयविजातीय व स्वगत अवयवादि भेदशुन्य एकच अद्वैत ब्रह्म आहे, दुसरें कांहीं नाहीं असें सांगितलें आहे. तेव्हां या प्रमाणावरून अद्वैत सिद्ध होत नाहीं काय ? **(उत्तर)** नाहीं, कसें तें पहा. ( **यथा व्यावर्तकं विशेषणं भवति तथा प्रवर्तकं प्रकाशकमपि विशेषणं भवति** ) 'विशेषण जसें व्यावर्तक असतें तसेंच तें प्रकाशकहि असतें. वरील छांदोग्यवचनांतील 'अद्वितीयम्' हें विशेषण ब्रह्माचें आहे, हें विशेषण सृष्टींतील अनेक जीव व तत्व यांपासून एका ब्रह्माचें पृथक्त्व दाखवितें; या विशेषणांतील व्यावर्तक गुण झाला. तसेंच त्याच विशेषणानें ब्रह्माच्या एकत्वाचें प्रकाशन केलें हा त्याचा प्रवर्तक गुण झाला. तसेंच पहा—**अस्मिन्नगरेऽद्वितीयो धनाढ्यो देवदत्तः । अस्यां सेनायामद्वितीयः शूरवीरो विक्रमसिंहः ॥** 'या नागरांत देवदत्त हा अद्वितीय धनाढ्य आहे व या सैन्यांत विक्रमसिंह हा अद्वितीय शूर आहे.' या वाक्यांतील 'अद्वितीय' या शब्दानें दुसरे कोणीच मनुष्य नाहींत असें ठरत नसून या नगरांत देवदत्तासारखा धनाढ्य व या सैन्यांत विक्रमसिंहासारखा शूर कोणीहि नाहीं, त्याहून कमी प्रतीचे पुष्कळ आहेत; त्याचप्रमाणें पृथिवी आदि जड पदार्थ, पश्वादि प्राणी तसेच-वृक्षादिकहि पुष्कळ आहेत, यांचा 'अद्वितीयम्' या विशेषणानें निषेध केलेला नाहीं. तसेंच जीव प्रकृति हीं जरी ब्रह्माप्रमाणें नसलीं तथापि त्यांच्या अस्तित्वाचा विषेध वरील वचनांतील 'अद्वितीयम्' या पदानें केलेला नाहीं. ब्रह्माप्रमाणें ती नसून त्यांच्यांत कांहीं न्यूनता आहे असें मात्र या विशेषणानें दर्शविलें आहे. ब्रह्म सदैव एक आहे व जीव आणि प्रकृतिमधील तत्वेंहि अनेक आहेत; या अनंत तत्वांहून ब्रह्म निराळें व एक आहे एवढीच गोष्ट वरील 'अद्वितीयम्, या विशेषणानें सिद्ध केली आहे. या विशेषणानें जीव प्रकृति व कार्यरूपी जगत् यांचा अभाव किंवा निषेध होऊं शकत नाहीं, तर ते आहेत पण शुद्ध ब्रह्माहून न्यून आहेत इतकाच अर्थ होऊं शकतो. हें वचन अद्वैतसिद्धीला साधक नाहीं व द्वैतप्रतिपादनाला बाधकहि नाहीं. या सर्व गोष्टी तुम्ही शांतपणानें विचार केला असतां समजण्यासारख्या आहेत. **(प्रश्न)** अहो, जसे पूर्ण ब्रह्मामध्ये सत्, चित् व आनंद हे गुण आहेत त्याचप्रमाणें जीवामध्यें अस्ति, भाति व प्रियरूपता हे गुण आहेत. या दोघांच्याहि गुणांचें ऐक्य तर स्पष्ट असतांना तुम्ही अद्वैताचें खंडन कां करतां ? **(उत्तर)** अहो किंचित् साधर्म्य असल्यानें या दोहोंमध्यें एकत्व होत नसतें पहा पृथ्वी, जल व अग्नि ही तीन तत्वें दृढ, जड व भौतिक आहेत. म्हणून तीं एक नाहींत. यामध्यें वैधर्म्यहि बरेंच आहे पहा पृथ्वीमध्यें गंध, रुक्षता, काठिण्य इत्यादि गुण आहेत, जलामध्यें रस, द्रवत्व, कोमलत्व, इत्यादि गुण आहेत व त्याचप्रमाणें अग्नीमध्यें रूप, दाहकत्व इत्यादि गुण आहेत हे प्रत्येकाचे गुण निरनिराळे असल्यामुळें या तीन पदार्थांचें ऐक्य मानतां येणार नाहीं; तसेंच मनुष्यें व किडे डोळ्यांनीं पाहतात, तोंडानें खातात व पायांनीं चालतात. म्हणून दोघेहि एकच असें म्हणतां येणार नाहीं; कारण मनुष्याची आकृति व किड्याची आकृति यांत फार भेद आहे व शिवाय मनुष्याला दोन पाय असतात व किड्याला अनेक असतात इत्यादि भेद असल्यामुळें मनुष्य व किडा एकच असें म्हणतां येणार नाहीं; याचप्रमाणें परमेश्वरामध्यें अनंत क्रिया, ज्ञान, आनंद, सर्वव्यापकत्व

व निर्भ्रांतित्व इत्यादि गुण पूर्ण आहेत तसेच ते जीवामध्यें अल्पज्ञान, अल्पबल, अल्पस्वरूप, भ्रांतित्व व परिच्छिन्नत्व इत्यादि गुण ब्रह्मांच्या गुणाहून भिन्न असे आहेत शिवाय परमेश्वर अत्यंत सूक्ष्म व जीव हा व्याप्य असल्यामुळें तो ईश्वराहून किंचित् स्थूल असा आहे. अर्थात् गुणतः व स्वरूपताहि जीव व ईश्वर यांत भेद आहे. (प्रश्न)

**अथोदरमन्तरं कुरुते । अथ तस्य भयं भवति द्वितीयाद्वै भयं भवति ।।** बृहदारण्यक. ।।

'जो ब्रह्म व जीव यांत थोडा तरी भेद पाहतो त्याला भय उत्पन्न होतें, कारण दुसऱ्यापासून भय होतें' या वचनाच्या विरुद्ध आपण प्रतिपादन कां करितां ? (उत्तर) या वाक्याचा अर्थ असा नाहीं जो जीव किंवा परमेश्वर यांच्या अस्तित्वाचा निषेध करील, जो परमेश्वराला एकदेशीय मानील, जो परमेश्वराच्या आज्ञेचें उल्लंघन करून त्याच्या गुणकर्मस्वभावाविरुद्ध चालेल, अथवा दुसऱ्या मनुष्याशीं वैर करील त्याला भय उत्पन्न होईल, द्वितीयबुद्धि किंवा वैरबुद्धि ही भयाला कारण होत असते. परमेश्वराचा व माझा कांहीं संबंध नाहीं असें म्हणणें, किंवा तुला मी कांहीं समजत नाहीं असें म्हणून दुसऱ्याचा उपमर्द करणें, दुसऱ्याला दुःख देणें इत्यादि वैरबुद्धीमुळेंच भय प्राप्त होतें. व्यवहारामध्येंहि अविरोधाला ऐक्य असें समजतात. देवदत्त, यज्ञदत्त व विष्णुमित्र अगदीं एक आहेत या म्हणण्याचा अर्थ त्यांच्यांत विरोध नाहीं असाच होतो. त्याचप्रमाणें परमात्मा व जीवात्मा हे परस्पर अविरोधीं आहेत असें समजावें. विरोध असल्यानें दुःख प्राप्त होतें व विरोध नसतां सुख होतें, हा अनुभव सार्वत्रिक आहे. (प्रश्न) ब्रह्म व जीव सदोदियते भिन्न असतात कीं केव्हां तें एकहि होतात ? (उत्तर) यांचें उत्तर पूर्वी एकदां दिलेलें आहे तथापि पुनः सांगतो. साधर्म्य किंवा अन्वयभाव यांच्या योगानें ऐक्य होतें व वैधर्म्य किंवा व्यतिरेक यांच्या योगानें भिन्नत्व ठरतें, पहा. आकाश व इतर मूर्त द्रव्यें जड असल्यामुळें व आकाशापासून तीं केव्हांहि पृथक् राहत नसल्यामुळें तीं भिन्न नाहींत, असेंहि म्हणतां येईल व आकाश हें विभु, सूक्ष्म, अरूप, अनंत असें आहे व मूर्त द्रव्यें परिच्छिन्न, स्थूल, दृश्य व अल्प आकारवान् असल्यामुळें तीं आकाशाहून भिन्न आहेत असेंहि म्हणतां येतें. आकाशावांचून पृथिव्यादि द्रव्यें राहूं शकत नाहींत हा यांमधला सारांश आहे व त्याचप्रमाणें आकाशाहून मूर्त द्रव्यें स्वरूपतः भिन्न असल्यामुळें त्यांत व्यतिरेकहि आहे व म्हणून त्यांत भिन्नत्व आहे. याचप्रमाणें ब्रह्म व्यापक असल्यामुळें जीव व पृथिव्यादि द्रव्यें त्याहून अलग राहूं शकत नाहींत हें खरें; पण स्वरूपतः त्यांच्यांत भेद असल्यामुळें तीं सर्व एक आहेत असेंहि होत नाहीं. जसें घर बांधण्यापूर्वी माती, लांकूड, लोखंड वगैरे पदार्थ आकाशामध्येच होते, घर बांधल्यनंतरहि ते आकाशांतच असतात व घर मोडल्यानंतर ते आकाशांतच राहणार. अर्थात् जरी तीनही कालांमध्यें ते आकाशांत असले तरी त्यांच्यात व आकाशांत स्वरूपतः भेद असल्यामुळें ते व आकाश एकच असें कधीं म्हणतां येणार नाहीं, त्यचप्रमाणें जीवव सर्व पदार्थ यांमध्यें परमेश्वर व्यापक असल्यामुळें व ते व्याप्य असल्यामुळें परमेश्वरापासून ते कधींहि भिन्न नाहींत. तथापि त्यांच्यांत व परमेश्वरांत स्वरूपतः भेद असल्यामुळें ते केव्हांहि एक होत नाहींत. सांप्रतचे वेदांती लोक काण्या पुरुषाप्रमाणें आहेत. ते केवळ अन्वयालाचा पाहून सर्व एकच आहे असें समजतात. पण त्यांतील व्यतिरेकाकडे ते दुर्लक्ष करीत असतात. सगुणता व निर्गुणता, अन्वय व व्यतिरेक, साधर्म्य व वैधर्म्य, सामान्य व विशेष हे भाव ज्यांत नाहींत असें एकहि द्रव्य या जगांत आपणास दिसणार नाहीं. असें असतांहि हट्टानें एकत्व प्रतिपादण्यामध्यें काय लाभ आहे !!

**परमेश्वराचें सगुणत्व व निर्गुणत्व**—(प्र.) परमेश्वर सगुण आहे कीं निर्गुण ? (उ.) परमेश्वर सगुणहि आहे व निर्गुणहि आहे. (प्र.) एकच परमेश्वर सगुण व तोच निर्गुण कसा बरें असूं शकेल ? (उ.) 'यद्गुणैः सह वर्तमानं तत्सगुणम् । गुणेभ्यो यन्निर्गतं पृथग्भूतं तन्निर्गुणम् ।' जो गुणांसहित असतो त्याला सगुण व जो गुणरहित असतो त्याला निर्गुण असें म्हणतात. प्रत्येक पदार्थामध्यें स्वतःचे स्वाभाविक गुण असतात व दुसऱ्यांतील विरोधी गुण नसतात. यामुळें प्रत्येक पदार्थ सगुण व निर्गुण असूं शकतो. केवळ सगुण असा कोणताहि पदार्थ नाहीं. प्रत्येक पदार्थामध्यें स्वाभाविक गुणांनीं सगुणता व विरोधिगुणांच्या अभावामुळें निर्गुणता सदैव असते. पहा. पृथिव्यादि पदार्थामध्यें जडत्व, रूपत्वादि गुण आहेत, म्हणून ते सगुण; पण चैतन्याचे ज्ञानादि गुण त्यांच्यांत

नाहींत म्हणून ते निर्गुण होत. तसेंच चैतन्यामध्यें इच्छा, ज्ञान वगैरे गुण असल्यामुळें तें सगुण व त्यामध्यें जडाचे रूपादि गुण नसल्यामुळें तें निर्गुण होय. याचप्रमाणें परमेश्वरामध्यें स्वतःचे अनंत ज्ञान. बल, क्रियादि गुण असल्यानें तो सगुण आहे व त्यामध्यें रूपादि जडाचे. गुण व रागद्वेषादि जीवाचे गुण नसल्यानें तो निर्गुण आहे. (प्र०) साकाराला सगुण व निराकाराला निर्गुण म्हणतात, असें आम्हीं अनेक वेळा ऐकिलें आहे. परमेश्वर जेव्हां अवतार घेत नाहीं तेव्हां तो निर्गुण व जेव्हां तो अवतार घेतो तेव्हां तो सगुण असें कां समजूं नये ? (उ०) या कल्पना अविद्वानांच्या आहेत. साकारतेशीं सगुणत्वाचा कांहीं संबंध नाहीं हे थोड्याशा विचारअंतीं सर्वांस समजण्यासारखें आहे. जसें निराकारामध्यें गुण असतात तसे ते साकारामध्येंहि असतात (प्र०) परमेश्वर विरक्त आहे कीं आसक्त आहे ? (उ०) आपणांस उत्तम पदार्थांची प्राप्ति झाली पाहिजे असें वाटणें ही आसक्ति होय. परमेश्वराला अप्राप्य' कांहींच नाहीं, असें असल्यामुळें तो आसक्त (किंवा रोगी) नाहीं. तसेंच प्राप्त असलेल्या वस्तूचा त्याग करणाऱ्याला विरक्त असें म्हणतात. परमेश्वर सर्वत्र व्यापक असल्यामुळें कोणत्याहि पदार्थाला तो सोडूं शकत नाहीं, व सर्व पदार्थ नेहमीं त्याच्या जवळच असतात, त्यामुळें त्याला विरक्तहि म्हणतां येत नाहीं. (प्र०) ईश्वराला इच्छा आहे कीं नाहीं ? (उ०) ज्याला जी वस्तु अप्राप्त असते त्याला तीविषयीं इच्छा उत्पन्न होते. परमेश्वराला सर्व पदार्थ सर्वदा प्राप्त आहेत व तो पूर्ण सुखयुक्त आहे म्हणून त्याला इच्छा किंवा अभिलाषा केव्हांहि होत नाहीं. पण त्यामध्यें ईक्षणमात्र आहे. सर्व प्रकारच्या विद्यांचें दर्शन व सर्व सृष्टि उत्पन्न करणें याला ईक्षण असें म्हणतात. हें मात्र परमेश्वराच्या ठिकाणीं आहे. याप्रमाणें संक्षेपानें ईश्वरविषयक अनेक गोष्टींचें निरूपण झालें. सुज्ञानीं विचार करून विस्तारानें जाणावें.

## वेदांची उत्पत्ति व त्यांचें नित्यत्व.

**यस्मादृचो अपातक्षन् यजुर्यस्मादपाकषन् । सामानि यस्य लोमान्यथर्वाङ्गिरसो मुखं ।**
**स्कंभन्तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥** अथर्व. १०।२३।४।२०.

'ज्यापासून ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद प्रकाशित झाले तो कोण आहे बरें ? याचें उत्तर, ज्यानें सर्व उत्पन्न करून धारण केलें आहे तो परमात्मा वेदांचा प्रकाशकर्ता आहे, असें आहे.' तसेंचः—

**स्वयंभूर्याथातथ्यतोऽर्थान् व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥** यजु. ४०।८

'जो स्वयंभू, सर्वव्यापक, शुद्ध, सनातन, निराकार परमेश्वर आहे, तोच सनातन जीवरूपी प्रजांच्या कल्याणासाठीं, यथावत् रीतीपूर्वक वेदद्वारा सर्व विद्यांचा उपदेश करतो.' (प्र०) परमेश्वर निराकार आहे कीं साकार ? (उ०) परमेश्वर निराकार आहे. (प्रश्न) निराकार परमेश्वरानें जिव्हादि साधनांशिवाय वर्णोच्चार व वेदांचा उपदेश उपदेश कसा केला ? कारण वर्णोच्चाराला ताल्वादि स्थान व जिव्हादि अवयवांचें प्रयत्न यांची आवश्यकता असते. (उत्तर) परमेश्वर सर्व शक्तिमान् व्यापक असल्यानें जीवांना आपल्या व्याप्तीनेंच त्याला उपदेश करतां येण्यासारखा आहे व त्यामुळेंच मुखादि अवयवांची त्याला अपेक्षा नाहीं. आपणाहून भिन्न असलेल्या दुसऱ्या माणसाला उपदेश करण्यासाठीं वाणीची आवश्यकता व वर्णोच्चारासाठीं मुखादि अवयवांची आवश्यकता आहे. आपल्याच मनामध्यें जेव्हां विचार चालतात, तेव्हां मुखजिव्हादिकांची हालचाल न होतां आपोआप शब्दोच्चारण होत असतें. दोनहि कानामध्यें बोट घातलें असतां मुखादिकांच्या प्रयत्नाशिवाय कसा शब्द निघत असतो हें स्पष्ट समजेल. अर्थात् भिन्न मनुष्याला उपदेश करण्यासाठीं मुखाच्या प्रयत्नाची आवश्यकता असते. परमेश्वर जीवांशीं अगदीं संलग्न आहे, इतकेंच नव्हें तर तो त्यांमध्यें पूर्णपणें व्यापक आहे. तेव्हां तोंडानें शब्दोच्चार करून जीवांना उपदेश करण्याची परमेश्वराला जरूरी नाहीं. तो आपल्या सान्निध्यानेंच त्यांना उपदेश करतो व अशा रीतीनें परमात्मस्फूर्तीनें जीवांमध्यें वेद प्रकट होतात व ते जीव आपल्या मुखांनीं उच्चारून इतरांना वेदांचा उपदेश करतात. (प्रश्न) केव्हां व कोणाच्या आत्म्यामध्यें वेदांचा उपदेश ईश्वरानें केला ? (उत्तर)

**अग्नेर्ऋग्वेदो वायोर्यजुर्वेदः सूर्यात्सामवेदः ॥** शतप० ११।५।२।३

'प्रथमतः सृष्टीच्या प्रारंभीं परमेश्वरानें अग्नि, वायु, आदित्य व अंगिरा या ऋषींच्या आत्म्यामध्यें एका एका वेदाचा प्रकाश केला.' (प्रश्न)

**यो वै ब्रह्माणं विदधाति पूर्वं वेदांश्च प्रहिणोति तस्मै ॥** श्वेताश्वेतर० ६।१८

इत्यादि वचनामध्यें ब्रम्ह्याच्या हृदयामध्यें वेदांचा प्रकाश केला असें लिहिलें आहे. हें खरें कीं वरील शतपथांतील खरें ? (उत्तर) प्रथमतः वर दिलेल्या ऋषींच्या अंतःकरणांत वेदाचा प्रकाश झाल्यानंतर त्यांच्याद्वारें ब्रम्ह्याच्या आत्म्यामध्यें वेद स्थापित झाले. पहा—

**अग्निवायुरविभ्यस्तु त्रयं ब्रह्म सनातनम् । दुदोह यज्ञसिद्ध्यर्थमृग्यजुः सामलक्षणम् ॥** मनु १।२३

परमेश्वरानें सृष्टीच्या प्रारंभीं मनुष्यांना उत्पन्न करून अग्नि आदि चार महर्षींना वेदांचा उपदेश केला व ब्रम्ह्यानें त्या चार ऋषींपासून ऋग्वेदादि चारहि वेदांचें ग्रहण केले. (प्रश्न) या चारच ऋषींमध्यें वेदांचा प्रकाश परमेश्वरानें केला व इतरांमध्यें केला नाहीं, यावरून परमेश्वर पक्षपाती होत नाहीं काय ? (उत्तर) तेच महर्षी इतरांपेक्षां पवित्र होते. म्हणूनच त्यांना उपदेश केला. (प्रश्न) वेद संस्कृत भाषेंतच कां प्रकाशित झाले ? (उत्तर) संस्कृतभाषा ही सर्व भाषांची जननी असल्यामुळें सर्वांत साधारण आहे. म्हणून परमेश्वरीय ज्ञान या सर्व साधारण भाषेमध्येंच लोकांना मिळालें. ज्याप्रमाणें पृथ्वी, जल वगैरे परमेश्वरदत्त पदार्थ सर्वांना साधारण आहेत त्याचप्रमाणें वैदिकज्ञानहि सर्वासाठींच असल्यामुळें संस्कृतभाषेंत दिलें असल्यानें सर्वांना साधारण होतें. जर तें कोणत्या तरी एका देशभाषेंत असतें तर तें सर्वांना साधारण झालें नसतें. (प्र०) वेद ईश्वरप्रणीत आहेत अन्यकृत नाहींत याला प्रमाण काय ? (उ०) जसा ईश्वर पवित्र, सर्व विद्या जाणणारा, शुद्धगुणकर्मस्वभावयुक्त, न्यायकारी, दयाळु आहे, त्याचप्रमाणें ज्या पुस्तकांत ईश्वराच्या गुणकर्मस्वभावानुकूल कथन असेल तेंच पुस्तकांत ईश्वरप्रणीत होय, अन्य नाहीं. तसेंच ज्यामध्यें सृष्टिक्रम. प्रत्यक्षादि प्रमाण, आप्तपुरुष व पवित्रात्मे यांचे व्यवहार इत्यादिकांच्या विरुद्ध कथन नसेल तें ईश्वरोक्त असें समजावें. जसें ईश्वराचें ज्ञान निर्भ्रम आहे, त्याचप्रमाणें ज्या पुस्तकांत निर्भ्रांत ज्ञानाचें प्रतिपादन केलें असेल त्याला ईश्वरोक्त असें म्हणावें. जसा परमेश्वर आहे व त्यानें जसा सृष्टिक्रम बनविला आहे, तसेंच ज्या पुस्तकांत परमेश्वर, सृष्टिकार्य, कारण व जीव इत्यादिकांविषयीं प्रतिपादन केलें असेल त्याला ईश्वरोक्त असें समजावें. वेदांमधील सर्व प्रतिपादन असेंच निर्दोष असल्यामुळें सर्व वेद ईश्वरप्रणीत आहेत असें समजावें. बायबल, कुराण वगैरे ग्रंथ तसे नाहींत, त्यांतील मजकूर असंबद्ध असल्यामुळें त्यांना ईश्वरप्रणीत असें म्हणतां येत नाहीं. याविषयीं विशेष स्पष्टीकरण पुढें करण्यांत येईल. (प्रश्न) वेद ईश्वरानेंच केले पाहिजेत असें नाहीं. मनुष्यें क्रमशः आपलें ज्ञान वाढवून तशीं पुस्तकें नाहीं कां रचूं शकणार ? (उत्तर) वैदिकज्ञानाशिवाय मनुष्यें आपलें ज्ञान वाढवूं शकणारच नाहींत. कारणाशिवाय कार्याची उत्पत्ति केव्हांहि होत नसते. जंगलांत हजारों वर्षें राहणारे लोक केवळ सृष्टी पाहून विद्वान् होत नाहींत. त्यांना जर शिकविलें तरच ते विद्वान् होतात. सध्यांहि शिकविल्याशिवाय कोणी विद्वान् होत नाहीं हा सार्वत्रिक अनुभव आहे. यावरून उघड दिसतें कीं जर परमेश्वरानें सृष्टीच्या आरंभीं त्या चार ऋषींना ज्ञान दिलें नसतें व जर त्यांनीं इतरांना उपदेश केला नसता तर आजपर्यंतचे सर्व लोक अविद्वानच राहिले असते. म्हणून शिक्षणपरंपरा चालूं ठेवणें हें विद्वानांचें काम आहे. शिक्षण दिल्याशिवाय कोणीहि सुशिक्षित होत नसतो. जर एखाद्या मुलाला लहानपणापासून अज्ञानी लोकांमध्यें नेऊन ठेविलें तर त्या सोबत्याप्रमाणें त्याचें मन असंस्कृत दिसेल. धनगर, जंगली व भिल्ल लोक शिक्षणाच्या अभावामुळेंच असे राहिले आहेत. शिवाय जोंपर्यंत आर्यावर्त देशांतून युरोप व यूनान देशांतील लोकांना शिक्षण मिळालें नव्हतें तोपर्यंत त्यांची दशा काय होती ? ते सुसंस्कृत होण्याला आर्यावर्तांतील विद्याच कारणीभूत झाली, हें इतिहास-प्रसिद्ध आहे. अमेरिकेंत रेडइन्डियन लोक लाखों वर्षें कसे अडाणी होते ? कोलंबसानें तें खंड शोधून काढल्यानंतर व युरोपियन लोक तेथें जाऊन राहिल्यानंतर आतां तेच अमेरिकेचे मूळचे रहिवासी कसे सुशिक्षित होऊं लागले आहेत हें पाहिलें म्हणजे मनुष्यें आपपोआपच ज्ञान शोधूं शकत नाहींत हें स्पष्ट दिसेल. मनुष्यांना मार्गदर्शक म्हणून वैदिक ज्ञान

पाहिजे म्हणजे त्याच्या आधारानें ते पुढें अनेक प्रगति करूं शकतात. म्हणूनच परमेश्वरानें सृष्टीच्या आरंभीं वेदांचा उपदेश केला व शिक्षणपरंपरा सुरूं केली व तिच्या योगानें उत्तरोत्तर लोक विद्वान् होत आले आहेत; म्हणूनच—

**स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्** ।। योग० समा० २६

त्या परमेश्वराला ' गुरु 'असें म्हणतात. ज्याप्रमाणें आम्ही अध्यापकांकडून विद्या मिळवून विद्वान् होतो, त्याचप्रमाणें सृष्टीच्या आरंभीं अग्न्यादिक ऋषींना परमेश्वरानें सर्व विद्यांचा उपदेश केला; म्हणून तो सर्वांचा गुरु होय. जीव जसा सुषुप्तिमध्यें व प्रलयामध्यें ज्ञानरहित होतो तसा परमेश्वर होत नाहीं. कारण त्याचें ज्ञान नित्य व एकरस आहे म्हणून तोच प्रलयकाळ संपल्यावर सृष्टि उत्पन्न करून वेदांचा ऋषींना उपदेश करतो. अर्थात् निमित्तावांचून नैमित्तिक कार्यसिद्धि होते असें कोणीहि समजूं नये. **(प्र०)** वेद संस्कृत भाषेंत असल्यामुळें त्यांचा अर्थ त्या अग्न्यादिकांना कसा समजला ? आधीं भाषेचें ज्ञान करून देऊन मग त्यांना परमेश्वरानें वेदांचा उपदेश केला कीं काय ? **(उ०)** वैदिकज्ञान ऋषींना ध्यानावस्थित स्थितिमध्यें अंतः स्फूर्तीनें होतें. ऋषींच्या आत्म्यांचा परमात्म्याशीं संयोग झाला म्हणजे स्वयंमेव वैदिक ज्ञानाची उमज त्यांना पडते, त्याला आधीं भाषा शिकण्याची आवश्यकता नाहीं. जेव्हां धर्मात्मे, योगी, महर्षि लोक ज्या ज्या अर्थज्ञानाची इच्छा करून ध्यान लावून बसतात त्यांना तें तें ज्ञान समाधिदर्शेतील परमात्मसान्निध्यानें होतें. अर्थात् परमेश्वरानेंच त्यांना अर्थ समजाविले. अशा वैदिक अर्थज्ञानाचा प्रकाश जेव्हां अनेकांच्या अंतःकरणांत पडला तेव्हां त्यांनीं तो अर्थ व ऋषिमुनींचे इतिहास मिळून **'ब्राह्मण'** ग्रंथ बनविले. ब्रह्म हें नांव वेदाचें आहे, त्या वेदाचें ज्यांत व्याख्यान आहे ते ब्राह्मण ग्रंथ होत.

'ऋषयो वेदमन्त्राः' ज्या मंत्रांत जे ऋषित्व होतें त्याचे जे प्रकाश झाले त्यांना त्या मंत्रांतील ऋषित्वाची संज्ञा प्राप्त झाली:—

**ऋषयो मंत्रदृष्ट्यः...मंत्रान्संप्राददुः** ।। निरु० १।२०

ज्या ज्या मंत्राचा अर्थ ज्या ज्या ऋषीला प्रथमतः समजला व ज्याच्या आधीं त्या त्या मंत्राचा अर्थ कोणीहि प्रकाशित केला नव्हता, तो त्यांनीं मंत्राची व्याख्या प्रथमतः करून दुसऱ्यांना त्याचा उपदेश केला. म्हणून ऋषीचें *नांव त्या त्या मंत्राबरोबर अजूनपर्यंतहि स्मरणार्थ लिहिलें जातें. हे ऋषि त्या त्या मंत्राचे कर्ते नसून त्यांच्या अर्थाचे* प्रकाशक आहेत. **(प्रश्न)** कोणकोणत्या ग्रंथांचें वेद असें नांव आहे ? **(उत्तर)** ऋक्, यजुः, साम व अथर्व या चार मंत्रसंहितेला वेद असें म्हणतात अन्य ग्रंथाला वेद ही संज्ञा मिळत नाहीं.

**(प्रश्न)** '**मंत्रब्राह्मणयोर्वेदनामधेयम्** ।' या कात्यायनमुनिप्रणीत वचनानें मंत्र व ब्राह्मणें यांना मिळून वेद म्हणतां येईल कीं नाहीं ? **(उत्तर)** संहिताग्रंथालाच अनादिकालपासून वेद असें समजत आले आहेत, तसें ब्रह्मणग्रंथांना नाहीं. निरुक्तामध्येंहिः—

**इत्यपि निगमो भवति । इति ब्राह्मणम्** ।। निरु० ५ खं. ३।४

याप्रमाणें ' निगम ' व ' ब्राह्मण ' असा स्पष्ट भेद केलेला आहे. पाणिनिमुनीनें अष्टाध्यायीमध्येंहि—

**छन्दो ब्राह्मणानि च तद्विषयाणि** ।। अष्टा० ४।२।६६

असाच 'छंदः' व 'ब्राह्मण' असा भेद केला आहे. तात्पर्य सर्व ऋषिमुनि लोक मंत्रभागालाच वेद असें मानितात व ब्राह्मणग्रंथांला वेदांची व्याख्यानें असें मानितात. कात्यायनानें स्वतःच्या ग्रंथापुरती आपली परिभाषा बनविली आहे ती इतर सर्व ऋषींच्या मतांच्या विरुद्ध असल्यामुळें ग्राह्य मानतां येत नाहीं. ब्राह्मण ग्रंथांत ऋषि, राजे यांच्या अनेक कथा आहेत, हे त्या त्या पुरुषांचे इतिहास असल्यामुळें ते ते पुरुष झाल्यानंतर लिहिले गेले आहेत. वेद तर अनादि व सनातन आहे, अशा सनातन वेदामध्यें ब्राह्मणांतील कथांचा अंतर्भाव कसा होईल ? अर्थात् ब्राह्मणग्रंथांना वेद मानणें *म्हणजे वेदाचें सनातनत्व नाहींसें करण्यासारखें आहे. मंत्र भागामध्यें असे इतिहास नाहींत.* पण अनेक विद्यांचा बोध

ज्यांच्या योगानें होईल अशा शुद्ध शब्दांचा प्रयोग त्यांत केलेला आहे; त्यामध्यें कोणत्यहि मनुष्यविशेषांचें नांव, कथा किंवा तशा प्रसंगाचा उल्लेख मुळींच नाहीं. (प्र०) वेदांच्या शाखा किती आहेत ? (उ०) वेदांच्या अकराशें सत्तावीस शाखा आहेत. (प्र०) म्हणजे काय ? (उ०) वेदांच्या व्याख्यानाला शाखा असें म्हणतात. (प्र०) सध्यां विद्वान् लोक वेदांच्या अवयवांनाच शाखा असें म्हणतात, तें खरें कीं काय ? (उ०) थोडासा विचार केला असतां काय खरें तें सहज समजेल. पहा, जितक्या शाखा आहेत तितक्या आश्वलायनादि ऋषींच्या नांवांवर प्रसिद्ध आहेत. जसे चारहि वेदांना परमेश्वरकृत मानतात, त्याचप्रमाणें शाखांना अश्वलायनादि ऋषिकृत मानतात. सर्व शाखांमध्यें मंत्रांचें प्रतीक धरून त्यावर व्याख्या करून ग्रंथ बनविलेले असतात. जसें तैत्तिरीयशाखेमध्यें **'इषेत्वोर्जेत्वेति ।'** अशीं वेदांतील प्रतीकें धरून पुढें व्याख्यानें केलेलीं आहेत. अशा तऱ्हेचीं प्रतीकें धरून व्याख्या वेदामध्यें कोठेंहि केलेली नाहीं. म्हणून परमेश्वरकृत चार वेद हे मूलवृक्षस्कंध असून, त्यांच्या आश्वलायनादि शाखा ऋषिमुनिकृत आहेत. ज्याप्रमाणें मातापिता आपल्या पुत्रांची उन्नति इच्छित असतात, त्याचप्रमाणें परमेश्वरहि सर्व लोकांची उन्नति इच्छितो व म्हणूनच त्यानें अगदीं सृष्टीच्या प्रारंभीं सर्व लोकांच्या सुधारणेसाठीं वेदांचा प्रकाश केला. या वेदरूपी सूर्याच्या योगानें लोकांनीं आपला अज्ञानान्धकार नाहींसा करावा व ज्ञान मिळवून आनंद व सुख यांची अभिवृद्धि करीत जावी, हें सर्वांस योग्य आहे. (प्र०) वेद नित्य आहेत कीं अनित्य आहेत ? (उ०) वेद नित्य आहेत. कारण परमेश्वर नित्य असल्यामुळें त्याचे ज्ञानादि गुणहि नित्यच आहेत. जो पदार्थ नित्य असतो त्याचे गुणकर्मस्वभावहि नित्यच असतात व जो अनित्य असतो त्याचे अनित्य असतात. (प्र०) काय हीं वेदांचीं पुस्तकेंहि नित्य आहेत ? (उ०) नाहीं, पुस्तकें हीं पानें व शाई यांचीं बनलेलीं असतात. तीं नित्य कशीं असूं शकतील ? हीं पुस्तकें नित्य नसून वेदांतील शब्द, अर्थ व संबंध हे नित्य आहेत. (प्र०) तर मग परमेश्वरानें त्या चार ऋषींच्या आत्म्यामध्यें ज्ञान उत्पन्न केलें असेल व त्या ज्ञानाच्या योगानें त्या त्या ऋषींनीं हे वेद बनविले असतील ? (उ०) ज्ञान हें ज्ञेयावांचून होत नाहीं. गायत्र्यादि छंद, षड्जादि स्वर व उदात्तानुदात्तादि स्वर यांची ज्ञानपूर्वक छंदांमध्यें योजना ही सर्व परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणाकडूनहि होत नाहीं. ज्यांना वेदांतील स्वारस्य समजत नाहीं, ते मनुष्यकृत वेद आहेत असें म्हणतात. पण सर्व ज्ञानयुक्त प्रमादरहित वेद रचणें हें सर्वथैव मनुष्यशक्तीच्या बाहेरचें आहे, असें वेदज्ञानाचा आस्वाद घेतलेल्या माणसाला वाटल्यावांचून राहणार नाहीं. ऋषींनीं वैदिक ज्ञान संपादन केल्यानंतर व्याकरणनिरुक्तादि शास्त्रें बनविलीं आहेत. तीं अनेक विद्यांचा प्रकाश सर्व लोकांस सुगमतेनें व्हावा म्हणून होत. पण जर प्रारंभीं परमेश्वरानें वेदांचा प्रकाश केला नसता तर कोणाला कांहीं एक आलें नसतें व हीं सध्यां प्रचारांत असलेलीं शास्त्रेंहि प्रचारांत आलीं नसतीं. तात्पर्य वेद हे ईश्वरोक्त आहेत व त्यांच्या प्रमाणेंच सर्व लोकांनीं चाललें पाहिजे. वैदिक मत हेंच सर्वांसाठीं आहे, निदान सनातनधर्माभिमान्यांनीं तरी आपलें मत वेद आहे व वेदांमध्यें जें जें सांगितलें आहे त्यालाच आम्ही मानतों असेंच नेहमीं म्हटलें पाहिजे.

याप्रमाणें ईश्वर व वेद याविषयीं संक्षेपानें वर्णन झालें. आतां या पुढील भागांत सृष्ट्युत्पत्तीविषयीं लिहिलें जाईल.

**इति श्रीसुभाषाविभूषित ईश्वरवेदविषयो नाम सप्तमसमुल्लासः संपूर्णः ।। ७ ।।**

# अथ अष्टमसमुल्लासः

**अथ सृष्टयुत्पत्ति–स्थिति–प्रलयविषयान् व्याख्यास्यामः ।**

आतां सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व प्रलय यासंबंधानें लिहावयाचें आहे. याविषयासंबंधानें वेदांमध्यें पुढील मंत्र आहेतः—

**इयं विसृष्टिर्यत आ बभूव यदि वा दधे यदि वा न ।**
**यो अस्याध्यक्षः परमे व्योमन्त्सो अङ्ग वेद यदि वा न वेद ।।** ऋ. मं. १०।१२९।७

हे (अङ्ग) मनुष्या ! (यतः) ज्यापासून (इयम्) ही (वि–सृष्टिः) विविध सृष्टि (आबभूव) उत्पन्न झाली आहे, (दधे) जो तिचें धारण करतो व जो तिचा प्रलयहि करतो, तसेंच जो या सृष्टीचा (अध्यक्षः) स्वामी आहे, (परमे व्योमन्) व ज्या सर्व व्यापकामध्यें हें सर्व जगत् उत्पत्ति, स्थिति व लय यांना प्राप्त होतें, (स) तोच परमात्मा आहे असें (वेद) जाण, व दुसऱ्या कोणालाहि सृष्टिकर्ता मानूं नको. (या मंत्रांत परमेश्वरच सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करतो, असें सांगितलें आहे.) तसेंच—

**तम आसीत्तमसा गूढमग्रेऽप्रकेतं सलिलं सर्वमा इदम् ।।**
**तुच्छ्येनाभ्वपिहितं यदासीत्तपसस्तन्महिना जायतैकम् ।।** ऋ. मं, १०।१२९।३

(इदम्) हें सर्व जग (अग्ने) सृष्टीच्या पूर्वीं (तमः) अंधकारमय व (तमसा) अंधकारानें (गूढम्) झांकलेलें व यास्तव जाणण्यास कठीण होतें, असें हें (अप्रकेतम् सलिलम्) आकाशरूपीं सर्व जग (तुच्छ्येनाभ्वपिहितम्) अनन्त परमेश्वराच्या समोर त्याच्या एका देशामध्यें आच्छादित झालेलें असें होतें. नंतर, त्या परमेश्वरानें (तपसःमहिना) आपल्या महान् सामर्थ्याच्या योगानें कारणरूपापासून (एकं जायत) कार्यरूपीं केलें. [या मंत्रांत प्रलयकालीं जग अव्यक्त असतें असें सांगून, त्यालाच सृष्टीच्या आरंभीं आपल्याच सामर्थ्यानें परमेश्वर व्यक्त स्थितींत आणतो, असें आहे.]

**हिरण्यगर्भः समवर्त्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ।।**
**स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ।।** ऋ. मं. १०।१२१।१

हे मनुष्या ! जो (हिरण्यगर्भः) सूर्यादि तेजस्वी पदार्थांचा आधार व या (भूतस्य) उत्पन्न झालेल्या व उत्पन्न होणाऱ्या जगाचा (एकः) अद्वितीय (पतिः) स्वामी आहे. तो परमेश्वर या (अग्ने) सृष्टीच्या उत्पत्तीच्या पूर्वीहि विद्यमान होता. (सः) त्या परमेश्वरानें (पृथिवीम्) पृथ्वीपासून (द्याम्) सूर्यापर्यंत सर्व जग उत्पन्न करून (दाधार) त्याला आधार दिला आहे, त्या (कस्मै) सुखमय परमेश्वराची प्रेमानें भक्ति करावी. [या मंत्रांत परमेश्वर सृष्टीच्या पूर्वीं होता व त्यानें या जगाला आधार दिला आहे, असें सांगितलें आहे.] तसेंच—

**पुरुष एवेदँ सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम् । उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ।।**यजु. ३१ २

हे मनुष्या ! जो (पुरुषः) सर्वांमध्यें पूर्ण व्यापक पुरुष आहे व जो (अमृतत्वस्य) नाशरहित कारण व जीव यांचा (ईशानः) स्वामी आहे व जो (अन्नेन–अति–रोहति) पृथिव्यादि जड व जीव याहून निराळा आहे, तोच (पुरुषः) परमात्मा या सर्व भूत (भाव्यम्) भविष्य व वर्तमान जगताचा उत्पन्नकर्ता आहे. तसेंच—

**यतो वा इमानि भूतानि जायन्ते येन जातानि जीवन्ति ।**
**यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति तद्विजिज्ञासस्व तद्ब्रह्मेति ।।** तैत्ति० भृगु अ. १ ।।

'ज्या परमात्म्याच्या रचनेच्या योगानें हीं सर्व पृथ्व्यादि भूतें उत्पन्न होतात, ज्याच्या योगानें जीवनदशेला प्राप्त होतात व ज्याच्या योगानें प्रलयाला जातात, तेंच ब्रह्म होय; त्याला जाणण्याची इच्छा कर.' याचप्रमाणें ब्रह्मसूत्रामध्येंहि सांगितलें आहेः— **जन्माद्यस्य यतः** । उत्तरमीमां० १।१।२।।

'ज्याच्या योगानें या जगाची उत्पत्ति, स्थिति व प्रलय होतात तेंच ब्रह्म होय.' (**प्रश्न**) हें जग परमेश्वरापासून उत्पन्न झालें आहे कीं दुसऱ्या कोणापासून ? (**उत्तर**) परमेश्वर हा हें जग उत्पन्न करण्यांत निमित्त कारण आहे व प्रकृति उपादान कारण आहे. (**प्रश्न**) प्रकृति ही परमेश्वरानें उत्पन्न केलेली नाहीं काय ? (**उत्तर**) नाहीं ती अनादि आहे. (**प्रश्न**) अनादि म्हणजे काय व अनादि पदार्थ किती आहेत ? (**उत्तर**) जें उत्पन्न झालेले नसतें त्याला अनादि असें म्हणतात. परमेश्वर, जीव व जगताचें कारण हे तीन अनादि पदार्थ आहेत. (**प्रश्न**) या तुमच्या म्हणण्याला आधार काय ? (**उत्तर**) याला वेदाचा आधार आहे. पहा:—

**द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।।**
**तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभि चाकशीति ।।** ऋ. मं. १।१६४।२०

(द्वा) ब्रह्म व जीव हे दोनहि (सुपर्णा) चेतनत्व व पालनशक्ति या गुणामध्यें सदृश आहेत, (सयुजा) ते व्याप्य व व्यापकभावानें संयुक्त झालेले आहेत, (सखाया) ते परस्पर मित्र आहेत व सनातन व अनादि आहेत, (समानम्) या दोहोंप्रमाणेंच (वृक्षम्) अनादि मूलरूपकारण व शाखारूप कार्य यांनीं युक्त असा एक वृक्ष आहे. जो मूलरूपांत असतांना कारणस्थितींत असतो व स्थूल होऊन शाखारूप बनला म्हणजे त्याचा विस्तार होतो व हा विस्तार प्रलयीं छिन्नभिन्न होऊन पुनः तो कारणरूपाला जाऊन मिळतो. असा तिसरा अनादि पदार्थ आहे. याचे गुणकर्मस्वभावहि अनादि आहेत. पूर्वीं सांगितलेल्या जीव व ब्रह्म यांपैकीं जो जीव आहे तो या शाखामय वृक्षरूप संसारांतील पापपुण्याच्या फलांचा (स्वादु अत्ति) उत्तम प्रकारें आस्वाद घेतो. पण दुसरा जो परमात्मा आहे तो (अनश्नन्) फलांचा उपभोग करीत नसून, चारीहि बाजूंनीं, बाहेर व आंत सर्व ठिकाणीं प्रकाशमान् होत आहे. जीवाहून ईश्वर व ईश्वराहून जीव भिन्न आहेत. आणि या दोहोंपेक्षां (मूलजडकारण) प्रकृति स्वरूपतः भिन्न आहे. असे हे तीनहि अनादि पदार्थ आहेत.

**यथातथ्यतोऽर्थान् व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ।।** यजु ४०।८

'अनादि सनातन जीवरूप प्रजेकरितां परमेश्वरानें वेदाद्वारां सर्व विद्यांचा उपदेश केला आहे.' (या मंत्रांत परमेश्वराच्या गुरुत्वाचा उल्लेख आहे व जीव हे ज्ञान ग्रहण करणारे आहेत असें ध्वनित केलें आहे.) तसेंच—

**अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वीः प्रजाः सृजमानां स्वरूपाः**
**अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते जहात्येनां भुक्तभोगामजोऽन्यः ।।** श्वेताश्वे० ४।५।।

'प्रकृती, जीव व परमेश्वर हे तीनहि अज अर्थात् कधींहि जन्मास न आलेले असे आहेत. अर्थात् हे तीनहि अनादि असून सर्व जगताचें कारण आहेत, यांना कोणी कारण नाहीं. अनादि प्रकृतीचा उपभोग अनादि जीव करतो व फसतो तसा परमात्मा फसत नाहीं. तो प्रकृतीचा उपभोग घेत नाहीं यांपैकीं ईश्वर व जीव यांचीं लक्षणें पूर्वीं ईश्वराविषयीं निरूपण करतांना सांगितलेली आहेत. आतां प्रकृतीचें लक्षण पहावयाचें–

**सत्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृतिः प्रकृतेर्महान् महतोऽहंकारोऽहंकारात्पञ्चतन्मात्राण्युभयमिन्द्रियं पञ्चतन्मात्रेभ्यः स्थूलभूतानि पुरुष इति पञ्चविंशतिर्गणः ।।** सांख्य. १।६१

(सत्वम्) शुद्धता (रजः) मध्यता व (तमः) जडता या तीन वस्तु मिळून जो संघात होतो, त्याला प्रकृति असें म्हणतात. त्यापासून महतत्व–बुद्धि, तिच्यापासून अहंकार, त्यापासून पंचतन्मात्र (शब्द, स्पर्श, रूप, रस, गन्ध) हीं सूक्ष्म भूतें आणि दहा इंद्रियें व अकरावें मन, पंचतन्मात्रापासून पृथिव्यादि पंच स्थूल भूतें, हे चोवीस पदार्थ उत्पन्न झाले. 'पुरुष' अर्थात् जीव परमेश्वर हा पंचविसावा पदार्थ आहे. यांपैकी महत्तत्व, अहंकार व पंच सूक्ष्मभूतें हें सर्व मूल अविकृत प्रकृतीचें कार्य आहे व तेंच इंद्रियें, मन व स्थूल भूतें यांचें कारण आहे पुरुष हा कोणाची प्रकृति व कशाचें उपादान कारणहि नाहीं व कशाचें कार्यहि नाहीं. (**प्रश्न**) **सदेव सोम्येदमग्र आसीत् ।;** छांदो० ६।२।। **असद्वा इदमग्र आसीत् ।।** तैत्ति० ब्रह्मानं० अ० ७ ।। **आत्मैवेदमग्र आसीत् ।।** बृहदा० १।४।१ ।। **ब्रह्म वा इदमग्र आसीत् ।।** शत० ११।१।११।१ ।। ही उपनिषदांची वचनें आहेत.

'हे श्वेकेतो ! हें जग सृष्टीच्यापूर्वी सत्, असत्, आत्मा व ब्रह्मरूप होतें. व नंतर **तदैक्षत बहु:स्यां प्रजायेयेति । सोऽकामयत । बहु:स्यां प्रजायेयेति ।।** तैत्ति० ब्रह्मानंदव० अ० ६ ।।

'तोच आत्मा आपल्या इच्छेनें अनेक रूप बनला आहे.' तसेंच **सर्वं खल्विदं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन ।।** हेंहि उपनिषदाचें वचन आहे.

'हें सर्व जग खरोखरच ब्रह्म आहे. त्यांत नानाप्रकारचे पदार्थ कांहींच नाहींत. पण जें कांहीं आहे तें सर्व ब्रह्मरूप आहे.' इत्यादि वचनांमध्यें एकच ब्रह्म आहे असें सांगितलें असतां आपण कसे तीन पदार्थ अनादि मानितां बरें ? (उ०) या वरील वचनांचा असा अनर्थ करणें तुम्हांला योग्य नाहीं. कारण उपनिषदांमध्येंच अन्य ठिकाणीं काय काय लिहिलें आहे व त्या सर्वांची एकवाक्यता कशांत आहे तें आधीं पहा:—

**एवमेव खलु सोम्यान्नेन शुङ्गेनापो मूलमन्विच्छाद्भिः सोम्य शुङ्गेन तेजोमूलमन्विच्छ तेजसा सोम्य शुङ्गेन सन्मूलमन्विच्छ सन्मूलाः सोम्येमाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठा ।।** छां. ६।८।४

'हे श्वेतकेतो ! तूं अन्नरूपी पृथ्वी कार्यावरून जलरूपी कारणाला जाण, कार्यरूपी जलावरून तेजोरूपी मूल जाण व तेजोरूपी कार्यावरून (सत्-रूप) सद्रूप कारण जी नित्य प्रकृति आहे तिला तूं जाण. ही सत्यरूप प्रकृति सर्व जगाचें मूळ कारण व त्याच्या स्थितीचें स्थान आहे. सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वी हें सर्व जग असत्सदृश होतें व जीवात्मा, ब्रह्म व प्रकृति यांत लीन झालेलें होतें. त्याचा अभाव नव्हता. आतां 'सर्वं खल्विदं०' हें वाक्य 'वडाची साल पिंपळाला लावण्यासारखें आहे.' कारण—

**सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शान्त उपासीत ।।** छांदो० ३।१४।१ ।।
**नेह नानास्ति किंचन ।।** कठोप० अ० २ व० ४।११ ।।

**या निरनिराळया उपनिषद्वचनांतून घेऊन तें तुम्ही एक बनविलें आहे. ज्याप्रमाणें शरीराचे अवयव शरीराबरोबर असले तरच ते काम देऊं शकतात. पण ते निरनिराळे केले तर त्यांच्यापासून कांहीं होऊं शकत नाहीं, तद्वतच प्रकरणांतील वाक्य प्रकरणाच्या अनुरोधानें घेतलें, तरच तें अन्वर्थक असतें व तसें न करतां जर एका प्रकरणांतील वाक्य दुसऱ्या प्रकरणांतील वाक्याशीं जोडलें, तर तें अनर्थकारक होतें. प्रकरणानुकूल त्याचा अर्थ केला तर तो पुढें दिल्याप्रमाणें होतो—'हे जीव ! तूं ब्रह्माची उपासना कर, ज्या ब्रह्माच्या योगानें या जगाची उत्पत्ति, स्थिति व जीवन हीं होतात, ज्याच्या बनविण्यानें व धारण केल्यानें हें जग अस्तित्वांत आहे, किंवा जें ब्रह्माबरोबर सहचरित आहे, त्याला सोडून दुसऱ्या कशाचीहि उपासना तूं करूं नकोस.' तसेंच 'त्या चेतनमात्र अखंडैकरस ब्रह्मामध्यें नाना वस्तूंचा मिलाफ झालेला नाहीं. पण हें सर्व जगत् निरनिराळया रूपानें त्याच्या आधारानें राहिलें आहे.' (प्र०) जगाचीं**
कारणें किती आहेत ? (उ०) जगाचीं तीन कारणें आहेत. (१) निमित्त कारण, (२) उपादान कारण व (३) साधारण कारण. ज्याच्या बनविण्यानें कांहीं बनतें, बनविलें नाहीं तर कांहींच बनत नाहीं, अर्थात् आपण स्वतःच जें बनत नाहीं; पण प्रकारान्तरानें दुसऱ्याला बनवितें त्याला **'निमित्तकारण'** म्हणतात. ज्याच्यावांचून कांही बनत नाहीं व जें अवस्थान्तर पावून कांहीं पदार्थरूप बनतें किंवा बिघडतें त्याला **'उपादानकारण'** म्हणतात. पदार्थ बनविण्याचें जें साधन व साधारण निमित्त असतें त्याला **'साधारणकारण'** असें म्हणतात. निमित्तकारण दोनप्रकारचें आहे. एक सर्व सृष्टींला कारणद्वारां बनविणारें, धारण करणारें, प्रलय करणारें, त्याचप्रमाणें सर्वांची व्यवस्था ठेवणारें, असें मुख्य निमित्तकारण परमात्मा आहे. दुसरें परमेश्वराच्या सृष्टींतून पदार्थ घेऊन अनेक प्रकारचें कार्यांतर बनविणारा साधारण निमित्तकारण जीव आहे. परमाणुप्रकृति हें संसाराचें उपादान कारण आहे–हिलाच संसार बनविण्यची सामग्री असें म्हणतात. ही जड असल्यामुळें आपण स्वतः कांहीं बनूं व बिघडूं शकत नाहीं. दुसऱ्यानें हिला बनवावें तशी ही बनते किंवा बिघडते. कोठें कोठें जड पदार्थांच्या निमित्तानें जड पदार्थ बनत जातो किंवा बिघडतोहि. जसें परमेश्वररोचित बीज पृथ्वीमध्यें पडून त्याला पाणी मिळालें तर तें वाढून त्याचें झाड बनतें. पण

अग्नि आदि जडाच्या संयोगानें तेंहि नाश पावतें. पण याचें नियमपूर्वक बनविणें व बिघडविणें हें परमेश्वर व जीव यांच्या आधीन आहे. जेव्हां एखादी वस्तु बनविली जाते तेव्हां ती बनविण्याला ज्ञान, दर्शन, बल, हात आदि जीं नानाप्रकारचीं साकार व आकाशादि निराकार साधनें लागतात त्याला साधारण कारण म्हणतात. उदाहरणार्थ घडा बनविणारा कुंभार हा घड्याचें निमित्तकारण होय. माती उपादान. दण्डचक्रादि सामान्य निमित्तकारण होत, तसेंच घडा बनविण्यांत व बिघडण्यांत काल, आकाश, प्रकाश, डोळे, हात ज्ञान, क्रिया आदि साधारण निमित्तें व निमित्तकारणें पण होतात. या तीन कारणांवांचून कोणतीहि वस्तु बनत नाहीं व बिघडतहि नाहीं. (प्र०) आधुनिक वेदान्ती लोकांच्या मतानें परमेश्वर हा जगताचें **'अभिन्न निमित्तोपादान कारण'** आहे—

**यथोर्णनाभिः सृजते गृह्णते च ॥ मुंडको० १।१।७ ॥**

'जसा कोळी दुसरा कोणताहि बाहेरचा पदार्थ न घेतां आपल्याच शरीरांतून तंतु काढून त्याचें जाळें बनवितो व त्यांतच राहून खेळतो, तद्वत् ब्रह्माहि आपल्यामधूनच जगताला बनवून, आपणच जगदाकार होऊन त्यांत आपणच क्रीडा करीत असतें.' 'मी बहुरूप अर्थात् जगदाकार होईन अशी इच्छा व कामना करीत तें ब्रह्म संकल्पमात्रानेंच सर्व जगद्रूप बनतें.' तसेंच—

**आद्यावन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा ॥ गौडपादीय कारिका. श्लोक ॥३१ ॥**

ही मांडूक्य उपनिषदावर कारिका आहे.

'जें प्रथम नसून अंतींहि नसतें तें मध्यकालींहि नाहींच असें समजावें.' सृष्टीच्या आरंभीं जगत् नव्हतें व प्रलयामध्यें संसार राहणार नाहीं. म्हणून वर्तमानकालीं सर्व जगत् ब्रह्म आहे असें कां म्हणूं नये ?

(उ०) जर तुमच्या म्हणण्याप्रमाणें ब्रह्म हें जगाचें उपादानकारण असले तर ब्रह्म परिणामी व अवस्थान्तरयुक्त विकारी मानावें लागेल. शिवाय आपल्याला माहीत आहेच कीं, उपादानकारणचे गुणकर्मस्वभाव कार्यामध्यें येतात. म्हणून ब्रह्माचे गुण जगतामध्येंहि आले पाहिजेत. असें—

**कारणगुणपूर्वकः कार्यगुणो दृष्टः ॥ वैशेषि० २।१।२४ ॥**

उपादानकारणाचे सदृश कार्यामध्यें गुण येत असतात (तसेच गुण त्याच्या कार्यामध्येंहि येतात,)' या नियमाला अनुसरून पाहतां ब्रह्म सच्चिदानंदस्वरूप आहे. पण जगत् कार्यरूपामुळें असत्, जड व आनंदरहित आहे, ब्रह्म अज आहे ( उत्पन्न न झालेलें आहे ) पण जग उत्पन्न झालेलें आहे. ब्रह्म अदृश्य आहे पण जग दृश्य आहे ब्रह्म अखंड आहे, पण जग खंडरूप आहे. अर्थात् जर पृथ्व्यादि कार्य ब्रह्मापासून बनलें असे मानलें तर पृथ्व्यादि कार्याचे जडत्वादि गुण ब्रह्मामध्येंहि असले पाहिजेत. पृथ्व्यादि पदार्थ जसे जड आहेत, तसेंच ब्रह्महि पण जड असले पाहिजे, किंवा जसें ब्रह्म चेतन आहे तसेंच पृथ्व्यादि कार्य पदार्थहि चेतन असले पाहिजेत. पण ज्याअर्थी अशी वस्तुस्थिति नाहीं त्याअर्थी ब्रह्म हें सृष्टीचें उपादानकारण नव्हे हें खास. व जो तुम्ही कोळयाचा दृष्टांत दिलात तो तुमच्या मताचा साधक नसून बाधक आहे. जडरूपी कोळयाच्या शरीरामध्यें असणारा जीवात्मा हा निमित्त कारण असून त्याचें जड शरीर हें जड तंतूंच्या उत्पत्तीला उपादान कारण आहे व कोळी आपल्या शरीरांतून सूत काढूं शकतो व दुसरा कोणताहि प्राणी स्वश-रीरांतून तंतू काढूं शकत नाहीं हा एक परमेश्वराच्या अद्भुत रचनेचा प्रभाव आहे कोळयाप्रमाणें व्यापक ब्रह्महि आपणा मधील व्याप्य प्रकृति आणि परमाणु कारणापासून स्थूल जगताला बनवून, बाह्य भाग स्थूलरूपी करून आपण त्याचें व्यापक असून साक्षीभूत होऊन आनंदमय राहिलेलें आहे. आतां परमेश्वरानें ईक्षण ( दर्शन, विचार व कामना ) केलें कीं, 'मी सर्व जगताला बनवून प्रसिद्ध व्हावें.' अशीं जीं उपनिषदवाक्यें आहेत. त्यांचें विवरण असें आहे कीं, जेव्हां जग उत्पन्न होतें तेव्हांच जीवांचे विचार, ज्ञान, ध्यान, उपदेश, श्रवण इत्यादिकांमध्यें परमेश्वर प्रसिद्ध होतो व तसाच पुष्कळ स्थूल पदार्थासह तो वर्तमान आहे असें कळतें' पण जेव्हां प्रलय होतो, तेव्हां परमेश्वर व मुक्त जीव यांशिवाय परमेश्वराला जाणणारा कोणीहि असत नाहीं. आतां मांडूक्य उपनिषदावरील जी कारिका आहे तीहि भ्रामक आहे. कारण कीं प्रलयामध्यें जग प्रसिद्ध नव्हतें, आणि सृष्टीच्या अतापर्यंत म्हणजे प्रलयाच्या आरंभापासून पुनः सृष्टि उत्पन्न होईपर्यंत हें जगताचें कारण सूक्ष्म होऊन अप्रसिद्ध राहातें. तसेंचः—

**तम आसीत्तमसा गूढमग्रे ।। ऋ० मं० १०।१२९।३ ।।**
**आसीदिदं तमो भूतमप्रज्ञातमलक्षणम् । अप्रतर्क्यमविज्ञेयं प्रसुप्तमिव सर्वतः ।।** मनु० १।५ ।।

'हें सर्व जग पूर्वी प्रलयकालीं अंधकारानें आच्छिदत होतें. प्रलयाला आरंभ झाल्यानंतरहि हीच स्थिति असते या अवस्थेमध्यें तें कोणालाहि जाणण्यास अशक्य, अतर्क्य, प्रसिद्ध चिन्हांनीं युक्त नसल्यामुळें इंद्रियांना न समजणारें असें असतें. प्रलयकालीं असें असलें, तरी तें वर्तमानकालीं समजतें, दिसतें व प्रत्ययाला येतें अर्थात् तें यावेळीं प्रसिद्ध चिन्हांनीं युक्त व जाणण्यास योग्य असें होतें आणि त्याची यथावत् उपलब्धि पण होत असते. असें असतां त्या कारिकेमध्यें वर्तमानकालींहि जगाचा अभाव लिहिला आहे, तो सर्वथैव अप्रमाण आहे. कारण जें ज्ञात्याला प्रमाणांनीं जाणतां येतें व अनुभवाला येतें तें नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. **(प्रश्न)** जग बनविण्यामध्यें परमेश्वराचा काय हेतु आहे ? **(उत्तर)** त्याचा हेतु आम्ही सांगतों; पण जग न बनविण्यामध्यें परमेश्वराचा हेतु कांहीं सांगूं शकाल काय ? **(प्रश्न)** होय. जर त्यानें जग बनविलें नसतें तर तो सदैव आनंदामध्यें निमग्न राहूं शकतो व जीवांना पण सुखदुःखें प्राप्त झालीं नसतीं. **(उत्तर)** हें तुम्ही आळशी व दरिद्रि लोकांप्रमाणें बोललांत. पुरुषार्थी लोक असें कधींहि बोलणार नाहींत. प्रलयकाळीं जीवांना सुख किंवा दुःख असतें काय ? सृष्टीच्या सुखदुःखाची तुलना केली तर दुःखापेक्षां सुखच कितीतरी पटीनें जास्त आहे. पहा, बरेच पवित्रात्मे जीव मुक्तीचें साधन करून मोक्षाच्या आनंदाला प्राप्त झालेले असतात; पण प्रलयामध्यें सुषुप्तावस्थेप्रमाणेंच कांहीं न करतां असतात. तात्पर्य आळसामध्यें सुख नसून पुरुषार्थामध्यें सुख आहे. जर परमेश्वरानें जग उत्पन्न केलें नसतें तर पूर्वसृष्टींतील जीवांच्या पापपुण्यानुरूप कर्माचीं फलें त्यांना कशीं देतां आलीं असतीं व जीव कर्मफल कसें भोगूं शकता ? म्हणून दयाळु परमेश्वरानें सृष्टि उत्पन्न करून जीवांना उन्नतावस्थेला पोंचण्यास एक साधन करून दिलें आहे, या शरीराला डोळे असण्याचें काय प्रयोजन आहे ? असें जर तुम्हांला कोणी विचारलें तर तुम्ही हेंच सांगाल कीं, पाहण्याकरितां त्यांची आवश्यकता आहे, तद्वत् परमेश्वरामध्यें जगद्रचनेसंबंधानें जें विज्ञान–बल–क्रिया आहे, त्याचें सार्थक जग उत्पन्न केल्यावांचून होणार आहे काय ? त्या परमेश्वराच्या गुणांची सार्थकता सृष्टि उत्पन्न केल्यानेंच होणारी आहे, यापेक्षां तुम्हांला दुसरें कांहीं म्हणतां येणार नाहीं. परमात्म्याचे न्याय, धारण, दया, आदि गुण जगदुत्पत्ति केल्यानेंच सार्थ होणार आहेत. त्याचें सामर्थ्य जगाची उत्पत्ति, स्थिति, प्रलय व व्यवस्था करण्यानेंच सफल होणारें आहे अन्यथा नाहीं. जसा डोळयांचा स्वाभाविक गुण पाहणें हा आहे, तसाच परमेश्वराचा स्वाभाविक गुण जगताची उत्पत्ति करून सर्व जीवांना असंख्य पदार्थ देऊन परोपकार करणें हा आहे. **(प्रश्न)** ठीक आहे. आतां बीज आधीं कीं वृक्ष आधीं तें सांगा पाहूं ? **(उ०)** बीज आधीं, बीज, हेतु, निदान, निमित्तकारण हे शब्द एकाच अर्थाचे आहेत. कारणापासून कार्य होतें; म्हणून कारण किंवा बीज हें आधीं व वृक्ष किंवा कार्य नंतर असें समजावें. **(प्रश्न)** जर परमेश्वर सर्वशक्तिमान् आहे तर तो जीवाला व सृष्टीच्या कारणालाहि उत्पन्न करूं शकेल व जर त्याला उत्पन्न करतां येत नसेल तर तो सर्वशक्तिमान् तरी कसा ? **(उ०)** सर्वशक्तिमान् शब्दाचा अर्थ आम्ही पूर्वी सांगितलाच आहे. असंभव गोष्टी करणाऱ्याला तुम्ही सर्वशक्तिमान् समजतां काय ? जर असंभव गोष्टी तो करूं शकेल म्हणजे कारणावांचून कार्य करूं शकेल तर कारणाशिवाय दुसऱ्या ईश्वराला उत्पन्न करणें, स्वतः मरणें, जड, दुःखी, अन्यायकारी, अपवित्र आणि कुकर्मी होणें याहि गोष्टी ईश्वराच्या ठिकाणीं संभवतील काय ? वास्तविक पाहिलें असतां अग्नींतील उष्णता, पाण्यांतील शीतत्व, पृथ्वींतील जडत्व इत्यादि स्वाभाविक गुणवान् पदार्थांना परमेश्वरहि विपरीत करूं शकत नाहीं. कारण ईश्वराचे नियम सत्य व पूर्ण आहेत म्हणून तो आपल्या नियमांचें परिवर्तन करूं शकत नाहीं. तात्पर्य, सर्वशक्तिमान् पदाचा अर्थ नियमाविरुद्ध आचरण करणारा असा नसून 'दुसऱ्या कोणाच्याहि सहाय्यावांचून आपलीं सर्व कार्यें तो पूर्णपणें करूं शकतो' असा आहे. **(प्र०)** ईश्वर साकार आहे कीं निराकार जर निराकार आहे तर हस्तपादादि साधनांशिवाय तो जग कसें उत्पन्न करूं शकेल ? व जर साकार आहे तर त्यांचें काम निर्दोष आहेच. **(उत्तर)** ईश्वर निराकार आहे. जो साकार अर्थात् शरीरयुक्त आहे तो ईश्वरच नव्हे; कारण परिमितशक्तियुक्त, देशकालवस्तुपरिच्छिन्न, क्षुधा, तृषा, भेदन, शीतोष्ण ज्वर, पीडादि शारीरिक दुःखांसहित

तो होणार. पण हे जीवाचे गुण आहेत. जीव मात्र या पूर्वोक्त गुणांनीं युक्त असतो, तसा ईश्वर कधींहि होत नाहीं तुम्ही व आम्ही हे शरीरधारी आहोंत; म्हणून त्रसरेणु, अणु, परमाणु, आणि प्रकृति यावर आमचा ताबा नाहीं. जे स्थूल देहधारी आहेत त्यांचा या सूक्ष्मपदार्थांवर ताबा असूं शकत नाहीं. जर परमेश्वरहि देहधारी झाला तर त्याचीहि स्थिति अशीच होईल. परमेश्वर भौत्तिक इंद्रियगोलक व हस्तपादादि अवयवरहित आहे. परंतु त्याची शक्ति, बल, पराक्रम, अनन्त आहे. त्यामुळें जीवांकडून किंवा प्रकृतीकडून न होणारें असें सर्व काम तो करूं शकतो. तो प्रकृतीपेक्षां सूक्ष्म असून तीमध्यें व्यापून राहिलेला आहे व म्हणूनच त्यांना पकडून तो जगदाकार करतो. (प्र०) अहो ! मनुष्यांचे आईबाप साकार आहेत म्हणून यांची संततिहि साकार होते, जर ते निराकार असते तर संततिहि निराकार झाली असती; तद्वत्च परमेश्वर निराकार असल्यानें त्यानें बनविलेलें जगत् निराकारच असलें पाहिजे. असें असतां तें साकार कसें ? (उत्तर) हा तुमचा प्रश्न अज्ञानी मुलाप्रमाणें आहे. कारण मागें म्हटलें आहे कीं, परमेश्वर जगाचा उपादान कारण नसून निमित्तकारण आहे. प्रकृति व परमाणु स्थूल आहेत व ते जगाचें उपादान कारण आहेत. ते स्थूल कारण सर्वथा निराकार नाहींत, तर ते परमेश्वराहून स्थूल व अन्यकार्य जगतापेक्षा सूक्ष्म आकारवान् आहेत; म्हणून साकारापासून साकार बनतें असें समजावें. (प्र०) परमेश्वर कारणावांचून कार्याला उत्पन्न करूं शकत नाहीं काय ? (उ०) नाहीं कारण अभावांचा भाव होऊं शकत नाहीं म्हणजे जें वर्तमान नाहीं त्याचा भाव वर्तमान होणें सर्वथा असंभव आहे. एखाद्या गप्पा मारणाऱ्यानें म्हटलें कीं, मी वंध्यापुत्राचा विवाह पाहिला, त्या दोघांनीं नरशृंगाचें धनुष्य घेतलें होतें, खपुष्पाची माळ घातली होती, ते मृगजळाचें स्नान करीत होते, गंधर्व नगरामध्यें राहत होते, तेथें मेघांवाचून वृष्टि व पृथ्वीवांचून अन्नाची उत्पत्ति होत असते. या सर्व गोष्टी जशा असंभवनीय आहेत त्याप्रमाणें कारणावांचून कार्य होणें हेंहि असंभवनीय आहे. तसेंच माझे मातापितर नसून मी उत्पन्न झालों, माझ्या तोंडांत जिव्हा नसून मी बोलतों, बिळामध्यें सर्प नव्हता पण त्यांतून बाहेर निघाला, मी कोठेंहि नव्हतों व हेहि कोठें नव्हते व आम्हीं सर्वजण येथें आलों या सर्व गोष्टी प्रमत्तगीता-प्रमाणेंच अर्थात् मूर्ख लोकांच्या भाषणाप्रमाणेंच आहेत. (प्र०) जर कारणावांचून कार्य होत नाहीं तर कारणाचें कारण कोणतें ? (उ०) हे आपण लक्षांत ठेवा कीं. जें केवळ कारणरूप आहे तें कोणाचेंहि कार्य बनत नसतें. जें एकाचें कार्य बनतें व दुसऱ्याचें कारण असतें तें दुसरें होय (तें मूल कारण नव्हे.) जसें घराचें पृथ्वी हें कारण आहे; पण जलाचें कार्य होतें; जी आदिकारण प्रकृति आहे. ती अनादि आहे पहा—

**मूले मूलमाभावादमूलं मूलम् ॥ सांख्य० १।६७ ॥**

मूळाचें मूळ नसतें म्हणजे कारणाचें कारण नसतें, म्हणून अकारण असें जें सर्व कार्याचें कारण असेल तेंच मूळ कारण होय. कोणत्याहि कार्याचा आरंभ होण्यचें पूर्वी तीन कारणांची आवश्यकता असते. जसें वस्त्र बनविण्याकरितां प्रथम कोष्टी सूत व नलिकादि वस्तू पाहिजेत, तरच वस्त्र बनेल, तसेंच जगताची उत्पत्ति होण्याचे पूर्वी परमेश्वर प्रकृति, काल आणि आकाश, तसेंच अनादि जीवांचें अस्तित्व, इतक्यांची आवश्यकता आहे. यामुळें या जगाची उत्पत्ति होते. यापैकीं जर एक नसेल तर जग बनणार नाहीं. नास्तिक लोकांच्या ज्या कांहीं शंका व तर्क आहेत, त्यांचाहि या ठिकाणीं विचार केला पाहिजे:—

[१] **शून्यं तत्वं भावो विनश्यति, वस्तुधर्मत्वाद्विनाशस्य** ॥ सांख्य० ।१।४४।।

(प्रश्न) शून्य हाच काय तो पदार्थ आहे. सृष्टीच्या पूर्वी शून्य होतें व अंतींहि तें शून्यच असणार. कारण भावाचा अभाव होऊन अर्थात् वर्तमान पदार्थांचा अभाव होऊन सर्व शून्यच होणार आहे. (उ०) आकाश, अवकाश, अदृश्य बिंदू यांना शून्य असें म्हणतात. शून्य हा जड पदार्थ आहे, या शून्यामध्यें सर्व पदार्थ अदृश्य राहत असतात. जसें एका बिंदूची रेषा, रेषांच्या योगानें वर्तुलादि आकारयुक्त होत असल्यानें भूमि पर्वतादि ईश्वराच्या रचनेनें बनत असतात, तसेंच शून्याला जाणणारा शून्यच होऊं शकत नाहीं.

[२] अभावाद्भावोत्पत्तिर्नानुपमृद्य प्रादुर्भावात् ॥ न्याय० ४।१।१४ ॥

(प्र०) अभावापासून भावाची उत्पत्ति होते असें दुसरे कांहीं नास्तिक म्हणतात. बीजाचें मर्दन केल्यावांचून अंकुर येत नाहीं व बीज फोडून पाहिलें तर त्यांत अंकुर नसतो. बीजांत अंकुर नसतां अंकुराची उत्पत्ति होते. यावरून अभावापासून भावाची होते हें उघड होतें. (उ०) जो बीजाचा उपमर्द करीत आहे तो प्रथम बीजामध्येंच होता. जर नसता तर उत्पन्नहि झाला नसता व उपमर्दहि करूं शकला नसता.

[३] ईश्वरः कारणं पुरुषकर्माफल्यदर्शनात् ॥ न्या० ४।१।२१ ॥

(प्र०) तिसरा नास्तिक म्हणतो कीं, मनुष्य जशीं जशीं कर्में करतो तशीं सर्व कर्मांचीं फळें त्याला प्राप्त होत नाहींत. कांहीं कर्मांची फळें कर्त्याला मिळतच नाहींत असें आढळतें. अर्थात् कित्येक कर्में निष्फळ होतात. यावरून कर्मांचें फल देणें पूर्णपणें ईश्वराधीन आहे हें उघड होतें. त्याला वाटलें तर तो फल देतो, नाहींतर नाहीं. तात्पर्य, फल देणें ईश्वराधीन आहे. (उ०) जर तुम्हीं म्हणतां त्याप्रमाणें फल देणें ईश्वराधीन असेल तर कर्म न करतां तो का फल देत नाहीं ? यावरून हेंच समजावयाचें कीं, ईश्वर स्वतंत्रपणानें मनुष्यांना फल देत नाहीं. तर जीव जसें कर्म करतो तसेंच त्याला ईश्वर फल देतो. त्यामध्यें यत्किंचित्हि कमीजास्तपणा तो करीत नाहीं असेंच विचारांतीं सर्वांस वाटेल.

[४] अनिमित्ततो भावोत्पत्तिः कण्टकतैक्ष्ण्यादिदर्शनात् ॥ न्या० ४।१।२२ ॥

(प्र०) चवथा नास्तिक म्हणतो कीं, निमित्तावांचून पदार्थांची उत्पत्ति होते. बाभळ आदि पुष्कळ झाडांना आपोआपच तीक्ष्ण कांटे उत्पन्न होतात हें आपण पाहतों. यावरून जेव्हां सृष्टीचा आरंभ होतो तेव्हां निमित्तावांचूनहि शरीरादि पदार्थ उत्पन्न होतात असें दिसतें. (उ०) ज्यापासून जे पदार्थ उत्पन्न होतात तेंच त्यांचें निमित्त होय. कांटेच्या झाडानांच कांटे उत्पन्न होतात, इतरांना नाहीं. अर्थात् निमित्तावांचून कांहींहि होऊं शकत नाहीं.

[५] सर्वमनित्यमुत्पत्तिविनाशधर्मकत्वात् ॥ न्या० ४।१।२५ ॥

(प्रश्न) सर्व पदार्थ उत्पत्ति व विनाशवान् असल्यामुळें अनित्य आहेत, असें पांचवा नास्तिक म्हणतो, [आधुनिक वेदान्ती या पंचम कोटींतील आहेत.] त्यांच्या मतें:—

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः । ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥

'ब्रह्म सत्य, जग मिथ्या व जीव व ब्रह्मामध्यें भेद मुळींच नाहीं.' (उ०) जर सर्वांची नित्यता नित्य असेल तर सर्व अनित्य होऊं शकणार नाहीं. (प्रश्न) सर्वांची नित्यताहि अनित्यच आहे. जसा अग्नि काष्ठांना जाळून स्वतःहि नाश पावतो. (उ०) जें प्रत्यक्षादि प्रमाणांनीं अनुभवाला येतें, तें वर्तमानसमयींहि अनित्य मानणें सर्वथैव असंबद्ध आहे. परमसूक्ष्म कारणालाहि अनित्य म्हणतां यावयाचें नाहीं. ब्रह्म सत्य आहे व त्यापासून (तुमच्या मतें) जग उत्पन्न झालें आहे, त्याअर्थी त्या सत्य ब्रह्माचें हें जगद्रूपी कार्य कधींहि असत्य असूं शकणार नाहीं. स्वप्नाप्रमाणें किंवा रज्जुसर्पाप्रमाणें तें काल्पनिकहि मानतां येत नाहीं. कारण कल्पना हा गुण कोणाचा आहे ? द्रव्य व गुण हे कधींहि पृथक् पृथक् राहूं शकत नाहींत. जर कल्पनेचा कर्ता नित्य आहे तर त्याची कल्पनाहि नित्यच असली पाहिजे. कल्पना अनित्य ठरविली तर कर्ताहि अनित्य होईल. न पाहिलेल्या व न ऐकलेल्या पदार्थांविषयीं स्वप्न कधींहि पडत नाहीं. जागृत अवस्थेमध्यें जगांतील सत्य पदार्थ पाहून जे संस्कार आत्म्यावर होतात व त्यांमुळें ज्या वासना बनतात, त्यांचेंच स्वप्नांमध्यें प्रत्यक्ष दर्शन होतें, एकाला सुषुप्ति अवस्था प्राप्त झाली असतां त्याला त्यावेळीं जरी बाह्य पदार्थांचें ज्ञान नसलें तरी त्यावेळीं बाह्य पदार्थांचा अभाव असतो असें म्हणतां येणार नाहीं. त्यावेळीं बाह्य पदार्थ असतातच. त्याचप्रमाणें वर्तमानकाळीं दृश्यरूपानें सर्व पदार्थ आहेत व प्रलयकाळीं कारणरूपानें ते सर्व पदार्थ असतात. जर संस्कारांवांचून स्वप्न होत असते तर जन्मांधाला रूपाचें स्वप्न पडलें असतें, पण तसें होत नाहीं. कारण त्याच्या आत्म्यावर रूपाचे संस्कार झालेले नसतात. स्वप्नामध्यें संस्कार व वासना यांचाच काय तो संबंध असतो, बाहेरचे पदार्थ नेहमीं असतातच.

(प्र०) ज्याप्रमाणें जागृतींतील पदार्थ स्वप्नामध्यें व या दोनहि स्थितींतील पदार्थ सुषुप्तीमध्यें अनित्य होतात, त्याचप्रमाणें जागृतींतील पदार्थ स्वप्नवत् का मानूं नये ? (उ०) असें मानतां येत नाहीं. कारण स्वप्न व सुषुप्ति यांमध्यें बाह्य पदार्थांविषयीं ज्ञान नसतें, पण ह्यामुळें बाह्य पदार्थांचा अभाव असतो असें नाहीं; किंवा एकाच्या पाठीमागचे पदार्थ त्याला दिसत नसतात; म्हणून ते नाहींत असें म्हणतां येत नाहीं. तद्वतच स्वप्न व सुषुप्तीविषयीं जाणावें. तात्पर्य ब्रह्म, जीव व प्रकृति (जगाचें उपादानकारण) हे तीन पदार्थ अनादि व नित्य आहेत हेंच खरें आहे.

[३] **सर्वं नित्यं पञ्चभूतानां नित्यत्वात् ॥ न्या० ४।१।२९ ॥**

**(प्रश्न)** पंचभूतें नित्य असल्यामुळें सर्व जगहि नित्य आहे असें सहावा नास्तिक म्हणतो. **(उत्तर)** हें सत्य नाहीं. कारण आपण ज्या पदार्थांच्या उत्पत्तीचें व विनाशाचें कारण पाहतां, तें जर नित्य म्हटलें तर सर्व स्थूल जगत् व शरीर आणि घटपटादि पदार्थ उत्पन्न व नाश होत असतांना देखील यांना नित्य म्हणावें लागेल. पण वास्तविक तसें नाहीं, त्यांना कार्यस्थितींत नित्य मानतां यावयाचें नाहीं. अर्थात् ते अनित्य [बदलत जाणारे] आहेत.

[७] **सर्वं पृथग् भावलक्षणपृथक्त्वात् ॥ न्या० ४।१।३४ ॥**

**(प्रश्न)** सर्व पदार्थ पृथक् आहेत. ज्या ज्या पदार्थाला आपण पाहतों त्यांत दुसरा पदार्थ कोणताहि नाहीं असें मानवा नास्तिक म्हणतो. (उ०) अवयवामध्यें अवयवी, वर्तमानकाल, आकाश, परमात्मा आणि जाति पृथक् पृथक् पदार्थसमूहांमध्यें एक एक आहेत. यांपासून कोणताच पदार्थ पृथक् पृथक् राहूं शकत नाहीं; यासाठीं सर्व पदार्थ पृथक् नाहींत पण स्वरूपानें पृथक् आहेत व पृथक् पृथक् पदार्थांमध्यें एक पदार्थहि आहे.

[८] **सर्वमभावो भावेष्वितरेतराभावसिद्धेः ॥ न्या० ४।१।३७ ॥**

**(प्रश्न)** आठवा नास्तिक म्हणतो कीं, सर्व पदार्थांमध्ये इतरेतर पदार्थांचा अभाव सिद्ध होत असल्यामुळें सर्वच अभावमय आहे. गाईमध्यें घोडेपणा नाहीं व घोड्यामध्यें गायपणा नाहीं म्हणून दोघेहि नाहींत. (उत्तर) हें तर्कशास्त्र खोटें आहे. अहो, सर्व पदार्थांमध्यें इतरेतरभाव जरी असला तरी त्यांत स्वस्वभाव आहेच, गाईमध्यें जरी घोडेपणा नसला तरी गाईत गायपणा व घोड्यांत घोडेपणा आहेच. तात्पर्य सर्व पदार्थांतील स्वस्वभावामुळें सर्व पदार्थ आहेत. जर पदार्थांचा भाव नसेल तर त्यांमध्यें इतरेतरभाव तरी कसा संभवणार ? (प्र०) नववा नास्तिक म्हणतो कीं, स्वभावामुळें जगाची उत्पत्ति झाली आहे. पाणी व अन्न एकत्र कुजूं लागलें म्हणजे त्यांत किडे उत्पन्न होतात, बीज, पृथ्वी व जल यांच्या संयोगानें तृण, वृक्षादि व पाषाणादि उत्पन्न होतात. समुद्रावर वायूच्या योगानें लाटा व लाटांमुळें समुद्रफेन उत्पन्न होतो. हळद, चुना व लिंबाचा रस एकत्र मिळाल्यानें लालरंग उत्पन्न होतो. याचप्रमाणें हें जग सर्व तत्त्वांच्या स्वाभाविक गुणांमुळेंच उत्पन्न होतें. त्याला बनविणारा कोणीहि नाहीं. (उ०) जर केवळ स्वभावाच्या योगानेंच जगाची उत्पत्ति होईल तर केव्हांहि त्याचा विनाश होणार नाहीं किंवा विनाश जर स्वभावानेंच होत असेल तर उत्पत्तिहि होणार नाहीं. जर उत्पत्ति व विनाश हे दोनहि स्वभाव सर्व पदार्थांत आहेत, असें मानलें तर उत्पत्तिविनाशांची व्यवस्था कधींहि होणार नाहीं. म्हणजे उत्पत्ति व विनाश होणार नाहींत. जर दुसऱ्या निमित्तानें उत्पत्ति व विनाश होतात असें मानलें तर हें निमित्त त्या पदार्थांहून निराळें मानावें लागेल. जर स्वाभावामुळेंच उत्पत्ति व विनाश होतात तर विशिष्ट समयींच विशिष्ट पदार्थांची उत्पत्ति व विनाश कसा होईल ? यांची व्यवस्था कारणारें तत्त्व कोणतें ? जर स्वभावामुळेंच आपोआप सर्व होतें, तर या पृथ्वीजवळ दुसरें चंद्रसूर्यादि गोल कां उत्पन्न होत नाहींत ? तात्पर्य या पदार्थांच्या स्वभावाचें नियमन करणारा कोणीतरी असलाच पाहिजे. ज्याच्या योगानें जें जें उत्पन्न होतें, तें तें ईश्वरानें उत्पन्न केल्यामुळेंच होय. बीज, अन्न, जल, पृथ्वी यांच्या संयोगानें गवत, वृक्ष, कृमि वगैरे उत्पन्न होतात. बीजादि ईश्वरनिर्मित पदार्थ नसते तर वृक्षादि पदार्थ झाले नसते. हळद, चुना व लिंबाचा रस निरनिराळ्या ठिकाणाहून येऊन आपो आप एकत्र होत नाहींत; ते कोणीतरी एकत्र करावे लागतात. ते यथायोग्य प्रमाणामध्यें एकमेकांत मिसळें तरच लाल रंग होतो. प्रमाणांत कमजास्त झाल्यानें होत नाहीं; त्याचप्रमाणें प्रकृतिपरमाणूंचें ज्ञान व युक्ति

यांना परमेश्वरानें मिळविल्यावांचून जड पदार्थ स्वतः कोणत्याच कार्याच्या सिद्धीकरितां विशेष पदार्थ बनवूं शकत नाहींत एवढ्याकरितां स्वभावादिकांनीं सृष्टि होत नसून परमेश्वराच्या रचनेनेंच होते. (प्र.) या सृष्टीचा कोणीहि कर्ता नव्हता, नाहीं व असणारहि नाहीं. कारण ती अनादि कालापासून अशीच आहे. ही केव्हांहि उत्पन्न झाली नाहीं व हिचा विनाशहि केव्हां होणार नाहीं. (उत्तर) कर्त्यावांचून कोणतीहि क्रिया किंवा कोणताहि पदार्थ उत्पन्न होऊं शकत नाहीं. पृथ्व्यादि पदार्थांमध्यें संयोगविशेषाच्या योगानें जी विशेष रचना दिसतेती केव्हांहि अनादि होणार नाहीं शिवाय जें संयोगापासून बनतें तें संयोग होण्यापूर्वी असूं शकत नाहीं व वियोग झाल्यावरहि राहूं शकणार नाहीं. जर तुम्ही हें अप्रमाण मानीत असाल तर प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहा. पाषाण, हिरा किंवा पोलाद यांचे तुकडे केले. वितळविलें किंवा भस्म केलें, तर आपणास असें आढळून येईल कीं हे पदार्थ बारीकबारीक परमाणु एकत्र होऊन झाले आहेत। ज्याअर्थी हे पृथक् पृथक् परमाणु मिळून झालेले आहेत त्याअर्थी ते कालान्तरानें अवश्य वेगळे झाले पाहिजेत. अर्थात् अणूंच्या संयोगानें यांची उत्पत्ति व वियोगानें त्यांचा नाश होणार आहे. तात्पर्य अशी संयोगापासून उत्पन्न होणारी सृष्टि याच स्थितींत अनादि कशी असूं शकेल ? (प्रश्न) आपलें म्हणणें खरें मानलें तरी अनादि ईश्वर मानण्याची आवश्यकता राहत नाहीं. कारण योगाभ्यासानें अणिमादि ऐश्वर्य ज्याला प्राप्त झालें आहे व जो सर्वज्ञत्वादि गुणयुक्त केवल ज्ञानी झाला आहे त्या जीवालाच ईश्वर म्हणतात. (उत्तर) जर अनादि ईश्वर जगाचा स्रष्टा नसेल तर साधनांच्या योगानें अभ्यास करून सिद्ध होणाऱ्या जीवाला आधार जीवनरूप जगत् व शरीर, इंद्रियें व त्यांचे गोलक हीं साधनें कशीं प्राप्त झालीं असतीं ? यावांचून जीव आपलें साधन तयार करूं शकत नाहीं. जर हीं साधनें त्याला प्राप्त झालीं नसतीं तर तो सिद्ध तरी कसा झाला असता ? जीव पाहिजे तसें साधन तयार करून सिद्ध झाला तरी पण अनेक सिद्धियुक्त जी परमेश्वराची अनादि सनातन स्वयंसिद्धि आहे, ती सारखी सिद्धि जीव कधींहि प्राप्त करूं शकणार नाहीं. कारण जीवाचें परमावधिपर्यंत सामर्थ्य वाढलें तरीहि तें ज्ञान व सामर्थ्य परिमितच असणार ? तें परमेश्वराच्या अनंत ज्ञान व सामर्थ्याइतकें कसें होईल ? पहा, आजपर्यन्त परमेश्वरीय सृष्टीक्रमाला बदलणारा कोणी झाला नाहीं व पुढेंहि होणार नाहीं. उदाहरणार्थ अनादि सिद्ध परमेश्वरानें नेत्र व कान याच्या ठिकाणीं पाहणें व ऐकणें यांचा निर्बंध केला आहे. त्यांचा व्यतिक्रम आजपर्यंत कोणीहि योगी करूं शकला नाहीं. तात्पर्य योग्याचें सामर्थ्य ईश्वराईतकें होऊं शकत नाहीं. (प्रश्न) कल्पकल्पांतरीं ईश्वर सृष्टि निरनिराळी व विलक्षण बनवितो कीं सर्वदा एकसारखीच ? (उत्तर) जशी ही सध्यां आहे तशीच पूर्वीच्या कल्पांत होती व पुढच्यांतहि तशीच होईल. पहा—

**सूर्याचंद्रमसौ धाता यथा पूर्वमकल्पयत् । दिवं च पृथिवीं चान्तरिक्षमथो स्वः ।। ऋ. मं. १०।१९०।३**

**'परमेश्वरानें ज्याप्रमाणें पूर्वीच्या कल्पांत सूर्य, चन्द्र, विद्युत्, पृथ्वी, अंतरिक्षादि पदार्थ बनविले होते तसेच यामध्येंहि त्यानें बनविलेले आहेत व पुढच्यांतहि असेच करील.'** परमेश्वराचें काम प्रमादरहित असल्यामुळें नेहमीं एकसारखेंच असतें. जो अल्पज्ञ असतो व ज्याच्या ज्ञानामध्यें क्षय व वृद्धि होतात त्याच्या कामामध्यें चूकभूल होत असते. परमेश्वर सर्वज्ञ असल्यामुळें त्याच्या कामांत चूक होत नाहीं. (प्रश्न) सृष्टीच्या उत्पत्ती विषयीं वेदादिशास्त्रांमध्यें परस्परविरोध आहे, तो पहाः—

**तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः । आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी पृथिव्या ओषधयः । ओषधिभ्योऽन्नम् । अन्नाद्रेतः । रेतसः पुरुषः । स वा एष पुरुषोऽन्नरसमयः ।** तैत्तिरीयो० ।। ब्रह्म० अ० १ ।।

'त्या परमेश्वर व प्रकृतिपासून आकाश—अवकाश उत्पन्न झाला, (अर्थात् जें कारणरूप द्रव्य सर्वत्र पसरलेलें होतें तें एकत्र केलें असतां अवकाश उत्पन्न झाला असें म्हणतात. कारण आकाश हें वास्तविक उत्पन्न झालेलें नाहीं. प्रकृति व परमाणु राहण्याची जागा तेंच आकाश होय.) आकाशानंतर वायु, वायूनंतर अग्नि, अग्नीनंतर पाणी, पाण्यानंतर पृथ्वी पृथ्वीपासून औषधि, औषधींपासून अन्न, अन्नापासून वीर्य व वीर्यापासून पुरुष अर्थात् शरीर उत्पन्न होतें या ठिकाणीं आकाशादि क्रमापासून छांदोग्यामध्यें अग्नीपासून, ऐतरेयामध्यें जलापासून, वेदामध्यें कोठें पुरुषापासून,

कोठें हिरण्यगर्भापासून, मीमांसेमध्यें कर्मापासून, वैशेषिकामध्यें कालापासून, न्यायामध्यें परमाणूंपासून, योगामध्यें पुरुषार्थापासून, सांख्यामध्यें प्रकृतीपासून, वेदान्तामध्यें ब्रह्मापासून सृष्टि उत्पन्न झाली, असें सांगितलें आहे. यापैकीं कोणतें विधान खरें व कोणतें खोटें आहे बरें ? **(उत्तर)** हीं सर्व विधानें खरीं आहेत; यांत असत्य कोणतेंहि नाहीं. जो यांत विपरीतपण पाहतो तोच असत्य आहे. परमेश्वर हें निमित्तकारण व प्रकृति हें जगाचें उपादानकारण आहे. महाप्रलय झाल्यानंतर जेव्हां जेव्हां सृष्टीची उत्पत्ति होते. तेव्हां तेव्हां ती आकाशादि क्रमानें होते. जेव्हां आकाश व वायु यांचा प्रलय होत नाहीं व अग्न्यादिकांचा होतो तेव्हां अग्न्यादिक्रमानें व जेव्हां विद्युदग्नीचाहि नाश होत नाहीं, तेव्हां जलाच्या क्रमानें सृष्टीची उत्पत्ति होते. सारांश, ज्या ज्या प्रलयामध्यें जेथपर्यंत प्रलय होतो तेथून पुढें सृष्टीची उत्पत्ति होते. आतां पुरुष व हिरण्यगर्भ यांपासून सृष्टि झाली, असें विधान केलें तर त्यांत कांहींच विसंगतपणा नाहीं. कारण ती दोन्हीं नांवें परमेश्वराचींच आहेत; (प्रथम समुल्लास पहा.) आतां सहा शास्त्रांमध्यें विरोध आहे असें जें आपलें म्हणणें आहे तेंहि अयोग्य आहे. कारण एका कार्यांत एकाच ठिकाणीं विरुद्धवाद असेल तर त्याला विरोध असें म्हणतां येईल, तसा विरोध या सहा शास्त्रांत नाहीं. कसा तो पहाः—(१) मीमांसेमध्यें 'कर्म केल्याशिवाय जगांत कोणतेंहि कार्य होत नाहीं;' वैशेषिकामध्यें 'वेळेवांचून कांहीं होत नाहीं;' (३) न्यायामध्यें 'उपादान कारणाच्या अस्तित्वावांचून कांहीं होत नाहीं;' (४) योगामध्यें 'विद्याज्ञानविचार केल्याशिवाय कांहीं होत नाहीं;' (५) सांख्यामध्यें 'तत्त्वांचा मिलाफ झाला नाहीं तर कांहीं होत नाहीं;' व (६) वेदान्तामध्यें 'बनविणाऱ्यानें बनविलें नाहीं तर कोणताहि पदार्थ उत्पन्न होऊं शकत नाहीं,' असें सांगितलें आहे. या सहा कारणांनीं सृष्टि बनते. यांपैकीं एकेकाची व्याख्या एकेका शास्त्रांत केली आहे, म्हणून त्यांत विरोध मुळींच नाहीं. जसें, सहा पुरुषांनीं एक छप्पर उचलून भिंतीवर ठेवावें, त्याप्रमाणें सहा शास्त्रकारांनीं मिळून सृष्टिरूप कार्याची व्याख्या पुरी केली आहे. शास्त्रांत विरोध मानणारे अंधपरंपरेनें चालणारांपैकीं आहेत. पांच आंधळे व एक मंददृष्टि यांना एकानें हत्ती दाखविला, अर्थात् त्यापैकीं प्रत्येकाला हत्तीचा एक एक अवयव समजाविला व जेव्हां हत्ती कसा आहे म्हणून प्रत्येकाला विचारलें तेव्हां त्यापैकीं एक एक म्हणाला कीं, खांब, सूप, मुसळ, केरसुणी, चवुतरा व चार खांबावर म्हशीसारखा, असा हत्ती आहे. या आंधळयांप्रमाणें सध्यांच्या पंडिकांची स्थिति आहे. नवीन भेदजनक कुकल्पनांनीं भरलेले टीकायुक्त अनार्य ग्रंथ पाठ करून व प्राकृत भाषावाल्यांनीं ऋषिप्रणीत ग्रंथांचें अध्ययन करण्याचें सोडून, नवीन क्षुद्रबुद्धिकल्पित संस्कृत व इतर भाषांचे ग्रंथ शिकून ते एकमेकांची निंदा करण्यास तयार झाले आहेत; व त्यांनींच हा खोटा कलह माजविला आहे. या पंडितमन्यांचें म्हणणें बुद्धिवानांनीं किंवा सामान्यबुद्धीच्या लोकांनींहि मानणें योग्य नाहीं. त्याचप्रमाणें सध्यांच्या अल्पविद्यायुक्त, स्वार्थी, इंद्रियासक्त व आपणास धर्माभिमानी म्हणावें म्हणून अनेक ढोंगें करणाऱ्या लोकांच्या योगानें दिवसेंदिवस मनुष्यमात्राची फारच शोचनीय स्थिति होत चाललेली आहे. **(प्रश्न)** अहो ! जर कारणावांचून कार्य होत नाहीं, तर तें कारण तरी कोणत्या कारणापासून उत्पन्न झालें ? **(उत्तर)** अहो भोळे लोकांनों ! तुम्ही हें समजण्याकरतां आपल्या बुद्धीचा कां उपयोग करीत नाहीं ? पहा, या संसारामध्यें कारण व कार्य असें दोनच पदार्थ आहेत. कारणापासून कार्य होतें. जें कारण असतें तें कोणाचेंहि कार्य नसतें व जें ज्यावेळीं कार्य असतें, तें त्याचवेळीं कारण नसतें. जोपर्यंत मनुष्य सृष्टीला यथावत् जाणत नाहीं, तोपर्यंत त्याला यथावत् ज्ञान प्राप्त होत नाहीं.

**नित्यायाः सत्वरजस्तमसां साम्यावस्थायाः प्रकृतेरुत्पन्नानां परमसूक्ष्माणां पृथक्पृथग्वर्तमानानां तत्त्वपरमाणूनां प्रथमः संयोगारंभः संयोगविशेषादवस्थान्तरस्य स्थूलाकारप्राप्तिः सृष्टिरुच्यते ॥**

'अनादि नित्य स्वरूप व सत्व, रज, तम या तीन गुणांच्या एकावस्थारूप प्रकृतीपासून परमसूक्ष्म उत्पन्न झालेले पृथक् पृथक् तत्त्वावयव विद्यमान आहेत, त्यांचा प्रथमच जो संयोगारंभ आहे, त्या संयोगविशेषाच्या योगानें अवस्थान्तर होत होत दुसऱ्या अवस्थेंत स्थूल बनत व बनवीत चाललेली अशी विचित्र रूपानें बनलेली आहे, म्हणूनच हा संसर्ग होत असल्यामुळें हिला सृष्टि असें म्हणतात.' जो प्रथम संयोगामध्यें मिळणारा व मिळविणारा पदार्थ आहे, जो

संयोगाचा आदि व वियोगाचा अंत म्हणजे ज्याचा विभाग होऊं शकत नाहीं त्याला कारण असें म्हणतात. जें संयोगानंतर बनतें व वियोगानंतर तसें राहत नाहीं त्याला कार्य असें म्हणतात. या कारणाचें कारण, कार्याचें कार्य, कर्त्याचा कर्ता, साधनाचें साधन व साध्याचें साध्य याप्रमाणें वाद करणारे पहात असून आंधळे व ऐकत असून बहिरे आहेत व जाणत असून मूढ आहेत असें समजावें. डोळयाचा डोळा, दिव्याचा दिवा व सूर्याचा सूर्य होऊं शकतो काय? जे उत्पन्न झालें तें कार्य व ज्यापासून उत्पन्न झालें तें कारण होय व जो कारणाला कार्यरूप बनवितो तो त्याचा कर्ता होय.

**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः। उभयोरपि दृष्टोन्तस्त्वनयोस्तत्वदर्शिभिः॥** गी. २।१६

'असताचा भाव–वर्तमानता व सताचा अभाव–अवर्तमानता कधींहि होत नाहीं हें तत्वदर्शी लोकांनीं निश्चयपूर्वक जाणलें आहे.' हा सिद्धांत अन्यपक्षपाती, आग्रही, मलिनात्मा व अविद्वान् लोकांना सहज समजत नाहीं व ते अभावापासून उत्पत्ति होते असें समजतात. जो मनुष्य विद्वान् व सत्संगी नसतो व पुरा विचारहि करीत नाहीं तो सदैव भ्रमजालामध्यें पडलेला असतो. जे पुरुष विद्यांच्या सिद्धांताला जाणतात व जाणण्याची खटपट करितात व इतरांना निष्कपटीपणानें समजावितात तेच पुरुष धन्य होत. अर्थात् जे कारणांवांचून सृष्टीची उत्पत्ति मानतात ते कांहीं जाणत नाहींत. जेव्हां सृष्ट्युत्पत्तीचा वेळ येतो तेव्हां परमेश्वर त्या सूक्ष्म पदार्थांना एकत्र करतो. त्या प्रथमावस्थेंत जें परमसूक्ष्म प्रकृतिरूप कारणापासून जें थोडेंसें स्थूल बनतें तें **महत्तत्त्व** होय. नंतर त्यापेक्षां आणखी थोडें स्थूल होतें त्याला अहंकार असें म्हणतात. या अहंकारापासून भिन्न भिन्न पांच सूक्ष्म भूतें, श्रोत्र, त्वचा, नेत्र, जिव्हा, घ्राण हीं पांच ज्ञानेंद्रियें; वाक्, हस्त, पाद, उपस्थ व गुदा हीं पंच कर्मेंद्रियें व अकरावें मन हीं कांहीं स्थूल अशीं उत्पन्न होतात; आणि पंचतन्मात्रापासून अनेक स्थूल अवस्थान्तराला प्राप्त होत होत क्रमानें पंच स्थूल भूतें उत्पन्न होतात. ज्यांना आम्ही प्रत्यक्ष पहात आहों, त्यांपासून नानाप्रकारच्या वृक्षादि औषधि, त्यांपासून अन्न, अन्नापासून वीर्य व वीर्यापासून शरीर होतें. सृष्टीच्या प्रारंभीं मैथुनी सृष्टि नव्हती. जेव्हां परमेश्वरानें स्त्रीपुरुषांचीं शरीरें उत्पन्न करून त्यांत जीवांचा संयोग केला त्यानंतर मैथुनी सृष्टि उत्पन्न झाली व तेव्हांपासून ती तशीच आतांपर्यंत चाललेली आहे. पहा, परमेश्वरानें या शरीरामध्यें कशी ज्ञानपूर्वक रचना केली आहे! जिला विद्वान् लोक पाहून आश्चर्यचकित होतात. आंत हाडांचे सांधे, त्यांना नाड्यांचें बंधन, त्यांवर मांसाचें वेष्टन, चामडीचें झांकण, प्लीहा, यकृत्, फुप्पुस, हृदय, पंखा व कला यांची योजना, जीवाचा संयोग, डोक्यांतील अद्भुत मेंदूची रचना, लोमनखादिकांची उत्पत्ति, डोळयांची व्यवस्था, इंद्रियांच्या मार्गाचा प्रकाश, जीवाच्या जागृत, स्वप्न, सुषुप्ति या अवस्था व त्या भोगण्यासाठीं स्थानविशेषांची योजना, सर्व धातूंचें वर्गीकरण इत्यादि कलाकौशल्यस्थापनादि अद्भुत सृष्टीला परमेश्वरावांचून कोण बनवूं शकणार बरें? याशिवाय नानाप्रकारची रत्नें व अनेक खनिज द्रव्यें व धातु यांनीं मिश्रित झालेली जमीन, विविध प्रकारच्या वटवृक्षादिकांच्या बीजांमधील अतिसूक्ष्म रचना, असंख्य हरित, श्वेत, पीत, कृष्ण, वर्णयुक्त व चित्रविचित्र पत्रें, पुष्पें, फळें, मुळें, निर्माण करून मिष्ट, क्षार, तिक्त, कटु, कषाय, अम्लादि विविधरस, सुगंधादि युक्त पत्र, पुष्प, फल, अन्न, कंद, मूलादिकांची विलक्षण रचना, नानाप्रकारचे क्रोडों भूगोल व सूर्यचंद्रादि लोक यांची घटना, त्यांचें धोरण, भ्रमण व त्यांना नियमांत ठेवणें, इत्यादि प्रकारची अद्भुत सृष्टि परमेश्वराशिवाय कोण बरें करणारा? जेव्हां कोणी मनुष्य या सृष्टिगत पदार्थांकडे पाहतो, तेव्हां त्याला दोन प्रकारचें ज्ञान होतें. एक त्या पदार्थाविषयीं व दुसरें त्याची रचना पाहून त्याच्या उत्पादकाविषयीं. जर कोणी एकानें सुंदर दागिना अरण्यांत पडलेला पाहिला तर प्रथमतः तो सुवर्णाचा आहे असें ज्ञान झाल्यानंतर तो ज्या बुद्धिमान् कारागिरानें बनविला असेल त्याच्या व त्यांतील नकशी कामावरून त्याची योग्यता त्यास कळून येईल; त्याचप्रमाणें या जगांतील नानाप्रकारच्या पदार्थांची रचना विचार करणाऱ्यांना सृष्टिकर्त्या परमेश्वराची सिद्धता करून देत आहे. **(प्रश्न)** प्रथमतः पृथ्व्यादि सृष्टि झाली कीं मनुष्यादि? **(उत्तर)** आधीं पृथ्व्यादि सृष्टि झाली; कारण पृथ्व्यादिकाशिवाय मनुष्यांची स्थिति व पालन झालें नसतें. **(प्रश्न)** सृष्टीच्या प्रारंभीं एकच मनुष्य उत्पन्न केला होता कीं अनेक? **(उत्तर)** आरंभीं अनेक मनुष्यें उत्पन्न झालीं होतीं; ज्या जीवांचीं कर्में ईश्वरीय सृष्टीमध्यें उत्पन्न होण्यासारखीं होतीं त्यांनाच सृष्टीच्या आरंभीं परमेश्वर जन्म देतो.

**'मनुष्या ऋषयश्च ये। ततो मनुष्या** ...ादि यजुर्वेदीय मंत्रांवरून सृष्टीच्या प्रारंभीं अनेक अर्थात् हजारों मनुष्यें झालीं होतीं असें निश्चित ...त. सृ...नेकडे पाहूनहि आपणास असेंच वाटतें कीं, मनुष्यें हीं अनेक ईबापांची लेकरें आहेत. **(प्रश्न)** प्रारंभीं जे मनुष्य झाले ते बाल्य, तरुण व वृद्ध अवस्थांपैकीं कोणत्या अवस्थेमध्यें झाले ? कीं तीनहि अवस्थेमध्यें ? (उ०) युवावस्थेमध्यें उत्पन्न झाले. बालक झाले असते तर त्यांचें पालन करण्यास दुसऱ्या माणसांची गरज लागली असती व वृद्धावस्थेंत झाले असते तर मैथुनी सृष्टि सुरूं झाली नसती. **(प्रश्न)** सृष्टीचा प्रारंभ कधीं झालेला आहे कीं नाहीं ? **(उत्तर)** ज्याप्रमाणें दिवसाच्यापूर्वीं रात्र व रात्रीच्यापूर्वीं दिवस हा क्रम सारखा चाललेला आहे, त्याचप्रमाणें सृष्टीच्यापूर्वीं प्रलय व प्रलयाच्यापूर्वीं सृष्टि, तसेच सृष्टीनंतर प्रलय व प्रलयानंतर सृष्टि असें हें अनादि कालापासून चक्र चालत आलें आहे, त्याचा आदि किंवा अंत नाहीं. पण जसा दिवस-रात्रींचा आरंभ व अंत नजरेस पडतो. त्याचप्रमाणें सृष्टीचा व प्रलयाचा आदि व अंत होत असतो. कारण कीं जसे परमात्मा, जीव जगताचें कारण हें तीन पदार्थ स्वरूपतः अनादि आहेत, त्याचप्रमाणें जगताची उत्पत्ति, स्थिति व प्रलय हींहि प्रवाहरूपानें अनादि आहेत. नदीचा प्रवाह जसा केव्हां सुकून जातो, केव्हां दिसत नाहीं, वृष्टिकालामध्यें दिसतो, उन्हाळ्यांत दिसत नाहीं, त्याचप्रमाणें या व्यवहाराला प्रवाहरूप असें समजावें. ज्याप्रमाणें परमेश्वराचे गुणकर्म-स्वभाव अनादि आहेत, त्याप्रमाणें जगाची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करणें हेंहि अनादिच आहे. ज्याप्रमाणें ईश्वराच्या गुणकर्मस्वभावांचा प्रारंभ व अंत नसतो, त्याचप्रमाणें त्याच्या कर्तव्याचाहि प्रारंभ व अंत नसतो. **(प्रश्न)** ईश्वरानें कांहीं जीवांना मनुष्य, कांहींना सिंहव्याघ्रादि क्रुर प्राणी, कांहींना हरीण, गाय वगैरे पशु, कांहींना वृक्षादि व कांहींना कीट पतंगादीचे जन्म दिले आहेत. यामुळें परमात्म्यामध्यें पक्षपातीपणा येतो कीं नाहीं ? **(उत्तर)** पक्षपात येत नाहीं. कारण त्या जीवांनीं पूर्वसृष्टीमध्यें केलेल्या कर्मानुसार व्यवस्था करून त्यांना योग्य ते जन्म दिले. जर कर्मांवाचून जन्म देता तर पक्षपात झाला असता. **(प्रश्न)** मनुष्यांची सृष्टी प्रथमतः कोठें झाली ? **(उ०)** त्रिविष्टप (**तिब्बत्**) नामक देशामध्यें प्रथमतः मनुष्यें उत्पन्न झालीं. **(प्रश्न)** आदिसृष्टीमध्यें मनुष्यांच्या किती जाती होत्या ? (उ०) एकच मनुष्य जाति. नंतर **'विजानीह्यार्यान्ये च दस्यवः ।'** या ऋग्वेदवचनांत सांगितल्याप्रमाणें श्रेष्ठांचें आर्य, विद्वान् व देव असें नांव पडलें व मूर्ख, चोर, डाकू व दुष्ट लोकांना दस्यु असें नांव पडलें. म्हणजे आर्य व दस्यु या दोन नांवानें दोन भेद झाले. **'उत शूद्रे उतार्ये'** या अथर्ववेदीय मंत्रांत सांगितल्याप्रमाणें आर्यांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार भेद झाले. द्विजविद्वानांना आर्य व मूर्खांना (अनार्य-अडाणी) असें नांव पडलें. **(प्रश्न)** नंतर ते येथें कसे आले ? **(उत्तर)** जेव्हां आर्य व दस्यु, म्हणजे देव (विद्वान्) व असुर (अविद्वान्) यांमध्यें वारंवार तंटे उत्पन्न होऊं लागले व जेव्हां त्यांच्यापासून पुष्कळ उपद्रव होऊं लागला, तेव्हां आर्यांनीं सर्व पृथ्वीवरील देशांतील उत्तम अशा या भरत-खंडामध्यें आगमन केलें. म्हणून याला 'आर्यावर्त' असें नांव पडलें. **(प्रश्न)** आर्यावर्ताची मर्यादा कोणती ? **(उत्तर)**

**आसमुद्रात्तु वै पूर्वादासमुद्रात्तु पश्चिमात । तयोरेवान्तरं गिर्योरार्यावर्तं विदुर्बुधाः ॥२२॥ मनु० अ० १**
**सरस्वतीदृषद्वत्योर्देवनद्योर्यदन्तरम् । तं देवनिर्मितं देशमार्यावर्तं प्रचक्षते ॥ १७ ॥ मनु० अ० २**

'उत्तरेच्या बाजूला हिमालय, दक्षिणेच्या बाजूला विंध्याद्रि आणि पूर्व व पश्चिमेच्या बाजूला समुद्र यांच्यामधील प्रदेशाला आर्यावर्त असें म्हणतात व पश्चिमेच्या बाजूला सरस्वती (अटक) नदी, पूर्वेच्या बाजूला दृषद्वती (ब्रह्मपुत्रा) व हिमालय आणि रामेश्वरापासून विंध्याद्रीपर्वताच्या सर्व प्रदेशाला आर्यावर्त असें म्हणतात. हा देश विद्वानांनीं वसविला आहे व हेंच आर्यांचें निवासस्थान असल्यामुळें त्याला आर्यावर्त असें म्हणतात **(प्रश्न)** प्रथमतः या देशाचें नांव काय होतें व तेथें कोण राहत असत ? (उत्तर) या देशांत पूर्वी कोणी राहत नव्हतें म्हणूनच याचें पूर्वींचें नांवहि कांहीं नव्हतें. सृष्ट्युत्पत्तीचा कांहीं काल लोटल्यानंतर आर्य लोक त्रिविष्टपांतून नीट आर्यावर्तांतच आले. **(प्रश्न)** कोणी जंगली लोक राहत असत, त्यांना हे आर्य असुर म्हणूं लागले. आर्य लोक आपणास देव म्हणत. या दोन लोकांमधील लढाईला देवासुरसंग्राम असें अनेक ग्रंथांत म्हटलें आहे, तें खरें काय ? **(उत्तर)** हें सर्व खोटें आहे. पहा:—

**विजानीह्यार्यान्ये च दस्यवो बर्हिष्मते रन्धया शासदव्रतान् ।।** ऋ० मं० १।५१।८
**उत शूद्रे उतार्ये ।।** अथर्व० १९।६२

पूर्वी लिहिलें आहे कीं, धार्मिक, विद्वान् व आप्तपुरुषांना आर्य असें म्हणतात व यांच्या विपरीत आचरण करणारे चोर, दुष्ट, अविद्वान्, अधार्मिक अशा लोकांना दस्यु असें म्हणतात. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या द्विजांना आर्य व शूद्रांना अनार्य (अडाणी) असें म्हणतात. वेदामध्यें जर अशी व्याख्या केली आहे तर विदेशीयांच्या कपोलकल्पित गप्पांना बुद्धिमान् लोक कधींहि मान देणार नाहींत. आर्यावर्तांतील अर्जुनादिकांनीं व दशरथादि महाराजांनीं हिमालयावर निवास करणाऱ्या आर्यांना सहाय्य करण्यासाठीं म्लेंच्छ, दस्यु आदि असुरांशीं जीं युद्धें केलीं त्यांस देवासुरसंग्राम असें म्हणतात. यांमध्यें असुरांचा पराजय व आर्यांचा जय झालेला आहे. या ऐतिहासिक गोष्टीवरून असें सिद्ध होतें कीं. आर्यावर्ताच्या बाहेर चारीहि दिशांना जे लोक राहत होते त्यांना असुर असें म्हणत असत. जेव्हां हे असुर हिमालय-निवासी आर्यांवर स्वारी करीत तेव्हां आर्यावर्तांतील अनेक राजे त्यांच्या मदतीला जात व त्या असुरांचा पराभव करीत. व जीं दक्षिणेंत राम–रावणांमध्यें युद्धें झालीं त्यांना देवासुरसंग्राम म्हणत नाहीं, त्यांना राम-रावण युद्ध किंवा आर्य-राक्षस युद्ध असें म्हणतात. आर्य लोक इराणांतून येथें आले व येथील जंगली लोकांबरोबर लढून त्यांचा पराजय करून येथील राजे बनले; अशाबद्दल संस्कृत वाङ्मयांत मुळींच प्रमाण नाहीं. असें असतां या विदेशीयांच्या कल्पनातरंगांची माननीयता कोठवर राहणार ? तसेंच—

**म्लेच्छवाचश्चार्यवाचः सर्वे ते दस्यवः स्मृताः ।।** मनु. १०।४५ ।। **म्लेच्छदेशस्त्वतः परः ।।** मनु. २।२३ ।।

'आर्यावर्ताशिवाय इतर देशांमध्यें दस्यु, म्लेच्छ लोक राहतात.' यावरूनहि हेंच ठरतें कीं, आर्यावर्ताशिवाय पूर्व, पश्चिम, उत्तर, वायव्य व ईशान्य व बाजूच्या सर्व देशांमधील राहणाऱ्यांना दस्यु, म्लेच्छ, असुर असें म्हणत व नैऋत्य, दक्षिण व आग्नेय या दिशांमध्यें (आर्यावर्ताशिवाय इतर देशांत) राहणाऱ्या लोकांना राक्षस असें म्हणत. अजूनहि शिद्दी वगैरे लोक ग्रंथांतरांतील राक्षसांच्या वर्णनाप्रमाणेंच भयंकर दिसतात. आर्यावर्ताच्या बरोबर खालच्या बाजूला राहणाऱ्या लोकांना नाग असें म्हणत व त्या देशाला पाताल असें नांव असे, आर्य लोकांचें ज्या बाजूला 'पादतल' आहे त्या बाजूला जो देश आहे तो 'पाताळ'. हल्ली ज्यास अमेरिका म्हणतात तो होय. याठिकाणीं नाग नामक लोक राज्य करीत असत. त्यांच्यांतील एका राजाच्या उलूपी नामक राजकन्येचा अर्जुनाशीं विवाह झाला होता. इक्ष्वाकु राजापासून पांडवांच्या अवधीपर्यंत पृथ्वीवर चोहोंकडे आर्यांचें बरेंच राज्य पसरलें होतें व वैदिक धर्माचा प्रसारहि आर्यावर्ताशिवाय इतर देशांतसुद्धां होत होता. याला प्रमाण पाहवयाचें असल्यास ब्रह्माचा पुत्र विराट्, विराटाचा मनु, मनूचे मरीच्यादि दहा पुत्र, त्यांपासून स्वायंभूवादि सात राजे यांचे व यांच्या संतानाचे राज्यविभाग ग्रंथांतरी पाहिले असतां हें सहज आढळून येईल. या वंशांत उत्पन्न झालेला इक्ष्वाकु राजा हा आर्यावर्ताचा प्रथम राजा होय. यानेंच आर्यावर्त वसविला. त्या वेळच्या आर्यांमधील पुरुषार्थ विलक्षण असे. पण सध्यांच्या त्यांच्या वंशजामध्यें अलास्य, प्रमाद, परस्परविरोध या दुर्गुणांचें दुर्दैवानें प्राबल्य झाल्यामुळें, यांचे अन्य देशामध्यें राज्य होण्याची गोष्ठ तर लांबच पण स्वतच्या आर्यावर्तामध्येंहि आर्यांचें अखंड, स्वतंत्र, स्वाधीन व निर्भय असें राज्य राहिलें नाहीं व जें कांहीं आहे तें सर्व विदेशीयांनीं पादाक्रांत केलेलें आहे. कांहीं थोडे राजे नांवाचे मात्र स्वतंत्र आहेत. जेव्हां दुर्दिन असतात तेव्हां देशींतील सर्व लोकांना अनेक प्रकारचीं दुःखें भोगावीं लागतात हा नियमच आहे. कोणीं कांहीं म्हटलें तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, स्वदेशीय राज्य असणें ही गोष्ट सर्वांत श्रेष्ठ व उत्तम आहे व तेंच सुखदायक आहे. तसें मतमतांतरांचा आग्रह न धरणारे, पक्षपातरहित, प्रजेवर मातापित्यांप्रमाणें कृपा करणारे, न्याय व दया यांनीं युक्त अशा विदेशीयांचें राज्य असलें तरी तें सुखदायक होत नाहीं, हा नियम सार्वत्रिक सर्व देशांना सारखा लागू आहे. भिन्न भाषा, भिन्न शिक्षण व भिन्न व्यवहार यांपासून होणारा विरोध सुटणेंच आधीं अत्यंत कठिण आहे; व हा विरोध सुटल्याशिवाय परस्परांवर उपकार करणें किंवा परस्परांचा अभिप्राय जाणणें हें फारच कठिण आहे. म्हणून जें कांहीं वेदादि शास्त्रांमध्यें सांगितलें आहे व त्यावरून बिधिनिषेधाची इतिहासांत जी व्यवस्था प्रतिपादली आहे, तीप्रमाणेंच सर्व भद्र पुरुषांनीं चालणें

अत्यंत उत्तम आहे. (प्र०) बरें तें असो, आतां हें सांगा कीं, जग उत्पन्न होऊन आजपर्यंत किती काळ झाला? (उ०) एक अब्ज सत्याण्णव कोटीहून जास्त वर्षे वेद व सृष्टि या विषयीं स्पष्ट खुलासा ऋग्वेदादिभाष्य भूमिका या महर्षि दयानंदाच्या ग्रंथांत 'वेदोत्पत्तीचा काळ' हें प्रकरण पहा. उत्पन्न होउन झालीं आहेत. ही सृष्टि परमाणूंपासून उत्पन्न झाली आहे. ज्याचा भाग होऊं शकत नाहीं त्याला परमाणु असें म्हणतात. साठ परमाणु एकत्र मिळाले असतां एक अणु होतो. दोन अणु मिळून एक द्व्यणुक होतो- यालाच स्थूल वायु म्हणतात. तीन द्व्यणुक मिळून त्रसरेणु होतो, यालाच अग्नि म्हणतात. चार द्व्यणुक एकत्र झाले असतां जल होतें. पांच द्व्यणुक एकत्र झाले असतां पृथ्वी होते. तीन द्व्यणुकांचा त्रसरेणु होतो व हे द्विगुणित झाले असतां पृथ्व्यादि दृश्य पदार्थ होतात. याप्रमाणें परमाणूंची रचना करून परमेश्वरानें ही गोलांची रचना केली आहे व तिला पूर्वी सांगितलीं तितकी वर्षें झालीं आहेत. (प्रश्न) या भूगोलादिकांचें धारण कोण करतो? याला कोणाचा आधार आहे? कोणी म्हणतात, सहस्र फणांचा सर्प पृथ्वीचा आधार आहे; कोणी म्हणतात, बैलाच्या शिंगावर पृथ्वी आहे; कोणी म्हणतात, आधाराशिवाय आहे; कोणी म्हणतात वायूच्या आधारानें आहे, कोणी म्हणतात, सूर्याच्या आकर्षणानें राहिली आहे; कोणी म्हणतात कीं, पृथ्वी जड असल्यामुळें ती खाली चालली आहे. इत्यादि अनेक प्रकारचीं विधानें ऐकण्यांत येतात, त्यांपैकीं खरें कोणतें बरें? (उत्तर) जे लोक शेष, सर्प, बैल, इत्यादिकांच्या आधारानें पृथ्वी आहे असें म्हणतात त्यांनीं हें सांगावें कीं ते कोणाच्या आधारानें राहिले आहेत? त्यांचा जन्म झाला तेव्हां त्यांचे आईबाप कोठें राहिले होते? बैलावर पृथ्वी आहे असें म्हणारे असें मुसलमान तर बिचारे गप्प बसतील. पण सर्पावर पृथ्वी आहे म्हणारे पौराणिक लोक मात्र पृथ्वी सर्पावर, सर्प कूर्मावर. कूर्म जलावर. जल अग्नीवर, अग्नि वायूवर व वायु आकाशांत राहतो, अशी परंपरा देतील. हें सर्व कशावर आहे? असा जर प्रश्न यांना केला तर ते म्हणतील कीं हें सर्व परमेश्वरावर आहे शेष व बैल हे कोणाचे पुत्र आहेत? असें जर त्यांना विचारलें तर ते सांगतील कीं कश्यप व कद्रू यांचे सर्प हे पुत्र व गाईचा बैल हा पुत्र आहे. आपणास पुराणें पाहिलीं असतां आढळून येतें कीं, मरीचीचा पुत्र कश्यप, मनूचा मरीचि, विराट् मनु व ब्रम्ह्याचा विराट् अशी परंपरा आहे. ब्रह्मा हा आदिसृष्टीचा होय. कश्यपानंतर शेषाचा जन्म आहे. त्या पूर्वी पांढ्या झाल्याचा पुरावा आहे. तेव्हां शेषाचा जन्म होईपर्यंत पांच पिढ्या झाल्या त्या काळांत पृथ्वीला आश्रय कोणी दिला? अर्थात् कश्यपाचा जन्म झाला तेव्हां पृथ्वी कशावर होती? यावर सर्पवाल्या-जवळ काहीं उत्तर नाहीं. वास्तविक पाहतां 'शेष' हें नांव परमेश्वराचें आहे व त्याच्या आधारानें पृथ्वी आहे हें खरें. 'शेष' म्हणजे 'शिल्लक असलेला' परमेश्वर. हा सर्व जगांत व्यापून उत्पत्ति व प्रलय यांतून शेष राहिलला आहे; म्हणून त्याला 'शेष' असें म्हणतात व याच्या आधारानें पृथ्वी आहे हे निर्विवाद आहे. हा वेदविदित विचार करून कवींनीं 'शेषाधार पृथ्वी' या वचनानें त्याचें वर्णन केलें आहे. पण हा भाव लोकांनीं न समजून शेषाचा सर्प करून त्याला हजार फणाहि उत्पन्न केल्या. शिवाय—

सत्येनोत्तभिता भूमिः ॥ अथर्व कां. १४।१।१ ॥

'(सत्य) जो त्रिकालाबाधित आहे व ज्याचा कधीं नाश होत नाहीं अशा ईश्वरानें भूमि आदित्य वगैरे सर्व लोक धारण केले आहेत.' तसेंच—

उक्षा दाधार पृथिवीमुत द्याम् ॥

'(उक्षा) वृष्टि करून भूगोलावर पाण्याचें सिंचन करणाऱ्या सूर्यानें आपल्या आकर्षणानें (पृथिवीम्) पृथ्वीला धारण केलें नाहे.' पण सूर्याला धारण करणारा परमेश्वराशिवाय कोणीहि नाहीं. अर्थात् त्यानेंच या संपूर्ण गोलाचें धारण केलें आहे. या मंत्रांतील 'उक्षा' या शब्दावरूनच कित्येक अज्ञानी लोकांनीं 'बैल' हा पृथ्वीचा धारणकर्ता आहे ही कल्पना बसविली असावी, पण पृथ्वीला शिंगावर उचलून धरणारा बैल केवढा व कोठें असला पाहिजे याची कल्पना त्या बिचाऱ्यांना नाहीं. (प्रश्न) एवढाल्या मोठमोठ्या गोलांना परमेश्वर कसा धारण करतो बरें?

**(उत्तर)** ज्याप्रमाणें अनन्त आकाशापुढें भूगोल म्हणजे कांहीं मोठा पदार्थ नाहीं, किंवा समुद्रापुढें पाण्याचा एक कण म्हणजे फार मोठा आहे, असें नाहीं. तद्वत्च त्या अनन्त परमेश्वरापुढें हें असंख्य गोल एका परमाणु एवढे सुद्धां नाहींत. तो सर्वांच्या बाहेर, सर्वांच्या आंत पूर्णपणे व्यापून राहिला आहे. **'विभुः प्रजासु'** असें त्याचें यजुर्वेदांत वर्णन आहे. अर्थात् तो सर्वांमध्यें पूर्णपणें व्यापून राहिला आहे. जर तो खिस्ती, मुसलमान व पौराणिक लोकांच्या म्हणण्याप्रमाणें एकदेशीय असता तर मात्र सर्व सृष्टीला आधार देऊं शकला नसता. कारण सर्वत्र जो असेल तोच सर्व धारण करूं शकतो, अन्य नाहीं. **(प्रश्न)** गोल परस्पर आकर्षणानें राहिले आहेत असें असतां, परमेश्वरानें धारण केले आहेत, असें तुम्ही कां म्हणतां ? **(उत्तर)** आधीं तुम्हीं हें सांगा कीं, हीसृष्टि अनंत आहे कीं सान्त ? जर अनंत म्हणाल तर साकार वस्तु अनन्त असूं शकत नाहीं हें तुम्हांला मान्य करावें लागेल; व जर सान्त म्हणाल तर ती जेथें संपली आहे, व ज्याच्यापुढें कोणताच लोक नाहीं, तेथें कोणी आकर्षणानें धरली आहे ! तें तुम्हांस सांगावें लागेल. कारण शेवटच्या गोलाला बाहेर ओढणारा कोणी पदार्थ नसल्यामुळें आंतल्या बाजूलाच तो खेंचला जाईल व अशा रीतीनें सर्व गोल आंत आंत खेंचले जाऊन जगताचा क्षणार्धांत नाश होईल. पण तसें होत नाहीं. समष्टि व व्यष्टिच्या द्वारें विचार केल्यानें याचा स्पष्ट उलगडा होणार आहे. सर्व समुदायाचें नांव समष्टि आहे व एकेक वृक्षादिकाचीं भिन्न भिन्न गणना करणें याला व्यष्टि म्हणतात. तसेंच या समष्टिरूप जगाचा धारण व आकर्षणाचा कर्ता त्या परमेश्वरावांचून दुसरा कोणीहि संभवत नाहीं. हें यावरून उघड होत आहे. तसेंच पहा:—

**स दाधार पृथिवीं द्यामुतेमाम्** ।। यजु० १३।४ ।।

पृथ्व्यादि प्रकाशरहित लोकलोकान्तरांची व सूर्यादि प्रकाशसहित लोकांची व इत्तर पदार्थांची ज्या परमेश्वरानें रचना व धारणा केलेली आहे, तोच सर्वत्र व्यापक असून सर्व जगाचा कर्ता व धर्ता आहे **(प्रश्न)** पृथ्वी वगैरे गोल स्थिर आहेत कीं, फिरत आहेत ? **(उत्तर)** फिरत आहेत. **(प्रश्न)** कित्येक लोक म्हणतात कीं, सूर्य फिरतो व पृथ्वी स्थिर आहे व दुसरे म्हणतात कीं, सूर्य स्थिर असून पृथ्वी फिरते यांत खरें कोणतें ? **(प्रश्न** ही दोनहि मतें अर्धी खोटीं आहत, कारण वेदामध्यें सांगितलें आहे कीं,—

**आयं गौः पृश्निरक्रमीदसदन्मातरं पुरः ।।पितरं च प्रयन्त्स्वः** ।। यजु० ३।६ ।।

( आयं गौः ) पृथ्वी, सूर्य, चंद्रादि गोल (पृश्नि) आकाशामधून (अक्रमीत्) आक्रमण करतात. त्यांपैकीं पृथ्वी आपल्या (मातरम्) जलपरमाणुरूप आकाशस्थ मातेला व अग्निमय अशा (स्वः) सूर्यरूपी (पितरम्) पित्याला (असदत्) प्रदक्षिणेनें प्राप्त होऊन (प्रयन्) पुनः पुनः जाते. या मंत्रांत सूर्याच्या सभोंवतीं पृथ्वी सारखी फिरत आहे असें सांगितलें असून सूर्यादि लोकहि आकाशांतून आपल्या नियमित मार्गानें फिरत आहेत असें सांगितलें आहे. तसेंच—

**आकृष्णेन रजसा वर्तमानो निवेशयन्नमृतं मर्त्यं च ।।**

**हिरण्ययेन सविता रथेना देवो याति भुवनानि पश्यन्** ।। यजु० ३३।४२

(सविता) सूर्य (रजसा) सर्व गोलांशीं ( आकृष्णेन )आकर्षणानें (वर्तमानः) संबंध ठेवणारा आहे. सूर्य हा (हिरण्ययेन) ज्योतिर्मय अशा ( रथेन ) रममाण करणाऱ्या तेजानें युक्त आहे. तो ( मर्त्यम् ) प्राण्यांना ( अमृतम् ) अमृतरूपी किरणसमूहद्वारा (निवेशयन्) अमृतांत प्रवेश करवितो आणि पृथिव्यादि सर्व मूर्तिमान् द्रव्यांना दाखवितो असा हा (देवः) सूर्य (भुवनानि) सर्व लोकांच्या बरोबर आकर्षण गुणांनीं संबंध ठेवून (पश्यन्) सर्वांना जगांतील पदार्थांचें स्वरूप दाखवीत (याति) आपल्या परिघामध्यें फिरत असतो. या मंत्रांत सूर्य आपल्या कक्षेभोंवतीं फिरतो असें सांगितले असून तो प्रकाश देणारा व सृष्टीला कारण आहे असेंहि सांगितलें आहे. सूर्य दुसऱ्या कोणत्याहि गोलाच्या सभोंवतीं फिरत नाहीं. सूर्यमालेंतील इतर गोल याच्या भोंवतीं फिरत असतात; याप्रमाणें एकेक सूर्यमालिकेमध्यें सूर्य हा प्रकाश देणारा असून इतर त्याच्या प्रकाशानें प्रकाशित होणारे आहेत. तसेंच—

दिवि सोमो अधिश्रितः ॥ अथर्व० १४।१।१ ॥

'जसा चंद्र हा सूर्याच्या प्रकाशानें प्रकाशित होत आहे.' त्याचप्रमाणें पृथ्व्यादि लोकहि सूर्यप्रकाशानें प्रकाशित होत आहेत. इतर पृथ्व्यादि गोल आपआपल्या आंसाभोंवतीं फिरत असल्यामुळें जो भाग सूर्यासमोर येतो, तेथें दिवस होतो व जो भाग सूर्यांसमोर नसतो, तेथें रात्र असते. अर्थात् दिवस व रात्र हें चक्र सर्वदा चाललेलेंच आहे. त्याचप्रमाणें उदयास्त, संध्या, मध्यान्ह व मध्यरात्र हे कलावयव देशदेशान्तरामध्यें सदैव असतात. जेव्हां आर्यावर्तांत सूर्योदय होतो तेव्हां पाताळांत (अमेरिकेंत) सूर्यास्त होतो; व जेव्हां आर्यावर्तांत सूर्यास्त होतो तेव्हां पाताळांत सूर्योदय होतो. तसेंच जेव्हां आर्यावर्तांत मध्यान्ह असतो तेव्हां पाताळांत मध्यरात्र असते व जेव्हां मध्यरात्र येथें होते, तेव्हां तेथें मध्यान्ह होतो. जे लोक सूर्य फिरतो व पृथ्वी स्थिर आहे असें समजतात ते अज्ञानी आहेत असें समजावें. सूर्य फिरत असता तर हजारों वर्षांचा दिवस व तेवढीच रात्र झाली असती, कारण असें कीं, सूर्य हा पृथ्वीहून लाखोंपट मोठा आहे, ( म्हणूनच त्याला वेदांमध्यें 'वृष्ण:' असें म्हटलें आहे.) व कोट्यावधि मैल दूर आहे. ज्याप्रमाणें मोहरीच्यापुढें डोंगर असावा, तसा पृथ्वीच्यापुढें सूर्य आहे. मोहरीला आपल्या भोंवतीं फिरण्यास फार वेळ लागणार नाहीं पण पहाडाला मात्र मोहरी भोंवतीं फिरावयास जास्त वेळ लागेल. त्याचप्रमाणें पृथ्वी आपल्या आंसा भोंवतीं फिरून ज्या मानानें दिवस रात्र होऊं शकतात त्यापेक्षां सूर्य पृथ्वी सभोंवतीं फिरत असता तर दिवस रात्रीचें प्रमाण फारच मोठें झालें असतें. सूर्य फिरत नाहीं असें म्हणणारे ही चूक करीत असतात. जर तो फिरत नसता तर एका राशिस्थानावरून दुसऱ्या राशिस्थानाला जाणें अशक्य झालें असतें. शिवाय गुरुपदार्थ फिरल्या वांचून आकाशांत राहूंच शकत नाहीं, असा अढळ नियम आहे, त्यालाहि बाध आला असता, जैन लोक असें समजतात कीं, पृथ्वी फिरत नाहीं, पण खालीं जात आहे व जंबुद्वीपाला दोन सूर्य व दोन चंद्र आहेत. हा सर्व त्यांच्या ज्योतिःशास्त्राच्या अज्ञानाचा प्रकार आहे. जर पृथ्वी खालीं खालीं चालली असती, तर चारींहि बाजूची वायूची (सध्यां सुरू आहे त्या तऱ्हेची) गति बंद झाली असती. चारी बाजूंनीं वायुचक्र न बनल्यामुळें पृथ्वी छिन्न भिन्न झाली असती. निम्न स्थलामध्यें राहाणाऱ्या लोकांना वायूचा स्पर्शहि झाला नसता व खालीं राहाणाऱ्यांना अधिक झाला असता, व एकाच प्रकारची वायूची गति झाली असती. दोन सूर्य व दोन चंद्र असते तर रात्र व कृष्णापक्षादि होणें असंभवनीय होतें. असो. याप्रमाणें हें जैन लोकांचें मत भ्रममूलक आहे. वास्तविक पहातां पृथ्वींसभोंवती फिरणारा एकच चंद्र आहे व सूर्यमालिकेला एकच सूर्य आहे. (प्रश्न) सूर्य, चंद्र व तारे हे काय पदार्थ आहेत व यांवर मनुष्यवस्ती आहे कीं नाहीं ? (उत्तर) हे सर्व भूगोलादि लोक आहेत व यामध्यें मनुष्यादि प्रजांची वस्तीहि पण आहे पहा—

एतेषु हीदं सर्वं वसु हितमेते हीदं वासयन्ते तद्यदिदं सर्वं वासयन्ते तस्माद्वसव इति ॥ शत.१४।६।७।४

'पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आकाश, चंद्र, नक्षत्रें व सूर्य यांना वसु असें म्हणतात. कारण यांच्यावर सर्वप्रकारचे पदार्थ व प्रजा वास करितात किंवा यांच्या योगानेंच सर्व प्रजांचें वास्तव्य होतें. ज्याअर्थी हें निवासाचे हेतु आहेत त्याअर्थीं त्यांना वसु असें नांव आहे.' पृथ्वीप्रमाणेंच इतर गोलहि वसु आहेत. तेव्हां त्यावर प्रजा राहूं शकेल यांत काय संदेह ? परमेश्वराच्या अनंत विश्वांतील पृथ्वी हा एक लहानसा गोल मनुष्यादि प्राण्यांनीं भरलेला आहे तर बाकीचे सर्व अगदीं रिकामे कसे असतील ? परमेश्वराचें कोणतेंहि कृत्य निष्प्रयोजन असूं शकत नाहीं. मग जर या असंख्य गोलांवर मनुष्यादि प्राणी नसते तर त्यांचें प्रयोजन तरीं काय ? त्यांचें साफल्य तरी कशामध्यें आहे ? तात्पर्य याचा विचार करतां, या सर्व गोलांवर सर्वत्र मनुष्यादि प्राण्यांची वस्ती आहे असें आढळून येतें. (प्रश्न) जशी या पृथ्वीवरील मनुष्यांची आकृति आहे तशीच इतर गोलांवरील मनुष्यांची आहे काय ? (उत्तर) या पृथ्वीवरील चिनी, हबशी आर्यावर्त युरोपादि देशांतील लोकांचे अवयव व रंग, रूप व आकृति यामध्यें जसा थोडा थोडा भेद आहे तसाच लोकलोकान्तरामध्यें पण भेद असणारच. परंतु ज्या जातीची सृष्टि या लोकांमध्यें आहे त्याच जातीची तशीच सृष्टि अन्य लोकांमध्यें आहे. म्हणजे ज्या ज्या शरीराच्या भागीं नेत्रादि अवयव आहेत त्याच भागीं लोकलोकान्तरांतील त्या त्या जातीचेहि अवयव तसेच असतात. कारण पहा—

**सूर्याचन्द्रमसो धाता यथापूर्वमकल्पयत् । दिवं च पृथिवीं चान्तरिक्षमथो स्वः ।।** ऋ. मं. १०।१९०

'परमेश्वरानें ज्याप्रमाणें सूर्य, चंद्र, द्यौ, भूमि, अंतरिक्ष व तत्रस्थ सुखविशेषदायक पदार्थ जसे पूर्वीच्या कल्पांत रचिले होते. तसेच ते या सृष्टीतहि रचिले आहेत व सर्व लोकलोकान्तरामध्येंहि तसेच एकसारखे बनविले आहेत, त्यांत भेद मुळींच नाहीं.' **(प्र०)** ज्या वेदांचा या ठिकाणीं प्रकाश आहे; तेच वेद तेथेंहि आहेत कीं दुसरे ? **(उ०)** हेच वेद असेच सर्वत्र आहेत. जशी एका राजाची नीति त्याच्या राज्यांत सर्वत्र सारखी असते तद्वत्च एका परमेश्वराच्या राज्यांत वेदोक्त नीति ही एकसारखीच आहे. **(प्र०)** अहो जर जीव व प्रकृतिस्थ तत्त्वें हीं अनादि आहेत व तीं ईश्वरानें बनविलीं नाहींत, तर त्यांवर ईश्वराचा अधिकार तरी कां चालावा ? कारण तीं स्वतंत्र आहेत. **(उ०)** ज्याप्रमाणें राजा व प्रजा समकालींच असतात व राजाच्या आधीन प्रजा असते. त्याचप्रमाणें परमेश्वराच्या आधीन जीव व सर्व जड पदार्थ आहेत. जर परमेश्वर सर्व सृष्टिरचना करणारा आहे, तर तो जीवांना कर्मांचीं यथायोग्य फलें देतो. सर्वांचें यथायोग्य रक्षण करतो. जर तो अनंतसामर्थ्यवान् आहे, तर मग अल्पसामर्थ्यवान् जीव व सर्व जड त्याच्या आधीन कां नसावे ? याकरितांच जीव हा कर्म करण्यास स्वतंत्र आहे; पण केलेल्या कर्मांचें फल भोगण्यास ईश्वराच्या व्यवस्थेनें तो परतंत्र आहे. परमेश्वर सर्वशक्तिमान् असल्यामुळें स्वतंत्र असून, तो सर्व विश्वांचें पालन व सृष्टीचा संहार करतो.

याप्रमाणें सृष्टिविद्येविषयीं संक्षेपानें लिहिलें. आतां पुढच्या समुल्लासांत विद्या, अविद्या, बंध व मोक्ष वगैरें-विषयीं लिहिण्यांत येईल.

**इति सुभाषाविभूषितः सृष्ट्युत्पत्तिस्थितिप्रलयविषयो नाम अष्टमसमुल्लासः संपूर्णः ।।८।।**

# अथ नवमसमुल्लासः ।

**अथ विद्याऽविद्याबंधमोक्षविषयान् व्याख्यास्यामः ।**

**विद्यां चाऽविद्यां च यस्तद्वेदोभय ँसह । अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ।।** यजु० ४०।१४

'जो मनुष्य (विद्या) यथार्थज्ञान व (अविद्या) कर्मोपासना यांना, परस्पर एक दुसऱ्याबरोबर एकदम जाणतो, तो कर्मोपासनेच्या योगानें मृत्यूला तरून जाऊन (विद्यया) यथार्थज्ञानाच्या योगानें मोक्षाला प्राप्त होतो.' अर्थात् कर्म व ज्ञान यांचीं मोक्षप्राप्तीला आवश्यकता आहे. अविद्येचें लक्षण:—

**अनित्याशुचिदुःखानात्मसु नित्यशुचिसुखात्मख्यातिरविद्या ।।** योग० सा० सू० ५

(१) हा संसार व देहादि पदार्थ हे अनित्य असतांहि नित्य वाटणें, जें कार्यजगत् प्रतीत होत आहे, तें सदैव आहेच व नेहमीं असेंच राहील, योगबलाच्या योगानें देवांचें हेंच शरीर सदैव राहतें अशी विपरीत बुद्धि होणें हा अविद्येचा प्रथम भाग आहे. (२) अशुचि अर्थात मलयुक्त पदार्थ, कामादि विषय, चोरी, मिथ्या भाषण इत्यादि अपवित्र गोष्टी पवित्र आहेत असें मानणें हा दुसरा भाग आहे. (३) अनित्यविषयसेवनरूप दुःखांमध्यें सुख मानणें हा तिसरा भाग आहे. (४) अनात्म पदार्थांमध्यें आत्मबुद्धि करणें हा चवथा भाग आहे. या चार प्रकारच्या विपरीत ज्ञानाला अविद्या असें म्हणतात. याहून जी विपरीत आहे ती विद्या होय. जसें अनित्याला अनित्य व नित्याला नित्य, अपवित्राला अपवित्र व पवित्राला पवित्र, दुःखाला दुःख व सुखाला सुख, अनात्म्याला अनात्मा व आत्म्याला आत्मा समजणें ही विद्या व हेंच सत्य ज्ञान होय. **वेत्ति यथावत तत्वपदार्थस्वरूपं यया सा विद्या । यया तत्वस्वरूपं न जानाति भ्रमादन्यस्मिन्नन्यन्निश्चिनोति सा अविद्या ।**' जिच्या योगानें पदार्थांच्या यथार्थ स्वरूपाचा बोध होतो तिला विद्या; जिच्या योगानें तत्वज्ञान होत नाहीं, भ्रमानें अन्याच्या ठिकाणीं अन्याची कल्पना होते, तिला अविद्या असें म्हणतात. कर्म व उपासना यांना अविद्या असें म्हणतात. याचें कारण, हे दोनहि प्रकार बाह्य व आंतरिक क्रियाविशेषाचे आहेत; ज्ञानविशेषाचे नाहींत. म्हणूनच वरील मंत्रांत सांगितलें आहे कीं, शुद्ध कर्म व परमेश्वराची उपासना यांच्याच योगानें मृत्यु व दुःख यांतून पार होतां येतें.' अर्थात् पवित्र कर्म, पवित्र उपासना व पवित्र ज्ञान यांच्या योगानेंच मुक्ति मिळते. मिथ्याभाषणादि अपवित्र कर्म, पाषाणमूर्त्यादिकांची उपासना, [प्रतीकोपासना] व मिथ्याज्ञान यांच्या योगानें बंध होतो. कोणीहि क्षणमात्रसुद्धां कर्म, उपासना व ज्ञान यांनीं रहित असा असूं शकत नाहीं. म्हणून धर्मयुक्त सत्यभाषणादि कर्में करावींत व मिथ्याभाषणादि अधर्मयुक्त कर्में सोडावींत, हेंच मुक्तीचें खरें साधन आहे, यांत तिलप्राय शंका नाहीं.

**बंधमोक्षाची नित्यनैमित्तिकता:**—(प्र०) मुक्ति कोणाला प्राप्त होत नाहीं ? (उ०) जो बद्ध आहे त्याला मुक्ति प्राप्त होत नाहीं. (प्र०) बद्ध कोण आहे ? (उ०) जो अधर्म व अज्ञान यांत फसलेला असा जीव आहे तो बद्ध होय. (प्र०) बंध व मोक्ष हे स्वाभाविक आहेत कीं नैमित्तिक ? (उ०) नैमित्तिक आहेत; कारण जर ते स्वाभाविक असते तर त्यांची निवृत्ति झालीच नसती. (प्र०)

**न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः ।।**
**न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता ।।** गौडपादीय कारिका. प्र. २ कां ३२ ।।

ही मांडूक्योपनिषदावरील कारिका आहे. 'जीव ब्रह्मच असल्यामुळें तो कधीं आवरणांत येत नाहीं, जन्म घेत नाहीं, बंधामध्यें पडत नाहीं, तो साधक नव्हे व तो साधनाहि करीत नाहीं, हा कधीं बधांतहि पडला नाहीं व कधीं

मुक्तहि होत नाहीं. अर्थात् हा नेहेमींच मुक्त आहे.' या कारिकेवरून जीव हा स्वाभाविक मुक्त आहे असें ठरत नाहीं काय ? (उ०) हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण जीवाचें स्वरूप अल्प असल्यानें तो आवरणांत येतो. शरीरासह प्रकट होत असल्यामुळें जन्म घेतो. कर्मफलाचा भोग घेऊन बंधामध्यें फसतो. बंधांतून सुटण्यासाठीं साधन करतो व दुःखत्यागाची इच्छा करतो. शेवटीं परमेश्वराची प्राप्ति करून घेऊन सर्व दुःखांचा लय करून मुक्तिहि प्राप्त करून घेतो. (प्र०) अहो ! हे तर देहाचे व अंतःकरणाचे धर्म आहेत. जीव हा पापपुण्यरहित साक्षीमात्र आहे. शीतोष्णादि हे शरीराचे धर्म असून आत्मा निर्लेप आहे. (उ०) देह व अंतःकरणें जड असल्यानें त्यांना शीतोष्णादि भोग होऊं शकत नाहींत. जे. मनुष्यादि चेतन प्राणी आहेत त्यांनाच शीतोष्णादि भोग होऊं शकतात. प्राणहि जड आहेत त्यांना क्षुधापिपासा होऊं शकत नाहींत. पण प्राणयुक्त जीवाला क्षुधा व तृष्णा लागते. मनहि जड असल्यानें त्याला हर्षशोक ,होऊं शकत नाहींत. पण मनाच्या सहाय्यानें जीव हर्ष, शोक, दुःख, सुख यांचा उपभोग घेऊं शकतो; ज्याप्रमाणें चांगलें किंवा वाईट शब्दादि विषयांचें ग्रहण किंवा वहिष्करण जीं श्रोत्रादि इंद्रियें आहेत, त्यांच्या द्वारें करून घेऊन जीव सुःखी किंवा दुःखी होतो, त्याचप्रमाणें अंतःकरण अर्थात् मन, बुद्धि, चित्त व अहंकार यांच्या योगानें संकल्प, विकल्प, निश्चय, स्मरण व अभिमान हे जीव करीत असल्यानें तो दंड व मान्यता यांचा भागी होतो. ज्याप्रमाणें तरवारीनें मारणारा दंडनीय ठरतो, तरवारीला शिक्षा कोणीं करीत नाहीं; त्याचप्रमाणें देहेंद्रिय, अंतःकरण व प्राण या साधनाच्या योगानें चांगलीं वाईट कामें करणाऱ्या जीवालाच सुख दुःख भोगावें लागतें; अर्थात् जीव हा साक्षी नसून कर्ता व भोक्ता आहे. कर्मांचा साक्षी तो एकच अद्वितीय परमेश्वर आहे. जीव हा कर्में करणारा असून तो त्यांत लिप्त होतो म्हणून तो ईश्वरहि नव्हे व साक्षीहि नव्हे. (प्रश्न) ब्रह्माच्या अंतःकरणांत पडलेल्या प्रतिबिंबालाच जीव असें म्हणतात. जसा आरसा फुटल्यानें बिंबाची कोणत्याहि प्रकारची हानि होत नाहीं, त्याचप्रमाणें जोंपर्यंत अंतःकरण असेल तोपर्यंत ब्रह्माचें प्रतिबिंब त्यांत राहतें व त्यालाच जीव असें म्हणतात, पण जेव्हां अंतःकरणोपाधिनष्ट होते, तेव्हां जीव मुक्त होतो. (उत्तर) हें म्हणणें बालकोक्तीप्रमाणें निराधार आहे. कारण साकार व पृथक् अशा पदार्थाचें प्रतिबिंब साकारांत पडूं शकते, तसें तें निराकार व एकमेकांत व्यापून असणाऱ्यां पदार्थांचें प्रतिबिंब पडूं शकत नाहीं. तोंड साकार असतें व आरसा साकार असतो व ते पृथक् असतात; म्हणून तोंडाचें प्रतिबिंब आरशांत पडूं शकतें. ब्रह्म निराकार, सर्वव्यापक व कोणाहूनहि पृथक् नसल्यामुळें त्याचें प्रतिबिंबच पडूं शकत नाहीं. (प्र०) पहा ! ज्याप्रमाणें गंभीर व स्वच्छ अशा जलामध्यें निराकार व व्यापक आकाशाचे प्रतिबिंब पडतें; त्याचप्रमाणें स्वच्छ अंतःकरणामध्यें परमात्म्याचा आभास पडतो, म्हणूनच त्याला 'चिदाभास' असें म्हणतात. (उ०) आकाशापेक्षां जो स्थूल वायु आहे त्याचें जेथें डोळयांनीं दर्शन होत नाहीं, तेथें आकाशाचें डोळयांना दर्शन होणेंच असंभव आहे; मग आकाशाच्या प्रतिबिंबाचे दर्शन तर लांबच. (प्र०) अहो ! हें जें वर निळें व अंधुक कांहीं दिसतें तें आकाश नव्हे तर तें काय आहे ? (उ०) पृथ्वी, जल व अग्नि यांचे त्रसरेणु त्या ठिकाणीं आहेत म्हणून तें निळें दिसते. जलाच्या अंशामुळें निळेपणा दिसतो; पृथ्वीच्या अंशामुळें अंधुक धुळीसारखा भास होतो व अग्नीच्या अंशामुळें त्या सर्वांना दृश्यपणा आलेला आहे. त्याचें जें पाण्यामध्यें प्रतिबिंब दिसतें तें आकाशाचें आहे असें समजणें चुकीचें आहे. (प्र०) अहो ! ज्याप्रमाणें आकाशाचे घटाकाश, मठाकाश, मेघाकाश व महदाकाश असे भेद होतात, त्याचप्रमाणें ब्रह्माचेहि ब्रह्मांड व अंतःकरण या दोन उपाधींमुळें ईश्वर व जीव असे दोन भेद झाले आहेत, असें कां समजूं नये ? जेव्हां घटादि पदार्थ नष्ट होतील तेव्हां जसें महदाकाशच अवशिष्ट राहतें, त्याप्रमाणें अंतःकरणादि उपाधि नष्ट झाल्यानें सर्व ब्रह्मच अवशिष्ट राहील. (उ०) आकाशामध्यें घागर किंवा घर यांच्या योगानें काहींच फेरबदल होत नाहींत. व्यवहारामध्येंहि 'घागर घेऊन या' असें म्हणतात. 'घागरींतील आकाश घेऊन या' असें म्हणत नाहींत. तात्पर्य ही आपली उपपत्ति ठीक नाहीं. (प्र०) ज्याप्रमाणें समुद्रांत मासे व इतर प्राणी फिरतात व हवेमध्यें पक्षी फिरतात त्याचप्रमाणें चिदाकाशरूप ब्रह्मामध्यें अंतःकरणें फिरत असतात. ती स्वतः जड आहेत खरीं पण ज्याप्रमाणें अग्नीच्या सान्निध्यानें लोखंड उष्ण होतें, त्याप्रमाणेंच सर्वव्यापक परमेश्वराच्या सत्तेनें अन्तःकरणें चेतनाप्रमाणें काम

करतात. निश्चल आकाशामध्यें पक्षादि प्राणी जसे फिरतात, त्याचप्रमाणें निश्चल परब्रह्मामध्यें जीव फिरत असतात. असें असतां जीवाला ब्रह्म मानण्यामध्यें दोष कोणता ? (उ०) जर सर्वव्यापक ब्रह्म अंत:करणामध्यें प्रकाशमान होऊन जीवरूप बनतें तर त्यामध्यें ब्रह्माचें सर्वज्ञत्वादिगुण कां बरें येत नाहींत ? जर आवरण झाल्यामुळें त्याचे ते गुण प्रकाशित होत नाहींत असें म्हणाल तर ब्रह्म खंडित व आवृत होतें असें म्हणावें लागेल. जर आपण ब्रह्माला अखंडित मानाल तर त्यामध्यें अंत:करणांच्या पडद्यांनीं भेद उत्पन्न होऊं शकणार नाहीं. जर असा पडदा पडत नाहीं तर त्याची सर्वज्ञता कां दिसत नाहीं ? जर तें आपल्या स्वरूपाला विसरून अंत:करणासहित इतस्तत: चलन पावतेसें दिसतें, पण स्वरूपत: तें स्थिर आहे, असें मानाल तर अंत:करण ज्या ठिकाणीं जातें, तेथील ब्रह्म भ्रांतियुक्त अज्ञानी होतें व जेथून अंत:करण निघून जातें तेथील ब्रह्म ज्ञानी, पवित्र व मुक्त होतें असें म्हणावें लागेल. कारण अंत:करणाच्या योगानेंच ब्रह्मामध्यें विकार होतो असें तुम्ही मानतां. पण असें मानल्यानें ब्रह्मामध्यें अंत:करणाच्या योगानें कोठें केव्हां विघाड होईल, हें सांगतां येणार नाहीं व बंध व मुक्ति क्षणिक होईल ! तुम्ही म्हटल्याप्रमाणें जर वास्तविक स्थिति असती तर जीवाला पूर्वी पाहिलेल्या गोष्टीचें स्मरण राहिलें नसतें. कारण ज्या ब्रह्मानें अंत:करणासहित होऊन जी वस्तु पाहिली. तें ब्रह्म किंवा तो ब्रह्माचा अंश दुसऱ्या जागीं नसल्यामुळें, दुसऱ्या जागीं. व दुसऱ्या काळीं पूर्वीं पाहिलेल्या गोष्टीचें स्मरण राहूं शकणार नाहीं. तात्पर्य, जीव व ब्रह्म हे भिन्न भिन्न आहेत, एक नाहींत. नवीन वेदान्ती म्हणतात, आमच्या मतें हा सर्व अध्यारोप आहे. एका पदार्थावर दुसऱ्या पदार्थाचा आरोप करणें याला अध्यारोप म्हणतात. येथें ब्रह्माच्या ठिकाणीं सर्व जगाचा व सर्व व्यवहारांचा अध्यारोप करून जिज्ञासूला पूर्ण ब्रह्माची ओळख करून देणें हा हेतु आहे. वास्तविक पाहतां सर्वच ब्रह्म आहे. (ऋषि०) अध्यारोप करणारा कोण ? (नवीन वेदान्ती) जीव. (प्रश्न) जीव कोणाला म्हणतात ? (उत्तर) अंत:करणावच्छिन्न चेतनाला जीव असें म्हणतात. (प्रश्न) अंत:करणावच्छिन्न चेतन दुसरा आहे कीं तोहि ब्रह्मच आहे ? (उत्तर) तो ब्रह्मच आहे. (प्रश्न) तर मग ब्रह्मानेंच आपल्या ठिकाणीं खोटी कल्पना केली काय ? (उत्तर) हो ! यांत ब्रह्माची काय हानि ? (प्रश्न) मिथ्या कल्पना करणाऱ्याला खोटा-असत्य-असें म्हणत नाहीं काय ? (उत्तर) नाहीं. मन व वाणी यांच्या योगानें जे कल्पित किंवा कथित असतें, त्याला असत्य असें म्हणतात. (प्रश्न) बरें, मन व वाणी यांच्या योगानें मिथ्या कल्पना करणारें व खोटें बोलणारें ब्रह्म मिथ्या कल्पित आणि वादी होणार नाहीं काय ? (नवीन वेदान्ती) ही, आम्हांला इष्टापत्ति आहे. (ऋषि) धन्य आहे तुम्हां नवीन वेदान्त्यांची ! सत्यसंकल्प सत्यस्वरूप व सत्यकाम परमेश्वरालाहि मिथ्या कल्पना करणारा बनविलात. चोरानें कोतवालाला दण्ड करावा, या प्रकारची ही गोष्ट होय. तुम्ही मिथ्यावादी व असत्यसंकल्पी आहांत व असें असतांहि तुम्ही आपला दोष ब्रह्माला लावूं पाहतां काय ? ब्रह्म वास्तविक एकरस, अखंड, सत्यसंकल्प, सत्यज्ञानी, व सत्यकारी आहे. असत्यपणा हा तुमचा दोष असून त्याच्याशीं ब्रह्माचा मुळींच संबंध नाहीं. जिला तुम्ही विद्या म्हणतां ती शुद्ध अविद्या आहे व अध्यारोपहि मिथ्याच आहे. तुम्ही स्वत:ला ब्रह्म समजतां व ब्रह्माला जीव समजतां, यापेक्षां आणखी अज्ञान तें कोणतें असणार ? जो सर्वज्ञ व सर्वव्यापक आहे तो परिच्छिन्न, व बंधनयुक्त कधींहि होऊं शकत नाहीं. अज्ञान, परिच्छिन्न, एकदेशी, अल्प, अल्पज्ञ, असा जीव आहे व त्याहून ब्रह्म निराळेंच आहे.

**मुक्ति व बंध यांचें वर्णन:—** (प्र०) मुक्ति कशाला म्हणतात ? (उ०) **'मुञ्चन्ति पृथग्भवन्ति भूतानि यस्यां सा मुक्तिः ।'** जिच्यामुळें सुटका होते, तिला मुक्ति असें म्हणतात. (प्र०) कशापासून सुटणें ? (उ०) ज्यापासून सुटावें अशी इच्छा सर्व जीव करीत असतात त्यापासून. (प्र०) जीव कशापासून सुटण्याची इच्छा करतात ? (उ०) दु:खापासून सुटावें अशी सर्व जीव इच्छा करतात. (प्र०) दु:खापासून सुटून काय प्राप्त करून घेतात व कोठें राहातात ? (उ०) सुख प्राप्त करून घेतात व ब्रह्मांत राहतात. (प्र०) मुक्ति व बंध कशा कशापासून होतात ? (उ०) परमेश्वराची आज्ञा पालन करणें; अधर्म, अविद्या, कुसंग, कुसंस्कार इत्यादिकांपासून दूर राहणें; सत्यभाषण, परोपकार, विद्या, पक्षपातरहित न्याय व धर्म यांची वृद्धि करणें; पूर्वोक्त प्रकारानें परमेश्वराची स्तुति, प्रार्थना व उपासना करणें; योगाभ्यास करणें; विद्या शिकणें व शिकविणें; धर्मपूर्वक पुरुषार्थ करून ज्ञानाची उन्नति करणें; सर्वांत उत्तम

साधनांचें सहाय्य घेणें व जें कांहीं करावयाचें असेल तें पक्षपातरहित न्यायधर्मानुसार करणें या साधनांच्या योगानें मुक्ति मिळते व याहून विपरीत ईश्वराज्ञाभंग वगैरे कर्मांच्या योगानें बंध होतो. (प्र०) मुक्तिमध्यें जीवाचा लय होतो कीं तो विद्यमान असतो ? (उ०)मुक्तिमध्यें जीव विद्यमान असतो व तो ब्रह्मामध्यें राहतो. (प्र०) ब्रह्म कोठें आहे ? व तो मुक्त जीव एका ठिकाणीं राहतो कीं स्वेच्छेनें पाहिजे तेथें संचार करतो ? (उ०) ब्रह्म सर्वत्र पूर्ण आहे. त्याच्या आधारानें जीव सर्वत्र अव्याहत गति होऊन व विज्ञानानंदानें मुक्त होऊन स्वतंत्रपणानें संचार करतो. त्याला कोणताहि अडथळा होत नाहीं. (प्र०) मुक्त जीवाला स्थूल शरीर असतें कीं नाहीं ? (उ०) नाहीं. (प्र०) मग तो सुखाचा उपभोग कशानें घेतो ? (उ०) त्याचें भौतिक शरीर नाश पावतें. पण त्याचे सत्यसंकल्पादि स्वाभाविक गुण व सामर्थ्य हीं सर्व राहतात. त्यांच्या योगानें तो सर्व आनंदाचा भोग घेतो. पहा :—

**शृण्वन् श्रोत्रं भवति, स्पर्शयन् त्वग्भवति, पश्यन् चक्षुर्भवति, रसयन् रसना भवति, जिघ्रन् घ्राणं भवति, मन्वानो मनो भवति, बोधयन् बुद्धिर्भवति, चेतयंश्चित्तं भवति, अहङ्कुर्वाणोऽहंकारी भवति ॥**

शतपथ ब्रा० १४

मुक्तिमध्यें भौतिक शरीर अथवा इंद्रियांचे गोलक वगैरे साधनें जीवाबरोबर राहत नाहींत. पण त्याचे स्वभाविक शुद्ध गुण मात्र राहतात. जेव्हां ऐकण्याची इच्छा करतो तेव्हां श्रोत्र, स्पर्श करूं इच्छितो तेव्हां त्वक् पाहण्याची इच्छा करतो तेव्हां चक्षु, स्वाद घेऊं इच्छितो तेव्हां रसना, वास घेऊं इच्छितो तेव्हां नासिका, संकल्प विकल्प करण्याच्या वेळीं मन, निश्चय करण्याच्या वेळीं बुद्धि, स्मरण करावयाच्या वेळीं चित्त व अहंकाराच्यावेळीं अहंकाररूप अशा स्वशक्तीनें जीवात्मा मुक्तीच्या अवस्थेमध्यें होतो. मुक्तिमध्यें त्याचें संकल्पमात्र शरीर असतें. ज्याप्रमाणें ह्या भौतिक शरीराच्या आधारानें असतांना इंद्रियगोलकांच्या सहाय्यानें जीव आपलें कार्य करतो. त्याचप्रमाणें हें शरीर नसतांनाहि मुक्तिमध्यें आपल्या शक्तिनें तो सर्व आनंदाचा भोगा भोगतो. (प्र०) त्याची शक्ति किती प्रकाराची व केवढी आहे ? (उ०) मुख्य शक्ति एकाच प्रकारची आहे. पण बल, पराक्रम, आकर्षण, प्रेरणा, गति, भोषण, (भाषण) ? विवेचन, क्रिया, उत्साह, स्मरण, निश्चय, इच्छा, प्रेम, द्वेष, संयोग, विभाग, संयोजक, विभाजक, श्रवण, स्पर्शन, दर्शन, स्वादन, गंधग्रहण व ज्ञान या चौवीस प्रकारच्या सामर्थ्यांनीं जीव युक्त आहे. यांच्या योगानेंच मुक्तिमध्येहि तो आनंदाचा उपभोग घेतो. जर मुक्तिमध्यें जीवाचा लय झाला असता तर त्या सुखाचा उपभोग तरी कोणी घेतला असता ? जीवाच्या नाशाला मुक्ति व मुक्तिमध्यें जीवाचा नाश होतो, असें म्हणणें हें अविचाराचें आहे. सर्व दुःखांतून सुटून, आनंदस्वरूप सर्वव्यापक अनंत परमेश्वरामध्यें आनंदानें राहणें, ही जीवाची मुक्ति होय. पहाः—

**अभावं बादरिराह ह्येवम् ॥** वेदान्त द० ४।४।१०

बादरि हा व्यासाचा पिता होय. मुक्तिमध्यें जीव असतो व त्यासह मन असतें असें तो मानतो. अर्थात् मनाचा व जीवाचा मुक्तिमध्यें लय होतो असें पराशरमुनि मानत नाहींत. तसेंच—

**भावं जैमिनिर्विकल्पामननात् ॥** वेदान्त दर्शन ४।४।११

जैमिनि आचार्य मुक्त पुरुषाबरोबर मनासारखें सूक्ष्म शरीर, इंद्रियें व प्राणादिक हीं विद्यमान असतात असें मानतात; अर्थात् यांचा अभाव मानीत नाहींत. तसेंच—

**द्वादशाहवदुभयविधं बादरायणोऽतः ॥** वेदान्त द० ४।४।१२

व्यास मुनि मुक्तिमध्यें पूर्वोक्त साधनांचा भाव व अभाव हे दोन्ही असतात असें मानतात; अर्थात् शुद्ध सामर्थ्ययुक्त जीव मुक्तिमध्यें असतो व अपवित्रता, पापाचरण, दुःख व अज्ञानादिक हे नसतात असें व्यासांचें मत आहे. तसेंच-

**यदा पञ्चावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह । बुद्धिश्च न विचेष्टते तामाहुः परमाङ्गतिम् ॥** कठो. २।६।१०

'जेव्हां शुद्ध मनयुक्त पंचज्ञानेंद्रियें जीवासह राहतात व बुद्धीचा निश्चय स्थिर होतो, तेव्हां त्या स्थितीला परमगति किंवा मोक्ष असें म्हणतात.' तसेंच—

**य आत्मा अपहतपाप्मा विजरो विमृत्युर्विशोकोऽविजिघत्सोऽपिपासः सत्यकामः सत्यसङ्कल्पः सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः स सर्वां्ँश्च लोकानाप्नोति सर्वां्ँश्च कामान् यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति ॥** छांदो० ८।७।१

**स वा एष एतेन दैवेन चक्षुषा मनसैतान् कामान् पश्यन् रमते ॥ य एते ब्रह्मलोके तं वा एतं देवा आत्मानमुपासते तस्मात्तेषां्ँ सर्वे च लोका आत्ताः सर्वे च कामाः स सर्वां्ँश्च लोकानाप्नोति सर्वां्ँश्च कामान्यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति॥** छांदोग्य ८।१२।५-६

**मघवन्मर्त्यं वा इद्ँ शरीरमात्तं मृत्युना तदस्याऽमृतस्या शरीरस्या त्मनोऽधिष्ठानमात्तो वै सशरीरः प्रियाप्रियाभ्यां न वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्त्यशरीरं वाव सन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः ॥** छांदोग्य ८।१२।१

'परमात्म्यामध्यें पाप, जरा, मृत्यु, शोक, क्षुधा, तृष्णा हे गुण नाहींत. तो सत्यकाम व सत्यसंकल्प आहे. त्याला शोधावा व त्यालाच जाणण्याची इच्छा धरावी. परमात्म्याच्या आश्रयाने मुक्त जीव सर्व लोकलोकांतरांना प्राप्त होऊन त्यांच्या सर्व इच्छा तृप्त होतात. जो परमात्मज्ञान प्राप्त करून घेऊन, मोक्षाचें साधन करणें व आपली शुद्धि करणें या दोन गोष्टी जाणतो, तो जीव मुक्तीला प्राप्त होऊन शुद्ध मन व दिव्य नेत्रांच्या योगानें सर्व कामनांना प्राप्त होत होत अत्यंत रममाण होतो. ज्या ब्रह्मलोकामध्यें अर्थात् दर्शनीय परमात्मामध्यें स्थित होऊन मोक्षसुखाचा उपभोग घेतात, त्या सर्वांतर्यामी परमात्म्याचीच मुमुक्षु लोक उपासना करतात, या उपासनेच्या योगानें त्याना सर्व कामना प्राप्त होतात. ते उपासक जे जे संकल्प करतात ते ते त्यांना प्राप्त होऊन त्यांनीं इच्छिलेल्या सर्व कामना पूर्ण होतात. ते मुक्त जीव स्थूल शरीर सोडून संकल्पमय शरीराचा आश्रय करून परमेश्वरामध्यें सर्वत्र संचार करतात. जे शरीरानें युक्त असतात ते सांसारिक दुःखांतून सुटूं शकत नाहींत, जसें एक वेळ इंद्राला प्रजापतीनें सांगितलें कीं, 'हे परमपूज्य धनयुक्त पुरुषा ! हें स्थूल शरीर मरणधर्मयुक्त आहे व ज्या प्रमाणें सिंहाच्या तोंडांत बकरी असते, त्याप्रमाणें हें मृत्यूच्या मुखांत पडलेलें आहे. तें हें शरीर मृत्यु व शरीररहित जीवाचें निवासस्थान आहे; व म्हणूनच हा शरीरधारी जीव सुखदुःखानीं सदोदित ग्रस्त झालेला असतो. संसारामध्यें असणाऱ्या शरीरासहित जीवाची सांसारिक प्रसन्नतेची निवृत्तिहि होत असते खरी, तरी तो सदैव आनंदात नसतो. पण मुक्तावस्थेंतील शरीररहित जीव सदोदित ब्रह्मामध्येंच राहात असल्यामुळें, त्याला सांसारिक सुखदुःखांचा स्पर्श होत नाहीं, व त्यामुळें तो सदैव शुद्ध आनंदामध्येंच रममाण असतो.'

**मुक्तींतून पुनरावृत्ति –(प्र०)** जीवाला मुक्ति मिळाल्यानंतर केव्हांतरीं तो जन्ममरणरूपी दुःखामध्यें पुनः येतो कीं नाहीं ? कारण—

**न च पुनरावर्तते न च पुनरावर्तते इति ॥** छां० ८।१५ **॥ अनावृत्तिः शब्दादनावृत्तिः शब्दात् ॥** वेदांत दर्शन ४।४।२३ ॥ **यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥** गीता० ॥ अ. १५ श्लोक ६

इत्यादि वचनांवरुन असें दिसतें कीं एकदां मुक्ति प्राप्त झाल्यावर पुनः त्याला संसारांत यावें लागत नाहीं. (उ०) मुक्ति झाल्यावरहि पुनरावृत्ति होते, कारण तसें वेदामध्यें लिहिलें आहे. पहा:—

**कस्य नूनं कतमस्यामृतानां मनामहे चारुदेवस्य नाम ॥ को नो मह्या अदितये पुनर्दात् पितरं च दृशेयं मातरं च ॥ १ ॥ अग्नेर्वयं प्रथमस्यामृतानां मनामहे चारुदेवस्य नाम ॥ स नो मह्या अदितये पुनर्दात् पितरं च दृशेयं मातरं च ॥ २ ॥** ऋ. मं. १।२४

'आम्ही कोणाचें नांव पवित्र आहे असें समजावें ? कोणता देव नाशरहित पदार्थामध्यें मुख्य असून सदा प्रकाशस्वरूप आहे ? कोण आम्हांला मुक्तीच्या सुखाचा उपभोग करवून देऊन, पुनः आम्हांला या संसारांत जन्म देऊन, मातापित्यांच्यें दर्शन करुन देतो ?' या प्रश्नांत उत्तरें—'आम्ही स्वप्रकाशस्वरूप. अनादि, सदामुक्त अशा

परमात्म्याचेंच नांव पवित्र आहे असें समजावें; जो आम्हांला मुक्तिमध्यें आनंद प्राप्त करुन देतो, व पुनः पृथ्वीवर मातापित्याशीं संबंध जोडून जन्म देतो, तोच मुक्तीची व्यवस्था करतो व तोच सर्वांचा स्वामी आहे.' तसेंच—

**इदानीमिव सर्वत्र नात्यन्तोच्छेदः ॥** सांख्य ॥. १।१५९ ॥

'ज्याप्रमाणें सध्यां कांहीं जीव बद्ध आहेत व कांहीं मुक्त आहेत, त्याचप्रमाणें सर्वदा स्थिति राहते. बंध व मुक्ति यांचा अत्यंत विच्छेद केव्हांहि होत नाहीं.' तात्पर्य बन्ध जसा कायमचा नसतो त्याचप्रमाणें मुक्तिहि कायमचीनसते.

(प्र०) **तदत्यन्तविमोक्षोऽपवर्गः** ॥ न्यायदर्शन १।२२

**दुःखजन्मप्रवृत्तिदोषमिथ्याज्ञानानामुत्तरोत्तरापाये तद नन्तरापायादपवर्गः** ॥ न्यायदर्शन १।२ ॥

'दुःखाच्या अत्यंत-पूर्ण-विच्छेदालाच मुक्ति असें म्हणतात.' जेव्हां मिथ्याज्ञान, अविद्या, लोभादि दोष, विषयादि दुष्ट व्यसनामध्यें प्रवृत्ति, जन्म व दुःख यांचीं उत्तरोत्तर निवृत्ति झाल्यानें पाठीमागच्यांचा नाश होतो व या प्रमाणें शेवटीं दुःखांचा पूर्ण नाश झाल्यानें जो मोक्ष होतो तो सदोदित राहतो; वारंवार वदलत नाहीं असें असतां मुक्तींतून पुनरावृत्ति कशी होते ? (उ०) 'अत्यन्तम्' हा शब्द 'अत्यन्तभाव' असा अर्थ दाखवीत नाहीं. 'अत्यंतं दुःखं अत्यंतं सुखं चास्य वर्तते ।' या वाक्यांत 'या मनुष्याला पुष्कळ दुःख व पुष्कळ सुख होतें' असा अर्थ आहे. तात्पर्य अत्यन्तम्' शब्दाचा 'पुष्कळ' असाच अर्थ होतो व हाच अर्थ **'तदत्यन्तविमोक्षो०'** या ठिकाणींहि घेतला पाहिजे. हा अर्थ ध्यानांत आणला असतां या वाक्यावरुन मुक्तींतून पुनरावृत्ति होत नाहीं असें ठरत नाहीं. (प्र०) बरें, जर मुक्तींतूनहि जीव परत येतो, तर मग तो मुक्तावस्थेमध्यें तरी किती दिवस राहातो ? (उ०)

**ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः परिमुच्यन्ति सर्वे** ॥ मुंडक. ३।२।६

'ज्यांना मुक्ति प्राप्त होते ते जीव एक महाकल्पपर्यंत ब्रह्मामध्यें आनंदानें राहून, नंतर पुनः संसारमध्यें येतात.' त्रेचाळीस लक्ष बीस सहस्र वर्षांची एक चतुर्युगी, दोन हजार चतुयुगीची एक अहोरात्र तीस अहोरात्रांचा एक महिना, बारा महिन्याचें एक वर्ष, व शंभर वर्षांचा एक **परान्तकाल** होतो. याप्रमाणें गणित करुन मुक्तींचे सुख भोगण्याची किती वर्षे होतात तें जाणावें. (प्र०) पण सर्व लोक मुक्तींमधून पुनः संसारांत जीव येत नाहींत असें जे मानतात ते सर्व खोटेच काय ? (उ०) मुक्तींमधून पुनरावृत्ति होणारच. कारण जीवाचें सामर्थ्य, शरीरादि साधनें व त्याचे उपाय हे सर्व परिमितच आहेत. मग अशा परिमिति साधनांच्या योगानें मिळविलेली मुक्ति अपरिमित कशी असू शकेल ? अनंत आनंद, अनंत कालपर्यंत भोगण्याचें सामर्थ्य, कर्म व साधन जीवामध्यें नाहीं; म्हणून ते अनंत सुखाचा उपभोग घेऊं शकत नाहींत. ज्यांचें साधन अनित्य आहे त्यांचें फलहि अनित्यच असणार शिवाय जर मुक्तींमधून जीव परत येत नसता तर या जगाचा उच्छेद झाला असता. कारण मुक्त होऊन एक एक जीव संसारातून नाहींसा झाला असता. पण तसे होत नाहीं व पुनः पुनः ते पूर्वी सांगितलेल्या वर्षसंख्येनंतर संसारांत येत असल्यामुळें हा संसार प्रवाहरूपानें अनादि व अनंत असा चालला आहे. (प्र०) जितके जीव मुक्त होतात तितके जीव परमेश्वर नवीन बनवितो व त्यांना संसारांत पाठवितो असें मानलें म्हणजे हा संसारप्रवाह अनादि होईल काय ? (उ०) असें मानलें तर जीवानां अनित्य मानावें लागेल. जे उत्पन्न होतात त्यांचा नाश अवश्य झालाच पाहिजे. तुमच्या मतांनें त्यांना मुक्ति मिळाली असतांही त्यांचा नाश होऊं लागेल व त्यामुळें मुक्ति अनित्य होईल. शिवाय तेथें गेलेले तुमच्या मतें परत येत नाहींत म्हणून मुक्तीच्या ठिकाणीं नेहमीं भरतीच होत असल्यामुळें फार गर्दी होईल; तसेंच तेथें एकाच सुखाचा त्यांना अनादिकालपर्यंत अनुभव येणार असल्यामुळें त्यांत त्यांला सुख तरी काय वाटणार ? दुःखाच्या अनुभवावांचून सुखाची मातब्बरी ती काय ? अनेक रस आहेत म्हणून मधुर रसांना महत्त्व आहे. जर एखादा मनुष्य गोडच खाऊं लागला व दुसऱ्या कोणत्याहि रसाचा आस्वाद त्यानें घेतला नाहीं तर त्यास पुढें गोडी समजणारहि नाहीं. कटु आदि अनेक रस खाऊन मग गोड खाल्लें असतां जशी त्याला त्याची मधुरता समजते, तशी ती एकाच मधुर रसाचें सेवन करणाऱ्याला समजत नाहीं; त्याच प्रमाणें संसारांतील दुःखांचा अनुभव घेतल्यानंतर मिळणाऱ्या मुक्तिसुखापासून खरा आनंद होतो. पण तेंच जर न संपणारें असलें तर त्यांत पुढें आनंद नाहींसा होईल. म्हणून पुनरावृत्तींची आवश्यकता

आहे. मुक्त झालेला जीव एक परान्तकालपर्यंत मुक्तिसुखाचा अनुभव घेतो व नंतर येथें फिरून येतो व पुनः साधन करून मुक्ति मिळवितो. अशी ही वस्तुस्थिति आहे. शिवाय परमेश्वर न्यायी असल्यानें तो नियमित कर्मांचें अनियमित फल कसें देईल ? असें केलें असतां त्याचा न्यायीपणा कमी होतो. जितकी ज्याच्यामध्यें शक्ति असेल तितकें ओझें त्यावर देणें हेंच समंजसपणाचें आहे. एक मण वजन उचलण्याची ज्याला शक्ति आहे त्याला जर दहा मण बोजा दिला तर त्याची निंदा होते, त्याचप्रमाणें अल्पज्ञ व अल्पसामर्थ्यवान् जीवावर अनंत सुखाचा भार घालणें, हें ईश्वराला कधींहि योग्य होणार नाहीं. असो परमेश्वर नवीन जीव उत्पन्न करतो हें म्हणणेंहि निर्मूल आहे व असें झाल्यानें सृष्टीचा प्रवाह केव्हांहि सारखा चालणार नाहीं. कारण ज्या कारणापासून जीव हें कार्य परमेश्वर करतो, त्यांत भर मुळींच पडत नसल्यामुळें त्याचा केव्हांना केव्हां तरी नाश होणारच. तसेंच ते जीव उत्पन्न होण्याचें कारण केवढेंहि मोठें असलें तरी त्यांतून खर्च मात्र होत असल्यामुळें व भर मुळींच पडत नसल्यामुळें जीव उत्पन्न होणें बंद होऊन सृष्टीचा उच्छेद होईल. पहा, एखाद्याजवळ अत्यंत भरलेला जरी खजिना असला व तो त्यांत कांहीं भर न घालतां केवळ खर्च करूं लागला तर तो त्याचा खजिना केव्हांना केव्हां तरी रिकामा होणारच. त्याचप्रमाणें जीवांच्या उत्पत्तीचें कारण समजावें. तात्पर्य हें संसारचक्र अव्याहत चालण्यास मुक्ति व पुनरावृत्ति यांची आवश्यकता आहेच. कांहीं दिवस कारागृहवास भोगण्यापेक्षां जन्मठेप कोण पसंत करील ? मुक्तींतून पुनः परत न येणें ही एक प्रकारची कैदच आहे. त्यांत सक्त *मजुरी नाहीं, इतकाच भेद आहे; तसेंच जीवाचा ब्रह्मामध्यें लय होणें हें समुद्रांत बुडून मरण्यासारखें आहे, तेव्हां* तेंहि श्रेयस्कर नाहीं. (प्र०) अहो, जसा परमेश्वर नित्यमुक्त व पूर्णसुखी आहे, त्याचप्रमाणें जीवहि मुक्त झाल्यानंतर नित्यमुक्त व पूर्ण सुखी राहील, असें मानावयाला काय हरकत आहे ? (उ०) परमेश्वराचें अनन्त स्वरूप, सामर्थ्य, गुण, कर्म, स्वभाव, हीं सर्व अनंत आहेत म्हणून तो अविद्या व दुःख यांत केव्हांहि पडत नाहीं. जीव मुक्त झाल्यावरहि तो शुद्ध स्वरूप, अल्पज्ञ व परिमित गुणकर्मस्वभावयुक्तच असतो. तो परमेश्वराप्रमाणें अनंतसामर्थ्ययुक्त कधींहि होत नाहीं. (प्र०) मग ही मुक्तिहि जन्ममरणप्रमाणेंच झाली. मग हिच्यासाठीं खटपट करून तरी काय लाभ ? (उ०) मुक्ति जन्ममरणाप्रमाणें नाहीं. कारण छत्तीस हजार वेळां सृष्टीची उत्पत्ति व प्रलय होण्याला जेवढा समय लागतो, तितका वेळा जीव आनंदाचा उपभोग घेत असतो व त्याला त्या वेळामध्यें दुःखाचा लेशहि होत नाहीं. ही काय लहान गोष्ट आहे ? आज भोजन केलें असतां पुनः उद्यां भूक लागते असें असूनहि तुम्ही क्षुधा निवारण्याचा उपाय करतां व एक कल्पान्तपर्यंत आनंद मिळत असतां, त्याच्यासाठीं प्रयत्न करणें व्यर्थ समजतां हें मोठें आश्चर्य होय. क्षुधा तृषा, धन, राज्य, प्रतिष्ठा, स्त्री, संतान यांसाठीं जर प्रयत्न करणें आवश्यक आहे, तर मग मुक्तीसाठीं कां करूं नये ? जसें मनुष्य मरणार हें ठरलेलें असतांहि जगण्याचा उपाय मनुष्यें करतात, त्याचप्रमाणें मुक्तींतून पुनरावृत्ति असतांहि ती प्राप्त होण्याचे उपाय करणें आवश्यक आहे. (प्र०) मुक्तीचें साधन कोणतें ? (उ०) मुक्तीचीं साधनें पूर्वीं सांगितलेलीं आहेत. आतां कांहीं विशेष साधनांविषयीं थोडेसें सांगतों. ज्याला मुक्ति प्राप्त करून घेणयाची इच्छा असेल त्यानें दुःख उत्पन्न करणाऱ्या मिथ्याभाषणादि पापकर्मांचा त्याग करावा व सुख देणाऱ्या सत्यभाषणादि धर्माचरणांचा स्वीकार करावा. जो जो कोणी दुःखाचा त्याग व सुखाची प्राप्ति यांची इच्छा करील त्यानें अधर्म सोडून धर्माचा आश्रय करावा; कारण दुःखाचें मूल पापाचरण व सुखाचें मूल धर्माचरण हें आहे. सत्पुरुषांच्या संगतीनें सत्यासत्य, धर्माधर्म, कर्तव्याकर्तव्य यांविषयीं विचार करावा व त्यांतील भेद जाणावा; शरीर व पंचकोष यासंबंधानें विचार करावा. एक **'अन्नमयकोश'** हा त्वचेपासून अस्थिपर्यंत असणाऱ्या पदार्थांचा समुदाय, हा पृथ्वितत्वाचा बनलेला आहे. दुसरा **'प्राणमयकोश'** हा पंचप्राणांचा बनलेला आहे. जो वायु बाहेरून आंत येतो तो 'प्राण' आंतून बाहेर जातो तो 'अपान,' जो नाभीमध्यें राहून सर्व शरीरांत रस पोंचवितो तो 'समान,' जो कंठामध्यें राहून अन्नपानादि व्यवहार चालवितो व बलपराक्रम वाढवितो तो 'उदान' व ज्याच्या योगानें सर्व शरीरांतील हालचाल व इतर चेष्टा जीवाच्या इच्छेनुरूप सहज होतात त्याला व्यान असें म्हणतात. या पांच प्राणांचा प्राणमयकोश बनलेला आहे. तिसरा **'मनोमयकोश'** यामध्यें मनासह अहंकार, वाक् पाद, पाणि, पायु, उपस्थ या पांच कर्मेंद्रियांचा समावेश होतो. चवथा **'विज्ञानमयकोश'** यामध्यें बुद्धि, चित्त, श्रोत्र,

त्वचा, नेत्र, जिव्हा व नासिका या पंचज्ञानेंद्रियांचा समावेश होतो. यांच्याच योगानें जीवज्ञानग्रहण वगैरे ज्ञानसंबंधीं व्यवहार करतो. पांचवा **'आनंदमयकोश'** याच्या योगानें प्रीति, प्रसन्नता, न्यूनाधिक आनंद हीं होतात व कारणरूप प्रकृति या कोशाला आधार आहे. या पांच कोशाच्या योगानें जीव सर्व प्रकारचें कर्म, उपासना व ज्ञान वगैरे व्यवहार करतो. या कोशांप्रमाणेंच जागृति, स्वप्न व सुषुप्ति अशा तीन अवस्था आहेत. तसेंच या जीवाला तीन शरीरें आहेत. जें आपल्याला दिसतें तें 'स्थूल शरीर,' पंचप्राण, पंचज्ञानेंद्रियें, पंच सूक्ष्मभूतें, मन व बुद्धि या सतरा तत्त्वांच्या समुदायाला 'सूक्ष्मशरीर,' असें म्हणतात. हें सूक्ष्मशरीर जन्ममरणादि अवस्थांमध्यें जीवाबरोबर राहतें. याचे दोन भेद आहेत. एक भौतिक व दुसरा स्वाभाविक. सूक्ष्मभूतांच्या अंशानें जें बनलें आहे त्याला भौतिक सूक्ष्मशरीर असें म्हणतात व दुसरें जीवाच्या स्वाभाविक गुणरूपानें बनलेलें असतें त्याला स्वाभाविक सूक्ष्मशरीर असें म्हणतात. हीं दोनहि सूक्ष्मशरीरें मुक्तीमध्येंहि जीवाबरोबर राहतात व यांच्या योगानेंच जीव तेथील आनंदाचा उपभोग घेतो. तिसरें कारण शरीर हें मूलप्रकृतीचें बनलेलें असल्यामुळें सर्वत्र विभु व सर्व जीवांना मिळून एक आहे. या शरीराच्या योगानें जीवांना गाढ निद्रेचा अनुभव येतो. चवथें तुरीयशरीर, या शरीरामध्यें जीव जाऊन आनंदस्वरूप परमात्म्या-मध्यें मग्न होतो. या समाधिसंस्कारजन्य शुद्ध शरीरापासून होणारा आनंद मुक्तींतील आनंदासारखा असतो. या सर्व कोशावस्था व शरीरादिक यांहून जीव पृथक् आहे. कारण जेव्हां मनुष्य मरतो तेव्हां 'या शरीरांतून जीव गेला' असें सर्व म्हणतात. हाच जीव प्रेरक, कर्ता, धर्ता, साक्षी व भोक्ता असा आहे. जो मनुष्य जीव हा कर्ता, भोक्ता नाहीं असें समजतो, तो अज्ञानी आहे असें समजावें. कारण हे जे शरीरादिक जड पदार्थ आहेत, त्यामध्यें सुखदुःखांचा भोग व पापपुण्याचें कर्तृत्व संभवतच नाहीं. हां, यांच्या सहाय्यानें जीव पापपुण्य करतो व त्यांचें फलहि भोगतो ही गोष्ट खरी आहे. जेव्हां इंद्रियें विषयांमध्यें, मन इंद्रियामध्यें, आत्मा मनामध्यें संयुक्त होऊन प्रणांला प्रेरणा करतो व बरीं वाईट कामें करण्यास लागतो तेव्हांच तो बहिर्मुख होतो. यावेळीं आंतून त्याला चांगलीं कामें करण्याविषयीं आनंद, उत्साह, निर्भयता व वाईट कामें करतांना भय, शंका व लज्जा हीं उत्पन्न होतात हेंच परमात्म्याचें शिक्षण आहे. **जो या शिक्षणाप्रमाणें वागतो त्याला मुक्तिजन्य सुखांचा लाभ होतो** व जो विपरीत आचरण करतो त्याला बंधजन्य दुःख भोगावें लागतें. हें एक साधन झालें. दुसरे साधन 'वैराग्य' हें आहे. ज्या सत्यासत्याविषयीं आपली खात्री झाली असेल, त्यांतील सत्याचें ग्रहण करून असत्याचा त्याग करणें, या निस्पृह आचरणाला विवेक असें म्हणतात. वैराग्यामध्यें या विवेकाचेंच प्राधान्य असतें. तसेंच पृथ्वीपासून परमेश्वरापर्यंत असणाऱ्या सर्व पदार्थांचें ज्ञान करून घेऊन व त्यांचे गुणकर्म स्वभाव जाणून, परमेश्वराची आज्ञा पालन करणें व त्याच्याच उपासनेमध्यें तत्पर राहणें. त्याच्या विरुद्ध आचरण न करणें, सृष्टीपासून उपकार करून घेणें, इत्यादि प्रकाराला विवेक असें म्हणतात. हें मुक्तीचें दुसरें साधन होय. शमदमादि 'षट् संपत्ति' हें तिसरें साधन. यामध्यें सहा प्रकारचीं कर्में करावीं लागतात, तीं हीं:-(१) आपल्या आत्म्याला व अंतःकरणाला अधर्माचरणापासून सोडवून धर्माचरणांत तत्पर करणें याला 'शम' असें म्हणतात. (२) श्रोत्रादि इंद्रियें व शरीर यांना व्यभिचारादि कुकर्मांपासून निवृत्त करून जितेंद्रियत्वादि शुभकर्मांमध्यें प्रवृत्त करणें याला 'दम' असें म्हणतात. (३) दुष्ट कर्में करणाऱ्या पुरुषांपासून सदैव दूर राहण्याची इच्छा करणें याला 'उपरति' असें म्हणतात. (४) निंदा, स्तुति, हानि, लाभ कांहीं झालें तरी आरंभलेलें मुक्तीचें साधन न सोडणें व हर्षशोकांत न फसणें याला 'तितिक्षा' असें म्हणतात. (५) वेदादि सत्यशास्त्रांवर व त्यांतील ज्ञानानें प्रबुद्ध झालेल्या सत्योपदेशक आप्तपुरुषावर विश्वास ठेवणें याला 'श्रद्धा' असें म्हणतात. (६) चित्ताची एकाग्रता ठेवणें याला 'समाधान' असें म्हणतात. ही षट्संपत्ति मिळून मुक्तीचें तिसरे साधन होतें. 'मुमुक्षुत्व' हें चवथें साधन आहे. ज्याप्रमाणें क्षुधा व तृषा यांनीं आतुर झालेल्या माण-साला अन्न व जल यांशिवाय कांहीं सुचत नाहीं, त्याचप्रमाणें मुक्ति व मुक्तीचीं साधनें यांशिवाय ज्याची कशावरहि प्रीति नसते त्याला 'मुमुक्षु' असें म्हणतात. या चार साधनानीं युक्त जो पुरुष तोच मोक्षाचा 'अधिकारी' समजावा. ब्रह्मप्राप्तीवरून मुक्ति हा प्रतिपाद्यविषय व वेदशास्त्रें हीं प्रतिपादक या दोहोंचें यथायोग्य ज्ञान होणें याला 'संबंध' असें म्हणतात, सर्व शास्त्रांनीं प्रतिपादन केलेला ब्रह्मप्राप्तिरूप विषय ज्याचा आहे तो 'विषयी' होय. सर्व दुःखाची

निवृत्ति होऊन परमानंदाची प्राप्ति होणें हें 'प्रयोजन' आहे. अधिकारी, संबंध, विषयी व प्रयोजन यांना अनुबंधचतुष्टय असें म्हणतात. यानंतर 'श्रवणचतुष्टय' आहे व तेंहि मुक्तीला आवश्यक आहे. तें हें :–(१) कोणी विद्वान् उपदेशक जो उपदेश करील तो ध्यान देऊन ऐकणें. विशेषतः ब्रह्मविद्येचा उपदेश एकाग्रतेनें ऐकणें याला 'श्रवण' असें म्हणतात. (२) जें ऐकलें असेल त्याविषयीं एकान्तामध्यें बसून विचार करणें, शंका येईल तीविषयीं ज्ञात्याकडून समाधान करून घेणें, वक्ता व श्रोता यांच्या सवडीप्रमाणें प्रश्नोत्तरें करून समाधान करून घेणें, याला 'मनन' असें म्हणतात. (३) जेव्हां ऐकण्यानें व मननानें एखाद्या गोष्टीविषयीं निःसंदेह खात्री होईल, तेव्हां ध्यानयोगानें समाधिस्थ होऊन जी गोष्ट ऐकली होती व विचारानें ठरविली होती ती तशीच आहे कीं नाहीं तें पाहणें याला 'निदिध्यास' असें म्हणतात. (४) जसे पदार्थाचे गुणकर्मस्वभाव व स्वरूप असेल त्याप्रमाणें बिनचूक जाणणें याला 'साक्षात्कार' असें म्हणतात. या चारांना श्रवणचतुष्टय असें म्हणतात. हें केल्यावर क्रोध, मलिनता, आलस्य, प्रमाद आदि तमोगुण, ईर्ष्या, द्वेष, काम, अभिमान, विक्षेप इत्यादि रजोगुण या दोनहि गुणांचा त्याग करावा व शांति, पवित्रता, विद्या, विचार इत्यादि सत्त्वगुणांचा स्वीकार करावा. त्याचप्रमाणें मुमुक्षूनें (मैत्री) सुखी जनांशीं मैत्री, (करुणा) दुःखी जनांवर दया, (मुदिता) पुण्यात्म्यांला पाहून हर्षित होणें व (उपेक्षा) दुष्ट जनांशीं प्रेम किंवा वैर कांहीं न करतां, त्यांची उपेक्षा करावी. या रीतीनें लोकांशीं त्यानें आचरण ठेवावें. मुमुक्षूनें दररोज कमींत कमी दोन तासपर्यंत ध्यान करीत जावें. या ध्यानाच्या योगानें त्याला मन आदि आंतरिक तत्त्वांचा साक्षात्कार होईल. आपण चेतनस्वरूप व ज्ञानरूप असून मनाचा साक्षी आहे. जेव्हां मन शांत, चंचल, आनंदित व विषादयुक्त होतें तेव्हां तें तसेंच आत्म्याला समजतें, यावरून आत्मा हा साक्षी आहे असें ठरतें. तसेंच तो इंद्रियादिकांचा व प्राणांचा ज्ञाता, पूर्वी पाहिलेल्या गोष्टीचा स्मरणकर्ता, एका कालीं अनेक पदार्थांना जाणणारा, धारण व आकर्षण कर्ता, व सर्वांहून पृथक् असा आहे. जर तो पृथक् नसता तर तो स्वतंत्र कर्ता, प्रेरक व अधिष्ठाता कधींहि झाला नसता.

अविद्याऽस्मितारागद्वेषाभिनिवेशाः पञ्च क्लेशाः ॥ योगदर्शन २।३

अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश या पांच क्लेशांपैकीं अविद्येविषयीं मागें सांगितलेंच आहे. आत्म्याहून पृथक् असलेल्या बुद्धीला आत्मा समजणें याला 'अस्मिता' असें म्हणतात. सुख देणाऱ्या पदार्थांवर प्रीति करणें याला 'राग' असें म्हणतात. दुःखदायक पदार्थांवर अप्रीति करणें याला 'द्वेष' असें म्हणतात. मी याच शरीरांत सदैव रहावें, मरूं नये असें वाटणें याला 'अभिनिवेश' असें म्हणतात. या पांच क्लेशांपासून योगाभ्यासजन्य विज्ञानानें सुटून ब्रह्मप्राप्ति करून घ्यावी व मुक्तीच्या आनंदाचा उपभोग घ्यावा. (प्रश्न) या भूमंडलावर अनेक मतमतांतरें आहेत व ते प्रत्येक निरनिराळया स्थानप्राप्तीला मुक्ति असें समजतात. जैन लोक एका शिळेला मोक्ष म्हणतात. खिस्ती लोकांच्या मतें चवथें आकाश व तेथें विवाह, बाजा, वाजंत्रे व वस्त्रादिक उपभोगाच्या साधनांनीं सुख मिळतें, असें समजतात. मुसलमान लोक सातव्या आकाशाला, वाममार्गी श्रीपुराला, शैव कैलासाला, वैष्णव वैकुंठाला, गोकुल गोसांवी गोलोकाला उत्तम स्त्री, अन्नपान, वस्त्रप्रावरण प्राप्त करून घेऊन आनंदांत राहणें, याला मुक्ति असें समजतात. पौराणिक लोक (सालोक्य) ईश्वराच्या लोकांमध्यें निवास करणें (सायुज्य) लहान भावाप्रमाणें ईश्वरासह राहणें (सारूप्य) उपासनीय देवाच्या आकृतीप्रमाणें आपली आकृति बनणें, (सामीप्य) सेवकाप्रमाणें ईश्वराजवळ नेहेमीं राहणें, (सायुज्य) ईश्वरामध्यें मिळून जाणें या प्रकारच्या अनेक दर्जाच्या मुक्ति मानतात. वेदान्ती लोक ब्रह्मामध्यें लय होण्याला मुक्ति म्हणतात. या अनेक मतांमध्यें खरें काय आहे बरें ? (उ०) जैन, खिस्ती व मुसलमान यांच्या मतासंबंधानें पुढें सविस्तर वर्णन करण्यांत येईल. त्यावेळीं त्यांच्या मुक्तीच्या कल्पनाहि सांगूं. वाममार्गी लोक श्रीपुरांत जाऊन तेथें लक्ष्मीसदृश्य स्त्रियांशीं संग करणें, मद्यमांस वगैरे खाणें व रंगराग करणें, याला मुक्ति असें मानतात. पण तो प्रकार येथील दुष्ट आचरणापेक्षां कांहीं विशेष नाहीं. शैव व वैष्णव लोक आपआपल्या लोकाला जाऊन, तेथें पार्वती व लक्ष्मीसारख्या स्त्रियांबरोबर सदैव राहणें व आपली आकृति शिव व विष्णूप्रमाणें बनविणें यागोष्टीहि वरीलप्रमाणेंच

आहेत. या लोकांतील व्यसनी धनाढ्य पुरुषांच्या लीलांपेक्षां त्यांत काय जास्त आहे ? तेथें रोग होत नाहींत व सदैव तारुण्य राहतें हाच काय तो तेथें विशेष आहे असें ते सांगतात. पण विषयीपणाशिवाय या सर्वांत काय जास्त आहे ? वास्तविक पाहतां जेथें भोग तेथें रोग व जेथें रोग तेथें वृद्धावस्था ही परंपरा असणारच. पौराणिकांच्या चतुर्विध मुक्ति तर सर्व कीटपतंगादि प्राण्यांना सदैव असतातच. त्यांत जास्त तें काय ? पहा:—ईश्वर सर्वत्र आहे व सर्व प्राणी ईश्वरांत आहेत; यावरून सर्वांना 'सालोक्य' मुक्ति अनायासानें प्राप्त आहे. तो सर्वत्र असल्यानें 'सामीप्य' मुक्तिहि सर्वांना आहेच. जीव हा ईश्वराहून लहान व ईश्वराप्रमाणें चेतन असल्यामुळें बंधूप्रमाणेंच आहे. अर्थात् 'सानुज्य' मुक्ति स्वतः सिद्ध आहेच. परमेश्वर व्यापक व जीव व्याप्य असल्यामुळें 'सायुज्य' मुक्तिहि सदैव जीवांना आहेच. या मुक्ति सर्वांना सदैव मिळणाऱ्या असल्यानें यांचें कांहींच महत्त्व नाहीं. नास्तिक लोक मनुष्य मेल्यानंतर त्याचें शरीर पंचतत्त्वांमध्यें मिसळतें यालाच मुक्ति असें म्हणतात. ही अनायासानें कावळ्याकुत्र्यांनाहि मिळत असल्यानें विचारार्ह नाहीं. तात्पर्य, शिवपुर, गोलोक, शिला, चवथें आकाश, सातवें आकाश, श्रीपुर, कैलास, वैकुंठ अशा प्रकारचें विशेष स्थान ही मुक्ति होऊं शकत नाहीं. कारण त्या स्थानांतून बाहेर गेल्यानें त्यांना मुक्ति मिळणार नाहीं. विशेष स्थानीं राहणें व अमुक ठिकाणीं न जाणें ही स्थिति मुक्तीची नाहीं. मुक्तीमध्यें मुक्त जीवाची अव्याहत गति असली पाहिजे. तो पाहिजे तेथें अडथळ्यावांचून जाऊं शकेल; भय, शंका, दुःख हीं त्याला होणार नाहींत; अशा आनंदमय अवस्थेला मुक्ति असें म्हणतात. पूर्वोक्त स्थानविशेष हे या मतमतातरांनीं उभारलेल्या अनेक कल्पत होत. त्यांना कोणीहि फसूं नये.

**पुनर्जन्म**— (प्र०) जीवाला एकच जन्म घ्यावा लागतो कीं अनेक ? (उ०) अनेक. (प्र) जर अनेक जन्म जीव घेतो तर पूर्वजन्म व मृत्यु यांचें स्मरण मनुष्याला कसें नाहीं ? (उ०) जीव हा अल्पज्ञ असून त्रिकालादर्शी नाहीं, म्हणून त्याला स्मरण राहत नाहीं. व ज्या मनाच्या योगानें त्याला ज्ञान प्राप्त होतें तेंहि एकाच कालीं दोन गोष्टींचें ज्ञान घेऊं शकत नाहीं. पूर्वजन्माची तर गोष्ट लांब राहो. पण याच जन्मांतील गर्भावस्थेंतील व जन्मल्यानंतर पांच वर्षापर्यंतची हकीगत याला आठवत नसते. जागृति व स्वप्न या दोन अवस्थेंत झालेल्या अनेक व्यवहारांचें त्याला सुषुप्तीमध्यें मुळींच भान नसतें. शिवाय 'तुम्ही आपल्या बाराव्या वर्षीं पांचव्या महिन्याच्या नवव्या दिवशीं दहा वाजतां काय केलें होतें ?' असा जर कोणी कोणाला प्रश्न केला तर त्याला तो काय उत्तर देणार ? तात्पर्य या शरीरांतील तरी सर्व स्मरण जीवाला कोठें आहे ? जर या जन्मांतील आपणास स्मरण नाहीं तर तें मागच्या जन्मांतील कसें असणार ? मागच्या जन्मांतील स्मरण होत नाहीं ही एक चांगली गोष्ट आहे. कारण मागची सर्व दुःखें आठवलीं असतीं तर जीवाला अतोनात दुःख झालें असतें. म्हणूनच परमेश्वरानें तें सर्वगुप्त ठेवलें आहे. जीवाला मागच्या व पुढच्या जन्मांतील ज्ञान, तो अल्पज्ञ असल्यामुळें होऊं शकत नाहीं. तें सदैव परमेश्वरालाच होऊं शकतें. (प्र०) जर जीवाला पूर्वकर्माचें स्मरण नाहीं, तर त्याला परमेश्वराकडून होणाऱ्या शिक्षांनीं त्याची सुधारणा कशी होणार ? जर त्याला अमुक अपराधासाठीं ही शिक्षा आहे असें समजलें तरच त्याची सुधारणा होईल. (उ०) ज्ञान जसें प्रत्यक्षानें होतें, तसें तें अनुमानादिकांनींहि होतें. या जन्मांतील आयुष्यक्रमांमध्यें अनेक समयीं प्राप्त होणाऱ्या राज्य, धन, बुद्धि, विद्या, दारिद्र्य, निर्बुद्धता, मूर्खत्व, सुख, दुःख इत्यादि गोष्टींवरून पूर्वजन्माची कल्पना सहज करतां येते. जसें एखाद्याला एक रोग झाला असतां, जर तो वैद्य असेल तर त्याला त्याचें कारण बरोबर समजतें व वैद्य नसेल तर समजत नाहीं. तथापि दोघांनाहि इतकें समजतें कीं, आपणाकडून कांहीं तरी कुपथ्य झालेलें आहे व त्या कुपथ्यानें हा रोग झालेला आहे. त्याचप्रमाणें जगांतील सुखदुःखांची विचित्र घटना पाहून तीवरून पूर्वजन्माचेंहि अनुमान होऊं शकतें. कित्येकांना जन्मतः दुःख व दुसऱ्या कित्येकांना जन्मतः सुख होत असलेलें आपण पाहतों. जर त्याचा पूर्वजन्मांतील पापपुण्याशीं संबंध नसेल तर मग परमेश्वराच्या राज्यांत अन्याय आहे, असें म्हणावें लागेल. नाहींतर एक धनाढ्य व एक दरिद्री याची उपपत्ति बरोबर लागणार नाहीं. तात्पर्य विचाराअंतीं असें वाटेल कीं पूर्वजन्माच्या पापपुण्यानुसारच सुखदुःखांची व्यवस्था होते व त्यामुळेंच परमेश्वरहि न्यायी आहे, असें ठरतें. (प्र०) एकच जन्म मानला तरीहि परमात्मा न्यायकारी होऊं शकतो; कारण राजा आपल्या राज्यांत जो न्याय करील तोच तेथें रास्त न्याय आहे असें

समजता. माळी आपल्या बागेंत कांहीं लहान व कांहीं मोठीं झाडें लावतो, कांहीं कापून टाकतो व कांहींना उपटून फेकतो. ज्याची जी वस्तु असते तिला तो पाहिजे तसा ठेवतो. त्याला दुसरा कोण विचारणार ? व ज्या अर्थी ईश्वरच सर्व सृष्टींत मोठा आहे व त्याच्यावर दुसरा कोणीहि नाहीं तेव्हां तो जें करील तेंच न्याय्य असें समजणें भाग आहे. हे न्याय्य व हें अन्याय्य म्हणण्याचा आम्हांस काय अधिकार ? (उ०) परमेश्वर न्याय्य करतो व अन्याय्य करीत नाहीं, म्हणूनच तो पूजनीय व श्रेष्ठ समजला जातो. जर तो वाटेल तें करील तर त्याला पूज्य कोण मानणार ? परमेश्वराच्या राज्यांत नियमाविरुद्ध व अन्यायाची गोष्ट परमेश्वराकडून होत नाहीं, म्हणूनच तो उपास्य आहे. जर एखादा माळी अयोग्य रीतीनें झाडें लावील किंवा तोडील तर त्याला कोणीहि कुशल समजणार नाहीं. तो विशिष्ट नियमांनी आपलें काम करतो, म्हणुनच त्याला मान आहे. यांचप्रमाणें सृष्टीविषयीं समजावें. परमेश्वर स्वभावतः पवित्र व न्यायकारी असल्यानें तो न्याय्य तेंच करतो. तो उन्मत्त मनुष्याप्रमाणें कांहींतरी करीत नाहीं. उत्तम काम करणाराची प्रतिष्ठा व दुष्ट काम करणाराची निंदा सर्व लोक करतात, हा सार्वत्रिक अनुभव आहे. ज्या अर्थी ईश्वराची सर्व लोक स्तुति करतात व आजपर्यंत सर्व विद्वान लोक त्याची स्तुति करीत आले आहेत, त्या अर्थी तो कधींहि अन्याय करीत नाहीं असें ठरतें, तात्पर्य, तो अन्यायांहि करीत नाहीं व केव्हांहि न्याय करण्याला भीत नाहीं. (प्र०) अहो ! परमेश्वर जितकें ज्याला देऊं इच्छील तितकें त्याला देत असेल व जें काम करूं इच्छील तितकें करीत असेल ? (उ०) जीवांच्या कर्मानुसार तो ठरवितो, आपल्या इच्छेनें ठरवीत नाहीं. लहानमोठ्यांना त्यांच्या मानानें सुखदुःख होत असतें. मोठ्यांना सुखाप्रमाणें दुःखहि जास्तच असतें. एखाद्या सावकाराचा खटला राज्याच्या कचेरींत असला तर सावकार पालखींत बसून कचेरीस जातो व भोई लोक त्याची पालखी उन्हांतून उघड्या पायांनीं नेत असतात हें पाहून लोकांना वाटतें कीं, हा सावकार पुण्यात्मा असून ते भोई पापी आहेत. पण हा सर्व भ्रम आहे. पालखी जसजशी कचेरीजवळ येते तसतशी सावकाराची चिंता वाढते. आपण जिंकूं कीं नाहीं याबद्दल त्याला शंका येऊन मोठी काळजी लागते. आपण प्राड्विवाका (वकील) जवळ जावें, कीं शिरस्तेदाराजवळ जावें, कीं काय करावें, असें त्याला होऊन जातें. खटल्यांत जय झाला तर आनंद होतो पण पराजय झाला तर मात्र त्याच्या दुःखाला पारावार नाहींसा होतो. पण भोयांना पाहिलें असतां ते खुशाल आनंदानें तंबाकू पीत बसलेले दिसतात. त्यांना कशाचीहि काळजी नसते. तसेंच श्रीमंतांना काळजीमुळें मऊ बिछान्यावरहि झोंप येत नाहीं. पण त्यांना उघड्या दगडावरहि झोंप येते. या तऱ्हेनें विचार केला असतां सुखी कोण ? याचा तेव्हांच निकाल लागतो. सर्वांना जर सुख सारखें असतें तर एकाची स्थिति दुसऱ्याला पसंत पडली असती. सावकाराला भोई होण्यास सांगितलें तर तो कबूल होणार नाहीं, पण भोयांना जर सावकाराच्या जागेवर बसवलें तर तें खूश होतील. त्याअर्थी भोयांच्या स्थितिपेक्षां सावकाराची स्थिति सुखदायक आहे, हें निःसंशय खरें आहे. उच्च दर्जाचा मनुष्य खालच्या दर्ज्यात येऊं इच्छित नाहीं, कारण तेथें सुखापेक्षां दुःख जास्त असतें. पण खालच्या वर्गांतील मनुष्य वरच्या वर्गात जाऊं इच्छितो, कारण तेथें दुःखापेक्षां सुख जास्त असतें. या अनुभवावरून सर्वांच्या स्थितींत सर्वांना सुख आहे असें होत नाहीं, पहा एक जीव विद्वान्, पुण्यात्मा, श्रीमान्, राजा अशांच्या घरीं जन्माला येतो व आजन्म सुख भोगतो व दुसरा अगदीं दरिद्र्याच्या घरीं जन्मास येतो व मरेपर्यंत दुःख भोगतो. एक जीव जन्मतः उत्तम घरांत राहून सुगंधियुक्त जलादिकांनीं स्नान करून चैन करतो. दूध पिण्याच्या वेळीं त्याला साखरमिश्रित दूध मिळतें. त्याच्या सेवेला नोकर चाकर पुष्कळ असतात. खेळण्याला नानाप्रकारचे खेळ असतात. बाहेर जाण्याच्या वेळीं सुंदर गाडीघोडे असतात. पण दुसरा जीव जंगलांत उत्पन्न होतो. त्याला स्नानाला पाणी मिळत नाहीं, प्यावयाला दूध नसतें, खावयाला मागूं लागला असतां थप्पड मिळते, किंवा कोंडा खावयास मिळतो. व्याकूळ होऊन रडूं लागला तरी कोणीहि त्याला विचारीत नाहीं हा जो भेद आहे तो त्याच्या पूर्वजन्माच्या पापपुण्याईमुळेंच होतो. कर्में केल्याशिवाय जर परमेश्वर अशीं सुखदुःखें देऊं लागला तर मग स्वर्ग व नरक यांची योग्यता नाहींशी होईल. कारण ते पाहिजे त्याला कर्में न करतांहि मिळूं लागतील. अशा अव्यवस्थेनें अधर्माचें प्रस्थ माजेल व कोणाचाहि कोणी विचारणार नाहीं. धर्माचें फल सुख मिळेलच अशी कोणाला जर खात्री राहिली नाहीं, तर मग

धर्माचरण कोण करील ? पण परमेश्वराच्या राज्यांत कृतमकर्मानुसार कर्त्याला फल मिळतें, म्हणूनच लोकांमध्यें धर्म कमी अधिक राहिला आहे. तात्पर्य पूर्वकर्मानुसार कांहीं सुखदुःखें मिळतात व या आयुष्यांतील बऱ्याईट कर्मानुसार पुढच्या जन्मांत सुख किंवा दुःख मिळेल, अर्थात् पूर्वजन्म व पुनर्जन्म हे आहेत. (प्र०) मनुष्य व पश्वादिक यांच्या शरीरांत जीव भिन्नभिन्न तऱ्हेचे आहेत कीं एकाच प्रकारचे ? (उ०) एकाच प्रकारचे. पण पापपुण्याप्रमाणें ते मलिन अथवा पवित्र असतात. (प्र०) मनुष्यांतील जीव पशूंमध्यें व पशूंमधील मनुष्यामध्यें जातो काय ? तसेंच स्त्रीमधील जीव पुरुषामध्यें व पुरुषामधील स्त्रीमध्यें जातो कीं काय ? (उ०) जेव्हां पाप जास्त होतें व पुण्य कमी होतें तेव्हां जीव पश्वादिकांमध्यें जातो व जेव्हां पुण्य जास्त होतें व पाप कमी होतें तेव्हां जीवाला विद्वानांचें शरीर मिळतें. जेव्हां पापपुण्य बरोबर असतें तेव्हां त्याला साधारण मनुष्यांचें शरीर मिळतें. यांतहि पुण्यपापाच्या उत्तम, मध्यम कनिष्ठतेमुळें शरीरेंहि उत्तम, मध्यम व कनिष्ठ मिळतात. पश्वादिकांच्या शरीरामध्यें पापाचा भोग झाल्यावर जेव्हां पापपुण्याची बरोबरी होते, तेव्हां तो पुनः मनुष्याच्या जन्मास येतो. पुढें जसजशीं कर्मे करील तसतशी त्याची परिस्थिति सुखदायक किंवा दुःखदायक होते. जीवाचा शरीराशीं संयोग झाला म्हणजे त्याला 'जन्म' असें म्हणतात व वियोग झाला म्हणजे त्याला 'मृत्यु' असें म्हणतात. जेव्हां जीव शरीर सोडतो तेव्हां तो (यमालय) आकाशस्थ वायूमध्यें राहतो. [आकाशांतील वायूला 'यम' अशी संज्ञा आहे. **'यमेन वायुना'** असें वेदांमध्यें म्हटलेलें आहे. गरुडपुराणांतील कल्पित गोष्टी या सर्व असत्य आहेत.] नंतर धर्मराजाच्या (परमेश्वराच्या) नियमानुसार पापपुण्याच्या अनुरोधानें त्याला पुढचा जन्म मिळतो. वायु, जल, अन्न, शरीरछिद्रें यांच्या द्वारानें तो दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो. तेथें परमेश्वराच्या प्रेरणेनें जाऊन क्रमानें वीर्यामध्यें जाऊन नंतर गर्भामध्यें राहून, शरीरधारण करून तो बाहेर येतो. जर त्याचीं कर्मे स्त्रीचें शरीर धारण करण्यास योग्य असलीं तर स्त्रीचें, पुरुषांच्या शरीराला योग्य कर्मे असलीं तर पुरुषाचें, नाहींतर नपुंसकाचें शरीर मिळतें स्त्रीपुरुषांच्या संबंधाच्या वेळीं वीर्याधिक्यानें पुरुष, रजाधिक्यानें स्त्री दोहोंच्या समत्वानें नपुंसक अशी प्रजा उत्पन्न होते. जोंपर्यंत उत्तम कर्मे, उपासना व ज्ञान मिळवून मुक्ति मिळवीत नाहीं, तोंपर्यंत जीव जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडलेला असतो. जो जीव मुक्ति प्राप्त करून घेतो तो महाकल्पापर्यंत जन्म-मरण दुःखापासून दूर असतो. (प्र०) मुक्ति एकाच जन्मांत मिळते कीं अनेक जन्मांत ? (उ०) अनेक जन्मांमध्यें. कारण—

**भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः । क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥** मुंड. २।२।८॥

'जेव्हां जीवाच्या हृदयांतील अविद्या व अज्ञानरूपी ग्रंथि तुटून जाते, सर्व संशय दूर होतात व जेव्हां दुष्ट कर्मांचा क्षय होतो तेव्हांच तो आंत व बाहेर व्यापून असणाऱ्या परमेश्वरामध्यें निवास करतो. अर्थात् मुक्ति मिळवितो.' (प्रश्न) मुक्तीमध्यें जीव परमेश्वरांत मिळून जातो की पृथक् राहतो ? (उत्तर) पृथक् राहतो; कारण जर तो परमेश्वरांत मिळून गेला तर मुक्तीचें सुख कोण भोगणार ? मुक्तीचीं अनेक साधनें करून जर तो तिच्या फलाचा उपभोग घेण्यास राहिला नाहीं तर तिचा उपयोग तरी काय ? परमेश्वरांत जीवाचा लय होणें ही मुक्ति नसून, तो त्याचा प्रलयच होय ? जीवाचा असा प्रलय होत नाहीं व तो मुक्तीच्या अवस्थेंतहि पृथक् राहतो व मुक्तीचें सुख भोगतो. जेव्हां जीव परमेश्वराची आज्ञा पालन करतो, सत्संग करून उत्तम कर्मे करतो व योगाभ्यास करून पूर्वोक्त साधनें करतो तेव्हां त्याला मुक्ति मिळते. पहा—

**सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् ॥**
**सोऽश्नुते सर्वान् कामान्सह । ब्रह्मणा विपश्चितेति ॥** तैत्ति० आनंद० १

'जो जीवात्मा, आपल्या बुद्धिमध्यें व आत्म्यामध्यें असणाऱ्या सत्य, ज्ञान व अनंत आनंदयुक्त परमात्म्याला जाणतो, तो त्या सर्वव्यापक ब्रह्मामध्यें स्थिर होऊन, त्या (विपश्चित) अनंत विद्यायुक्त ब्रह्मासह सर्व कामनांची प्राप्ति करून घेतो; अर्थात् ज्या ज्या आनंदाच्या कामना त्याला होतात त्या त्या त्याला अडथळ्यावांचून प्राप्त होणें, याला मुक्ति असें म्हणतत. (प्र०) ज्याप्रमाणें शरीरावांचून जीवाला सांसारिक सुखें भोगतां येत नाहींत, त्याचप्रमाणें

मुक्तिसुखाचाहि त्याला शरीराशिवाय उपभोग कसा घेतां येईल ? (उ०) याचें उत्तर पूर्वी दिलें आहे. त्यांत विशेष इतकाच आहे कीं, ज्याप्रमाणें शरीराच्या आधारानें सांसारिक सुखें भोगलीं जातात, त्याचप्रमाणें परमेश्वराच्या आधारानें मुक्तिसुख भोगलें जातें. मुक्तजीव अनंत व व्यापक ब्रह्मामध्यें पाहिजे तेथें फिरतो. शुद्ध ज्ञानानें सर्व सृष्टि पाहतो. अन्य मुक्तजीवाशीं मिळतो. सृष्टिविद्येला क्रमानें जाणतो. सर्व लोकलोकांतरामध्यें यथेच्छ फिरतो. जे गोल दिसतात व जे दिसत नाहींत त्यांवरहि जातो. तो सर्वपदार्थांना जाणतो. अज्ञेय गुढाचें त्याला आकलन होतें, व ज्ञानाधिक्यानें त्याला आनंदहि अधिकाधिक प्राप्त होतो. मुक्तीमध्यें जीवात्मा निर्मल होत असल्यामुळें, पूर्ण ज्ञानी बनतो व तो सर्व सन्निहित पदार्थांना योग्य रीतीनें जाणतो. यालाच सुखविशेष स्वर्ग असें म्हणतात. विषयतृष्णेमध्यें फसून दुःखें भोगणें हा नरक होय. 'स्वः सुखं गच्छति यस्मिन् स स्वर्गः । अतो विपरीतो दुःखभोगो नरक इति ।' स्वर्गामध्यें दोन भेद आहेत. या संसारामध्यें जें सुख होतें त्याला सामान्य स्वर्ग असें म्हणतात व परमेश्वर-प्राप्तीनें जें मुक्तिसुख मिळतें त्याला विशेष स्वर्ग असें म्हणतात. सर्व जीव स्वभावतः सुख मिळावें व दुःख मिळं नये असें इच्छितात खरें; पण जोंपर्यंत ते अधर्म सोडून धर्माचें अवलंबन करीत नसतात तोंपर्यंत त्यांना तें प्राप्त होत नसतें. पाहाः—'छिन्ने मूले वृक्षो नश्यति तथा पापेक्षीणे दुःखं नश्यति ।' जसें मूळ कापल्यानंतर वृक्षाचा नाश होतो, त्याचप्रमाणें पाप संपल्यानंतर दुःखाचा नाश होतो. मनुस्मृतीमध्यें पापपुण्यांची पुष्कळ प्रकारें गति लिहिली आहे ती पहा. पाप व शिक्षाः—

**मानसं मनसैवायमुपभुङ्क्ते शुभाशुभम् । वाचा वाचा कृतं कर्म कायेनैव च कायिकम् ॥८॥**
**शरीरजैः कर्मदोषैर्याति स्थावरतां नरः । वाचिकैः पक्षिमृगतां मानसैरन्त्यजातिताम् ॥ ९ ॥** मनु० अ० ॥ १२

'हा जीव मनानें केलेल्या शुभाशुभ कर्मांचें फल मनानें भोगतो, वाणीनें केलेल्याचें वाणीनें भोगतो व शरीरानें केलेल्याचें शरीरानें भोगतो. जो मनुष्य चोरी, परस्त्रीगमन, श्रेष्ठांना मारणें इत्यादि शारीरिक दुष्कर्में करतो त्याला स्थावर जन्म प्राप्त होतो, अर्थात् तो वृक्षादिक होऊन राहतो. जो वाणीनें पाप करतो त्याला पक्षी व मृग यांचा जन्म मिळतो व जो मनानें दुष्ट कर्में करतो त्याला चांडालादि योनींत जन्मावें लागतें.' सत्व, रज व तम :—

**यो यदैषां गुणो देहे साकल्येनातिरिच्यते । स तदा तद्गुणप्रायं तं करोति शरीरिणम् ॥२५॥**
**सत्त्वं ज्ञानं तमोऽज्ञानं रागद्वेषौ रजः स्मृतम् । एतद्व्याप्तिमदेतेषां सर्वभूताश्रितं वपुः ॥२६॥** मनु. अ. १२

'या जीवांच्या देहामध्यें जो गुण जास्त होतो, तो गुण त्या जीवाला त्या वेळीं आपल्यासारखा करतो.' जेव्हां आत्म्यामध्यें ज्ञान वाढतें, तेव्हां सत्वगुण, अज्ञान वाढतें तेव्हां तमोगुण व रागद्वेष वाढतात तेव्हां रजोगुण शरीरामध्यें वाढला आहे असें जाणावें हे प्रकृतींतील तीन गुण सर्वत्र सर्व पदार्थांमध्यें व्यापलेले आहेत.

**तत्र यत्प्रीतिसंयुक्तं किञ्चिदात्मनि लक्षयेत् । प्रशान्तमिव शुद्धाभं सत्त्वं तदुपधारयेत् ॥२७॥**
**यत्तु दुःखसमायुक्तमप्रीतिकरमात्मनः । तद्रजोऽप्रतिघं विद्यात्सततं हारि देहिनाम् ॥२८॥**
**यत्तु स्यान्मोहसंयुक्तमव्यक्तं विषयात्मकम् । अप्रतर्क्यमविज्ञेयं तमस्तदुपधारयेत् ॥२९॥** मनु. अ. १२

'जेव्हां आत्म्यामध्यें प्रीति, शांति व शुद्धि वाढलेली दिसेल तेव्हां जाणावें कीं, सत्वगुण वाढला,असून रज व तम कमीप्रमाणानें आहेत. जेव्हां आत्मा व मन दुःखी, अप्रसन्न व विषयांमधून इकडे तिकडे गमन करीत आहे असें दिसेल तेव्हां जाणावें कीं, रजोगुण वाढला असून सत्व व तम हे दबले आहेत. जेव्हां आत्मा व मन मोहानें युक्त होऊन सांसारिक पदार्थांमध्यें रमतात, दरिद्रीसे होऊन विषयांत आसक्त होतात व जेव्हां ते तर्कवितर्करहित होतात तेव्हां समजावें कीं तमोगुण वाढला असून सत्व व रज हे दबले गेले आहेत.'

त्रयाणामपि चैतेषां गुणानां यः फलोदयः । अग्र्यो मध्यो जघन्यश्च तं प्रवक्ष्याम्यशेषतः ।।३०।।
वेदाभ्यासस्तपो ज्ञानं शौचमिन्द्रियनिग्रहः । धर्मक्रियात्मचिन्ता च सात्त्विकं गुणलक्षणम् ।।३१।।
आरंभरुचिताऽधैर्यमसत्कार्यपरिग्रहः । विषयोपसेवा चाजस्त्रं राजसं गुणलक्षणम् ।।३२।।
लोभः स्वप्नोऽधृतिः क्रौर्यं नास्तिक्यं भिन्नवृत्तिता । याचिष्णुता प्रमादश्च तामसं गुणलक्षणम् ।।३३।। मनु. अ. १२

'आतां या तीन गुणापासून जें उत्तम, मध्यम व कनिष्ठ फल मिळतें तें सांगतों. वेदांचा अभ्यास, धर्मानुष्ठान ज्ञानाची वृद्धि, पवित्रता, इंद्रियनिग्रह, धर्मक्रिया व आत्मचिंतन करण्याची इच्छा होणें हें सत्त्वगुणाचें लक्षण आहे. 'जेव्हां रजोगुणाची वाढ होते तेव्हां आरंभशूरत्व, धैर्यत्याग, असत्कर्म करण्याची आवड व निरंतर विषयसेवन, हे गुण दिसू लागतात. व जेव्हां तमोगुण वाढतो तेव्हां लोभ, आळस, निद्रा, भिरुत्व, क्रूरता, नास्तिक्य (वेद व ईश्वर यांवर अश्रद्धा), चित्ताची व्यग्रता, प्रमाद होणें, व व्यसनांत फसणें हे गुण दिसतात. यांतील लोभ हा सर्वपापाचें उगमस्थान आहे.'

यत्कर्म कृत्वा कुर्वंश्च करिष्यंश्चैव लज्जति । तज्ज्ञेयं विदुषा सर्वं तामसं गुणलक्षणम् ।।३५।।
येनास्मिन्कर्मणा लोके ख्यातिमिच्छति पुष्कलाम् । न च शोचत्यसंपत्तौ तद्विज्ञेयं तु राजसम् ।।३६।।
*यत्सर्वेणेच्छति ज्ञातुं यन्न लज्जति चाचरन् । येन तुष्यति चात्माऽस्य तत्सत्त्वगुणलक्षणम् ।।३७।।*
तमसो लक्षणं कामो रजसस्त्वर्थ उच्यते । सत्त्वस्य लक्षणं धर्मः श्रैष्ठ्यमेषां यथोत्तरम् ।।३८।। मनु. अ. १२.

'जे कर्म केल्यानंतर, करीत असतां व करण्याची इच्छा झाली असतां करणाऱ्याला लज्जा, भय व शंका प्राप्त होते तें कर्म तामस आहे असें जाणावें. ज्या कर्माच्या योगानें लोकांमध्यें आपली पुष्कळ ख्याति होईल असें इच्छितो, संपत्ति नसतांहि चारण भाटादिकांना ती देऊन आपले स्तुतिपाठ करवितो, तेव्हां त्यामध्यें रजोगुण वाढला असें जाणावें. जेव्हां आत्मा सर्वांकडून ज्ञान ग्रहण करावें असें इच्छील, गुणग्रहण करीत जाईल, सत्कर्म करण्याला लाजणार नाहीं व धर्माचरणांत रुचि धरील तेव्हां समजावें कीं, त्यामध्यें सत्त्वगुण वाढला आहे. तमोगुणाचें काम रजोगुणाचें अर्थसंग्रह व सत्त्वगुणाचें धर्म हें लक्षण आहे. तमोगुणापेक्षां रजोगुण व रजोगुणापेक्षां सत्त्वगुण श्रेष्ठ आहे.' याप्रमाणें विचार करून मनुष्यांनीं जे जे कनिष्ठ गुण व स्वभाव असतील त्यांचा 'त्याग' करून आपण जे जे श्रेष्ठ गुण आत्मोन्नतिकारक असतील त्यांचा स्वीकार करावा. आतां ज्या ज्या गुणाच्या योगानें जीवाला जी जी गति प्राप्त होते तीविषयीं पुढें सांगितलें आहे. त्रिविधगतिः—

देवत्वं सात्त्विका यान्ति मनुष्यत्वं च राजसः । तिर्यक्त्वं तामसा नित्यमित्येषा त्रिविधा गतिः ।।४१।।
स्थावराः कृमिकीटाश्च मत्स्याः सर्पाश्च कच्छपाः । पशवश्च मृगाश्चैव जघन्या तामसी गतिः ।।४२।।
हस्तिनश्च तुरङ्गाश्च शूद्रा म्लेच्छाश्च गर्हिताः । सिंहा व्याघ्रा वराहाश्च मध्यमा तामसी गतिः ।।४३।।
चारणाश्च सुपर्णाश्च पुरुषाश्चैव दाम्भिकाः । रक्षांसि च पिशाचाश्च तामसीषूत्तमा गतिः ।।४४।। मनु. अ. १२

'सात्त्विक मनुष्यांना देवत्व–अर्थात् विद्वत्व, राजसिकांना मनुष्यत्व व तमोगुणी लोकांना नीचगतित्व प्राप्त होते. जे अत्यंत तमोगुणी असतात ते वृक्षादि, स्थावर, कृमि, कीट, मत्स्य, सर्प, पशु, कच्छप, मृग, यांच्या जन्माला पावतात. जे मध्यम तमोगुणी असतात त्यांना हत्ती, घोडा, शूद्र, म्लेंच्छ, निंदित कर्म करणारे सिंह, व्याघ्र, वराह यांचा जन्म मिळतो. जे तमोगुणी लोकांमध्यें उत्तम असतात त्यांना चारण (कवितेच्या द्वारानें मनुष्यांची स्तुति करणारे) सुंदरपक्षी, दांभिक पुरुष (आपल्या सुखासाठीं आपली प्रशंसा करणारे), राक्षस (हिंसा करणारे), पिशाच (अनाचारी, मद्यादि सेवन करणारे, मलिन राहणारे.) यांचा जन्म प्राप्त होतो.'

झल्ला मल्ला नटाश्चैव पुरुषाः शस्त्रवृत्तयः । द्यूतपानप्रसक्ताश्च जघन्या राजसी गतिः ।।४५।।
राजानः क्षत्रियाश्चैव राज्ञां चैव पुरोहिताः । वादयुद्धप्रधानाश्च मध्यमा राजसी गतिः ।।४६।।
गंधर्वा गुह्यका यक्षा विबुधानुचराश्च ये । तथैवाप्सरसः सर्वा राजसीषूत्तमा गतिः ।।४७।। मनु. अ. १२

'जे कनिष्ठ रजोगुणी असतात ते (भल्ल) तलवार वगैरे हत्यारानें मारणारे व कुदळीनें खणणारे (मल्ल) नौका वगैरे चालविणारे व (नट) जे नाड्यावरून कसरतीचीं कामें करतात, शस्त्रधारी, भृत्य, मद्यप्राशन करणारे यांच्या जन्माला जातात. जे मध्यम रजोगुणी असतात ते राजे, क्षत्रिय, क्षत्रियवर्णस्थ राजांचे पुरोहित, वादविवाद करणारे, दूत, प्राड्विवाक् (वकील बॅरिष्टर) युद्ध विभागावरील अध्यक्ष यांच्या जन्माला जातात. जे उत्तम रजोगुणी असतात ते (गंधर्व) गाणारे, (गुह्यक) वाद्यें वाजविणारे (यक्ष) धनाढ्य, विद्वानांचे सेवक व उत्तम स्वरूपवान् स्त्रिया यांच्या जन्माला जातात.'

**तापसा यतयो विप्रा ये च वैमानिका गणाः । नक्षत्राणि च दैत्याश्च प्रथमा सात्त्विकी गतिः ॥४८॥**
**यज्वान ऋषयो देवा वेदा ज्योतिषि वत्सराः । पितरश्चैव साध्याश्च द्वितीया सात्त्विकी गतिः ॥४९॥**
**ब्रह्मा विश्वसृजो धर्मो महानव्यक्तमेव च । उत्तमां सात्त्विकीमेतां गतिमाहुर्मनीषिणः ॥५०॥**
**इंद्रियाणां प्रसङ्गेन धर्मस्यासेवनेन च । पापान् संयान्ति संसारानाविद्वांसो नराधमाः ॥५२॥** मनु.अ. १२

'जे साधारण सत्त्वगुणी असतात, ते तपस्वी, यति संन्यासीं, वेदपाठी, विमान चालविणारे, ज्योतिषी व (दैत्य) देहपोषक असे होतात. जे मध्यम सत्त्वगुणी असतात ते यज्ञकर्ते, वेदांचा अर्थ जाणणारे, विद्वान्, वेदज्ञ, विद्युत् व कालविद्या यांना जाणणारे, रक्षक, ज्ञानी, व (साध्याः) कार्यसिद्धीसाठीं ज्यांची मदत होते असे अध्यापक यांच्या जन्माला येतात. जे उत्तम सत्त्वगुणी असून उत्तम कर्में करतात, ते (ब्रह्मा) सर्व वेद जाणणारा, (विश्वसृजः) सर्व सृष्टिविद्येला जाणून विमानादि विविध कला व यानें करणारे, धार्मिक, सर्वोत्तम बुद्धियुक्त-अव्यक्त, प्रकृतिविशित्व यांची सिद्धि मिळविलेले असे होतात. जे इंद्रियांना वश होऊन विषयी बनतात, धर्म सोडून अधर्मानें वागतात, त्या अविद्वानांना मनुष्यांतील नीच स्थितीमध्यें जन्म प्राप्त होतो व ते अनंत दुःखें भोगीत असतात.' याप्रमाणें सत्त्व, रज व तम या तीन गुणांच्या सहाय्यानें जीव जीं जीं बरीं वाईट कामें करतो, त्या कामांचीं बरी वाईट फलें त्याला प्राप्त होतात. जे मुक्त होतात त्यांना 'गुणातीत' असें म्हणतात. कारण ते कोणत्याहि गुणामध्यें फसत नाहींत, म्हणून सर्वांनीं मुक्तीचें साधन करावें.

**योगश्चित्तवृत्तिनिरोधः ॥२॥ तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ॥३॥** योगदर्शन पाद १ ॥

'मनुष्यानें रजोगुण व तमोगुण यांनीं युक्त असलेल्या कर्मापासून आपल्या मनाला निवृत्त करून, सत्त्वगुणयुक्त कर्मापासूनहि मनाला मागें हटवून केवल शुद्धसत्त्वगुणयुक्त व्हावें; नंतर त्याचाहि निरोध करून, एकाग्र व्हावें-अर्थात् एक परमात्मा व धार्मिक कर्म यांच्या अग्रभागीं मनाची स्थिरता करून बाकीच्या सर्व ठिकाणांपासून मनाला मागें हटवावें. जेव्हां चित्ताची एकाग्रता व विरुद्धावस्था होते, तेव्हां सर्वदृष्ट्या परमेश्वरस्वरूपामध्यें जीवात्म्याची स्थिति होते' इत्यादि मुक्तीचीं साधनें आहेत, व—

**अथ त्रिविधदुःखात्यन्तनिवृत्तिरत्यन्तपुरुषार्थः ॥** सांख्य ॥१।१ ॥

(आध्यात्मिक) शारीरिक दुःखें (आधिभौतिक) दुसऱ्या प्राण्यांपासून उत्पन्न होणारीं दुःखें व ( आधिदैविक ) अतिवृष्टि, अतिताप अनावृष्टि मनादि इंद्रियांची चपलता इत्यादिकांपासून होणारीं दुःखें या तीनहि प्रकारच्या दुःखांपासून सुटून मुक्ति मिळविणें हा अत्यंत पुरुषार्थ आहे.

**याच्या पुढील भागांत आचार, अनाचार, भक्ष्य व अभक्ष्य यांविषयीं लिहिलें जाईल.**
**इति सुभाषाविभूषितो विद्याऽविद्याबंधमोक्षविषयो नाम नवमसमुल्लासः संपूर्णः ॥९॥**

# अथ दशमसमुल्लासः ।

**अथाऽऽचाराऽनाचारभक्ष्याभक्ष्यविषयान् व्याख्यास्यामः ॥**

**आचार व अनाचार**— धर्मयुक्त कर्मांचें आचरण, सुशीलता, सत्पुरुषांची संगति व सद्विद्येचें ग्रहण करण्यांत आनंद वाटणें, इत्यादिकांना आचार असें म्हणतात व याहून विपरीत जें वर्तन असतें, त्याला अनाचार असें म्हणतात. पहा—

**विद्वद्भिः सेवितः सद्भिर्नित्यमद्वेषरागिभिः । हृदयेनाभ्यनुज्ञातो यो धर्मस्तन्निबोधत ॥१॥**
**कामात्मता न प्रशस्ता न चैवेहास्त्यकामता । काम्यो हि वेदाधिगमः कर्मयोगश्च वैदिकः ॥२॥**
**संकल्पमूलः कामो वै यज्ञाः संकल्पसंभवाः । व्रतानि यमधर्माश्च सर्वे संकल्पजाः स्मृताः ॥३॥**
**अकामस्य क्रिया काचिद् दृश्यते नेह कर्हिचित् । यद्यद्धि कुरुते किंचित्तत्तत्कामस्य चेष्टितम् ॥४॥ मनु.अ. २**

'ज्याचे रागद्वेषरहित विद्वान् लोक नित्य सेवन करतात, हृदय व आत्मा यांना जें सत्य कर्तव्य आहे असें वाटतें, तोच खरा धर्म आहे असें समजावें, व त्याचें आचरण सर्वांनीं करावें. तो धर्म हा आहे:— या संसारामध्यें अत्यन्त कामात्मता व अतत्यन्त निष्कामता ही श्रेष्ठ गणली जात नाहींत; वेदार्थज्ञान व वेदोक्त कर्म हीं सर्व कामनेनेंच सिद्ध होतात. मी निरिच्छ व निष्काम होईन, असें कोणी म्हटलें तर तें असत्य आहे असें जाणावें. कारण सर्व यज्ञ, सत्यभाषणादि व्रतें, यमनियम व सर्व धर्माचरणें संकल्पापासूनच होत आहेत. जी हस्त, पाद, नेत्र, मन इत्यादिकांची हालचाल होते, ती संकल्पानेंच होतें. जर इच्छा मुळींच झाली नाहीं, तर मुळींच हालचाल होणार नाहीं.' तसेच—

**वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम् । आचारश्चैव साधूनामात्मनस्तुष्टिरेव च ॥६॥**
**सर्वन्तु समवेक्ष्येदं निखिलं ज्ञानचक्षुषा । श्रुतिप्रामाण्यतो विद्वान् स्वधर्मे निविशेत वै ॥८॥**
**श्रुतिस्मृत्युदितं धर्ममनुतिष्ठन् हि मानवः । इह कीर्तिमवाप्नोति प्रेत्य चानुत्तमं सुखम् ॥९॥**
**योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद् द्विजः । स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिंदकः ॥११॥** मनु.अ. २

'संपूर्ण, वेद, मनुस्मृति व ऋषिप्रणीत इतर शास्त्रें, सत्पुरुषांचा आचार व ज्याच्या योगानें आपला आत्मा प्रसन्न होतो तीं कर्में— अर्थात् जीं करीत असतां मनाला भय, शंका व लज्जा ही होत नाहींत—त्यांचें सेवन करणें हें सर्वांना उचित आहे. पहा, जेव्हां कोणी मनुष्य चोरी करूं लागतो तेव्हां त्याच्या मनांत भय, शंका, लज्जा, ही उत्पन्न होतात, म्हणून तें काम अधर्मयुक्त आहे असें समजून टाकावें. मनुष्यांनीं सर्व शास्त्रें, वेद, सत्पुरुषांचें आचरण व आत्मतुष्टि या चार प्रकारांनीं धर्माचा विचार करून, ज्ञाननेत्रांनीं धर्माचें निरीक्षण करून, त्याचे अवलंबन करावें. जो मनुष्य वेदोक्त धर्म व वेदांशीं विरुद्ध नसलेला स्मृत्युक्त धर्म, याचें अनुष्ठान करतो, त्याला या लोकीं कीर्ति व मरणानंतर उत्तम सुख हीं प्राप्त होतात. वेदाला श्रुति व धर्मशास्त्रला स्मृति असें म्हणतात. यांच्या योगानें सर्वांनीं कर्तव्याकर्तव्याचा निश्चय करावा. जर कोणी वेदाचा व वेदानुकूल असणाऱ्या अन्य ग्रंथांचा अपमान करील, तर त्याला सर्व श्रेष्ठ लोकांनीं जातिबाह्य करावें कारण जो वेदांची निंदा करतो त्याला नास्तिक असें समजावें.'

## धर्माचीं लक्षणें

**वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः। एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥१२॥**
**अर्थकामेष्वसक्तानां धर्मज्ञानं विधीयते । धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः ॥१३॥ मनु.अ. २॥**

'वेद, स्मृति, सत्पुरुषांचा आचार व स्वतःच्या आत्म्याला ज्यांत आनंद होतो तें, हीं चार धर्माचीं लक्षणें आहेत. अर्थात् यांच्या सहाय्यानें सर्वांनीं धर्म कोणता व अधर्म कोणता हें जाणावें.' 'जे लोक अर्थ—द्रव्य व विषय यांत फसलेले नाहींत, त्यांनाच धर्माचें ज्ञान होतें व जे धर्म जाणण्याची इच्छा करतात, त्यांना वेद हेंच एक मुख्य प्रमाण आहे.

**वैदिकैः कर्मभिः पुण्यैर्निषेकादिर्द्विजन्मनाम् । कार्यः शरीरसंस्कारः पावनः प्रेत्य चेह च ।।२६।।**

**केशान्तः षोडशे वर्षे ब्राह्मणस्य विधीयते । राजन्यबंधोर्द्वाविंशे वैश्यस्य द्व्यधिके ततः ।।६५।।मनु.अ.२।।**

'ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनीं आपल्या संतानांचे निषेकादि संस्कार वेदोक्त कर्मपद्धतीनें करावेत. या संस्कारांच्या योगानें या जन्मीं व परजन्मीं पवित्रता प्राप्त होते. ब्राह्मणाचें सोळाव्या वर्षी, क्षत्रियाचें बावीसाव्या वर्षी व वैश्याचें चोवीसाव्या वर्षी, केशान्तकर्म करावें. क्षौर (मुंडन) विधीला केशान्तसंस्कार असें म्हणतात. हा संस्कार केल्यावर केवळ शिखा तेवढीच वाढूं देऊन दाढी मिशा वगैरे सर्व केसांची हजामत वारंवार करीत जावें. शीतप्रधान देश असेल तर इच्छेप्रमाणें केस वाढवावेत व जर उष्णप्रधान देश असेल तर शिखेसहित मुंडन इष्ट असल्यास करावें; कारण जर उष्ण प्रदेशामध्यें डोक्यावर केस जास्त वाढले तर डोक्यांत उष्णता जास्त वाढून बुद्धि मंद होते दाढी, मिशा मोठ्या वाढूं दिल्यानें जेवतेवेळीं त्रास होतो व त्यांत उष्टें अडकून राहतें, याकरितां सर्वांनीं आपल्या सोईप्रमाणें मुंडन करून इतर कर्में यथोचित करावीत.'

**इंद्रियाणां विचरतां विषयेष्वपहारिषु । संयमे यत्नमातिष्ठेत् विद्वान् यन्तेव वाजिनाम् ।।८८।।**

**इंद्रियाणां प्रसङ्गेन दोषमृच्छत्यसंशयम् । सन्नियम्य तु तान्येव ततः सिद्धिं नियच्छति ।।९३।।**

**न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति । हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्द्धते ।।९४।। मनु अ. २.**

'ज्याप्रमाणें सारथी घोड्यांना तावरून धरून सरळ मार्गानें त्यांना घेऊन जातो, त्याचप्रमाणें विद्वानानें आत्मसंयमन करून, विषयांमध्यें मनाला गुरफटून टाकणाऱ्या इंद्रियांना आपल्या ताब्यांत ठेवावें. इंद्रियांना विषयासक्ति व अधर्म यांत चालविल्यानें खात्रीनें मनुष्याला दोष लागतो; पण जर त्यानें आपल्या इंद्रियांना स्वाधीन ठेवून धर्ममार्गानें नेलें तर त्याला अभीष्ट सिद्धि मिळते. ज्याप्रमाणें विस्तवामध्यें लांकडे व तूप घालीत गेल्यानें विस्तव विझत नाहीं, त्याचप्रमाणें विषयांचा उपभोग घेण्यानें कामेच्छा कमी होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर ती वाढते म्हणून मनुष्यांनीं विषयासक्त होऊं नये.'

**वेदास्त्यागश्च यज्ञाश्च नियमाश्च तपांसि च । न विप्रदुष्टभावस्य सिद्धिं गच्छन्ति कर्हिचित् ।। ९७ ।।**

**वशे कृत्वेन्द्रियग्रामं संयम्य च मनस्तथा । सर्वान्संसाधयेदर्थान् अक्षिण्वन् योगतस्तनुम् ।।१००।।**

**श्रुत्वा स्पृष्ट्वा च दृष्ट्वा च भुक्त्वा घ्रात्वा च यो नरः । न हृष्यति ग्लायति वा स विज्ञेयो जितेन्द्रियः ।।**

९८ मनु. अ. २ ।।

'जो पुरुष जितेंद्रिय नसतो त्याला विप्रदुष्ट असें म्हणतात. अशा मनुष्याकडून वेदार्थज्ञान, दान, यज्ञ, नियम किंवा धर्माचरण कांहीं एक होत नाहीं. पण जो जितेंद्रिय असतो त्याच्याकडून हे सर्व प्रकार होतात. म्हणून पांच कर्मेंद्रियें, पांच ज्ञानेंद्रियें व मन यांना आपल्या ताब्यांत ठेवून, युक्ताहारविहार करून, शरीराचें रक्षण करून सर्व पुरुषार्थांची सिद्धि करून घ्यावी. ज्याला स्तुतीनें हर्ष होत नाहीं व निंदेनें शोक होत नाहीं. चांगल्या स्पर्शानें सुख व दुष्ट स्पर्शानें ज्याला दुःख होत नाहीं, ज्याला उत्तम भोजनानें आनंद व निकृष्ट भोजनानें दुःख होत नाहीं, सुगंध व दुर्गंध यांवर जो रुचि किंवा अरुचि ठेवीत नाहीं, त्याला जितेंद्रिय असें म्हणतात.'

**नापृष्टः कस्यचिद् ब्रूयान्न चान्यायेन पृच्छतः । जानन्नपि हि मेधावी जडवल्लोक आचरेत् ।।११०।।**

**वित्तं बंधुर्वयः कर्म विद्या भवति पञ्चमी । एतानि मान्यस्थानानि गरीयो यद्यदुत्तरम् ।।१३६।। मनु. अ. २।।**

'कोणी प्रश्न विचारला नसतां किंवा कपटानें अथवा अन्यायानें विचारीत असतां, त्याला उत्तर देऊं नये. त्या कपटी लोकांच्या पुढें विद्वान् मनुष्यानें अज्ञानी मनुष्याप्रमाणें रहावें. जो निष्कपटी व जिज्ञासू असेल त्यानें विचारलें

नसतांहि त्याला उपदेश करावा. धन, बंधु, वय, कर्म व विद्या ही पांच मान्यता वाढविणारीं स्थानें आहेत. यांत *धनापेक्षां बंधु श्रेष्ठ, बंधूपेक्षां वय श्रेष्ठ, वयापेक्षां कर्म श्रेष्ठ व कर्मापेक्षां पवित्र विद्या श्रेष्ठ आहे असें समजावें.'*

**अज्ञो भवति वै बालः पिता भवति मन्त्रदः । अज्ञं हि बालमित्याहुः पितेत्येव तु मन्त्रदम् ॥१५३॥**

**न हायनैर्न पलितैर्न वित्तेन न बंधुभिः । ऋषयश्चक्रिरे धर्मं योऽनूचानः स नो महान् ॥१५४॥**

**न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः । यो वै युवाप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः ॥१५६॥**

**विप्राणां ज्ञानतो ज्यैष्ठ्यं क्षत्रियाणां तु वीर्यतः । वैश्यानां धान्यधनतः शूद्राणामेव जन्मतः ॥१५५॥**

मनु० अ० २.॥

'शरीराचें वय केवढेंहि जरी असलें तरी ज्याला विद्या व ज्ञान नसतें त्याला बालक असें म्हणतात. व विद्याविज्ञानाचा जो लोकांना उपदेश करतो तो कितीहि जरी लहान असला तरी त्याला वृद्ध असें समजावें; कारण सर्व शास्त्रांनुसार व विद्वानांच्या मतानुसार अज्ञानी बाल असून ज्ञानी हा पिता होय. वय अधिक असल्यानें, केस पांढरे झाल्यानें, किंवा कुटुंब मोठें असल्यानें, मनुष्याला वृद्धत्व येत नसतें. पण जो विद्वान् असतो त्यालाच सर्व ऋषि व महात्मे लोक मोठा वृद्ध असें म्हणतात. ब्राह्मण ज्ञानानें, क्षत्रिय बलानें, वैश्य धनधान्यानें व शूद्र जन्मानें (वयानें) वृद्ध समजला जातो.'

**यथा काष्ठमयो हस्ती यथा चर्ममयो मृगः ॥ यश्च विप्रोऽनधीयानस्त्रयस्तेत नाम बिभ्रति ॥१५७॥**

**अहिंसयैव भूतानां कार्यं श्रेयोऽनुशासनम् । वाक् चैव मधुरा श्लक्ष्णा प्रयोज्या धर्ममिच्छता ॥१५९॥** मनु. अ. २॥

'जो मनुष्य व विषेषतः विप्र अध्ययन करीत नाहीं त्याची योग्यता लांकडाच्या हत्तीप्रमाणें किंवा चामड्याच्या मृगाप्रमाणें जाणावी. अविद्वानाला जगामध्यें नाममात्रानें मनुष्य म्हणतात, इतकेंच. म्हणून विद्या शिकावी. विद्वान् व्हावें व वैरभाव सोडून सर्व प्राण्यांच्या कल्याणाचा उपदेश करावा. उपदेशाच्या वेळीं मधुर व कोमल वाणीचा प्रयोग करावा. जे पुरुष सत्य उपदेशाच्या योगानें धर्मवृद्धि व अधर्माचा नाश करतात ते धन्य होत.'

**स्वच्छता**—नित्य स्नान करावें, व आपलें वस्त्र, अन्न, पान, स्थान व सर्व इतर वस्तुमात्र स्वच्छ ठेवावें. कारण हे पदार्थ स्वच्छ असले तरच चित शुद्धि होऊन आरोग्य वाढतें व पुरुषार्थ करण्याकरितां सामर्थ्यहि वाढतें. मल व दुर्गंध यांचा पूर्ण नाश होईल अशी सर्वत्र स्वच्छता ठेवावी.

**आचारः परमो धर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एव च ॥** मनु. १।१०८ ॥

'सत्यभाषणादि कर्मांचें आचरण करणें हाच वेद व स्मृति यांत सांगितलेला आचार होय.'

## वडिलांशीं करावयाचें वर्तन.

**मा नो वधीः पितरं मोत मातरम् ॥** यजु. १६।१५॥

**आचार्यो ब्रह्मचर्येण ब्रह्मचारिणमिच्छते ॥** अथर्व. ११।१५।१७॥

**मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव ॥** तैत्तिरीयारण्यके ७ । ११

'माता, पिता, आचार्य व अतिथि यांची सेवा करणें याला देवपूजा म्हणतात.' ज्या ज्या कर्मांपासून जगावर उपकार होईल तें तें कर्म करणें व हानिकारक कर्म सोडून देणें हेंच मनुष्यमात्राचें मुख्य कर्तव्य आहे. नास्तिक, लोभी, विषयलंपट, विश्वासघातकी, असत्यवादी, स्वार्थी, कपटी, छळी वगैरे प्रकारच्या दुष्ट मनुष्यांची कधींहि संगति करूं नये पण जे परोपकारी, सत्यवचनी धार्मिक असतील त्यांची संगति अवश्य धरावी हाच श्रेष्ठाचार आहे.

**परदेशगमन**—(प्र०) आर्यावर्तीतील लोक इतर देशांत गेले असतां त्यांचा धर्म बुडतो व आचारभ्रष्ट होतो असें म्हणतात हें खरें काय ? (उ०) अन्यदेशांत गेल्यानें धर्मभ्रष्टता होत नाहीं, पण आचरण सोडल्यानें धर्मभ्रष्टता येते. बाह्याभ्यंतर शुद्धि, सत्यभाषणादि व इतर आचार जोंपर्यंत सोडले नाहींत तोंपर्यंत धर्मभ्रष्टता होण्याची भीति नको. शिवाय आर्यावर्तांत राहून जो दुष्टाचार करील तोहि धर्मभ्रष्ट होतो. तात्पर्य आचरण चांगलें राहिलें तर धर्म पाळला जातो, हा सिद्धांत मनांत धरूनच प्राचीनकाळचे लोक द्वीपद्वीपांतरीं जात असत. पहा—

**मेरोर्हरेश्च द्वे वर्षे वर्षं हैमवतं ततः । क्रमेणैव व्यतिक्रम्य भारतं वर्षमासदत् ॥**
**स देशान् विविधान् पश्यन् चीनहूणनिषेवितान् ॥** महाभारत शांतिपर्व. अ. ३२७ ॥

'एका वेळीं महर्षि व्यास, शुक्र व इतर सर्व शिष्यांसह पाताल देशांमध्यें (त्या देशाला सध्यां अमेरिका म्हणतात) गेले होते. तेथें त्यांनीं बराच कालपर्यंत निवास केल्यानंतर शुकाचार्यानें त्यांना असा प्रश्न विचारला कीं, आत्मविद्या इतकीच आहे कीं जास्त आहे ? व्यासानी आपल्या मुलाची मानसिक स्थिति जाणून त्याला कांहीं उत्तर दिलें नाहीं. कारण त्यांनीं एकदां आत्मविद्येचा त्यांला उपदेश केला होता. आतां त्याला दुसऱ्याच्या साक्षीची आवश्यकता आहे, असें जाणून त्याला ते म्हणाले कीं, हे शुका ! तूं मिथिला नागरीमध्यें जाऊन हाच प्रश्न राजा जनकाला कर. तो या प्रश्नाचें योग्य उत्तर देईल. पित्याचें हें वचन ऐकून शुकाचार्य मिथिला नागरीस जाण्यासाठीं निघाला. तो प्रथम मेरुवर्ष—उत्तरध्रुवाच्या आसमन्ताद्भागीं जो हिममय प्रदेश आहे त्याप्रदेशांतून हरिवर्षामध्यें आला. ईशान्य, उत्तर, व वायव्य कोनांत जे देश आहेत त्यांचें हरिवर्ष हें नांव होतें. वानरांना हरि म्हणतात. म्हणून ज्या देशांतील मनुष्य रक्तमुखी वानराप्रमाणें भुऱ्या डोळयाचें आहेत, त्या देशाला संस्कृतांत हरिवर्ष म्हणतात. ह्याच प्रदेशाला हल्लीं युरोप हें नांव आहे. मेरुवर्ष, हरिवर्ष हें भरतवर्ष किंवा भारतवर्ष या देशांना पहात पहात हूण (यहुदी लोकांच्या) देशांत प्रवास करून चीन देशांत आला. चीनांतून हिमालयाच्या बाजूनें मिथिला नगरींत त्यानें प्रवेश केला. तसेंच श्री कृष्ण व अर्जुन (अश्वतरी) अग्निनौका नामक जलयानांत बसून पातालामध्यें गेले होते व तेथून युधिष्ठिरानें आरंभलेल्या यज्ञासाठीं उद्दालक ऋषीला घेऊन आले.' 'धृतराष्ट्राचा विवाह गांधार (कंदाहार) देशांतील राजकन्येबरोबर झाला होता.' 'पांडुराजाची स्त्री माद्री ही इराणच्या राजाची कन्या होती.' 'अर्जुनाचा विवाह पाताल (अमेरिका) देशांतील उलूपी नामक राजकन्येबरोबर झाला होता.' इत्यादि ऐतिहासिक कथांवरून, प्राचीनकाळचे लोक देशदेशांतरीं व द्वीपद्वीपांतरीं जात येत असत व त्यांचा धर्म कायम राहत असे, असें आपणांस ओढळेल. मनुस्मृतीमध्यें नौकायानांवर कर घ्यावा असें सांगितलें आहे; यावरूनहि वरील गोष्ट सिद्ध होते. जेव्हां युधिष्ठिरानें राजसूययज्ञ केला, तेव्हां सर्व भूगोलावरील राजांना निमन्त्रण पाठविण्यासाठीं भीम, अर्जुन' नकुल व सहदेव यांना चार दिशांना पाठविलें होतें. जर अशा रीतीनें परदेशगमनांत दोष असता तर ते कधींहि गेले नसते. तात्पर्य, प्राचीनकाळचे आर्यावर्तांतील लोक राजकार्य, व्यापार व देशदर्शन यासाठीं सर्व देशांत प्रवास करीत असत. आजकालची स्पृष्टास्पृष्टतेची व परदेशगमनानें मनुष्य धर्मभ्रष्ट होतो, ही कल्पना मूर्ख लोकांच्या अज्ञानांतून निघालेली आहे. जे लोक देशदेशांतरामध्यें व द्वीपद्वीपांतरामध्यें जाण्याला भीत नाहींत, ते अन्य देशांत जाऊन तेथील अनेक विद्वानांशीं मैत्री करून, त्यांच्या रीतिभाति पाहून, आपलें राज्य व व्यापार वाढवून, निर्भय शूरवीर होतात. दुसऱ्यांतील सद्व्यवहाराचा स्वीकार करून आपणांमधील असद्व्यवहाराचा त्याग करतात व त्यामुळें मोठें ऐश्वर्य प्राप्त करून घेऊन सुखी होतात, ज्या मनुष्यांना परदेशगमनानें आपला धर्म बुडेल असें वाटतें, त्यांना महाभ्रष्ट म्लेच्छकुलोत्पन्न वेश्यासमागमनानें आचारभ्रष्टता येते असें वाटत नाहीं, हें अत्यन्त आश्चर्य नव्हे काय ? मांसभक्षण व मद्यपान करणाऱ्यांच्या शरीराला व वीर्यादिकांना जास्त दुर्गंधी येते,ही गोष्ट खरी आहे. अशा लोकांशीं जर शुद्ध मनुष्य संगति करूं लागेल तर त्या दुर्गंधाचा परिणाम याच्याहि वर होऊं शकतो, म्हणून त्यांची संगति सोडावी. यावरून त्यांच्यांशीं अगदीं लगटून राहणें चांगलें नव्हें एवढेंच ठरेल पण त्यांच्याशीं इतर व्यवहार करणें, त्यांच्यांतील विद्या व इतर गुण यांचें ग्रहण करणें यांत कांहींच दोष नसल्यानें मद्यपानादि दोष सोडून विद्यादि गुणांचें ग्रहण करण्यांत कांहींच हानि नाहीं. मूर्ख लोकांची मजल एथपर्यंत पोंचली आहे कीं त्यांना पाहणें हें सुद्धा पाप आहे असें तें समजतात व म्हणूनच त्यांच्यांशीं ते युद्धादि व्यवहार करूं शकत नाहींत. कारण युद्ध करावयाचें असतांना त्यांना प्रथम पहाव लागतें. धर्म हा आपल्या आत्म्याशीं संलग्न आहे. राग, द्वेष. अन्याय व मिथ्या भाषणादि दोष सोडून देऊन निर्वैरता, प्रीति, परोपकार, सज्जनता इत्यादि गुण ग्रहण करणें हा सदाचार व हाच धर्माचार आहे. जोंपर्यंत आपण उत्तम कामें करीत आहोंत, तोंपर्यंत आम्ही कोणत्याहि देशांत अथवा द्वीपांत असलों तरी हरकत नाहीं व आपणाला दोष लागणार नाहीं पण जर आर्यावर्तांत राहून पापाचरण केलें तर

येथेंहि आमची आचारभ्रष्टता व धर्मभ्रष्टता होईल, एवढें मात्र सर्वांनीं लक्षांत ठेवावें. तात्पर्य आचाराचा नाश झाल्यानें धर्माचा नाश होतो, परदेशगमनानें होत नाहीं. परदेशांत गेल्यानें तेथील लोक आपल्या मतामध्यें आपणाला ओढून नेतील अशी कोणाला भीति वाटण्याचा संभव आहे; पण त्याला उपाय असा आहे कीं, परदेशांत जाणाराला वैदिकधर्माचें ज्ञान असावें व पाखंडमताचें खंडन करण्याची शक्ति अवश्य असावी. देशदेशांतरीं व द्वीपद्वीपांतरीं गेल्यावांचून व्यापार व राज्य यांची उन्नति व बढती कधीं तरी होऊं शकेल काय ? जेव्हां आपल्या देशांत आपलेच व्यापारी व्यापार करतात, तेव्हां देशाचीं संपत्ति वाढणें शक्य नसतें. पण जेव्हां आपल्या देशातील लोक बाहेर जात नाहींत व बाहेरच्या देशांतील लोक आपल्या देशांत येऊन व्यापार व राज्य करतात तेव्हां तेथें दारिद्य व दुःख याशिवाय आणखी काय प्राप्त होणार ? पाखंडी लोक आपली प्रतिष्ठा व बडेजाव कायम ठेवण्यासाठीं इतर लोकांना अज्ञानी ठेवतात, भोजनाच्छादानांमध्यें स्पृष्टास्पृष्टतेचा बखेडा माजवितात व इतर लोक देशदेशांतरीं जाऊन शहाणे झाले तर ते आपणावर पुढें खरमरीत टीका करतील, या भीतीनें ते परदेशगमनाचे मार्ग बंद करण्यास मागेंपुढें पहात नाहींत. परदेशांत राहून मांसमद्यादि निषिद्ध पदार्थांचें सेवन केलें नाहीं म्हणजे झालें.

**स्पर्शास्पर्श**:—या स्पृष्टास्पृष्टतेच्या अतिरेकानें एथपर्यंत मजल आली आहे कीं, प्रत्येकानें आपआपली रोटी बनवून खावी. पण याचा परिणाम युद्धाच्या वेळीं पराजय हाच होतो. आपल्या हातानें करून खाण्यांत शक्तीचा अपव्यय होतो. युद्धाकडे तेवढें लक्ष कमी जातें, मध्येंच कोणी स्पर्श केला असतां उपाशीं राहावें लागतें व त्यामुळें नेटानें काम होत नाहीं. वास्तविक क्षत्रियांनीं एका हातांत रोटी व दुसऱ्या हातांत तलवार घेऊन स्पर्शास्पर्शाचा विचार न करतां शत्रूवर चढाई केली पाहिजे व विजय संपादन केला पाहिजे. हाच त्यांचा आचार होय व पराजित होणें हा अनाचार होय. या प्रकारच्या स्पर्शास्पर्शाच्या गोष्टींचा आर्यावर्तांतील लोकांनीं वाजवीपेक्षां फाजील पाल्हाळ माजवून, आपापसांमध्यें मोठमोठे विरोध माजविले व स्वातंत्र्य, आनंद, धन, राज्य, विद्या व पुरुषार्थ यांना पारखे होऊन, आतां डोक्यावर हात धरून बसले आहेत. आतां आपणाला थोडेंसें कांहींतरी मिळावें अशी इच्छा करतात पण मिळत आहे कोठें ? अशा रीतीनें सर्व आर्यावर्ताचा नाश झाला आहे. चौका करूं नये किंवा स्वच्छता करूं नये असें आमचें म्हणणें मुळींच नाहीं. ती अवश्य पाहिजेत झाडणें, सारवणें या गोष्टीं; अवश्य झाल्या पाहिजेत व खरकट्याचाहि बंदोबस्त नीट केला पाहिजे खिस्ती व मुसलमानाप्रमाणें अस्वच्छता व भ्रष्टता कोणीहि करूं नये. पण त्याबरोबर आपापसांत वैर वाढेल अशा तऱ्हेचेहि स्पृष्टास्पृष्टतेचे प्रकार व छूताछूतीचे आचार बंद झाले पाहिजेत. (प्र०) निर्लेप म्हणजे काय ? (उ०) जें अन्न दुधांत केलें जातें किंवा भाजलें जातें त्याला निर्लेप म्हणतात व जें पाण्यांत शिजवितात त्याला निर्लेप म्हणत नाहींत. पण या सर्व गोष्टी धूर्त लोकांनीं चाविलेल्या पाखंडापैकींच आहेत. दुधांत शिजवणें व पाण्यांत शिवजवणें एकच. पण दूध तूप ज्यांत जास्त असेल ते पदार्थ स्वादिष्ट व शरीराला चांगले असल्यामुळें त्यांना हे पाखंडी लोक दोष मानीत नाहींत. पाहिजे त्याच्याकडील खातात, पण पाण्यांत तयार केलेले निःसत्त्व असल्यामुळें खात नाहींत. याचप्रमाणें 'कच्ची रोटी व पक्की रोटी' याविषयीं जाणावें. वास्तविक पाहतां अग्नीच्या सहाय्यानें पुरें परिपक्क झालेलें जें अन्न तें पक्कें व इतर कच्चे होय; पण दूध तूप ज्यांत विशेष आहे तेच पदार्थ हे लोक पक्के असें समजतात व हीन जातीकडूनहि घेऊन खातात. पक्केच पदार्थ खावेत असें आतां कोणी म्हणेल, पण तेंहि ठीक दिसत नाहीं. चणे वगैरे कांहीं पदार्थ कच्चेहि खाल्लें जातात. तात्पर्य या पाखंडी लोकांचे निर्बंध त्यांच्या स्वतःच्या सोईपुरते आहेत. (प्र०) ब्राह्मणानें आपल्या हातानें अन्न शिजवून खावें कीं शूद्रादिकांना नोकरीला ठेवून त्यांच्याकडून अन्न शिजवून खावें ? (उ०) शूद्रांनीं शिजवलेलें अन्न खाण्यासहि हरकत नहीं. पहा, ब्राह्मण विद्याव्यासंगांत, क्षत्रिय राज्य पालन करण्यांत व वैश्य शेती, व्यापार व पशुपालन करण्यांत तत्पर असतात; म्हणून त्यांच्या येथील सर्व परिचर्या (अन्न शिजवण्यापासून तों घर झाडून साफ करण्यापर्यंत) शूद्रांना करावयाची असते. मात्र शूद्रांच्या घरीं शूद्रांनीं शिजवलेलें अन्न आपत्कालाशिवाय द्विजांनीं खावूं नये. जेव्हां द्विजांच्या घरीं पाकादि संस्कार करण्यासाठीं शूद्र नेमले जातील तेव्हां त्यावर द्विजांनीं देखरेख करावी. पहा—

आर्याधिष्ठिता वा शूद्राः संस्कर्तारः स्युः ॥ आपस्तंबधर्मसूत्र प्रपाठक २। पटल २। खंड २। सूत्र ४

आर्यांच्या अर्थात् ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या देखरेखीखालीं शूद्रांनीं द्विजांच्या घरीं पाकादि संस्कार करावेत.' आर्यांच्या घरामध्यें शूद्र अर्थात् मूर्ख स्त्रीपुरुष यांनीं पाकादि करून त्या तीन वर्णांची सेवा करावी. हीं कामें करतेवेळीं त्यांनीं आपलें शरीर व वस्त्रादि पदार्थ उत्तम स्वच्छ ठेवावे. आर्यांच्या घरीं जेव्हां शूद्र अन्न तयार करण्यास येतील तेव्हां त्यांनीं तें काम करतेवेळीं तोंड बांधावें. नाहींतर त्यांच्या तोंडातील उच्छिष्ट पदार्थ, लाळ किंवा त्यांचा श्वास अन्नांत पडून तें अन्न बिघडेल. त्यांनीं प्रतिदिन उत्तम स्नान करावें व प्रत्येक आठ दिवसांनीं हजामत करून नखें वगैरे साफ काढून चांगलें स्नान करावें व नंतर पाक करावा. द्विजांना वाढून नंतर मग आपण जेवावें. (प्र०) अहो, शूद्र अन्नाला शिवला असतां तें दूषित झालें, असें समजतात. मग ते शूद्राच्या हातचें कसें खाऊं शकतील ? (उ.) शूद्रांनीं शिवलेलें अन्न खात नाहींत हें म्हणणें आधीं खोटें आहे. कारण दूध, तूप, साखर, गूळ, शाक, फळ, मूल, धान्य या पदार्थांना शूद्रच नव्हे तर धेड, चांभार, मुसलमान, खिस्ती लोकहि स्पर्श करतात. शेतांत कामें करून ते पदार्थ उत्पन्न करतात, हेच लोक शेत कापतात, धान्य चाळतात, उंसाचा रस काढून गूळ व साखर करतात, शेतांमध्यें असतांना तेथेंच मलमूत्रांचा उत्सर्ग करतात व अस्वच्छ हातांनीं सर्व धान्यांना स्पर्श करतात. गूळ करतेवेळीं त्याच हातांनीं रस पितात व त्याच हातांनीं गुळाच्या ढेपी बनवितात. चिनी तयार करावयाच्या वेळीं वहाणांच्या पायांनींच ती चेंचतात मग त्या वहाणांना काय काय लागलेलें असतें तें ते पहातहि नाहींत. त्या वहाणा चामड्याच्या असतात हें तर निराळें सांगावयाला नकोच. दुधामध्यें तर पाहिजे त्या भांड्यांतून पाणी घालतात व तें दूध सर्व लोक घेतात. याच प्रमाणें बाजारांत मिळणाऱ्या इतर पदार्थांविषयीं आहे. जर हे पदार्थ स्वच्छ आहेत असें समजून चालतात तर सर्वांनीं स्पर्श केलेले पदार्थ खाल्यासारखें नाहीं कां होत ? मग आपस्तंब धर्म सूत्रकारांनीं सांगितल्याप्रमाणें शूद्रांकडून अन्न शिजवून घेऊन तें खाण्यास काय हरकत आहे ? (प्र.) मूल, फल, कंद व धान्य यांना साक्षात् स्पर्श केलेला नसतो म्हणून कांहीं दोष नाहीं. पण आपल्या डोळ्यांपुढें शूद्रानें तयार केलेलें अन्न कसें खावें ? (उ०) साक्षात् व परंपरेनें असा भेद आपण केला नसता तर तुम्हांला खावयाला कांहींच मिळालें नसतें. गूळ, साखर, खजूर गोड लागतो दूध तूप पौष्टिक आहे, मिठाशिवाय चालत नाहीं व धान्य तर धुवून घेतां येतें, या सबबीवर विशेषतः आपमतलबावर आपले धर्माचे सिंधु रचले गेले आहेत. जर अदृष्टामध्यें दोष नाहीं असें म्हणतां तर तुमच्या दृष्टीच्या आड भंगी किंवा मुसलमान यांनीं शिजविलेलें अन्न जर तुमच्यापुढें आणून ठेवलें तर तें तुम्ही खाल काय ? नाहीं, मग न पाहिल्यानें दोषाची निवृत्ति होते या म्हणण्यांत काय अर्थ आहे ? हां, मुसमान व खिस्ती मद्यमांसाचें सेवन करतात, त्यांच्या हातचें खाण्यानें मद्यमांसाशीं परंपरेनें संबंध घडतो म्हणून त्यांच्या हातचें न खाणें, हें उत्तम खरें. पण आर्यांमध्यें परस्पर रोटीव्यवहार होण्याला दोष कोणता ? जोंपर्यंत एक मत, एक हानिलाभ एक सुखदुःख परस्परांमध्यें होणार नाहीं, तोंपर्यंत उन्नति होणें अशक्य आहे. आतां केवळ खाणें पिणें एकत्र केल्यानेंच सर्व उन्नति होणार नाहीं ही गोष्ट खरी आहे, पण असें झाल्यानें उन्नतिला अडथळे उत्पन्न होणार नाहींत. उन्नति इच्छिणाऱ्यांनीं नेहेमी वाईट गोष्टी सोडून उत्तम गोष्टींचीं आपल्यांत वाढ केली पाहिजे. असें जोंपर्यंत होणार नाहीं तोंपर्यंत अवनति होत जाईल यांत शंकाच नको..आपसांत फूट, मतभेद ब्रह्मचर्याचा अभाव, विद्या न शिकणें व न शिकविणें, बालविवाह, अस्वयंवर, विषयासक्ति, मिथ्याभाषणादि कुलक्षणें वेदविद्येच्या प्रसाराची बंदी इत्यादि कारणांमुळें आर्यावर्तांतील लोकांचें राज्य गेलें व तेथें विदेशीयांचें राज्य झालें. जेव्हां आपसांत भाऊबंद झगडतात तेव्हांच विदेशी मध्यें पडून पंच बनतात. लोक हो ! तुम्ही पांच हजार वर्षांपूर्वीं घडलेल्या महाभारतांतील गोष्टी विसरलांत काय ? भारतीय युद्ध चाललें असतां लढणारे वीर आपल्या वाहनांवर बसूनच खाणें पिणें हे व्यवहार करीत होते. आपसांतील दुहीमुळेंच कौरव, पांडव व यादव यांचा नाश झाला व तोच रोग अजूनपर्यंत आर्यावर्ताच्या पाठीमागें लागलेला आहे. यापासून आर्यांचें आणखी किती नुकसान होणार हें कांहीं समजत नाहीं. त्याच स्वगोत्राचें हनन

करणाऱ्या व स्वदेशाचा नाश करणाऱ्या दुर्योधनाच्या पद्धतीप्रमाणेंच आर्यलोक सध्यांहि चालत आहेत व दुःख भोगीत आहेत हें केवढें आश्चर्य बरें ? परमेश्वरानें आतां आर्यावर्तावर कृपा करावी व या रोगाला दूर करावें !

**भक्ष्याभक्ष्य**—भक्ष्याभक्ष्य दोन प्रकारचें आहे. एक धर्मशास्त्रोक्त व दुसरें वैद्यशास्त्रोक्त. पहा—

**अभक्ष्याणि द्विजातीनाममेध्यप्रभवाणि च ॥ मनु. ५।५ ॥**

'ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनीं विष्टामूत्रादि मलिन पदार्थांच्या संसर्गापासून उत्पन्न झालेल्या कंदमूल-शाक-फलांचें भक्षण करूं नये.' तसेंच—

**वर्जयेन्मधुमांसंच ॥ मनु. २।१७७॥**

'मद्य व मांस यांचेंहि सेवन करूं नये' मद्य, गांजा, भांग, अफू वगैरे सर्व मादक पदार्थ व तंबाकू वगैरे शरीरनाशक पदार्थ हे सर्व बुद्धीला मांद्य आणतात. पहा—

**बुद्धिं लुम्पति यद्द्रव्यं मदकारि तदुच्यते ॥ शार्ङ्गधर ४।२१**

'ज्या ज्या द्रव्याच्या योगानें बुद्धीचा नाश होतो, त्या त्या मादक द्रव्याचें सेवन करूं नये.' त्याचप्रमाणें जें अन्न कुजून व बिघडून दुर्गंधानें दुषित झालेलें असेल, जें उत्तम प्रकारें तयार केलें नसेल, जें मद्य व मांस खाणाऱ्या लोकांनीं तयार केलेलें असेल तें खाऊं नये. आपल्या अन्नासाठीं कोणाचीहि हिंसा करूं नये. व त्यांत सर्वांवर उपकार करणाऱ्या गाईसारख्या जनावराला मारणें हें तर फारच वाईट आहे. एका गाईपासून दूध, तूप, दही, ताक वगैरे पुष्टि देणारे पदार्थ उत्पन्न होतात, बैल उत्पन्न होऊन आमचें शेत नांगरतात, एकटी गाय आपल्या एका पिढीमध्यें चार लक्ष पंचाहत्तर हजार सहाशें मनुष्यांना सुखी करते. म्हणून अशा उपयुक्त पशूला स्वतः मारूं नये व दुसरा मारीत असेल तर आपणाकडून होण्यासारखा जेवढा प्रयत्न असेल तेवढा करावा व त्याला मारूं देऊं नये. पहा, कित्येक गाई वीस शेर दूध देतात व कित्येक दोन शेर देतात. पण चांगल्या पद्धतशीर रीतीनें पाळलेल्या गाई सरासरीच्या मानानें अकरा शेर दूध देतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसेंच कित्येक गाई अठरा महिनेपर्यंत दूध देतात व कित्येक सहा महिन्यांनीं आटतात. तेव्हां सरासरीनें एक वर्षपर्यंत गाय दूध देते असें म्हणण्यास हरकत नाहीं. या हिशेबानें पाहतां गाईच्या एका जन्मांतील दुधानें (२४९६०) चोविस हजार नऊशें साठ मनुष्यांची तृप्ति एक वेळ होऊं शकते. बहुधा प्रत्येक गाईला दहा किंवा बारा वासरें होतात. त्यांतून पांच बैल पांच गाई झाल्या असें मानलें तरी त्याच गाईच्या जन्मामध्यें त्या (१२४८००) एक लक्ष चोव्वीस हजार आठशें माणसांची एक वेळ तृप्ति करूं शकतील. पांच बैल आपल्या आयुष्यांत (५०००) पांच हजार मण धान्य कमींत कमी उत्पन्न करूं शकतील. या अन्नानें, प्रत्येकाला पाऊणशेर या प्रमाणानें अडीच लक्ष मनुष्यांची तृप्ति होऊं शकते. अर्थात् दूध व अन्न मिळून (३७४८००) तीन लक्ष चवऱ्याहत्तर हजार आठशें मनुष्यांची एकवेळ तृप्ति होऊं शकते. तात्पर्य एका गाईच्या एका पिढीमध्यें गाईचें दूध, तिच्यापासून उत्पन्न झालेल्या गाईचें दूध व बैलांनीं उत्पन्न केलेलें धान्य या सर्वांनीं मिळून—(४७५६००) चार लक्ष पंचाहत्तर हजार सहाशें मनुष्यें एकवेळ तृप्त होतात; व पुढच्या त्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या संततीचा हिशोब केला तर त्यांपासून असंख्यात मनुष्यांचें पालन होऊं शकतें, असें आपणास आढळेल या शिवाय बैलांची गाडी वगैरे वाहनें ओढण्याच्या कामीं मनुष्यांना उपयोग होतो तो निराळाच. गाईप्रमाणेंच म्हैस ही दुधाचा पुरवठा करते व लोकांच्या उपयोगीं पडते. पण गाईच्या दुधातुपापासून जशी मनुष्यांच्या बुद्धीची वाढ होते तशी म्हशीच्या दुधातुपानें होत नाहीं; म्हणून सर्व आर्यांनीं गाईचें रक्षण व वर्धन करावें. सर्व विद्वानांचें या बाबतीत एकमत आहे. गाईप्रमाणें बकरीच्या एका पिढींतील दुधापासून (२५९२०) पंचवीस हजार नऊशें वीस मनुष्यांचें एकवेळ पोषण होतें; व त्याचप्रमाणें म्हैस, मेंढे घोडे, उंट, हत्ती, गाढव इत्यादि पशूंपासून पुष्कळ प्रकारें मनुष्यांना सहाय्य मिळतें. अर्थात् या पशूंना मारणारा किती लोकांना दुःख देतो याचा यावरून विचार करतां येईल. शिवाय याचाहि येथें विचार करावा कीं, एका पशूला मारून त्याच्या मांसापासून किती मनुष्यांची एका वेळची तृप्ति होईल व पशूंचें संरक्षण करून त्यांच्या दुधापासून किती मनुष्यांची

---

विस्तारास्तव महर्षि दयानंदाचा गोकरुणानिधि ग्रंथ पहा

एका वेळची तृप्ति होईल, हें पाहिलें असतां पशूचें मांस भक्षण करण्यांत कसा व किती तोटा आहे, हें सहज समजेल. जेव्हां या देशांत आर्यांचें राज्य होतें तेव्हां गो आदिक पशूंचें सर्वत्र रक्षण होत होतें. त्यामुळें या भूमंडलावर सर्व लोक आनंदानें राहत असत. कारण त्या वेळीं गाई पुष्कळ असल्यानें दूध तूप विपुल मिळत असे व धान्य उत्पन्न करण्यास बैल विपुल असत व त्यामुळें धान्य पुष्कळ व स्वस्त मिळत होतें. पण सध्यां जेव्हांपासून विदेशी मांसाहारी लोक या देशांत येऊन राहूं लागले, तेव्हांपासून गो आदि पशूंना मारून खाणारे व मद्यपान करणारे राज्याधिकारी झाले व क्रमानें संसारोपयोगी पशूंची संख्या दिवसानुदिवस कमी कमी होत गेल्यानें धान्य व दूधदुभत्याची महर्गता होऊन आर्य लोक दिवसानुदिवस ज्यास्त ज्यास्त दुःखी होऊं लागले आहेत. कारण **नष्टे मूले नैव फलं न पुष्पम्। वृद्धचाणक्य अ० १०।१३॥'**

वृक्षाच्या मूलाचा नाश झाला असतां त्याला फुलें व फळें हीं येत नाहींत, अशी स्थिति होते; तद्वत्‌च गाईचा नाश झाला असतां दूध, तूप, जमीन नांगरण्यास बैल तरी कसे व कोठून मिळणार ? (प्र०) अहो ! जर सर्वच मनुष्य हिंसा न करणारे झाले तर मग व्याघ्रादि हिंस्र पशु इतके वाढतील कीं, तेच गाय वगैरे सर्वोपयोगी पशूंना खाऊन टाकतील कीं नाहीं ? (उ.) व्याघ्रादि हिंस्र पशूंना मारून व तसेच जे दुष्ट मनुष्यादि प्राणी असतील त्यांना दंड देऊन इतरांचें रक्षण करणें हें राजपुरुषांचें आद्य कर्तव्य आहे (प्र.) मग त्या मारलेल्या प्राण्यांचें मांस टाकून द्यावें काय ? *(उ.) पाहिजे तर फेंकून द्यावें, पाहिजे तर कुत्रे वगैरे मांसाहारी पशूंना खाऊं द्यावें, जाळून टाकावें, किंवा कोणी* मांसाहारी मनुष्य खात असेल तर त्याला द्यावें. मांसाहारानें मनुष्याचा स्वभावहि हिंसक व दुष्ट बनतो; म्हणून कोणीहि मांसाहार करूं नये. हिंसा, चोरी, विश्वासघात, छळ व कपटादींचा अवलंब करून जें प्राप्त होतें, तें अभक्ष्य होय व अहिंसा, धार्मिककृत्यें यांच्यापासून जें प्राप्त होतें तें भक्ष्य आहे असें समजावें. त्याचप्रमाणें ज्या पदार्थांपासून स्वास्थ्य, रोगनाश, बुद्धिबल, पराक्रम यांची वृद्धि व आयुष्याची वृद्धि होते अशा तांदूळ, गहू, फळ, मूळ, कंद, दूध, तूप, मिष्टान्नादि पदार्थ सेवन करावेत. हे सर्व पदार्थ भक्ष्य समजावेत. जे पदार्थ आपल्या प्रकृतीमध्यें विकार करतात ते सोडावेत व जे ज्या ज्या वेळीं हितकारक असतील त्याचें त्या त्या वेळीं सेवन करणें उत्तम होय.

**उच्छिष्टान्नभक्षणनिषेधः**— (प्र.) एका पात्रांत अनेकांनीं जेवण्यांत कांहीं दोष आहे काय ? (उ.) होय, फार दोष आहे एकाचे कुष्टादि रोग दुसऱ्याला लागतात. प्रत्येकाची प्रकृति भिन्न भिन्न असल्यामुळें एका पात्रात सर्वांनीं अन्न सेवन केल्यानें त्यांना निरनिराळे रोग होण्याचा व त्याचें रक्त दूषित होणयाचा संभव असतो. त्याचप्रमाणें दुसऱ्याचें उच्छिष्ट खाण्यानेंहि अनेक दोष उत्पन्न होण्याचा संभव असतो. पहा—

**नोच्छिष्टं कस्यचिद्दद्यान्नाद्याच्चैव तथान्तरा। न चैवात्यशनं कुर्यान्न चोच्छिष्टः क्वचिद्व्रजेत् ॥**

म. २।५६

'आपलें उच्छिष्ट कोणाला देऊं नये व दुसऱ्या कोणाचें उच्छिष्ट आपण खाऊं नये. अधिक भोजन कधींही करूं नये व हात आणि तोंड धुतल्याशिवाय इकडे तिकडे हिंडूं नये' (प्र.) **'गुरोरुच्छिष्टभोजनम्।'** याचा अर्थ काय बरें ? (उ.) याचा अर्थ गुरूचें उच्छिष्ट खावें असा नसून 'गुरूचें जेवण झाल्यानंतर जें अन्न शिल्लक राहिलें असेल तें भक्षण करावें— अर्थात् गुरूला आधीं जेऊं घालावें व नंतर आपण जेवावें.' असा आहे. (प्र.) जर कोणाचेंहि उच्छिष्ट खाऊं नये असें आहे तर मधमाशांचा उच्छिष्ट मध, वासरांचें उच्छिष्ट दूध व आपण एक घांस घेतल्यानंतर आपलेंच उच्छिष्ट आपण कसें खावें ? (उ.) मध हा मधमाशाचा उच्छिष्ट नाहीं. तो अनेक औषधींचा सार आहे व त्याचें एकीकरण करण्यांत मधमाशाचें सहाय्य होतें इतकेंच. वासरें हीं स्तनांतून बाहेर येणाऱ्या दुधाचें पान करतात त्या योगानें *आंतील दूध उच्छिष्ट होत नाहीं. वासरांचें दूध पिऊन झाल्यावर स्तनाला पाण्यानें धुवून स्वच्छ भांड्यांत धार काढावी* म्हणजे झालें. आपलें उच्छिष्ट आपणालाच अपायकारक नसल्यानें त्यासंबंधानें विशेष लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. स्वाभाविक रीतीनें पाहिलें तरी आपल्या उच्छिष्टाचा आपल्याला वीट येत नाहीं, पण दुसऱ्याच्या उच्छिष्टाचा येतो. मुख, नाक, कान, डोळे, उपस्थ व गुह्येंद्रिय या आपल्या इंद्रियांतून निघणाऱ्या मलाला स्पर्श करण्यास आपणास

पूर्णा उत्पन्न होत नाहीं; पण त्याच दुसऱ्याच्या इंद्रियांतील मलाला स्पर्श करणें कंटाळवाणें वाटतें. याचप्रमाणें उच्छिष्टाविषयीं जाणावें; म्हणून कोणचेंहि उच्छिष्ट दुसऱ्या कोणीहि खाऊं नये हें उत्तम व हेंच सृष्टिनियमास अनुकूलहि आहे. (प्रश्न) स्त्रीपुरुषांनीहि परस्पर एकमेकांचें उच्छिष्ट खाऊं नये काय ? (उत्तर) स्त्रीपुरुषांनीं सुद्धा एकमेकांचें उच्छिष्ट खाऊं नये, कारण त्यांच्या शरीरांचा स्वभावहि भिन्न असतो.

**अभक्ष्य अन्नः**—(प्र०) अहो सर्वांचीं शरीरें सारखीच हाडांमांसाचीं आहेत व सर्वांच्या शरीरांत एकसारखेंच रक्त खेळत आहे, मग पाहिजे त्याच्या हातचें अन्न खाण्याला काय हरकत आहे ? (उत्तर) पाहिजे त्याच्या हातचें अन्न खाण्यांत पुष्कळ दोष आहेत. पहा, चांगलें सात्विक पदार्थ खाऊन ब्राह्मण व ब्राह्मणी यांचीं शरीरें सात्विक व निर्दोष जशीं बनलेलीं असतात तशीं तीं चांडालादिकांचीं नसतात. चांडालाच्या शरीरांतील परमाणु दुर्गंधानें भरलेलें असतात तसे द्विजांचे नसतात, कारण त्यांच्या खाण्याच्या पदार्थांत तसा भेद असतो; म्हणून ब्राह्मणादि उत्तम वर्णाच्या हातचें अन्न खावें; भेड, भंगी, चांडाल, चांभार इत्यादि नीच व अमंगल मनुष्यांच्या हातचें अन्न खाऊं नये ब्राह्मणाचें व चांडालाचें शरीर जरी हाडामांसाचेंच असलें तरीहि त्यांत आणखी पुष्कळ भेद असतात. आई, सासु, कन्या, बहीण, मुलाची मुलगी इत्यादि स्त्रियांचीं शरीरें सारखींच हाडामांसाचीं असतात, तथापि त्या सर्वांशीं सारखें आचरण करावयाचें नसते, कारण त्यामध्यें आणखी इतर दृष्टीनें पुष्कळ भेद आहेत. मुखानें प्रत्येक पदार्थ खातां येतो हें खरें पण लोक अन्न खातात व मल खात नाहींत. तात्पर्य विचारानेंच सर्व गोष्टी केल्या पाहिजेत व ज्या अर्थी चांडालादिकांचीं शरीरें अमंगल असतात त्या अर्थीं त्यांनीं तयार केलेलें अन्न उच्च वर्णांनीं खाण्यास योग्य नसतें.

**गाईचें शेणाः**— (प्र०) गाईच्या शेणानें सारवतात तसें दुसऱ्या प्राण्यांच्या शेणानें सारवण्यास काय हरकत आहे ? (उत्तर) गाईच्या शेणाला घाण येत नाहीं. तें हवा शुद्ध करतें. तें चिकट असल्यानें जमीन लवकर उखळली जात नाहीं, सारवलेल्या जमिनी वाळल्यावर स्वच्छ दिसतात व त्यांवर कपडा ठेवला तर त्याला मळ लागत नाहीं. जशीं माती वस्त्रादिकांना लागते तसें वाळलेलें शेण लागत नाहीं. मनुष्यादि इतर प्राण्यांची विष्टा दुर्गंध उत्पन्न करणारी व हवा बिघडविणारी असते. गाईच्या शेणानें सारवलेली जमीन स्वच्छ व साफ दिसते. जेवणाखाण्याच्या ठिकाणीं दूध तूपादि पदार्थ पडतात व ते तसेंच राहूं दिले तर तेथें माशा जमतात व दुर्गंधी होते. पण जर ती जागा शेणानें स्वच्छ सारवली तर ती सुंदर व स्वच्छ होते. चुनेगच्चीचें घर पाण्यानें धुवून स्वच्छ ठेवतां येतें पण जर जमीनच असली तर ती शेणानें स्वच्छ सारवण्याची अत्यंत आवश्यकता आहे. मांसाहारी म्लेंच्छ लोकांच्या बबर्जीखान्यामध्यें व त्याच्या आसपास कोठें हाडे तर कोठें मांसाचे तुकडे, कोठें जळकीं लांकडें, कोठें राख व इतर पदार्थ इकडे तिकडे पडलेले असतात. तेथें माशा अशा घूं घूं करीत असतात कीं, त्यांचें वर्णन देखील करतां येत नाहीं. अशा दुर्गंधीयुक्त स्थानीं जर चांगला मनुष्य गेला तर त्याला वांतीच होईल. पण ब्राह्मणादि निर्मांसाहारी लोकांचें स्वयंपाक घर तसें नसतें. तें झाडून सारवून स्वच्छ व नीटनेटकें केलेलें असतें. असो तात्पर्य इतकेंच कीं गोमयानें स्वच्छता वाढते म्हणून तसें करणें उत्तम आहे.

**चौकाः**— (प्र.) पुरभय्याप्रमाणें चौका करून त्यांत बसून खाणें चांगलें नाहीं काय ? ( उ. ) जी जागा स्वच्छ व रमणीय असेल व जेथें दुर्गंध येत नसेल तेथें बसून जेवावें. पण या गोष्टी वेळेवर अवलंबून आहेत. युद्धाच्या प्रसंगीं चौका करीत बसण्यास वेळ नसते, तेव्हां घोड्यावर किंवा रथांत बसून खाण्यास कांहीं हरकत नाहीं. पण जेव्हां घरीं व्यवस्था होण्यासारखी असते तेव्हां वरील सर्व प्रकारांचा विचार करून भोजनादि व्यवहार करावेत. (प्र.) आपल्या हातांनीं आपण करून खावें कीं दुसऱ्यांच्या हातचें जेवावें ? (उ.) जर सर्व आर्य शुद्ध धार्मिक पद्धतीनें वागत असले तर सर्व आर्यांच्या हातचें आर्यांनीं खाण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं; कारण ब्राह्मणादि तीन वर्णांची स्त्रीपुरुषें चौका करणें; भांडीं घासणें हीं कामें करूं लागलीं तर विद्यावृद्धि व ज्ञानप्रसार कोण करणार? पूर्वी युधिष्ठिराच्या राजसूययज्ञामध्यें सर्व भूमंडळावरील राजे, महाराजे ऋषी महर्षि अनेक आलेले होते. त्यांनीं राजाच्या एकाच पाकशाळेंतील अन्न सेवन केलें होतें. जेव्हांपासून ख्रिस्ती व मुसलमान वगैरे मतमतांतरें निघून, वैर वाढलें व मद्यगोमांसादिकांचा प्रचार

सुरूं झाला तेव्हांपासून भोजनामध्यें स्पर्शास्पर्शाचा बखेडा सुरूं झाला आहे. पहा, प्राचीनकाळीं काबुल, कंदाहार, इराण, अमेरिका, युरोप इत्यादि ठिकाणच्या राजांच्या गांधारी, माद्री, उलूपी वगैरे मुली आर्यावर्तांतील राजांनीं केल्या होत्या. यांचे व त्यांचे भोजनादि व्यवहार होत असत. शकुनि वगैरे तद्देशीय राजपुरुषांचा खानपानादि व्यवहार कौरवपांडवांशीं बिनबोभाट होत असे. त्यांच्यांत मुळींच विरोध नव्हता, कारण त्यावेळीं सर्व भूमंडळावर एकच वैदिकमत होतें. या वैदिकधर्मावरच सर्व लोक निष्ठा ठेवित असत. ते लोकांची आपल्याप्रमाणें काळजी घेत व त्यांच्या सुखदुःखाविषयीं जपत असत, म्हणूनच त्यावेळीं आर्यावर्तांत फारच सुख होतें. पण आतां अनेक मतमतांतरें झाल्यापासून अनेक दुःखें उत्पन्न झालीं आहेत. या सर्व दुःखाच्या मुळाचें निवारण करणें बुद्धिमान् पुरुषांचें आद्य कर्तव्य आहे. ज्या योगानें असत्य मतमतांतरांचा शीघ्र प्रलय होईल व सर्वत्र ऐक्य भाव नांदूं लागेल, असा सत्यमताचा अंकुर परमेश्वरानें सर्वांच्या मनांत उत्पन्न करावा. सर्व विद्वान् लोकांनीं या दृष्टीनें विचार करून सर्व प्रकारचा विरोधभाव टाकावा व सर्वांनीं आनंदाचें भागी व्हावें.

(याप्रमाणें आचार व अनाचार, भक्ष्य व अभक्ष्य यांविषयीं थोडेसें दिग्दर्शन झालें. येथें दहावा समुल्लास पुरा होऊन सत्यार्थप्रकाशाचा पूर्वार्धहि पूर्ण झाला. या पूर्वार्धामध्यें खंडनमंडनाचा भाग विशेष दिला नाहीं. याचें कारण प्रथमतः धर्म व अधर्म यांचा विचार करण्याचें सामर्थ्य मनुष्यामध्यें आल्यानंतरच खंडनमंडनांतील सूक्ष्मभेद लक्ष्यांत येऊं शकतात. याकरितां पहिल्या दहा समुल्लासामध्यें सत्य धर्माचा उपदेश करून पुढील चार समुल्लासांमध्यें मतमतांतराचें खंडनमंडन करण्यांत येणार आहे. अकराव्या समुल्लासामध्यें आर्यावर्तीय मतमतांतरांचें, बाराव्यामध्यें जैनधर्माचें, तेराव्यामध्यें ख्रिस्ती धर्माचें व चवदाव्यामध्यें मुसलमान धर्माचें खंडनमंडन करून, त्या त्या मतांचें खरें स्वरूप काय आहे तें दाखविण्यांत येईल. चवदाव्या समुल्लासांच्या शेवटीं स्वमतहि दिलें जाईल, जे लोक निःपक्षपात बुद्धीनें या ग्रंथाचें विचारपूर्वक परिशीलन करतील त्यांना धर्माचें खरें स्वरूप कळेल. पण जे दुरभिमानें विचार करणार नाहींत. त्यांना अविचाराला जें योग्य फल मिळावयाचें तेंच मिळेल. सर्व गोष्टींचा नीट विचार करून सत्य कोणतें व असत्य काय आहे याचा सर्व काळीं निश्चय करणें विद्वानांचें काम आहे. सदोदित जें खरें असेल त्याचा स्वीकार करून असत्याचा त्याग करावा. अशा रीतीनें गुणग्राहक बनून उद्योग करावा म्हणजे धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारीहि पुरुषार्थांची त्यांना प्राप्ति होईल व ते आनंदित व प्रसन्न होतील यांत शंका नाहीं.)

इति श्रीसुभाषाविभूषित आचारानाचारभक्ष्याभक्ष्यविषयो नाम दशमसमुल्लासः संपूर्णः ॥१०॥

॥ समाप्तोऽयं पूर्वार्धः ॥

॥ ओ३म् शम् ॥

# अथ उत्तरार्धः

## अनुभूमिका

पांचहजार वर्षांच्या पूर्वी वैदिकधर्माशिवाय दुसरा कोणताहि धर्म नव्हता ही गोष्ट सिद्ध झालेली आहे; कारण वेदोक्त सर्व गोष्टी विद्या व तर्क यांनीं सिद्ध आहेत. वेदांकडे लोकांची अप्रवृत्ति झाल्यामुळेंच स्वार्थ माजून माहाभारताचा घनोघोर संग्राम झाला. लोकांची प्रवृत्ति वेदांकडून ढळल्यामुळें त्यांच्यांत अज्ञान माजत चाललें व त्यामुळें लोकांच्या बुद्धीला भ्रम होऊन ज्याला जसें वाटलें तसें त्यानें मतमतांतर चालविलें. या प्रचलित वेदबाह्य मतमतांतरांमध्यें पौराणिक मत, जैनीमत, खिस्तिमत व कुराणमत किंवा मुसलमानी मत हीं मूल आहेत. हीं चार मतें याच क्रमानें लोकांत प्रचलित झालीं आहेत. या चार मतांच्या शाखा हजारांहून कमी नाहींत. या सर्व मतांचे अनुयायी, त्यांचे चेले, व अन्य सर्व लोक यांना परस्पर सत्यासत्याचा विचार करण्यास सोपें जावें, म्हणून हा ग्रंथ बनविला आहे. *या ग्रंथांत जें सत्य वैदिक मताचें मंडन व असत्याचें खंडन स्पष्टपणानें लिहिलेलें आहे तें सर्वांनीं पाहून* त्यांना सत्यासत्याचा विचार करतां यावा याकरतांच आहे. या चार मतांचे मूल ग्रंथ पाहून माझ्या बुद्धिप्रमाणें व विद्याभ्यासाप्रमाणें जो बोध झालेला आहे तो लोकांपुढें ठेवणें हें मी सर्वोत्तम काम समजतों. कारण या मतमतांच्या प्रचारामुळें विज्ञान (वेदज्ञान) अजिबात गुप्त झालें तर तें सहजरीत्या पुनः मिळणें संभवत नाहीं. पक्षपात सोडून जर या ग्रंथाचें वाचन लोक करतील तर त्यांस सत्यासत्य तेव्हांच समजेल व त्यामुळें सर्वांना आपआपल्या कल्पनेप्रमाणें सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग करण्यास सुलभ होईल. या उत्तरार्धांमधील अकराव्या समुल्लासामध्यें पुराणादि ग्रंथांतून जी शाखाशाखान्तररूप मतें आर्यावर्तांत प्रचारांत आलेलीं आहेत, त्यांतील गुणदोषांचें संक्षेपानें वर्णन केलेलें आहे. हा ग्रंथ सत्यासत्याचा निर्णय करण्या व करविण्यासाठींच केलेला आहे. या मतमतान्तरांतील गुणदोष व्यक्त करून सदोषाला सहाय्य देणारे जें काम मी केलेलें आहे तें परोपकारी आहे असें कोणी मानलें नाहीं, तरी या कामाबद्दल विरोधीभावहि मनांत आणूं नये. मनुष्यजन्माचें महत्त्व न्यायदृष्टीनें सत्याचा निर्णय करण्यांतच आहे. वितंडवादानें मतमतान्तरांची सिद्धि दाखवून लोकांना अनिष्टफल भोगावयास लावणें हें पक्षपातरहित काम करणाऱ्या विद्वज्जनांस योग्य नाहीं जोपर्यंत या मिथ्या अवैदिक मतमतांतरांचा समूल नाश होऊन एका सत्य वैदिक मताचा सर्व मनुष्यांमध्यें प्रचार होणार नाहीं; तोंपर्यंत मनुष्यांमध्यें भेदभाव राहून खरा आनंद कधींहि प्राप्त होणार नाहीं. जर आम्ही सर्व मनुष्य, व विशेषतः सर्व विद्वान् लोक, ईर्ष्या व द्वेष सोडून आणि निःपक्षपातानें सत्यासत्यतेचा निर्णय करून सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग करूं, तर सर्वत्र आनंदी आनंद होण्यास फार उशीर लागणार नाहीं. विद्वानांमध्येंच विरोध असल्यामुळें अन्य सर्व लोक भ्रमजालांत फसत आहेत व परस्परांत विरोध फैलावत आहे. जर हे विद्वान् लोक आपल्याच स्वार्थाकडे न पहातील व सर्वांच्या हिताचा विचार करतील तर सर्वांमध्यें थोड्याच वेळांत ऐकमत होईल यांत शंका नाहीं. हें ऐकमत कोणत्या धोरणानें गेलें असतां साधेल याचें वर्णन या ग्रंथाच्या शेवटीं दाखविलें आहे. सर्व शक्तिमान् परमात्मा सर्व मनुष्यांना एका वैदिकमतामध्यें प्रवृत्त होण्यास उत्साहित करो.

अलमतिविस्तरेण विपश्चिद्वरशिरोमणिषु ।

—०—

# अथैकादशसमुल्लासः ।

अथाऽऽर्यावर्तीयमतखंडनमण्डने विधास्यामः

आतां या समुल्लासामध्यें आर्यावर्तातील आर्यलोकांच्या मतमतान्तरांचें खंडन मंडन करावयाचें आहे. हा आर्यावर्त देश असा उत्तम आहे कीं या देशासारखा उत्तम देश सर्व भूमंडळावर दुसरा कोणताहि नाहीं. या देशाला '**सुवर्णभूमि**' असें म्हणतात. कारण ही भूमि सर्व प्रकारच्या रत्नांची जननी आहे. यासाठींच सृष्टीच्या प्रारंभीं आर्यलोक येथें येऊन राहिले. आम्ही सृष्टिविषय नामक निबंधांत पूर्वीं दाखविलेंच आहे कीं '**आर्य**' हें उत्तम पुरुषाला नांव आहे व आर्यांशिवाय जीं इतर माणसें आहेत तीं '**दस्यु**' होत. जेवढे म्हणून देश या भूमंडळावर आहेत ते सर्व या देशाची प्रशंसा करीत आहेत व मनांत इच्छा करीत आहेत कीं आर्यावर्ताशीं आपला संबंध जडावा. परिस नामक दगडाची जी गोष्ट आपण ऐकतों ती जरी केवळ कविकल्पना असली तथापि ती या देशाला लावून पाहतां खरी दिसते. आर्यावर्त देश हाच खरा परिस आहे व या देशाला जे जे लोखंडमय दरिद्री देश स्पर्श करतात, ते ते सुवर्णमय म्हणजे धनाढ्य होतात हें सर्व लोकांना मान्य आहे.

**एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः । स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥** मनु० २।२०.

(**अर्थ**)'या आर्यावर्त देशांत उत्पन्न झालेल्या ब्राह्मणांपासून म्हणजे विद्वानांपासून, भूमंडळावर राहणाऱ्या सर्व माणसांनीं म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, दस्यु, म्लेंच्छ आदिकरून सर्वांनीं आपलीं कर्तव्यें काय व आपण काय केलें पाहिजे याचें शिक्षण मिळवावें; त्याचप्रमाणें इतरांनीं येथील विद्वानाकडूनच विद्याभ्यास शिकावा.'या मनूच्या श्लोकामध्यें प्राचीन काळच्या आर्यावर्ताची खरी योग्यता वर्णिली आहे. सृष्टीच्या प्रारंभापासून तों पांचहजार वर्षांपूर्वींपर्यंत सर्व भूमंडलावर आर्यांचेंच सार्वभौम राज्य होतें. अन्य देशांमध्यें लहान लहान मांडलिक राजे राहत असत. कौरव पांडवांच्या कालापर्यंत या देशांतील राजांच्या कायद्याप्रमाणें इतर देशांतील राजे व प्रजा वागत असत, याबद्दल मनुस्मृतींमधील प्रमाण वर दिलें आहे. मनुस्मृति ही सृष्टीच्या प्रारंभीं झालेली आहे, तेव्हां तीवरून तत्कालीन वस्तुस्थिति समजण्यास हरकत नाहीं; तसेंच महाराज युधिष्ठिरानें जो राजसूयज्ञ केला त्यावेळेपर्यंत, किंवा भारतीय युद्ध संपेपर्यंत, येथील राजांच्या आधीनच इतर देशांतील राजे होते. पहा ! चीनदेशाचा भगदत्त, पाताल ( अमेरिका ) देशाचा बभ्रुवाहन, युरोपचा बिडालाक्ष (मांजराप्रमाणें ज्याचे डोळे आहेत तो), यवन (यूनान) व इराण देशाचा शल्य हे राजे भारतीय महायुद्धामध्यें व राजसूययज्ञामध्यें सार्वभौम राजाच्या आज्ञेनें आलेले होते. रघुगण नामक राजाच्यावेळीं रावण हाहि त्याचा एक लहानसा मांडलिक राजा होता; जेव्हां तो रामचंद्र राजाच्यावेळीं विरुद्ध झाला, तेव्हां रावणाला दंड देण्याकरितां रामचंद्रानें त्यांचा पराभव केला व त्याचें राज्य बिभीषणाला दिलें. तात्पर्य, स्वायंभुव राजापासून तों पांडवांपर्यंत आर्यांचें चक्रवर्ती राज्य या भूमंडलावर होतें. नंतर आपसांत विरोध उत्पन्न होऊन वैमनस्यें वाढलीं, व परस्परांतील युद्धामुळे आर्यांच्या चक्रवर्ती राजाचा नाश झाला. या परमात्म्याच्या सृष्टीमध्यें **अभिमानी, अन्यायी व अविद्वान्** अशा लोकांचें राज्य फार दिवस टिकत नाहीं. ही संसाराची स्वाभाविक प्रवृत्ति आहे कीं, जेव्हां वाजवीपेक्षां फाजील धन देशांत वाढतें तेव्हां त्या देशांतील लोकांमध्यें **आळस, पुरुषार्थरहितता, ईर्ष्या,** द्वेष, विषयासक्ति, व प्रमाद वाढूं लागतात आणि त्यामुळें त्यांच्यांत अशिक्षितता इत्यादि दुर्गुण वाढून सुशिक्षणपरम्परा बिघडते, व्यसनांचें प्राबल्य होतें, मद्यमांस सेवनाचा प्रचार होतो, बालविवाह सुरू होऊन मनुष्यें निःशक्त होतात, व सर्व स्वेच्छाचारी बनतात. तसेंच मोठें सैन्य व युद्धसामुग्रीची विपुलता या गोष्टी आपणाकडे आहेत असें एकदां राजपुरुषांना वाटलें, व आपली बरोबरी करणारा या भूमंडलावर कोणीहि नाहीं अशी त्यांची खात्री झाली कीं, त्या राजांत पक्षपात, अन्याय व अभिमान वाढत जातो;

जेव्हां हे दोष वाढतात तेव्हां त्या राज्यांत अनेक तंटे होऊन व परस्परांत लढाई होऊन त्यांचा नाश होतो; किंवा लहानशा कुलांतील एखादा दूरदर्शी पुरुष त्यांच्या उलट लोककल्याणासाठीं उभा राहतो व त्या अभिमानी राजांचा पूर्ण पराभव करितो. जेव्हां हे वर सांगितलेले दोष मुसलमानी बादशाहामध्यें उत्पन्न झाले तेव्हां श्रीशिवाजी महाराज व गोविंदसिंगजी हे पुरुष उत्पन्न होऊन त्यांनीं मुसलमानी राज्याचा नाश केला. पूर्वीं आर्यावर्तांत कोणकोणते चक्रवर्ती राजे होऊन गेले तें मैत्र्युपनिषदांत सांगितलें आहे.

**अथ किमेतैर्वा परेऽन्ये महाधनुर्धराश्चक्रवर्तिनः केचित् सुद्युम्नभूरिद्युम्नेन्द्रद्युम्नकुवलयाश्वयौवना–श्ववध्यश्वाश्वपतिशशविन्दुहरिश्चन्द्राम्बरीषननक्तुसर्यातिययात्यनरण्याक्षसेनादयः । अथ मरुत्तभरतप्रभृतयो राजानः ।**

मैत्र्युपनिशद् १।४ ॥

**(अर्थ)** 'सुद्युन्म, भूरिद्युन्म, कुवलयाश्व, यौवनाश्व, वध्यश्व, अश्वपति, शशबिन्दु, हरिश्चन्द्र, अम्वरीष, ननवत्तु, सर्याति, ययाति, अनरण्य, अक्षसेन, मरुत्त, भरत हे या भूमंडलावर प्रसिद्ध चक्रवर्ती राजे होऊन गेले.' इत्यादि प्रमाणांवरून हें स्पष्ट होत आहे कीं सृष्टीच्या उत्पत्तिपासून महाभारतापर्यंत आर्यांचेंच सार्वभौम चक्रवर्ती राज्य होतें; पण सध्यां त्यांच्यांत पूर्वोक्त दोष उत्पन्न झाल्यामुळें ते भाग्यहीन व राज्यभ्रष्ट होऊन परकीयांकडून आज पादाक्रांत केले जात आहेत. मनुस्मृति व भारतादिग्रन्थ पाहिले असतां स्वायम्भुवापासून पांडवांपर्यंत कोणकोणते चक्रवर्ती राजे झाले हें सर्वांस समजेल; या राजांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणें हें अज्ञानी व पक्षपाती लोकांचें काम आहे.

**(प्रश्न)** प्राचीनकाळीं आग्नेयास्त्रादिक विद्या होत्या असें जें ग्रंथांतरीं लिहिलें आहे तें खरें कीं खोटें ? तोफा व बंदुका त्यावेळीं होत्या किंवा नाहीं ? शस्त्रास्त्रें देवताविषयक मंत्रांच्या जपाने साध्य होतीं कीं काय ? **(उत्तर)** पदार्थविज्ञान शास्त्राच्या सहाय्यानें हीं शस्त्रास्त्रें तयार करतां येतात व पूर्वीच्या लोकांना तीं तशी करतां येत असत हें खरें; पण मंत्रांचा नुसता जप केला असतां विशिष्ट अस्त्र साधतां येतें हें अगदीं खोटें. पदार्थविज्ञानशास्त्रांच्या ज्ञानानें विचार करणें हा 'मंत्र' होय; या विचाराच्या योगानें केलेल्या पदार्थांच्या जुळवणीपासून तीं साधतात. जे शब्दमय मंत्र आहेत त्यांच्या जपापासून कोणतेंहि द्रव्य उत्पन्न होत नाहीं. जर कोणी म्हणेल कीं, अमुक मंत्र जपला असतां अग्नि उत्पन्न होतो, तर त्यांठिकाणीं विचार करण्यासारखी ही गोष्ट आहे कीं त्या मंत्रापासून उत्पन्न होणारा अग्नि आधीं मंत्र म्हणणाऱ्यांचें हृदय व जिव्हा जाळील. मारावयाला जावें शत्रूला व आधींच मरावें आपण, अशी या मंत्रवाल्यांच्या मन्त्रांची स्थिति आहे. वास्तविक '**मंत्र**' म्हणजे विचार किंवा मनन. याच अर्थी 'राजमंत्री' हा शब्द वापरण्यांत येतो. राज्यांतील सर्व कामांचा विचार करणारा तो राजमंत्री होय. तात्पर्य, मंत्र म्हणजे विचार, सर्व सृष्टींतील पदार्थांचें प्रथमतः ज्ञान प्राप्त करून घेऊन, त्यांवर विचार करून, कुशलतापूर्वक त्यांची जुळणी केली असतां अनेक कलाकौशल्याचे व उपयोगाचे पदार्थ उत्पन्न होतात; जसें:––लोखंडाचा बाण किंवा गोळा बनवून त्यांत असे पदार्थ ठेविले जावे कीं, त्यांना अग्नीचा स्पर्श केला असतां वायूमध्यें धूरच धूर होईल व त्याला सूर्यकिरणांचा स्पर्श झाला असतां, किंवा वायूचें घर्षण झालें असतां एकदम अग्नीप्रमाणें पेट घेईल; अशा प्रकारच्या शस्त्रालाच '**अग्नेयास्त्र**' असें म्हणतात; या शस्त्राचा प्रतीकार करण्यासाठीं '**वारुणास्त्र**' सोडीत असतात; जर शत्रूनें आपल्या सैन्यावर आग्नेयास्त्र सोडलें तर वाटेंतच त्यावर वारुणास्त्र सोडीत. या शस्त्रांमध्यें अशीं द्रव्यें घातलेलीं असत कीं त्यांचा त्या आग्नेयास्त्राच्या धुराशीं स्पर्श झाला असतां त्या धुराचे मेघ बनत, व त्यांतून एकदम पाणी पडून त्या अस्त्रानें पेटत असलेला अग्नि विझे; त्याचप्रमाणें '**नागास्त्र**' किंवा '**सर्पास्त्र**' असतें. हें शत्रूवर सोडलें असतां सर्व शरीर पाशानें एकदम बांधलें जातें '**मोहनास्त्र**' म्हणून जें असतें त्याच्या मधून निघणाऱ्या वायूच्या योगानें शत्रूचें सैन्य कैफ चढल्याप्रमाणें अगदीं गुंग होऊन पडतें; त्याचप्रमाणें '**पाशुपतास्त्र**' म्हणून एक अस्त्र आहे, त्यांमध्यें तारांची व शिसें किंवा अन्य पदार्थांची अशी व्यवस्था केलेली असते कीं, विद्युत् प्रवाह सुरू होऊन त्या योगानें शत्रूचे अनेक लोक संहारले जातात. 'तोफा व बंदुका' हें शब्द अन्य भाषेंतील आहेत; यांनाच अनुक्रमें संस्कृत भाषेंमध्यें '**शतघ्नी**' व **भृशुंडी**' असें म्हणतात; ज्यांना संस्कृत विद्येचा परिचय नाहीं,

ते कांहीं तरी लिहितात व कांहींहि बोलतात; त्यांच्या त्या लेखानें व भाषणानें कोणीहि भ्रमांत पडूं नये; आपले पूर्वज पदार्थविद्येच्या सहाय्यानेंच शस्त्रास्त्रें साध्य करीत होते असें समजावें.

आर्यावर्त देशांतूनच इतर देशांत विद्या गेली हें इतिहासप्रसिद्ध आहे; आर्यावर्तांतून मिसर देशांत, मिसर देशांतून युनान देशांत, युनानामधून रोम देशांत, रोम देशामधून युरोपखंडांत, व युरोपांतून अमेरिकेंत व इतर देशांत विद्येचा प्रसार झाला. अजूनहि संस्कृत विद्येचा प्रसार आर्यावर्तांत जितका आहे तितका दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं; कित्येक आधुनिक लोक म्हणत असतात कीं, जर्मनीमध्यें संस्कृताचा प्रचार फार आहे; मॅक्समुल्लर साहेब यांनीं जितका संस्कृताचा अभ्यास केलेला होता, तितका कोणीहि केलेला नाहीं. या ज्या गोष्टी आहेत त्या केवळ बोलावयाच्या आहेत. (**निरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते**) ज्या ठिकाणीं इतर वृक्ष नाहींत तेथें एरंडालाहि मोठा वृक्ष मानतात; या म्हणीप्रमाणें पाहिजे तर त्यांना थोर विद्वान् समजावें. युरोपखंडांत संस्कृतविद्येचा प्रचार नसल्यामुळें जर्मनींत जें कांहीं थोडेसें आहे व मॅक्समुल्लर जें कांहीं थोडेसें शिकला होता तेंच त्यांना फार असें वाटलें यांत नवल नाहीं; पण आर्यावर्ताच्या मानानें तेथें कांहींच विद्वत्ता नाहीं. जर्मनींतील एका प्रिन्सिपालाबरोबर झालेल्या पत्रव्यवहारावरून माहिती मिळाली होती कीं, संस्कृतभाषेंत लिहिलेल्या साधारण चिठ्ठीचा अर्थ करणारेहि जर्मनीमध्यें फार थोडे आहेत, मग वेद जाणणारे दूरच ! मॅक्समुल्लर साहेबांचें संस्कृत साहित्य व वेदावरील व्याख्या पाहिल्यानें स्पष्ट होतें कीं, त्यानें आर्यावर्तांतील लोकांनीं केलेल्या साहित्य व वेदावरील टीका पाहून इकडचीं तिकडचीं कांहीं विधानें केलेलीं आहेत; पण त्याच्या ग्रन्थावरून त्याला वेदाचें स्वारस्य समजलें आहे, असें मुळींच ठरत नाहीं. '**युञ्जन्ति ब्रध्नमरुषं चरन्तं परितस्थुषः । रोचन्ते रोचना दिवि**' या मन्त्रामध्यें मॅक्समुल्लरानें 'ब्रध्न' शब्दाचा 'घोडा' असा अर्थ केला आहे ! त्यापेक्षां सायणाचार्यांनीं केलेला 'सूर्य' असा अर्थ बरा आहे हें खरें; पण वास्तविक तेथें 'परमेश्वर' असा अर्थ आहे. या विषयींचा खुलासा व त्याचा खरा अर्थ 'ऋग्वेदादि भाष्यभूमिका' नामक पुस्तकांत केलेला आहे तो तेथेंच वाचकांनीं पहावा, आणि जर्मन पंडित व मॅक्समुल्लरसाहेब यांचें संस्कृतभाषेंमधील प्राविण्य वाचकांनीं जाणावें ! तात्पर्य इतकेंच कीं, जी विद्या आजकाल इतर देशांत दिसत आहे तिचें मूळ आर्यावर्तांतूनच तिकडे गेलें.'वायबल इन् इंडिया' नामक पुस्तकाचा कर्ता मुळांत गोल्डस्टकर होते जेकालयट साहेब आपल्या पुस्तकांत लिहितो कीं 'आर्यावर्त देश हा सर्व विद्यांचें माहेरघर आहे. हे परमेश्वरा ! पूर्वीच्या कालीं आर्यावर्ताची उन्नति होती तशी सध्यांच्या कालीं आमच्या देशाची कर.' हें फ्रान्सदेशनिवासी एका पंडिताचें या देशाबद्दल मत आहे. 'दाराशिकोह' नामक बादशाहानें उपनिषदांचीं भाषान्तरें केलीं आहेत; त्या ग्रंथांत तो लिहितो कीं, 'अरबी वगैरे पुष्कळ भाषा मी शिकलों, पण मला फारसा आनंद झाला नाहीं; पण जेव्हां मी संस्कृत भाषा पाहिली व त्यांतील ग्रंथांचें श्रवण केलें तेव्हां माझा संदेह दूर होऊन मला जो आनंद झाला त्याचें वर्णन होणें शक्य नाहीं.' तसेंच काशीच्या मानमंदिरांतील 'शिशुमारचक्र' पाहिलें असतां अजूनहि खगोलविद्येचा पुष्कळसा वृत्तांत ध्यानीं येतो; जरी या यंत्राची नीट व्यवस्था सध्यांच्या कालांत कोणी ठेवलेली नाहीं, तथापि तें प्राचीन कौशल्य दाखवीत आहे ! सवाई जयपुराधीशानें अशा यंत्रादिकांचा नीट संभाळ केला, तर प्राचीन वैभव राखून ठेवल्यासारखें होईल; पण आमच्या राजे लोकांना आपलें वैभव राखण्याची बुद्धि केव्हां होईल ती होवो. अशा सर्वश्रेष्ठ भरतखंडाला जी अवनति महाभारतीय युद्धापासून लागली आहे ती अजूनहि सुटली नाहीं; व जेथें भावाभावांमध्यें घनघोर युद्धें होतात तेथें उन्नतीची आशा तरी कशाला पाहिजे ? (**विनाशकाले विपरीतबुद्धिः**) जेव्हां विनाश होण्याचा काल येतो तेव्हां बुद्धि विपरीत होते. कोणी विद्वान् त्यांना समजून सांगूं लागला तर त्यांना वाईट वाटतें व कोणी स्वार्थसाधु कपटानें वाईट उपदेश करूं लागला तर तो त्यांना प्रिय वाटतो !

महाभारतयुद्धामध्यें मोठमोठे विद्वान् पुरुष, राजे-महाराजे व ऋषि-महर्षि यांचा नाश झाला. त्यामुळें विद्या व वैदिक धर्म यांच्या जागृतीचें काम बंद पडलें, व अर्थातच अज्ञान माजलें. ईर्ष्या, द्वेष, अभिमान व दुही यांचें प्रस्थ वाढलें व त्यामुळें आपआपसांत कलह वाढत गेले जो बलवान् झाला त्यानें मिळेल तेवढें राज्य आपल्या ताब्यांत

घेण्याचा सपाटा चालविला; त्यामुळें आर्यावर्ताच्या अखंड राज्याचे लहान लहान तुकडे झाले. जेव्हां या देशांतील राज्यव्यवस्था अशी खंडित झाली तेव्हां इतर देशावरची याची सत्ता नाश पावली. ब्राह्मण लोक अविद्वान् होऊं लागले मग क्षत्रिय, वैश्य व शूद्र अविद्वान् होऊं लागले तर त्यांत नवल तें काय ? तसेंच वेदादिशास्त्रें अर्थासहित पठण करण्याची परम्परा बंद होऊन केवळ चरितार्थासाठीं ब्राह्मण लोक वेदांची घोकंपट्टी करूं लागले ! अशा रीतीनें वास्तविक गुरु असणाऱ्या ब्राह्मणांमध्यें अविद्या वाढल्यामुळें ते छल, कपट व अधर्म यांनीं युक्त झाले व आपले दोष लोकांना समजूं नयेत म्हणून त्यांनीं क्षत्रियादिकांना वेदादिशास्त्रांचा निव्वळ पाठहि शिकविण्याचें बंद केलें ! ब्राह्मणांनीं मनांत विचार केला कीं, आपल्या उपजीविकेचा कांहींतरी प्रबंध केला पाहिजे तर तो कसा करावा ? यावर विचार करून त्यांनीं असें ठरविलें कीं, लोकांमध्यें अज्ञान राहिल्याशिवाय आपला बडेजाव माजणार नाहीं; तेव्हां ते क्षत्रियादिकांना विद्याध्ययन न शिकवितां असा उपदेश करूं लागले कीं, 'आम्हीच तुमचे देव आहोंत व आमचीच तुम्हीं पूजा केली पाहिजे. जर आमची सेवा केली नाहींत तर स्वर्ग किंवा मुक्ति तुम्हांला मिळणार नाहीं; जर आमची सेवा न कराल तुम्ही नरकांत पडाल.' त्या क्षत्रियादिकांमध्येंहि विद्वत्ता नसल्यामुळें यांचा हा कपटी उपदेश ते प्रमाण मानूं लागले. पण परमपूज्य वेद व आर्ष ग्रंथ यामध्यें पूर्ण विद्वान् व धार्मिक यांस ब्राह्मण म्हटलें आहे व तेच सर्वांना पूजनीय आहेत. ती योग्यता मूर्ख, विषयलंपट, कपटी व अधार्मिक ब्राह्मणांना घरी बसल्या कशी प्राप्त होणार ? पण 'अज्ञान्यांचे गुरु अज्ञानी' या म्हणीप्रमाणें संस्कृतविद्याविरहित व अज्ञानग्रस्त क्षत्रियादिकांना या भिक्षुकांच्या गप्पा ठीक आहेत असें वाटलें व त्यामुळें नामधारी ब्राह्मणांचें फावलें; तेव्हां सर्वांना आपल्या भ्रमजालामध्यें फसवून वश करून घेण्यासाठीं 'ब्रह्मवाक्यं जनार्दनः' म्हणजे ब्राह्मणाच्या तोंडांतून जें वाक्य निघेल तें साक्षात् भगवानाचें वाक्य आहे असें समजावें अशा खोट्या तत्वांचा त्यांनीं प्रचार केला. जेव्हां अज्ञानी व श्रीमान् क्षत्रियादि लोक या कपटी उपदेशाच्या पाशांत सांपडले व त्यांचे चेले बनले तेव्हां भिक्षुकांना विषयानंदाचें उपवनच मिळाल्यासारखें झालें. पृथ्वीमध्यें जें कांहीं उत्तम आहे तें ब्राह्मणांसाठीं आहे असा डांगोरा त्यांनीं पिटविला व आपलें अज्ञान झांकण्यासाठीं गुण, कर्म व स्वभावानें समाजावयाची वर्णव्यवस्था मोडून, जन्मानेंच ब्राह्मणादि वर्ण समजावे अशी अव्यवस्था माजवली व अंत्येष्टि संस्कारामध्येंहि दानें उपटण्यास सुरवात केली ! जसें यांच्या मनाला वाटलें, तसा उपदेश हे करूं लागले. 'आम्ही भूदेव आहों; आमची सेवा केल्याशिवाय कोणालाहि कोणाताच देवलोक मिळणार नाहीं' असें म्हणणाऱ्या भिक्षुक ब्राह्मणांना असें विचारलें पाहिजे कीं, तुम्ही स्वतः कोणत्या लोकांत जाणार ! तुमचीं कामें पाहिलीं तर तीं घोर नरकांत तुम्हांला नेऊन पोंचविणारीं आहेत. तुम्ही कृमिकीटकपतंगादिक बनाल; असें जर कोणी त्यांना म्हटले तर ते रागानें लाल होऊन म्हणतात कीं, आम्ही शाप दिला तर तुमचा नाश होऊन जाईल; कारण धर्मशास्त्रांत म्हटलेलें आहे कीं, जो ब्रह्मद्रोह करतो त्याचा नाश होतो. [ब्रह्मद्रोही विनश्यति] पण त्यांनीं आतां लक्षांत ठेवावें कीं अशा कोरड्या गर्जनेनें कोणाचहि नाश होणार नाहीं. हें खरे आहे कीं वेद व परमात्मा यांना जाणणारा, धार्मिक व परोपकारी असा जो पुरुष असेल त्याच्याशीं जर कोणी द्वेष केला तर त्याचा जरूर नाश होईल; पण जो विद्वान् नाहीं व ज्याच्यांत ब्राह्मणत्व नाहीं अशाला कोणीहि ब्राह्मण म्हणूं नये व त्याची सेवाहि कोणी करूं नये.

**(प्रश्न)** मग हे जे सध्यां ब्राह्मण म्हणवतात ते कोण ? **(उत्तर)** ते ब्राह्मण नव्हेत; ते भिक्षुक आहेत; जसे युरोपांत पोप तसे हे येथें अधर्म माजविणारे स्वार्थी लोक होत. **(प्रश्न)** पोप हे कोण आहेत ? **(उत्तर)** वास्तविक 'पोप' शब्दाचा मूळचा रोमभाषेंतील अर्थ 'उत्तम पिता' असा आहे; पण पुढें या पोपांच्या गादीवर नास्तिक, क्रूर, कपटी व स्वार्थी लोक येऊं लागल्यापासून पोप हा शब्द निंदाव्यंजक झाला आहे; सध्यांच्या ब्राह्मणांचीहि तशीच स्थिति झाली आहे. पूर्वीचे ब्राह्मण खरे होते व आतां हे नामधारी झाले आहेत. **(प्रश्न)** सध्यांचे ब्राह्मण नामधारी कसे ? यांचा पिता ब्राह्मण व माताहि ब्राह्मणी असें असतां त्यांच्या संतानांला नामधारी ब्राह्मण असें तुम्ही कसें म्हणतां ? **(उत्तर)** तुम्ही म्हणतां तें खरें; पण आईबाप ब्राह्मण असले किंवा गुरु चांगला साधु असला म्हणून त्यांचीं मुलें किंवा शिष्य उत्तम ब्राह्मण किंवा उत्तम साधु असतात, असा कांहीं नियम नाहीं. ब्राह्मण किंवा साधु आपआपल्या अंगच्या गुणकर्मस्वभावाप्रमाणें

होत असतात; जर अंगीं ब्राह्मणाचे गुण नाहींत तर ब्राह्मण्य तरी आहे असें कसें म्हणतां येईल ?ब्राह्मण परोपकारी असले पाहिजेत; पण हे सध्यांचे नामधारी ब्राह्मण स्वार्थी व म्हणूनच दान घेण्यांत पटाईत आहेत; युरोपांतल्या पोपांप्रमाणें यांचीं सध्यांचीं स्थिति आहे. युरोपांतील पोप व त्यांचे चेले तेथील श्रीमंत लोकांस असें सांगत असत कीं, 'हे श्रीमान् लोक हो! तुम्ही पाहिजे तें करा; कांहीं हरकत नाहीं. फक्त आमच्याकडे येऊन पापाचें क्षालन करून घ्या म्हणजे झालें ! आमच्या आज्ञेशिवाय तुमचें पाप नाश पावणार नाहीं व तुम्हांला स्वर्गामध्यें थारा मिळणार नाहीं; जर तुम्ही स्वर्गात जाण्याची इच्छा धरीत असाल, तर आम्हांला द्याल तितकें तुमच्या पापाचें क्षालन करून तुम्हांला स्वर्गात सुख मिळेल अशी व्यवस्था करूं. या उपदेशाप्रमाणें शेंकडों दुराचारी श्रीमान् लोक पोपाकडे येत, लाखों रुपये देत, व पोपाकडून पापक्षालनाची चिठ्ठी घेत असत ! पोपाच्या पदरांत पैसे पडतांच पोप येशू व मेरी यांच्या मूर्तीकडे जाऊन उभा राही व तेथें पुढें लिहिल्याप्रमाणें हुंडी लिहून देत असे; 'हें खुदावंद ! ईसामसीह ! अमुक मनुष्यानें तुझ्या नांवावर एक लाख रुपये स्वर्गात जाऊन सुखानें राहण्यासाठीं दिलेले आहेत, ते आम्ही जमा केले आहेत; जेव्हां हा गृहस्थ स्वर्गात येईल तेव्हां तूं तुझ्या बापाच्या स्वर्गातील राज्यामध्यें पंचवीस हजारांचा बागबगीचा व घर, पंचवीस हजारांमध्यें नोकर चाकर व स्वारी यांची व्यवस्था, पंचवीस हजारांमध्यें खाण्यापिण्याची व कपडालत्त्यांची व्यवस्था व बाकी राहिलेल्या पंचवीस हजारांत यांचे कोणी भाऊबंद येतील त्यांची व्यवस्था करण्याकडे खर्च करावे; व यांचा उत्तम बडेजाव तूं तेथें ठेवावास.' याप्रमाणें खिस्ताला हुंडी लिहिल्यावर खालीं पोप आपली सही करीत असे. ही हुंडी त्या दुराचारी श्रीमंताला देऊन सांगत असत कीं, 'हे गृहस्था ! ही हुंडी जपून ठेव व ती आपल्या कबरेमध्यें तुझ्या प्रेताबरोबर पुरण्याची व्यवस्था कर. जेव्हां तुला नेण्यासाठीं देवदूत येतील तेव्हां तुला व या हुंडीला ते स्वर्गात घेऊन जातील व तेथें ही हुंडी वटवून आंत लिहिल्या-प्रमाणें सर्व पदार्थ तुला देण्याची व्यवस्था ते करतील !' अशा रीतीनें पोप व त्यांचे शिष्य स्वर्ग प्राप्त करून देण्याचा मक्ता घेत असत! या प्रकारामुळें युरोपमध्यें किती अनाचार माजून राहिले होते तें इतिहासज्ञ लोकांना निराळें सांगणें नको; जेव्हां युरोपखंडभर अज्ञान माजलेलें होतें तेव्हां या पोपांचें बंड फार माजलें होतें, पण जेव्हां तेथें विद्येचा प्रसार झाला व विचारांची जागृती झाली तेव्हां या पोपांना त्यांनीं धाब्यावर बसविलें पण अजूनहि पोपाची सत्ता निर्मूल झालेली नाहीं, याचें कारण इतकेंच कीं खऱ्या धर्माचें ज्ञान अजून त्यांना झालेलें नाहीं.

आर्यावर्तांतहि हीच पोपलीला अन्य रीतीनें प्रचारांत आलेली आहे व सध्यांहि ती बरीच चाललेली आहे. त्यांना थोडीशी दक्षणा दिली असतां येथील ब्राह्मण प्रायश्चित देऊन शुद्ध करण्याचा आव घालतात! पण हें त्यांचें गौडबंगाल किती दिवस चालणार ? ब्राह्मणांला चार आणे दिल्यानें जर केलेलीं दुराचरणें नाश पावूं लागतील तर या पृथ्वीवर सर्व आनंदीआनंद पसरून, रोगराई नाहींशी होऊन सर्व लोक मुक्त होतील ! पण असें होत आहे काय ? होत नाहीं हें खास. तें कां होत नाहीं अशी शंका कोणी घेतील तर त्याला उत्तर असें कीं, प्रायश्चित्तचा हा मार्गच नव्हे व केलेलें कर्म भोगल्याशिवाय केव्हांहि नाश पावणार नाहीं. राजा व प्रजा यामध्यें जोंपर्यंत अज्ञान भरलेलें आहे, सत्संग जोंपर्यंत होत नाहीं, स्वार्थी व भोंदू लोकांचा आपमतलबी उपदेश जोंपर्यंत चालू आहे, तोंपर्यंत या नामधारी ब्राह्मणांचे हें सर्व थोतांड चालेल. यांच्यांमध्यें सर्वच असे कपटी आहेत असें नाहीं; जे उत्तम निष्कपटी व धार्मिक आहेत त्यांना आम्ही खरे ब्राह्मण असें समजतों व जे साधू असें आहेत त्यांना साधू असें समजतों. पण जे भोंदू आहेत ते जरी ब्राह्मणाच्या कुळां-मध्यें उत्पन्न झालेले असले तरी ते ब्राह्मण नव्हेत असें धर्माच्या साक्षीनें आम्ही साफ म्हणतों; हेच हिंदुस्थानांतील पोप होत व यांचीं दुराचरणें त्याच पोपलीला होत. वेदादि सत्य शास्त्रांचें स्वतः अध्ययन करून व त्या विद्यांचा लोकांमध्यें प्रचार करून जैन, मुसलमान व ख्रिस्ति इत्यादि नास्तिक मतवाल्यांच्यां जाळ्यांतून आर्यांचा बचाव करणें, गुणकर्मानें ठरणाऱ्या वर्णाश्रमधर्माची उन्नति करून आर्यांची उन्नति करण्यास सदैव झटणें हें काम धर्मज्ञ ब्राह्मणाशिवाय व निरपेक्ष साधूशिवाय दुसरा कोण करणार बरें ? दानांसाठीं लुब्ध झालेल्यांकडून हें काम होईल काय ? कधींहि होणार नाहीं. आतां ही गोष्ट खरीं कीं, यांच्या या स्वार्थी पोपलीलेपासूनहि थोडें थोडें धर्माचें रक्षण झालेलें आहे; पण तें (विषादप्यमृतं ग्राह्यम्) 'विषामधूनहि अमृत ग्रहण करावें' या तत्त्वाप्रमाणें होय. शिवाय तें धर्मरक्षण यांनीं केलेलें नसून

यांच्या स्वार्थाच्या प्रवृत्तीनें आपो आप झालेलें आहे; त्यावद्दल यांना मुळींच मोठेपणा देतां येत नाहीं. तसेंच मधून मधून जे धार्मिक पुरुष व संत झाले त्यांच्या परिश्रमानें सध्यां धर्माचें अस्तित्व राहिलें आहे; जर सगळेच यांच्या सारखे पोप बनले असते, तर धर्माचें नांवहि राहिलें नसतें. राजे, यजमान व इतर लोक हे सर्व अविद्वान् झाल्यानंतर कांहीं मंत्रांची घोकंपट्टी करणारे ब्राह्मण दुढ्ढाचार्य बनले; व त्यांनीं **ब्राह्मणो न हन्तव्यः। साधुर्न हन्तव्यः**' हीं वाक्यें पुढें करून नामधारी ब्राह्मण व वेषधारी भोंदू यांनीं कोणतींहि पातकें केलीं तरी ते अवध्य आहेत असें भासविलें तर त्यांत नवल काय ? या स्वार्थसाधु लोकांनीं पाहिजे तसले ग्रंथ लिहून शेवटीं व्यासाचें नांव किंवा दुसऱ्या कोण्यातरी ऋषि-मुनीचें नांव घालून आपल्या मतलबाचा प्रचार केलेला आहे; व मोठ्या कुशलतेनें अशी व्यवस्था केलेली आहे कीं निजणें, उठणें, बसणें, खाणें-पिणें हीं कर्मेंसुद्धां या पोपांच्या संबंधाशिवाय होऊं नयेत ! काय हे धर्माच्या नांवाखालीं थोतांड !!! ब्राह्मणाला मारूं नये, दंड करूं नये, साधूला मारूं नये ही वाक्यें सदाचारी व धार्मिक ब्राह्मणासाठीं आहेत; दुराचारी, आपलपोट्या व नामधारी ब्राह्मण भिक्षुकांसाठीं नाहींत. असे जे जे लोक दुराचरण करतील त्यांना कडक शासन केलें पाहिजे या बिघडलेल्या स्थितीचा मूळाचा प्रचार भारतीय युद्धाच्यापूर्वी सरासरी एक हजार वर्षांपासून चालू झाला होता; त्यावेळीं कोठें कोठें ऋषिमुनींचें जरी वास्तव्य होतें तरी थोडाथोडा आळस, प्रमाद, ईर्ष्या, द्वेष यांचे अंकुर त्यावेळीं फुटूं लागले होते; परंतु सदुपदेश कमी होत गेला तसें त्या अंकुराचे मोठाले वृक्ष बनूं लागले व जेव्हां सदुपदेशपरंपरा अजिबात लोपली, तेव्हां या आर्यावर्तांत अविद्या अंधकाराचा फैलाव होऊन आपसांत भांडणझगडे होऊं लागले.

**उपदेश्योपदेष्ट्रृत्वात् तत्सिद्धिः। इतरथान्धपरम्परा ॥** सांख्य ३ । ७० व ७१ ॥

**(अर्थ)** 'जेव्हां लोक उत्तम उपदेश करणारे होतात, तेव्हां ते धर्म, अर्थ, काम व मोक्ष साधण्यास योग्य होतात; पण जेव्हां तसे उपदेशक नसतात तेव्हां अन्धपरंपरा चालू होते.' पुनः जेव्हां सत्पुरुष उत्पन्न होऊन सद्वर्तनाचा उपदेश करतात तेव्हां अंधपरंपरेचा नाश होऊन ज्ञानाची वृद्धि व कर्तव्यजागृति होते. जेव्हां या मूर्ख लोकांच्या पापजनक उपदेशाच्या जाळयांत लोक सांपडतात, तेव्हां ते धूर्त लोक सांगतात कीं, 'आमची पूजा करा, आम्हांला दक्षिणा द्या व आमच्या चरणाचें पाणी प्या !' विचारे धर्मभोळे लोक या दुराचारी भिक्षुकांच्या कुत्सित उपदेशाला बळी पडून ते जें कांहीं सांगतील तें तें करीत असतात, व अविद्वान् व अज्ञानी गुरुंचे चेले बनल्यामुळें दिवसानुदिवस अवनतीला जात असतात. त्यांच्यांतील विद्या, बळ बुद्धि, पराक्रम, शौर्य, वीर्य इत्यादि शुभ गुण नाश पावतात व ते विषयासक्त, आळशी व परस्वापहारक बनून दररोज जास्त हीन अवस्थेला जात असतात. या ब्राह्मणांच्या अज्ञानामुळें या आर्यावर्ताची अवनति झाली व त्यांतूनच एक वाममार्ग सुरूं झाला ; याकरिता **जेव्हां ब्राह्मण पूर्ण विद्वान्, धार्मिक व कर्तव्यदक्ष बनून इतर वर्णांना आपआपलीं कर्तव्यें करण्यास प्रोत्साहन देतील तेव्हां या देशाची सर्व बेशांत थोरवी होईल यांत शंका नाहीं.**

पूर्वीच्या विभागांत सांगितल्याप्रमाणें ब्राह्मण अज्ञानी झाले, तेव्हां सर्वत्र अनेक प्रकारें दुराचरणें माजलीं; जो तो आपलें मत प्रस्थापित करूं लागला; पण यांत गम्मत ही कीं, आपण लिहिलेलें कोणी मानणार नाहीं असें समजून दुसऱ्यांच्या नांवावर आपले लेख प्रचलित करण्याचा ढोंगी लोकांनीं सपाटा चालविला. ' शिव उवाच । पार्वत्युवाच **भैरव उवाच**' अशा तऱ्हेनें प्रारंभ करून मग पुढें आपल्या मजाला वाटेल ले लिहावें असा त्यांचा क्रम असे. **'शाक्तमत'** हें त्यापैकींच एक आहे; त्याचें थोडेसें दिग्दर्शन येथें करावयाचें आहे.

**मद्यं मांसं च मीनं च मुद्रा मैथुनमेव च । एते पञ्चमकराः स्युर्मोक्षदा हि युगे युगे ॥** कालीतन्त्रादिक.
**प्रवृत्ते भैरवीचक्रे सर्वे वर्णा द्विजातयः । निवृत्ते भैरवीचक्रे सर्वे वर्णाः पृथक् पृथक् ॥** कुलार्णवतन्त्र.
**पीत्वा पीत्वा पुनः पीत्वा यावत्पतति भूतले । पुनरुत्थाय वै पीत्वा पुनर्जन्म न विद्यते ॥** महानिर्वाणतन्त्र.
**मातृयोनिं परित्यज्य विहरेत्सर्वयोनिषु । वेदशास्त्रपुराणानि सामान्यगणिका इव ॥**
**एकैव शाम्भवी मुद्रा गुप्ता कुलवधूरिव ॥** ज्ञानसंकलनीतन्त्र.

वाचक हो! पहा आतां या धर्मद्वेष्ट्या व वेदविरुद्ध अधर्मप्रवर्तक लोकांची लीला ! सर्व दुराचरणांना या वाममार्गी लोकांनीं उत्तम मानलें आहे ! 'मद्य, मांस, मीन, मुद्रा व मैथुन हे पांच प्रकार सर्व युगांत मोक्ष देणारे असतात' हा यांचा पहिला सिद्धांत ! दारू पिणें, मांस व मासे भक्षण करणें, योनिपात्राकार भोंकाचे वडे वगैरे मुद्रा व अप्रतिबद्ध मैथुन करणें, म्हणजे सर्व पुरुष हे शिव आहेत व सर्व स्त्रिया ह्या पार्वति आहेत असें समजून, '**अहं भैरवस्त्वं भैरवी ह्यावयोरस्तु संगमः**' या मनःकल्पित सूत्रानें पाहिजे त्या पुरुषाचा व पाहिजे त्या स्त्रीचा वाटेल तेव्हां समागम होऊं देणें हीं कृत्यें सदोष नाहींत असें कोणीहि म्हणणार नाहीं; पण या वाममार्गी शाक्त लोकांनीं हींच निर्दोष मानलीं आहेत ! धर्मशास्त्रकारांनीं नीच स्त्रियांना, परस्त्रियांना व रजस्वलांना शिवणें पाप आहे असें मानलें आहे. पण या शाक्तांनीं तसें करणें अत्यंत पुण्यकारक गणलें आहे !

**रजस्वला पुष्करं तीर्थं, चाण्डाली तु स्वयं काशी, चर्मकारी प्रयागः, स्याद्रजकी मथुरा मता । अयोध्या पुक्कसी प्रोक्ता०** ॥ रुद्रयामलतन्त्र ॥

(अर्थ) 'रजस्वलेशीं समागम करणें हें पुष्करतीर्थांत स्नान, चांडालीशीं समागम केल्यानें काशीयात्रेचें पुण्य, चांभारणीशीं संग करण्यानें प्रयागस्नान, धोबोणीशीं संग केल्यानें मथुरा यात्रा व कंजरीशीं समागम केल्यानें अयोध्येच्या तीर्थांत स्नान केल्याचें पुण्य मिळतें' अशीं हीं या शाक्तांचीं तन्त्रें म्हणत आहेत !! हाय हाय ! काय हा धर्मच्छल ! हे ग्रन्थ लिहितेवेळीं यांनीं धर्मशास्त्राला बाजूला ठेवलें तें ठेवलें; पण वैद्यशास्त्राचा तरी विचार करावयास पाहिजे होता म्हणजे रजस्वलेशीं संग केल्यानें कसे भयंकर रोग होतात हें त्यांना समजलें असतें. आपली परिभाषा दुसऱ्यांना समजूं नये म्हणून यांनीं आपले संकेत निराळेच बनविले आहेत. मद्याला 'तीर्थ,' मांसाला 'शुद्धि' किंवा 'पुष्प,' मत्स्याला 'तृतीया' 'जलतुम्बिका,' मुद्रेला 'चतुर्थी,' व मैथुनाला 'पञ्चमी, अशा सांकेतिक खुणा केलेल्या आहेत. हीं नांवें उच्चारून ते आपलीं कार्यें साधतात व दुसऱ्याला पत्ता लागूं देत नाहींत. शाक्तमतामध्यें येणाऱ्याला कौल, आर्द्र वीर, शाम्भव, गण अशीं नांवें देतात व जे त्यांचें हें अधार्मिक व अवैदिक मत स्वीकारीत नाहींत त्यांना ते कंटक, विमुख शुष्कपशु असें म्हणत असतात! यांचें म्हणणें आहे कीं, 'जेव्हां भैरवीचक्र सुरू होतें तेव्हां ब्राह्मणापासून तों चांडालापर्यंत सर्व लोक द्विज होतात व जेव्हां भैरवीचक्र बंद होतें तेव्हां सर्व वर्ण पृथक् पृथक् वर्णानें युक्त होतात !' वाममार्गी शाक्तलोक जमिनीवर किंवा कपड्यावर बिंदु, त्रिकोण, चतुष्कोण, किंवा वर्तुळ अशा आकृत्या काढून त्यावर दारूनें भरलेली घागर ठेवून तिची पूजा करतात व (ब्रह्मशापं विमोचय) 'हे मद्या ! तूं ब्रह्मादिकांच्या शापापासून रहित हो.' हा मंत्र म्हणतात. याचें नांव भैरवीचक्र ! ही सर्व मंडळी एका गुप्त ठिकाणीं जमते व हे भैरवीचक्र सुरू करते. वाममार्ग्यांशिवाय दुसऱ्या कोणला तेथें घेत नाहींत; तेथें त्यांच्या सर्व स्त्रिया व पुरुष जमतात. त्या जागाचे दोन भाग करून एका जागेंत स्त्रिया बसतात. व दुसऱ्या जागीं पुरुष बसतात. पुरुषांपैकीं एका पुरुषाला नागवा करून आपल्यामध्यें आणून, त्याला मध्यें बसवितात व त्यांची सर्व पूजा करतात !! नंतर एका पात्रांत दारू, मांस, व वडे ठेवलेले असतात; तें पात्र हातांत घेऊन त्यांच्यांतील मोठा आचार्य मोठ्यानें म्हणतो कीं (शिवोऽहम् भैरवोऽहम्) 'मी शिव आहे, मी भैरव आहे.' अशी गर्जना केल्यानंतर त्या उच्छिष्ट पात्रानेंच इतर लोक मद्यमांसाचें सेवन करतात. अशा रीतीनें मद्यमांसाचें यथेच्छ सेवन झाल्यावर त्याच्या नशेमध्यें एका स्त्रीला नागवी करून व एका पुरुषाला नागवा करून पुरुषाच्या हातांत तलवार देतात व त्या जोडप्याला महादेवपार्वतीचें जोडपें असें समजात ! व त्यांच्या गुप्त इंद्रियांची सर्व मिळून पूजा करतात !! नंतर त्यांना मद्यमांस पाजून त्यांच्या उच्छिष्ट पात्रानें आपण पितात व अधिकच झिंगतात. अशा रीतीनें पुनः पुनः दारू पिऊन नंतर जमलेल्या स्त्रीपुरुषांमध्यें यथेच्छ कुकर्में सुरू होतात, त्यांची कल्पनाहि करणें वाईट आहे. कन्या, बहीण, माता हा भाव नाहींसा होऊन स्त्री व पुरुष एवढाच भाव ते धरतात असें म्हटलें असतां त्यांच्या अत्याचाराचें अत्युग्र चित्र वाचकांच्या डोळ्यांपुढें येईल. असें होतां होतां केव्हां केव्हां मद्यसेवन जास्त झालें तर लाथाबुक्या व मारामाऱ्याहि होत असतात व जखमी झालेल्यांना दुसऱ्या दिवशीं घरीं उचलून आणावें लागतें.

जो त्यांत नवखा असतो त्याला त्या मद्यमांसाच्या सेवनानें ओकारी होते पण त्यांत जे थोर मानलेले असतात ते तें वमन तेथल्या तेथें खाऊन टाकतात; अशा वमनभक्षकांना 'सिद्ध' असें ते समजतात. त्यांच्यांत दीक्षित व सिद्ध होण्याला खालील गुण लागत असतात:—

**हालां पिबति दीक्षितस्य मन्दिरे सुप्तो निशायां गणिकागृहेषु । विराजते कौलवचक्रवर्ती ॥**

**(अर्थ)** 'कलालाच्या घरीं जाऊन बाटल्यांवर बाटल्या पिऊन व रंडीच्या घरीं जाऊन जो अत्यंत कुकर्में करतो व ही कर्मे करण्यामध्यें मुळींच लज्जित किंवा साशंक होत नाहीं, तो त्यांच्यामध्यें मुख्य चक्रवर्ती राजाप्रमाणें पूज्य व सिद्ध मानला जातो.' त्याच्या मताप्रमाणें सदाचारी लोक हे लहान व दुराचारी लोक फार मोठ्या योग्यतेचे होत. पहा-

**पाशबद्धो भवेज्जीव: पाशमुक्त: सदाशिव: ॥ ज्ञानसंकलनीतन्त्र ।.४३॥**

त्यांच्या तन्त्रामध्यें बद्ध व मुक्त त्यांची अशी व्याख्या केली आहे कीं, 'लोकलज्जा, शास्त्रलज्जा, कुललज्जा, देशलज्जा इत्यादि पाशांनीं जो बद्ध असेल तो जीव व जेव्हां तो निर्लज्ज होऊन दुराचार चीं कर्में करूं लागतो तेव्हां तोच सदाशिव बनतो.' उड्डीसतन्त्रामध्यें असा एक प्रयोग लिहिला आहे कीं, एक घर असावें व त्यांत चारहि बाजूंला खोल्या असाव्या व सर्व खोल्यांत दारूच्या बाटल्या भरलेल्या असाव्या. ज्याला पुनर्जन्मांतून मुक्त व्हावयाचें असेल त्यानें एका खोलींत जाऊन एक बाटली प्यावी, तेथून दुसऱ्या खोलींत जावें व तेथें बाटली प्यावी, तेथून तिसरींत जाऊन तेथें प्यावी व या प्रमाणें पुन: पुन: करावें. उभें राहतां येईनासें होईपर्यंत दारू पीत असावें. जमिनीवर पडल्यानंतर पुन: उठून दारू प्यावी व या प्रमाणें करीत असावें म्हणजे पुनर्जन्माची यातायात भोगावी लागत नाहीं !! वास्तविक मन्वादि शास्त्रांप्रमाणें पाहिलें तर त्यांना पुन: मनुष्य जन्म मिळणार नाहींच, पण नीच योनीमध्यें त्यांचा जन्म होऊन तेथेंच त्यांना हजारों वर्षेंपर्यंत यातना भोगीत राहणें भाग पडेल. वाममार्गियांमध्यें ही एक वाईट चाल आहे कीं,ते मुलगी किंवा बहीण याचा विचार न करतां केवळ स्त्री अशीच भावना करून सर्वांशीं स्त्रीप्रमाणें व्यवहार करतात; त्यांतल्या त्यांत मातेशीं तसा व्यवहार करीत नाहींत हें चांगलें. या वाममार्गी लोकामध्यें दहा महाविद्या प्रसिद्ध आहेत; त्यापैकीं मातंगी विद्यानुयायी जे लोक असतात ते (मातरमपि न त्यजेत्) 'आईशींहि समागम करणें सोडूं नये' असें मानतात ! हाय हाय ! धिक्कार असो या पंथाला ! हे लोक अशा प्रकारें समागमाच्या वेळीं सिद्धि प्राप्त होण्यासाठीं विशिष्ट मंत्र जपत असतात. हे लोक किती मूर्ख व विवेकशून्य असले पाहिजेत ! जे मनुष्य असत्य बोलतात ते अवश्य सत्याची निंदा करीत असतात; या सामान्य नियमाला अनुसरून हे लोक असेंहि म्हणत असतात कीं, 'वेद, शास्त्रें व पुराणें सामान्य वेश्यांप्रमाणें आहेत व या शाम्भवी वाममार्गाची मुद्रा मात्र कुलवधू स्त्रीप्रमाणें आहे.' या वाममार्गी लोकांनीं कांहीं कालापूर्वीं वेदमताचा पाडाव करून आपल्या शाक्तमताचा बराच प्रसार केलेला होता, पण कालांतरानें या मताचा आपोआपच नाश झाला, तथापि निरनिराळ्या रूपानें हें मत आर्यावर्तांत चहूंकडे अजूनहि आहेच. यांनीं धूर्तता करून वैदिकधर्माच्या नांवाखालींहि आपलें मत दडपण्याचा क्रम चालविला होता. त्याचाच अवशेष यज्ञांमधील पशुवध, देवळांमधील बकऱ्यांच्या व रेड्यांच्या हत्या व कालीच्या देवळांत चालणारा पशुवध वगैरे गोष्टी आहेत; या गोष्टी आपल्याच धर्मांतील आहेत असें सध्यां कित्येकांस वाटत आहे हें हि त्यांतल्या त्यांत अत्यंत आश्चर्य ! या शाक्तांनीं वेदावर आपल्या मताप्रमाणें टीका केल्या आहेत; स्मृतींमध्यें, पुराणांमध्यें व ब्राह्मणादिग्रंथांत घुसडाघुसडी केली आहे व आपलें मत वैदिकमतामध्यें मिळवून दिलेलें आहे. हे विचारपूर्वक पाहिलें असतां तेव्हांच समजतें; पण साधारण वरवर पाहणारांस कळत नाहीं. पहा—

**सौत्रामण्यां सुरां पिबेत् । प्रोक्षितं भक्षयेन्मांसम् । वैदिकी हिंसा हिंसा न भवति ॥ न मांसभक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने । प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु महाफला ॥ मनु० ५।५६. ॥**

'सौत्रामणी यज्ञ करून दारू प्यावी,' असें हे शाक्त म्हणतात, पण वास्तविक सौत्रामणि यज्ञामध्यें सोमरसाचें पान करावयाचें असतें. सोमरस व दारू हे दोन अगदीं भिन्न पदार्थ आहेत, पण हें या पापी लोकांना समजावें कसें ? 'प्रोक्षितमांसाचें भक्षण करावें' हें यांचें दुसरें विधान आहे. अशा नीचपणाच्या गोष्टी या शाक्तांनीं आपल्या वैदिक

धर्मग्रंथांत घुसडून दिल्या आहेत. यांना असें विचारलें पाहिजे कीं, यज्ञामध्यें केलेली हिंसा जर हिंसा होत नाहीं तर शाक्तांना व त्यांच्या कुटुंबांना मारून होमामध्यें कां जाळून टाकूं नये ? 'मांस भक्षण करणें, मद्य प्राशन करणें, परस्त्री-गमन करणें यांत मुळींच दोष नाहीं,' असें हे शाक्त म्हणतात. जर या तीन कृत्यांना दोष नाहीं तर मग दोष तरी कशांत आहे ? प्राण्यांना मारल्याशिवाय किंवा पीडा दिल्याशिवाय मांस मिळत नाहीं, व दुसऱ्याला पीडा देणें हा अधर्म आहे. तेव्हां मांस भक्षण करण्यांत दोष नाहीं असें कसें म्हणतां येईल ? वाममार्गी लोकांच्या ग्रंथांशिवाय मद्यपान करावें असें कोणीहि म्हणत नाहींत; इतकेंच नव्हे तर सर्व एकमतानें मद्यपानाचा निषेध करीत आहेत; तेव्हां मद्यपान हेंहि अधर्मजनकच आहे यांत शंका नाहीं. स्वस्त्रीवांचून परस्त्रीला स्पर्शहि करूं नये असें सर्व वैदिक धर्मग्रंथ म्हणत आहेत. असें असतांहि या धूर्त शाक्तानीं वर लिहिल्याप्रमाणें मनःकल्पित श्लोक बनवून मनुस्मृत्यादि ग्रंथांत घुसडून दिले आहेत, व गोमेध आणि अश्वमेध करून गाय व अश्व यांचें हनन करावें व त्यांचें मांस भक्षण करावें असें बेलाशक ऋषिमुनींच्या ग्रंथांमध्यें घालून, आपले दुर्विचार सत्य वैदिकधर्मांतील आचारांत मिसळून दिले आहेत. यज्ञामध्यें पशूला मारून होम करण्यानें यजमान व पशु हे दोघेंहि स्वर्गाला जातात असें यांनीं जें ठिकठिकाणीं लिहिलें आहे तें निव्वळ अज्ञानमूलक आहे: वैदिक ब्राह्मणादि ग्रंन्थांमध्यें अश्वमेध, गोमेध नरमेध वगैरे जे शब्द येतात त्यांचा खरा अर्थ त्यांना न समजल्यामुळें त्यांनीं तसें लिहिले असेल. या ठिकाणीं अश्वमेध, गोमेध, नरमेध वगैरे शब्दांचें वैदिक अर्थ काय तें पाहिलें पाहिजे.

**राष्ट्रं वा अश्वमेधः । शत० १३।१।६।३. अन्नं हि गौः ।शत०४।३।१।२५. अग्निर्वा अश्वः । आज्यं मेधः ।। शत०।।**

वैदिक धर्मग्रन्थांमध्यें घोडा, गाय, मनुष्य वगैरेंना ठार मारून त्यांचा होम करावा असें लिहिलें नाहीं; हे सर्व वाममार्गी लोकांच्या ग्रथांमध्यें लिहिलेलें आहे; पण धूर्त वाममार्गी लोकांनीं आपल्या मतांची घुसडाघुसड मात्र त्या ग्रन्थांमध्यें बऱ्याच ठिकाणीं केलेली आहे. वास्तविक वैदिकप्रणालीप्रमाणें पाहतां राजानें यथान्याय प्रजांचें पालन करणें, विद्यादानादि करणाऱ्या यजमानानें अग्नीमध्यें घृतादि पदार्थांचें हवन करणें हा अश्वमेध; अन्न, इंद्रियें, किरण व भूमि यांना शुद्ध राखणें हा गोमेध; मनुष्य मेल्यानंतर त्याच्या शरीराचें विधिपूर्वक दहन करणें हा नरमेध; असें असतांहि शाक्तांनीं वैदिक ग्रंथांमध्यें मांसाच्या हवनाचीं वाक्यें घुसडून दिलीं व पुढील लोकांनीं तीं खरीं मानलीं !! **(प्रश्न)** यज्ञ करणारे असें म्हणतात कीं, यज्ञ करण्यानें यजमान व पशु स्वर्गाला जातात. यज्ञ झाल्यानंतर यज्ञिय ऋत्विज पशूला जीवंत करीत असत. हें सर्व खरें कीं काय ? **(उत्तर)** नाहीं. हें खरें नाहीं. ते स्वर्गाला जातात असें जे म्हणत असतील, त्यांनाच मारून व त्यांचा होम करून, त्यांना स्वर्गाला पोंचवावें हें उत्तम; किंवा आपल्या प्रिय माता, पिता, स्त्री, पुत्रादिकांना मारून त्यांचा होम करून त्यांना ते स्वर्गाला कां बरें पोंचवीत नाहित ? **(प्रश्न)** जेव्हां यज्ञ करतात तेव्हां वेदमन्त्र म्हणून ते तें कार्य करतात; वेदमन्त्रांत नसेल तें यज्ञांत कसें करतील ? **(उत्तर)** मन्त्र हा एक शब्दसमूह आहे. तो कोणाला केव्हांहि उच्चार करण्याला अडथळा करूं शकत नाहीं; पण त्याचा अर्थ असा नाहीं कीं त्याच्या योगानें पशूला मारून हवन करणें वेदविहित आहे असें सिद्ध होईल. **'अग्नये स्वाहा'** इत्यादि मंत्रांचा अर्थ अग्नीमध्यें घृतादि पूर्वोक्त उत्तम हविर्द्रव्यांचें हवन केल्यानें वायु, वृष्टि, जल यांची शुद्धि होऊन जगताला सुख होतें, इत्यादि प्रकारचा आहे. पण हे सत्य अर्थ त्या मूढ वाममार्गी लोकांना समजत नाहीं. समजतील तरी कसे ? जे स्वार्थी असतात त्यांना अपमतलबाशिवाय दुसरें कांहीं दिसत नसतें व दिसलें तरी ते मानीत नाहींत.

जेव्हां शाक्तांच्या मताचा प्रचार झाला तेव्हां वैदिक धर्माच्या उज्वल ज्योतीचा प्रकाश संपून चोंहोकडे अज्ञानान्धकार, स्वार्थ व विषयलोलुपता माजली. त्या अंधपरंपरेंत शाक्तांनीं वैदिक धर्मग्रन्थांमध्यें घुसडाघुसडी केली. तींच शुद्ध वैदिक मतें आहेत असें पुढील लोक मानूं लागले व राजरोस हिंसामय कृत्यें धर्माच्या नांवाखालीं होऊं लागलीं. चोंहोंकडे अनाचार माजला; मेल्यानंतर श्राद्धतर्पणादिकांचा अंधप्रकार सुरू झाला व लोक त्यामध्यें राजरोस मांसाहार करूं लागले. तेव्हां स्वाभाविकपणेंच कांहीं स्वतन्त्र विचारांच्या माणसांना वाटलें कीं, जर खरोखरच हिंसा व अनाचार वैदिक धर्मामध्यें आहेत तर तो धर्म मनुष्यांच्या उन्नतीला उपयोगी पडणारा नसला पाहिजे. या विचारसरणीनें चार्वाकाच्या

माणसांकडून बौद्ध व जैन मताचा प्रचार झाला. यज्ञ यागादिकांमध्यें ज्या शाक्तांच्या घाणेरड्या व अधार्मिक चालीरीती मिळून गेल्या होत्या त्यांचा किती भयंकर घोर परिणाम होत असे याचें एक उदाहरण येथें देतों. आपल्या देशांमधील गोरखपूर नामक संस्थानच्या राजानें एकदां यज्ञ करविला. त्या यज्ञामध्यें 'यजमानपत्नीनें घोड्याशीं समागम करावा' (यजु० महीधरभाष्य स्वामी दयानंदांचा ऋग्वेदादि भाष्यभूमिका हा ग्रंथ विशेष प्रकाशक आहे अ० २३) असें विधान असल्यामुळें तसें त्यानें आपल्या पत्नीकडून भोळसरपणानें करविलें. पुढें त्या त्रासानें ती मरण पावली; तेव्हां तो उदास होऊन आपल्या राज्यावर आपल्या पुत्राला बसवून आपण साधू झाला व हीं अवैदिक कृत्यें न करण्याबद्दल लोकांस उपदेश करूं लागला. असो; तात्पर्य इतकेंच कीं शाक्तमताचा पगडा आपल्या धर्मकल्पनांत झाल्यामुळें व त्या राजाच्या युक्तिपूर्ण उपदेशानें हीं बौद्ध, जैन, चार्वाक, आभरणक वगैरे मतें निघालीं. त्यांचें स्वतंत्र रीतीनें पुढें परीक्षण करूं. पण येथें चार्वाकमताचा थोडासा मासला देतो.

**पशुश्चेन्निहतः स्वर्गं ज्योतिष्टोमे गमिष्यति । स्वपिता यजमानेन तत्र कस्मान्न हिंस्यते ॥**
**मृतानामिह जन्तूनां श्राद्धं चेत्तृप्तिकारणम् । गच्छतामिह जन्तूनां व्यर्थं पाथेयकल्पनम् ॥**

( अर्थ ) ' जर पशूला मारून त्याचें हवन केल्यानें तो पशू स्वर्गाला जातो तर यजमानानें आपल्या बापाला मारून त्याला स्वर्गाला कां पोंचवूं नये ? जर मेलेल्या प्राण्याला श्राद्ध करून तृप्ति मिळते तर गांवाला जाणाऱ्या बरोबर खाण्यापिण्याची व्यवस्था करून देण्याचें कांहीं कारण नाहीं. ' कारण जर मेलेल्या माणसाला तर्पण व अन्नदान केल्यानें तेथें पाणी व अन्न मिळतें तर दूरच्या देशीं राहणाऱ्याला किंवा मार्गांत असणाऱ्याला, त्यांच्या नांवानें अन्न पाणी घरच्या माणसांनीं सोडलें तर तेंहि त्याला मिळालें पाहिजे ; पण तसें पोंचत नाहीं, मग श्राद्धांतील अन्नदानानें तरी पितरांची तृप्ति कशी होईल ?या प्रकारचा चार्वाकांचा युक्तिसिद्धवाद व तर्कवितर्क जेव्हां सुरूं झाले तेव्हां तेंहि कांहीं लोकांना खरें वाटून त्यांच्या मताचाहि बराच प्रसार झाला ! जेव्हां चार्वाकादि मतांचा स्वीकार राजे महाराजे व श्रीमान् लोक करूं लागले तेव्हां ही भिक्षुक मंडळीहि त्या बाजूला झुकली, कारण यांना जेथें स्वार्थ साधेल तेथें जावयाचें एवढेंच काय तें काम असतें; अशा रीतीनें हे जैन किंवा बुद्ध बनूं लागले; असा या नास्तिकमतांचा पुष्कळ प्रसार झाला ; तथापि कांहीं पर्वतस्थानें व काशी, कनोज, पश्चिम, व दक्षिण देश यांमध्यें या नास्तिकांचा फारसा पगडा बसला नाहीं; तथापि मुळींच नाहीं असेंहि नाहीं. बौद्ध जैनादिकांना वेदांचे अर्थ समजत नसत व शाक्तमताच्या प्रभावानें दूषित झालेलीं हिंसामय यज्ञयागादिक कृत्यें करणें हाच वेदोक्तधर्म असें प्रत्यक्ष दिसत असलेल्या पुराव्यावरून ते समजत, व त्यामुळें वेदाची सराटून निन्दा करीत. त्या नास्तिकांच्या निन्देनें वेदाचें अध्ययनाध्यापन बंद पडत चाललें, यज्ञोपवीतधारणादि संस्कार नामशेष होऊं लागले, व ब्रह्मचर्यादि नियम मोडत चालले. त्यांनीं पुष्कळ वेदादिक पुस्तकांचा नाश केला व जैन व बौद्ध राजांनीं आर्यांना फार छळलें; जेव्हां राजसत्ता त्यांची झाली तेव्हां जैन व बुद्ध गृहस्थांची व भिक्षूंची चोहोंकडे प्रतिष्ठा होऊं लागली व वेदमार्गी आर्य लोकांचा अपमान होऊं लागला. न्यायशासनामध्यें पक्षपात होऊं लागला. जैनी व बुद्ध अपराधी असतांहि ते सुटले जात व आर्य निरपराधी असले तरी दंडनीय ठरत ! अशा रीतीनें अन्याय सुरूं झाला व ते नास्तिकमतानुयायी लोक गर्विष्ठ, चैनी व धमेंडखोर बनत चालले. ऋषभदेवापासून तों महावीरापर्यंत होऊन गेलेल्या तीर्थकरांच्या मोठमोठ्या मूर्ति करून त्यांची पूजा करण्याचा क्रम सुरूं झाला व अशा रीतीनें मूर्तिपूजेचा प्रकार सुरू झाला. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें शाक्तमताचा प्रसार झाल्यामुळें जशी हिंसा ही यज्ञाचें अंग होऊन बसली, त्यांचप्रमाणें जैन व बुद्ध धर्मांतील मूर्तिपूजाहि वैदिकधर्मांत येऊन बसली; याप्रमाणें या मतांचा इतिहास पाहिला असतां यज्ञांतील हिंसा व मूर्तिपूजा या दोन अवैदिक चाली धर्मांत कशा येऊन बसल्या हें समजेल.

याप्रमाणें शाक्तांच्या व जैनबुद्धादिकांच्या मतांचा वैदिक धर्मावर पगडा बसून शुद्ध वैदिकधर्मांत भेसळ झाली, सर्वव्यापी परमेश्वराची मानमान्यता कमी होऊन पाषाणादि मूर्तीवर पुष्पफलादि भोग चढविण्यांतच पुरुषार्थ मानण्यापर्यंत अध्यात्मिक अवनति झाली, व जैनधर्माखालीं वैदिकधर्म दबला गेला, अशी स्थिति आर्यावर्तामध्यें तीनशें वर्षेपर्यंत होती; कारण तीनशें वर्षेपर्यंत जैनी राजांचें राज्य आर्यावर्तांत भरभराटीच्या स्थितींत होतें. त्या मुदतींत प्रायः वेदाचा

अर्थ लुप्त झाल्यासारखा होता. आधीं शाक्तांची धुमडाधुसड नंतर जैनादिकांनीं एकसारखा केलेला छल वगैरे कारणांनीं पूर्वीच्या शुद्ध वैदिकधर्माचा मागमूस नाहींसा होत चालला; या स्थितीला आज जवळ जवळ अडीच हजार वर्षें झालीं असावीं; अशा कठीण प्रसंगीं द्रविडदेशांतील एका ब्राह्मणकुलामध्यें श्रीशंकराचार्य उत्पन्न झाले. त्यांनीं पूर्ण ब्रह्मचर्य पालन करून व्याकरणादि सर्व शास्त्रांचें उत्तम अध्ययन केलें. तेव्हां त्यांना कळून आलें कीं, नास्तिक लोकांचा प्रभाव जास्त झालेला आहे व शुद्ध वैदिक धर्म बुडत चालला आहे. जैनादि नास्तिकमतांचा पाडाव करून वैदिकमताची स्थापना कशी करतां येईल या विचाराकडे शंकराचार्यांचें मन लागलें. शंकराचार्यांनीं जशीं आपलीं शास्त्रें अभ्यासलीं होतीं त्यांचप्रमाणें प्रतिपक्ष्यांचीहि पुस्तकें व युक्तिवाद त्यांनीं अवगत करून घेतले होते. तेव्हां सर्व गोष्टींचा विचार करून त्यांनीं ठरविलें कीं, उपदेश व शास्त्रार्थ करूनच या नास्तिकांचा पाडाव केला पाहिजे व आपल्या वैदिकधर्माचा ध्वज लावला पाहिजे.

असा विचार करून ते उज्जयिनी नगरी मध्यें आले. तेथें सुधन्वा नामक राजा राज्य करीत होता; या राजानें जैनीमताचें ग्रंथहि पाहिले होते व वैदिकग्रंथहि पाहिले होते; त्यामुळें त्याच्या अंतःकरणांत वैदिकधर्माबद्दल बराच आदर उत्पन्न झाला होता. या राजाच्या राज्यामध्यें शंकराचार्यांनीं प्रथम उपदेश करण्यास सुरवात केली व पुढें राजाची भेट घेऊन त्याला ते म्हणाले कीं, "हे राजा ! तूं वैदिक ग्रंथ व जैन ग्रंथ यांचें अध्ययन केलें आहेस व स्वतः तूं जैनमताचा स्वीकार केला आहेस; करितां तुझ्या जैनमतवादी पंडितांबरोबर माझा शास्त्रार्थ करविण्याची व्यवस्था कर;पण त्यांत ही अट मुख्यत्वेंकरून असली पाहिजे कीं, जो हरला जाईल त्यानें जिंकणाऱ्याचें मत स्वीकारावें व जें मत शास्त्रार्थानें योग्य ठरेल त्याचा तूंहि स्वीकार करावास." हें आचार्यांचें भाषण ऐकून राजास आनंद झाला; कारण, जरी सुधन्वा राजा जैन होता, तथापि संस्कृतशास्त्राचें अध्ययन त्यानें केलेलें असल्यामुळें त्याच्या बुद्धीमध्यें ज्ञानाचा प्रकाश पडलेला होता व तो इतरांप्रमाणें हट्टी नव्हता. हें उघडच आहे कीं, जे विद्वान् असतात ते सत्यासत्याचा निर्णय करून सत्याचें ग्रहण करतात व असत्याचा त्याग करतात, पण जे हट्टी असतात ते कांहीं झालें तरी आपलें म्हणणें सोडीत नाहीत. असो. जोंपर्यंत सुधन्वा राजाला उत्तम उपदेशक भेटला नव्हता तोंपर्यंत तो संशयामध्यें होता व वैदिकधर्म खरा कीं जैनधर्म खरा याचा त्याला निश्चयात्मक निकाल कांहींच झाला नव्हता; पण जेव्हां त्यानें शंकराचार्यांचें वरील म्हणणें ऐकिलें तेव्हां त्याला अत्यानंद झाला व आपल्या पंडितांकडून शास्त्रार्थ करवून सत्यासत्याचा निर्णय करविण्याचा त्यानें निश्चय केला; व त्याप्रमाणें निरनिराळया ठिकाणांहून अनेक जैन पंडितांना बोलावून आणलें व शास्त्रार्थाचा दिवस ठरविला. श्रीशंकराचार्यांचें वैदिकमत व जैनपंडितांचें वेदविरुद्ध मत या दोहोंमध्यें शास्त्रार्थ व्हावयाचा होता. शंकराचार्यांचा हेतू असा होता कीं, वैदिकधर्माची स्थापना करावयाची व अवैदिक जैनादि मतांचें खडंन करावयाचें. त्याचप्रमाणें जैनपंडितांचा हेतू असा होता कीं, आपल्या मताचें मंडन करून वैदिक मतांचें खंडन करावयाचें; याप्रमाणें आपल्या पक्षाचें मंडन करण्यासाठीं दोनहि पक्षाची मडळी ठरलेल्या दिवशीं जमून शास्त्रार्थाला सुरवात झाली.

शास्त्रार्थ कित्येक दिवसपर्यंत चालला होता. जैनपंडितांचा प्रतिपाद्य विषय असा होता कीं, सृष्टीचा कर्ता अनादि ईश्वर असा कोणहि नाहीं; जगत् व जीव अनादि आहेत, व त्यांची उत्पत्ति किंवा विनाश होत नाहीं; याच्या विरुद्ध श्रीशंकराचार्यांनीं जें आपलें मत म्हणून तेथें मांडलें होतें तें असें कीं, अनादि सिद्ध परमात्मा होच सृष्टीचा कर्ता आहे, जगत् व जीव मिथ्या आहेत व परमेश्वर आपल्या मायेनें जगत् उत्पन्न करून त्याचा विनाशहिं करतो, हा सर्व प्रपंच स्वप्नवत् असून परमेश्वरच आपण जगद्रूप होतो व ही सर्व लीला करतो. पुष्कळ दिवसपर्यंत शास्त्रार्थ झाला पण शेवटपर्यंत युक्ति व प्रमाण यांनीं जैनमताचें खंडण होत गेलें व शंकराचार्यांचें मत अखंडित राहिलें. तेव्हां त्या सर्व पंडितांनीं व सुधन्वा राजानें आपल्या जैनमताचा त्याग करून शंकराचार्यांच्या वैदिकमताचा स्वीकार केला या जैनांच्या पराभवामुळें चोहोंकडे बरीच गडबड माजून राहिली. सुधन्वा राज्याच्या अन्य इष्टमित्रांनीं व जैनपंडितांनीं पुनः पुनः शंकराचार्यांशीं आव्हानें करून शास्त्रार्थ केले पण हरएक शास्त्रार्थांत त्यांचा पराभव होऊन वेदमताचा जय होऊं लागला. पुढें याच सुधन्वा राजानें आपले नोकर चाकर बरोबर देऊन व आचार्यांचें रक्षण उत्तम रीतीनें होईल अशी व्यवस्था

करून सर्व आर्यावर्तभर वैदिकधर्माचा उपदेश करण्याच्या कामीं शंकराचार्यांना फार मदत केली. या वेळेपासून पुनः आर्यावर्तामध्यें पूर्वीप्रमाणें यज्ञोपवीतसंस्कार होऊं लागले व वेदांचें पठनपाठन सुरू झालें. शंकराचार्यांनीं दहावर्षेपर्यंत सर्व आर्यावर्त देशांत फिरून जैनादि नास्तिकमतांचें खंडन केलें व वैदिक मताची स्थापना केली. जैन लोकांच्या मूर्तिपूजेचें खंडन केलें तेव्हां ज्यानें त्यानें आपआपल्या मूर्ति लपवून टाकल्या व कित्येकांनीं तर जमिनींत पुरुन टाकल्या त्या अजूनपर्यंतहि कोठें कोठें खोदलें तर सांपडतात.

जसें जैन व बौद्ध मत सुरू होतें त्याच प्रमाणें शैवमत, शाक्तमत वगैरे मतेंहि प्रचलित होतीं. त्या सर्व मतांचें शंकराचार्यांनीं खंडन केलें. त्यावेळीं या देशांत धनहि विपुल होतें व देशभक्तिहि मोठी होती, त्यामुळें या वैदिकमताचा पुनः झपाट्यानें प्रचार झाला. जैन लोकांचीं मोठमोठीं मंदिरें होतीं तीं तशींच कायम ठेवून त्यांत वेदशास्त्रशाला स्थापण्याचें सुधन्वा राजानें व आचार्यांनीं ठरविलें होतें; याप्रमाणें वेदमताचा थोडासा प्रसार होऊं लागला, इतक्यांत दोन कपटी बौद्ध भिक्षु बाहेरून आपण वेदमतानुयायी आहों असें दाखवून शंकराचार्यांच्या जवळ येऊन राहिले. त्यांनीं शंकराचार्यांची मर्जी आपणांवर सुप्रसन्न करून घेतली व कांहीं दिवसांनीं त्यांनीं शंकराचार्यांना असें एक जालीम वीष पाजलें कीं, त्या योगानें त्यांच्या अंगावर फोड येऊन त्याच आजारामध्यें सहा महिन्याचे आंतच त्यांचें देहावसान झालें. वैदिकमताचा प्रचार होणार होता तो थांबला, सर्व आर्य निरुत्साहित झाले व पुनः नास्तिकांना जोर आला. तथापि शंकराचार्यांनीं शारीरभाष्यादि जे ग्रंथ जैनांचें खंडन करण्याकरितां लिहून ठेवले होते त्यांच्या आधारानें त्यांच्या शिष्य-मंडळीनें जैनादिक नास्तिकांचें खंडन करण्याचा क्रम चालविला. ब्रह्मसत्य, जगन्मिथ्या व जीवब्रह्माची ऐक्कता यालाच वेदमत समजून या मताचा शिष्यवर्गानें बराच प्रसार केला. आचार्यांनीं दक्षिणेमध्यें शृंगेरी, पूर्वेकडे भूगोवर्धन, उत्तरेकडे जोशी व पश्चिमेकडे द्वारकेमध्यें शारदा या मठांचीं स्थापना केली होती. या मठांतील शिष्यांनीं प्रथमतः बराच धर्मप्रसार केला खरा; पण पुढें जसजशी त्यांची मानमान्यता वाढत चालली व जसजसें त्यांच्याकडे धन एकत्रित होऊं लागलें तसा तसा त्यांचा उपदेशाचा क्रम बंद पडत चालला व अधिकार गाजविण्याकडे व चैन करण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली; व त्यांच्या गादीवर पुढें पुढें तर अज्ञानी लोक बसूं लागल्यामुळें जो कांहीं अनर्थ होऊं लागला त्याचें वर्णन करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं.

जैनी, बौद्ध, वगैरे नास्तिक लोकांचें मत परमेश्वर मुळींच नाहीं व जीव व सृष्टि अनादि आहे असें होतें व त्यामुळें परमेश्वराची उपासना व आस्तिकता यांचा लोप होत होता. या साठीं शंकराचार्यांनीं परमेश्वरच काय तो सत्य आहे व सृष्टि मिथ्या असून जीव हाच परमेश्वर आहे असें प्रतिपादन केलें. ज्या लोकांशीं सामना करावयाचा होता. त्यांच्या विचारसरणीचा विचार केला असतां हें ठीक होतें, असें म्हणण्यांस हरकत नाहीं. पण जेव्हां आम्ही त्यां मताची वैदिक सिद्धांतांशीं तुलना करून पाहूं लागतों तेव्हां तें मत शुद्ध वैदिक नाहीं असेंच म्हणावें लागतें. ब्रह्माशिवाय कांहींच नाहीं हा या नवीन वेदान्त्यांचा सिद्धान्त आहे. तो कसा काय आहे तें थोडासा विचार करून पाहूं.

( **अद्वैतमतवादी** म्हणतो ) जगत् स्वप्नवत् आहे. जसे रज्जूवर सर्पाचा, शिंपीवर चांदीचा, मृगजलामध्यें जलाचा भास होतो तद्वत् किंवा गंधर्वनगर किंवा इंद्रजाल याप्रमाणेंच हें सर्व विश्व मिथ्या-असत्य-आहे व एक अद्वितीय ब्रह्मच केवळ सत्य आहे. यावर तुमचें काय म्हणणें आहे ? (**सिद्धान्ती** उत्तर देतो.) तुम्ही असत्य कशाला म्हणतां ? ( **अद्वै०** ) जी वस्तु नसते व प्रतीत होते ती 'असत्य' असें आम्ही म्हणतों. ( **सि०** ) जी वस्तु मुळींच नाहीं तिची प्रतीति तरी कशी होते ? (**अद्वै०**) अध्यारोपानें. ( **सि०** ) अध्यारोप म्हणजे काय ? ( **अद्वै०** ) **वस्तुन्यवस्त्वारोपणमध्यासः । अध्यारोपापवादाभ्यां निष्प्रपञ्चं प्रपंच्यते ।**) 'एका पदार्थावर दुसऱ्या पदार्थाचा आरोप करणें याला **'अध्यास'** असें म्हणतात व या अध्यारोपाचें निराकरण करणें याला 'अपवाद' असें म्हणतात. अध्यारोप व अपवाद यांच्या योगानें प्रपंचरहित परब्रह्मामध्यें प्रपंचाचा विस्तार होतो.' (**सि०**) रज्जु या वस्तूच्या ठिकाणीं सर्प या अवस्तूचा भास होतो असें म्हणतां; पण हें तुमचें तर्कशास्त्र अगदीं खोटें आहे. कारण सर्प ही अवस्तु नसून वस्तु आहे. जरी ती रज्जूच्या ठिकाणीं नसली तरी ती देशांतरीं आहे व ती रज्जु पाहणाऱ्यानें पूर्वी पाहिली होती म्हणूनच तिची भावना

रज्जूच्या ठिकाणीं त्यानें केली; जर सर्प पाहिला नसता तर रज्जूच्या ठिकाणीं सर्पाची कल्पना झालीच नसती. याचप्रमाणें स्थाणूवर पुरुषाची व शिंपीवर चांदीची कल्पना होण्यास ते ते पदार्थ पूर्वी पाहण्याची आवश्यकता आहे हेंहि आपल्या लक्ष्यांत येईल; आता आपण स्वप्नाप्रमाणें म्हणतां तर तेंहि खोटें, कारण स्वप्न तरी पाहिलेल्या पदार्थांचेंच होतें. जे आपण जागृतींत पाहतो त्यांचे संस्कार आपल्या आत्म्यावर होतात व त्या संस्कारामुळें स्वप्न पडतें; तात्पर्य रज्जूच्या ठिकाणीं सर्पाचा भास होण्यास जशी पूर्वी सर्प असण्याची आवश्यकता आहे त्याचप्रमाणें स्वप्नामध्यें कांहीं वस्तु पाहण्यासहि ते ते पदार्थ असण्याची आवश्यकता आहे. आतां सांगा कीं, तुमच्या मताप्रमाणें जी ब्रह्माच्या ठिकाणीं जगाची कल्पना भासली, ती भासण्याला पूर्वी जग होतें कीं काय ? (अद्वै०) नाहीं, कारण स्वप्नामध्यें आपण न अनुभवलेल्या गोष्टीहि पाहतों. जसें—आपलें डोकें कापलें आहे, स्वतः रडत आहों, पाण्याची धार वर चढत आहे, आपण उडत आहों वगैरे आपण न अनुभवलेलीं स्वप्नें पाहतों ते हां स्वप्न पाहण्याला वस्तु पाहिलीच पाहिजे असें नाहीं. (सि०) हें पहा ! अशी तुम्ही गडबड करूं नका. हा तुमचा दृष्टांत योग्य नाहीं कारण जें पाहिलेलें किंवा ऐकलेलें नसतें त्याचा संस्कार होत नसतो. ज्याचा संस्कार होत नसतो त्याची स्मृति राहत नसते, व स्मृतिशिवाय साक्षात् अनुभव किंवा स्वप्न होणें अगदीं असंभवनीय आहे; एकाचें डोकें कापलेलें कोणी पाहिलें किंवा ऐकलें, किंवा कोणाला रडतांना पाहिलें, कारंजाचें पाणी वर उडतांना पाहिलें किंवा ऐकलें, पक्षी उडतांना पाहिला, तर त्या सर्व पाहण्याचे व ऐकण्याचे संस्कार आत्म्यामध्यें जमा होतात. जेव्हां जागृतींतून निराळा होऊन केवळ या संस्कारांनाच पाहतो व आपणामध्यें त्यांचा अनुभव घेतो, तेव्हां त्याला वाटतें कीं, आपलें मस्तक कापलें आहे, आपण रडत आहों, पाण्याची धार वर चढत आहे, आपण उडत आहों इ०. केव्हां केव्हां दोन निरनिराळ्या ठिकाणच्या अनुभवाचें एकीकरण करूनहि स्वप्नांत चमत्कारिक पदार्थ दिसतात; पण मुळींच पाहिलें नाहीं असें कांहीं हि दिसत नाहीं. अर्थात् स्वप्नामध्यें वस्तूवर अवस्तूचें आरोपण होत नसतें. जसें चित्र काढणारा पूर्वी पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या पदार्थाचें चित्र, त्या पदार्थाचे जे संस्कार आत्म्यामध्यें झालेले असतात त्यांच्या योगानें काढतो, किंवा प्रतिबिंब काढणारा बिंबाला पाहून त्याचें स्वरूप लक्ष्यांत ठेवून नंतर तें काढतो, त्याचप्रमाणें स्वप्नाचें आहे' स्वप्नामध्यें स्मरणजन्यच प्रतीति असते; आपल्या अध्यापकादिकांना पाहतों, किंवा ज्याला पाहून पुष्कळ काळ लोटला असेल त्याला एकदम पाहतो तें सारें स्मरणजन्यच होय. अतीत ज्ञानाचा साक्षात्कार होणें हें हि स्मरणाशिवाय होत नाहीं. जसें जाग्रत् अवस्थेमध्यें स्मरण असतें तसें तेथें नियमपूर्वक होत नसतें; पण पाहिल्या किंवा ऐकल्याशिवाय कोणताहि पदार्थ स्वप्नांत दिसत नाहीं हें खास. जन्मांधाला रूपाचें स्वप्न कधींहि होत नाहीं याचें कारण तरी हेंच कीं त्यानें रूप कधीहि पाहिलेलें नसतें हेंच होय; यासाठीं तुमचें अध्यास व अध्यारोपाचें लक्षण असत्य आहे. तुमचा विवर्तवादहि खोटा आहे. कारण रज्जूमध्यें सर्पाचा भास होण्याला जसें सर्पाचें अस्तित्व असण्याची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें ब्रह्मामध्यें जगाचा भास होण्यास जग असण्याची आवश्यकता आहे व जग जर पूर्वी मानलें तर स्वतंत्र रीतीनें आहे असें मानावें लागेल व तुमच्या अद्वैताची हानि होईल. म्हणून रज्जुसर्पादिक दृष्टांत ठीक नाहींत. (अद्वै०) अधिष्ठानावांचून अध्यस्त वस्तूची प्रतीति होत नाहीं. अर्थात् जर रज्जु नसेल तर सर्पाचा भास होणार नाहीं शिवाय रज्जूमध्यें तीनहि कालीं सर्पाचें अस्तित्व नाहीं; अंधुक उजेडामध्यें एकदम रज्जु नजरेस पडला असतां तो सर्प आहेसें वाटतें व पाहणारास भय वाटतें; पण प्रकाश आणून तो रज्जु आहे अशी खात्री झाली म्हणजे सर्पाचा भास नाहींसा होऊन ति नाश पावते. याप्रमाणें ब्रह्माच्या ठिकाणीं भासत असलेलें जगत् ब्रह्मसाक्षात्कार झाला म्हणजे नाहीसें होतें व केवळ ब्रह्माची प्रतीति होऊं लागते. (सि०) सर्प व रज्जु असें दोन पदार्थ असल्याशिवाय रज्जूवर सर्पासा भास होऊं शकणार नाहीं ; त्याचप्रमाणें ब्रह्म व जगत् हे दोन पदार्थ नित्य मानावे लागतात. मग तुम्हीं अद्वैत कसें म्हणतां ! (अद्वै०) आम्ही म्हणतों कीं, ब्रह्माच्या ठिकाणीं जगताचा केवळ भास झाला आहे. ( सि० ) बरें तुमचें म्हणणें घटकाभर खरें मानूं यावर मी असें विचारतों कीं, ब्रह्मामध्यें जगताचा भास कोणाला झाला ? ( अद्वै० ) जीवाला. ( सि० ) जीव कसा झाला ? (अद्वै०) अज्ञानानें ( सि० ) अज्ञान कोठून आलें व तें राहतें कोठें ? ( अद्वै० ) अज्ञान अनादि असून ब्रह्मामध्यें राहतें. ( सि० ) ब्रह्मामध्यें ब्रह्मासंबंधीं अज्ञान झालें कीं दुसऱ्या संबंधानें ? व तें कोणाला झालें ?

( अद्वै० ) चिदाभासाला अज्ञान झालें. ( सि० ) चिदाभासाचें स्वरूप काय आहे ? ( अद्वै० ) चिदाभासाचें स्वरूप ब्रह्मचे; पण जेव्हां त्याला स्वस्वरूपासंबंधानें अज्ञान होतें तें आपण आपल्यालाच विसरतें. ( सि० ) स्वस्वरूपाची विस्मृति पडण्याला कारण काय ? ( अद्वै० ) अविद्या. ( सि० ) अविद्या हा सर्व व्यापक सर्वज्ञाचा गुण आहे कीं अल्पज्ञाचा ? ( अद्वै० ) अल्पज्ञाचा. ( सि० ) तुमच्या अद्वैताच्या मतें सर्वव्यापक सर्वज्ञ चेतन अशी एकच वस्तु आहे कीं दुसरा अल्पज्ञहि आहे ? ( अद्वै० ) एकच वस्तु आहे. ( सि० )मग अल्पज्ञ आला कोठून ? जर हा अल्पज्ञ चेतन ब्रह्माहून भिन्न मानाल तर ठीक आहे. द्वैत सिद्ध झालें किंवा थोड्याशा ब्रह्माला अज्ञान होतें असें मानत असाल तर त्याचें कारण दाखवावें लागेल व एकाच वेळीं एके ठिकाणचें ब्रह्म अल्पज्ञ व दुसरीकडचें सर्वज्ञ असें होईल. शरीराच्या एका भागाला फोड झाला असतां जसें सर्व शरीर निरुपयोगी होतें, त्याचप्रमाणें त्या एकदेशविकृत ब्रह्माची स्थिति होईल. ( अद्वै० ) अज्ञान हा उपाधीचा धर्म आहे ब्रह्माचा नाहीं. ( सि० ) बरें आतां हें सांगा कीं, उपाधि जड आहे, कीं चेतन व सत्य आहे, कीं असत्य ? ( अद्वै० ) ती अनिर्वचनीय आहे. तिच्या संबंधानें सत्य किंवा असत्य, जड किंवा चे न असें कांहींच सांगतां येत नाहीं. (सि०) या बोलण्यानें तुह्मांवर 'वदतो व्याघातः' हा दोष येत आहे. उपाधि किंवा अविद्या आहे असें म्हणून ती जड, चेतन, सत्, असत् आहे कीं नाहीं हें तुम्हांला सांगतां येत नाहीं ! सोन्यामध्यें पितळ मिळवून तें सोनाराजवळ नेलें असतां तें सोनें आहे कीं पितळ आहे हें सोनाराला सांगतां येणार नाहीं, असें म्हणण्यासारखी तुमची स्थिति झाली आहे ! तर मग असें म्हणा कीं यांत दोनहि प्रकार आहेत ? ( अद्वै० ) जसें महदाकाश एकच मोठें असून मेघाच्या योगानें मेघाकाश, घराच्या योगानें मठाकाश व घटाच्या योगानें घटाकाश जसें उपाधीच्या योगानें निरनिराळें आकाश भासतें, त्याचप्रमाणें माया, अविद्या, समष्टि, व्यष्टि, अंतःकरण इत्यादि उपाधींच्या योगानें अज्ञानी लोकांना ब्रह्मच निरनिराळें भासतें; वास्तविक तें एकच आहे पहाः—

**अग्निर्यथैको भुवनं प्रविष्टो रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ।। एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा रूपं रूपं प्रतिरूपो बहिश्च ।।**
**कठ० व० ५ । ९।।**

(अर्थ) 'जसा अग्नि लांब, रुंद, लहान, मोठ्या अनेक आकृतींनीं युक्त असणाऱ्या पदार्थांमध्यें व्यापक होऊन तदाकार भासतो, व तो त्या पदार्थांहून निराळा असतो, त्याचप्रमाणें सर्व व्यापक परमात्मा अंतःकरणादिकांमध्यें व्यापक होऊन अंतःकरणाबाहेर भासत असतो; पण तो त्याहून निराळाच असतो.' (सि०) हें सर्व तुमचें म्हणणें व्यर्थ आहे; ज्याप्रमाणें तुम्ही घट, मठ व मेघ आकाशाहून भिन्न आहेत असें मानतां त्याचप्रमाणें कार्यकारणरूप जगत् जीवाहून भिन्न आहे व जीव ब्रह्माहून भिन्न आहे असें कां समजत नाहीं ? ( अद्वै० ) जसा अग्नि सर्व पदार्थांमध्यें प्रविष्ट होऊन पाहणाऱ्यांना तदाकार भासतो, त्याचप्रमाणें परमात्मा सृष्टि व जीव यामध्यें व्यापक आहे व अज्ञानी लोकांना आकारवान् भासतो. वास्तविक ब्रह्म जडहि नाहीं व जीवरूपहि नाहीं. जसें अनेक जलपात्रांत अनेक सूर्य दिसतात पण सूर्य एकच असतो, जलपात्रांचा नाश होण्यानें सूर्याचा नाश होत नाहीं किंवा त्यामध्यें विकार होत नाहीं, त्याचप्रमाणें अनेक अंतःकरणांमध्यें ब्रह्माचा आभास पडतो. त्याला 'चिदाभास' असें म्हणतात. जोंपर्यंत अंतःकरण असतें तोंपर्यंत चिदाभास असतो . हाच जीव होय. व जेव्हां ज्ञानानें अंतःकरणाचा नाश होतो त्यावेळीं जीव मूळच्या ब्रह्मस्वरूपांत मिळतो; या चिदाभासाला आपल्या ब्रह्मस्वरूपाचें अज्ञान होतें व आपण अज्ञानी, कर्ता, भोक्ता, सुखी, दुःखी, पुण्यात्मा, जन्ममरणधर्मयुक्त आहों असें वाटत असतें. असें जोपर्यंत हें अज्ञान कायम असतें, तोपर्यंतच तो संसारबंधनांत असतो. (सि०) हा तुमचा दृष्टांतहि व्यर्थ आहे; कारण सूर्य साकार आहे, जलपात्रेंहि साकार आहेत व हे दोन पदार्थ परस्पर भिन्न आहेत, म्हणून सूर्याचें प्रतिबिंब जलपात्रांत पडतें. सूर्य जर निराकार असेल तर त्याचें प्रतिबिंब कधींहि पडणार नाहीं. परमेश्वर निराकार असल्यामुळें त्याचें प्रतिबिंब पडूं शकत नाहीं व तो सर्व व्यापक असल्यामुळें त्याच्याहून निराळा दुसरा पदार्थच नाहीं कीं ज्यांत त्याचें प्रतिबिंब पडेल. ब्रह्म व सृष्टि यांचा व्यापक व व्याप्य असा संबंध आहे. अन्वयव्यतिरेकाच्या दृष्टीनें पाहतां सर्व पदार्थ त्यांच्यांत आहेत; पण ते सर्व त्याहून भिन्न आहेत असें आढळेल.

जो एकच पदार्थ असतो तो व्याप्य व व्यापक होऊं शकत नाहीं व आकारवान् पदार्थ असल्याशिवाय त्याचा आभास दुसऱ्या ठिकाणीं पडूं शकणार नाहीं; म्हणून ब्रह्माचा आभास पडूं शकत नाहीं, अंतःकरणोपाधीच्या योगानें ब्रह्मच जीव होतो असें जें तुम्ही मानतां तेंहि अविचारानेंच होय. पहा. अंतःकरण चञ्चल व लहान आणी ब्रह्म अचल व महान् आहे. जर तुम्ही ब्रह्म व जीव निराळे नसून एकच आहेत असें मानत असाल तर या प्रश्नाचें उत्तर द्या कीं, अंतःकरण चञ्चल असल्यामुळें जेव्हां तें एका जागेंतून दुसऱ्या जागेंत जातें, तेव्हां जेथें तें जातें तेथील ब्रह्म अंतःकरणयुक्त झाल्यामुळें अज्ञानी व जेथून अंतःकरण चलन पावलें तेथील पूर्वीचें ब्रह्म सज्ञानी होतें की काय ? एखाद्या खोलीमध्यें दिवा ठेवला तर चोहोंकडे सारखा प्रकाश पडतो पण दिव्याच्या व भिंतीच्यामध्यें एखादा पदार्थ ठेवला तर तेवढ्या भागापुरता भिंतीवर अंधार होतो; जर तो पदार्थ फिरता राहिला तर जेथें जेथें तो पदार्थ जाईल तेथें तेथें अंधार पडेल व जेथून तो जाईल तेथें पूर्वीप्रमाणें उजेड पडेल. याचप्रमाणें जेथें अंतःकरण जाईल तेथें असलेलें ब्रह्म अज्ञानी होऊन पहिलें ब्रह्म सज्ञानी होईल, व असें होऊं लागलें म्हणजे केवल अंतःकरणाच्या चञ्चलतेनें दरएक क्षणाला ब्रह्माला बंध व मुक्ति होतील किंवा अखंड ब्रह्माचा एक देश अंतःकरणानें अज्ञानी झाला तर ब्रह्म चेतन असल्यामुळें त्या ब्रह्माचा परिणाम सर्व ब्रह्मावर होण्याचा संभव आहे; कारण शरीराच्या एका भागावर फोड झाला असला तरी सर्व शरीरभर चेतना असल्यामुळें तें सर्व शरीर त्या फोडामुळें कोणतेहि काम करण्यास निरुपयोगी होतें. शिवाय आणखी अशी एक आपत्ति येते कीं, मथुरानगरींतील अंतःकरणविशिष्ट ब्रह्मानें जर एखादी गोष्ट पाहिली व थोड्या काळानें तें अंतःकरण काशीला आलें तर त्याला ती गोष्ट तेथें आठवणार नाहीं. कारण मथुरेमधील ब्रह्म निराळें व काशीचें ब्रह्म निराळें (**अन्यदृष्टमन्यो न स्मरति**) एकानें पाहिलेलें दुसऱ्याला आठवत नाहीं असा न्याय आहे. या न्यायानें विचार केला असतां असें आढळेल कीं, ज्या चिदाभासानें मथुरानगरीमध्यें एक गोष्ट पाहिली तोच चिदाभास काशीनगरीमध्यें नसल्यामुळें तेथें त्याला ती गोष्ट आठवणार नाहीं; कारण ब्रह्म स्थिर असल्यामुळें ब्रह्माचा जो भाग मथुरानगरींत आहे तो काशींत नाहीं; शिवाय आणखी एक विचार करा कीं, ब्रह्म सर्वज्ञ असल्यामुळें जर ब्रह्मच जीव आहे तर जीवहि सर्वज्ञ असला पाहिजे, पण तसा नाहीं याचें कारण काय ? शिवाय जर ब्रह्माचें प्रतिबिंब जीव आहे असें मानतां तर पूर्वदृष्ट व पूर्वश्रुत पदार्थांचें स्मरण त्याला होऊं शकणार नाहीं; कारण अंतःकरण चलन पावल्याबरोबर दुसऱ्या प्रदेशांतील ब्रह्माचें प्रतिबिंब त्यांत पडेल व पहिल्या ब्रह्माचा नाश होईल; आणि जर ब्रह्म एक असल्यानें स्मरण होतें असें म्हणाल तर जसें ब्रह्म एकच असल्याने स्मरण होतें तसेच तें सर्व एकदम अज्ञानीहि होऊं शकणार नाहीं हें कशावरून ? तुमच्या या मतानें तुम्ही नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाव ब्रह्माला अनित्य, अज्ञानी, अशुद्ध व बद्ध केलें आहे व अखंड ब्रह्माला खंडित केलें आहे. हें आश्चर्य नव्हे काय ? (अद्वै०) तुम्ही म्हणतां कीं आभास पडण्याला साकार पदार्थाची आवश्यकता आहे; पण निराकार पदार्थाचाहि आभास पडतो, आरशांत किंवा पाण्यांत आकाशाचा आभास पडतो तरी आकाश निराकार आहे असें तुम्ही मानतां आहां. जसा निराकार आकाशाचा पाण्यांत आभास पडतो व तो निळा दिसतो त्याचप्रमाणें अंतःकरणांत परब्रह्माचा आभास पडतो व जीवरूप दिसतो. यावर तुम्ही काय म्हणतां ? (सि०) जर आकाशाला रूप नसेल तर तें नजरेला दिसणार नाहीं व ज्या अर्थी तें नजरेला दिसणार नाहीं त्या अर्थी तें आरशांत किंवा पाण्यांत दिसेल तरी कसें ? साकार वस्तूचें प्रतिबिंब दिसेल, पण निराकार वस्तूचें केव्हांहि दिसणार नाहीं. (अद्वै०) वर जें निळें आकाश दिसतें त्याचें प्रतिबिंब पाण्यांत दिसत नाहीं काय ? (सि०) होय. प्रतिबिंब दिसतें खरें पण जें निळें दिसतें तें आकाश नव्हे. आकाशाला रंगरूप मुळींच नाहीं. तर मेघमंडळांमध्यें पृथ्वी, जल व अग्नीचे त्रसरेणू जमा झालेले असतात त्यांचा तो निळा रंग आहे. हें स्थान मेघमंडळ होय व या ठिकाणाहून वृष्टि होत असते. जसें धुकें दुरून शुभ्र दिसतें पण जवळून तसें दिसत नाहीं, त्याचप्रमाणें आकाशांतील निळा रंग दिसतो. तो आकाशाचा रंग नसून वर सांगितलेल्या तीन तत्वांच्या संमिश्रणाचा दुरून भासणारा रंग आहे. (अद्वै०) बरें तें असो. आम्ही पूर्वी दिलेले रज्जूसर्पादि दृष्टांत मिथ्या आहेत काय ? (सि०) तुमचे दृष्टांत चूक नाहींत, पणत्यांवरून तुम्ही

अनुमान काढतां तें चुकीचें आहे; हें करों तें आम्ही पूर्वी दाखविलेंच आहे. बरें आतां हें सांगा कीं अज्ञान कोणाला होतें? (अद्वै०) ब्रह्माला. (सि०) ब्रह्म सर्वज्ञ आहे कीं, अल्पज्ञ आहे? (अद्वै० ) ब्रह्म सर्वज्ञहि नाहीं व अल्पज्ञहि नाहीं; कारण सर्वज्ञता किंवा अल्पज्ञता उपाधिसहित असणाऱ्याला प्राप्त होत असते. (सि०) बरें उपाधिसहित कोण असतें ? (अद्वै०) ब्रह्म उपाधिसहित होऊन जीव व ईश्वर बनतें (सि०) मग ब्रह्मच उपाधियुक्त असल्यामुळें सर्वज्ञ व अल्पज्ञ होऊ शकतें ना ? (अद्वै०) होऊं शकते खरें. पण उपाधि कल्पित आहे म्हणून ती मिथ्या आहे. (सि० ) जर उपाधि कल्पित आहे तर तिची कल्पना करतो कोण ?(अद्वै०) बरें आमचें मत कांहींहि असो. तुमच्या मतें जीव व ब्रह्म एक आहे कीं नाहीं ? ( सि० ) आमच्या मतें जीव व ब्रह्म एक नाहीं. जीव अल्पज्ञ असून ब्रह्म सर्वज्ञ आहे. तुम्ही म्हणतां कीं ब्रह्म अज्ञानी झालें व जीवरूप बनलें, पण अज्ञानी बनणारें तें ब्रह्म तरी कसलें ? जें मिथ्या कल्पना करतें तें कसें सत्य होऊं शकतें ? (अद्वै०) आम्ही सत्य व असत्य यांना मिथ्या म्हणतों. वाणीनें बोलणेंहि मिथ्याच आहे. ( सि० ) जर तुम्ही सत्य व असत्य यांना व वाणीलाहि मिथ्या समजतां तर तुम्ही तरी मिथ्या नाहीं कशावरून ? ( अद्वै० ) सत्य व असत्य हें कल्पित असून आम्ही त्यांचे साक्षी आहोंत व त्या सत्यासत्याचे आधार आहोंत. ( सि० ) जर तुम्ही सत्य व असत्य यांना आधार आहांत तर तुम्हीच सावकराप्रमाणें व चोराप्रमाणेंहि व्हाल व त्यामुळें अप्रामाणिक ठराल; जो सदासर्वदा सत्यपक्षाचें अवलम्बन करतो, सत्य बोलतो. सत्य मानतो, सत्य करतो, असत्य सोडतो असत्य बोलत नाहीं व असत्य करीत नाहीं तोच प्रामाणिक समजला जातो; ज्या अर्थी तुम्ही आपल्या वाणीला आपणच मिथ्या म्हणतां त्या अर्थी तुम्ही मिथ्यावादी झालांत (अद्वै०) बरें तें असो. अनादि माया ब्रह्माच्या आश्रयानें असते व तीच ब्रह्मावर आवरण घालते असें तुम्ही मानतां कीं नाहीं ? (सि०) नाहीं; कारण 'जी वस्तु नसते पण भासते ती माया' असा तुम्ही अर्थ करतां. ज्यांच्या अन्तःकरणांतील सारासार विचारशक्ति नष्ट झाली असेल तेच लोक हा तुमचा सिद्धांत मानतील! कारण विचारवान् लोकांना वस्तु नसून तिचा भास होतो अशी कल्पनाच होणें अशक्य आहे. वंध्यापुत्रा-प्रमाणें ही तुमची कल्पना केवळ तर्काच्याच विरुद्ध आहे असें नव्हें तर " सन्मूलाः सोम्येमाः प्रजाः । " या छांदोग्योपनिषदाच्या वचनाच्या विरुद्ध आहे. (अद्वै.) काय तुम्ही वसिष्ठ, शंकराचार्य व निश्चलदासादि याहून अधिक शहाणे आहां कीं, त्याचेंहि तुम्ही खंडन करूं लागला ! आमच्या मतें तर त्यांचे सिद्धांतच ठीक आहेत. (सि०) वसिष्ठ व शंकराचार्यांची गोष्ट बाजूला ठेवा व हें सांगा कीं तुम्ही विद्वान आहां कीं अविद्वान आहां ? (अद्वै०) आम्ही साधारण शिकलेले आहों. ( सि० ) असो. तुम्ही आमच्या पुढें तुमचें अद्वैतमत स्थापना करा व आमच्या आक्षेपांचे निरसन करा म्हणजे झालें. ज्याचा पक्ष उत्तम ठरेल त्याचें अनुकरण करावें. जर तुमचें मत उत्तम आहे तर आपल्या युक्तींनीं आपल्या पक्षाचें समर्थन करा व आमच्या द्वैत मताचें खंडन करा; जेव्हां तुम्ही हें आमचें मत खंडित कराल तेव्हांच तुमचें मत ग्राह्य होईल. आम्ही तर वाटेल त्याच्याशीं शास्त्रार्थ करून अद्वैतमताचें युक्ति व शास्त्रप्रमाणांनीं खंडन करण्यास तयार आहों; ज्याला अद्वैताचा अभिमान असेल त्यानें पुढें यावें. श्रीशंकराचार्यांनीं जैनमताच्या खंडनसाठीं हें मत पुढें आणलें इतकेंच. देशकाल वस्तुस्थितीच्या अनुरूप आपणांस असम्मत अशा मताचा स्वीकार करूनहि विद्वान् लोक प्रतिपक्षाचें खंडन करीत असतात. जर श्रीशंकराचार्यांच्या मताप्रमाणें खरो-खरच जीव व ईश्वर एक असून जगत् व त्यांतील सर्व व्यवहार मिथ्याच आहेत असें असेल, तर प्रथमतः त्यांचें मत तरी जगांतील एक व्यवहारच होय. शिवाय निश्चलदासादि अद्वैती पंडितांचें कोटीक्रम फारच विलक्षण व असमंजस आहेत. (जीवब्रह्मणोर्भिन्नश्चेतनत्वात्) जीव चेतन असल्यामुळें ब्रह्मच आहे हें त्यांचें विधान आहे; पण असले विधान साधारण विचारी मनुष्यहि करूं शकणार नाहीं; कारण साधारण साधर्म्यमात्रानेंच ऐक्य ठरत नाहीं, तेथें वैधर्म्य आहे कीं नाहीं तेंहि पहावें लागतें. ' पृथ्वी व जल हे दोन पदार्थ एकच आहेत कारण ते जड आहेत ' असे जर कोणी म्हटले तर तें कोण खरें मानील ? कारण पृथ्वीचें गंधादि गुण व जलाचे शीतलादि गुण परस्पर भिन्न असल्यामुळें जल व पृथ्वी एक होऊं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें जीव व ब्रह्म एक होऊं शकणार नाहीं. कारण जीवामध्यें अल्पत्व, अल्पज्ञत्व, भ्रांतिमत्व वगैरे धर्म आहेत व परमेश्वरामध्यें सर्वव्यापित्व, सर्वज्ञत्व व निर्भ्रांतित्व वगैरे गुण स्वाभाविक आहेत. हें या दोहोंमध्यें

वैधर्म्य असल्यामुळें ब्रह्म निराळें व जीव निराळा हेंच खरें. ते केव्हांहि एक नव्हते व केव्हांहि एक होणार नाहींत. याप्रमाणें तुमच्या निश्चलदासादिकांचें योगवासिष्ठादि ग्रंथांविषयीं जाणावें. योगवासिष्ठ वाल्मिकी यांच्या नांवावर आहे; ते ऋषी वेदमतानुयायी होते व म्हणून कधींहि त्यांत प्रतिपादिलेलें अवैदिक मत लिहिणार नाहींत. रामचंद्रहि वेदवेत्ता होता; तोहि तसले अवैदिक मत ऐकून उगीच रहणार नाहीं. (अद्वै०) अहो ! तुम्ही म्हणतां खरें पण व्यासांनीं आपल्या उत्तरमीमांसेमध्यें अद्वैतच प्रतिपादलें आहे. पहा :—

**सम्पाद्याऽऽविर्भावः स्वेन शब्दात् ॥१॥ ब्राह्मेण जैमिनिरुपन्यासादिभ्यः ॥२॥ चिति तन्मात्रेण तदात्मकत्वादित्यौडुलोमिः ॥३॥ एवमप्युपन्यासात् पूर्वभावादविरोधं बादरायणः ॥४॥ अतएव चानन्याधिपतिः ॥५॥** वेदांतद० ४।४ सू० १।५।६।७।९॥

(अर्थ) जें पूर्वी ब्रह्म असतें तेंच जीवरूप होऊन प्रगट होतें, कारण 'स्व' शब्दानें आपल्या ब्रह्म स्वरूपाचें ग्रहण केलें जातें. ॥१॥ 'अयमात्मा अपहतपाप्मा' इत्यादि उपन्यासांवरून ब्रह्मस्वरूपापासून जीव स्थित होतो असें जैमिनी आचार्यांचें मत आहे असें ठरतें. ॥२॥ औडुलोमि आचार्यांचे असें मत आहे कीं, तदात्मकस्वरूपनिरूपणादि बृहदारण्यक वाक्यांवरून जीव मुक्तीमध्यें चैतनमात्रस्वरूप असतो. ॥३॥ व्यासमहात्मे या पूर्वोक्त उपन्यासादि ऐश्वर्य प्राप्तिरूप वचनाच्या अनुरोधानें जीव ब्रह्मच आहे असें मानतात. ॥४॥ योगी सर्व ऐश्वर्यासह ब्रह्मरूपता करून घेऊन अन्य अधिपतींनीं विरहित होऊन अर्थात् आपणच स्वतः आपला व इतर सर्वांचा अधिपति होऊन ब्रह्मस्वरूपानें मुक्तीच्या अवस्थेंमध्यें स्थिर होतो. ॥५॥ याप्रमाणांवरून तरी अद्वैत सिद्ध होत नाहीं काय ? (सि०) या सूत्रांवरून अद्वैत सिद्ध होत नाहीं, पण तुम्ही जो त्यांचा अर्थ केला आहे त्यावरून मात्र तुम्हांला सूत्रांचा अर्थ समजला नाहीं असें होतें. या सूत्रांचा खरा अर्थ कसा आहे तो पहा.—जोपर्यंत जीव आपल्या स्वकीय शुद्ध स्वरूपाला प्राप्त होऊन, सर्व मलांचा नाश करून पवित्र होत नाहीं, तोपर्यंत त्याला योगाचीं सर्व ऐश्वर्यें प्राप्त होणार नाहींत व त्याच्या अंतर्यामीं असणाऱ्या ब्रह्माची प्राप्ति होणार नाहीं व पूर्ण आनन्दहि त्याला लाभणार नाहीं. ॥१॥ याप्रमाणें जेव्हां योगी निष्पाप होऊन योगैश्वर्यसंपन्न होतो, तेव्हांच तो ब्रह्माशीं मिळतो व तेथील आनंदाचा उपभोग घेऊं शकतो असें जैमिनी आचार्य म्हणतात. ॥२॥ जेव्हां अविद्यादि दोषांचा त्याग करून आपल्या चैतनमात्र स्वरूपानें जीव राहतो, तेव्हांच त्याला 'तदात्मकत्व' म्हणजे ब्रह्मस्वरूपाशीं पूर्ण संबंध प्राप्त होतो असें औडुलोमी आचार्य म्हणतात. ॥३॥ जेव्हां जीव शरीरांत असतांनाच योगैश्वर्य व शुद्ध विज्ञान प्राप्त करून घेतो व जीवन्मुक्त होऊन ब्रह्माशीं पूर्ण संबंध ठेवतो त्यावेळीं त्याला आपलें निर्मळ पूर्वस्वरूप प्राप्त होतें असें व्यासमुनि म्हणतात. ॥४॥ जेव्हां योगी सत्यसंकल्प होतो व त्याला स्वयं परमेश्वरप्राप्ति होऊन मुक्तिसुख मिळतें, तेव्हां तो स्वाधीन व स्वतन्त्र असा राहतो. एक मुख्य व दुसरा गौण असा तेथें भेद राहत नाहीं. सर्व मुक्तजीव एकाच योग्यतेचे होतात. ॥५॥ जर असा अर्थ नसेल तर पुढील सूत्रांशीं विरोध होईल. पहा:-

**नेतरोनुपपत्तेः ॥१॥ भेदव्यपदेशाच्च ॥२॥ विशेषणभेदव्यपदेशाभ्यां च नेतरौ ॥३॥ अस्मिन्नस्य च तद्योगं शास्ति ॥४॥ अन्तस्तद्धर्मोपदेशात् ॥५॥ भेदव्यपदेशाच्चान्यः ॥६॥ गुहां प्रविष्टावात्मानौ हि तद्दर्शनात् ॥७॥ अनुपपत्तेस्तु न शारीरः ॥८॥ अंतर्याम्यधिदैवादिषु तद्धर्मव्यपदेशात् ॥९॥ शारीरश्चोभयेऽपि हि भेदेनैनमधीयते ॥१०॥** वेदान्तसूत्र ॥

(अर्थ) ब्रह्माच्या ठिकाणींच सृष्टिकर्तृत्व सिद्ध होतें, इतर जीव अल्पज्ञ व अल्प सामर्थ्यवान् असल्यामुळें त्यांच्याकडे सृष्टिकर्तृत्व येऊं शकत नाहीं; म्हणून जीव व ब्रह्म एक नाहीं. ॥१॥ "**रसं ह्येवायं लब्ध्वानन्दी भवति ।**" हें उपनिषद्वचन आहे. या वचनामध्यें जीव व ईश्वर यांमधील भेद वर्णन केला आहे. जेव्हां जीवाला आनंदमय परमेश्वराची प्राप्ति होते तेव्हांच तो आनंदी होतो. प्राप्य ब्रह्म व प्राप्त करून घेणारा जीव असा या दोहोंचा संबंध असल्यामुळें जीव व ब्रह्म हीं दोन भिन्न आहेत. ॥२॥ (**दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः स वाह्याभ्यन्तरो ह्यजः ॥ अप्राणो**

(१) १।१।१६. (२) १।१।१७. (३) १।२।२२. (४) १।१।१९. (५) १।१।२०. (६) १।१।२१. (७) १।२।११. (८) १।२।३०. (९) १।२।१८. (१०) १।२।२०.

ह्यमनाः शुभ्रो ह्यक्षरात्परतःपरः ॥ मुंडक. उ० २।१।२ ॥ ) परमेश्वर हा दिव्य, शुद्ध, अमूर्त-निराकार, सर्वव्यापक आंतबाहेर व्यापून असणारा, अजन्मा श्वासप्रश्वासादि शरीरसंबंधविरहित, त्याचप्रमाणें मनाच्या संबांधनें विरहित, स्वयंप्रकाशी इत्यादि विशेषणांनीं युक्त परमेश्वर आहे. हा अविनाशी प्रकृति व जीव यांहून फार पलीकडे आहे. असल्या वाक्यांमध्यें प्रकृति, जीव, व परमेश्वर यांमध्यें भेद वर्णिला असल्यामुळें जीव ब्रह्माहून निराळा आहे असेंच म्हणावें लागतें. ॥३॥ ज्याअर्थीं सर्वव्यापक परमेश्वरामध्यें जीवाचा योग करावा असें विधान आहे त्याअर्थीं त्यांचा परस्परांत भेद आहे हें उघड आहे. कारण भेद असल्याशिवाय एकाचा दुसऱ्याशीं योग कां करावा लागेल ? ॥४॥ ब्रह्माला 'सर्वांतर्यामी' वगैरे विशेषणें दिलेलीं आहेत, त्यावरुन व्यापक ब्रह्म व व्याप्य जीव यांचा व्याप्यव्यापक संबंध असल्यामुळें ते परस्पर भिन्न आहेत असें ठरतें, कारण व्यापक व व्याप्य हे पदार्थ भिन्नच असतात. ॥५॥ परमेश्वर जसा जीवाहून भिन्न आहे त्याचप्रमाणें तो इंद्रियें, अंतःकरण, पंचभूतें, दिशा, वायू सुर्यादि दिव्य पदार्थ व देवतावाच्य विद्वान् यांहून भिन्न आहे असें वर्णन असल्यामुळें जीव व ईश्वर यांचा भेद उघड होत आहे. ॥६॥ 'गुहां प्रविष्टौ सुकृतस्य लोके० ' इत्यादि उपनिषद्वचनांवरुन जीव व परमेश्वर यांचा भेद स्पष्ट होत आहे. याचप्रमाणें भेददर्शक उपनिषद्वचनें पुष्कळ आहेत. ॥७॥ ( शरीरे भवः शारीरः ) शरीरधारी जीव ब्रह्म नव्हे; कारण ब्रह्माचे गुणकर्म-स्वभाव त्यामध्यें नाहींत. ॥८॥. ( अधिदैव ) सर्व दिव्य पदार्थ म्हणजे मनादि इन्द्रियें, (अधिभूत ) पृथ्व्यादि भूतें, व ( अध्यात्म ) सर्व जीव यांमध्यें व्यापक असल्यामुळें तो जीवाहून भिन्न आहे. ॥९॥ शरीरधारी जीव ब्रह्म नाहीं कारण त्या दोहोंमध्यें स्वरुपतः भेद आहे. ॥१०॥ इत्यादि वेदान्तदर्शनांतील सूत्रांच्या आधारानें जीव व ईश्वर यांचा भेद सिद्ध होत आहे; शिवाय जर ब्रह्माशिवाय दुसरा कोणताच पदार्थ नाहीं असें मानले तर (उपक्रम) सृष्टीची उत्पत्ति व ( उपसंहार ) प्रलय हे दोनहि ब्रह्मामध्येंच मानावे लागतील. उत्पत्ति व विनाश हे धर्म जर ब्रह्माचें मानले तर 'उत्पत्तिविनाशरहित ब्रह्म आहे. अशा अर्थांच्या सर्व वैदिक वाक्यांशीं त्याचा विरोध होईल. परमेश्वर निर्विकार अपरिणामी, शुद्ध,सनातन, निर्भ्रांतत्वादि विशेषणयुक्त आहे हे गुण जीव व ब्रह्म यांत भेद मानला असतांच ब्रह्माच्या ठिकाणीं सिद्ध होऊं शकतात; पण जर त्यांत अभेद मानला तर ब्रह्म विकारी, परिणामी, विनाशयुक्त, उत्पत्तियुक्त, अशुद्ध,वगैरे दुर्गुणांनी युक्त होतें. तेव्हां अशा स्थितींत अद्वैतमताचा कोण विचारी मनुष्य स्वीकार करील ? शिवाय ( उपसंहार ) प्रलय झाल्यानंतरहि जड व जीव यांचा कारणब्रह्मामध्यें लय झाल्यानंतर कारणरुपाने ते जड व जीव त्या कारणब्रह्मामध्यें असूं शकतात. तेव्हां या अद्वैत्यांच्या मतानें उपक्रम व उपसंहाराचीहि व्यवस्था ठीक होत नाहीं; अशा अनेक आपत्ति या अद्वैतमतामध्यें असल्यामुळें तें वैदिक सिद्धांतांच्या विरुद्ध आहे. असो.

शंकराचार्यांनीं नास्तिकांचें खंडन करुन आपल्या मताची स्थापना केल्यानंतर, व ते परलोकवासी झाल्यानंतर, त्यांच्या अनुयायांनींहि नास्तिकांचें बरेंच खंडन करून आपल्या मताचें मंडन चालविलें होतें व या त्यांच्या उपदेशाचा परिणाम तत्कालीन आर्यावर्तावर बराच झाला होता. शंकराचार्यानंतर तीनशें वर्षांनीं उज्जयिनी नगरीमध्यें विक्रमादित्य नामक राजा बराच पराक्रमी होऊन गेला; त्यानें आर्यावर्तांतील लहानमोठ्या राजांमध्यें चाललेल्या लढाया नाहींशा करवून सर्वत्र शान्तता पसरविली होती; नंतर भर्तृहरी नामक राजा काव्यादि शास्त्रामध्यें थोडासा विद्वान् झाला होता; शेवटीं तो वैराग्यवान् झाला. व त्यानें राज्याचा त्याग केला विक्रमादित्यानंतर पांचशें वर्षांनीं भोजराजा राज्य करूं लागला. त्यानें आपल्या राज्यामध्यें व्याकरण, काव्य व अलंकार वगैरेंचा इतका प्रसार केला कीं, कालिदासासारखा बकरी चरविणाराहि त्या विद्येच्या योगानें रघुवंशाचा प्रणेता झाला. भोजराजाच्या जवळ जो कोणी नवीन श्लोक तयार करून घेऊन जाई त्याला तो जसें त्याचें काव्य असेल तसा मान करुन द्रव्यहि देत असे. भोजराजाच्या कारकीर्दीमध्यें विद्येचा बराच प्रसार झाला होता. पण पुढें राजांनीं विद्याशिकणें सोडून दिलें, ब्राह्मणांनीं शिकविणें सोडून दिलें, व ज्ञानचक्षु फुटल्यामुळें लोक अज्ञानान्ध झाले. जरी शंकराचार्यांच्या पूर्वीं व कर्ममार्गी लोकानंतर शैवादि संप्रदाय बरेच उत्पन्न झाले होते तथापि कोणाचेंच मत इतकें प्रबळ झालेले नव्हतें. विक्रमादित्याच्या वेळेपासून शैवमताचा पुनः प्रसार होऊं लागला. ज्याप्रमाणें शाक्तांमध्यें दश महाविद्या होत्या त्याचप्रमाणें शैवामध्येंहि पाशुपतादि अनेक शाखा होत्या.

या सर्वांचें शंकराचार्यांनीं खंडन केलें होते, तथापि शंकराचार्यांना त्यांनीं शिवाचा अवतार बनविलें ! इतकेच नव्हे तर त्यांचे अनुयायी शैवपंथी बनले व कित्येक तर शाक्तहि बनूं लागले ! शैव हे महादेवाचे उपासक व शाक्त हे आपण पार्वतीचे उपासक आहों असें म्हणत असतात. हे दोघेहि रूद्राक्ष धारण करतात व भस्म लावितात. सध्यां हे विधि सार्वत्रिक झाले आहेत हें खरें, पण पूर्वीं हे दोन मतवाले लोकच रूद्राक्ष व भस्म यांचें धारण करीत; तथापि जसे शाक्त वेदमताविरुद्ध व अघोरी असतात तसे शैव नाहींत.

धिग् धिक् कपालं भस्मरूद्राक्षविहीनम् ॥ १ ॥
रूद्राक्षान् कण्ठदेशे दशनपरिमितान् मस्तके विंशती द्वे ।
षट् षट् कर्णप्रदेशे करयुगलगतान् द्वादशान्द्वादशैव ॥
बाह्वोरिन्दोः कलाभिः पृथगिति गदितमेकमेवं शिखायाम् ।
वक्षस्यष्टाऽधिकं यः कलयति शतकं स स्वयं नीलकण्ठः ॥२॥

शैव व शाक्तमंळींनीं असले अनेक श्लोक बनविले आणि रूद्राक्ष व भस्म धारण करण्यानेंच महादेव बनतां येतें असें ते प्रसिद्ध करूं लागले ! त्याचें प्रतिपादन असें आहे कीं, ' ज्याच्या कपाळावर भस्म नाहीं व ज्याच्या गळ्यांत रूद्राक्ष नाहींत त्याला धिक्कार असो ! , तसेंच (**तं त्यजेदंत्यजं यथा**) त्या भस्मरूद्राक्षविहीन मनुष्याला चांडालाप्रमाणें समजून त्याचा त्याग करावा. 'रूद्राक्ष धारण करावयाचे ते कंठामध्यें ३२, डोक्यामध्यें ४०, प्रत्येक कानांत सहा सहा प्रत्येक हातांत बारा बारा, प्रत्येक भुजावर सोळा सोळा, शेंडीला एक व हृदयावर १०८ असें धारण करावें जो याप्रमाणें धारण करतो तो साक्षात् महादेव होतो. ' याप्रमाणें शैव व शाक्त हे मानीत असतात.

शैव व शाक्त याच दोन मतवाल्या लोकांनीं लिंगपूजा सुरू केली. लिंगाची पूजा सुरू करण्यांत त्यांना निर्लज्जपणा मुळींच वाटला नाहीं व आपण हा किती नीचपणा करीत आहों याचाहि विचार त्यांना सुचला नाहीं ! ( **स्वार्थी दोषं न पश्यति** ) स्वार्थी माणसांला आपले दोष दिसत नाहींत असें जें म्हणतात तेंच खरें, त्याच लिंगपूजा करण्यानें व पाषाणादि मूर्तींची पूजा करण्यानें सर्व धर्म, अर्थ, काम व मोक्ष सिद्ध होतात असें तेच पुढें मानूं लागले ! काय हा अविचार ! लिंगाच्या पूजेनें मोक्ष कसा मिळेल ? याचा विचार त्या विषयी लोकांस कसा होणार ? जैनी लोक मंदिरांत मूर्ति ठेवितात व ते तेथें जातात हें पाहिल्याबरोबर त्यांच्याप्रमाणें हेहि तसेंच करूं लागले. निरनिराळीं देवळें बांधूं लागले व अनेक मूर्तींची स्थापना करूं लागले; इतकेंच नव्हे तर जैनमंदिरांतहि जाऊं येऊं लागले. पण पुढें जसजसा जैनांशीं व यवनांशीं प्रसंग पडला व त्यांच्याशीं द्वेष वाढूं लागला तसतसा हेच स्वार्थी लोक त्यांचा द्वेष करूं लागले. पहा—

**न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कण्ठगतैरपि । हस्तिना ताड्यमानोऽपि न गच्छेज्जैनमन्दिरम् ॥ १ ॥**

(**अर्थ**) 'प्राण कंठीं आले तरीहि यावनी (म्लेच्छ) भाषा बोलूं नये व हत्ती मारावयास अंगावर धावून आला तरीहि जैनमंदिरांत प्रवेश करूं नये; म्हणजे हत्ती अंगावर आला तर जैनमन्दिरांत न जातां खुशाल हत्तीच्या पायांखालीं चिरडून मरावें ' अशा प्रकारचा अद्वातद्वा हे पुढचे मतान्ध लोक आपल्या चेल्यास उपदेश करूं लागले; जेव्हां कोणी संशोधक पुरुष यांना विचारतो कीं, बाबानो ! या तुह्मीं चालविलेल्या प्रकाराला आधार आहे काय ? तेव्हां हे उत्तर देतात कीं, हो आधार आहे. पहा मार्कण्डेयादि पुराणें असें सांगतात व तीं ते वाचूनहि दाखवितात, पुराणांतील दुर्गापाठ वगैरे वरून देवीची पूजा, वर्णन व तशाच इतर कथांवरून इतर गोष्टी हे लोक सिद्ध करीत असतात ! भोजराजा राज्य करीत असतां कोणी एकानें मार्कण्डेय पुराण व शिवपुराण बनवून तें व्यासकृत आहे असें प्रसिद्ध केलें. हें वर्तमान जेव्हां भोजराजाला समजलें, तेव्हां त्या लेखकाला हस्तच्छेदनादि कडक दंड करून सर्व राज्यांत त्यानें जाहीर केले कीं, ज्यानें त्यानें आप आपल्या नांवांवर ग्रंथ प्रसिद्ध करावें पण स्वतः कांहींतरी काव्यें रचून तीं ऋषिमुनिकृत आहेत असें जो भासवील तो कडक शिक्षेस पात्र होईल. हा वृत्तान्त भोजराजाप्रणीत ' संजीवनी ' नामक इतिहासांत लिहिलेला आहे. ज्याला पहावयाचा असेल त्यानें ग्वालेर संस्थानांतील भिंड नामक नगरामध्यें तिवारी ब्राह्मणाच्या

घरीं त्या इतिहासाची प्रत आहे, तीमध्यें पहावें. याच ग्रंथामध्यें लिहिलें आहे कीं, व्यासानें चार हजार चारशें श्लोकांचें भारत बनविले होतें व त्याच्या शिष्यानें त्यांत पांच हजार सहाशे श्लोक जास्त घालून त्याचें **महाभारत** बनविलें; याप्रमाणें भोजराजानें पुढें लिहिलें आहे कीं, हेंच भारत विक्रमादित्याच्या वेळीं वीस हजार श्लोकात्मक होतें, माझ्या पित्याच्या समयीं पंचवीस हजार झालें व मी मोठा झाल्यानंतर पाहतो तों तीस हजार श्लोकात्मक बनलें !! याप्रमाणें भोजराजानें स्वकीय पुस्तकांत लिहिलें आहे; जर अशा रीतीनें लोक प्राचीन ग्रंथांना आपल्या लाभासाठीं वाढवूं लागलें तर ते महाभारत कांहीं काळानें एका उंटाचा बोजा होईल. जी स्थिति महाभारताची तीच सर्व पुराणांचीं आहे. **महाभारत** व **रामायण** हे दोन ग्रंथ मूळचे ऋषिप्रणीत तरी आहेत, पुढें लोकांनीं त्यांत भर घातली. पण पुराणांची गोष्ट मात्र याहून अगदीच निराळीं; पुराणें ही याच अवैदिक स्वार्थी लोकांनीं लिहिलीं व त्या ऋषिमुनींच्या नांवांवर चालविलीं व त्याचमुळें लोक अज्ञानांत फसूं लागलें व वैदिक-धर्मविहीन बनलें त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं; या वरील, भोजराजाच्या लेखावरून असें वाटतें कीं त्या राजाला वैदिकधर्माचा संस्कार बराच झालेला होता. भोजप्रबन्धांत लिहिलें आहे:—

**घटयैकया क्रोशदशैकमश्वः सुकृत्रिमो गच्छति चारुगत्या ।।**
**वायुं ददाति व्यजनं सुपुष्कलं विना मनुष्येण चलत्यजस्त्रम् ।। १ ।।**

( **अर्थ** ) ' भोजराजाच्या राज्यांत असे शिल्पकला जाणणारे लोक होते कीं, त्यांच्या कारकीर्दीमध्यें त्यांनीं एका घोड्याच्या आकाराचें यंत्रकलायुक्त यान बनविलें होतें. त्याचा वेग असा होता कीं, तें ( दरतासाला साडेसत्तावीस कोस) दरवटकेला अकरा कोस जात असें. तेंच भूमीवर व अंतरिक्षांतूनहि चालत असें व एक पंखा असा बनविला होता कीं, तो मनुष्याशिवाय फिरत असे. एकदां त्याचें यंत्र सुरू केलें कीं तो सारखा फिरत राहून पुष्कळ वायु देत असे.'

जर हे पदार्थ आजपर्यंत तसेच राहिले असते तर युरोपांतील लोकांना इतका गर्व करण्याचें कांहीं कारण राहिलें नसतें. असो; याप्रमाणें भोजराजाच्या वेळीं विद्या व कला यांची वृद्धि झाली होती.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें जैनमंदिरामध्यें जाण्यास बरेच प्रतिबंध तत्कालीन लोकांनीं केले; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. लोक जैनमूर्तीचें दर्शन घेत व त्याचा नास्तिकवाद ऐकत; जेव्हां जैनी लोकांचा या पौराणिक लोकांवर बराच परिणाम होऊं लागला तेव्हां पौराणिकांनीं यावर कांहीं तरी युक्ति केली पाहिजे असा विचार केला; कारण त्यांना पुन: जैनमताचें प्राबल्य होईल कीं काय अशी भीति वाटूं लागली होती. तेव्हां सर्वांनीं मिळून विचार केला व ठरविलें कीं, जैनी लोकांच्या मंदिराचा व मूर्तींचा सामान्य लोकांवर बराच परिणाम होतो व त्यांच्या गप्पागोष्टींमध्येंहि लोकांचें मन रमतें, यासाठीं आपणाकडेहि तशा तऱ्हेची कांहीं व्यवस्था केली पाहिजे; असा विचार करून पौराणिक मंडळींनीं जैनी लोकांच्या चोवीस तीर्थंकाराप्रमाणें आपणामध्यें चोवीस अवतार बनविले; तशीं मंदिरें बनवून त्यांत त्या मूर्तींची स्थापना केली, व त्यांचें महात्म्य वर्णन करण्यसाठीं जैनी लोकांच्या आदि व उत्तर पुराणाप्रमाणें अठरा पुराणें व अठरा उपपुराणें बनविलीं; याप्रमाणें मुर्तिपूजा व पुराणांचा प्रसार झाला व त्याखालीं शुद्ध वैदिक धर्म हळूहळू लोपत चालला.

भोजराजानंतर दीडशें वर्षांनीं वैष्णव मताला प्रारंभ झाला. कंजर जातीमध्यें शठकोप नामक मनुष्य उत्पन्न झाला होता. त्यानें या मताचा थोडासा प्रसार केला. नंतर चण्डालकुलोत्पन्न यवनाचार्य झाला; त्यानें या मताच्या प्रसारार्थ बरीच खटपट केली. नंतर चौथा ब्राह्मणकुलोत्पन्न रामानुज झाला त्यानें या मताला बरेंच पसरविलें. शैवांनीं शिव-पुराणादि बनविलीं, शाक्तांनीं देवी भगवतादि व वैष्णवांनीं विष्णु पुराणादिक लिहिलीं. त्या त्यापुराणांवर लेखकांनीं आपलें नांव यासाठीं घातलें नाहीं कीं, तसें केलें तर आपल्या ग्रन्थास कोणीहि विचारणार नाहीं. म्हणून त्यांनीं तीं पुराणें व्यासकृत आहेत असें प्रसिद्ध केलें; वास्तविक हीं पुराणें नसून नवीन ग्रन्थ आहेत. पण दरिद्री असतांहि जसें नांव सोनुबाई ठेवतात; त्याचप्रमाणें या नवीन ग्रन्थांना पुराणें असें म्हणूं लागले व आश्चर्याची गोष्ट ही कीं, आपल्या मतमतांतरांतील झगडेहि त्यांत त्यांनीं गोवून टाकले !

मतमतान्तरांतील भांडणें व द्वेष पुराणांमध्यें भरलेले आहेत; ते पहाण्यास फार लांब जाण्याचें प्रयोजन नाहीं.

कोणतेंहि पुराण काढून पाहिलें तरी तेथें सांपडतील. देवीभागवत पहा. श्रीनामक एक देवी होती, ही श्रीपुरची स्वामिनी होती, हिनें सर्व जगत् बनविलें; ब्रह्मा, विष्णु, महेश्वरालाहि हिनेंच बनविलें ! बयांना बनवावें असें जेव्हां तिच्या मनांत आलें तेव्हां तिनें आपलें हात घांसले. त्या घर्षणानें तिच्या हातांवर एक फोड उत्पन्न झाला व त्यांतून ब्रह्मा उत्पन्न झाला. त्याला ती देवी म्हणाली कीं, तूं माझ्याशीं विवाह कर, ब्रह्मा म्हणाला कीं, तूं माझी माता आहेस म्हणून मी तुझ्याबरोबर विवाह करणार नाहीं. हें उत्तर ऐकल्यावरोबर मातेला क्रोध आला व त्या क्रोधामध्यें तिनें ब्रह्मयाचें भस्म करून टाकलें. पुन: तिनें आपलें हात चोळले तेव्हां त्यांमधून विष्णु उत्पन्न झाला. त्यालाहि त्याचप्रमाणें सांगितलें; पण त्यानेंहि एकलें नाहीं, तेव्हां त्यांचें भस्म केलें; पुन: पूर्वी लिहिल्याप्रमाणें हात चोळून तिसरा मुलगा उत्पन्न केला, त्याचें नांव महादेव झालें. त्यालाहि तिनें सांगितलें कीं तूं माझ्याबरोबर विवाह कर. महादेव म्हणाला कीं, हे माते मी तुझ्याशीं विवाह करूं शकणार नाहीं. तूं दुसरें शरीर धारण कर; त्याप्रमाणें तिनें दुसरें शरीर धारण केलें. इतक्यांत महादेवानें तेथें दोन ठिकाणीं पडलेली राख पाहिली; व तो तिला म्हणाला कीं, ही राख कशाची आहे ? देवी म्हणाली, हे दोघेहि तुझे बंधु आहेत. यांनींमाझी आज्ञा मानली नाहीं; म्हणून मी त्यांचे भस्म केलें महादेव म्हणाला कीं, मी एकटा कसा राहूं शकेन ? यांना उठीव आणखी दोन स्त्रिया उत्पन्न कर व आम्हां तिघांचा अनुक्रमें तिघीशीं विवाह होऊं दे; त्याप्रमाणें देवीनें केलें व त्यां तिघांचा त्या तीन स्त्रियांशीं विवाह झाला ! वाचकहो ! काय ही कथा ? त्यांनीं आईशीं विवाह केला नाहीं पण बहिणीशीं केला. काय असल्या प्रकारांना उचित समजावें ? याचप्रमाणें पुढें त्या देवीनें इंद्रादि देव उत्पन्न केलें व ब्रह्मा, विष्णु, रुद्र व इंद्र यांना पालखी उचलणारे भोई बनविलें. अशा तऱ्हेच्या गप्पाच सर्व पुराणभर आहेत ! श्रीपुर कोठें आहे, देवीचें शरीर कसें उत्पन्न झालें, तिची मातापितरें कोण व कोठें होतीं ? इत्यादि प्रश्नांला त्यांच्यापाशीं उत्तरें मुळींच नाहींत. जर ते म्हणतील कीं देवी अनादि आहे तर त्यावर प्रश्न असा कीं, शरीरयुक्त साकार पदार्थ संयोगजन्य असल्यामुळें त्यांनीं नि:शंकपणानें बहिणीशीं कसा विवाह केला ? ज्याप्रमाणें या देवीभागवतामध्यें देवीचें महत्त्व व ब्रह्मा, विष्णु व महादेव यांचें क्षुद्रत्व दाखविलें आहे त्याचप्रमाणें शिवपुराणमध्यें देवी आदिकांचें क्षुद्रत्व वर्णन करून हे सर्व महादेवाचे दास व दासी आहेत व महादेवच काय तो सर्वांचा ईश्वर आहे असें लिहिलें आहे.

याच शाक्त व शैव ग्रन्थामध्यें भस्मधारणाचा व रुद्राक्षधारणाचा विधि आहे असें पूर्वी सांगितलें आहे. व केवळ भस्मधारणानें व रुद्राक्षधारणानें मुक्ति आहे असें समजात व तशा प्रकारानें लोक मुक्त झाले असा पुराणांतरी मन:कल्पित कथाहि त्यांनीं लिहून ठेविल्या आहेत; जर रुद्राक्षासारखें एखाद्या वृक्षाचें फळ शरीरावर ठेवलें किंवा भस्म अंगावर लावल्यानें माणसें मुक्तीला गेलीं तर राखेमध्यें लोळणारी गाढवें व रुद्राक्षांच्या वनांत राहून त्यांची उपजीविका करणारे भिल्ल व रानवट लोक हे सर्व मुक्तीलाच जातील ! मग योगाभ्यासाची खटपट कशाला पाहिजे ? (प्रश्न) कालाग्निरुद्रोपनिषदामध्यें भस्म धारण करावें असें सांगितलें आहे. 'त्र्यायुषं जमदग्ने:' या यजुर्वेदाच्या वचनावरून भस्मधारण सिद्ध होत आहे. पुराणांमध्यें असें लिहिलें आहे कीं, महादेवाच्या डोळयांतून जो अश्रुपात झाला त्यापासून जो वृक्ष बनला त्याला रुद्राक्ष असें म्हणतात. म्हणून त्यांचीं फळें धारण करण्यांत अत्यंत पुण्य आहे; जरी कोणी आपल्या शरीरावर एक रुद्राक्ष धारण केला तरीहि त्याला यमाचें व नरकाचें भय राहणार नाहीं हें पुराणांतरीचें विधान सर्वच खोटें काय ? (उत्तर) होय. हें सर्व खोटें आहे. कालग्निरुद्रोपनिषद् कोणीतरी राख धारण करणाऱ्यानें रचून लिहिलें आहे; कारण त्यातील **'यस्य प्रथमा रेखा सा भूर्लोक:'** इत्यादि वचनें अनर्थकारक व अवैदिक आहेत; कारण जी रेषा प्रत्येक दिवशीं आपल्या हातानें बनविली जाते ती भूलोकाची वाचक कशी होईल ! व 'त्र्यायुषं जमदग्ने:०' हा वेदमंत्र भस्मधारणविधि सांगत नसून त्याचा अर्थ अगदी निराळा आहे. पहा. (चक्षुर्वै जमदग्निः ॥ शतप० ब्रा० ॥) असा जमदग्नि शब्दाचा अर्थ शतपथामध्यें दिला आहे. वरील यजुर्वेदमंत्राचा अर्थ पुढें दिल्याप्रमाणें आहे. 'हे परमेश्वर ! माझ्या नेत्रांची ज्योति (त्र्यायुषम्) त्रिगुणित अर्थात् तीनशें वर्षेपर्यंत राहो व मीहि अशीं धर्मकृत्यें करीन कीं, ज्यायोगानें माझ्या दृष्टीचा नाश होणार नाहीं.' महाराज ! हा किती मूर्खपणा आहे कीं, डोळ्यां-तील अश्रुपातापासून वृक्ष उत्पन्न झाला असें मानावें ! काय सृष्टिनियमांविरुद्ध कोणी कांहीं करूं शकतो ? तात्पर्य हें

त्या पुराणान्तरीं लिहिलें आहे कीं, रुद्राक्ष, भस्म, तुळशी, कमलाक्ष, दर्भ, चंदन वगैरेचें धारण करावें, हें सर्व जंगली व पशुवत् मनुष्यांचें काम आहे. या वाममार्गी व शैवादि मिथ्याचारी मतवाल्या लोकांचें कोणी ऐकूं नये. हीं कर्में अवैदिक असल्यामुळें त्याज्य आहेत. विचारी माणसें शास्त्राध्ययन करून या कपोलकल्पित गोष्टींचा त्याग करतात व शुद्ध वैदिक कर्माचा अवलंब करून मुक्ति मिळवितात; जर रुद्राक्ष धारण करण्यानें यमाचें दूत भितात तर त्यांस पोलीसाचे शिपाई सुद्धां भ्याले पाहिजेत; जर आपण पाहतों कीं, भस्म व रुद्राक्ष धारण करणाऱ्याला कुत्रा, सिंह, सर्प, विंचू, माशी, मच्छर हे भीत नाहींत; तर त्याला न्यायाधीश यमराजाचे दूत भितील हें कोण विचारी मनुष्य खरें मानील?

ज्याप्रमाणें शाक्त व शैव हे मार्ग अवैदिक आहेत, त्याचप्रमाणें वैष्णवमतहि अवैदिकच आहे; यावर कोणी असें म्हणतील कीं, '**नमस्ते रुद्र मन्यवे ।' 'वैष्णवमासि ।' 'वामनाय च' 'गणानां त्वा गणपतिं हवामहे । 'भगवती भुयाः ।' 'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ।'** इत्यादि वचनांवरून शैव, वैष्णव, गाणपत्य, शाक्त वगैरे मतें सिद्ध होत आहेत; पण वास्तविक तसें नाहीं. ही वाक्यें या संप्रदायांना साधक नसून बाधक आहेत. 'रुद्र' शब्दाचे अर्थ 'परमेश्वर, प्राणदिवायु, जीव, अग्नि, इत्यादि आहेत.' 'नम' शब्दाचा अर्थ '**नमस्कार**' असा आहे व 'अन्न' असाहि आहे. (पहा निघं० २।७॥) परमेश्वर हा दुष्टांवर क्रोध करून त्यांस रडविणारा आहे म्हणून त्यांस रुद्र असें म्हणतात; या परमेश्वराला सर्वांनीं नमस्कार करावा. त्याप्रमाणें प्राण व जठराग्नि यांना अन्न द्यावें. जो मंगल करणारा-सर्व संसाराचें कल्याण करणारा परमात्मा आहे त्याला सर्वांनीं नमन करावें. '**शिवस्य परमेश्वरस्यायं भक्तः शैवः ।' 'विष्णोः सर्वव्यापकस्य परमात्मनोऽयं भक्तः वैष्णवः ।' 'गणपतेः सकलजगत्स्वामिनोऽयं सेवकः गाणपतः' 'भगवत्या वाण्या अयं सेवकः भागवतः ।' 'सूर्यस्य चराचरात्मनोऽयं सेवकः सौरः ।**' रुद्र, शिव, विष्णु, गणपति, सूर्य वगैरे हीं नावें परमेश्वराची आहेत व तीं त्याचे निरनिराळे गुण दाखवीत आहेत. भगवती, देवी शक्ति हीं नांवें वाणीचीं आहेत. असें असतांहि तीं नांवें निरनिराळी आहेत व त्या देवता निरनिराळ्या आहेत, असा भिन्न भाव समजून या अविचारी लोकांनीं आपआपसांत विनाकारण भांडणें व तंटे मात्र उत्पन्न केले आहेत. जर हे लोक शुद्ध वैदिकसिद्धांत लक्ष देऊन पाहतील तर त्यांस एकच परमेश्वर सर्वांचा उपास्य आहे असें वाटेल. हा झगडा अज्ञानानें यांनीं उत्पन्न केला आहे. जसें:-कोणा एका बैराग्याजवळ दोन चेले होते. ते प्रतिदिवशीं गुरूचे पाय दाबीत असत. एकानें डाव्या पायाची सेवा करावी व दुसऱ्यानें उजव्या पायाची सेवा करावी असा त्यांनीं ठराव केला होता. एके दिवशीं असें झालें कीं, एक चेला बाजारांत कांहीं विकत घेण्यासाठीं गेला होता व दुसरा गुरूचा पाय दाबीत होता. इतक्यांत गुरू सहज कुशीं परतले त्या बरोबर जो पाय शिष्य दाबीत होता त्यावर दुसरा पाय येऊन पडला. तेव्हां त्या शिष्याला फार क्रोध आला व त्यानें त्या गुरुबंधूनें ज्याची सेवा करावयाची तो पाय मला पूज्य असलेल्या पायावर आला म्हणून त्या पायाला आपल्या जवळच्या काठीनें येथेच्छ बडविलें. गुरु म्हणाला ! अरे दुष्टा ! तूं हें काय करीत आहेस ? चेला म्हणाला, गुरु महाराज ! मी तुमच्या पूज्य चरणाची सेवा करीत असता त्यावर हा पाय कां आला ? इतक्यांत बाजारांत गेलेला दुसरा चेला आला व आपल्या भांव्याचा पाय दाबूं लागला; पहातो तों तो पाय सुजलेला आहे. तेव्हां तो गुरूला म्हणाला कीं, गुरूजी ! माझ्या सेव्य चरणाला हें काय झालें ? गुरूनें सर्व वृत्तान्त त्याला सांगितला. तेव्हां त्या मूर्खानें तरी कांहीं विचार करावा ! पण कांहीं विचार न करतां, त्यानें आपला दंडा हातांत घेतला व दुसऱ्या चेल्यानें दाबावयाच्या पायावर जोरानें मारला. तेव्हां गुरु घाबरला व ओरडूं लागला. पण त्यांकडे चेल्यांचें लक्ष्य गेलें नाहीं. ते माझ्या सेव्य पायावर दुसऱ्यानें काठी मारली म्हणून दुसऱ्याच्या सेव्य पायावर काठ्या मारूं लागले. गुरु बिचारा म्हातारा केविलवाण्या स्वरानें ओरडूं लागला तरी त्यांचें मारणें चाललेंच होतें ! हा गलबला एकून बरेच लोक आले व साधूला विचारू लागले कीं, काय झालें ? त्यांतील बुद्धिमान् पुरुषानें त्या दोनहि चेल्यांच्या मारांतून त्या साधूला एका बाजूला केलें व तो त्या चेल्यांना म्हणाला, पापानों ! हे दोनहि पाय तुमच्या पूज्य गुरूचेच आहेत.

दोनहि पायांची सेवा केल्यानें ती गुरूचीच सेवा केल्यासारखें होतें व त्याच्या एखाद्या पायाला दुःख देण्यानें गुरूला दुःख होतें, म्हणुन गुरूला सेव्य मानून त्याला सुख होईल असें करा.'

ज्याप्रमाणें या दोन चेल्यांनीं अभिमानानें त्या गुरूची दशा केली त्याचप्रमाणें या मतवाल्यांनीं आपल्या अभिमानानें परमेश्वराची स्थिति केली आहे. अखंड सच्चिदानंदस्वरूप परमेश्वराचीं अनेक गुण दाखविणारीं विष्णुरुद्रादि अनेक नामें आहेत. त्या सर्वांचा परमात्मपर अर्थ होतो; (पहा पूर्वार्ध, प्रथम समुल्लास पृ. १३-२४) तो न घेतां शैव, शाक्त, वैष्णवादि संप्रदाय बनवून हे अभिमानी लोक दुसऱ्या नांवांनीं व्यक्त होणाऱ्या ईश्वराची निन्दा करून आपली अधोगति करून घेत आहेत; हे मन्दमति लोक आपल्या बुद्धीचा थोडासा विकास करून विचार करीत नाहींत. थोड्याशा विचाराअन्तीं त्यांस असेंच वाटेल कीं, विष्णु, रुद्र शिव आदिक नांवें त्याच एका अद्वितीय, सर्वांतर्यामी, सर्वानियंत्या जगदीश्वराचे गुण कर्म व स्वभाव दाखवीत आहेत. असा खरा प्रकार असतां अज्ञानानें स्वतः युक्त होऊन व त्यांत हवीं तशीं मतमतान्तरें उभारून परस्परांत द्वेष उत्पन्न करणाऱ्यांवर परमेश्वराचा कोप होणार नाहीं काय?

तापः पुण्ड्रं तथा नाम माला मन्त्रस्तथैव च । अमी हि पञ्च संस्काराः परमैकान्तिहेतवः ॥ १ ॥
अतप्ततनूर्न तदामो अश्नुते ॥ इति श्रुतेः ॥ रामानुजपटलपद्धतौ ॥

शंख, चक्र, गदा पद्म इत्यादि चिन्हांनीं युक्त असणाऱ्या मुद्रांना अग्नींमध्यें तापवून वैष्णव भुजांवर डाग देतात व नंतर ती मुद्रा दुधामध्यें निववितात. कोणी मनुष्यें तें दूध मोठ्या भक्तीनें पितात! आतां पहा अशा रीतीनें मनुष्यांच्या अंगावर डाग देऊन तीच मुद्रा न धुतां दुधांत घातल्यामुळें मनुष्याच्या मांसाची घाण त्या दुधाला येत असेल. वैष्णव लोक समजतात कीं अशा तप्तमुद्राधारण करण्यानें मनुष्य मुक्त होतो! शंखचक्रादि तप्तमुद्रा जो धारण करीत नाहीं, त्याला परमेश्वर प्राप्ति होणें नाहीं असें हे वेडे लोक समजतात. ज्याचें शरीर कच्चें अर्थात् तप्तमुद्रा घेतलेलें नाहीं त्याला तें सुख मिळत नाहीं असें म्हणतात व त्या म्हणण्यांला वेदाचा आधार देतात. पण बिचाऱ्यांना वेदाचा अर्थ समजतो आहे कोठें? (अतप्ततनूर्न तदामो अश्नुते) याचा अर्थ 'ज्यानें धर्माचरणादि तप केलें नाहीं त्याला परमात्मप्राप्तीपासून होणारें अनुपम सुख मिळणार नाहीं' असा आहे. तो न पाहतां यांनीं 'अतप्ततनूः' शब्दाचा अर्थ *'तप्तमुद्रा न धारण केलेलें शरीर'* असा या स्वार्थी लोकांनीं केला! याचें आश्चर्य करावें तेवढें थोडेंच. ज्याप्रमाणें गळ्यांतील किंवा कमरेतील पट्ट्यांवरुन हा राजपुरुष आहे असें लोक समजतात व त्याला ते भितात, त्याचप्रमाणें या तप्तमुद्रांचे डाग अंगावर असलेले पाहून हा मनुष्य विष्णूकडचा आहे असें जाणून त्याला यम व त्याचे दूत फार घाबरतात!! पहाः—

दोहा—बाना बड़ा दयालका, तिलक छाप और माल । यम डरपै कालू कहै, भय माने भूपाल ॥

'परमेश्वराचा तिलक, छाप माळ धारण करणें हें फार महत्त्वाचें आहे. त्याच्या योगानें यमराज भयभीत होतात व राजाहि त्याला भीत असतो.' याप्रमाणें मूर्खासारखे छाप मारून मोक्ष मिळतो असें हे समजतात. पर असे डाग देऊन मोक्ष मिळेल तर पातकी जगांत राहील कशाला? अशी ही लीळा अगाध आहे. ज्ञानेंचसबाची दवनति केलेली आहे. जसे हे (मुद्रा) तप्तमुद्राधारणानें मोक्ष मानतात, त्याचप्रमाणें (पुण्ड्र) त्रिशूलाप्रमाणें डोक्यावर गंध लावणें; (नाम) नारायणदास विष्णुदास वगैरे दासान्त नामें ठेवणें, (माळा) कमळाक्षांची माळा वाळगणें (मन्त्र) 'ओम् नमो नारायणाय' या मंत्राचा जप करणें या प्रकारांनीं मोक्ष मिळतो असें हे वेडे लोक समजत असतात. यांना मन्त्र म्हणजे काय हें न समजल्यामुळें यांनीं 'ओम् नमो नारायणाय।' 'श्रीमन्नारायणचरणं शरणं प्रपद्ये।' 'श्रीमते नारायणाय नमः' 'श्रीमते रामानुजाय नमः।' असे मन्त्र करून ठेवलेले आहेत व ते श्रीमान् व धनाढ्य लोकांना जपावयास सांगत असतात. हीहि एक दुकानदारीच आहे. यांमध्यें मन्त्रत्व मुळींच नाहीं, पण हे मन्त्र आहेत असें हे लोकांना सांगतात व त्याचा उपदेश करण्यासाठीं लोकांकडून पैसे घेतात व हीं अक्षरें सांगतात. त्या भोळ्या बिचाऱ्यांस हें सर्व खरें वाटतें व ते फसतात! या पांच संस्कारांना चक्रांकित मुक्ति असें हे समजतात. या मन्त्रांचा अर्थ—

'मी नारायणाला नमस्कार करतों. मी लक्ष्मीयुक्त नारायणाला नमस्कार करतो, मी श्रीयुत अर्थात् शोभायुक्त नारायणाला नमस्कार करतो. अशा तऱ्हेचा आहे. त्यांत काय मन्त्रात्व आहे बरें ? असो. ज्याप्रमाणें वाममार्गी लोकांनीं पांच प्रकार मुक्तीला हेतु आहेत असें सांगितलें आहे त्याचप्रमाणें या लोकांनीं हे पांच संस्कार चक्रांकित मुक्तीला हेतु आहेत असें सांगितलें आहे. तप्तमुद्रा घेण्याला जो वेदमन्त्र हे प्रमाण म्हणून देतात तो व त्याचा अर्थ पुढें दिला आहे:-

**पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते प्रभुर्गात्राणि पर्येषि विश्वतः । अतप्ततनूर्न तदामो अश्नुते शृतास इद्वहन्तस्तत्समाशत ॥१॥ तपोष्पवित्रं दिवस्पदे ॥२॥ ऋ० म० ६।८३ मं० १।२ ॥**

**अर्थ**-हे ( ब्रह्मणस्पते ) ब्रह्माण्डाचें व वेदांचें पालन करणाऱ्या सर्वशक्तिमान् परमेश्वरा ! (ते) तुझ्या व्याप्तीनें सर्व संसारांतील पदार्थ व्याप्त झाले आहेत. तूं या सर्व विश्वाचा ( प्रभु ) स्वामी आहेस व व्यापक असून परम पवित्र आहेस. जो ब्रह्मचर्य, सत्य भाषण, शमदम, योगाभ्यास, जितेन्द्रियत्व, सत्संगादि तपश्चर्या करीत नसल्यामुळें अपरिपक्क अन्तःकरणयुक्त आत्मा असतो, त्याला तुझी प्राप्ति होत नाहीं. पण जे पूर्वोक्त तप करतात व त्यामुळें शुद्ध होतात, त्यांना तुझी प्राप्ति होते. ॥१॥ जे प्रकाशस्वरुप परमेश्वराच्या सृष्टीमध्यें विस्तृत पवित्राचरणरुपी तप करतात, ते परमेश्वराला प्राप्त होतात. ॥२॥ आतां वाचकांनीच विचार करावा कीं, रामानुजीयादि लोक या मन्त्रांवरुन तप्तमुद्रा धारण कराव्या असें कसें प्रतिपादितात ? यावरून विचार करा कीं, ते विद्वान् होते कीं अविद्वान् ! जर कोणी म्हणतील कीं ते विद्वान् होते, तर त्यांनीं असे असंभवनीय अर्थ कसे केले ? 'अतप्ततनूः' शब्दाचा 'अतप्तभुजैकदेशः' असा अर्थ होत नाहीं तर 'सर्व शरीर ज्याचें तप्त झालें नाहीं' असा होतो व जर शरीर डागून घ्यावें असा मन्त्राचा आशय मानावयाचा असेल तर सर्व शरीर डागावें लागेल. पण सर्व शरीर भाजून घेण्यास ते लोक तयार आहेत काय ? बरें सर्व शरीर जाळलें तरी तें वरील मन्त्राच्या विरुद्धच होणार. कारण त्यामधील 'तप्त' या शब्दाचा अर्थ डागणें किंवा जाळणें असा नसून सत्यभाषण धर्माचरणादि पवित्र कर्मं करणें असा आहे पहाः—

**ऋतं तपः सत्यं तपः श्रुतं तपो दमस्तपः ॥** तैत्ति. १०।८॥

यथार्थ शुद्ध भाव, सत्य मानणें, सत्य बोलणें,सत्य करणें, मनाला अधर्मापासून निवृत्त करणें,बाह्य इन्द्रियांला अन्यायाचरणापासून परावृत्त करणें, शरीर, इन्द्रियें व मन यांच्याकडून शुभकर्में करविणें, वेदादि सत्य विद्या शिकणें व शिकविणें, वेदानुसार आचरण करणें इत्यादि उत्तम धर्मयुक्त कामाला तप असें म्हणतात. धातूचे छाप तापवून चमडी जाळणें तप नव्हें, याचा येथें विचार करावा. पहा. तप्तमुद्राधारी आपणास मोठे वैष्णव समजतात. पण आपल्या कुकर्माकडे दुर्लक्ष्य करतात. हें वैष्णवमत 'शठकोप' नामक मनुष्यानें सुरू केलें असें पूर्वी दाखविलेंच आहे, त्यापूर्वी तें नव्हतें. चक्रांकित लोकांच्या भक्तमाला ग्रंथांत असें लिहिले आहे कीं. **'विक्रीय शूर्पं विचचार योगी ।'** शठकोप नामक कंजर सूप विकून योगी होऊन संचार करीत होता ! इत्यादि इतिहास चक्रांकित ग्रन्थांत दिलेला आहे. हा या मताचा उत्पादक कंजर जातीमध्यें उत्पन्न झाल्याकारणानें तत्कालीन ब्राह्मणांनीं त्याला शास्त्रें शिकण्यास मना केलें व ते त्याचा तिरस्कार करीत असत; म्हणून त्यानें संतापानें ब्राह्मणांच्या विरुद्ध संप्रदाय सुरू केला व त्या संप्रदायाची चिन्हें म्हणून तिलक चक्रादि बनविली. हीं सर्व वेदाशास्त्रविरुद्ध आहेत हें विचारी वाचकांस निराळें सांगणें नको. त्याचा चेला चण्डालकुलोत्पन्न मुनिवाहन व त्याचा शिष्य यवनकुलोत्पन्न यावनाचार्य होऊन गेला; पुढें यालाच यामुनाचार्य असें म्हणूं लागले ! याचा शिष्य रामानुज हा ब्राह्मणकुलांत उत्पन्न झाला होता. हा चक्रांकित होऊन संप्रदायप्रवर्तक बनला. याच्यापूर्वी कांहीं ग्रन्थ प्राकृतांत बनविलेले होते. रामानुजानें संस्कृतामध्यें ग्रन्थ तयार करून आपल्या संप्रदायाला व्यवस्थित स्वरुप आणण्याची खटपट केली. पण जें मूळचेंच अवैदिक तें नीट कसें होणार ? यानें संस्कृतांत श्लोकबद्ध ग्रन्थ केले व वेदान्तदर्शनावर व उपनिषदांवर श्रीशंकराचार्यांच्या मताविरुद्ध टीका केली व त्यांची बरीचशी निन्दा केली. शंकराचार्यांचें मत जीवब्रह्मैक्य व जगत्प्रपंच मिथ्या असें होतें, त्याविरुद्ध रामानुजाचें मत जीव, ब्रह्म व माया हे तीन पदार्थ अनादि व नित्य आहेत असें होतें, शंकराचार्यांच्या मतांत ब्रह्मातिरिक्त जीव जगाला कारण न मानलें हें ठीक नाहीं. तसेंच रामानुजाच्या मतांत जीव व माया यांसहित परमेश्वर एक आहे असें

मानलें जातें म्हणून त्याला विशिष्टाद्वैती म्हटलेलें आहे. जीव ईश्वर, व माया (प्रकृति) या तीनहि वस्तूंना नित्य मानून पुनः त्या तीहींला एक म्हणून त्याचें नांव अद्वैत ठेवणें हें सर्वथा गैर आहे. हीं दोनहि मतें अवैदिक आहेत, पण त्यांत शंकराचार्यांचें इतरांइतकें दोषी नाहीं. शंकराचार्य जीवनब्रह्मैक्य मानतात व जगत्कारण मिथ्या मानतात हें कां सदोष आहे यांचें दिग्दर्शन पूर्वी केलेंच आहे. रामानुजाचार्य जीव व मायासहित ईश्वर व प्रकृति यांना मानीत असूनहि अद्वैती मानतात व आपणास विशिष्टाद्वैती समजतात हें त्यांतल्या त्यांत आश्चर्य होय. यांच्या या विशिष्टाद्वैतामध्यें जीव सर्वथा परतन्त्र आहे; कंठी, माला, तिलक धारण करण्यानें व मूर्तिपूजा करण्यानें ईशप्राप्ति होते वगैरे अवैदिक मतें असल्यानें तें जास्त भ्रष्ट आहेत. जशी या चक्रांकितादि मतांमध्यें अनेक अवैदिक मतांची भेसळ झाल्यामुळें तीं जास्त वेदविरुद्ध आहेत.तसें शंकराचार्यांचें नाहीं. कारण त्यांत मूर्तिपूजा वगैरे अवैदिक प्रकार नाहींत.

(प्रश्न) मूर्तिपूजा केव्हांपासून सुरू झाली ? (उत्तर) जैनी लोकांच्या काळापासून. (प्रश्न) जैनी लोकांनीं कोठून आणली ? (उत्तर) आपल्या मूर्खपणापासून. (प्रश्न) जैनी लोक असें म्हणतात कीं, शांत व ध्यानावस्थित मूर्ति पाहिल्यानें आपल्या जीवावरहि तसाच चांगला परिणाम होत असतो. हें खरें नाहीं काय ? (उत्तर) जीव चेतन आहे व मूर्ति जड आहे. काय मूर्तिप्रमाणें जीवहि जड होईल ? ही तुमची मूर्तिपूजा केवळ पाखंडमत आहे. ही जैनी लोकांनीं सुरू केली आहे. मूर्तिपूजेचें परीक्षण बाराव्या समुल्लासामध्यें करण्यांत येईल. (प्रश्न) शाक्त, शैव, वैष्णवादिकांनीं मूर्ति बनविण्यांत जैनी लोकांचें अनुकरण केलेलें दिसत नाहीं. कारण जैनमूर्तिप्रमाणें वैष्णवादिकांच्या मूर्ति नाहींत. (उत्तर) बरोबर आहे; जर जैनी लोकांच्या तीर्थकरांच्या मूर्तिसारख्याच मूर्ति यांनीं बनविल्या असत्या तर हेहि जैनच झाले असते. म्हणून यांनीं आपल्या मूर्ति निराळया केल्या; कारण जैनांशीं विरोध करणें हें यांचें काम होतें. जैन मूर्ति विरक्त, ध्यानावस्थित व नागव्या अशा असतात, तर या वैष्णवांच्या शृंगारयुक्त, स्त्रीसहित, रंगरागभोग यांनीं युक्त, विषयी, अशा उभ्या, बसलेल्या किंवा निजलेल्या असतात ! जैन लोक शंख, घंटा, झांज वगैरे वाद्यें कमीं वाजवितात. पण हे वैष्णवादिक फारच वाद्यांचा गोंगाट करीत असतात. असा जैनांशीं विरुद्ध प्रकार करण्यानें बरेच लोक जैनी लोकांच्या जाळयांतून फसून यांच्या जाळयांत पडले. ते व्यासादि महर्षींच्या नांवावर लादलेल्या नवीन व स्वकपोलकल्पित ग्रंथांतील गोष्टी 'पुराणें' म्हणून सांगूं लागले व आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं अनेक युक्त्या करूं लागले ! दगडाची मूर्ति वगैरे बनवून गुप्तपणानें पर्वतांवर किंवा दुसऱ्या कोठें तरी आधीं पुरून ठेवावी व नंतर आपल्या चेल्यांकडून चोहोंकडे असें प्रसिद्ध करावें कीं, आपणांस रात्रौ स्वप्न पडलें व त्यांत महादेव, पार्वती, राधा, कृष्ण, सीता राम, लक्ष्मी, नारायण, भैरव, हनुमान किंवा दुसरा कोणी तरी देव यांनें येऊन सांगितलें कीं, मी अमुक ठिकाणीं आहे. मला तेथून घेऊन ये, मंदिर, बांध व माझा पुजारी तूं हो ! म्हणजे तुला इच्छित फल देईन. मूर्ख श्रीमान् लोकांना या लीला खऱ्या वाटत व ते विचारीत कीं, महाराज ! अशी मूर्ति कोठें आहे ? तेव्हां तो भोंदू सांगतो कीं, अमुक पहाडावर आहे. माझ्या बरोबर या म्हणजे मी दाखवितों. तेव्हां ते सर्व आंधळे त्या भोंदूच्या पाठीमागून जाऊं लागतात व तेथें असलेली मूर्ति पाहून सर्व आश्चर्यचकित होऊन त्यांच्या पायांवर पडून म्हणतात कीं हे महाराज ! तुम्हांवर या देवाची अनंत कृपा आहे. आतां आपण या देवाला घेऊन जाऊं. आम्ही तुम्हाला मंदिर बांधून देतों, त्यामध्यें हिची स्थापना करा व आपणच पूजा करा. म्हणजे या मूर्तीचें आम्हांलाहि दर्शन स्पर्शन करून इच्छित मनकामना पूर्ण करून घेण्यास उत्तम संधि मिळेल. असा प्रकार एकानें केलेला पाहून अनेक स्वार्थी लोक भोळया लोकांना कपटानें फसवून देवांच्या नांवाखालीं अनाचार व लूट करूं लागले. (प्रश्न) परमेश्वर निराकार आहे हें आम्हीहि कबूल करतों. पण निराकाराचें ध्यान करणें अशक्य असल्यामुळें कांहींतरी मूर्ति ध्यानासाठीं पुढें असणें आवश्यक नाहीं काय ? निदान कांहीं न करण्यापेक्षां मूर्तीच्यां पुढें जाऊन हात जोडून परमेश्वराचें स्मरण करणें व त्याचें नामस्मरण करणें योग्य नाहीं काय ? (उत्तर) ज्या अर्थीं परमेश्वर निराकार व सर्वव्यापक आहे त्या अर्थीं त्याची मूर्ति बनूं शकत नाहीं व जर मूर्तीकडे पाहून परमेश्वराचें स्मरण होतें असें आपण समजत आहां तर परमेश्वरानें केलेल्या पृथ्वी, जल, अग्नि, वायु, सूर्य इत्यादि अनेक अद्भुत पदार्थांच्या दर्शनानें व त्यांतील विलक्षण रचना पाहण्यानें परमेश्वराचें स्मरण होणार नाहीं काय ?

परमेश्वररचित पृथ्वी, पहाड, पर्वत वगैरे महान् मूर्ति आहेत, ज्यांच्याकडे पाहिलें असतां त्या सर्व शक्तिमान् परमेश्वराची तत्काल कल्पना मनांत येते. मूर्तीला पाहिल्याबरोबर परमेश्वराची कल्पना होते असें जें तुम्ही म्हणतां तें सर्व खोटें आहे. कारण मूर्ति पाहिल्याबरोबर ती रचणाऱ्याच्या कौशल्याची कल्पना होते. बरें तें असो. मूर्ति पाहिल्यानेंच परमेश्वराची कल्पना होते असें जें तुम्ही म्हणतां त्यावरून असें होतें कीं, मूर्ति समोर नसली तर परमेश्वराची कल्पना होणार नाहीं व त्यामुळें येथें परमेश्वर नाहीं, असें समजून लोक मूर्तीच्या आड चोरी, जारकर्म वगैरें कुकर्में करण्यास प्रवृत्त होतात. कारण ज्याला वाटतें कीं, मूर्ति हा देव, तो असेंच समजणार कीं, जेथें मूर्ति नाहीं तेथें देव नाहीं व अशी त्याची खात्री झाल्यानें तो कुकर्में करण्यास प्रवृत्त झाला तर त्यांत काय आश्चर्य ? इत्यादि अनेक दोष मूर्तीच्या पूजेपासून होत असतात. आतां पहा, जे पाषाणमूर्तीला न मानतां सर्वव्यापक सर्वशक्तिमान् परमेश्वर सर्व ठिकाणीं आहे व तो न्यायकारी आहे असें मानतात, त्यांना असें वाटतें कीं, आपण कोठेंहि कांहीं करूं लागलों तर तें परमेश्वर पाहतो, कारण तो सर्वत्र आहे. तो आपलीं बरीं वाईट कामें पाहतो. परमेश्वर सर्वत्र आहे असें मानणारा शारीरिक कुकर्में तर करूं शकतच नाहीं; पण मानसिक कुकल्पनाहि त्याला सोडणें भाग पडतें, कारण परमेश्वर मनांतहि आहे. आपण मन किंवा वाणी यांच्याकडून कांहीं कुकर्म केलें तर सर्वांतर्यामी परमेश्वर न्यायकारी असल्यामुळें तो आपणास शासन करीलच, केव्हांहि सोडणार नाहीं. याचप्रमाणें सर्वव्यापक परमेश्वराच्या उपासनेपासून अनेक लाभ आहेत. असो. त्याचप्रमाणें तुम्ही करतां तशा नामस्मरणापासूनहि कांहीं लाभ नाहींत. साखर साखर असें तोडानें म्हटलें तरी तोंड गोड होणार नाहीं व निंबाचा जप केला तरी कांहीं तोंड कडू होणार नाहीं. तात्पर्य, नुसतें नांव जपत राहिल्यानें कांहींएक होणें नाहीं. (प्र०) काय नांव घेणें व्यर्थ आहे ? सर्व पुराणामध्यें नाममहात्म्य फारच लिहिलेलें आहे तें सर्व खोटेंच काय ? (उ०) नामस्मरण करण्याची जी तुमची रीति आहे ती खोटी आहे. (प्र०) कां ? (उ०) अवैदिक आहे म्हणून. (प्र०) बरें तर तुम्हीच आम्हांला सांगा पाहूं वैदिक रीतीनें नामस्मरण कसें करावें तें ? (उ०) वैदिक पद्धतीनें नामस्मरण करण्याची रीति अशी आहे पहा. 'न्यायकर्ता' हें एक ईश्वराचें नांव आहे. कारण ईश्वर पक्षपातरहित होऊन सर्वांचा यथायोग्य न्याय करतो. हा त्या शब्दाचा अर्थ लक्षांत ठेवून आपणहि न्याययुक्त व्यवहारच सदासर्वदा करीत राहणें, केव्हांहि अन्याय न करणें इत्यादि प्रकारें परमेश्वराच्या नांवाचा अर्थ लक्षांत आणून त्यांतील परमेश्वराच्या गुणांचें मनन करून ते गुण अंगीं आणण्याचा झटून प्रयत्न केल्यास एका नामानेंहि मनुष्याचें कोटकल्याण होईल. तसें नुसतें नांव तोडानें कोट वेळ उच्चारलें तरी कांहींएक होणें नाहीं.

(प्र०) आम्ही जाणतों कीं, परमेश्वर निराकार आहे. पण त्यानें शिव, विष्णु, गणेश, सूर्य, देवी वगैरेंचीं शरीरें धारण करून व रामकृष्णादि अवतार धरून सृष्टीचें पालन केलें; त्यामुळें अवतारांच्या मूर्ति बनूं शकतात व अशा मूर्ति बनविण्यांत काय हानि आहे ? (उ०) हो, फार हानि आहे. करण **'अज एकपात्' 'अकायः'** इत्यादि विशेषणांनीं परमेश्वर जन्ममरणरहित व निराकार आहे असें वेदामध्यें प्रतिपादलें आहे. ईश्वर अवतार घेतो असें म्हणण्यास वेदांत मुळींच आधार नाहीं. व युक्तीनेंहि परमेश्वर अवतार घेतो असें म्हणणारांचें खंडन होऊं शकतें. पहा. जो आकाशवत् सर्वव्यापक आहे, अनंत असून सुखदुःखादि द्वंद्वातीत आहे व अदृश्य आहे तो लहानशा गर्भाशयामध्यें कसा येऊं शकेल ? गर्भामध्यें येणें किंवा शरीरांतून जाणें हें एकदेशीय पदार्थाच्या ठिकाणीच संभवतें. जो सर्वगत, अचल व अदृश्य आहे त्याचा अवतार होतो व तो शरीरधारी होतो असें मानणें म्हणजे वंध्यापुत्राचें लग्न होऊन त्याला पुत्रपौत्र झाले हें खरें मानण्यासारखें आहे. (प्र०) अहो ! परमेश्वर व्यापक असल्यामुळें तो मूर्तीमध्येंहि आहे. मग मूर्तीमध्यें असलेल्या परमेश्वराची भावना मूर्तीमध्यें करण्यास किंवा परमेश्वराची भावना कोणत्याहि ठिकाणीं करण्यास काय हरकत आहे ? पहाः— **'न काष्ठे विद्यते देवो न पाषाण न मृण्मये ॥ भावे हि विद्यते देवो तस्माद्भावो हि कारणम् ॥१॥'** परमेश्वर काष्ठ, पाषाण किंवा मृण्मयमूर्ति यांत नसतो तर तो भावामध्यें असतो, जेथें भाव असतो, तेथें देव असतो. (उ०) अहो, परमेश्वर सर्वव्यापक असतांना त्याची एका वस्तूच्या ठिकाणीं भावना करणें व इतरत्र न करणें हेंच मुळीं अज्ञानाचें द्योतक आहे. हें एखाद्या चक्रवर्ती राजाला चक्रवर्ती राजा न

समजतां त्याला एका झोंपडीचा मालक समजण्यासारखें आहे. **परमेश्वराची भावना तो सर्वत्र आहे अशीच केली पाहिजे.** तरच तें ज्ञान व ती भावना; असें न करतां कोणत्या तरी एका वस्तूमध्यें त्याची भावना करणें हें त्याचा अपमान करण्यासारखें आहे. भक्तानें परमेश्वराचा असा अपमान करणें कधींहि योग्य नाहीं, जर तुम्ही परमेश्वर सर्वव्यापक मानतां तर फुलझाडांवरचीं फुलें तोडून मूर्तीवर कां घालतां ? काय त्या फुलांमध्यें व झाडामध्यें परमेश्वर नाहीं ? व जर तो तेथें आहे तर तेथील फूल काढून दुसऱ्या ठिकाणीं मूर्तीवर घालणें हें मूळच्या फुलाच्या जागेमध्यें परमेश्वर नाहीं असें म्हणण्यासारखेंच नाहीं काय ? चंदन उगाळून मूर्तीला लावण्याचें काय प्रयोजन ? धूप मूर्तीसाठीं जाळण्यानें काय होतें ? घंटा, झांज, टाळ, पखवाज वाजवून कोलाहल करण्याचें कारण काय ? चंदनामध्यें परमेश्वर आहे व परमेश्वराच्या बाहेर चंदन नाहीं, मग ही अज्ञानी माणसासारखी खटपट कशाला पाहिजे ? आपल्या हातांत परमेश्वर आहे मग मूर्तीला हात जोडण्याचे कारण काय ? आपल्या डोक्यांत परमेश्वर आहे मग मूर्तीच्या पुढें डोके वाकवितां कशाला अन्नामध्यें परमेश्वर भरलेला असतांहि मूर्तीला नैवेद्य कशाला अर्पण करतां ? पाण्यामध्यें परमेश्वर असतांहि मूर्तीवर पाणी घालण्याचें कारण काय ? परमेश्वर अशुद्ध असतो म्हणून तुम्ही त्याला पाण्यानें शुद्ध करतां काय ? परमेश्वर नित्यशुद्ध आहे हें तुम्ही विसरता काय?जर विसरत नाहीं तर परमेश्वराला स्नान कशाला ? परमेश्वर नित्यतृप्त आहे असें असतांहि त्याला नैवेद्य समर्पण करतां यावरून त्याची ओळखच या कृत्यानें तुम्हांला झाली नाहीं असें म्हणावें लागतें. परमेश्वर सर्व पदार्थांमध्यें आहे ही भावना धरा. जर तुम्ही व्यापकाची पूजा करीत असतां तर पाषाणादि मूर्तीवर गंधफूल चढविण्यांत काय लाभ ? व जर त्या त्या पदार्थांची पूजा करीत असतां तर आपण परमेश्वरांची पूजा करतो असें खोटें कां बोलतां ? आम्ही पाषाणादिकांचे पुजारी आहों असें स्पष्ट कां नाहीं सांगत ? आतां तुम्ही म्हणतां कीं, भाव असेल तेथेंच परमेश्वर आहे. काय तुमचा भाव नसेल तेथें परमेश्वर नसेल ? तुमच्या भावाच्या आधीन परमेश्वर आहे असें म्हणण्यास तुमच्या जवळ काय प्रमाण आहे ? मृत्तिकेमध्यें सुवर्णरजतादिकांचा, पाषाणावर हिऱ्याचा, समुद्रफेणावर मोत्यांचा, पाण्यामध्यें तूप-दुधाचा व धुळीमध्यें साखरेचा भाव करून आपले व्यवहार चालतात कीं काय तें पहा किंवा तसा भाव करून ते ते पदार्थ प्राप्त होतात कीं काय तें पहा जर हे भौतिक पदार्थ तुम्हांला नुसत्या भावनेनें मिळणार नाहींत, तर ध्यानयोगगम्य परमेश्वर तुमच्या भावनेचा गुलाम होऊन पाहिजे त्या मूर्तीमध्यें राहील असें कशावरून म्हणतां ? भावनेनें कांहीं तरी होतें काय ? तुम्ही भावना केली नसली तरी तुम्हांला दुःख होतें व तुम्ही सुखाची भावना करतां तरीहि तें तुम्हांला लाभत नाहीं, याचें कारण काय ? आंधळयानें नेत्रांची भावना केली असतां त्याला दिसूं लागेल काय ? मरण्याची भावना कोण करीत असतो ? पण भावना न करतांहि लोक मरतात कीं नाहीं ? ते कां ? अनात्म्याच्या ठिकाणीं आत्म्याची भावना करणें, जडाच्या ठिकाणी चेतनाची भावना करणें ही चूक आहे हेंच अज्ञान आहे. हीच खोटी भावना होय. **जो पदार्थ जसा असेल तसाच त्याला मानणें ही खरी भावना.** जी वस्तु जशी असेल तशीच भावना करणें हें ज्ञान व अन्यथा भावना करणें हें मिथ्याज्ञान किंवा अज्ञान होय. अज्ञान हें बंधाला कारण असून ज्ञान हेंच मोक्षाला कारण आहे. तात्पर्य पाषाणाच्या ठिकाणीं व्यापक परमेश्वराची कल्पना करणें ही भावना नसून तें अज्ञान आहे. तुम्ही अभावनेला भावना व भावनेला अभावना समजतां हें तुमचें अज्ञान आहे. **(प्रश्न)** अहो, मूर्तीवर वेदमंत्रांनीं जेव्हां देवतेचें आवाहन केलें जातें तेव्हांच त्या मूर्तीमध्यें परमेश्वर येतो. जोंपर्यंत आवाहन झालेलें नसतें तोंपर्यंत त्यात परमेश्वर नसतो व जेव्हां विसर्जन होतें तेव्हां तो तेथून जातो. **(उत्तर)** जर मंत्रोच्चारानें आवाहन होऊन तेथे देवता येते तर मग या मूर्तीमध्यें चेतनदेवता असल्यामुळें ती मूर्ति सचेतन कां होत नाहीं ? आवाहन झाल्यानंतर मूर्ति चेतन व्हावी व विसर्जन झाल्याबरोबर पूर्वीप्रमाणें अचेतन व्हावी. पण तसें होत आहे काय ? तुम्ही नुसतें आवाहन व विसर्जन म्हटल्याबरोबर जर परमेश्वर येईल व जाईल तर परमेश्वरावर हक्क चालवणारे तुम्ही मोठेच कोणी तरी असलां पाहिजेत. पण तुम्ही काय म्हणतां त्याचा तरी तुम्ही विचार करीत आहां काय ? परमेश्वर येतो व जातो म्हणजे काय ?तो तेथें पूर्वी नसतो कीं काय ? जर असतो तर आवाहन कसलें करतां ! पूर्णब्रह्म सर्वव्यापक परमात्मा सर्वत्र असल्यामुळें तो जातहि नाहीं व येतहि नाहीं. किंवा तो जाऊं शकत

नाहीं व येऊंहि शकत नाहीं. कारण तो सर्व ठिकाणीं आहे. एकदेशी पदार्थाचें जाणें येणें संभवेल. जो तेथें पूर्वी नसेल त्याला बोलावावयाचें, जो पूर्वीपासूनच तेथें पूर्णपणे भरलेला आहे त्याला तुम्ही बोलावितां तरी काय व आवाहन तरी कसलें करतां ? जर मंत्रसामर्थ्यानें परमेश्वराला बोलविण्याचें तुमच्या अंगांत सामर्थ्य आहे तर मेलेल्या माणसाच्या आत्म्याला पुन: त्याच शरीरांत घटकाभर तरी बोलावूं शकतां काय ? तुमचें मंत्रबल परमेश्वरावर चालतें व जीवावर चालत नाहीं काय ? त्याचप्रमाणें शत्रूच्या शरीरांतील जीवांचें विसर्जन करून त्यांना कां ठार मारीत नाहीं बरें ? तात्पर्य तुमचें आवाहन व विसर्जन सर्व थोतांड असून भोळया लोकांना तुम्ही राजरोस फसवीत आहां. वेदामध्यें मूर्तिपूजा करावी असें कोठेंहि लिहिलेलें नाहीं व आवाहनविसर्जनाबद्दल एक अक्षरहि नाहीं. हें बंड तुम्हीं अज्ञानानें माजविलेलें आहे. **(प्र०)** प्राणप्रतिष्ठापनेचे मन्त्र आहेत. पहा: **'प्राणा इहागच्छन्तु सुखं चिरं तिष्ठन्तु स्वाहा । आत्मेहागच्छतु सुखं चिरं तिष्ठतु स्वाहा । इंद्रियाणीहागच्छन्तु सुखं चिरं तिष्ठन्तु स्वाहा ।"** हे मन्त्र असतांना तुम्ही नाहीं म्हणतां ? **(उ०)** अहो महाराज ! वेदांमध्यें नाहीं असें आम्ही म्हणतो. तुम्हीं जीं हीं वाक्यें उच्चारलींत तीं वेदामध्यें मुळींच नाहींत; तुमचीं स्वकपोलकल्पित आहेत. तुम्हांसारख्या अवैदिक वाममार्गी लोकांनीं केलेल्या तंत्रग्रंथांतील गाबाळ व वेदांतील पूज्य मन्त्र यांत महदंतर आहे. **(प्रश्न)** काय तंत्रग्रंथ खोटे आहेत ? **(उत्तर)** हो अगदीं खोटे आहेत. पाषाणादिकांची मूर्ति तयार करून तिची स्थापना करावी, तीवर गंधफूल चढवावें असें वेदांतील एकाहि मंत्रांत लिहिलेलें नाहीं. **(प्रश्न)** बरें, वेदांमध्यें नसेल. ! नसलें म्हणून काय झालें ? मूर्तिपूजेचा निषेध तर नाहींना ? निषेध नसला तर करावयास काय हरकत आहे ? व जरी निषेध असला तरीहि **'प्राप्तौ सत्यां निषेध: ।"** या न्यायानें करावयास कांहीं हरकत नाहीं कारण मूर्तिपूजेची प्राप्ति झाली होती म्हणूनच निषेध केलेला आहे. तात्पर्य दोनहि बाजूंनीं मूर्तिपूजा करण्यास कांहीं हरकत नाहीं. (उत्तर) मूर्तिपूजा करावी असें कोठेंहि वेदामध्यें नाहीं. तसेंच परमेश्वराच्या ठिकाणीं कोणत्यांहि अन्य पदार्थाची तो पूजनीय आहे असें समजून उपासना करूं नये असें पुष्कळ ठिकाणीं सांगितलेलें आहे. आपण म्हणतां कीं, प्राप्ति ज्याची झाली असेल त्याचाच निषेध केला जातो पण आपण हेंहि लक्षांत ठेवा कीं, अपूर्वविधिहि सांगितलेला असतो. परमेश्वराशिवाय अन्य पदार्थांची उपासना केली तर काय होतें तें पहा:—

**अन्धन्तम: प्रविशन्ति येऽसम्भूतिमुपासते । ततो भूय इव ते तमो य उ सम्भूत्यां रता: ।।** यजु. ४०।९।।

**अर्थ**—जे (असम्भूतिम्) अनुत्पन्न अनादि मूल प्रकृतीची परमेश्वराच्या ठिकाणीं उपासना करतात, ते अंधकारांत प्रवेश करतात. अर्थात् ते अज्ञानी बनून दु:खसागरांत पडतात. तसेंच जे (संभूत्याम्) मूलप्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या कार्यरूप पृथिव्यादि भूतांना, पाषाणवृक्षादिकांना किंवा मनुष्यादिकांच्या शरीरांना तो परमेश्वर आहे असें समजून, (उपासते) भजतात ते जास्त अंधकारांत प्रवेश करतात. अर्थात् ते मूर्ख लोक चिरकाल अज्ञानी होऊन घोर दु:खमय नरकांत पडून अत्यंत क्लेश भोगतात. याप्रमाणें इतर पदार्थांची उपासना करण्यानें जीवाला दु:खच प्राप्त होतें असें वेदांत सांगितलें आहे. आतां त्या परमेश्वराची मूर्ति नाहीं याविषयीं सांगितलें आहे तें पहा:—

**न तस्य प्रतिमा अस्ति** ।।२।। यजु. ३२।३।।

'जो परमेश्वर सर्व जगांत व्यापलेला आहे, त्या निराकार परमेश्वराची प्रतिमा मुळींच नाहीं, किंवा त्याचें परिमाण किंवा सादृश्यहि नाहीं.' याप्रमाणें वेदामध्यें सांगितलें आहे. आतां उपनिषदांत काय सांगितलें आहे तें पहा. केनोपनिषद:— **यद्वाचानाभ्युदितं येन वागभ्युद्यते । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ।।३।।**

'जो परमेश्वर वाणीचा विषय नाहीं व ज्याच्या धारणेनें व सत्तेनें वाणीची प्रवृत्ति सुरू असते, त्यालाच तूं ब्रह्म आहे असें जाण त्यांची तूं उपासना कर. त्याच्याशिवाय जे दुसरे पदार्त आहेत ते उपासनीय नाहींत.'

**यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ।।४।।**

'जो परमेश्वर मनानें इयत्ता करून जाणला जात नाहीं, पण जो मनाला जाणत असतो, त्यालाच तूं ब्रह्म आहे असें जाण व त्याचीच उपासना कर. त्याच्याशिवाय जीव व अंत:करणादिक जे पदार्थ आहेत त्यांची ब्रह्माच्या ठिकाणीं उपासना करूं नकोस.'

**यच्चाक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यन्ति । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥५॥**

'जो परमेश्वर डोळयायाला दिसत नाहीं, पण ज्याच्या योगानें डोळयाला दिसत असतें, तेंच ब्रह्म आहे असें जाण व त्याचीच उपासना कर. त्याशिवाय सूर्य, विद्युत् अग्नि वगैरे जे पदार्थ आहेत त्यांची उपासना करूं नकोस.'

**यच्छ्रोत्रेण न शृणोति येन श्रोत्रमिदं श्रुतम् । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥६॥**

ज्या परमेश्वराचें ग्रहण कान करूं शकत नाहींत, पण ज्याच्या योगानें कान शब्द ऐकूं शकतात, तेंच ब्रह्म आहे असें जाणून त्याची उपासना कर, त्याच्याशिवाय जे शब्दादि विषय आहेत त्यांची उपासना ब्रह्माबद्दल करूं नकोस.'

**यत्प्राणेन प्राणिति येन प्राणः प्रणीयते । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥७॥** केनोपनि० खं १ मं०४-८

'जो परमेश्वर प्राणाच्या योगानें गतिमान् होत नाहीं पण ज्याच्या योगानें प्राण गतिमान् होतात, तें ब्रह्म आहे असें समज व त्याची उपासना कर. त्याशिवाय वायु वगैरे इतर पदार्थ आहेत त्यांची उपासना करूं नकोस.' याप्रमाणें परमेश्वराचीच उपासना करावी इतरांची करूं नये, याविषयीं अनेक वचनें आहेत. प्राप्त गोष्टीचा निषेध होतो असें तुम्ही म्हणतां. तसा अप्राप्ताचाहि होतो हेंहि विसरतां कामा नये. एके ठिकाणीं बसलेल्या माणसाला त्या जागेवरून उठविणें हें प्राप्त गोष्टीचा निषेध करण्याचें उदाहरण आहे. 'तूं चोरी करूं नकोस, विहिरींत पडूं नकोस, दुष्टांचा संग करूं नकोस, विद्याहीन राहूं नकोस.' इत्यादि प्रकारचा निषेध हा अप्राप्त वस्तूंचा निषेध होय. त्याचप्रमाणें वरील मूर्तिपूजेचा निषेध हाहि अप्राप्त निषेधच आहे. तो मनुष्यांच्या ज्ञानामध्यें अप्राप्ताचा व परमेश्वराच्या ज्ञानाप्रमाणें प्राप्ताचा निषेध होय. (प्र.) अहो, तुमच्या म्हणण्याचें तात्पर्य असें कीं मूर्तिपूजेमध्यें पुण्य नाहीं; जसें पुण्य नाहीं तसें त्यांत पापहि पण नाहींना? (उ०) विहित कर्में व निषिद्ध कर्में अशीं दोन प्रकारचीं कर्में आहेत. सत्य भाषण करावें अशा तऱ्हेनें वेदप्रतिपादित सर्व कर्में विहितकर्मांमध्यें येतात. मिथ्या भाषण करूं नये अशा प्रकारें सर्व वेदनिषिद्ध कर्में निषिद्ध कर्मांमध्यें येतात. विहित कर्में करावीं व निषिद्ध कर्में करूं नयेत. विहित कर्में करणें हा धर्म, न करणें हा अधर्म व निषिद्ध कर्में करणें हा अधर्म व न करणें हा धर्म होय. ज्याअर्थी वेदांनीं निषिद्ध मानलेली मूर्तिपूजा तुम्ही करतां त्याअर्थी तुम्ही पापीच आहांत यांत मुळींच शंका नाहीं. (प्र.) पहा, वेद अनादि आहेत. वेदांच्या समयीं मूर्तीचें काय काम होतें? कारण त्यावेळीं देवता प्रत्यक्ष होत्या. मूर्तिपूजा ही नंतर सुरू झाली हें तर उघड आहे. तिचा उल्लेख पुराणें व तंत्रग्रंथ यांत आहे. जेव्हां मनुष्यांचें सामर्थ्य कमी होऊं लागलें, तेव्हां ते निराकार परमेश्वराचें ध्यान करण्यास समर्थ होईनात, मूर्ति असली तर तें ध्यान करूं शकतात; म्हणून अल्पज्ञ लोकासांठीं मूर्तिपूजा आहे. कारण एक एक पायरीवरून चढून गेलें तर दुसऱ्या मजल्यावर सहज चढून जातां येईल. पण एकदम वर जाणार म्हटलें तर तें शक्त नसतें. मूर्तिपूजा ही पहिली पायरी आहे. ती करतां करतां जेव्हा अंतःकरण पवित्र होतें तेव्हां तोच निराकार परमेश्वराचें ध्यान करूं शकतो. जसें निशाण मारणारा प्रथमतः मोठ्या पदार्थावर निशाण मारतो व नंतर जसजसा त्याचा अभ्यास वाढत जातो, तसतसा तो लहान लहान पदार्थलाहि मारूं शकतो, त्याचप्रमाणें प्रथमतः स्थूल मूर्तीची पूजा करतां करतां शेवटीं निर्विकार ब्रह्माचें ध्यान करूं शकतो. ज्याप्रमाणें लहान मुलें लहानपणींच बाहुल्यांचा खेळ खेळतात, त्याचप्रमाणें ज्ञानाच्या बाल्यावस्थेमध्यें मूर्तिपूजा आवश्यक नाहीं काय? (उ०) जर वेदविहित कर्में करणें हा धर्म आहे व वेदविरुद्ध कर्म करणें अधर्म ठरलाच तर मग मूर्तिपूजा ही अधर्मयुक्तच ठरली. वेदविरुद्ध ग्रंथाला प्रमाण मानणें नास्तिकांचें काम आहे पहा—" **नास्तिको वेदनिन्दकः** " मनु म्हणतात कीं, वेदाची निंदा करणारा त्यांचा अपमान करणारा, त्यांच्या आज्ञा न मानतां त्यांविरुद्ध आचारण करणारा जो असतो तो नास्तिक होय. तसेंच—

**या वेदबाह्याः स्मृतयो याश्च काश्च कुदृष्टयः । सर्वास्ता निष्फलाः प्रेत्य तमोनिष्ठा हि ताः स्मृताः ॥९५॥**
**उत्पद्यन्ते च्यवन्ते च यान्यतोऽन्यानि कानिचित् । तान्यर्वाक्कालिकतया निष्फलान्यनृतानि च ॥** मनु १२।२३॥४

'जे ग्रंथ पुरिस्त पुरुषांनी बनविलेले आहेत व ज्यांतील विषय वेदाच्या विरुद्ध आहेत, ते लोकांना दुःखसागरा

मध्यें बुडविणारे असल्यामुळें निष्फळ असत्य व अज्ञानमय होत. ते या व परलोकीं दुःख देणारे होतात.' ' जे वेदविरुद्ध असतात ते सर्व आधुनिक होत, ते शीघ्र नाश पावणारे असतात. ते सत्य मानणें निष्फळ व मूर्खपणाचें आहे' याप्रमाणें ब्रह्मापासून जैमिनीपर्यंत जे विद्वान झाले त्यांचें मत हें आहे कीं, जें कांहीं वेदविरुद्ध असेल त्याचा त्याग करावयाचा व जें वेदानुकुल असेल त्याचें आचरण करावयाचें व हा धर्म होय. कारण वेद सत्य धर्माचा प्रतिपादक आहे. अशा या वेदाच्या विरूद्ध जे जे तंत्रपुराणादि ग्रंथ आहेत ते सर्व वेदविरूद्ध असल्यामुळें असत्य व अग्राह्य आहेत व त्या वेदविरुद्ध पुस्तकांत सांगितलेली मूर्तिपूजाहि अधर्मरूपच आहे. मनुष्यांचें ज्ञान पदार्थाची पूजा केल्यानें वाढत नाहीं, इतकेंच नव्हे तर जें कांहीं ज्ञान असतें तेंहि नाश पावतें. ज्ञान वाढण्यास ज्ञानी पुरुषांची संगतीच कारण आहे. पाषाणमूर्तीची पूजा केल्यानें परमेश्वराचें ध्यान करण्यास मन योग्य होतें हें म्हणणेंहि निष्फळच आहे. कारण तसें मानण्यास कांहींएक संबंध नाहीं. मूर्तिपूजा ही परमेश्वराची कल्पना होण्यास सहाय्यक पायरी नसून ती परमेश्वरी कल्पना आणण्यास विघातक आहे. मूर्तिपूजा हा एक खड्डा आहे. यांत एकदां मनुष्य पडला म्हणजे तो मरेपर्यंत उठणें शक्य नाहीं. धार्मिक विद्वानांची संगति, योग्यांचा सहवास व सत्यभाषणादि व्रतें परमेश्वरासंबंधीचें ज्ञान होण्यास सहाय्यकारक आहेत यांत शंका नाहीं. याप्रकारच्या सत्संगतीनें पुष्कळ माणसें उद्धरली आहेत. पण मूर्तिपूजेनें कोणाची उन्नति झाली असें कोणीहि दाखवूं शकणार नाहीं. मूर्तीची पूजा करणारा दररोज ज्यास्त ज्यास्त अज्ञानी होत असतो. त्याचा विवेक नाहींसा होत जातो व शेवटीं तो मनुष्य जन्म फुकट घालवून धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारहि पुरुषार्थांना मुकतो. तात्पर्य आजपर्यंत या मूर्तिपूजेच्या कल्पनेनें अनेक लोक फसले व सध्यांहि फसत आहेत व ज्या पुरुषार्थांच्या प्राप्तीसाठीं मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे त्यांना ते विमुख होत आहेत हें आश्चर्य नव्हें काय? मूर्तिपूजा ब्रह्मप्राप्तीच्या उद्योगामध्यें स्थूल लक्ष्याप्रमाणें नाहीं. त्यापेक्षां सृष्टिविद्या ही एक पायरी आहे असें म्हटलें तर शोभेल. धार्मिक विद्वान् सृष्टिविद्येवर विचार करून ब्रह्माला जाणूं शकतो. लहान मुलें जशी बाहुल्यांचा खेळ खेळतात व आपली कल्पना वाढवितात त्याप्रमाणें मूर्तिपूजा ही सहाय्यक नाहीं. पण अक्षर-ओळख व स्वाध्याय हे सहाय्यकारी आहेत. विद्याभ्यास व सुशिक्षण यांच्या योगानें ईश्वरप्राप्ति होईल तशी ती मूर्तिपूजेनें होणार नाहीं. **(प्रश्न)** अहो ! साकारावर मन स्थिर होतें तसें निराकारावर मन स्थिर होत नाहीं, म्हणून मूर्तिपूजा आवश्यक आहे. **(उत्तर)** साकारावर मन कधींहि एकाग्र होऊं शकत नाहीं. कारण जेव्हां मूर्तीचें ध्यान मनुष्य करूं लागतो तेव्हां तिच्या प्रत्येक अवयवावर क्रमाक्रमानें मन चलन पावतें. त्यामुळें तें स्थिर होऊंच शकत नाहीं. निराकार परमेश्वराचें चिंतन करण्यांत प्रथमतः मन जोरानें धांव घेतें खरें; पण परमेश्वराची अनंतता पाहून तें थकतें व पुनः आपल्यामध्यें स्थिर राहून त्याच्या अनंत गुणकर्मस्वभावाच्या चिंतनामध्यें गुंगून राहतें. अशा रीतीनें गुंग होऊन राहिलें म्हणजे त्याला एक विलक्षण आनंद होऊं लागतो व तें ज्यास्त स्थिर होऊं लागतें. जर साकारावर मन स्थिर होऊं शकलें असतें तर जगांतील सर्व मानसांचीं मनें स्थिर झालीं असतीं; कारण सर्व लोक प्रायः साकाराला चाहत असतात. पण असा अनुभव आहे कीं जसजसें साकाराच्या पाठीमागें लागावें तसतसें मन ज्यास्त चंचल होत जातें. म्हणून मन स्थिर करण्यास साकार पदार्थ सोडावे लागतात. मनुष्य, स्त्री, पुत्र, धन, मित्र इत्यादि साकार पदार्थांत मन नेहेमीं गढलेलें असतांहि स्थिर होत नाहीं. तें स्थिर करण्यास या पदार्थांविषयीं उदासीन व्हावें लागतें. असें सर्व प्रतिपादन करितात हेंहि पाहिलें पाहिजे. निराकार परमेश्वर निरवयव असल्यामुळें तेथें मन एकदम स्थिर होतें. तेथें त्याला चञ्चल करण्याचें कारणच नसतें. म्हणून मूर्तिपूजन करणें अधर्म आहे. मंदिर बांधण्यामध्यें कोटयावधि रुपये खर्च होतात. त्या पैशांचा दुसरीकडे सद्व्यय केला तर पुष्कळांचें कल्याण होऊं शकतें देवळें हीं कित्येक ठिकाणीं दुष्ट लोकांचें अड्डे झालेलीं आहेत. जर मूर्तीच्या योगानें मनुष्याच्या मनावर कांहीं चांगला परिणाम होणें संभवनीय असतें तर देवळांतच कोणीतरी दुष्ट कर्मे करूं शकला असता काय ? स्त्रीपुरुष मंदिरांत जमा झाल्यापासून व्यभिचार, बखेडा, दुराचार, रोगादिकांची उत्पत्ति होण्याचा संभव असतो. मूर्तिपूजा हीच धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांना साधक असें मानल्यानें मनुष्यें पुरुषार्थहीन होतात व मनुष्यजन्म फुकट घालवितात. मूर्तिपूजेच्या योगानें नानाप्रकारचीं चरित्रें व अनेक मूर्ति प्रचारांत येऊन त्यांच्या उपासकांमध्यें भेदभाव वाढतो, त्यांचें ऐक्यमत

कधींहि होत नाहीं व परस्परविरुद्ध अनेक मतमतांतरें वाढून तो सर्व समाज म्हणजे भांडखोर लोकांची मंडळी बनून सर्व देशाचाहि शेवटीं त्यांच्या भांडणानें नाश होतो. मूर्तीच्या भजनानें व पूजनानें शत्रूचा नाश होईल असा त्यांचा विश्वास बसतो. त्यामुळें ते लोक शत्रूच्या नाशाची मुळींच तयारी करीत नाहींत. त्यामुळें शत्रु यांच्यावर चाल करून येतात, यांचा पराभव करतात, यांचें राज्य व धन हिसकावून घेतात व यांना गुलाम बनवितात. शेवटीं हे परटाच्या घोड्याप्रमाणें किंवा कुंभाराच्या गाढवाप्रमाणें शत्रूच्या स्वाधीन होऊन अनेक दुःखें भोगीत असतात हा इतिहास पाहिला असतां सहज समजण्यासारखें आहे. जर कोणाच्या बसावयाच्या ठिकाणीं एखाद्यानें दगड आणून ठेवला तर त्याला राग येतो. त्याचप्रमाणें परमेश्वराचें अधिष्ठान जें हृदय त्यामध्यें परमेश्वराचें ध्यान न करतां पाषाणाच्या मूर्तीचें ध्यान केलें तर परमेश्वरहि क्रोधायमान कां होणार नाहीं व अशा लोकांचा तो कां नाश करणार नाहीं ? देवदर्शन घेण्यासाठीं देवळादेवळामध्यें फिरून व देशदेशांतरीं भ्रमण करून दुःख भोगतात. पण हृदयांत असलेल्या परमेश्वराकडे दृष्टि फेंकीत नाहींत. यामुळें त्यांच्याकडून धर्म साधला जात नाहीं व येथेंहि त्यांना भयंकर कष्ट भोगावें लागतें. देवाचे स्वार्थी पुजारी या अशा भोळ्या भाबड्यांना हवें तसें लुटतात. देवाच्या स्वार्थी पुजाऱ्यांना हवें त्याहून जास्त धन मिळत असल्यामुळें ते वेश्यागमन, परस्त्रीगमन, मद्यपान, मांसाहार व अनेक बखेडे करतात. त्यामुळें देणारे व घेणारे दोघेहि दुःखी होऊन नाश पावतात. मातापितादिकांचा सत्कार करीत नाहींत व मूर्तीचाच बडेजाव जास्त करतात. त्यामुळें ते जन्मदात्यांशीं कृतघ्न होतात. मूर्तीला कोणी फोडले किंवा चोरलें तर ते रडत बसतात व दुःखी होतात. पुजारी परस्त्रीगमन करतात व पुजारिणी परपुरुषगमन करतात व दोघेहि विवाहजन्य प्रेमानंदाला मुकतात. स्वामी व सेवक यांत वितुष्ट येऊन दोघांमधील संबंध कायम राहात नाहीं. जडाचें ध्यान करणाऱ्याचा आत्माहि जडबुद्धियुक्त होतो. कारण ध्येयाचा धर्म ध्यात्यामध्यें येणें साहजिक आहे. परमेश्वरानें सुगंधीयुक्त पुष्पादिक बनविलीं आहेत तीं त्यांचा सुगंध हवेंत पसरून हवा शुद्ध व निरोगी व्हावी म्हणून होय. फुलें झाडांवर राहिलीं तर पुष्कळ वेळपर्यंत त्यांतील सुगंध हवेंत पसरून हवा शुद्ध होत असतें. पुजारी लोक फुलें लवकर तोडून त्यांचें इष्ट कार्य करण्यास प्रत्यवाय करीत असतात. पुष्पादिक पाण्यामध्यें पडून मूर्तीच्या आसपास सडत असल्यामुळें दुर्गंध उत्पन्न करतात व त्यांमुळें हवा बिघडते. फुलें दगडावर रचण्यासाठीं परमेश्वरानें उत्पन्न केलीं आहेत काय ? देवावरचीं फुलें, गंध व अक्षता पाण्यांत पडून कुजतात व त्या कुजलेल्या पाण्यांत हजारों जीव उत्पन्न होतात व त्यांत अनेक जीव पडून मरतात. अशा प्रकारें एक कीं दोन ? - मूर्तिपूजेपासून अनेक दोष होत असतात. म्हणून विद्वान् पुरुषांनीं मूर्तिपूजा न करणें चांगलें. जे लोक मूर्तिपूजा करीत आहेत किंवा करीत असतील ते पूर्वोक्त दोषांनीं दुष्ट होतील यांत शंका नको. यासाठीं विचारी लोकांनीं मूर्तिपूजेचा नाद सोडून द्यावा व वेदादि शास्त्रांच्या श्रवणमनननिदिध्यासनानें आणि सत्संगानें परमात्म्याची ओळख करून घेऊन कृतकृत्य व्हावें.

**(प्रश्न)** तुम्ही निराकार परमेश्वराची मूर्ति करूं नये म्हणतां तें सयुक्तिक आहे. पण या आर्यावर्तामध्यें प्राचीन काळापासून पंचायतनपूजा चालू आहे व त्यामध्यें शिव, विष्णु, अंबिका, गणेश व सूर्य यांच्या मूर्ति असतात. तर ही करण्यास काय सरकत आहे ? **(उत्तर)** कोणतीहि मूर्ति करून ती पूजणें अवैदिक असल्यामुळें अधर्म्य आहे. वेदांमध्येंहि पंचायतनपूजा सांगितली आहे. पण ती तुम्ही म्हणतां त्याहून भिन्न आहे. ही वैदिक पंचायतनपूजा प्रत्येकानें केलीच पाहिजे. मूळच्या अत्युत्तम पंचायतनपूजा शब्दाच्या अर्थाचा पौराणिकांनीं विपर्यास करून तुम्ही म्हणतां ती पूजा सुरू केली, या विद्याविहीन मुर्खांनीं बनविलेल्या मूर्तिपूजेचें मागें खंडन केलेंच आहे. आतां खरी वैदिक पंचायतनपूजा कोणती व ती कशी करावी हे सांगतोः —

**मा ना वधीः पितरं मोत मातरम्** ।।यजु. १६।१५।। **आचार्यो ब्रह्मचर्येण ब्रह्मचारिणमिच्छते** ।। अथर्व. ११।५।१७।।
**अतिथिर्गृहानागच्छेत्** ।। अथर्व. १५।१३।११।। **अर्चत प्रार्चत प्रियमेधासो अर्चत** ।। ऋ. मं. ८ ।७।६९।८।।

पहिली माता ही मूर्तिमती देवता सर्व संतानांनीं पूजा करण्यास योग्य आहे. आपल्या तनमनधनें करून तिची सेवा करावी व तिला प्रसन्न राखावें, तिला वाक्ताडणादिकांच्या योगानें कधींहि त्रास देऊं नये. आपल्या जन्मदात्रीचा

सन्मान करणें हें प्रत्येकाचें अवश्य कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें आपल्या पित्याचा सर्व प्रकारें सत्कार करावा. जो आपल्याला विद्यादान देतो त्या आचार्याची तनमनधनेंकरून सेवा करावी व सत्कार करावा. अतिथीचा सत्कार करावा. जो धार्मिक, निष्कपटी विद्वान्, सर्वांची उन्नति व्हावी असें इच्छिणारा असतो व ती साधण्यासाठीं सत्याचा उपदेश करीत करीत चोहोंकडे भ्रमण करीत असतो, त्या अतिथीचा सत्कार करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें स्त्रीला पति हा पूजनीय असून पतीला स्त्री ही पूजनीय आहे. तात्पर्य माता, पिता, आचार्य, अतिथी व पति किंवा पत्नी या पांच मूर्तिमान् देवता प्रत्येकानें पूजा करण्यास योग्य आहेत. हीच मूळची पंचायतनपूजा, या पांच मूर्तिमान् देवतांच्या योगानेंच मनुष्यदेह प्राप्त होतो, त्याचें पालन होतें, देहधारी जीवाला सत्यविद्यांचें शिक्षण मिळतें, सारासारविचार जागृत होतो, ज्ञान वाढतें व शेवटीं परमेश्वरप्राप्ति होते. ही वैदिक मूर्तिपूजा परमेश्वरप्राप्तीच्या मार्गातील पायरी आहे. यांची सेवा न करतां जो पाषाणमूर्तीची सेवा करितो तो वेदविरुद्ध आचरण करीत असल्यानें पतित होतो. जसें या पांच देवतांचा उल्लेख वेदांमध्यें आहे त्याचप्रमाणें तो इतर वैदिक ग्रंथांतहि आहे. पहा.

**मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव ।।तै.** उप० १।११।।

**पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा । पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ।** मनु०।। ३।५५

**उपचर्यः स्त्रिया साध्व्या सततं देववत्पतिः ।।** मनु० ५।१५४।।

'माता, पिता, आचार्य व अतिथि हे देव आहेत असें मानून त्यांचा सत्कार कर.' 'पिता, भ्राता, पति, दीर यांनीं घरांतील स्त्रियांचा सत्कार करावा व त्यांस भूषणें द्यावीं म्हणजे त्यांचें फारच कल्याण होतें.' 'साध्वी स्त्रीनें सतत पतीची सेवा करावी.' याप्रमाणें सर्व वैदिक ग्रंथांमध्यें या पंचायतनपूजेचें वर्णन आहे. मग या प्रत्यक्ष दिसणाऱ्या मूर्ति सोडून दुसऱ्या दगडाच्या मूर्तींचें भजन करण्यांत काय अर्थ आहे ? या देवतांच्या कृपेनें येथें फायदा होतो. ज्ञान मिळतें व मोक्षाचें साधन सुलभ होतें. **(प्रश्न)** मातापिता आदिकांची सेवा करून मूर्तीला भजलें तर काय हरकत आहे ? **(उत्तर)** पाषाणमूर्तीच्या पूजेनें ज्या अर्थीं कांहीं लाभ नाहीं, त्या अर्थीं ती करावी तरी कशाला व ज्या अर्थीं या पूर्वी सांगितलेल्या माता, पिता, आचार्य, अतिथि वगैरेंची पूजा केली असतां इहपरलोकीं सुख मिळतें त्या अर्थीं यांचीच पूजा करणें उत्तम. हीच मोठ्या अनर्थाची गोष्ट आहे कीं प्रत्यक्ष दिसणाऱ्या मातापित्यांची सेवा करावयाची सोडून पाषाणावर डोकें बडवून घेण्यास लोक धांवतात ! अतिथि वगैरेंच्या पुढें जर नैवेद्य ठेवला तर ते खाऊन टाकतील व मूर्तीच्या पुढें ठेवलेला नैवेद्य पुनः जशाचा तसा आपणास मिळतो या खात्रीनें तर हे स्वार्थी लोक माता-पित्यांच्या वैदिक पूजेपासून निवृत्त झाले नसतील ना ? पाषाणादिकांच्या मूर्ति बनवाव्या, त्यांच्यावर गंधफूल चढवून नैवेद्य ठेवावा, घंटा वाजवून कोलाहल करावा, नैवेद्यावरचें सत्व न टाकतां देवाकडे नुसतीं बोटें नाचवावीं व शेवटीं आपणच तो नैवेद्य खाऊन टाकावा; हाच प्रकार जर कोणाचा सत्कार करण्याचा असेल तर थट्टेचा प्रकार आणखी तो कसा असतो हें शोधणें फार कठीण आहे ? हें मूर्तीच्या नांवांखालीं भोळ्या लोकांना लुटण्याचें काम स्वार्थी लोकांनी चालविलें आहे. हें पाहून कोणाहि धार्मिक मनुष्याला वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. **(प्रश्न)** ज्याप्रमाणें स्त्रियांची दगडामध्यें खोदलेली किंवा मातीची मूर्ति पाहिल्याबरोबर कामोत्पत्ति होते त्याचप्रमाणें वीतराग शांत मूर्ति कोणत्या तरी देवाची पाहिली असतां वैराग्य प्राप्त होणार नाहीं काय ? **(उत्तर)** अशी मूर्ति पाहिल्यानें वैराग्य प्राप्त होईल असें म्हणणें अगदीं मूर्खपणाचें आहे. मूर्तीचा जडत्वधर्म आत्म्यामध्यें येऊन आत्म्याजवळ असलेली विचारशक्ति नाश पावूं शकेल. यापेक्षां मूर्तीकडे पाहिल्यानें कांहींएक होणें नाहीं. विवेकावांचून वैराग्य नाहीं, वैराग्यवांचून विज्ञान नाहीं व विज्ञानवांचून शांति नाहीं. मूर्ति पाहून जे मनोविकार जागृत होतात असें तुम्ही म्हणतां ते मूर्तीच्या दर्शनानें होत नसून त्या मूर्ति ज्या पुण्यपुरुषाच्या असतील त्यांचा जो आम्ही इतिहास वाचलेला असेल त्या इतिहासपरिशीलनानें जे संस्कार आमच्या मनावर झालेले असतील त्यांचा तो परिणाम आहे. जर केवळ मूर्तीचा परिणाम असेल तर इतिहासानभिज्ञ लोकांवर तसा परिणाम होत नाहीं. कोणाविषयीं प्रीति होते ती त्याच्या अंगचे गुण ऐकल्यानें होते त्याची मूर्ति पाहिल्यानें नव्हे, हें विसरतां कामा नये. मूर्तिपूजा व तशासारखे जे अनेक दोष या आर्यावर्तांत झालें

त्यांच्याच योगानें निरुपयोगी पुजारी, भिक्षुक, आळशी, पुरुषार्थहीन मनुष्यें क्रोडोगणती या देशांत दिसत आहेत. या सर्व संसारामध्यें या लोकांपासूनच मूळ मूर्खपणा, छल, कपट यांचा प्रसार झाला. ( **प्रश्न** ) मूर्तीमध्यें साक्षात्कार दिसतो. जेव्हां काशीमध्यें औरंगजेब बादशहानें काळभैरवाच्या देवळावर चाल केली व मूर्तीवर तोफा चालविल्या तेव्हां तेथें हजारों गांधिलमाशा निघून त्यांनीं औरंगजेबाच्या सैन्याचा पुरा पराभव केला ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. (**उत्तर**) गांधिलमाशांचा हा स्वभाव आहे कीं, जेव्हां त्यांच्या घराला धक्का लागतो किंवा आसपास धूर होतो तेव्हां जे लोक जवळपास असतील त्यांवर त्या धांवतात. जेव्हां सैन्यानें देवळावर चाल केली व तेथें तें उध्वस्त करण्यास प्रारंभ केला तेव्हां त्या माशांच्या घरट्यास इजा होऊन त्या माशा निघाल्या व तें होणें साहजिकच होतें; त्यांत दैवी चमत्कार कांहींच नाहीं. ( **प्रश्न** ) अभिषेकाच्या वेळीं दुग्धधारा चालली असतां सिंहनाद होणें हा चमत्कार आहे कीं नाहीं ? ( **उत्तर** ) ही तर पुजाऱ्याची हातचलाखी व कारागिराची कुशलता आहे. जर असे चमत्कार खरोखरच ईश्वरी चमत्कार होतात असें म्हणावयाचें तर महम्मद गिझनीनें जेव्हां सोरटी सोमनाथाचें देवालय फोडून देवाचे तुकडे केले तेव्हां तुमच्या मूर्तीचा साक्षात्कार कोठें गेला होता ? त्यांत आवाहन केलेली देवता होती ना ? (**प्रश्न**) अहो जेव्हां म्लेंच्छांनीं महादेवाच्या देवळावर हल्ला केला तेव्हां महादेव ज्ञानवापीमध्यें अदृश्य झाले व वेणीमाधव ब्राह्मणाच्या घरांत गुप्त झाले, हा तरी चमत्कार आहे कीं नाहीं ? (**उत्तर**) जर कोटपाळ, काळभैरव, लाटभैरव वगैरे भूतप्रेतादिगण बरोबर बाळगणारा तुमचा महादेव शक्तिमान असता तर त्यानें मुसलमानांचा पराभव नाहीं का केला असता ? अनंत शक्ति ज्या तुमच्या गरुडाची आहे त्यावर बसणारा तुमचा विष्णु खरोखरच जर समर्थ्यवान् असता व तुमच्या आवाहनानें तो त्या मूर्तींत असता तर मुसलमान त्या मूर्तींची अवहेलना करण्यास धजते काय ? जर महादेव व विष्णु यांनीं खरोखरच त्रिपुरासुरादि दुष्ट भयंकर राक्षसांचा संहार केला, तर त्यांना मुसलमानांचें भस्म करणें अशक्य होतें काय ? व जर शक्य होतें तर त्यांनीं आपली विडंबना कां करुन घेतली ? खरें पहिलें असतां त्या पाषाणांत दैवी सामर्थ्य आहे कोठें व असेल कसें ? जेव्हां मुसलमान एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन दीन दीन करीत देवळांचा व मूर्तींचा विध्वंस करीत काशीला पोंचले तेव्हां त्या काळच्या पुजारी लोकांना आपल्या ह्या दगडाच्याच मूर्ती आहेत व त्यांत कांहीं जोर नाहीं असें वाटलें तेव्हां त्यांनीं महादेवाच्या मूर्तीला विहिरीमध्यें लोटून दिले व वेणीमाधवाच्या मूर्तीला एका ब्राह्मणाच्या घरीं लपवून ठेविलें. हा दैवी चमत्कार नसून भिक्षुकांच्या अज्ञानाचा व क्षत्रियांच्या भ्याडपणाचा मासला आहे. जर तुमच्या काळभैरवाच्या अंगांत खरोखरच कांहीं जोर असता व जर खरोखरच त्याला यमदूत घाबरत असते तर त्याच्यावर मुसलमान हल्ला करुं शकले असते काय ? जर काशीमध्यें यमदूत जात नाहींत असें तुम्ही म्हणतां तर तेथें यवनांच्या दूतांनीं तुमच्या मूर्तींचा छळ करुन देवळाच्या जागीं मशीद कशी बांधली ? काशीविश्वेश्वराच्या मंदिराची मशीद करण्यानें जर मुसलमानांचें कांहीं वांकडें झालें नाहीं तर त्याची पूजा करण्यानें तरी तुमचें हित कसें होईल ? थोडासा विचार करा म्हणजे तुमच्या ध्यानीं येईल कीं, हा सर्व वेश्यांचा बाजार आहे. याकरितां या पाषाणमूर्तींच्या नादीं न लागतां मातपिता वगैरे ज्या जीवंत मूर्तिमान् देवतांची पूजा करावी म्हणून वेदानें सांगितलें आहे त्यांचीच सर्वांनीं पूजा करावी व आपली उन्नति करुन घ्यावी.

**काली, कामाक्षी व जगन्नाथः**— (**प्रश्न**) अहो ! कलकत्त्याला काली, कामाक्षी वगैरे देवींना हजारों लोक भजतात हा काय चमत्कार आहे ? जर तेथें दैवत जागृत नसतें तर कोणीं त्यांची उपासना केली असती ? (**उत्तर**) जसें दुसऱ्या ठिकाणीं गतानुगतिक लोक आहेत तसेंच ते काशीमध्यें व कलकत्त्यासहि आहेत. आंधळे लोक मेंढराप्रमाणें असतात. ते एकाच्या पाठीमागून जाऊं लागले म्हणजे भराभर तिकडेच झुकतात व सर्व मिळन खड्डयांत पडतात. याचप्रमाणें हा मूर्तीपूजेचा प्रकार आहे. विचार करुन काय करणें तें करणारे लोक कमी. गतानुगतिक फार. नाहींतर काली व कामाक्षीमध्यें काय आहे व तेथें रक्तमांसाचा शितडा घालून लोकांना अशी कोणती मुक्ति मिळणार आहे ? देवाचें स्थान शुद्ध असावें कीं रक्तानें व मांसानें दुर्गंधयुक्त असावें ? कालीचें देऊळ म्हणजे तो एक देवीच्या नांवावर चालविलेला खाटिकखानाच होय. ( **प्रश्न** )बरें तें असो ! पण जगन्नाथाचा तर प्रत्यक्ष चमत्कार आहे ना ? ज्या वेळीं देवाचें

कलेवर बदलावयाचें असतें तेव्हां आपोआप समुद्रांतून चंदनाचें लांकूड येतें ! चुलीवर एकावर एक सात हंडे ठेविले तर त्यांत वरचा आधीं शिजतो ! जगन्नाथपुरीमध्यें देवाचा प्रसाद कोणी न घेतला तर तो कुष्टी होतो. देवाचा रथ आपोआप चालतो व त्याचें पापी माणासाला दर्शन होत नाहीं. जगन्नाथाचें देवालय इन्द्रदमनाच्या राज्यामध्यें देवतांनीं बनविलें होतें. कलेवर बदलण्याच्या वेळीं एक राजा, एक पंडा व एक सुतार मरतो. याप्रमाणें तेथें चमत्कार होत असतात ना ? **(उत्तर)**तुम्ही जर याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहाल तर तुम्हांसा त्यांत कांहींच चमत्कारयुक्त व खरें असें वाटणार नाहीं. ज्यावेळीं कलेवर बदलण्याची वेळ येते तेव्हां होडींतून चंदानाचें लांकूड समुद्रांत घालतात व तें लाटांबरोबर तीरावर येतें. तें घेऊन सुतार लोक त्याची मूर्ति बनवितात. जेव्हां हंडे शिजवितात तेव्हां दरवाजे बंद करुन आंत कोणासहि येऊं देत नाहींत. भूमिवर चारहि बाजूला सहा व मध्यें एक याप्रमाणें चुली करुन त्यांवर हंडे चढवितात व त्यांत तांदूळ शिजत घालतात. बाहेरच्या सहा चुल्यांवर तवे ठेवून त्यांचीं तोंडें बंद करतात व त्यांवर राख व माती घालून त्यांवर भाताची मोठमोठीं भांडीं ठेवतात व मधले हंडें मात्र नुसत्या चुलीवर ठेवतात. जेव्हां श्रीमान् लोक हा भात शिजविण्याचा चमत्कार पहाण्यास येतात तेव्हां मधल्या चुल्यावरील भात शिजविलेला दाखवितात व बाकीच्या खालच्या भांड्यांतील कच्चा दाखवितात व ईश्वराच्या चमत्काराचें वर्णन करून कांहींतरी तेथें द्रव्य देवण्यास त्या श्रीमंतांस सांगतात. मूर्ख श्रीमान् लोक तेथें रुपये मोहरा ठेवतात किंवा दुसरे कोणी मासिक द्रव्य देण्याचें कबूल करतात ! शूद्र व नीच लोक देवालयामध्यें नैवद्य घेऊन जातात व नैवद्य दाखविणें झालें म्हणजे ते त्यांतून थोडासा खातात. अशा रीतीनें तो नैवद्य उच्छिष्ट झाला म्हणजे जो गृहस्थ रुपया देईल त्याच्या घरीं तेच शूद्र लोक तो पोंचवितात व ते लोक त्या भ्रष्ट पदार्थांचें सेवन करतात. दीन, अनाथ, रोगी, शूद्र, साधु, ब्राह्मण, स्वच्छ व अस्वच्छ सर्व एक जागीं बसून तें भ्रष्ट व अस्वच्छ अन्न खातात ! जेव्हां एक पंगत उठते तेव्हां त्या उष्ट्या पानांवरच दुसऱ्या लोकांना जेवावयास घालतात ? असा अनाचार जगन्नाथाला आहे. तेथें चमत्कार तर कांहीं नाहीं पण भ्रष्टपणा मात्र फार आहे. पुष्कळ लोक हा देवाचा नैवद्य न खातां स्वतः हातानें अन्न शिजवून खातात पण त्यांस कुष्ट होत नाहीं व कांहीं नाहीं. कालीच्या देवळांतील व जगन्नाथाच्या देवळांतील पद्धति पाहिल्या म्हणजे शाक्तांच्या पूर्वीं सांगितलेल्या पद्धतीचें थोडेंसें स्मरण होतें. शाक्तांचा अवशिष्ट राहिलेला अनाचार या देवळांत सध्यां दिसत आहे. जगन्नाथाचा प्रसाद न खाल्ला तर कुष्ट होतें हें म्हणणें अगदीं खोटें आहे कारण त्या गांवांतच अनेक लोक असे आहेत कीं ते प्रसाद खात नाहींत. शिवाय जगन्नाथपुरीमध्यें अनेक कुष्ठी आहेत ते दररोज तें उष्टें अन्न खातात पण त्यांचें कुष्ट जात नाहीं. वाममार्गी लोकांचें भैरवीचक्र जर पहावयाचें असेल तर जगन्नाथपुरीमध्यें पहावें. सुभद्रा ही श्रीकृष्ण व बलराम यांची बहीण असतांहि तिला दोन भावांच्यामध्यें स्त्री व मातेच्या ठिकाणीं बसविली आहे. जर शाक्तांचें भैरवीचक्र नसतें तर असला अभद्र प्रकार झाला नसता. रथाला थोडीशी कलाकौशल्याची योजना आहे. जो पर्यंत तो सरळ चालवला जातो तोंपर्यंत नीट चालतो. पण जेव्हां तो मेळयाच्या मध्यभागीं जाऊन पोंचतो तेव्हां पुजारी लोक मध्येंच एक खुंटी घट्ट करितात. तेव्हां तो हालेनासा होतो. तेव्हां पुजारी लोक पुकारूं लागतात कीं, लोकहो दान करा ! पुण्य करा ! म्हणजे जगन्नाथ प्रसन्न होऊन आपला रथ चालवील ! आपल्या धर्माची वृद्धि होईल ! जोपर्यंत दान येत राहतें तोंपर्यंत असेंच पुकारीत असतात व एकदांचें दान संपलें म्हणजे मग त्यांतीलच एक पुजारी आंगावर उत्तम कपडे घोलून येतो व जगन्नाथाची प्रार्थना करतो कीं, 'हे जगन्नाथा ! तूं आपला रथ चालीव व आमचा धर्म राख.' असें प्रार्थून तो रथावर चढतो. तेव्हां पुजारी ती खुंटी पुनः पूर्ववत् करतात. त्यामुळें रथ हालू लागतो. यांत आश्चर्य कांहींच नाहीं. जगन्नाथाच्या दर्शनाला यात्रा फार जमते व देवळामध्यें प्रकाशाची वगैरे व्यवस्था नीट नसल्यामुळें आधींच दिवे लाविल्याशिवाय कांहीं दिसत नाहीं. अशा स्थितींत पंडे लोकांनीं मध्यें पडदे करून ठेविले आहेत. चटकन पडदा ओढतात व त्यामुळें मूर्ति दिसेनाशी होते, तेव्हां ते म्हणतात कीं तूं पापी आहेस. कांहीं तरी येथें दान कर म्हणजे तुला देवाचें दर्शन होईल. बिचारे भोळे लोक या धूर्तांच्या तडाक्यांत सांपडतात व जें काय असेल नसेल तें तेथें दान करतात ; तेव्हां आपलें काम झालें असें पाहिल्याबरोबर झटकन पडदा दूर करतात व दर्शन देतात व जयजयकार मोठ्यानें ओरडून करतात. तेव्हां प्रेक्षक मंडळी खुष

होतें व आपणास कृतकृत्य समजते ! व अशा रीतीनें धक्के खात व पातकी असल्याबद्दलचा शिक्का कपाळावर मारून घेऊन बाहेर येतात ! इंद्रदमन नांवाचा एक राजा पूर्वी भरतखंडांत होऊन गेला. त्याचे वंशज अजूनहि कलकत्त्यास आहेत. त्या राजानें लाखों रुपये खर्च करून हीं मंदिरें बांधली. कारण तो देवीचा उपासक होता. त्यानें जगन्नाथाचें मंदिर बांधून सर्वांनीं सर्वांच्या हातचें अन्न खावें व स्पर्शास्पर्श कोणी मानूं नये असें एवढ्यासाठीं ठरविलें कीं, या उपायानें तरी आर्यावर्तातील रोटीव्यवहार एक होईल. पण बिचाऱ्याच्या कृतीनें भ्रष्टपणा मात्र फार माजला. जगन्नाथ हा लांकडाचा ठोकळा आहे. तो देव नव्हे. ज्या कारागिरांनीं तें देऊळ बांधिलें ते एकपरी देव होत. राजा, पंडा व सुतार मरतो असें जें तुम्ही म्हणतां तेंहि अगदीं खोटें आहे. ते तर मरत नाहींतच पण ते गरीब व भोळ्या लोकांना फारच छळतात व नागवितात. पंडे तर देवळाजवळच नेहमीं असतात. मूर्तीच्या हृदयांत सोन्याच्या संपुष्टांत शाळिग्राम ठेविलेला असतो त्याला धुऊन तें पाणी ते पितात. एखादे वर्षी त्या पाण्यातून कांहीं विषप्रयोग होऊन त्यांपैकीं एखादा मेला असेल व तेथील भोजन बहाद्दरानें उठवलें असेल कीं त्याला जगन्नाथानें आपलें कलेवर बदलण्याचें वेळीं बरोबर नेलें. अशा गप्पा धन उठवणारे लोभी लोक पुष्कळ उठवतात. विचारी माणसानीं विचार करून त्यांतील खरेंखोटें-पणाची निवड करावी. ह्याप्रमाणें निरनिराळया ठिकाणीं ज्या मूर्ति बसविलेल्या आहेत ते देव नव्हेत. देव एक आहे व तो सर्व ठिकाणीं आहे. पहा:—

**कतम एको देव इति स ब्रह्म त्यदित्याचक्षते** शतपथ. १४।६।७।१०।। **त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वामेव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि ।।** तैत्तिरी. १।१।

'ब्रह्म ( जें सर्व व्यापक आहे तोच ) एक देव आहे. ' हे परमेश्वरा ! तूंच खरें प्रत्यक्ष परब्रह्म आहेस, तूंच प्रत्यक्ष ब्रह्म आहेस म्हणून असें मी म्हणेन' इतर जड पदार्थाला परमेश्वर असें कधींहि म्हणणार नाहीं. या वैदिक उपदेशाचें स्मरण प्रत्येकानें नेहमीं ठेवावें.

**गयाश्राद्ध:** — (**प्र०**) गयेला श्राद्ध केल्यानें पितरांचीं सर्व पापें नाहींशीं होतात व त्या पुण्यप्रभावानें ते स्वर्गाला जातात. तेथील श्राद्धामध्यें जे पिंड दिले जातात ते आपल्या हातांनीं पितर घेतात हें काय कमी आश्चर्य आहे ? (**उत्तर**) हें सर्व खोटें आहे. गयेला श्राद्ध करून गयावळांना जें तुम्ही रुपये देतां त्या रुपयांनीं ते श्रीमान् होतात व वेश्यागमनादि महत्पापें करतात. या सर्वपापाचें मळ कारण या मूर्ख लोकांनीं दिलेल्या दक्षिणेंत आहे. पितर आपल्या हातानें पिंड घेतात हें म्हणणें निव्वळ खोटें आहे. कारण तसा अनुभव सध्यां कोणास येत नाहीं. पूर्वी कोणी धूर्तानें कांहीं कपट करून खड्ड्यांत एखाद्या माणसाला बसवून त्यावर झांकण घालून कपटानें पिंड आंत घेऊन जाण्याची व्यवस्था केली असेल, कोणा अज्ञानी श्रीमंताला अशा प्रकारानें ठकविलें असल्यास नवल नाहीं . अशा ठकविण्याच्या अनेक युक्त्या आहेत त्यांपैकींच ही एक. वैजनाथाला रावणानें आणलें होतें हा समजहि तशांतलाच एक गप्पेपैकीं आहे.

**रामेश्वर, सोमनाथ, ज्वालामुखी वगैरे देवता:**— (**प्रश्न**) गंगेचें पाणी रामेश्वराच्या लिंगावर घातलें असतां तें वाढतें हें आश्चर्यकारक नाहीं काय ? (**उत्तर**) तुम्ही अज्ञानी माणसासारखे बडबडूं नये. गंगेच्या पाण्यानें रामेश्वरांतील दगडाची मूर्ति वाढेल कशी ? वास्तविक पाहिलें असतां त्या देवळांत दिवसासुद्धां अतिशय अन्धकार असतो व तेथ बारीकबारीक दिवे रात्रंदिवस पेटवलेले असतात. जेव्हां लिंगावर पाणी घालतात, तेव्हां त्या दिव्यांचें तेज त्या पाण्यांत पडून तें चकाकतें. त्यामुळें त्याचा आकार अस्थिर आहे असें वाटतें इतकेंच. बोलून चालून धगड तो वाढतहि नाहीं व कमीहि होत. नाहीं (**प्रश्न**) श्रीरामचंद्रानें रामेश्वराची स्थापना केली ना ? जर मूर्तिपूजा अवैदिक असती तर रामचंद्र कां मूर्ति स्थापना करते व वाल्मीकिऋषि तरी आपल्या रामायणांत कशाला रामेश्वराविषयीं लिहिते ? (**उत्तर**) श्रीदाशरथि रामचंद्राच्या वेळीं रामेश्वराचें लिंग किंवा त्या लिंगावरचें देऊळ यांचें नांव गांवहि नव्हतें. हें देऊळ दक्षिणेंतील रामराजानें बांधलें व तेथें लिंगाची स्थापना केली. पण हें सर्व त्या श्रीरामचन्द्रानंतर पुष्कळ वर्षांनीं

झालें. जेव्हां श्रीरामचंद्रानें लंका नगरी हस्तगत करून तीवर बिभीषणाची स्थापना केली व आपण, सीता, हनुमान व इतर वानरगण यांसह विमानांत बसून आकाशमार्गानें अयोध्येला येण्यास निघाले, तेव्हां सीतेस ते म्हणतात:

**अत्र पूर्वं महादेवः प्रसादमकरोद्विभुः ।। सेतुबंध इति ख्यातम्० ।।** वाल्मीकिरामायण· युद्ध० १२।३२०

'हे सीते ! तुझ्या वियोगानें व्याकुळ होऊन मी इतस्ततः भ्रमण करीत या ठिकाणीं आलों. येथें चातुर्मास मुक्काम केला. सर्वव्यापक, विभु व देवांचाहि देव जो महादेव त्या परमेश्वराची एकनिष्ठेनें मी उपासना केली. तेव्हां त्याच्या कृपेनें आम्हांला येथें सर्व युद्धसामुग्री प्राप्त झाली. हा सेतु बांधून आम्ही सर्वांनीं लंकेंत प्रवेश केला व तेथें रावणाचा वध करून तुला प्राप्त करून घेतली ' इतक्या मजकुराशिवाय वाल्मीकिरामायणामध्यें रामेश्वराचें नांवहि नाहीं. यावरून उघड होतें कीं, तें देऊळ लिंग रामाच्या वेळेला मुळींच नव्हतें.

**(प्रश्न) ' रङ्ग है कालियाकान्तको । जिसने हुक्का पिलाया सन्तको ।।**

बरें, दक्षिण देशांमध्यें कालियाकान्ताची मूर्ति आहे. ती अजूनहि हुक्का पीत असते. पाहिजे तर तुम्ही जाऊन पहा. हा तरी चमत्कार आहे कीं नाहीं ? **(उत्तर)** आम्ही तो चमत्कार पाहिला आहे तें सर्व थोतांड आहे. मूर्तीचें तोंड पोकळ केलेलें आहे व त्या तोंडांत एक नळी बसविलेली असते; त्या नळीमध्यें हुक्क्याची नळी जोडतात व पाठीमागचा मनुष्य त्या नळींतून हुक्का ओढतो. बाहेरून पाहुणारांला वाटतें कीं खरोखरच मूर्ति हुक्का पीत आहे. नाकातोंडाला भोकें ठेवलेलीं आहेत त्यांतून आंतील मनुष्य धूर सोडतो; त्यामुळें बाहेरील माणसांना जास्तच खरें वाटतें. सर्वच मूर्खांचा बाजार त्यांत वाईटाचेच अनेक प्रकार आहेत झालें. मूर्ख धनिकाकडून पैसे उपटण्याच्या अनेक युक्त्या आहेत यापेक्षां त्यांत जास्त कांहीं नाहीं. नाहीं तर देवाला हुक्का हवा कशाला ?

**(प्रश्न)** पहा, द्वारकेंतील ठाकुरजीची मूर्ति भक्ताबरोबर तेथपर्यंत चालत गेली व एका सव्वारतीमध्यें कित्येक मणांची मूर्ति तोलली गेली. हा चमत्कार अद्भुत नाहीं काय ? **(उत्तर)** नाहीं, नाहीं ती मूर्ति त्यानें चोरून नेली होती व सव्वा रतीनें मूर्ति तोलली गेली हें तुमचें म्हणणेंहि अगदीं भांगट माणासाच्या बडबडण्यासारखें आहे. आता या गप्पा तुम्ही पुरें करा.

**(प्रश्न)** अहो ! सोमनाथाचे चरण पृथ्वीला लागत नसत. ती मूर्ति अधांतरीं उभी राहत असे हा नाहीं का दैवी चमत्कार ? **(उ०)** बस्स् ! सोमनाथाविषयीं जास्त बोलूं नका. अहो, जर तेथें आवाहित दैवत जागृत असतें तर महंमद गिझनीनें येऊन जेव्हां मूर्ति फोडली, दरवाजे पाडले व देवळाचा विध्वंस केला तेव्हां त्या देवाचा चमत्कार कोठें गेला होता ? पुजारी व भक्त यांचा विध्वंस करून हिंदूंच्या लाखों फौजेचा नाश करून महंमद गिझनीनें मूर्ति फोडून यथेच्छ द्रव्य लुटण्याचें काम चालू ठेवलें तेव्हां तुमचें दैवत कोठें गेलें होतें ? ' हे महादेवा ! तूं या म्लेंच्छांना मारून आमचें रक्षण कर ' अशी त्यावेळीं लोकांनीं केलेली प्रार्थना त्या देवानें कां ऐकली नाहीं व आपल्या भक्तांचें रक्षण कां केलें नाहीं ? त्यावेळचे पुजारी तेथें असलेल्या सर्व राजांना सांगत कीं, " हे राजेलोकहो ! तुम्ही स्वस्थ बसा. महादेवाची आम्ही प्रार्थना केली आहे; त्याच्याकडून वीरभद्र किंवा भैरव आतां येईल व महंमदाचा पराभव करून टाकील ! आम्हांला दुर्गादेवी स्वप्नांत दिसली. तिनें सांगितलें कीं, मी आतां प्रकट होऊन म्लेंच्छांचा पाडाव करतें. तेव्हां हे राजेलोकहो ! तुम्ही हो बेफिकीर असा. महंमद आमच्या देवावर कसा चालून येईल ? हें बोलून चालून जागतें दैवत आहे. नुसत्या इच्छामात्रेंकरून त्याचा वाटेंतच विध्वंस होईल. ' भोळे बिचारे अज्ञानी व क्षत्रियांच्या कुळांत स्वकुळाळा बट्टा लावण्यासाठींच उत्पन्न झालेले राजे बेफिकीर राहिले. देव आपलें व आमचें रक्षण करील असा मनांत विश्वास धरून त्यांनीं सैन्याची वगैरे कांहीं तयारी केली नाहीं. वेडे बिचारे ! अशा दगडाच्या मूर्ति जर कोणाचें रक्षण करूं शकत्या तर मग अवाढव्य सैन्य राजे लोकांनीं कशाला पाळलें असतें ? जसें हें पुजाऱ्यांनीं सांगितलें तसेंच ज्योतिष्यांनींहि आपल्यापरी राजांना आपल्या जाळयांत ओढून त्यांना तोंडघशीं पाडलें. ज्योतिषी म्हणाले कीं 'अहो सध्यां लढाई करण्याला किंवा शत्रूवर चाल करून जाण्याला मुहूर्त नाहीं ! चंद्र आठवा आहे व बुध आडवा पडला आहे ! 'झालें. शेवटीं बुध (शहाणा) आडवा आल्यामुळें अर्थात् ज्ञानी ब्राह्मण मूर्ख व कर्तव्यशून्य झाल्यामुळें क्षत्रियहि त्यांचेंच खरें मानूं

लागले व सर्व बेफिकीर झाले. सर्व लोक मुहूर्त शोधून काढण्यास व देवाला नवस करण्यास लागले. कोणीहि लढाईची तयारी केली नाहीं. झालें ! क्षत्रियांना कायमच कालिमा लागण्याचा प्रसंग आला. आपल्या क्रूर राक्षसी अवाढव्य सैन्यासह महंमद गिझनीनें वेढा दिला. देऊळ घेरलें. तेव्हां राजे लोक जागे झाले. मूर्तीची व मंदिराची आतां कमबख्ती आली असें पाहिल्याबरोबर कांहीं तरी प्रयत्न करावा म्हणून लढाईला तोंड देण्यास पुढें झाले. पण आयत्या वेळीं लढाई कशी होते. सर्वांचा पुरा मोड झाला व क्षत्रिय पळूं लागले ! हाय हा धर्म ! काय हा मूर्तिपूजेचा परिणाम ! दगडावर देवाची भावना केली तर कोणाची तरी उन्नति होणें शक्य आहे काय ? महंमदानें पुजाऱ्यांची कत्तल केली, कित्येकांना पकडलें, तेव्हां ते म्हणाले की, 'आम्हीं तुला तीन कोट रुपये देतों. पण आमच्या देवाला व देवळाला शाबूत ठेव' त्यावर तो म्हणाला कीं, ' हे काफीर लोकहो ! आम्ही मूर्तिपूजक नाहीं इतकेंच नव्हे, तर आम्ही मूर्तिभंजक आहों !' असें म्हणून त्यानें देऊळ फोडलें मूर्तीच्या वर खालीं—जमिनींत व छतामध्यें लोहचुंबक बसवून मूर्ति अधांतरीं त्या चुंबकाच्या आकर्षणानें राहील अशी तेथें व्यवस्था केली होती. जेव्हां महम्मदानें वरचें छत तोडलें तेव्हां वरचा लोहचुंबक जागचा हालल्यामुळें मूर्ति धडकन् जमिनीवर पडली. तिला महम्मदानें फोडलें तेव्हां तींतून अठरा कोटी रुपयांचीं रत्नें निघालीं. तीं सर्व त्यानें घेतलीं व पुजाऱ्यांना मारमारून त्यांच्याकडून खजिना उघडा करून घेतला व तो साफ लुटून फस्त केला. तेथील पुजाऱ्यांना गुलाम केलें व त्यांना मजुरी करणें, हमाली करणें, पीठ दळणें, घोड्यांना चारा घालणें, मलमूत्राचा उठाव करणें इत्यादि आपल्या सैन्यांतील कामें दिलीं ! हाय ! पहा अज्ञानाचा परिणाम कसा होतो तो ! दगडाची पूजा करण्यानें कसा सत्यानाश होतो तो पहा ! परमेश्वराची भक्ति केली असती तर त्यांस स्वकर्तव्य समजलें असतें व प्रसंगीं म्लेंच्छांचें दांत पाडून आपला विजय संपादण्यास आपले क्षत्रिय तयार झाले असते. जितकीं मूर्तीची देवळें आहेत तितकीं जर शूरवीरांचीं स्थानें असतीं व तेथें शूरांचीच भक्ति केली जाती तर असला घोर प्रसंग गुदरला नसतां. या लोकांनीं मूर्तीची निःसीम भक्ति केली खरी; पण आयत्यावेळीं एक तरी देवता त्यांना उपयोगी पडली काय ? निदान त्यापैकीं एखादा दगड तरी शत्रूच्या शिरावर पडून शत्रूचा एक तरी माणूस मारला जावयाचा होता ! जसे ते या मूर्तीची भक्ति करीत होते त्याचप्रमाणें जर निःसीमपणानें एखाद्या शूर वीरावर ते भक्ति करते तर खात्रीनें महम्मदाचे सर्व लोक तेथें जाया झाले असते. पण दगडाची भक्ति करणारांची बुद्धिहि दगडाप्रमाणेंच होणार, त्यांना खरा मार्ग सांपडणार कसा ?

**(प्र०)** अहो, एकदां द्वारकेच्या रणछोडजीनें नर्सीमेहताजवळ हुंडी दिली व त्यांचें ऋण चुकतें केलें. ही प्रसिद्ध गोष्ट किती आश्चर्यकारक आहे बरें ? **(उत्तर)** ते एका सावकारानें रुपये दिले होते व लोकांनीं उठविलें कीं, श्रीकृष्णानें पाठविले. जर अशा तऱ्हेचा साक्षात्कार होऊं शकला असता तर जेव्हां संवत १९१४ मध्यें इंग्रजांनीं तोफा डागून मूर्ती व मंदिरें उडवून दिलीं तेव्हां तुमचें दैवत कोठें निजलें होतें ? वाघेर आदि मंडळीनें लढून जें अतुल शौर्य दाखविलें व जो शत्रूचा पाडाव केला तसें एकहि मूर्तीकडून झाले नाहीं इतकेंच नाहीं. तर एका माशीला सुद्धां मारणें झालें नाहीं. खरोखरच जर तेथें श्रीकृष्णासारखा असता तर पुजाऱ्यांचे असले चाळे त्यानें कधींहि चालूं दिले नसते. आधीं या पुजाऱ्यांना त्यानें हद्दपार केले असते. आधीं हें पहा कीं, जो आपलें रक्षण करूं शकत नाहीं, त्याला शरणागत झालेले लोक मारले गेले तर त्यांत कसलें आश्चर्य ?

**(प्रश्न)** ज्वालामुखी देवी तर प्रत्यक्ष आहेना ? अजूनहि ती प्रत्यक्ष आहे. ती सर्वांना खाऊन टाकते. नवेद्य दिला तर तोहि अर्धा खाते व अर्धा ठेवते. हा आहे कीं नाहीं चमत्कार ? मुसलमान बादशहांनीं तीवर पाण्याचा पाट सोडला व लोखंडाचे तवे तिच्या तोंडावर बसविले तरीहि तिच्या तोंडांतून निघणारा धूर कमी झाला नाहीं ! व तिच्या पोटांतील अग्नीहि विझला नाहीं ? तिच्या पहाडांतून गर्जना होत असते. तेथील चंद्रकूप बोलत असतो. तेथील योनियंत्रांतून बाहेर आले असतां पुनर्जन्म होत नाहीं; जर कोणी ठुमरा बांधला तर त्याला महापुरुष असें म्हणतात व जोपर्यंत तो पुरा झाला नाहीं तोंपर्यंत त्या बांधणाराला अर्धा महापुरुष असें म्हणतात हे सर्व वृत्तांत खरें आहेत. तेव्हां आतां तरी सांगा कीं, आमचीं दैवतें खरीं आहेत कीं नाहींत ? **(उत्तर)** तुम्ही महामूर्ख आहांत. ज्याला तुम्ही देवी

म्हणतां व पूजतां तो तर ज्वालामुखी पर्वत आहे. ज्वालामुखी पर्वत पृथ्वीवर पुष्कळ आहेत व त्यांतून धूर व केव्हां केव्हां अग्नीचा वर्षाव होत असतो. ज्याप्रमाणें फोडणी देण्याकरितां तापविलेल्या पळींत थोडेसें तूप टाकलें तर त्या पळींतून ज्वाला निघतात व त्या पाळीला अग्नींतून बाजूला करून फूक मारली तर त्या ज्वाला विझून जाऊन त्या तुपांतून धूर निघूं लागतो; त्याप्रमाणें पृथ्वीच्या पोटांतील भयंकर उष्णतेनें धूर निघत असतो. चुलींत जशीं लांकडें जळत असतात, किंवा वणव्यामध्यें जशीं जंगलें जळून खाक होतात त्याचप्रमाणें पृथ्वीच्या पोटांत भयंकर अग्नि आहे. व तेथें सर्व पदार्थ पूर्ण रसमय स्थितीमध्यें आहेत. त्यामुळें पर्वताच्या तोंडातून सारखा धूर निघत असतो. यामध्यें विशेष तें काय आहे ? या ज्वालामुखी पर्वतावर पूर्वी सांगितल्याप्रमाणेंच कोणीतरी महामूर्खानें देऊळ बांधिलें व आपल्या पोटापाण्याची सोय करून घेतली; दुसरें काय ? तेथें मंदिर, कुंड व इकडे तिकडे थोडेसे नळ आहेत; याशिवाय तेथें कांहीं नाहीं. वर्षातून नियमित दिवशीं पुजारी लोक तेथें धामधूम करतात व भोळया लोकांना फसवितात; याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. तेथें एक कुंड आहे. त्यांत दलदल असून थोडेसें पाणी आहे. त्यांतून बुडबुडे येत असतात, ते पाहून मूढ लोक आपली यात्रा सफल झाली असें मानतात ! पण हा सर्व आंतून वाफ वर येते तिचा प्रकार आहे. योनियंत्र हें भिक्षुकांनीं पैसे उपटण्यासाठीं एक साधन करून ठेवलें आहे. त्यांतून आपलें शरीर बाहेर काढलें असतां पुनर्जन्म होत नाहीं, असें म्हणणें म्हणजे सर्व अध्यात्म ग्रंथ निरुपयोगी आहेत असें म्हणण्यासारखें आहे व ठुमरे बांधून महापुरुष होतो, हें मानणेंहि निर्बुद्धिपणाचें लक्षण आहे. तशा रीतीनें एखादा गाढवहि महापुरुष बनेल. पण ही गोष्ट शक्य आहे काय ? महापुरुष बनण्याला धर्मयुक्त पुरुषार्थ करण्याची आवश्यकता आहे, असें आपलीं सर्व शास्त्रें म्हणतात आहेत व खरें आहे. तिकडे दुर्लक्ष करून या थोतांडावर विश्वासून आपली व देशाची अवनति करूं नका.

(प्र०) अमृतसरमधील तलावाचें पाणी हें प्रत्यक्ष अमृतच आहे. तेथील मुरठी झाडाचें फळ अर्धे गोड असतें. तेथें एक भिंत आहे. ती वांकलेली असून पडत नाहीं. रेवालसरमध्यें बेडे तरतात. अमरनाथावर आपोआप लिंग बनतें व त्यांचें दर्शन घेण्यास जे यात्रेकरू जातात त्यांना कबुतरांचीं जोडपीं दर्शन देऊन यात्रा साफल्य झालें असें भासवितात. हें केवढें हो आश्चर्य ? (उ०) तुमच्या डोक्यांतून विचारशक्ति मुळींच नाहींशी झाली असावी असें वाटतें. अमृतसरच्या तलावाचें नांव मात्र अमृत आहे, पाणी अगदीं वाईट असतें. जेव्हां तो तलाव बांधला तेव्हां तेथें जंगल असेल व तेथील पाणी उत्तम स्वच्छ असेल पण आतां तसें नाहीं. व जर तें पाणी म्हणजे प्रत्यक्ष अमृतच असतें तर अमृतसरांतील लोक मेलेच नसते. भिंत पडत नाहीं म्हणतां तर तिची बनावटच तशीं आहे. (तिच्या वरच्या टोकांतील लंबरेषा पायाच्या आंत पडत असते म्हणून ती पडत नाहीं.) मुरठ्याच्या झाडाला कलम करून वाढवलेलें असेल किंवा गप्पाच असतील. रेवालसरमध्यें बेडा तरतो ती कारागिरांची कुशलता आहे. अमरनाथ पर्वतावर बर्फाचे पहाड बनतात तेथें पाण्यांत बर्फ पडून त्यांचें लिंग बनेल तर त्यांत काय आश्चर्य ? कबूतरें एक तर पाळलेलीं कोणीतरी सोडीत असतील, तीं स्वेच्छेनें येत असतील, किंवा तेथें मूळचीच असतील. यांत कांहींच आश्चर्य नाहीं.

(प्र०) हरिद्वार हें स्वर्गाचें द्वार आहे. त्या क्षेत्रांत जो स्नान करतो त्यांचीं सर्व पापें नाहींशीं होतात. तेथील तपोवनांत गेल्यानें तपस्वी बनतो. देवप्रयाग, गंगोत्तरींतील गोमुख, उत्तरकाशीमधील गुप्त काशी, त्रियुगीनारायण यांचें दर्शनानें मनुष्य पुनीत होतो. केदारेश्वर व बद्रीनारायण यांची पूजा सहा महीने देव करतात व सहा महीने माणसें करतात. महादेवाचें मुख नेपाळांत, तुंगनाथामध्यें जानु, केदारमध्यें छाती, अमरनाथामध्यें पाय आहेत. तेथें जाऊन दर्शन, स्पर्शन व स्नान केल्यानें मनुष्य मुक्त होतो. केदार व बद्री हीं स्थळें स्वर्गच होत. तेथूनच तो स्वर्गाला जातो. हें तरी आश्चर्य आहे कीं नाहीं ? (उत्तर) हरिद्वार हें गांव हिमालयांत जाण्याच्या पहाडी रस्त्याच्या प्रारंभीं आहे व तेथील कुंडांत उतरण्यासाठीं तेथें पायऱ्या केलेल्या आहेत. त्यांचा व स्वर्गाचा मुळींच संबंध नाहीं. या कुंडांत अनेक मूर्ख लोक प्रेतांतील हाडें टाकीत असल्यामुळें तेथील पाणीं नेहमी खराब झालेलें असतें. तेथें स्नान केलें असतां पापें नाश पावतात, हेंहि अगदीं असत्य. कारण पापांचा भोग झाल्यावांचून तीं केव्हांहि नाश पावत नसतात. तपोवन पूर्वी येथें होतें, पण सध्यां मात्र तें भिक्षुकवन बनलेलें आहे. तपोवनांत नुसतें गेल्यानें तपस्वी होतां येत नसून तप कल्यानेंच मनुष्य तपस्वी होत असतो. तेथील तपोवनांत गेल्या नंतर जर माणसें तपस्वी झालीं असतीं तर तेथील दुकानदार असत्यवादी

राहतेना. हिमालय पर्वतातून गंगा वाहते. जे गोमुख तुम्ही म्हणतां तें पैसे उपटणाऱ्या लोकांनीं केलेलें आहे. हिमालय पर्वतालाच हे धूर्त लोक स्वर्ग म्हणतात ! उत्तर काशी वगैरे ठिकाणें ध्यानयोग करण्यासाठीं उत्तम आहेत खरी; पण तेथें नुसतें गेल्यानें कांहीं होणें नाहीं योगाभ्यास करणाऱ्यानें तेथें जावें. देवप्रयाग वगैरे निव्वळ पौराणिकांच्या गप्पा आहेत. हा सर्व मूर्खांचा बाजार व धूर्तांची दुकानदारी आहे. जर गांव हिंडण्यानें पुण्य मिळेल तर यमनियम कशाला पाहिजेत ? जेथें अलखनंदा व गंगा यांचा संबंध होतो. तेथें देवता वसत असतात असें या स्वार्थी लोकांनींच उठवलेलें आहे व जर असें त्यांनीं उठवलें नसतें तर तेथें कोण गेलें असतें व पुजाऱ्यांची तुंबडी कशी भरली असती? गुप्तकाशी तर कोठेंच नाहीं. जी आहे ती प्रसिद्ध काशी आहे. तेथें एक धुमी दिसते, पण ती केव्हांपासून आहे याचा पत्ता नाहीं. भोळया लोकांस ही तीन युगापासून सारखी पेटत आहे असें हे धूर्त लोक सांगत असतात. ही बैराग्यांच्या धुमीसारखी किंवा पारशांच्या अग्यारीसारखी आहे. ही जर तीन युगांची असती तर तेथें राख अतोनात झाली असती; पण तसा प्रकार मुळींच नाहीं. तप्तकुंड आहे; पण जशीं इतर ठिकाणीं उन्हाळीं असतात तसेंच तें आहे. पहाडांतील उष्णतेमुळें पाणी तापून बाहेर येतें इतकेंच. त्याच्याच जवळ दुसरें थंड पाण्याचें कुंड आहे. त्यांत पहाडांतील दुसरीकडचें पाणी येत आहे. यांत कसलें आश्चर्य ? हा कांहीं दैवी चमत्कार नव्हे. केदारस्थान ध्यानाला चांगलें आहे. पण तेथेंहि या स्वार्थांध पंड्यांनीं भोळया लोकांस फसविण्याचा सपाटा चालविला आहे. बद्रीच्या ठिकाणींहि असलेच स्वार्थी पुजारी लोक फार. तेथें रावळजी म्हणून एक मुख्य आहेत. ते अनेक स्त्रिया करून विषयानंद करीत असतात. अशा अधार्मिक भोंदूंनीं धर्माचा नाश केला आहे. तेथें एक पशुपतीचें व पंचमुखी मूर्तीचें मंदिर आहे. हें स्थान अत्यंत पवित्र व रमणीय आहे. पण त्याचा स्वार्थी लोकांनीं असा फायदा घेतला असल्यामुळें शुद्ध धार्मिक मनुष्याच्या तें निरुपयोगी झाले आहे.

(**प्रश्न**) विंध्याचलामध्यें काली अष्टभुजा विंध्येश्वरी देवी प्रत्यक्ष सत्य आहे. या देवीची तीन काळीं तीन रूपें बदलत असतात. तिच्या देवळांत एकहि माशी नाहीं. (**उत्तर**) अहो, तुम्ही नीट पहाल तर पाषाणाच्या तीन मूर्तीच प्रत्यक्ष तेथें दिसत असतात. तीन वेळा पुजारी लोक निरनिराळा पोषाख घालतात म्हणून तीन निरनिराळया देवी असें पाहणारास वाटतें; माशांविषयीं जें तुम्ही म्हणालांत तें अगदी खोटें; हजारों लाखों माशा तेथें घूं घूं करीत असतात. (**प्र०**) प्रयाग हा तीर्थराज आहे. तेथें मुंडन केलें असतां व गंगा–यमुनांच्या संगमावर स्नान केलें असतां, इच्छासिद्धि प्राप्त होत असते. (उ.) प्रयागामध्यें महात्म्य मुळींच नाहीं. तेथील स्वार्थसाधु लोकांनीं पैसे लुटण्याची एक युक्ति काढली आहे इतकेंच. मनुष्य, प्रयागांत स्नान केलें असतां स्वर्गाला जातो असा कोणाचाच अनुभव नाहीं. तेथें जे जे स्नान करतात ते ते सर्व घरीं परत येत असतात. तेथें जे बुडून मरतात, त्यांचाहि जीव आकाशातील वायुमध्यें भ्रमण करून पुनः जन्माला येत असला पाहिजे. पैसे मिळतात म्हणून स्वार्थी लोकांनीं त्या प्रयागाला तीर्थराज म्हटलें इतकेंच. वास्तविक जड पदार्थांमध्यें राजा व प्रजा असा भाव असूं शकत नाहीं. (प्र.) अयोध्या सर्व वस्तीसह तीन वार उडून स्वर्गाला गेली असें म्हणतात, हा केवढा हो चमत्कार ? (उ.) अयोध्या नगरींतील कुत्रे, गाढव, भंगी, चांभार, व्यभिचारी व स्वार्थी लोकहि स्वर्गाला गेले हें म्हणणें असंभवनीय आहे. स्वर्गामध्यें गेली असती तर पृथ्वीवर न राहती. ती तेथच्या तेथेंच आहे. हे सर्व पौराणिक लोकांचे गप्पेचे प्रकार आहेत. नैमिषारण्याचाहि याचप्रमाणें प्रकार आहे. (**प्र०**) मथुरा तीन लोकांहून निराळी म्हणून सर्व तीर्थांत श्रेष्ठ आहे; वृन्दावन श्रीकृष्णाच्या लिलेचें स्थान असून गोवर्धन व्रजयात्रा करणें हें महत् भाग्यानें साधलें जातें. सूर्यग्रहणसमयीं कुरुक्षेत्रांत गेले असतां महत् पुण्य लाभतें हें सर्वच खोटें आहे काय ? (**उत्तर**) हें सर्व खोटें आहे, यांत मुळींच शंका नाहीं. मथुरा तीन लोकांहून निराळी हें तर खोटेंच; पण तेथें तीन प्रकारचे प्राणी फार माजलेले आहेत. ते भाविक माणासांना छळीत असतात. मथुरेचे चौबे जो स्नानाला जाईल त्याकडून कर घेण्यासाठीं टपून बसलेले असतात. न दिला तर छळतात व यात्रेकरूस रडकुंडीस आणतात. हे चौबे यजमानाच्या पाठीस लागून म्हणत असतात कीं, "महाराज ! लाओ दक्षणा ! भांग, मिर्ची और लड्डू खावे पीवे. यजमानकी जयजय करें." या चौब्यांच्या जाचांतून माणसें सुटून स्नान करवयास लागलीं

तर तेथें जलचर कांसव पाण्यांत उतरतांच चावा घेण्यास तयार असतात. त्यामुळें घांटावर पाण्याच्या बाहेरहि स्नान करणें मोठ्या मुष्किलीचें होतें. माकडें लोकांना त्रास देत असतात. याप्रमाणें या तीन प्राण्यांच्या जाचांतून मनुष्य निघणें कठीण असतें. तेथें माणसें भोळेपणानें जातात व पस्तावतात. वृंदावन पूर्वी कधीं नीट असेल. पण सध्यां मात्र वेश्यावन बनलेलें आहे. तेथील स्त्रियांची व चेल्यांची लीला अवर्णनीय व अस्मरणीय आहे. हाय, हाय ! काय ही धर्मक्षेत्रांची स्थिति ! किती ही धार्मिक अवनति ! गोवर्धन, व्रजयात्रा व दीपमाळेचा मेळा हेहि प्रकार वरीलप्रमाणेंच क्षुद्र, निंद्य व स्वार्थी लोकांनीं काढलेले आहेत. कुरुक्षेत्रामध्येंहि तीच स्थिति चाललेली असते. जो खरोखर धार्मिक आहे तो या मेळ्यापासून बराच दूर राहील. या मेळ्यामध्यें किंवा क्षेत्रांमध्यें जसे अनाचार होत असतात तसे इतर ठिकाणीं क्वचितच होत असतील. (प्र०) मूर्तिपूजा व तीर्थयात्रा सनातन असतां तुम्ही ती मानीत नाहीं याचेंच आम्हांला मोठें आश्चर्य वाटतें ! (उ०) अहो, जर ती सनातन असती तर ती वेद व ब्राह्मणादि ऋषिमुनिप्रणीत ग्रंथांत लिहिलेली असती. पण तसें मुळींच नाहीं. अडीच तीन हजार वर्षांपूर्वी जैनी व शाक्त लोकांनीं हिला प्रथम प्रारंभ केला व नंतर स्वार्थी पौराणिक लोकांनीं तिचा प्रसार केला. या पूर्वी आर्यावर्तामध्यें मूर्तिपूजा नव्हती ; तेव्हां शुद्ध वैदिकधर्म जागृत होता. जेव्हां जेव्हां जैनी लोकांनीं गिरनार, पालिठाना, शिखर, आबू, शत्रुंजय वगैरे ठिकाणीं तीर्थें आहेत, असें प्रसिद्ध केलें तेव्हां त्यांच्या जोडीला पौराणिकांनींहि आपलीं तीर्थें तयार केलीं, इतकेंच. जर कोणाला जास्त खात्री करून पहावयाची असेल तर त्यानें पंड्यांकडचे ताम्रपट व त्यांच्या जुन्या वह्या पहाव्या. कोणाकडेहि एक हजार वर्षांपेक्षां जुना लेख नाहीं. यावरूनच सिद्ध होतें कीं, हा जास्त प्रचार फार तर एक हजार वर्षांतला आहे. तात्पर्य, खऱ्या धार्मिक पुरुषांनीं आपला सारासार विचार जागृत करून खऱ्या धर्माचें आचरण करावें. या पौराणिकांच्या भ्रमजालांत पडून आपला जन्म व्यर्थ घालवूं नये.

## पुराणांचें परीक्षण.

**क्षेत्रमहात्म्य**–(प्र०) तुम्ही मूर्तिपूजेचें खंडन केलें पण तीर्थमहात्म्य व क्षेत्रमहात्म्य तरी मानतां ना ? सर्व पुराणांमध्यें क्षेत्रांची महात्म्यें वर्णिलीं आहेत. पहा–'**अन्यक्षेत्रे कृतं पापं काशीक्षेत्रे विनश्यति ।।**' वगैरे. हें केवढें बरें क्षेत्राचें महात्म्य आहे ? (**उत्तर**) जर त्या क्षेत्रांमध्यें लोकांचीं पापें नाश पावलीं असतीं तर तेथें गेल्यानें दारिद्य, अंधत्व, पंगुत्व, कोड वगैरे नाहींसें होऊन सर्व श्रीमान्, निरोगी व जीवन्मुक्त झालेले असते. तशी ज्या अर्थी स्थिति नाहीं त्या अर्थी तेथें गेल्यानें पाप नाश पावतें असें कशावरून म्हणतां ? (प्र०) "**गंगा गंगेति यो ब्रूयाद्योजनानां शतैरपि ।। मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति ।। १ ।। हरिर्हरति पापानि हरिरित्यक्षरद्वयम ।। २ ।। प्रातःकाले शिवं दृष्ट्वा निशि पापं विनश्यति ।। आजन्मकृतं मध्याह्ने सायाह्ने सप्त जन्मनाम् ।। ३ ।।** इत्यादि श्लोक अनेक पुराणांत व महात्म्यग्रंथांत आहेत. हजारों कोसांवरून "**गंगा गंगा**" असें जरी तोंडानें म्हटलें तरी सर्व पापें नाहींशीं होतात व तो मनुष्य विष्णुलोकाला जातो. 'हरि' असें म्हटलें असतां सर्व पाप नाश पावतें. सकाळीं शिवाचें दर्शन घेतलें असतां रात्रीं केलेलें पाप नाश पावतें, दुपारी दर्शन घेतलें असतां आजन्मांतील पाप जळतें व सायंकाळीं दर्शन घेतलें असतां सप्त जन्मांचें पाप नाश पावतें. अशीं जी वचनें पुराणांत आहेत तीं स्थानमहात्म्य व क्षेत्रमहात्म्य दाखवीत नाहींत काय ? (**उत्तर**) हें सर्व खोटें आहे यांत मुळींच शंका नाहीं. जर गंगा, हरि, राम, कृष्ण, नारायण, शिव, भगवती इत्यादि नांवें घेतल्यानें पापें नाश पावतील तर कोणीहि पापी राहणार नाहीं व पापें करावयासहि कोणी भिणार नाहीं. कित्येक लोक तर या नामस्मरणावर विश्वास ठेवून यथेच्छ दुराचरण करतात व नंतर 'राम' असें म्हणतात व सर्व पाप जळलें असें समजतात. अशा प्रकारें असत्य गोष्टींवर विश्वास ठेवून मनुष्यें इहपर लोकांच्या सुखाला मुकत आहेत. **हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें कीं, केलेलें पातक भोगलेंच पाहिजे, भोगल्याशिवाय त्याची कधींहि निवृत्ति होणार नाहीं.** (प्र०) बरें, तुमच्या मतें तरी तीर्थें आहेत काय ? व तुम्ही कोणत्या तरी नामस्मरणाला मानतां काय ?(उ०)होय आम्ही वैदिक तीर्थें व वैदिक नामस्मरण मानतों व तेंच प्रत्येक धार्मिक माणसानें मानावें हें योग्य आहे, **सत्य शास्त्रांचें अध्यायन व अध्यापन, धार्मिक विद्वानांची संगति, परोपकार, धर्मानुष्ठान, योगाभ्यास,**

निर्वैर होणें, निष्कपटी होणें, सत्य बोलणें, सत्य, मानणें, सत्य कर्मे करणें, ब्रह्मचर्य सेवन करणें, आचार्य अतिथि, मातापिता यांची सेवा करणें, परमेश्वराची स्तुति प्रार्थना व उपासना करणें, शांति धरणें जितेंद्रिय होणें, सुशील बनणें, धर्मयुक्त पुरुषार्थ करणें, ज्ञान व विज्ञान मिळवणें शुभ गुण अंगीं आणणें हीं सर्व दुःखांतून जीवाला पार नेणारीं असल्यामुळें वेदानुकूल तीर्थें आहेत. यांचें सेवन करावें हें धार्मिक माणसांचें काम आहे. जलाशय किंवा क्षेत्र यांना तीर्थ असें कोणीहि म्हणत नाहींत. '**जना यैस्तरन्ति दुःखानि तानि तीर्थानि**' ज्यांच्या योगानें जीव सर्व दुःखांतून तरून जातात व सुख प्राप्त करून घेऊं शकतात तीं तीर्थें होत. जलाशय ही तारणारी नसून बुडविणारी आहेत, जलाशयांना तीर्थें म्हणण्यापेक्षां नौकांना तीर्थें म्हणणें बरें. कारण त्यांच्या सहाय्यानें मनुष्यें जलांतून तरून तरी जातात. (प्र०) तीर्थ शब्द तुम्ही आचार्यवाची आहे असें म्हणतां; त्याला आधार काय ? तुम्ही म्हणतां म्हणून आम्ही मानावें काय ? (**उत्तर**) आम्ही सांगतो म्हणून नका मानूं; यजुर्वेदाचें व पाणिनीचें सांगणें तर मानाल ना ? पहा:—

**नमस्तीर्थ्याय च** ॥ यजु० अ० १६।४२ **समानतीर्थेवासी** ॥ अष्टा० ४।४।१०७ ॥

'जे ब्रह्मचारी एका गुरूजवळ एकच शास्त्र शिकत असतात अर्थात् जे सहाध्यायी असतात त्यांस **सतीर्थ्य** असें म्हणतात.' यावरून उघड होतें कीं, तीर्थ शब्दाचा आचार्य, आध्यापक, गुरु, असाहि अर्थ आहे. तीर्थरूप किंवा तीर्थस्वरूप हें पिता किंवा पित्यासमान जो असतो त्याला लावतात. ह्यावरून त्या तीर्थ शब्दाचा पिता असाहि अर्थ होतो. पिता व आचार्य हे उत्तम ज्ञान देऊन मोक्ष मिळवून देण्यास सहाय्य करतात म्हणून त्यांस तीर्थ असें म्हणतात. जे वेदादि शास्त्रें शिकले आहेत व जे सत्यभाषणादि धर्मांनीं युक्त आहेत त्यांना तीर्थ असें म्हणतात. या तीर्थसंज्ञक साधू व धर्मात्मे यांना अन्नादि पदार्थ देऊन त्यांची सेवा करावी, त्यांचा सत्कार करावा व त्यांपासून विद्या मिळवावी. हें वरील यजुर्वेदामध्यें दाखविलें आहे. आतां वैदिक नामस्मरण कसें करावें तें पहा:—

**न तस्य प्रतिमा अस्ति यस्य नाम महद्यशः** ॥ यजु० ३२।३ ॥

'परमेश्वराचें नामस्मरण मोठें यश प्राप्त करून देणारें आहे' परमेश्वराच्या नामस्मरणापासून धर्मयुक्त कामें करण्याची प्रवृत्ति होते व तीं कामें केल्यानें यश वाढतें. परमेश्वराचीं नांवें ब्रह्म, ईश्वर, परमेश्वर, न्यायकारी,दयाळू, सर्वशक्तिमान् वगैरे आहेत. सर्वांहून तो मोठा आहे म्हणून त्याला ब्रह्म म्हणतात. ईश्वराचाहि ईश्वर आहे म्हणून त्याला **परमेश्वर** असें म्हणतात. सर्व सामर्थ्यवान् तो असल्यामुळें त्याला ईश्वर म्हणतात. तो सदासर्वदा न्याय करतो, अन्याय केव्हांहि करीत नाहीं म्हणून त्याला **न्यायकारी** असें म्हणतात. तो सर्वांवर कृपा करतो, म्हणून त्याला **दयाळू** असें म्हणतात. आपल्या सामर्थ्यानेंच कोणाचें सहाय्य न घेतां सर्व जगाची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करतो म्हणून त्याला **सर्वशक्तिमान्** असें म्हणतात. तो विविध पदार्थांना बनवितो म्हणून त्याला **ब्रह्मा** असें म्हणतात. सर्व ठिकाणीं व्यापक होऊन सर्व पदार्थांचें तो रक्षण करतो म्हणून त्याला **विष्णु** असें म्हणतात. तो सर्वांत मोठा देव आहे म्हणून त्याला **महादेव** असें म्हणतात तो प्रलय करतो म्हणून त्याला **रुद्र** असें म्हणतात. याप्रमाणें अर्थ दाखविणारीं परमेश्वराचीं नांवें आहेत. हे अर्थ लक्षांत ठेवून एकएका नांवामध्यें जो अर्थ व जो गुण त्या नांवानें दाखविला जातो तो गुण व धर्म आपण आपल्या अंगीं अंशतः तरी आणण्याचा प्रयत्न करणें व अशी प्रयत्न करण्याची स्फूर्ति होण्यासाठीं तीं परमेश्वराचीं नांवें लक्षांत ठेवणें याचेंच नांव वैदिक नामस्मरण आहे. या नामस्मरणानें सर्व मानवांची उन्नति होईल यांत शंका नको. ब्रह्म नांवाचें स्मरण करून सर्वांत थोर होण्याची इच्छा करावी. **परमेश्वर** शब्दाच्या स्मरणानें समर्थांमध्यें समर्थ व्हावें. ईश्वर शब्दानें सामर्थ्यवानांत सामर्थ्यवान् होण्याची इच्छा धरावी. **न्यायकारी** शब्दानें अधर्म सोडून धर्माचरण करीत जाण्याकडे प्रवृत्ति धरावी. **दयाळू** या शब्दानें सर्वांवर दया करावयास शिकावें. **सर्वशक्तिमान्** पदानें सर्व साधनें जय्यत ठेवण्यास शिकावें. ब्रह्मा शब्दानें शिल्पविद्या शिकण्यास उद्युक्त व्हावें. विष्णु शब्दानें सर्व जगांतील जीवांना आपणांप्रमाणेंच सुख हवें आहे असें समजून त्यांना सहाय्य करण्यास तयार व्हावें; **महादेव** शब्दानें विद्वानांतहि विद्वान् व तेजस्व्यांमध्यें तेजस्वी व्हावें. रुद्र शब्दानें दुष्टांचा नाश करण्यास उद्युक्त व्हावें व याप्रमाणें अन्य नामांवरून अन्य गुण जाणून ते ते गुण प्रसंगीं अंगीं आणण्याचा प्रयत्न करावा. तात्पर्य, परमेश्वराच्या नांवांचा अर्थ मनांत आणून त्या नांवांच्या अर्थानें व्यक्त होणारे गुणकर्मस्वभाव

या उक्तीमध्यें अनुभवून तसे आपले गुणकर्मस्वभाव करण्याविषयीं खटपट करावी. अशा प्रकारें कृतीमध्यें उतरलेले नामस्मरण उन्नतीला सहाय्यक होत असतें ही पद्धत वैदिक आहे. (प्र०) हें तुम्ही म्हणतां याला आधार काय ? (उत्तर) याला वेदाचा आधार आहे. पहा **तेजोसि तेजो मयि धेहि** ॥ 'हे परमेश्वरा ! तूं तेज:स्वरूप आहेस म्हणून माझ्यामध्येंहि तेज उत्पन्न कर. या प्रकारच्या प्रार्थना वेदामध्यें अनेक ठिकाणीं आहेत. त्यांचा विचार केला असतां **'ज्या नांवानें जो परमेश्वराचा गुण व्यक्त केला जातो तो गुण तें नांव उच्चारून ध्यानांत आणणें व तो अंगीं आणण्याचा प्रयत्न करणें** याला वैदिक नामस्मरण असें म्हणतात, हें सहज कळण्यासारखें आहे. (प्रश्न) **' गुरुब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुः साक्षात्परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ १ ॥** ' याप्रमाणें गुरुमहात्म्यांत वर्णिलें आहे. गुरूचें चरणामृत प्यावें, तो सांगेल तसें करावें, गुरु लोभी असला तर त्याला वामनाप्रमाणें मानावा, क्रोधी असला तर नृसिंह मानावा, मोहयुक्त होणारा असला तर रामाप्रमाणें मानावा, कामी असेल तर कृष्णाप्रमाणें मानावा. गुरु कसाहि असला तरी त्याच्यावर अश्रद्धा करूं नये; सन्त व गुरु यांचें दर्शन घेण्यास जातांना पावलोपावलीं अश्वमेध यज्ञ केल्याचें पुण्य लागतें. या गुरुमहात्म्याचें आश्चर्य नव्हें काय ? (उत्तर) हें गुरुमहात्म्याचें आश्चर्य नसून तुमच्या अज्ञानाचें आश्चर्य आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश्वर हीं जीं नांवें आहेत त्यांच्याशीं तुल्य, तुम्ही म्हणतां तशा गुरूच्या नांवाची योग्यता होऊंच शकत नाहीं. गुरुगीता म्हणून जें एक चोपडें स्वार्थी माणसानें लिहिलें आहे त्यामध्यें त्यानें तुम्ही म्हणतां तसें लिहिलें आहे. माता, पिता, आचार्य, अतिथि हे गुरु आहेत. त्यांची सेवा करावी व त्यांपासून विद्या व सुशिक्षण यांची प्राप्ति करून घ्यावी. गुरूचें काम विद्या देणें हें असून शिष्याचें काम विद्या घेणें हें आहे. जो मनुष्य लोभी, क्रोधी, कामी व मोही असेल तो गुरुच नव्हें, असें समजावें व त्याचा त्याग करावा ; इतकेंच नव्हें तर त्याला शिक्षा करावी. अशा भोंदूंना शिक्षा करणें वाईट नाहीं. जो सद्‌गुणयुक्त असेल तोच गुरु समजावा व तोच खरोखर मोक्षापर्यंत घेऊन जाईल. पण जे इतर कण्ठी, तिलक. टिळे, टोपी करून वेदविरुद्ध मंत्रोपदेश करणारे असतात ते कधींहि गुरु या पदवीस योग्य नसतात. ते शिष्यांपासून धन हरण करणारे असतात म्हणून त्यांच्या मागें कोणीहि लागूं नये. पहाः—

**दोहा—लोभी गुरू लालची चेला, दोनों खेले दाव । भवसागर में डूबते, बैठ पथरकी नाव ॥**

'लोभी गुरु व स्वार्थी चेला यांची जोडी, दगडाच्या नौकेत बसून जाणारीं माणसें जशीं समुद्रांत बुडतात त्याप्रमाणें भवसागरात बुडणारी आहे.' अशा भोंदू गुरूंचा लपंडाव कोणीहि चालूं देऊं नये. ज्याप्रमाणें पुजारी लोकांनीं मूर्ती स्थापून अज्ञान माजविण्याचा व त्या योगानें आपला स्वार्थ साधण्याचा सपाटा चालविला, त्याचप्रमाणें या ढोंगी लोकांनीं 'गुरुमहात्म्य ' व 'गुरुगीता' वगैरे पुस्तकें बनवून आपणांस कुकर्में करण्यास मोकळीक करून घेतली व आपली चाकरी भोळया लोकांकडून अव्याहृत चालावी अशी सोय केली व तेवढ्यासाठीं कितीहि दुःख झालें तरीं गुरूचे दोष काढू नयेत, त्यानें दिलेलें दुःख सहन करावें व त्याची चाकरी करावी असें लिहिलें ! पण जेव्हां ज्ञानाचा प्रकाश पसरतो तेव्हां अशा स्वार्थांध लोकांचें कांहीं चालेनासें होतें

**पुराणांचा कर्ता**—(प्र०) अहो ! तुम्ही आतांपर्यंत पुराणांचें खंडन केलेंत. पण जीं अष्टादश पुराणें व्यासानें लिहिलीं त्या व्यासाची योग्यता जाणून तुम्ही पुराणांचें खंडन करीत आहां काय ? (उ०) पुराणांचा कर्ता व्यास नव्हे. तीं कोणी तरी भोंदूनें लिहिलेलीं आहेत. (प्र०) वा:, वा: ! पुराणें व्यासानेंच केलीं आहेत. पहाः—

**अष्टादशपुराणानां कर्ता सत्यवतीसुतः ॥१॥ इतिहासपुराणाभ्यां वेदार्थमुपबृंहयेत् ॥२॥** भारत ॥ * * * **पुराणान्यखिलानि च ॥३॥** मनु० ॥ **इतिहासपुराणं पञ्चमं वेदानां वेदः ॥४॥ छांदोग्य० ७।१॥ दशमेऽहनि किंचित्पुराणमाचक्षीत ॥५॥ पुराणविद्या वेदः ॥ सूत्रम् ॥**

'अठरा पुराणांचा कर्ता व्यास आहे व व्यासांचें वचन मानलेंच पाहिजे ॥१॥ इतिहास व पुराण, यांच्या योगानें वेदाचा अर्थ जाणावा व लोकांस शिकवावा; कारण इतिहास व पुराणें हे ग्रंथ वेदाचा अर्थ सुचवीत असतात ॥ २ ॥ पितृकर्मामध्यें पुराणें व हरिवंश कथा सांगाव्या ॥ ३ ॥ इतिहास व पुराणें यांना पांचवा वेद असें म्हणतात.

॥४॥ अश्वमेघसमाप्तीच्या दहाव्या दिवशीं थोडेंसें पुराणश्रवण करावें ॥५॥ पुराणविद्या हा वेद आहे ॥६॥ इत्यादि प्रमाणांवरून पुराणें प्रमाण आहेत असें ठरतें. पुराणांमध्यें मूर्तिपूजा, नामस्मरण व तीर्थमहात्म्य वगैरे करावीं असें सांगितलें आहे; तेव्हां तोहि विधिच आहे असें ठरतें. आतां तरी तुम्ही पुराणांचें प्रमाण मानाल कीं नाहीं ? **(उत्तर)** व्यासानें वेदांतदर्शन व योगसूत्रावर भाष्य रचलें आहे. त्याच व्यासानें जर हीं सर्व पुराणें लिहिलीं असतीं तर यांमध्यें अशा गप्पा आल्याच नसत्या. व्यासांच्या वेदांतदर्शनावरून ते फारच विद्वान् होते असें स्पष्ट दिसतें. अशा तऱ्हेचे ते विद्वान्, धार्मिक, सत्यवादी योगीपुरुष पुराणांसारख्या गप्पागप्पाळांचे कर्ते कसे होतील ? जे लोक पुराणें हीं व्यास-प्रणीत आहेत असें मानतात, त्यांना व्यासांच्या विद्वत्तेचा लवलेशहि समजला नाहीं असेंच म्हणावें लागतें; नाहीं तर भागवतादि शीर्षकल्पित ग्रंथांचा कर्ता व्यास आहे असें कधींहि म्हटलें नसतें. वेदादिशास्त्रविरुद्ध असत्य गोष्टी लिहिणें हें व्यासासारख्या विद्वानाच्या हातून कधींहि होणार नाहीं. विरोधी, स्वार्थी, ढोंगी, अविद्वान्, अशा लोकांनीं पुराणें रचलीं व तीं व्यासांच्या नांवावर लादलीं. हें या अठरा पुराणांबद्दल झालें. आतां छांदोग्यादि ग्रंथांमध्यें जो पुराण शब्द येतो त्याचा अर्थ तुम्ही समजतां असा नाहीं. हीं अठरा पुराणें आधुनिक आहेत व छांदोग्यवचन त्यांपेक्षां जुनें आहे. म्हणून त्यांतील पुराण शब्दाचा अर्थ निराळा आहे. पहा:—

**ब्राह्मणानीतिहासान् पुराणानि कल्पान् गाथा नाराशंसीरिति ॥**

हें ब्राह्मण व सूत्रें यांतील वचन आहे. ऐतरेय, शतपथ, साम व गोपथ या ब्राह्मणांमध्यें प्रत्येकीं इतिहास, पुराण, कल्प, गाथा व नाराशंसी असें पांच भेद आहेत. (इतिहास) याज्ञवल्क्य व जनक याचा संवाद हा इतिहासाचा भाग, (पुराण) ब्राह्मणांतील जगदुत्पत्तीचें जें वर्णन आहे तें पुराण होय. (कल्प) वेदांतील शब्दांच्या सामर्थ्याचें वर्णन व अर्थनिरूपण करणें हा ब्राह्मणांतील भाग कल्पसंज्ञक होय. (गाथा) दृष्टांत दार्ष्टान्तिरूप जो ब्राह्मणांतील भाग हा गाथा होय. (नाराशंसी) मनुष्यांच्या प्रशंसनीय व अप्रशंसनीय कर्मांचें कथनरूप जो ब्राह्मणांतील भाग आहे तो नाराशंसी समजावा. या पांच प्रकारांनीं वेदाचा अर्थ समजतो, म्हणून हे प्रकार पूर्वोक्त ब्राह्मणांमध्यें सांगितले आहेत. पितृकर्मामध्यें, ज्ञानी लोकांचा सत्कार ज्यांत होतो अशा कर्मांमध्यें व अश्वमेधाच्या अंत्य दिवशीं हे ब्राह्मणांतील भाग लोकांस समजून सांगावे, असें प्राचीन ग्रंथांत सांगितलें आहे. ब्राह्मण ग्रंथ व्यासाच्या पूर्वींचे. तेव्हां त्यांत आलेला पुराण शब्द निराळया अर्थाचा असलाच पाहिजे. तो आधुनिक पुराणांचा वाचक कसा होईल ? ब्राह्मणग्रंथांतील पुराणांचा भाग कोणता हें मागें दाखविलेंच आहे. जीं पुराणें वेदाचा अर्थ समजविण्यास सहाय्याकारी आहेत तीं हीं अठरा पुराणें नसून तीं ब्राह्मणांतर्गत होत, हेंहि येथें विसरतां नये. या नवीन शीर्षकल्पित भागवतादि मिथ्या ग्रंथांना व्यासप्रणीत मानून त्यांची थोर योग्यता आहे असें मानणें हें अज्ञानाचें काम आहे. जेव्हां व्यासानें वेद पढले तेव्हां तुमच्या मतानें पुराणें नव्हतीं, व्यास ब्रह्मचारी असतांना जीं पुराणें होतीं तीं वरील ब्राह्मण ग्रंथांतील होत. ज्या व्यासानीं वेदाध्ययन करून वेदाच्या अर्थाचा प्रसार केला त्यांस वेदव्यास असें म्हणतात. वर्तुळाच्या मध्यगामी रेषेला व्यास म्हणतात व तोच शब्द ज्ञानांत पारंगत असणाऱ्यालाहि लावतात. ऋग्वेदापासून अथर्ववेदापर्यंत सांगोपाङ्ग अध्ययन करून ते ज्ञान शुकदेव, जैमिनि वगैरे शिष्यांना त्यानें शिकविलें म्हणून त्यास वेदव्यास (वेदपारंगत) असें म्हणतात. नाहींतर त्यांचें मूळचें नांव कृष्णद्वैपायन असें होतें. सध्यां कोणी म्हणतात कीं, व्यासानीं वेदांना एकत्र केलें म्हणून त्याला वेदव्यास असें म्हणतात. पण तें सर्व खोटें आहे. कारण व्यासांचा पिता, पितामह, प्रपितामह, पराशर, वसिष्ठ, ब्रह्मा इत्यादिकांनींहि वेदांचें सांग अध्ययन केलेलें होतें. जर पूर्वी वेद नव्हते तर त्यांनीं अध्ययन कसलें केलें ? तात्पर्य ही आधुनिक कल्पना खोटी आहे.

**पौराणिक कथा:**—पुराणांतील बहुतेक कथा असत्य व अतिशयोक्तीच्या आहेत. कोणती तरी एखादी घुणाक्षर न्यायानें खरीहि आहे; नाहीं असें नाहीं. जें पुराणांत सत्य आहे तें वेदादि शास्त्रांतील व जें असत्य आहे तें त्या स्वार्थी लेखकांच्या अशुद्ध मेंदूतील होय. पहा, शैवांनीं शिवपुराण बनविलें व त्यांत शिवाला परमेश्वर मानून विष्णु, ब्रह्मा,

इन्द्र, गणेश, सूर्य वगैरे यांना त्याचे दास बनविले. वैष्णवांनीं विष्णुपुराणादि ग्रंथ लिहिले व त्यांत विष्णूला परमेश्वर करून इतरांना त्याचे किंकर केले. देवीच्या उपासकांनीं देवीभागवतादि ग्रंथ केले व त्यांत देवीला थोर करून ब्रह्मा, विष्णु, रुद्रादिकांना तिचे दूत बनविले. गाणपत्यांनीं गणेशपुराण बनवून गणपतीला मुख्य देव बनवून इतरांना त्याचे दास बनविले. आतां पहा: या गोष्टी जर या संप्रदायी लोकांच्या नव्हेत तर त्या केल्या कोणी ? एकाच मनुष्यानें केल्या असें म्हटलें तर एकच मनुष्य अशा परस्परविरोधी गोष्टी लिहील असें संभवनीय दिसत नाहीं. परस्परविरोधामुळेंच हीं पुराणें विद्वानांनीं लिहिलीं नाहींत असें म्हणावें लागतें. एका पुराणांतील विधानें खरीं मानलीं तर दुसऱ्यांतील खोटीं होतात व दुसऱ्यांतील खरीं मानलीं तर तिसऱ्यांतील खोटीं ठरतात व तिसऱ्यांतील खरीं मानलीं तर त्यांचा कशाशींच मेळ बसत नाहीं. पुराणांमध्यें परस्पर विरोधी गोष्टी इतक्या आहेत कीं, त्या शोधावयास लांब जाण्याचें कारण नाहीं शिवपुराणांत शिवापासून, विष्णूपुराणांत विष्णूपासून, देवीपुराणांत देवीपासून, गणेशखंडांत गणेशापासून, सूर्यपुराणांत सूर्यापासून, वायुपुराणांत वायूपासून सृष्टीची उत्पत्ति झाली असें लिहिलें आहे व पुनः त्याच पुराणांत हे सर्व देव उत्पन्न झाले व शरीर धारण करते झाले असें प्रतिपादिलें आहे, याची असंबद्धता वरवर पाहणारासहि दिसेल. जर शिव उत्पन्न होऊन शरीरधारी झाला व त्याला वायको मुलें झाली तर तोहि सृष्टींतीलच एक परिच्छिन्न पदार्थ झाला. असा एकदेशीय परिच्छिन्न पदार्थ सर्व सृष्टि बनवूं शकेल ? सृष्टीची उत्पत्ति, प्रलय व स्थिति करणारा उत्पन्न कसा होईल व जो उत्पन्न होतो तो सृष्टीची उत्पत्ति कशी करूं शकेल ? या प्रश्नावर पौराणिकांजवळ कांहीं उत्तर नाहीं. कारण, जो उत्पन्न होतो त्याचा या सृष्टीमध्येंच अंतर्भाव होतो व सृष्टींतला पदार्थच सृष्टि उत्पन्न करतो हें म्हणणें म्हणजे सर्व सृष्टि कोणी केली तें माहीत नाहीं असें म्हणण्यासारखें आहे.

**शिवपुराणांतील सृष्टीची उत्पत्ति**—निरनिराळया पुराणांमध्यें सृष्टीची उत्पत्ति निरनिराळ्या प्रकाराची दिलेली आहे. शिवपुराणांत असें लिहिलें आहे कीं, शिवानें अशी इच्छा केली कीं, आपण आतां सृष्टि उत्पन्न करावी. त्यानें एक जलाशय उत्पन्न केला व त्यांत नारायण उत्पन्न करून त्याच्या नाभीमधून कमल उत्पन्न केलें. त्या कमलांत ब्रह्मा उत्पन्न झाला. त्यानें चोहोंकडे पाहिलें कीं सर्व पाणी आहे. तेव्हां जलामध्यें एक त्यानें अंजलि सोडली. त्याबरोबर त्या जलांतून एक बुडबुडा आला व त्यांतून एक पुरुष उत्पन्न झाला. तोच विष्णु होय. त्यानें ब्रह्म्याला म्हटलें कीं, हे पुत्रा, सृष्टि उत्पन्न कर. ब्रह्म्यानें त्याला म्हटलें कीं, मी तुझा पुत्र नाहीं; तूंच माझा पुत्र आहेस. त्यांच्यामध्यें भांडण सुरू झालें व ते दोघे दिव्य सहस्रवर्षेपर्यंत त्या जलावर मारामारी करीत राहिले ! हें पाहून महादेवास आश्चर्य वाटलें व तो म्हणाला कीं, मी या दोघांस सृष्टि उत्पन्न करण्यास पाठविलें पण हे आपआपसांत मारामारी करावयास लागले. तेव्हां त्यानें त्या दोघांमध्यें एक विशाल लिंग उत्पन्न केलें. तें त्या दोघांमध्यें वाढूं लागलें व वाढत वाढत आकाशापर्यंत जाऊन पोंचलें. या लिंगाला पाहून त्या दोघांलाहि आश्चर्य वाटलें व ते म्हणाले कीं, याचा आदि व अंत शोधूं या. जो याचा पत्ता लावून आधीं येईल तो पिता व जो मागाहून येईल तो पुत्र होय. याप्रमाणें दोघांमध्यें ठराव झाला. विष्णूनें कूर्माचें रूप धरलें व तो तळाकडे जाऊं लागला व ब्रम्ह्यानें हंसाचें रूप धरून तो वर उडूं लागला दोघेहि मनोवेगानें चालले. दिव्य सहस्रवर्षेपर्यंत दोघेहि दोन दिशांनीं चालत होते. पण कोणालाच टोंकाचा पत्ता लागला नाहीं. जेव्हां पत्ता लागेना तेव्हां एकाला वाटे कीं, कदाचित् दुसऱ्यानें पत्ता आणला असला तर मला पुत्र व्हावें लागेल. तर आतां काय उपाय करावा या विवंचनेंत दोघेहि पडले इतक्यांत एक गाय व एक केतकीचें झाड वरून खालीं उतरत येत होतें. त्याला ब्रम्ह्यानें विचारलें कीं, तुम्ही याचा अंत पाहिला काय ? त्यांनीं सांगितलें कीं, आम्ही हजार वर्षेपर्यंत या लिंगाच्या आधारानें चालत आहों. ब्रम्ह्यानें विचारलें कीं, याचा अंत कोठें तरी आहे कीं नाहीं ? त्यांनीं सांगितलें कीं याचा अंत नाहीं. ब्रम्ह्यानें त्यांस सांगितलें कीं, तुम्ही माझ्याबरोबर चला व अशी साक्ष द्या कीं, तूं या लिंगाच्या मस्तकावर दुधाची धार सोडीत होतीस व वृक्ष फुलें घालीत होता. अशी साक्ष तुम्ही दिलीत तर मी तुम्हांस तुमच्या ठिकाणावर घेऊन जाईन. त्यांनीं सांगितलें कीं, आम्ही कधींहि खोटी साक्ष देणार नाहीं. तेव्हां ब्रह्मा संतापानें लाल होऊन म्हणाला कीं, तुम्ही जर साक्ष दिली नाहीं तर मी तुमचें भस्म करून टाकीन. तेव्हां त्यांनीं भिऊन

तो म्हणत होता त्याप्रमाणें खोटी साक्ष देण्यास कबुली दिली. तेव्हां तिनेंहि खालीं उतरूं लागले. हे मूळच्या जागेवर पोंचण्यापूर्वीच तेथें विष्णु येऊन राहिला होता. ब्रह्मा पुढें होऊन विष्णूला विचारतो कीं कसें काय ? तुम्हांला तळ सांपडला काय ? त्यानें खरें उत्तर दिलें व म्हणाला मला याचा अंत लागला नाहीं. तेव्हां खूष होऊन ब्रह्मा म्हणाला कीं, मी याचा अंत पाहून आलों. विष्णु म्हणाला कीं, कोणी तरी साक्षी पाहिजे तेव्हां ब्रम्ह्यानें गाय व वृक्ष दाखविला त्यांनीं सांगितलें कीं, आम्ही या लिंगाच्या शिरावर होतों; तेथें हा आला होता. ही असत्य साक्ष दिल्याक्षणींच लिंगांतून शब्द निघाला कीं, हे केतकी वृक्षा ! तूं खोटें बोलत आहेस. यासाठीं मी तुला शाप दिला कीं, आजपासून तुझी फुलें कोणीहि देवतेच्या पूजेला घेणार नाहींत व जो घेईल त्याचा सत्यानाश होईल. गाईला शाप दिला कीं हे गाई ! ज्या तोंडानें तूं खोटें बोललीस त्या तोंडानें तूं आजपासून विष्ठा भक्षण करशील. व ब्रम्ह्यालाहि शाप दिला कीं, ज्या अर्थी तूं खोटें बोललास त्या अर्थी तुझी पूजा कोणीहि करणार नाहीं. विष्णूला त्यानें वर दिला कीं ज्या अर्थी तूं सत्य बोललास त्या अर्थी तुझी पूजा सर्व लोक करतील. याप्रमाणें झाल्यावर ब्रह्मा व विष्णु लिंगाची स्तुति करूं लागले. तेव्हां लिंग प्रसन्न होऊन त्यांतून एक जटाजूटयुक्त मूर्ति बाहेर आली व तो पुरुष त्यांस म्हणाला, मी तुम्हांस सृष्टि उत्पन्न करण्यासाठीं पाठविलें असतां तुम्ही आपआपसांत भांडूं लागलां हें काय? त्यांवर ब्रह्मा व विष्णु म्हणाले, आमच्याजवळ सामुग्री नाहीं, तेव्हां आम्ही सृष्टि कशी उत्पन्न करावी ? तेव्हां महादेवानें आपल्या जटांतून एक भस्माचा गोळा काढून दिला व त्यांस सांगितलें कीं, तुम्ही यापासून सृष्टि उत्पन्न करा. वाचकहो विचार करा ! जेव्हां सृष्टींतील पंचभूतें नव्हतीं तेव्हां ब्रह्मा, विष्णु, महादेव यांचीं शरीरें, जल कमल, लिंग, गाय, केवड्याचा वृक्ष व भस्म हे पदार्थ कसे झाले व कोणी केले ? याप्रमाणें असंबद्ध कथा या पुराणांत आहेत. या कथेवरून देवहि खोटी साक्ष देण्यास लोकांस प्रवृत्त करतात असें भासतें. असे या गोष्टीपासून अनेक दोष उत्पन्न होतात.

**भागवतातील सृष्टि - उत्पत्तीची कथाः**—भागवातांत सृष्टि–उत्पत्तीविषयीं असें लिहिलें आहे कीं, विष्णूच्या नाभींतून कमल निघालें व कमलांतून ब्रह्मा निघाला. ब्रम्ह्याच्या उजव्या आंगठ्यापासून स्वयंभू व डाव्या आंगठ्यापासून सत्यरूपा राणी उत्पन्न झाली. ललाटापासून रुद्र व मरीचादि दशपुत्र उत्पन्न झाले. त्यांपासून दक्ष प्रजापति झाले. त्याच्या तेरा मुलींचा विवाह कश्यपाबरोबरच झाला. त्यांपैकीं दितीपासून दैत्य, दनूपासून दानव, आदितीपासून आदित्य, विनतेपासून पक्षी, कद्रूपासून सर्प, सरमेपासून कुत्रे व अन्य स्त्रियांपासून हत्ती, घोडे, उंट, गाढव, म्हशी वगैरे पशु पक्षी, व गवत, बोर वगैरे सर्व झाडें उत्पन्न झालीं !!! वा: वा: ! अहो, भागवत लिहिणारे गृहस्थ हो ! काय तुमची अक्कल ! काय तुमची वर्णनशैली ! तुम्हांला अशा खोट्या गोष्टी लिहिण्यास थोडीशी सुद्धां लाज वाटली नाहींना ? यापेक्षां तुम्ही आंधळे बनलां असतां तर बरें झालें असतें. स्त्री पुरुषांच्या–मानवी प्राण्यांच्या–रजोवीर्याच्या योगानें मनुष्येंच उत्पन्न होतात, पण तुम्ही हत्ती घोडेहि मनुष्यांच्या शरीरापासूनच उत्पन्न केलेत ! शाबास तुमची ! परमेश्वरी नियमाविरुद्ध तुम्ही मानवी स्त्रीपासून सिंह, कुत्रे, हत्ती, घोडे वगैरे बनविलेत, पण वृक्षहि बनविलेत ना ? धन्य तुमची ! सिंह उत्पन्न झाल्यानंतर त्यांनीं आपल्या आईबापांला कसें खाऊन टाकलें नाहीं ? मनुष्यशरीरापासून वृक्ष उत्पन्न होणें शक्य आहे काय ? या खोट्या कपोलकल्पित गोष्टींवर कांहीं मूढांचा अजूनपर्यंत विश्वास बसला, हें फारच दुःखजनक वृत्त होय. या असत्य गोष्टी हे महाधूर्त लोक लोकांस सांगतात व वेडेपीर त्या निमूटपणानें ऐकून घेतात ! हें पाहून हे मनुष्यच आहेत कीं दुसरे कोणी प्राणी आहेत याबद्दल शंका येते ! हीं भागवतादि पुराणें रचणारे पाखंडी गर्भांतच कां नाश पावले नाहींत हें समजत नाहीं. हे बालपणीच मेले असते तर या आर्यावर्ताला ही कष्टमय दशा प्राप्त झालीच नसती. (प्र०) अहो यांत विरोध मुळींच नाहीं. विष्णुपुराण लिहिलें त्यांत विष्णूची स्तुति केली व त्याचप्रमाणें अन्य पुराणें रचलीं त्यांत अन्य देवतांची प्रशंसा करून अन्यान्य देवता कनिष्ठ आहेत असें लिहिलें तें सर्व योग्यच आहे. कारण, जो तो आपआपल्यापरि श्रेष्ठच आहे. मनुष्यांपासून वृक्षादिकांची उत्पत्ति परमेश्वरानें आपल्या मायेनें केली असेल ? जो कांहीं कारण नसतां आपल्या मायेच्या योगानें सर्व सृष्टि उत्पन्न करतो त्याला काय अशक्य असेल बरें ? (उत्तर) अहो भोळे लोक हो ! तुम्ही जें काय बोलतां तें विचार करून बोलत जा. उगीच बडबडणें चांगले नव्हे

पाहिजे त्याची तुम्ही स्तुति करा. पण ती त्याची यथार्थ गुण दाखविणारी असली पाहिजे. फाजील खुशामत करणें एकप्रकारची निंदाच होते. ज्या पंथांमध्यें तुम्ही जातां त्याला तुम्ही सर्वांत श्रेष्ठ करतां व इतरांस कनिष्ठ मानतां हा कोठला न्याय ? कांहीं सत्याची बाजू धराल कीं नाहीं ? माया ही मनुष्यमध्यें असू शकते. जो छली, कपटी असतो त्याला मायवी असें म्हणतात. परमेश्वरामध्यें छल कपटादि दोष नसल्यामुळें त्याला मायावी असें म्हणत नाहींत.जर आदि सृष्टिमध्यें कश्यप व त्याच्या स्त्रिया यांपासून पशुपक्षी व झाडें हीं झालीं असें तुम्ही म्हणतां, तर तशी सृष्टि सध्यां कां होत नाहीं ? शतपथादि ब्राह्मणांतर्गत पुराणग्रन्थांत व वैदिक ग्रन्थांत कश्यप वगैरेंच्या ज्या गोष्टी दिल्या आहेत त्या, तुम्ही मानतां त्या गोष्टींपासून अगदीं भिन्न आहेत. पहा:-**तस्मात काश्यप्य इमाः प्रजाः ॥ शत० ७।५।१।५॥**

शतपथामध्यें असें लिहिलें आहे कीं, 'ही सर्व सृष्टि कश्यपानें केलेली आहे.' आतां कश्यप कोण हें पहा—
**कश्यपः कस्मात् पश्यको भवतीति ॥ निरू० २। २॥**

सृष्टिकर्त्या परमेश्वरालाच कश्यप असें म्हणतात. कारण तो पश्यक (**पश्यतीति पश्यः स एव पश्यकः**) आहे. अर्थात् तो निर्भ्रमवृत्तीनें सर्व चराचर जगताला व जीवांच्या कर्मांना व सकल विद्यांना यथावत् पाहतो. सर्वसाक्षी असा त्या काश्यप शब्दाचा अर्थ आहे. **'आद्यन्तविपर्ययश्च'** या महाभाष्यवचनाप्रमाणें पहिलें अक्षर व अंत्याक्षर यांचा विपर्यास होऊन **'पश्यक'** शब्दाचा **'कश्यप'** शब्द बनला. या शब्दाचा हा वैदिक अर्थ ध्यानांत न आणतां पौराणिकांनीं या कश्यपाचा संबंध एका व्यक्तीशीं जोडला हें त्यांचें अज्ञान होय.

**मार्कण्डेयपुराण**—मार्कंण्डेयपुराणांतील दुर्गापाठामध्यें असें लिहिलें आहे कीं, देवाच्या शरीरांतील तेज निघून त्याची एक देवी बनली व तिनें महिषासुराला मारलें! रक्तबीजाच्या शरीरांतून एक रक्तबिंदु जरी पृथ्वीवर पडला तरी त्या एका बिंदूपासून तसाच रक्तबीज राक्षस तयार होत असे. त्यामुळें सर्व जगतामध्यें रक्तबीज भरून गेलें. रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या, वगैरे पुष्कळ गप्पा मारलेल्या आहेत. अहो ! रक्तबीजांच्या योगानें जर सर्व जग भरून गेलें होतें. तर देवी आपल्या सिंहासह कोठें राहत होती ? जेथें देवी राहत होती तेथें रक्तबीज नव्हतें असें जर म्हणाल तर त्यांनीं सर्व जग व्यापलें हें असत्य म्हणावें लागेल. जर सर्व ठिकाणीं रक्तबीज होऊन गेलें होतें, तर मग पशुपक्षी, मनुष्यादि प्राणी, जल, स्थल, मगर, मासे, कांसव वगैरे प्राणी कोठें राहिले होते ? सारांश, अशा तऱ्हेच्या गप्पा पुराणांत असंख्य आहेत.

**श्रीमद्भागवतः**—आतां श्रीमद्भागवतांतील लीला पहा. ब्रम्ह्याला नारायणानें चतुःश्लोकी भागवताचा उपदेश केला आहे. त्यांत म्हटलें आहेः—

**ज्ञानं परमगुह्यं मे यद्विज्ञानसमन्वितम् । सरहस्यं तदङ्गञ्च गृहाण गदितं मया ॥ भा० २।९।३०**

'हे ब्रह्मदेवा ! ज्ञान, विज्ञान व रहस्य यांनीं युक्त व धर्मार्थकाममोक्षांना अंगभूत असणारें जें हें माझें परमगुह्य ज्ञान आहे तें ग्रहण कर.' आतां या वाक्यरचनेंत एवढें पहावयाचें कीं, जर ज्ञान विज्ञानयुक्त म्हटलें तर त्याला आणखी 'परम' असें म्हणण्याचें काय कारण आहे ? बरें ज्ञानाला गुह्य असें म्हटल्यानंतर मग रहस्य म्हणून द्विरुक्ति तरी करण्याचें कारण काय ? अशा तऱ्हेची मूळश्लोकांतच शब्दयोजना अन्वर्थक नाहीं. मग त्यावरून लिहिलेल्या ग्रंथांत अनर्थकारक गोष्टी असल्या तर त्यांत काय आश्चर्य ? पहा—ब्रह्मदेवाला वर दिलेला आहे कीं:—

**भवान् कल्पविकल्पेषु न विमुह्यति कर्हिचित् ॥ भा० २।९।३६॥**

'तुला सृष्टि व प्रलय यांमध्यें-कल्पविकल्पामध्येंहि-केव्हांहि मोक्ष प्राप्त होणार नाहीं.' हा वर त्याला मिळाला असतांहि त्यानें दशमस्कंधामध्यें मोहित होऊन वत्सलाहरण केलें ! मग वर दिल्याचें महत्त्व काय बरें राहिलें ? जर वर दिलेलें खोटे होतात तर ते वर तरी कसले ! दोन गोष्टीपैकीं वर तरी खोटा असावा किंवा वत्सहरण तरी खोटें असावें ? दोहोंतून एकीला गप्प म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं ! जर वैकुंठामध्यें रागद्वेष, ईर्ष्या, दुःख क्रोधादि नाहींत तर सनकादिकांना वैकुंठद्वारामध्यें क्रोध कसा बरें उत्पन्न झाला ? ज्या अर्थीं तेथें त्यांना क्रोध आला त्या अर्थीं तेथें स्वर्गत्व मुळींच नाहीं असें ठरतें. जर जय व विजय हे द्वारपाल होते व त्यांना स्वामीची आज्ञा मानणें भाग होतें तर त्यांनीं

सनकादिकांना प्रतिबंध केला, यांत दोष कसला ? जर त्यांचा कांहीं दोष नाहीं तर त्यांना शाप तरीं कां लागावा? 'तुम्ही पृथ्वीवर पतन पावा ' असा ज्या अर्थी त्यांना शाप झाला त्या अर्थी तेथें पृथ्वी नव्हती हें उघड आहे, तेथें आकाश, वायु, अग्नि, व जल हीं चारच तत्त्वें होतीं ! जर असें आहे तर मंदिर, वैकुंठद्वार व जल हे पदार्थ कोणाच्या आधारानें होते ! असो. एवढ्यानें काय झालें ! पौराणिकलीला अजून यापुढें आहेत ! जेव्हां पुढें जयविजयांनीं सनकादिकांची स्तुति केली व विचारिलें कीं, 'महाराज ! आम्ही पुन: वैकुंठामध्यें केव्हां येऊं ? त्यावर सनकादिक म्हणालें कीं, **जर तुम्ही नारायणाची सप्रेम भक्ति कराल तर सातव्या जन्मांत वैकुंठाला याल व जर विरोध भक्ति कराल तर तिसऱ्या जन्मांत याल ?'** या विधानांत सप्रेमभक्तिपेक्षां विरोधभक्तीचें महात्म्य जास्त संगितलें आहे ! लोक हो, विचार करा! भागवताच्या मतानें नारायणाशीं विरोध केल्यानें लवकर मुक्ति मिळते ! असो. या गोष्टीमध्यें आणखी एक विचाराचा प्रश्न आहे तो हा कीं, जय-विजय हे नारायणाचे नोकर होते व त्यांचें रक्षण करणें हें त्याचें काम होतें. जर एखादा मनुष्य अपराधाशिवाय एखाद्याच्या नोकरांना दु:ख देऊं लागला तर त्यानें त्या दु:ख देणाऱ्याला कडक शासन करणेंच योग्य होय. असें असतां जर तो स्वामी गप्प राहील तर त्याच्या नोकरांची दुर्दशा कोणीही करून टाकील. वास्तविक पाहतां या गोष्टींत स्वामीनिष्ठ जयविजय निरापराधी होते व सनकादिक अपराधी होते. जर नारायणाच्या येथें न्याय असतां तर त्यानें सनकादिकांना दंड केला पाहिजे होता. पण भागवतांत न्याय कोठून ! भागवताच्या दृष्टीनें ज्याच्याशीं विरोध करणेंच श्रेयस्कर आहे त्याच्या जवळ न्याय असेल तरी कसा ! सनकादिकांनीं आंत येण्याचा हट्ट धरावा व नोकरांबरोबर लढावें व नोकर प्रामाणिकपणानें काम करीत आहेत असें आढळून आल्यावर त्यांस शाप द्यावा ! वारे न्याय ! जयविजयांबद्दल सनकादिकांनाच पृथ्वीवर ढकलले पाहिजे होते. जर प्रत्यक्ष नारायणाच्या घरीं इतका अंधार आहे तर मग त्याचे भक्त जे वैष्णव त्यांच्यांत काय अज्ञान असेल याची नुसती कल्पनाच करावी ! व त्यांची कशी दुर्दशा होत असेल याचा विचार करावा ! असो. पुढे हे जयविजय विरोधभक्ति करण्याच्या इच्छेनें हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपु झाले. हिरण्यक्षाला वराहानें मारलें. त्याचा वृत्तांत पुढें दिल्याप्रमाणें लिहिला आहे:—हिरण्याक्षानें पृथ्वीला चटाईप्रमाणें गुंडाळून उशाला घेऊन तो झोंपी गेला. विष्णूनें वराहरूप धारण केलें व त्या पृथ्वीच्या गुंडाळीला तोंडांत धरून हिसका मारला. तेव्हां तो जागा झाला व त्या दोघांचें युद्ध जुंपलें व वराहानें हिरण्याक्षाला मारलें या ठिकाणी पृथ्वी गोल आहे कीं चटईप्रमाणें आहे ? याचा विचार केला असतां, या भागवतकाराला भूगोलविद्येचें ज्ञान मुळींच नव्हतें असें दिसेल ! पृथ्वीची गुंडाळी धरून हिरण्याक्ष निजला तो कोठें निजला ? व वराहानें कशाच्या आधारनें पृथ्वी त्याच्या उशाखालून घेतली ! वराहानें पृथ्वीला तोंडांत धरलें होतें, मग हिरण्याक्षाचें व त्याचें युद्ध झालें कोठें ? व जयविजयाला पृथ्वीवर पतन पावण्यास जो शाप झाला होता त्याची वाट काय ? कारण ते वराहाच्या तोंडांत असणाऱ्या पृथ्वीवर होते असें म्हणणें संभवत नाहीं. अशा हजारों मिथ्या कथा या पुराणांत आहेत ! आतां हिरण्यकश्यपूचें वृत्त पहा. त्याला प्रल्हाद नांवाचा मुलगा होता. तो पक्का ईश्वरभक्त. जेव्हां तो शाळेंत शिकावयास जाई तेव्हां शिक्षकांना सांगे कीं, माझ्या पाटीवर नारायण असें लिहून द्या. हें त्याच्या बापाला समजलें तेव्हां तो त्याला म्हणाला कीं, तूं आमच्या शत्रूचें भजन कां करतोस ? ईश्वराचें भजन करूं नकोस. हें त्याचें म्हणणें प्रल्हादानें ऐकलें नाहीं. तेव्हां त्यानें त्याला बांधून मारलें, पहाडावरून कडेलोट केला व तापलेल्या कढईंत शिजविलें, तरीहि त्याला कांहींच झालें नाहीं. तेव्हां तो प्रल्हादाला एके दिवशीं म्हणाला कीं 'जर तुझा नारायण सत्य आहे तर तूं या तापलेल्या खांबाला घट्ट मिठी मार, तुझा देव तुला वांचवूं दे !' असें म्हणून त्यानें प्रल्हादाला एका तापवून लाल केलेल्या लोहस्तंभाजवळ उभें केलें, तेव्हां प्रल्हादाच्या मनांत शंका उत्पन्न झाली कीं, मी जगेन कीं मरेन ? तेव्हां नारायणानें आपला साक्षात्कार दाखविण्यासाठीं मुंग्यांची रांग त्या खांबावर चालू केली ! तेव्हां त्याची खात्री झाली व तो एकदम खांबाला जाऊन चिटकला. त्याबरोबर तो खांब फाटला व त्यांतून नृसिंह बाहेर आला व त्याच्या बापाला पकडून त्याचें पोट फाडून त्याला त्यानें मारलें ! नृसिंहानें संतुष्ट होऊन प्रल्हादाला वर माग, म्हणून सांगितलें. तेव्हां त्यानें 'आपल्या

पित्याला सद्गति मिळो' हा वर मागितला. नृसिंहानें वर दिला कीं, तुझे एकवीस पुरुष सद्गतीला जातील. या ठिकाणीं असा विचार केला पाहिजे कीं, विरोधभक्ति करणें जर परमेश्वराला इष्ट आहे तर हिराण्यकश्यपूनें काय वाईट केलें ? हिरण्यकश्यपूच ठीक करीत होता असें म्हटलें पाहिजे. कारण विरोधानें लवकर मुक्ति मिळते ! मग प्रल्हादाचा पक्ष नारायणाला ऊचलण्याचें कारण काय ? जर प्रल्हादाची भक्ति हिरण्यकश्यपूइतकी प्रखर नाहीं तर प्रल्हाद जास्त प्रिय कां ? बरें तें असो. पूर्वी ठरल्याप्रमाणें जय–विजय तीन जन्मांनीं मुक्त व्हावयाचे. पण येथें तर नृसिंह एकदम एकवीस पूर्वजांना सद्गति देतो ! तेव्हां नारायणालाहि विसर पडतो म्हणावयाचा !! बरें तेंहि असो. भागवताच्या लेखानुसार ब्रह्मा, प्रजापति कश्यप व हिरण्याक्षहिरण्यकश्यपु मिळून चारच पिढ्या झाल्या असें असतां नृसिंह कोणत्या एकवीस पिढ्यांना सद्गति देणार ! प्रल्हादासह धरल्या तरी पांच पिढ्या होतात. एकवीस पिढ्या नसतां एकवीस पूर्वजांना सद्गति कशी देतां येते ? काय ह्या गप्पा ? बरें ! पुनः तेच हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपु, रावण-कुंभकर्ण व शिशुपाल-वक्रदंत झाले, असें म्हटलें आहे; तेव्हां नृसिंहाच्या वराची वाट काय ? एकदां सद्गति मिळाली असतांहि पुनः जन्मावें लागलें काय ? असे प्रमादयुक्त ग्रंथ प्रमादी पुरुषच लिहितात व तसेच पुरुष वाचीत असतात ! विद्वानाला ते वाचून दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं ! पूतना व अक्रूर यांविषयीं भागवतांत अशाच गप्पा आहेत. पहाः—

**रथेन वायुवेगेन ।। भा० । ३९ ।३८ जगाम गोकुलं प्रति ।। भा० ।३८।२४।।**

कंसाच्या आज्ञेनें वायूप्रमाणें चालणाऱ्या घोड्यांच्या रथांत बसून अक्रूर जो सकाळीं निघाला तो गोकुळांत सूर्यास्ताच्या समयीं येऊन पोंचला ! पण वाचकांनीं येथें विचार करावा कीं, या दोन स्थलांमधलें अंतर सगळें चार मैल आहे. इतकें अंतर तोडावयाला वायूप्रमाणें चालणारे घोडे व त्यांस वेळ लागला बारा तास ! यापेक्षा असंबद्धता ती आणखी कोणती असणार ! पूतनेचें शरीर सहा कोस रुंद व असेंच अनेक कोस लांब होतें म्हणून वर्णन आहे !! तिला श्री कृष्णानें मारून मथुरा व गोकुळ यांच्यामध्यें टाकलें. जर खरोखर असें तिचें शरीर मोठें होतें तर त्याच प्रेताखालीं मथुरा व गोकुळ या दोनहि गांवांचा नाश झाला असता व भागवत लिहिणाराचें घरहि तिच्याखलीं चूर झालें असतें !!

**अजामिळाची कथाः**—या भागवतामध्यें अजामिळाची कथा कशी विचित्र दिली आहे ती पहा ! नारदाच्या सांगण्याप्रमाणें अजामिळानें आपल्या मुलाचें नांव नारायण ठेविलें होतें. मरत असतां त्यानें आपल्या मुलाला हांक मारली. तेव्हां परमेश्वराला वाटलें कीं, मला प्रेमानें हांक मारीत आहे, म्हणून त्याला त्यानें सद्गति दिली ! ! काय परमेश्वराला लोकांची अंतःकरणें !समजत नाहींत ? अजामिळानें आपल्या मुलाला हांक मारली, आपणास नव्हें; इतकेंहि परमेश्वराला समजत नाहीं असें भागवतकाराचें म्हणणें आहे काय ? बरें नाममहात्म्य जाज्वल्य आहे असें मानावें, तर सध्यांहि पुष्पळांच्या घरीं नारायण नावांचीं मुलें आहेत, मग ते सर्व दुःखमुक्त कां बरें होत नाहींत ?

अशाप्रकारें मेरुपर्वताचें परिमाणहि ज्योतिःशास्त्राच्या विरुद्ध लिहिलें आहे. तसेंच प्रियव्रत राजाच्या रथाच्या चाकाच्या रेषेमध्यें समुद्र झाला ! पृथ्वी ही एकोणचाळीस कोटी योजनें आहे ? असें कांहीं तरी असंभाव्य लिहिलेलें आहे, त्याला मुळींच पारावार नाहीं.

**भागवताचा कर्ता**—भागवत व्यासानें लिहिलें असें कांहीं भाविक लोक समजतात, पण तें खोटें आहे. हें भागवत बोपदेवानें केलें आहे. त्याचा जयदेव म्हणून एक बंधु होता त्यानें गीतगोविंद बनविलें. हिमाद्रि नामक जो ग्रंथ त्यानें लिहिला त्यांत त्यानेंच लिहिलें आहे कीं भागवतहि आपणच बनविलें आहे. हिमाद्रीमधील त्याच्या विधानाचा भावार्थ असा आहेः -

**हिमाद्रेः सचिवस्यार्थे सूचना क्रियतेऽधुना ।। स्कंधाऽध्यायकथानां च यत्प्रमाणं समासतः ।।१।।**

**श्रीमद्भागवतं नाम पुराणं च मयेरितम् ।। विदुषा बोपदेवेन श्रीकृष्णस्य यशोन्वितम् ।। २ ।।**

हिमाद्रि नामक सचिवानें बोपदेव पंडिताला सांगितलें कीं, मला तूं कलेलें भागवत संपूर्ण ऐकण्यास वेळ नाहीं. म्हणून तूं संक्षेपानें श्लोकबद्ध सूचीपत्र तयार कर. तें पाहून मी संक्षेपानें भगवतांतर्गत कथाभाग जाणूं शकेन. या सचिवाच्या इच्छेनुरूप बोपदेवानें जे श्लोक लिहिले त्यांतील कांहीं खालीं देतों.

बोधयन्तीति हि प्राहुः श्रीमद्भागवतं पुनः ॥ पञ्च प्रश्नाः शौनकस्य सूतस्यात्रोत्तरं त्रिषु ॥१॥
प्रश्नावतारयोश्चैव व्यासस्य निर्वृतिः कृतात् ॥ नारदस्यात्र हेतूक्तिः प्रतीत्यर्थं स्वजन्म च ॥२॥
सुप्तघ्नं द्रौण्यभिभवस्तदस्त्रात्पांडवावनम् ॥ भीष्मस्य स्वपदप्राप्तिः कृष्णस्य द्वारिकागमः ॥३॥
श्रोतुः परीक्षितो जन्म धृतराष्ट्रस्य निर्गमः ॥ कृष्णमर्त्यत्यागसूचा ततः पार्थमहापथः ॥४॥
इत्यष्टादशभिः पादैरध्यायार्थः क्रमात्स्मृतः ॥ स्वपरप्रतिबंधोनं स्फीतं राज्यं जहौ नृपः ॥५॥
इति वैराज्ञो वाऽचौक्तौ प्रोक्ता द्रौणिजयादयः ॥ प्रथमः स्कंधः ॥

याप्रमाणें बाराहि स्कंधांचें सूचिपत्र बोपदेवानें तयार करून हिमाद्रीला दिलें. जर कोणाला विस्तारपूर्वक पहावयाचें असेल तर त्यानें बोपदेवकृत हिमाद्रिनामक ग्रंथ पहावा. याचप्रमाणें अन्यपुराणांमध्येंहि अज्ञानाचें अकांडतांडव आहे.

**भारतांतील कृष्ण व भागवतांतील कृष्ण:**—महाभारतामध्यें जें श्रीकृष्णाचें वर्णन आलेलें आहे तें फारच उत्तम आहे. त्याचे गुण, कर्म, स्वभाव व त्याचें चरित्र जें महाभारतांत आहे तें परमपवित्र व आप्त पुरुषासारखें आहे. महाभारांमध्यें वर्णिलेल्या श्रीकृष्णाच्या हातून आजन्मांत कोणतेंहि वाईट काम झालेलें नाहीं. पण भागवतांत पहावें तो श्रीकृष्णाच्या हातून अनुचित कामें झालीं आहेत असें म्हणावें लागतें. भागवतकारांनीं श्रीकृष्णाला अनुचित दोष लावलेले आहेत. दूध, दहीं, लोणी यांची चोरी करणें, कुब्जा दासीबरोबर समागम, परस्त्रियांबरोबर रासमंडळामध्यें क्रीडा वगैरे मिथ्या दोष भागवतकारानें श्रीकृष्णाला लावलेले आहेत ! हे दोष वाचून व ऐकून मतमतांतील लोक श्रीकृष्णाची फारच निंदा करीत आहेत. जर हा भागवतग्रंथ नसता तर श्रीकृष्णासारख्या महात्म्याची अशी निंदा झालीच नसती.

**ज्योतिर्लिंगें:**—शिवपुराणांमध्यें बारा ज्योतिर्लिंगांची गोष्ट आहे. ज्या पदर्थाला किंवा मूर्तीला ज्योतिर्लिंग म्हणावयाचें त्यामध्यें प्रकाशाचा लेश तरी पाहिजे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, या बारांपैकीं कोणत्याहि ज्योतिर्लिंगामध्यें प्रकाशाचा लेशहि नाहीं. दिवा जवळ नेल्याशिवाय रात्रीं त्यांचें दर्शन होत नाहीं. असें असतांहि अप्रकाशित पदार्थांना ज्योतिर्लिंग म्हणून त्यांचें महात्म्य वर्णिलेलें आहे. हें केवढें अज्ञान आहे बरें ? (प्र०) अहो, तुम्ही पुराणें निरुपयोगी म्हणतां. पण तीं फार उपयोगी आहेत. ज्यांना वेदाध्ययन करण्याचें सामर्थ्य नाहीं, त्यांनीं स्मृतीचें अध्ययन करावें. ज्यांना स्मृति समजत नसतील त्यांनीं शास्त्राध्ययन करावें. ज्यांना शास्त्रेंहि समजत नसतील त्यांनीं पुराणें वाचून धर्मज्ञान संपादन करावें. म्हणून पुराणांची आवश्यकता आहे. स्त्री–शूद्रांना वेदाध्ययनाचा किंवा वेद ऐकण्याचा अधिकार नाहीं. म्हणून त्यांच्यासाठीं पुराणें आहेत. (उ०) हें तुमचें म्हणणें अगदीं असत्य आहे. अमक्याला अध्ययनाचा अधिकार नाहीं व तमक्याला आहे असें तुम्ही कशावरून म्हणतां ? स्त्री-शूद्रांना लहानपणापासून हलके हलके तुम्ही अध्ययनाला योग्य करण्याची खटपट केली आहे काय ? ज्यांना प्राथमिक शिक्षण मिळतें त्यांना सामर्थ्य येतें. तुम्हीं त्यांना शिकवावयाचेंच नाहीं असें ठरवून टाकलें. तेव्हां त्यांच्या मेंदूची शक्ति तरी कशी वाढावी ? बरें, स्त्री-शूद्रांना अत्यंत प्राचीन काळीं वेदाध्ययनाचा अधिकार नव्हता असें तुम्ही म्हणूं शकत नाहीं. कारण छांदोग्यामध्यें गार्गी वगैरे स्त्रियांनीं वेदाध्ययन केल्याचें प्रसिद्ध आहे. जानश्रुतिनामक शूद्रानेंहि रैक्यमुनीजवळ वेदाध्ययन केलें होतें हें प्रसिद्ध आहे. यजुर्वेदाच्या २६ व्या अध्यायांतील दुसऱ्या मंत्रांत असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, वेद शिकणें व ऐकणें ह्याचा मनुष्यमात्राला अधिकार आहे. जे लोक पुराणांसारखे असत्य प्रतिपादनाचे ग्रंथ निर्माण करितात व लोकांना सत्याग्रहणापासून विमुख करीत असतात ते महापापी होत.

**नवग्रहांचे मंत्र**—पहा, या पौराणिक लोकांनीं या नवग्रहांच्या संबंधानें असें भ्रमजाल उत्पन्न केलें आहे कीं, त्यांत प्रायः सर्व विद्याहीन लोकांची बुद्धि ग्रस्त झालेली आहे. (१) "**आकृष्णेन रजसा०**" हा मंत्र सूर्याला लावतात, पण यांत गुरुत्वसंबंधानें उत्पन्न होणाऱ्या आकर्षणाचें वर्णन आहे. (२) "**इमं देवा असपत्नं॰ सुवध्वम्०।**" हा मंत्र चंद्रासाठीं जपतात ! पण यांत राजगुणांचें विधान आहे. (३) "**अग्निर्मूर्धा दिवः ककुत्पतिः०**" हा मंत्र मंगळासाठीं जपतात, पण यांत अग्नीचें वर्णन आहे. (४) "**उद्बुध्यस्वाग्ने प्रतिजागृहि०**" हा मंत्र बुधाच्या तुष्टीसाठीं

जपतात, पण यांत केवळ यजमानवर्णन आहे. (५) "**बृहस्पते अतियदर्यो०**" हा मंत्र गुरुसाठीं उपयोगांत आणतात, पण यांत विद्वानांचे गुण वर्णिले आहेत. (६) "**शुक्रमन्धस०**" हा मंत्र शुक्राप्रीत्यर्थ जपतात. पण यांत शुक्रासंबंधानें कांहीं एक नसून वीर्य व अन्नविषयक वर्णन आहे. (७) **शन्नो देवीरभिष्टय०**" हा मंत्र शनीसाठीं जपला जातो, पण यांत जल, प्राण व परमेश्वर यांचें गुणवर्णन आहे. (८) "**कया नश्चित्र आभुवदूती०**" हा मंत्र राहूसाठीं जपतात ! पण एक तर राहु हा ग्रह मुळींच नाहीं व दुसरें असें कीं, त्या मंत्रांत राहूचें वर्णन नसून मित्रविषयक वर्णन आहे. (९) "**केतुं कृण्वन्नकेतवे०**" हा मंत्र केतूसाठीं जपतात, पण केतु हा ग्रह नाहीं. व या मंत्रांत ज्ञानग्रहणासंबंधीं सांगितलेलें आहे. हे मंत्र ग्रहांचा कोणत्याहि तऱ्हेनें संबंध दाखवीत नाहींत. अर्थ न समजल्यामुळें व स्वार्थानें पौराणिकांनीं हें भ्रमजाल माजविलेलें आहे. ( या संबंधाचें सविस्तर वर्णन "**ऋग्वेदादि भाष्यभूमिका**" नामक पुस्तकांत पृ० २३९ ते २४२ वर पाहा.)

**फलज्योतिषः**–(प्र०) ग्रहांचे मंत्र तुम्ही नाहीं असें म्हणतां, पण त्यापूर्वीं तुम्ही हें सांगा कीं, या ग्रहांपासून मनुष्यांना सुखदुःख होतें कीं नाहीं ? (उ०) ग्रहांचा व मनुष्यांच्या सुखदुःखांचा संबंध जसा तुम्ही समजतां तसा मुळींच नाहीं सूर्याच्या किरणांनीं उष्णता व चंद्राच्या किरणांनीं शीतता मनुष्यांना भासते. ग्रहांच्या भ्रमणानें ऋतुकालमान बदलतें व त्यामुळें मनुष्यांच्या प्रकृतीच्या अनुरूप उष्णता किंवा थंडी होऊन कांहीं सुखदुःख होत असतें. तुम्ही समजतां तसें सुखदुःख ग्रहांपासून होत नाहीं. जोशीबुवा आपली लीला चालवूं लागले म्हणजे ते म्हणतात, "पहा, तुम्हांला आज अष्टमस्थानीं सूर्यादि क्रूर ग्रह आलेले आहेत. शनीची साडेसाती सुरू होऊन त्याची तुम्हांवर क्रूर दृष्टि वळलेली आहे. तुम्हांला तुमच्या उद्योगधंद्यांत फार विघ्नें येतील व घरदार सोडून तुम्हांला देशोधडीस लागावें लागेल. पण जर तुम्ही ग्रहांची शांति, दान, जप, स्तोत्र पाठ, पूजा वगैरे करवाल तरच तुमचा बचाव होईल" अशी प्रस्तावना करून हे जोशीबुवा लूट चालवीत असतात. पण त्यांना ग्रह म्हणजे काय वस्तु आहे व त्यांचा व मनुष्यांचा संबंध काय आहे याचें ज्ञान मुळींच नसतें. (प्र०) आम्हांला वाटतें कीं, ग्रहांचा आमच्या सुखदुःखांशीं फारच संबंध आहे. पहाः—**दैवाधीनं जगत्सर्वं मन्त्राधीनं च दैवतम् ॥ ते मन्त्रा ब्राह्मणाधीनास्तस्माद् ब्राह्मणदैवतम् ॥१॥** "देवतांच्या आधीन सर्व जगत् आहे. मंत्रांच्या आधीन सर्व देवता आहेत व ते मंत्र ब्राह्मणांच्या आधीन राहिल्यामुळें ब्राह्मण हेच देव होत. पाहिजे त्या देवतेला मंत्रसामर्थ्यानें बोलावून आपलें काम हटकून करून घेणें, हा अधिकार ब्राह्मणांचाच असल्यामुळें ब्राह्मणांची योग्यता फार मोठी आहे. जर आमच्यामध्यें मंत्रसामर्थ्य नसतें तर तुमच्यासारखे नास्तिक आम्हांला बोलूंच देते ना. पण आमच्या मंत्रसामर्थ्यानेंच आम्ही आमचा धर्म राखला आहे. (उ०) सर्व जग देवतांच्या आधीन आहे असें म्हणतां, तर चोर, डाकू व कुकर्मी लोक हेहि तुमच्या देवतांच्या आधीन आहेत काय ? (प्र०) हो हो, यांत काय संशय ? (उ०) बरें तर हें सांगा कीं, त्या देवताच त्यांच्याकडून कुकर्में करून घेत असतात काय ? जर असें म्हणाल कीं, त्या देवतांच्या प्रेरणेनेंच ते लोक दुष्ट कर्में करतात, तर त्या दुष्ट कर्में करवणाऱ्या देवतांमध्यें व राक्षसामध्यें काय बरें भेद उरला ? जर तुमच्या आधीन अशा सामर्थ्यवान् देवता आहेत तर त्यांच्याकडून आपल्या मंत्रसामर्थ्यानें तुम्ही राजाचा खजिना आपल्या घरीं कां नाहीं आणीत व कां श्रीमान् होत नाहीं ? असे भिक्षा कां मागतां ? घरोघर फिरून शनीसाठीं तेलाची भीक मागतां कशाला ? ज्याला तुम्ही कुबेर नामक देवता समजतां, त्याला आपल्या मंत्रांच्या योगानें वश करून घेऊन तुम्ही धनवान् कां होत नाहीं ? गरीबांना खोट्या नाट्या गोष्टी सांगून कां लुटतां बरें ? तुम्हांला दान देण्यानें ग्रहांची शान्ति होते व न देण्यानें ते पीडा करतात याबद्दल आम्हांला कांहीं तरी प्रत्यक्ष पुरावा पाहिजे. जेव्हां ग्रीष्मऋतूमध्यें सूर्य प्रखर किरणांनीं भूमीला संतप्त करीत असतो, तेव्हां ज्याला सूर्य उत्तमस्थानीं आला असेल तो तापलेल्या रस्त्यावरून अनवाणी जाऊं लागला तर त्याचे पाय भाजणार नाहींत काय ? तसेंच पौष मासांतील रात्रीमध्यें दोघांनाहि मैदानांत उभें केलें तर ज्याला चंद्र विरुद्ध असेल त्याला थंडी लागेल व ज्याला अनुकूल असेल त्याला लागणार नाहीं असें होईल काय ? नाहीं. मग हे ग्रह अनुकूल व प्रतिकूल झाले तर त्यापासून कोणाचें

काय होणार ? हे ग्रह तुमचे संबंधी किंवा स्नेही होऊं शकत नाहींत व त्यांच्यापासून तुमच्यापर्यंत तार किंवा आगगाडी हि नाहीं कीं ज्या साधनांच्या योगानें त्यांचा व तुमचा परस्पर संबंध होत राहील. जर तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें तुमच्याजवळ मंत्रसामर्थ्य असेल तर तुम्ही त्या सामर्थ्याच्या योगानें धनाढ्य कां बरें होत नाही? कां दारोदार पंचांग घेऊन भीक मागत फिरतां ? आपल्या शत्रूंना मंत्रांच्या योगानें वश कां नाहीं करीत ? हें वेदविरुद्ध ढोंग तुम्ही चालवीत आहां म्हणून तुम्हीच आजकालचे खरे नास्तिक आहां. तुम्ही म्हणतां कीं अमुक अमुक पदार्थ अमक्या ग्रहाच्या शांतीसाठीं आम्हाला दान दिला असतां तो ग्रह संतुष्ट होईल, पण असें म्हणावयाला तुम्हांजवळ काय आधार आहे ? काय तुम्ही ग्रहांकडून मक्ता घेतलेला आहे ? ज्याला वाईट ग्रह आला असेल त्यानेंच जर त्या दानाचा उपभोग घेतला तर तुम्हांला देण्यापेक्षां त्याचा जास्त लाभ होईल. खरोखर वस्तुस्थितीचा विचार केला असतां आपणास असें आढळून येईल कीं, सूर्यचंद्रादि ग्रह हे चेतन नसून जड आहेत व ते कोणाला, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें, त्रास देत नाहीत किंवा सुखहि देत नाहींत. त्यांचा तो धर्मच नाहीं. वास्तविक लोकांच्या पाठीमागें लागून त्यांना छळणारे ग्रह तुम्हीच आहां. " ये गृह्णन्ति ते ग्रहा. " जे दान घेतात ते ग्रह होत. तुम्ही घेतां म्हणून लोकांच्या राशीस येणारे ग्रह तुम्हीच. तुम्ही राजा, प्रजा, शेटसावकार, श्रीमंतदरिद्री यांच्या घरीं जाऊन स्वतः सूर्य, शनैश्चर बनून त्यांच्या राशीला आकाशांतील ग्रह आलेले आहेत असे सांगून त्यांचें मन अस्वस्थ करतां व त्यांच्याकडून दान उपटतां ! जर तुम्ही गांवांत न फिराल तर कोणालाहि ग्रहांपासून भीति उत्पन्न होणार नाहीं. अशक्त मनोवृत्तींचा लाभ तुम्ही अशा खोडसाळ रीतीनें करुन घेतां ! म्हणून तुम्हीच मूर्तिमान ग्रह आहांत ? जे लोक तुमच्या या कपटजालांत सांपडत नाहींत त्यांना तुम्ही नास्तिक समजतां व जे भोळे लोक तुमच्या थापांना फसतात त्यांना तुम्ही आस्तिक म्हणतां ! पण हें मनांत पक्कें समजा कीं, लोकांना फसवण्याचा धंदा करणारे तुम्ही महानास्तिक आहां !

(प्र०) तुम्ही ज्योतिष खोटें मानतां काय ? अहो सूर्यचन्द्राचें ग्रहण आम्ही जोशी लोक जसें वर्तवितों, अगदी त्याप्रमाणेंच तें घडून येतें ना ? मग त्याचप्रमाणें ग्रहांचें फल जसें आम्ही वर्तवूं त्याप्रमाणें घडून येणार हें उघड आहे ? जर ग्रहांचा मनुष्याशीं योग नसता तर धनाढ्य, दरिद्री, राजा, रंक, सुखी, दुःखी असा भेद लोकांमध्यें झालाच नसता.
(उ०) जें ग्रहांचें गणित करून तुम्ही ग्रहण वर्तवितां तें गणित सिद्ध असल्यामुळें सत्यच आहे. पण त्यावरून फलितहि खरेंच आहे असें कसें ठरवितां येईल ? गणितविद्या सत्य आहे म्हणून तुम्ही वर्तवितां तें फलज्योतिषहि खरें आहे असें युक्तिप्रमाणादि कोणत्याहि तऱ्हेनें ठरणार नाहीं, अनुलोम, प्रतिलोम, पृथ्वी चन्द्रादिकांच्या गति यांच्या योगानें अमुक समयीं अमुक होईल हें गणितानें स्पष्ट होऊं शकतें. **छादयत्यर्कमिन्दुर्विधुंभूमिभाः** ॥ ग्रहलाघ० ४।४॥ 'सूर्य व भूमि यांच्यामध्यें चन्द्र येतो तेव्हां सूर्यग्रहण होतें सूर्य व चन्द्र यांच्यामध्यें पृथ्वी येते व त्या पृथ्वीची छाया चन्द्रावर पडते तेव्हां चन्द्रग्रहण होतें. ' जशी भूमीची छाया चन्द्रावर पडली असतां चन्द्रग्रहण होते तद्वत्च चन्द्राची छाया भूमीवर पडली असतां सूर्य ग्रहण होतें असें सिद्धांतशिरोमणी, सूर्यसिद्धांतादि आर्षग्रन्थामध्यें लिहिलें आहे. सूर्य स्वतः स्वयंप्रकाशी असल्यामुळें त्याच्यावर कोणाचीहि छाया पडूं शकत नाहीं. पण दिव्याच्या व आपल्यामध्यें कांहीं तरी पदार्थ धरला असतां तो पदार्थ त्या दिव्याच्यामध्यें आल्यामुळें जसा दिवा पेटत असूनहि आपणास दिसत नाहीं तद्वतच सूर्यग्रहणामध्ये चन्द्र मध्यें आल्यामुळें सूर्य दिसेनासा होतो. याप्रमाणें ग्रहणाविषयीं वस्तुस्थिति आहे. आतां तुम्ही म्हणतां की, या जगांत एक सुखी व दुसरा दुःखी दिसतो तें कां ? याचें उत्तर असें कीं जो पुरुष जसें कर्म करतो त्याप्रमाणें त्याची उन्नति किंवा अवनति होते. ग्रहांच्या योगानें मनुष्याची उन्नति किंवा अवनति होते, असें म्हणणें अगदीं निर्मूल आहे. जर ग्रहांचा संबंध खरोखरच मनुष्याच्या सुखदुःखाशीं असता व फलज्योतिष ग्रंथाच्या द्वारें जोशीबुवांना समजण्यासारखा असता, व जोशी लोकांच्या घरांत दुःखी विधवा व कष्टी लोक दिसले नसते. जोशी लोक विवाह करतात तो वधुवरांचे जातक पाहूनच करतात. मग एकीचा नवरा मरतो तर दुसऱ्याची बायको मरते व अनेक तऱ्हेनें स्त्रीपुरुषामध्यें तंटे उत्पन्न होतात, ते कां ? फलज्योतिषाप्रमाणें त्यांनीं सर्व ग्रहबल पाहिलेलेंच असतें. मग असें असतांहि त्याचीं कुटुंबें

दुःखांत कां ? वास्तविक जर विचार केला तर असें आढळून येतें कीं, कर्माची गति सत्य आहे. ग्रहांच्या गति सुखदुःखभोगाला कारण नाहींत; पृथ्वी व हे सर्व ग्रह या आकाशामध्यें परस्परांपासून इतके दूर आहेत कीं, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें त्यांचा संबंध कर्त्याशीं व त्याच्या कर्माशीं साक्षात् आहे असें मानणेंहि अशक्य आहे. मनुष्य स्वतंत्र रीतीनें जें काम करतो त्याचें परमेश्वरी नियमानें परतंत्रपणें तो फल भोगतो. भोग्यफल देण्याचा संबंध ग्रहाशीं लावणें शुद्ध वेडेपणा आहे. कर्म करणारा व त्या कर्मांचीं फळें भोगणारा जीव आहे व त्या जीवाला त्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें फल भोगविण्यास भाग पाडणारा परमात्मा आहे. याशीं ग्रहांचा कोणत्याहि रीतीचा साक्षात् संबंध नाहीं. ग्रह सुख-दुःखादि फलें भोगण्यास लावतात असें जर मानवयाचे असेल तर पूर्वजन्मीं केलेल्या कर्माची काय वाट ? व ग्रहांना फल देण्याचा हेतु काय ? तसेंच आणखी असें पहा कीं, ज्या क्षणीं पृथ्वीवर एखादा मनुष्य जन्मतो, त्याचे जन्मपत्र तुम्ही तयार करतां त्याच क्षणीं दुसरा मनुष्य भूगोलावर अन्य ठिकाणीं जन्मतो ना, ? मग एका चक्रवर्ती राजाच्या सदृशय दुसरा चक्रवर्ती कां होत नाहीं बरें ? याचें काय उत्तर द्याल ?सारांश ज्योतिषशास्त्रांचा तात्विक विचार केल्यानें होणारा लाभ एका बाजूस राहून सांप्रत उदर भरण्यास साधनीभूत अशी फलज्योतिष्याची लीला मात्र चोहोंकडे पसरून राहिलेली आहे व पर्यायानें लोकांच्या पुरुषार्थाच्या मात्र ती आड येत आहे खरें.

**गरूडपुराण**—(प्र०) गरूड्पुराणांत सांगितलेल्या व नरकांत जीवाला होत असलेल्या शिक्षाहि सर्व खोट्याच म्हणतां काय ? (उ०) ज्या रीतीनें गरूड—पुराणांत मजकूर लिहिला आहे त्याप्रमाणें तो खरा आहे, असें केव्हांहि म्हणतां येणार नाहीं. तें खरें मानण्याला इतर सत्यशास्त्रांत प्रमाण मुळींच नाहीं. ( प्र० )मग जीव शरीरांतून गेल्यावर त्याची गति काय होते ? (उ०) त्या जीवाच्या बऱ्या वाईट कर्माप्रमाणें त्याची बरी वाईट गति होते. (प्र०) गरूड-पुराणांत लिहिलें आहे कीं, यमपुरीचा राजा यम आहे, त्याचा चित्रगुप्त हा मंत्री आहे, त्याचे पर्वतप्राय शरीरें धारण करणारे अनेक दूत असतात, ते सर्व जीवांना पकडून यमपुरींत नेतात व तेथें त्यांच्या पातकांप्रमाणें निरनिराळ्या नरकांत जीवाला घालतात. म्हणूनच मेल्यानंतर दान, पुण्यकर्मे, श्राद्धें, व तर्पणें वगैरे केलीं पाहिजेत. वैतरणी नदींतून उतरून जाण्यासाठीं गोप्रदानेंहि केलीं पहिजेत. हें इतकें लिहिलें असतांहि तुम्ही तें सर्व खोटें कसें म्हणतां ? ( उ० ) या गरूडपुराणांतील गोष्टी खऱ्या आहेत असें मानण्यास कोणत्याहि सद्ग्रन्थाचें प्रमाण मिळत नसल्यामुळें त्या सर्व गोष्टी खोट्या आहेत असें उघड होत आहे. दुसरे असें पहा कीं, अन्य ठिकाणीं असणारे जीव यमलोकांत जातात. व तेथें आपल्या पापाबद्दल दंड भोगतात. मग यमलोकांत जे जीव आहेत त्यांच्यासाठीं आणखी दुसरा लोक आहे काय ? जर नसेल तर त्यांचा न्याय कोठें होतो ? जर यमदूतांचीं शरीरें पर्वतप्राय असतात तर तीं दिसत कां नाहींत ? जर यमदूतांचीं शरीरें पर्वतप्राय आहेत तर ते लहानशा झोंपड्यांत कसे येतात व तेथून जीवाला कसा घेऊन जातात. लहान बोळांत व लहान घरांत तीं शरीरें कशीं बरें येऊं शकतात ? रस्त्यांत कशीं बरें अडकत नाहींत ? जर हवे त्यावेळीं ते आपलीं शरीरें सूक्ष्म करतात असें मानाल तर जेव्हां त्यांचीं शरीरें सूक्ष्म होतात तेव्हां त्यांचीं मोठीं शरीरें कोठें असतात हे तुम्हांस सांगावें लागेल ? या अशा गप्पा लिहिणें सोपें आहे, पण त्याचें प्रत्यंतर दाखविणें फार कठीण आहे ! जेव्हां अरण्यांत वणवा लागतो तेव्हां किटपतंगादि अनेक लहान थोर प्राणी भराभर मरत असतात. त्या वेळीं हे पर्वतप्रायशरीरधारी यमदूत तेथें धडपडत जात असतील व त्या धांदलींत त्यांची एक-मेकांना टक्करहि होत असेल नाहीं बरें ? किडिमुंगीच्या जीवाला यमलोकांत नेण्यास हे पर्वतप्रायशरीरयुक्त यमदुत एकत्र जमले असतां तेथें महान् अधंकार होत असला पाहिजे किंवा एकमेकांच्या धक्काबुक्कीमध्यें बरेच अपघात होत असले पाहिजेत. महाराज ! जरा विचार करा म्हणजे तुमच्या गप्पांचें तुम्हांलाच आश्चर्य वाटेल व तुमचीच खात्री होईल कीं, असें भ्रमजाल पसरण्यानें कोणाचीहि उन्नति होणें शक्य नाहीं. श्राद्ध, तर्पण, पिंडप्रदान वगैरे जें कांहीं तुम्ही करतां तें मृत जीवांना पोंहचतें अशी समजूत तुमची असेल तर तें खोटें आहे. तें सर्व या भोजनभाऊंना पोंहचतें व तुम्ही मृतांच्या नांवानें दिलेलें सर्व दान ब्राह्मणाच्यां घरांत भरून ठेवलेलें तुम्हाला दिसेल श्राद्धामध्यें मृत जीव तृप्त होत नसून तुम्ही बोलावलेले ब्राह्मण तृप्त होत असतात. तुम्ही मात्र गोड गोड थापांना भुलून हवे ते गोड पदार्थ आपल्य वाड-

वडिलांच्या नांवासाठीं यांना मारतां ! वैतरणी नदीवर उपयोगी पडण्यासाठीं दिलेली गाय जोश्याच्या घरीं किंवा भाटकांच्या घरीं तुम्ही प्रत्यक्ष पहात असून ती गाय आपणास किंवा मृत जीवास वैतरणीवर मिळेल असें मानतां या अविचारास काय म्हणावें हें समजत नाहीं. जर ती गाय येथें राहते तर तेथें कोणाची शेपटी सांपडतें वरें ? वरें तेंहि असो. शरीर तर येथें जाळलें जातें, किंवा पुरलें जातें, मग कोणत्या हातानें वैतरणी नदीवर गाईची शेपटी जीव पकडतो याचें उत्तर तुमच्या जवळ कांहीं तरी आहे काय ? या दानाच्या संबंधानें एक दृष्टांतासाठीं गोष्ट देतो तिचा विचार करा :—

'एक जाट होता व त्याच्या घरीं एकवीस शेर दूध देणारी गाय होती. ती पुष्कळ दूध देणारी होती व तिचें दूधहि उत्तम स्वादिष्ट होतें. पुरोहित तें दूध पुष्कळ वेळां प्याले होते. त्यामुळें त्याला ती गाय आपणास मिळावी असा लोभ उत्पन्न झाला होता. पुरोहित म्हणत असे कीं, जेव्हां म्हातारा मरेल तेव्हां गोप्रदानाचा संकल्प याच गाईसंबंधानें करण्यास यजमानास भाग पाडूं. कांहीं दिवसांनीं त्या जाटाचा बाप मरण्याच्या बेतांत आला. वाचा बंद झाली व त्याला काढण्याची वेळ आली. त्याचे सर्व स्नेही संबंधी जमा झाले, तेव्हां पुरोहितबुवा हलकेच म्हणतात कीं' 'यजमान महाराज ! यावेळीं आपण एखादे गोप्रदान कराल तर ठीक होईल.' जाटानें चटकन् दहा रुपये काढून संकल्प सांगण्यास सांगितलें. तेव्हां पुरोहितबुवा म्हणतात. 'अहो ! असा प्रसंग कांहीं वारंवार येत नसतो, यावेळीं सवत्स दुभती गाय साक्षात् दान केली पाहिजे. गाय म्हातारी नसावी, दुधाळ असावी व उत्तम असावी. आम्ही तुमच्या वडिलांच्या कल्याणासाठीं सांगतों.' त्यावर जाट म्हणाला कीं, 'पुरोहितबुवा ! आमच्या घरांत एकच गाय आहे व तीवर सर्व मुलांबाळांचा संभाळ चालला आहे. तेव्हां ती देणें कठीण आहे. हे वीस रुपये घ्या व संकल्प सांगा. वीस रुपयामध्ये चांगली उत्तम गाय येईल.' त्यावर पुरोहित म्हणतो, 'वा, वा ! तुम्ही तुमच्या बापापेक्षांहि गाईची योग्यता जास्ती समजतां ! तुम्ही उत्तम पुत्र होऊन आपल्या बापाला वैतरणी नदीमध्यें बुडवून मारूं इच्छितां ?' हें बोलणें त्या जमलेल्या मंडळींनीं ऐकलें व तेहि त्या पुरोहितासारखेंच बोलूं लागले व त्या सर्वांनीं मिळून त्याच घरांतील गोप्रदान करविलें. त्यावेळीं तो जाट गप्प राहिला. पुरोहिताची लबाडी त्याच्या ध्यानीं आली, पण वेळच तशी होती, तेव्हां कांहीं बोलूं शकला नाहीं. पुढें कांहीं वेळानें त्यांचा बाप वारला. इकडे त्या पुरोहितानें ती गाय, तिचें वासरूं, दूध काढण्याचें भांडें व दक्षिणा नेऊन आपल्या घरीं ठेविली व पुनः मृतकसंस्कार करण्यासाठीं यजमानाच्या घरीं स्वारी तयार झाली. स्मशानांत त्या जाटाच्या बापाचा दहनविधि झाला व उत्तरकार्य झालें; त्यांतहि पुरोहितानें तशीच चलाखी चालविली. पुरोहितानें व इतर महाब्राह्मणांनीं त्याला बराच लुटला व सपिंडी वगैरे कृत्यें पार पाडलीं. इकडे जाटाच्या घरांतील गाय पुरोहितानें उपटल्यामुळें त्याच्या घरच्या मुलांबाळांचें फार हाल होऊं लागले. बापाला चवदा दिवस होईपर्यंत त्याच्या उत्तरकार्यांस सर्व दिवस गेल्यामुळें त्याला कांहीं करतां आलें नाहीं. पण चवदा दिवस झाल्यानंतर एके दिवशीं जाटाची स्वारी पुरोहिताच्या घरीं सकाळींच गाईची स्थिति पाहण्याच्या उद्देशानें गेली. ती वेळ अगदीं सकाळची असल्यामुळे पुरोहितबुवा त्या गाईचें दूध काढून तें घरांत नेत होते. त्यांनीं आपला यजमान घरीं आला आहे असें पाहून 'या बसा' केलें. तेव्हा त्यांचा संवाद झाला तो असा :—(जाट) पुरोहितबुवा ! जरासे इकडे या, थोडें काम आहे. (पुरोहित) हा आलों. (जा०) नाहीं, तें दुधाचें भांडेंहि इकडे घेऊन या. (पु०) बरें. [असें म्हणून पुरोहितबुवा तेथें येऊन बसले व आपल्याजवळ त्यांनीं दुधाचें भांडें ठेवलें.] (जा०) पुरोहितबुवा ! तुम्ही बरेच लबाड दिसतां ? (पु०) कसे हो ? (जा०) अहो तुम्ही आमची गाय कोणत्या कामासाठीं दान घेतली होतीत ? (पु०) तुमच्या पित्याला वैतरणी नदीमधून तरून नेण्यासाठीं. (जा०) तर मग तुम्ही गाईला वैतरणी नदीच्या किनाऱ्यावर कां बरें पोंचविली नाहीं ! आम्ही तुमच्या भरवंशावर होतों. पण तुम्ही तर गाईला आपल्याच घरीं बांधून ठेवलीत धन्य आहे तुमची ! आमच्या पित्याला वैतरणी नदींत, या तुमच्या चुकीमुळें, किती वेळ बुडावें लागले असेल न कळे ? (पु०) नाहीं. नाहीं. या गाईच्या दानापासून जें पुण्य होते, त्या पुण्याच्या योगानें तेथें दुसरी गाय मिळते ; ती त्या जीवाला पैलतीराला घेऊन जाते. त्याप्रमाणें त्या गाईनें तुमच्या पित्याला पैल तीराला नेलेंहि असेल. (जा०)

बरें, वैतरणी येथून किती दूर व कोणत्या बाजूला आहे बरें ? (पु०) हें पहा, एकोणचाळीस कोटी योजनें पृथ्वी आहे. तिच्या दक्षिण व नैर्ऋत्य दिशेला वैतरणी नदी आहे . तेव्हां अनुमानानें जवळ जवळ तीस कोट योजनें असेल. (जा०) इतक्या अंतरावर गोप्रदान झाल्याबरोबर तुमची चिट्ठी किंवा तार तेथें तुमच्या मनोवेगानें गेली असेल. पण त्याबद्दल कांहीं उत्तरबित्तर आलें आहे कां हो ! (पु०) आमच्याकडे गरुडपुराण आहे व त्यांत जें लिहिलें आहे तें आम्हांस प्रमाण आहे. त्याप्रमाणें आम्ही तुम्हांस सांगत आहों. पुण्याच्या प्रभावानें जें काम होतें त्याला तार किंवा चिट्ठीची मुळींच जरूरी नाहीं. ( जा० ) बरें, पण जें गरुडपुराणांत लिहिलें आहे त्याचें प्रत्यंतर पाहतां येईल कीं नाहीं ? ( पु० ) प्रत्यंतर कसलें पाहतां ! सर्व मानतात व त्या पुस्तकांत लिहिलें आहे, झालें. सर्वच गोष्टी जर प्रत्यंतरानें पाहूं लागलां तर कसें चालेल ? ( जा० ) जर त्याचें प्रत्यंतर कांहीं नाहीं तर उघड होतें कीं, तुमचें पोट भरण्यासाठीं तें गरुडपुराण तुमच्यासारख्यांनीं रचलेलें आहे. जेव्हां माझ्या पित्याकडून मला निरोप येईल कीं, वैतरणी नदीवर आपणास गाईची फार जरूरी आहे, तेव्हां मी त्याला ती पाठवून देईन. माझी आवडती गाय मी तुमच्या घरांत ठेवूं इच्छित नाहीं. माझ्या मुलांचें फार हाल होत आहेत. तुम्ही बऱ्या गोष्टीनें गाय व वासरूं परत करा. ( पु० ) अहो ! दिलेले दान परत घेतलें तर तुमचा सत्यानाश होईल. (जा०) बरें. जास्त बोलूं नका ! तुम्ही म्हणता त्याचें प्रत्यंतर मला पाहणें आहे. आमच्या मुलांबाळांचे तेरा चवदा दिवस दुधावांचून जे हाल झाले तेवढे पुष्कळ झाले. आतां जर कांहीं वेडेंवांकडें बोलाल तर संभाळा. तेव्हां पुरोहितानें कांहीं आढेवेढे घेतले नाहींत व जाटानें आपली गाय व वासरूं आपल्या घरीं आणून बांधिलीं.

जर अशा तऱ्हेचे जाट चोंहोंकडे होतील तर या पुरोहितांच्या लीला बऱ्याच कमी होतील. पुराणांमध्यें असें लिहिलें आहे व जोशी लोकहि असें सांगतात कीं, दहा दिवसांमध्यें जें उत्तरकार्य केलें जातें त्याच्या योगानें त्याची दहा अंगे बनतात व सपिंडी करण्यानें त्या दशांगयुक्त शरीराशीं जीवाचा संबंध होतो व अंगुष्ठमानशरीरधारी असा जो जीव बनून नंतर तो तेथून यमलोकाला जातो. जर असें आहे तर मरण्याच्या वेळीं यमदूत कशाला येतात ? व जर ते त्यावेळींच जीवाला यमलोकांत नेतात तर दहा दिवसांतील उत्तरकार्य कशासाठीं केलें जातें ? याचा विचारी लोकांनीं विचार करावा. यमदूत तेरा दिवसांनीं येतात ते त्याला नेतात असें कोठेंहि लिहिलें नाहीं. बरें, जर शरीर दहा दिवसांनीं बनतें तर शरीराबरोबर आपल्या आप्तेष्टांचा मोह त्याला कसा उत्पन्न होत नाहीं व त्यामुळें तो कसा परत येत नाहीं ?

**स्वर्गलोकः**— (प्र०) जीव स्वर्गांत गेल्यानंतर त्याला तेथें खाण्यापिण्याची व्यवस्था उत्तम व्हावी म्हणून येथें दानधर्म करणें आवश्यक आहे हें खरें काय ? (उ०) काय येथें दान केल्याशिवाय स्वर्गांत कांहीं मिळत नाहीं ? (प्र०) कसें बरें मिळेल ? (उ०) जर तेथें कांहीं मिळत नाहीं तर तुमच्या स्वर्गापेक्षां हाच लोक चांगला. कारण कीं, येथें धर्मशाळा आहेत, अन्नसत्रें आहेत, इष्टमित्रांकडून येथें भोजनें देण्यांत येतात, वस्त्रप्रावरणें कोणी तरी दाता देतो. तात्पर्य, येथें बऱ्याच गोष्टी मिळतात. पण स्वर्गांत तसें कोणी कोणाला देत नाहीं असें म्हणतां, तेव्हां तो लोक फारच कंगाल असला पाहिजे व त्या लोकांत सर्व लोक निर्दय व कृपण असले पाहिजेत. अशा लोकांत भल्या माणसांनीं कशाला बरें जावें ? (प्र०) बरें, आमचें गरुडपुराण खोटें असें घटकाभर मानूं, आतां हें आम्हांला सांगा कीं, तुमच्या वेदमताप्रमाणें जीव शरीरांतून निघाल्यानंतर त्याची काय अवस्था होते ? (उ०) गरुडपुराण घटकाभर खोटें मानून कसें चालेल ? विचारान्तीं तें कायमचें खोटें मानावें लागेल समजलांत ? बरें तें असो. आतां वैदिक धर्माप्रमाणें खरोखर जीवाची गति काय होते तें ऐका:— **'यमेन वायुना सत्यराजन् ॥'** इत्यादि वैदिकवचनांवरून हें उघड होतें कीं **'यम'** हें नांव एका विशिष्ट वायूचें आहे. शरीर सुटल्यानंतर वायूच्या आधारानें अंतरिक्षामध्यें जीव राहतात व जो सत्यप्रिय निःपक्षपाती परमेश्वर आहे तोच सर्वांचा न्याय करणारा व तदनुकूल त्यांस फल देणारा असल्यामुळें तोच खरा **'धर्मराज'** आहे.

**दान कोणास करावें:**— (प्र०) तुमच्या म्हणण्याप्रमाणें कोणालाहि गोप्रदान वगैरे कांहीं करण्याची गरज नाहीं कीं कांहीं दान व पुण्य करण्याची आवश्यकता आहे ? (उ०) आमच्या मतें दान करूं नये असें मुळींच नाहीं. दान अवश्य केलें पाहिजे, पण तें योग्य परोपकारशील अशा पुरुषांनाच करावें. परोपकारी पुरुषांच्या सहाय्यार्थ सोनें,

चांदी, हिरे, मोतीं, माणकें, अन्न, जल, स्थान, वस्त्रपात्रादिक सर्व कांहीं द्यावें, पण जे अयोग्य, मदांध, दुर्व्यसनी; स्वार्थी व दुष्ट असतील त्यांना कांहींएक देऊं नये.

दुष्टपुरुषः—(प्र०) योग्य व अयोग्य म्हणजे काय ? (उ०) जे छली, कपटी, स्वार्थी, विषयी, कामक्रोधलोभमोह यांनीं युक्त असतात, दुसऱ्याला दुःख देणारे, भोंदू, मिथ्यावादि, अविद्वान्, कुसंगी, आळसी, दात्याजवळ जाऊन वारंवार याचना करणारे. धरणें धरून बसणारे, नाहीं म्हणून सांगितलें तरी पुनः पुनः मागणारे, असंतुष्ट, न देणाराची निंदा करणारे, त्याला शिव्याशाप देणारे, अनेकवार ज्यानें सहाय्य केलें आहे व एकदां करावयास चुकला त्याच्याशीं शत्रुत्व करणारे, वरून साधूचा वेष घेऊन दुसऱ्यांस फसविणारे, आपणाकडे पदार्थ असूनहि तो आपणाकडे नाहीं असें म्हणारे, एकाला एक व दुसऱ्यांला भलतेंच सांगून त्यांच्यांत कलह लावून आपला स्वार्थ साधणारे, रात्रंदिवस याचकवृत्ति धारण करणारे, निमंत्रणावांचून जाणारे, निमंत्रणानें जेव्हां जातील तेव्हां भांग गांजा वगैरे मादक द्रव्यें पिऊन त्याचा योगानें वाजवीपेक्षां फाजील आहार करणारे, उन्मत्त होऊन प्रमादी होणारे. सत्यमार्गाचा विरोध करणारे व असत्यमार्गानें स्वतःच्याच फायद्याकडे लक्ष देऊन चालणारे, आपल्या शिष्यांना सदुपदेश न करतां आपलीच सेवा करावयास लावणारे, सत्पुरुषांची सेवा करण्यापासून परावृत करणारे, सद्विद्येच्या प्रसाराच्या विरुद्ध राहणारे, जगतांतील अटल नियम खोटे आहेत असे म्हणारे, स्त्रीपुरुष, मातापिता, संतान, राजा प्रजा, इष्टमित्र यांच्यामध्यें अप्रीति उत्पन्न करून आपला स्वार्थ साधणारे, जग मिथ्या आहे असें प्रतिपादन करणारे इत्यादि प्रकारचे लोक हे अयोग्य किंवा दुष्ट पुरुष होत. यांना कोणीहि सहाय्य करूं नये. आतां—

उत्तमपुरुष कोण आहेत तें सांगतों. जे लोक ब्रह्मचर्य धारण करतात. जितेंद्रिय असतात. वेदादि सद्विद्या स्वतः शिकतात व दुसऱ्यांस शिकवितात. जे सुशील, सत्यवादी, परोपकारप्रिय, पुरुषार्थी, उदार, विद्या व धर्म यांचीं उन्नति करण्यांत तत्पर, धर्मात्मे, शांतचित्त, निंदास्तुतीकडे दुर्लक्ष करणारे, हर्षशोकरहित, निर्भय, उत्साही, योगी, ज्ञानी, सृष्टिक्रम, वेदाज्ञा व ईश्वराचे गुणकर्मस्वभाव यांच्या अनुकूल वर्तन करणारे, न्यायी, पक्षपातरहित सत्योपदेश करणारे, सत्यशास्त्राचें पठणपाठण करणाऱ्यांचें परीक्षक, कोणाच्याहि वशिल्यानें काम न करणारे, प्रश्नाचे यथार्थ समाधान करणारे, आपल्याप्रमाणेंच अन्यजनांचें सुखदुःख व हानिलाभ समजणारे, अविद्यादि क्लेशविरहित हट्टदुरभिमानरहित अपमानाला अमृताप्रमाणें व मानाला विषाप्रमाणें समजणारे, संतुष्ट जे कोणी प्रीतीनें व खुशीनें जितकें देतील तितक्यांतच संतुष्ट असणारे, आपत्कालींच एकदां मागणारे व न दिलें तर क्रुद्ध न होणारे. दात्यापासून लवकर दूर होणारे न देणाऱ्याची निंदा न करणारे, सुखी पुरुषांशीं मित्रता, दुःखितांवर करुणा, पुण्यात्मे लोक दृसतील त्यांना पाहून आनंदित होणारे, व पापी पुरुषांची उपेक्षा करणारे, रागद्वेषरहित, सत्याला मानणारे, सत्यवादी व सत्यकर्म करणारे, निष्कपटी, ईर्षाद्वेषरहित, गंभीराशय, सत्पुरुष, धार्मिक, सर्व प्रकारें दुष्ट आचरण न करणारे, आपल्या तनमनधनाला परोपकारांत समर्पण करणारे, परोपकारार्थ आपले प्राणहि खर्ची घालणारे, इत्यादि प्रकारचे शुभ लक्षणांनीं युक्त जे पुरुष आहेत ते सत्पात्र होत व त्यांनाच उत्तम पुरुष असें समजावें. अशा सज्जनांलाच सर्वांनीं दान व सहाय्य द्यावें इतरांना देऊं नये. आपत्कालीं मात्र, अन्न, जल, वस्त्र, औषधी, स्थान व मार्ग या बाबतींत सर्वांनीं आपत्तींत असणाऱ्यांला सहाय्य करावें, कारण आपत्कालीं वरील विषयांचे सर्व प्राणिमात्र अधिकारी होतात.

खरा दाताः—(प्र०) दाते किती प्रकारचे आहेत व त्यांत श्रेष्ठ दाता कोणता ? (उ०) दात्याचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन भेद आहेत. (१) जो देशकालवर्तमान व पात्रापात्रता यांचा नीट विचार करून सत्यविद्या व धर्म यांची उन्नति करण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या परोपकारांत सर्वस्वाचें दान करतो तोच श्रेष्ठ दाता होय. (२) जो कीर्ति व स्वार्थ यांसाठी दान करतो तो मध्यम होय. (३) जो आपलें व दुसऱ्याचें हिताहित पाहत नाहीं, वेश्यागमनादि दुष्टाचरणरत पुरुषांना व भांडभाटादिकांनाहि दान देतो, देण्याच्या वेळीं तिरस्कार व क्रोध यांनीं युक्त होतो, योग्यायोग्यतेचा विचार करीत नाहीं, तंटे भांडणें करून जो दान देतो, दुसऱ्यांस व विशेषतः धर्मात्म्यांस दुःख देऊन

आपण सुखी होण्यासाठीं जो दान देतो, तो अधम समजावा. तात्पर्य जो सारासार विचार करून विद्वान् व धार्मिक कोण आणि दुराचारी कोण यांना नीट ओळखून सज्जनांचा सत्कार करतो तो श्रेष्ठ, आपल्या प्रशंसेसाठीं काम करणारा मध्यम अंदाधुंदीनें सर्वांच्या नुकसानीचें काम करणारा अधम समजावा. (प्र०) दानांचें फल येथेंच मिळतें कीं परलोकीं ? (उ०) सर्वत्र मिळतें. (प्र०) तीं फळें स्वतःच मिळतात कीं, कोणी देणारा आहे ? (उ०) फल देणारा ईश्वर आहे. आपणांस माहीत आहेच कीं, चोर स्वतः तुरुंगांत जाऊं इच्छित नसतो पण त्याला राजा तुरुंगांत जाणें भाग पाडतो; त्याचप्रमाणें सर्वांचा न्यायाधीश परमेश्वर आहे. तो सर्वांस त्यांच्या कर्मानुरूप फळें देतो. जसा राजा आपल्या राज्यांतील लोकमध्यें जे सज्जन असतील त्यांना पारितोषिकें देतो व दुष्टांना सजा करतो तद्वतच परमेश्वर या विश्वामध्यें न्याय करतो.

**पुराणांचें परीक्षणः**—कोणी म्हणतात कीं, गरुडपुराणादि पुराणें ही वैदिकधर्माला सहाय्यक आहेत, पण हा त्यांचा भ्रम आहे. वास्तविक पाहतां हीं सर्व पुराणें वेदाला विरोध करणारीं असून अनाचार माजविणारीं आहेत. त्याचप्रमाणें सर्व तंत्राग्रंथहि तसेच विरोधी आहेत. हे ग्रंथ परस्पर विरोधीहि आहेत. कोणतेंहि पुराण दुसऱ्या पुराणाशीं किंवा तंत्राशीं मिळत नाहीं; इतकेंच नव्हे तर इतरांशीं विरोध करतें व याच कारणामुळें पुराणें मानणाऱ्या लोकांमध्यें सर्वत्र विरोध, भेद, दुही, कलह व मतमतांतरें यांचें प्राधान्य दिसतें. शैववैष्णवादि मतमतांतरें हे पुराणांचेच परिणाम आहेत. अशा तऱ्हेचे भेदोत्पादक ग्रंथ असण्यापेक्षां नसलेलेच चांगले. अज्ञानी लोक यांना पूज्य मानतात पण कोणीहि विचारी मनुष्य यांना पूज्य मानणार नाहीं. पुराणांमध्यें झगडे अनंत आहेत, व त्यांची एकवाक्यता होणें शक्य नाहीं. पहा, शिवपुराणामध्यें त्रयोदशी व सोमवार यांचें महात्म्य आहे, तर आदित्यपुराणामध्यें रवीचें आहे; चंद्रखंडामध्यें सोमग्रह, मंगल, बुद्ध, गुरू, शुक्र, शनि, राहु, केतु, यांचें आहे तर वैष्णवपुराणामध्यें विष्णूचें आहे. वैष्णवाची एकादशी, वामनाची द्वादशीं, नृसिंहाची व अनंताची चतुर्दशी, चंद्राची पौर्णिमा दिक्पालांची दशमी, दुर्गेची नवमी, वसूंची अष्टमी, मुनीची सप्तमी, कार्तिकस्वामीची षष्ठी, नागाची पंचमी, गणेशाची चतुर्थी, गौरीची तृतीया, अश्विनीकुमारांची द्वितीया, आद्यादेवीची प्रतिपदा व पितरांची अमावस्या याप्रमाणें निरनिराळया देवतांसाठीं निरनिराळया तिथींस व वारास उपोषणाचे नियम केलेले आहेत. प्रत्येकाचें महात्म्य निरनिराळें वर्णिलें आहे. वैष्णवांची एकादशी व शैवांची एकादशी यांत भेद आहेत. एका मतांतील मनुष्य समजतो कीं, त्या दिवशीं अन्नग्रहण केलें असतां पाप लागतें तर दुसरा म्हणतो कीं, दुसऱ्या दिवशीं उपोषित राहिल्यानें पुण्य लागतें. आतां येथें असा विचार करावयाचा कीं, सर्व तिथी व वार जर निरनिराळया देवांसाठीं आहेत व त्या देवताप्रीत्यर्थ मनुष्यांनीं उपोषण करणें हें जर पुण्य आहे व अन्नग्रहण करणें हें जर पाप आहे तर असा कोणता दिवस राहतो कीं जेव्हां मनुष्य देऊं शकेल ? व जर जेवणाला त्याला फुरसत नाहीं तर तो जगेल तरी कसा ? बरें कांहीं दिवस उपोषण केलें व कांहीं दिवस न केलें तर त्यानेंहि कांहीं पुण्य व कांहीं पाप लागण्याचा संभव आहे, मग पूर्ण धार्मिक होण्याची आशाच नाहीं. 'धर्मसिंधु, निर्णयसिंधु, व्रतार्क' इत्यादि ग्रंथहि प्रमादी लोकांनींच बनविलेले आहेत. या ग्रंथांमध्येंहि कोणास खऱ्या धर्माचा पत्ता लागणार नाहीं. आज उपास करावा कीं उद्यां करावा हाच काय तो महत्वाचा वाद या ग्रंथांत प्रधान दिसतो. या मांडणानें कोणी दशमीच्या दिवशीं एकादशींचें उपोषण करतो तर कोणी द्वादशीच्या दिवशीं करतो. उपाशीं राहण्यासंबंधानें वादविवाद करणारे लोक उन्नतीला जातील कीं नाहीं, हें विचारी माणसांला सांगण्याची आवश्यकता नाहीं ! हे म्हणतात कीं, **'एकादश्या-मन्ने पापानि वसन्ति'** एकादशीच्या दिवशीं सर्व पापें अन्नामध्यें राहतात. यांना असें विचारलें पहिजे कीं, कोणाची पापें त्या अन्नांत राहतात ? तुमची कीं, तुमच्या वडिलांची जर एकादशीच्या दिवशीं सर्वांचीं पापें अन्नांत जाऊन बसत असतीं तर त्या दिवशीं सर्व लोक निष्पाप होऊन सुखी झाले असते, पण वास्तविक पहावें तों लोक भुकेनें तडफडतांना मात्र दिसतात. उपाशी राहण्यापासून दुःख होतें, दुःख पापापासून होतें म्हणून उपास करणें हें पाप आहे. या उपासाचेंहि महात्म्य पुराणांत कांहीं थोडें थोडकें नाहीं. त्याची विचित्र कथा पुराणांत आलेली आहे ती अशीः—

ब्रह्मलोकांमध्यें एक वेश्या होती, तिनें कांहीं अपराध केल्यामुळें तिला शाप झाला कीं, तुझें पृथ्वीवर अधःपतन होईल तिनें देवांची स्तुति करून विचारलें कीं; मी पुनः स्वर्गात केव्हा येईन ? त्यांनीं तिला सांगितलें कीं, जेव्हां

कोणी आपलें एकादशीव्रताचें पुण्य तुला देईल तेव्हां तूं पुनः स्वर्गांत येशील; हें ऐकल्यानंतर ती स्वर्गीय विमानासह एका नगरांत पतन पावली. तेथील राजानें तिला विचरलें कीं, तूं कोण आहेस ? तिनें आपल्या अधःपतनाचा सर्व वृतांत त्याला सांगून ती म्हणाली मला जर कोणी आपल्या एकादशीचें पुण्य अर्पण करील तर पुनः मी स्वर्गांत जाऊं शकेन. राजानें दयार्द्र दृष्टीनें आपल्या सर्व राज्यांत शोध केला पण कोणीहि एकादशीचें योग्य रीतीनें व्रत करणारा मिळाला नाहीं; पण एका घरीं शूद्र स्त्रीपुरुषांमध्यें भांडण झालें होतें, त्या रागानें त्या स्त्रिनें त्यादिवशीं स्वयपाक केला नव्हता व कांहीं खाल्लें नव्हतें. ज्या दिवशीं अहोरात्रांत कांहीं खाल्लें नव्हतें त्या दिवशी दैवयोगानें एकादशी होती. राजदूत शोध करीत असतां, त्या शूद्रीनें सांगितलें कीं, बावानों, मी कांहीं जाणून बुजून एकादशी केली नाहीं पण न जाणतां त्या दिवशीं उपोषण घडलें आहे. हें ऐकल्याबरोबर तिला राजदूतांनीं राजाकडें नेलें. तिला राजानें विनविलें कीं, हे बाई ! तूं या विमानाला स्पर्श कर म्हणजे या वेश्येचें विमान स्वर्गांत जाईल. तिनें त्याप्रमाणें त्याला स्पर्श केला तेव्हां तत्क्षणींच तें विमान वर उडून स्वर्गांत गेलें ! हें न जाणतां एकादशी केल्यानें किती पुण्य लागेल त्याची काय सीमा आहे !!! वाहवा ! ज्ञानांध लोक हो ! हें जर खरें असेल तर ही पानाची विडी स्वर्गांत मिळत नाहीं, हिला तुम्ही एकादशी करणारे सर्व लोक स्पर्श करा व पाहूं ही स्वर्गांत जाते कीं, येथेंच राहते तें. जर ही स्वर्गात गेली तर आपण आणखी पाठवूं व आपण सर्व एकादशी करण्यास सुरवात करूं व जर न गेली तर तुम्ही ढोंगापासून निवृत्त व्हावें हें योग्य आहे !'धनदा, कामदा, पुत्रदा, निर्जला' असें एकादशीचे चौवीस भेद आहेत. पुष्कळ लोक पुत्राच्या इच्छेनें किंवा धनाच्या इच्छेनें एकादशीचें व्रत करतां करतां म्हातारे होऊन मरूनहि जातात पण त्यांना पुत्रहि होत नाही, अथवा धनहि मिळत नाहीं. हा सार्वजनिक अनुभव आहे. मग या थोतांडावर विश्वास कां ठेवावा ? उन्हाळयांतील एकादशीच्या दिवशीं कित्येक पाणी न प्याल्यामुळें व्याकुळ होत असतात. विशेषतः बंगालदेशांत या एकादशीव्रतामुळें अनेक लोकांस त्रास होत असतो. ते लोक तर विधवा स्त्रियांना त्या दिवशीं पाणी सुद्धां देत नाहींत ! काय हे हाल व धर्माच्या नांवावर काय हा निर्दयपणा ! उन्हाळयांतील एकादशीला सजला व पावसळयांतील एकादशीला निर्जला असें म्हटलें असतें तर जरा बरें झालें असतें; कारण, उन्पाळयांत शोष उत्पन्न होतो तसा पावसाळयांत होत नाहीं, पण या भिक्षुकांना दया आहे कोठें ? 'कोणी मरो किंवा जगो;' आमची दक्षणा कायम असली म्हणजे झालें हाच जप ज्यांना आहे त्यांच्या मेंदूंत विचार तरी कशाला शिरेल ? गर्भवती, सद्योविवाहित स्त्री, मुलें व तरुण यांनीं तर उपास करतांच नये. जेव्हां अजीर्ण झालें असेल त्यावेळी पोटें दूध किंवा सरवत पिऊन रहावें, त्या दिवशीं मात्र कांहीं खाऊं नये. भूक लागली असतां न खाणें व न लागली असतां खाणें हे दोनहि मार्ग फार अपायकारक आहेत. यापासून अनेक रोग उत्पन्न होतात. म्हणून कोणीहि विचारी पुरुषांनीं या पौराणिक गबाळवर विश्वास न ठेवतां आपली नीति कायम ठेवून शुद्ध धर्मानें वागण्याचा निश्चय करावा.

**शैव शाक्त पौराणिक मतें व वैराग्यादि पंथः**—कोणी असें प्रतिपादन करतात कीं, सध्यां उपलब्ध असलेल्या वेदामध्यें मूर्तिपूजा नसली म्हणून काय झालें ? वेदाच्या शाखा कांहीं इतक्याच नाहींत, त्या अनेक आहेत ऋग्वेदाच्या २१, यजुर्वेदाच्या १०१, सामवेदाच्या १००० व अथर्ववेदाच्या ९ इतक्या चार वेदांच्या शाखा आहेत. त्यापैकीं थोड्याशा सध्यां उपलब्ध आहेत. ज्या शाखा लुप्त झाल्या आहेत त्यांत मूर्तिपूजा, तीर्थमहात्म्य वगैरे असेल ? जर त्यांत नसतें तर पुराणांत कोठून आलें असतें ? ज्या अर्थीं तें पुराणांत दिसत आहे व पुराणें ही त्यांचें कार्य आहे त्या अर्थीं असें निश्चयानें अनुमान केलें जातें कीं, या सर्व गोष्टी त्या लुप्त शाखांमध्यें आहेत. या प्रकारच्या प्रतिपादनावर उत्तर असें कीं, त्यामध्यें अमूक आहे व अमूक नाहीं असें म्हणण्यास प्रमाण कांहीं एक नाहीं. लुप्त झालेल्या ग्रंथांमध्यें अमूक गोष्टी आहेत असें कसें म्हणतां येईल ? आतां दुसरा विचार असा कीं एका मूळापासून ज्या शाखा उत्पन्न होतात त्यांच्या जाडीमध्यें किंवा लांबीमध्यें जरी भिन्नता असली तरी जातीमध्यें भेद असणार नाहीं. सर्व शाखांचें ऐकमत्य असलें पाहिजे, निदान त्या परस्पर विरोधी तरी नसल्या पाहिजेत. ज्या वेदाच्या शाखा आज उपलब्ध आहेत, त्यांत मूर्तिपूजा, जलस्थल, तीर्थमहत्म्य वगैरे उपलब्ध होत नाहीं तेव्हां दुसऱ्या शाखांमध्यें तरी तें आहे असें कसें म्हणतां येईल ? तसें म्हटलें तर परस्पर शाखांमध्यें विरोध आहे असें म्हणावें लागेल; शिवाय असें कीं, चार वेदाच्या या शाखा

आहेत. सर्व शाखा सध्यां मिळत नाहींत हें खरें पण चारहि वेद पूर्ण मिळत आहेत. ज्या अर्थी त्या वेदांमध्यें पाषाणपूजणादि प्रकार नाहींत तेव्हां त्यांच्या शाखांमध्यें ते असले पाहिजेत असें कधींही म्हणतां येणार नाहीं. वेदांच्या विरुद्ध शाखाग्रंथ कधींहि असूं शकणार नाहींत. तात्पर्य पुराणें हीं वेदांच्या किंवा शाखांच्या अनुकूल आहेत असें म्हणतां येणार नाहीं. तीं वेदाच्या विरुद्ध आहेत व तीं संप्रदाय प्रवर्तकांनी आपलें मत स्थापण्यासाठीं बनविलीं आहेत. हे ग्रंथ परस्पर विरोधी असल्यामुळें सर्व लोकांमध्यें विरोध व मत्सर वाढत आहे. अशा या दुष्ट ग्रंथापासून कधींहि मानवजातीचें हित होणार नाहीं.

वेद हेच परमेश्वरदत्तग्रंथ आहेत व त्यांनींच मानवांची उन्नति होईल. वेद हे जसे परमेश्वरकृत आहेत तसे इतर ग्रंथ आश्वलायनादि ऋषिप्रणीत आहेत. परमेश्वरकृत व ऋषिकृत यांत पुष्कळ भेद आहे हें विसरतां नये. ज्याप्रमाणें पानें व फांद्या पाहून कोणता वृक्ष आहे तें ओळखतां येतें. त्याच प्रमाणें ऋषिमुनीकृत अंग व उपांग, ब्राह्मण व उपवेद हे ग्रंथ पाहून त्याच्या योगानें वेदांतील अर्थ जाणतां येतो. म्हणून ऋषिप्रणीत ग्रंथ शाखास्थानीं आहेत व परमेश्वरप्रणीत वेदग्रंथ वृक्षस्तंभ किंवा बीजस्थानीं आहेत. म्हणूनच वेदविरुद्ध जें असेल तें अप्रमाण असें मानणें सर्वसंमत झालें आहे. लुप्त झालेल्या ग्रंथांत मूर्तिपूजा वगैरे थोतांडें आहेत असें जर तुम्ही म्हणूं लागलां तर उद्यां दुसरे लोक असें म्हणतील कीं, त्या ग्रंथांत शूद्रांला थोरवी दिलेली आहे, ब्राह्मणांला नीच मानलेलें आहे, अकर्तव्याला कर्तव्य म्हणून प्रतिपादिलें आहे, मिथ्याभाषणादि धर्म मानला आहे, सत्यपालन अधर्म आहे, व्यभिचाराला उत्तम गणिलें आहे, असें लिहिलें आहे, असें जर कोणी दुराचारी म्हणूं लागेल तर त्याला तुम्ही काय उत्तर द्याल ? आम्ही जें उत्तर तुम्हांस दिलें आहे तेंच तुम्ही त्यास देणार. जसा प्रसिद्ध शाखांमध्यें व उपलब्ध ग्रंथांमध्यें धर्म आहे त्याचप्रमाणें अप्रसिद्ध शाखांमध्यें मानणें भाग आहे, किंवा अप्रसिद्ध ग्रंथांमध्यें अमूक आहे असें किंवा नाहीं याबद्दल वाद करणेंच आधीं निरुपयोगीं आहे;कारण जसें कोणीहि जवळ असलेल्या पुस्तकांत अमूक आहे असें ठाम सांगू शकतो तसे लुप्त झालेल्या पुस्तकांत अमूक आहे असें म्हणूं शकणार नाहीं. आतां पहा कीं, जैमिनि, व्यास व पतंजलि यांच्या वेळेपर्यंत सर्व शाखा होत्या कीं नाहीं? जर होत्या तर त्यांनीं केलेल्या विधानांचें खंडन तुम्ही करूं शकणार नाहीं व जर नव्हत्या तर शाखा होत्या याला तरी काय प्रमाण आहे? पहा जैमिनि मुनीनें आपल्या पूर्व मीमांसेमध्यें जें कर्मकांड लिहिलें आहे तें सर्व वेदानुकूल आहे, पतञ्जलिमुनीनें योगशास्त्रामध्यें लिहिलेलें उपासनाकांड व व्यासानें शारीरसूत्रांमध्यें लिहिलेलें ज्ञानकांड सर्व वेदानुकूल आहे. त्यांमध्यें पाषाणादिमूर्ति–पूजा, प्रयागादि तीर्थमहात्म्य वगैरे थोतांडें मुळींच नाहींत !लिहितील कोठून ? जर वेदांमध्यें असतें तर त्यांनी लिहिलें असतें, वेदांतच जें नाहीं तें ते लिहिणार तरी कसें ? तात्पर्य लुप्तशाखांमध्येंहि मूर्तिपूजादि विषय नसले पाहिजेत. शिवाय असें कीं, शाखाग्रंथ हे ईश्वरकृत ग्रंथ नव्हेत. कारण वेदांतील प्रतीकें घेऊन त्यांवर या ग्रंथांत व्याख्या केलेली आहे व इतर सामान्य जनांला समजण्यासाठीं इतिहासहि लिहिलेला आहे. संसारी मनुष्यांचा इतिहास वेदांमध्यें असूं शकणार नाहीं हें उघड आहे, वेदांतध्यें फक्त शुद्धविद्येचा उपदेश केलेला आहे. यांत मनुष्यविशेषाचें नांवहि नाहीं, उलट मूर्तिपूजेचें खंडणच आलेलें आहे. शिवाय या मूर्तिपूजनापासून श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, नारायण, शिव वगैरेंचा सत्कार तर होत नाहींच पण त्यांची पूजाऱ्यांकडून निंदा मात्र होत असतें. हें सर्वांना माहीत आहे कीं, राम, कृष्ण, शिव हे मोठमोठे चक्रवर्ती राजे पूर्वकालीं या देशांत होऊन गेले, त्यांच्या सीता, रुक्मिणी, लक्ष्मी, पार्वती इत्यादि स्त्रिया महाराण्या होऊन गेल्या, पण सध्यां त्यांच्या नांबानें काय चाललें आहे !या महात्म्यांच्या मूर्ति मंदिरांत ठेवून त्यांच्या नांवानें पूजारी लोक भीक मागत फिरत आहेत ! हे पूजारी म्हणत असतात, कीं 'महाराज शेटसावकारजी ! या, दर्शन घ्या, चरणामृत प्या व मूर्तिपुढें यथाशक्ति भेट ठेवा. अहो लोक हो ! सीताराम, कृष्णरुक्मिणी, राधाकृष्ण, लक्ष्मीनारायण, महादेपार्वती यांच्या या मूर्ति दर्शनीय आहेत, पण काय करावें यांना तीन चार दिवसांत कोणी भोग चढविला नाहीं, त्यामुळें त्यांस कांहीं मिळालें नाहीं ! सीतेची नथ काल चोरीला गेली व कृष्णाचा शेला हरवला ! म्हणून आपण उदार होऊन तो पुनः नवा घेऊन द्या. रामकृष्णादिकांचे कपडे आहेत ते त्यांना द्या. त्यांना भोग चढवा. नैवेद्य समर्पण करा. हें मंदिर जीर्ण झालें आहे तो कोपरा मोडला आहे, तेथून काल चोर आले व त्यांनीं देवाचें सर्व लुटून नेलें! देवाचे कपडे उंदरानें खाल्लें ! एके दिवशीं तर या मुर्तिवर उंदरानीं असा अनर्थ केला कीं, तिचा डोळाहि कोठें नेऊन

त्यानीं टाकला ! आमच्यानें चांदीचा डोळा बसवणें शक्य नाहीं म्हणून डोळयाला कवडी लावली आहे ! ' अशा तऱ्हेच्या भाषणांनीं पुजारी लोक रात्रंदिवस त्या महात्म्यांची निंदा करीत असतात. हे लोक रामलीला व रासमंडळ करतात, सीताराम व रामकृष्ण यांना नाचवितात ! व तें सर्व इतर अज्ञ लोक खुशाल पाहतात. रामाला व कृष्णाला लोकांपुढें नाचण्याचें काय बरें कारण ? पण तें सर्व हे स्वार्थी लोक करतात ! मंदिरामध्यें सीता, राम वगैरे उभे आहेत व पुजारी गादीवर लोडाला टेंकून बसले आहेत ही काय त्यांची उपासना ? उष्णकाळींहि त्यांना दरवाजाला कुलूप लावून आंत बंद करतात पण हे पुजारी स्वतः उघड्या हवेंत आनंदानें निजतात. जर देवाला नैवेद्य हवा तर त्याला उन्हाळयांत थंड व स्वच्छ हवा नको काय ? पुष्कळ पुजारी असे आहेत कीं, नारायणाला एका लहानशा डबींत बंद करून त्यावर एक कपडा गुंडाळून तो आपल्या गळयांत टांगून ठेवितात ! ज्याप्रमाणें वानरी आपल्या पुत्राला गळयांत बांधून धरते त्याचप्रमाणें हे लोक आपल्या गळयांत देवाच्या मूर्ती लटकवीत ठेवतात· जेव्हां कोणी पुरुष मूर्तीला तोडतो तेव्हां हे लोक आपली छाती बडवीत रोदन करतात ! 'हाय हाय ! कोणी दुष्टानें सीतारामाची मूर्ति तोडली !' असा हे कल्होळ करतात. नंतर कोणातरी श्रीमंतावर गदा घालून नवी मूर्ति उत्तम कारागिराकडून तयार करवून आपला पूर्वीचा व्यापार चालू ठेवतात. हे म्हणतात कीं, 'नारायणाला तुपावांचून नैवेद्य चालत नाहीं, त्यांत उत्तम तूप असलें पाहिजे. जास्त नैवेध देतां येत नसेल तर थोडा द्यावा, पण अवश्य तो उत्तम असावा ' ! रामलीला व रासमंडळ झाल्यानंतर त्या सोंग घेणाऱ्यांकडून भीक मागावयास लावतात किंवा त्यांना नाक्यावर बसवून त्यांच्याकडून याचना करवितात हा किती निंद्य प्रकार आहे बरें ? सीताराम यांची योग्यता कोठें व त्यांच्या नांवावर चालू असलेला हा निंद्य प्रकार कोठें याचा विचारी लोकांनी अवश्य विचार केला पाहिजे. सीताराम भिक्षुक नव्हते तर लोकांचा उद्धार करणारे होते. त्यांचा हे स्वार्थी लोक असा उपहास करीत असतात. यापेक्षां आपल्या पूर्वजांची निंदा ती कोणती ? रामकृष्णादिकांच्या वेळीं अशीं त्यांचीं सोगें जर रस्त्यावर नाचवलीं असतीं व त्यांच्या नांवानें भीक मागितली असती तर ती त्यांना केव्हांहि पसंत पडली नसती. त्यांनीं या प्रकाराचा निषेध केला असता व पुनः असले प्रकार करूं दिले नसते व त्यांच्या विरुद्ध जो कोणी त्यांचा उपहास अशारीतीनें करतो त्याला त्यांनीं दंडव केला असता. सध्यांहि या पुजाऱ्यांची जी अवनति झालेली आहे ती तरी त्या सत्पुरुषांची निंदा केल्यामुळेंच होय. मूर्तिपूजाविरोधी लोकांपासून यांना जी शिक्षा झाली ती तरी त्यामुळेंच होय व जोंपर्यंत हीं कुकर्मे ते सोडणार नाहींत तोंपर्यंत त्यांची अवनति अशीच होत राहील. पापाचें फल दुःख हें आहे. मूर्तिपूजा हें पाप आहे व म्हणूनच पाषाणमूर्तिपूजकांचा सदासर्वदा या आर्यावर्तामध्यें पराजय, मानहानि व अवनति होत आहे. याच मूर्तीवर फाजील विश्वास ठेवल्यानें यांचें आजपर्यंत फार नुकसान झालें आहे व जोंपर्यंत हा प्रकार हे सोडणार नाहींत तोंपर्यंत त्यांची उन्नति होणें अशक्य आहे. या मूर्तिपूजकांमध्यें वाममार्गी लोक फारच अपराधी आहेत. जेव्हां ते चेला करतात तेव्हा ते त्यांना 'दं दुर्गायै नमः । भं भैरवाय नमः ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे । ' इत्यादि मंत्रांचा उपदेश करतात. विशेषतः बंगालमध्यें एकाक्षरी मंत्रांचा उपदेश करीत असतात. ह्रीं, श्रीं, क्लीं ।। शावर तं० ।। वं० प्रकी० प्र० ४४ ।। ' हे त्यांचे एकाक्षरी मंत्र होत ! तेथें धनाढ्यांना पूर्णाभिषेक करीत असतात. या दहा महाविद्यांचे मंत्र अनेक आहेत त्यांपैकीं कांहीं येथें देतो. 'ह्रां ह्रीं ह्रूं बगलामुख्यै फट् स्वाहा ।। शा० प्रकी० प्र० ४१ ।। ' ' ह्रूं फट् स्वाहा ।। कमरत्न त० बीज. मं. ४ ।। ' हे अशा तऱ्हेचे चमत्कारिक आवाज काढून भोळया बापड्या लोकांना धूर्त लोक फसवीत असतात. हा धर्म नव्हे व ज्ञानाचा मार्गहि नव्हे हें विचारी माणसांला निराळें सांगावयास नको. हे लोक जारण, मोहन, उच्चाटन, विद्वेषण, वशीकरण आदिप्रयोग आपण करतों असें लोकांना सांगतात व गरीबांना फसवितात. यांच्या त्या मंत्रांनीं तर कांहींच होत नसतें. ते जें जें हातचलाखीनें करतात तें तें सर्व मंत्रानें केलें असें ते लोकांना भासवितात; जेव्हां हे ' मारणप्रयोग' करतात तेव्हां ज्याला मारावयाचें त्याची मातीची किंवा गव्हाच्या कणिकेची मूर्ति तयार करतात व त्या मूर्तीच्या छाती, नाभि, कंठादि मर्मस्थानीं सुऱ्या खुपसतात. डोळे, हात पाय वगैरे ठिकाणीं, खिळे ठोकतात व त्या मूर्तीला आडवी पाडून तीवर दुर्गा किंवा भैरव यांची स्थापना करून तिच्या हातांत त्रिशूल देतात व तो त्रिशूल त्या

खालीं ठेवलेल्या मूर्तीच्या हृदयांत खुपसतात; व त्या मुर्तीपुढें वेदी तयार करून मांसादि अमेध्य पदार्थांचें हवन करतात ! हा प्रकार इकडे चालू असतां ज्याला मारावयाचें असतें त्याला त्याच्या नोकरांना पैसे भरून किंवा अन्य तऱ्हेनें दुग्धादि पदार्थामिघून विष पाजतात व आपल्या मंत्रानें तो मेला असें भासवितात ! या कृत्यानें भोळे लोक फसतात हें खरें पण विचारी लोकांना हें सर्व ढोंग आहे असें तेव्हांच वाटतें. हें यांचें पुरश्चरण, जप व हवन चाललें असतां तो मेला तर आपणास भैरव किंवा देवी प्रसन्न आहे असें लोकांस सांगतात व मोठ्यानें **भैरवो भूतनाथश्च'** याचा पाठ करतात व नंतर त्याहिपेक्षां मोठ्यानें **'मारय मारय । उच्चाटय उच्चाटय । विद्वेषय विद्वेषय । छिन्धि छिन्धि । भिंधि भिंधि । वशीकुरु वशीकुरु । खादय खादय । भक्षय भक्षय । त्रोटय त्रोटय । नाशय नाशय । मम शत्रून्वशी कुरु वशीकुरू । हूं फट् स्वाहा'** कामरत्न उच्च० ५।७।। ' याप्रकाराचे मंत्र झापाऱ्यानें जपतात व देव आपल्या हातांत आहे असें लोकांस भासवितात. मद्यमांस होमांत टाकतात. हे सर्व प्रकार स्वत:स मद्यमांस खावयास मिळावें म्हणूनच होत. आपल्या भृकुटीच्या मध्यभागीं सिंदुराची रेखा आंखून चमत्कारिक अंगविक्षेप करतात व आपल्या अंगांत देव आला असें दाखवितात, पण हे सर्व फसवणुकीचे प्रकार होत ! केव्हां केव्हां तर या शाक्तांचे प्रकार इतके भयंकर होतात कीं, एखाद्या माणसाला हे ठार मारून त्याच्या मांसाचें पोडेंसें हवन हे करतात व बाकीच्या मांसाचें भक्षण करून टाकतात ! जो कोणी नवखा यांच्या या भेसूर भैरवीचक्रामध्यें जातो व तेथील प्रकार पाहून गर्भगळीत होतो व मद्यमांसभक्षणास कचरतो त्याची ते तत्काल आहुति देतात ! असे हे लोक निर्दय असतात. यांच्यांत जो अघोरी असतो तो प्रेताचेंहि मांस खातो ! व कित्येक तर विष्ठामूत्रहि भक्षण्यास मागेंपुढें पाहत नाहींत. हा तंत्रांचा प्रकार आहे. हा धर्म आहे काय व आत्मिक उन्नति यानें होईल काय याचा विचार सुज्ञांनीं करावा.

या वाममार्ग्यामध्यें कांहीं चोलीमार्गी व कांहीं बीजमार्गी असे भेद आहेत. चोलीमार्गी जे असतात ते सर्व नियमित वेळीं एका गुप्त ठिकाणीं जमतात. स्त्रीपुरुष, मुलगामुलगी, भाऊबहीण, मातापिता, वगैरे सर्व एकत्र जमतात व यथेच्छ मद्यमांसांचें सेवन करतात, नंतर एका स्त्रीला नागवी करून तिच्या गुप्त इंद्रियाचें सर्व पूजन करतात व ती दुर्गादेवी आहे असें सर्व मानतात ! त्याचप्रमाणें पुरुषाला नग्न करून त्याच्या गुप्त इंद्रियाचें सर्व पूजन करतात ! नंतर पुरुषाचें उत्तरीय व बायकांच्या चोळया एकत्र करून एका मातीच्या किंवा दुसऱ्या कसल्यातरी भांड्यांत ते सर्व कपडे घालतात. नंतर यथेच्छ मद्यपान झाल्यानंतर व सर्वांना धुंदी आल्यानंतर त्या भांड्यांतून एक एक कपडा काढण्यांत येतो. ज्या पुरुषाच्या कपड्याबरोबर ज्या स्त्रीचा कपडा निघेल ती त्या पुरुषाची त्या वेळीं बायको समजली जाते ! अशा प्रकारें हे अनेक कुकर्मे करतात व केव्हां तर आपआपसांत भांडून व मारामारी करून डोकीं फोडूनहि घेतात. जेव्हां प्रात:काळीं आपल्या घरीं परत जातात तेव्हां त्यांना शुद्धीवर आल्यावर माता पिता बहीण,वगैरे विषयीं पूर्ववत् ज्ञान होऊं लागतें. दुसरे बीजमार्गी जे असतात ते त्याचप्रमाणें निंद्य प्रकारें समागम करून वीर्य पाण्यांत मिसळून तें सर्व पितात ! व त्यांत आश्चर्य हें कीं, हे नीच लोक या अधर्माचरणाला मोक्षाचें साधन असें समजतात ! या त्यांच्या दुराचरणानें ते लोक दुराचारी, मूर्ख व अवनतियुक्त असे होतात. यासाठीं सर्वांनीं तो दुष्ट मार्ग सोडून खऱ्या धर्माच्या मार्गानें जाणें योग्य आहे.

जसे हे वाममार्गी प्रेतनाथाची पूजा करतात, त्याचप्रमाणें शैव लोक भूतनाथाची पूजा करतात. शाक्तांपेक्षां शैव थोडेसे चांगले हें जरी खरें तरी त्यांत सुद्धां निंद्य प्रकार कांहीं थोडा नाहीं. ज्याप्रमाणें शाक्त हे मंत्राचा उपदेश करून शिष्यांच्या धनांचा अपहार करतात त्याप्रमाणें शैवहि करतात . हे **'ओं नम: शिवाय ।'** या मंत्राचा उपदेश देतात. रूद्राक्ष व शवभस्म धारण करतात. मातीचें किंवा पाषाणाचें मोठें लिंग करून त्याची पूजा करतात. शाक्त लोक प्रत्यक्ष लिंगाची पूजा करतात हें मातीचें लिंग करून तें पूजतात इतकाच काय तो भेद आहे व नंतर ' हर हर बं बं बं असे बकरीप्रमाणें आवाज करतात. गालावर बोटें लावून 'बूर् र्र् ' किंवा बड् बड् बड् ' असा आवाज काढतात ! व हे असें समजतात कीं, असे शब्द केल्यानें महादेव व पार्वती प्रसन्न होतात. याचें कारण ते असें सांगतात कीं, भस्मासुराच्या पाठीमागें जेव्हां महादेव लागला तेव्हां त्यानें बं बं बं अशा आवाज केला होता म्हणून आता हेहि

तसाच आवाज करतात ! त्याचप्रमाणें दक्षप्रजापतीचें शिर तोडून त्याचें हवन केलें व नंतर त्याला बकऱ्याचें मुंडकें बसविलें म्हणून हे सध्यां बकऱ्याप्रमाणें आवाज काढतात ! काय हें वेड ! अशा वेडानें मनुष्यांची उन्नति होईल काय ? शिवरात्रीं व प्रदोष वगैरे व्रतें केल्यानें मुक्ति होते असें हे मानतात ! तात्पर्य जसे वाममार्गी भ्रष्ट आहेत त्याचप्रमाणें शैवहि आहेत. यांमध्यें कानफाटे, नाथ वगैरे भेद आहेत. गिरी, पुरी, बन, अरण्य, पर्वत, सागर गृहस्थहि शैव होऊं शकतात असें हे समजतात ! कोणी तर असे असतात कीं, थोडे शाक्त थोडे शैव व थोडे वैष्णव. या लोकांविषयीं तंत्रांतरीं श्लोक आहे तो असा:—**अंतः शाक्ता बहिः शैवाः सभामध्ये च वैष्णवाः ॥ नानारूपधराः कौला विचरन्ति महीतले ॥** " आंत शाक्त, बाहेर शैव व भाषण करावयाच्यावेळीं सभेमध्यें वैष्णव असे नानारूपें धारण करणारे वाममार्गी लोक पृथ्वीवर हिंडतात. या लोकांपासून सर्वांनीं दूर रहावे, हीं मतें उन्नतीच्या घातक आहेत.

वैष्णवहि त्याच मासल्यापैकीं होत. त्यांच्या लीलाहि अद्भुत आहेत. हे आपणास विष्णूचे दास मानतात. याच्यांत श्रीवैष्णव म्हणून एक पंथ आहे. हे चक्रांकित वैष्णव होत. हे आपणांस सर्वांत श्रेष्ठ समजतात. पण सदाचरणाच्या दृष्टीनें पाहिलें तर यांत कांहींच तथ्य नाहीं असें म्हणावें लागतें. (प्र०) कां बरें ? कसें तथ्य नाहीं ? ललाटांवर नारायणाच्या चरणारविंदाप्रमाणें तिलक व त्यांत पिवळी रेषा ही श्री आहे. आणखी काय पाहिजे ? हें असें उत्तम चिन्ह धारण करतों म्हणून आम्हांला श्रीवैष्णव असें म्हणतात. एका नारायणाशिवाय दुसऱ्या कोणाला मानत नाहीं. महादेवाच्या लिंगाचें दर्शनहि करीत नाहीं. कारण आमच्या ललाटांवर जी श्री विराजमान आहे ती त्या महालिंगाला पाहून लज्जित होते ! आलमंदारादि स्तोत्रांचा पाठ आम्ही करीत असतों. नारायणाची समंत्रक पूजा करतों, मांस खात नाहीं, मद्य पीत नाहीं, मग आम्ही चांगलें नव्हे कसे ? (उ०) हा तुमचा तिलक म्हणजे हरिपदाकृति व पिवळी रेषा ही श्री आहे असें मानणें हाच निव्वळ भ्रम आहे. कारण हें तुम्ही आपल्या ललाटावर हातानें काढलेलें चित्र आहे. जसें हत्तीचें मस्तक रंगवितात तसें तुम्ही तुमचें रंगविलें तर दुसरें काय ? नाहीतर तुमच्या ललाटावर विष्णुपदाचें चिन्ह कसें येईल ! काय कोणी वैकुंठावर जाउन विष्णूच्या पायांचा छाप मारून आणला आहे ? ( प्र० ) बरें आता हें सांगा कीं, तुमची ती श्री जड आहे कीं चेतन ? ( उ० ) चेतन आहे. ( प्र० ) तर आतां तुम्हीच पहा कीं, ही तुमच्या कपाळावरची रेषा जड असल्यामुळें ती लक्ष्मी होऊं शकणार नाहीं. कारण आतांच तुम्हीं सांगितलेंत कीं, श्री ही चेतन आहे. शिवाय आम्ही तुम्हांस असें विचारतों कीं, ही बनविलेली आहे कीं न बनविलेली आहे ? जर न बनविलेली आहे असें म्हणाल तर या गंधातील रेषा ही तुम्ही बनविली असल्यामुळें श्री होऊं शकणार नाहीं; शिवाय जर तुमच्या ललाटावर श्री आसती तर तुमचें तोंड शोभायमान दिसलें असतें. पण तें तर काळवंडलेलें दिसत आहे तें कां बरें ? जर तुमच्या डोक्यावर श्री आहे तर मग भीक कां मागतां, परान्न कां घेतां, व अन्नसत्रांत कां जेवतां ? ही निर्लज्जपणाची कमाल आहे कीं, तुम्ही कपाळावर श्री बांधून दरिद्री लोकांप्रमाणें व्यवहार करतां

एक परिकाल नामक वैष्णवभक्त होऊन गेला. तो चोरी, छल, कपटादि दुष्ट कृत्यें करून धन मिळवीत असे व वैष्णवांकडे आणून देत असे व त्यामुळें आपणास कृतकृत्य मानीत असे. एके दिवशीं त्यानें पुष्कळ खटपट केली पण त्याला चोरी करतां आली नाहीं व कांहीं लूटहि मिळाली नाहीं. त्यामुळें तो खिन्नवदन होऊन इकडे तिकडे भ्रमण करूं लागला. नारायणानें पाहिलें कीं, माझा भक्त आज फार दुःखित झाला आहे. तेव्हां त्याचें शांतवन केलें पाहिजे असा विचार करून त्यानें एका सावकाराचा वेष घेतला व एका रथामध्यें बसून त्या परिकालाच्या समोर आला. तो त्या सावकारला पाहिल्याबरोबर आनंदित झाला व त्याला म्हणाला. 'शेटसाहेब ! आपल्या अंगावरचे सर्व दागिने येथें निमूटपणानें खालीं उतरून ठेवा. नाहींतर तुमचा जीव घेईन.' हें भाषण ऐकून नारायणानें सर्व दागिने काढण्यास व त्याचा पुढें ठेवण्यास प्रारंभ केला. आंगठी काढण्यास थोडासा उशीर लागला त्यामुळें त्या चोराला फार राग आला व त्यासरशीं त्यानें त्या नारायणाचें बोट कापून त्यांतून आंगठी काढून घेतली. हें आपल्या भक्ताचें धाष्ट्यर्याचें कृत्य पाहून नारायण फार प्रसन्न झाला व चतुर्भुज होऊन त्याला दर्शन दिलें. नारायण त्याला म्हणाला कीं, 'हे परिकाल ! तूं माझा परम भक्त आहेस; कारण तूं चोरी करून त्या धनाच्या योगानें वैष्णवांची सेवा करीत आहेस, तूं

धन्य आहेस.' नंतर त्यानें ते सर्व दागिने वैष्णवांकडे नेऊन दिले. याप्रमाणें कांहीं काळ लोटल्यानंतर परिकालानें एका सावकाराजवळ नोकरी धरली. पुढें तो व्यापारी व तो नोकर देशदेशांतरीं व्यापारासाठीं गेले. ते पुष्कळ सुपाऱ्या खरेदी करून व त्या सर्व नौकेमध्यें घालून आपल्या देशीं येऊं लागले. तेव्हां वाटेंत त्या परिकालानें त्यांतील एक सुपारी फोडून त्यांतील अर्धी सुपारी सावकाराकडे दिली व म्हणाला, ही अर्धी सुपारी माझी आहे, ही आपणाकडे ठेवा व या जहाजावर माझी अर्धी सुपारी आहे असें लिहून द्या. तो सावकार म्हणाला, बाबारे ! अर्धी कशाला, तुला पाहिजे तितक्या सुपाऱ्या मी देईन. तेव्हां तो म्हणाला, मी अधार्मिक नाहीं, माझ्या हक्काचा जेवढा माल आहे तेवढाच मी घेईन जास्त घेणार नाहीं. तेव्हां त्या भोळया सावकारनें लिहून दिलें कीं, आपल्या जहाजावर त्याची अर्धी सुपारी आहे. जेव्हां जहाज बंदरांत आलें व सावकार सुपारी उतरून घेऊं लागला. तेव्हां परिकाल त्याला म्हणाला, 'शेटजी माझी अर्धी सुपारी द्या.' जेव्हां तो अर्धी सुपारी देऊं लागला तेव्हां परिकाल भांडूं लागला. तो म्हणाला 'माझी या जहाजावर अर्धी सुपारी आहे व हा सावकार मला एक सुपारीचा तुकडा देऊन मला ठकवीत आहे.' हें भांडण राजपुरुषापर्यंत गेलें तेव्हां परिकालानें तो वाण्याचा लेख दाखवून सांगितलें कीं, यानें अर्धी सुपारी आम्हांस दिली पाहिजे. वाण्यानें पुष्कळ सांगितलें. पण त्यानें तें मानलें नाहीं. शेवटीं सर्व सुपाऱ्यांपैकीं अर्ध्या सुपाऱ्या घेऊन त्या सावकारास त्यानें सोडलें व सुपाऱ्या वैष्णवांस अर्पण केल्या, तेव्हां वैष्णव फार खूष झाले ! अजूनपर्यंत त्या परिकालाची मूर्ति वैष्णव मंदिरांत नजरेस पडते, इतकी त्याची पवित्रता हे वैष्णवलोक मानतात ! ही कथा भक्तमाला नामक ग्रंथांत आहे तेथें विस्तारपूर्वक वाचकांनीं पहावी. या ठिकाणीं वाचकांनीं विचार करावा कीं, नारायण, वैष्णव व त्यांचे दास हे तीनहि चोर आहेत कीं नाहीं. हे चोरांचे साथीदार होतात कीं नाहीं ? व्यक्तिविषयक आमचा लेख नाहीं, त्यांच्या मतांमध्यें जी कथा विश्वसनीय म्हणून मानली जाते तिचें परीक्षण केलें असतां काय निष्पन्न होतें तें पहावयाचें आहे. सध्यां तर वैष्णवांमध्यें अनेक भेद झाले आहेत व भिन्नभिन्न तिलक, कंठीं वगैरे धारण करीत आहेत. **रामानंदी** आहेत ते बाजूला गोपीचंदन लावून मध्यें काळी रेषा लावतात; **नीमावत** आहेत ते दोन बाजूला बारीक रेषा आंखून व मध्यें लाल बिंदू लावतात; **माधव** असतात ते फक्त एक काळी रेषाच लावतात; **गौडबंगाली** कट्यारीप्रमाणें रेषा काढतात; **रामप्रसादी** आहेत ते चंद्रकाकार गंध लावून मध्यें एक गोल टिकला लावतात. याप्रमाणें अनेक प्रकारें हे आपलीं कपाळें रंगवीत असतात व तेंच मोक्षसाधन आहे असें समजता ! रामानंदी असतात ते नारायणाचें हृदय गंध आहे व लाल रेषा ही लक्ष्मी आहे असें मानतात व जे गोसावी असतात ते, तें गंध श्रीकृष्णाचें हृदय असून आंतील रेषा ही राधा आहे असें समजतात. याप्रमाणें हे सर्व लोक शुद्ध धर्माला विसरून भ्रमजलांत फसत आहेत.

भक्तमाला नामक ग्रंथामध्यें एक कथा दिलेली आहे. ती अशी:—कोणी एक मनुष्य एका वृक्षाखालीं येऊन निजला. पुढें तेथेंच तो मरण पावला. इतक्यांत त्या झाडावर बसलेल्या कावळयानें त्या माणसाच्या ललाटावर विष्ठा केली. त्या शरिरांतून जीवाला नेण्यासाठीं यमदूत तेथें आले व तिकडून ललाटावरचा छाप पाहून विष्णुदूतहि धांवून आले. दोघाचें दूत तेथें भांडण करूं लागले. यमदूत म्हणाले कीं यमाची आम्हांस आज्ञा आहे कीं, याला आम्ही लवकर यमलोकांत नेऊन पोंचवावा, विष्णुदूतहि त्याचप्रमाणें म्हणूं लागले कीं, आम्हांस विष्णूची आज्ञा आहे कीं, याला विष्णुलोकाला न्यावें. हा वैष्णव आहे. पाहा याच्या ललाटावर वैष्णवतिलक आहे. तो तिलक पाहिल्याबरोबर यमदूत गप्प बसले व वैष्णव दूतांनीं त्याल्या विष्णुलोकांत नेलें. नारायणानें त्याला वैकुंठांत स्थान दिलें ! अकस्मात् तिलक लावल्याचें जर असें पुण्य आहे तर आस्थेनें तिलक लावला असतां केवढें पुण्य मिळेल याचा विचार करावा. अर्थात् तिलक लावणाऱ्याचीं सर्व पास्तकें नाहींशीं होतील यांत शंका नाहीं असें हे वैष्णव समजतात. आम्ही यावर असें विचारतों कीं, जर लहानसा तिलक लावला तर वैकुंठाला जातो तर तोंडावर काळया रंगाचालेप दिला किंवा सर्व शरीरभर लेप लावला तर तो वैकुंठाच्याहि पलीकडे जात असेल नाहीं बरें ? बाबानो ! या गप्पा आतां पुरे करा! हें सर्व व्यर्थ आहे. धर्म निराळा हें आतां जगजाहीर होत आहे. धुमीच्या पुढें आंग तापवीत बसणें, लंगोटी लावणें, जटा बांधणें, हे ढोंगाचे प्रकार व्यर्थ होत. बगळयाप्रमाणें ध्यान लावतात, गांजाभांग पितात, डोळे

लाल करून भोळयांना फसवितात, कवडीचीहि भीक मागण्यास लाजत नाहींत, गृहस्थांच्या मुलांना फसवून चेले बनवितात अशीं दुष्ट कर्मे हे करतात ! प्राय: यांच्यांत मजूर लोक प्रविष्ट होतात. कोणी विद्या शिकूं लागला तर ते त्याला अडथळा करतात. त्यांना ते म्हणतात कीं, **'पठितव्यं तदपि मर्तव्यं दंतकटाकटेति किं कर्तव्यम्'** संतांनी विद्या कां म्हणून शिकावी ? कारण विद्याध्ययन केलें तरी मरण चुकत नाहीं. मग दातांना व्यर्थ शीण तरी कशाला ? साधूंनी चार घरें फिरून यावें, संतांची सेवा करावी, रामाचें भजन करावें म्हणजे झालें. अशा विचारांनीं आत्मोन्नति होणार नाहीं हें सूज्ञ वाचकांस निराळें सांगणें नको. धर्मोन्नतीला ज्ञानाची अत्यंत आवश्यकता आहे.

जर कोणी मूर्खपणाची किंवा अविद्येची मूर्ति पाहण्याची इच्छा करीत असेल तर त्यानें या लोकांना पहावें. या प्रत्यक्ष अज्ञानाच्या मूर्तिच होत. त्यांच्याजवळ जे कोणी जातात त्यांना हे 'बच्चा बच्ची' असें म्हणतात. मग ते सर्वतोपरी त्यांचे आईबाप शोभण्यासारखे असले तरी हरकत नाहीं! या प्रकारच्या साधूंना खाकी साधु असें म्हणतात. याच प्रकारचे आणखी रूखड, सूखड, गोदडिये, जमाती, सुतरेसाई, अकाली, कानफाटे, जोगी, औघडी इत्यादि आहेत हे सर्व एकामाळेचेच मणी होत.

एकदां एका खाकी साधूचा एक चेला 'श्रीगणेशाय नम:' घोकत घोकत विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेला. तेथें एक पंडित बसलेला होता त्यानें त्याच्या उच्चारणांत चूक आहे असें पाहिले व तो त्या चेल्यास म्हणाला 'साधूजी, तुम्हीं **स्त्रीगनेसाजन्नमें** असें घोकत आहां, तें अशुद्ध आहे. तर कृपा करून **श्रीगणेशाय नम:** असें घोका.' हें ऐकून त्या चेल्यानें लवकर लोटा भरून विहिरींतून काढला व आपल्या गुरूजवळ जाऊन म्हणाला कीं, 'हे गुरुजी ! विहिरीवर एक पंडित बसलेला आहे, तो मला म्हणाला कीं, मी अशुद्ध घोकत आहे.' हें ऐकतांच गुरूची स्वारी लाल झाली व ते त्या पंडिताजवळ जाऊन त्यास दरडावून म्हणतात 'काय रे पंडिता ! तूं माझ्या शिष्याचें मन चंचल करतोस! तूं काय शिकला आहेस बोल ? तूं आपल्या ज्ञानाच्या घमेंडींत असशील. पण हें पहा, कीं, तूं एकच पाठ जाणत आहेस. पण मी तीन तऱ्हेचे पाठ जाणतों, ( १ ) **स्त्रीगनेसाजन्नमें**, ( २ ) **स्त्रीगनसायन्नमें** ( ३ ) **श्रीगनेसायनमें** अशीं तीन पाठांतरें मी जाणत आहे.' हें त्या साधूचें बोलणें ऐकल्यावर त्या दोघांचा तेथें पुढें दिल्याप्रमाणें संवाद झाला:—

( **पंडित**–) पहा साधूजी ! विद्या काय आहे तें तुम्ही शिकल्याशिवाय समजणें शक्य नाहीं. ( **खाकी साधू**–) जा रे जा पंडिता ! पुष्कळ विद्वानांना आम्हीं रगडलें आहे. एक भांगेचा लोटा झोंकून एक गांजाचा दम मारला म्हणजे सर्व सिद्धि मिळते; बंभोलानाथ ! संतांचें घर फार मोठें आहे तें तुला अनुभवाशिवाय कसें समजेल ? ( **पं०** ) पहा ! जर तूं विद्या शिकला असतास तर असे अशुद्ध शब्द कसे उच्चारतास. विद्येच्या योगानें तुला सर्व प्रकारचें शुद्ध ज्ञान झालें असतें. (**खा०**) वा रे पंडिता ! तूं आमचा गुरु बनूं पाहत आहेस, पण हें पक्कें लक्षांत ठेव कीं, आम्ही तुझें मुळींच ऐकणार नाहीं. ( **पं०** ) खरेंच आहे जर तुला बुद्धिच नसेल तर तूं ऐकणार कसें ? उपदेश ऐकून समजण्याला अध्ययनानें सुसंस्कृत झालेली बुद्धि लागत असते. ( **खा०** ) जो वेदशास्त्रें शिकून आमच्या सारख्या संतांना मान देत नाहीं त्याची ती विद्या व्यर्थ होय. ( **पं०** ) आम्ही संतांची सेवा करतों; पण तुमच्या सारख्या दुर्व्यसनरत पुरुषांची नाहीं करीत. तुम्ही संत नव्हे, विद्वान्, धार्मिक, सज्जन, परोपकारी असे जे पुरुष असतील तेच खरे संत होत. ( **खा०** ) आम्ही दिगंबर वृत्ति धारण करून नागवे राहतों, धुमीजवळ बसतों, गांजा चरस वगैरे महादेवाला प्रिय असणाऱ्या व्यसनांचें सेवन करतों, तीन लोटे भांग पितो, गांजा भांग धतूरा यांच्या पाल्याची भाजीहि खातों, अफूहि खातों, रात्रंदिवस बंभोलानाथाच्या कृपेनें निशेमध्येंच राहतों, दुनिया नाहीं असें समजतों, भीक मागून त्यावर गुजारा करतों, रात्रभर असा खोकला येत असतो कीं, जवळ निजणाऱ्यास झोंप येणें शक्य नसते; तथापि धुमी व गांजा सोडीत नाहीं. या प्रकारचें वर्तन आमचें अव्याहत सुरू असतां तुम्ही आम्हांला साधु नव्हे म्हणतां काय ? आम्हांला सिद्धिहि अनुकूल झालेल्या आहेत. जर तुम्ही आमची निंदा करून आम्हांला क्रोध आणाल तर आम्ही तुमचें भस्म करून टाकूं ( **पं०** ) हीं सर्व लक्षणें मूर्ख लोकांची आहेत. पहा **'साध्नोति पराणि धर्मकार्याणि स साधुः।'** सदोदित जो धर्मकार्यें करीत

असतो, परोपकारामध्यें रत असतो, ज्याला कोणताहि दुर्गुण नसतो, नेहमीं सत्योपदेश करून जो सर्वांची सुधारणा करतो तोच साधु होय, (खा०) जा रे जा ! तूं भामटा आहेस. तुला काय साधूचीं कर्मे माहीत ! संतांचें घर मोठें आहे. त्यांना कोठेंच अटकाव नाहीं. फार वोलशील तर हा चिमटा तुझ्या कपाळावर मारून तुझा प्राण घेईन (पं०) ठीक आहे बुवाजी ! तुम्ही जा, आपल्या आसनावर बसा; वाटेल तें करा, मारण्याबिरण्याचें मनांत आणू नका; कारण सध्यांचें राज्य कसें काय आहे तें पहाल तर तुमचें तुम्हांलाच कळेल कीं, दुसऱ्याला मारण्याचा परिणाम काय होतो तो. जर तुम्ही दुसऱ्या कोणाला मारलेंत तर तुम्हांला पकडतील, मारतील व तुरुंगांत ठेवतील, शिवाय दुसऱ्याला मारणें हें साधूचें लक्षण नव्हे. (खा०) तूं राक्षस आहेस, सकाळीं उठून तुझें तोंड पाहणें योग्य नव्हे. (पं०) तुम्ही कोण्या महात्म्याचा संग केला नाहीं वाटतें. (खा०) आम्हीच स्वतः महात्मे असतां दुसऱ्याची संगति करण्याची काय आवश्यकता आहे ? (पं०) जे लोक दुर्भागी असतात त्यांची तुमच्या सारखीच बुद्धि होत असते.

याप्रमाणें बोलाचाली झाल्यानंतर खाकीजी आपल्या धुमीजवळ गेले व पंडितजी आपल्या घरीं गेले. संध्याकाळीं जेव्हां आर्तीची वेळ झाली तेव्हां सर्व लहानसहान साधु या वृद्ध खाकीजी जवळ येऊन त्याला, दंडोते, करून जवळच अनुग्रहासाठीं बसूं लागले तेव्हां हे खाकीजी त्यांतील प्रत्येकास म्हणतात कीं, अहो ! रामदासजी, ! तुम्ही काय अध्ययन केलें आहे ? रामदासजी म्हणाले-महाराज, मी तर वेस्नुसहसरनाम म्हटलें आहे. गोविददासजी म्हणालें-मीं रामसतवराज म्हटला आहे. अशा तऱ्हेनें आपापली विद्वता ते जमलेल्या मंडळीपुढें मांडूं लागले. तितक्यांत एकानें खाकीजीला विचारलें कीं, 'महाराज तुम्ही काय पढलें आहे.' तेव्हां ते म्हणाले कीं, आम्हीं गीताजीचें अध्ययन केलें आहे. पण हें आश्चर्य आहे कीं, आम्ही एकहि गुरु केला नाहीं. कारण आम्ही कोणाला गुरु करणार ? पहा जेव्हां आम्ही परागराज क्षेत्रांत अध्ययन करीत होतों' तेव्हां जर आम्हांस हें कोणतें अखसर आहे म्हणून शंका आली तर त्यासासाठीं कोणातरी एखाद्या मोठ्या घोतराच्या पंडिताला जाऊन विचारीत होतों. याशिवाय आम्हांला कोणत्याहि कामासाठीं गुरु करण्याची गरजच पडली नाहीं. अशा तऱ्हेच्या अक्षरशत्रुजवळ अविद्येनें घर केलेलें असलें तर त्यांत नवल काय ? व आश्चर्य हें कीं, हे सध्यांचे गुरु आहेत व हेच साधु आहेत !!

या लोकांचीं कामें म्हटलीं म्हणजे नशा, मारामारी, ओरडणें, निजणें खाणें, पिणें, झांज पिटणें, घंटा ठोकणें, शंख वाजविणें, धुमी पेटविणें, चोहोंकडें व्यर्थ फिरणें हीं होत. या कामाशिवाय हे कांहीं एक करीत नसतात. दगडांतून पाणी काढणें सोपें आहे पण या लोकांना एखादी गोष्ट समजावणें शक्य नाहीं. हे प्रायः शूद्रवर्णी, मजूर लोक कामाला कंटाळून ही राख लावून अल्लारखी धदा स्वीकारतात व गांवाला उपद्रव देत हिंडत असतात ! त्यांना विद्या नसते व त्यामुळें सत्संगाचें महात्म्य त्यांना कळत नसतें. जे नाथपंथी असतात, त्यांचा 'नमः शिवाय' हा मंत्र, खाकी बैराग्यांचा 'नृसिंहाय नमः' रामावतान्यांचा 'श्रीरामचंद्राय नमः' किंवा 'सीतारामाभ्यां नमः' कृष्णोपासकांचा 'श्रीराधा–कृष्णाभ्यां नमः, नमो भगवते वासुदेवाय, गोविंदाय नमः' हा असतो. हा मंत्र कानांत उच्चारण केल्याबरोबर तो उच्चारणारा गुरु बनतो व ऐकणारा उत्तम शिष्य बनतो. याशिवाय कोणी कांहीं तर कोणी कांहीं नवे नवे मंत्र तयार केलेले असतात. पहा तुंब्यायाचा मंत्रः–"जल पवितर सथल पवितर और पवितर कुवा। शिव कहे सुन पार्वती तूंबा पवितर हुवा ।।" आतां वाचकांनीं येथें विचार करावा कीं, अशा निरक्षर व निर्बुद्ध लोकांकडून जनतेवर उपकार थोडा तरी होऊं शकतो काय ? जर यांच्यांत योग्यता असती तर गोष्ट निराळी. पण पहावें तों त्यांची फारच हीन दशा असते. लोक आपल्या धुमीवर जीं लांकडें जाळतात त्या ऐवजीं जर यांनीं एक कांबळें विकत घेतलें तर त्यांचें थोड्या पैशांत काम भागून लांकडें व्यर्थ फुकट जाणार नाहींत. पण त्यांस इतकी बुद्धि कोठून येणार ? ते आपणास तपस्वी म्हणतात कां तर ते धुमीजवळ तापत बासतात ! जर अशा प्रकारानें तपस्वी होतां येईल तर जंगली लोक फारच मोठे तपस्वी होऊं शकतील ! जटा वाढवून, राख लावून, किंवा तिलक लावून जर तपस्वी होतां येईल तर सर्व लोक तपस्वी होतील. हे लोक बाहेरून विरक्ति दाखवितात पण अंतर्यामीं फारच स्वार्थी असतात.

कबीरपंथीहि वरील प्रमाणेंच होत. (प्र०) कां बरें ? कबीरपंथ तर सर्वांत उत्तम. हे मूर्तिपूजेचें खंडण करतात.

कबीर साहेब स्वतः फुलांपासून उत्पन्न झाले व अंतींहि त्यांचीं फुलेंच झालीं. असे ते सिद्ध होते ! वेद व पुराणें यांना जी गोष्ट समजली नाहीं ती कबीरानें जाणली. खरा रस्ता कबीरानेंच लोकांस दाखवला; म्हणूनच त्याला 'सत्यनाम कबीर' असें म्हणतात. ( उ० ) कबीरपंथहि वर लिहिल्याप्रमाणेंच आहे. ते मूर्ति पूजीत नसतील, पण पलंग, गादी, तक्के, खडावे, दिवा वगैरेंचें पूजन करतात. हें काय मूर्तिपूजन नव्हे ? काय कबीरसाहेब भुंगा होता. जो फुलांतून बाहेर पडला ? फुलांतून बाहेर पडणें सर्वथा असंभव आहे. पण त्याविषयीं काशीमध्यें जी गोष्ट लोकांत प्रसिद्ध आहे ती कदाचित् खरी असेल. कोणी एक नीच जातीचा मनुष्य काशीमध्यें रहात होता. त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें; तो एके दिवशीं एका गल्लींतून जात असतां त्यास एक फुलांची पाटी दिसली. तिच्या जवळ जाऊन पहातो तों आंत एक त्याच दिवशीं जन्मलेलें मूल आहे. तें त्यानें घरीं आणून आपल्या बायकोला दिलें. तिनें त्याचें पालन करून वाढवलें. पुढें तो मुलगा मोठा झाल्यावर संस्कृत शिकण्याच्या इच्छेनें एका पंडिताजवळ गेला. त्यानें ब्राह्मणेतराला आपण शिकवित नाहीं असें सांगितलें व त्याचप्रमाणें इतर पंडितांनींहि त्याला शिकवलें नाहीं ! तेव्हां त्याचा निरुपाय होऊन आपले विचार तो इतर आपल्या जातभाईंला उपदेशूं लागला व त्यानें आपल्या गाण्यानें व भजनानें बऱ्याच लोकांचें चित्त आकर्षिलें. तो आपल्या उपदेशामध्यें पंडितांची व शास्त्र्यांची फार निंदा करीत असे. तंबुरा घेऊन मोठ्यानें भजन करीत असे. कांहीं लोक त्याचे शिष्य झाले. जेव्हां तो मेला तेव्हां लोकांनीं त्याला सिद्ध बनविलें ! जें त्यानें कवन केलें होतें त्याचें त्यांनीं अध्ययन सुरू केलें. हे लोक त्याच्या उपदेशावरून कान बंद केल्यानंतर जो शब्द होतो त्याला अनाहत शब्द असें मानूं लागले. मनोवृत्तीला सुरती म्हणूं लागले ! तो अनाहत शब्द ऐकणें हेंच परमध्यान म्हणूं लागले व बर्चीप्रमाणें तिलक लावण्यांत पुरुषार्थ मानूं लागले ! आतां विचारी लोकांनीं यांत पहावें कीं, यांच्यांत आत्मोन्नतिकारक काय आहे व जर कांहीं नाहीं तर हा पंथ इतर पंथाप्रमाणेंच टाकाऊ आहे असें स्पष्ट म्हणण्यास काय हरकत आहे ?

(प्र०) पंजाबमध्यें गुरू—नानक होऊन गेला, त्यानें मूर्तिपूजेचें खंडन केलें, मुसलमान होण्यापासून पुष्कळांना वांचविलें, त्यानें गृहस्थाश्रमांतच राहून उपदेशाचें पुष्कळ काम केलें. त्यानें पुढील मंत्रांत आपला आशय प्रकट केला आहे त्यावरूनच त्याचे विचार किती चांगले होते तें समजेल: —"**ओं सत्यनाम कर्तापुरुष निर्भो निर्वैर अकालमूर्त अजोनि सहभंगुरु प्रसाद जप आदि सच जुगादि सच है भी सच नानक होसी भी सच** ॥ जपजी पौडी १ ॥" ज्याचें ओंकार नाम सत्य आहे तो जगत्कर्ता पुरुष भय व वैररहित आहे, काल व योनि यांच्या बंधांत येत नाहीं. तो स्वयंप्रकाश आहे. त्याचा जप गुरुकृपेनें कर. तो परमात्मा आदिमध्यें सत्य होता, युगांदिकांच्या वेळीं सत्य होता, सध्यांहि सत्य आहे व पुढेंहि सत्यच राहणार' (उ०) हें खरें कीं, नानकाचा आशय ठीक आहे, पण त्याला जशी असावी तशी विद्वत्ता नव्हती. आपल्यापरीनें त्यानें थोडेंसें काम चांगलें केलें. जी त्याच्या खेड्यांतील भाषा होती ती त्याला येत होती. पण इतर वेदादिशास्त्राध्ययन त्याला मुळींच येत नव्हतें. जर थोडें तरी अध्ययन असतें तर 'निर्भय' शब्दाच्या जागीं 'निर्भो ' म्हटलेंच नसतें. त्यानें संस्कृत येत नसतांहि आपणाला संस्कृत येत आहे असें बऱ्याच ठिकाणीं भासविल आहे. पण संस्कृत भाषा न शिकतां कशी येऊं शकते ? हें त्याला समजलें नाहीं. आपल्या प्रतिष्ठेसाठीं त्यानें आपण संस्कृत जाणतच आहों असें लोकांस भासविण्याचा प्रयत्न केला ! नाहींतर त्यानें आपल्याच ग्राम्य भाषेंत आपला सर्व उपदेश करावयाचा होता. मध्यें हा अशुद्ध संस्कृताचा घोंटाळा कशाला केला ? ज्याला ज्याला म्हणून आपली प्रतिष्ठा व्हावी असें वाटतें त्याला असेंच ढोंग करावें लागतें. त्यानें आपल्या ग्रंथांत कोठें वेदांची स्तुति तर कोठें निंदा केलेली आहे; कारण त्याला तर बोलून चालून संस्कृत येतच नव्हतें. पण येत नाहीं असें तर स्पष्ट दाखवावयाचें नाहीं, म्हणून त्यानें असा लपंडाव केला. जर केवल स्तुति किंवा निंदाच करता तर कोण्या पंडितानें शास्त्रार्थाला बोलावलं असतां मानहानि होण्याचा संभव होता. म्हणून त्यानें हा निराळाच पंथ काढला. कोठें त्यानें वेदांला चांगलेंहि म्हटलें आहे व कोठें त्यांची निंदाहि केली आहे. पहा:—'**वेद पढत ब्रह्मा मरे चारों वेद कहानि ॥ साधुकी महिमा वेद न जाने । सुखमनी पौडी ७ चो. ८ ॥ नानक ब्रह्मज्ञानी आप परमेश्वर ॥** सु. ० पौ ० ८। चो. ६॥ नानक म्हणतो कीं, **वेद पठण करतां करतां ब्रह्मादिक मेले तेव्हां तो कशाला पाठ करतां ? काय नानक वेदाध्ययन सोडल्यामुळें अमर झाला आहे ?**

काय नानकः मेला नाहीं ? वेद हे सर्व विद्यांचें भांडार असतां त्याला नानक कहाणी म्हणतो; तेव्हां त्यानें केलेला सर्व उपदेशाहि कहाणीसारखाच असला पाहिजे. जे मूर्ख असतां आपणास साधु व ब्रह्मज्ञानी समजतात, त्यांना वेदांचें महत्त्व काय समजणार ? नानक स्वतः संस्कृत शिकला नव्हता म्हणून त्याला वेद समजळे नाहींत. शिवाय वेदांचा गौरव त्यानें केला असता तर त्याला कोणी गुरु मानलें नसतें. म्हणून वेदांची योग्यता कमी आहे असें त्याला प्रसिद्ध करणें भाग पडलें. ज्याला स्वतः समजलें नाहीं तो दुसऱ्यास काय शिकवणार ? ही गोष्ट खरी आहे कीं, जेव्हां नानक पंजाबांत झाला तेव्हां तेथें मुसलमानांचा जाच अतिशय होता व त्यामुळें तेथें संस्कृतविद्येचा लोप झालेला होता. नानकानें आपल्या उपदेशानें पुष्कळ लोकांना महंमदीय होण्यापासून निवृत केलें हेंहि खरें; पण, त्यांच्या हयातींत त्याचा पंथ फारसा वाढलेला नव्हता. या देशांत तर ही गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, मेल्यानंतर लोक पाहिजे त्याला सिद्ध, योगी, महात्मा बनवितात. त्याचप्रमाणें नानकाच्या शिष्यांनीं त्याला बनविलें. नानक हा कांहीं मोठा पुरुष नव्हता. तथापि त्याच्या शिष्यांनीं नानकचंद्रोदय व जन्मसाखी असे ग्रन्थ तयार करून त्यांत हा एक अद्भुत पुरुष होऊन गेला. त्याची ब्रह्मादि देवांशीं भेट झाली व त्यांच्याशीं भाषणें झालीं,त्यांनीं याचीं मान्यता केली, नानकाच्या विवाहामध्यें हत्ती, घोडे, रथ वगैरे सर्व सुवर्ण, चांदी, हिरे, माणकें, रत्नें, यांनीं सजविलेलें होतें ? आतां ह्या गप्पा नव्हेत तर हें काय आहे बरें ? नानकासारख्या सामान्य स्थितींत वाढलेल्या पुरुषाच्या विवाहांत हिरे रत्नांनीं सुशोभित केलेले असंख्य घोडे कोठून बरें येणार ? हां, ही गोष्ट खरी कीं, यांत नानकाचा दोष नसून त्याच्या चेल्यांचा दोष आहे. पण जर त्यावेळीं त्याचें त्याच्या चेल्यांनीं असें महात्म्य वाढवलें नसतें, तर त्याचें मत वाढलेंच नसतें. नंतर त्याच्या पाठीमागून त्याच्या गादीवर जे जे बसले त्यांनीं आपल्या मनाला वाटेल तें लिहून नानकाच्या मूळच्या ग्रंथांत भर घालून ग्रंथ वाढवला. याला सध्यां 'ग्रंथसाहेब' असें म्हणतात ! नानकापासून तों गुरुगोविंदसिंहापर्यंत एकंदर दहा असामी गादीवर बसले. त्या प्रत्येकानें आपल्या मनास वाटेल तें या ग्रंथासाहेबामध्यें लिहून ठेवलें आहे. पुराणांतील कल्पित गोष्टीप्रमाणेच या ग्रंथांत पुष्कळ गप्पा भरलेल्या आहेत. याच्या गादीवर बसणारे आपणास गुरु म्हणवून घेतात. इतकेंच नव्हे तर आपण पूर्ण ब्रह्मज्ञानी व आपणच परमेश्वर आहों असें मानतात. त्यामुळें त्यांनीं कर्म व उपासना सोडली आहे व अन्य आडमार्गानें भटकत आहेत. नानकानें ईश्वराच्या भक्तीवर विशेष जोर दिलेला होता. जर त्याच्या म्हणण्याप्रमाणेंच पुढील गुरूंनीं आपला उपदेश चालविला असता तर फारसें बिघडलें नसतें. पण पुढील गुरूंनीं मन मानेल तसा उपदेश सुरू केला ; इतकेंच नव्हे तर त्यांनीं आपणासच परमेश्वर बनविलें ! त्यामुळें फारच बिघाड झाला या पंथांतहि फार भेद आहेत. जे उदासीन पंथी आहेत ते आपणास थोर समजतात, निर्मल पंथी आहेत ते आपणास थोर समजतात, अकाली व सूतर हसाई आहेत ते आपणास महात्मे समजतात, याप्रमाणें आपआपसांत बरेच झगडे आहेत. यांच्या गादीवरील दहावा गुरू गोविंदसिंह हा फार शूरवीर होऊन गेला. मुसलमानांनीं याला व याच्या अनुयायांना फार त्रास दिला, याबद्दल सूड घ्यावा असें याच्या मनांत आलें पण त्याच्याजवळ युद्धासामुग्री नव्हती व मुसलमानांचा तर त्या वेळीं फार जोर होता ; तेव्हां त्यानें एक युक्ती केली, ती अशी कीं, त्यानें एक पुरश्चरण केलें व अशी प्रसिद्धि केली कीं, आपणास एक देवी प्रसन्न झाली आहे. त्या देवीनें आपणास एक खड्ग व एक वर दिला आहे व असें सांगितलें आहे कीं, हे ' माझ्या भक्ता ! तूं या तरवारीच्या सहाय्यानें मुसलमानांला मार, तुझा सर्वत्र विजय होईल.' याप्रमाणें आपल्या शिष्याकडून प्रसिद्धि करविल्याकारणानें त्याचे पुष्कळ अनुयायी बनले व त्यांच्या सहाय्यानें त्यानें आपलें सूड उगविण्याचें काम चालविलें वाममार्गी लोकांचे जसे पांच ' मकार' आहेत तसें या गुरु गोविंदसिंहानें पांच 'ककार' सूरू केले. हे पांच 'ककार' लढाईच्या उपयोगीं त्यांवेळीं पडलें. (१) केश, (२) कंकण, (३) कच्छ (४) कंगवा, (५) कर्द हे पांच ककार होत. (१) डोक्यावरचे सर्व केस वाढविणें, या पासून द्वंद्व युद्धांत थोडासा शिराचा बचाव होऊं शकतो; (२) डोक्यावर किंवा हातांत कंकण घालतात याच्या योगानें डोक्याचें व हाताचें रक्षण होऊं शकतें. हें बहुधा यांच्या पगडींत असतें. प्रायः याला सुदर्शनासारखीं तीक्ष्ण धारहि असते. (३) गुडघ्यांच्या वरच्या बाजूला जसा मल्ल लोक कच्छ बांधतात त्याप्रमाणें बांधणें याच्या योगानें लवकर पळतां येतें व गुप्त इंद्रियाचें बरेंच संरक्षणहि होतें. (४) कंगवा

याला फणी असें म्हणतात हिच्या योगानें केश विंचरतां येतात. (५) कर्द हा पांचवा प्रकार आहे. याचा युद्धामध्यें फार उपयोग होत असतो. या पांच प्रकारांमुळें त्याचे अनुयायी त्यावेळीं फार लढवय्ये झाले व त्या वेळच्या परिस्थितिप्रमाणें तें सर्व ठीक होतें. पण सध्यांची परिस्थिति निराळी असल्यामुळें तो तसाच सरंजाम ठेवणें हें निरुपयोगी आहे. पण हीं पांच चिन्हें धारण करणें हाच आतां त्यांचा धर्म झाला आहे. हे शीख लोक मूर्तिपूजा करीत नाहींत. पण ग्रंथसाहेबाची पूजा करतात. ग्रंथ पूजणें ही मूर्तिपूजाच आहे. कोणत्याहि जड पदार्थापुढें डोकें नम्र करणें व त्यावर फुलें घालणें हें सर्व मूर्तिपूजेंतच येतें, ज्याप्रमाणें मूर्तीच्या पुजाऱ्यांनीं देवळावर आपली उपजीविका केली आहे त्याचप्रमाणें या ग्रंथामध्येंहि झालेलें आहे. जसे मूर्तिपूजक लोक आपल्या मूर्तीवर फुलें घालतात व त्यांचें दर्शन घेतात त्याचप्रमाणें हे लोक ग्रंथाची पूजा करून त्याचें दर्शन घेतात. मूर्तिपूजकांमध्यें जितका वेदाचा गौरव आहे तितका यांच्यांत नाहीं व याला कारण केवळ त्यांचें अज्ञान होय. जर त्यांच्यांत विद्येचा प्रसार होईल तर ते सर्व वैदिकधर्माचे अनुयायी बनतील यांत शंका नाहीं. जसा यांनीं, भोजन व पंक्तिभेद यांचा झगडा मिटविला आहे त्याचप्रमाणें जर हे लोक विषयासक्ति व दुराभिमान सोडून वैदिकमताला आलिंगन देतील तर उत्तम होईल.

याचप्रमाणें दादूपंथी लोकांची स्थिति आहे. वैदिकमार्ग सोडून जे हे अन्य ढोंगी लोकांनीं सुरू केले आहेत, त्या मार्गांमध्यें लोक भ्रांतचित्त होऊन गोते खात आहेत ! दादूजींचा जन्म गुजराथेंत झाला. नंतर हे जयपुराजवळ अमेर म्हणून एक गांव आहे तेथें जाऊन तेल्याचा धंदा करूं लागले. लोक तरी मोठे विचित्र असतात. त्यांनीं सर्वशक्तिमान् परमेश्वराला सोडून दादूजींचीच पूजा करण्यास सुरवात केली. वेदादि शास्त्रें शिकण्याचें सोडून 'दादूराम' म्हणण्यांतच मुक्ति आहे असें मानूं लागले ! जेव्हां सत्यशास्त्रांचा उपदेश बंद पडला तेव्हां असले बखेडे उत्पन्न झाले तर त्यांत काय आश्चर्य ? या पंथामध्यें एक 'रामसनेहि' नामक पंथ आहे. त्याचें मत असें आहे कीं, रामनामाच्या जपानेंच सर्व कांहीं होतें. म्हणून त्यांनीं वैदिकधर्म, ध्यान, कर्म, उपासना वगैरे सर्व सोडून दिलें आहेत; पण दुपार झाली म्हणजे रामनामाचें काम भागत नाहीं व रोटीहि मिळत नाहीं; तेव्हां मात्र त्यांना यजमानाच्या घरची आठवण होते. यांना स्त्रियांच्या संगतीनें राहण्याची फार हौस असते. स्त्रियांना हें 'रामकी' असें म्हणतात. अशा तऱ्हेचे धर्माच्या नांवावर हे लोक काय काय अनर्थ करीत असतात तें मनांत आणलें म्हणजे अंगावर शहारे येतात !

मेवाडजवळ शहापुर म्हणून गांव आहे, तेथें रामचरण नामक साधू होऊन गेला. त्यानेंहि 'राम' नामाचाच जप करण्यास आपल्या शिष्यांस सांगितलें. राम राम हाच परममंत्र व तोच सिद्धांत आहे असें या मतवाल्यांचें म्हणणें आहे. त्यांच्या संतदासप्रणीत एका ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं,—'**भरम रोग तब ही मिट्या, रट्या निरंजन राइ ।। तब जमका कागज फट्या, कट्या करम तब जाइ ।। साखी ।। ६ ।।** या ठिकाणीं बुद्धिमान् लोकांनीं विचार करावा कीं, केवल राम शब्दाच्या उच्चारणानें केलेल्या कर्मांचें पातक नाश पावेल कीं काय ? नुसत्या रामशब्दोच्चारानें आपण निष्पाप होऊं असें म्हणणें हें निव्वळ अज्ञान आहे व हा शुद्ध भ्रम आहे. या गोष्टींनीं माणसें निष्पाप तर होणार नाहींतच पण नेहमीं पापांतच बुडतील व मनुष्यजन्माचें सार्थक त्यांच्याकडून कांहींच होणार नाहीं. तसेंच रामचरणकृत ग्रंथांत पुढें दिल्याप्रमाणें लिहिलें आहेः—

**महमा नांव प्रताप की, सुनो सरवण चित्त लाई ।। रामचरण रसना रटो, क्रम सकल झड जाइ ।। जिन जिन सुमर्या नांव कूं, सो सब उतऱ्या पार ।। रामचरण जो विसर्या, सोही जमके द्वार ।। रामबिना सब झूठ बतायो ।। रामभजन छूट्या सब क्रम्मा । चंद अरु सूर देई परकम्मा ।। राम कहे तिन कूं भै नाही । तीन लोकमें कीरति गाहीं ।। राम रटत जम जोर न लागै ।। राम नाम लिख पथर तराई । भगति हेति औतार ही धरही ।। ऊंच नीच कुलभेद विचारै ।। सो तो जनम आपणो हारै ।। संता के कुल दीसै नाहीं ।। राम राम कह राम सम्हांहीं ।। ऐसो कुण जो कीरति गावै । हरि हरि जन को पार न पावै ।। राम संता का अन्त न आवे । आप आपकी बुद्धि सम गावै ।।**

या मताचें परीक्षण—प्रथमतः हें तर अगदीं उघड आहे कीं, रामचरणादिकांचे ग्रंथ पाहिल्या बरोबरच हे कोणा तरी ग्राम्य मनुष्याचे असावे असें वाटतें. त्यामध्यें उदात्त कल्पना किंवा उच्च वृत्ति मुळींच नाहीं. अशिक्षितपणामुळें व वेदादिशास्त्रांच्या अपरिचयामुळें यांचीं मनें असंस्कृत असतात, अशा स्थितींत हे जास्त चांगले ग्रंथ काय लिहिणार ? राम राम म्हटल्यानें सर्व पापें नाश पावतात असें समजणें हा यांचा केवळ भ्रम आहे. या मतांचा प्रसार करणें म्हणजे आपला व दुसऱ्याचा जन्म फुकट घालविण्यासारखें आहे. राम राम म्हटल्यानें यमाचें भय चुकतें असें हे म्हणतात, पण जर त्या जपानें राजपुरुष, चोर, डाकू, व्याघ्र, सिंह, सर्प, विंचू वगैरेचें भय चुकत नाहीं तर त्यापासून यमाचें भय चुकेल असें संभवनीय आहे कसें ? ज्याप्रमाणें 'साखर साखर म्हटल्यानें तोंड गोड होत नाहीं तद्वतच सत्यभाषणादि व्रतें केल्यावांचून नुसतें रामराम म्हणण्यानें कांहीं एक होणार नाहीं. जर राम सर्वत्र आहे तर एकदां 'राम' असें म्हटल्याबरोबर त्याला ऐकूं जाईल, व जर त्याला ऐकूं जात नसेल तर जन्मभर म्हटलें तरी त्यापासून काय होणार आहे ? या लोकांनीं आपलें पोट भरावें व दुसऱ्यांचा जन्म व्यर्थ घालवावा म्हणून हें पाखंड उत्पन्न केलें आहे यांचीं नांवें असतात रामस्नेही पण हे काम करतात मात्र रांडस्नेहीपणाचीं, हें फार आश्चर्य आहे ! जर अशीं पाखंडें सुरू झालीं नसतीं तर या देशाला ही अशी कष्टप्रद दशा प्राप्त झालीच नसती. हे लोक आपल्या चेल्यांला उच्छिष्ट भक्षण करावयाला लावतात व त्यांच्या स्त्रियांशीं एकांतांत वास करतात. स्त्रियाहि त्यांना प्रणाम करून त्यांच्याबरोबर एकांतांत राहून उपदेश घेण्यास तयार होतात !

या पंथांमधील आणखी एक शाखा खेडपा नामक गांवीं मारवाडांत सुरू झालेली आहे. या शाखेचा मूळ उत्पादक एक रामदास नामक धेड जातीचा होता. त्याला दोन स्त्रिया होत्या. एके वेळीं यांचें डोकें बिघडून हा इतका भकला होता कीं, तो कुत्र्यांबरोबरहि जेवीत असे. नंतर तो वाममार्गी होऊन नंतर कुंडापंथी बनला. नंतर तो रामदेवाचा अनुयायी ' कपाडिया ' बनला. राजपुतान्यांत चांभार लोक भगवी वस्त्रें नेसून रामदेवकृत गीतें चांभाराला व अन्य लोकांना ऐकवीत असतात, त्यांना कपाडिया असें म्हणतात व त्या गीतांना ते ' शब्द ' असें म्हणतात. हा कपाडिया बनून आपल्या दोन स्त्रियांसह गीतें गात गात चोहोंकडे हिंडत होता. पुढें हिंडतां हिंडतां जोधपूर संस्थानांतील सीथल नामक गांवीं एक तसाच धेडांचा गुरु रामदास म्हणून होता त्याला जाऊन हा मिळाला. त्यानें आपल्या रामदेवपंथाचा त्याला उपदेश करून आपला चेला बनविलें. हा रामदास आपल्या खेडपा गांवीं परत आला व तेथें आपली गादी स्थापून आपलें मत पसरविण्यास प्रारंभ केला या प्रमाणें हें मत त्या गांवांच्या आसपास पसरलें.

वरील रामचरणमताचाहि हाच प्रकार आहे. रामचरण हा मूळचा जयपुरचा बनिया होता. त्यानें दांतडा गांवीं एका साधूकडून वेष घेऊन त्याला गुरु केलें, व शहापुरामध्यें येऊन आपलें मत स्थापलें. भोळया लोकांत पाखंडी मनुष्याचें मत लवकर पसरत असल्यामुळें याचें मतहि तेथें लवकर पसरलें. वरील रामचरणाच्या मताप्रमाणेंच या पंथामध्यें चेले करतात. उच्च नीच भाव ठेवित नसतात. ब्राह्मणापासून तों अंत्यजापर्यंत सर्व सारख्या योग्यतेचे असें हे समजतात. कूंडापंथी लोकांमध्यें सर्व मिळून एका कूंडांतील अन्न खातात, उच्छिष्ट खाण्यास प्रत्यवाय मानीत नाहींत, असे हे आचारभ्रष्ट आहेत. वैदिकधर्मापासून लोकांना पराङ्मुख करतात, व्यवहाराला निरुपयोगी करतात व आईबापांपासून मुलांना अलग करतात; अशा तऱ्हेचे हे कुकर्मी आहेत. आपणाला चेला मिळाला म्हणजे झालें मग दुसऱ्याचें कांहीं कां होईना असें यांचें मत आहे. यांच्या पंथांत ' राम ' नाम हाच महामंत्र आहे. या नामाला हे 'छुच्छम वेद ( सूक्ष्म वेद ) ' असें म्हणतात ! रामनामाच्या जपानें अनंत जन्माचें पाप नाश पावतें, या जपाशिवाय अन्य कोणत्याहि उपायानें मुक्ति नाहीं असें यांचें मत आहे. जो श्वास व प्रश्वासाबरोबर रामाचा जप करावा असें सांगेल त्यालाच सत्य गुरु असें हे समजतात. त्या सत्यगुरूला परमेश्वराहूनहि मोठा मानतात. त्याच्या मूर्तिचें ध्यान करतात. वेषधारी साधूचें चरण धुऊन, तें पाणी पितात. जेव्हां गुरुपासून चेला दूर जातो तेव्हां तो आपल्या गुरुचा केस व नख आपणाकडे ठेवून घेतो व त्याचें उदक नित्य पितो. हें लोक रामदास व हररामदास यांच्या ग्रंथाची योग्यता वेदाहूनहि अधिक मानतात ! त्या ग्रंथाला प्रदक्षिणा व साष्टांग प्रणाम करतात. स्त्री व पुरुष यांना एकच राम नामाचा जप

करण्यास उपदेश करतात. केवळ नामस्मरणालाच पुण्य मानतात व हे शास्त्राध्ययनामध्यें पाप समजतात. पहा:—

**पंडिताई पाने पडी, ओ पूरब लो पाप ॥ राम राम सुमऱ्या विना, रहग्यो रीतो आप ॥ वेद पुराण पढे पढ गीता, राम भजन विन रह गये रीता ॥**

याप्रमाणें त्यांच्या पुस्तकांतील उपदेश असतो. स्त्रियांना असा उपदेश हे गुरू करतात कीं, त्यांनीं पतीची सेवा करण्यापेक्षां साधूची सेवा करणें पुण्यकारक आहे. वर्णाश्रमव्यवस्थेला हे लोक मानत नाहींत. जर एखादा ब्राह्मण यांच्या पंथाचा नसेल तर तो नीच व जर एक चांडाळ यांच्या पंथाचा असेल तर त्याला उच्च समजतात. हे ईश्वराचा अवतार मानीत नाहींत. पण वर रामचरणाच्या वचनांत **'भगति हेति औतार ही धर ही ॥'** असें वाक्य आलेलें आहे त्यांत असें प्रतिपादन केलें आहे कीं, भक्ति व संतांचें हित यासाठीं केव्हां केव्हां अवतारहि होत असतो. इत्यादि प्रकारचीं पाखंड मतें या देशांत पुष्कळ आहेत, सूज्ञ लोकांनीं यापासून कसें नुकसान होतें हें जाणून एका वैदिकधर्मापासून कशी सर्व प्रकारें उन्नति होते हें ओळखून शुद्ध व वैदिकधर्मांत यावें हें उत्तम.

गोकुलिये म्हणून गोसाव्यामध्यें एक पंथ आहे. ते फार ऐश्वर्यसंपन्न असतात व त्यामुळें त्यांच्यांत अतोनात अनाचार व चैनबाजी असते हा प्रकार गोसाव्यांना तरी शोभत नाहीं. ते समजतात कीं, हें ऐश्वर्य सर्व त्यांना त्यांच्या तपस्वीवृत्तीनें मिळालेलें असतें, पण वास्तविक पहावें तो छलकपटादि कृत्यांनींच त्यांच्या जवळ पैसा जमलेला असतो. धूर्ततेनें भोळ्या लोकांना लुबाडावयाचें हा प्रकार सर्व मतांमध्यें सारखाच दिसतो. या पंथांतील गोसाव्यांची लीला अंगावर रोमांच उभे करणारी आहे. हे गोलोकांत आपली मुक्ति आहे असें समजतात . हें मत तेलंग देशांत प्रथमतः उत्पन्न झालें त्याची हकीकत आहे असें कीं, कोणी लक्ष्मणभट्ट म्हणून एक ब्राह्मण तेलंग देशांत राहत होता. त्याचा विवाह झाल्यानंतर कांहीं कारणामुळें त्यानें मातापिता व स्त्री यांचा त्याग करून, तो काशीला गेला व तेथें त्यानें संन्यास घेतला. संन्यास घेतेवेळीं त्यानें आपल्या गुरूस असें खोटेंच सांगितलें होतें कीं, आपला विवाह मुळींच झालेला नाहीं. दैवयोगानें त्याच्या आईबापांनीं ऐकलें कीं, आपला मुलगा संन्यस्त होऊन काशीमध्यें राहिला आहे, तेव्हां त्याची स्त्री व मातापितरें काशीला गेलीं व ज्यानें त्याला संन्यासदीक्षा दिली होती त्याला शरण जाऊन त्यांनीं सांगितलें कीं, या पुरुषाला तुम्ही कां बरें संन्यास दिलात ! याची ही धर्मपत्नी अजून तरूण आहे नंतर त्या तरूण स्त्रीनें त्याला सांगितलें कीं, जर तुम्ही माझ्या पतीला परत मजजवळ देणार नाहीं तर निदान मला तरी संन्यास देऊन पुनीत करा. तेव्हां त्या गुरूनें त्या लक्ष्मणभट्टांला बोलावुन आणून म्हटलें कीं, तूं फार लबाड बोललास. तुझें लग्न झालेलें असून तूं माझ्याजवळ सांगितलेंस कीं, आपलें लग्न झालेलें नाहीं. आतां तूं संन्यासाश्रम सोडून गृहस्थाश्रम पुनः कर. तो गुरूच्या आज्ञेप्रमाणें संन्यास सोडून पुनः गृहस्थी बनून राहिला. अशा पुरूषानें हें मत सुरू केलें. याप्रमाणें असत्यवचनी पुरुषाकडून हें मत प्रवृत्त झालेलें आहे. जेव्हां हा आपल्या तेलंग देशांत गेला तेव्हां त्याला सर्वांनीं अपंक्त केले, कोणी त्याला जातींत घेईनात, तेव्हां हा चोहोंकडे भटकूं लागला. हिंडतां हिंडतां तो पुनः काशीनगरीजवळील चरणार्गढ किंवा जिला चंपारण्य असें म्हणतात त्या ठिकाणीं येऊन पोंचला. त्या अरण्यांत एक लहान बालक त्याला दिसला. या बालकाला कोणी एकानें तेथें सोडून चारहि बाजूंनीं आग लावून दिली होती. जेव्हां या लक्ष्मणभट्टानें तो बालक पाहिला तेव्हा त्यानें त्याला आपणाजवळ घेतले व त्यासह तो काशीस येऊन राहिला. तेथें त्याचें लालनपालन उत्तमरीतीनें केलें. तो लहानाचा मोठा झाला व त्याचें काशीमध्यें अध्ययन होऊं लागलें इतक्यांत त्याच्या आईबापांचें देहावसान झालें, त्यामुळें तो मुलगा पुनः निराश्रित झाला ! पुढें थोडेंसें अध्ययन झाल्यानंतर तो मुलगा एका विष्णुस्वामीच्या मंदिरांत प्रवेश करून तेथें चेला बनून राहिला. पुढें तेथें कांहीं विशेष मतभेद झाल्यामुळें काशी क्षेत्रांत त्यानें संन्यास घेतला संन्यास घेतल्यानंतर एका जातिबहिष्कृत ब्राह्मणाच्या तरुण मुलीशीं याचा संबंध जडला. त्या ब्राह्मणाने याला सांगितलें कीं, तूं हा आश्रम सोड व या मुलीशीं विवाह कर. त्याप्रमाणें त्यानें केलें. याच्या बापानें जसें केलें होतें तसेंच त्याच्या मुलानेंहि केलें यांत काहीं विशेष नवल नाहीं. या स्त्रीला बरोबर घेऊन जेथें हा पूर्वी चेला बनून होता त्या विष्णुस्वामीच्या मंदिरांत गेला. हा विवाहित असल्यामुळें त्याला तेथें कोणी राहूं दिलें नाहीं. तेथून तडे व्रज देशांत गेला. व्रज देश हा अज्ञानी लोकांचें माहेरघर असल्याचें प्रसिद्धच आहे.

तेथें यानें आपल्या छल व कपटयुक्त युक्तींनीं अनेक प्रकारें आपल्या भ्रमजालामध्यें लोकांना ओढण्यास सुरवात केली. त्यानें असें तेथें प्रसिद्ध केलें कीं, ' मला श्रीकृष्ण भगवान् भेटले व त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, या मर्त्य लोकांमध्यें गोलोकांतून जे कांहीं दैवी जीव आलेले आहेत, त्यांना ब्रह्मज्ञानानें पवित्र करून पुन: गोलोकांत पाठवून दे.' अशा प्रकारच्या खोट्या गोष्टींचा प्रसार करून त्यानें आपलें मत वाढवण्यास प्रारंभ केला. त्यानें ८४ वैष्णव बनवले. आपला उपदेश खलील मन्त्रानें तो करूं लागला, व तोच वेद आहे. असें त्यानें लोकांस भासविलें. तो मंत्र पहा:—

**श्रीकृष्ण: शरणं मम ॥१॥ क्लीं कृष्णाय गोपीजनवल्लभाय स्वाहा ॥२॥** गोपालसहस्रनाम ॥

हे दोन मन्त्र सर्व साधारण आहेत, पण पुढील मन्त्र सर्व समर्पण करण्यासाठीं आहे तो पहा:—

**श्रीकृष्ण शरणं मम ॥ सहस्रपरिवत्सरमितकालजातकृष्णवियोगजनिततापक्लेशानन्ततिरोभावोऽहं भगवते कृष्णाय देहेन्द्रियप्राणांतःकरणतद्धर्मांश्च दारगारपुत्राप्तवित्तेहपराण्यात्मना सहसमर्पयामि, दासोऽहं कृष्ण तवास्मि ॥**

या मंत्राचा उच्चार करून शिष्यांचें शिष्यिणींचें अर्पण करतात. ' क्लीं कृष्णाय०' यांतील 'क्लीं' या मांत्रिक शब्दावरून उघड होतें कीं, हें मतहि एकपरी वाममार्गापैकींच आहें. हें वल्लभमत वाममार्गांतीलच एक भेद आहे. जर असें नसते तर या मतांच्या अनुयायांमध्यें गोसाव्यांना किंवा त्यांच्या गुरूला आपल्या स्त्रिया समर्पण करण्याची चाल कधींच आली नसती. या मतांतील गोसावी प्राय: स्त्रीसंसर्ग करणारेच असतात त्याचें तरी कारण हेंच. हे लोक श्रीकृष्णाला 'गोपीजनवल्लभ ' म्हणतात, पण श्रीकृष्ण जसा गोपीला प्रिय होता तसाच तो इतर भक्तांलाही प्रिय होता. जो स्त्रीभोगामध्येंहि फसलेला असतो तोच स्त्रियांना प्रिय असतो हे उघड आहे. असा स्त्रैण श्रीकृष्ण होता काय ? नाहीं महाभारतावरून तर तो मोठा योगी होता असें ठरत आहे. मग हे त्याला स्त्रैण कां बरें बनवितात ? त्याच्या वियोगाचें दु:ख सहस्रपरिवत्सरपर्यंत होत आहे असें म्हणणेंहि व्यर्थ आहे कारण वल्लभ व त्याचे शिष्य कांहीं सर्वज्ञ नव्हते. काय श्रीकृष्णाचा वियोग फक्त हजार वर्षांचाच आहे ! जर श्रीकृष्ण खरोखर दैवी जीवांवर अनुकंपा करणारा असता तर वल्लभाच्या जन्माच्या पूर्वीच्या लोकांच्या उद्धाराची व्यवस्था केली असली पाहिजे. तो दैवी जीवांवर उपकार करणारा केवळ वल्लभवावर अवलंबून राहील असें संभवनीय वाटत नाहीं. वरील मंत्रामध्यें 'ताप व क्लेश' हे दोन शब्द पर्यायवाची आहेत. त्या दोहोंचा तेथें काय उपयोग. त्यांतील कोणत्यातरी एका शब्दानें काम भागलें असतें. तसेंच मंत्रामध्यें 'अनन्त' शब्दाचा पाठ करावयाचा असेल तर 'सहस्र' शब्द गाळला पाहिजे. जर दु:खें अनंत असलीं तर तीं सहस्र वर्षांत परिमित कशीं होऊं शकतील ? बरें तीं दु:खें अनंतकालपर्यंत राहणारीं अनंत आहेत असें जर मानावयाचें असेल तर त्याचा नाश होऊं शकणार नाहीं. मग तेथें वल्लभाचे अनुयायी बनण्याचें कांहींच कारण नाहीं. आतां दुसरी गोष्ट अशी कीं, श्रीकृष्णाला देहेंद्रिय, प्राणांत:करणादिकांचें अर्पण करण्याची काय आवश्यकता आहे ? त्याचप्रमाणें त्याला स्थान, धन, स्त्रीपुत्र यांचें अर्पण कशासाठीं करावयाचें ? श्रीकृष्ण हा आप्तकाम व पूर्ण संतुष्ट योगेश्वर असल्यामुळें त्याला या गोष्टींची काय बरें आवश्यकता आहे.? शिवाय त्याला देहादि सर्व अर्पण करणें ही कल्पनाच चमत्कारिक आहे. कारण या नखशिखांत देहांमध्यें मलमूत्रादि दुर्गंधयुक्त पदार्थ भरलेले आहेत ते श्रीकृष्णाला अर्पण करण्यांत त्याला काय लाभ होणार ? शरीराकडून नेहमीं पापपुण्यकर्में होतच असतात. तेव्हां हें शरीर श्रीकृष्णाला अर्पण करण्यानें तोच पापपुण्याचा मालक होऊन आपण मुक्त होऊं ही स्वार्थाची कोटी वा अर्पणाच्या कृत्यांत तर नसेल ना !वा: कर्में करावीं आपण व त्याचें श्रीकृष्णानें भोगावें फल ! शरीरांतील मलमूत्र श्रीकृष्णाला अर्पण करण्यांत कोणताहि धर्म नाहीं,जर तें अर्पण करावयाचें असेल तर तें सध्यांच्या गोसाव्यांना अर्पण करावें. गोड स्वत: खाऊन कडूचा तिरस्कार करणें हाच गोसाव्यांचा सध्यांचा धर्म आहे, हे म्हणतात कीं, गोसाव्यांला चांगलेच पदार्थ द्यावे. ते दुसऱ्या कोणालाहि देऊं नयेत ! या सर्व गोसाव्यांचा हा खेळ सर्वार्थ साधून चैन करण्यासाठीं व दुसऱ्याचे धनादि पदार्थ असतील ते उपटून वेदोक्त कर्मांचा नाश करण्यासाठींच आहे हें उघड आहे. असें जर नसतें तर असे स्त्रीविषयक अनाचार यांच्या अनुयायांत भयंकरपणानें माजलेच नसते. पहा या वल्लभमतांतील गम्मत:—

श्रावणस्यामले पक्ष एकादश्यां महानिशि ।। साक्षाद्भगवता प्रोक्तं तदक्षरश उच्यते ।१।
ब्रह्मसंबंधकरणात्सर्वेषां देहजीवयोः ।। सर्वदोषनिवृत्तिर्हि दोषाः पंचविधाः स्मृताः ।।२।।
सहजा देशकालोत्था लोकवेदनिरूपिताः संयोगजाः स्पर्शजाश्च न मंतव्याः कदाचन ।।३।।
अन्यथा सर्वदोषाणां न निवृत्तिः कथंचन ।। असमर्पितवस्तूनां तस्माद्वर्ज्जनमाचरेत् ।४।
निवेदिभिः समर्प्यैव सर्वं कुर्यादिति स्थितिः ।। न मतं देवदेवस्य स्वामिभुक्तिसमर्पणम् ।।५।।
तस्मादादौ सर्वकार्ये सर्ववस्तुसमर्पणम् ।। दत्तापहारवचनं तथा च सफलं हरेः ।।६।।
न ग्राह्यमिति वाक्यं हि भिन्नमार्गपरं मतम् ।। सेवकानां यथा लोके व्यवहारः प्रसिध्यति ।।७।।
तथा कार्यं समर्प्यैव सर्वेषां ब्रह्मता ततः ।। गंगात्वे गुणदोषाणां गुणदोषादिवर्णनम् ।।८।।

हे श्लोक गोसाव्यांच्या सिद्धांतरहस्यादि ग्रंथांमध्यें आहेत. हेच या मताचे मूलभूत श्लोक होत. यांना कोणी असें विचरावें कीं, जो श्रीकृष्ण निजधामस्थ होऊन पांच हजार वर्षें झालीं, तो श्रावणाच्या एकादशीच्या दिवशीं मध्यरात्रीला वल्लभाला कसा हो दिसला ? ।। १ ।। हे दुसऱ्या श्लोकांत म्हणतात की, जो गोसाव्यांचा चेला बनतो व त्याला सर्वस्व समर्पण करतो, त्याच्या शरीरिक व जीवसंबंधीं सर्व दोषांची निवृत्ति होते. हें वल्लभसंप्रदायांचें म्हणणें मूर्खांच्या अज्ञानाच्या सहाय्यानें स्वतः ची चैन उडवणें आहे. हे लोक याच मताच्या आधारानें मूर्खांना फसवून आपल्या भ्रमजालांत ओढून घेत असतात. जर शारीरिक व आत्मिक दोष खरोखरच नाश पावले असते, तर या संप्रदायांतील लोक सुखी राहिले असते पण तसा प्रकार आहे कोठें ? या संप्रदायांत दरिद्री व दुःखी लोक अनेक आहेत, ते कां ? हे लोक दोषांचे पांच प्रकार करीत असतात, ते असेः- ।। २ ।। ( १ ) जो कामक्रोधापासून दोष उत्पन्न होतो तो सहज दोष होय; (२) देशकालविशेषांमुळें जीं पापें होतात तो दुसरा दोष; (३) भक्ष्याभक्ष्य व वेदानें प्रतिपादन केलेला मिथ्याभाषणादि दोष हा तिसरा होय; (४) वाईट संगतीनें होणारे चौर्य जारकर्मादि दोष हा चौथा होय; (५) अस्पृशींयांना स्पर्श करणें, हा पांचवा दोष होय. तसेंच माता, भगिनी, कन्या, कुलवधू, पुत्रवधू, गुरुपत्नी, यांच्याशीं संग करणें या पांच प्रकारच्या दोषांला या गोसावी मतांमध्यें मुळींच दोष नाहीं. मन मानेल तसा आचार विचार करण्यास कांहीं हरकत नाहीं. हें यांचे नैतिक आचरण असतें. अशा लोकांची धार्मिक उन्नति होण्याची आशाच नको ! ।। ३ ।। हे म्हणतात कीं, अन्य कोणताहि उपाय दोषांच्या निवृत्तीला नाहीं, म्हणून गोसावी मत स्वीकारून त्यांच्या चेल्यानें आपलें सर्वस्व गुरूला अर्पावें व दोषमुक्त व्हावें. या त्यांच्या सांगण्याप्रमाणेंच अजूनहि या मताचें लोक आपली मुलगी, स्त्री, पुत्रवधू व धनादि पदार्थ यांचें अर्पण गुरूला करतात ! या वल्लभमतामध्यें जसें इतर पदार्थं समर्पण करतात त्याच प्रमाणें स्वतः ची स्त्रीहि अर्पण करतात. इतकेंच नव्हे तर त्या स्त्रीचा गुरूनें उपभोग घेतल्यावांचून आपण तिला स्पर्श करणें पाप आहे असें समजतात ! अशा रीतीनें धर्माच्या नांवाखालीं हें दुराचरण करीत असतात ! ।। ४ ।। म्हणून यांचे सर्व चेले प्रत्येक वस्तु प्रथमतः गुरूला अर्पून त्यानें तिचा उपभोग घेतल्यावरच तिचा हे उपभोग घेत असतात. कारण भोग घेतल्यानंतर त्याचें समर्पण होऊं शकत नाहीं असें यांचें मत आहे. ।। ५ ।। म्हणून सर्व कार्यांमध्यें सर्व वस्तूंचें आधीं समर्पण करावें असें यांचें मत आहे. प्रथमतः भार्यादि पदार्थ गोसाव्यांला समर्पण करून मग त्यांचा स्वतः उपभोग घ्यावा. त्याचप्रमाणें हरीला सर्व पदार्थ अर्पून मग आपण ते स्वीकारावें. ।। ६ ।। या मताशिवाय अन्यमताचा उपदेश कधींहि चेल्याने ऐकूं नये व ऐकल्यास त्या उपदेशाचें ग्रहण करूं नये, हा यांचा व्यवहार प्रसिद्ध आहे. ।। ७ ।। त्याचप्रमाणें सर्व वस्तु अर्पण करून सर्वांमध्यें ब्रह्मबुद्धि धारण करावी. असें केलें असतां ज्याप्रमाणें गंगेच्या पाण्यांत दुसरें जल पूर्णपणें मिसळून जातें त्याचप्रमाणें हा शिष्य ब्रह्मांत मिळतो. गोसाव्यांच्या मतांत सर्व उत्तम गुण आहेत व अन्यमतांत सर्व दोष आहेत म्हणून या गोसावी मताच्या गुणांचें वर्णन निरंतर करावें. ।।८।। वाचकांनीं या गोसाव्यांच्या मताचा विचार करावा व पहावें कीं, या मतानें कसा या देशामध्यें अनाचार माजविला आहे. (प्र०) हे गोसावी लोक ब्रह्माचें एक लक्षणहि जाणत नाहींत. मग हे आपल्या शिष्यांना

ब्रह्यामध्यें कसें घेऊन जाणार ? (या प्रश्नावर गोसाव्यांचें **उत्तर**) **अहो** ! आम्हीच ब्रह्म आहों. म्हणून जे लोक आमची संगति धरतात ते सहजच ब्रह्मामध्यें लीन होतात. "(प्र०) तुमच्यामध्यें तर कोणताच ब्रह्माचा गुण दिसत नाहीं. आम्हाला असें वाटतें कीं, तुम्ही शिष्यांचें सर्वस्व हरण करून स्वतः ची चैन करण्याच्या उद्देशानें हें ढोंग माजविलेलें आहे. तुम्ही तुमच्या शिष्यांच्या स्त्रिया व धनादि पदार्थ यांचा उपभोग घेऊन त्या पुनीत झाल्या असें समजतां. पण तुमच्या स्त्रिया व कन्या असमर्पितच राहिल्यांमुळें कशा बरें पुनीत होतात ? तुमची आईहि असमर्पित होती. जर तुमच्या मताप्रमाणें असमर्पित स्त्री अशुद्ध तर तुमची आईहि अशुद्धच व तिच्या पोटी येणारे तुम्हीहि अशुद्धच होय. मग तुमची तरी शुद्धता कशानें होणार ? तुम्ही आपली स्त्री, पुत्री किंवा भगिनी शुद्ध करण्यासाठीं कोणाला देत असतां काय ? जर नाहीं तर तुमच्या शिष्यांच्या स्त्रिया तुम्ही कां घेतां ? (उ०) हे तुमचे प्रश्न नास्तिकपणाचें आहेत. (प्र०) हें आमच्या प्रश्नाला उत्तर नव्हे. तुमचें आचरण धार्मिक नाहीं, अनीतीचें आहे. याकरतां तें तुम्ही सोडलें पाहिजे. आजपर्यंत जें केलेंत. तें केलेंत. पण आतां तरी या दुष्ट वर्तनापासून दूर रहा व सदाचरणी बना. वेदोक्त ईश्वरप्रणीत धर्माचें अवलंबन करून धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारहि पुरुषार्थ साधून आपल्या जन्माचें सार्थक करा. जें तुम्ही करीत आहां तें नरकाचें साधन आहे, म्हणून तें करणें योग्य नव्हे.

हे गोसावी लोक आपल्या या पंथाला ' पुष्टिमार्ग ' असें म्हणत असतात, याचें कारण या मार्गांत खावें, प्यावें, आनंद करावा व स्त्रियांचा उपभोग घ्यावा हेंच काय तें कर्तव्य आहे. पण यांचे धर्मगुरु प्रायः भगंदरादि भयंकर रोगांनीं ग्रस्त होऊन प्रायः कुजून मरत असतात. हें दुर्वर्तनाचें फल त्यांच्या डोळयासमोर त्यांना मिळत असतांहि हे कसें त्याकडे दुर्लक्ष करतात नकळे. वास्तविक पाहिलें असतां हा पुष्टिमार्ग नसून कुष्टिमार्ग आहे. ज्याप्रमाणें कुष्टी माणसाचें शरीर कुजून, त्यांतील सप्तधातु क्षीण होऊन तो शेवटीं विकळ होऊन मरण पावतो, त्याचप्रमाणें या पंथांतील माणसांची व विशेषतः यांच्या गुरूंची स्थिति होते. हा खरा नरकाचा मार्ग आहे. यासाठीं सर्वांनीं जपून वागावें व या मार्गाकडे केव्हांहि वळूं नये कारण या मार्गानें खात्रीनें दुःख प्राप्त होतें. दुःख हाच नरक व सुख हाच स्वर्ग होय. हे गोसावी लोक याप्रमाणें मिथ्या आचारांचा प्रसार करून भोळया लोकांस आपल्या कबजांत घेऊन, त्यांस भुलथापी देऊन, आपणच साक्षात् श्रीकृष्ण आहों असें त्यांस भासवून, आपण चैन करतात व दुसऱ्यांस लुबाडतात. हे लोकांना असें सांगत असतात कीं, जेवढे दैवी जीव गोलोकांतून येथें आलेले आहेत, त्यांच्या उद्धारासाठीं श्रीकृष्णानें आमच्या रूपानें जन्म घेतलेला आहे. जर आमचा उपदेश लोकांनी ऐकला नाहीं तर त्यांना गोलोकाची प्राप्ति होणार नाहीं व त्या गोलोकांत श्रीकृष्ण हा एकच पुरुष व अन्य सर्व जीव स्त्रिया आहेत, त्या त्यांच्या विलासाचा आनंद,जे पुरुष आमचे शिष्य बनणार नाहींत त्यांस, मिळणार नाहीं. हें यांचें मत आहे ! वाः भले शाबास गोसावीबुवा ! गोसाव्यांचे जेवढे चेले आहेत ते सर्व गोपी होणार तर मग ! व त्या कृष्णाच्या पाठीस इतक्या स्त्रिया लागणार ? ज्याला दोन स्त्रिया असतात त्याची कोण त्रेधा होते. मग याला या सर्व स्त्रिया होऊन पाठीमागें लागल्या तर किती त्रास होईल कोण जाणें ? श्रीकृष्णाला फार सामर्थ्य आहे, कोट्यावधि स्त्रिया गोलोकांत त्याला मिळाल्या; तथापि तो सर्वांस प्रसन्न ठेवतो असें कित्येक लोक म्हणतील. पण त्यांनी याचा विच[illegible] कीं, तेथेंहि त्याची या स्त्रियांशिवाय अर्धांगी आहे ना ? मग या स्त्रियांमध्यें व तिच्यामध्यें व तंटेभांडणें होतील[illegible] दोघांनाहि खुष करणें त्यास कठीण होईल. शिवाय गोलोकांतील स्त्रियाहि येथील स्त्रियापेक्षां जास्त कामेच्छा बाळगणाऱ्या असणार. या लोकांतहि पुरुषापेक्षां स्त्रियांना काम विकार जास्त असतो; मग तेथेंहि तोच प्रकार असला तर त्यांत नवल काय ? तात्पर्य त्याला कोट्यावधि कामुक स्त्रिांच्या भोगानें जास्त सुख होईल ही कल्पनाच मुळीं भ्रामक आहे. परमेश्वराला स्त्रियांच्या उपभोगाची इच्छा आहे ही गोष्ट कोण विचारी पुरुष मानणार ! खरें पाहिलें असतां कांहीं कामुक पुरुषांनीं हा मार्ग काढला आहे व आपल्या भ्रमजालांमध्यें लोकांना ओढलें आहे. यांच्या या स्वर्गलोक म्हणण्यापेक्षां व्यभिचारलोक म्हणणें जास्त शोभेल. छिः, छिः, छिः ! यांच्या या लोकापेक्षां आमचा हा मर्त्यलोक जास्त नीतिसंपन्न आहे यांत शंका नाहीं. या मतांतील गुरु येथें आपण श्रीकृष्णच प्रत्यक्ष आहों असें म्हणतात व अनेक स्त्रियांशीं कुकर्म करून भगंदरादि रोगांनीं पीडित होऊन

अत्यंत त्रस्त होत असतात, अशीच स्थिति गोलोकांतील प्रत्यक्ष श्रीकृष्णाची होत असेल. जी अवतारांची स्थिति तीच मूळस्वरूपाची. येथें अवताराला थोड्याशा स्त्रिया मिळतात, तर तेथें त्याला अनंत मिळतात. असो. तात्पर्य या यांच्या मतानें परमेश्वरालाहि व्यभिचारी बनविले आहे, तेव्हां यांच्या नीचपणाची कमाल आहे म्हणावयाचें. मर्त्यलोकांत लीलावतार धारण करीत असल्यामुळें रोगादि दोष होत असतात तसा प्रकार गोलोकांत नाहीं. अशी कोणी कल्पना करून समाधान मानून घेऊं शकतील. पण ही त्यांची चूक आहे. कारण 'भोगे रोगभयं' जेथें भोग आहे तेथें अवश्य रोग असलाच पाहिजे. बरें तेंहि असो. तेथें श्रीकृष्णाच्या कोट्यावधि स्त्रिया आहेत असें तुम्ही म्हणतां या स्त्रियांना कांहीं संतति होते कीं नाहीं ? होत असेल तर मुलीच होतात कीं मुलगेहि होतात ? जर कांहीं मुलगे व कांहीं मुली होत असतील तर त्यांचा विवाह कोणाशीं होणार ? किंवा मुलीच होत असल्या तरी यांचें लग्न कोणाशीं करावयाचें ? भावावहिणींचें व बापलेकांचें लग्न करणार कीं काय ? बरें त्यांस संतान होतच नसेल असें म्हणाल तर श्रीकृष्ण नपुंसक आहे कीं तेथील सर्व स्त्रिया वंध्या आहेत याचें उत्तर द्यावें लागेल ! बाबानों, हें गोकुळ नव्हे तर हा मुसलमानी बादशहांच्या बिबी लोकांच्या सैन्याचा प्रकार झाला ! आतां हे गोसावी लोक आपल्या शिष्य व शिष्यिणीकडून तन, मन, धन आपणास अर्पण करून घेतात. पण हेंहि होणें अशक्य आहे. कारण स्त्रीचा विवाह होतांच तिचें शरीर पतीला अर्पण झालेलें असते. तेव्हां ती या गुरूला पुन: कसें अर्पूं शकेल ? त्याचप्रमाणें मनहि पतीवरच ठेवणें हा तिचा धर्म आहे. तेव्हां तें तरी कसें अर्पण करूं शकेल ? एकदां तन, मन पतीला अर्पण केल्यानंतर तें तिनें पुन: घेऊन गुरूला अर्पण करणें हा अधर्म आहे. त्याचप्रमाणें जिला तन व मन स्वत:ला नाहीं ती धन तरी कसें या गोसाव्याला अर्पण करूं शकेल ? तात्पर्य या पंथांतील तन, मन, धन अर्पण्याचा प्रकारहि अधर्माचाच आहे यांत शंका नाहीं. या गोसाव्यांचें असें मत दिसतें कीं, मिळवावें चेल्यानें व चैन करावी आपण ! या अधर्मप्रकारामुळेंच हे सर्व वल्लभसंप्रदायी गोसावी मूळचे तेलंगी असतांहि ते सर्व सध्यां जातिबहिष्कृत झालेले आहेत. यांना कोणीहि मूळ जातीत घेत नाहींत व जो जो यांच्याशीं व्यवहार करतो तोहि बहिष्कृत केला जातो. तात्पर्य हा वल्लभसंप्रदाय धर्मबाह्य व पतित असल्यामुळें हे लोक विद्याहीन, भ्रष्ट व प्रमादि होत असतात. हे गोसावी इतके मूर्ख असतात कीं, यांना प्राय: कोणत्याच शास्त्राचें अध्ययन नसतें. जेव्हां हे गोसावी गुरु आपल्या चेल्यांच्या घरीं पादपूजेला जातात, तेव्हां ते कांहीं बोलत नाहींत. कारण त्यांना माहीत असतें कीं आपण कांहीं बोलणें म्हणजे आपलें अज्ञान प्रदर्शित करण्यासारखें आहे. 'मूर्खाणां बलं मौनं' असें सुभाषित आहे त्याचप्रमाणें यांचें आचरण असतें. यांचें काम तेथें फक्त इतकेंच असतें कीं, स्त्रियांकडे नीट निरखून पाहणें ! या गोसाव्यानें आपल्या स्त्रीकडे जितकें पहावें तितकें त्या पतीला समाधान वाटत असतें. घरांतील पति, भाऊ, बाप, आई वगैरे सर्व या गोसाव्याचा हा अनुग्रह आहे असें समजतात ! किती बरें ही अनीति व किती हा अधर्म ! याला कोणीतरी धर्म समजेल काय ? काय ही स्थिति ? घरांतील सर्व स्त्रिया येऊन गोसाव्याच्या पायांची पूजा करतात. या सर्व कृत्याला घरांतील थोर लोकांची अनुज्ञा असतेच ! या जातीपैकीं जे कोणी खरे धर्माभिमानी असतात व याच्या कह्यांत सांपडत नाहींत त्यांच्या घरांतील स्त्रियांना हे गुरु कुंटिणी वगैरे पाठवून वश करण्यासहि मागें पुढें पहात नाहींत. असें दूतीचें काम करणारे त्यांच्याजवळ व आसपास फार राहात असतात. ज्याप्रमाणें यांच्या ह्या लीला आहेत त्याप्रमाणें यांच्या दक्षिणा मागण्याच्याहि लीला अपूर्व आहेत. हे म्हणतात कीं, "हे यजमानाजी लाओ भेट गोसाईजीकी, बहूजीकी, लालजीकी, बेटीजीकी, मुखियाजीकी, बाहरियाजीकी, गवैयाजीकी और ठाकूरजीकी;" या सात नांवावर हे यथेच्छ स्वार्थ साधतात. जेव्हां कोणी एखादा यांचा शिष्य मरूं लागतो तेव्हां त्याच्या छातीवर पाय ठेवून त्याच्याकडून जेवढें मिळेल तेवढें गट्ट करण्यास मागें पुढें पहात नाहींत. हीं अशीं दुष्ट कृत्यें करणें हें फारच नीचपणाचें कृत्य आहे. जेव्हां यांच्या चेल्यांचा विवाह होतो तेव्हां हेच दुराचारी लोक नवरानवरीचें पाणिग्रहण करण्यासाठीं बोलाविले जातात. यांच्यांत कित्येकांची इतकी मूढ भक्ति असते कीं, ते यांनीं स्नान केल्यास पाण्याचें आचमन करून आपण पवित्र झालों असें समजतात. यांचें केशरी स्नान म्हणून होत असतें. चेल्यांच्या स्त्रिया यांच्या आंगाला केशरी उटणें लावतात

व त्याच प्राय: यांना सर्वांग चोळून स्नान घालतात; केव्हां केव्हां स्त्रिपुरुष मिळून स्नान घालतात. जेव्हां गोसाव्याचें स्नान संपून तो पितांबर नेसून आपल्या खडावांवर आरूढ होतो तेव्हां त्याचें धोतर पुन: त्या पाण्यांत धुऊन त्यांतच पिळतात व तें (आंगाच्या व धोतराच्या मळानें युक्त झालेलें)पाणी कोणी पितात व कोणी त्याचें आचमन करतात ! नंतर त्या गुरूला अनेक मसाल्यानें युक्त असलेला विडा देतात, तो त्यानें चावून घेतल्यांनंतर त्याच्या तोंडाजवळ एक शिष्य रुप्याचें भांडें धरतो. त्यांत तो गुरु आपल्या तोंडातील अर्धा चावलेला विडा थुंकतो, त्याचे सर्व चेले तो विडा महान् प्रसाद आहे असें समजून भक्षण करतात व आपणास कृतकृत्य समजतात ! वाचकांनीं विचार करावा कीं हे कोणत्या कोटींतील लोक असावे. मूर्खपणा व अनाचार यांची येथें सीमा झालेली आहे. समर्पण करण्याचा व उच्छिष्टभक्षणाला प्रसाद समजण्याचा प्रकार तर सर्वांवर कळसच आहे. यांपैकीं कित्येक लोक आपणास फार सोंवळे असें समजतात. वैष्णवांशिवाय दुसऱ्याचे हातचें हे खात नाहींत व कित्येक तर वैष्णवांच्याहि हातचें खात नाहींत. रवा, गूळ, साखर, तूप वगैरे पदार्थांशिवाय इतर पदार्थांस इतरांचा स्पर्श झाला तर धुऊन घेतात. गरीब बिचारे ! साखरसुद्धां त्यांनीं धुऊन घेतली असती. पण ती धुतां येत नाहीं व धुतली तर नाहींशी होते म्हणून धूत नाहींत इतकेंच ! हे यांचे गुरु लोकांस सांगतात कीं, आपण ठाकूरजीच्या रंगरागभोगांमध्यें धन फार खर्च करतों, पण जर कोणी नीट लक्ष्यपूर्वक पाहील तर त्यांस असें आढळून येईल कीं, हे आपल्या भोगासाठींच सर्व खर्च करीत असतात. कैक प्रसंगीं तर हे फारच अनर्थ व अत्याचार करतात. होळीच्या सनामध्यें तर हे पिचकाऱ्या भरभरून स्त्रियांच्या गुप्त इंद्रियावर मारतात व हंसतात ! त्याचप्रमाणें निषिद्ध कर्महि यांतील ब्राह्मण म्हणविणारे करीत असतात ! हे लोक आपल्या नोकरांस द्रव्यद्वारा पगार देत नाहींत;तर सवड साधेल त्याप्रमाणें त्यांना रोटी, डाळ, भात, कढी, शाक, लाडू, इतर पक्कानें देतात व हे नोकर लोक तीं पक्वानें नेऊन ठराविक दुकानांवर विकतात व आपण पैसे करतात ! हे गोसावी स्वत:च पक्वानें विकते तर तेच एकटे दोषी झाले असते. पण तीं विकणें दुसऱ्याला भाग पाडून त्यांच्याकडून हे दुष्ट लोक तीं कामें करवितात हें मोठें दुर्भाग्य आहे. स्वत: पातकांमध्यें बुडून दुसऱ्यांस बुडविणारे हे लोक आहेत. आंधळे लोक या आंधळ्या गुरूंचा आश्रय करून भवसागरांतून सुखरूप जाण्याची इच्छा करतात. पण ते आपल्या गुरूसह खड्डयात पडतात. अशा रीतीनें हा आर्यवर्ग अधार्मिक मतांनीं गुरफटला गेला आहे व त्यामुळें दिवसानुदिवस अधोगतीला जात आहे.

**नारायणमतपरीक्षण**–'यादृशी शीतला देवी तादृशो वाहन: खर: ।' या मतप्रमाणेंच जसें वर सांगितलेलें वल्लभमत तसेंच हें नारायणमतहि अधार्मिकच आहे. पहा, अयोध्येजवळच्या एका लहानशा गांवीं सहजानंद नामक एक गृहस्थ ब्रह्मचारीवेषानें गुजराथ, काठेवाड, कच्छभूज वगैरे देशांमध्यें पुष्कळ फिरला. तेव्हां त्याला वाटलें कीं, या देशांतील लोक बरेच मूर्ख व अत्यंत भोळे आहेत; त्यांना जसें नाचवावें तसें हे नाचूं शकतील. असे असे पाहून त्यानें दोन चार शिष्य बनविले व त्यांनीं चोहोंकडे प्रसिद्ध केलें कीं, सहजानंद हा प्रत्यक्ष नारायणाचा अवतार आहे. तो फार सिद्ध असून चतुर्भुज मूर्ति धारण करून भक्तांना साक्षात् दर्शन देतो. एकदां असें झालें कीं, त्या प्रांतांत दादा खाचर म्हणून एक जमीनदार होता. त्याला त्याच्या शिष्यांनीं सांगितलें कीं, तुला जर चतुर्भुज नारायणाचें दर्शन घ्यावयाचें असेल तर आम्ही सहजानंदाला प्रार्थून तुला दर्शन करवून देतों. त्यानें उत्तम आहे असें सांगितलें. ठरलेल्या वेळी एका अंधाराच्या खोलीमध्यें मुकुट धारण करून शंख चक्र हातांत घेऊन सहजानंद बसला व त्याच्या पाठीमागें दुसरा शिष्य गदा व पद्म धरून बसला. हे दोघे अशा बेतानें बसले कीं, पाहणाराला चतुर्भुज मूर्ति दिसावी. दादा खाचर बिचारा भोळा माणूस होता. त्याला शिष्यांनीं सांगितलें कीं; तूं आंत जाशील तेव्हां फक्त एकदांच डोळे उघडून मूर्ति पहावीस. जास्त वेळ पाहशील तर नारायण कोपायमान होऊन तुझें भस्म करील (पण यावेळीं या चेल्यांच्या मनांत असें होतें कीं, जर यानें जास्त वेळ पाहिलें तर आपलें कपट बाहेर येईल.) ज्या अंधार कोठडीमध्यें सहजानंद व त्याचा शिष्य शंखचक्रांकित होऊन कलाबतू व रेशमी कपडे धारण करून बसला होता. त्या खोलीमध्यें या शिष्यांनी दादा खाचराला नेलें. त्यांनी बरोबर एक बारीकसा कंदील नेलेला होता. त्याच्या उजेडांत दादा खाचरानें त्या चतुर्भुज मूर्तीचें दर्शन घेतलें. शिष्यांनीं दिवा बाजूला केला व सर्वांनीं लोटांगणें घातलीं.

तेव्हां आंतून शब्द झाला कीं, ' तूं धन्य आहेस, तूं महाराजांचा शिष्य होऊन रहा . ' ही आकाशवाणी समजून दादा खाचर खूष झाला व त्या आज्ञेला त्यानें रुकार दिला. जेव्हां तेथून निघून तो दुसऱ्या दालनांत गेला तेव्हां तेथें त्याला सहजानंद गादीवर बसला आहे असें आढळलें ( हा कपडे बदलून दुसऱ्या मार्गानें तेथें येऊन पूर्वीच बसला होता. ) तेव्हां तर त्या भोळया दादाच्या मनाची खात्रीच झाली. इतक्यांत चेले म्हणाले कीं, आतां हें दुसरें स्वरूप धारण करून येथें येऊन बसले आहेत, असे हे सिद्ध आहेत. तात्पर्य अशा प्रकारे तो दादा खाचर यांच्या जाळयांत फसला गेला. एवढा मोठा जमीनदार त्याचा शिष्य झाल्याबरोबर त्याच्या मताचा जोरानें प्रसार होऊं लागला. त्याच्या जमीनदारीमध्यें सहजानंदानें आपलें मुख्य स्थान करून तेथून तो इकडे तिकडे भ्रमण करीत असे. सर्वांना उपदेश करीत असे व पुष्कळांना साधु बनवीत असे. केव्हां केव्हां दुसऱ्या एखाद्या साधूच्या गळयांतील शिरा दाबून त्याला मूर्च्छित करीत असे व लोकांना सांगे कीं, आपण याची समाधि लावली आहे. अशी अनेक प्रकारें धूर्तता करून त्यानें काठेवाडांतील भोळया लोकांस आपल्या भ्रमजालांत ओढलें. याप्रमाणें आपल्या मताचा प्रसार करून जेव्हां तो मेला तेव्हां त्याच्या शिष्यांनी बरेंच पाखंड माजविलें. असो. याप्रमाणें याचें मत पसरलें गेलें. याच्या मताप्रमाणें एक चोराची गोष्ट आहे ती अशी:—'एक चोर होता, त्याला चोरी करतांना पकडलें. त्याच्यावर शाबिती होऊन न्यायाधिशानें त्याचें नाक व कान कापून टाकण्याची शिक्षा दिली. जेव्हां त्याचें नाक व कान कापले गेले तेव्हां तो न रडतां आनंदानें नाचूं लागला; हसूं लागला. हें पाहून लोकांस आश्चर्य वाटलें, व पुढें लिहिल्याप्रमाणें त्याचा व लोकांचा संवाद झाला. ( **लोक** म्हणाले ) तूं कां हंसतोस ? ( **चोर** उत्तर देतो ) तसाच कांहीं आनंदाचा प्रकार आहे. ( लोक० ) असा कोणता आनंद आहे ? ( **चोर०** ) फारच आश्चर्याची गोष्ट आहे, असा आनंद आपणास आजपर्यंत मिळाला नव्हता. ( **लो०** ) पण तें काय आहे ? ( **चो०** ) माझयापुढें साक्षात् चतुर्भुज नारायणाची मूर्ति दिसत आहे. ती पाहून मला फारच आनंद होत आहे. मी फार भग्यवान् आहे कीं, आज मला साक्षात् दर्शन झालें. ( **लो०**) मग तें आम्हांला कसें होईल ! ( **चो०** ) तुम्ही नाक कापाल तर तत्क्षणींच दर्शन होईल. नाकाचा पडदा मध्यें असल्यामुळें तुम्हांस दर्शन होत नाही. हें ऐकल्याबरोबर त्या मंडळींतील एकानें आपलें नाक कापा व मला नारायणाचें दर्शन करवा असें त्यास म्टहलें. त्याप्रमाणें त्यानें त्याचें नाक कापलें व त्याच्या कानांत हळूच म्हटलें कीं, बाबारे ! आतां तुझें नाक येणार नाहीं. जर तूं माझ्याप्रमाणें नाचशील तर तुझी स्तुति होईल. नाहीं तर हे सर्व लोक तुझा व माझा उपहास करतील. हें ऐकतांच त्याच्या ध्यानांत सर्व वर्म आलें व तोहि त्याच्याप्रमाणेंच आनंदानें नांचूं लागला व लोकांस सांगूं लागला कीं आपणास दर्शन झालें. अशा प्रकारे हजारों लोक त्याचें अनुयायी बनले व सर्वांनीं आपला 'नारायणदर्शी' पंथ आहे असें सांगितलें. तेथील मूर्ख राजाला हा वृत्तांत समजला. तेव्हां त्यानेंहि या नारायणदर्शीचें दर्शन घेऊन त्याला सर्व वृत्तांत विचारला; तेव्हां तो म्हणाला कीं, हे राजा ! आम्हांला नाक कापल्या वेळेपासून साक्षात् भगवान् नारायणाचें दर्शन होत आहे. यांत फार आनंद आहे. जर तुला दर्शन घ्यावयाचें असेल तर तूंहि आपलें नाक कापून घे. हें ऐकतांच राजाहि तसें करण्यास तयार झाला. त्यानें आपल्या आश्रित जोशीबुवाला नाक कापण्यास कोणता मुहूर्त उत्तम आहे म्हणून विचारिलें. त्यानें आपलें पंचांग काढून दशमीच्या दिवशीं प्रातःकाळीं आठ वाजतां उत्तम मुहूर्त आहे असें सांगितलें. जोशीबुवाच्या पोतड्यांत सर्व कांहीं करण्यास मुहूर्त असतातच; मग तो नाक कापावयास मिळाला तर त्यांत काय आश्चर्य ! असो. याप्रमाणें राजा त्या नाककाप्यांना वश झाल्यामुळें त्या सर्वांना शिधे पोंचूं लागले व त्यांची खाण्यापिण्याची चैन झाली. हा सर्व वृत्तांत त्याच्या एका घरंदाज वृद्ध दिवाणाला समजला व त्याला फार वाईंलें वाटलें हा ९० वर्षांचा वृद्ध होता व फार अनुभवशीर व विचारी होता. याचा नातु सध्यां दिवाणाचें काम पहात होता. त्यानें आपल्या आजाला हा वृत्तांत सांगितला व विनविलें कीं, कांहीं तरी तोड काढून या वेडांतून राजाला सोडावा. त्यानें ठीक आहे असें सांगितलें व आपली राजाची गांठ घालून देण्यास सांगितलें. दुसरे दिवशीं राजाची भेट झाली तेव्हां त्या राजानें हा नाककाप्याचा वृत्तांत त्यास

सांगितला व आपण स्वतः नाक कापून घेण्यास तयार आहों असेंहि दर्शविलें. तेव्हां तो वृद्ध म्हणाला कीं, हे राजन् ! आपण अशी शीघ्रता करूं नये. परीक्षा केल्यावांचून अशा गोष्टींत आपण पडूं नये. (राजा म्हणाला) काय हे हजारों लोक खोटें बोलतात असें तुम्ही म्हणतां ? ( वृद्धानें उत्तर दिलें ) हे खरें बोलतात कीं खोटें बोलतात हें पाहण्यासाठींच आधीं परीक्षा करण्याची जरूरी आहे. (राजा०) परीक्षा कशा प्रकारें करावी ? (वृद्ध० विद्या, सृष्टींतील अनुभव व प्रत्यक्षादि प्रमाणें या योगानें परीक्षा करावी. (रा०) अशिक्षित माणसांनीं परीक्षा कशी करावी ? (वृ०) त्यांनीं विद्वानांच्या संमतीनें आपल्या ज्ञानाची वृद्धि करून. (रा०) विद्वान् न मिळाला तर काय करावें ? (वृ०) पुरुषार्थी माणसाला कांहींच दुर्लभ नाहीं. (रा०) बरें आतां या प्रसंगीं कशी परीक्षा करावी हें तुम्ही सांगा पाहूं ? ( वृ० ) हें पहा राजेसाहेब, मी वृद्ध आहे व थोड्या दिवसांचा सोबती आहे. तेव्हां मी स्वतः माझें नाक कापून स्वतः अनुभव पाहतों व जसें पुढें ठरेल त्याप्रमाणें मग इतरांनीं करावें. हें भाषण ऐकून राजानें ठीक आहे असें सांगितलें. नंतर राजानें जोशीबुवाला आपल्या वृद्ध दिवाणजीचें नाक कापण्यास मुहूर्त विचारला व तो त्यांनीं उदयीक शुक्लपंचमीच्या दुपारीं दहा वाजतां उत्तम मुहूर्त आहे असें सांगितलें. त्याप्रमाणें पंचमीच्या दिवशीं सर्व तयारी झाली. दिवाणजींच्या सांगण्याप्रमाणें राजानें दोन हजार सैन्य बरोबर घेतलें व साडेनऊ वाजतां नियमित स्थळीं सर्व जमा झाले. दिवाणजी व राजा तेथें आल्यावर या नाककाप्या मंडळीला फारच आनंद झाला व ही सर्व मंडळी नाचूं लागली. इतक्यांत राजानें त्यांच्या महंताला—ज्याचें नाक पहिल्यानदां कापलें होतें त्याला आपणाकडे बोलवून सांगितलें कीं, आज आपल्या वृद्ध दिवाणजीचें नाक कापून त्यास नारायणाचें दर्शन करावयाचें आहे. महंतानें मोठ्या आत्युतेनें ठीक आहे असें म्हटलें जेव्हां दहा घटका भरत आल्या तेव्हां एकानें चाकू घेतला व दुसऱ्यानें नाकाखालीं परात धरली व चाकूवालयनें वृद्ध दिवाणाचें नाक कापून त्या परातींत टाकलें. जेव्हां नाक कापलें गेलें तेव्हां दिवाणजीच्या नाकांतून टपटप रक्त खालीं पडूं लागलें व त्याचें तोंड खारकन उतरलें. इतक्यांत त्या मूर्ख व लबाड महंतानें त्या दिवाणजीच्या कानांत मंत्रोपदेश सांगण्याच्या मिषानें असें सांगितलें कीं, ' हे दिवाणजी महाराज ! आतां ओशाळे होऊं नका. तोंडावर आनंद दिसूं द्या व सर्वांस सांगा कीं, आपणास नारायणाचें प्रत्यक्ष दर्शन झालें. आतां कांहीं कापलेलें नाक पुनः येत नाहीं, तेव्हां आम्ही म्हणतों तसें करा नाहींतर तुमचें सर्वत्र हंसें होईल . ' हा मंत्र दिवाणजीच्या कानांत सांगून महंत एका बाजूस झाले. तेव्हां राजानें दिवाणास विचारलें कीं, कसें काय ? तुम्हांला आतां तरी नारायणाचें दर्शन झालें कीं नाहीं ? तेव्हां ते नाकाच्या आड कपडा धरून राजाच्या कानांत दिवाणजी म्हणाले कीं, ' कांहीं नाहीं या मूर्ख व लबाड माणसानें आज इतके दिवस लोकांना फारच फसविलें आहे. तेव्हां आतां तुम्हांला हेंच योग्य आहे कीं, याला पकडून सर्वांदेखत कडक शासन करावें; कारण याच्या संगतीनें पुष्कळ लोक भ्रष्ट झाले आहेत. याच्या या अपराधाबद्दल याला गाढवावर बसवून सर्व शहरभर याची धिंड काढावी व पुष्कळ मार द्यावा व नंतर आजन्म कैद याला द्यावी. याप्रमाणें राजाचें व दिवाणाचें भाषण चाललें आहे इतक्यांत त्या महंताला यांचा संशय आला. तेव्हां त्यानें पळून जाण्याची खटपट केली पण चोहोंबाजूला फौज असल्यामुळें त्याला पळून जातां येईना. हें पाहिल्याबरोबर राजालाहि फार क्रोध आला व त्यानें आपल्या नोकरांस सांगितलें कीं, या लोकांना पकडून त्यांच्या पायांत बिड्या घाला व या दुष्टाच्या तोंडाला काळा रंग फांसून, गळयांत फाटलेल्या जोड्यांची माळ घालून चौरस्त्यावर याला उभा करून पुष्कळ मार द्या व गाढवावर बसवून गांवभर धिंड काढा व शेवटीं याला मारून टाका; कारण याला जर जिवंत ठेवला तर तो पुनः दुसऱ्या माणसांना उपद्रव दिल्यावांचून राहणार नाहीं. याप्रमाणें त्याला जेव्हां कडक शिक्षा झाली तेव्हा या नाककाप्यांचा संप्रदाय बंद पडला. अशा प्रकारचे दुष्ट लोक जे असतात ते आपलें पोट भरण्यासाठीं असे अनेक वेदविरूद्ध संप्रदाय सुरू करतात व भोळया लोकांस लुटीत असतात.

याप्रमाणें ही मतवाल्यांच्या दुर्वर्तनाची लीला आहे. स्वामी नारायणाचें मतहि असेंच आहे. यांचा स्वामी मरूं लागला म्हणजे हे लोकांस असें सांगतात कीं, यांना नेण्यासाठीं व मुक्ति देण्यासाठीं सहजानंद महाराज सफेद घोड्यावर स्वार होऊन आले अन्वेत. हें ऐकून तें भोळया लोकांस खरें वाटतें व ते यांना आपलें धन अर्पण करण्यास तयार

होतात. जेव्हां यांची जत्रा भरत असते तेव्हां या मतांतील पुजारी लोक देवळांत बसतात व बाहेरच्या बाजूस दुकानें लावलेलीं असतात आणि आंतून बाहेर वस्तु पाठविण्यासाठीं गुप्त छिद्रें किंवा वाटा केलेल्या असतात. जेव्हां भोळे भक्त-लोक देवाला नारळ व इतर पदार्थ ठेवतात तेव्हां ते सर्व गुप्त वाटेनें बाहेरच्या दुकानांत पाठवून तेथें विकतात व अशा रीतीनें हे लोक हजारों रुपयांचा माल विकतात. जो ज्या जातीचा असेल त्याकडून त्याच्या धंद्याप्रमाणें काम घेतात. हजाम कुंभार, शिंपी, वाणी, शूद्र जो कोणी यांच्याकडे येईल त्याच्याकडून आपला स्वार्थ साधेल असें आचरण हे लोक करवून घेतात. आपल्या चेल्यांवर एक प्रकारचा कर बसवून दरवर्षी हे लोक हजारों रुपये कमावीत असतात. जो मनुष्य यांच्यापैकीं गादीवर बसतो तो विवाह करतो व आभूषणें धारण करतो. कोणाच्याहि घरीं थोडासा उत्सव झाला तर या बुवांची चैन उडते व तेहि लोक यांना अनेक प्रकारें भेटी देत असतात. हे लोक आपल्या मतवाल्या लोकांशीं मैत्री करणें हा सत्संग असें समजतात व दुसऱ्या मतांतील लोकांशीं संगति कुसंग आहे असें समजतात ! या दुष्ट व दुराचारी लोकांशिवाय दुसऱ्या मतांमध्यें कसाहि धार्मिक पुरुष कां असेना त्याची मानमान्यता करणें किंवा त्याची सेवा करणें हे पाप असें समजतात ! केव्हां केव्हां त्यांतील साधु पुरुष प्रसिद्धपणें स्त्रियांचें तोंड पाहत नाहींत. पण गुप्त रीतीनें काय काय प्रकार करतात हें लिहिणें फार कठीण आहे ! केव्हां यांच्या या आचरणाची प्रसिद्धि होते व केव्हां होत नाहीं इतकेंच. अशा रीतीचे हे लोक कुकर्मी आहेत. कित्येक वेळां तर यांचे साधु मेल्यानंतर त्यांस गुप्त विहिरीमध्यें फेंकून देतात व असें उठवतात कीं, साधुमहाराज सदेह स्वर्गाला गेले; त्यांना नेण्यासाठीं सहजानंदजीची स्वारी स्वतः आलेली होती. त्यांना आम्ही विनविलें कीं, आमच्या गुरूला वैकुंठाला नेऊं नये. पण त्यांनीं सांगितलें कीं, यांचीच तेथें फार आवश्यकता आहे यासाठीं यांना तेथें नेलेंच पाहिजे असें म्हणून त्या सहजानंदजींनीं त्यांना विमानांत बसवून ते सर्व वैकुंठाला चालते झाले हें सर्व आम्ही नजरेनें पाहिलें; याप्रमाणें हे लोक आपल्या श्रोत्यांना ठकविण्यासाठीं हव्या तशा थापा मारतात. कित्येक वेळां हे असेंहि सांगतात कीं, त्या विमानावर देवगंधर्व फुलांची वृष्टि करीत होते इत्यादि. जेव्हां एखाद्या गुरूला जगण्याची आशा नसते तेव्हां तो असें सांगतो कीं, मी आतां उद्यां वैकुंठाला जाणार आहे. जर त्या रात्रीं त्याचे प्राण न गेले तर त्याचे शिष्य त्याला विहिरींत फेंकून देतात. कारण जर असें न केलें तर ते वैकुंठाला जावयाचे कां राहिले वगैरे प्रश्न साधारण लोक विचारतील अशा प्रकारचे अनर्थ करणारे लोक या गोकुळया गोसाव्या-मध्यें आहेत. तेव्हां यांना धार्मिक असें कसें म्हणतां येईल ? 'श्रीकृष्ण:शरणं मम' हा यांचा मंत्र असतो. याचा वास्तविक अर्थ श्रीकृष्णाला मी शरण आहे असा आहे. पण कित्येक वेळां श्रीकृष्ण मला शरण येतो असाहि अर्थ केला जातो ! अशा धूर्त पुरुषांची धन्य आहे ! हीं सर्व मतें व मतांतरें वेदांच्या विरुद्ध असल्यामुळें घातुक आहेत. विद्याहीन व भोळया लोकांना हीं उत्तम वाटतात खरीं; पण त्यांची या मतांपासून उन्नति न होतां अवनतिच होत असते. यासाठीं या मतांपासून सर्वांनी दूर रहावें हेंच बरें.

**मध्वमत**—(प्र०) मध्वमत कसें काय आहे ? (उ०) जशीं इतर मतें आहेत तसेंच हेंहि आहे. रामानुज वर्षांतून एकदांच चक्रांकित होत असतात व वर्षांतून दोनदांहि होत असतात. रामानुज कपाळावर पिवळी रेषा लावतात व हे माध्व काळी रेषा लावतात. एकदां एका माध्व पंडिताचा व एका महात्म्याचा पुढें लिहिल्याप्रमाणें शास्त्रार्थ झाला—(महात्मा०) अहो ! तुम्ही ही काळी रेषा व मध्यें हा टिळा कशासाठीं बरें लावतां ? (माध्व०) हा तिलक आमच्या कपाळावर आहे म्हणून आम्ही वैकुंठाला जागत पोहोंचूं. तसेंच श्रीकृष्णाचें श्यामवर्ण शरीर असल्यामुळें आमच्या या तिलकाचा रंगहि श्याम आहे. (महात्मा०) जर डोक्यावर एक तिलक लावून वैकुंठाला जाता येते तर सर्व तोंडावर काळा रंग लावला तर कोठें जाता येईल बरें ? वैकुंठाच्याहि पलीकडे जाऊन पोहोंचणार नाहीं ? जसें तुमच्या श्रीकृष्णाचें शरीर काळें आहे तसेंच तुम्हीहि रंग लावून आपलें सर्वांग कां बरें काळें करीत नाहीं ? असें केल्यानें तुम्हीहि कृष्णासारखेच व्हाल. असे ज्या माध्वमताचे सिद्धांत आहेत तें माध्वमत वेदानुकूल कसें असेल ? अर्थात् तेंहि इतर पंथांप्रमाणेंच त्याज्य आहे.

**लिंगांकित**—(प्र०) लिंगांकित मत कसें आहे ? जसें रामानुज व माध्वमत तसेंच हेंहि आहे. जसे वैष्णव लोक आपणास चक्रमुद्रांनीं डागून घेतात, त्याचप्रमाणें हे लोक लिंगाकृति मुद्रांनीं आपणास महादेवभक्त समजतात.

हे लोक पाषाणाचें लिंग सोन्यांत किंवा चांदींत मढवून आपल्या गळयांत बांधतात, गरीब लोक फडक्यांत बांधून गळयांत लटकावितात. हे लोक या दगडाच्या लिंगाला इतके पूज्य समजतात कीं, जेव्हां हे पाणी पितात तेव्हां त्या दगडाला दाखवून मग पितात. यांचें मत शैवमताप्रमाणेंच त्याज्य आहे.

**ब्राह्मसमाज व प्रार्थनासमाज**—या दोनहि समाजांत इतर पंथांप्रमाणेंच कांहीं गोष्टी चांगल्या व पुष्कळशा वाईट आहेत. कित्येकांना वाटतें कीं हे समाज नवीन स्थापलेले असल्यामुळे, सर्वांशीं हे उत्तम आहेत, पण वास्तविक गोष्ट तशी नाहीं. उघडच आहे कीं, ज्यांना वेदज्ञान नसतें त्यांच्याकडून धर्माचें प्रतिपादन निर्दोष रीतीनें कसें होऊं शकेल ? या समाजांनीं लोकांना ख्रिस्तीय मतापासून निवृत्त केलें, मूर्तिपूजेपासून मार्गे हटविलें व अन्यभ्रमजालापासून लोकांस दूर केलें, या गोष्टी या समाजांनीं चांगल्या केल्या. पण यांच्यांत पुढें लिहिल्याप्रमाणें दोष आहेत. (१) यांच्यांत स्वदेशभक्ति बरीच कमी असते. हें ख्रिस्ती लोकांप्रमाणें वागतात, खाणें, पिणें व विवाहाचे नियम यांनीं विदेशीयांप्रमाणें बदलले आहेत. (२) आपल्या देशाची व आपल्या पूर्वजांची प्रशंसा करणें तर दूरच राहिलें पण हे त्यांची यथेच्छ निंदा मात्र करतात. ब्रह्मादि महर्षि लोकांचें नांवहि घेत नाहींत; इतकेंच नव्हे तर हे असें प्रतिपादन करतात कीं, सृष्टीमध्यें इंग्रजांप्रमाणें कोणीहि विद्वान् झाले नाहींत. आर्यावर्तातील लोक अनादि कालापासून असेच मूर्ख आहेत. (३) हे लोक वेदांची प्रतिष्ठा तर करीत नाहींतच; पण उलट त्यांची निंदा मात्र हवी तशी करतात. ब्रह्मसमाजाच्या पुस्तकांत जीं वाक्यें उद्धृत केलेलीं असतात, तीं प्रायः 'ईसा, मूसा, महंमद, नानक, चैतन्य' वगैरे लोकांचीं असतात, तेव्हां असें वाटतें कीं, यांचीं मतेंहि या मतवाल्या लोकांप्रमाणेंच असावीं. यांनीं एकाहि महर्षीच्या नांवाचा आपल्या पुस्तकांतून गौरव केलेला नाहीं, हें कां बरें ? हे लोक आर्यावर्तांत उत्पन्न झाले आहेत व त्यांनीं याच देशाचें अन्न खाल्लें आहे. असें असतां आपल्या मातापित्यांनीं अवलंबिलेल्या उन्नत वैदिक धर्माचा त्याग करूनवि देशी मतावर यांचा विश्वास कां बरें अधिक बसावा ? ब्राह्मसमाजी व प्रार्थनासमाजी लोक प्रायः संस्कृतानभिज्ञ असतात. त्यामुळें त्यांना असें वाटतें कीं, आपण जें कांहीं इंग्रजी भाषेच्या द्वारानें ज्ञान मिळविलें आहे तेंच अत्युत्तम आहे, अशा प्रकारचा अभिमान त्यांस उत्पन्न होतो; अशा लोकांकडून मनुष्यांच्या उन्नतीला आवश्यक असें कोणतें काम होणार आहे ? (४) इंग्रज, यवन व अंत्यज यांच्या बरोबरहि हे खातात व पितात. यांचा असा समज झालेला दिसतो कीं, सर्वांनीं एकत्र भोजन केल्यानें व जातिभेद तोडल्यानेंच आपला देश वर येणार आहे. पण अशा मतांनीं सुधारणा होण्याची गोष्ट तर लांबच पण उलट बिघाड मात्र होत आहे. या प्रकारचे दोष यांच्या मतांमध्यें आहेत.

जातिभेदाविषयी ब्रह्मसमाजी व वेदमतानुयायी यांमध्यें एकदां संभाषण झालें तें असें—(५)(ब्र० प्र०) जातिभेद ईश्वरकृत आहे कीं मनुष्यकृत ? (वेद० उ०) ईश्वरकृत व मनुष्यकृत असे दोन प्रकारचे जातिभेद आहेत (प्र०) ते कसे ? (उ०)मनुष्य, पक्षी, पशु, वृक्ष, जल, जन्तु आदि जाति परमेश्वरकृत आहेत. ज्याप्रमाणें पशूंमध्यें गाय, घोडा, हत्ती, उंट, वगैरे जाति, वृक्षामध्यें वड, पिंपळ, आंबा वगैरे जाति, पक्ष्यांमध्यें हंस, कावळा, बगळा वगैरे जाति आहेत, त्याचप्रमाणें मनुष्यांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अंत्यज या जाति आहेत. या सर्व ईश्वरकृत आहेत. पण भेद इतकाच कीं, मनुष्यांतील ब्राह्मण क्षत्रियादि जाति या सामान्य जाति नसून विशेषात्मक जाति आहेत हें विसरतां नये. अर्थात् (पूर्वी या पुस्तकांत वर्णिल्याप्रमाणें) गुणकर्मस्वभावानुसार या ब्राह्मणादि जाति असतात. हीच वर्ण व्यवस्था होय. त्यांच्या त्यांच्या स्वभाव गुणकर्मांनुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या वर्णांची यथायोग्य परीक्षा करून राजा व विद्वान् यांनीं या जाती जाणाव्या. या परीक्षेमध्यें मनुष्यांची परीक्षाशक्ति प्रधान असते. म्हणून या जातीला मनुष्यकृत असें म्हणतात इतकेंच. भोजनभेदहि परमेश्वकृत व मनुष्यकृत आहे. पहा सिंह, व्याघ्रादि प्राणी मांसाहारी आहेत व गाय, म्हैस, शेळी वगैरे प्राणी शाकाहारी आहेत हा भेद ईशकृत होय पण मनुष्यांनीं देशकालवस्तुपरिस्थितिप्रमाणें केलेला भोजनभेद हा मनुष्यकृत होय. (प्र.) अहो, हे युरोपियन् लोक बूट, कोट, पाटलोण वगैरे घालून आपलें भोजन करितात व त्यामुळें त्यांची उन्नति होत आहे. (उ०) हें म्हणणें चुकीचें आहे. मुसलमान व अंत्यजहि आपले अशुद्ध कपडे घालूनच

जेवतात व हवें त्याच्या हातचें खातात; पण यांची उन्नति झालेली नाहीं. या युरोपियनांची जी उन्नति होत आहे ती यांच्या या खाण्यापिण्यांतील अत्याचारामुळें नसून इतर कारणामुळें होय. तीं कारणें हीं आहेत कीं, त्यांच्यात बाल–विवाह पद्धति नाहीं, मुलांना व मुलींना ते सुशिक्षित करतात, ते स्वयंवर करतात, भोंदू लोकांच्या उपदेशाला जुमानीत नाहींत, जें कांहीं करावयाचें तें संघशक्तीनें व विचारानें करतात. आपल्या स्वजातीच्या उन्नतीसाठीं तनमनधन अर्पण करतात, आळस सोडून उद्योग करतात. हे लोक त्यांच्या देशांत झालेल्या बुटांना त्यांच्या आफिसांत पाहिजे तेथें नेतात व त्यांनाहि ते मान राखतात. पण येथील जोड्याला दरवाज्याबाहेर ठेवण्यास लावतात. त्यांना त्यांच्या जुत्यांचा मान आमच्यापेक्षां अधिक वाटतो. या एका उदाहरणावरून वाचकांनीं जाणावें कीं, त्यांच्यांत स्वाभिमान किती आहे. या युरोपियन लोकांना या देशांत येऊन शंभर वर्षांपेक्षां जास्त वर्षें झालीं. तथापि त्यांनीं आपलें आचरण सोडलें नाहीं, कपडे करणें व इतर रीतिरिवाज हे सर्व त्यांचे त्यांच्या देशांतील रिवाजाप्रमाणें आहेत. पण येथील लोकांनी कांहीं विचार न करतां त्यांचें अनुकरण करणें सुरू केलें आहे. यावरून उघड होतें की, ते बुद्धिमान व स्वाभिमानी व तुम्ही निर्बुद्ध व निरभिमानी आहांत; हाच भेद त्यांच्यांत व तुमच्यांत आहे. अनुकरण कशाचें करावें व कशाचें करूं नये हें विचार करून ठरविलें पाहिजे. ते हातीं घेतलेलें काम नेटानें पार पाडतात, आपल्या वरिष्ठांची आज्ञा पाळतात, त्यांच्या देशाच्या व्यापाराला उत्तेजन देतात, उत्साही असतात, या त्यांच्या गुणांचें तुम्ही अनुकरण करावें. तें सोडून बूट पाटलोणीचें अनुकरण करण्यांत काय लाभ आहे ? कोट पाटलोण घालण्यानें त्यांची सुधारणा झालेली नाहीं. त्यांची सुधारणा वरील गुणांनीं झालेली आहे. त्यांच्यामध्येंहि जातिभेद आहेत. ते आपणास उच्च समजतात व अन्यदेशीयांस नीच समजतात. म्हणूनच ते दुसऱ्या कोणाबरोबर विवाह करीत नाहींत, दुसरा कितीहि थोर असो त्याला हे आपली मुलगी देत नाहींत व त्याची हे करीत नाहींत. जर कोणी असा अन्यदेशीयांशीं विवाह केला तर त्याला हे लोक नीच समजतात व त्याच्यांशीं एकत्र भोजनव्यवहार करीत नाहींत, व समाजांत त्याला मानमान्यतता मिळत नाहीं. हा जातिभेद नव्हे तर काय ? ब्राह्मसमाजी समजतात कीं, या युरोपियनामध्यें जातिभेद नाहीं. पण हा त्यांचा कित चुकीचा समज आहे ? करितां लोक हो ! विचार करून जें काय अनुकरण करावयाचें तें करा. आतां अनुकरण कराल व पुढें पश्चात्ताप पावाल असलें अनुकरण नको आहे. पहा, वैद्य व औषध यांची आवश्यकता रोग्याला असते व निरोग्याला नसते. विद्वान् हा नीरोगी व अविद्वान् हा रोगी होय. अर्थात् अविद्वान् पुरुषाचा अविद्यारूपी रोग घालविण्यासाठीं त्याला विद्यामृत पाजलें पाहिजे. सत्यविद्या व सत्योपदेश केला पाहिजे. त्यांना खाण्यापिण्यांतच धर्म आहे असें जें वाटतें तें त्यांचें अज्ञान आहे वास्तविक खाण्यापिण्यानें धर्म येत नाहीं व जातहि नाहीं. धर्माचें तत्व निराळ्या ठिकाणीं आहे. खरा धर्म एका बाजूला सोडून जे लोक आपला धर्म खाण्यापिण्यापुरताच आहे असें समजतात, त्यांची संगति कोणी करूं नये. सज्जनांनीं त्यांना उपदेश करून त्यांचीं मनें सुसंस्कृत करावीं (प्र०) आम्ही या अज्ञानी लोकांस पुष्कळ सांगितलें पण ते ऐकतच नाहींत ? (उ०) कां ऐकत नाहींत ? त्याना समजेल अशा उपायांनें सांगावें. त्यांच्यापासून तुम्ही दूर राहतां तेव्हां त्यांच्यावर तुमच्या विद्येचा परिणाम होत नाहीं. तुमची विद्या ही स्वार्थासाठीं आहे कीं परोपकारासाठीं आहे, हें तुम्हांला माहीत नाहीं वाटते ( प्र० ) आमचें ज्ञान परोपकारासाठीं आहे. (उ०) मग तुमच्या जवळच्या लोकांवर त्याचा तुम्ही परिणाम केला पाहिजे. तुम्ही आपलें आचरण उत्तम व चोख करावें म्हणजे त्यांचें प्रेम तुमच्यावर बसेल. तुमच्या विद्येचा परिणाम त्यांच्यावर होईल. तुम्ही त्यांच्यांत मिसळत नाहीं व स्वार्थेच्छु होऊन हवें तसें आचरण करतां हा तुम्ही महान् अपराध करीत आहां. परमेश्वरानें सांगितलें आहे कीं, परोपकार हा धर्म व परपीडा हें पाप आहे; म्हणून विद्वानांनीं यथायोग्य व्यवहार करून अज्ञानी लोकांचें दुःखसागरापासून तारण करून त्यांना सुखी केलें पाहिजे; त्यांनीं मूर्खाप्रमाणें आचरण करूं नये. पण ज्या रीतीनें त्यांची व आपली प्रत्येक दिवशीं उन्नति होईल असें आचरण करीत असावें.

**ईश्वरतत्त्वज्ञान**––(६) (ब्राह्मसमाजी मनुष्याचा प्रश्न) आम्ही कोणतेंहि धर्मपुस्तक ईश्वरप्रणीत आहे व सर्वांशीं सत्य आहे असें मानीत नाहीं. सर्व पुस्तकें मनुष्यप्रणीत आहेत व ज्या अर्थी मनुष्यांची बुद्धि निर्भ्रांत नसते त्या

अर्थी त्यांनीं बनविलेल्या ग्रंथांत निर्भ्रम ज्ञान मिळणें अशक्य असतें; म्हणून आम्हीं ज्या ज्या ठिकाणीं जेवढा सत्याचा अंश असेल त्याचेंच ग्रहण करतो व इतरांचा त्याग करतो. वेद, ब्राह्मण, बायबल, कुराण, पुराण वगैरे कोणताहि ग्रंथ असो त्यांतील सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग आम्ही करतो. कोणताच विशिष्ट ग्रंथ आम्ही प्रमाणभूत मानीत नाहीं. (वैदिक धर्मीयाचें उत्तर) ज्या मताच्या आधारानें तुम्ही सत्यग्रहण करूं इच्छितां त्याच मताप्रमाणें तुम्ही असत्याचेंहि ग्रहण करतां असें ठरतें. पहा. तुम्ही म्हणतां कीं मनुष्याची बुद्धि निर्भ्रांत नसते व ज्या अर्थी तुम्ही मनुष्यच आहां त्या अर्थी तुमची बुद्धिहि तशीच निर्भ्रम नसणार ? मग तुम्ही जें सत्य म्हणून मानाल तें तरी निर्भ्रम कसें मानतां येईल ? तुमच्याच मताप्रमाणें तुमचें म्हणणें संशयात्मक ठरतें मग तें कोण कसें बरें खरें मानील ? जसे अन्य मनुष्य सर्वज्ञ नाहींत तसेच तुम्हीहि सर्वज्ञ नाहीं हें उघड आहे. तुम्ही जे आज सत्य म्हणून समजत असाल तें कदाचित् वास्तविक रीतीनें असत्यच नसेल कशावरुन ? अर्थात् स्वतःची बुद्धि ही कांहीं उत्तम कसोटी नव्हे. या सत्यासत्य निर्णयासाठीं परमेश्वराचें वचनच आम्हां अल्पज्ञ जीवांना सहाय्यकारी होऊं शकते. जसें पूर्वीं या वेदव्याख्यानाच्या प्रसंगीं लिहिलें आहे त्याचप्रमाणें वेदाचें प्रामाण्य तुम्हांला मानणें भाग आहे, नाहीं तर 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशी तुमची अवस्था होईल. वेदामध्यें सर्व सत्यच प्रतिपादन आहे व कोणतीहि असत्य गोष्ट त्यांत सांगितली नाहीं, असें असतां त्या वेदाला न मानणें हें आपलें व दुसऱ्याचें नुकसान करण्यासारखें आहे. यासाठींच आर्यावर्तीय लोक तुम्हांला आपले असें समजत नाहींत व खरोखर पाहतां आर्यावर्ताची उन्नति करण्याला कारणीभूत तुम्ही होऊं शकत नाहीं; कारण तुम्हाला तुमचें स्वतःचें मत कोणतेंच नाहीं. तुम्ही सर्व घरचे भिक्षुक आहांत ! तुम्ही तुमच्या अल्प बुद्धिनें कांहीं मतें ठरवलीं आहेत व त्यांच्या योगानें तुम्ही या देशाची उन्नति होईल असें मानतां. पण तशी उन्नति होणें सर्वथैव अशक्य आहे. जसें कोणी एका मातापित्यांनीं आपल्या उत्पन्नानें सर्व जगांतील मुलांचे पालन करण्याचा प्रयत्न करावा तसा हा तुमचा खटाटोप आहे. कोणीएक मनुष्य कितीहि श्रीमान् असो, त्याच्यानें सर्व जगांतील मुलांचें संगोपन होणें अशक्य आहे व जर तो तसें करण्याचा प्रयत्न करील तर सर्वांचें संगोपन त्याच्याकडून होणार नाहींच; पण त्याची मुलें मात्र उपाशी मरतील; तशी तुमची स्थिति आहे. वेदांचें प्रमाण मानल्यावांचून तुमचीं मतें खरीं कीं खोटीं आहेत हें तुम्हांला समजणार नाहीं व तें न समजल्यामुळें तुमच्याकडून देशांची उन्नति होणार नाहीं. ज्या या आर्यावर्त देशाला रोग झाला आहे त्याला आरोग्य देण्याला जें औषध पाहिजे तें तुम्हांकडे नाहीं. बरें विदेशीय लोक तुमची पर्वा करीत नसल्यामुळें तुमचीं मतें ते मानणार नाहींत. या देशांतील लोक तुम्हांस परधर्ममतानुयायी समजतात याप्रमाणें तुमचा धड या देशासहि उपयोग नाहीं व परदेशासहि नाहीं. असो; आजपर्यंत झालें तें झालें. पण आतां तरी वेदादि शास्त्रांना मान देऊन स्वदेशोन्नति करण्यास लागा. तुम्ही मानतां कीं, सर्व सत्य परमेश्वराच्या योगानें प्रसिद्ध होतें, तर मग ऋषींच्या आत्म्यांमध्यें परमेश्वरस्फूर्तीनें प्रकाशित झालेले वेद कां बरें प्रमाणभूत मानीत नाहीं ? हा हें खरें कीं, तुम्ही वेदाध्ययन केलेलें नाहीं व करण्याची इच्छाहि करीत नाहीं, तेव्हां तुम्हांला वैदिक ज्ञानाची माहिती कशी होणार ? (७) ज्याप्रमाणें मुसलमान व ख्रिश्चन लोक मानतात त्याचप्रमाणें तुम्ही, जीव उत्पन्न झाले आहेत व जगत् हें उपादान कारणाशिवाय उत्पन्न झालें आहे असें मानीत आहांत. उपादान कारणावांचून जगद्रूपी कार्य होऊं शकत नाहीं व जीव अनादि अनंत आहेत, वगैरे माहिती या पुस्तकांतील सृष्ट्युत्पत्ति व जीवेश्वर या विषयीं मागें दिली आहे ती पहा. जसें कारणावांचून कार्य होणें अशक्य आहे त्याचप्रमाणें उत्पन्न झालेली वस्तु चिरकाल टिकणें अशक्य आहे. पाश्चत्ताप व परमेश्वरप्रार्थना यांच्या योगानें पापांची निवृत्ति होते असें जें तुम्ही मानवां तेंहि चुकीचेंच आहे. या मानण्यानेंच या जगांत पुष्कळ पापें वाढलीं आहेत. पौराणिक लोक तीर्थयात्रेनें, जैन लोक नवोकार मंत्रजप व तीर्थ यांच्या योगानें ख्रिस्ती लोक ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यानें, मुसलमान लोक तोबा करण्यानें पापें नाश पावतात, असें मानतात हें सर्व भ्रममूलक आहे. पण असा या मतवादी लोकांचा विश्वास असल्यामुळें हे लोक पापाला भीत नाहींत व दररोज नवीं नवीं पापें करूं लागतात ! या बाबतींत प्रार्थनासमाजी व ब्राह्मसमाजी लोक सारखेच दोषी आहेत. जर त्यांनीं वेदाध्ययन केलें असतें तर त्यांस कळलें असतें कीं, केलेल्या पापाचा भोग झाल्यावांचून नाश होत

नाहीं. असें ज्ञान जर लोकांना होईल तर लोक पापांना भितील व ते जास्त पापें करणार नाहींत. जर भोगावांचून पापांचा नाश होईल तर परमेश्वर अन्यायकर्ता ठरेल. यासाठीं तसें मानणें योग्य होणार नाहीं. (८) तुम्ही ब्राह्मसमाजी लोक जीवांचीं अनंत उन्नति मानतां तर तेंहि होणें अगदीं अशक्य आहे. कारण अल्प व ससीम जीवाचे गुणकर्मस्वभावहि ससीम व अल्प असणार हें उघड आहे. (प्र०) जरी जीव ससीम व अल्प आहे, तथापि परमेश्वरा-दयाळु असल्यामुळें जीवाच्या नियमित कर्मांचें फळ तो अनंत देतो असें कां मानूं नये ? (उ०) असें झालें तर परमेश्वरा-जवळ न्याय नाहीं असें होईल, व सत्कर्में करण्याची इच्छा कोणीहि करणार नाहीं, कारण लोकांना वाटेल कीं, थोड्याशा सत्कर्मांचें फल परमेश्वर अनंत देईल. प्रार्थना केली किंवा पश्चात्ताप झाला म्हणजे सर्व पापें नाश पावतात असें मानणें हेंहि पापांना उत्तेजन देण्यासारखेंच आहे. अशा मानण्यानें धर्माची अवनति व पापांची वृद्धि मात्र होण्याचा संभव आहे. (प्र०) आमच्या मतें निसर्गप्राप्त ज्ञान हें वेदाहूनहि श्रेष्ठ आहे. कारण जर हें स्वाभाविक ज्ञान नसेल तर वेदाध्ययनादिक कांहींच होणें अशक्य आहे. म्हणूनच आम्ही स्वाभाविक ज्ञानाला महत्त्व देतों तें योग्य आहे (उ०) हें तुमचें म्हणणें सर्वथैव निराधार आहे. कारण जें कांहीं दुसऱ्यानें दिलेलें असतें तें स्वाभाविक होऊं शकत नाहीं. जें सहज ज्ञान असतें तेंच स्वाभाविक ज्ञान होय. जें स्वाभाविक असतें तें वाढूं शकत नाहीं. जें नैमित्तिक ज्ञान असतें तेंच वाढूं शकतें व म्हणूनच त्याच्या योगानें मनुष्यांची उन्नति होऊं शकते. पहा, तुम्ही बाल्यावस्थेमध्यें कर्तव्याकर्तव्य किंवा धर्माधर्म कांहींच जाणूं शकत नव्हतां. पण जेव्हां विद्वानांकडून तुम्हांला नैमित्तिक ज्ञान मिळालें तेव्हांच कर्तव्याकर्तव्याचें ज्ञान होऊं लागलें. हें तुम्ही स्वानुभवानें जाणतच आहां. तेव्हां उघड ठरतें कीं, नैमित्तिक ज्ञान हें स्वाभाविक ज्ञानापेक्षां श्रेष्ठ आहे. (९) तुम्ही ख्रिस्ती व मुसलमनांप्रमाणेंच पुनर्जन्म मानीत नाहीं हें निव्वळ त्याचें अनुकरण आहे. हें तुमचें मानणें अगदीं निर्मूल आहे. या विषयींचें वर्णन पूर्वीं आलेंच आहे तें पहा. पण येथें एवढें लक्षांत ठेवा कीं, जीव शाश्वत आहे व त्याचीं कर्में प्रवाहरूपानें नित्य आहेत. कर्म व कर्ता यांचा नित्य संबंध असतो. जीव कर्मांशिवाय राहूं शकेल किंवा राहत असेल, हें कधींतरी शक्य आहे काय ? तुम्ही तर परमेश्वरालाहि कर्महीन मानतां ! पूर्वजन्म न मानल्यानें कृतहानि व अकृताभ्यागम, नैर्घृण्य व वैषम्य दोष परमेश्वराचे ठिकाणीं येऊं शकतो. जर पूर्वींचा जन्म नसेल तर या जन्मीं सुखदुःखाची प्राप्ति कशी बरें होईल ? व जर पुढचा जन्म नसेल तर या जन्मीं केलेल्या कांहीं कर्मांचें न मिळालेलें फळ नष्ट होणार कीं काय ? पुनः शरीर धारण केल्यावांचून या जन्मीं दुसऱ्यास दिलेल्या सुखदुःखांचें फल मिळूं शकतच नाहीं. जर पापपुण्यानुसार फळें मिळत नाहींत असें मानलें तर परमेश्वर हा अन्यायकर्ता आहे असें मानावें लागेल. तात्पर्य, सर्व प्रकारें विचार केला असतां पूर्वजन्म व पुनर्जन्म आहेत असेंच मानावें लागतें. अर्थात् तुम्ही पुनर्जन्म मानीत नाहीं तें ठीक नाहीं. (१०) ईश्वरामध्यें जसें दिव्य गुण आहेत तसेच विद्वानांमध्यें व इतर पदार्थांमध्येंहि आहेत, म्हणून त्यांनाहि देव असें मानलें पाहिजे. परमेश्वर हा देवांचाहि देव आहे म्हणून त्याला महादेव असें म्हणतात. पण तुम्ही तर त्यालाच देव मानतां व इतर देवांना मानीत नाहीं हाहि तुमचा दोष आहे (११) अग्निहोत्रादि परोपकारमय कर्में हीं कर्तव्यकर्में आहेत असें तुम्ही मानीत नाहीं हा तुमचा फार मोठा दोष आहे. (१२) ऋषिमहर्षि लोकांचे उपकार न स्मरतां येशूच्या पायां पडणें चांगलें नव्हे. (१३) मूल कारण वेदरूपी विद्येशिवाय अन्य कार्यरूपी विद्या झाल्या असें मानणें हें अज्ञान आहे. (१४) यज्ञोपवीत व शिखा हीं विद्येचीं चिन्हें आहेत. हीं सोडून केवळ ख्रिस्ती माणसांप्रमाणें बनणें हें केव्हांहि तुम्हांला योग्य नाहीं. जर तुम्ही कोट पाटलोण घालतां तर तुम्हांला या यज्ञोपवीताचा जास्त भार वाटतो काय ?(१५) ब्रम्ह्यापासून झालेल्या प्राचीन ऋषि व महर्षि लोकांची महती गावयाची सोडून युरोपियन् लोकांची स्तुति करणें हें काम पक्षपातीपणाचें व हांजीहांजीपणाचें आहे. (१६) बीजांकुराप्रमाणें जडचेतनाच्या संयोगानें जीव उत्पन्न झाला असें मानणें व उत्पत्तीपूर्वीं जीव नव्हता असें मानणें व उत्पन्न झाल्यांनंतर तो चिरस्थायी मानणें हें सर्व परस्पर व पूर्वापार विरुद्ध आहे. जर उत्पत्तीच्या पूर्वी कोणताहि चेतन पदार्थ नव्हता तर संयोगानंतर तरी तो कोठून आला ? व संयोग तरी कोणाचा झाला ? जर चेतन व जड सनातन आहेत असें मानाल तर ठीक आहे. पण सृष्टीपूर्वीं ईश्वराशिवाय दुसरें कांहीं न मानणें हेंहि तुमचें मत

भ्रममूलकच आहे. ईश्वर, प्रकृति व जीव हे तीन पदार्थ सनातन आहेत असें जें 'आर्यसमाजा' चें मत आहे तेंच सर्वथा सत्य आहे. व त्याप्रमाणें जेव्हां तुम्ही मानाल तेव्हांच तुम्हांकडून कांहींतरी देशोद्धार होईल. तुम्ही व आम्ही सर्व मिळून या आर्यावर्ताची उन्नति करुंया. या देशामुळें आम्हां सर्वांची व तुमचीं शरीरें पोसलीं आहेत व पोसलीं जातील. यासाठीं त्याच्या उन्नतीसाठीं तनमनधन अर्पण करण्यास तयार होणें हें येथील सर्व लोकांचें आदि कर्तव्य आहे. आर्यसमाज हा वैदिकमार्गावलंबी असल्यामुळें या आर्यावर्ताच्या उन्नतीला तो जसा पोषक आहे तसा दुसरा कोणताहि नाहीं. जर लोकांनीं या समाजाला सहाय्य दिलें तर लवकर देशाची उन्नति होईल. कारण एक मतानुयायी समाज जसा मोठा असेल तसें त्यांच्याकडून महत् कार्य होऊं शकतें तें एकाकडून कदापि होणार नाहीं. (प्र०) तुम्ही तर सर्वांचें खंडणच करीत असतां पण सर्वांचा धर्म आपआपल्या पुरता ठीक आहे. कोणाचेंहि खंडण करण्याची गरज नाहीं. तुम्ही सर्वांचें खंडण करतां; पण असें तुमच्या मतामध्यें विशेष काय आहे की ज्याच्या योगानें तुमचें मत श्रेष्ठ समजलें जाईल ? जो तुमचें खंडण करील असा तुमच्या पेक्षां श्रेष्ठ पुरुष दुसरा कोणी नाहीं काय ? तुम्ही जें सर्वांचें खंडण करीत आहां व आपणास श्रेष्ठ समजत आहां तें योग्य नाहीं. कारण या परमेश्वराच्या राज्यांत एकाहून एक थोर व लहानाहून लहान असे पुष्कल योग्यतेचे जीव आहेत; कोणीही आपल्या मताबद्दल अभिमान मानूं नये ? (उ०) हें पहा सर्व मनुष्यें सामान्य बाबतींत एक सारखीं आहेत व म्हणुनच त्यांच्या उन्नतीचा जो मानवधर्म आहे तोहि एकच आहे. तो परस्परविरुद्ध असूं शकत नाहीं. मनुष्यांच्या उन्नतीचा धर्म एक आहे व त्याहून अन्य तो अधर्म होय हेंच आम्ही विशेष सांगत आहों: सध्यां मतमतांतरें अनेक आहेत, हजाराहून जास्ती आहेत; पण त्यांत पौराणिक ख्रिस्ती जैनी व कुराणी असें चार मुख्य भेद आहेत. या चारांचे पोटसंप्रदाय अनेक आहेत. जर कोणीं प्रथमतः वाममार्गी लोकांना विचारलें कीं, महाराज ! मी आजपर्यंत कोणताहि धर्म स्वीकारला नाहीं; कारण कोणता धर्म श्रेष्ठ हें मला माहीत नव्हतें; तर कृपा करून सांगा कीं, या प्रचलित धर्ममतांपैकीं कोणते मत श्रेष्ठ आहे ? व मी कोणत्या मताचें ग्रहण करूं ? यावर तो वाममार्गी असें उत्तर देईल कीं, आमचें मत सर्वोत्तम आहे त्याचेंच तुम्ही ग्रहण करा. (जिज्ञासूचा प्र० ) हीं इतर नऊशें नव्याण्णव मतें कशीं आहेत ? (वाममार्गी मनुष्याचें उत्तर) इतर सर्व मतें असत्य व नरकाला पोंचविणारीं आहेत. 'कौलात्परतरं नास्ति ।' या वचनप्रमाणें आमच्या मताहून श्रेष्ठ असें कांहीं नाहीं. (प्र०) तुमचा धर्म कोणता आहे ? ( उ० ) भगवतीला मान देणें, मद्य मांसादि पंच मकरांचें सेवन करणें, रुद्रयामलादि चौसष्ट तंत्रांना प्रमाण मानणें, हा आमचा धर्म आहे. जर तुला मुक्तीची इच्छा असेल तर तूं आमाचा चेला हो. ( जि० प्र० ) ठीक आहे, पण इतर मतवाल्या महात्म्यांकडे जाऊन थोडीशी विचारपूस करून जें उत्तम ठरेल त्याचा स्वीकार करूं. (वा० उ०) अहो तुम्ही त्यांच्या नादीं लागूं नका. हें तुम्हांला भुलवून आपल्या जाळयांत ओढून घेतील. कोणाच्याहि जवळ जाऊ नका, आमच्याजवळ या; नाहींतर पश्चात्ताप होईल. पहा ! आमच्या मतामध्यें भोग व मोक्ष दोन ही साधतात. (जि० प्र०) ठीक आहे. पण इतर मतांचें परीक्षण तर मला करूं दे. पुढें जिज्ञासूनें शैवाला विचारलें तेव्हां तो म्हणाला कीं, शिव हीच परमपूज्य देवता आहे. तिची भक्ति करावी. रूद्राक्षधारण, भस्मलेपन व लिंगपूजन करून मुक्ति मिळवावी. दुसरा मार्ग मुक्ति साधण्याला योग्य नाहीं. नंतर जिज्ञासु नवीन वेदान्त्याजवळ गेला व त्यास त्यानें प्रश्न केला तो असा. (जि० प्र०) महाराज ! आपला धर्म काय आहे तें कृपा करुन सांगा. (वेदान्त्याचें उत्तर) आमच्याकडे धर्म व अधर्म कांहीं नाहीं. आम्ही प्रत्यक्ष ब्रह्म आहों. आम्ही ब्रह्मच असल्यामुळें आमच्यांत धर्म व अधर्म असणार कसे ? हें जग मिथ्या आहे. जो ज्ञानी होतो तो आपणास शुद्ध चेतन ब्रह्म मानतो व मुक्त होतो. (प्र०) जर तुम्ही आपणास ब्रह्म व नित्यमुक्त मानतां तर त्या शुद्धब्रह्माचे गुण तुमच्यांत कसे दिसत नाहींत ? व शरीरधारी कां आहांत ? (उ०) अहो ! तुम्हांला हें शरीर दिसत आहे हीच तर तुमची भ्रांति आहे. आम्हांला तर केवल ब्रह्माशिवाय दुसऱ्या कशाचाहि अनुभव येत नाहीं. ( प्र० )तुम्ही अनुभव घेणार कोण व कशाचा अनुभव घेतां ? ( उ० )पाहणारें व अनुभव घेणारें ब्रह्म व ज्याचा अनुभव घ्यावयाचा तेंहि ब्रह्मच. ( प्र० ) काय दोन ब्रह्में

आहेन ? (उ०) नाहीं नाहीं. आपणच आपल्याला पाहतो व आपणच आपल्याला अनुभवतों (प्र०) कोणी आपल्या खांद्यावर आपणच चढूं शकेल काय ? तुमचें मत वेडेपणाचें आहे. यांत तथ्य मुळींच नाहीं. असें म्हणून या जिज्ञासूनें पुढें जैनी उपदेशकाजवळ जाऊन त्याला प्रश्न केला तेव्हां तो म्हणाला —(उ०) जैनधर्मच सर्वांत श्रेष्ठ आहे . इतर धर्म हे भ्रामक समजुती आहेत. जगताचा कर्ता परमेश्वर मानण्याची मुळींच गरज नाहीं. कारण जग हें अनादि सिद्ध आहे. तें उत्पन्न झालें नाहीं व नाश पावणार नाहीं. तूं आमचा चेला हो. आम्ही सर्व सत्याला मानणारे आहों. आमच्या धर्मासारखा शुद्ध धर्म दुसरा कोणताच नाहीं. हें उत्तर ऐकून त्या जिज्ञासूनें पाद्र्यांला विचारलें तेव्हां तो म्हणाला कीं, ' आमचा ख्रिस्ती धर्म सर्वांत थोर आहे. सर्व माणसें पापी आहेत, तीं काळोखांत आहेत . आम्ही उजेडांत आहों. येशूवर विश्वास ठेवल्याशिवाय कोणाच्याहि पापांचें क्षालन होणार नाहीं. येशूवर विश्वास ठेवल्यानें तूं शुद्ध होऊन मुक्त होशील. येशूनें सर्वांच्या प्रायश्चित्तासाठीं आपला प्राण दिला व दयेचा प्रकाश पाडला आहे. म्हणून तूं आमच्या कळपांत ये व मुक्त हो. ' हें उत्तर ऐकून जिज्ञासु तेथून निघाला तो मौलवी साहेबाकडे जाऊन त्यानें आपला प्रश्न त्याला विचारला. तेव्हां मौलवी म्हणाला–' बाबारे ! खुदा, पैगंबर व कुराण हीं मानल्यावांचून कोणालाहि निजात प्राप्त होणार नाहीं. जो या महजबला मानणार नाहीं तो काफीर आहे. ' हें ऐकून जिज्ञासु एका वैष्णवाजवळ गेला व त्याला त्यानें आपला प्रश्न केला. तेव्हां तो वैष्णव म्हणाला–आमचा तिलकाचा छाप पाहून यमराज भयभीत होत असतो. ' हें ऐकून जिज्ञासु म्हणाला कीं, यांचा हा तिलक पाहून डांस, माशा, शिपाई, चोर, डाकू, वगैरे प्राणी भीत नाहींत; तर मग यमदूत भितात हें म्हणणें तरी खरें कशावरून ? अशा रीतीनें प्रत्येक मतवाल्या माणसानें आपलें मत उत्तम व दुसरीं मतें नरकाला पोंचविणारीं असें त्यास सांगितलें. कोणी कबीर, कोणी नानक, कोणी दादू, कोणी वल्लभ, कोणी सहजानंद, कोणी माधव इत्यादि परमपूज्य आहेत असें सांगितलें, अर्थात् ज्यानें त्यानें आपल्या मताचा गौरव व परमताची निंदा केली. अशा प्रकारें हजारों लोकांना त्यानें विचारलें व हजारों माणसांनीं त्याला तसाच जबाब दिला, तेव्हां त्याची खात्री झाली कीं हे सर्व स्वार्थी लोक आहेत, यांच्यांत कोणीहि गुरू करण्याला योग्य नाहीं. कारण एक मत खोटें आहे असे सिद्ध करण्यास नउशें नव्याण्णव साक्षी मिळाल्या आहेत. जसें-असत्यवादी दुकानदार आपल्या दुकानांतील पदार्थांची स्तुति करतो व दुसऱ्या दुकानांतील पदार्थांची निंदा करतो त्याचप्रमाणें यांची स्थिति आहे. अशी स्थिति झालेल्या जिज्ञासूनें काय करावें तें पुढील उपनिषद्वचनांत सांगितलें आहे: —

**तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् ॥ समित्पाणिःश्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥ १२ ॥ तस्मै स विद्वानुपसन्नाय सम्यक् प्रशान्तचित्ताय शमान्विताय ॥ येनाक्षरं पुरुषं वेद सत्यं प्रोवाच तां तत्त्वतो ब्रह्मविद्याम् ॥ १३ ॥ मुण्डक० १।२॥**

त्या सत्याच्या विज्ञानासाठीं त्यानें समित्पणि होऊन-हात जोडून अरिक्त हस्त होऊन-वेदवित् ब्रह्मनिष्ठ अर्थात् परमात्म्याला जाणणाऱ्या गुरूजवळ जावें. या पाखंडी लोकांच्या जाळयांत त्यानें फसूं नये ॥ १२ ॥ जेव्हां असा जिज्ञासु विद्वानापाशीं जाईल, तेव्हां त्या विद्वानानें शांतचित, जितेंद्रिय व जवळ आलेल्या जिज्ञासूला यथार्थ ब्रह्मविद्येचा व परमेश्वराच्या गुणकर्मस्वभावांचा नीट उपदेश करावा. ज्या साधनाच्या योगानें त्या जिज्ञासूला धर्म, अथ, काम, मोक्ष व परमात्मा यांचें ज्ञान होईल व त्यांची प्राप्ति होईल त्या साधनांचा त्याला उपदेश करावा ब्रह्मविद्येचा व परमेश्वराच्या गुणकर्मस्वभावांचा नीट उपदेश करावा. ज्या साधनाच्या योगानें त्या जिज्ञासूला ॥ १३ ॥ अशा आप्त विद्वान् पुरुषाजवळ तो जिज्ञासु गेला व त्यानें त्याला विचारलें कीं—'हे महाराज ! मी या मतमतांतरवाल्या उपदेशांच्या परस्पर भिन्न उपदेशांनीं भ्रांतचित्त झालों आहे. खरें काय व खोटें कोणतें हें मला समजेना. जर यांतलें एक खरें मानावें तर नउशें नव्याण्णवाशीं विरोध करावा लागतो. याकरितां कृपा करून मला खरा हिताचा मार्ग दाखवा.' त्यावर तो आप्तविद्वान् म्हणाला, ( आप्त० ) तूं म्हणतोस तें खरें आहे. हीं मतें अविद्येमुळेंच उत्पन्न झालीं आहेत. हे धूर्त लोक इतर अज्ञ लोकांना फसवून

त्यांच्या द्वारानें आपला स्वार्थ साधतात. जे लोक यांच्या या भ्रमजालामध्यें फसतात त्यांचा मनुष्यजन्म व्यर्थ जातो व त्यांना दुःखाशिवाय कांहींच प्राप्त होत नाहीं. पाहा ! या सहस्रमतांमध्यें जें कांहीं सामान्य चांगलें तत्त्व आहे तें वेदमत सर्वश्रेष्ठ आहे· वेदमताचा चांगला भाग मतमतांतरामधून थोडा अधिक अजूनहि दिसत आहे. त्या चांगल्या भागावर या स्वार्थसाधु लोकांनीं आपल्या अज्ञानानें अनेक अधर्म उभारले आहेत व अनेक ढोंगें केलीं आहेत. ( **जिज्ञासुचा प्र०** ) गुरूजी ! याची परीक्षा कशी करावी ? ( **आप्ताचें उत्तर** ) 'तूं त्या मतवाल्यांच्या मंडळीमध्यें जा व खालील प्रश्नांचीं उत्तरें त्यांस विचार म्हणजे तुझी खात्री होईल. सत्यभाषण हा धर्म व असत्यभाषण हा अधर्म आहे कीं नाहीं ? तसेंच विद्याध्ययन करणें, ब्रह्मचर्य पाळणें, युवावस्थेमध्यें विवाह करणें, सत्संग, पुरुषार्थ, सत्य व्यवहार करणें, हा सर्व धर्म आहे व विद्या न शिकणें, ब्रह्मचर्य न पाळणें, व्यभिचार करणें, कुसंगति धरणें, असत्यव्यवहार, छल, कपट, हिंसा दुसऱ्याची हानि करणें इ० धर्म आहे कीं नाहीं ?' हें भाषण ऐकून तो जिज्ञासु त्या मतवाल्यांच्या सभेंत गेला व त्यानें वर सांगितल्याप्रमाणें त्या सर्वांना उद्देशून प्रश्न केला. तेव्हां सर्वांनीं एकमतानें उत्तर दिलें कीं, सत्यनिष्ठा वगैरे धर्म आहे व असत्याचरणादि अधर्म आहे. तेव्हां त्या जिज्ञासूनें असा प्रश्न विचारला कीं, ( जि० **प्र०** ) अहो, तुमचें जर या सामान्य वैदिकधर्मांत ऐकमत्य आहे तर मग तुम्ही सर्व एकमत होऊन या खऱ्या धर्माची उन्नति व अन्य अधर्मकारक मतांचा नाश करण्यास कां बरें प्रवृत्त होत नाहीं ? तेव्हां ते सर्व म्हणाले. ( **उ०** ) अहो ! असें जर आम्हीं केलें तर मग आम्हांला कोण विचारील ? आमचे चेले आमच्या आज्ञेंत राहणार नाहींत; आमची उपजीविका नाश पावेल. व जी आमची चैन चालली आहे ती चालणार नाहीं. म्हणून आम्हीं आमच्या मतांचा आग्रहपूर्वक उपदेश करीत असतो. '**रोटी खाइये शक्करसे और दुनियां ठगिये मक्करसे**' हा आमचा मंत्र आहे. या संसारामध्यें जो सीधासाधा मनुष्य असेल त्याला कोणीहि विचारीत नाहीं. पण जो कोणी ढोंग करतो त्याची यथेच्छ चैन चालते असा आमचा तर अनुभव आहे. ( जि० प्र० ) तुम्ही आपल्या पाखंडमय उपदेशानें लोकांना ठकवीत आहांत, तेव्हां तुम्हांला राजा कसा दंड करीत नाहीं ? (मत० उ० ) अहो, तुम्हांला माहीत नाहीं, आम्ही राजालाहि आमचा शिष्य बनविला आहे. मग तो कसा आम्हांला शिक्षा करील ? आम्ही आमची व्यवस्था उत्तम केली आहे. ( जि० प्र० ) तुम्ही याप्रमाणें दुसऱ्या लोकांना ठकवीत आहांत तेव्हां तुम्हांला परमेश्वरानें प्रश्न विचारल्यावर तुम्ही काय उत्तर द्याल बरें ? या येथील थोड्याशा चैनासाठीं पुढें घोर नरकांत पडाल, यासाठीं अशा या भयंकर अपराधांतून कां बरें तुम्ही निवृत्त होत नाहीं ? ( मत० उ० ) अहो कोणी पाहिलें आहे पुढें काय आहे तें ! जेव्हां तो प्रसंग येईल तेव्हां पाहून घेऊं. सध्यां तर आमची चैन आहे. आम्हांला लोक स्वखुषीनें धनादि पदार्थ देत आहेत तेव्हां राजाकडून आम्ही दंडनीय होऊं शकत नाहीं व त्याचप्रमाणें परमेश्वर आम्हांला दंड करणार नाहीं. ( जि० प्र० ) ज्याप्रमाणें लहान बालकाला फसवून त्याच्याकडील द्रव्य हरण करणाऱ्याला राजा शासन करतो त्याचप्रमाणें तुम्हांला शासन करणें योग्य आहे. कारण या धर्माच्या बाबतींत जे अज्ञ असतात ते बालकासारखेच होत. '**अज्ञो भवति वै बालः पिता भवति मन्त्रदः**' ।। मनु. ५।५।३।। ' जो ज्ञानरहित असतो तोच बालक व जो ज्ञान देणार असतो तोच पिता किंवा वृद्ध समजावा. असो. याप्रमाणें तुम्ही या अज्ञ बालकांचें त्यांना फसवून धन हरण करीत असतां म्हणून तुम्ही दण्डनीय आहांत. जे विद्वान् असतात ते तुमच्या जाळयांत सांपडत नाहींत. पण अज्ञानी लोकांना खरेंखोटें समजत नसल्यामुळें तुम्ही त्यांना तेव्हांच फसवितां, म्हणून तुम्हांला राजाकडून अवश्य दंड झाला पाहिजे. ( म० उ० ) ज्या अर्थी राजा व प्रजा आमच्याच मताचे आहेत त्या अर्थी आम्हांला शिक्षा देणारा कोणीहि नाहीं हें उघड आहे. पण जर कोणी आम्हांस शिक्षा देण्याची व्यवस्था करूं लागेल तर आम्ही त्याला दुसरीं कांहीं तोड काढूं. ( जि० प्र० ) जे तुम्ही व्यर्थ बसून दुसऱ्यांचें धन हरण करतां त्याबद्दल गृहस्थांच्या मुलांना व मुलींना विद्या शिकविलीत किंवा स्वतः विद्याभ्यास केलांत तर किती तरी कल्याण होईल, नाहीं काय ? (मत० उ०) वाः आम्हांला तुम्ही चांगला उपदेश करीत आहां ! म्हणें,—लहानपणापासून ब्रह्मचर्य पाळून अध्ययन करा, नंतर दुसऱ्याला ती विद्या शिकवा, व आपली चैन कमी करा ! अशा रीतीनें जन्मल्यापासूनें मरेपर्यंत मेहनत करण्याची आम्हांला काय गरज आहे ? आम्हांला घरीं बसल्या बसल्या लाखों रु० मिळत आहेत

व चैन होत आहे मग हा त्रास कोणी करावा ? (जि०प्र०)अहो ! पण याचा परिणाम वाईट आहे हें तुम्हांला कळते ना ? पहा ! तुमच्या दुर्वर्तनानें तुम्हांला वाईट रोग होतात, तुम्ही लवकर मरतां व सर्व बुद्धिमान् लोक तुमची निंदा करतात; असा प्रकार चालला असतांहि तुम्हांला कसें समजत नाहीं ? [मत०उ०] अरे बाबा ! तुला समजत नाहीं, पहा:—

टका धर्मष्टका कर्म टका हि परमं पदम् ॥ यस्य गृहे टका नास्ति हा टका टकटकायते ॥१॥
आना अंशकला: प्रोक्ता रूप्योऽसौ भगवान् स्वयम् ॥ अतस्तं सर्व इच्छन्ति रूप्यं हि गुणवत्तमम् ॥२॥

पैशावांचून धर्महि नाहीं व कर्म नाहीं. त्यावांचूनहि परमपद नाहीं. ज्याच्या घरीं टका नाहीं तो सर्व उत्तम पदार्थांना टकाटका पाहत असतो व म्हणतो कीं, जर माझ्या घरीं पैसा असता तर मी हे उत्तम पदार्थ घेतले असते. ॥१॥ पुष्कळ लोक शोडषकलायुक्त अदृश्य परमेश्वराचें वर्णन करतात, पण तो अदृश्य असल्यामुळें त्याचा बोध कोणालाहि होत नाहीं. पण रुपया हा सोळा अंशानीं युक्त असा दृश्यमान् भगवान् परमेश्वर आहे. म्हणूनच सर्व लोक याच्या प्राप्तीची इच्छा करतात. कारण सर्व कामना या रुपयाच्या सहाय्यानें साधल्या जातात. [जि० प्र०] ठीक आहे. तुमचें आंतील वर्म आतां समजलें. तुम्ही हें जें सर्व पाखंड उभारलें आहे तें सर्व तुमच्या चैनीसाठींच आहे. पण याच्या योगानें जगाचा नाश होत आहे तें तुमच्या लक्षांत येत नाहीं. जशी सत्योपदेशाच्या योगानें लोकांची उन्नति होते तशीच पाखंडमताच्या योगानें अवनति होते, हें तुम्ही जाणत नाहीं काय ? जर तुम्हांला धनच पाहिजे असेल तर नोकरी करावी किंवा व्यापार करावा. [मत०उ०] नोकरीमध्यें किंवा व्यापारांत परिश्रम जास्त व हानि होण्याचाहि संभव असतो. पण आमच्या या बाजूनें गेलें असतां हानि होतच नाहीं. तुलशीजल घेऊन चरणामृत दिलें, रुद्राक्षबंधन केलें, चेल्याचें मुंडण करवलें व आणखी हव्या त्या चेष्टा करून आपलें प्रस्थ माजवलें म्हणजे मग आम्हांला कांहींएक करण्याची गरज नाही. सर्व कांहीं आमचे चेले आम्हांसाठीं करीत असतात. [जि० प्र०] बरें हे तुमचे चेले जें आपलें धन तुम्हांला देतात तें कां बरें ? [मत० उ०] आपणास मुक्ति किंवा स्वर्ग मिळावा व धर्म साधावा म्हणून. [जि० प्र०] अहो ! पण तुम्ही स्वत: मुक्त नाहीं व मुक्तीचें स्वरूप व साधनहि जाणत नाहीं तेव्हां तुमची सेवा करणारे मुक्त होतील तरी कसे ? [मत०प्र०] हे आमचे शिष्य ज्या ज्या वस्तु आम्हांला दान करतात त्या त्या त्यांना परलोकांत मिळतात, या लोकांत मिळण्यासाठीं दानें नाहींतच [जि० प्र०] बरें, या दान देणाऱ्यांना तें मिळेल कीं नाहीं हें कांहीं सांगवत नाहीं, पण दान घेणाऱ्या तुमच्या सारख्या भिक्षुकांना काय बरें प्राप्त होतें ? स्वर्ग कीं नरक ? [मत०उ०] आम्हीं भजन करतो त्याचें फल आम्हांला स्वर्गरूप मिळतें. दान घेतल्यानें येथें आम्हांला व परलोकीं दान देणाऱ्यांला सुख मिळतें. [जि० प्र०] तुम्ही कसलें भजन करतां ! हें सर्व तुमचें टक्यासाठीं भजन चाललेलें आहे तुम्हांस परमेश्वराचें स्मरण तरी कशाला होईल ? तुम्ही मेल्यानंतर तुमचा पैसा येथें राहतो व तुमचें शरीर भस्म होऊन जातें व परमात्मास्मरण न केल्यामुळें तुमच्या आत्म्याला कोठेंहि स्वास्थ्य मिळत नाहीं. तुमच्या या अशुद्धिकारक कृत्यांनीं तुमचा आत्मा सदैव मलीन होऊन दु:ख भोगीत राहील. (मत० उ०) आम्ही अशुद्ध नाहीं. आमची सर्व शुद्धि झालेली आहे. (जि० प्र०) कामक्रोधादि अनेक मल तुमच्या अंत:करणांत असतांना तुम्ही शुद्ध कसे राहणार ? [मत० उ०] तुम्ही हे मल आम्हांमध्यें आहेत असें कशावरून म्हणतां ? (जि० प्र०) तुमच्या व्यवहारांवरून हें उघड होत आहे. (मत० उ०) अहो ! महात्मे लोक जे असतात त्यांचें वर्तन व अंत:करण यांचा मेळ नसतो. हत्तीचे दाखवायाचे दांत निराळे व खावयाचे निराळे ही जशी स्थिति असते तसाच प्रकार महात्म्यांचा असतो. ते आंतून शुद्ध असतात पण बाहेर लीलामात्रेंकरून अन्य व्यवहार चालवितात. (जि० प्र०) जर तुम्ही आंतून शुद्ध असाल तर बाहेरील कार्मेंहि शुद्ध असून उत्तमच झालीं पाहिजेत नाहीं काय ? (मत० उ०) अहो ! आम्ही कसेहि असलों म्हणून काय झालें ? आमचे चेले तरी उत्तम आहेत ना ! (जि० प्र०) जसे तुम्ही गुरु तसेच तुमचे चेले. (मत० उ०) नाहीं नाहीं, सर्व मनुष्यांचें एकमत कधींहि होऊं शकत नाहीं. कारण जितक्या व्यक्ति तितक्या त्यांच्या भिन्न भिन्न प्रकृति आहेत. (जि० प्र०) जर बाल्यावस्थेंत उत्तम शिक्षण मिळालें, सत्यभाषणादि धर्माचा स्वीकार व असत्यभाषणादि अधर्माचा त्याग करणारे मनुष्य झाले तर त्या सर्वांचें एकमत झालें पाहिजे. अधर्माला यांचें [illegible] राहणारच. धर्माला [illegible]

अधर्मात्मे कमी व्हावे अशी खटपट सर्वांनीं केली पाहिजे. धर्मात्मे जास्त झाले म्हणजे मनुष्य सुखी होतात व अधर्मात्मे जास्त झाले म्हणजे लोक दुःखी होतात. म्हणून सर्व विद्वानांनीं पक्षपात सोडून एक प्रकारचा उपदेश करावा व संघशक्ति वाढवावी. (मत० उ०) आजकाल कलियुग आहे. या तुम्ही सांगतां त्या सत्ययुगांतील गोष्टी आहेत. (जि० प्र०) कलियुग हें एका कालाच्या मर्यादेचें नांव आहे व ज्या अर्थी काल हा निष्क्रिय आहे त्या अर्थी धर्म किंवा अधर्म करण्यास काल हा सहाय्यक किंवा बाधक होऊं शकत नाहीं; तुम्हीच स्वतः मूर्तिमंत कलियुगें आहांत. या सर्व जगामध्यें जो धर्म वाढत आहे किंवा अधर्म कमी होत आहे तो केवळ उपदेशक व धर्मात्मे यांच्या योगानें होय. जशी संगति असते तसे गुणदोष अंगीं येतात. हें अगदीं उघड आहे. (मत० उ०) तुमचा तर्क फार लांब धांवत आहे. तेव्हां तुमचे व आमचें जुळणार नाहीं. हें उत्तर ऐकून जिज्ञासूनें पुढें प्रश्न विचारण्याचें सोडून दिलें. तो या मतवाल्यांची संगति सोडून त्या पूर्वी भेटलेल्या महात्म्याकडे गेला व त्याला म्हणाला कीं, हे महाराज ! तुम्ही मला हें सत्य ज्ञान करून दिलें आहे व माझा उद्धार केला आहे. नाहींतर मी कोणाच्या तरी एखाद्या मतामध्यें फसून नष्ट झालों असतों. अ तां मी या पाखंडी मतवाल्यांचें खंडन व वेदोक्तमताचें मंडन करीत राहीन. (उ०) हेंच सर्व विद्वान् माणसांचें व संन्यासी पुरुषांचें काम आहे. सत्याचें मंडन व असत्याचें खंडन करण्यास सर्वांनीं निस्पृहपणानें तयार व्हावें, या योगानेंच सर्वांचें हित होईल.

**ब्रह्मचारी व सन्यासीः**—ब्रह्मचारी व सन्यासी हे आश्रम फारच उत्तम आहेत व या आश्रमांच्या नियम-व्यवस्थेप्रमाणें चालणाराचें हित झाल्याशिवाय राहणार नाहीं. हें अगदीं निःसंशय आहे. सध्यां स्वार्थी लोकांनीं या आश्रमामध्येंहि पुष्कळ गडबड केलेली आहे. सध्यां पुष्कळ लोक जटा वाढवून व रंगीत वस्त्रें धारण करून आपणास ब्रह्मचारी म्हणवून घेतात व आपण सिद्ध आहोंत असें सांगून हवीं तशीं कुकर्में करण्यास मागें पुढें पाहत नाहींत ब्रह्मचारी लोकांचें विद्याध्ययन हें मुख्य काम असतां तें ते करीत नाहींत व नेहमी लोकांना दाखविण्यासाठीं जपपुरश्चरणा दिकामध्यें दंग असतात ! जो ब्रह्मचारी विद्याध्ययन करीत नाहीं त्याची योग्यता अजागलस्तनासारखी आहे त्याच जन्म व्यर्थ होय. तसेंच जे सन्यासी स्वतः विद्याहीन असून केवळ दंडकमंडलु व भिक्षा पात्र घेऊन दारोदार हिंडतात वैदिकधर्माची उन्नति करण्यास मदत करीत नाहींत, लहानपणींच संन्यास घेतल्यामुळें ज्यांचीं इंद्रियें अनावर असतात व त्यामुळें जे कुमार्गी होतात, जे विद्याभ्यास करीत नाहींत, जे जलस्थलकाष्ठपाषाणादिकांचें पूजन करीत इकडून तिकडे हिंडतात, विद्वान् असून मौनधारण करतात, एकांतीं राहून यथेच्छ खाऊन पिऊन आनंद करतात, ईर्ष्या व द्वेष यांनीं युक्त असून अनेक दुर्वर्तनें करतात, काषायवस्त्र व दंडधारण करण्यानेंच आपणास कृतकृत्य समजतात, व समजत असतांहि सत्यकृत्य करीत नाहींत ते जिवंत असतांहि केवळ भूभार होत. पण जे परोपकाराचें कृत्य करतात, धर्माचा उपदेश करतात तेच खरे संन्यासी समजावें.

**गोसावी लोकः**—गिरी, पुरी, भारती गोसावी लोक आपल्या अनेक परिवारमंडळीसह चोहोंकडे हिंडतात, अद्वैतमताचा प्रसार करीत असतात व थोडेसें उपदेशाचें कामहि करितात. पण वास्तविक स्थिति पाहिली असतां हेहि भोजनभाऊच आहेत असें म्हणावें लागतें; यांतील पुष्कळ लोक भोजन मिळतें म्हणून त्या मंडळींत असतात व बाहेरून फारच ढोंग करतात हे लोक संध्याकाळच्या वेळीं आपल्या महन्ताला मध्यें गादीवर बसवून त्याची पूजा करतात व इतर साधु बाजूला उभे राहून हातांत पुष्प घेऊन पुढील श्लोक म्हणतात.

**नारायणं पद्मभवं वसिष्ठं शक्तिं च तत्पुत्रपराशरं च । व्यासं शुकं गौडपदं महान्तम् ॥६०॥**

**इत्यादि** श्लोक म्हणून 'हरहर' म्हणून मोठ्यानें गर्जना करून त्या महन्तावर पुष्पवृष्टि करतात व त्याला साष्टांग नमस्कार करतात. जो कोणी असें करीत नाहीं त्याला तेथें उभें राहण्याचीहि मनाई करतात. हा दंभ केवळ लोकांना

दाखविण्यासाठीं करीत असतात. या दंभामुळें लोक फसलें जाऊन लोकांत त्या महंताची प्रतिष्ठा होते व त्याला पुष्कळ मिळकत होते. पुष्कळ लोक याप्रमाणें संन्यासाचा नुसता अभिमान मात्र धरतात, पण त्या आश्रमाप्रमाणें हातून कांहींच कार्य करीत नाहींत. संन्यासामधील कर्तव्यकर्में कोणतीं हें पांचव्या समुल्लासांत सांगितलें आहे तें तेथें पहा. तीं कर्तव्यें न करणें म्हणजे त्यांनीं आपला समय व्यर्थ घालविणें आहे. जर कोणी चांगला उपदेश करूं लागला तर त्याला अधिक विरोध करतात ! यापैकीं कांहीं लोक भस्मधारी तर दुसरे रुद्राक्षधारी असतात, कोणी शैव तर कोणी चक्रांकित असतात. तात्पर्य, हे लोक संन्यासी होऊनहि आपल्या पाखंडमताचा अभिमान सोडीत नाहींत. तात्पर्य, यावत्कालपर्यंत शुद्ध वैदिकमार्गाचा प्रसार व यांच्या या पाखंडमताचें खंडण होणार नाहीं तोंपर्यंत लोकांची उन्नति होणार नाहीं. जे संन्यासी शांकरमतानुयायी असतात ते इतर मतांचें खंडन करतात व इतर मतांचें संन्यासी या मताचें खंडन करतात. कित्येकांचें तर असें मत असतें की, आपण महात्मे आहों ! आम्हांला खंडनमंडन करून काय करावयाचें आहे ? हे सर्व भूभारभूत लोक झालेले असतात. यांचा कोणालाच कांहीं उपयोग नाहीं. जेव्हां हे उपदेशक असे स्वार्थी झाले तेव्हांच वेद—मार्गविरोधी, वाममार्गी, ख्रिस्ती ,मुसलमानी, जैनी, वगैरे प्रबळ झाले. याचा नाश होत आहे व दुसरे लोक आपलें बल वाढवीत आहेत, तरीहि त्यांना तें समजत नाहीं. हे आपल्या स्वार्थामध्यें तत्पर असतात. यांचे डोळे उघडत नाहींत व उघडतील तरी कशाला ! जर यांच्या अंत:करणांत थोडातरी परोपकार असेल व कर्तव्यकर्म करण्याची इच्छा असेल तर सर्व कांहीं होईल. पण यांना आपल्या खाण्यापिण्यापेक्षां व आपल्या चैनीपेक्षां दुसरें कांहींच सुचत नाहीं. हे लोक निंदेला भितात व सत्यमार्गापासून व सत्योपदेशापासून परावृत्त होतात, म्हणून संन्याशांनीं ( लोकैषणा ) लोकांत प्रतिष्ठा मिळविण्याची इच्छा, ( वित्तैषणा ) द्रव्य मिळविण्याची इच्छा व ( पुत्रैषणा ) पुत्राप्रमाणें शिष्यांवर मोहित होणें या तीन एषणांचा त्याग करून आपलें सत्य कर्तव्य काय आहे तें करण्यास सैदव तयार असलें पाहिजे. जोंपर्यंत या एषणांचा त्याग होणार नाहीं तोंपर्यंत संन्यास तरी कसा साधला जाईल ? अर्थात् पक्षपात सोडून वेदमार्गोपदेशाच्या योगानें जगताचें कल्याण करण्यामध्यें अहर्निश प्रवृत्त होणें हेंच संन्याशांचें मुख्य कर्तव्य आहे. आपल्या आश्रमाला योग्य असणारीं कर्तव्यें जर आपणाकडून होत नसलीं तर संन्यासी असें म्हणवून घेणें तरी योग्य आहे काय ? गृहस्थ आपल्या घरापुरत्या व्यवहारामध्यें जसा दक्ष असतो तसाच संन्यासी सर्व लोककल्याणाच्या व्यवहारामध्यें दक्ष असला पाहिजे. पहा, तुमच्या डोळयांदेखत हें पाखंड मत वाढत जात आहे. सर्व लोक ख्रिस्ती व मुसलमान होऊं लागले आहेत. अशा वेळीं आपल्या घराचें रक्षण व आपल्या बंधूंची उन्नति करणें हें तुमचें आद्य कर्तव्य आहे. तुम्ही मनांत आणाल तर अजूनहि उन्नति होणें शक्य आहे. जर या आर्यावर्ताची उन्नति करण्यास तुम्ही लवकर सुरवात केली नाहीं तर भविष्यकाळींहि त्याची उन्नति कशी होईल व इतर सर्व देशांची उन्नति तरी कशी होईल ? कारण सर्व मनुष्यांची ज्याच्या योगानें उन्नति होते तीं वेदादि शास्त्रें आर्यावर्तांत आहेत, म्हणून या आर्यावर्ताची उन्नति आधीं झाली पाहिजे. त्यासाठीं त्या शास्त्रांचें अध्ययन झालें पाहिजे; तरच इतर देशांची उन्नति या देशाच्या सहाय्यानें होऊं शकेल. शास्त्रांचें अध्ययन, पटनपाठनव्यवस्था, ब्रह्मचर्यपालन, व इतर आश्रमांची सुव्यवस्था यांच्या योगानें देशाची उन्नति होऊं शकते. चोहोंकडे नीट डोळे उघडून पहा म्हणजे तुम्हांला आढळेल कीं, चोहोंकडे पाखंडमतें प्रसृत होत आहेत. थोतांडाला मान मिळत आहे व ढोंगाचा बडेजाव होत आहे. साधूचें सोंग घेऊन दुकानदारी चालवीत आहेत व त्यांच्या सोंगाला लोक फसत आहेत. कोणी साधु स्त्रिया जवळ गेल्या म्हणजे पुत्र होण्याचा आशीर्वाद देत असतात. व त्यांच्या त्या आशीर्वादाला व हावभावाला भुलून पुष्कळ भोळया स्त्रिया त्यांच्या-जवळ हात जोडून पुत्र होण्याची याचना करतात ! सर्वांना बावाजी पुत्र होईल म्हणून सांगत पण सर्वांनाच कांहीं तो होत नसतो. ज्यांना होतो त्यांना असें वाटतें कीं, बावाजीच्या आशीर्वादानें हा मुळगा झाला आहे. त्यांना जर कोणी विचारलें कीं, सुसरी, कुत्री, गाढवी, कोंबडी वगैरे प्राण्यांला जे बच्चे होतात ते कोणत्या आशीर्वादानें होतात ? या प्रश्नावर त्यांच्याकडून कांहीं जबाब येणार नाहीं. कोणी साधु सांगतात कीं, आपण मेलेल्याला उठवतों किंवा जास्त

वेळ जगवितों; पण पुढें पहावें तों तोच मरण साधु पावतो ! पुष्कळ धूर्त लोक असें करतात कीं, मोठमोठे बुद्धिवान्ही त्यांना फसून जातात ! पुष्कळ ढोंगी लोक आपली प्रसिद्धि करण्यासाठीं अनेक युक्त्या योजतात. सात आठ ढोंगी लोक एकत्र होतात व जो त्यांच्यांत जास्त धूर्त असेल त्यास सिद्ध बनवून अरण्यांत बसवितात व आपण त्याचे शिष्य होऊन नगरांत हिंडतात व जो भेटेल त्यास असा असा महात्मा तुम्हीं पाहिला काय ? असे प्रश्न विचारतात. तेव्हां अर्थात्च लोकांत त्या साधूसंबंधानें जिज्ञासा उत्पन्न होते व त्याला ते विचारतात कीं तो कसा आहे ? तेव्हां ते त्यांस म्हणतात–अहो तो फारच सिद्ध पुरुष आहे. मनांतील गोष्टी जाणतो, जसें बोलतो तसें घडतें, तो मोठा योगी आहे, त्याचें दर्शन झाल्यानेंच आम्ही घरदार सोडून त्याचा शोध करीत हिंडत आहों. आम्ही ऐकलें आहे कीं, तो महात्मा या बाजूला आलेला आहे. हें ऐकून नागरिक त्यास म्हणतात कीं, जर तुम्हांला तो दिसला तर आम्हांला कळवावें. आम्हीहि त्यांचें दर्शन घेऊं व मनांतील गोष्टी विचारूं. अशा प्रकारें दिवसभर नगरांत हिंडून त्या साधूविषयीं चोहोंकडे आदर उत्पन्न करतात व रात्रीं एकत्र जमून खाऊन पिऊन आनंद करतात. असे दोन चार दिवस इकडे तिकडे हिंडून गांवभर त्याचा डंका वाजल्यानंतर हलकेच एखाद्या श्रीमंताला गांठून म्हणतात कीं, तो साधू येथून जवळच असलेल्या जंगलांत उतरला आहे. तुम्हांला दर्शन घ्यावयाचें असेल तर चला. जेव्हां तो येण्यास तयार होतो तेव्हां ते त्यास विचारतात कीं, तुम्हांला काय विचारावयाचें आहे ? तेव्हां कोणी म्हणतात कीं, पुत्र पाहिजे, कोणी धनाची इच्छा करतात, कोणी रोग निवारणाची अपेक्षा धरतात, तर कोणी शत्रु जिंकण्याची इच्छा करतात. अशा रीतीनें ते आपआपली इच्छा त्यांस कळवितात. नंतर त्या शिष्याबरोबर ते लोक बावांच्या दर्शनाला जातात. तेथें गेल्यावर ते शिष्य त्या दर्शनेच्छु लोकांस पूर्वसंकेताप्रमाणें बसवितात. साधु व शिष्य यामध्य पूर्वींच ठरलेलें असतें कीं, अमुक इच्छा करणाराला अमुक बाजूला बसवावें, त्याप्रमाणें धनाची इच्छा करणाराला डाव्या बाजूला, पुत्राची इच्छा करणाराला समोर, रोगनिवारणाची इच्छा करणाराला उजवीकडे व शुत्रुनिवारणाची इच्छा करणाराला पाठीमागून आणून बसलेल्या मंडळींच्या पाठीमागें बसवितात. जाण्याबरोबर सर्व लोक त्याला नमस्कार करतात, तेव्हां तो आपल्या गंभीर आवाजानें व आढ्यतेनें उच्च स्वरांत बोलतो कीं , 'काय येथें आमच्याजवळ पुत्र ठेवलेले आहेत ? कीं जो तूं आमच्याजवळ पुत्र होण्याची इच्छा धरून आला आहेस ?' त्याचप्रमाणें धनाची इच्छा करणाऱ्याकडे वळून म्हणतो कीं, 'तुम्ही धनाची इच्छा करून आलां आहां; पण बाबांनों ! फकीराजवळ धन कोठें आहे ? येथें काय रूपयांच्या थैल्या आहेत ? रोग्याकडे पाहून म्हणतो कीं, 'बाबारे! जा तूं वैद्याजवळ. मी कांहीं वैद्य नाहीं. वैद्य असेल तो तुझा रोग बरा करील.' याप्रमाणें बोलून ते धूर्त लोक आपली छाप मंडळीवर बसवितात. आलेल्या माणसाचा बाप रोगी असेल तर शिष्य आंगठ्यानें खुणा करतो, आई असेल तर तर्जनीनें, बंधु असेल तर मधल्या बोटानें स्त्री रोगी असेल तर अनामिकेनें व मुलगी असेल तर कनिष्ठिकेनें खूण करतात व त्या खुणांवरून तो धूर्त साधु जाणून त्या आलेल्यांस म्हणतो कीं, तुमचा, बाप, आई, भाऊ, स्त्री किंवा मुलगी रोगी आहे, वगैरे त्यांचें भाषण ऐकून ते जमलेले लोक मोहित होतात. तेव्हां ते शिष्य त्यांस विचारतात कीं, आम्ही सांगितल्याप्रमाणेंच येथे सिद्धि आहे कीं नाहीं ? तेव्हां ते म्हणतात की, होय बुवा ! जसें तुम्ही सांगितलें तसेंच आहे. तुम्ही आम्हांला यांचें दर्शन करवलें हे तुमचे आमच्यावर फार उपकार आहेत व आमचेहि महाभाग्य कीं, आमच्या डोळ्यांना ह्या महात्म्याचें दर्शन झालें. यांच्या दर्शनानें आम्ही कृतार्थ झालों तेव्हां ते शिष्य म्हणूं लागतात कीं, महात्मा मनोगति आहे. येथें फार दिवस राहील म्हणून नियम नाहीं. जर तुम्हांला यांचा आशीर्वाद घेणें असेल तर होईल तेवढी तनमनधनानें यांची सेवा करा. सेवा केतील तर मेवा मिळेल. जर हे साधु कोणावर प्रसन्न झाले तर काय वर देतील व कसें त्याचें कल्याण करतील तें सांगवत नाहीं. संतांची गति विचित्र आहे. नागरिक लोक हें ऐकून हर्षित होतात व आपआपल्या घरीं जातात व ते शिष्यहि त्यांच्या बरोबर जातात, कारण त्यांना भिती असते कीं, आपलें कपट जर कोणी फोडलें तर फार पंचाईत होईल. म्हणून ते शिष्य त्या लोकामध्यें व त्यांच्या मित्रांमध्यें या साधूविषयीं जितका आदरभाव उत्पन्न होईल तितका करतात. अशा रीतीच्या त्यांच्या प्रयत्नानें गतानुगतिक लोकामध्यें त्याचा गौरव होतो व त्याच्या दर्शनास झुंडीच्या झुंडी जाऊं लागतात ! जेव्हां अनेक लोक येऊं लागतात तेव्हां साधु मौन धरून

बसतो व ते शिष्य लोकांना म्हणतात कीं, महाराजांना फार त्रास देऊं नका. जर त्यांत एखादा कोणी धनाढ्य असेल तर त्याच्या मनांत काय आहे तें जाणून पुर्वसंकेताच्या स्थळीं नेऊन त्याला बसवतात व त्या साधूला संकेत करतात. तेव्हां तो त्याला मनांतील सांगतो, त्यामुळें एकदम सर्व लोक आश्चर्यचकित होतात व साधुमहाराजांना कोणी बर्फी, पेढे, पैसे, आणा, रुपया, मोहोर, कपडा, पुतळया वगैरेंची भेट अर्पण करतात. कोणी शिधा देतात व आशा रीतीनें त्यांच्या चैनीला प्रारंभ होतो. लोकांमध्यें विश्वास उत्पन्न करून पुष्कळ लुटतात. द्रव्य घेऊन त्यांना म्हणतात की 'बाबारे ! जर तुझी भक्ति असेल तर तुला पुत्र होईल.' असे धूर्त व ठग लोक या जगांत फार आहेत, यांची विद्वानाला तेव्हांच परीक्षा होते. पण जे साधारण पुरुष असतात त्यांना त्यांचें हें कपट समजत नाहीं. म्हणून त्यांना सत्संग व विद्याध्ययन यांची फार आवश्यकता असते. विद्वत्ता व सारासारविचार ज्याला असतो त्याला कोणीही फसवूं शकत नाहीं. ज्याचा ज्ञाननेत्र उघडा असतो तो स्वतःचा तर बचाव करतोच पण तो इतरांचाहि बचाव करतो. म्हणून सर्वांनीं ज्ञानार्जन करावें. प्रथम वयांत उत्तम विद्या शिकावी, विद्वान् व्हावें व सत्संगति धरावी. दुष्टांची संगति धरली, व जवळ विद्या नसली म्हणजे फार दुःख होत असतें व अवनति होते. तात्पर्य ज्ञानाचें महत्व फार आहे. यासाठीं तें सर्वांनीं मिळवावें.

**न वेत्ति यो यस्य गुणप्रकर्षं स तस्य निंदां सततं करोति ॥ यथा किराती करिकुंभजाता मुक्ताः परित्यज्य बिभर्ति गुंजाः ॥ वृ. चा. अ. ११ । १२ ॥**

'जो ज्याचा गुण जाणत नाहीं, तो त्याची सतत निंदा करतो. जसे जंगली भिल्ल लोक हत्तीच्या गंडस्थळांतील मोत्यें टाकून गुंजांच्याच माळा आपल्या गळयांत घालतात.' तात्पर्य, मनुष्यें गुणज्ञ झालीं पाहिजेत. गुणज्ञानाशिवाय उन्नति होणें शक्य नाहीं. यासाठीं माणसांनीं विद्वान्, ज्ञानी, धार्मिक व सत्पुरुष यांच्या संगतीनें ज्ञान मिळवून योगी, पुरुषार्थी, जितेंद्रिय, ज्ञानी व सुशील होऊन धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे पुरुषार्थ साधून आनंदाचा उपभोग घ्यावा.

याप्रमाणें या समुल्लासामध्यें आर्यावर्तांतील मतमतांतरांचें दिग्दर्शन केलें आहे. त्यावरून खरा धर्म कोणता व पाखंडमत कोणतें याचें ज्ञान विद्वानांनीं करून घ्यावें. आतां येथें आर्यावर्तांत पूर्वीं कसकसे राजे होऊन गेले त्यांची थोडीशी माहिती दिलेली आहे.

**राजवंशः**—प्राचीनकाळीं या आर्यावर्तांत होऊन गेलेल्या युधिष्ठिरापासून तों मध्यमकाळांत झालेल्या यशपालापर्यंत राजांचें संक्षिप्त टिप्पण करावयाचें योजलें आहे. याचा विद्वान् वाचकांस इतिहास संशोधनाच्या कामीं उपयोग होईल अशी आशा आहे. स्वायंभुव मनूपासून युधिष्ठिरापर्यंत झालेल्या राजांचा इतिहास महाभारतादि ग्रंथामध्यें आलेला आहे. तो पाहिला असतां प्राचीन आर्यराजांचें जीवन-चरित्र विद्वान् वाचकांस समजण्यासारखें आहे.

ही येथें देण्यांत येत असलेली माहिती, राजपुतान्यांतील मेवाड (उदयपुर चितोडगड) राज्यांतील श्रीनाथद्वार नामक स्थानांतून जी हरिश्चन्द्रिका व मोहनचंद्रिका नामक पाक्षिक पत्रें निघत होतीं, त्यांतून घेतलेली आहे. याप्रमाणें विद्वान् वाचकांनीं ग्रंथाचें नीट परिशीलन करून जर विश्वसनीय माहिती प्रसिद्ध केली तर लोकांवर फार उपकार होणार आहेत. वरील मासिकांच्या प्रकाशकानें ही खालील माहिती विक्रम संवत् १७८२ मध्यें लिहिल्या गेलेल्या एका प्राचीन पुस्तकांतून घेतली व ती आपल्या मासिकांमध्यें संवत् १९३६ मार्गशीर्ष शुक्लपक्षाच्या १९। २० या दोन अंकांत प्रसिद्ध केली होती. तिच्यावरून आम्ही येथें ती देत आहों :—

**आर्यावर्तदेशीयराजवंशावली**—इंद्रप्रस्थामध्यें आर्यलोकांनीं श्रीमन्महाराज युधिष्ठिरापासून यशपालापर्यंत जें राज्य केलें, त्या मुदतींत एकशेंचौव्वीस राजे गादीवर बसले; व त्यांचें एकंदर राज्य ४१५७ वर्षें ९ महिने, १४ दिवस इतकें झालें. त्याचा क्रमः—

श्रीमन्महाराजा युधिष्ठिराच्या वंशांत तीस पिढ्या झाल्या, त्यांनीं १७७० वर्षें ११ महिने १० दिवस इतक्या मुदतीपर्यंत राज्य केलें :—

| आर्यराजा | | वर्ष | महिने | दिवस | आर्यराजा | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजा युधिष्ठिर | ३६ | ८ | २५ | १६ सुचिरथ | ४२ | ११ | २ |
| २ | राजा परिक्षित् | ६० | ० | ० | १७ शूरसेन (दुसरा) | ५८ | १० | ८ |
| ३ | राजा जनमेजय | ८४ | ७ | २३ | १८ पर्वतसेन | ५५ | ८ | १० |
| ४ | राजा अश्वमेध | ८२ | ८ | २२ | १९ मेधावी | ५२ | १० | १० |
| ५ | द्वितीयराम | ८८ | २ | ८ | २० सोनचीर | ५० | ८ | २१ |
| ६ | छत्रमल | ११ | ११ | २७ | २१ भीमदेव | ४७ | ९ | २० |
| ७ | चित्ररथ | ७५ | ३ | १८ | २२ नृहरिदेव | ४५ | ११ | २३ |
| ८ | दुष्टशैल्य | ७५ | १० | २४ | २३ पूर्णमल | ४४ | ८ | ७ |
| ९ | राजा उग्रसेन | ७८ | ७ | १२ | २४ करदवी | ४४ | १० | ८ |
| १० | राजा शूरसेन | ७८ | ७ | २१ | २५ अलमीक | ५० | ११ | ८ |
| ११ | भुवनपति | ६१ | ५ | ५ | २६ उदयपाल | ३८ | ९ | ० |
| १२ | रणजित् | ६५ | १० | ४ | २७ दुवनमल | ४० | १० | २६ |
| १३ | ऋक्षक | ६४ | ७ | ४ | २८ दमात | ३२ | ० | ० |
| १४ | सुखदेव | ६२ | ० | २५ | २९ भीमपाल | ५८ | ५ | ८ |
| १५ | नरहरिदेव | ५१ | १० | २ | ३० क्षेमक | ४८ | ११ | २१ |

राजा क्षेमकाच्या विश्रवा नामक प्रधानानें त्याला मारून आपण राज्य करण्यास सुरवात केली. त्याच्या वंशांत १४ पिढ्या झाल्या व त्यांनीं ५०० वर्षे ३ महिने १७ दिवस राज्य केलें; त्याचा विस्तार :—

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विश्रवा | १७ | ३ | २९ | ८ कद्रुत | ४२ | ९ | २४ |
| २ | पुरसेनी | ४२ | ८ | २१ | ९ सज्ज | ३२ | २ | १४ |
| ३ | वीरसेनी | ५२ | १० | ७ | १० अमरचूड | २७ | ३ | १३ |
| ४ | अनंगशायी | ४७ | ८ | २३ | ११ अमीपाल | २२ | ११ | २५ |
| ५ | हरिजित् | ३५ | ९ | १७ | १२ दशरथ | २५ | ४ | १२ |
| ६ | परमसेनी | ४४ | २ | २३ | १३ वीरसाल | ३१ | ८ | ११ |
| ७ | सुखपाताळ | ३० | २ | २१ | १४ वीरसालसेन | ४७ | ० | १४ |

राजा वीरसालसेनाला त्याच्या वीरमहा नामक प्रधानानें मारून स्वत: राज्य करण्यास सुरवात केली. त्याच्या वंशांत १६ पुरुष झाले व त्यांनीं ४४५ वर्षे ५ महिने ३ दिवस राज्य केलें :—

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजा वीरमहा | ३५ | १० | ८ | ९ तेजपाल | २८ | ११ | १० |
| २ | अजितसिंह | २७ | ७ | १९ | १० मणिकचंद्र | ३७ | ७ | २१ |
| ३ | सर्वदत्त | २८ | ३ | १० | ११ कामसेनी | ४२ | ५ | १० |
| ४ | भुवनपति | १५ | ४ | १० | १२ शत्रुमर्दन | ८ | ११ | १३ |
| ५ | वीरसेन | २१ | २ | १३ | १३ जीवनलोक | २८ | ९ | १७ |
| ६ | महीपाल | ४० | ८ | ७ | १४ हरिराव | २६ | १० | २९ |
| ७ | शत्रुशाल | २६ | ४ | ३ | १५ वीरसेन (दुसरा) | ३५ | २ | २० |
| ८ | संघराज | १७ | २ | १० | १६ आदित्यकेतु | २३ | ११ | १३ |

राजा आदित्यकेतूला धन्धरराजा नामक प्रयागच्या राजानें मरून त्याचें राज्य आपण बळकावलें. त्याच्या वंशांत ९ पुरुष झाले व त्यांनीं ३७४ वर्षे ११ महीने १६ दिवस राज्य केलें:—

| | आर्यराजा | वर्ष | महिने | दिवस | आर्यराजा | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजा धंधर | ४२ | ७ | २४ | ६ जीवनराज | ४५ | २ | ५ |
| २ | महर्षि | ४१ | २ | २९ | ७ रुद्रसेन | ४७ | ४ | २८ |
| ३ | सनरच्ची | ५० | १० | १९ | ८ आरीलक | ५२ | १० | ८ |
| ४ | महायुद्ध | ३० | ३ | ८ | ९ राजपाल | ३६ | ० | ० |
| ५ | दुरनाथ | २८ | ५ | २५ | | | | |

राजा राजपालाला सामंत महान्पालानें मारून १४ वर्षे राज्य केलें व त्याला उज्जैनच्या (अवन्तिका) विक्रमादित्य राजानें लढाईमध्यें मारून त्याचें राज्य घेतलें. यानें ९३ वर्षे राज्य केलें. राजा विक्रमादित्याला पैठणच्या शालिवाहनाच्या समुद्रपाल योगी नामक उमरावानें मारून त्याचें राज्य घेतलें. त्याच्या वंशांतील १६ पुरुषांनीं ३७२ वर्षे ४ महिने व २७ दिवस राज्य केलें:—

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | समुद्रपाल | ५४ | २ | २० | ९ अमृतपाल | ३६ | १० | १३ |
| २ | चंद्रपाल | ३६ | ५ | ४ | १० बलीपाल | १२ | ५ | २७ |
| ३ | सहायपाल | ११ | ४ | ११ | ११ महीपाल | १३ | ८ | ४ |
| ४ | देवपाल | २७ | १ | २८ | १२ हरिपाल | १४ | ८ | ४ |
| ५ | नरसिंहपाल | १८ | ० | २० | १३ सीसपाल | ११ | १० | १३ |
| ६ | सामपाल | २७ | १ | १७ | १४ मदनपाल | १७ | १० | १९ |
| ७ | रघुपाल | २२ | ३ | २५ | १५ कर्मपाल | १६ | २ | २ |
| ८ | गोविंदपाल | २७ | १ | १७ | १६ विक्रमपाल | २४ | ११ | १३ |

राजा विक्रमपालानें पश्चिमदेशचा, राजा मुलुखचंदाबरोबर लढाई केली व त्या लढाईंत मुलुखचंदानें विक्रमपालाला मारून इंद्रप्रस्थाचें राज्य हस्तगत केलें. त्याच्या वंशांत १० पुरुष झाले व त्यांनीं १९१ वर्षे १ महिना १६ दिवस राज्य केलें:—

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुलुखचंद | ५४ | २ | १० | ६ कल्याणचंद | १० | ५ | ४ |
| २ | विक्रमचंद | १२ | ७ | १२ | ७ भीमचंद | १६ | २ | ९ |
| ३ | अमीचंद* | १० | ० | ५ | ८ लोवचंद | २६ | ३ | २२ |
| ४ | रामचंद | १३ | ११ | ८ | ९ गोविंदचंद | ३१ | ७ | १२ |
| ५ | हरिचंद | १४ | ९ | २४ | १० राणी पद्मावती + | १ | ० | ० |

राणी पद्मावती एक वर्ष राज्य केल्यानंतर मरण पावली. तिला संतान नव्हतें; तेव्हां मंत्रीमंडळानें एकमतानें विचार करून बैरागी हरिप्रेमाला गादीवर बसविलें. त्याच्या वंशांत ४ पुरुष झाले व त्यांनीं ५० वर्ष २१ दिवस राज्य केलें:—

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हरिप्रेम | ७ | ५ | १६ | ३ गोपालप्रेम | १५ | ७ | २८ |
| २ | गोविंदप्रेम | २० | २ | ८ | ४ महावाहु | ६ | ८ | २९ |

राजा महाबाहु आपल्या राज्याचा त्याग करून वनामध्यें तप करण्यास चालता आला, हें बंगालच्या आधिसेन राजानें ऐकून, त्यानें इंद्रप्रस्थावर चाल केली व आपण तेथें राज्य करूं लागला. त्याच्या वंशांत १२ पुरुषांनीं १५१ वर्षे ११ महिने २ दिवस राज्य केलें:—

* याला कांहीं इतिहासांत माणकचंद असेंहि लिहिलें आहे. + ही पद्मावती गोविन्दराजाची राणी होय.

| | आर्यराजा | वर्ष | महिने | दिवस | आर्यराजा | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजा आधिसेन | १८ | ५ | २१ | ७ कल्याणसेन | ४ | ८ | २१ |
| २ | विलावलसेन | १२ | ४ | २ | ८ हरिसेन | १२ | ० | २५ |
| ३ | केशवसेन | १५ | ७ | १२ | ९ क्षेमसेन | ८ | ११ | १५ |
| ४ | माधवसेन | १२ | ४ | २ | १० नारायणसेन | २ | २ | २९ |
| ५ | मयूरसेन | २० | ११ | २७ | ११ लक्ष्मीसेन | २६ | १० | ० |
| ६ | भीमसेन | ५ | १० | ९ | १२ दामोदरसेन | ११ | ५ | १९ |

राजा दामोदरसेननें आपल्या उमरावांला फार दुःख दिलें तेव्हां त्याला कंटाळून दीपसिंह नामक उमरावानें सैन्य जमवून राजाबरोबर लढाई केली व राजाला ठार मारलें व त्याचें राज्य आपण करण्यास सुरवात केली. त्याच्या वंशांत पुढें ९ पुरुषांनीं १०७ वर्षे ९ महिने २२ दिवस राज्य केलें:—

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दीपसिंह | १७ | १ | २६ | ४ नरसिंह | ४५ | ० | १५ |
| २ | राजसिंह | १४ | ५ | ० | ५ हरिसिंह | १३ | २ | २९ |
| ३ | रणसिंह | ९ | ८ | ११ | ६ जीवनसिंह | ८ | ० | १ |

राजा जीवनसिंहानें कांहीं विशिष्ट हेतूनें आपलें सैन्य उत्तरेकडे पाठविले आहे असें पाहून वैराटच्या पृथ्वीराज चव्हाणानें त्यावर एकदम हल्ला करून त्याचें राज्य घेतलें. त्याच्या वंशांतील ५ पुरुषांनीं इंद्रस्थावर ८६ वर्षे २० दिवस राज्य केलें:—*

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पृथ्वीराज | १२ | २ | १९ | ४ उदयपाल | ११ | ७ | ३ |
| २ | अजयपाल | १४ | ५ | १७ | ५ यशपाल | ३६ | ४ | २७ |
| ३ | दुर्जनपाल | ११ | ४ | १४ | | | | |

राजा यशपालावर गिझनीच्या सुलतान शहाबुद्दीन घोरीनें चाल केली व राजा यशपालाचा पराभव करून त्याला प्रयागच्या किल्ल्यांत संवत् १२४९ मध्यें कैद करून ठेविलें व दिल्लीचें राज्य आपण बळकावलें त्याच्या पुढें मुसलमान ५३ राजे गादीवर बसले व त्यांनीं ७५४ वर्षे १ महिना १७ दिवस राज्य केलें. हा अर्वाचीन इतिहास आधुनिक ग्रंथांत सविस्तर आलेला आहे.

याप्रमाणें येथें अकरावा समुल्लास पुरा झाला. यापुढील बाराव्या समुल्लासामध्यें बौद्ध व जैन मताविषयीं लिहूं.

**इति सुभाषाविभूषित आर्यावर्तीयमतखंडनमंडनविषय एकादशः समुल्लासः संपूर्णः ॥११**

---

* अन्य इतिहासांमध्यें असें आहे कीं, महाराज पृथ्वीराजावर सुलतान शहाबुद्दीन घोरीनें चाल केली, त्याचा पृथ्वीराजानें अनेक वेळां प्रतिकार केला. पण शेवटीं संवत् १२४९ मध्यें आपसांतील वैरामुळें पृथ्वीराजाचा पराभव झाला. त्याला घोरीनें पकडून त्याचे डोळे काढले व त्याला आपल्या देशांत नेलें व नंतर दिल्लीचें राज्य आपण करूं लागला. दिल्लीस ४५ मुसलमान बादशहांनीं ६१३ वर्षेपर्यंत राज्य केलें. इ०

# (२) अनुभूमिका

जेव्हां आर्यावर्तांतील मनुष्यांमध्यें सत्यासत्याचा यथावत् निर्णय करणाऱ्या वेदविद्येचा प्रचार बंद झाला, अविद्या पसरली व मतमतांतरें उत्पन्न झालीं, तेव्हांच जैनीमतादि अविद्यायुक्त मतांचा प्रचार झाला पहा. प्राचीन काळच्या रामायण व महाभारतादि ग्रंथांमध्यें जैनी लोकांचें नांवहि आढळत नाहीं; पण जैनी लोकांच्या ग्रंथांमध्यें रामकृष्णादिकांच्या वर्णनात्मक गाथा विस्तारपूर्वक लिहिलेल्या आहेत. यावरून हें उघड होतें कीं, हें मत या रामायणादि ग्रंथांच्या नंतरचें आहे; कारण जैनी लोकांच्या लिहिण्याप्रमाणें जर त्यांचें मत फार प्राचीन असतें तर तें या इतिहास ग्रंथांत अंशतः तरी आलें असतें. ज्या अर्थीं या ग्रंथांत त्याचें नांवसुद्धां नाहीं. त्या अर्थीं या ग्रंथांच्या नंतर तें मत सुरूं झालें असेंच ठरतें. कोणी म्हणतील कीं, जैनी लोकांच्या ग्रंथांतील कथा घेऊन वाल्मीकीयआदि ग्रंथ बनविले असतील; तर त्यांना असें विचारावें कीं, तुमच्या ग्रंथांचा वाल्मीकीयआदि ग्रंथांमध्यें नामनिर्देश सुद्धां कां नाहीं ? व तुमच्या ग्रंथामध्यें त्यांच्या ग्रंथांचा निर्देश कां आहे ? पित्याच्या जन्माला मुलगा पाहूं शकतो काय ? केव्हांहि नाहीं. यावरून उघड होतें कीं, जैन व बौद्ध मतें शैवशाक्तादि मतांच्या पाठीमागून सुरूं झालीं आहेत. आतां या बाराव्या समुल्लासामध्यें जें जें जैनीयांच्या ग्रंथाविषयीं लिहिलें आहे, तें तें त्यांच्या ग्रंथांतील प्रमाणें देऊन लिहिलें आहे. यामध्यें जैनी लोकांनीं वाईट मानण्याचें काहींच कारण नाहीं; कारण यांच्या मताविषयीं जें आम्हीं लिहिलें आहे, तें केवळ सत्यासत्याचा निर्णय करण्यासाठींच लिहिलें आहे, कोणाशी विरोध किंवा कोणाची हानि करण्याच्या इराद्यानें नव्हे. जेव्हां हा लेख जैन, बौद्ध व अन्यलोक पाहतील, तेव्हां सर्वांना सत्यासत्याचा निर्णय करण्याचा विचार करतां येईल व लेखहि लिहितां येतील व निर्णयहि होईल. जोंपर्यंत वादी व प्रतिवादी बनून प्रीतिपूर्वक वाद किंवा लेख केला नाहीं, तोंपर्यंत सत्यासत्याचा निर्णय होऊंच शकत नाहीं. जोंपर्यंत विद्वानामध्येंच सत्यासत्याचा निर्णय होत नाहीं, तोंपर्यंत अविद्वानांला महान अंधकारांत पडून दुःख भोगावें लागतें. यासाठीं सत्याचा जय व असत्याचा क्षय व्हावा म्हणून मित्रतापूर्वक वाद व लेख करणें हें आम्हां मनुष्यांचें मुख्य कर्तव्य आहे. जर असें न होईल तर मनुष्यांची उन्नति केव्हांहि होणार नाहीं. शिवाय हा बौद्ध व जैन मताचा विषय या लोकांशिवाय अन्य लोकांनाहि अपूर्व लाभ व बोध करणारा होईल; कारण हे लोक आपाल्या पुस्तकांना कोणाच्या नजरेस पाडीत नाहींत, कोणाला दाखवीत व शिकवीतहि नाहींत. मला मुंबईच्या आर्यसमाजाचे म० सेवकराम कृष्णदास नामक मंत्री यांच्या परिश्रमानें हे ग्रंथ प्राप्त झाले आहेत. त्याचप्रमाणें काशीमधील यंत्रालयामध्यें जैनप्रभाकर व मुंबईमध्यें प्रकरणरत्नाकर ग्रंथ छापल्यामुळें जैनी लोकांचें मत पाहणें लोकांना सुलभ झालें आहे. बरें, आपल्या मताचीं पुस्तकें आपणच पहावीं व दुसऱ्या कोणाला दाखवूं नये ही काय विद्वानांची गोष्ट आहे यावरून उघड होतें कीं, या ग्रन्थांच्या कर्त्यांनाच प्रथमतः ही शंका होती कीं, या ग्रन्थामध्यें असंभव गोष्टी आहेत, जर दुसऱ्या मतवाल्यांनीं पाहिले तर ते खंडन करतील व जर आमच्या मतवाल्यांनीं दुसऱ्या मताचे ग्रन्थ पाहिले तर आमच्या मतावरची त्यांची श्रद्धा नष्ट होईल. असो जें होईल तें होवो. ज्यांना आपला दोष दिसत नाहीं अशीं पुष्कळ मनुष्यें असतात पण ते दुसऱ्याचे दोष काढण्यास सदैव उद्युक्त असतात, हें मात्र योग्य नाहीं. प्रथमतः आपले दोष पाहून व ते काढून टाकून मग दुसऱ्यांचे दोष पहावे व ते काढण्याच्या खटपटीस लागावें. असो. आतां ह्या बौद्ध व जैनी लोकांच्या मताचा विषय आम्ही सर्व सज्जनांच्या पुढें सादर करीत आहों. यावर यथायोग्य विचार त्यांनीं करावा.

**किमधिकलेखेन बुद्धिमद्वर्य्येषु ॥**

ओ३म्

# अथ द्वादशसमुल्लासारम्भः

**अथ नास्तिकमतान्तर्गत-चार्वाक- बौद्ध-जैनमत**

**खण्डनमनण्डनविषयात् व्याख्यास्यामः ॥**

(१) **चार्वाकमतपरीक्षणः**—कोणी एक बृहस्पति नामक मनुष्य होता. तो वेद, ईश्वर व यज्ञादि उत्तम कर्मे यांनाहि मानीत नव्हता. पहा त्याचें मतः—

**यावज्जीवं सुखं जीवेन्नास्ति मृत्योरगोचरः ॥ भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥**

'कोणीहि मनुष्य प्राणी मृत्यूला अगोचर नाहीं, अर्थात् सर्वांना मरणें चुकत नाहीं, म्हणून जोंपर्यंत शरीरांत जीव आहे तोंपर्यंत सुखानें रहावें. जर कोणी म्हणाला कीं, धर्माचरणानें शरीराला कष्ट होत असतें, व जर धर्म सोडला तर पुनर्जन्मांत फार दुःख भोगावें लागतें; तर त्यावर चार्वक असें उत्तर देतो कीं, अहो भोळे लोकहो ! मेल्यानंतर शरीर भस्म होऊन जातें, जो खाऊन पिऊन सुखी झाला असेल तो पुनः संसारांत येणार नाहीं; म्हणून जितकें होईल तितकें करून आनंदानें रहावें. हाच लोक सत्य आहे; परलोक मुळींच नाहीं. पहा पृथ्वी, जल, अग्नि, वायु या चार भूतांच्या परिणामानें हें शरीर बनलें आहे. यामध्यें यांच्या मिश्रणानेंच चैतन्य उत्पन्न होतेः ज्याप्रमाणें मादक द्रव्य खाण्यापिण्यानें नशा येते, त्याचप्रमाणें शरीराच्या उत्पत्तीबरोबर जीव उत्पन्न होऊन शरीराचा नाश पावतो, तेव्हां पापपुण्याचें फल कोणाला होणार ?

**तच्चैतन्यविशिष्टदेह एव आत्मा देहातिरिक्त आत्मनि प्रमाणाभावात् ॥**

'या शरीरामध्यें चार भूताच्या संयोगानें जीवात्मा उत्पन्न होऊन त्या भूतांचा वियोग झाल्याबरोबर त्याचा नाश होतो. कारण, मेल्यानंतर कोणताहि जीव प्रत्यक्ष होत नाहीं. आम्हीं एका प्रत्यक्षालाच मानतों; कारण प्रत्यक्षावांचून अनुमानादिक होतच नाहींत. म्हणून मुख्य प्रत्यक्षाच्यापुढें अनुमानादि गौण असल्यामुळें त्यांचें आम्हीं ग्रहण करीत नाहीं, सुंदर स्त्रीच्या आलिंगानानें आनंद करणें हें पुरुषार्थाचें फल आहे.' (**उत्तर**) हीं पृथ्व्यादि भूतें जड असल्यामुळें त्यांच्यापासून चैतन्याची उत्पत्ति केव्हांहि होऊं शकत नाहीं. ज्याप्रमाणें सध्यां मातापित्याच्या संयोगानें देहाची उत्पत्ति होते, त्याचप्रमाणें आदि सृष्टीमध्यें मनुष्यादि शरीरांची आकृति परमेश्वराच्या करणीवांचून कधींहि होऊं शकत नाहीं. मद (नशा) येतो त्याप्रमाणें चेतन उत्पन्न होऊन नाश पावत नाहीं. कारण मद हा चेतनालाच होतो तसा तो जडाला होत नाहीं. पदार्थ नष्ट अर्थात अदृष्ट होतात; परंतु त्यांचा अभाव होत नाहीं. याप्रमाणें अदृश्य होत असल्यामुळें, जीवाचाहि अभाव मानतां नये. जेव्हां जीवात्मा सदेह होत असतो तेव्हां तो प्रकट होतो, व जेव्हां शरीराला सोडतो तेव्हां हें शरीर मृत्यूला प्राप्त होत असल्यामुळें, पूर्वीप्रमाणें चेतनायुक्त होऊं शकत नाहीं. हीच गोष्ट बृहदारण्यकांत सांगितली आहे—

**नाहं मोहं ब्रवीमि अनुच्छित्तिधर्मायमात्मेति ॥**

याज्ञवल्क्य म्हणतात कीं, हे मैत्रेयि ! कीं मोहानें भाषण करीत नाहीं. पण आत्मा अविनाशी आहे. आत्म्याच्या योगानेंच शरीर चेष्टा करीत असतें. जेव्हां जीव शरीरांतून पृथक होतो, तेव्हां शरीरांत ज्ञान कांहींहि राहत नाहीं. जर देहाहून आत्मा पृथक् नसेल तर ज्याच्या संयोगानें चेतनता व वियोगानें जडता होते तो देहापासून पृथक् आहे. ज्याप्रमाणें डोळे सर्वांना पाहतात पण ते आपणालाच पाहूं शकत नाहींत, त्याचप्रमाणें प्रत्यक्षाचें ज्ञान घेणारा आपणास प्रत्यक्ष करूं शकत नाहीं. ज्याप्रमाणें आपल्या डोळयांनीं सर्व घटपटादि पदार्थ पाहत असतों त्याचप्रमाणें डोळयांना आपल्या ज्ञानानें पाहत असतो. जो द्रष्टा असतो तो द्रष्टाच राहतो, दृश्य केव्हांहि होत नाहीं. ज्याप्रमाणें आधारावांचून आधेय,

कारणावांचून कार्य, अवयवीवांचून अवयव व कर्त्यावांचून काम राहूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें कर्त्यावांचून प्रत्यक्ष कसें होऊं शकेल ? जर तुम्हीं सुंदर स्त्रीशीं समागम करणें हेंच पुरुषार्थाचें फल मानाल तर तें क्षणिक सुख आहे, व त्यापासून पुढें दुःख होतें तेंहि पुरुषार्थाचेंच फल होईल, जर असें आहे तर स्वर्गाची हानि होत असल्यानें दुःख भोगावें लागेल. जर दुःख सोडण्याचा व सुख वाढवण्याचा यत्न सदोदित केला पाहिजे असें तुम्ही म्हणत असाल तर तें मुक्तिसुखच नव्हे, असें होईल. म्हणून तें खऱ्या पुरुषार्थाचें फल नव्हें. (चार्वाक०) जे दुःखसंयुक्त सुखाचा त्याग करतात ते मूर्ख होत. जसें धान्यार्थी धान्याचें ग्रहण व भुसाचा त्याग करतात, तसाच संसारामध्यें बुद्धिमानांनीं सुखाचें ग्रहण व दुःखाचा त्याग करावा. या प्रत्यक्ष लोकांतील प्राप्त होत असलेलें सुख सोडून व अप्राप्त स्वर्गसुखाची इच्छा धरून जे वेदोक्त अग्निहोत्रादि कर्म, उपासना व ज्ञानकाण्डाचें अनुष्ठान परलोकासाठीं करतात ते अज्ञानी होत. ज्या अर्थी परलोकच नाहीं त्या अर्थीं त्याची आशा करणें मूर्खपणाचें काम आहे, कारण कीं:—

अग्निहोत्रं त्रयो वेदास्त्रिदण्डं भस्मगुण्ठनम् ॥ बुद्धिपौरुषहीनानां जीविकेति बृहस्पतिः ॥

चार्वाकमतप्रचारक बृहस्पति म्हणतो कीं, अग्निहोत्र, तीन वेद, तीन दण्ड व भस्मधारण हे निर्बुद्ध व पुरुषार्थरहित लोकांनीं आपल्या जीविकेसाठीं निर्माण केले आहेत. कंटकादिकांपासून जो त्रास होतो तो नरक, लोकसिद्ध राजा हाच परमेश्वर व देहाचा नाश होणें हा मोक्ष आहे. अन्य कांहीं नाहीं. (उ०) विषयरूपी सुखालाच पुरुषार्थाचें फल मानून विषयदुःखनिवारणामध्येंच कृतकृत्यता व स्वर्ग मानणें हें मूर्खपण आहे. अग्निहोत्रादि यज्ञांनीं वायु, वृष्टि, जल यांची शुद्धि होऊन आरोग्य वाढतें. व त्यापासून धर्म, अर्थ, काम व मोक्ष सिद्ध होऊं शकतात हें न जाणतां वेद, ईश्वर व वेदोक्तधर्म यांची निंदा करणें हें धूर्तांचें काम आहे. जें त्रिदंडी व भस्मधारण यांचें यांनें खंडन केलें तें ठीक आहे. जर कांटे लागणें हा नरक आहे तर त्यापेक्षां महारोग होणें हा नरक नाहीं कसा ? तसेच राजा हा ऐश्वर्यवान् व प्रजापालनतत्पर असल्यास त्याला श्रेष्ठ मानणें हें योग्य आहे. पण जर एखादा राजा अन्यायी व पापी असला तर त्यालाहि परमेश्वर मानणें हें निव्वळ वेडेपण आहे. शरीराचा नाश होणें हाच जर मोक्ष असेल तर गाढव व कुत्रे यांच्यात व तुमच्यांत भेद काय ? फक्त आकृतीचाच भेद आहे. ( चार्वाक )

अग्निरुष्णो जलं शीतं शीतस्पर्शस्तथानिलः ॥ केनेदं चित्रितं तस्मात्स्वभावात्तद्व्यवस्थितिः ॥ १ ॥
न स्वर्गो नापवर्गो वा नैवात्मा पारलौकिकः ॥ नैव वर्णाश्रमादीनां क्रियाश्च फलदायिकाः ॥२॥
पशुश्चेन्निहतः स्वर्गं ज्योतिष्टोमे गमिष्यति ॥ स्वपिता यजमानेन तत्र कस्मान्न हिंस्यते ॥ ३ ॥

(१) चार्वाक, आभरणक, बौद्ध व जैन हे सर्व जगाची उत्पत्ति स्वभावापासून मानतात. जे जे स्वाभाविक गुण आहेत, त्यांच्या योगानें द्रव्याचा संयोग होऊन सर्व पदार्थ बनत असतात व जगाचा कर्ता कोणीही नाहीं. (२) हें मत चार्वाकाचें आहे पण बौद्ध व जैन हे लोक परलोक व जीवात्मा यांना मानतात; याला चार्वाक मानीत नाहींत. कांहीं कांहीं गोष्टी सोडून अन्यमतें या तीनहि लोकांची एकसारखींच आहेत. कोणताहि आत्मा स्वर्गामध्यें, नरकामध्यें, व परलोकामध्यें जाणारा नाहीं, व वर्णाश्रम कर्मांपासूनहि कांहीं फळ होत नाहीं. जर यज्ञामध्यें पशु मारल्यानें व त्यांचा होम केल्यानें तो स्वर्गाला जात असेल तर यजमानानें आपल्या पितादिकांना मारून त्यांचा होम करून स्वर्गाला कां पाठवूं नये ? तसेंच—

मृतानामपि जन्तूनां श्राद्धं चेत्तृप्तिकारणम् ॥ गच्छतामिह जन्तूनां व्यर्थं पाथेयकल्पनम् ॥ ४ ॥
स्वर्गस्थिता यदा तृप्तिं गच्छेयुस्तत्र दानतः ॥ प्रासादस्योपरिस्थानामत्र कस्मान्न दीयते ॥ ५ ॥

जर मेलेल्या जीवांना श्राद्ध व तर्पण तृप्तिकारक होतें, तर परदेशांत जाणारे मार्गामध्यें निर्वाहार्थ अन्नवस्त्र व धनादिक कां घेऊन जातात ? कारण जसें मेलेल्याच्या नांवानें अर्पण केलेले पदार्थ स्वर्गामध्यें पोंचत असतात, तसें परदेशांत गेलेल्यांना त्यांच्या आप्त इष्टांनीं आपल्या घरीं त्यांच्या नांवानें आर्पण केले तर ते देशांतरीं जाऊन पोंचावे. पण तसे ज्या अर्थी पोंचत नाहींत त्या अर्थीं स्वर्गामध्यें तरी ते कसे पोचूं शकतात? ॥४॥ जर मृत्युलोकामध्यें केलेल्या दानानें स्वर्गवासी तृप्त होतात, तर खालच्या मजल्यावर दान केलें असतां वरच्या मजल्यावरील पुरुष कां बरें तृप्त होत नाहींत ? ॥५॥

यावज्जीवेत्सुखं जीवेदृणं कृत्वा घृतं पिबेत् ।। भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ।।६।।
यदि गच्छेत्परं लोकं देहादेष विनिर्गतः ।। कस्माद्भूयो न चायाति बन्धुस्नेहसमाकुलः ।।७।।
ततश्च जीवनोपायो ब्राह्मणैर्विहितस्त्विह । मृतानां प्रेतकार्याणि न त्वन्यद्विद्यते क्वचित् ।।८।।

(६) म्हणून जिवंत असेपर्यंत चैनीनें रहावें. जर घरांत पदार्थ नसतील तर ऋण काढून आनंद करावा. ऋण काढलें तरी पुनः देण्याची गरज नाहीं, कारण ज्या शरीरांतील जीवानें खाल्लें व पान केलें त्या जीव व शरीर यांचेंहि पुनरागमन होत नाहीं. मग कोणाजवळ कोण मागेल व कोण देईल ? ।।७।। लोक म्हणतात कीं, मृत्युसमयीं शरीरांतून जीव निघतो व तो परलोकीं जातो, हें सर्व मिथ्या आहे; कारण जर असें होत असतें तर तो कुटुंबाच्या मोहानें बद्ध होऊन पुनः कां बरें परत येत नाहीं ? ।।८।। तात्पर्य हेंच कीं, हें सर्व ब्राह्मणांनीं आपल्या उपजीविकेसाठीं निर्माण केलें आहे. जें दशगात्रादिक मृतकार्य केलें जातें तें सर्व यांच्या जीविकेसाठींच आहे.

त्रयो वेदस्य कर्तारो भाण्डधूर्तनिशाचराः । जर्फरीतुर्फरीत्यादि पण्डितानां वचः स्मृतम् ।।९।।
अश्वस्यात्र हि शिश्नं तु पत्नीग्राह्यं प्रकीर्तितम् । भाण्डैस्तद्वत् परं चैव ग्राह्यजातं प्रकीर्तितम् ।।१०।।
मांसानां खादनं तद्वन्निशाचरसमीरितम् ।।११।।

(९) वेदांचे कर्ते भांड, धूर्त व निशाचर (राक्षस) हे तीन होत. जर्फरी, तुर्फरी इ० हीं पंडितांचीं वचनें आहेत (१०) पहा यांची रचना कशी आहे ती ! घोड्याचें शिश्न स्त्रीनें ग्रहण करावें व त्याच्याशीं यजमानपत्नीनें समागम करावा, कन्येबरोबर थट्टा करावी, असें लिहिणें हें धूर्ताशिवाय होणार नाहीं (११) वेदांमध्यें मांसभक्षणाचा जो भाग आलेला आहे तो राक्षसांनीं लिहिलेला आहे.

(उत्तर) चेतन परमेश्वरानें जड पदार्थ निर्माण केल्यावांचून, ते स्वतः आपआपसांत स्वभावानेंच नियमपूर्वक मिळून उत्पन्न होतील हें अशक्य आहे जर स्वभावानेंच होत असते तर दुसरे सूर्य, चन्द्र, पृथ्वी नक्षत्रादि लोक आपोआपच कां बरें बनत नाहींत ? (२) स्वर्ग हें सुखोपभोगाचें व नरक हें दुःखभोगाचें नांव आहे. जर जीवात्मा नसता तर सुखदुःखाचा भोक्ता कोण होऊं शकतां ? जसा या वेळीं सुखदुःखाचा भोक्ता जीव आहे, त्याचप्रमाणें परजन्मामध्येंहि असतो. काय, सत्य भाषण व परोपकारादि क्रियाहि वर्णाश्रमधर्मीयांच्या निष्फल होतील ? कधींहि नाहीं. ।।२।। पशु मारून त्याचा होम करावा असें वेदादि सत्यशास्त्रामध्यें कोठेंहि लिहिलेलें नाहीं. मृतकांचें श्राद्ध व तर्पण करणें हें कपोलकल्पित आहे. कारण कीं, हें वेदादि सत्यशास्त्रांच्या विरुद्ध आहे व तें भागवतादि पुराणवाल्यांचें मत आहे. म्हणून या गोष्टीचें चार्वाकानें केलेलें खंडन अखंडनीय आहे. ।।३।। जी वस्तु असते तिचा अभाव केव्हांहि होऊं शकत नाहीं. विद्यमान जीवाचा अभाव होऊं शकत नाहीं. देह भस्म होतो पण जीव अविनाशी राहतो. जीव दुसऱ्या शरीरांत जातो; म्हणून जे लोक ऋणादिक करून चैनीचे पदार्थ घेऊन किंवा उसने पदार्थ आणून आपली चैन करतात, व ज्यांचे घेतले असतील त्यांना परत करत नाहींत, ते खरोखर पापी होतात व दुसऱ्या जन्मांत दुःखरूपी नरक भोगतात, यांत कांहीं संदेह नाहीं. (५) देहातून निघाल्यानंतर जीव स्थानांतर व शरीरांतर पावतो. व त्याला पूर्वजन्म कुटुंबादिकांचें कांहीं ज्ञान राहत नाहीं म्हणून पुनः कुटुंबामध्यें येत नाहीं. (६) हां, ब्राह्मणांनीं प्रेतकर्म आपल्या जीविकेसाठींच बनविलें आहे, पण तें वेदोक्त नसल्यामुळें खंडनीय आहे. (७) आतां पाहा कीं, जर चार्वाकानें वेदादि सत्यशास्त्रें पाहिलीं, ऐकिलीं किंवा अध्ययन केलीं असतीं तर त्यानें वेदांची निंदा केव्हांही केली नसती. वेद हे भांड धूर्त व निशाचर यांनी रचले आहेत असें त्यानें केव्हांही म्हटलें नसतें. हीहि गोष्ट खरी कीं, भांड, धूर्त व निशाचर यासारखे महीधरादि टीकाकार झाले आहेत. ती त्या टीकाकारांची धूर्तता आहे ( ऋग्वेदादिभाष्य भूमिका. पहा) वेदांची नव्हे; पण ही शोचनीय गोष्ट आहे कीं चार्वाक, आभाणक, बौद्ध व जैन यांपैकीं कोणीहि चार वेदांच्या संहिता पाहिल्या नाहींत व कोणा विद्वानापासून त्यांचें अध्ययनहि केलें नाहीं व म्हणूनच त्यांचीं बुद्धि नष्ट भ्रष्ट ते होऊन वेदांची निंदा करूं लागले. दुष्ट वाममार्गीयांच्या प्रमाणशून्य कपोलकल्पित भ्रष्ट टीकांना पाहून, वेदांच्या विरुद्ध होऊन अविद्यारूपी अगाध समुद्रांत बुडाले. (८) ही विचार करण्याची गोष्ट आहे कीं, स्त्रीनें घोड्याचें शिश्न घ्यावें व त्याच्याशीं समागम

करावा, तसेंच कन्येबरोबर हास्य व थट्टा करावी हें वाममार्गी लोकांशिवाय अन्य मनुष्याचें काम कसें असेल ? या महा-पापी वाममार्गीयांशिवाय भ्रष्ट, वेदविरुद्ध व अशुद्ध व्याख्यान दुसरा कोण करील ? या चार्वाकादिकांना पाहून अत्यंत शोक होतो कीं, विचार केल्याचांचून यांनीं वेदांची निंदा केली. थोडा तरी आपल्या बुद्धीचा यांनीं उपयोग करावयाचा होता. काय करतील बिचारे ! त्यांच्याजवळ इतकी विद्याच नव्हती कीं जिच्या योगानें ते सत्यासत्याचा विचार करून सत्याचें मंडन व असत्याचें खंडन करूं शकलें असते. (९) व जें मांसभक्षणासंबंधानें वेदांत आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे तीहि या वाममार्गी टीकाकारांचीच उक्ति होय म्हणून त्यांना राक्षस म्हणणें योग्य आहे. वेदामध्यें कोठेंहि मांस खावें असें लिहिलेलें नाहीं. याकरितां या मिथ्या गोष्टीचें पाप त्या टीकाकारांवर व ज्यांनीं वेदांचें अध्ययन न करतां त्यांची निंदा केली त्यांच्यावर आहे. हें अगदीं खरें आहे कीं, ज्यांनीं वेदांना विरोध केला, करीत आहेत व करतील ते अवश्य अविद्यांधकारांत पडतील. त्यांना सुखाऐवजीं जितकें दारूण दुःख मिळेल तेवढें थोडें आहे. यासाठीं मनुष्यमात्रानें वेदानुकूल आचरण ठेवणें योग्य आहे. ॥९॥ वाममार्गी लोकांनीं मिथ्या कपोलकल्पनांनीं वेदांच्या नांवावर आपलें प्रयोजन साधलें अर्थात् यथेष्ट मद्यपान, मांसभक्षण, परस्त्रीगमन वगैरे दुष्ट पापांकडे प्रवृत्ति वाढविण्यासाठीं वेदांला कलंक लावला ! या गोष्टीला पाहून चारवाक, बौद्ध व जैन या लोकांनीं वेदांची निंदा करण्यास आरंभ केला, व त्यांनीं पृथक् पृथक् वेदविरुद्ध अनीश्वरवादी मत सुरूं केलें. जर चारवाकादिकांना मूळ वेदार्थ समजला असता तर ते असत्य टीका पाहून वेदमताचा परित्याग कां करते ? काय करतील बिचारे ! ' विनाशकाले विपरीत बुद्धिः ' जेव्हां नष्टभ्रष्ट होण्याची वेळ येते तेव्हां मनुष्याची बुद्धि उलटी होत असते.

आतां चारवाकादिपंथामध्यें जो परस्पर भेद आहे त्याविषयीं लिहितों. हे चारवाकादि पंथ पुष्कळ गोष्टींत एक आहेत. चारवाक देहाच्या उत्पत्तिबरोबर जीव उत्पन्न होतो व देहाच्या नाशाबरोबर जीवही नाश पावतो असें मानतो. पुनर्जन्म व परलोक मानीत नाहीं. एका प्रत्यक्ष प्रमाणावांचून दुसरी अनुमानादि प्रमाणें मानीत नाहीं. चारवाक शब्दाचा अर्थ ' जो बोलण्यामध्यें प्रगल्भ असून विशेषतः वैतण्डिक ( वितण्डवादी ) असतो तो ' असा आहे. बौद्ध व जैन हे प्रत्यक्षादि चारहि प्रमाणें मानतात; अनादि जीव, पुनर्जन्म, परलोक व मुक्ति यांनाहि मानतात. एवढाच चारवाक, बौद्ध व जैन यांत भेद आहे. पण नास्तिकता, वेद व ईश्वर यांची निंदा, परद्वेष षड्यातना पूर्वे सांगितलेली सहा कर्मे ) व जगत्कर्ता कोणीहि नाहीं असें मानणें इत्यादि गोष्टींत हे सर्व एकच आहेत. याप्रमाणें हें संक्षेपानें चारवाकमताविषयीं झालें. आतां बौद्धमतांचें परिक्षण करूं.

**कार्यकारणभावाद्वा स्वभावाद्वा नियमकात् । अविनाभावनियमो दर्शनान्तरदर्शनात् ॥**

कार्य-कारणभाव, अर्थात् कार्याच्या दर्शनानें कारणाचा व कारणाच्या दर्शनानें कार्यादींचा साक्षात्कार होत असतो, म्हणजे एकाच्या प्रत्यक्ष दर्शनानें तत्संबंधीं शेष राहिलेल्याचें अनुमान होत असतें. या कार्यकारणभावज्ञानावांचून प्राण्यांचे संपूर्ण व्यवहार साधूं शकत नाहींत. इत्यादि कारणांनीं अनुमानाला अधिक मानून चारवाकाहून भिन्न बौद्धादिमतें झालीं आहेत, बौद्धांचे चार प्रकार आहेतः—

(१) माध्यमिक, (२) योगाचार, (३) सौत्रान्तिक व (४) वैभाषिक, ' बुद्धया निर्वर्त्तते स बौद्धः ' जी गोष्ट बुध्दीनें सिद्ध होते अर्थात् जी आपल्या बुध्दीमध्यें निश्चयपूर्वक ठरली जाते ती मानणारा व जी बुध्दीनें ठरत नाहीं ती न मानणारा तो बौध्द होय. या बौद्धांच्या चार प्रकारांपैकीं पहिल्या प्रकारांतील माध्यमिक लोक सर्वांला शून्य मानणारे आहेत. जितके पदार्थ आहेत ते सर्व शून्यच आहेत अर्थात् ते आधीं नव्हते व अन्तींहि नसणार. मध्यसमयीं जे प्रतीत होत आहेत तेहि प्रतीतिसमयीं भासतात व मागाहून शून्यरूप होऊन जातात असें ते मानतात. जसें उत्पत्तीच्या पूर्वीं घट नव्हता, नाश झाल्यानंतर तो नसणार, घटज्ञानसमयींच काय तो भासमान होतो व अन्य पदार्थांचें ज्ञान होण्याच्या वेळीं घटाचें ज्ञान रहात नाहीं म्हणून शून्य हेंच एक तत्व आहे. दुसरे योगाचार संज्ञक बौद्ध बाह्यशून्य मानणारे असतात, म्हणजे सर्व पदार्थ आंतील ज्ञानामध्यें भासतात, बाहेर नाहींत. जसें घटाचें ज्ञान जेव्हां आत्म्यामध्यें होतें तेव्हांच मनुष्य [illegible] जो, तो घट आहे. त्याला जोंवर ज्ञान झालें नाहीं तर तो कांहींच म्हणत नाहीं. आपल्या [illegible] शून्य आहे असें

मानतात. तिसरे सौत्रांतिक बौद्ध लोक बाहेरील पदार्थ अनुमानानें जाणला जातो असें मानतात, कारण बाहेरील कोणताच पदार्थ पूर्ण दिसत नाहीं. कांहीं भाग दिसतो त्या भाभावरून शेषभागाचें अनुमान केलें जातें असें यांचें मत आहे. चौथें वैभाषिक बौद्ध याचें मत असें आहे कीं, पदार्थाची प्रतीति बाहेरच होते, आंत नाहीं 'अयं नीलो घटः' यामध्यें निळा घट बाहेर दिसतो, त्याची आंत प्रतीति होत नाहीं. जरी यांचा बुद्ध हा एकच आचार्य होता तथापि त्याच्या शिष्यांमध्यें बुद्धिभेदामुळें चार प्रकार झाले आहेत. ज्याप्रमाणें सूर्यास्त झाल्यानंतर जार पुरुष परस्त्रीगमन करतो व विद्वान् पुरुष सत्यभाषणादि श्रेष्ठ कर्मे करीत असतो. समय एक पण भिन्न लोक आपआपल्या बुद्धीनुरूप भिन्न-भिन्न कामांमध्यें प्रवृत्त होत असतात त्याचप्रमाणें याविषयीं जाणावें. या पूर्वोक्त चार प्रकारच्या बौद्धांमध्यें जे माध्यमिक आहेत ते सर्व पदार्थांला क्षणिक मानतात, प्रतिक्षणीं बुद्धीचा परिणाम होत असल्यामुळें जो पूर्वक्षणीं ज्ञात पदार्थ असतो तो दुसऱ्या क्षणीं राहत नाहीं म्हणून सर्वांला क्षणिक मानलें पाहिजे, असें हे मानतात. जी प्रवृत्ति आहे ती सर्व दुःखरूप आहे; कारण प्राप्तिमध्यें कोणीहि संतुष्ट राहूं शकत नाहीं. एकाच्या प्राप्तिमध्यें दुसऱ्याची इच्छा तयारच असते असें योगाचार बौद्ध मानतात. तिसरे सौत्रांतिक बौद्ध, सर्व पदार्थ आपआपल्या लक्षणांनीं लक्षित होत असतात, जसें गाईच्या चिन्हांनीं गाय व घोड्याच्या चिन्हांनीं घोडा ज्ञात होत असतो अर्थात् लक्षण लक्ष्यामध्यें असतें असें मानतात. चौथा वैभाषिक हा शून्यालाच सर्व पदार्थरूप मानतो. पहिला माध्यमिक जसा शून्यवादी आहे त्याच पक्षाचा हाहि आहे. या बौद्धांत पुष्कळ विवादपक्ष आहेत पण ते सर्व या चार प्रकारच्या भावना मानतात.

(उत्तर) जर सर्वच शून्य असेल तर शून्याला जाणणारा शून्य असूं शकणार नाहीं; व जर सर्व शून्य नसेल तर शून्याला शून्य जाणू शकणार नाहीं. तात्पर्य शून्याला जाणणारा (ज्ञाता) व शून्य (ज्ञेय) असें दोन पदार्थ होतात. योगाचार बौद्ध हे बाह्य शून्य मानतात. येथें विचार असा करावयाचा कीं, जर बाहेरील दिसणारा पर्वत नाहीं तर तो यांच्या मतानें पाहणाऱ्याच्या आंत आहे. पण पाहणाऱ्याच्या हृदयामध्यें एवढा पर्वत राहण्याजोगा अवकाश कोठें आहे? म्हणून बाहेर पर्वत आहे व पर्वताचें ज्ञान मात्र आत्म्यामध्यें आहे. सौत्रांतिक बौद्ध कोणात्याच पदार्थाला प्रत्यक्ष मानीत नाहींत. ते आपणा स्वतःला व आपल्या वचनांलाहि प्रत्यक्ष न मानता अनुमानच मानीत असतील! जर पदार्थ प्रत्यक्ष होत नसतील तर, 'अयं घटः' असा प्रयोगहि होतां नये, 'अयं घटैकदेशः' असा व्हावा. हा घटाचा एकदेश आहे व एक देशाचें नांव घट नसून अंगोपांग समुदायाचें नांव घट आहे. 'हा घट आहे' हें प्रत्यक्ष आहे, अनुमेय नव्हें, कारण सर्व अवयवामध्यें अवयवी एक असतो, त्याचें प्रत्यक्ष ज्ञान झाल्यांनंतर घटाचे सर्व अवयवहि प्रत्यक्ष होतात, अर्थात् सावयव घट प्रत्यक्ष होतो चौथे वैभाषिक बौद्ध हे बाह्य पदार्थलाच प्रत्यक्ष मानतात, तेंहि ठीक नाहीं. कारण जेथें ज्ञाता व ज्ञान असतें तेथेंच प्रत्यक्ष होतें. जरी प्रत्यक्षाचा विषय बाहेर असला तथापि तदाकार ज्ञान आत्म्याला होतें. जर क्षणिक पदार्थ व त्यांचें ज्ञानहि क्षणिक मानलें तर 'प्रत्यभिज्ञा' होणार नाहीं, अर्थात् मी अमुक गोष्ट केली होती असें स्मरण होणार नाहीं. ज्याअर्थी पूर्वदृष्ट व पूर्वश्रुत यांचें स्मरण होत असतें त्याअर्थी क्षणिकवादहि ठीक नाहीं. जर सर्व दुःखच असेल व सुख मुळींच नसेल तर सुखदुःख सापेक्ष असल्यामुळें सुखाच्या अपेक्षेशिवाय दुःख आहे असें ठरणारच नाहीं. ज्याप्रमाणें रात्रीच्या अपेक्षेनें दिवस व दिवसाच्या अपेक्षेनें रात्र ज्ञात होते त्याचप्रमाणें सुखदुःखाविषयीं समजावें. अर्थात् सर्व दुःख मानणें हें ठीक नव्हें. बौद्धांचा स्वलक्षणवादहि ठीक नाहीं. कारण नेत्र रूपाचें लक्षण आहें व रूप लक्ष्य आहे. घटाचें रूप हें लक्ष्य व चक्षू हे घटरूपानें लक्षण आहें व ती परस्पर भिन्न आहेत. तसेंच गंध हें पृथ्वीचें लक्षण अभिन्न आहे. तात्पर्य लक्ष्य व लक्षण हीं भिन्न आहेत व अभिन्नहि आहेत असें मानलें पहिजे. शून्यवादी बौद्धांना पूर्वी उत्तर दिलेंच आहे कीं, शून्याला जाणणारा शून्य असूं शकणार नाहीं.

### तीर्थंकर व त्यांचीं मतें

**सर्वस्य संसारस्य दुःखात्मकत्वं सर्वतीर्थंकरसंमतम् ॥**

ज्या तीर्थंकरांना बौद्ध मानतात त्यांनाच जैनहि मानतात. या बाबतींत हे दोघे एक आहेत. पूर्वोक्त चार

वाममार्गी मद्यमांसाहारी बौद्ध आहेत, पण जैन लोक तसे नाहींत, हा या दोहोंमध्यें विरोध आहे. जे महावीर गौतम-गणधर आहेत त्यांचें नांव बौद्धांनीं बुद्ध असें ठेवलें व जैन लोकांनीं त्यानाच गणधर व जिनवर असें ठेवलें. ज्याची परंपरा जैनमतानुयायी आहे, अशा त्या राजा शिवप्रसादजीनें आपल्या 'इतिहासतिमिरनाशक' ग्रंथाच्या तिसऱ्या खंडामध्यें लिहिलें आहे कीं, स्वामी शंकराचार्य होण्यापूर्वी जवळ जवळ एक हजार वर्षें भारतवर्षामध्यें जैन व बौद्धधर्म पसरला होता. यावर टिपणीः—'बौद्ध म्हणण्यानें आमचा आशय त्या मताशीं आहे कीं, जें महावीराच्या व गणधर गौतम स्वामीच्या वेळेपासून शंकरस्वामीच्या वेळेपर्यंत वेदविरुद्ध मत संपूर्ण भारतवर्षामध्यें पसरलें होतें व ज्याला अशोक व संप्रति महाराजानें मानलें होते. त्यांतून जैन लोक कोणत्याही तऱ्हेनें बाहेर निघूं शकत नाहींत, ज्याच्यापासून जैन शब्द निघाला तो जिन शब्द व ज्यापासून बौद्ध शब्द बनला तो बुद्ध शब्द हे पर्याय शब्द आहेत. कोशामध्यें दोहोंचा अर्थ एकच लिहिला आहे. तसेंच गौतमाला दोघेहि मानतात. दीपवंशादि प्राचीन ग्रंथांमध्यें शाक्यमुनि गौतमबुद्धाला महावीर या नांवानेंच वर्णिलें आहे. त्याच्या वेळीं त्याचेंच एक मत राहिलें असेल. आम्ही जे जैन असें न लिहितां गौतम-मतानुयायी लोकांना बौद्ध असें लिहिलें आहे त्याचें प्रयोजन केवळ इतकेंच आहे कीं, 'दुसऱ्या देशांतील लोकांनींहि यांना बौद्धच म्हटलें आहे.' असेंच अमरकोशामध्येंहि लिहिलें आहे :—

**सर्वज्ञः सुगतो बुद्धो धर्मराजस्तथागतः ॥ समन्तभद्रो भगवान्मारजिल्लोकजिज्जिनः ॥ १ ॥**
**षडभिज्ञो दशबलोऽद्वयवादी विनायकः ॥ मुनीन्द्रः श्रीघनः शास्ता मुनिः शाक्यमुनिस्तु यः ॥ २ ॥**
**स शाक्यसिंहः सर्वार्थः सिद्धश्शौद्धोदनिश्च सः ॥ गौतमश्चार्कबंधुश्च मायादेवीसुतश्च सः ॥ ३ ॥**

अमरकोश कां. १। वर्ग १। श्लो० ८—१०॥

आतां पहा ! बुद्ध व जिन, तसेंच बौद्ध व जैन हीं एकाचींच नांवें आहेत कीं नाहींत ? काय अमरसिंहहि बुद्ध व जिन यांना ते एकच आहेत, असें लिहिण्यामध्यें चुकला ? जे अविद्वान् जैन आहेत ते आपलेंहि जाणत नाहींत व दुसऱ्याचेंहि जाणत नाहींत, केवळ हट्टानें ते बडबडत असतात, पण जे जैनांमध्यें विद्वान् आहेत ते सर्व जाणतात कीं, बुद्ध व जिन आणि बौद्ध व जैन हे पर्यायवाची शब्द आहेत. यांत कांहीं संदेह नाहीं. जैन लोक म्हणतात कीं, जीवच परमेश्वर होतो; हे लोक आपल्या तीर्थंकरांनाच कैवल्यमुक्तिप्राप्त व परमेश्वर मानतात व त्यांच्याशिवाय अनादि ईश्वराला मानत नाहींत. सर्वज्ञ वीतराग, अर्हन्, केवली, तीर्थंकृत, जिन हीं सहा नास्तिकांच्या देवतांचीं नांवें आहेत. आदिदेवाचें स्वरूप चंद्रसूरीनें 'आप्त निश्चयालंकार' ग्रंथांत लिहिलें आहें, तें असें:—

**सर्वज्ञो वीतरागादिदोषस्त्रैलोक्यपूजितः ॥ यथा स्थितार्थवादी च देवोऽर्हन् परमेश्वरः ॥१॥** आ. द. पृ. ९

त्याचप्रमाणें तौतातितांनींहि लिहिलें आहे:—

**सर्वज्ञो दृश्यते तावन्नेदानीमस्मदादिभिः ॥ दृष्टो न चैकदेशोऽस्ति लिंगं वा योऽनुमापयेत् ॥२॥**
**न चागमविधिः कश्चिन्नित्यसर्वज्ञबोधकः ॥ न च तत्रार्थवादानां तात्पर्यमपि कल्पते ॥३॥**
**न चान्यार्थप्रधानैस्तैस्तदस्तित्वं विधीयते ॥ चानुवदितुं शक्यः पूर्वमन्यैरबोधितः ॥४॥**

(१) ' जो रागदि दोषांनीं विरहित, त्रैलोक्यामध्यें पूजनीय, यथावत् पदार्थांचा वक्ता, सर्वज्ञ, असा अर्हन् देव आहे, तोच परमेश्वर आहे. (२) ज्याअर्थी आम्ही या समयीं परमेश्वराला पाहत नाहीं त्याअर्थी सर्वज्ञ असा ईश्वर प्रत्यक्ष नाहीं. ज्याअर्थी ईश्वरामध्यें प्रत्यक्ष प्रमाण नाहीं त्याअर्थी त्याच्या ठिकाणीं अनुमान प्रमाणहि लागूं होऊं शकत नाहीं. कारण एकदेश प्रत्यक्ष झाल्यावांचून अनुमान होऊं शकत नाहीं. (३) ज्याअर्थी प्रत्यक्ष व अनुमान नाहीं त्याअर्थी आगम, अर्थात् नित्य व अनादि सर्वज्ञ परमात्म्याचा बोधक शब्द, प्रमाण होऊं शकत नाहीं. ज्याअर्थी हीं तीनहि प्रमाणें त्याठिकाणीं संभवत नाहींत, तेव्हां अर्थवाद अर्थात स्तुति निंदा परकृति अर्थात् दुसऱ्याच्या चरित्राचें वर्णन व पुराकल्प अर्थात् इतिहासाचें तात्पर्यहि लागूं पडूं शकत नाहीं. (४) तसेंच अन्यार्थ प्रधान अर्थात् बहुव्रीहि समासाच्या तुल्य परोक्ष परमात्म्याच्या सिद्धीचें विधानहि होऊं शकत नाहीं, मग ईश्वराच्या उपदेशकांचा उपदेश ऐकल्यावांचून अनुवाद तरी कसा होऊं शकेल ?

(या मतांचें खंडन) –(१) जर अनादि ईश्वर नसता तर अर्हन् देवाच्या मातापितादिकांच्या शरीरांचा सांचा कोणी बनविला असता ? संयोगकर्त्यावांचून यथायोग्य सर्वावयवसंपन्न, यथोचित कार्य करण्याला उपयोगी असें शरीर बनूं शकतच नाहीं; व ज्या पदार्थांचें शरीर बनलें आहे ते स्वतः जड असल्यामुळें, ते स्वतःच याप्रकारानें उत्तम रचना-युक्त होऊन शरीररूप बनूं शकत नाहींत, कारण त्यांत यथायोग्य बनण्याचें ज्ञानच नाहीं; व जो प्रथमतः रागादि दोषां-सहित असून नंतर दोषरहित होतो तो कधींहि ईश्वर होऊं शकत नाहीं; कारण ज्या निमित्तानें तो रागादिकापासून मुक्त होतो, त्या मुक्तीचें निमित्त सुटल्यानंतर त्याचें मुक्ति हें कार्य अनित्य होईल; जो अल्प व अल्पज्ञ आहे तो सर्वव्यापक व सर्वज्ञ केव्हांहि होऊं शकत नाहीं. जीवाचें स्वरूप एकदेशी व परिमित गुणकर्मस्वभावयुक्त असतें, तो सर्व विद्यांचा सर्व प्रकारें यथार्थवक्ता होऊं शकत नाहीं, म्हणून तुमचे तीर्थंकर केव्हांहि परमेश्वर होऊं शकत नाहींत. (२) काय तुम्ही जे पदार्थ प्रत्यक्ष आहेत त्यांनाच मानतां, अप्रत्यक्षाला नाहीं ? जसें कानाच्या योगानें रूप दिसत नाहीं व नेत्र शब्दांचें ग्रहण करूं शकत नाहींत, त्याचप्रमाणें परमेश्वराचें ग्रहणहि हीं इंद्रियें करूं शकत नाहींत. अनादि परमात्म्याला पाहण्याचें साधन शुद्ध अंतःकरण हें आहे; व विद्या आणि योगाभ्यास यांनीं पवित्र झालेला आत्मा परमेश्वराला प्रत्यक्ष पाहूं शकतो. जसें अध्ययन केल्यावांचून विद्येच्या प्रयोजनाची प्राप्ति होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें योगाभ्यास व विज्ञान यावांचून परमात्माहि दिसणार नाहीं. ज्याप्रमाणें भूमीचें रूपादि गुण पाहूनच गुणांच्या अव्यवहित संबंधानें, पृथ्वी प्रत्यक्ष होत असते, त्याचप्रमाणें या सृष्टींतील परमात्म्याची रचना विशेषता पाहून परमात्मा प्रत्यक्ष होतो. पापा-चरण करण्याच्या वेळीं भय, शंका लज्जा वगैरे उत्पन्न होतात तीहि अंतर्यामीं असणाऱ्या परमेश्वराच्या प्रेरणेनेंच होय. याच्या योगानेंहि परमेश्वर प्रत्यक्ष होत असतो, मग अनुमान होण्यामध्यें काय संदेह ? (३) प्रत्यक्ष व अनुमान होत असल्यामुळें आगम प्रमाणहि नित्य, अनादि सर्वज्ञ ईश्वराचें बोधक होऊं शकतें. म्हणून ईश्वरामध्यें शब्दप्रमाणहि आहे. ज्याअर्थी तीनहि प्रमाणांनीं ईश्वराला जीव जाणूं शकतो, त्याअर्थी अर्थवाद म्हणजे परमेश्वराच्या गुणांची प्रशंसा करणेंहि यथार्थ होऊं शकते, कारण जे नित्य पदार्थ आहेत त्यांचें गुणकर्मास्वभावहि नित्य होऊं शकतात व त्यांची प्रशंसा कर-ण्यामध्यें कोणताच प्रतिबंध नाहीं. (४) जसें मनुष्यामध्यें कर्त्यावांचून कोणतेंहि कार्य होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें हें महत्कार्य कर्त्यावांचून होणें सर्वथा असंभवनीय आहे. असें जर आहे तर ईश्वराच्या अस्तित्वामध्यें मूढालाहि संदेह होऊं शकत नाहीं. जेव्हां परमेश्वराच्या गुणांची स्तुति उपदेश करणाऱ्यांकडून ऐकूं तेव्हां तिचा अनुवाद करणेंहि सरळ आहे. (५) तात्पर्य जैन लोक प्रत्यक्षादि प्रमाणांनीं ईश्वराचें खंडन करतात, तें अनुचित आहे जैन लोकांचा प्रश्नः—

**अनादेरागमस्यार्थो न च सर्वज्ञ आदिमान् ।। कृत्रिमेन त्वसत्येन स कथं प्रतिपाद्यते ।। १ ।।**
**अथ तद्वचनेनैव सर्वज्ञोऽन्यैः प्रतीयते ।। प्रकल्पेत कथं सिद्धिरन्योऽन्याश्रययोस्तयोः।। २ ।।**
**सर्वज्ञोक्ततया वाक्यं सत्यं तेन तदस्तिता ।। कथं तदुभयं सिध्येत् सिद्धमूलान्तराहृते ।। ३ ।।**

(१) अनादि शास्त्राचा अर्थ होऊं शकत नाहीं, मग बनावट असत्य वचनानें त्याचें प्रतिपादन कसें होऊं शकेल ? (२) जर परमेश्वराच्या वचनानें परमेश्वर सिद्ध होत असेल तर अनादि ईश्वरानें अनादि शास्त्राची सिद्धि व अनादिशास्त्रानें अनादि ईश्वराची सिद्धि करणें हा अन्योन्याश्रय दोष आहे, (३) कारण सर्वज्ञाच्या कथनानें तें वेदवाक्य सत्य व त्याच वेदवचनानें ईश्वराची सिद्धि तुम्ही करतां हें कसें होऊं शकेल ? त्या शास्त्र व परमेश्वर यांच्या सिध्दिसाठीं तिसरें कोणतें तरी प्रमाण असलें पाहिजे व जर असें मानाल तर अनवस्था दोष येईल.

(उत्तर) (१, २, ३,) आम्ही लोक परमेश्वराला व त्याच्या गुणकर्मस्वभावाला अनादि मानतों. अनादि नित्य पदार्थांमध्यें अन्योन्याश्रयदोष येऊं शकत नाहीं, जसें कार्याच्या योगानें कारणाचें ज्ञान व कारणाच्या योगानें कार्याचा-बोध होत असतो. कार्यामध्यें कारणाचा स्वभाव व कारणामध्यें कार्याचा स्वभाव नित्य असतो. त्याचप्रमाणें परमेश्वर व परमेश्वराचे अनन्तविद्यादि गुण नित्य असल्यामुळें वेद ईश्वरप्रणीत आहे, असें म्हणण्यांत अनवस्था दोष होत नाहीं. तुम्ही तीर्थंकरांना परमेश्वर मानतां तें तर केव्हांहि सत्य होऊं शकत नाहीं; कारण मातापित्यांवांचून त्यांचें शरीर बनूं शकत नाहीं, तेव्हां तपश्चर्या करून ज्ञान व मुक्ति कशीं बरें मिळवूं शकतील ? तसेंच संयोगाचा आरंभहि अवश्य असला

पाहिजे, कारण वियोगावांचून संयोग होऊं शकत नाहीं. म्हणून तुम्हांला अनादि सृष्टिकर्त्या परमेश्वराला मानणें भाग आहे. पहा ! कोणी कितीहि जरी मोठा सिद्ध पुरुष बनला तरीहि शरीरादिकांची रचना पूर्णत्वानें तो जाणूं शकत नाहीं. जेव्हां सिद्ध जीव सुषुप्ति अवस्थेमध्यें जातो तेव्हां त्याला कशाचेंही भान राहत नसते. जेव्हां जीव दुःखित होतो तेव्हां त्याचें ज्ञानहि थोडेंसें न्यून होतें. अशा परिच्छिन्न सामर्थ्ययुक्त एकदेशामध्यें राहणाऱ्या जीवाला ईश्वर मानणें भ्रांति-बुद्धियुक्त जैनाशिवाय दुसरे कोणीहि मानूं शकत नाहींत. जर तुम्ही म्हणाल कीं, हे तीर्थंकर आपल्या मातापित्यांपासून उत्पन्न झाले, तर ते मातापिता कोणापासून व त्यांचे मातापिता कोणापासून झाले ? आणि त्यांचे तरी मातापिता कोणा-पासून झाले? इत्यादि अनवस्था होईल.

**आस्तिक व नास्तिक यांचा संवादः**—आतां याच्यापुढें प्रकरणरत्नाकराच्या दुसऱ्या भागांतील आस्तिक व नास्तिक यांचीं संवादात्मक प्रश्नोत्तरें येथें देतों महान् महान् जैन लोक याला प्रमाण मानतात (हा संवाद मुंबईमध्यें त्यानीं पूर्वीं छापून प्रसिद्ध केला होता. ) ( **नास्तिक** ) ईश्वराच्या इच्छेनें कांहीं एक होत नाहीं. जें काय होतें तें कर्मानें होते. (**आस्तिक**) जर सर्व कर्मानें होतें तर कर्म कशानें होतें ? व जीवादिकांकडून होतें, असें जर म्हणाल तर ज्या श्रोत्रादि साधनांनीं जीव कर्म करतो तीं कशापासून झालीं ? अनादि काल व स्वभाव यापासून तीं होतात असें जर म्हणाल तर अनादिचें सुटणें असंभवनीय असल्यामुळें तुमच्यामध्यें मुक्ति होणें असंभवनीय होईल . प्रागभावाप्रमाणें ते अनादि सान्त असतात असें जर म्हणाल तर प्रयत्नावाचून सर्वांचीं कर्में निवृत्त होतील. ईश्वर जर फलदाता नसेल तर पापाच्या दुःखरूपी फलाला जीव स्वेच्छेनें कधींहि भोगणार नाहीं; जसें चोर केलेल्या चोरीच्या दण्डादि फलाला स्वेच्छेनें भोगत नाहींत, पण राजाच्या व्यवस्थेनें त्यांना भोगणें भाग पडतें, त्याचप्रमाणें परमेश्वराच्या भोगवण्यानें पापपुण्याचें फल जीव भोगतो, नाहींतर कर्मसंकर होईल . एकाचीं कर्में दुसऱ्यांला भोगणें भाग पडेल. (**नास्तिक**) ईश्वर अक्रिय आहे, तो जर कर्म करणारा असेल तर त्याला कर्माचें फल भोगावें लागेल. म्हणून आम्ही जसें केवली मुक्ताला प्राप्त मुक्तांला अक्रिय मानतो त्याचप्रमाणें तुम्हीहि माना. ( **आस्तिक** ) ईश्वर अक्रिय नसून सक्रिय आहे. जर तो चेतन आहे तर कर्ता नसेल कसा ? व जर तो कर्ता आहे तर क्रियेहून पृथक् कधींहि राहूं शकणार नाहीं. तुम्ही जसें कृत्रिम बनावटी तीर्थंकरांना जीवांपासून बनलेले ईश्वर मानतां, तसें अशा प्रकारच्या ईश्वराला कोणीहि विद्वान् मानूं शकत नाहीं; कारण जे निमित्ताच्या योगानें ईश्वर बनतात ते अनित्य व पराधीन असतात, ते ईश्वर बनण्याच्यापूर्वीं जीव होते, नंतर कांहीं निमित्तानें ते ईश्वर बनलें; तेव्हां ते पुढें केव्हांतरी पुनः जीव बनतील. जीव आपल्या जीवत्व स्वभावाला केव्हांहि सोडूं शकत नाही, कारण जीव हा अनंत कालापासून आहे व अनंत कालापर्यंत तो राहील. म्हणून त्या जीवाव्यतिरिक्त अनादि स्वतः सिद्ध परमेश्वराला मानणें योग्य आहे. पहा ! ज्याप्रमाणें वर्तमान समयीं जीव पापपुण्याचा कर्ता व सुखदुःखांचा भोक्ता आहे त्याप्रमाणें ईश्वर कधींहि होऊं शकत नाहीं. ईश्वर जर क्रियावान् नसता, तर तो या जगाला कसें बनविणार ? तुम्ही जर कर्माला प्रागभाववत् अनादि सान्त मानतां तर तें कर्म समवाय संबंधानें नव्हें पण तें संयोगजन्म होऊन अनित्य होतें. जर मुक्तीमध्यें क्रिया होतच नाहीं असें मानतां तर सांगा कीं तें मुक्त जीव ज्ञानयुक्त असतात कीं नाहीं ? असतात असें जर म्हणाल तर ते अनंत क्रियायुक्त झाले; नाहीं तर तें काय मुक्तिमध्यें पाषाणवत् जड होऊन जातात ? व एकें ठिकाणीं पडलेले राहून ते काहीं एक चेष्टा करीत नाहींत काय ? जर ते कांहीं करीत नाहींत तर मग ती मुक्ति तरी कसली ? पण ते अंधःकारांत व बंधनांत पडले असें होईल ! ( नास्तिक ) ईश्वर व्यापक नाहीं, जर तो व्यापक असता तर सर्व वस्तू चेतन कां नाहींत व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांची उत्तम, मध्यम व निकृष्ट अवस्था कां झाली ? कारण ईश्वर जर सर्वत्र सारखा व्यापक असेल तर लहानमोठेपणा नसला पाहिजे. ( **आस्तिक** ) व्याप्य व व्यापक एकच असत नाहीं. व्याप्य एकदेशी व व्यापक सर्वदेशी असतो. जसें आकाश व्यापक आहे व भूगोल, घटपटादि पदार्थ व्याप्य असून एकदेशीय आहेत. ज्याप्रमाणें पृथ्वी व आकाश एक नाहीं त्याच प्रमाणें ईश्वर व जगत् एक नाहीं. ज्याप्रमाणें सर्व घटपटादि पदार्थांमध्यें आकाश व्यापक आहे तथापि घटपटादि पदार्थ आकाश नाहींत, त्याचप्रमाणें परमेश्वर चेतन सर्वत्र असतांहि सर्वच पदार्थ चेतन असत नाहींत. ज्याप्रमाणें विद्वान् व अविद्वान्, धर्मात्मा व अधर्मात्मा यांची बरोबरी होत नाहीं, त्याचप्रमाणें

विद्यादि सद्गुण, सत्यभाषणादि कर्म व सुशीलतादि स्वभाव यांच्या न्यूनाधिक्यामुळें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्व, शूद्र व अंत्यज हे लहान व मोठे मानले जातात. वर्णांची व्याख्या चतुर्थसमुल्लासांत दिली आहे ती पहावी. (नास्तिक)ईश्वराच्या रचनेच्या योगानें जर सृष्टि झाली असती तर मातापित्यादिकांचें काय काम ? (आस्तिक) ऐश्वरी सृष्टिचा ईश्वर कर्ता आहे, तो जीवसृष्टीचा नाहीं. जीवांचीं जीं कर्तव्यकर्मे आहेत त्यांना ईश्वर करीत नाहीं, पण जीव करतो. वृक्ष, फल, औषधीं वगैरे पदार्थ ईश्वराने उत्पन्न केले आहेत. त्यांना घेऊन मनुष्यानें दळून कुटून पोळी वगैरे करून खाल्ली नाहीं तर, मनुष्यांबद्दल हीं कर्में काय ईश्वर करील ? हीं कामें जर केलीं नाहींत तर जीवांचें जीवनहि होणें अशक्य आहे; म्हणून आदिसृष्टीमध्यें जीवांच्या शरीरांचे सांचे बनवणें ईश्वराधीन आहे. नंतर त्यांपासून पुत्रादिकांची उत्पत्ति करणें जीवांचें कर्तव्यकर्म आहे. (नास्तिक) जर परमात्मा शाश्वत अनादि चिदानंदस्वरूप आहे तर तो जगत् प्रपंच व दुःख यांत कां पडला ? आनंद सोडून दुःखाचें ग्रहण करणें हे सामान्य मनुष्यहि करीत नाहीं, मग तें परमेश्वरानें का केलें ? (आस्तिक) परमात्मा कोणात्याहि प्रपंचामध्यें किंवा दुःखांत पडत नाहीं व आपल्या आनंदाला सोडीतहि नाहीं, कारण प्रपंचांत पडणें हें जो एकदेशीं असेल त्यालाच शक्य असतें सर्वव्यापकाला नाहीं. अनादि, चिदानंद, व ज्ञानस्वरूप परमात्मा जर जगताला बनवणार नाहीं तर त्याला अन्य कोण बनविणार ? जगत् बनवण्याचें जीवामध्यें सामर्थ्य नाहीं व जडामध्यें स्वतःच बनण्याचें सामर्थ्य नाहीं यांवरून हें सिद्ध झालें कीं, परमात्माच जगताला बनवितो व सदा आनंदांत राहतो. ज्याप्रमाणें परमात्मा परमाणूपासून सृष्टि उत्पन्न करतो, त्याचप्रमाणें मातापितारूप निमित्त कारणाच्या योगानें उत्पत्ति होण्याच्या व्यवस्थेचा नियम त्यानें केला आहे. (नास्तिक) ईश्वर मुक्तिरूप सुख सोडून जगताची सृष्टि करणें; धारण करणें व प्रलय करणें हे बखेडे करण्यांत तो कां पडला ? (आस्तिक) ईश्वर सदामुक्त असल्यामुळें, एकदेशामध्यें राहणाऱ्या बंधपूर्वक मुक्तीनें युक्त व साधनांनीं सिद्ध झालेल्या तुमच्या तीर्थंकरांप्रमाणें, सनातन परमात्मा नाहीं. जो अनंतस्वरूप गुणकर्मस्वभावयुक्त परमात्मा आहे तो या अल्प जगताला बनवितो, धारण करतो पण तो बंधनांत कधींहि पडत नाहीं; कारण बंध व मोक्ष हे सापेक्षत्वानें आहेत. मुक्तीच्या अपेक्षेनें बंध व बंधाच्या अपेक्षेनें मुक्ति होत असते. जो कधींहि बद्ध नव्हता त्याला मुक्त असें कसें म्हणतां येईल ? जे जीव एकदेशीं असतात तेच बद्ध व मुक्त होत असतात. अनंत, सर्व देशी, सर्वव्यापक ईश्वर बंधन व नैमित्तिक मुक्तीच्या चक्रामध्यें तुमच्या तीर्थंकरांप्रमाणें कधींहि पडत नाहीं, म्हणून त्या परमात्म्याला सदैव मुक्त असें म्हणतात. ( नास्तिक ) जीवांना कर्मांचें फल आपोआपच भोगावें लागेल, जशी भांग घेतली असतां तिचा मद आपोआपच येतो. त्यांत ईश्वराचें कांहींच काम नाहीं. ( आस्तिक ) ज्याप्रमाणें राजावांचून चोर, डाकू, लंपट, दुष्ट, मनुष्य स्वयंमेव फांशी किंवा कैदी होत नाहींत किंवा होऊं इच्छित नाहींत, पण राजाच्या राजनीतीच्या न्यायव्यवस्थानुसार बलात्कारानें पकडून राजा त्याला यथोचित दंड देतो, त्याचप्रकारें ईश्वर आपल्या न्यायव्यवस्थेच्या योगानें स्वकर्मानुसार यथायोग्य दंड देतो; कारण कोणीहि जीव आपल्या दुष्ट कर्माचें फल भोगूं इच्छित नाहीं. म्हणून परमात्मा हा न्यायाधीश अवश्य असला पाहिजे. (नास्तिक) जगतामध्यें एक ईश्वरच नाहीं पण जितके मुक्त जीव आहेत तितके सर्व ईश्वरच आहेत. ( आस्तिक ) हें म्हणणें सर्वथा व्यर्थ आहे; कारण जो प्रथम बद्ध असून मागाहून मुक्त होतो; तो बंधनामध्यें अवश्य पडतो कारण तो स्वाभाविक सदैव मुक्त नसतो. जसें तुमचे चोवीस तीर्थंकर प्रथमतः बद्ध होते, व पुनः मुक्त झाले, ते पुनः अवश्यमेव बंधनांत पडतील; जर जीवाप्रमाणें ईश्वरहि अनेक असतील तर ते, जसे जीव तंटेबखेडे करीत फिरतात त्यांचप्रमाणें हे अनेक ईश्वरहि आपआपसांत लढतील व भांडतील. ( नास्तिक ) हे मूढा ! जगताचा कर्ता कोणी नाहीं, हें स्वयंसिद्ध आहे. ( आस्तिक ) ही जैनांची केवढी मोठी चूक आहे ? कर्त्यावांचून कोणतेंहि कर्म व कर्मावांचून कोणतेंहि कार्य जगतामध्यें होतें असें दिसत नाहीं. ही अशी गोष्ट आहे कीं, गव्हाच्या शेतांत गहूं आपोआप दळले जाऊन, त्याच्या स्वयं रोट्या बनून, त्या आपोआप जैनांच्या पोटांत जाव्यांत ! कापसाचें सूत, कपडा, अंगरखा, फेटा, उपरणें, धोतर पगडी वगैरे आपोआप बनत नाहींत. जर असें होत नाहीं तर कर्त्या ईश्वरावांचून विविध जग व नाना प्रकारची रचना कशी बनूं शकेल ? हट्ट करून जग जर स्वयंसिद्धच आहे, असें

भावनांच्या योगानें सकल बासनांची निवृत्ति करून, शून्यरूप निर्वाण मुक्ति होते असें हे मानतात. हे आपल्या शिष्यांला योगाचाराचा उपदेश करितात. गुरूच्या वचनाला प्रमाण मानावयास सांगतात. अनादि बुद्धीमध्यें वासना असल्यामुळें बुद्धि अनेकाकार भासते असें यांचें मत आहे. त्यांतील प्रथमस्कंधः—

रूपविज्ञानवेदनासंज्ञासंस्कारसंज्ञकः ।।

(१) इंद्रियांच्या योगानें रूपादि विषयांचें ग्रहण केलें जातें. हा रूपस्कंध पहिला होय. (२) आलयविज्ञान प्रवृत्ती... ज्ञानरूप व्यवहाराला विज्ञानस्कंध म्हणतात हा दुसरा स्कंध. (३) रूपस्कंध व विज्ञानस्कंध यांच्यापासून उत्पन्न झालेला तिसरा सुखदुःखादि प्रतीतिरूप वेदनास्कंध आहे. (४) गौ आदि संज्ञांचा संबंध अर्थात् नामांचा नामीशीं संबंध जो असतो तो संज्ञास्कंध चौथा होय. (५) वेदना स्कंधापासून रागद्वेषादि क्लेश व क्षुधातृषादि उपक्लेश, मद, प्रमाद, अभिमान्, धर्मरूप व अधर्मरूप व्यवहार यांना संसारस्कंध असें मानतात. सर्व संसार हा दुःखरूप आहे, तें दुःखाचें घर आहे म्हणून त्याच्या ठिकाणीं दुःखसाधनरूप भावना करून संसारांतून सुटणें ही मुक्ति होय. या बौद्धमतांमध्यें मुक्ति, अनुमान प्रमाण, जीवाचें अस्तित्व हें मानतात हाच चार्वाक व बौद्ध यांत भेद आहे.

देशना लोकनाथानां सत्वाशयवशानुगा ।। भिद्यन्ते बहुधा लोके उपायैर्बहुभिः किल ।।१।।
गंभीरोत्तानभेदेन क्वचिच्चोभयलक्षणा ।। भिन्नाहि देशना ऽ भिन्ना शून्यताद्वयलक्षणा ।।२।।
अर्थानुपार्ज्य बहुशो द्वादशायतनानि वै ।। परितः पूजनीयानि किमन्यैरिह पूजितैः ।।३।।
ज्ञानेन्द्रियाणि पञ्चैव तथा कर्मेन्द्रियाणि च ।। मनो बुद्धिरिति प्रोक्तं द्वादशायतनं बुधैः ।।४।।

(१) जे ज्ञानी, विरक्त व जीवनमुक्त, लोकनाथांच्या अर्थात् बुद्धादि तीर्थंकरांच्या पदार्थांच्या स्वरूपाला जाणणारे व जे भिन्न भिन्न पदार्थांचे उपदेशक आहेत, ज्यांला पुष्कळ भेदांनीं व पुष्कळ उपायांनीं सांगितलें आहे, त्यांना मानावें. (२) फार गंभीर व प्रसिद्ध अशा भेदांनीं कोठें गुप्त व प्रकटपणानें भिन्न भिन्न गुरूंचा उपदेश, जो न्यून लक्षणयुक्त पूर्वी सांगितला आहे, त्याला मानावें. (३) जी द्वादशायतन पूजा आहे तीच मोक्ष देणारी आहे. त्या पूजेसाठीं पुष्कळ द्रव्यादि पदार्थ मिळवून, द्वादशायतन अर्थात् बारा प्रकारचें स्थानविशेष बनवून सर्व प्रकारें पूजा करावी. अन्याची पूजा करण्याचें काय प्रयोजन ? (४) यांची द्वादशायतन पूजा ही आहे:—श्रोत्र, त्वक्, चक्षु, जिव्हा व नासिका हीं पांच ज्ञानेंद्रियें; वाक्, हस्त, पाद, गुह्य, उपस्थ हीं पांच कर्मेन्द्रियें; मन व बुद्धि या बारांचा सत्कार करणें अर्थात् यांना आनंदामध्यें प्रवृत्त करणें ही त्यांची पूजा होय. इत्यादि बौद्धांचें मत आहे.

(उत्तर) जर सर्व संसार दुःखरूप असेल तर कोणत्याहि जीवाची प्रवृत्ति त्याच्याकडे होणार नाहीं. या संसारामध्यें जीवाची प्रवृत्ति आहे हें प्रत्यक्ष दिसतें म्हणून सर्व संसारदुःखरूप आहे असें म्हणतां येणार नाहीं. संसारामध्यें सुखहि आहे व दुःखहि आहे, आणि जर बौद्ध लोक दुःखरूपच संसार आहे असाच सिद्धांत मानतात तर खानपानादि करणें, पथ्य व औषधादि सेवन करून शरीरक्षण करणें या प्रकारच्या कामामध्यें ते कां बरें प्रवृत्त होत असतात ? जर ते असें म्हणतील कीं, आम्ही प्रवृत होतों पण त्याला दुःखच मानतों; तर तेंहि असंभवनीय आहे कारण जीव सुखासाठीं प्रवृत्त होतो, व दुःखापासून निवृत्त होतो. तात्पर्य संसारामध्यें धर्मक्रिया, विद्या, सत्संग इत्यादि श्रेष्ठ व्यवहार सुखकारक आहेत. यांना कोणीहि विद्वान्—बुद्धांशिवाय—दुःखाचे हेतु मानीत नाहींत. जे यांनीं पांच स्कंध ठरवले आहेत तेहि अपूर्ण आहेत, कारण कीं, जर अशा रीतीनें स्कंधाचा विचार करूं गेलें, तर एकएका गोष्टीचें अनेक भेद होऊं शकतील. हे लोक ज्या तीर्थंकरांना उपदेशक व लोकनाथ मानतात, पण या नाथांचाहि जो नाथ अनादि परमात्मा आहे त्याला मानत नाहींत ! जर तो अनादि परमेश्वर नाहीं तर त्या तीर्थंकरांनीं कोणापासून उपदेश घेतला ? त्यांना स्वयंज्ञान प्राप्त झालें असें ते म्हणतील पण तें असंभवनीय आहे; कारण कारणावांचून कार्य होत नाहीं. बरें जर त्यांच्या कथनानुसार तसेंच मानलें तर सध्यां शिकल्याशिकविल्याशिवाय, ऐकल्याऐकविल्याशिवाय व ज्ञानी लोकांच्या सत्संगाशिवाय एखादा कां दरें ज्ञानी होत नाहीं ? जर असें होत नाहीं तर पूर्वोक्त कथन सर्वथा निर्मूल, युक्तिशून्य व सन्निपातरोगग्रस्त

मनुष्याच्या बडबडण्यासारखें आहे. शून्यरूप अद्वैताचा जो उपदेश बौद्धाचा आहे तो खरा नाहीं, कारण विद्यमान् वस्तु शून्यरूप केव्हांहि होऊं शकत नाहीं. हां, विद्यमान वस्तु कालान्तरानें सूक्ष्म कारणरूप होऊं शकते म्हणून हें कथन भ्रामक आहे. जर द्रव्याचें उपार्जन करून पूर्वोक्त द्वादशायतनपूजा करणें हें मोक्षाचें साधन आहे असें मानतात, तर दशप्राण व अकरावा जीवात्मा यांची पूजा कां करीत नाहींत ? जर इंद्रियें व अंतःकरण यांची पूजा मोक्षप्रद आहे, तर या बौद्धांमध्यें व विषयिजनामध्यें भेद्र कोणता ? जर त्यांपासून या बौद्धांनीं आपला बचाव केला नाहीं तर तेथें तरी मुक्ति कोठे राहिली ? जेथें अशा गोष्टी आहेत तेथें मुक्तीचें काय काम ? काय ही यांनीं आपल्या अविद्येची उन्नति केली आहे ! या अविद्येचें श्रेय यांच्याशिवाय दुसऱ्याला मिळूं शकत नाहीं. यांवरून हा निश्चय होतो कीं, यांनीं ईश्वर व वेद यांच्याशीं विरोध केला म्हणूनच यांना हें फळ मिळालें. प्रथमतः यांनीं संसाराच्या ठिकाणीं दुःखरूपी भावना केली, नंतर द्वादशायतनपूजा मध्येंच घुसडून दिली ! काय यांची ही द्वादशायतनपूजा संसारांतील पदार्थांच्या बाहेर आहे ! कीं जी मुक्ति देणारी होईल ? जर कोणी डोळे मिटून रत्न शोधूं लागला तर तें त्याला प्राप्त होईल काय ? वेद व ईश्वर यांना न मानल्यामुळें त्यांची अशी गति झाली आहे. अजूनहि जर यांना सुख प्राप्त करून घेण्याची इच्छा असेल तर वेद व ईश्वर यांचा आश्रय करून त्याची प्राप्ति करून घ्यावी.

**विवेकविलास ग्रंथांतील बौद्धांचें मत.**

**बौद्धानां सुगतो देवो विश्वं च क्षणभंगुरम् ।। आर्यसत्वाख्यया तत्वचतुष्टयमिदं क्रमात् ।।१।।**
**दुःखमायतनं चैव ततः समुदयो मतः ।। मार्गश्चत्यस्य च व्याख्या क्रमेण श्रूयतामतः ।।२।।**

(१) बौद्धांचा सुगतदेव बुद्ध भगवान् हा पूजनीय देव आहे, जगत् क्षणभंगुर आहे, आर्यपुरुष व आर्यस्त्री, तसेंच तत्वांची संज्ञादि प्रसिद्धि ही चार तत्वें बुद्धांनीं मानण्याजोगी आहेत. (२) या विश्वाला दुःखाचें घर समजावें, म्हणजे उन्नति होते, आतां याची व्याख्या क्रमानें ऐका:—

**दुःखसंसारिणः स्कंधास्ते च पंच प्रकीर्तिताः ।। विज्ञानं वेदनासंज्ञा संस्कारो रूपमेव च ।।३।।**
**पंचेन्द्रियाणि शब्दाद्या विषयाः पञ्च मानसम् ।। धर्मायतनमेतानि द्वादशायतनानि तु ।।४।।**

(३) संसारामध्यें दुःखच दुःख आहे. जे पूर्वी पांच स्कंध सांगितले आहेत ते जाणावें. (४) पांच ज्ञानेंद्रियें, त्यांचे शब्दादि पांच विषय, मन, बुद्धि व अंतःकरण ही धर्माची बारा स्थानें आहेत.

**रागादीनां गणो यः स्यात् समुदेति नृणां हृदि ।। आत्मात्मीयस्वभावाख्यःस स्यात्समुदयः पुनः ।।५।।**
**क्षणिकाः सर्वसंस्कारा इति या वासना स्थिरा ।। स मार्ग इति विज्ञेयः स च मोक्षोऽभिधीयते ।।६।।**

(५) जी मनुष्यांच्या हृदयामध्यें रागद्वेषादि समूहांची उत्पत्ति होत असते त्याला समुदय म्हणतात, व जो प्रत्येक आत्म्याचा संबंध व स्वभाव आहे त्याला आख्या म्हणतात. यांच्या योगानें पुनः समुदय होत असतो. (६) सर्व संस्कार क्षणिक आहेत, ही वासना स्थिर करणें हा बौद्धांचा मार्ग आहे व तेंच शून्यतत्व शून्यरूप होणें हा मोक्ष आहे.

**प्रत्यक्षमनुमानं च प्रमाणं द्वितीयं तथा ।। चतुः प्रस्थानिका बौद्धाः ख्याता वैभाषिकादयः ।।७।।**
**अर्थो ज्ञानान्वितो वैभाषिकेण बहु मन्यते ।। सौत्रान्तिकेन प्रत्यक्षग्राह्योऽर्थो न बहिर्मतः ।।८।।**
**आकारसहिता बुद्धिर्योगाचारस्य संमता ।। केवलां संविदं स्वस्थां मन्यन्ते मध्यमाः पुनः ।।९।।**

(७) बौद्ध लोक प्रत्यक्ष व अनुमान हीं दोन प्रमाणें मानतात. या बौद्धांमध्यें चार भेद आहेत. वैभाषिक, सौत्रांतिक, योगाचार व माध्यमिक. (८) ज्ञानामध्यें असणारा अर्थ विद्यमान असतो असें वैभाषिक मानतात, कारण जो ज्ञानामध्यें नसतो तो अर्थसिद्ध आहे असें कोणीहि पुरुष मानूं शकत नाहीं; सौत्रांतिक आत्म्यांत जो प्रत्यक्ष पदार्थ तोच मानतात, बाहेरच्याला नाहीं. (९) योगाचार लोक आकारसहित विज्ञानयुक्त बुद्धिला मानतात, व माध्यमिक बौद्ध केवळ आपल्यामधील पदार्थांच्या ज्ञानालाच मानतात, बाहेरच्या पदार्थाला मानीत नाहींत.

**रागादिज्ञानसंतानवासनाच्छेदसंभवा ।। चतुर्णामपि बौद्धानां मुक्तिरेषा प्रकीर्तिता ।।१०।।**
**कृत्तिः कमण्डलुर्मौण्ड्यं चीरं पूर्वाह्णभोजनम् ।। संघो रक्ताम्बरत्वं च शिश्रिये बौद्धभिक्षुभिः ।।११।।**

(१०) रागादि ज्ञानाच्या प्रवाहाच्या वासनेचा नाश होणें हीच मुक्ति आहे असें चारीहि प्रकारचें बौद्ध मानतात, (११) मृगचर्म, कमंडलु, मुंडन, वल्कल वस्त्र, पूर्वाण्हीं अर्थात् नऊ वाजण्याच्या पूर्वी भोजन, एकटे न राहणें, रक्तवस्त्र धारण करणें हा बौद्धांच्या साधूचा वेष आहे.

(उत्तर) जो बौद्धांचा सुगत देव होता, त्याचा गुरु कोण होता ? जर विश्व क्षणभंगुर आहे तर ब-याच काळापूर्वी पाहिलेल्या पदार्थाचें स्मरण 'हाच तो आहे' असें होतां नये. जर विश्व क्षणभंगुर असतें, तर पदार्थच राहिला नसता मग स्मरण कशाचें झालें असतें ? (१)जर बौद्ध या क्षणिकवादाला मानीत असतील तर त्यांचा मोक्षहि क्षणिकच होईल. जर ज्ञानानें युक्त असणारा अर्थच द्रव्य आहे तर जड द्रव्यामध्यें ज्ञान असलें पाहिजे मग तें चलनादि क्रिया कशा बरें करूं शकत नाहींत ? बरें जें बाहेर दिसतें ते मिथ्या कसें होऊं शकतें ? जर केवळ ज्ञानहि हृदयांतील आत्म्यांत असेल तर तें आकाश बुध्दिसहित होईल व दृश्य असले पाहिजे बाह्य पदार्थांला जर केवळ ज्ञानच मानलें, तर ज्ञेय पदार्थावांचून ज्ञानच होऊं शकत नाहीं. वासनाच्छेदच मुक्ति असेल तर सुषुप्ति हीहि एक मुक्तीच मानवी लागेल. असें मानणें विद्येशीं विरुद्ध असल्यामुळें तिरस्करणीय आहे. बौद्धांची मतें व त्यांचें परीक्षण संक्षेपानें दाखविलें; यांवरून विचारशील बुद्धिमानांनीं अवलोकन करून यांचीं विद्या व मत कसें आहे, हें जाणावें. या मताला जैन लोक सुद्धां मानतात.

**बौद्धजैनमतपरीक्षण**–प्रकरणरत्नाकर भाग १ नयचक्रसार यामध्यें खालील गोष्टी लिहिल्या आहेत:–बौद्ध लोक हरएक समयीं नवीन अशीं (१) आकाश, (२) काल, (३) जीव, (४) पुद्गल, हीं चार द्रव्यें मानतात व जैन लोक धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय, आकाशास्तिकाय, पुद्गलास्तिकाय व जीवास्तिकाय व काल या सहा द्रव्यांना मानतात. यांपैकीं कालाला आस्तिकाय मानित नाहींत, पण त्याविषयीं ते असें म्हणतात कीं, काल उपचारानें द्रव्य आहे; वस्तुत: नाहीं. यापैकीं 'धर्मास्तिकाय' हें द्रव्य गतिपरिणामित्वामुळें परिमानाला प्राप्त होऊन, जीव व पुद्गल यांच्या गतीच्या समीप स्तंभन करण्याला हेतुभूत आहे तें असंख्य प्रदेश, परिणाम व लोक यामध्यें व्यापक आहे. दुसरें ' अधर्मास्तिकाय ' हें आहे, कीं जें स्थिरतेच्या योगानें परिणामी झालेला जीव व पुद्गल यांच्या स्थितीच्या आश्रयाचा हेतु आहे. तिसरें ' आकाशास्तिकाय ' हें सर्व द्रव्यांला आधार, त्यामध्यें अवगाहन, प्रवेश निर्गमादिक्रिया करणारे जीव व पुद्गल यांच्या अवगाहनाचा हेतु असून सर्वव्यापक आहे. चवथें ' पुद्गलास्तिकाय , हें आहे कीं, हें कारणरूप सूक्ष्म, नित्य, एकरस, वर्ण, गंध, स्पर्शकार्य, यांचें लिंग, पूर्ण होणें व गळून जाणें या स्वभावानीं युक्त असतें. पांचवा ' जीवास्तिकाय ' हा चेतनायुक्त असून ज्ञानदर्शन यामध्यें उपयुक्त, अनंत पर्यायांनीं परिणामी होणारा कर्ता व भोक्ता आहे. सहावा ' काल ' हा पूर्वोक्त पंच आस्तिकायांचें परत्व, अपरत्व, नवीनत्व, प्राचीनत्व यांचें चिन्हरूप व प्रसिद्ध वर्तमानरूप पर्यायांनीं युक्त आहे म्हणून त्याला काल असें म्हणतात.

**(समीक्षक)** जीं बौद्धांनीं चार द्रव्यें प्रतिसमयीं नवीन नवीन मानलीं आहेत तीं असत्य आहेत, कारण आकाश, काल, जीव व परमाणु, हे नवीन व प्राचीन असे होऊं शकत नाहींत; कारण हे अनादि असून कारणरूपानें अविनाशी आहेत तेव्हां ते नवीन किंवा प्राचीन कसे होऊं शकतील ? व जैन लोकांचें मानणेंहि ठीक नाहीं, कारण धर्म अधर्म हीं द्रव्यें नसून गुण आहेत. हे दोनहि जीवास्तिकायामध्यें येतात म्हणून हें आकाश, परमाणु, जीव व काल मानतें तर ठीक झालें असतें. पण वैशेषिककारांनीं जीं नऊ द्रव्यें मानिली आहेत तींच ठीक आहेत; कारण पृथ्व्यादि पंचतत्वें, काल, दिशा, आत्मा व मन हे मिळून नऊ पृथक् पृथक् पदार्थ निश्चित आहेत. एका जीवाला चेतन मानूनहि परमेश्वराला न मानणें ही जैन व बौद्ध यांची पक्षपाताची गोष्ट आहे.

**सप्तभंगी व स्याद्वाद:**– बौद्ध व जैन लोक सप्तभंगी व स्याद्वाद मानतात; तो असा आहे कीं, (१) ' सन् घट: ' याला प्रथम भंग म्हणतात, कारण कीं, घट आपल्या वर्तमानत्वानें युक्त अर्थात् ' घट आहे ' या वाक्यानें त्याच्या अभावाचा निषेध केला. (२) दुसरा भंग ' असन् घट: ' ' घट नाहीं ' पहिला घटाच्या अस्तित्वामुळें व दुसरा त्याच्या अभावामुळें भंग मानलेला आहे. (३) तिसरा भंग ' सन्नसन्न घट: ' अर्थात् हा घट आहे पण पट नाहीं, कारण कीं, त्या दोहोंपासून तो पृथक् झाला आहे. (४) चवथा ' घटोऽघट: ' 'अघट: पट: ' दुसऱ्या पटाच्या

अभावाची अपेक्षा आपणांमध्यें असल्यामुळें घटाला अघट म्हणतात. त्याच्याठिकाणीं युगपत् दोन संज्ञा 'घट व अघट' अशा होतात. (५) पांचवा भंग हा आहे कीं. घटाला पट म्हणणें, अयोग्य आहे. अर्थात् त्यांच्यामध्यें घटत्व वक्तव्य आहे व पटत्व अवक्तव्य आहे. (६) सहावा भंग हा आहे कीं, जर घट नाहीं तर त्याविषयीं बोलणेंहि योग्य नाहीं, व जर तो असेल तर त्याविषयीं बोलणें योग्य आहे. व (७) जें बोलण्याला इष्ट आहे पण जें नाहीं व सांगण्याला योग्यहि घट नाहीं, याला सातवा भंग म्हणतात. याच प्रकारानें:—

**स्यादिति जीवोऽयंप्रथमो भंगः ॥१॥ स्यान्नास्ति जीवो द्वितीयो भंगः ॥२॥ स्यादवक्तव्यो जीवस्तृतीयो भंगः ॥३॥ स्यादस्ति नास्ति नास्तिरूपो जीवश्चतुर्थो भंगः ॥४॥ स्यादस्ति अवक्तव्यो जीवः पञ्चमो भंगः ॥५॥ स्यान्नास्ति अवक्तव्यो जीवः षष्ठो भंगः ॥६॥ स्यादस्ति नास्ति अवक्तव्यो जीव इति सप्तमो भंगः ॥७॥**

(१) जीव आहे असें म्हटलें असतां, जीवाच्या विरोधी जडपदार्थांचा जीवामध्यें अभाव होतो तो प्रथम भंग होय. (२) जडामध्यें जीव नाहीं असें म्हणणें हा दुसरा भंग. (३) जीव आहे पण बोलण्यास योग्य नाहीं हा तिसरा भंग आहे. (४) जेव्हां जीव शरीर धारण करितो तेव्हां तो प्रसिद्ध व जेव्हां तो शरीराहून पृथक् होतो तेव्हां तो अप्रसिद्ध राहत असतो असें म्हणणें हा चतुर्थ भंग होय. (५) जीव आहे पण वर्णन करण्यास अशक्य आहे हा पांचवा भंग आहे. (६) जीव प्रत्यक्ष प्रमाणानें दाखवतां येत नाहीं म्हणून तो डोळयांस दिसत नाहीं, या कथ—नाला सहावा भंग म्हणतात. (७) एके काळीं अनुमानानें जीवाचें असणें, व अदृश्यत्वामुळें त्याचें नसणें, एक स्थितिमध्यें न राहणें, पण क्षणाक्षणामध्यें परिणामाला प्राप्त होणें, अस्ति नास्ति हा व्यवहार न होणें न नास्ति अस्ति हा व्यवहारहि न होणें हा सातवा भंग आहे.

याप्रमाणें ही नित्यत्व सप्तभंगी व अनित्यत्व सप्तभंगी आहे. तसेंच सामान्यधर्म, विशेषधर्म, गुण व पर्याय, या प्रत्येक वस्तूमध्यें सप्तभंगी असते. त्याचप्रमाणें द्रव्य, गुण, स्वभाव व पर्याय यांच्या अनंतत्वामुळें सप्तभंगीहि अनंत होत असते. हा असा बौद्ध व जैन यांचा स्याद्वाद व सप्तभंगी न्याय आहे.

**(समीक्षक)**—हें म्हणणें एका अन्योन्याभावांतील साधर्म्य व वैधर्म्यामध्यें चरितार्थ होतें: यासरळ प्रकरणाला सोडून कठीण भ्रमजाल रचणें हें केवळ अज्ञांनीं लोकांना फसवण्यासाठीं आहे. पहा ! जीवाचा अजीवामध्यें व अजी—वाचा जीवामध्यें अभाव नेहमीं असतोच. जसें जीव व जड या दोहोंमध्यें वर्तमानत्व असल्यामुळें त्यांच्यांत साधर्म्य आहे व एक चेतन व दुसरा जड असल्यामुळें त्यांच्यांत वैधर्म्य आहे अर्थात् जीवामध्यें चैतन्याचें अस्तित्व व जडत्वाचें नास्तित्व आहे. याचप्रमाणें जडामध्यें जडत्व आहे व चेतनत्व नाहीं; यावरून उघड होतें कीं, गुण कर्म स्वभावांचें समानधर्म व विरूद्धधर्म यांच्या विचाराच्या योगानें सप्तभंगी व स्याद्वाद सहज समजूं शकतो, मंग इतका विस्तार कशाला ? यामध्यें बौद्ध व जैन यांचें एकमत आहे, थोडेसें पृथकत्व होण्यानें भिन्नभावहि होत असतो. यापुढें जैन मताचें परीक्षण करूं:—

**चिदचिद्द्वेपरे तत्त्वे विवेकस्तद्विवेचनम् ॥ उपादेयमुपादेयं हेयं हेयं च कुर्वतः ॥१॥**
**हेयं हि कर्तृरागादि तत्कार्यमविवेकिनः ॥ उपादेयं परं ज्योतिरुपयोगैकलक्षणम् ॥२॥**

(१) जैन लोक 'चित् व अचित्' अर्थात् चेतन व जड दोघांलाहि परतत्व मानतात. या दोहोंच्या विवेचनाचें नांव विवेक आहे. जें जें ग्रहण करण्यास योग्य आहे त्याचें ग्रहण करणें व जें जें त्याज्य आहे, त्याचा त्याग करणें, हें जो करतो त्याला विवेकी असें म्हणतात. (२) जगताचा कर्ता व रागादि विकार तसेंच 'ईश्वरानें जग केलें' या अविवेकी मताचा त्याग करणें व योगानें लक्षित परम ज्योतिस्वरूप जो जीव आहे त्याचें ग्रहण करणें हें उत्तम आहे. हे लोक जीवाशिवाय ईश्वर हें दुसरें चेतन तत्त्व आहे असें मानत नाहींत' कोणीहि अनादिसिद्ध ईश्वर नाहीं असें बौद्ध व जैन मानतात. याविषयांवर राजा शिवप्रसादजी हे **'इतिहासतिमिरनाशक'** नांवाच्या ग्रंथामध्यें लिहितात कीं, **यांचीं दोन नांवें आहेत, एक जैन व दूसरें बौद्ध. हे दोनहि पर्यायवाची शब्द आहेत. बौद्धांमध्यें**

जाईल पण त्याच्या स्वाभाविक श्वेतवर्णाला नाहींसें करतां येणार नाहीं. जसा वस्त्राला पुनः मळ लागतो त्याचप्रमाणें मुक्त झाल्यावरहि लागेल. (प्र०) जीव पूर्वोपार्जितकर्मांच्या योगानें शरीर धारण करतो, त्यासाठीं ईश्वराला मानणें व्यर्थ आहे. (उ०) जर केवळ कर्मच शरीरधारणासाठीं निमित्त आहे व ईश्वर कारण नाहीं, तर तो जीव ज्यांत पुष्कळ दुःखें भोगावी लागतात असें वाईट जन्म घेणार नाहीं; तर सदैव चांगलेच जन्म धारण करील. कर्म प्रतिबंधक आहे असें जर म्हणाल, तरीहि जसा चोर आपणच बंदिखान्यांत जात नाही व स्वतः फांसावर चढत नाहीं, राजा शिक्षा देतो, त्याचप्रमाणें जीवाला शरीर धारण करण्यास व त्याच्या कर्मानुसार फल देण्यास कारणीभूत असणाऱ्या परमेश्वराला तुम्ही माना. [प्र०] मदा [नशे] प्रमाणें कर्मांचें स्वयमेव फल प्राप्त होतें. त्याला फल देण्याकरितां दुसऱ्याची गरज नाहीं. [उ०] जर असें होईल तर नेहमीं मद्यपान करणाऱ्या लोकांना नशा थोडी येते व अनभ्यस्त माणसाला जास्त येते त्याप्रमाणें नित्य व फार पापपुण्य करणारांला न्यून फल व कधींकधीं पापपुण्य करणारांला जास्त फल मिळालें पाहिजे. थोडें कर्म करणारांला जास्त फल मिळेल. [प्र०] ज्याचा जसा स्वभाव असेल त्याला तसेंच फल मिळत असतें. (उ०) जर तें स्वभावामुळें असेल तर तें सुटणें किंवा मिळणें हें असम्भव आहे. जसा शुद्ध वस्त्राला निमित्तामुळें मळ लागतो व तो निमित्तामुळेंच नाहींसा होतो असें मानणेंच ठीक आहे. (प्र०) संयोगावांचून कर्म परिणामाला प्राप्त होऊं शकत नाहीं. जसें दूध व आंबटपणा यांच्या संयोगावांचून दहीं होत नाहीं, त्याचप्रमाणें जीव व कर्मांचा परिणाम होत असतो. (उ०) पण दूध व आंबटपणा यांचें मिश्रण करणारा तिसरा असतो, त्याचप्रमाणें जीव व कर्मांचें फल यांचा संबंध जोडणारा तिसरा ईश्वर असला पाहिजे. कारण जड पदार्थ नियमानें संयुक्त होत नाहींत व जीवहि अल्पज्ञ असल्यामुळें स्वयं आपल्या कर्मफलाला प्राप्त होऊं शकत नाहींत. यांवरून हें सिद्ध झालें कीं ईश्वरनिर्मित सृष्टिक्रमाशिवाय कर्मफलाची व्यवस्था होऊं शकत नाहीं. (प्र०) जो कर्मापासून मुक्त होतो त्यालाच ईश्वर म्हणतात. (उ०) ज्याअर्थीं अनादिकालापासून जीवाला कर्म लागलें आहे त्याअर्थीं तो त्यांतून मुक्त कधींहि होऊं शकत नाहीं. [प्र०] कर्माचा बंध सादि आहे. [उ०] जर तो सादि आहे तर कर्माचा योग अनादि नाहीं व संयोगाच्या पूर्वीं जीव निष्कर्म होता. जर निष्कर्माला कर्म लागलें तर मुक्तांलाहि लागेल. कर्म व कर्ता यांचा समवाय म्हणजे नित्य संबंध असतो व तो सुटत नसतो, हें नवव्या समुल्लासामध्यें आलेंच आहे. तसेंच मानणें योग्य आहे. जीवानें आपलें कितीहि सामर्थ्य व ज्ञान वाढविलें, तरी त्याचें ज्ञान परिमित व त्याचें सामर्थ्य मर्यादितच असणार, ईश्वराप्रमाणें अनंत कधींहि होऊं शकत नाहीं. जितकें सामर्थ्य वाढवणें उचित आहे तितकें तो योगसाधनानें वाढवूं शकतो.

जैनांमध्यें जे अर्हत लोक आहेत ते देहाच्या परिमाणाबरोबर जीवाचेंहि परिमाण मानतात त्यांना असें विचारलें पाहिजे कीं, हत्तीचा जीव कीटकामध्यें कीटकाचा हत्तीमध्यें कसा राहूं शकेल ? हीहि एक मूर्खपणाचीच गोष्ट आहे जीव एक सूक्ष्म पदार्थ आहे. तो एक परमाणुमध्येंहि राहूं शकत. त्याची शक्ती शरीरामध्यें विद्युत् नाडी वगैरेमधून संयुक्त होते, त्या शक्तीमुळें तो शरीरांतील सर्व हालचाल जाणतो. उत्तम संगतीनें उत्तम व वाईट संगतीनें वाईट होतो, जैन या प्रकारचा धर्म मानतातः—

**रे जीव भवदुहाइं इक्कं चिय हरइ जिणमयं धम्मं । इयराणं परमं तो सुहकप्पे मुढमुसि ओसि ॥**

प्र. रत्ना. २। षष्ठी शत ६०। सू. ३॥

'अरे जीव ! एक जिनमत व श्रीवीतरागभाषितधर्मच, संसारासंबंधीं जन्मजरामरणादि दुःखांचें हरण करणारा आहे. याचप्रमाणें जैन मतवाल्याला सुदेव व सुगुरुहि जाणावा. वीतराग अशा ऋषभ देवांपासून तों महावीरापर्यंत झालेल्या देवांशिवाय जे अन्य हरिहर ब्रह्मादि कुदेवांची आपल्या कल्याणासाठीं पूजा करतात ते सर्व ठकविले गेले आहेत असें समजावें.' याचा हा भाव आहे कीं, जैनमताचें सुदेव, सुगुरु व सुधर्म सोडून जो अन्य कुदेव व कुधर्म यांचें सेवन करील त्याचें कांहींहि कल्याण होणार नाहीं (**समीक्षक**) यांचीं पुस्तकें कशीं निंदायुक्त आहेत, याचा याठिकाणीं विद्वानांनींच विचार करावा.

**अरिहं देवो सुगुरु सुद्ध धम्मं च पंच नवकारो। धन्नाणं कयच्छाणं निरंतरं वसइ हिययम्मि॥** प्र. र. २।६०

अरिहन् देवेन्द्रकृत पूजादि करण्याप्रमाणें दुसरें कांहींएक उत्तम नाहीं असा जो, देवांचा देव, शोभायमान अरिहन्त देव, ज्ञान क्रियावान् शास्त्रांचा उपदेष्टा, शुद्ध, कषायमलरहित. सम्यक्त्वविनयदयामूल, श्रीजिनभाषित जो धर्म आहे, तोच दुर्गतीमध्यें पडलेल्या प्राण्यांचा उद्धार करण्यास योग्य आहे. अन्य हरिहरादिकांचा धर्म संसारांतून उद्धार करणारा नाहीं. पंच, अरिहन्तादिक, परमेष्ठी, तत्संबंधीं यानां नमस्कार हे चार पदार्थ धन्य आहेत अर्थात् श्रेष्ठ आहेत; क्षमा, दया, सम्यक्त्व ज्ञान, दर्शन व चारित्र हा जैनांचा धर्म आहे, **(समीक्षक)** जी मनुष्यमात्रावर दया नाहीं ती दया नव्हे व क्षमाहि नव्हे, ज्ञानाच्याबद्दल अज्ञान, दर्शनाबद्दल अंधेर व चारित्राबद्दल भुकेनें मरणें ह्यांत कोणती उत्तम गोष्ट आहे ? जैनमताच्या धर्माची प्रशंसा:—

**जइ न कुणसि तव चरणं न पढसि न गुणेसि देसि नो दाणम्। ता इत्तियं न सक्किसिजं देवो इक्क अरिहन्तो॥**
प्र. र. भा. २। ष. सू. २॥

'हे मनुष्या ! जर तूं तपचारित्र करूं शकत नाहींस, सूत्रें शिकूं शकत नाहींस, प्रकरणादिकांचा विचार करूं शकत नाहींस व सुपात्राला दान देऊं शकत नाहींस, तथापि तूं एक अरिहन्त देव आमच्या आराधनेला योग्य आहेस. सुगुरु सुधर्म अशा जैनमतांमध्यें श्रद्धा ठेवणें हें सर्वोत्तम व उद्धाराला कारणीभूत आहे.' **(समीक्षक)** जर दया व क्षमा ह्या उत्तम गोष्टी आहेत, पक्षपातामध्यें फसण्यानें दया ही अदया व क्षमा ही अक्षमा होते. या धर्माचें प्रयोजन हें आहे कीं, कोणत्याहि जीवाला दुःख देऊं नये; पण ही गोष्ट सर्वथा होणें असंभव आहे, कारण दुष्टाला दण्ड करणें हीहि एक दयाच गणली आहे. जर एका दुष्टाला दंड न दिला तर सहस्र मनुष्यांला दुःख होईल; म्हणून तसली ती दया दया नव्हे व क्षमा क्षमा नव्हे. हें तर ठीक कीं, सर्व प्राण्यांच्या दुःखाचा नाश करणें व सुखाची प्राप्ति करून देण्याचा उपाय करणें ही खरी दया आहे. केवळ पाणी गाळून पिणें, क्षुद्र जंतूंचा बचाव करणें, ही दया नव्हे. पण या प्रकारची दया जैनांच्या बोलण्यांतच आहे. कारण ते तसें आचरणांत करीत नाहींत. मनुष्य कोणत्याहि मतामध्यें कां असेना त्यावर दया करणें, त्याचा अन्नपानादिकांनीं सत्कार करणें, दुसऱ्या मतांतीलहि विद्वानांची मानमान्यता करणें ही काय दया नव्हे ? जर यांच्याजवळ खरी दया आहे तर विवेकसाराच्या २२१ पृ. वर काय लिहिलें आहे तें पहा ! '(१) परमताची स्तुति करणें, (२) दुसऱ्या मतवाल्यांना नमस्कार करणें (३) अन्यमतवाल्याशीं थोडे भाषण करणें, (४) त्यांच्याशीं संलाप करणें (५) त्यांना अन्नवस्त्रादि किंवा खाण्यापिण्याचे पदार्थ देणें. (६) अन्यमतांतील प्रतिमापूजनाला गंधपुष्पादि देणें' हीं सहा प्रकारचीं कर्में जैनांनीं कधींहि करूं नयेत. **(समीक्षक)** जैन लोकांची अन्यमतानुयायांवर किती अदया, कुदृष्टि व द्वेष आहे याचा या ठिकाणीं बुद्धिमानांनींच विचार करावा. ज्या अर्थी अन्यमतस्थ मनुष्यांवर अशी यांची अदया आहे त्याअर्थी जैनांला दयाहीन म्हणणें योग्य आहे; कारण आपल्या घरांतील माणसांचीच सेवा करणें हा विशेष धर्म नाहीं त्यांच्या मताचीं मनुष्यें हीं त्यांच्या घरांतील माणसांसारखींच आहेत; त्यांची ते सेवा करितात, तशी ते अन्यमतवाल्यांची करीत नाहींत, तेव्हां यांना कोण बुद्धिमान् मनुष्य दयाशील समजणार आहे ? विवेक. पृ. १०८ मध्यें लिहिलें आहे कीं, मथुरेच्या राजाच्या नमुचि नामक दिवाणाला जैनांनीं आपला विरोधी समजून मारून टाकलें व आलोयणा (प्रायश्चित) करून ते शुद्ध झाले. 'दया व क्षमा यांचें हें विनाशक कृत्य नव्हे काय ? ज्या अर्थी अन्यमतवाल्यांवर हे त्यांचे प्राण घेण्यापर्यंत वैरबुद्धि ठेवतात त्या अर्थी यांना दयावान् असें कोण म्हणेल ? यांना दयाळू न म्हणतां हिंसक म्हणणें सार्थक होईल. आर्हतप्रवचनसंग्रह परमागमसार या ग्रंथामध्यें साम्यक्त्वदर्शनादिकांचीं लक्षणें लिहिलीं आहेत कीं, सम्यक् श्रद्धा, सम्यक् दर्शन, ज्ञान, चारित्र हीं चार मोक्षमार्गाचीं साधनें आहेत. यांची व्याख्या योगदेवानें केली आहे. ज्या रूपानें जीवादिद्रव्य अवस्थित आहे, त्याच रुपानें जिनप्रतिपादित ग्रंथानुसार, विपरीत अभिनिवेशादिरहित जी श्रद्धा, अर्थात् जिनमतावर प्रीति असते तिला सम्यक् श्रद्धा व सम्यक् दर्शन असें म्हणतात.

**रुचीर्जिनोक्ततत्वेषु सम्यक्श्रद्धानमुच्यते ।**

जिनोक्त तत्त्वांवर सम्यक् श्रद्धा ठेवली पाहिजे दुसऱ्या कशांवर नव्हे.

**यथावस्थिततत्त्वानां संक्षेपाद्विस्तरेण वा । यो बोधस्तमत्राहुः सम्यग्ज्ञानं मनीषिणः ॥**

ज्याप्रकारचीं जीवादिक तत्त्वें आहेत त्यांचा संक्षेपानें किंवा विस्तारानें जो बोध होतो त्यालाच बुद्धिमान् लोक सम्यक् ज्ञान असें म्हणतात,

**सर्वथाऽनवद्ययोगानां त्यागश्चारित्रमुच्यते ॥ कीर्तितं तदहिंसादि व्रतभेदेन पंचधा ॥**

**अहिंसासूनृतास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहाः ॥**

सर्व प्रकारांनी निंदनीय अन्यमतसंबंधाचा त्याग करणें याला चारित्र असें म्हणतात, अहिंसादि भेदांनीं व्रत पांच प्रकारचें आहे. (१) **अहिंसा** कोणत्याहि प्राणिमात्राला न दुखविणें. (२) **सूनृता** प्रियभाषणा करणें, (३) **अस्तेय** चोरी न करणें, (४) **ब्रह्मचर्य** उपस्थेंद्रियाचा संयम करणें, (५) **अपरिग्रह** सर्व वस्तूंचा त्याग करणें. या पांच व्रतांतील पुष्कळ गोष्टी उत्तम आहेत. अहिंसा, चोरो वगैरे निंदनीय कर्मांचा त्याग करणें हें फारच उत्तम आहे. पण हें सर्व अन्यमतांची निंदा करण्यानें होणाऱ्या दोषांनीं आच्छादित झाल्यामुळें दोषयुक्त झालें आहे ! पहिल्या सूत्रांतच लिहिलें आहे कीं, अन्य हरिहरादिकांचा धर्म उद्धार करणारा नाहीं; काय ही लहान निंदा आहे ! ज्यांचे ग्रंथ पाहिले असतां पूर्ण विद्या व धार्मिकता दिसते त्यांची निंदा करणें व पूर्वी ज्या दाखविल्या आहेत अशा आपल्या महा असंभव गोष्टी, त्या सांगणाऱ्या आपल्या तीर्थंकरांची स्तुति करणें हा केवळ हट्ट आहे. बरें जर जैन लोक कांहीं चारित्र करूं शकले नाहींत; शिकूं शकले नाहींत, त्यांच्यांत दान देण्याचें सामर्थ्य नसलें तर नुसतें जैनमत खरें आहे असें म्हणण्यानेंच तें उत्तम होईल काय ? व अन्य मतवाले श्रेष्ठ असतांहि अश्रेष्ठ होतील ? असें म्हणणाऱ्या माणसांना वेडा व बालबुद्धि म्हणूं नये तर म्हणावें तरी काय ? यांवरून हेंच सिद्ध होतें कीं, यांचे आचार्य स्वार्थी होते; ते पूर्ण विद्वान् नव्हते. ते जर सर्वांची निंदा न करते तर अशा असत्य गोष्टींमध्यें कोणीही फसले नसते व त्यांचें प्रयोजनहि सिद्ध झालें नसतें. पहा ! जैनाचें मत सर्वांना बुडविणारें व वेदमत सर्वांचा उद्धार करणारें अ हे हें तर सिद्ध होतेंच. हरिहरादि देव हे सुदेव व यांचें ऋषभदेवादि सर्व कुदेव आहेत असें जर दुसऱ्या लोकांनीं म्हटलें तर तें यांना वाईट लागणार नाहीं काय ? आतां यांच्या आचार्यांची आणखी चूक पहा:—

**जिणवर आणा भंगं उमग्ग उस्सुत्त लेस देसणउ । आणा भंगे पावंता जिणमय दुक्करं धम्मम् ॥ प्र० २।६।११॥**

उन्मार्ग उत्सूत्रांचा लेश दाखवण्यानें, जिनवर अर्थात् वीतरागी तीर्थंकरांच्या आज्ञेचा जो भंग होतो तो दुःखाचा हेतु आहे व तेंच पाप आहे. जिनेश्वरानें सांगितलेले सम्यक्त्वादि धर्म करणें फार कठीण आहे म्हणून ज्या प्रकारें जिनाच्या आज्ञेचा भंग होणार नाहीं त्या प्रकारें वर्तन ठेवावें. ( **समीक्षक** ) आपल्या मुखानें आपली प्रशंसा करणें, आपणच आपल्या धर्माला मोठा म्हणणें व दुसऱ्याची निंदा करणें ह्या सर्व मूर्खपणाच्या गोष्टी आहेत. कारण ज्याची दुसरेहि प्रशंसा करतात त्याची प्रशंसा करणें ठीक आहे. चोरहि आपली आपल्या मुखानें प्रशंसा करतात तेव्हां ते प्रशंसनीय होऊं शकतील काय ? याचप्रकारें यांच्या सर्व गोष्टी आहेत.

**बहुगुणाविज्झा निलयो उस्सुत्तभासी तहा विमुत्तव्वो । जहवरमणिजुतो विघ्नुविग्घकरो विसहरो लोए ॥**
**प्र० २।६।१८।**

जसा विषधर सर्पांतील मणि त्यागाला योग्य आहे, त्याचप्रमाणें जो जैन मतामध्यें नाहीं तो कितीहि जरी विद्वान् असला तरी, त्याचा त्याग करणें जैनाला उचित आहे. ( **समीक्षक** ) पहा किती चुकीची गोष्ट आहे ! जर यांचे चेले व आचार्य विद्वान् असते तर ते विद्वानांवर प्रेम करते. ज्या अर्थीं यांचे तीर्थंकरांसहित सर्वच अविद्वान् आहेत, त्या अर्थीं ते विद्वानांचा सन्मान कां करतील ? सुवर्ण मळामध्यें किंवा धुळींत पडलें तरी त्याचा त्याग कोण करील ? यांवरून जैनासारखे पक्षपाती, हट्टी, दुराग्रही व विद्याहीन दुसरे कोणीहि नाहींत, हें सिद्ध होत आहे.

**अइ सयपा वियपा वाधम्मि अपव्वे सुतो विपायरया । न चलन्ति सुद्धधम्मा धन्ना किविपावपव्वेसु ॥**
**प्र. २।६।२९।**

अन्यदर्शनें मानणारें कुलिंगी अर्थात् जैनमतविरोधी जे असतील त्यांचें दर्शनहि जैनांनीं करूं नये. (**समीक्षक**) ही किती मूर्खपणाची गोष्ट आहे याचा बुद्धिमान् लोकांनीं विचार करावा. ज्याचें मत खरें आहे त्याला कशाचीहि भीति

वाटत नाहीं हें खरें आहे. आपलें मत ठीक नाहीं, जर तें दुसऱ्यानें ऐकलें तर तो त्याचे खंडण करील हें यांचे आचार्य जाणत होते, म्हणून त्यांनीं सर्वांची निंदा केली व मूर्ख लोकांना फसविलें

**नामं पितस्स अ सुहं जेणनिदिठाइ मिच्छपव्वाह । जेसि**
**अणुसंगा उधम्मीणविहोई पावमई ।। प्र. २।६।७**

जो जैनमताशीं विरूद्ध धर्म आहे तो सर्व मनुष्याला पापी करणारा आहे; म्हणून कोणत्याहि अन्य धर्माला न मानतां जैन धर्मालाच मानणें श्रेष्ठ आहे. ( **समीक्षक** ) यांवरून जैन धर्म सर्वांशीं वैर, विरोध, निंदा, ईर्ष्या आदि दुष्ट कर्मरूपसागरामध्यें बुडविणारा आहे हें सिद्ध होतें. जैन लोक जसे सर्वांचे निंदक आहेत तसे दुसरे कोणीहि दुसऱ्याची निंदा करणारे महानिंदक व अधर्मी नसतील. एकाच बाजूनें सर्वांची निंदा व आपली प्रशंसा करणें हें शठ मनुष्यांचें काम नव्हे काय ? कोणत्याही मतांतील विवेकी लोक असोत ते चांगल्याला चांगला व वाईटाला वाईटच म्हणणार.

**हाहा गुरुअअ कज्जं सामीनंहु अच्छिक्खस्स पुक्करिमो ।।**
**कह जिण वयण कह सुगुरु सावय कह इय अकज्जं । प्र. २।६।३५।।**

सर्वज्ञ भाषित जिनवचन, जैनांचे सुगुरु व जैनधर्म कोठें व त्याचे विरुद्ध कुगुरु, अन्यमार्गाचे उपदेश कोठें ? अर्थात् आमचे सुगुरु, सुदेह व सुधर्म आणि अन्याचे कुगुरु, कदेव व कुधर्म आहेत. ( **समीक्षक** ) ही गोष्ट बोरें विकणाऱ्या बाईप्रमाणें आहे. जशी ती आपल्या आंबट बोरांना गोड म्हणते व दुसऱ्यांच्या गोड बोरांना आंबट म्हणते व तीं निरुपयोगीं आहेत असें भासविते, त्याचप्रकारें जैनांच्या गोष्टी आहेत, हे लोक आपल्या मतवाल्याशिवाय अन्यमतवाल्यांची सेवा करणें महत्पाप समजतात.

**सप्पो इक्कं मरणं कुगुरु अणंता इदेह मरणाइ । तोवरिसप्पं गहियुं मा कुगुरुसेवणं भद्दम् ।। प्र. २।३७।।**

जसें पूर्वी लिहिलें आहे कीं, सर्पातील मणि त्याज्य आहे त्याचप्रमाणें अन्य मतांतील श्रेष्ठ धार्मिक पुरुषांचाहि त्याग करणें उचित आहे. याहूनही अन्य मतवाल्यांची जास्त निंदा आतां करतात. जैन मताशिवाय अन्य सर्व कुगुरु अर्थात् ते सर्पाहूनही वाईट आहेत. त्यांचें दर्शन, सेवा व संग कधींही करूं नये, कारण सर्पाच्या संगतीनें एकदां मरण येतें पण अन्यमार्गी कुगुरूंच्या सेवेनें अनेककवार जन्ममरणामध्यें पडावें लागतें, म्हणून हे भद्रा ! अन्यमार्गीयांच्या गुरूंजवळसुद्धां उभा राहूं नकोस. जर तूं अन्यमार्गीयांची सेवा केलीस तर तूं दुःखांत पडशील. ( **समीक्षक** ) पहा ! जैनाप्रमाणें कठोर, भ्रांत, द्वेषी, निंदक प्रमादी दुसरे कोणीहि मतवाले नसतील. यांनीं मनामध्यें हा विचार केला आहे कीं, जर पण अन्यांची निंदा व आपली प्रशंसा न करूं तर आपली सेवा कोणी करणार नाहीं व आपली प्रतिष्ठा होणार नाहीं. आपण ही गोष्ट त्यांच्या दुर्भाग्याची आहे कीं, जोंपर्यंत हे उत्तम विद्वानाशीं संगति करणार नाहींत तोंपर्यंत यांना यथार्थ ज्ञान व सत्यधर्माची प्राप्ति कधींहि होणार नाहीं, म्हणून त्यांनीं विद्याविरुद्ध आपल्या असत्य गोष्टींचा त्याग करून वेदोक्त सत्यमतांचें ग्रहण करावें हें जैनांना उचित आहे व यानेंच त्यांचें फार कल्याण होईल.

**कंमणिमो किं करिमो ताणहयसाण धिठदुठाणं । जे दंसि ऊण लिंग खिवंति नरयम्मि मुद्धजणं ।।**
**प्र. २।६।४०।।**

ज्यांच्या कल्याणाची आशा नष्ट झाली आहे, धीट व वाईट कामें करण्यांत अत्यंत चतुर अशा दुष्ट दोषयुक्त मनुष्यांला काय सांगावें ? काय करावें ? कारण जो त्यांवर उपकार करतो त्याचा ते नाश करतात. जसें कोणी दया करण्यासाठीं आंधळया सिंहाचे डोळे उघडण्यास गेला असतां त्यानें त्याला खाऊन टाकावें त्याचप्रमाणें अन्यमार्गातील कुगुरूंवर उपकार करणें म्हणजे आपला नाश करून घेण्यासारखें आहे. म्हणून त्यांपासून सदैव दूर रहावें. ( **समीक्षक** ) जैन लोक जसा विचार करतात त्याचप्रमाणें दुसऱ्या मतवाल्यांनींहि विचार केला तर जैनाची किती दुर्दशा होईल बरें ? जर त्यांच्यावर कोणीहि कोणत्याच प्रकारचा उपकार न केला तर त्यांचीं बरींच कामें नाश पावतील व त्यांना फार दुःख होईल. याप्रमाणें दुसऱ्यांसाठीं जैनांनीं कां बरें विचार करूं नये.

**जह जह तुट्टई धम्मो जह जह दुठाणहोय अइउदउ । समद्दिठिजियाण तह तह उल्लसइ समतं ।। प्र. २।६।४२।।**

**जशी जशी दर्शनभ्रष्ट, निह्नव, पाच्छता, उसन्ना व कुसीलियादिक व अन्यदर्शनावलंबी, त्रिदंडी, परिव्राजक,**

मानाल तर कर्त्यावांचून पूर्वोक्त वस्त्रादि पदार्थ बनतात असें प्रत्यक्ष सिद्ध करून दाखवा. असें जर तुम्ही सिद्ध करूं शकत नाहीं तर त्या तुमच्या प्रमाणशून्य कथनाला कोण बुद्धिमान् पुरुष मानील ? (नास्तिक) ईश्वर विरक्त आहे कीं मोहित ? जर तो मोहित असेल तर जगत् बनवण्यास समर्थ होणार नाहीं. (आस्तिक) परमेश्वरामध्यें वैराग्य किंवा मोह केव्हांच संभवत नाहीं; कारण जो सर्वव्यापक आहे तो एका पदर्थाचें ग्रहण व दुसऱ्याचा त्याग करूं शकत नाहीं ईश्वराहून उत्तम पदार्थ किंवा त्याला अप्राप्त असा कोणताच पदार्थ नाहीं, म्हणून त्याला कशाबद्दलही मोह होत नाहीं. वैराग्य व मोह होणें हें जीवामध्येंच संभवतें तसें तें परमेश्वरामध्यें नाहीं. (नास्तिक) ईश्वराला जर जगाचा कर्ता व जीवांना फलें देणारा मानाल तर तो प्रपंची बनून दुःखी होईल. (आस्तिक) पहा ! अनेकविध कर्मांचा कर्ता, प्राण्यांना फल देणारा, धार्मिक, न्यायी व विद्वान् असा मनुष्य जर कर्मांमध्यें फसत नाहीं व प्रपंचीहि बनत नाहीं तर अनंत सामर्थ्य-युक्त परमेश्वर प्रपंची व दुःखी कसा बरें होईल ? हां ! तुम्ही आपल्या अज्ञानानें आपल्यासारखें व आपल्या तीर्थंकरां-सारखेंच परमेश्वरालाहि अज्ञानानें युक्त समजतां; पण हा तुमच्या अज्ञानाचा खेळ आहे. अविद्यादि दोषांपासून सुटण्याची जर तुमची इच्छा असेल तर वेदादि सत्य शास्त्रांचा आश्रय करा. विनाकारण भ्रमांत पडून धक्के कां बरें खातां ?

आतां जैन मताचीं सूत्रें व त्यांचें परीक्षण देतो. जैन लोक जगतासंबंधानें जसें मानतात तसेंच त्यांच्या सूत्रांनुसार लिहितों. प्रथमतः सूत्रांचा मूलार्थ संक्षेपानें करून नंतर त्यांच्या सत्यासत्याची समीक्षा केली आहे.

**सामि अणाइ अणन्ते च नूगइ संसार घोरकान्तरे । मोहाइ कम्मगुरु ठिइ विवांग वसनु ममइ जीवरो ॥**

—प्रकरणरत्नाकर भाग २। षष्ठिशतक ६०। सू० २.

हा रत्नसारभाग नामक ग्रंथाच्या सम्यक्त्वप्रकाश प्रकरणामधील गौतम व महावीर यांचा संवाद आहे. याचा संक्षेपानें उपयोगी अर्थ असा आहे कीं, 'संसार अनादि अनंत आहे, याची उत्पत्ति केव्हांहि झाली नाहीं व नाश केव्हांहि होणार नाहीं. अर्थात् हे जग कोणीहि बनविलें नाहीं.' तसेंच आस्तिक नास्तिक संवादामध्येंहि, 'हे मूढ ! जगत्कर्ता कोणी नाहीं, हें कधीं बनलें नाहीं व याचा कधींही नाश होणार नाहीं,' असें लिहिलें आहे. (समीक्षक) जो संयोगापासून उत्पन्न होतो तो अनादि व अनंत कधींहि होऊं शकत नाहीं. कर्माची उत्पत्ति व विनाश झाल्याशिवाय राहत नाहीं. जगामध्यें जितके पदार्थ उत्पन्न होतात तितके सर्व जर उत्पत्ति व विनाशयुक्त दिसतात तर मग हें जग उत्पत्ति व विनाशयुक्त कां नाहीं ? म्हणून तुमच्या तीर्थंकरांना सम्यक् बोध नव्हता हें खरें. जर त्यांना सम्यक् ज्ञान असतें, तर ते अशा असंभव गोष्टी कां लिहिते ? जसे तुमचे गुरु तसेच तुम्ही शिष्यंहि आहां ! तुमच्या गोष्टी ऐकणाऱ्याला पदार्थविज्ञान कधींहि होऊं शकणार नाहीं. जो पदार्थ प्रत्यक्ष संयुक्त दिसतो, त्याची उत्पत्ति व विनाश कां बरें मानीत नाहीं ? तात्पर्य यांच्या आचार्यांना भूगोल खगोलविद्याहि येत नव्हती व आताहि यांच्यांत ही विद्या नाहीं. नाहीं तर खालीं लिहिलेल्या असंभव गोष्टी हे कशा मानते व बोलते ? पहा ! या सृष्टीमध्यें पृथ्वीकाय अर्थात् पृथ्वी हे एक जीवाचें शरीर आहे तसेच जलकायादिहि जीव आहेत असें मानतात. पण अन्य कोणीहि यांना असें मानूं शकत नाहींत. ज्या तीर्थंकरांना हे जैन लोक सम्यक् ज्ञानी व परमेश्वर मानतात त्यांच्या असत्य गोष्टींचे आणखी नमुने पहा ! 'रत्नासारभाग' (या ग्रंथाला जैन लोक मानतात. हा ग्रंथ इ. स. १८७९ एप्रिल ता. २८ रोजीं बनारस जैनप्रभाकर छापखान्यांत नानकचंद जतीनें छापून प्रसिद्ध केला.) या ग्रंथाच्या १४५ व्या पृष्ठांवर काळाची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे. समयाचें नांव सूक्ष्मकाळ आहे असंख्यांत् समयाला आवलि असें म्हणतात. एककोटी सदसष्ट लक्ष सत्तर हजार दोनशें सोळा आवलींचा एक मुहूर्त होतो. तीस मुहूर्तांचा एक दिवस, पंधरा दिवसांचा एक पक्ष, दोन पक्षांचा एक महिना, बारा महिन्यांचें एक वर्ष होतें. अशा सत्तरलक्ष कोटी छप्पन सहस्र कोटि वर्षांचा एक पूर्व होतो अशा असंख्यांत पूर्वांचा एक पल्योपम काल होतो. असंख्यांत ही संज्ञा याला लावतात कीं, चार कोस चौरस व तितकीच खोल अशी एक विहीर खणावी व त्यांत जुगुलि मनुष्याच्या शरीरांवरील निम्नलिखित केंसाचें तुकडे भरावे; हल्लींच्या मनुष्याच्या केंसापेक्षां जुगुली मनुष्याचा केंस चार हजार शाणणाव्या हिश्शानें सूक्ष्म असतो; म्हणजे जुगुली मनुष्याचें चार हजार

शाण्णव केंस एकत्र करावे तेव्हां सध्यांच्या माणसाचा एक केंस होतो. अशा जुगुली मनुष्याच्या एका अंगुळा एवढ्या केंसाचे सातवेळ आठ आठ तुकडे करण्यानें २०९७१५२ वीस लक्ष सत्यान्नव हजार एकशें बावन तुकडे होतात. अशा तुकड्यांनीं पूर्वोक्त विहीर भरावी. त्यांतून शंभर वर्षांनीं एक एक तुकडा काढावा. अशा रीतीनें त्या विहिरींतील सर्व तुकडे निघून ती विहीर रिकामी होण्याला लागणाऱ्या कालाला संख्यात काल असें म्हणतात. वरील तुकड्यांमधून एक एक तुकड्यांचे असंख्यांत तुकडे करून त्या तुकड्यांनीं ती विहीर, चक्रवर्ती राजाची सेना जरी त्यावरून गेली तरी तो ढीग दबला जाणार नाहीं, अशी ठांसून भरावी. नंतर त्या तुकड्यांमधून शंभर वर्षांनीं एक एक तुकडा काढावा, अशा रीतीनें ती विहीर रिकामी होण्याला जो काल लागतो तो असंख्यांत काल होय. असें असंख्यांत पूर्व झालें म्हणजे एक **पल्योपम** काल होतो. हा पल्योपम काल विहीरीच्या दृष्टांतानें जाणावा. जेव्हां दहा कोट्यानुकोटी पल्योपम काल जाईल तेव्हां एक **सागरोपम** काल होतो, व जेव्हां दहा कोट्यानकोटी सागरोपम काल व्यतीत होईल तेव्हां एक **उत्सर्पणी** काल होतो, व जेव्हां एक उत्सर्पणी व एक अपसर्पणी काल होतो तेव्हां एक कालचक्र पुरें होतें. जेव्हां अनंत कालचक्रें पुरीं होतात तेव्हां एक पुद्‌गल परावृत्त होतो. अनंतकाल म्हणजे काय. ? जी सिद्धांत पुस्तकामध्यें नऊ दृष्टांतांनीं कालाची संख्या केलेली आहे, त्याच्यानंतरचा जो काल तो अनंतकाल होय. अनंत पुद्‌गलपरावृत्त काल जीवाच्या भ्रमणामध्यें व्यतीत होतो.

गणितविद्याविशारद लोक हो ऐका ! जैनांच्या ग्रंथांतील कालसंख्या तुम्ही करूं शकाल कीं नाहीं ? व तुम्ही हिला सत्य मानाल कीं नाहीं ? पहा ! हे तीर्थंकरही अशी गणितविद्या शिकले होते ! असे गुरु व शिष्य यांच्या मतामध्यें आहेत ! यांच्या अविद्येला कांहीं पारावार नाहीं. आणखीहि यांच्या मतांतील अंधःकार पहा ! रत्नासार भाग पृ. १३३ पासून पुढें जे कांहीं ऋषभदेवापासून तों महावीरपर्यंत चोवीस तीर्थंकर झाले आहेत त्यांच्या वचनांचा सारसंग्रह लिहिला आहे, तो पाहण्यासारखा मासलेवाईकच आहे. रत्नाकर भाग पृ. १४८ मध्यें लिहिलें आहे कीं, पृथ्वीकायाचे जीव, माती, पाषाणादि भेद जाणावेत. त्याच्यामध्यें राहणाऱ्या जीवांच्या शरीराचें परिमाण एक अंगुळाचा असंख्यातवा भाग समजावा. अर्थात् अत्यंत सूक्ष्म ते असतात. त्यांचें आयुर्मान अधिकाधिक बावीस हजार वर्षेंपर्यंत असतें. (रत्ना. पृ. १४९) वनस्पतीच्या शरीरांत अनंत जीव असतात त्या सर्वांना साधारण वनस्पति असें म्हणतात. जे कंदमूलप्रमुख व अनंतकायप्रमुख असतात त्यांना साधारण वनस्पतीचे जीव म्हणावें. त्यांचें आयुष्य अनंतमुहूर्त असतें; येथें यांचा पूर्वोक्त मुहूर्त समजावा. यांच्या एका शरीरामध्यें एकच स्पर्शेन्द्रिय असतें, व त्यांत एकच जीव राहतो. यालाच निरनिराळी वनस्पति म्हणतात. याचें देहमान एक हजार योजन असतें. पौराणिकांचें योजन चार कोसांचें असतें पण जैनांचें योजन १०,००० कोसांचें असतें. अशा चार सहस्र कोसांचें एक शरीर होतें. यांचें आयुर्मान अधिकाधिक दहा हजार वर्षेंपर्यंत असतें. नंतर दोन इंद्रियांचे जीव असतात. त्यांना एक शरीर व एक मुख असतें यामध्यें शंख, कवडी, ऊ वगैरेचा अंतर्भाव होतो. यांचें देहमान अधिकांत अधिक अठ्ठेचाळीस कोस स्थूल असते, व आयुष्यमान अधिकाधिक बारा वर्षांचें असतें. येथें यांची चूक झाली असावी कारण एवढ्या मोठ्या शरीराचें आयुष्य जास्तीच लिहिलें पाहिजे होतें. अशा प्रकारची अठ्ठेचाळीस कोस लांबीरुंदीची ऊ जैनांच्याच शरीरांवर पडत असेल, व त्यांनींच ती पाहिली असेल. दुसरे एवढी मोठी ऊ पाहूं शकतील ! असें त्यांचें भाग्य कोठें आहे ?

(रत्नसा, पृ. १५०) यांची अंदाधुंदी पहा ! विंचू, ढेकूण, कसर व माशी यांची शरीरें एक एक योजन लांब असतात, यांचें आयुष्य अधिकाधिक सहा महिने असतें. लोकहो पहा ! चार कोस लांबीचा विंचू कोणी पाहिला आहे काय ? विंचवाचें व माशीचें शरीर आठ मैल लांबीचें असतें असें जैनांच्या ग्रंथांत आहे ! असे विंचू व माशा यांच्याच घरांत असतात व त्यांनाच त्या दिसतात. या संसारांत हे प्राणी दुसऱ्या कोणाच्याहि नजरेस पडले नसतील. असले विंचू जर केव्हां जैनांना चावले तर त्यांचे काय होत असेल ? जलचरांचें अर्थात् माशाचें शरीरमान एक हजार योजन अर्थात् १०,००० कोसांचें एक योजन या हिशोबानें १,००००००० एक कोटी कोस लांब असतें; व एक कोटी पूर्व वर्षांचें यांचें आयुष्य असतें. असले स्थूल जलचर जैनांशिवाय दुसऱ्या कोणीहि पाहिले नसतील ! चतुष्पाद हत्तीचे देहमान दोन कोसांपासून नऊ कोसांपर्यंत दिलेलें आहे. आयुष्यमान चोवीस हजार वर्षांचें लिहिलें आहे ! असे मोठमोठ्या

शरीरांचे जीव जैनांनीच पाहिले असतील व म्हणूनच ते मानतात. दुसरे कोणी बुद्धिमान् हें मानूं शकणार नाहींत. (रत्न. पृ. १५१) मध्यें जलचर गभज जीवांचें देहमान उत्कृष्ट एक हजार योजनें अर्थात् १,००००००० एक कोट कोस व आयुष्मान एक कोटी पूर्व वर्षाचें असतें. अशा मोठ्या शरीराचे व आयुष्याचे जीव यांच्या आचार्यांनीं स्वप्नांतच पाहिले असतील. जिचा केव्हांहि संभव नाहीं अशी ही मोठी असत्य गोष्ट नाहीं काय ?

आतां (रत्न. पृ. १५१ ) मध्यें भूमीचें परिमाण पहा. या तिरव्या लोकांत असंख्यात द्वीप व असंख्यात समुद्र आहेत. या असंख्यातांचें प्रमाण, अडीच सागरोपम कलामध्यें जितके समय होतात तितकीं द्वीपें व तितके समुद्र आहेत. असें जाणावें. आतां या पृथ्वीमध्यें जम्बुद्वीप हें प्रथम सर्व द्वीपांच्या मध्यें आहे. याचें माप एक लक्ष योजन अर्थात् दोन एक अब्ज कोस आहे. या देशाच्या चारहि बाजूंनीं लवणसमुद्र आहे, याची लांबी दोन लक्ष योजन अर्थात् अब्ज कोस आहे. या जम्बुद्वीपाच्या चारहि बाजूंला धातकीखंड नांवाचें द्वीप आहे. त्याचा विस्तार चार लक्ष योजनें अर्थात् चार अब्ज कोस आहे. त्याच्या पुढें कालोदधि समुद्र आहे. त्याचें प्रमाण आठ लक्ष योजनें अर्थात् आठ अब्ज कोस आहे. त्याच्यापुढें पुष्करावर्त द्वीप आहे, त्याचें प्रमाण सोळा कोस आहे. त्या द्वीपाच्या आंत खोरा आहेत. त्या द्विपाच्या अर्ध्या भागांत मनुष्यें राहतात. याच्या पुढें असंख्यांत द्वीप व समुद्र आहेत व त्यांच्यांत तीर्यक् योनी जीव राहतात. (रत्नसार पृ. १५३) जंबुद्वीपामध्यें एक हिमवन्त, एक ऐरण्डवन्त, एक हरिवर्ष, एक रम्यक, एक देवकुरु, एक उत्तरकुरु, अशीं सहा क्षेत्रें आहेत.

**(समीक्षक)** भूगोलविद्या जाणणारे लोकहो ऐका ! भूगोलाचें परीमाण करण्यांत तुम्ही चुकलांत कीं, जैन चुकले ? जैन जर चुकले असतील तर त्यांना तुम्ही समजवा व जर तुम्ही चुकलां असाल तर तुम्ही त्यांच्याकडून शिका. थोडासा विचार केला असतां असें वाटतें कीं, जैनांचे आचार्य व शिष्य भूगोल, खगोल व गणितविद्या मुळींच शिकले नव्हते. जर ते ही विद्या शिकले असते तर त्यांनीं असल्या असंभव गोष्टी कशाला लिहिल्या असत्या ? असले अविद्वान् पुरुष जगत् अकर्तृक आहे व ईश्वर नाहीं असें मानतात, यांत आश्चर्य काय आहे ? म्हणूनच जैन लोक आपलीं पुस्तकें कोणत्याहि अन्यमतांतील विद्वानांना देत नाहींत. हे लोक हीं पुस्तकें तीर्थंकरांनीं बनवलीं असल्यामुळें प्रामाणिक आहेत असें मानतात. ते ग्रंथ अशा अविद्यायुक्त गोष्टींनीं भरलेले आहेत कीं जर ते दुसऱ्यांना दाखविलें तर आपलें बिंग बाहेर पडेल म्हणून हे कोणालाच दाखवीत नाहींत, यांच्या वांचून कोणीहि थोडासा विद्वान् मनुष्य केव्हांहि या गप्पाध्यायाला खरें मानणार नाहीं. हा सर्व घोंटाळा जैनांनीं जग अनादि आहे असें मानण्यासाठीं लिहिला आहे पण तें सर्व असत्य आहे. हां जगाचें कारण अनादि आहे, कारण ते परमाणु आदितत्वरूप अकर्तृक आहेत; पण त्यामध्यें नियमपूर्वक बनणें व बिघडणें हें सामर्थ्य मुळींच नाहीं. द्रव्यांचे परमांणु स्वभावानें पृथक् पृथक् आहेत, जड आहेत, म्हणून ते आपोआप यथायोग्य रीतीनें बनूं शकत नाहींत म्हणून त्याचा बनविणारा चेतन अवश्य आहे व तो बनविणारा ज्ञानरूप आहे. पहा ! पृथ्वीसूर्यादि सर्व लोकांना नियमांमध्यें ठेवणें हें अनंत अनादि चेतन परमात्म्याचेंच काम आहे. ज्याच्यामध्यें संयोग व रचना विशेष दिसतें तें स्थूल जग कधींहि अनादि होऊं शकत नाहीं. जर कार्यरूपी जगाला नित्य मानाल तर त्याचें कारण मुळींच असणार नाहीं, व तेंच कार्य कारणरूप होईल. जर असें तुम्ही म्हणाल तर आपल्या आपणच कार्य व कारण असें मानण्यामध्यें अन्योन्याश्रयदोष व आत्माश्रयदोष येईल. आपल्या खांद्यावर आपणच चढणें व आपला पिता आपणच होणें हें होऊं शकत नाहीं. म्हणून जगाचा कर्ता अवश्य मानला पाहिजे. **(प्रश्न)** ज्या ईश्वराला जगाचा कर्ता तुम्ही मानतां त्या ईश्वराचा कर्ता कोण ? **(उत्तर)** कर्त्याचा कर्ता व कारणाचें कारण कधींहि असूं शकत नाहीं; कारण प्रथम कर्ता व कारण असलें तरच कार्य होतें. ज्याच्यामध्यें संयोग व वियोग नसतात, जो प्रथम संयोग व वियोग यांना कारण असतो, त्याचा कर्ता किंवा त्याचें कारण कोणतेंहि असूं शकत नाहीं. याचें विशेष स्पष्टीकरण अष्टमसमुल्लासामध्यें पहावें. या जैन लोकांना स्थूल गोष्टींचेंहि यथावत् ज्ञान नाहीं मग परमसूक्ष्म सृष्टीविद्येचें ज्ञान कसें समजणार ? जैन लोक सृष्टीला अनादि मानतात द्रव्यपर्यायांलाहि अनादि मानतात, प्रतिगुण, प्रतिदेशामध्यें अनंतपर्याय व प्रतिवस्तुमध्येंहि अनंतपर्याय मानतात, असें प्रकरणरत्नाकरांत लिहिलें आहे पृ. सर्

असत्य आहे, कारण ज्यांना अंत व मर्यादा असते त्यांचे सर्व संबंधी अंतयुक्तच असतात. अनंताला जरी असंख्य म्हटलें तरीहि तें ठीक होत नाही. पण जीवाच्या अपेक्षेनें ही गोष्ट ठीक होऊं शकते, परमेश्वराच्या अपेक्षेनें नाहीं. कारण एकएका द्रव्यामध्यें आपआपल्या एकेका कार्यकारणसामर्थ्याला अविभागपर्यायांनीं अनंत सामर्थ्ययुक्त मानणें केवळ अविद्येची गोष्ट आहे. जर एकएका परमाणुद्रव्याची सीमा असते तर त्यांत अनंतविभागरूप पर्याय कसें राहूं शकतील ! अशा एकएका द्रव्यांमध्यें अनंत गुण व एका गुणप्रदेशामध्यें अविभागरूप अनंत पर्यायाला अनंत मानणें केवळ बालपणाच्या गोष्टी आहेत. कारण ज्याच्या अधिकारणाला अंत आहे तर त्यांत राहणारांचा अंत कां नसेल ? या ग्रंथांत अशाच अनेक मिथ्या गोष्टी लिहिल्या आहेत. जीव व निर्जीव या दोन पदार्थांविषयीं जैनांची निश्चत मतें पुढील प्रमाणें आहेत:—

**चेतनालक्षणो जीवः स्यादजीवस्तदन्यकः ॥ सत्कर्मपुद्‌गलाः पुण्यं पापं तस्य विपर्ययः ॥१॥**

हें जिनदत्तसूरीचें वचन आहे व हें प्रकरणरत्नाकराच्या पहिल्या भागांतील नयनचक्रसारामध्यें लिहिलें आहे. "जीव चेतनालक्षण आहे व निर्जीव अर्थात् जड, चेतनारहित आहे. सत्कर्मरूप पुद्‌गल हें पुण्य व पापकर्मरूप पुद्‌गल हें पाप आहे." (**समीक्षक**) जीव व जड यांचें लक्षण ठीक आहे. पण जे जडरूप पुद्‌गल आहेत ते पापपुण्यरूप केव्हांहि होऊं शकत नाहींत; कारण पापपुण्य करण्याचा स्वभाव चेतनामध्येंच असतो. पहा ! हे जितके जड पदार्थ आहेत तितके सर्व पापपुण्यविविरहित आहेत. जीवाला अनादि मानणें हें जैनांचें मत ठीक आहे; पण त्या अल्प व अल्पज्ञ जीवाला मुक्तिदशेमध्यें सर्वज्ञ मानणें हें खोटें आहे कारण जो अल्प व अल्पज्ञ आहे त्याचें सामर्थ्यहि नेहमीं मर्यादितच असणार ? जैन जग, जीव, जीवाचें कर्म व बंधन हे अनादि मानतात. यामध्यें सुद्धां जैनांच्या तीर्थंकरांची चूक झाली आहे; कारण संयुक्त जगाचें कार्यकारण, प्रवाहानें कार्य व जीवांचें कर्म व बंधन हीं अनादि होऊं शकत नाहींत, व जर असें तुम्ही मानतां तर कर्म व बंध यांपासून सुटणें तरी कसें मानतां ? पदार्थ अनादि असतो तो कधींहि सुटूं शकत नाहीं. जर अनादीचा नाश होतो असें मानाल तर तुमच्या सर्व अनादि पदार्थांचा नाश होण्याचा प्रसंग येईल, व जर अनादि नित्य आहे असें मानाल तर कर्म व बंध नित्य मानावे लागतील. जेव्हां सर्व कर्मांच्या नाशाचा प्रसंग येईल व जेव्हां अनादीला नित्य मानाल तेव्हां कर्म व बंधनहि नित्य मानावे लागतील. जर तुम्हीं सर्व कर्मांपासून सुटणें हीच मुक्ति असें मानतां तर सर्व कर्में सुटणें हें मुक्तीचें निमित्त झालें, व त्यामुळेंच मुक्ति ही नैमित्तिक झाली, म्हणून तीं सदैव राहणार नाहीं. कर्म व कर्ता यांचा नित्यसंबंध असल्यामुळें केव्हांहि कर्म सुटणार नाहीं व यामुळेंच तुम्ही आपणाकरितां व तीर्थंकरांकरितां मुक्ति नित्य मानलेली आहे पण हें बरोबर नाहीं. (**प्रश्न**) ज्याप्रमाणें धान्याचें बरचें साल निघून गेल्यानें किंवा त्याला अग्निसंयोग झाल्यानें जसा त्या बीजाला पुनः अंकुर येत नाहीं त्याप्रमाणें मुक्त झालेल्या जीवाला पुनः जन्ममरणरूप संसारामध्यें यावें लागत नाहीं. (उ०) जीव व कर्म यांचा संबंध साल व बीज यांच्यासारखा नाहीं, पण यांचा समवायसंबंध आहे. जीव, व त्यामध्यें कर्म व कर्तृत्वशक्ति यांचा संबंध अनादिकालापासून आहे. जर त्याच्यामध्यें कर्म करण्याच्या शक्तीचाहि अभाव मानाल, तर सर्व जीव पाषाणवत् होऊन जातील व त्यांच्यांत मुक्तीचा उपभोग घेण्याचें सामर्थ्यहि राहणार नाहीं. जसा अनादिकालाच्या कर्मबंधांतून सुटून जीव मुक्त होतो तसाच तो तुमच्या नित्यमुक्तींतून सुटून पुनः बंधांत पडेल; कारण जसें तुम्ही मुक्तीच्या कर्मरूपी साधनापासून सुटून जीव मुक्त होतो असें मानतां त्याचप्रमाणें तो नित्यमुक्तीमधून सुटून बंधनांत पडतो असें कां मानीत नाहीं ? साधनांनीं सिद्ध झालेला पदार्थ कधींहि नित्य असूं शकत् नाहीं व जर साधनसिद्धिवांचून मुक्ति मानाल तर कर्मावांचूनहि बंध होऊं शकेल ! जसा वस्त्रांला मळ लागतो, तो धुतला असतां जातो व पुनः मळ लागतो त्याचप्रमाणें मिथ्यत्वादि हेतुमुळें व रागद्वेषादि कारणांच्या आश्रयामुळें जीवाला कर्मरूप मळ लागतो व तो सम्यक् ज्ञानदर्शनचरित्रानें निर्मळ होतो. मळ लागण्यानें मळ लागतो असें मानतां तर मुक्त जीव संसारी होतो व संसारी जीव मुक्त होतो असें तुम्हांला मानावें लागेल; कारण जशी निमित्तांनीं मलीनता सुटते तशी ती निमित्तांनीं लागतेहि. म्हणून प्रवाहरूपानें बंधन व मुक्ति ही जीवाला अनादि आहे असें माना; तीं अनंततेनें नाहीं. (प्र०) जीव कधींहि निर्मळ नव्हता; तो नेहमीच मलीन आहे. (उ०) जर तो कधींहि निर्मळ नव्हता तर केव्हांहि तो निर्मळ होणार नाहीं. जर एखादें वस्त्र प्रथमतः शुभ्र असलें व नंतर त्याला मळ लागला तर तो धुऊन

तसेंच विप्रादिक दुष्ट लोकांचीं शक्ति, सत्कार व पूजा अधिक होईल तसें तसें सम्यक् दृष्टी जीवांचें सम्यकत्व विशेष प्रकाशित होईल असें म्हणणें फार आश्चर्य आहे. (**समीक्षक**) आतां पहा ! जैनांपेक्षां अधिक ईर्ष्या द्वेष व वैरबुद्धियुक्त दुसरा कोणी असेल काय ? हां ! दुसऱ्या मतांमध्यें ईर्ष्याद्वेष आहेत, पण जितके ते या जैनामध्यें आहेत तितके दुसऱ्यांमध्यें नाहींत. द्वेष हेंच पापाचें मूळ आहे तेव्हां जैनामध्यें पापाचरण कशावरून नसेल ?

**संगो विजाण अहिउ तेसिं धम्माइ जेपकुव्वन्ति । मुतूण चोरसंगं करन्ति ते चोरियं पावा ।। प्र. २।६।७५ ।।**

याचा मुख्य भावार्थ इतकाच आहे कीं, जसें मूर्ख लोक चोरांच्या संगतीनें नासिकाछेदादि दण्डाचें भय बाळगीत नाहींत, त्याचप्रमाणें जैनमताहून भिन्न धर्मामध्यें स्थित असलेले चोर लोक आपल्या होणाऱ्या अकल्याणाला भीत नाहींत. (**समीक्षक**) जो जसा मनुष्य असतो तो प्राय: आपणासारखाच दुसऱ्याला समजतो. जैनमत तेवढें साहुकार मत आहे व बाकीचीं सारीं चोर मतें आहेत हें खरें असू शकेल काय ? जोंपर्यंत मनुष्यामध्यें अत्यंत अज्ञान व कुसंगतीनें भ्रष्ट झालेली बुद्धि असते तोंपर्यंतच दुसऱ्यांशीं असलेला ईर्षाद्वेष वगैरे ते सोडीत नाहीं. जसें जैनमत दुसऱ्यांचें द्वेषक आहे तसें दुसरें कोणतेंहि नाहीं.

**जच्छपसुमहिसलरका पव्वंहोमन्ति पायन वमीए ।।**
**पूअन्तितंपि सद्दाहा ही लावी परायस ।। प्र. २।६०।७६ ।**

पूर्वसूत्रांत सांगितल्याप्रमाणें जैनमार्गाहून भिन्न मार्गाचें अवलंबन करणारे लोक मिथ्यात्वी व आपण सम्यक्त्वी अर्थात् अन्य सर्व पापी व जैनलोक सर्व पुण्यात्मे आहेत, म्हणून जो कोणी मिथ्यात्वी लोकांचा धर्म स्थापन करील तो पापी आहे. (**समीक्षक**) जसे अन्य मतांतील चामुंडा, कालिका, ज्वाला, व प्रमुखांची, पापनवमी, दुर्गानवमी, वगैरे तिथिव्रतें सर्व वाईट आहेत त्याचप्रमाणें ज्यांपासून फार कष्ट होतात अशीं तुमची पजूमणादि व्रतें, वाईट नाहींत काय ? या ठिकाणचें वाममार्गी लोकांच्या लिलेंचें खंडण तर ठीक आहे. पण शासनदेवी व मरुतदेवी यांना जे मानतात त्यांचें यांनीं खंडण केलें असतें तर बरें झालें असतें. आमची देवी हिंसक नाहीं असें जर म्हणतील तर तें म्हणणें खोटें आहे. कारण यांच्या शासनदेवीनें एका पुरुषाचे व एका बकऱ्याचे डोळे काढले होते, तेव्हां ती राक्षसी व दुर्गा व काली यांची सख्खी बहीण कशी नव्हे ? आपल्या पच्चखाणादि व्रतांना उत्तम मानणें व नवम्यादि व्रतांना वाईट मानणें ही मूर्खपणाची गोष्ट आहे. दुसऱ्यांच्या उपासांचीं निंदा व आपल्या उपासांची स्तुति करणें हा मूर्खपणा आहे सत्यभाषणादि जीं यांच्यातील व्रतें आहेत ती सर्वांसाठींच उत्तम आहेत जैनांचा किंवा अन्य कोणाचाच उपवास योग्य नाहीं

**वेसाणवंदियाणय माहणडुं वाणजर परिरक्खणम् ।।**
**भत्ता भर कठाणं वियाण जन्ति दूरेणम् ।। प्र. २।६०।८२**

याचा मुख्य भावार्थ हा आहे कीं, जे वेश्या, चारण, भाटादि, लोकांचे, ब्राह्मण, यज्ञ, गणेशादि व मिथ्यादृष्टी देवी आदि देवतांचें भक्त असतात, व जे यांना मानतात, ते सर्व बुडणारे व बुडवणारे होत. कारण त्यांच्याजवळ या सर्व वस्तू ते मागतात व वीतरागी पुरुषापासून दूर राहतात-(**समीक्षक**) दुसऱ्या मार्गीयांच्या देवतांना मिथ्या म्हणणें, व आपल्या देवतांना सत्य म्हणणें हें केवळ पक्षपातीपणाचें आहे. हे जर अन्य वाममार्गीयांच्या देवांचा निषेध करतात तर आपल्या शासनदेवीचा निषेध कां करीत नाहींत? शासनदेवीनें रात्रीं भोजन करण्यासाठीं एका पुरुषाला थप्पड मारली, त्याचे डोळे बाहेर काढलें व त्याबद्दल बकऱ्याचे डोळे काढून त्या मनुष्याला लाविलें असें 'श्राद्धदिनकृत्य' ग्रंथाच्या ४६ पृ. वर लिहिलें आहे. या देवीला हिंसक असें हे लोक कां मानीत नाहींत ? रत्नसागर भा. १ पृ.६७वर काय लिहिलें आहे पहा ! मरुतदेवी पांथस्थांना दगडाची मूर्ति होऊन सहाय्य करीत असे. हिलाहि तशीच कां मानीत नाहीं ?

**किसोपि जणणी पावो पाणो जणणी इकिं अगो विद्धि ।।**
**जइमिच्छर ओ जावो गुपे सुसमच्छरं वहइ ।। प्र. २।६०।८१.**

जे जैनमतविरोध मिथ्यात्वी अर्थात् मिथ्याधर्मवाले आहेत ते कां जन्मतात ? जन्मल्यानंतर वाढतात का ? अर्थात् ते लवकर नाश पावते तर चांगलें झालें असतें ! (**समीक्षक**) पहा याचा वीतरागभाषित दयाधर्म ! दुसऱ्या मतवाल्याचें जीवीतहि हे इच्छित नाहींत ! यांच्या केवळ कथनामध्येंच काय तो दयाधर्म आहे व जो आहे तो क्षुद्र जीव पशु यांसाठी आहे. जैनभिन्न मनुष्यासाठीं नाहीं.

**शुद्धे मग्गे जाया सुहेण मच्छंति सुद्धिमग्गंमि। जे पूण अमग्गजाया मग्गे गच्छन्ति तं चुप्पं ॥ प्र. २।६०।८३**

याचा मुख्य भावार्थ हा आहे कीं, एखदा जैनकुलांत जन्म घेऊन मुक्तीला जाईल तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. **पण जैनभिन्न** कुलामध्यें जन्मून मिथ्यात्वी व अन्यमार्गी बनून मुक्ति प्राप्त होते हें फार मोठें आश्चर्य आहे. याचें तात्पर्य **असें कीं, जैनमतानुयायीच** मुक्त होतात अन्य नाहीं. जे जैनमताचें ग्रहण करीत नाहींत ते नरकांत जातात. **(समीक्षक)** जैनमतांतील एखादा दुष्ट पुरुष नरकांत जात नसेल काय ? हे सर्वच मुक्तींत जातात व दुसरे कोणी नाहीं ! ही काय उन्मत्तपणाची वल्गना नव्हे ! भोळया माणसांशिवाय अशा गोष्टीं दुसरा कोण मानील ?

**तिच्छराणं पूआसंमत्तगुणाणकारिणी भणिया । सावियमिच्छत्तयरी जिण समये देसिया पूआ ॥ प्र २।६०।९०**

जिन मूर्तीची पूजा करणें हें एकच सार आहे व याहून भिन्न मार्गीयांच्या मूर्तींची पूजा करणें हें असार आहे. जो **जिनमार्गाची** आज्ञा पाळतो तो तत्वज्ञानी व जो पाळत नाहीं तो तत्वज्ञानी नव्हे ! **(स०)** वाहवा ! काय म्हणावें ! जशा **वैष्णवादिकांच्या** मूर्ति पाषाणादि जड पदार्थांच्या आहेत तशा तुमच्या नाहींत काय ? तुमची जशी मूर्तिपूजा मिथ्या आहे तशीच वैष्णवादिकांचीहि मूर्तिपूजा मिथ्या आहे. तुम्ही तत्वज्ञानी बनता व अन्यांला अतत्वज्ञानी बनवितां, **यांवरून** तुमच्या मतांमध्यें तत्वज्ञान मुळींच नाहीं हें उघड ठरतें.

**जिण आणा एधम्मो आणा हि आण फुंड अहमुत्ति ॥**
**इयमुणि ऊण यतत्तं जिण आणाए कुणहु धम्मं ॥ प्र. र. २।६०।९२ ॥**

जिनदेवाची जी आज्ञा, दया व क्षमा आहे तोच धर्म आहे, त्याशिवाय इतर सर्व आज्ञा अधर्म आहे. **(समीक्षक)** **ही कितीतरी** मोठी अन्यायाची गोष्ट आहे. जैनमताशिवाय अन्य कोणीहि पुरुष सत्यवादि धर्मात्मा नाहीं काय ? त्या धार्मिक माणसाला मान देऊं नये काय ? हां ! जर जैनमतस्थ मनुष्यांची जिव्हा व मुख चामड्याचें नसतें व अन्यांचें चामड्याचें असतें तर हें म्हणणें ठीक झालें असतें, यांनीं आपल्या ग्रंथांची, वचनांची **व** साधूंची अशीं महती वर्णिली आहे **कीं,** जणू काय हे भाटांचे थोरले बंधूच बनले आहेत.

**वन्नेमिनारया उविजेसिन्दुरकाइ संभरंताणम् । भव्वाण जणइ हरिहररिध्दि सीमिध्दि विउद्धोसं ।।प्र. २।६०।९५**

जी हरिहरादि देवांची विभूति आहे ती नरकाला कारणीभूत आहे. त्यांना पाहून जैनांचे रोमांच उभे राहतात. जसें राजाज्ञेचा भंग करण्यानें मनुष्याला मरणापर्यंत दुःख होतें त्याचप्रमाणें जिनेंद्राची आज्ञा भंग करण्यानें जन्ममरण दुःख कां पावणार नाहीं ? असें याचें मुख्य तात्पर्य आहे **(समीक्षक)** पहा ! जैनांच्या आचार्यांची मनोवृत्ति व त्यांच्या कपटाची व ढोंगाची लीला ! आतां तर यांच्या अंतर्यामांतील गोष्ट बाहेर आली. हरिहरादिकांचें व त्यांच्या उपासकांचें ऐश्वर्य व त्यांची उन्नत्ति ही यांना पहावीशी सुद्धां वाटत नाहीं. दुसऱ्याची बढती झालेली पाहून यांचे रोमांच उभे राहतात त्यांचें सर्व ऐश्वर्य आपणास मिळालें व ते दरिद्री झाले तर उत्तम असें हें प्रायः इच्छित असतील. जैन लोक **हे** राजाचे फार खुशामतीं व फार भित्रे असतात म्हणून हे राजाज्ञेचा दृष्टांत देतात. राजाची असत्य गोष्टहि मानावी काय ? जैनाहून अधिक ईर्ष्याद्वेषी दुसरा कोणीहि असणार नाहीं.

**जो दइशुद्धधम्मं सो परमप्पा जयम्मि नहु अन्नो । किं कप्प द्रुम्म सरिसो इयरतरू होइकइयावि ।।** प्र. २।६०।१०१

**जे** जैनधर्माच्या विरुद्ध अहेत ते मूर्ख लोक आहेत. जो जिनेंद्रभाषित धर्माचा धर्मोपदेष्टा, साधु, गृहस्थ व **ग्रंथकर्ता** आहे तो तीर्थंकराच्या तुल्य आहे. त्याच्या तुल्य दुसरा कोणी नाहीं. **(समीक्षक)** जर जैन लोक बालबुद्धि नसते तर अशा गोष्टी कशाला मानते. वेश्या जशी आपणाशिवाय दुसऱ्याची स्तुति करीत नसते तशीच यांची ही गोष्ट दिसते.

**जे अमुणि अगुण दोषाते कह अग्रुहाणहुन्तिमग्नच्छा ॥**
**आहते विहुम ग्रच्छाता विसअमि आण तुललत्तं ।। प्र. २।६०।१०२।**

जिनेंद्र देव, तदुक्त सिद्धांत व जिनमताच्या उपदेशकांचा त्याग करणें जैनाना उचित नाहीं **(समीक्षक) हे जैनांचे हट्ट, पक्षपात व अविद्या यांचे फल नव्हें तर काय ? जैनांच्या थोड्याशा गोष्टी सोडून अन्य सर्व त्याज्य आहे !**

ज्याला थोडीशी बुद्धि असेल व जो जैनांचे देव, सिद्धांत ग्रंथ व उपदेशकांचा उपदेश ऐकून विचार करील तर तत्क्षणीच तो निःसंदेह त्या सर्वांचा त्याग करील.

**वयणे वि सुगुरुजिणवल्लहस्सकेसि न उल्लसइ सम्मं ।**

**अहकह दिणमणितेयं उलुआणं हरइ अन्धत्तं ॥ प्र. २।६०।१०८**

जे जिनवचनानुकूल चालतात ते पूजनीय आहेत, व विरुद्ध वागतात ते अपूज्य होत. जैन गुरूंला मानणें व अन्यमार्गीयांला न मानणें, **(समीक्षक)** जर जैन लोक अज्ञान्यांना शिष्य करून आपल्या मतांत त्यांना पशुवत् न बांधते तर ते यांच्या जाळयांतून सुटून आपल्या मुक्तीचें साधन प्राप्त करून आपला जन्म सफल करून घेते. अहो तुम्हांला जर कोणी कुमार्गी, कुगुरु, मिथ्यात्वी व कूपदेष्टा म्हणेल तर तुम्हाला किती दुःख होईल बरें ? ज्याअर्थी तुम्ही दुसऱ्यांला दुःखदायक आहांत त्याअर्थी तुमच्या मनांत बऱ्याच वाईट गोष्टी भरलेल्या आहेत.

**तिहुअण जणं मरंतं दठ्ठण निअन्तिजेन अप्पाणं । विरमंतिन पावा उधिध्दि धिठ्तणं ताणम् ॥ प्र. २।६० १०९**

जरी मरणापर्यंत दुःख झालें तरीहि कृषिव्यापारादि कर्मे जैन लोकांनीं करूं नयेत कारण हीं कर्मे नरकांत घेऊन जाणारीं आहेत. **(समीक्षक)** आतां कोणी तरी जैनांना विचारावें कीं तुम्हीं व्यापारादि कर्मे कां करतां ? या कर्मांला कां सोडीत नाहीं ? व जर सोडून द्याल तर तुमच्या शरीराचें पालनपोषणहि होऊं शकणार नाहीं व जर तुमच्या कथनाप्रमाणें सर्व लोक हीं कर्मे सोडतील तर तुम्ही कोणती वस्तु खाऊन जिवंत राहाल ? असा अत्याराचाराचा उपदेश करणें सर्वथा व्यर्थ आहे. काय करतील बिचारे ! यांना विद्या व सत्संग नसल्यामुळें यांच्या मनाला जें आलें तें यांनीं लिहिलें आहे !

**तइया हमाण अहमा कारण रहिया अनाण गव्वेण ।**

**जे जपंति उशुत्तं ते सिदिध्दिच्छपम्मिच्चं ॥ प्र० २। ६०।१२१**

जे जैनागमाच्या विरुद्ध शास्त्रांना मानणारे आहेत ते अधमाधम आहेत. कोणतेंहि का काम सिद्ध होईना पण जैनमताच्या विरुद्ध बोलूं नये व मानूं नये. कोणतेंही प्रयोजन साधत असलें तरी अन्यमताचा त्यागच करावा. **(समीक्षक)** तुमच्या मूळ पुरुषापासून आजपर्यंत जितके पुरुष झाले असतील तितक्या सर्वांनीं दुसऱ्यांला शिव्या देण्याशिवाय दुसरी कोणतीच गोष्ट केली नसेल व ते करणारहि नाहींत ! आपलें प्रयोजन सिद्ध होत आहे असें जेव्हां हे जैन लोक पाहतात तेव्हां हे चेल्यांचेहि चेले बनतात. अशा खोट्यानाट्या गप्पा मारण्यास यांस मुळींच लज्जा वाटत नाहीं ही मोठ्या शोकाची गोष्ट आहे.

**जम्बीर जिणस्स जिओ मिरई उस्सुत्तले सदेसणओ ।**

**सागर कोडा कोडिंहिं मइ अइ भी भवरणे ॥ प्र० २।६०।१२२**

जैनसाधूमध्येंहि धर्म आहे व आमच्या अन्यमतामध्येंहि धर्म आहे असें जो कोणी मनुष्य म्हणेल तो मनुष्य कोट्यावधि वर्षेपर्यंत नरकांत राहून पुनः पुनः नीच योनींत जाईल. **(समीक्षक)** वाहवारे वाहवा ! विद्येचे शत्रूहो ! हें भयंकर वचन लिहिलें म्हणजे आपल्या मिथ्या वचनांचें कोणीहि खंडन करणार नाहीं, असा तुम्ही विचार केला असेल. आतां कोठपर्यंत तुम्हांला समजवावें ! तुम्ही तर व्यर्थ निंदा व अन्यमतांशीं वैर करण्यास सज्ज आहांत व आपलें प्रयोजन साधणें यांतच पुरुषार्थ समजत आहांत !

**दूरे करणं दूरम्मि साहुणं तहयभावणा दूरे । जिणधम्म सद्दहाणं पितिर कदुरकाइनिठवइ ॥ प्र.२।६०। १२७**

जर कोणा माणसाकडून जैनधर्माचें थोडेहि अनुष्ठान होऊं शकत नसेल तरीहि त्यानें जैनधर्मच सत्य आहे तसा अन्य नाहीं अशी श्रद्धा ठेवली तरीहि तो दुःखांतून तरून जाईल **(समीक्षक)** मूर्खाला आपल्या मतामध्यें आणून फसविण्याला याहून मोठी गोष्ट दुसरी कोणती असणार ? कारण कांहीं धर्म तर करावा लागणार नाहीं पण मुक्ति मात्र साधेल; असलें भोंदू मत दुसरें कोणतें असेल ?

**कइया होही दिवसो जइया सुगुरुण पायमूलिम्मि ॥**

**उस्सुत्त सविसलवर हिलेओनिसुणे सुजिणधम्मं ॥प्र. २।६०।१२८॥**

जर मी मनष्य आहे तर जिनागम अर्थात जैनांचीं शास्त्रें ऐकेन, उत्सूत्र अर्थात् अन्यमताच्या ग्रंथांचें श्रवण

हीहि गोष्ट भोळया माणसांना फसविण्यासाठींच आहे. कारण या इच्छेनें हे जर येथील दुःखसागरहि तरूं शकत नाहींत; तर पूर्वजन्मांच्या संचित पापांपासून उत्पन्न झालेला दुःखरूपी फलाचा भोग भोगल्यावांचून कसा सुटणार ? जर अशा असत्य व विद्याविरुद्ध गोष्टी न लिहिते तर वेदादिशास्त्रें पाहून, ऐकून व सत्यासत्याचा विचार करून, या कपोलकल्पित अविद्यारूप ग्रंथांना सोडून देते. पण यांनीं अविद्वानांना असें जखडून बांधलें आहे कीं, यांच्या जाळयांतून कोणी एखादा सत्संगी बुद्धिमानच सुटू शकेल पण अन्य जडबुद्धि लोकांचें सुटणें अगदीं असंभवनीय व अति कठीण आहे.

**जह्मजेणं हिंभणियं सुयववहारं निसोहियंतस्स । जायइ विसुद्ध बोहिं जिणआणा राह गत्तओ ।।** प्र. २।०६०।१३८

जे लोक जिनाचार्यांनीं सांगितलेल्या सूत्र, निरुक्ति, वृत्ति, भाष्यचूर्णी, हें ग्रंथ मानतात; तेहि शुभ व्यवहार व दुःख व्यवहार करून, चरित्र युक्त होऊन सुखाला प्राप्त करून घेतात. अन्यमतांचें ग्रन्थ पाहून होत नाहींत. **(समी०)** अत्यन्त भुकेनें मरण्याला चारित्र म्हणतात काय ? जर भुकेनें व तहानेनें मरण्याला चारित्र म्हणावयाचें असेल तर दुष्काळामध्यें ज्यांना अन्नपाणी मिळत नाहीं अशी पुष्कळ मनुष्यें भुकेनें मरतात. मग ते शुद्ध होऊन त्यांना देखील शुभ फल प्राप्त झालें पाहिजे, हेहि शुद्ध होणार नाहींत, व तुम्हीहि शुद्ध होणार नाहीं, पण पित्तादिकांचा प्रकोप होऊन रोगी व्हाल व दुःख भोगाल. न्यायाचरण, ब्रह्मचर्य, सत्यभाषण हाच धर्म आहे, व असत्यभाषण अन्यायादि व्यवहार पाप आहे. परोपकारासाठीं सर्वांशीं प्रीतिपूर्वक वर्तन ठेवणें हें शुभ चारित्र होय, जैनमतामध्यें सांगितल्याप्रमाणें भुकेलेलें व तहानलेलें राहणें हा धर्म नव्हे. या यांच्या सूत्रादिकांना मानण्यानें थोडेंसें सत्य व बरेंच असत्य प्राप्त होऊन मनुष्य दुःखसागरांत बुडतो

**जइजाणसि जिणनाहो लोयाया राविपर कए भूओ । तातंतं मन्नंतो कह मन्नसि लोअ आयारं** प्र. २।६०।१४८

जे उत्तम प्रारब्धवान् मनुष्य असतात तेच जिनधर्म ग्रहण करतात. अर्थात् जे जिनधर्म ग्रहण करीत नाहींत ते उत्तम प्रारब्धवान् नव्हेत. **(समीक्षक)** ही गोष्ट खोटी व चुकीची नाहीं काय ? अन्यमतांमध्यें उत्तम प्रारब्धवान् व जैनमतामध्यें प्रारब्धहीन कोणी नाहीं काय ? सहधर्म्यांनीं अर्थात् जैनधर्मीयांनीं आपआपसांत कलह करूं नयेत. पण त्यांनीं प्रीतिपूर्वक वागावें असें जें यांनीं सांगितलें आहे त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, जैन लोक दुसऱ्यांशीं कलह करण्यामध्यें कांहीं वाईट समजत नाहींत. हीहि यांची गोष्ट अयुक्त आहे. कारण सज्जन पुरुष सज्जनांशीं प्रेम करतात व दुष्टांना शिक्षण देऊन त्यांना सुशिक्षित करतात. ब्राह्मण, त्रिदंडी, परिव्राजकाचार्य अर्थात् सन्याशी, तापसी अर्थात् बैरागी आहेत ते सर्व जैनमतांचे शत्रु आहेत, असें जें हें त्यांनीं लिहिलें आहे तें चुकीचें आहे आतां पहा कीं हे सर्वांना शत्रुत्वानें पाहतात व सर्वांची निंदा करतात तेव्हां जैनांचा दया व क्षमारूप धर्म कोठें राहिला ? कारण दुसऱ्यांशीं द्वेष करणें हें दया व क्षमा यांचा नाश करण्यासारखें आहे व याच्यासारखा दुसरा कोणताच हिंसारूप दोष नाहीं. जैन जसे द्वेषाच्या मूर्ती आहेत तसे दुसरे लोक थोडेच असतील. ऋषभदेवापासून तों महावीरापर्यंत झालेल्या चोवीस तीर्थंकरांना रागी, द्वेषी, मिथ्यत्वी व जैनमतवाल्यांना सन्निपातज्वरानें भ्रमिष्ठ झाले आहेत व त्यांचा धर्म नरकाला नेणारा आहे म्हणून तो विषासमान समजावा असें जर कोणी म्हटलें तर तें जैनांना किती बरें वाईट लागेल ? जैनलोक निंदा व परमतद्वेषरूप नरकांत महाक्लेश भोगित राहिले आहेत म्हणून ते ह्या गोष्टी सोडतील तर बरें होईल.

**एगो अगरू एगो विसाव गोचे इआणि विवहाणिं ।**
**तचछयजं जिणदब्बं परुप्परन्तं न विच्चान्ति ।।** प्र. २।६०।१५०

सर्व श्रावकांचा देवगुरुधर्म एक आहे. चैत्यवंदन अर्थात् जिनप्रतिबिंबमूर्ति देवल व जिनद्रव्याचें रक्षण व जिनमूर्तीची पूजा करणें हा धर्म आहे, **(समीक्षक)** आतां पहा ! जितका मूर्तिपूजेचा झगडा चालला आहे तो सर्व जैनांच्या घरांतूनच सुरूं झाला आहे, व पाखंडाचें मूलहि जैनमतांतून निघालें आहे. श्राद्धदिनकृत्य पृ. १ मध्यें मूर्तिपूजेचें प्रमाणः–

**नवकारेणा विवोहो ।।१।। अनुसरणं सावउ ।।२।। व याइं इमे ।। जओगो ।।४।।**
**चियं वन्दणगो ।।२।। यच्चरखाणं तु विहि पुच्छम ।।६।।** इत्यादि.

(१) श्रावकांच्या पहिल्या द्वारामध्यें नवकाराचा जप करणें. (२) दुसरें नवकाराच्या जपांनंतर मी श्रावक आहे असें स्मरण करणें. (३) तिसरें अनुव्रतादि आमचीं किती व्रतें आहेत. (४) चवथें द्वार चार वर्गामध्यें

अग्रभागी मोक्ष आहे, त्याचा जो ज्ञानादिक हेतु आहे, तोच योग होय. त्याचा सर्व अतीचार निर्मल करण्यानें सहा आवश्यक कारणें होतात याला उपचारानें योग असें म्हणतात. यालाच योग असें आम्ही म्हणूं (५) पांचवें चैत्य-वन्दन म्हणजे मूर्तीला नमस्कार याला द्रव्यभावपूजा म्हणूं. (६) सहावें प्रत्यारव्यानद्वार नवकारासीप्रमूख विधिपूर्वक म्हणूं इत्यादि, व याच ग्रंथामध्यें पुढें पुष्कळसे विधि लिहिले आहेत. संध्याकाळच्या भोजनसमयीं जिनबिंब म्हणजे तीर्थंकराच्या मूर्तीचें पूजन करावें व द्वार पूजावें. या द्वारपूजेमध्यें मोठमोठे बखेडे आहेत. जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार करणें व नवीं बनवणें यापासून मुक्ति होते असे यांचे नियम आहेत. मंदिरांमध्यें चांगल्या प्रकारें जाऊन बसावें, मोठ्या, प्रीतीनें पूजा करावी, 'नमो जिनेन्द्रेभ्यः' इत्यादि मंत्रांनीं स्नानादि करावें व 'जलचंदनपुष्पधूपदीपनैः 'इत्यादिकांनीं गंधादिक अर्पावी. पुजाऱ्याला राजा व प्रजा प्रतिबंध करूं शकत नाहींत असें रत्नसारभागाच्या १२ पृष्ठावर मूर्तिपूजेचें फल लिहिलें आहे. (समीक्षक) या गोष्टी सर्व कपोलकल्पित आहेत; कारण पुष्कळ जैनपुजाऱ्यांना राजादिक प्रतिबंध करतात. मूर्तिपूजे-पासून रोग, पीडा व महादोष सुटतात. 'कोणी एकानें पांच कवड्यांची फुलें वाहिलीं त्याला १८ देशांचें राज्य मिळालें व त्यांचें नांव कुमारपाल झालें;' असें रत्नसार पृष्ठ ३ मध्यें लिहिलेल्या सर्व गोष्टी खोट्या आहेत व मूर्खाला भुलव-ण्याच्या आहेत; कारण अनेक जैन लोक पूजा करतां करतां रोगी होतात व एका बिघ्याचेंहि राज्य पाषाणपूजेपासून मिळत नाहीं. जर पांच कवड्यांचीं फुलें वाहून राज्य मिळेल तर पांच पांच कवड्यांचीं फुलें चढवून सर्व भूगोलाचें राज्य कां बरें मिळणार नाहीं ? व राज दंड कां तुम्ही भोगतां ? जर मूर्तिपूजेच्या योगानें भवसागर तरून जातां तर सम्यग्ज्ञानदर्शन व चारित्र कां करीत असतां ? गौतमाच्या आंगठ्यामध्यें अमृत व त्याच्या स्मरणानें मनोवांछित फळ मिळतें असें रत्नसा. पृ. १३ मध्यें लिहिलें आहे. (समीक्षक) जर असें असतें तर सर्व जैन लोक अमर झाले पाहिजेत पण ते होत नाहींत, म्हणून ही केवळ मूर्खाला भुलवण्याची गोष्ट आहे यांत दुसरें कांहीं एक तत्व नाहीं रत्नसार पृ. ५२ मध्यें पूजा करण्याचा श्लोक लिहिला आहे तो असा :—

जलचंदनधूपनैरथ दीपाक्षतकैर्नैवेद्यवस्त्रैः । उपचारवरैर्जिनेन्द्रान् रुचिरैरद्य यजामहे ।।

आम्ही जल, चंदन, अक्षता, पुष्पें, धूप, दीप, नैवेद्य, वस्त्र व अतिश्रेष्ठ उपचारांनीं जिनेंद्र अर्थात् तीर्थंकरांची पूजा करतों. जैनांपासून मूर्तिपूजा सुरूं झाली असें यावरून आम्ही म्हणतों. (विवेकसार पृ. २१) जिनमंदिरामध्यें मोह येत नाहीं, ती भवसागरांतून पार नेणारी आहे. (विवेक, ५१–५२) मूर्तिपूजेनें मुक्ति येते. जिनमंदिरांत जाण्यानें सद्गुण मिळतात. जो जलचंदनादिकांनीं तीर्थंकरांची पूजा करील तो नरकांतून सुटून स्वर्गाला जाईल. (विवेक. पृ. ५५) जिनमंदिरांतील ऋषभदेवादि मूर्तींची पूजा करण्यानें धर्म, अर्थ, काम व मोक्ष सिद्ध होतात. (विवेक. पृ. ६१) जिनमूर्तीची पूजा करण्यानें सर्व जगाचें क्लेश नाश पावतील. (समीक्षक) आतां यांच्या अविद्यायुक्त असंभव गोष्टी पहा ! जर या प्रकारानें पापादि वाईट कामें सुटून जातील, मोह न येईल, भवसागरांतून पार होतील, सद्गुण प्राप्त होतील व नरकाला सोडून स्वर्गांत जातील, धर्म, अर्थ, काम, मोक्षाला प्राप्त होतील व सर्व क्लेश दूर होतील; असें जर आहे तर सर्व जैन लोक सुखी व सर्व पदार्थांच्या सिद्धिला प्राप्त कां झालेले नाहींत ? ज्यांनी जिनमूर्तिची स्थापना केली आहे त्यांनीं आपली व आपल्या कुटुंबाची उपजिविका तयार केली आहे असें याच विवेकसाराच्या ३ पृष्ठावर लिहिलें आहे. (विवेक. पृ. २२५) शिवविष्णुआदींची पूजा करणें फार वाईट गोष्ट आहे. तें नरकाचें साधन आहे. (समीक्षक) शिवादिकांच्या मूर्ति जर नरकाला साधन आहेत तर जैनांच्या मूर्ति तशा नरकाला साधन नाहींत काय ? आमच्या मूर्ति त्यागी, शांत व शुभ मुद्रायुक्त आहेत म्हणून चांगल्या व शिवादिकांच्या मूर्ती तशा नाहींत म्हणून त्या वाईट आहेत, असें जर ते म्हणतील तर त्यावर यांस असें विचारावें कीं, तुमच्या मूर्ति तर लाखों रुपयांच्या मंदिरांत राहतात व चंदन केशरादिकांचा उपभोग घेतात. तर मग त्या त्यागी कशा ? व शिवादिकांच्या मूर्ति छायेवांचूनहि राहतात तेव्हां त्या त्यागी कां नव्हेत ? शांतीसंबंधानें पाहतां सर्व जड पदार्थ निश्चल असल्यामुळें शांतच असतात. तात्पर्य सर्व मतांतील मूर्तिपूजा व्यर्थ आहे. (प्रश्न) आमच्या मूर्ति वस्त्रादिकांचें धारण करीत नाहींत, म्हणून चांगल्या आहेत.(उत्तर)

सर्वांच्या समोर नागव्या मूर्ति ठेवणें व असणें पशुवत् लीला आहे. (प्रश्न) ज्याप्रमाणें स्त्रीचें चित्र किंवा मूर्ति पाहण्यानें कामोत्पत्ति होते, त्याचप्रमाणें साधु किंवा योगी यांच्या मूर्ति पाहून शुभ गुण प्राप्त होतात. (उत्तर) पाषाणादि मूर्ति पाहून जर शुभ गुण येतात असें जर तुम्ही मानतां तर त्यांतील जडत्वादि गुणहि येत असतील; व जर जडबुद्धि व्हाल तर तुम्ही सर्वथा नाश पावाल. दुसरें, जे उत्तम विद्वान् आहेत, त्यांची मैत्री व सेवा सोडल्यानें तुमच्यांत मूढताच जास्त वाढेल. जे जे दोष मूर्तिपूजेपासून होतात असें अकराव्या समुल्लासांत लिहिलें आहे ते सर्व पाषणादि मूर्तिपूजेपासून होतील. ज्याप्रमाणें जैनांनीं मूर्तिपूजेमध्यें असत्य कोलाहल चालवला आहे त्याचप्रमाणें त्यांच्या मंत्रांतहि बऱ्याच असंभव गोष्टी लिहिल्या आहेत. यांचा हा मंत्र आहे. रत्नसार पृष्ठ १.

**नमो अरिहन्ताणं नमो सिद्धाणं नमो अयरियाणं नमो उवज्झायाणं नमो लोए सब्बसाहूणं एसो पंच नमुक्कारो सब्ब पावप्पणासणो मंगलाचरणं च सव्वे सिपढमं हवइ मंगलम् ।।१।।**

या मंत्राचें महात्म्य फार लिहिलें आहे, व जैनांचा हा गुरुमन्त्र आहे. यांनी तर तंत्र, पुराण, भाट यांच्या कथांचाहि पराभव केला आहे. श्राद्धदिनकृत्य पृष्ठ ३ :—

**नमुक्कार तउपढे ।।९।। जऊकव्वं । मन्ताणमन्तो परमो इमुत्ति धेयाणधेयं परमं इमुत्ति । तत्ताणतत्तं परमं पवित्तं संसारसत्ताणदुहाहयाणम् ।।१०।। ताणं अन्नन्तु नो अत्थि ।। जीवाणं भव सायरे ।। बुड्डु ताणं इमं मुत्तुं । नमुक्कारं सुपोययम् ।।११।। कब्वं । अणेगजंमंतरसं चिआणं । दुहाणंसारीरिअमाणुसाणु साणं । कत्तोय भव्वाणभविज्जनासो न जावपत्तो नवकारमन्तो ।।१२।।**

(१०) जो मन्त्र आहे तो पवित्र व परममंत्र आहे. तो ध्यानाच्या योग्य आहे. तो परमध्येय आहे, तत्वांमध्यें परमतत्व आहे, दुःखांनीं पीडित झालेल्या संसारी जीवाला नवकार मंत्र असा आहे कीं, जशी समुद्रांतून पार जाण्याला नौका असते (११) जो हा नवकार मन्त्र आहे. तो नौकेसारखा आहे जे याला सोडतात ते भवसागरांत बुडतात. जे यांचें ग्रहण करतात ते दुःखांतून तरून जातात. जीवांना दुःखांतून पृथक ठेवणारा, सर्व पापांचा नाशक, मुक्तिकारक मन्त्र या मंत्राशिवाय दुसरा कोणताच नाहीं. (१२) अनेक भवसागरामध्यें उत्पन्न झालेल्या शरीरासंबंधीं दुःखापासून व भवसागरापासून संसारी जीवांना तारणारा हाच एक आहे. जोंपर्यंत नवकार मन्त्र जपला जात नाहीं तोंपर्यंत हा जीव भवसागरांतून पार होऊं शकत नाहीं. हा अर्थ सूत्रांत सांगितला आहे. अग्निप्रमुख अष्टमहाभयांमध्यें सहाय्य करणारा नवकार मंत्राशिवाय दुसरा कोणीच नाहीं. जसें महारत्न वैडूर्य मण्याचें ग्रहण करणें व शत्रूच्या भयाच्या वेळीं अमोघशस्त्र ग्रहण करणें त्याचप्रमाणें श्रुत केवलीचें ग्रहण करणें आहे. हेंच सर्व द्वादशांगीं नवकार मन्त्राचें रहस्य आहे. (१) या मन्त्राचा अर्थ हा आहे :—(नमो अरिहन्ताणं) सर्व तीर्थंकराला नमस्कार (नमो सिद्धाणं) जैन मताच्या सर्व सिद्धांला नमस्कार (नमो आयरियाणं) जैनमतांच्या सर्व आचार्यांना नमस्कार (नमो उवज्झायाणं) जैनमताच्या सर्व उपाध्यायांला नमस्कार नमो लोए सब्ब साहूणं) जैनमताचे जे सर्व साधू या लोकांत आहेत त्यांना नमस्कार असो. (मन्त्रामध्यें जरी जैनपद नाहीं तथापि जैनमताच्या सर्व ग्रन्थामध्यें जैनाशिवाय अन्याला नमस्कार करूं नये असें लिहिलें आहे म्हणून वरील अर्थ ठीक आहे.) (तत्वविवेक पृ. १६९) जो मनुष्य लांकूड व दगड यांना देवबुद्धीनें पूजतो त्याला चांगलीं फळें प्राप्त होतात. (समीक्षक) जर असें असेल तर सर्व लोक दर्शन करून सुखरूप फल कां प्राप्त करत नाहींत ? (रत्नसार भाग पृ. १०) पार्श्वनाथाच्या मूर्तीच्या दर्शनानें पापें नाश पावतात. (कल्पभाष्य पृ. ५१) मध्यें लिहिलें आहे कीं, सवालक्ष मंदिरांचा जीर्णोद्धार केला. इत्यादि मूर्तिपूजा विषयांमध्यें यांचा बराच लेख आहे. मूर्तिपूजेचें मूळकारण जैनमत आहे, हें याबरून उघड होतें.

आतां जैनांच्या साधूंची लीला पहा :—(विवेकसार पृ. २२८) मध्यें असें लिहिलें आहे कीं, एक जैनमताचा साधु कोशा वेश्येशीं भोग करून, नंतर त्यागी होऊन स्वर्ग लोकाला गेला. (विवे. पृ. १० अर्णकमुनि चारित्रांतून चुकून कित्येक वर्षेपर्यंत दत्तशेटाच्या घरीं विषयोपभोग करून नंतर देवलोकाला गेले. श्रीकृष्णाचा पुत्र ढढंगमुनीची थाळी घेऊन गेला नंतर देवता झाला. (विवेक. १५६) जैनमताचा साधु जरी केवळ वेषधारी असला तरीहि त्याचा

सत्कार लोकांनीं करावा, साधूचें शुद्ध चारित्र असो किंवा अशुद्ध चारित्र असो सर्व पूजनीय असतात. (विवेक. १६८) जैनमताचा साधु चारित्रहीन असला तरीहि तो अन्य मताच्या साधूपेक्षां श्रेष्ठ असतो. (विवेक १७१) श्रावक लोकांनीं जैनमताच्या साधूचे चारित्रहीन भ्रष्टाचार पाहिलें तरीहि त्यांनीं त्यांचीं सेवा करावी. (विदेक. २१६) एका चोरानें पांच मुठी चोरून चारित्र ग्रहण केलें, त्याला फार वाईट वाटलें व फार पश्चात्ताप वाटला, सहा महिन्यांत तो केवळ ज्ञान प्राप्त करून सिद्ध झाला. (**समीक्षक**) आतां यांच्या साधूंची व गृहस्थांची लीला पहा ! बहुत कुकर्म करणारा साधूहि यांच्या मतानें सद्गतीला गेला ! (विवेक. पृ. १०६) मध्यें लिहिलें आहे कीं, श्रीकृष्ण तिसऱ्या नरकांत गेला. (विवेक. पृ. १४५ मध्यें लिहिलें आहे कीं, धन्वंतरी नरकांत गेला. (विवेक. पृ० ४८) मध्यें लिहिलें आहे कीं, योगी, जंगम, काजी, मुल्ला किती तरी अज्ञानानें तप व कष्ट करून कुगतीला गेले आहेत. (रत्नासार. १७१) मध्यें लिहिलें आहे कीं, नव वासुदेव, अर्थात् त्रिपृष्ठ वासुदेव, द्विपृष्ठ वासुदेव, स्वयम्भू वासुदेव, पुरुषोत्तम वासुदेव, सिंहपुरुष वासुदेव, पुरुष पुण्डरीक वासुदेव, दत्त वासुदेव, लक्ष्मण वासुदेव व श्रीकृष्ण वासुदेव हे सर्व अकराव्या, बाराव्या, चौदाव्या, पंधराव्या, अठराव्या व बाविसाव्या तीर्थंकाराच्या वेळीं नरकाला गेले आणि नवप्रति वासुदेव अर्थात् अश्वग्रीवप्रति वासुदेव, तारकप्रति वासुदेव, मोदकप्रति वासुदेव, मधुप्रति वासुदेव, निशुंभप्रति वासुदेव, बलीप्रति वासुदेव, प्रल्हादप्रति वासुदेव, रावणप्रति वासुदेव, जरासिंधुप्रति वासुदेव, हे सर्व नरकांत गेले. कल्पभाष्यामध्यें लिहिलें आहे कीं ऋषभदेवापासून महावीरापर्यंत झालेले २४ तीर्थंकर सर्व मोक्षाला गेले. (**समक्षीक**) बुद्धिमान् पुरुषांनीं येथें विचार करावा कीं, जैनाचे साधु, गृहस्थ व तीर्थंकर यांपैकीं बहुत लोक वेश्यागामी, परस्त्रीगामी, चोर असे असूनहि ते जैनमतांमध्यें असल्यामुळें सर्व स्वर्गाला व मुक्तीला गेले, श्रीकृष्णादि धार्मिक महात्मे सर्व नरकाला गेले, असें म्हणणें ही किती वाईट गोष्ट आहे ? विचार करून पाहिलें तर असें आढळेल कीं, उत्तम पुरुषांनीं जैनांची संगति करणें किंवा त्यांना पाहणें हेंहि वाईट आहे, कारण जे यांच्या संगतींत राहतील त्यांच्या हृदयांत अशाच वाईट गोष्टी शिरतील. या महाहठी व दुराग्रही मनुष्यांच्या संगतीपासून वाईट गोष्टीशिवाय आणखी कांहींच पदरीं पडणार नाहीं. हां, जे जैनांमध्यें उत्तम जैन आहेत त्यांच्या संगतीपासून कांहींच दोष होणार नाहीं. गंगादि तीर्थें व काशी आदि क्षेत्राचें सेवन केल्यानें कांहींएक परमार्थ साधणार नाहीं असें (विवेक. पृ.५५ वर) लिहिलें आहे. पण त्यांचीं गिरिनार, पालिठाणा व आबू वगैरे तीर्थें व क्षेत्रें मुक्ति देणारीं आहेत. (**समीक्षक**) या ठिकाणीं असा विचार केला पाहिजे कीं, जशीं शैव वैष्णवादिकांचीं तीर्थं व क्षेत्रें जल, स्थल व जड स्वरूप आहेत, त्याप्रमाणें जैनांचीं आहेत. यांतील एकाची निंदा व दुसऱ्याची स्तुति करणें हें मूर्खपणाचें काम आहे.

**जैनांच्या मुक्तीचें वर्णनः**—(रत्नसार भा. पृ. २३) महावीर तीर्थंकर गौतमाला म्हणतो कीं, ऊर्ध्व लोकांमध्यें एक सिद्धशिला स्थान आहे. स्वर्गपुरीच्या वर पंचेचाळीस लक्ष योजनें लांब व तितकीच रुंद आहे, व आठ योजनें जाड आहे जसा मोत्यांचा श्वेतहार असतो किंवा जसें गोदुग्ध असतें त्यापेक्षाहि ती उज्जवल आहे. सोन्याप्रमाणें प्रकाशणारी व स्फटिकाहून निर्मळ आहे. ही सिद्धशिला १४ व्या लोकांच्या शिखरावर आहे. या सिद्धशिलेवर शिवपुरधाम आहे. त्यामध्येंहि मुक्त पुरुष अधर राहतात. तेथें जन्ममरणादि कोणताच दोष नाहीं व आनंदानें ते तेथें राहतात, पुनः जन्ममरणांत येत नाहींत व सर्व कर्मापासून सुटतात. ही जैनांची मुक्ति आहे. (**समीक्षक**) या ठिकाणीं असा विचार केला पाहिजे कीं, ज्याप्रमाणें अन्यमतांमध्यें वैकुंठ, कैलास, गोलोक, श्रीपूर पौराणिकांनीं, चौथें आकाश ख्रिस्तीलोकांनीं व सातवें आकाश मुसलमानांनीं मुक्तिचें स्थान लिहिलें आहे त्याचप्रमाणें जैनांनीं सिद्धशिला व शिवपूर लिहिलें आहे. ज्याला जैन लोक वर असें मानतात, तोच भाग आमच्या भूगोलाच्या खालच्या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांना खालीं आहे असें वाटतें. उच्चनीच हे अपेक्षेनें आहेत. ते व्यवस्थित पदार्थ नाहींत. ज्याला आर्यावर्तांतील जैनी लोक वर मानतात त्यालाच अमेरिकेंतील लोक खालीं मानतात व अमेरिकेंतील लोक वरील भाग समजतात त्यालाच आर्यावर्तांतील लोक– खालील भाग समजतात. ती शिळा पंचेचाळीस नव्हे दुप्पट नव्वद लक्ष मैल जरी असली तरी तेथें गेलेले मुक्त नसून ते बंधनामध्येंच आहेत, कारण जर ते त्या शिलेच्या व शिवपुराच्या बाहेर आले तर त्यांची मुक्ति नाश पावत असेल. त्या मुक्तांना सदा तेथेंच राहण्याची प्रीति व तेथून बाहेर जाण्याविषयीं अप्रीति

होत असेल असा जेथें अटकाव, प्रीति व अप्रीति आहे तेथें मुक्ति आहे असें कसें म्हणतां येईल ? नवव्या समुल्लासा-मध्यें ज्या प्रकारची मुक्ती लिहिली आहे तशीच मानणें ठीक आहे, ही जैनांची मुक्ति म्हणजे एक प्रकारचें बंधनच आहे. जैनलोकहि मुक्तिच्या विषयामध्यें भ्रमानें फसले आहेत. वेदांच्या ज्ञानाशिवाय यथार्थ अर्थबोध होऊन मुक्तीच्या स्वरूपाला कोणीहि जाणूं शकत नाहींत हें खरें आहे.

आतां आणखी कांहीं यांच्या असंभव गोष्टी ऐकां [विवेकसार पृ. ७८] एककोटी साठ लक्ष कलशांनीं महावीराला जन्मसमयीं स्नान घातलें होतें. (विवेक पृ. १३६) दक्षार्ण राजा महावीराच्या दर्शनाला गेला. तेथें त्याला अभिमान झाला. तेव्हां त्यांच्या निवारणासाठीं–१६,७७,७२,१६००० इतकीं इंद्राची स्वरूपें व १३,३७,०५,७२,८०,००,००,००० इतक्या इन्द्राण्या तेथें आल्या होत्या. त्यांना पाहून राजाला आश्चर्य वाटलें. (**समीक्षक**) त्या इतक्या इन्द्र–इन्द्रण्यांना उभें राहण्याला असले किती भूगोल पाहिजेत याचा या ठिकाणीं विचार केला पाहिजे !

विहीर, कुवा व तलाव बनवूं नये असें श्राद्धदिनकृत्य आत्मनिभावना पृ. ३१ मध्यें लिहिलें आहे. (**समी.**) जर सर्व मनुष्य जैन झालें तर कोणीहि विहीर, कुवा व तलाव खणणार नाहीं मग सर्व लोक पाणी कोठून पितील ? (**प्र.**) तलावादि बांधण्यापासून त्यांत जीव पडतात व त्यामुळें बांधणाराला पाप लागतें, म्हणून आम्ही जैन लोक हें काम करीत नाहीं, (**उ.**) तुमची बुद्धि कां बरें नाश पावली ? जसें तुम्ही क्षुद्र जीवांच्या मरणानें पाप होतें असें म्हणतां तर गाय मनुष्यादि जे मोठमोठे प्राणी असतात त्यांना पाणी मिळून जें महापुण्य होणार त्याचीं गणना कां बरें करीत नाहीं ? (तत्वविवेचक पृ. १९६) एका नगरीमध्यें मणिशंकर शेटजीनें विहीर बांधिली, त्यामुळें तो धर्मभ्रष्ट होऊन त्याला सोळा महारोग झालें. मेल्यानन्तर त्याच विहिरीमध्यें एक प्राणी झाला, महावीराच्या दर्शनानें त्याला जातिस्मरण झालें. महावीर म्हणतात कीं, मी आलों हें पाहून, त्यानें पूर्व जन्माचे धर्माचार्य असें जाणून तो दर्शनाला येऊं लागला. मार्गामध्यें श्रेणिकाच्या घोड्याच्या टापानें मेला, नंतर शुभध्यानाच्या योगानें दर्दूरांक नामक महर्धिक देवता बनला. अवधिज्ञानाच्या योगानें मी येथें आलों आहे असें जाणून वन्दनापूर्वक ऋद्धि दाखवून गेला. (**समीक्षक**) इत्यादि विद्या विरुद्ध असंभव खोट्या गोष्टी सांगणाऱ्या महावीराला सर्वोत्तम मानणें भ्रमाचें लक्षण आहे.

मृतकावरील वस्त्र साधूनें घ्यावें असें श्राद्ध दिनकृत्य पृ. ३६ मध्यें लिहिलें आहे. (**समीक्षक**) पहा. यांचे साधूहि महाब्राह्मणांसारखेच झाले. वस्त्र साधूनें घ्यावें पण मृतकाचीं आभूषणें कोणी घ्यावींत ? बहुमूल्य असलीं तर घरांतच ठेवीत असतील. (रत्नसार पृ. १०५) भाजणें, कुटणें, दळणें, अन्न शिजविणें यांमध्यें पाप आहे. (**समीक्षक**) आतां यांची विद्याहीनता पहा ! जर ही कर्में न केलीं तर मनुष्य प्राणी कसे बरें जगतील ? व जैनलोक पीडित होऊन मरून जातील. (रत्नसार पृ. १०४) बाग लावल्यामुळें एक लक्ष पापें माळयाला लागतात. (**समीक्षक**) जर माळयाला लक्ष पापें लागतात तर त्या वृक्षांच्या पत्र, फळ, फूल, छाया यांपासून अनेक जीवांना आनंद होतो त्यापासून कोटीगुण पुण्य होतें याकडे काहींच लक्ष नाहीं हा किती अंधार आहे ! (तत्वविवेक पृ. २०२) एके दिवशीं लब्धी साधू चुकीनें वेश्येच्या घरीं गेला व धर्मानें भिक्षा मागितली, वेश्या म्हणाली कीं, येथें धर्माचें, काम नाहीं, पण अर्थाचें काम आहे, तेव्हां त्या*लब्धी साधूनें साडेबारा लक्ष मोहरांचा वर्षाव तिच्या घरीं केला. (**समीक्षक**) या गोष्टीला नष्टबुद्धि माणसा-शिवाय कोण मानणार ? एक पाषाणमूर्ति. घोड्यावर बसली आहे असें जेव्हां स्मरण करावें तेव्हां ती तेथें उपस्थित होऊन रक्षण करतें असें रत्नसार पृ.६७ मध्यें लिहिलें आहे. (**समीक्षक**) सांगा जैन लोकहो ! आज काल तुमच्या घरीं चोरी, डाका,शत्रूचें भय होत असतेंच, मग तुम्ही त्या मूर्तीचें स्मरण करून आपलें रक्षण कां करून घेत नाहीं ? कां बरें मग पोलिसादिकांच्या व राजस्थानांच्या मागें फिरत असतां ? आतां जैनांच्या साधूंचीं लक्षणें पहा.

**सरजोहरणं भैक्ष्यभुजो लुञ्चितमूर्द्धजाः ।। श्वेताम्बराः क्षमाशीला निःसंगा जैनसाधवः ।।१।।**
**लुञ्चिताः पिच्छिकाहस्ताः पाणिपात्रा दिगम्बरा ।। ऊर्ध्वासिनो गृहे दातुर्द्वितीयाः स्युर्जिनर्षयः ।।२।।**
**भुङ्क्ते न केवलं न स्त्रीमोक्षमेति दिगंबरः ।। प्राहुरेषामयं भेदो महान् श्वेताम्बरैः सह ।।३।।**

जैनांच्या साधूंचीं लक्षणें समजावीत म्हणून जिनदत्तसूरीनें हे श्लोक केले आहेत. ( १ ) ' ( सरजोहण ) चवरी घेणें, भिक्षा मागून खाणें, डोक्यावरील केसांचें लुंचन करणें, श्वेत वस्त्र धारण करणें क्षमायुक्त राहणें, कशाचीहि संगति न धरणें, अशा लक्षणांनीं युक्त असणाऱ्या श्वेतांबर जैनाला यति असें म्हणतात ' ( २ ) ' दुसरें दिगंबर म्हणजे वस्त्र धारण करणें डोक्यावरील केस उपटणें पिच्छिका अर्थात् एक लोकरीच्या सुतांची झाडणी झाडण्यासाठीं बगलेंत धरणें, जर कोणी भिक्षा दिली तर ती हातांत घेऊन खाणें, हे दिगम्बर दुसऱ्या प्रकारचे साधु असतात. ' ( ३ ) ' भिक्षा देणारा गृहस्थ जेवून उठला म्हणजे मग त्याच्या मागून जेवण करणारे ते जिनर्षि तिसऱ्या प्रकारचे साधु होत. दिगम्बर व श्वेतांबर यांमध्यें इतकाच भेद आहे कीं, दिगम्बर लोक स्त्रियांना अपवर्ग [मोक्ष] मानीत नाहींत व श्वेतांबर मानतात. इत्यादि गोष्टीनीं मोक्ष होतो,' हे यांच्या साधूंचे भेद आहेत. जैन लोकांचें केशलुञ्चन ( केश उपडणें ) सर्वत्र प्रसिद्ध आहे, व पांच मुष्टि लुञ्चन करावें असेंहि लिहिले आहे. पांच मुष्टि लुंचन करून चरित्र ग्रहन केलें अर्थात् डोक्यावरचें पांच मुष्टि केस उपटून काढून साधु झाला. असें विवेकसार २१६ पृ. वर लिहिलें आहे. ( कल्पसूत्रभाष्य पृ. १०८) केश—लुञ्चन करावें, गाईच्या केसाप्रमाणें केस ठेवावेत. ( **समीक्षक** ) जैनलोकहो ! आतां सांगा कीं, तुमचा दयाधर्म कोठें आहे ? काय ही हिंसा नव्हे ? आपण स्वतः, गुरूनें किंवा कोणीहि जरी केस उपटले तरी जीवाला किती कष्ट होत असेल ? जीवाला कष्ट देणें हीच हिंसा होय. विवेकसार ग्रंथामध्यें संवत् १६३३ सालीं श्वेतांबरांमधील ढून्डिया व ढून्डियांमधील तेरा पन्थी ढोंगी निघाले, असें लिहिलें आहे. ढूंढिये कोल पाषाणादि मूर्तीला मानत नाहींत, ते भोजन, स्नान इत्यादि करण्याच्या वेळा सोडून बाकी इतर वेळीं नेहमी तोंडांवर पट्टी बांधून ठेवतात, व जे जति असतात ते फक्त पुस्तक वाचावयाच्या वेळेलाच तोंडावर पट्टी बांधतात. अन्य समयीं नाहीं. **(प्रश्न)** मुखावर पट्टी अवश्य बांधली पाहिजे. कारण वायुकायमध्यें म्हणजे वायूमध्यें जे सूक्ष्म शरीरवाले जीव राहतात ते मुखाच्या वाफेच्या उष्णतेनें मरतात. जे मुखावर पट्टी बांधीत नाहीत त्यांना त्याबद्दल पाप लागतें. म्हणून तोंडाबर पट्टी बांधणें चांगलें असें आम्ही समजतो. ( **उ.** ) ही गोष्ट विद्या व प्रत्यक्षदिप्रमाणांच्या विरूद्ध असल्यामुळे अयुक्त आहे, कारण जीव अजर अमर आहेत म्हणून ते मुखाच्या वाफेनें मरूं शकणार नाहीत. यांना तुम्हीहि अजर व अमर मानता. ( **प्र.** ) जीव मरत नाहीं, पण मुखांतील उष्ण—वायूनें त्यांना पीडा होते. अशी त्यांना पीडा देणाऱ्यांना पाप लागतें म्हणून मुखावर पट्टी बांधावी हें चांगलें. ( **उ.** ) ही गोष्ट सर्वथा असंभव आहे. कारण पीडा दिल्यांवांचून कोणत्याहि जीवाचा थोडा वेळ सुद्धां निर्वाह होऊं शकत नाहीं. ज्याअर्थीं तुमच्या मतानें मुखाच्या वायूपासून जीवांना पीडा होते, त्याअर्थीं चालणें फिरणें, बसणें उठणें, हात फिरविणें, डोळे मिचमकावणें इत्यादि क्रियापासूनहि त्यांना पीडा होत असली पाहिजे. तात्पर्य तेम्ही जीवांना पीडा पोंचविल्यावांचून राहूं शकत नाहीं. ( **प्र.** ) जोंपर्यंत शक्य आहे तोंपर्यंत जीवांचें रक्षण केलें पाहिजे. व जेथें आमचें कांहीं चालत नाहीं तेथें आमचा निरुपाय आहे. सर्व वायु आदि पदार्थांतील जीव मरत असतात. आम्ही मुखावर कपडा बांधला नाहीं तर ते जास्त मरतील व बांधला असतां कमी मरतील. ( **उत्तर** ) हेंहि तुमचें कथन युक्तिशून्य आहे; कारण कपडा बांध—ण्यानें जीवाला अधिक दुःख पोंचतें. जेंव्हां कोणी मुखावर कपडा बांधतो तेंव्हां त्याच्या तोंडांतील वायूला प्रतिबंध झाल्यामुळें तो खाली जातो किंवा मौनसमयीं एकत्र होऊंन नासिकाद्वारा वेगानें बाहेर पडतो. या योगानें उष्णता अधिक होऊन तुमच्या मताप्रमाणेंच जीवाला अधिक पीडा होते, पहा ! जेव्हां घराचे किंवा खोलीचे सर्व दरवाजे बंद केले असतां किंवा पडदे बांधले पसतां, तीमध्यें विशेष उष्णता होते. दरवाजे उघेडे ठेवले असता तशी होत नाहीं. याचप्रमाणे मुखावर कपडा बांधण्यापासून जास्त उष्णता होते व तोंड मोकळें ठेवलें असतां न्यून होते. तात्पर्य तुम्ही तुमच्याच मता - नुसार जीवांना अधिक दुःखदायक होत आहांत. जोंपर्यंत तुमचें तोंड बांधलेलें असतें तोंपर्यंत वायु एकत्र होऊन नासिकाद्वारा,वेगानें बाहेर पडतो व तेथील जीवांना जास्त धक्का व पीडा देतो. पहा ! जसा कोणी विस्तवाला तोंडानें फूंकून पेटवतो व कोणी नळीनें फुंकतो, तर त्यामध्यें तोंडानें फुंकणाऱ्याचा वायु एकत्र होऊन जात नसल्यामुळें अग्नि लवकर पेटत नाहीं, पण नळीनें एकत्रित होऊन जात असल्यामुळ तो लवकर पेटतो कारण तो नळींतून अधिक वेगानें

अग्नीवर लागतो, त्याचप्रमाणें तोंडावर पट्टी बांधल्यानें वायूला प्रतिबंध होउन नाकावाटें तो वेगानें बाहेर पडतो व जीवांना जास्त दुःख देतो. म्हणून तोंडावर पट्टी बांधणाऱ्यापेक्षां न बांधणारे जास्त धर्मात्मे आहेत. तोंडावर पट्टी बांधण्यानें अक्षरांचें उच्चारण, स्थान व प्रयत्न ठीक होत नसल्यामुळेंहि, नीट होऊं शकत नाहीं. निरनुनासिक अक्षरांचें सानुनासिक उच्चारण केल्यानें तुम्हांला दोष लागेल. तसें तोंडावर पट्टी बांधल्यानें दुर्गंधहि अधिक वाटतो, कारण शरी— रांत दुर्गंध भरलेला आहे. शरीरांतून जितका वायु बाहेर पडतो तो दुर्गंधयुक्त असतो हें प्रत्यक्ष आहे. त्याला प्रतिबंध झाला असता जास्त दुर्गंध वाढतो. जशी दुर्गंधाची जागा बंद असल्यास तींत दुर्गंध जास्त असतो व तीच उघडी असली तर तितका नसतो. त्याचप्रमाणें मुखावर पट्टी बांधण्यानें जास्त दुर्गंध वाढतो, दंतधावन, मुखप्रक्षालन, स्नान न करण्यानें व वस्त्र न धुण्यानें तुमच्या शरीरापासून जास्त दुर्गंध उत्पन्न होऊन या जगांत बरेच रोग उत्पन्न होऊन जीवांना जितकी पीडा पोंचते तितकें तुम्हाला जास्त पाप लागतें. ज्याप्रमाणें यात्रेमध्यें मळ जास्त झाल्यामुळें महामारीचा उपद्रव सुरू होतो व जीवांना अनेक प्रकारें त्रास होतो दुर्गंध उत्पन्न न झाला तर हे रोग होत नाहींत व जीवांनाहि दुःख होत नाहीं म्हणून तुम्ही दुर्गंध वाढवीत असल्यामुळें अधिक अपराधी आहांत; व जे तोंडावर पट्टी बांधीत नाहींत, मुखप्रक्षालन, दंतधावन, स्नान व वस्त्रक्षालन करतात ते शुद्ध राहत असल्यामुळें तुमच्यापेक्षां जास्त चांगले. ज्याप्रमाणें अंत्यजांच्या सहवासानें बुद्धि निर्मल होत नसते त्याचप्रमाणें तुमच्या सहवासानें बुद्धिहि वाढत नाहीं. रोग होण्यानें व बुद्धि कमी झाल्यानें धर्मानुष्ठानहि ठीक होऊं शकत नाहीं, अशीच स्थिति नेहमीं दुर्गंधयुक्त असणाऱ्या तुमची व तुमच्या संगतीनें असणारांची अवश्य होत असते. ( **प्र.** ) ज्याप्रमाणें बंद असलेल्या घरांत पेटवलेल्या अग्नीची ज्वाला बाहेर पडून बाहेरच्या जीवाला त्रास देणारी होत नाहीं. त्याचप्रमाणें आम्ही तोंडावर पट्टी बांधून वायूला प्रतिबंध करून बाहेरच्या जीवाला कमी दुःख पोंचवीत असतों. मुखावर पट्टी बांधण्यानें बाहेरच्या जीवांला दुःख पोंचत नाहीं. जवळ जळत असलेल्या अग्नीवर आडवा हात धरण्यानें जसा त्या अग्नीपासून कमी त्रास होतो त्याचप्रप्राणें तोंडावर प्रतिबंधक पडदा नसेल तर एकदम तोंडांतील उष्ण वायूनें तोंडाबाहेरील वायूंतील जीवांना जास्त पीडा अवश्य झाली पाहिजे. ( **उत्तर** ) ही तुमची गोष्ट बालबुद्धीची आहे. **प्रथम** हें पहा कीं, जेथें छिद्र नाही व बाहेरील वायूचा आंतील वायूशीं संबंध नाहीं तेथें अग्नि जळूंच शकत नाहीं. जर हें तुम्हाला प्रत्यक्ष पहावयाचें असेल तर एका कंदिलांत दिवा पेटवून त्याची सर्व छिद्रें बन्द करा म्हणजे थोड्याच वेळांत तो दिवा विझेल. ज्याप्रमाणें पृथ्वीवर राहणारे प्राणी बाहेरच्या वायूशिवाय जगूं शकत नाहींत, त्याचप्रमाणें अग्नीहि जळूं शकत नाहीं. जर अग्नीच्वा प्रगतीचा एका बाजूनें निरोध केला तरदुसऱ्या बाजूनें तो अधिक वेगानें निघून जाईल. तोंडाच्या आड हात धरला तर तोंडाच्या वाफेनें आपणाला जास्त आंच लगते खरी पण ती हातावर अधिक लागत असते. म्हणून तुमची गोष्ट सत्य नाहीं. ( **प्रश्न** ) कोणा मोठ्या मनुष्याच्या कानांत कांहीं बोलावयाचें असेल तर आपल्या मुखांतील थुंकी किंवा दुर्गंधी त्याला लागूं नये म्हणून आपल्या तोंडावर हातरूमाल किंवा हात धरून बोलतात, हें सर्व लोक जाणतात. त्याचप्रमाणें जेव्हां कोणी पुस्तक वाचूं लागलें असता त्यावर थुंकी अवश्य उडते व तें उच्छिष्ट होतें व बिघडतें म्हणून मुखावर पट्टीं बांधणें उत्तम आहे. ( **उत्तर** ) यावरून हें सिद्ध झालें कीं, जीवांच्या रक्षणासाठीं पट्टी बांधणें व्यर्थ आहे. जेव्हां **मोठ्या** माणसाच्या कानांत बोलावयाचें असतां तोंडावर रूमाल एवढ्यासाठीं धरतात कीं, करावयाची गुप्त गोष्ट तिसऱ्या कोणाला ऐकूं येऊं नये पण जेव्हां उघड गोष्टी बोलावयाच्या असतात तेव्हां कोणीहि तोंडावर पडदा धरीत नाहीं यावरून हें उघड होतें कीं, हें सर्व गुप्त गोष्टीसाठीं आहे. दंतधावनादि न करण्यानें तर तुमच्या तोंडांतून फारच दुर्गंध निघत असतो, व जेव्हां तुम्ही कोणाजवळ किंवा कोणी तुम्हाजवळ येत असेल तेव्हां त्याला दुर्गंधीशिवाय आणखी काय मिळणार आहे ? त्याचप्रमाणें तोंडावर पडदा धरण्याचीं पुष्कळ अन्य कारणें आहेत. पुष्कळ मनुष्यासमोर एकाच्याच कानांत गुप्त गोष्ट सांगावयाची असल्यास जर तोंडावर पडदा धरला नाहीं तर तोंडांतील निघालेला वायु जसा पसरेल तसे ते शब्दहि पसरतील. जेव्हां ते दोघे एकांतांत असतात तेव्हां तोंडावर कपडा धरण्याचें कांहीच कारण नसतें. कारण तेथें ऐकणारा तिसरा कोणी नसतोच. थोरांवर थुंकी पडूं नये म्हणजे काय लहानांवर पडावी ? व त्या थुंकीपासून बचूंहि शकत नाहीत. आम्हीं जरी दुरून गोष्टी केल्या व वायु आमच्याकडे किंवा दुसऱ्याकडे वाहत असला तर थुंकी वायूच्या बरोबर सूक्ष्म होऊन त्रसरेणु

अंगावर अवश्य पडत असतील. यांला दोष समजणें ही अविद्येची गोष्ट आहे. तोंडाच्या वाफेनें जीवांना दुःख पोंचत असेल किंवा ते मरत असतील तर वैशाख व ज्येष्ठ महिन्यांतील सूर्याच्या मोठ्या उष्णतेनें वायुकायांतील जीव मेल्यावांचून एकहि राहूं शकत नाहींत; पण त्या उष्णतेनेंहि जीव मरूं शकत नाहींत; म्हणून हा तुमचा सिद्धांत असत्य आहे. जर तुमचें तीर्थंकर पूर्ण विद्वान असते तर ते अशा व्यर्थ गोष्टी कां करते ! पहा ! ज्यांची वृत्ति सर्व अवयवांसह विद्यमान असते, अशा जीवांलाच पीडा पोंचत असते, पहा:—

**पंचावयवयोगात्सुखसंवित्तिः** ।।सांख्य ५।२७ ।।

जेव्हां पांच इंद्रियांचा पांच विषयांशीं संबन्ध घडतो तेव्हांच सुखाची किंवा दुःखाची प्राप्ति जीवांला होते. जसें बहिऱ्याला गालिप्रदान, आंधळयाला रूप, किंवा जवळून भयानक सर्प व्याघ्रादिकांचें गमन, बधिराला स्पर्श पीनस रोग्याला गन्ध व शून्य जिह्वावाल्याला रस यांची प्राप्ति होत नाहीं, त्याचप्रमाणें त्या जीवांचीहि व्यवस्था आहे. पहा ! जेव्हां मनुष्याचा जीव सुषुप्तिदशेमध्यें (झोपेंत) असतो, तेव्हां त्याला सुख किंवा दुःख प्राप्त होत नसतें, कारण तो शरीराच्या आंत तर असतोच पण त्याचा शरीराच्या बाहेरील अवयवांशीं संबन्ध नसतो, म्हणून त्याला सुखदुःखाची प्राप्ति होत नाहीं. वैद्य लोक व सध्यांचे डॉक्टर नशा येण्याचें औषध देऊन मनुष्याला गुंगवून त्याला चिरतात, तेव्हां त्याला मुळींच दुःख होत नसतें, त्याचप्रमाणें वायुकायांतील व अन्य स्थावर शरीरयुक्त जीवांना दुःख किंवा सुख प्राप्त होत नाहीं, तेव्हां पीडेपासून त्यांना सोडवण्याची गोष्ट कशी बरें सिद्ध होईल ? जर त्यांना सुखदुःखाची प्राप्ति प्रत्यक्ष नाहीं तर अनुमानादिक युक्त येथें कसें बरें होऊं शकतील ? (**प्रश्न**) ज्याअर्थी ते जीव आहेत त्याअर्थी त्यांना कां बरें सुखदुःख असणार नाहीं? (**उत्तर**) ऐका भोळे लोकहो ! तुम्ही जेव्हां सुषुप्तिमध्यें (झोपेंत) असतां तेव्हां तुम्हांला सुखदुःख कां बरें प्राप्त होत नसतें ? प्रसिद्ध संबन्ध हाच सुखदुःखाच्या प्राप्तीचा हेतु आहे. आतांच याचें उत्तर आम्ही दिलें आहे कीं, नशा येण्याचें औषध देऊन डॉक्टर लोक रोग्याला फाडतात व चिरतात म्हणून त्याला दुःख विदित होत नाहीं, त्याचप्रमाणें अतिमूर्छित जीवांना सुखदुःख कसें प्राप्त होईल ? कारण तेथें त्यांची प्राप्ति होण्याचें कोणतेंच साधन नसतें. (**प्रश्न**) पहा ! हिरव्या शाकपाक कंद यांना आम्हीं खात नाहीं, कारण हिरव्या भाजींत व कंदमूलांमध्यें अनंत जीव असतात. जर आम्हीं त्यांना खाल्ले तर त्यांना मारण्याचें व पीडा देण्याचें पाप आम्हांला लागेल. (**उत्तर**) ही तुमची भयंकर अज्ञानाची गोष्ट आहे. हरित शाक खाण्यानें जीवांला मारणें व त्याना पीडा देणें हें कोणत्या आधारावरून तुम्ही मानतां ? जर त्यांना पीडा झालेली तुम्हांला प्रत्यक्ष दिसते तर ती आम्हांला तरी प्रत्यक्ष दाखवा, ती तुम्हांलाहि प्रत्यक्ष दिसणार नाहीं व आम्हांलाहि तुम्ही दाखवूं शकणार नाहीं. जेथें प्रत्यक्ष नाहीं तेथें अनुमान उपमान व शब्दप्रमाणहि लागूं होऊं शकत नाहीं. वर जें आम्हीं उत्तर दिलें आहे तें या गोष्टीलाहि लागू पडतें. अत्यंत अंधःकार महासुषुप्ति व महानशा यांमध्यें असणाऱ्या जीवांला सुखदुःख होतें असें मानणें ही तुमच्या तीर्थंकरांचीहि चूक आहे. या तीर्थंकरांनीं तुम्हांला युक्ति व विद्या यांच्या विरुध्द गोष्टींचा उपदेश केला ! जर घर सान्त आहे तर त्यांत राहणारे अनंत कसे असूं शकतील ? जर कंद हा मर्यादित आहे असें आम्ही पाहतों तर त्यांत राहणारेहि सान्तच (नियमित) असले पहिजेत. ज्याअर्थी त्यांना तुम्ही अनंत मानतां त्याअर्थी तुमची ती मोठी चूक आहे. (**प्रश्न**) पहा ! तुम्ही तापविल्यांवांचूनच थंड पाणी पितां हें फार पाप करीत आहांत . जसें आम्ही तापविलेलें पाणी पितों त्याचप्रमाणें तुम्हीहि प्या. (**उत्तर**) हीहि तुमची भ्रमयुक्त गोष्ट आहे. कारण जेव्हा तुम्ही पाणी तापवितां तेव्हां त्यांतील जीव मरून जातात व त्यांच्या प्रेतांच्या अर्कानें तें पाणी युक्त असल्यांमुळें तें पाणीं म्हणजे त्यांच्या शरीरांचें आसव तुम्ही पितां असें म्हणण्यास हरकत नाहीं, अर्थात् तुम्ही फार पापी आहांत. जें थंड पाणी पितात ते तसे नाहींत. कारण, जें थंड पाणी पितात तें पाणी त्याच्याबरोबर पोटांत जातें व तेथें तें थोडेसें ऊन होतें व त्यांतील जीव श्वासाबरोबर बाहेर पडतात. तात्पर्य, या रीतीनें पहातां जलकायांतील जीवांला सुखदुःख होतें असें संभवत नाही. तेव्हां त्यापासून पापहि कोणाला होणार नाहीं. (**प्रश्न**) ज्याप्रमाणें जठराग्नीनें तापलेल्या पाण्यांतून जीव बाहेर जातात त्याचप्रमाणें विस्तवानें तापलेल्या पाण्यांतून कां जात नाहींत? (**उत्तर**) हां जातच असतील. पण तुम्ही तोंडांतील उष्ण वायूच्या योगानें जीव मरतात असें मानतां

त्या तुमच्या मताप्रमाणें पाणी तापल्यानेंहि जीव मरतील किंवा अधिक दुःखीत होऊन निघून जात असतील किंवा त्यांची मृत शरीरें जलामध्यें सडून तुम्ही तें पाणी पितां म्हणून तुम्ही अधिक पापी होता कीं नाहीं ? (प्रश्न) आम्ही आपल्या हातांनीं पाणी तापवीत नाहीं व कोणाहि गृहस्थाला तापविण्याला आज्ञाहि करीत नाहीं तेव्हां आम्ही पापी नाहीं. (उ.)जर तुम्ही उष्ण जल घेत किंवा पीत नसाल तर कोण गृहस्थ कशाला तापवील?म्हणून त्या पापाचा भोग तुम्हांलाच होइल इतकेंच नव्हे तर अधिक पापी तुम्ही होत असला पाहिजे; कारण जर तुम्ही कोणा एका गृहस्थाला उष्ण उदक करण्यास सांगितलें असतें तर एकेच ठिकाणीं पाणी ऊन केलें गेलें असतें, पण आतां ते गृहस्थ अशा भ्रमांत असतात कीं, साधुमहाराज कोणाच्या घरीं येतील कोण जाणें, म्हणून प्रत्येक गृहस्थ आपआपल्या घरीं जल उष्ण करून ठेवतो; म्हणून त्या पापाचे तुम्हीच भागी होतां. तसेच अधिक लाकडें व अधिक अग्नि पेटविल्यानें वर लिहिल्याप्रमाणें स्वयंपाक शेती व व्यापार इत्यादिकामध्यें तुम्हीच जास्त पापी व नरकगामी होत असतां. तसेंच पुनः तुम्ही जल उष्ण करण्याच्या मुख्य उद्देशानें उष्ण जल पिण्याचा व थण्ड जल न पिण्याचा उपदेश करीत असतां त्यामुळें पापाचे मुख्य भागीदार तुम्हीच होतां व जे या तुमच्या उपदेशाप्रमाणें वागतात तेहि पापीच होत असतात. आतां पहा ! कीं तुम्ही महान् अविद्येमध्यें निमग्न असतां कीं नहीं, पहा ! लहान क्षुद्र जीवांवर दया करणें व अन्य मतवाल्या माणसांची निंदा करणें व त्यांच्यावर उपकार न करणें हें काय लहान पाप आहे ? जर तुमच्या तीर्थंकरांचें मत खरें असतें तर सृष्टीमध्यें इतक्या नद्या वाहाताहेत व जें इतकें जल परमेश्वरानें उत्पन्न केलें आहे, तें कां केलें असतें ? व तो सूर्यालाहि उत्पन्न न करतां. कारण त्याच्या योगानें कोट्यानकोटी जीव तुमच्या मतानुसार मरत असतात ! ज्यांना तुम्ही ईश्वर मानतां, ते जेव्हां विद्यमान् होते तेव्हां त्यांनीं दया करून सूर्याचा ताप व मेघ कां बंद केले नाहींत ?व पूर्वोक्त प्रकारावांचून विद्यमान् प्राण्यांना व कन्दमूल पदार्थांमध्यें राहणाऱ्या जीवांना सुखदुःखाची प्राप्ति झाली नसती. सर्वथा सर्व जीवांवर दया करणें हेंहि दुःखालाच कारण होतें, जर तुमच्या मतानुसार सर्व लोक वर्तन करतील व चोर व डाकू यांना शिक्षा करणार नाहींत तर किती पाप होईल बरें ? म्हणून दुष्टांना यथावत् शिक्षा करण्यांत व श्रेष्ठांचें पालन करण्यांतच खरी दया आहे, व याच्या विपरीत आचरणानें दया व क्षमा यांचा नाश होतो. जितके जैन लोक दुकानदारी करतात ते सर्व असत्यच बोलत असतात, दुसऱ्याच्या धनाचा उपहार करतात व गरीबांना छळणें वगैरें कुकर्में करतात. याच्या निवारासाठीं तुम्ही उपदेश कां करीत नाहीं ? मुखावर पट्टी बांधण्याच्या ढोंगामध्यें कशाला राहतां ? तुम्ही जेव्हां चेला व चेली करतां तेव्हां त्यांचें केशलुञ्चन करतां व पुष्कळ दिवस भुकेलेलें राहण्यानें आपल्या व दुसऱ्याच्या आत्म्याला पीडा देतां, तुम्ही पीडा करून दुसऱ्यांला दुःख देतां, आत्महत्त्या अर्थात् आत्म्याला दुःखदायक होऊन कां बरें हिंसक बनतां ! हत्ती, घोडे, बैल, उंट, इत्यादिकावर चढण्यांत व मनुष्यांना मजुरीला लावण्यांत जैन लोक कां बरें पाप मानीत नाहींत ! जर तुमचे चेले अशा बाष्कळ गोष्टींना सत्य करूं शकत नाहींत तर तुमचे तीर्थंकरहि त्यांना सत्य करूं शकणार नाहींत. जेव्हां तुम्ही कथा वाचीत असतां तेव्हां तुमच्या श्रोत्यांच्या व तुमच्यामधील जीव तुमच्या मतानुसार मरतच असतील तेव्हां तुम्ही या पापाचें मुख्य कारण कां बरें होत असतां ? या थोड्याशा कथनावर विचार करून पुष्कळ जाणावें. तात्पर्य या जल, स्थल व वायूंतील स्थावर शरीरयुक्त अत्यंत मूर्छित जीवांना दुःख किंवा सुख पोंचत नाहीं.

**असंभव गोष्टीः**—आतां जैनांच्या आणखीहि थोड्याशा असंभव गोष्टी लिहितों. त्या तुम्ही ऐकल्या पाहिजेत, या ठिकाणीं तुम्ही हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, आपल्या हातांनीं साडेतीन हाताचें एक धनुष्य होतें व काळाची संख्या जशी पूर्वी सांगितली आहे ती लक्षांत घ्यावी. रत्नसार भाग पृ. १६६-६७ मध्यें लिहिलें आहे की, (१) ऋषभदेवाचें शरीर ५००धनुष्यें लांब व ८४,००,०००, पूर्व वर्षाचें आयुष्य होतें. (२) अजितनाथाचे ४५० धनुष्यें शरीर लांब असून ७२,००,००० पूर्व वर्षाचें आयुष्य होतें. (३) संभवनाथाचें शरीर ४०० धनुष्यें असून त्यांचें आयुष्य ६०,००,००० पूर्व वर्षें होतें. (४) अभिनंदनाचें शरीर ३५० धनुष्यें असून त्याचें आयुष्य ५०,००,०००' पूर्व वर्षें होतें (५) सुमतिनाथाचें शरीर ३०० धनुष्यें असून त्याचें आयुष्य ४०,००,००० पूर्व वर्षें होतें. (६) पद्मप्रभाचें

शरीर १४० धनुष्यें असून त्याचें आयुष्य ३०,००,००० पूर्व वर्षे होतें. (७) पार्श्वनाथाचें २०० धनुष्यें शरीर असून २०,००,००० पूर्व वर्षे आयुष्य होतें. (८) चंद्रप्रभाचें १५० धनुष्यें शरीर व १०,००,००० पूर्व वर्षे आयुष्य होतें. (९) सुविधिनाथाचें १०० धनुष्यें शरीर व २,००,००० पूर्व वर्षे आयुष्य होतें. (१०) शीतलनाथाचें ९० धनुष्यें शरीर व १,००,००० पूर्व वर्षे आयुष्य होतें (११) श्रेयांसनाथाचें ८० धनुष्यें शरीर व ८४,००,००० पूर्व वर्षे आयुष्य होतें. (१२) वासुपूज्य स्वामीचें ७० धनुष्यें शरीर व ७२,००,००० पूर्व वर्षे आयुष्य होतें. (१३) विमलनाथाचें ६० धनुष्यें शरीर व ६०,००,००० पूर्व वर्षे आयुष्य होतें. (१४) अनन्तनाथाचें ५० धनुष्यें शरीर व ३०,००,००० वर्षे आयुष्य होते. (१५) धर्मनाथाचें ४५ धनुष्यें शरीर १०,००,००० पूर्व वर्षे आयुष्य होतें. (१६) शान्तिनाथाचें ४० धनुष्यें शरीर व १,००,००० पूर्व वर्षे आयुष्य होतें. (१७) कुंथुनाथाचें ३५ धनुष्यें शरीर व ९५००० वर्षे आयुष्य होतें. (१८) अमरनाथाचें ३० धनुष्यें शरीर व ८४००० वर्षे आयुष्य होतें, (१९) मल्लीनाथाचें २५ धनुष्यें शरीर व ५५००० वर्षे आयुष्य होतें. (२०) मुनिसुव्रताचें २० धनुष्यें शरीर व ३०००० वर्षे आयुष्य होतें, (२१) नमिनाथाचें १४ धनुष्यें शरीर व १००० वर्षे आयुष्य होतें (२२) नेमिनाथाचें १० धनुष्यें शरीर व १००० वर्षे आयुष्य होतें, (२३) पार्श्वनाथाचें ९ हात शरीर १०० वर्षे आयुष्य होतें, (२४) महावीराचें ७ हात शरीर व ७२ वर्षे अयुष्य होतें.

हे चोवीस तीर्थंकर जैनाचें मतप्रवर्तक आचार्य व गुरु होत. यांनाच जैन लोक परमेश्वर मानतात व हे सर्व मोक्षाला गेले आहेत असें ते समजतात इतकें मोठें शरीर व एवढें आयुष्य मनुष्याला असूं शकेल कीं काय याचा बुद्धिमान् लोकांनींच विचार करावा ! या भूगोलावर असली धिप्पाड माणसें फारच थोडी राहूं शकतील. या जैनांच्या गप्पांच्या आधारावरून पौराणिकांनीं एक लक्ष दहा हजार वर्षांचे जें आयुष्य लिहिलें आहे तेंहि खरें नाहीं तेव्हां जैनांचें कथन तरी कसें खरें होऊं शकेल ? आतां आणखी थोडें ऐका :—

(कल्पभाष्य पृ. ४)– नागकेतानें गांवाएवढी शिला एका अंगुलीवर धरली. (कल्प पृ. ३५) महावीराने आंगठ्यानें पृथ्वि दाबली व त्यामुळें शेष कापूं लागला. (कल्प. पृ. ४६) महावीराला सर्पानें चावा घेतला. त्या जखमेंतून रक्ताऐवजी दूध बाहेर आलें, व तो सर्प आठव्या स्वर्गात गेला ! (कल्प पृ.४७) महावीराच्या पायावर खीर शिजविली असतां त्यांचें पाय जळले नाहींत. (कल्प पृ. १६) लहानशा भांड्यांत उंट बोलविला. (रत्नसार भा. १ पृ. १४) शरीराचा मळ काढूं नये व चोळूं नये (विवेकसार भाग १५) जैनांच्या एका दमसार साधूनें क्रोधित होऊन उद्वेगजनक सूत्र म्हटलें व एका शहराला आग लागली, हा महावीर तीर्थंकरांचा अत्यंत प्रिय होता. (विवे. भा. १ पृ. १२७) राजाची आज्ञा अवश्य मानली पाहिजे. (विवे. भा. १ पृ. २२७) एका कोशा वेश्येनें थाळीमध्यें सरसांचा ढीग करून त्यावर फुलांनी झांकलेली सुई उभी करून तीवर उत्तम प्रकारें नाच केला. पण सुई पायांत गेली नाहीं व ढीगही वांकडातिकडा झाला नाहीं. (तत्वविवेक पृ. २२८) या कोशा वेश्येशीं एका स्थूल मुनीनें १२ वर्षेपर्यंत भोग केला आणि नंतर दीक्षा घेऊन सग्दतीला गेला व कोशा वेश्याही जैनधर्म पालन केल्यामुळें सद्गतीला गेली. (विवेक. भा. १ पृ. १८५) एका सिद्धाचीं गळयांत बांधण्याची कंथा एका वैश्येला दररोज ५०० मोहरा देत असे. (विवेक. भा. १ पृ. २२८) बलवान् पुरुषाची आज्ञा व देवाची आज्ञा मोडल्यानें घोर वनांत कष्टांनें राहिल्यानें व गुरु, माता, पिता, कुलाचार्य ज्ञातीचे लोक, धर्मोपदेष्टा यांचा प्रतिकार केल्यानें धर्मांत न्यूनता होत असल्यानें धर्माची हानि होत नाहीं.

(समीक्षक) आतां पहा यांच्या असत्य गोष्टी ! एक मनुष्य गांवाएवढा दगड आपल्या एका अंगुळीवर कधीं तरी धरूं शकेल काय ? तसेंच पृथ्वीवर आंगठा दाबल्यानें पृथ्वी दाबली जाणें शक्य आहे काय ? जर शेषनाग न हींच तर कांपणार कोण ? शरीराला कापल्यावर त्यांतून दूध निघाले असे कोणी पाहिले आहे काय ? हे जादूच्या खेळाशिवाय दुसरें कांहीं नाहीं, त्याला चावणारा सर्प स्वतर्गांत गेला व श्रीकृष्ण तिसऱ्या नरकांत गेलें हें किती खोटें आहे? जेव्हां महावीराच्या पायावर खीर शिजविली तेव्हां त्याचें पाय कसे जळले नाहींत ? लहानशा भांड्यांत उंट कधीं तरी येऊं शकतो काय! जे शरीराचा मळ काढून टाकीत नाहींत व जे अंग चोळीत नाहींत ते दुर्गंधरूप महानरक भोगीत असतील. ज्या साधूनें

नगर जाळले त्याची दया व क्षमा कोठें गेली ? जर महावीराच्या संगतीनें त्याचा आत्मा पवित्र झाला नाहीं तर महावीराच्या मरणानंतर त्याच्या आश्रयानें जैन लोक कधींहि पवित्र होणार नाहींत. राजाची आज्ञा मानली पाहिजे पण जैन लोक बनिये आहेत म्हणून राजाला भिऊन त्यांनीं ही गोष्ट लिहिली असेल. कोशा वेश्येचें शरीर कितीहि हलकें असलें तरी सरसांच्या ढीगावर सुई उभी करून तिच्यावर नाचणें, पायांत सुई न बोचणें व ढीग अस्ताव्यस्त न होणें हें अशक्य असल्यामुळें तो वृत्तांत अगदीं असत्य नाहीं तर काय? कांहीं झालें तरी हरकत नाहीं, कोणीहि कोणत्याच अवस्थेंत धर्म मोडतां नये. कंथा हें एक वस्त्र आहे तें दररोज पाचशें मोहोरा कशा बरें देईल ? आतां जर अशा कहाण्या लिहूं लागलों तर ग्रंथ फारच मोठा होईल म्हणून आतां जास्त लिहीत नाहीं, या जैनांच्या थोड्याशा गोष्टी सोडून बाकी सर्व खोट्याच गोष्टीं भरल्या आहेत. पहा :—

दो ससि दो रवि पढमे । दुगुणा लवणं मिधाय ईसंमे ।।
बारससमि बारसरवि । तप्पमि इंनि दिठ ससि रविणो ।। प्रकरण. भा. ४ सं. संग्रह. ७७

जें जंबुद्वीप लक्ष योजनें म्हणजे चार लक्ष कोस आहे असें लिहिलें होतें, त्यांत हें पहिलें द्वीप आहे. यामध्यें दोन चन्द्र व दोन सूर्य आहेत. व लवणसमुद्रामध्यें त्याच्या दुप्पट म्हणजे चार चन्द्र व सूर्य आहेत. तसेंच धातकीखंडांत बारा चन्द्र व बारा सूर्य आहेत. यांची तिप्पट म्हणजे छत्तीस होतात व त्यामध्यें जंबुद्वीपाचे व चार लवण समुद्राचे मिळविलें म्हणजे बेचाळीस होतात. कालोदधि समुद्रामध्यें बेचाळीस सूर्य व बेचाळीस चन्द्र आहेत. याचप्रमाणें पुढील द्वीप व समुद्रामध्यें पूर्वोक्त बेचाळीसाच्या तिप्पट केले असतां १२६ होतात व त्यांत धातकी खंडाच्या बाहेरील लवण-समुद्राचें चार व जंबुद्वीपाचे दोन हे सर्व एकत्र केले असतां १४४ चन्द्र व १४४ सूर्य पुष्करद्वीपामध्यें होतात. ही अर्ध्या मनुष्यक्षेत्राची गणना आहे. पण जेथें मनुष्य राहत नाहींत तेथें पुष्कळ सूर्य व चन्द्र स्थिर आहेत. पूर्वोक्त १४४ ची तिप्पट करून, जंबुद्वीपाचे दोन चंद्र व दोन सूर्य व चार चार लवण समुद्राचे व बारा बारा धातकी खंडाचेच बेचाळीस कालोदधीचे मिळविले असतां ४९२ चंद्र व ४९२ सूर्य पुष्कर समुद्रांत होतात. या सर्व गोष्टी श्रीजिनभद्रगणीक्षमा-श्रमणानें मोठ्या 'संघयणी' मध्यें, तसेच 'योतिसकरंडक पयन्ना' मध्यें व 'चंद्रपन्नति' व 'सूरपन्नति' प्रमुख सिद्धांत-ग्रंथामध्यें याप्रमाणें लिहिल्या आहेत.

(**समीक्षक**) भूगोल खगोल जाणणारे लोकहो ! आतां ऐका ! या एका भूगोलामध्यें एका प्रकारे ४९२ चंद्र व सूर्य व दुसऱ्याप्रकारे अनेक चंद्र व सूर्य असें हे लोक मानतात ! आपले मोठे भाग्य आहे कीं, आम्हा वेदमतानुयांना सूर्य सिद्धांतादि ज्योतिषग्रंथाचें अध्ययन करून ठीक ठीक भूगोल व खगोल यांचें ज्ञान झालें नसतें तर आम्ही या जैनांच्या महा अंधःकारामध्यें सांपडलों असतों व जसे आज जैनलोक अविद्याग्रस्त आहेत तद्वतच आम्ही राहिलों असतों. या अविद्वानांला अशी शंका आली कीं, जंबुद्वीपांतील एक सूर्य व चंद्रानें काम भागत नाहीं, कारण एवढ्या मोठ्या पृथ्वीला तीस घटिकांमध्यें एक चंद्र व सूर्य पुनः पुनः कसे येऊं शकतील ? हे लोक सूर्यापेक्षांहि पृथ्वीला मोठी मानतात ही यांची मोठीच चूक आहे.

दो ससि दो रवि पंती एगंतरियाछ सठिसंरवाया ।।
मेरुं पयाहिणंता । माणूसखित्ते परिअडंति ।। प्र. मा. ४ । संग्रहसूत्र. ७९ ।।

मनुष्य लोकांतील सूर्य व चन्द्र यांच्या पंक्तीची संख्या सांगतात. दोन चन्द्र व सूर्य यांची पंक्ति (श्रेणी) आहे. ते एक लक्ष योजन म्हणजे चार लक्ष कोसांच्या अंतरावरून चालतात. जसें सूर्याच्या पंक्तीच्या आंतरीयभागीं चंद्राची पंक्ति आहे, त्याचप्रमाणें चंद्राच्या पंक्तीच्या आंतरीय भागीं सूर्याची पंक्ति आहे. त्याचप्रमाणें चार पंक्ति आहेत एक एक चंद्रपंक्तिमध्यें ६६ चन्द्र आहेत. व एकेका सूर्यपंक्तिमध्यें ६६ सूर्य आहेत या चारहि पंक्ति जंबुद्वीपांतील मेरू पर्व-ताला प्रदक्षिणा करीत करीत मनुष्यक्षेत्रांमध्यें परिभ्रमण करतात. ज्यावेळीं जंबुद्वीपांतील मेरूच्या दक्षिणदिशेला एक सूर्य फिरत असतो तेव्हां त्याच्या उत्तर दिशेला दुसरा सूर्य असतो, त्याच प्रमाणें लवण समुद्राच्या एकेका दिशेमध्यें दोन दोन फिरत असतात, धातकी खण्डाच्या सहा सहा, कालोदधीच्या २१, पुष्करार्धाच्या ३६ या प्रकारें सर्व मिळून ६६ सूर्य

दक्षिणदिशेमध्यें व ६६ सूर्य उत्तरदिशेमध्यें आपआपल्या क्रमानें फिरत असतात । या दोनहि दिशांचे सर्व सूर्य एकत्र केले असतां १३२ होतात । याचप्रमाणें ६६ चन्द्राच्या दोनहि बाजूंची बेरीज केली असतां १३२ होते । हे सर्व मनुष्य लोकांमध्यें फिरत असतात । याचप्रमाणें चन्द्राबरोबर नक्षत्रांच्याहि बऱ्याच पंक्ति जाणाव्या ।

(समीक्षक) आतां पहा ! या भूगोलावर १३२ सूर्य व १३२ चन्द्र जैनांच्या घरावर तापत असतात ! जर इतके तापत आहेत तर ते जीवंत तरी कसे राहिले ? रात्रीच्या वेळीं थंडीच्या मारानें जैन लोक जखडून जात असतील ? अशा असत्य गोष्टींमध्यें भूगोल व खगोल विद्या न जाणणारेच फसतात, अन्य नाहीं । तर एकच सूर्य या भूगोलासदृश अन्य भूगोलांवरहि प्रकाशतो तर लहानशा भूगोलाची ती कथा काय ? जर पृथ्वी फिरली नसती व सूर्यच पृथ्वीच्या चारहि बाजूला फिरला असता तर कित्येक वर्षांचा दिवस व रात्र झाली असती । सुमेरु हा हिमालयावांचून दुसरा कोणताच पर्वत नाहीं, हा सूर्याच्या समोर असा आहे कीं, जसा घटाच्या समोर मोहरीचा दाणा । जोंपर्यंत जैनमतामध्येंच हे लोक राहतील तोंपर्यंत त्यांना या गोष्टी समजूं शकणार नाहींत व सदैव अंधारांतच राहतील ।

समत्तचरण सहिया सव्वंलोगं फुसे निरवसेसं ।।
सत्तयचउदस भाए पंचयसुपदेसविर ईए ।। प्र.भा. ४।१३५

सम्यक् चारित्रसहित जे केवली असतात ते केवळ समुघ्दांत अवस्थेपासून सर्व चवदा राज्य लोकामध्यें आपला आत्मप्रदेश करून फिरतील ।

(समीक्षक) जैन लोक १४ राज्यें मानतात । त्यांतील चवदाव्या शिखरांवरील सर्वार्थसिद्धीच्या विमानाच्या ध्वजेच्यावर थोडें दूर सिद्धशिला आहे. तसेंच दिव्य आकाश ज्याला शिवपुर असें म्हणतात, त्यांत केवली, अर्थात् ज्यांना केवल ज्ञान, सर्वज्ञता व पूर्णपवित्रता प्राप्त झाली आहे, ते जातात व आपल्या आत्मप्रदेशामुळें सर्वज्ञ असतात. ज्यांचा प्रदेश असतो ते विभू नसतात व जे विभू नसतात ते कधींहि सर्वज्ञ असूं शकत नाहींत; कारण कीं, ज्याच्या आत्मा एकदेशी असतो तोच जातो येतो, बद्ध व मुक्त, ज्ञानी व अज्ञानी होत असतो; तसा सर्वव्यापी व सर्वज्ञ होऊं शकत नाहीं ; जे जैनांचें तीर्थंकर जीवरूप अल्प व अल्पज्ञ होऊन राहिले होते, ते सर्वव्यापक सर्वज्ञ होऊं शकत नाहींत; पण जो परमात्मा अनाद्यनन्त, सर्वव्यापक, सर्वज्ञ, पवित्र, ज्ञानस्वरुप आहे, ज्यामध्यें सर्वज्ञत्वादिगुण यथातथ्यपणानें असू शकतात त्याला जैन लोक मानीत नाहींत ।

गब्मनरति पलियाऊ । तिगाउ उक्कोसते जहन्नेणं ।।
मुच्छिम दुहावि अन्तमुहु । अङ्गुल असंख भागतणू ।। २४१ ।।

मनुष्यें दोन प्रकारचीं आहेत । एक गर्भापासून उत्पन्न झालेलीं व दुसरीं गर्भाशिवाय उत्पन्न झालेली. त्यापैकीं गर्भज मनुष्यांचें उत्कृष्ट तीन पल्योपम आयुष्य जाणावें व तीन कोसांचें शरीर जाणावें । (समीक्षक) ज्यांचें तीन पल्योपम आयुष्य व तीन कोसांचें शरीर आहे अशीं माणसें या भूगोलावर थोडींच राहूं शकतील । पूर्वीं लिहिल्याप्रमाणे जर तीन पल्योपम आयुष्य असेल व ते त्या समयापर्यंत जगत असतील तर त्यांच्या संतानांचीं शरीरेंहि तीन कोसच झालीं पाहिजेत । अशीं माणसें मुंबई शहरांमध्यें दोन व कलकत्त्यांत तीन किंवा चारच राहूं शकतील । असें जर आहे तर जैनांनीं एका नगरामध्यें असलीं लाखों माणसें राहतात असें लिहिलें आहे तेव्हां तें नगरहि लाखों कोसांचें असलें पाहिजे । सर्व भूगोलावर तसलें एकहि शहर असूं शकणार नाहीं ।

पणया ललरकयोयण । पिररंभा सिद्धिशियफलिहविमला ।।
तदुर्वरि गजोयणंते लोगन्तो तच्छ सिलठिई ।। २५८ ।।

पें सार्वार्थसिद्धि विमान आहे, त्याच्या ध्वजेच्यावर १२ योजनें सिद्धशिला आहे । तिची लांबी, रुंदी व जाडी ४५ लक्ष योजनें आहे, ती सर्व शुभ्र असून सुवर्णमय स्फटिकाप्रमाणें निर्मळ अशी सिद्धशिलेची सिद्धभूमि आहे हिला कोणी 'ईषत् प्राग्भरा' असेंहि म्हणतात. ही सर्वार्थसिद्धशिला विमानापासून १२ योजनें अलोक आहे. हा परमार्थ केवली श्रुत जाणत आहे. ही सिद्धशिला सर्वार्थ मध्यभागामध्यें ८ योजनें स्थूल आहे, ती चार दिशांमध्यें व चार उपदिशांमध्यें माशीच्या पंखांप्रमाणें पातळ होत गेली आहे । उत्तानछत्र व आकार करून सिद्धशिलेची स्थापना केली आहे

या शिलेच्यावर एका योजनाच्या अंतरानें लोकान्त आहे व तेथें सिद्ध लोक राहतात. (**समीक्षक**) या ठिकाणीं लक्षांत आणलें पहिजे कीं, जैनांच्या मुक्तीचें स्थान सर्वार्थसिद्धि विमानाच्या ध्वजेच्यावर ४५ लक्ष योजनांची एक शिळ आहे. ती कितीहि जरी स्वच्छ व निर्मळ असली तथापि तिच्यावर राहणारे मुक्त जीव एक प्रकारानें बद्धच असतात कारण, त्या शिळेच्चा बाहेर जर ते आले तर त्यांना मुक्तीसुख प्राप्त होत नाहीं. व जर आंत राहिले तर त्या [illegible] वायूहि मिळत नसला पाहिजे. ही मुक्तीची कल्पना केवळ अविद्वानाला फसविण्यासाठींच केलेली आहे. हें निव्वळ भ्रमजाल आहे.

**वितिचउरिं दिस सरीरं । वारस जोयणति कोसच उकोसं जोकणसहसं पणिदिय ।**
**उहे वुच्छन्ति विसेसंतु ।। प्र. ४ सं. सू. २६७ ।।**

सामान्यपणानें एक इंद्रियाचें शरीर १ हजार योजनांचें असतें तें उत्कृष्ट आहे असें जाणावें. दोन इंद्रियांचें शङ्खादिकांचें शरीर १२ योजनांचें जाणावें, चतुरिंद्रिय भ्रमरादिकांचें शरीर चार कोस व पंचेंद्रियांचें एक सहस्र योजनें अर्थात् चार सहस्र कोस शरीर असतें असें जाणावें. (**समीक्षक**) चार चार हजार कोस शरीरधारी माणसें झालीं तर भूगोलावर फारच थोडीं माणसें राहतील. शंभरएक माणसांनीं हा भूगोल अगदीं ठांसून भरून जाईल व कोणाला हिंडाफिरावयाला जागाच राहणार नाही. ते नंतर जैनालाच राहाण्याचें ठिकाण व मार्ग विचारतील, व हे त्यांना आपल्या घरांतच ठेवतील कदाचित् ! पण चार चार हजार कोस शरीराच्या माणसाला रहावयास निदान ३२ हजार कोसांचें तरी घर लागेल ! असें एक घर बनविण्यामध्यें जैनांचें सर्व धन खर्च झालें तरीहि असें घर बनणार नाहीं. आठ हजार कोशाची तक्तपोशी बनविण्यास लांकडें कोठून आणणार ! व जर मध्यें खांब लावले तर तो मनुष्य आंत प्रवेशहि करूं शकणार नाहीं ! म्हणून अशा ज्या गोष्टी असतात त्या सर्व खोट्याच असतात.

**ते थूला पल्ले विहु संखिज्जाचे बहुती सव्वेविं ।। ते इक्किवक्क असंखे । सुहुमे खम्मे पफप्पेह ।।**
प्र. भा ४ लघुक्षेत्र । **समासप्र. ४**

पूर्वोक्त एक अंगुल केसांच्या तुकड्यांनीं चार कोस औरस चौरस व तितकाच खोल खड्डा भरावा. आंगुलांएवढ्या केंसाचे तुकडे सर्व मिळून वीस लक्ष सत्तावन हजार एकशें बावन होतात. या मानानें त्या विहिरीमध्यें अधिकांत अधिक तेहेतीस कोटी सात लक्ष बासष्ट हजार एकशें चार कोटी, चोवीस लक्ष पांसष्ठ हजार सहाशें पंचवीस कोटी, बेचाळीस लक्ष एकोणीस हजार नउशें साठ कोटी, सत्याण्णांव लक्ष त्रेपन हजार सहाशे कोटी (३३०७६२१०४, २४६५६२५, ४२१९९६०, ९७५३६००, कोटी) इतकी सर्व स्थूल लोमखण्डाची संख्या त्या घन योजन पल्योपम विहिरीमध्यें होते. हाहि संख्यातकाल समजावा. पूर्वोक्त एका लोमखण्डाचे मनानें असंख्यात खण्ड कल्पावे तेव्हां असंख्यात सूक्ष्म रोमाणु होतील ! (**समीक्षक**) आतां पहा ! यांच्या गणनेची रीती ! एका अंगुळावएढ्या केंसाचे तुकडे जितके केले आहेत तितके कधीं तरी कोणाच्या गणनेमध्यें येऊं शकतात काय ? व त्यानन्तरहि मनानें त्या एकेका खण्डाचे असंख्य तुकडे कल्पतात ! यावरून हेंहि सिद्ध होतें कीं पूर्वोक्त खण्ड हातांनींच केले असतील, जर हातांनीं नसतील तर मनानें केले असतील ! पण कशानेंही केलेले असले तरीहि एका अंगुळाएवढ्या केंसाचे तुकडे असंख्य कसे बरे होऊं शकतील ?

**जंबुदीपपमाणं गुलजोयाणलरफ पट्टुयिरक्कंभो ।।**
**लवणाईयासेस । पलया मादुगुप्पगुज्जाय ।। प्र. ४ लघु. १२ ।।**

प्रथम जंबुद्वीपाचें एक लक्ष योजनांचें प्रमाण आहे व तेवढेंच जाड आहे. बाकी लवणादि सात समुद्र व सात द्वीपें जम्बुद्वीपांच्या प्रमाणाच्या दुप्पट आहेत. एका पृथ्वीमध्यें जम्बुद्वीपादि सात द्वीपें व सात समुद्र आहेत ते पूर्वी लिहिले आहेत. (**समीक्षक**) जम्बुद्वीपाच्या दुप्पट दोन लक्ष योजनांचे दुसरें द्वीप तिसरें चार लक्ष योजनाचें, चौथें आठ लक्ष योजनांचें, पांचवें सोळा योजनांचें, सहावें बत्तीस लक्ष योजनांचें व सातवें चवसष्ट लक्ष योजनांचें तेवढ्याच प्रमाणाचें किंवा त्यापेक्षा मोठ्या प्रमाणाचे समुद्र या पंधरा हजार परिधियुक्त भूगोलावर कसें वरें राहूं शकतील ? तात्पर्य या सर्व गोष्टी असत्य आहेत.

फुरुनइघुलसी सहसा । छच्चेवन्तरनई उपइ विजयं ॥
दोदो महानईउ । चनुदस सहसा उपत्तेयं ॥ प्र. भा. ४ लघु. ॥६३॥

कुरुक्षेत्रामध्यें ८४ हजार नद्या आहेत. ( समीक्षक ) कुरुक्षेत्र तर फारच लहान देश आहे, त्याला, न पाहतांच एक कोटी गोष्ट लिहिण्यांत त्यांना लज्जाहि आली नाहीं.

यामुमरा उताउ । दुगेग सिंहासणाउ अघ्रुपुव्वं ।
घऊ सु वितास नि आसण, दिसिभवजिण मज्जणं होई ॥
प्र. भा. ४ लघु. ॥११९॥

त्या शिलेच्या विशेषतः दक्षिण व उत्तर दिशामध्यें एक एक सिंहासन आहे असें जाणावें. त्या शिलांचीं नांवें, दक्षिण दिशेमध्यें अतीपांडुकंबला, उत्तर दिशेमध्यें अतिरक्तकंबला अशीं आहेत. या सिंहासनावर तीर्थंकर बसतात. ( समीक्षक ) पहा ! यांच्या तीर्थंकरांच्या जन्मोत्सवादिक करण्याच्या शिळा, अशीच यांच्या मुक्तीची सिद्धशिला आहे. अशाच यांच्या पुष्कळ गोष्टी असत्य आहेत. किती म्हणून लिहाव्या. जल गाळून पिणें, सूक्ष्म जीवांवर नाममात्र दया करणें, रात्रीला भोजन न करणें या यांच्या तीन गोष्टी चांगल्या आहेत. बाकी जितकें यांचें कथन आहे तें सर्व असंभवग्रस्त आहे. एवढ्या लेखानेंच बुद्धिमान् लोक पुष्कळ जाणूं शकतील. थोडेंसें हें दिग्दर्शनमात्र लिहिलें आहे. जर यांच्या सर्व असंभवनीय गोष्टी लिहिल्या तर एवढे ग्रंथ होतील कीं, त्यांचें एका आयुष्यांत पठणहि होणार नाहीं. ज्याप्रमाणें शितावरून भाताची परीक्षा करतात त्याचप्रमाणें या थोड्याशा लेखावरुन बुद्धिमानांनीं इतर गोष्टींविषयीं जाणावें. याच्यापुढें ख्रिस्तांच्या मताविषयीं लिहूं.

इति सुभाषाविभूषितो नास्तिकमतांतर्गतचारवाकबौद्ध जैनमतखण्डनमण्डनविषयो नाम द्वादशसमुल्लासः संपूर्णः ॥१२॥

# अनुभूमिका (३)

या समुल्लासांत जे बायबलाचें मत वर्णिलें आहे तें केवळ ख्रिस्त्यांचेंच मत आहे असें नसून त्यायोगें यहुदी आदिहि मतें गृहीत होत आहेत. या १३ व्या समुल्लासांत ख्रिस्ती मताविषयीं लिहिलें आहे त्याचें तरी कारण हेंच कीं, सांप्रत बायबलानुयायीं ख्रिस्तीमतच मुख्य मत गणलें गेलें आहे, यहुदी वगैरे मतें गौण होत; अर्थात् मुख्यमताच्या ग्रहणांत गौण मतांचा समावेश आपोआप होतो. बायबलाविषयीं लिहिणें म्हणजे ख्रिस्ती, यहुदी वगैरे धर्माविषयीं आलेंच; कारण सदहू धर्मानुयायी बायबल ह्याच धर्मग्रंथ प्रमाण मानितात, बायबल हेंच उपरोक्त धर्माचें मूलकारण होय. बायबलाची भाषांतरें अनेक भाषेंत मोठमोठ्या ख्रिस्ती मिशनरींनीं केलेलीं आहेत. त्यापैकीं संस्कृत भाषेंतील प्रत माझ्या वाचण्यांत आली, वाचनांतील ज्या मला पुष्कळ शंका उद्भवल्या त्यांपैकीं कांहीं थोड्याशा ह्या समुल्लासामध्यें दिग्दर्शित केल्या आहेत. केवळ सत्याची वृध्दि आणि असत्याचा ऱ्हास व्हावा, हेंच शंका दिग्दर्शित करण्याचें कारण आहे. कोणाला दुःख व्हावें, कोणाची हानि करावी अथवा कोणावर मिथ्या दोषारोपण करावें हा माझा बिलकुल हेतु नाहीं. या भागांत प्रथम बायबलांतील वचनें देऊन नंतर त्याखालीं माझें म्हणणें मी दिलें आहे. त्यावरून हें पुस्तक—बायबल कसें आहे व त्यांतील मतें कशीं काय आहेत हे सर्वांना समजून येईल. असें झालें म्हणजे सर्व मनुष्यमात्रानें ह्या ग्रंथाचा अभ्यास करावा, श्रवण करावें, लेख लिहावें, पक्षी प्रतिपक्षी बनून परस्पर विचारविनियम करावा व अशारीतीनें ख्रिस्ती धर्माचें आंदोलन सर्वांनीं करीत असावें. आणखी एक माझा मुख्योद्देश हा आहे कीं, मनुष्याचें धर्मज्ञान वृद्धिंगत होऊन त्यांना 'सत्यासत्य' व कर्त—व्याकर्तव्य' कर्मासंबंधीं निर्णय करण्यास शक्य व्हावें व सत्याचा, कर्तव्याचा स्वीकार आणि असत्य, अकर्तव्य यांचा त्याग करण्यास त्यांना सहज साध्य व्हावें.

त्यांनीं सर्व मतमतांतरांचीं पुस्तकें वाचावींत, समजून घ्यावींत, संमत, असंमत याविषयीं पूर्ण मनन करावें व मगच तें मत प्रतिपादन करावें, हें सर्वांना उचित आहे. शिक्षणानें मनुष्य जसा पंडित तसा श्रवणानें तो बहुश्रुत बनतो. श्रवणानें त्याला इतर लोकांना उपदेश करतां येणार नाहीं परंतु स्वतःपुरतें त्याला बरेंच ज्ञान प्राप्त करता येईल जो कोणी पक्षांधतेनें अध्ययन करतो त्याला स्वपर गुणदोष कदापि कळणार नाहींत. मनुष्याचा आत्मा 'सत्यासत्या' चीं यथायोग्य निवड करण्याचें सामर्थ्य बाळगतो आणि म्हणून जेवढें त्याचें वाचन व श्रवण असेल तेवढ्यापुरता तरी निर्णय करणें शक्य आहे. एक स्वमताविषयीं पूर्ण ज्ञानी व दुसरा जर स्वमताविषयीं पूर्ण अज्ञानी असेल तर त्यांच्या—मध्यें कसलाच विचारविनिमय होणें शक्य नाहीं, परंतु जो अज्ञानी आहे तो अधिकाधिकच भ्रमांत पडतो. असें होऊं नये म्हणून या ग्रंथांत प्रचलित सर्व मताविषयीं अल्प—स्वल्प लिहिलें आहे, त्यावरून त्या मतांतील बाकीविषयीं सत्यासत्याचें अनुमान सर्वांना करणें सुलभ पडेल.

जें जें सर्वमान्य 'सत्य' आहे त्याविषयीं एकवाक्यता आहे फक्त झगडा आहे तो 'खोट्या' करतां ! अथवा एक सत्य व दुसरें असत्य असेल तरी विवाद उत्पन्न होतोच ! जे लोक 'सत्यासत्य निर्णयार्थ' संवाद करितात तोच संवाद हितकारी होय व त्यानेंच अवश्य तो परिणाम प्राप्त होईल. आतां मी या समुल्लासांत ख्रिस्ती मताविषयीं थोडेसें लिहून तें विचारार्थ सर्वांसमक्ष ठेवतों. विचारवंतांनीं तें कसें आहे हें पहावें. अलमतिलेखेन विचक्षणवरेषु

उदेपूर
भाद्रपद शुक्लपक्षः विक्रमार्क १९३९

(स्वामी) **दयानंद सरस्वती.**

# अथ त्रयोदशसमुल्लासारम्भः ।

अथ ख्रिस्तीमत-विषयं समीक्षिष्यामः

आतां यापुढें ख्रिस्ती मताविषयी लिहितों म्हणजे सर्वांना हें ख्रिस्तीधर्ममत निर्दोष आहे किंवा नाहीं 'बायबल' पुस्तक ईश्वरकृत आहे किंवा कसें हें विदित होईल. प्रथम बायबलचा जुना करार (सृष्ट्युत्पत्ति भाग) याविषयीं लिहिण्यांत येत आहे:—.

१—प्रारंभीं देवानें आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली. आणि पृथ्वी अस्ताव्यस्त व शून्य होती, आणि जलावर अंधार होता. आणि देवाचा आत्मा जलावर हालत होता.—उत्पत्ति अध्याय १ ओवी १।२

समीक्षकः—आरंभ कशाला म्हणतां ? (ख्रिस्ती) सृष्टींच्या प्रथमोत्पत्तीला. (समीक्षक) काय हीच सृष्टि उत्पन्न झालेली आहे ? हिच्यापूर्वी ती केव्हांच उत्पन्न झाली नव्हती काय ? (ख्रिस्ती) आम्हांला माहीत नाहीं, ती झाली होती किंवा नाहीं, ईश्वर जाणे . (समी) जर माहीत नाहीं तर ह्या पुस्तकावर विश्वास कां ठेवला ? त्यायोगें संदेह निवारण होऊं शकत नाहीं, त्या पुस्तकाच्या आधारें लोकांना उपदेश करून, ह्या संशयग्रस्त ख्रिस्तीमतांत लोकांना कां फसवितां ? आणि निःसंदेह सर्व शंकानिवारक वेदमताचा तुम्हीं स्वीकार कां करीत नाहीं ? ईश्वराच्या सृष्टीचें ज्ञान जर तुम्हाला अवगत नाहीं तर ईश्वराला काय जाणत असाल ? आकाश कशाला समजतां ?(ख्रिस्ती)पोकळी व जें वर दिसतें त्याला, (समी.) पोकळीची उत्पत्ति कशाप्रकारें झाली ? कारण हा पदार्थ विभु, अति सूक्ष्म आणि वर खालीं एकसारखा आहे. जेव्हां आकाश उत्पन्न झालें नव्हतें तेव्हां पोकळी व जें वर दिसतें तें आकाश होतें कां नव्हतें ? जर नव्हतें तर ईश्वर, जगताचें कारण व जीव कोठें रहात होते ? अवकाश असल्याखेरीज कोणताहि पदार्थ स्थित होऊं शकत नाहीं; याकरितां तुमचें बायबलाचें कथन योग्य नाहीं. ईश्वर अस्ताव्यस्त, त्यांचें ज्ञान व कर्म हीं अस्ताव्यस्त आहेत किंवा व्यस्थित ? (ख्रिस्ती) व्यवस्थित असतात (समीक्षक) मग येथें ईश्वरानें निर्माण केलेली पृथ्वी अस्ताव्यस्त होती असें कां लिहिलें आहे ? (ख्रिस्ती) अस्ताव्यस्त याचा अर्थ उंच सखल होती, बरोबर सपाट नव्हती. (समी.) मग बरोबर कोणी केली ? आणि आतां ती उंच सखल नाहीं काय ? याकरितां ईश्वराचें कार्य अस्ताव्यस्त असूं शकत नाही. कारण तो सर्वज्ञ असल्यामुळें त्यांच्या कामांत अस्ताव्यस्तपणा, दोष वा चूक कधींच असूं शकत नाहीं. आणि ज्याअर्थी बायबला-मध्यें ईश्वराची सृष्टि अस्ताव्यस्त लिहिलेली आहे त्याअर्थी हें पुस्तक ईश्वरकृत होऊं शकत नाहीं.

ईश्वराचा आत्मा हा काय पदार्थ आहे ? [ख्रिस्ती] चेतन. [समी.] तो साकार आहे वा निराकार त्याच— प्रमाणें व्यापक आहे कां एकदेशी ? [ख्रिस्ती] निराकार, चेतन आणि व्यापक आहे. परंतु एखाद्या सनाई पर्वत व चौथ्या आसमानादि ठिकाणीं विशेष करून रहात असतो. ( समीक्षक ) जर निराकार आहे तर त्याला कोणी पाहिलें ? आणि सर्वव्यापक आहे तर पाण्यावर तो कधींहि डोलूं शकत नाहीं ? बरें जेव्हां ईश्वराचा आत्मा पाण्यावर हालत होता तेव्हां देव कोठें होता ? यावरून हेंच सिद्ध होतें कीं, ईश्वराचें शरीर अन्यत्र कोठें तरी असेल अथवा आपल्या आत्म्याचा एखादा तुकडा पाण्यावर हालवीत बसला असेल ! असा जो देव आहे तो विभु व सर्वज्ञ कधीं होऊं शकत नाहीं, आणि जो विभू नाहीं तो जगताची रचना, धारण, पालन जीवांच्या कर्माची व्यवस्था किंवा प्रलय कधीं करूं शकत नाहीं कारण ज्या पदार्थाचें स्वरूप एकदेशी आहे त्याचे गुण, कर्म स्वभाव देखील एकदेशी असतात. असा जो आहे तो ईश्वर होऊं शकत नाहीं. कारण ईश्वर सर्वव्यापक, अनन्त गुण, कर्म स्वभावयुक्त, सच्चिदानन्दस्वरूप, नित्य शुद्ध, बुद्ध, मुक्त-स्वभाव, अनादि अनन्तादि लक्षणयुक्त असा जो वेदांमध्यें वर्णिला आहे त्याला माना म्हणजे तुमचें कल्याण होईल अन्यथा नाहीं.

२—तेव्हां देव बोलला, प्रकाश होवो, आणि प्रकाश झाला. आणि देवानें पाहिलें कीं, प्रकाश चांगला आहे.
—उत्पत्ति अ. १ ओ. ३।४।।

(समीक्षक ईश्वराचें म्हणणें जडरूप प्रकाशानें ऐकलें ? जर ऐकलें असेल तर आतांहि - सूर्य, दीपक, अग्नीचा प्रकाश आमचें तुमचें म्हणणें कां ऐकत नाहीं ? प्रकाश जड असतो तो कधीं कोणाचें म्हणणें ऐकूं शकत नाहीं. ईश्वरानें प्रकाश पाहिला तेव्हांच त्याला प्रकाश चांगला आहे हें कळलें काय ? पहिल्यानें त्याला कळून आलें नाही काय ? त्याला अगोदर कळतें तर पाहिल्यावर तो चांगला आहे असें त्यानें कां म्हटलें असतें. जर तो प्रथमपासून जाणत नव्हता तर तो ईश्वरच नव्हे ! म्हणून तुमचें बायबल ईश्वरोक्त नव्हे ! व त्यांत वर्णिलेला ईश्वर सर्वज्ञ नव्हे.

३—मग देव बोलला, जलामध्यें अंतराळ होवो, आणि तें जलापासून वेगळें करो. असें देवानें अंतराल केलें आणि अंतराळाखालचें जें जल तें अंतराळावरच्या जलापासून वेगळें केलें आणि तसें झालें. देवानें अंतराळाला आकाश म्हटलें; आणि सायंकाळ व सकाळ झाली. हा दुसरा दिवस. —उत्पत्ति अ. १ ओ. ६।७।८।।

समीक्षक—आकाश व पाण्यानेंहि ईश्वराची आज्ञा ऐकली काय ? आणि जर पाण्यामध्यें आकाश नव्हतें तर पाणी कोठें राहिलें ? पाहिल्या ओवींत आकाश उत्पन्न केलें होतें मग पुनः तें उत्पन्न करणें व्यर्थ होय. आकाशाला जर स्वर्ग—अंतराळ म्हटलें तर तें सर्वव्यापक आहे म्हणून सर्वत्र स्वर्ग झाला. मग स्वर्ग वर आहे असें म्हणणें व्यर्थ आहे. सूर्य जर उत्पन्नच झाला नव्हता तर मग दिवस व रात्र कोठून झाली ? असल्या असंभव गोष्टी पुढील ओव्यामध्यें भरलेल्या आहे.

४—मग देव बोलला, आपण आपल्या प्रतिरूपाप्रमाणें आपल्या प्रच्छिायेसारखें मनुष्य उत्पन्न करूं. आणि देवानें आपल्या प्रतिच्छायेप्रमाणें मनुष्याला उत्पन्न केलें; देवाच्या प्रतिच्छायेप्रमाणें त्यानें त्याला उत्पन्न केलें; पुरुष व स्त्री असे त्यांस उत्पन्न केलें आणि देवानें त्यांस आशिर्वाद दिला. —उत्पत्ति अ. १ ओ. २६।२७।२८।।

समीः—ईश्वरानें आपल्या प्रतिच्छायेप्रमाणें आदामाला (मूळ पुरुषाला) बनविलें होतें तर ईश्वराचें स्वरूप पवित्र, ज्ञानमय, आणि आनन्दमय आदि लक्षणयुक्त असल्यामुळें त्याप्रमाणें आदाम कां झाला नाहीं ? तो तसा झाला नाहीं म्हणूनच तो ईश्वरस्वरूपाप्रमाणें नव्हता व आदामाला उत्पन्न केलें ईश्वरानें, जर स्वरूपालहि त्यानें उत्पत्तिवान् बनविलें तर तो अनित्य कां म्हणूं नये ? बरें, कोणत्या पदार्थापासून आदामाला त्यानें उत्पन्न केलें ? (खिरस्ती) मातीपासून. (समीक्षक) माती कशापासून झाली ? (खिरस्ती) त्याच्या कुदरतीनें अर्थात् सामर्थ्यानें. (समीक्षक) ईश्वराचें सामर्थ्य अनादि आहे कीं नवीन ! (खिरस्ती) अनादि आहे. (समी.) जर अनादि आहे तर जगताचें कारण सनातन ठरलें मग अभावापासून भावाची उत्पत्ति कां मानतां ! (खिरस्ती) सृष्टीपूर्वी ईश्वराखेरीज दुसरी कोणतीच वस्तु नव्हती. (समी.) जर नव्हती तर हें जग कोणत्या पदार्थापासून उत्पन्न झालें ! ईश्वराचें सामर्थ्य द्रव्य आहे कां गुण ! द्रव्य आहे तर ईश्वराहून भिन्न दुसरा पदार्थ होता व जर गुण आहे म्हणाल तर गुणा—पासून द्रव्य कधीं बनूं शकत नाहीं, जसें रूपापासून अग्नि आणि रसापासून जल बनत नाहीं. ईश्वरापासून जग झालें असतें तर ईश्वरापासून जगाचे गुण, कर्म, स्वभाव बनले असते परंतु ईश्वरासारखें तें नसल्यामुळें ईश्वरापासून तें बनलेलें नाहीं हें निश्चित होय. ईश्वरापासून नव्हें परंतु परमाणु—प्रकृतीपासून ते बनलें आहे म्हणूनच परमाणुप्रमाणें गुणधारी जग दिसत आहे. ईश्वर जग निर्माण—कर्ता आहे असें जें वेदादि शास्त्रांत लिहिलें आहे त्याप्रमाणें त्यास जगन्नियंता माना. आदामाचें आंतरस्वरूप जीव व बाह्य मनुष्यवत् आहे तसें ईश्वराचें स्वरूप कां नाहीं ? कारण जर आदाम ईश्वराचें प्रतिच्छायेप्रमाणें बनलेला आहे तर ईश्वरही आदामासारखा अवश्य असला पाहिजे.

५—आणि परमेश्वर देव यानें भूमींतील मातीचा मनुष्य घडिला व त्याच्या नाकपुड्यांत प्राणवायु फुंकला. म्हणून मनुष्य जीवंत प्राणी झाला. परमेश्वर देव यानें एदनांत पूर्वेकडे बाग लाविला आणि ज्या मनुष्याला त्यानें घडिलें

होतें त्याला तेथें ठेविलें आणि बगीच्यामध्यें जीवनाचें झाड आणि बरें व वाईट जाणण्याचें झाड हीं परमेश्वर देव यानें भूमींतून उगवत असें केलें, —उत्पत्ति अ. २ ओ. ७।८।९.

**समी**:—ईश्वरानें जेव्हां एदन बागेमध्यें आदामाला ठेवलें होते तेव्हां आदामाला पुन: दुसरीकडे न्यावें लागेल हें त्याला माहीत झालें नाहीं काय ? एदनाच्या पूर्वेस ईश्वरानें मातीपासून आदामाला जर बनविलें तर तो ईश्वराच्या स्वरूपापासून झाला नाहीं आणि ईश्वरस्वरूपापासून म्हणावयाचें असेल तर ईश्वरदेखील मातीपासूनच बनला असेल ? ईश्वरानें आदामाच्या नाकपुड्यांत श्वास फुंकला तर तो श्वास प्राणवायु ईश्वरस्वरूप होता कां भिन्न ? भिन्न होता म्हणाल तर ईश्वरस्वरूपाप्रमाणें आदाम नव्हता. जर एक आहे तर आदाम आणि ईश्वर एकस्वरूपी झाले. जर एक स्वरूपी आहेत तर ईश्वरामध्येंहि आदामाप्रमाणें जन्म, मरण, वृद्धि, क्षय, क्षुधा, तृषा आदि दोष आले. मग असा सदोषी जो आहे तो ईश्वर कसा होऊं शकतो ? याकरितां असल्या धर्मपुस्तकाचें कथन योग्य नाहीं व तें धर्मशास्त्रही ईश्वरकृत नव्हे.

६—मग "परमेश्वर देव यानें आदामाला गाढ झोंप लाविली; आणि तो झोंपेंत असतां त्याची एक फांसोळी काढून तिच्या ठिकाणीं मांस भरलें. आणि परमेश्वर देव यानें जी फांसोळी मनुष्यांतून काढली होती तिची स्त्री केली; आणि तिला आदमाकडे आणिलें. —उत्पत्ति अ. २ ओ. २१।२२॥

**समीक्षक**-मातीपासून. ईश्वरानें आदाम बनविला मग त्याची स्त्री मातीपासून कां निर्माण केली नाहीं ? आणि स्त्री जशी हाडाची बनविली तसा आदाम कां हाडापासून उत्पन्न केला नाहीं? नरापासून पैदा झाल्यामुळें नारी नांव झालें तर नारीपासून नर नांवहि असलें पाहिजे व त्यांच्यांत परस्पर प्रेमहि रहावें; ज्याप्रमाणें स्त्रीवर पुरुषानें प्रेम करावें त्याप्रमाणें पुरूषावर स्त्रीनेंहि प्रेम करावें. विद्वजनहो, ईश्वराची पदार्थविद्या अर्थात् 'फिलॉसफी' कशी झळकते आहे ती पहा ! आदामाची—नराची एक फांसोळी काढून त्यानें नारी बनविली तरी सर्व मनुष्यांच्या फांसळया भरपुरच ! वास्तविक सर्व पुरुषांची एक फांसळी स्त्रियांपेक्षां कमी असावी ती कां नाहीं ? स्त्रीलाच एक फांसोळी असावयास पाहिजे कारण ती एका फांसोळीचीच निर्माण केली आहे ! ज्या सामग्रीनें ईश्वरानें जग निर्माण केलें त्याला स्त्रीचें शरीर बनविणें शक्य नव्हतें काय ? यावरून बायबलचा सृष्टि क्रम सृष्टिविद्येच्या विरुद्ध आहे.

७—परमेश्वर देव यानें जे वनपशु उत्पन्न केले होते त्या सर्वांमध्यें साप धूर्त होता तो स्त्रीला म्हणाला, बागांतील सर्व झाडांचें फळ खाऊं नका असें देवानें तुम्हांला सांगितलें हें खरें काय ? मग स्त्री सापाला म्हणाली, आम्ही बागांतील झाडांच्या फळांतून खावें, परंतु बागाच्या मध्यभागीं जें झाड आहे, त्याच्या फळाविषयीं देवानें असें म्हटलें आहे कीं त्यांतून खाऊं नका व त्याला शिवूं नका, शिवाल तर मराल मग स्त्रीला साप म्हणाला, तुम्ही मराल असें कांहीं नाहीं' कां तर देवाला ठाऊक आहे कीं ज्या दिवशीं तुम्ही त्यांतून खाल त्या दिवशीं तुमचे डोळे उघडतील, आणि देवासारखी तुम्ही बरें वाईट जाणणारी व्हाल. मग त्या झाडाचें फळ खायास चांगलें आणि 'दिसण्यांत सुंदर आणि शहाणें करण्यासाठीं तें इष्ट आहे. असें जेव्हां स्त्रीनें पाहिलें तेव्हां तिनें त्याचें फळ घेऊन खाल्लें, आणि त्यांतून आपल्या नवऱ्यालाहि दिलें, आणि त्यानेंहि खाल्लें. तेव्हां त्या उभयतांचे डोळें उघडलें, आणि आपण नग्न आहों असें त्यांस समजलें. मग त्यांनी अंजिराचीं पानें शिवून आपणांसाठीं वस्त्रें केलीं. मग परमेश्वर देव सापाला म्हणाला; त्वां हें केलें आहे यामुळें सर्व ग्रामपशूंमध्यें व वनपशूमध्यें तूं शापित आहेस; तूं आपल्या पोटानें चालशील आणि आयुष्यभर माती खाशील. आणि मी तुझ्या व स्त्रीच्यामध्यें आणि तुझ्या व हिच्या संतानामध्यें परस्पर वैर ठेवीन; तें तुझें डोकें फोडील आणि तूं त्याची टांच फोडशील. स्त्रीला तो म्हणाला, मी तुझें गरोदरपणाचें दु:ख व वेदना वाढवीन तूं दु:खानें लेंकरें प्रसवशील, आणि तुझी ओढ तुझ्या नवऱ्याकडे लागून तो तुजवर धनीपण करील आणि आदामाला तो म्हणाला त्वां आपल्या स्त्रीची गोष्ट ऐकून ज्या झाडाचें फळ खाऊं नको म्हणून म्यां तुला आज्ञा दिली होती त्याचें फळ त्वां खाल्ले यास्तव तुझ्यामुळें भूमि शापित झाली आहे, तिचें फळ तूं आयुष्यभर कष्टानें खाशील. तीं तुजसाठीं कांटे व कुसळ उपजवील, आणि तूं शेतांतील हिरवळ खाशील.

उत्पत्ति अ'. ३ ओ व्या. १–२–३–४–५–६–७–१४–१५–१६–१७–१८ ॥

**समीक्षक**—ख्रिस्त्यांचा ईश्वर सर्वज्ञ असता तर प्रथमच धूर्त साप अर्थात् सैतान त्यानें कां बनविला असता ? असा दुष्ट सैतान ज्या ईश्वरानें निर्माण केला तो ईश्वरच अपराधाचा खरा वाटेकरी होय! कारण त्यानें दुष्टाला बनविलेंच नसते तर तो दुष्टता कां करता? आणि तो पूर्वजन्म मानीत नाहीं तर कांहीं अपराध नसता तो पापी कां म्हणून बनविला ? खरें विचारलें तर तो साप नव्हता पण मनुष्य होता. मनुष्य असल्याखेरीज त्याला मानवी भाषा कशी बोलता आली असती ? जो स्वत: खोटा व दुसऱ्यांना खोट्या मार्गी नेतो त्याला सैतान म्हटलें पाहिजे, वास्तविक या प्रसंगीं सैतान सत्यवादी होता त्यानें आदामाच्या बायकोला मुळींच भुलविलें नाहीं. परंतु जें सत्य होतें तेंच त्यानें सांगितलें ह्या झाडाचें फळ खाल तर तुम्हीं मराल असें ईश्वरानेंच आदाम व हव्वा यांना खोटें सांगितलें होतें. जर तें झाड ज्ञानदातें आणि अमर बनविणारें होतें तर त्याचें फल खाण्याची ईश्वरानें कां मनाई केली ? ज्याअर्थी त्यानें मनाई केली त्याअर्थी बायबलोक्त ईश्वर लबाड व लोकांना भुलविणारा व फसविणारा ठरला ! कारण त्या वृक्षाचें फळ मनु. यांना ज्ञानदायक आणि सौख्यकारक होतें, अज्ञानवर्धक व मृत्युकारक नव्हतें. त्या वृक्षाचें फळ खाण्याची बंदी ईश्वराला करावयाची होती तर त्या वृक्षाची उत्पत्ती त्यानें कोणत्या उद्देशानें केली ? स्वत:करिता केली असेल तर तो स्वत: अज्ञानी व मरणाधीन होता काय? दुसऱ्यासाठीं जर त्या वृक्षाची उत्पत्ति होती तर त्याचें फळ खाण्यांत मुळींच अपराध नव्हता व आजकल असा एखादा देखील वृक्ष ज्ञानकारक व मृत्युनिवारक पाहण्यांत येत नाहीं, ईश्वरानें तर त्याचें बीज नष्ट केलें नसेल ? असल्या कृत्यांनीं जर मनुष्य छळी' कपटी होत असतो तर ईश्वर त्याप्रमाणें कशावरून झाला नसेल ? जो दुसऱ्याशीं कपट करतो, व त्यांचा छळ करतो, तो छळी कपटी कां नसेल ? विनाकारण आदाम 'हव्वा व सर्प यांना ज्यानें शाप दिला तो ईश्वर अन्यायी होय, तो खोटें बोलला व त्यांना भुलविलें म्हणून हा शाप ईश्वरलाच लागला पाहिजे. हव्वेच्या पूर्वी ज्या स्त्रिया प्रसूत होत होत्या त्यांना गर्भावस्थेची व प्रसवण्याची दुःखें वेदना ह्या सहन कराव्या लागत नव्हत्या, ही 'फिलॉसफी' अजब खरी ! परिश्रमावांचून कोणीतरी आपली उपजीविका करूं शकतो काय ? प्रारंभीं वृक्षांना काटे वगैरे नव्हते काय ? जर प्रत्यक्ष ईश्वरानेंच मनुष्यांना तुम्ही शेतांतील हिरवळ खाल, अशी उचित आज्ञा केली आहे तर बायबलाच्या उत्तरार्धांत मांस खाणें लिहिलें आहे तें मिथ्या नव्हे काय? बायबलाचा उत्तरार्ध खरा असेल तर हा पूर्वार्ध असत्य होय. आदामाचा कांहीं अपराध जर सिद्ध होत नाहीं तर आदामाचे अपराधामुळें त्याचे संतान जी मनुष्यजाती ती सर्व अपराधी, पापी आहे असें ख्रिस्ती लोक कां म्हणतात ? असा ईश्वर व त्यानें दिलेलें धर्मपुस्तक बुद्धिमानांना कधीं तरी योग्य वाटेल काय ?

८—मग परमेश्वर देव बोलला, पहा, मनुष्य बरें व वाईट जाणण्याविषयीं आम्हांताल एकासारखा झाला आहे; तर आतां त्यानें हात लांब करून जीवनाच्या झाडाचेंहि फळ तोडून खाऊं नयें, व अमर होऊं नये; ह्याप्रमाणें त्यानें मनुष्याला बाहेर घालविले आणि जीवनाच्या झाडाची वाट राखावयास एदन बागाच्या पूर्वेकडे करूब व ज्वालानुरुपी फिरती तरवार ठेवली.

—उत्पत्ति अ. ३ ओ. २२।२४।।

**समीक्षक**—तें फळ आदामानें व त्याच्या बायकोनें खाल्लें म्हणून तें जोडपें आपल्या सारखे ज्ञानवान् झालें असा ईश्वराला कसा भ्रम झाला व मनुष्यें जर त्याच्यासारखीं झालीं असतीं तर त्यांत कोणती वाईट गोष्ट होती ? ही शंकाच त्याला कां पडली? ईश्वराची बरोबरी कधीं कोणी करूं शकत नाहीं परंतु या ओव्यावरून हेंच सिद्ध होतें कीं बायबलांत वर्णिलेला ईश्वर हा देव नव्हता तर एक विशेष मनुष्य होता. बायबलांत जेथें व जेव्हां ईश्वराचें कथन आलेलें आहे तेव्हां व तेथें मनुष्याप्रमाणेंच वर्णन आलें आहे. आतां पहा कीं, आदामाचें ज्ञानवर्धन पाहून ईश्वर किती दुःखी झाला व नंतर त्यानें त्या अमर झाडाचें फळ खाण्यामध्यें किती ईर्ष्या केली, ईश्वरानें आदामाला एदन बागेतून बाहेर घालविलें व जीवनाच्या झाडाची वाट राखायाला करूब अर्थात् ज्वालारुपी तरवारीचा त्यानें पहारा बसविला. असलीं कामें ईश्वर करूं शकत नाहीं. तीं मनुष्यें करतात यावरुन ख्रिस्त्यांचा परमेश्वर देव सर्वज्ञ तर नव्हताच पण एक साधारण मनुष्य होता !

९—हबेल मेंढपाळ झाला, आणि काइन शेतकरी झाला. आणि कांहीं दिवसानंतर असें झालें कीं, काइनानें

परमेश्वरासाठीं शेताच्या उपजांतील अर्पण आणिलें आणि हबेलानें आपल्या मेंढरांतील प्रथम जन्मलेलें व त्यांतील पुष्ट यांतून अर्पण आणिलें, आणि परमेश्वरानें हबेल व त्याचें अर्पण यांस मान्य केलें. पण काइन व त्याचें अर्पण यास मान्य केले नाहीं; यास्तव काइनला फार राग आला आणि त्याचें तोंड उतरलें. तेव्हां परमेश्वर काइनला बोलला, तुला राग कां आला ? आणि तुझें तोंड कां उतरलें ? —उत्पत्ति अ. ४ ओ. ३ ते ६ ॥

**समीक्षक**—ईश्वर जर मांसाहारी नसतां तर अर्पण केलेलें पुष्ट मेंढरू त्यानें स्वीकारलें नसतें व हबेलाचा सत्कार केला नसता आणि काइनचा व त्यानें अर्पण केलेल्या भेटीचा तिरस्कार त्यानें केला नसता. अशा प्रकारचे झगडे लावणें व हबेलाच्या मृत्यूस कारणीभूत होणें आणि साधारण माणसें एकमेकाशीं जसा व्यवहार करतात तसा व्यवहार करणें इत्यादि गोष्टी ख्रिस्त्यांच्या ईश्वराच्या आहेत. बाग बनविणें, त्यांत येणें जाणें हीं मनुष्याचीं कामें आहेत. यावरून असलें धर्मपुस्तक (बायबल) मनुष्यांनीं रचलेलें आहे, ईश्वरानें नव्हे, हें कळून येतें.

१०—नंतर परमेश्वर काइनला म्हणाला. तुझा भाऊ हबेल कोठें आहे ? तेव्हां तो बोलला मला ठाऊक नाहीं; मी आपल्या भावाचा संभाळणारा आहे काय ? मग तो म्हणाला, त्वां काय केलेंस ? तुझ्या भावाच्या रक्ताची वाणी भूमींतून मला हांक मारिते तर आतां ज्या भूमीनें तुझ्या भावाचें रक्त तुझ्या हातांतून घ्यावयास आपलें तोंड उघडिलें तिचा शाप तुजवर आहे. — उत्पत्ति ४ ओ. ९।१०।११ ॥

**समीक्षक** — काइनाच्या तोंडून ऐकल्याखेरीज सर्वज्ञ ईश्वर हबेलाचें वृत्त जाणूं शकत नव्हता काय ? आणि भूमींतून रक्तवाणीचा शब्द कधींतरी कोणाला हांक मारतो काय ? ह्या सर्व गोष्टी अविद्वानाच्या असल्यामुळें बायबल हें ईश्वरकृत तर नव्हेंच पण विद्वान् मनुष्य--कृतहि नव्हे.

११—आणि मथुशलाहास जन्म दिल्यावर हनोख तीनशें वर्षे देवाच्या संगती चालला. –उ. अ. ४ ओ. २२ ॥

**समीक्षक**— ख्रिस्तांचा ईश्वर मनुष्य नव्हता तर त्याच्याबरोबर हनोख कसा चालूं शकला ? याकरितां जो वेदोक्त निराकार प्रभु परमात्मा आहे त्यालाच ख्रिस्ती लोकांनीं मानावें, यानेंच त्यांचें कल्याण होईल.

१२—आणि असें झालें कीं, मनुष्यें भूमीवर बहुत होऊं लागलीं आणि त्यांस कन्या झाल्या. तेव्हां देवाच्या पुत्रांनीं मनुष्यांच्या कन्यांस पाहिलें कीं, त्या सुंदर आहेत आणि सर्वांतून ज्या त्यांनीं निवडल्या त्या त्यांनी बायका करून घेतल्या. आणि त्या दिवसांत पृथ्वीवर महाकाय होते, आणि देवाचे पुत्र मनुष्यांच्या कन्यापाशीं गेले, आणि त्यांस त्यांपासून पुत्र झाले; पूर्वकालीं जी पराक्रमी व नामांकित मनुष्यें होतीं तीं हींच. परनेश्वराने पाहिलें कीं, पृथ्वीवर मनुष्याची दुष्टाई मोठी आणि त्याच्या हृदयाच्या विचारांतील प्रत्येक भावना सर्वदा केवळ वाईट आहे. तेव्हां परमेश्वरानें मनुष्याला पृथ्वीवर उत्पन्न केलें होतें. यामुळें तो अनुतापला आणि आपल्या अंतःकरणांत खिन्न झाला मग परमेश्वरानें म्हटलें कीं, ज्या मनुष्याला म्यां उत्पन्न केलें त्याला मी भूमीच्या पाठीवरून पुसून टाकीन. मनुष्याबरोबर पशूलाहि आणखी सरपटणारे व आकाशांतील पक्षी यांसहि, कां कीं, त्यांस उत्पन्न केल्यामुळें मला अनुताप झाला आहे.

— उत्पत्ति अ. ६ ओ. १।२।४।५।६ ॥

**समी.** — ख्रिस्त्यांना विचारलें पाहिजे कीं, देवाचे पुत्र, त्याची बायको, त्याची सासू–सासरा मेहुणा व सोयरी–धायरीं कोणकोणतीं आहेत ? कारण देवांचे पुत्र मनुष्यांच्या कन्यापाशीं गेलें आणि त्यांना त्यांच्यापासून पु[illegible] अर्थात् देव मनुष्यजातीचा, या क्रियेनंतर, आजोबा बापांचे बाप-बनलेले आहेत, देव कितीतरी भ[illegible]यशाली सद्‌गृहस्थ आहे ! सर्व जगांत त्याच्या पुत्रप्रपौत्रांची नुसती गर्दी माजून राहिली आहे. वाचकहो ! ईश्वर व त्याचें पवित्र शास्त्र असल्या गोष्टी वर्णन करूं शकत नाहीं ! जुन्या कराराच्या उत्पत्तीचे वेळीं जे जंगली लोक होते त्यांनींच हें पुस्तक बनविलें आहे, हेंच असल्या धर्मपुस्तकावरून सिद्ध होतें. जो सर्वज्ञ नाहीं, ज्याला भविष्यकाळाचें ज्ञान नाहीं तो ईश्वर नसून जीव होय. ज्यानें सृष्टि बनविली त्याला त्या वेळेसच भविष्यकालीं मनुष्यें दुष्ट होतील, [illegible] कळलें नाहीं काय ? योगी व साधारण प्रतीचा विद्वान् मनुष्य देखील शांततावृद्धि व ज्ञानप्रचार पाहून शोक करीत नाहीं, पश्चात्ताप पावत नाहीं, पण ख्रिस्त्यांचा परमेश्वर देव योगी व साधारण विद्वान् मनुष्यापेक्षांहि कमीप्रतीचा असल्यामुळें, त्याने मनुष्याला

पृथ्वीवर उत्पन्न केलें म्हणून त्याला अनुताप झाला व आपल्या अंतःकरणांत खिन्न झाला या मनुष्यांना व त्यांच्या बरोबर निष्पापी पशुपक्ष्यांनाहि भूमीच्या पाठीवरून पुसून टाकण्यासाठीं शाप देता झाला. असला विषाद मानणारा, प्रथम कृत्य करून नंतर तें चुकलें म्हणून पश्चात्ताप करणारा ईश्वर सर्वज्ञ नसून, पापी, हर्षशोकादिकांनीं भरलेला, क्रूर, अज्ञानी तामसी मनोवृत्तीचा बायबलोक्त परमेश्वर देव जो आहे तो व त्याचें धर्मपुस्तक त्याज्य समजून 'सच्चिदानंदस्वरूप' असा, सर्व पापें, क्लेश, दुःख, अज्ञान, यांनीं रहित वेदोक्त परमेश्वर जो आहे तो प्रभु व त्याचे जगदारंभीचें विशुद्ध ज्ञान-वेद हीं जर ख्रिस्त्यांनीं मानलीं असतीं अथवा अद्यापिही ते मानतील तर ते आपला मानव जन्म सफल करूं शकतील.

१३—आणि तारवाची लांबी तीनशें हात, त्याची रुंदी पन्नास हात व त्याची उंची तीस हात याप्रमाणें तें कर. परंतु तुजशीं मी आपला करार स्थापीन आणि तूं तारवांत जाशील, तुझे बरोबर तुझे पुत्र व तुझी बायको व तुझ्या पुत्रांच्या बायका जातील. आणि सर्व प्राण्याच्या प्रत्येक जातींतून जीवंत राखण्यासाठीं दोन दोन तूं आपल्याबरोबर तारवांत घे; तीं नर व मादी असावीं. पक्षांच्या एकेका जातींतून आणि भूमीवरचीं सर्व सरपटणारीं यांच्या एकेका जातींतून म्हणजे सर्वांतून दोन, दोन, त्वां त्यांस जिवंत राखावें म्हणून तुजकडे येतील; आणि सर्व प्रकारच्या अन्नांतून तूं आपणांसाठीं मिळवून आपणापाशीं सांठवून ठेव; ते तुझ्या व त्यांच्या खाण्यासाठीं होईल. तसें नोहानें केलें; देवानें त्याला जें कांहीं आज्ञापिलें त्याप्रमाणें त्यानें केलें. — उ. अ. ६ ओ. १५,१८ ते २२ ।।

**समी.**—असल्या अविद्येनें भरलेल्या असंभव गोष्टी सांगणारा वक्ता परमेश्वर आहे असें कोणीतरी विद्वान् मान्य करू शकेल काय ? कारण एवढ्या मोठ्या लांब रुंद, उंच नावेंत हत्ती-हत्तीण, उंट-उंटीण, आदि क्रोडों जन्तु आणि त्याच्या खाण्यापिण्यासाठीं खाद्यपेयादि पदार्थ व नोहाचें संपूर्ण कुटुंब आणि त्या कुटुंबांतील झाडून सर्व मंडळी इतक्या सर्वांचा समावेश होणें शक्य आहे काय ? याकरितां हें पुस्तक मनुष्यकृत आहे व ज्यानें हा लेख लिहिला तो विद्वान्-देखील नव्हता.

१४—नंतर नोहानें परमेश्वरासाठीं वेदी बांधिली, आणि सर्व शुद्ध पशूंतून व सर्व पक्ष्यांतून कांहीं घेऊन वेदीवर होम केलें. तेव्हां परमेश्वर सुवास घेऊन प्रसन्न झाला, आणि परमेश्वरानें आपल्या मनांत म्हटलें कीं, मनुष्यामुळें मी भूमीला आणखी कधीं शापणार नाहीं; मनुष्याच्या मनांतील सावना त्याच्या बाळपणापासून वाईट आहे; तरी जसें आतां म्यां केले आहे तसें मी फिरून कधीं सर्व जीवांस मारणार नाहीं. —उत्पत्ति अ. ८ ओ. २०।२१ ।।

**समी.**—वेदी बांधणें, होम करणें हे विधि बायबलांत ज्या अर्थीं वर्णिले गेले आहेत त्याअर्थीं ते वेदांतूनच घेतलें आहेत. परमेश्वराला नाक आहे म्हणावयाचे त्याखेरीज तो सुवास घेऊन प्रसन्न झाला नसतां ? ख्रिस्त्यांचा परमेश्वर एखाद्या साधारण मनुष्याप्रमाणेंच मोठा अल्प समाधानी आणि शीघ्र क्रोधी नव्हे काय ? मनुष्याप्रमाणें शीघ्र क्रोधवश होऊन स्वचुकीचा पश्चात्ताप व्यक्त करतो. प्रथम शाप देण्यास तयार होतो, लगेच होमांतील सुगंध नाकांत जातांच प्रसन्न होऊन मी आतां पुनः कधीं शाप देणार नाहीं असें म्हणण्यासहि तयार होतो ! प्रथम सर्वांना मारण्याची खटपट व या ठिकाणीं आतां मी त्यांना मारणार नाहीं अशी त्याची लटपट दिसून येत आहे. एखाद्या विद्वानाची प्रतिज्ञा देखील इतकी चंचल नसते, परतु ख्रिस्त्यांचा परमेश्वर देव हा ईश्वर नसून साधारणसा विद्वान् मनुष्यदेखील नाहीं, तर शुध्द बालिश आहे.

१५—आणि देवानें नोहास व त्याच्या पुत्रांस आशीर्वाद देऊन म्हटलें कीं, सफल व्हा आणि बहुत वाढून पृथ्वी भरा. सर्व सचल जीव तुमचे खाद्य होतील; जशी कोवळी हिरवळ म्यां तुम्हांस दिली तसे अवघे दिले आहे. तथापि ज्यांत जीवन म्हणजे रक्त आहे तें मांस खाऊं नका. उत्पत्ति अ. ९ ओ. १।३।४।।

**समी:**—एकाला प्राणकष्ट देऊन दुसऱ्याला सुखी करावें ह्या कृतीनें ख्रिस्त्यांचा ईश्वर दयाहीन ठरत नाहीं काय? जे आईबाप एका मुलाला मारून दुसऱ्याला पोषितात ते महापापी नव्हेत काय ? ख्रिस्त्यांचा ईश्वर असाच पापी आहे. ईश्वराला तरसर्व प्राणी पुत्रवत् असले पाहिजेत पण असें नाहीं म्हणूनच यांचा ईश्वर कसाईवत् काम करीत असल्यामुळें तो निर्दयी, पापी आहे असेंच नव्हें काय ?

१६—आणि सर्व पृथ्वीवर भाषा एक व बोली एकच होती, आणि ते म्हणलें आपण सर्व पृथ्वीवर पांगूं नये आणि आपलें नांव व्हावें म्हणून नगर व त्याचें शिखर आकाशाला लागेल असा बुरूज बांधू. मग जे नगर व बुरूज मनुष्य—संतान बांधीत होते ते पहावयास परमेश्वर उतरला. मग परमेश्वरानें म्हटलें कीं पहा, लोक एकच आहेत व त्यांची भाषाहि एकच आहे, आणि त्यांच्या करणीचाहि हा केवळ आरंभ आहे, म्हणून ते जें कांहीं योजतील तें केल्यांवांचून राहणार नाहींत. चला आपण उतरूं आणि त्यांनीं एकमेकांची भाषा समजूं नये म्हणून तेथें त्यांच्या भाषेचा गोंधळ करूं. परमेश्वरानें त्यांस तेथून सर्व पृथ्वीच्या पाठीवर विखरिलें आणि त्यांनीं नगर बांधण्याचें सोडलें.

—उत्पत्ति अ. ११ ओ. १-४-५-६-७-८ ॥

**समी:**—जेव्हां सर्व पृथ्वीवर एकच भाषा व एकच बोली होती तेव्हां संपूर्ण मनुष्यजातीमध्यें अत्यंत प्रेम आनन्द ही खरोखरच वसत असतील, परंतु त्या प्रेमाचा व आनंदाचा विरस ख्रिस्त्यांच्या मत्सरी ईश्वरानें केला ! त्याला हें न पाहवल्यामुळें त्यानें त्यांच्या एक भाषेचा गोंधळ केला आणि सर्वांचा सत्यानाश केला ! ख्रिस्ती ईश्वरानें खरोखर हा मोठा अपराध केला ! हें ईश्वरी कृत्य सैतानाच्या कामापेक्षां नीचपणाचें होय ! यावरून हेंहि विदित होतें कीं, हा परमेश्वर देव सनाई पर्वतावर राहात होता व त्याला जीवांची उन्नति असह्य होत होती ! असली वृत्ति अविद्वानाखेरीज कोणाची असेल ! या कृतीवरून ख्रिस्त्यांचा देव हा ईश्वर आहे व त्याचें धर्मपुस्तक बायबल हें ईश्वरोक्त आहे असें म्हणणें शक्य कसें होईल ?

१७—आणि असें झालें कीं, मिसराच्या जवळ जाऊन पोहोंचल्यावर तो आपली बायको साराय इला म्हणाला, अगे पाहा, तूं सुंदर रूपाची स्त्री आहेस, हें मला ठाऊक आहे. तर असें होइल कीं जेव्हां मिसरी तुला पहातील तेव्हां ते म्हणतील, ही याची बायको आहे; मग ते माझा जीव घेतील आणि तुला वांचवितील. तर मी याची बहीण आहे असें सांग, म्हणजे तुझ्याकडून माझें बरें होईल, आणि तुझमुळें माझा जीव वाचेल. —उ. अ. १२ ओ. ११।१२।१३।।

**समी:**—पहा, जो आब्राहाम मोठ्यांत मोठा पैगंबर झाला असें ख्रिश्चन व मुसलमान गर्जना करून त्याचें ढोलकें बडवितात तो व त्याचें कर्म किती मिथ्या भाषणादि दोषांनीं भरलेलें आहे. ज्यांचे असले पैगंबर आहेत त्यांना विद्या व कल्याणाचा मार्ग कसा सांपडणार बरें ?

१८—आणि देवानें अब्राहामास सांगितलें कीं, माझा करार पाळ; तूं आणि तुझ्यामागें तुझें संतान पिढ्यान पिढ्या पाळो, मजशीं व तुजशीं व तुझ्यानंतर तुझ्या संतानाशीं जो माझा करार तुम्हीं पाळावा तो हाच कीं, तुम्हांमधील प्रत्येक पुरुषाची सुंता व्हावी. तुम्ही आपली अग्रत्वचा कापून टाका; ही मजमध्यें व तुमच्यामध्यें कराराची खूण होईल, म्हणजे तुमच्या पिढी दर पिढी आठ दिवसांचें तुमचें प्रत्येक घरांत जन्मलेलें पुरुष–संतान याची आणि जो तुझ्या संतानातील नव्हे, तर कोणत्याही परक्या लोकांपासून पैक्यानें विकत घेतलेला त्याची सुंता व्हावी; म्हणजे माझा करार तुमच्या देहांत सर्व कालाचा करार होईल. आणि बेसुंती पुरुष-संतान ज्याची सुंता झाली नाहीं तो प्राणी आपल्या लोकांतून छेदलाच जाईल; त्यानें माझा करार मोडला आहे —उतपत्ति अ. १७ ओ. ९-१०-११-१२-१३-१४.

**समीक्षक:**—आतां पहा, ईश्वरानें दिलेली अ यथा विचित्र आज्ञा. मनुष्याशीं त्याला सुंतेद्वारें करार करावयाचा होता तर जन्मतःच त्यानें इंद्रियावरील अग्रत्वचा उत्पन्न केली नसती. जी अग्रत्वचा त्यानें उत्पन्न केली आहे ती इंद्रिय रक्षणार्थ मोठ्या कुशलतेनें केलेली आहे. ज्याप्रमाणें नेत्रावरील त्वचा नयनसंरक्षणार्थ आहे त्याप्रमाणेंच ही अग्रत्वचा होय. ती जर नसती तर मुंगीच्या चावण्यानें किंवा थोडीशीं इजा होण्यानें पुष्कळ दुःख झालें असतें, शिवाय लघुशंकेनंतर मूत्राचे थेंब वस्त्रांना लागूं नयेत इत्यादिकाकरितां ती अग्रत्वचा न कापणें अर्थात् सुन्ता न करणें योग्य असून सुन्ता करणें वाईट होय. जर हा ईश्वरी करार होता तर ख्रिस्ती लोकांनीं तो कां मोडला ? ते आपली सुन्ता कां करून घेत नाहींत ? पवित्र शास्त्रांतील एक शब्द देखील व्यर्थ नाहीं अशी येशू ख्रिस्तानें प्रतिज्ञा केली आहे, येशूची ही प्रतिज्ञा खोटी कीं खरी ह्याचा पूर्ण विचार ख्रिस्ती लोक मुळींच करीत नाहींत.

१९—नंतर देव अब्राहामाशीं बोलणें संपवून त्यापासून वर गेला. —उत्पति अ. १७ ओ. २२

**समीक्षक**:—यावरून सिद्ध होतें कीं, ख्रिस्त्यांचा देव मनुष्य किंवा पक्षी होता; कारण तो पक्ष्यासारखा वरून खालीं व खालून वर येत जात होता. हा कोणी इंद्रजाल रचणारा पुरुष दिसतो.

२०—आणि परमेश्वरानें मम्रे वनांत त्याला दर्शन दिलें तेव्हां तो दुपारीं उन्हाचे वेळेस डेऱ्याच्या दाराशीं बसला होता. आणि तो आपली दृष्टि वर करून पाहतो तों तीन पुरुष त्याजवळ उभे आहेत, आणि त्यानें पाहून त्यांस भेटावयास डेऱ्याच्या दारापासून धांवत जाऊन भूमीपर्यन्त नमन केलें, आणि म्हणाला, माझ्या प्रभू, तुमच्या दृष्टींत मी कृपा पावलों तर आपल्या दासाजवळून जाऊं नका. थोडें पाणी आणूं द्या, आणि तुम्ही आपले पाय धुवून, झाडाखालीं विसावा घ्या. मी थोडी भाकर आणीन आणि तुम्ही आपल्या जीवास आधार करा मग पुढें जा; कां तर याकरितांच तुम्ही आपल्या दासाजवळ आलां आहां; तेव्हां ते म्हणाले, तूं बोलतोस तसें कर. मग अब्राहाम डेऱ्यांत सारेकडे धांवत जाऊन म्हणाला, तीन माप सपीठ लवकर तयार कर व तें मळून पोळया कर. आणि अब्रहामाने गुरांकडे धांवत जाऊन चांगलें कोंवळें वासरूं घेऊन चाकराच्या हातीं दिलें, मग त्यानें तें तयार करावयास त्वरा केली, नंतर त्यानें लोणी व दूध व तयार केलेलें वासरूं हीं आणून त्यापुढें ठेवलीं; आणि ते जेवीत असतां तो त्यांजवळ झाडाखालीं उभा होता.
उत्पत्ति अ. १८ ओ. १-२-३-४-५-६-७-८.

**समीक्षक**:—सज्जनहो ! लक्षांत ठेवा, ज्यांचा परमेश्वर कोंवळें वासरूं मिटक्या मारून खातो त्याचे उपासक गाय वांसरें आदिपशूंना गटागट कां खाणार नाहींत ? ज्याला दयामाया बिलकूल नाहीं, जो मांस खाण्यास इतका आतुर असतो, तो हिंसक मनुष्यपेक्षां कोणी अन्य असूं शकेल काय ? ईश्वराबरोबर आणखी दुसरीं दोन माणसें कोण होतीं ? ही टोळी जंगली मनुष्यांची होती व त्यांचा जो पुढारी होता त्याचें नांव बायबलांत परमेश्वर देव ठेवलेलें असावें असें यावरून कळून येतें. या गोष्टीमुळेंच बायबल ईश्वरकृत आहे व बायबलोक्त देव ईश्वर आहे असें बुद्धिमान् लोक मानीत नाहीत.

२१—तेव्हां परमेश्वर आब्राहामाला, म्हणाला, सारा हांसून कां म्हणाली, मी म्हातारी असतां निश्चयें प्रसवेन काय ? परमेश्वराला कोणतीहि गोष्ट असाध्य आहे काय ? —उत्पत्ति अ. १८ ओ. १३-१४.

**समीक्षक**:—पहा, ख्रिस्त्यांचा ईश्वर कसा बायकाप्रमाणें व मुलाप्रमाणें चिडतो व ताना मारतो त्या.

२२—तेव्हां परमेश्वरानें सदोम व गमोरा यांवर गंधक व अग्नि आकाशांतून वर्षिला. आणि नगरें व अवघें मैदान आणि नगरांतील सर्व राहणारे व भूमींतून उगवलेलें यांचा नाश केला. —उ. अ. १९ ओ. २४-२५

**समीक्षक**:—ही पण बायबलोक्त ईश्वरलीला ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.सबंध शहरें जाळून त्यानें भस्म केली परंतु निरुपद्रवी व निष्पापी अशा बालकांचीहि त्याला यत्किंचित् कांहीं दयामाया आली नाहीं ! लहान मोठे सर्व अपराधीच होते काय ? म्हणून त्यांना जमिनींत गाडून टाकलें ? हा प्रकार न्याय, दया व विवेक इत्यादिकांच्या विरुद्ध आहे. ज्यांचा ईश्वर असली कामें करतो त्याचे भक्त मग अशीं कृत्यें कां करणार नाहींत?

२३—चल, आपण आपल्या बापाला द्राक्षारस पाजूं आणि त्यापाशीं निजूं आणि आपल्या बापापासून संतान राखूं; तर त्या रात्रीं त्यांनीं आपल्या बापाला द्राक्षारस पाजला, मग वडील जाऊन आपल्या बापापाशीं निजली. मग असें झालें कीं, दुसऱ्या दिवशीं वडील धाकटीस म्हणाली, पहा, काल रात्रीं मी आपल्या बापापाशीं निजलें. या रात्रींहि आपण त्याला द्राक्षारस पाजूं आणि तूं जाऊन त्यापाशीं नीज. तशा लोटाच्या दोघी कन्या आपल्या बापापासून गरोदर झाल्या —उ. अ. १९ औ. ३२ ते ३४. ३६

**समीक्षक**:—अहाहा ! पिता कन्या ज्या मद्यपानाच्या निशेंत असलें कुकर्म करूं शकतात तें दुष्ट मद्यपान ख्रिस्ती लोक करितात तेव्हां त्यांच्या कुकर्मांना काय पारावर राहत असेल ? करितां सज्जनहो मद्यपानाचें नांव देखील घेऊं नका.

२४—आणि परमेश्वरानें सांगितल्याप्रमाणे सारेची भेट घेतली आणि परमेश्वरानें वचन दिलें होतें तसें सारेला केलें. म्हणजे सारा गदोदर होऊन जो काळ देवानें अब्राहामाला सांगितला होता त्यांत ती त्याच्या म्हातारपणीं पुत्र प्रसवली.
—उत्पत्ति अ. २१ ओ. १।२।।

**समीक्षक**:–आतां विचार करा, सारेची भेट घेऊन ती गरोदर झाली हें कसें घडलें ? सारा व परमेश्वर या तिसरा कोणी गर्भस्थापनेला कारणीभूत दिसतो आहे ? सारा ईश्वरापासून गरोदर राहिली हें स्पष्ट आहे.

२५—नंतर अब्राहामानें पहांटेस उठून भाकरी व पाण्याची पखाल घेतली आणि हागारेला देऊन तिच्या खांद्याव ठेविली, आणि लेंकरूं देऊन तिला रवाना केलें; तेव्हां ती निघून बैरशेबा रानामध्यें फिरत गेली. तिनें लेंकरूं झुडपाखालीं टाकलें. व समोर बसून हांक फोडून रडूं लागली आणि देवानें मुलाचा शब्द ऐकला आहे.

—उत्पत्ति अ. २१ ओ. १४,१५,१६,१७

**समीक्षक**:—आतां ईश्वराची अजब श्रवणशक्ति व चमत्कार पहा, सारेचा पक्षपात करून हागारेला तेथून काढले. ती हांका मारून रडूं लागली, पण देवांनीं शब्द ऐकला मुलाचा कसा अद्‌भूत प्रकार आहे ? ईश्वराचें चित्त ठिकाणावर नसेल ? *असलें पुस्तक व त्यांतील गोष्टी ईश्वरीय होऊं शकतील काय ? साधारण मनुष्यांना शोभतील अशा* **गोष्टीच यांत भरपूर आहेत, व सत्यांश तर फारच थोडा ह्या पुस्तकांत भरलेला आहे.**

२६— या गोष्टीनंतर असें झालें कीं, देवानें अब्राहामाची परीक्षा पाहिली आणि त्याला म्हटलें कीं हे अब्राहामा, अब्राहाम म्हणाला, आज्ञा प्रभू आणि त्यानें म्हटलें तूं आपला एकुलता एक इसाक ज्यावर तूं प्रीति करितोस त्याला घेऊन मोरिया देशांत जा, आणि तेथील डोंगरावर एक जो तुला सांगेन त्यावर त्याचा होम कर. (याप्रमाणें अब्राहामानें सर्व करून) आपला पुत्र वधावयासाठीं हात लांबवून सुरा घेतला तेव्हां परमेश्वराचा दूत आकाशांतून त्याला हांक मारून म्हणाला, तूं मुलावर आपला हात टाकूं नको. आतां मला दिसून आलें कीं, तूं देवाला भितोस.

—उतपत्ति अ. २२ ओ. १,२,१० ते १२

**समीक्षक**:—आतां स्पष्ट झालें कीं; तो बायबलांतील ईश्वर अल्पज्ञ आहे व अब्राहाम हा एक भोळाभाबडा मनुष्य होता. एरवीं दोघांनीं असल्या चेष्टा केल्या नसत्या ! ख्रिस्त्यांचा ईश्वर सर्वज्ञ असतां मुलाच्या मानेवर सुरी ठेवण्याच्याच अगोदर अब्राहामाचें अंतःकरणपरीक्षण त्यानें केलें असतें ! असला ईश्वर सर्वज्ञ नसून अल्पज्ञ आहे.

२७—महाराज, आमचें ऐक, आम्हांमध्यें तूं देवाचा सरदार आहेस, आमच्या प्रेतस्थानांतील जी कबर तुला आवडेल तींत तूं आपल्या मृताला पूर. —उ. अ. २३ ओ. ६

**समीक्षक**:—प्रेतें पुरण्यानें जगाचें फार नुकसान होतें कारण तीं सडून त्यांच्या दुर्गंधानें रोगांची वाढ होते. **(प्रश्न)** पहा, ज्यावर आपण प्रेम करतो त्याला आपण जाळणें हें योग्य नाहीं आणि तें पुरणें म्हणजे जणूं काय त्याला निजविणें होय म्हणून प्रेतें पुरणेंच योग्य होय. **(उत्तर)** जर प्रेतांवर तुमचें प्रेम आहे तर तीं आपल्या घरांत कां ठेवून घेत नाहीं ? पुरता तरीं कशाला ? ज्या जीवात्म्यावर आमचें प्रेम होतें तो जीवात्मा त्या देहांतून निघून गेला आतां दुर्गन्धमय माती शिल्लक आहे तिजवर प्रेम कसलें व तिचें ममत्व कशाकरितां ? तुमची प्रीति जर त्याजवर आहे तर त्याला जमिनींत गाडणें हें प्रीतीचें लक्षण काय ? कारण जर एखादा गृहस्थ एखाद्याला म्हणाला कीं, मित्रा माझें तुजवर प्रेम आहे मी तुला जमिनींत गाडूं इच्छितों, तुझ्या मुखावर व शरीरावर धूळ, दगड–धोंडे, विटा टाकतों, तुझ्या छातीवार भली मोठी पाषाणशिळा ठेवतों तर त्या मित्राचा चेहरा हें ऐकून प्रसन्न होईल काय ? कधींच नाहीं. म्हणून प्रेतें पुरणें हें प्रेमाचें लक्षण नव्हें व पेटींत घालून ती पुरण्यामुळें फार दुर्गंध उत्पन्न होऊन तो भूमींतून वर येतो व संपूर्ण शुद्ध हवेची खराबी करून रोगोत्पत्ति करतो. दुसरी गोष्ट एका प्रेताला कमींत कमी ६ हात लांब व ४ हात रुंद जागा पाहिजे. ह्या हिशोबानें शेकडों, हजारों, लाखों व क्रोडों मनुष्यासाठीं किती मोठ्या जागेचा व्यर्थ व्यय होणार आहे तो वांचेल. ती जागा शेताच्या बागबगीचाच्या, वसाहतीच्या वगैरे कोणत्याच लोकोपयोगी कामास येत नाहीं. प्रेतें पुरणें हें सर्वांत वाईट होय. त्यापेक्षां ती पाण्यांत टाकणें हें कांहींसें बरें पण त्यांतील हाडें वा मल हा पाण्यांत राहीलच व तो सडला म्हणजे तेंहि दुःखदायक होईल, बरें जंगलामध्यें तीं सोडून दिलीं तर त्यास मांसाहारी पशुपक्षी खाऊन टाकतील तथापि त्यांच्या हाडांतील मज्जा व मल हा सडून दुर्गंध उत्पन्न झाला म्हणजे तेवढ्या अंशानें तरी लोकांना तें अपायकारकच आहे. या सर्वांपेक्षां त्यांतल्या त्यांत प्रेतें जाळणें हेंच बरें, कारण प्रेताचा प्रत्येक कण अणुवत् बनून तो

ीब वायुमध्यें उडून जाईल. (प्रश्न) जाळलीं तरी दुर्गंध उत्पन्न होतोच. (उत्तर) जर कसें तरी जाळलें तर ..ा उत्पन्न होईल परंतु पुरणें वगैरे पेक्षां पुष्कळ कमी प्रमाणांत उत्पन्न होतो, परंतु विधिपूर्वक प्रेताचें भस्म केल्यास .डासा देखील दुर्गंध उत्पन्न होणार नाहीं. वेदामध्यें तो विधि पुढीलप्रमाणें सांगितला आहे. प्रेताच्या तीन हात खोल, साडेतीन हात रुंद, पांच हात लांब, तळीं दीड वीत अर्थात् चढ उतार वेदी खोदून शरीराचे वजनाबरोबर तूपामध्यें एक शेरी रतीभर कस्तुरी, एक मासाभर केशर घालून कमींत कमी अर्धा मण चंदन-वा त्याहून अधिकहि असल्यास तें घ्यावें व त्यांबरोबर अगर, तगर, कापूर, आदि व पळस वगैरेचीं लांकडें घेऊन त्याची वेदी वर सांगितल्या-प्रमाणें रचावी व त्यावर प्रेत ठेवून त्यावर एक वितीइतकी लांकडें चोंहोंकडे रचून तुपाच्या आहुती द्याव्यात. अशा रीतीनें प्रेताचा अग्निसंस्कार करावा.

ह्याप्रमाणें प्रेत दहनविधि केल्यास कांहींच दुर्गंध होत नाहीं. या संस्कारालाच शास्त्रांत अन्त्येष्टि, नरमेध, पुरुष-मेघ असें म्हणतात. गरीबांस वीस शेर तूप चीतेमध्यें घालतां आलें नाहीं तर इतर आप्तेष्टांनीं स्व-जातीयाकडून भीक मागून तें मिळवावें अथवा राज्यातर्फे मिळवावें. परंतु या विधीनें दहन करावें आणि कोणत्याहि प्रकारें तूप मिळत नसल्यास तसेंच जाळावें. पुरण्यापेक्षां जाळणें उत्तम होय. कारण एक विश्वाभर भूमींत अथवा एका-वेदी इतक्या जागेंत लाखों क्रोडों प्रेतें जळू शकतात. भूमीहि प्रेतें पुरण्यानें जशी खराब होतें तशी होत नाहीं. शिवाय कबरी, थडगी पाहून भयही उत्पन्न होतें अर्थात भित्र्या लोकांस तेंहि होणार नाहीं म्हणून प्रेतें पुरणें हें सर्वथा निषिद्ध होय.

२८—आणि म्हटलें, माझ्या धन्याचा अब्राहम यांचा देव परमेश्वर यांची स्तुति असो; त्यानें माझ्या धन्याशीं दयेनें व सत्यतेनें वर्तणें सोडिले नाहीं; मी वाटेंत असतां परमेश्वरानें मला माझ्या धन्याच्या भावाच्या घरीं आणलें.

—उत्पत्ति अ. २४ ओ. २७ ।।

**समीक्षकः**—काय तो अब्राहामाचाच ईश्वर होता ? ज्याप्रमाणें आजकल बिगारी किंवा वाटाडे लोक मार्ग दाख-वितात त्याप्रमाणें ईश्वर बिगारी किंवा वाटाड्या होऊन त्याच्या पुढें पुढें जर चालला असेल तर सध्यां तो मार्ग कां दाखवीत नाहीं ? व मनुष्यापाशीं गप्पा-गोष्टी कां करीत नाहीं ? जंगली मनुष्याखेरीज असल्या गोष्टी असला ईश्वर व असलें धर्म-पुस्तक कोण मानील ?

२९—इस्माएलाच्या पुत्रांचीं नांवें त्यांच्या त्यांच्या वंशाप्रमाणें अशीं आहेत; एस्माएलाचा ज्येष्ठ पुत्र नबायोथ आणि कीदर, अदबैल, मिबसाम, मिम्मा, दुमा, मस्सा, हदर, थेमा, यटूर, नाफीश व केदमा.

—उत्पत्ति अ. २४ ओ. १३।१४।१५।।

**समीः**—हा इस्माएल अब्राहामाला त्याच्या स्वपत्नीपासून झाला नव्हता तर त्याची दासी हाजिरा हिजपासून झाला होता. म्हणजे दासी पुत्र इस्माएल व त्याच्या पुत्रांचीं हीं नांवें व त्यांच्या वंशावळी आहेत.

३०—आतां तूं कळपाकडे जाऊन त्यांतून शेळयांची दोन चांगलीं करडें मजकडे आण, म्हणजे मी तुझ्या बापा साठीं त्याला आवडतें असें रुचिकर अन्न तयार करीन. मग तूं तें आपल्या बापाला नेऊन दे, म्हणजे तो खाईल आणि तो आपल्या मरणापूर्वीं तुला आशीर्वाद देईल. मग रिबकेनें आपला वडील पुत्र एसाब व त्याची जीं ऊंचीं वस्त्रें तिच्याजवळ होतीं तीं घेऊन आपला धाकटा पुत्र याकोब याच्या अंगांत घातलीं. आणि त्याच्या हातांत व त्याच्या मानेच्या गुळगुळीत ठिकाणीं तिनें शेळयांच्या करडांचीं कातडी लावलीं, आणि याकोबानें आपल्या बापाला म्हटलें, मी तुझा वडील पुत्र एसाब आहे. तुझ्या सांगण्याप्रमाणें मीं केलें आहे; कृपा करुन उठून बैस व माझी पारध खा, म्हणजे तुझा आत्मा मला आशीर्वाद देईल. —उत्पत्ति अ. २७ ओ. ९-१०-१५-१६-१९

**समीक्षकः**—पहा, अशा लबाडीनें व कपटानें आशीर्वाद मिळवून नन्तर सिद्ध व पैगंबर बनतात ही आश्च-र्याची गोष्ट नव्हे काय ? असे ख्रिस्त्यांचे पूर्वज झालेले आहेत मग यांच्या मतांतील विचित्र गोष्टींना काय कमी आहे काय ?

३१— आणि याकोबा पहाटेस उठून जो धोंडा त्यानें आपल्या उशास घेतला होता तो त्यानें घेऊन स्तंभ असा

करून ठेविला व त्याच्या माथ्यावर तेल घातलें; आणि त्या ठिकाणाचें नांव बेथेल ठेविलें पण पहिल्यानें तेथील नगराचें नांव लूज होतें. आणि हा जो धोंडा म्यां स्तंभ असा करुन ठेविला आहे तो देवाचें घर होईल.

—उत्पति अ. २८ ओ. १८,१९,२२।।

**समी**:—हें जंगली लोकांचें काम पहा ! यांनीं दगड-धोंडे पुजिले व पुजविले. यानांच मुसल्मान लोक 'बयतलमुकद्दस' म्हणतात. तो दगड हेंच ईश्वराचें घर व त्या पत्थरमात्रामध्येंच ईश्वर राहात होता. वाह वाह ! काय सांगावें ? ख्रिस्त्यांनों ! मोठे मूर्तिपूजक तर तुम्हीच आहां.

३२—आणि देवानें राहेलेची आठवण केली आणि देवानें तिचे ऐकून तिची कुस वाहती केली. मग ती गरोदर होऊन पुत्र प्रसवली आणि म्हणाली, देवानें माझा अपमान दूर केला आहे. —उत्पति अ. ३० ओ.२२,२३।।

**समी**:—वाहरे ख्रिस्त्यांचा देव मोठा डाक्टर दिसतो ! स्त्रियांची कूस वाहती करण्यास कोणतें शस्त्र वा औषध त्याजजवळ होतें बरें ? कीं ज्या शस्त्रानें स्त्रियांची कूस वाहती झाली ? या सर्व अंधाधुन्दीच्या गोष्टी होत.

३३—आणि देवानें अरामी लाबान याजवळ रात्रीं स्वप्रांन्त येऊन त्याला म्हटलें त्यां याकोबाशीं बरें वाईट बोलूं नये, म्हणून सांभाळ. आणि आतां तूं जायाला पाहतोस, कां कीं, त्वां आपल्या बापाच्या घराची उत्कण्ठा धरिली आहे. परंतु त्वां माझे देव कां चोरले ? —उत्पति अ. ३१ ओ. २४,३०।।

**समी**:—येथें आम्ही हा नुसता नमुना दाखवीत आहों कीं, बायबलामध्यें हजारो मनुष्यांच्या स्वप्रांन्त ईश्वर आला, गोष्टी केल्या, साक्षात् जागृत झाला, खाल्लें, प्याला आला, गेला परंतु आतां कोण जाणें तो आहे कां नाहीं तें ? कारण आतां कोणाच्या स्वप्रांन्त येत नाहीं मग जागृतावस्थेंतील तर प्रश्न दूरच राहिला. वरील ३० व्या ओवीवरून सप्रमाण सिद्ध झालें कीं, हे जंगली लोक पाषाणादि मूर्तींना देव मानून पूजीत होते, इतकेंच नव्हें तर, प्रत्यक्ष ख्रिस्त्यांचा आकाशांतील बाप जो ईश्वर तो देखील दगडालाच देव समजत होता ! असें नसतें तर तूं माझे देव कां चोरलेस असें त्यानें म्हटलें नसतें. निराकार देवाचीं चोरी कशी कोण करणार ?

३४— याकोबहि आपल्या वाटेनें गेला, आणि जातांना देवाचे दूत त्याला भेटले. तेव्हां याकोब त्यांस पाहून म्हणाला, हें देवाचें सैन्य, म्हणून त्यानें त्या ठिकाणाचें नांव महनाइम ठेविलें. —उत्पत्ति अ. ३२ ओ. १-२ ।।

**समीक्षक**:—ख्रिस्त्यांचा ईश्वर मनुष्य आहे हें निश्चितपणें समजण्यास कांहीं हरकत राहिली नाहीं कारण तो सैन्य राखतो व सैन्य असल्यावर शस्त्रें असतील व जेथें तेथें लढाया करीत असेल नाहीं ? नाहीं तर सैन्य बाळगण्याचें प्रयोजन काय ?

३५—मग याकोब एकला राहिला आणि पहाट होईपर्यंत कोणी त्याशीं झोंबी केली आणि त्याला जिंकलें नाहीं असें पाहून तो त्याच्या मांडीच्या खोलग्याला शिवला; आणि याकोब त्याशीं झोंबी करीत असतां त्याच्या मांडीचा खोलगा उखळला मग तो म्हणाला पहाट झाली, तर मला जाऊं दे; पण हा म्हणाला, मला आशीर्वाद दिल्यावाचून मी तुला जाऊं देणार नाहीं. मग तो याला म्हणाला, तुझें नांव काय ? तेव्हां यानें म्हटलें, याकोब तेव्हां तो बोलला, तुझें नांव यापुढें याकोब म्हणणार नाहींत, तर इस्राएल म्हणतील; कां कीं, तूं देवाशीं आणि माणसाशीं पराक्रम करुन जय पावलास, मग याकोबानें विचारलें, कृपा करुन आपलें नांव सांग; तेव्हां तो म्हणाला, माझें नांव कां पुसतोस ? आणि त्यानें तेथें त्याला आशीर्वाद दिला आणि देवाला समक्ष पाहिलें असतां माझा प्राण वांचला, असें म्हणून याकोबानें त्या ठिकाणचें नांव पनुएल ठेवलें. मग पनुएलाच्या पलीकडे जातांना त्याला सूर्य उगवला, आणि तो आपल्या मांडीत लंगडत चालला. याकरितां मांडीच्या खोलग्यांतील जी घोंडशीर ती इस्राएल लोक आजपर्यंत खात नाहींत; कां कीं, याकोबाच्या मांडीच्या खोलग्यांतल्या घोंडशिरेला तो शिवला. —उत्पत्ति अ. ३२ओ. २४ ते ३२।।

**समीक्षक**:—ख्रिस्त्यांचा ईश्वर असा 'अखाडमल्ल' आहे म्हणूनच तर सारा व राहेला यांना पुत्रवती बनविण्याची त्यानें कृपा केली ! असला कधीं ईश्वर होऊं शकणें शक्य आहे काय ? आणखी असें पहा कीं, याकोब त्याला आपलें नांव विचारतां तर तें देखील तो सांगत नाहीं. ही विचित्र लीला नव्हे काय ? ईश्वरानें त्याची शिर चढविली व कुस्तीत अजिक्य झाला परंतु जर तो डॉक्टर होता तर मांडीची जखम व शिर बरी करतां. ख्रिस्त्यांच्या ईश्वराचा मित्र

व खेळगडी जो याकोब तो लंगडत राहिला तर मग अशा ईश्वराचे अनन्यभक्तहि लंगडत असतील. देवाला याकोबान समक्ष पाहिलें म्हणून त्याचा प्राण वांचला असें याकोब म्हणतो व देवाशीं झोंबीहि केली ह्या गोष्टी साकार व शरीरधारी ईश्वराखेरीज कशा होऊं शकतात ? ही ईश्वरी लीला नसून शुद्ध पोरकट पोरचेष्टा होत.

३६— आणि यहूदाचा वडील पुत्र एर परमेश्वराच्या दृष्टींत दुष्ट होता, म्हणून परमेश्वरानें त्याला जिवें मारलें मग यहूदानें ओनानाला सांगितलें, तूं आपल्या भावजयीपाशीं जा, म्हणजे तिजशीं लग्न करुन आपल्या भावासाठीं संतान उत्पन्न कर तेव्हां ओनान समजला कीं, संतान आपलें होणार नाहीं; मग तो आपल्या भावजयीपाशीं गेला, तेव्हां असें झालें कीं, त्यानें आपल्या भावाला बीज देऊं नये म्हणून, भूमीवर तें नासविलें तेव्हां त्यानें जें केलें तें परमेश्वराच्या दिसण्यांत वाईट होतें म्हणून त्यानें त्यालाहि जिवें मारलें. —उत्पत्ति अ. ३८ ओ. ७।८।९।१०।।

**समीक्षक**:—वाचकहो ! हीं कामें मनुष्याचीं आहेत कीं ईश्वराचीं; हें आतां तुम्हींच पाहून घ्या जर ईश्वराज्ञेप्रमाणें ओनानानें आपल्या भाजयीशीं 'नियोग' केला तर त्याला कां जिवें मारिलें ? त्याला सुबुद्धि ईश्वरानें कां दिली नाहीं ? वेदोक्त नियोग पद्धति प्रारंभीं सर्वत्र आस्तित्वांत होती हेंहि निश्चित झालें. नियोग रीति सर्व देशांत एक काळीं रूढ होती.

## जुना करार ' निर्गम ' चें पुस्तक.

३७—आणि असें झालें कीं, त्या दिवसामध्यें मोशे प्रौढ झाल्यावर आपल्या भाऊबन्दाकडे गेला; तेव्हां त्यानें त्यांची कष्टाचीं कामें पाहिलीं आणि मिसरी मनुप्यास आपल्या भाऊबंदांतील एका इब्री मनुष्याला मारतांना पाहिलें. आणि त्यानें इकडे तिकडे न्याहाळून कोणी नाहीं, असे पाहून त्यानें त्या मिसऱ्याला जिवें मारिलें, आणि त्याला वाळूंत लपविलें मग दुसऱ्या दिवशीं तो बाहेर गेला, तेव्हां पहा, दोन इब्री मनुष्य भांडत होते, आणि तो त्यांतल्या अपराध्याला बोलला, तूं आपल्या शेजाऱ्याला कां मारतोस ? तेव्हां हा बोलला तुला आम्हांवर नायक व न्यायाधीश कोणी नेमिलें ? जसें त्वां मिसऱ्याला जिवें मारिलें तसें तूं मला जिवें मारावयास पहातोस काय ? तेव्हां मोशे भिऊन म्हणाला, खचीत ही गोष्ट कळली आहे. —निर्गम अ. २ ओ.: ११ ते १५।।

**समीक्षक**:—आतां बायबलाचा मुख्य सिद्धकर्ता व त्या मताचा आचार्य मोशे याचें चरित्र पहा ! : मोशे हा क्रोधादि दुर्गुणांनीं युक्त, मनुष्यहत्या करणारा, चोराप्रमाणें राजदंडाचे भय बाळगणारा, केलेलें कृत्य छपवूं पाहणारा अर्थात् खोटें बोलूं पाहणारा, पण तो देखील ईश्वर प्राप्ति करूं शकतो ! तो पैगंबर झाला, त्यानें यहूदी आदि धर्मप्रचलित केला व तो धर्महि मोश्याप्रमाणेंच झाला ! म्हणूनच ख्रिस्त्यांचे मोश्यापर्यंत जे मूळ पुरुष झाले ते सर्व विद्यासंपन्ना—वस्थेंत नव्हें, तर अज्ञानी जंगली होते.

३८—मग मोश्यानें इस्राएलाच्या सर्व वडिलास बोलवून सांगितलें तुम्ही आपआपल्या कुटुंबाप्रमाणें मेंढरूं काढून घ्या आणि वल्हांडण सणासाठीं कापा. आणि जुफ झाडाची जुडी घेऊन पात्रांतल्या रक्तांत बुचकळून पात्रांतलें रक्त दाराच्या कपाळपट्टीवर व दोन बाह्यांवर लावा आणि सकाळपर्यंत तुम्हांतील कोणी आपल्या घराच्या दाराबहेर जाऊं नये कां कीं, मिसऱ्यांस पीडा करावयास परमेश्वर फिरतो आणि कपाळपट्टीवर व दोन्ही बाह्यांवर रक्त तो पाहील तेव्हां परमेश्वर दारावरुन जाईल, आणि नाश करणाऱ्याला पीडा करावयास तुमच्या घरांत जाऊं देणार नाहीं.

—निर्गम अ. १२ ओ. २१ ते २३।।

**समीक्षक**:—जादुटोणे करणारा ईश्वर सर्वज्ञ कधींतरीं होऊं शकेल काय ? रक्ताचा टिळा दाराच्या कपाळपट्टीवर पाहिल्यानन्तर त्याला इस्राएलाच्या लोकांचें घर ओळखूं यावें अन्यथा नाहीं. असल्या घाणेरड्या गोष्टी जंगली लोकांनींच लिहून ठेवलेल्या आहेत हें स्पष्ट आहे. ईश्वर हा क्षुद्र बुद्धीच्या मनुष्याप्रमाणें कसा असेल ?

३९— मग असें झालें कीं, मध्यरात्रीं परमेश्वरानें मिसर देशांतील सर्व जेष्ठ पुत्र जिवें मारलें. आपल्या राजासनावर बसणारा फारो याच्या ज्येष्ठ पुत्रापासून बन्दिशाळेंत जो कैदी होता त्याच्या ज्येष्ठ पुत्रापर्यंत, आणि पशूंचें प्रत्येक प्रथम वत्स जिवें मारिलें. तेव्हां फारो व त्यांचे सर्व दास व सर्व मिसरी रात्रीं उठले आणि मिसर देशांमध्यें मोठा आकांत झाला, कां कीं, ज्यांत कोणी मेला हीं असें घर नव्हतें. निर्गम अ. १२ ओ. २९।३०।।

**समीक्षक:**—ऐन मध्यरात्रीं अट्टल चोराप्रमाणें ख्रिस्त्यांच्या ईश्वरानें निर्दयी बनून मनुष्यांचे सर्व वडील पुत्र व पशूचीं सर्व पहिली बच्ची वा सर्व निरपराध्यांना जिवें मारलें तरी दयेचा पाझर म्हणून त्याच्या पाषाणवत् अंतःकरणाला फुटला नाहीं ! मिसर देशांमध्यें इतका शोकजनक, हृदयविदारक आक्रोश सुरू झाला असेल कीं, साधारण मनुष्याचें अतःकरण तो पाहून करुणरसानें भरून आलें असेल पण आकाशांतील बापाचें काळीज शिलेप्रमाणें बनलेलें होतें ! वाः ! ज्याला लवमात्र दयामाया आहे असा जीव देखील असें काम करूं शकत नाहीं मग दयेचा सागर, न्यायाधीश, प्रभु, परमात्मा कसें करील ? परंतु ख्रिस्त्यांचा देवच मुळीं रुधिरप्रिय असल्यामुळें ' मांसाहारिणः कुतो दया ' या न्यायानें मांसाहारी ईश्वराला दया नसणें हेंहि स्वाभाविकच आहे.

४०—परमेश्वर तुम्हांसाठीं लढाई करील; आणि तुम्ही उगेच राहाल. मग परमेश्वर मोश्याला म्हणाला, तूं मला कां हांक मारतोस ? इस्राएलाच्या संतानास सांग कीं, पुढें चाला. आणि तूं आपली काठी उचलून आपला हात समुद्रावर लांब करून त्याचे दुभाग कर, मग इस्राएलाची संतानें समुद्रावरून कोरड्यावरुन जातील.

—निर्गम अ. १४ ओ. ते १६॥

**समीक्षक:**—काय महाराज ! प्रथम तर ईश्वर, मेंढरामागें ज्याप्रमाणें धनगर त्याचप्रमाणें, इस्राएलाच्या कुळामागें धांवत होता. आतां तो कोठें अंतर्धान पावला हें सांगतां येईल काय ? जर तोच देव हयात असता तर समुद्रांत चोंहोभागीं रेल्वे—लाईन त्यानें निर्माण केली असती व त्यायोगें सर्व जगाचें कल्याण होतें. नावा आदि बनविण्याचें श्रम वांचते ! परंतु काय सांगावें, ख्रिस्त्यांचा ईश्वर कोण जाणें कोठें गडप झाला तो ? पहा, मोश्याबरोबर त्यानें काय काय असंभव प्रकार केले. जसा ख्रिस्त्यांचा देव तशी त्याची भक्तमण्डळी व त्या मण्डळीचें पवित्र शास्त्र होय ! असें शास्त्र व असा ईश्वर आम्हां लोकांपासून दूर राहील तरच आमचें कल्याण आहे.

४१—त्यांच्या पायां पडूं नको आणि त्यांची सेवा करूं नको; कां कीं मी परमेश्वर तुझा देव आवेशी देव आहे, जे माझा द्वेष करतात त्यांच्या तिसऱ्या व चवथ्या पिढीपर्यंत बापांच्या अन्यायामुळें लेंकरांचें शासन मीं करतों.

—निर्गम अ. २० ओ. ५

**समी.**:—बापाच्या अपराधांचें प्रायश्चित चवथ्या पिढीपर्यंत त्याच्या वंशजांना शासन करणें हा कोणाच्या घरचा न्याय आहे बरें ? सुजनाच्या पोटीं कुपुत्र व कुपुत्रांना सुपुत्र होत नाहींत काय ? असें आहे तर चवथ्या पिढीपर्यंत बापाच्या पापाबद्दल मुलांबाळांना दण्ड तो कसा देऊं शकतो ? व ५ व्या पिढीपासून जे दुष्ट निपजतील त्यांना तो दण्ड देऊं शकणार नाहीं काय ? अपराधाविना शासन करणें हा घोर अन्याय आहे.

४२—शाब्बाथ दिवस पाळावा म्हणून त्याची आठवण कर. सहा दिवस उद्योग करुन आपलें सर्व काम कर. पण सातवा दिवस तुझा देव परमेश्वर याच्या विसाव्याचा दिवस आहे. यास्तव परमेश्वरानें शाब्बाथ दिवसाला आशीर्वाद देऊन तो पवित्र ठरविला. —निर्गम अ. २० ओ. ८ ते ११ ॥

**समीक्षक:**—रविवार हाच तेवढा पवित्र व बाकीचे सहा दिवस अपवित्र समजावयाचे काय ? परमेश्वरानें सहा दिवसपर्यंत मोठे परिश्रम केलें होते काय ? कीं ज्यामुळें त्याला सातवे दिवशीं विश्रांति घेणेंच भाग पडलें ? रविवाराला आशीर्वाद दिला तर सोमवार वगैरेंना काय दिला ? अर्थात् शाप दिला. असें काम विद्वानचें असत नाहीं तर मग ईश्वर कसें करील ; रविवारामध्यें असें काय गुण आहेत व सोमवार वगैरेंनीं कोणतें वाईट काम केलें म्हणून एक पवित्र व बाकीचे तसेंच अपवित्र ठरले.

४३—आपल्या शेजाऱ्याविषयीं खोटी साक्ष देऊं नको. आपल्या शेजाऱ्याच्या घरावर लोभ ठेवूं नको; आपल्या शेजाऱ्याची बायको, अथवा दास अथवा त्याची दासी, अथवा त्याचा बैल, अथवा त्याचे गाढव अथवा आपल्या शेजाऱ्याचें जें कांहीं असेल त्यावर लोभ ठेवूं नको. —निर्गम अ. २० ओ. १६, १७ ॥

**समी.**:—वाह ! म्हणून तर ख्रिस्ती लोक परदेशीयांच्या मालावर अशी झडप घालतात कीं, जणूं तृषार्त पाण्यावर व भुकेला अन्नावर ! हे केवळ पक्षपात आणि मतलबसिंधु प्रकार होत. आम्ही सर्वमनुष्यांना शेजारी मानतों असें

जर कोणी म्हणेल, तर ज्यांना शेजारी म्हणता येत नाहीं, अशा मनुष्याशिवाय, दुसऱ्या कोणाजवळ बायका व दास्या असतात ? ख्रिस्त्यांचा ईश्वरहि अवश्यमेव असाच असेल. या सर्व गोष्टी स्वार्थी मनुष्यांच्या आहेत, ईश्वराच्या नव्हेत.

४४—जो मनुष्याला मरण येईल असें म्हणतो त्याला जिवें मारावेंच. जर कोणी टपून मारलें असें नाहीं पण देवानें त्याच्या हातीं लागूं केलें, तर जेथें त्यानें पळावें असें ठिकाण मी तुजसाठीं नेमून देईन. —निर्गम अ. २१ ओ. १२।१३.

**समीक्षकः**—हा जर ईश्वरी न्याय असेल तर मोश्यानें जेव्हां एका मनुष्याला मारून पुरून टाकलें होतें, तेव्हां ख्रिस्त्याच्या देवानें मोश्याला कां दण्ड दिला नाहीं ? देवानें त्या मनुष्याला मारण्यासाठींच मोश्याला उत्पन्न केलें होतें असें जर म्हणाल तर तो पक्षपाती बनला, कारण त्या मोश्याचा राजाकडून न्याय कां होऊं दिला नाहीं ?

४५—आणि त्यानें इस्राएलच्या संतानांतील तरुणांस पाठविलें, आणि त्यांनीं परमेश्वराला होम केले व गोऱ्हांची शान्त्यार्पणें केलीं. तेव्हां मोश्यानें अर्धे रक्त घेऊन वाट्यांत ठेवलें. मग मोश्यानें रक्त घेऊन लोकांवर शिंपडून म्हटलें कीं पहा, या अवघ्या गोष्टीविषयीं जो करार परमेश्वरानें तुम्हांशीं केला त्याचें हें रक्त आहे. तेव्हां परमेश्वरानें मोश्याला सांगितलें तूं डोंगरावर मजपाशीं चढ व एथें ऐस, मग त्यांस शिकवण्यास मी तुला त्या दगडी पाट्या, नियम व आज्ञा ज्यां लिहिल्या त्या देईन. —निर्गम अ. २४ ओ. ५,६,८,९, १३.

**समीक्षकः**—आतां या गोष्टी जंगली लोकांच्या आहेत किंवा नाहींत त्या पहा. परमेश्वर बैलांचें बलिदान घेतो, वेदीवर त्यांचें रक्त शिंपडतो; तेव्हां ही किती अमानुषता, असभ्यता होय ? जेथें ख्रिस्त्यांचा ईश्वरच बैलाची शान्त्यर्पणें घेतो तेथें त्याचे भक्त गायीचें बलिदान करुन स्वतःचें उदरभरण कां करुन घेणार नाहींत ? व जगताचें वाटोळें कां करणार नाहींत ? असल्या किळसवाण्या गोष्टी बायबलांत भरलेल्या आहेत. असले कुसंस्काराधीन लोक स्वतःच्या चष्म्यांतून पाहून वेदांनाहि कलंक लावूं पाहतात ? परंतु वेदामध्यें असल्या गोष्टींचें नांव देखील नाहीं. ख्रिस्त्यांचा ईश्वर पहाडावर राहात होता; त्याला शाई, लेखणी, कागद बनवितां येत नव्हते म्हणून दगडी पाट्यांवर तो मजकूर लिहून देत होता; आणि त्या जंगली लोकापुढें तो स्वतः ईश्वर म्हणून बसत होता हें स्पष्ट दिसून येतें !

४६—तेव्हां त्यानें म्हटलें; तुझ्यानें माझें तोंड पहावत नाहीं, कां तर कोणी मनुष्य मला पाहून जगणार नाहीं; आणि परमेश्वर बोलला, पहा मजपाशीं ठिकाण आहे आणि तूं खडकावर उभा रहा. मग असें होईल कीं, माझें वैभव जवळून चालतें तेव्हां मी तुला खडकाच्या खोलग्यांत ठेवीन, आणि मी जवळून जातो तेव्हां हातानें तुजवर झांकण करीन, मग मी हात काढीन, तसें माझें मागलें अंग तुला दिसेल, परंतु माझें तोंड दिसणार नाहीं. —निर्गम अ. ३३ ओ. २० ते २३.

**समीक्षकः**—ख्रिस्त्यांचा देव केवळ मनुष्यवत् शरीरधारी होता व मोश्याशीं कपटजाल रचून आपणाच स्वतः ईश्वर होऊन बसला ! मागलें अंग पाहील, व त्याला आपलें रूप दिसू नयें याकरितां स्वहातानें त्याच्यावर झांकण घालतें. परंतु रूप दिसलें नसलें तरी देवाचे हात मोश्याला दिसलें नसतील काय ?

## जुना करार, लेवीय

४७—आणि परमेश्वरानें मोश्याला हांक मारून सभामंडपांतून त्याला असें सांगितलें कीं, इस्राएलाच्या संतानाशीं बोलून त्यांस सांग कीं, तुमच्यांतला मनुष्य परमेश्वराला पशूंतल्यांचें अर्पण करील तरल तुम्ही आपलें किंवा शेरडांमेंढराचें करा. —लेवीय अध्यय १ ओ. १-२.

**समीक्षकः**—स्वतःसाठीं ख्रिस्त्यांचा परमेश्वर गाय, बैल आदींचें बलिदान करण्याचा उपदेश करीत आहे तर तो गाय-बैल यांच्या रक्तमासांचा तहानेला व भुकेला आहे किंवा नाहीं ? जो मांसाहारी साधारण मनुष्यासारखा आहे. त्याची गणना ईश्वर म्हणून कशी करावी ? ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

४८—आणि त्यानें बैल परमेश्वरापुढें कापावा; मग आहेरानाचें पुत्र याजक यांनीं त्याचें रक्त आणावें; आणि सभामंडपाच्या दारीं जी वेदी आहे तीवर चहूंकडे रक्त शिंपडावें आणि त्यानें होमपशूचें कातडें काढावें मग तो कापून त्याचें तुकडे करावे आणि अहेरान याजक याच्या पुत्रांनीं वेदीवर अग्नि ठेवून अग्नीला लांकडे लावावीं. मग वेदीवरील

अग्नीच्या लांकडांवर अहेरानाचे पुत्र याजक यांनीं तुकडे व शिर व मांदें ठेवावें. आणि त्यानें त्याची आंतडी व त्याचे पाय पाण्यानें धुवावें मग याजकानें वेदीवर. अवघीं जाळावीं; हा होम परमेश्वराला सुगंध असें होत्र आहे.

—लेवीय अ. १ ओ. ५ ते ९

**समी.**:—थोडा विचार करा !. परमेश्वरा समोर त्याच्या भक्तानें बैल मारावा व त्यानेंहि त्याला मारूं द्यावें व त्याचें रक्त वेदीच्या चोहोंबाजूला शिंपडावें, अग्नीमध्यें त्याचा होम करावा, ईश्वरानें त्याचा सुगंध घ्यावा हे प्रकार खाटिकांच्या गृहस्थितीपेक्षां कांहीं कमी आहेत ? यावरून बायबल हें ईश्वरकृत ठरत नाहींच पण उलट ख्रिस्त्यांचा ईश्वर जंगली मनुष्याच्या लीलांना देखील मागें सारतो.

४९–आणि परमेश्वरानें मोश्याला असें सांगितलें कीं, जर अभिषिक्त याजक लोकांच्या दोषाप्रमाणें पाप करितो तर त्यानें आपण केलेल्या पापासाठीं निर्दोष खोंड असें पापाकरितां अर्पण परमेश्वराला करावें आणि त्यानें खोंड सभामंडपाच्या दाराजवळ परमेश्वरासमोर आणावा व आपला हात खोंडाच्या डोक्यावर ठेवावा, मग परमेश्वरासमोर; खोंड कापावा. —लेवीय अ. ४ ओ १।३।४

**समीक्षक**:–आतां पहा कीं, पापापासून मुक्त होण्याकरितां प्रायश्चित्त काय तर आणखी एकदां स्वत: पाप करावें गाय आदि निर्दोष व उत्तम पशूंची हत्या करावी आणि खुद्द परमेश्वरानेंच काय ती करण्यास भक्तांस लालवावें. धन्य आहेत हे ख्रिस्ती लोक ! अशा गोष्टी करणारा व करविणारा जो आहे त्याला ईश्वर मानतात व त्यापासून मुक्तीची आशा बाळगतात.

५०–जर अधिकारी पाप करतो तर त्यानें जें पाप केलें सें त्याचें पाप त्याला कळलें तेव्हां त्यानें आपलें अर्पण शेळयांतले निर्दोष नर आणावें. आणि आपला हात करडाच्या डोक्यावर ठेवावा, मग परमेश्वरापुढें ज्या ठिकाणीं होमपशु कापीत असतात तेथें तो कापावा; हें पापाकरितां अर्पण आहे. —लेवीय अ. ४ ओ. २२ ते २४.

**समीक्षक**:–वाहवा ! वाहवा ! जर असें आहे तर त्यांचे अधिकारी अर्थात् न्यायाधीश सेनापति आदि लोक पाप करण्यास कां भीतील ? स्वत: मनमुराद पापें करावींत आणि त्यांच्या प्रायश्चितार्थ गायी, वासरें, करडें वगैरेंचे प्राण घ्यावेंत ! आणि म्हणूनच ख्रिस्ती लोक पशु किंवा पक्षी यांचे प्राण घेण्यास कचरत नाहींत. ख्रिस्ती लोकांनों ! आतां तरी ह्या जंगली मताचा त्याग करून सुसभ्य धर्ममय वेदमताचा स्वीकार करा म्हणजे तुमचें कल्याण होईल.

५१—पण जर त्याला बकरें मिळेना तर त्यानें केलेल्या पापाविषयीं, त्याच्या दोषमुळें होले किंवा पारव्याचीं दोन पिलें एक पापाकरितां अर्पणासाठीं व एक होमासाठीं अशीं परमेश्वराजवळ आणावीं. त्यानें तीं याजकाकडे आणावीं, मग त्यानें जें पापाकरितां अर्पणसाठीं आहे तें प्रथम वाहावें, म्हणजे त्याची मान मुरगाळून त्याचें शिर तोडावें पण तें चिरूं नये. मग विधीप्रमाणें त्यानें दुसऱ्याचा होम करावा; असें त्याविषयीं त्यानें केलेल्या पापासाठीं याजकानें प्रायश्चित्त केल्यावर त्याची क्षमा होईल, आणि ज्यानें पाप केलें त्याला जर दोन होले किंवा पारव्याचीं दोन पिलें मिळत नाहींत तर त्यानें आपलें अर्पण एका मापाचा दहावा वांटा सपीठ पापाकरितां अर्पणसाठीं आणावें, त्यानें त्यावर तेल घालूं नये. धूपही ठेवूं नये. कां कीं, तें पापाकरितां अर्पण आहे. त्यानें तें याजकाकडे आणावें मग याजकानें आपल्या मुठींत मूठभर घेऊन सूचनेसाठीं त्यांतलें कांहीं वेदीवर परमेश्वराला जीं होत्रें त्याप्रमाणें जाळावें. तें पापाकरितां अर्पण आहे. असें यांतल्या एखाद्याविषयीं त्यानें केलेल्या पापाकरितां याजकानें त्यासाठीं प्रायश्चित करावें म्हणजे त्याची क्षमा होईल;* आणि उरलेलें पीठ अन्नार्पणांप्रमाणें याजकाचें असावें. —लेवीय अ. ५ ओ. ७,८,९,११ ते १३.

*ज्यानें वासरूं, कोकरूं, मेंढरूं, होला, पारवा आणि सपीठ हीं देखील भक्तांपासून घेण्याचा नियम केला अशा. ईश्वराची धन्य आहे. अद्‌भूत गोष्ट म्हणजे ही कीं, 'पारव्यांच्या पिलांच्या' माना मुरगळावयास लावीत होता म्हणजे गर्दन तोडण्याचे परिश्रमसुद्धां भक्तांना पडूं नये इतका भक्तवत्सल ख्रिस्त्यांचा देव असलेला पाहून तो परमेश्वर नसून जंगली लोकांतला एखादा चतुर पुरुष होता असें वाटतें. तो पर्वतावर बसून स्वत:लाच ईश्वर भासवीत होता व अज्ञानी जंगली लोकांनी त्याला ईश्वर मानलें ! त्यानें युक्ति योजून बसल्या ठिकाणींच पर्वतावर खाण्याची सोय करून ठेवण्यासाठीं पक्षी, अन्नादि मागवीत होता आणि मौज करित होता त्याचे दूत त्यांचें सर्व काम करीत होते. वासरूं, करडूं, मेंढरू, पारवा व उत्तम सपीठ गट्ट करणारा बायबलांतील ईश्वर कोठें व सर्वव्यापक, सर्वज्ञ अजन्मा, निराकार, सर्वशक्तिमान् व न्यायकारी इत्यादि उत्तम गुणयुक्त वेदोक्त ईश्वर कोठें ! याचा सज्जन लोकांनींच विचार करावा.

**समीक्षक**:-ऐका, ख्रिस्त्यांच्या ईश्वरानें पापाचें प्रायश्चित्त करून घेणें सहज साध्य करून ठेवल्यामुळें दरिद्री अगर श्रीमंत कोणताहि ख्रिस्ती मनुष्य पाप करण्यास भीत नसेल. परिश्रमाशिवाय पापांतून मुक्त होता येतें ही ख्रिस्त्यांच्या बायबलांतील गोष्ट मोठी अद्भुत आहे. कारण प्रथम पाप करावें नंतर त्याच्या क्षालनार्थ दुसऱ्या जिवाचा वध करावा आणि त्याचें मांस मग मोठ्या गमतीनें मिटक्या मारून खावें आणि अशा रीतीनें पापांतून मुक्त व्हावें. पारव्याच्या पिल्लाची मान मुरगळतांना तें किती तडफडत असलें तरी देखील ख्रिस्त्यांना दया येत नसावी ना ? त्यांना दया तरी कां व कशी यावी ? त्यांच्या आकाशांतील बापाचा त्यांना उपदेशच तसा आहे. सर्व पापांचें प्रायश्चित्त जर अशा प्रकारचें आहे तर येशूवर विश्वास ठेवल्यानें पाप नष्ट होतें, असलें विचित्र अवडंबर ख्रिस्ती लोक कां माजवितात ?

५२—आणि जो याजक कोणाचा होम करतो त्यानें अर्पिलेल्या होमपशूचें कातडें याजकाचें आहे, त्याचेंच असावें आणि प्रत्येक अन्नार्पण जें भट्टींत भाजलेलें व कढईत व तव्यावर सिध्दा केलेलें प्रत्येक हें अर्पणाऱ्या याजकाचें आहे, याचें असावें. —लेवीय अ. ७ ओ. ८।९.

**समीक्षक**:-येथेंच देवीचे भोपे व मंदिरांचे पुजारी यांच्या उदरंभरणार्थ असल्या विचित्र भटी लीला आहेत अशी आमची समजूत होती. परंतु ख्रिस्त्यांचा ईश्वर व त्याचे पुजारी यांच्या पोपलीला येथल्यापेक्षां सहस्रपट विचित्र आहेत ! कारण कातड्याचा पैसा व भोजनाचे पदार्थ खावयास मिळत, तेव्हां ख्रिस्ती भटांची मोठी चंगळ होत असेल, आणि आतांहि होत असेल ! एखादा मनुष्य एका मुलास मारून दुसऱ्या मुलास त्याचें मांस खावयास देईल असें कधीं होईल काय ? मग सर्व माणसें, पशु, पक्षी हे सर्व जीव परमेश्वराला पुत्रवत् असतांना तो असें कसें करील ? ईश्वर असें काम कधींच करीत नाहीं. आणि म्हणूनच हें बायबल ईश्वरकृत व त्यांतील ईश्वर किंवा त्याचा उपदेश मानणारे लोक धर्मज्ञ केव्हांहि होऊं शकत नाहींत. असल्याच गोष्टी लेवीय आदि पुस्तकांत भरलेल्या आहेत. त्या कोठवर वर्णन कराव्यात

## 'गणना' चें पुस्तक

५३—आणि परमेश्वराचा दूत वाटेंत उभा राहिलेला व त्याच्या हातीं त्याची तरवार उपसलेली असें गाढवीनें पाहिलें आणि गाढव वाटेंतून वळून शेतांत चालली म्हणून बलामानें गाढव वाटेंत फिरवयास तिला मारलें. मग परमेश्वरानें गाढवीचें तोंड मोकळें केलें आणि ती बलामाला म्हणाली, म्यां तुझें काय केलें म्हणून त्वां मला आतां तीन वेळां मारलें ? —गणना. अ. २२ ओ. २३।२८.

**समीक्षक**:—पूर्वीं गाढवाला सुद्धां परमेश्वराच्या दूतांचें दर्शन होत असे. पण आतां मोठमोठे बिशप, पाद्री वगैरेंना व श्रेष्ठ कनिष्ठ मनुष्यांनाहीं परमेश्वर किंवा त्याच्या दूतांचें दर्शन होत नाहीं ! कां आतां परमेश्वर किंवा त्याचे दूत हे अस्तित्वांतच नाहींत वाटतें ? जर असतील तर कोणत्या गाढ झोपेंत ते पडले आहेत ? कां रोगग्रस्त आहेत ? कां दुसऱ्या कोणत्या भूगोलावर ते गेले आहेत ? वा कोणत्या अन्य धंद्यामध्यें गुंतले आहेत ? कां आतां ख्रिस्ती लोकांवर ते रुसले आहेत ? कां मेले आहेत ? झालें तरी काय ? कळत नाहीं कोठें आहेत ते ? अनुमान तर असें आहे कीं, जे सांप्रत नाहींत, जे दिसत नाहींत, तें पूर्वींहि नव्हते व दिसत नव्हते, पण ह्या सर्व केवळ भाकडकथा रचलेल्या आहेत.

५४—तर आतां बाळकांतल्या सर्व पुरुषांस मारा, आणि ज्या स्त्रियांस पुरुषाशीं संयोग झाला त्या सर्वांसहि मारा. आणि स्त्रियांमध्यें सर्व मुली पुरुषाशीं संयोग झाला नाहीं त्यांस आपणासाठीं वांचवा.

—गणना. अ ३१ ओ. १७,१८.

**समीक्षक**:—वाहवा ! पैगंबर मोशे व तुमचा ईश्वर धन्य असो ! जो स्त्रियां–बालकें वृद्ध व पशू आदि यांचा हत्या करण्याचें सोडीत नाहीं त्याला काय म्हणावें ? आणखी एक गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते ती ही कीं, मोशे विषयासक्त होता कारण जर तसा तो नसता तर अक्षतयोनि अर्थात् पुरुषांशीं ज्यांचा संयोग झाला नाहीं अशा सर्व मुली आपणा–साठीं वांचवा असें कां सांगतां किंवा ज्यांचा पुरुषांशीं संयोग झाला त्या सर्व स्त्रियांस मारा अशी निर्दयपणाची आज्ञा कां देतां ? यास्तव मोशे हा निर्दयी व कामासक्त विषयी होता.

## शमुएलचें दुसरें पुस्तक

५५—आणि त्या रात्रीं असें झालें कीं, परमेश्वराचा शब्द नाथाकडे असा आला कीं, जाऊन माझा सेवक दावीद याला सांग कीं परमेश्वर असें म्हणतो तूं मला राहण्यासाठीं घर बांधशील काय ? ज्यां इस्राएलाचें वंश मिसर देशांतून आणलें त्या दिवसापासून आजपर्यंत मी घरांत राहिलों नाहीं, डेऱ्यांत व मंडपांत वर्तत आलों आहे.

—श. पु. २ रे अ. ओ. ४ ते ६.

**समीक्षकः**–आतां तर ख्रिस्त्यांचा ईश्वर मनुष्याप्रमाणें देहधारी आहे असें समजण्यास कसलीच शंका राहिली नाहीं. कारण तो म्हणतो कीं, 'मी फार श्रम केले; डेरेमंडप यामध्यें राहिलों. दावीदाला सांगा कीं, मला राहण्या-साठीं घर बांधून दे म्हणजे मी त्यांत आनंदानें राहीन इत्यादि.' असलें पुस्तक व असला ईश्वर मानण्यास ख्रिस्त्यांना लज्जा नाहीं कां वाटत ? वाटत असेल, पण करतील काय बिचारे, फसले आहेत, आतां यांतून सुटका करून घेण्यास त्यांना अत्यंत पुरुषार्थ करणेंच उचित होय.

## 'राजे'

५६—आणि बाबेलाचा राजा नबुखदनेस्सर याच्या राज्याच्या एकुणिसाव्या वर्षीं पांचव्या महिन्याच्या शुद्ध सप्तमीस बाबेलाच्या राजाचा सेवक हुजऱ्यांचा सरदार नबूजरदान यरूशलेमास आला तेव्हां त्यानें परमेश्वराचें मंदिर व राजाचें घर जाळलें, आणि यरूशलेमांतलीं सर्व घरें व महाजनांचीं घरें सर्वं अग्नीनें जाळून टाकलीं. आणि हुजऱ्यांच्या सरदारासंगतीं खास्द्यांचें सर्व सैन्य यानें यरूशलेमाचे कोट चहूंकडून मोडले. —राजे २ अ. २५ ओ ८।९।१०

**समीक्षकः**–काय करावें ? ख्रिस्त्यांच्या ईश्वरानें सौख्यासाठी म्हणून दावीदाकडून स्वतःस आरामशीर राहाण्यस घर बांधून घेतलें होतें त्यामध्यें मोठ्या आनंदानें तो वास्तव्य करीत होता परंतु नबुखदनेस्सर कसला दुष्ट, त्यानें त्या परमेश्वराच्या मंदिराचा चक्काचूर कीं हो केला ! यावेळीं बिचारा ख्रिस्त्यांचा परमेश्वर व त्याची दूतसेनाहि अगदीं हतबल बनली ! यापूर्वीं ख्रिस्त्यांच्या परमेश्वरानें पुष्कळ लढाया मारल्या होत्या व विजय प्राप्त केले होते परंतु या खेपेस काय झालें कोण जाणें, स्वतःच्या मंदिराचा चक्काचूर होत असतांहि तो गरीब बिचारा गप्प बसला आणि त्याचे दूतहि कोठें दडून बसले होते त्यांचाहि पत्ता नव्हता ! अशा कठीण समयीं ख्रिस्त्यांच्या ईश्वराच्या कोणी कामीं पडला नाहीं किंवा प्रत्यक्ष ईश्वराचा पराक्रमहि त्याच्या उपयोगास आला नाहीं ! या वेळेस ईश्वराचा पराक्रम खरोखरच निरुपयोगी झाला असेल तर यापूर्वीं त्याच्या पराक्रमाचीं जीं बहारीचीं वर्णनें बायबलांत वर्णिली आहेत तीं पोकळच म्हणावयाचीं ! मिसर देशांतील रहिवाश्यांचीं मुलेंबाळें ठार करण्यापुरताच त्याचा पराक्रम होता आतां शेराला सव्वा शेर असे शूरवीर भेटतांच त्याचा सर्व पराक्रम लयास गेला असें समजावयाचें काय ? या अपमानजनक कृत्यामुळें ख्रिस्त्यांच्या परमेश्वरानें सर्वत्र आपली निंदा व अप्रतिष्ठा करून घेतली आहे ! असल्या गप्पा या बायबलांत सर्वत्र भरपूर भरल्या आहेत.

## जुना करार, भाग दुसरा (जबूर)

## कालवृत्तांत १

५७—मग परमेश्वर इस्राएलावर मरी लावली तेव्हां इस्राएलांतली सत्तर हजार माणसें पडलीं.

—कालवृत्तांत १ अ. २१ ओ. १४.

**समीक्षकः**— आतां पहा ! इस्राएलाच्या ख्रिस्त्यांच्या ईश्वराची लीला. एका वेळेस ख्रिस्त्यांच्या ईश्वरानें इस्राएल कुल मोठें आवडतें होतें, त्यानें अहोरात्र त्या कुलाची काळजी घेतली, त्याचें पालन केलें आणि आतां तोच ईश्वर क्रोधवश होऊन इस्राएलावर मरीचा आजार पाठवतो व तद्द्वारें सत्तर हजार माणसांचा फन्ना पाडतो ! एक कवी म्हणतो कीं:—

**क्षणे रुष्टः क्षणे तुष्टो रुष्टतुष्टः क्षणेक्षणे। अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयङ्करः ।।१।।**

क्षणांत प्रसन्न, क्षणांत अप्रसन्न, म्हणजे क्षणोक्षणीं प्रसन्नाप्रसन्न होणाऱ्या मनुष्याची प्रसन्नतादेखील भयंकर असते हें अगदीं सत्य आहे. याप्रमाणेंच ख्रिस्त्यांच्या ईश्वराची ही लीला आहे.

## ईयोबाचें पुस्तक

५८—पुनः एक दिवस असा आला कीं, त्या दिवशीं देवकुमार परमेश्वरासमोर येऊन उभे राहावयास आले आणि त्यांच्यामध्यें सैतानहि परमेश्वरासमोर येऊन उभा राहिला. आणि परमेश्वर सैतानाला म्हणाला, तूं आतां कोठून आलास ? सैतानानें परमेश्वराला उत्तर दिलें, 'मी पृथ्वीवर इकडे तिकडे हिंडून फिरून आलों आहे. परमेश्वरानें सैतानाला विचारिलें, 'माझा सेवक ईयोब याजकडे तुझें लक्ष गेलें आहे काय ? भूतलावर त्याच्या तोडीचा सात्विक व सरळ, देवाला भिऊन वागणारा व पापांपासून दूर राहणारा असा दुसरा कोणी नाहीं. त्याला विनाकारण अपकार करण्यास तूं मला चिथावलेंस, तरी तो आपल्या सत्वाला दृढ धरून राहिला आहे.' सैतानानें परमेश्वरास उत्तर केलें 'त्वचेसाठीं त्वचा ! मनुष्य आपल्या प्राणांसाठीं आपलें सर्वस्व देईल. तूं आपला हात पुढें करून त्याच्या हाडामांसास लावून तर पहा, म्हणजे तो तुझ्या तोंडावर तुझा अव्हेर करील.' परमेश्वर सैतानाला म्हणाला, 'पहा, मी तुझ्या हातीं देतों; मात्र त्याची प्राणहानि करूं नको.' मग सैतान परमेश्वरासमोरून गेला; आणि त्यानें ईयोबास मोठमोठ्या गळवांनीं नखशिखांत भारी पिडिलें. ईयोबानें आपलें अंग खाजविण्यासाठीं एक खापरी घेतली आणि तो जाऊन राखेंत बसला.

—ईयोब अ. २ ओ. १ ते ८

**समीक्षकः**—आतां ख्रिस्त्यांच्या ईश्वराचें सामर्थ्य पहा. प्रत्यक्ष ईश्वरासमोर सैतान ईश्वरभक्ताला दुःख देतो तरी भक्तांचा कैवारी ख्रिस्त्यांचा परमेश्वर सैतानाचें कांहींच पारिपत्य करीत नाहीं, किंवा भक्ताला वांचवूं शकत नाहीं अथवा देवाचे दूतहि सैतानाचा सामना करूं शकत नाहींत. एका सैतानानें सर्वांना भयभीत करून सोडलें. ख्रिस्त्यांचा ईश्वर सर्वज्ञहि नाहीं, कारण तो जर सर्वज्ञ असता तर सैतानाकडून ईयोबाची परीक्षा कां घेता ?

५९—मी आपल्या मनाशीं म्हणालों; माझ्यापूर्वी जितके राजे येरुशलेमावर होऊन गेले तितक्यांहून अधिक ज्ञान मी प्राप्त करून घेतलें. ज्ञान व विद्या यांची पूर्ण प्रतीति माझ्या मनाला पटली आहे. ज्ञान काय आणि वेडेपणा व मूर्खत्व काय हीं जाणण्याकडे मी आपलें चित्त लाविलें तों, मला असें दिसून आलें कीं, हें जे वाऱ्यामागें लागण्यासारखें वायफळ होय. कारण जेथें ज्ञान फार तेथें खेदहि फार, ज्याला विद्या अधिक त्याला दुःखहि अधिक.

—उपदेशक अ. १ ओ. १६ ते १८

**समीक्षक**—बुद्धि व ज्ञान हे पर्यायवाची शब्द असून ते भिन्न मानले आहेत आणि बुद्धीची वाढ पाहून शोक व दुःख मानणें हें अविद्यायुक्त अज्ञानी लोकांचें काम आहे, विद्वान् मनुष्य असें कसें लिहील ? याकरितां हें बायबल पुस्तक ईश्वरीय तर नाहींच परंतु एखाद्या विद्वानाचें देखील होऊं शकत नाहीं.

येथपर्यंत तौरेत जबूर हे जे जुन्या कराराचे भाग त्यांतून थोडेसें लिहिलें. यानंतर मत्तय वगैरे जे नव्या कराराचे भाग आहेत त्याविषयीं थोडेसें विवेचन करूं. कारण ख्रिस्त्यांचा 'नवा करार' हा ग्रंथ त्यांनीं प्रमाणभूत मानिलेला आहे, व त्याचेंच नांव 'पवित्रशास्त्र' म्हणून ठेवलें आहे. त्याचें स्पष्टीकरण करतांच त्याची परीक्षा होईल.

## नवा करार अथवा पवित्रशास्त्र

### मत्तयकृत

६०—येशू ख्रिस्ताचा जन्म याप्रकारें झाला. त्याची आई मरीया ईचें योसेफास वाग्दान झाल्यावर त्यांचा सहवास झाल्यापूर्वी ती पवित्र आत्म्याकडून गरोदर झालेली अशी दिसण्यांत आली. तो त्या गोष्टीच्या विचारांत आहे तों, पहा, प्रभूच्या दूतानें त्याला स्वप्नांत दर्शन देऊन म्हटलें, योसेफा, दाविदाच्या पुत्रा, तूं आपली स्त्री मरीया इचा अंगीकार करायाला भिऊं नको, कारण तिच्याठायीं जो गर्भ आहे तो पवित्र आत्म्याकडून आहे.—मत्तय अ. १ ओ. १८।२०

**समीः**—कोणीहि विद्वान् प्रत्यक्षादि प्रमाण व जी गोष्ट सृष्टिक्रमादिविरुद्ध आहे ती कधींच मानणार नाहीं. या गोष्टीवर मूर्ख व जंगली मनुष्यानींच विश्वास ठेवावा हें काम सभ्य विद्वानांचें नव्हें. ईश्वरी नियमांचा भंग करण्यास कोण समर्थ आहे बरें ? जो सर्वज्ञ व निर्भ्रम आहे अशा परमेश्वराच्या नियमांचा भंग करिता येईल तर कोणीहि त्याच्या

आज्ञा मानणार नाहीं. मरीयेला जसा गर्भ राहिला तशा तऱ्हेनें ज्या ज्या कुमारिका गरोदर राहतील. त्या सर्व ईश्वरापासूनच गरोदर आहेत असें कोणीहि म्हणूं शकतील आणि परमेश्वराच्या दूतानें प्रत्यक्ष मला स्वप्नांत येऊन सांगितलेलें आहे कीं, तो कुमारीगर्भ परमेश्वराचा आहे असें खोटेंनाटेंच सांगूं लागतील; पण ही गोष्ट शक्य नाहीं. ज्याप्रमाणें मेरीचा गर्भ संशयाती असून कांहीं तरी लटपटपंची लढविली आहे, त्याप्रमाणें सूर्यापासून कुंती गर्भवती राहणें वगैरे पुराणांत लिहिलेल्या सर्व असंभव गोष्टी आहेत. असल्या गोष्टी फक्त 'बैल गाभणा, तर सातवा महिना' म्हणून उत्तर देणारे खुळे लोकच खऱ्या मानतील पसतील. असें झालें असेल कीं अन्य एखाद्या पुरुषसमागमानें मरीया गरोदर झाली असेल, व मरीया ईश्वरापासून गरोदर झाली आहे अशी त्यानेंच किंवा दुसऱ्या कोणी गप्प उठविली असेल.

६१—तेव्हां सैतानाकडून येशूची परीक्षा व्हावी म्हणून आत्म्यानें त्याला रानांत नेलें. आणि तो चाळीस दिवस व रात्री उपाशी राहिल्यावर मग त्याला भूक लागली. परीक्षक त्यापाशीं येऊन म्हणाला, तूं देवाचा पुत्र असलास तर धोंड्यांच्या भाकरी व्हाव्या अशी आज्ञा कर. —मत्तय अ. ४ ओ. १ ते ३

**समीक्षकः**— यावरून ख्रिस्त्यांचा ईश्वर सर्वज्ञ नाहीं हें स्पष्ट सिद्ध होत आहे. कारण जर तो सर्वज्ञ असता तर त्याची परीक्षा तो सैतानकडून कां घेतां ? स्वतः त्यानेंच ती घेतली असती किंवा अगोदरच येशूचें अंतःकारण त्यानें ओळखलें असतें. आजकाल एखाद्या ख्रिस्त्याला ४० दिवस व रात्रीं उपाशीं ठेवलें तर तो जगूं शकेल काय ? दुसरीहि गोष्ट यावरून सिद्ध होतें कीं, येशूख्रिस्त ईश्वराचा पुत्र तर नव्हताच पण त्याच्या अंगीं कांहीं करामतहि नव्हती; नाहींतर त्यानें सैतानासमक्ष धोंड्यांच्या भाकरी बनवून दाखविल्या असत्या. त्यानें फार तर त्या खावयाच्या नव्हत्या. पण त्यावरून त्याचें ईश्वर-पुत्रत्व सिद्ध झालें असतें, व मग त्याला जी भूक लागली म्हणून दुसऱ्या ओवींत सांगितलें आहे तशी त्याला भूकहि न लागती. खरी गोष्ट ही कीं, परमेश्वर निर्मित धोंड्यांच्या भाकरी बनविण्यास कोणीहि समर्थ नाहीं. ईश्वर सर्वज्ञ असल्यामुळें तोहि पूर्वकृत नियम बदलूं शकत नाहीं आणि म्हणूनच त्याचीं सर्व कृत्यें जगाच्या आरंभापासून बिनचूक होत आहेत.

६२—त्यानें त्यास म्हटलें. माझ्या मागून या म्हणजे मी तुम्हांस मनुष्यें धरणारे करीन. मग ते लागलेच जाळीं सोडून देऊन त्याच्या मागून चालले. —मत्तय अ. ४ ओ. १९।२०.

**समीक्षकः**—जुन्य करारांतील तौरेत भागांत लिहिलें आहे कीं, मुलांबाळांनीं आपल्या आईबापांची सेवा करावी व त्यांना प्रिय असें वागावें म्हणजे त्यांना दीर्घायुष्य प्राप्त होईल. ख्रिस्तानें आईबापांची सेवा व त्यांना प्रिय अशी वागणूक न ठेविल्यासुळेंच त्या पापाचें फल म्हणून तो अकालीं मेला. आईबापांची सेवा करणें दूरच परंतु इतर लोकांना त्यानें आपल्या जाळयांत अडकवून हजारों आईबापांपासून त्यांचीं मुलेंबाळें सोडवून त्यांचें शाप घेतले ! आणखी येशूनें मनुष्यांना फसविण्याकरितां हें मत प्रचलित केलें आहे हेंहि यावरून कळून येतें. त्या मताच्या जाळयांत जर स्वतः ख्रिस्तानें कित्येक अज्ञ मनुष्यें माशाप्रमाणें पकडलीं तर गुरूचें अनुकरण करून त्याचे शिष्य आजकाल हजारों अज्ञ लोकांचा फसवून ख्रिस्ती करतात यांत नवल तें काय ? कारण ज्याप्रमाणें मोठमोठे व विपुल मासे मिळविणाऱ्या लोकांचा चरितार्थ उत्तम चालतो त्याप्रमाणें जितकें अज्ञानी, दरिद्री लोक स्वमतांत जास्त जो कोणी मिशनरी आणील त्याची प्रतिष्ठा व जीविका उत्तम चालते ! हे मिशनरी लोक जगांतील स्वधर्माविषयीं जे लोक पूर्ण अज्ञानी आहेत, ज्यांना गरीबीनें त्रस्त केलें आहे, जे भोळे, अंधश्रद्धाळू लोक आहेत; अशांना आपल्या जाळयांत पकडून त्यांना आपले आईबाप, बंधुभागिनी, नातलग या सर्वांपासून पृथक् करितात !' म्हणून सर्व विद्वान् आर्यांनीं स्वतः ख्रिस्ती मिशनरींच्या जाळयांत सांपडूं नये व आपल्या इतर धर्मभोळया बंधूंना या जाळयापासून वांचविणें त्यांचें कर्तव्य आहे.

६३—नंतर येशू सभास्थानांत शिक्षण देत व राज्याची सुवार्ता गाजवीत व लोकांतलें सर्व प्रकारचे रोग आणि सर्व प्रकारचीं दुखणीं बरीं करीत सर्व गालीलांत फिरला आणि त्याची कीर्ति सूरिया देशभर पसरली; तेव्हां ज्यांस नाना प्रकारचे रोग व वेदना लागल्या होत्या, जे भूतग्रस्त व फेंपरेकरी व पक्षघाती होते अशा सर्व दुखणेकऱ्यांस त्याकडे आणिलें आणि त्यानें त्यांस बरें केलें. —मत्तय अ. ४ ओ. २३।२४.

**समीक्षकः**—जर आजकालाची रामरक्षा, मंत्र, तंत्रादि प्रयोगांनीं भूतेंखेतें निघतात हें खरें असेल तर बायबलांत वर्णिलेल्या असल्याच पोपलीलांनी रोगग्रस्त लोक बरे होत असतील. जर यावरून येशूचें देवपुत्रत्व मानावयाचें तर आमच्या येथील भट, पुजारी, गंडादोरा करणारे हे सर्व देवपुत्रच होत ! या सर्व थापा धर्ममोळया लोकांना फसविण्याकरितां आहेत. येशूनें रोगी बरे केले ह्या बायबलांतील व आमच्यांतील गंड्यादोऱ्यांनीं भूतपिशाच्च नाहीसें झालें या गप्पा सारख्याच होत.

६४—जे आत्म्यानें 'दीन' ते धन्य, कारण स्वर्गाचें राज्य त्यांचें आहे. 'जे शोक करितात' ते धन्य, कारण 'ते सांत्वन पावतील' मी तुम्हांस खचीत सांगतों, कीं, आकाश व पृथ्वी नाहींशीं होईपर्यंत सर्व गोष्टी पूर्ण झाल्यावांचून नियमशास्त्राची एक मात्रा किंवा एक बिंदु नाहींसा होणार नाहीं. यास्तव जो कोणी या अगदीं लहान आज्ञांतील एक रद्द करील व तदनुसार लोकांस शिकवील त्याला स्वर्गाच्या राज्यांत अगदीं लहान म्हणतील, आणि जे कोणी त्या पाळील व शिकवील त्याला स्वर्गाच्या राज्यांत मोठा म्हणतील. —मत्तय अ. ५ ओ.।३।४ १८।१९

**समीः**—जर स्वर्ग एक असेल तर राजाही एकच असला पाहिजे. जितके 'दीन' आहेत ते सर्व स्वर्गाला जातील. मग स्वर्गाचे अधिकारी फार झाल्यावर ते आपापसांत लढाया झगडे करतील आणि राजव्यवस्थेचे तुकडे तुकडे पडतील. 'दीन' म्हणजे कोण ? जर कंगाल, दरिद्री, निष्कांचन म्हणणें असेल तर तें योग्य नव्हें व जर मनानें जो दीन असेल त्याला समाधान वृत्ति लाभणें कठीण; म्हणूनच हाहि अर्थ योग्य नव्हे व जर निरभिमानता म्हणणें असेल तर दीनता व अभिमान यांचा अर्थ एकच नव्हे. जर आकाश व पृथ्वी ह्या नाहींशा झाल्या तर नियमशास्त्रच तेवढें कोठें राहील ? असले अनित्य नियमशास्त्र मनुष्यकृत असतें, सर्वज्ञ ईश्वरप्रणीत तें होऊं शकत नाहीं. याठिकाणीं मनुष्यकृत नियमशास्त्र बलात्कारानें लोकांकडून पालन करवून घेण्यासाठीं स्वर्गाच्या राज्याचीं लालुच दाचविली आहे. व जो हें करणार नाहीं त्याला स्वर्गांत लहान म्हणतील अशी भीति घातली आहे.

६५—आमची प्रति दिवसाची भाकर आज आम्हांस दे. पृथ्वीवर आपणाकरितां संपत्ति सांठवूं नका, तेथें कसर व जंग खाऊन नाश करितात. आणि चोर घर फोडून चोरी करितात. —मत्तय अ. ६ ओ. ११।१९.

**समीक्षकः**—यावरून येशूख्रिस्ताच्या काळीं लोक जंगली व दरिद्री होते, असें स्पष्ट दिसतें. येशूहि दरिद्री होता. म्हणूनच त्यानें प्रतिदिवसाची भाकरी ईश्वराजवळ मागितली आहे व आपल्या शिष्यांना मागण्यास सांगितलें आहे. संपत्ति सांठवूं नका अशी गुरूची आज्ञा असतां ख्रिस्ती लोक आज संपत्तिसाठींच धडपडत आहेत. गुर्वाज्ञा मानून आपल्या जवळील सर्व संपत्तिचें दानपुण्य करून त्यांनीं 'दीन' बनणें त्यांचें कर्तव्य आहे.

६६—मला, हे प्रभू, असें म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यांत होईल असें नाहीं. —मत्तय अ. ७ ओ. २१

**समीः** जर येशूचें हें वचन सत्य असेल तर त्याला नुसतें प्रभु प्रभु म्हणणाऱ्या त्याच्या मोठमोठ्या अनुयायांचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यांत होणार नाहीं. कारण ख्रिस्ताज्ञेविरुद्ध वागणें हें पाप होय, म्हणून येशूला त्यांनीं प्रभु म्हणूं नये.

६७—त्या दिवशीं मला बहुत म्हणतील, हे प्रभू, प्रभू आम्हीं तुझ्या नांवानें प्रवचन सांगितलें, व तुझ्या नांवानें भूतें घालविलीं, तुझ्या नांवानें बहुत अद्भूत कृत्यें केलीं. नाहींत काय ? तेव्हां मी त्यांस स्पष्ट सांगेन कीं, मला तुमची कधींच ओळख नव्हती 'अहो अधर्म करणाऱ्यांनों, मजपासून निघून जा.' —मत्तय अ. ७ ओ. २२।२३

**समीक्षकः**—या ठिकाणीं भोळयाभाळया लोकांना चकविण्यासाठीं येशूनें आपण स्वर्गांतील न्यायाधीश आहों अशी बताव केलेली आहे. ह्या प्रलोभनाला भोळे लोकच फसतील.

६८—आणि पहा, एक कुष्टीरोगी येऊन त्याच्या पायां पडून म्हणाला, हे प्रभू, तुझी इच्छा असली तर मला शुद्ध करावयास तूं शक्तिमान् आहेस. तेव्हां त्याचें हात पुढें करून त्याला स्पर्श केला व म्हटलें, माझी इच्छा आहे, शुद्ध हो, तेव्हांच त्यांचें कुष्ट जाऊन तो शुद्ध झाला. —मत्तय अ. ८ ओ. २।३

**समीक्षक** :—ह्या सर्व गोष्टी विद्या, व सृष्टिक्रम यांविरूध्द आहेत व त्या अज्ञानी व भोळया लोकांनींच खऱ्या मानाव्यात, बायबलांतील या गोष्टी जर खऱ्या मानावयाच्या तर शुक्राचार्य, धन्वंतरि, कश्यप वगैरेविषयींच्या ज्या चमत्कारिक गोष्टी पुराणांत व भारतामध्यें सांगितल्या आहेत त्या खिस्ती लोकांनीं सत्य कां मानूं नयेत ? दैत्यांचें मेलेलें सैन्य जिवंत केलें, बृहस्पतीच्या पुत्राचे (कचाचे) तुकडे तुकडे करून ते जनावरांना व माशांना खाऊं घातले तरीही पण शुक्राचार्यांनीं त्याला जिवंत केलें, नंतर त्याच कचाला मारून, त्याचें मांस शुक्राचार्यांस खावयास दिलें पण पुनः शुक्राचार्यानें आपल्या पोटांत त्याला सजीव करून बाहेर काढलें व स्वत: मेला पण कचानें शुक्राचार्य यांस जिवंत केलें ! कश्यपानें तक्षकाकडून भस्म झालेलीं मनुष्यें व वृक्ष जिवंत केले. धन्वंतरीनें लाखों प्रेतें उठविलीं, लाखों कुष्टरोगी वगैरे बरें केलें, लाखों अंधांना दृष्टि व बहिऱ्यांना श्रवणशक्ति प्राप्त करून दिली. या सर्व गोष्टी खिस्ती लोकांनीं असत्य कां मानाव्यात ? जर पुराणांतील चमत्कार खोटे तर येशूच्या नांवावर उगाच लादलेले चमत्कार तेवढेच खरे असें खिस्त्यांनीं कां मानावें ? जे दुसऱ्यांच्या गोष्टींना खोटें व आपल्या खोट्याला खरें मानतात ते पक्षपाती हट्टी लोक नव्हेत काय ? आणि म्हणूनच खिस्त्यांच्या ह्या भाकडकथा सर्वथैव खोट्या व हट्टी लोकांच्या होत.

६९—मग तो पलीकडे गदरेकरांच्या देशांत आल्यावर दोन भूतग्रस्त मनुष्य कबरींतून निघून येत असतांना त्याला भेटलें; ते इतके विक्राळ होते कीं, त्या वाटेनें कोणाच्यानें जाववत नसे. तेव्हां पहा, ते ओरडत म्हणाले, हे देवाच्या *पुत्रा, आमचा व तुझा काय संबंध ? नेमलेल्या समयापूर्वीं तूं आम्हांला पीडावयास एथें आलास काय ? तेथें त्यांपासून दूर* अंतरावर डुकरांचा मोठा कळप चरत होता. मग त्या भूतांनीं त्याला विनंति केली कीं, जर आम्हांस काढीत असलास तर आम्हांस त्या डुकरांच्या कळपांत पाठीव. त्यानें त्यांस म्हटलें जा. मग तीं निघून डुकरांत शिरलीं; आणि पहा, तो अवघा कळप कड्यावरून समुद्रांत धडक धांवत जाऊन पाण्यांत बुडून मेला. —मत्तय अ. ८ ओ. २८ ते ३२.

**समीक्षक** :—हें थोड्याशा विचारांतीं आपणांस सहज असजेल. ह्या गोष्टी म्हणजे शुद्ध थोतांड आहे. मेलेला मनुष्य कबरस्थानांतून कधींतरी उठूं शकेल काय ? जशीं थडग्यांमधील मनुष्यें उठूं शकत नाहींत, कोणाशीं संवाद करूं शकत नाहींत, तशीं कोणाच्या अंगांत प्रवेशहि करूं शकत नाहींत. या गप्पा फक्त अज्ञानी लोकांनींच पिकविलेल्या असतात व त्यांवर केवळ महाजंगली लोकच विश्वास ठेवतात. पण ही बायबली लीला पहा कीं, तीं कबरस्थ प्रेतें मोठ्यानें ओरडत उठलीं व येशूला म्हणालीं-आम्हांला त्या डुकरांच्या कळपांत पाठीव. येशूनें तसें केलें ! आतां या ठिकाणीं डुकरांची जी हत्या झाली व डुकरांच्या मालकांचें जें नुकसान झालें तें या सर्वांचें पाप येशूला लागलें तरीहि आमचा प्रभु येशू पापांची क्षमा करणारा व पवित्र आहे अशी खिस्त्यांची समजूत आहेच ! येशू पवित्र होता, तर त्या भूतानांच त्यानें पवित्र कां केलें नाहीं ? तसें केलें असतें तर कांहीं ठीक झालें असतें. तो जर न्यायी होता, तर निरपराधी असे जे डुकरांचे मालक त्यांची त्यानें व्यर्थ नुकसानी तरी कां केली व केली तर तिची भरपाई करणें हें त्याचें कर्तव्य नव्हतें काय ! आजकालचे सुशिक्षित पाश्चात्य लोक या भाकडकथांवर विश्वास ठेवीत असतील काय ? जर ठेवीत असतील तर तेहि अद्याप भ्रमजालांत अडकले आहेत म्हणावयाचें.

७०— आणि पहा, खाटेवर पडलेल्या कोणी एका पक्षपाती मनुष्यास त्याकडे आणिलें; तेव्हां येशू त्याचा विश्वास पाहून पक्षपात्याला म्हणाला. मुला, धीर धर; तुझ्या पापांची क्षमा झाली आहे. मी धार्मिकांस नाहीं, तर पाप्यांस बोलावयास आलो. —मत्तय अ. ९ ओ. २।१३

**समीक्षक**:—हीहि वरीलप्रमाणेंच असंभवनीय गप्प असून भोळया जनतेला येशूच्या जाळयांत अडकविण्याकरितां रचलेली आहे. पापाच्या क्षमेबद्दल जें लिहिलें आहे तें तर फारच विचित्र आहे. ज्याप्रमाणें मद्यप्यानें, किंवा अफीणबाजानें सेवन केलेल्या मद्य, अफू, भांग, गांजा याची नशा दुसऱ्याला येऊं शकत नाहीं त्याप्रमाणें एकाचें पाप सुटून तें दुसऱ्या कोणाला लागत नाहीं किंवा नष्ट होत नाहीं. ज्याचें त्यालाच तें भोगावें लागतें. असा न्यायी ईश्वराचा चोख न्याय आहे. जर एकाचें पापपुण्य दुसऱ्याला प्राप्त होत असेल तर मोठीच मौज होईल. आरोपीच्या अपराधाबद्दल न्यायाधीशाला कां शिक्षा मिळूं नये ? पण असें नाहीं हें खास ! ईश्वरानें पाप्याला यथावत् जर शासन केलें नाहीं व

त्याच्याबद्दल निष्पाप्याला केलें तर त्रिकाल ईश्वर अन्यायी होय. धर्मच मनुष्याला कल्याणप्रद आहे, सत्य आहे; तो येशू अथवा दुसरा कोणीहि नाहीं आणि धर्मात्म्याकरितां येशू इत्यादि मधल्या दलालांची मुळींच आवश्यकता नाहीं. तारण हें धार्मिकासाठींच आहे, पाप्याकरितां नव्हें; कारण पाप्यानें कृतकर्माचें फल भोगलेंच पाहिजे.

७१— तेव्हां त्यानें आपल्या बारा शिष्यांस जवळ बोलावून त्यांनीं अशुद्ध आत्म्यांस काढावें आणि सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारचीं दुखणीं बरीं करावी असा अधिकार दिला. कारण बोलणारे तुम्ही नाहीं, तर तुमच्या बापाचा आत्मा हाच तुम्हांमध्यें बोलणारा आहे. मी पृथ्वीवर शांतता चालवयास आलों असें समजू नका, परंतु तरवार चालवायास आलों. कारण 'पुत्र व बाप, कन्या व आई, सून व सासू यांत विरोध' पाडण्यास मी आलों.

—मत्तय अ. १० ओ. १३।३४ से ३६

**समीक्षक** :—ज्यानें येशू ख्रिस्ताला ३० रुपयांची लांच खाऊन पकडून दिलें व ऐन प्रसंगीं ख्रिस्ताला सोडून जे पळाले तेच हे ख्रिस्ताचे अत्यंत प्रिय असे बारा शिष्य होत ! अशुद्ध आत्मे काढणें, औषधाशिवाय रोग बरे करणें ह्या गोष्टी अज्ञानी लोकांच्या असून त्या सृष्टिक्रमाविरुद्ध असल्यामुळें असंभवनीय होत, हें आम्हीं वारंवार सांगितलेंच आहे. जर जीव बोलणारे नसून ईश्वर बोलणारा आहे तर जीव काय काम करीत असतो ? सत्य व असत्य भाषणाचें फल सुख व दुःख यांचा भोक्ता मग ईश्वरच ठरला. हा सिद्धांत देखील पूर्ण चुकीचा आहे. येशू जसा पृथ्वीवर शांतता स्थापन करण्यासाठीं आला नव्हता त्याचप्रमाणें आज त्याच्या शिष्यांकडून जगांत अशांतता नांदत आहे. 'जैसा गुरु तैसा चेला' हेंच खरें ! सांप्रत तरवारीचें राज्य आहे हें कोण अमान्य करील ? पितापुत्र, कन्या-माता, सासू-सुना, यांच्यामध्यें विरोध असल्यावर कोणतें कुटुंब सुखसमृद्ध राहणार आहे ? याच उपदेशानुसार पिता-पुत्रांची, कन्या-मातांची, सासू—सुनांची ताटातूट करून त्यांना दुःखांत लोटण्याचें सर्व श्रेय येशूभक्त घेत आहेत. पृथ्वीवर अशांतता, दुःख, कलह, झगडे चालविणारे असे आपले सच्छिष्य पाहून गुरूला खरोखर धन्यता वाटत असेल. कारण पृथ्वीवर अशांतता माजविणें त्याचें ब्रीदच होतें. हें काम मात्र श्रेष्ठ पुरुषांचें नव्हें.

७२—येशूनें त्यांस विचारिलें, तुम्हांजवळ किती भाकरी आहेत ? ते म्हणाले सात, व कांहीं मासोळ्या. मग त्यानें समुदायास जमिनीवर बसावयास सांगितलें आणि त्यानें त्या सात भाकरी व मासोळ्या घेऊन उपकारस्तुति करून त्या मोडिल्या व शिष्यांस दिल्या आणि शिष्यांनीं समुदायाला दिल्या मग ते सर्व जेवून तृप्त झाले आणि त्यांनीं उरलेल्या तुकड्यांचे सात टोपले भरून घेतले. जेवणारे तर बायका व लेकरें खेरीज करून चार हजार पुरुष होते.

—मत्तय अ. १५ ओ. ३४ ते ३९

**समीक्षक** :—आजकालच्या दांभिक व इंद्रजाल रचणाऱ्या लोकांच्या गोष्टीप्रमाणेंच वरील ख्रिस्तकहाणी आहे किंवा नाहीं तें पहा. भाकरीमध्यें दुसऱ्या भाकरी कोठून आल्या ? जर ख्रिस्तांस हें सामर्थ्य होतें तर चाळीस दिवसांच्या उपवासानंतर त्याला जेव्हां भूक लागली होती त्या वेळीं अंजिराचीं फळें शोधण्याकरितां तो कां भटकत होता आणि माती दगडधोंडे त्यांच्याच त्यानें पुरणपोळ्या कां बनविल्या नाहींत ? हे सर्व बालिश प्रकार होत. वेषधारी साधु संन्यांशी जसे बायाबापड्यांना फसवितात तसलाच हा प्रकार !

७३—त्यासमयीं 'तो प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कामाप्रमाणें फल देईल.' —मत्तय अ. १६ ओ. २७.

**समीक्षक**:—ज्याला ज्याला कर्मानुसारच फल मिळणार आहे. मग ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यानें पापांची क्षमा होणार आहे हा उपदेश व्यर्थ आहे. जर वरील उपदेश खरा असेल, तर हा खोटा होय कीं, क्षमा करण्यास योग्य असतील त्यांना क्षमा होईल, नसतील तर त्यांना नाहीं, असें जर कोणी म्हणेल तर हेंहि ठीक नव्हे; कारण सर्व कर्माचीं फळें यथायोग्य रीतीनें देणेंच न्याय व दया होय.

७४—तेव्हां येशूनें उत्तर दिलें कीं, अहाहा, अविश्वासी व कुटिल पिढी, मी कोठवर तुम्हांबरोबर असूं ? कोठवर तुमचें सोसूं ? कारण कीं, तुम्हांस खचीत सांगतों कीं जर तुम्हांमध्यें मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास आहे तर या डोंगराला एथून तिकडे सर, असें तुम्ही म्हटल्यास तो सरेल. तुम्हांला कांहीं असाध्य होणार नाहीं. मत्तय अ. १७ ओ. १७।२०

**समीक्षकः**—'अहो विधर्म्यांनों, या ख्रिस्ताला शरण या व मुक्त व्हा' असा ख्रिस्ती मिशनरी उपदेश करीत असतात. पण हा उपदेश वरील ख्रिस्तवाक्यानेंच सपशेल खोटा ठरतो. कारण प्रत्यक्ष ख्रिस्त सहवासांत जन्म घालविला असतांहि त्याचे शिष्य अविश्वासी व कुटिल राहिले ते राहिलेच. मग ख्रिस्तानंतरच्या हजारों वर्षांच्या ख्रिस्तशिष्याची गोष्टच बोलावयास नको. स्वतः ख्रिस्ताचे वेळेस जर त्याच्या शिष्याचे अंगीं मोहरीच्या दाण्याएवढाहि विश्वास त्याला आढळून आला नाहीं तर सांप्रतच्या ख्रिस्तशिष्यांता तो कसला असणार ?जर त्याच्याठायीं ख्रिस्तविश्वास आहे तर त्यांनीं एखादा डोंगर सारून दाखवावा, बिना औषधांचे रोगी बरें करून दाखवावेत. पण जेथें त्यांच्याजवळ मोहरीच्या दाण्याएवढाहि विश्वास नाहीं तेथें ह्या गोष्टी आजच्या ख्रिस्त्यांना साध्य व्हाव्यात कशा ? 'परोपदेशे पांडित्य' करावयाला त्यांचें काय नुकसान होतें ? झाला तर फायदाच होतो ! येशूच्या स्वतःच्या ठायीं पापमुक्त करण्याचें सामर्थ्य असतें, दुसऱ्यांच्या ठायीं विश्वास उत्पन्न करण्याची शक्ति असती, पवित्र बनविण्याची ताकत असती तर त्यानें आपल्या हयातींतच आपल्या शिष्याचे आत्मे निष्पाप, विश्वासी, पवित्र बनविले नसते काय ? जी कामगिरी तो स्वतः करूं शकला नाहीं ती म्हणे आतां त्याच्या शिष्याकडून होईल, असें समजणेंच चूक आहे. ख्रिस्तशिष्य मोहरीच्या दाण्याएवढाहि विश्वास बाळगीत नव्हते. अशा अविश्वासी लोकांकडून जें पवित्रशास्त्र बायबल रचलें गेलें आहे तें शास्त्र कितपत प्रमाण मानावें हा प्रश्नच आहे. कारण अविश्वासी, अपवित्रात्मे, अधर्मी लोकांचे लेख तसेच असणार. ज्यांना स्वतःचें कल्याण व्हावें अशी इच्छा आहे, त्यांनीं तरी त्यांवर विश्वास ठेवणें योग्य नाहीं. वरील ख्रिस्तवचन सत्य असेल तर आजच्या एखाद्या ख्रिस्ती मिशनऱ्याला एखादा डोंगर सारण्यास सांगावें, जर तो सरला तर, पूर्ण विश्वास नसला तरी मोहरीच्या दाण्याएवढा कां होईना, पण विश्वास आहे हें खास ! मुळींच न सरला तर अणुमात्रहि विश्वास नाहीं असें बेलाशक समजावें. ह्या ठिकाणीं असें जर कोणी म्हणेल कीं पहाड म्हणजे अभिमानादि दोष असें समजा, तरीहि ठीक नाही. कारण या ठिकाणीं असा अर्थ घ्यावयाचा तर प्रेतें, आंधळे, कुष्टरोगी, भूतग्रस्त यांना ख्रिस्तानें बरें केल्याच्या ज्या गोष्टी आहेत त्या ठिकाणीं आळसी, अज्ञानी, विषयी व भ्रान्त लोकांना उपदेश करून सचेत, कुशल असें ख्रिस्तानें बनविलें असा अर्थ कां घेऊं नये ? वास्तविक असें म्हणणें देखील धाडसाचेंच आहे. कारण स्वशिष्यांनाच त्यानें सचेत, कुशल असें कां केलें नाहीं ? याकरितां असंभव गोष्टींचा उपदेश करणें हें येशूचें अज्ञान प्रदर्शन होय. येशू ख्रिस्तांत विद्या असतीच तर असल्या मनमानेल त्या जंगली गप्पा तो कां मारतां ? तथापि (**निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते**) ज्याप्रमाणें वृक्षरहित देशांत एरंड सर्वापेक्षां उंच व उत्तम वृक्ष समजला जातो तद्वत्च महाजंगली अविद्वानांच्या देशांत येशूलाहि श्रेष्ठत्व प्राप्त होणें स्वाभाविकच होतें. परंतु सांप्रत काळीं बिचाऱ्या येशूचो गणना ती काय ?

७५—मी तुम्हांस खचीत सांगतों कीं, तुमचें मन फिरल्याशिवाय व तुम्ही बाळकासारखे झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यांत तुमचा प्रवेश होणारच नाहीं. —मत्तय अ. १८ ओ. ३

**समीक्षक**—आपल्या इच्छेवर फिरणें वा न फिरणें अवलंबून आहे व त्यायोगें स्वर्ग अगर नरक प्राप्त होतो हा तर वैदिकधर्माचा सिद्धांत झाला. मग ख्रिस्तावरील विश्वासानें पाप नष्ट होतें हें म्हणणें फोल ठरलें. खरें हें आहे कीं, कोणी कोणाचे पाप घेऊं शकत नाहीं. मात्र बाळासारखें मन झाल्याखेरीज म्हणजे ज्ञान अज्ञान न समजतां वागल्यानें स्वर्गप्राप्ति होते हें ख्रिस्ताचें म्हणणें अज्ञानद्योतक होय. ह्यावरून, बालकासमान सर्वांचीं मनें बनलीं, त्यांची सारासार बुद्धि जागृत झाली नाहीं, म्हणजे कोणीहि आपल्या उपदेशाविरुद्ध ब्र काढणार नाहीं, मग आपण सांगूं तीच अमावस्या मानतील, व डोळे झांकून ते आपले अनुयायी होतील असें ख्रिस्ताला वाटलें असावें, एवढेंच सिद्ध होतें. ख्रिस्ताच्या उपदेशाचाच हा परिणाम आहे कीं, बायबलांतील सृष्टिक्रमाविरुद्ध व अविद्याजनक असंभव गोष्टीवर त्याचे चेले विश्वास ठेवतात. ख्रिस्ताचा उपदेशच बालिश मग तो मानणारे बालिश कां नसावेत ? लोक असे बालिश बनावेत हीच ख्रिस्ताची इच्छा होती कारण त्याचे उपदेश बालकांना शोभणारे आहेत, विद्वानासाठीं नाहींत.

७६—मी तुम्हांस खचीत सांगतो कीं, स्वर्गाच्या राज्यांत धनवानाचा प्रवेश होणें कठीण आहे. आणखी तुम्हांस सांगतों, देवाच्या राज्यांत धनवानाचा प्रवेश होणें यापेक्षां उंटाला सूईच्या नाकांतून जाणें सोपें आहे.

 —मत्तय अ. १९ ओ. २३।२४

**समीक्षक:**—यावरून येशू दरिद्री होता असें सिद्ध होतें. धनवान लोकांमध्यें त्याची, कांहीं प्रतिष्ठा नव्हती. याकरितांच त्यानें असें लिहिलें. तथापि दारिद्री काय किंवा धनवान काय सर्वांमध्यें बरे वाईट लोक असावयाचेच. जो कोणी सत्कर्म करतो तो पुण्यवान व जो वाईट कामें करतो तो पापी होय. ईश्वराचें राज्य संबंध भूगोलावरच आहे. त्यामध्यें दरिद्री व श्रीमंत आहेत, पण येशूंची जन्मभूमि दरिद्री लोकांची असेल व अपवादादाखल श्रीमंतहि असतील. अशा श्रीमंतांना स्वर्गाचें दार येशूनें बंद ठेवलें परंतु त्यामध्यें संपत्तीनें श्रेष्ठ व आत्म्यानेंहि श्रेष्ठ असा एकहि नसेल काय ? परंतु येशूचें स्वर्गाचें राज्य सर्वव्यापक नव्हतें. यावरून ख्रिस्ताचा ईश्वर व त्याचें राज्य एकदेशी ठरलें. आणखी या वाक्यानें हेंहि सूचित होतें कीं, जितके श्रीमंत ख्रिस्ती लोक असतील त्यांना ईश्वराचें राज्य दुष्प्राप्य ठरलें. अरेरे, ते सर्व नरकांत जातील व दरिद्री ख्रिस्ती लोकांनीं मात्र बेधडक स्वर्गांत जावें ना ! येशू ख्रिस्तानें थोडा तरी विचार केला असता तर त्याला कळून आलें असतें कीं, दरिद्र्याजवळ जशी सारासारबुद्धि, विवेक, पापाभीरुता व ईश्वरनिष्ठा असते तशीच श्रीमंताजवळहि असते. उलट दरिद्री लोकांजवळ ही साधनसामग्री कमीच असते. त्यांना बिचाऱ्यांना पोटाचीच मारामार, अशी स्थिति म्हणूनच 'बुभुक्षितः किं न करोति पापं' या न्यायानें पापें झालीं तर तीं दरिद्र्यांकडूनच सहसा ज्यास्त व्हावयाचीं. श्रीमंत तर स्वतः पापभिरू राहूनहि शक्य तों अनाथ, दरिद्री यांना मदत करील किंवा अन्य धर्ममार्गी पैशाचा व्यय करील पण येशू ख्रिस्तानें श्रीमंतांना स्वर्गाच्या राज्यांतील प्रवेश कठीण व दरिद्र्यांना सहज साध्य सांगितला आहे, म्हणून ख्रिस्तानुयायांनीं दरिद्री होण्याचीच धडपड करावी.

७७—येशूनें त्यांस म्हटलें, मी तुम्हास खचीत सांगतों कीं, पुनरुत्पत्तींत मनुष्याचा पुत्र आपल्या गौरवाच्या सिंहासनावर बसेल तेव्हां माझ्या मागून चालत आलेले तुम्हीहि बारा सिंहासनावर इस्राएलाच्या बारा वंशांचा न्याय कराल. आणि ज्या कोणी घरें किंवा भाऊ किंवा बहिणी किंवा बाप किंवा आई किंवा लेकरें किंवा शेतें माझ्या नांवा-करितां सोडिलीं आहेत, त्याला शंभरपट मिळेल. व सार्वकालिक जीवन हें वतन मिळेल. —मत्तय अ. १९ ओ. २८।२९

**समीक्षक:**–आतां ख्रिस्ताची विचित्र लीला पहा ! मेल्यानंतरहि लोकांनीं आपल्या मोहजालांतून निसटूं नये, म्हणून येशूनें थापा देण्यास प्रारंभ केला आहे. आपल्या मागून चालत आलेले तुम्ही बाराहि जण आपण ज्या सिंहासनावर बसेन त्यावरच आपल्याजवळ बसा असें तो म्हणतो. ह्या शिष्यामध्यें ३० रुपयांच्या लालुचीनें स्वगुरुद्रोह करून येशूला पकडून देणारा नराधम पापी शिष्य देखील आहे. अशा शिष्यागणासह ख्रिस्ताची स्वारी सिंहासनावर न्यायदाना-साठीं आरूढ होणार आहे. न्यायदिनीं इस्राएल कुलाशिवाय इतर कुलांचा व जातींचा सूड उगवला जाणार आहे. इस्राएल कुलाच्या अभिमानानें त्याचा न्याय न करितां त्यांना सर्व गुन्हे माफ आणि अन्य कुलांचा न्याय होईल ! यावरून अनुमान हेंच निघतें कीं, ख्रिस्ती लोक न्याय देतांना स्वजातीचा पक्षपात करितात म्हणूनच एखाद्या गोऱ्यानें काळ्या मनुष्याचा खून केला तर गोरा मनुष्य निरपराधी होऊन बहुधा सुटतो. ज्याप्रमाणें गोऱ्या ख्रिस्तानुयायांचा विचित्र न्याय त्याप्रमाणें त्यांच्या स्वर्गीय सद्गुरूचा स्वर्गीय खासा न्याय ! या न्यायदानांत आणखी एक मोठा दोष उत्पन्न होतो तो असा कीं, एक मनुष्य सृष्टिच्या मध्यकालीं मृत्यु पावला व ऐक न्यायाच्या आदल्या दिवशीं मेला तर जो मध्यकालीं मेला तो बिचारा न्यायाच्या दिवसाची वाट पहात शेंकडों वर्षें स्वस्थानींच तडफडत राहील व जो न्याय-दिनाच्या आदल्या दिवशीं मरेल त्याचा २४ तासांत झटपट न्याय होईल. हा न्याय कां न्यायाचा फार्स ?आमच्यामतें हा घोर अन्याय होय आणि जो नरकांत जाईल तो सर्वकाळ नरकांतच जाईल व स्वर्गांत जाणारा सर्वकाळ स्वर्गांतच राहील. हा देखील न्यायाचाच ऐक प्रकार म्हणायचा काय ? वास्तविक रीतीनें ज्या साधनांना व कर्मांना अंत आहे त्यांच्या फलांनाहि अंत असलाच पाहिजे. दोन जीवाचें पापपुण्य कधींहि समान असूं शकत नाहीं. ऐखाद्याचें पुण्य दुसऱ्याच्या पापापेक्षा कमीजास्त असणारच किंवा दुसऱ्याचें पाप ऐखाद्याच्या पुण्यापेक्षां न्यूनाधिक असणार; पण शिक्षा मात्र समान याकरितां तारतम्य न्यायानें अधिक न्यून सुखदुःखवाले, अनेक स्वर्ग व नरक हे असावेत, तरच सुखदुःखें भोगतां येतील पण ही व्यवस्था ख्रिस्ती शास्त्रांत नसल्यामुळें हें शास्त्र ईश्वरकृत आहे वा ख्रिस्त न्यायाधीश हे ईश्वराचे चिरंजीव आहेत; ह्या सर्व गोष्टी खोट्या होत. आणखी ऐक विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे कोणाचेहि आईबाप शंभर शंभर

असूं शकत नाहींत. पण ख्रिस्तराज भावीक भक्तांना थाप देत आहेस कीं, ' मजकरितां तुम्ही आपले आईबाप, बहिण-भाऊ वगैरे सर्व सोडून द्या कारण मी तुम्हांला त्यांच्या ऐवजीं शंभरपच देईन.' मुसलमानी शास्त्रांत स्वर्गामध्यें एकेकाला ७२-७२ बायका मिळतात असें जें वर्णन आहे, त्यावरूनच मात्थीनें हें अत्यंत ' शुभवर्तमान ' सांगितलें असेल.

*७८—मग सकाळीं तो परत नगरांत येत असतां त्याला भूक लागली आणि वाटेवर एक अंजिराचें झाड पाहून तो त्याकडे गेला; पण पानांवांचून त्यावर कांहीं मिळालें नाहीं; मग त्यानें त्याला म्हटलें यापुढें तुला कधीं फळ न येवो, आणि तागलेंच तें अंजिराचें झाड वाळून गेलें.* —मत्तय अ. २१ ओ. १८।१९

**समीक्षक:**—सर्व लहान मोठे ख्रिस्तभक्त मोठया आढ्यतेनें ख्रिस्ताची शांति व क्षमा रसभरीत रीतीनें वर्णन करीत असतात. ह्यांचा गुरु फार क्षमाशील व फारच शांततेचा पुतळा, त्याला राग क्रोध कसा तो शिवला नाहीं. परंतु वरील प्रकारावरून त्यांची शांतता ठळकपणें दृग्गोचर होत आहे. येशू शांतशील तर नव्हताच पण क्रोधी होता व ऋतुविषयीचें त्याला ज्ञानहि नव्हतें. येशूच्या क्षुधाशांतिस्तव ऋतुनें आपलें नियमित कार्य सोडून द्यावयाचें होतें असें ह्या ईश्वरपुत्राला वाटलें काय ? भूकेनें व्याकुळ झाल्यामुळें तो अजिरांजवळ गेला पण तेथें फक्त पानेंच राहिलेलीं ! मग काय विचारतां शांतीनें खांबीं प्राण सोडणारा ईश्वरपुत्र खवळला व वृक्षा तुझें भस्म होवो म्हणतांच अंजिराचें झाड एकदम वाळून गेलें केवढा हा पराक्रम ! झाडानें ईश्वरपुत्राचा केवढा मोठा अपराध केला ! बरें, बेट्याला प्रायश्चित्त मिळालें. झाडाचें तर ठीक पण ही कृति साधारण मनुष्याला तरी शोभतें काय ? शापानें जर झाड वाळलें तर, मग आशीर्वादानें त्याला फळें आलीं नसतीं काय ?

७९—त्या दिवसांतील संकटामागून लागलाच ' सूर्य अंधकारमय होईल व चंद्र प्रकाश देणार नाहीं, व तारे आकाशांतून पतन पावतील, व आकाशांची बळें डळमळतील.' —मत्तय अ. २४ ओ. २९

**समीक्षक:**—वाहवाह येशू महाराज ! तारे पतन पावतात व आकाशींचीं बळ ( सैन्यें ) डळमळतात हें ज्ञान कोणत्या विद्येनें तुम्ही प्राप्त केलें, कोण जाणें ? येशूला थोडा बहुत तरी विद्येचा गन्ध असतां तर हे सर्व तारे खगोलांतर्गत आहेत; ते पडत नसतात हें त्याला अवश्यमेव ज्ञान झालें असतें. येशू हा सुताराचा मुलगा असल्याकारणानें लांकडें फोडणें, त्यांचो चिरफाड करणें, तोडजोड करणें हाच त्याचा वास्तविक धन्दा परंतु आपण ह्या अडाणी देशांत पैगम्बर व्हावें अशी त्याला लहर आली. बस्स, मग काय उशीर, लागला गप्पाष्टकें झोडायला ! त्याच्या मुखांतून कित्येक वचनें चांगलीं व बोधप्रदहि निघालेलीं आहेत व पुष्कळशीं असंभव आहेत. तेथील लोक जंगली होते, त्यांनीं त्याचें सर्व म्हणणें ब्रह्मवाक्य मानलें. सांप्रत युरोपादि पाश्चात्य देश ज्याप्रमाणें विद्यासंपन्न उन्नतियुक्त आहेत; त्याप्रमाणें पूर्वी असते तर त्याच्यापुढें येशूचें सिद्धपण कांहींच चाललें नसतें. आतां पाश्चात्यांना ख्रिस्ताचें अगाध ज्ञान कळून चुकलें आहे. तथापि व्यवहार व खोटा देशाभिमान, धर्माभिमान वगैरे दुराग्रहांत ते फसले आहेत एवढेंच. पाश्चात्यांनीं हट्टास न पेटतां सर्वथैव सत्य अशा वेदमार्गाचा अवलंब करुन भौतिक उन्नतिबरोबर आध्यात्मिक उन्नत्ति करावी. आध्यात्मिक उन्नत्तीचीच त्यांच्यांत काय ती उणीव आहे.

८०—आकाश व पृथ्वी नाहींशीं होतील, परंतु माझीं वचनें नाहींशीं होणार नाहींत. —मत्तय अ. २४ ओ. ३५

**समीक्षक:**—हीहि फिलॉसफी वरीलप्रमाणेंच अविद्यायुक्त व मूर्खपणाची आहे. आकाश नाहींसें कसें होईल ? जर आकाश अतिसूक्ष्म आहे व तें नेत्रांनाहि पाहतां येत नाहीं तर त्याचें डळमळणें कोणाला दिसेल ? स्वतःच्या मुखानें स्वतःची बढाई मारणें हें विद्वान् व शहाण्या मनुष्याचें काम नव्हें.

८१—मग डावीकडल्यांसही तो म्हणेल, अहो शापग्रस्तहो, सैतान व त्याचे दूत यासाठीं जो सार्वकालिक अग्नि सिद्ध केला आहे त्यांत माझ्यापुढून जा. —मत्तय अ. २५ ओ. ४१

**समीक्षक:**—आपल्या *शिष्यांना स्वर्ग व शिष्येतरांना सार्वकालिक अग्नि ही योजना पक्षपाताची नव्हे काय ?* अध्याय २४ मध्यें सांगितल्याप्रमाणें आकाश नाहींसें झाल्यावर सार्वकालिक अग्नि व स्वर्ग कोठें राहाणार आहे ? सैतान व त्याचे दूत यांना ईश्वरानें निर्माणच केले नसते, तर सार्वकालिक अग्नीची तरी त्याला यातायात कां करावी लागती ?

ज्या ईश्वराला य:कश्चित् सैतानानें भीक घातली नाहीं तो ईश्वर तरी कसला ? कारण सर्वसमर्थ ईश्वरानें प्रारंभींच सैतानाला पकडून बन्दीगृहांत ठेवलें असतें तर चाललें नसतें काय ? पण ख्रिस्त्यांचा ईश्वर सैतानाला बन्दीगृहांत ठेवूं शकला नाहीं व मारूं शकला नाहीं. त्याला उत्पन्नच कां होऊं दिलें ? या दुष्ट सैतानानें ईश्वराचे प्यारे चिरंजीव ख्रिस्त महाराज यांना ४० दिवस दुःख दिलें तरी पित्याला सैतानाचा बंदोबस्त करणें शक्य झालें नाहीं. जेथें बापाची ही स्थिति तेथें पुत्राला थोडाच सैतान दाद देणार ? हा बाप म्हणजे ईश्वर नव्हे व येशूख्रिस्त म्हणजे ईश्वरपुत्र नव्हे. आणि या सर्वांवरून बायबलोक्त ईश्वर हा परमेश्वर होऊं शकत नाहीं.

८२—तेव्हां यहुदा इस्कारयोते नांवाच्या बारांतील एकानें मुख्य याजकाकडे जाऊन म्हटलें, मी त्याला धरुन तुमच्या स्वाधीन केले तर मला काय द्याल ? त्यांनीं त्याला तीस रुपये तोलून दिले. —मत्तय अ. २६ ओ. १४।१५

**समीक्षक:**—येशूचें सर्व कौशल्य व ईश्वरीयत्व या ठिकाणीं खासें सिद्ध होत आहे, तें पहा. ख्रिस्ताच्या सहवासांत रात्रंदिन राहात असतांहि जर त्याच्या शिष्यसंघांतील प्रमुख शिष्य यहूदा पवित्रात्मा बनला नाहीं तर येशूच्या मरणानंतरचे शिष्य किती पवित्रात्मे बनले असतील याचा विचार करा. येशू ख्रिस्तावर अंधपणें विश्वास ठेवणारे लोक किती फसत आहेत तेंहि पहा. मूर्तिमंत जिवंत असतां ज्यानें आपल्या शिष्यांची सुधारणा व कल्याण केलें नाहीं. तो मेल्यावर आपल्या शिष्यांचें काय कल्याण करील तें उघडच आहे.

८३—आणि तो भोजन करीत असतां येशूनें भाकर घेऊन व आशीर्वाद देऊन ती मोडिली, आणि शिष्यांस देऊन म्हटलें, घ्या, खा, हें माझें शरीर आहे. आणि त्यानें प्याला घेतला व उपकारस्तुति करुन तो त्यांस दिला, व म्हटलें सर्व तुम्ही त्यांतील प्या. हें माझें 'कराराचें रक्त' आहे. —मत्तय अ. २६ ओ. २६।२७।२८

**समीक्षक:**—अविद्वान् जंगली मनुष्यशिवाय असा उपदेश कोण करील ? खावयाच्या भाकरीला मांस व पेयाला रक्त कोण म्हणूं शकेल ? परंतु सुधारणेच्या कळसास पोंहचल्याच्या गोष्टी करणारे आजकालचे ख्रिस्ती लोक या प्रकाराला 'प्रभुभोजन' संबोधून येशूच्या रक्तमांस-सेवनानें ढेकर देत असतात. जे आपल्या गुरुचें रक्तमांस खाण्यास सोडीत नाहींत ते इतरांचा काय मुलाजा राखतील ?

८४—मग त्यानें पेत्र व जब्दीचे दोघे पुत्र यांस बरोबर घेतलें आणि तो खिन्न व अति कष्टी होऊं लागला. तेव्हां त्यानें त्यास म्हटलें 'माझा जीव' मरणप्राय 'अति खिन्न' झाला आहे, तुम्ही एथें राहा व माझ्याबरोबर जागृत असा. मग कांहींसा पुढें जाऊन पालथा पडला. आणि त्यानें अशी प्रार्थना केली कीं, हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला मजवरून टळून जावो. —मत्तय अ. २६ ओ. ३७ ते ३९

**समीक्षक:** पहा, जर तो साधारण मनुष्य नसतां व ईश्वराचा पुत्र असतां व त्रिकालदर्शी, विद्वान् असतां तर असल्या हास्यास्पद चेष्टा न करतां. यावरून येशू हा ईश्वर होता, तो त्रिकालज्ञ होता तो पापांची क्षमा करणार आहे, वगैरे वाग्जाल येशूनें किंवा त्याच्या शिष्यांनीं उगाचच खोटेंनाटें बनविलें आहे, हें स्पष्ट कळून येतें. येशू हा साधारण, अडाणी असा एक मनुष्य होता. तो विद्वान् नव्हता, योगी नव्हता व सिद्धहि नव्हता.

८५—तो बोलत आहे इतक्यांत, पहा, बारांतील एक जो यहूदा तो आला; आणि त्या संगतीं मुख्य याजक व लोकांचे वडील यांकडला मोठा समुदाय तरवारी व सोटे घेऊन आला. त्याला धरुन देणारा यानें त्यांस खूण सांगून ठेविली होती; ती अशी कीं, मी ज्याचें चुंबन घेईन तोच तो आहे. त्याला धरा. लागलेच त्यानें येशूजवळ येऊन हे गुरु, सलाम, असें म्हणून त्याचे पुष्कळ चुंबन घेतलें येशूनें त्याला म्हटलें, गड्या, ज्या करितां आलास तें कर. तेव्हां त्यांनीं जवळ येऊन येशूवर हात टाकून त्याला धरिलें. त्यावेळीं त्याचे बाकीचे शिष्य दूर पळाले. देवाचें देऊळ मोडावयास व तीन दिवसांत तें बांधावयास मी समर्थ आहे असें ह्यानें म्हटलें. तेव्हां प्रमुख याजक उठून त्याला म्हणाला, तूं कांहींच उत्तर देत नाहींस काय ? हें तुझ्याविरुद्ध कशी साक्ष देतात ? तथापि येशू उगाच राहिला. यावरून प्रमुख याजकानें त्याला म्हटलें, मी तुला जीवंत देवाची शपथ घालून विचारितों कीं, देवाचा पुत्र ख्रिस्त तो तूं आहेस कीं,

नाहींस हें आम्हांस सांग. येशू त्याला म्हणाला तूं म्हटलेंस तसेंच. आणखी मी तुम्हांस सांगतों, यापुढें तुम्ही 'मनुष्याच्या पुत्राला पराक्रमाच्या उजवीकडे बसलेला व आकाशाच्या मेघांवर बसून येताना' पाहाल, तेव्हां प्रमुख याजकानें आपलीं वस्त्रें फाडून म्हटलें यानें दुर्भाषण केलें आहे; आम्हांस आणखी साक्षी कशास पाहिजेत ? पहा, आतां तुम्ही हे दुर्भाषण ऐकिलें आहे. तुम्हांस कसें वाटतें ? त्यांनीं उत्तर दिलें कीं, मरणदंडास पात्र आहे. तेव्हां ते त्याच्या तोंडावर थुंकले व त्यांनीं त्याला बुक्या मारिल्या; आणि कोणी त्याला चपडाका मारून बोलले, अरे ख्रिस्ता, आम्हांशीं अंतर्ज्ञानानें बोल; तुला कोणी मारिलें ? इकडे पेत्र तर वाड्यांत बाहेर बसला होता. तेव्हां एक दासी त्याकडे येऊन म्हणाली, तूंही गालीलकर येशूबरोबर होतास. तो सर्वांच्या समोर नाकावरून बोलला, तूं जें म्हणतेस तें मला ठाऊक नाहीं. मग तो बाहेर देवडीवर गेल्यावर दुसरीनें त्याला पाहून तेथल्या लोकांस म्हटलें हाहि नासोरी येशूबरोबर होता. पुनः तो शपथ वाहून नाकावरून बोलला कीं, मी त्या मनुष्याला ओळखीत नाहीं. —मत्तम.अ. २६ ओ. ४७ ते ५०,५६ व ६१ ते ७२.

**समीक्षक** :—ज्याला आपल्या अनुयायांच्याठायीं दृढ विश्वास उत्पन्न करतां आला नाहीं त्याचें सामर्थ्य व प्रताप कितपत होता, याचा वाचकांनींच विचार करावा. अनुयायी तरी किती प्रामाणिक ! वास्तविक त्यानीं आपल्या गुरुबरोबर प्राण द्यावयाचे तें बाजूस राहून, एक लांच खावून पकडून देतो तर एक येशू हा कोण आहे हें आपणाला मुळींच माहीत नाहीं म्हणतो व खोट्या शपथा वाहतो. बायबलांत वर्णिल्याप्रमाणें येशू ख्रिस्ताच्या अंगीं चमत्कार करून दाखविण्याचें सामर्थ्य नव्हतें असें दिसतें. जर तसें असतें तर बायबलांत एका ठिकाणीं सांगितलें आहे कीं, लुकाचें घरीं त्याच्या पाहुण्यांना मारण्याकरिता कित्येकजन आले होते, पण त्यावेळीं ईश्वराच्या दूतानें त्या मारेकऱ्यांना अंध बनविले. ही गोष्ट असंभव असली तरी तसलाच प्रयोग ईश्वराच्या दूतानीं आपल्या स्वामीपुत्रास वांचविण्यासाठीं यावेळीं करावयास पाहिजे होता, किंवा ख्रिस्ताच्या सामर्थ्यानें तो घडून यावयास पाहिजे होता. परंतु एवढेंहि ख्रिस्ताकडून झालें नाहीं. पण त्याच्या अनुयायांच्या बढाया, कोटिक्रम, लंगडी वकिली इत्यादि ऐकल्यावर हसूं येतें. असे हालहाल होऊन मरण्यापेक्षां समाधि वा दुसऱ्या एखाद्या विहित मार्गानें येशूनें प्राण द्यावयाचा होता. पण विद्या व ज्ञान याखेरीज तशी बुद्धि निर्माण कशी होईल ? तोच येशू म्हणतो—

८६—मला आपल्या बापाजवळ मागतां येत नाहीं, आणि आतां तो मला दूताच्या बारा सैन्यापेक्षां अधिक पाठवून देणार नाहीं असें तुम्हांला वाटतें काय ?

**समीक्षकः**—येशू ख्रिस्त बापाच्या बढाया सांगतो, लोकांस धमक्या देतो, पण स्वतः मात्र किंकर्तव्यमूढ बनून 'हा प्याला मजवरून टळून जावो' अशीच इच्छा बाळगतो; ही अत्यंत आश्चर्याची गोष्ट आहे. नच टळला तर ईश्वरेच्छा ! देवपुत्र खरा ! याजकानें विचारलें असतां स्तब्ध राहतो व तूं म्हणतोस तसेंच हें उत्तर देतो. परंतु आपण ईश्वरपुत्र आहों, असें शपथेवर सांगण्यास तयार होईना. यापूर्वी शेंकडो वेळेस आपण ईश्वराचा पुत्र आहों अशा वल्गना येशू ख्रिस्तानें केलेल्या होत्या. ज्यांनीं ख्रिस्ताचा छळ करून त्याला मारिलें त्यांचेंहि कृत्य उचित नव्हतें, कारण देहांत प्रायश्चित्त देण्याइतका त्याचा भयंकर अपराध नव्हता. परंतु ते देखील जंगली लोकच होते. त्यांना न्याय व अन्याय कसा समजावा ? जर ख्रिस्तानें आपण ईश्वराचा पुत्र आहों, असा खोटानाटा उपदेश केला नसता व त्याच्या शत्रूंनीं त्याचे हालहाल केले नसते तर उभयतांनाहि तें भूषणावह झालें असतें. परंतु त्यांच्याजवळ इतकी विद्या धर्मात्मता व न्यायशीलता कोठून आणावी !

८७—येशू सुभेदाराच्या पुढें उभा राहिला असतां सुभेदारानें त्याला विचारलें, तूं यहुद्यांचा राजा आहेस काय ? येशूनें त्याला म्हटलें, तूं म्हणतोस तसेंच. मुख्य याचक व वडील हे त्यावर दोषारोप करीत असतां त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं, तेव्हां पिलात त्याला म्हणाला, हे लोक तुझ्याविरुद्ध किती गोष्टींची साक्ष देतात, हें तूं ऐकत नाहींत काय ? परंतु त्यानें त्याला कांहीं उत्तर दिलें नाहीं. एका शब्दानेंहि नाहीं; यावरून सुभेदाराला फार आश्चर्य वाटलें. पिलातानें त्यांस म्हटलें, तर ख्रिस्त म्हटलेल्या येशूचें मीं काय करावें ? सर्व म्हणाले त्याला वधस्तंभीं द्यावें. तो म्हणाला, कां ? त्यानें काय वाईट केलें ? ते फारच ओरडतच म्हणाले, त्याला वधस्तंभीं द्यावें. तेव्हां आपलें

कांहींच चालत नाहीं, उलट अधिकच गडबड होत आहे असें पाहून पिलातानें पाणी घेऊन समुदायासमोर हात धुऊन मी या धार्मिक मनुष्याच्या रक्ताविषयीं निर्दोष आहे. तुमचें तुम्ही पहा, असें म्हटलें. सर्व लोकांनीं उत्तर दिलें कीं, त्याचें रक्त आम्हांवर व आमच्या लेंकरांवर असो. तेव्हां त्यानें त्याकरितां बरब्बाला सोडिलें व येशूला फटके मारुन वधस्तंभीं देण्याकरितां सोपून दिलें नन्तर सुभेदाराच्या शिपायांनीं येशूला कचेरीं नेलें आणि सगळें पलटण मिळवून त्यावर आणिलें. आणि त्यांनीं त्याचीं वस्त्रें काढून त्याच्या अंगांत किरमिजी झगा घातला. व कांट्यांचा मुगुट गुंफून त्याच्या मस्तकीं घातला. व त्याच्या उजव्या हातांत वेत दिला, आणि त्याच्यापुढें गुढघे टेकून हे यहूद्यांच्या राजा, जय जय ! असें म्हणून त्यांनीं त्याची थट्टा मांडिली. आणि ते त्यावर थुंकलें व तो वेत घेऊन त्याच्या मस्तकावर मारूं लागले. मग त्याची थट्टा चेल्यावर त्यांनीं त्याच्या अंगांतून तो झगा काढून त्याचीं वस्त्रें त्याच्या अंगांत घातलीं, आणि त्याला वधस्तंभीं देण्याकरितां नेलें.

आणि गुलगुलता नांवाची जागा, म्हणजे कवटीची जागा, एथें येऊन पोंहोंचल्यावर त्यांनीं त्याला ' पित्तमिश्रित' द्राक्षारस प्यावयास दिला, परंतु तो चाखून पाहिल्यावर तो पिईना. त्यांनीं त्याच्या दोषारोपाचा लेख त्याच्या डोक्याच्या वर लाविला; तो असा कीं, हा यहुद्यांचा राजा येशू आहे, नंतर त्यांनीं त्याबरोबर दोन लुटारू एक उजवीकडे व एक डावीकडे असे वधस्तंभीं दिले, आणि जवळून जाणाऱ्यांनीं ' डोकीं डोलवीत ' त्याची अशी निंदा केली कीं, अरे देऊळ मोडून तीन दिवसांत बांधणाऱ्या तूं आपलें तारण कर; तूं देवाचा पुत्र असलास तर वधस्तंभावरून खालीं ये. तसेंच मुख्य याजकहि, शास्त्री व वडील यांसहित थट्टा करीत म्हणाले कीं, त्यानें दुसऱ्यांचें तारण केलें, त्याला आपलें तारण करवत नाहीं; तो इस्राएलाचा राजा आहे, त्यानें आतां वधस्तंभावरुन खालीं यावें, म्हणजे आम्ही त्यावर विश्वास ठेवूं, तो देवावर भरंवसा ठेवतो त्याला तो प्रिय असला तर त्यानें त्याला आतां सोडवावें.' कारण मी देवाचा पुत्र आहे असें तो म्हणाला. जे लुटारु त्याच्या बरोबर वधस्तंभीं दिले होते त्यांनींहि त्याची तशीच निंदा केली. मग दोन प्रहरांपासून तिसऱ्या प्रहरापर्यंत सर्व देशावर अंधार पडला. आणि सुमारें तिसऱ्या प्रहरीं येशू मेठ्यानें आरोळी मारीत बोलला, ' एली एली, लमा शबकनी,' म्हणजे माझ्या देवा माझ्या देवा, तूं माझा कां त्याग केलास ? ' जे तेथें उभे होते त्यांतील कित्येकांनीं हें ऐकून म्हटलें कीं, तो एलीयाला बोलावितो त्यांतून एकानें लगलेंच धांवत जाऊन स्पंज घेतलें, आणि ' आंबेनें ' भरुन वेतावर ठेवून, त्याला ' प्यावयास दिलें ' वरकड म्हणाले, असूं दे. एलीया त्याला तारायास येतो कीं नाहीं हें आपण पाहूं. मग येशूनें पुनः मोठ्यानें ओरडून प्राण सोडिला.

—मत्तय अ. २७ ओ. ११ ते १४; २२ ते ३१; ३३, ३४; ३७ ते ५०

**समीक्षक:**—त्या दुष्ट लोकांनीं येशू ख्रिस्ताचा जो छळ केला तो सर्वथैव इष्ट असा नसून दूषणास्पद आहे. यामध्यें लोकांचा तर दोष आहेच पण येशू ख्रिस्त हा पूर्ण निर्दोषी होता असें नव्हें. कारण ईश्वर हा कोणाचा बाप नाहीं, ना त्याचा कोणी पुत्र आहे. जर तो अमुक एखाद्याचा बाप असेल तर कोणाचा तरी सासरा, मेहुणा, सोयरा—धायराहि असलाच पाहिजे. याकरितां मुख्य याजकानें विचारतांच खरें खरें उत्तर देणें येशूचें काम होतें. लोकांनीं त्याची निंदा केली ती अयोग्य नव्हती कारण यंव केलें, त्यंव केलें अशा दर्पोक्ति स्वतः ख्रिस्तानें काढल्या होत्या व त्याचे शिष्य अद्यापिहि काढतात. त्या खऱ्या असल्या किंवा शूर देवाचा एकुलता-एक लाडका पुत्र तो असतां तर ' देवा देवा सोडीव ' अशा हृदयद्रावक किंकाळ्या न मारतां. लोकांनीं म्हटल्याप्रमाणें वधस्तंभावरून खालीं आला असतां व सर्वांना त्यानें आपले शिष्य बनविलें असतें. ईश्वर जर त्याचा खराखरा बाप असता तर स्पुत्राचे असे झालेले हाल त्याला खचित पाहवले नसते. येशू जर त्रिकालदर्शी असता तर ' पित्तमिश्रित द्राक्षरस ' चाखून पाहण्याची गरज नव्हती प्रथम त्याला तो कसा आहे हें कळलें असतें. ईश्वरपुत्राच्या तोंडून, ईश्वरा, ' तूं माझा कां त्याग केलास ? ' असें चुकून तरी उद्गार निघणें शक्य आहे काय ? हा सर्व प्रकार भविष्य वर्तविल्याप्रमाणेंच घडावयाचा होता म्हणून येशू वधस्तंभावरून खालीं न येतां तिसऱ्या दिवशीं कबरस्थानांतून उठून तो स्वर्गांत गेला, असा ख्रिस्ताचे अनुयायी गप्पा मारीत असतात. जें भविष्य त्याच्या अनुयायांला माहीत तें येशूला स्वतःला माहित नव्हतें हें जगांतील एक अपूर्व

असें 'आश्चर्य' आहे. त्याला संबंध आयुष्यांत केव्हां तरी हें भविष्य कळतें असतें तर देवानें आपला त्याग केला किंवा काय अशी शंका त्यानें प्रदर्शित केली नसती व मोठ्या आनंदानें व शांतीनें त्यानें प्राण सोडला असता.

या सर्व हकीगतीवरून अखेर सत्याचाच शेवटीं जय व्हावयाचाच या अटल नियमाप्रमाणें येशूची थोरवी, त्याचें ईश्वरपुत्रत्व, त्याचे चमत्कार व त्याच्या बढाया ह्या सर्व फोल ठरून साधारणशा गुन्हेगाराप्रमाणेंच तो फांसावर लटकला व इतरांप्रमाणें मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतरची त्याच्या अनुयायांनीं 'कादंबरीवजा' कितीहि रसभरीत हकीगत लिहून ठेवली असली तरी तिची किंमत हिंदूंच्या पुराणांतील भाकडकथांपेक्षां खास जास्त चित्तवेधक व मनोरंजक नाहीं.

८८—आणि, पाहा, मोठा भूमिकंप झाला; कारण प्रभूच्या दूतानें स्वर्गांतून उतरून येऊन धोंड एकीकडे ठेवली आणि तीवर तो बसला. तो एथें नाहीं, कारण सांगितल्याप्रमाणें तो उठला आहे. या, प्रभु निजला होता तें हें स्थल पाहा. मग पाहा, येशू त्यांस भेटून म्हणाला, कल्याण असो. त्यांनीं जवळ जाऊन, त्याचें चरण धरून त्यास नमन केलें. तेव्हां येशूनें त्यांस म्हटलें भिऊं नका. जा आणि हें माझ्या भावांस सांगा; यासाठीं कीं त्यांनीं गालीलांत जावें, तेथें मी त्यांच्या दृष्टीस पडेन. इकडे अकरा शिष्य गालीलांत जो पर्वत येशूनें नेमिला होता त्यावर गेले. आणि त्यांनीं त्याला पाहून नमन केलें तरी कित्येकांस संशय वाटला. तेव्हां येशू जवळ येऊन त्यांस असें म्हणाला, मला स्वर्गांत आणि पृथ्वींवर सर्व अधिकार दिला आहे. जें सर्व कांहीं मी तुम्हांस आज्ञापिलें तें पाळायास त्यांस शिकवा; आणि, पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सदोदित तुम्हां बरोबर आहे.

—मत्तय अ. २८ ओ. २, ६, ९, १०, १६, १७, १८, २०

**समीक्षक**—बायबली गप्पा विचित्र तर खऱ्याच ! स्वर्ग म्हणजे काय कलेक्टर साहेबांची कचेरी आहे कां ईश्वराचे दूत म्हणजे कलेक्टर अथवा मामलेदाराचे चपराशी आहेत ? येशू त्याच शरीरानें उडून स्वर्गास कसा गेला ? संपूर्ण ७२ तास प्राणोत्क्रमणानंतर लोटल्यावर तें शरीर दुर्गंधरहित राहिलें असेल काय ? स्वमुखानें स्वतःची प्रशंसा करणें हें दांभिकतेचें लक्षण होय ! येशूप्रमाणें आतांचें मुडदे जिवंत होऊन स्वर्गांत कां बरें जात नाहींत ? येथपावेतों मत्तयकृत शुभवर्तमानाविषयीं लिहिलें आतां पुढें इतरांविषयीं लिहूं.

## मार्ककृत शुभवर्तमान

८९—जो सुतार, मरीयेचा पुत्र, आणि याकोब व योसे व यहुदा शिमोना यांचा भाऊ तो हाच ना ? आणि याच्या बहिणी येथें आपणाबरोबर आहेत ना ? मार्क अ. ६ ओ. ३

**समीक्षक**—खरें उघडकीस येतें तें असें ! येशू हा सुतारणीचा मुलगा होता व याकोब, योसेव. यहूदा हे तिघे भाऊ शिवाय बहिणीहि येशूला होत्या हीं सर्व जशी ईश्वराचीं मुलें नव्हत पण मरीया व योसेफ या सुतार दांपत्याचीं मुलें; तसाच येशूहि होता. कित्येक वर्षें सुतारकीचा धंदा करीत होता. मग हळूहळू पैगंबर बनून ईश्वराचा मुलगा बनला व जंगली लोकांनींहि त्याला तसें मानिलें. काटकूट, फाटफूट, हा सुतारकीचा धन्दा येशूनें आजन्म उत्तमप्रकारें चालविला ह्यांत कांहीं शंका नाहीं.

## लूकरचित शुभवर्तमान

९०—येशू त्याला म्हणाला, मला उत्तम कां म्हणतोस ? एक म्हणजे देव त्यावांचून कोणी उत्तम नाहीं.

—लूक अ. १८ ओ. १९

**समीक्षक**—ईश्वरच फक्त अद्वितीय व सर्वोत्तम आहे असें जर प्रत्यक्ष येशू म्हणतो तर त्याच्या शिष्यांनीं 'बाप, पुत्र व पवित्रात्मा' ही गारुडी त्रिपुटी कोठून पैदा केली कोण जाणें ?

९१—हेरोद येशूला पाहून फार संतोष पावला, कारण त्याविषयीं ऐकिल्यावरून तो त्याला भेटावयास बऱ्याच काळापासून इच्छित होता, आणि त्याकडून झालेलें कांहीं अद्भुत दृष्टीस पडेल अशी त्याला आशा होती. त्यानें त्याला बरेच प्रश्न केले, परंतु त्यानें त्याला कांहींच उत्तर दिलें नाहीं. लूक अ. २३ ओ. ८।९

समीक्षक—मत्तयकृत शुभवर्तमानांत येशूचें हें सत्य स्वरूप झांकून ठेवण्यांत आलें असून त्यांच्या नांवावर अनेक चमत्कार वर्णिले आहेत. पण लूक म्हणतो, तसें कांहीं नाहीं. सर्व शुभवर्तमानांत शुभच पाहिजे असता लूकनें असें अशुभ कां बरें वर्तविलें असावें ? यांत खरा कोण ? येशू चतुर व अद्‌भुत चमत्कार करून दाखवणारा जर होता तर हेरोदाराच्यापुढें तो मूकस्तंभ कां राहिला. याचें खरें उत्तर हेंच कीं येशूंत विद्या अथवा कांहीं अद्‌भुत शक्ति वास करीत होती असें मुळींच नाहीं.

## योहानकृत शुभवर्तमान

९२—प्रारंभीं शब्द होता, आणि शब्द देवासहित होता, आणि शब्द देव होता. तोच प्रारंभीं देवासहित होता. त्याच्याद्वारें सर्व झालें, आणि जें झालें असें कांहींच त्यावांचून झालें नाहीं. त्यांत जीवन होतें, व तें जीवन मनुष्यांच्या प्रकाश होतें. —योहान अ. १ ओ. १.२,३,४.

समीक्षक—शब्द, हा उच्चार करणाऱ्यापूर्वीं होऊं शकत नाहीं जर शब्द देवासहित होता तर प्रारंभीं शब्द होता हें म्हणणें व्यर्थ झालें शब्द देव होता हें कसें ? कारण प्रारंभीं देवाच्यापूर्वीं १ ल्या ओवीप्रमाणें तो होताच व मग पुन: शब्द देवासहित होता . म्हणजे देव देव होता, शिवाय देवाच्यापूर्वीं शब्द असणें हें शक्यच नाहीं. तर प्रारंभीं देव होता व मग शब्द होता हें म्हणणें योग्य आहे. नुसत्या शब्दद्वारा सृष्ट्युत्पत्ति कधींहि होऊं शकणार नाहीं. कारण जोंपर्यंत सृष्टीचें कारण अस्तित्वांत नव्हतें तोंपर्यंत कारणावांचून कार्य झालें कसें ? शिवाय शब्दोच्चार न करतांहि देव सृष्टि निर्माण करूं शकतो. जीवन म्हणजे काय व प्रथम तें कशांत होतें ? जर याप्रमाणें जीव तुम्ही अनादि मानीत असाल तर आदामाच्या नाकपुडींत ईश्वराला श्वास फुकण्याचें कारणच राहिलें नाहीं. जीवन मनुष्यांचाच प्रकाश आहे व पशुपक्ष्यादिकांचा नाहीं, हें विचित्र होय.

९३—भोजन होते वेळेस शिमोनाचा पुत्र यहूदा इस्कर्योत याच्या मनांत येशूला धरून द्यावें असें सैतान घालून चुकला. —योहान अ. १३ ओ २.

समीक्षक:—ही गोष्ट सर्वथैव असत्य आहे. सैतान सर्वांना बहकावितो तर सैतानाला कोण बहकावितो ? जर ख्रिस्त्यांचें उत्तर सैतान आपोआपच बहकूं शकतो, असें असेल तर मनुष्यहि आपोआपच बहकूं शकतो असें कां ते मानीत नाहींत? सैतानाचें काम तरी कोणतें आहे? जर सैतानास जन्म देणारा व त्याला बहकविणारा परमेश्वर आहे तर परमेश्वरच सैतानाचा सैतान ठरला व तो ख्रिस्त्यांचा परमेश्वर देव होय. परमेश्वरानेंच सर्वांना सैतानाद्वारें बहकाविलें आहे. वाचकहो ! ईश्वर असलीं नीच कामें कधींतरी करूं शकतो काय ? पण खरी स्थिति अशी आहे कीं, ख्रिस्त्यांचें पुस्तक ख्रिस्त्यांचा ईश्वर व त्याचा पुत्र येशू हे ज्यांनीं बनविलें ते सैतान असले तर असतील; परंतु या पुस्तकावरून ना तें पुस्तक ईश्वरकृत आहे, ना त्यांत वर्णिलेला देव परमेश्वर आहे, ना येशू ख्रिस्त ईश्वराचा पुत्र आहे, हें सिद्ध होतें.

९४—तुमचें अंत:करण घाबरूं नये, देवावर विश्वास ठेवा, आणि मजवरहि विश्वास ठेवा. माझ्या बापाच्या घरांत राहण्याच्या जागा बहूत आहेत; नसत्या तर मीं तुम्हांस सांगितलें असतें; मी तुम्हांसाठीं जागा तयार करावयास जातों. आणि मी जाऊन तुम्हांसाठीं जागा तयार केली म्हणजे पुन: येऊन तुम्हांस माझ्याजवळ घेईन, यासाठीं कीं जेथें मी आहे तेथें तुम्हीहि असावें. मी जातों तिकडचा मार्ग तुम्हांस ठाऊक आहे. येशूनें त्याला म्हटलें, मार्ग, सत्य व जीवन मी आहे, माझ्याद्वारें आल्यावांचून बापापाशीं कोणी जात नाहीं. तुम्ही मला जाणिलें असतें तर माझ्या बापालाही जाणिलें असतें; आतांपासून तुम्ही त्याला जाणतां व त्याला पाहिलें आहे. —योहान अ. १४ ओ. १ ते ४ व ६, ७

समीक्षक:—हिंदुवर्णांमधील भटी लीलांवर देखील येशू ख्रिस्तानें ताण केली आहे. कशी ती पहा ! येशूनें आपल्या बापाच्या घराची एकट्याची मालकी सांगितली असती तर त्यांत अयुक्तिक कांहींच नव्हतें. पण जो सर्वांचा बाप जगदीश्वर आहे त्याच्या इस्टेटीचाहि येशू एकटाच जणूं काय मक्तेदार बनला आहे. न जाणो ईश्वराचा लिलांव होऊन तो येशूनें घेतल्यामुळें ईश्वर त्याचाच एकट्याचा बाप झाला असेल ! लीलांवांत खरेदी केल्याप्रमाणेंच ख्रिस्ताची

ही भाषा आहे. लिलांवांतील खरीददाराची जशी खरेदी केलेल्या प्रत्येक वस्तूवर मालकी असते किंवा खरेदी केलेली प्रत्येक वस्तु जशी खरेदीदाराच्या आधीन असते; तसा परमेश्वर हा येशू ख्रिस्ताच्या आधीन बायबलानें करुन दिला आहे त्याखेरीज ईश्वर जर स्वतंत्र असतां व ख्रिस्ताधीन नसतां तर येशूनें फर्माविलेल्या आज्ञांची व शिफारशींची अंमलबजावणी करण्याकरतां तो बांधला गेला नसता. येशू ज्याची शिफारस करील त्यालाच ईश्वर तारील ! येशूपूर्वी ईश्वराला असें कोणीच वश केलें नाहीं काय ? जो स्वमुखानें आपणच मार्ग, सत्य व जीवन आहे अशी बढाई गातो व ईश्वरा-जवळील जागा आपल्या ताब्यांत आहे म्हणून थापा मारतो; तो खरोखरच मोठा ढोंगी व फसव्या असला पाहिजे. पण त्यानें अशा बढाया मारल्या नसत्या तर त्याच्या मतांत कोण फसला असता ?

९४—मी तुम्हांस खचीत खचीत सांगतों, मी जीं कृत्यें करितों तीं मजवर विश्वास ठेवणाराहि करील आणि त्यापेक्षां मोठींहि करील. —योहान अ. १५ ओ. १२

**समीक्षक**:-वाचक हो ! ह्या येशू ख्रिस्ताच्या वाक्यानुसार, ख्रिस्ती लोक येशूवर खरा विश्वास ठेवणारे असते तर, बायबलांत जीं येशूचीं चमत्कारिक कृत्यें वर्णन केलेलीं आहेत तीं ते करूं शकले असते. पण एकहि ख्रिस्ती तसा कां धरें दिसून येत नाहीं ? वस्तुतः ख्रिस्तालाच कोणतेंहि चमत्कारिक कृत्य करतां आलें नाहीं, मग त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्याला तें कसें करतां येईल ? ज्याचे डोळे व बुद्धि नष्ट झाली आहे अशा लोकांनीं, ख्रिस्तानें जन्मांध लोक बरे केले, असें मानावें.

९६—जो एकच एक सत्य देव आहे. —योहन अ. १७ ओ. ३

**समीक्षक**:—ख्रिस्त स्वतः एकाच अद्वितीय परमेश्वराचा दास असतांनाहि मग त्रिपुटी केव्हां आली ? *बायबलांत पुष्कळ ठिकाणीं अशाच प्रकारच्या अवास्तव **गोष्टी** भरलेल्या आहेत. नव्या करारांतील चार शुभवर्तमानांचें येथपर्यंत समीक्षन केलें, यापुढें इतर भागांविषयीं पाहूं

## ' प्रकटीकरण '

९७— आणि सिंहासनभोंवतीं चोवीस सिंहासनें आहेत. आणि त्या सिंहासनांवर ते शुभ वस्त्रेंल्यालेले व डोक्यांवर सोन्याचे मुकुट घातलेले चोवीस वडील नसलेले आहेत असें दृष्टीस पडलें. आणि सिंहसनाच्या आंतून ' विजा ' व ' वाणी ' व गर्जना निघत आहेत.' आणि सात अग्निरूप मशाली सिंहासनापुढें जळत आहेत, त्या देवाचे सात आत्मे आहेत, आणि सिंहासनापुढें ' स्फटिकासारखा ' जसा काय कांचेचा समुद्र आहे, आणि ' सिंहासनाच्या मध्यभागीं सिंहा-सनाच्या चार बाजूंस ' पुढें व मागें ' डोळयांनीं भरलेले असे चार प्राणी आहेत.—योहान प्रकटीकरण अ. ४ ओ. ४।५'६

**समीक्षक**:—एखाद्या गांवाप्रमाणें ख्रिस्त्यांचा स्वर्ग आहे व त्यांचा ईश्वर या प्रकरणांत एखाद्या दीपकाप्रमाणें अग्निस्वरुप आहे. डोकीला सोन्याचे मुकुट घातलेले वडील असून ख्रिस्त्यांच्या देवांचे आत्मे सात आहेत. सिंहासनांतून विजा, वाणी, गर्जना निघत आहेत. सगळीच **मौज** !

९८—' सिंहासनावर बसलेला ' याच्या उजव्या हातावर 'पाठपोट लिहिलेली' व सात शिक्के मारुन बंद केलेली अशी ' पुस्तकाची गुंडाळी ' मीं पाहिलीं आणि पुस्तकाचे शिक्के फोडून ती उघडावयास कोण योग्य आहे असें मोठ्यानें ओरडणारा बलवान मी तेथें पाहिला, तेव्हां स्वर्गांत व पृथ्वीवर व पृथ्वीखालीं कोणी हें पुस्तक उघडावयास किंवा त्यांत पहावयास समर्थं नव्हता. हें पुस्तक उघडावयास व त्यांत पहावयास योग्य असा कोणी आढळला नाहीं म्हणून मी रडलों. —प्रकटीकरण अ. ५ ओ. १ ते ४

**समीक्षक**:—हिंदूंचे वेद वाचावयास कोणी समर्थ नाहीं, ही पुराणांतील गप्प व ख्रिस्त्यांच्या वरीलप्रराणें स्वर्गीय. गप्पा यांत बेमालूम साम्य आहे. ख्रिस्ती स्वर्गांतील सिंहासन, पाठपोट लिहिलें व सात शिक्क्यांनीं सीलबंद केलेलें पुस्तक स्वर्गांत व पृथ्वीवर येशू खेरीज कोणीहि वाचावयास समर्थ नाहीं म्हणून ' प्रकटीकरणाचा कर्त्ता ' ढळढळींत

* ख्रिस्तानंतर त्याच्या अनुयायांनीं बायबलांत कोठें स्पष्ट उल्लेख नसतांहि इ. स. ८०० पासून ' बाप, पुत्र व पवित्रात्मा ' ही त्रिपुटी अस्तित्वांत आणली. —भाषांतरकर्ता.

रडला. हिंदूंचे पुराणकार व ख्रिस्त्याचे शुभवर्तमानकार हे रडवे होत, यांत शंका नाहीं. ख्रिस्तमहात्म्य आमच्यांतील पौराणिक देवमहात्म्यापेक्षां सरस नाहीं.

९९—तेव्हां सिंहासन व चार प्राणी ही आणि वडील यामध्यें ' वधिला होता ' असा ' कोंकरा ' उभा राहिलेला मी पाहिला, त्याला सात शिंगें व सात डोळे होते, ते ' सर्व पृथ्वीवर ' पाठविलेले देवाचे सात आत्मे आहेत.

—प्र. क. अ. ५ ओवी ६

**समीक्षकः**—हाय हाय ! ही प्रकटीकरणकर्त्याची स्वप्नसृष्टि पहा. त्याच्या स्वप्नांतील स्वर्ग, त्यांतील सिंहासन, चारपशू ' बधिलेला कोंकरा ' म्हणजे येशू याच गोष्टी स्वर्गांत आहेत. दुःखाची गोष्ट एवढीच कीं, येशू ख्रिस्त ह्या भूतलावर होता तेव्हां त्याला दोन डोळे होते पण शिंगें फुटली नव्हती व आत्माहि एकच होता परंतु स्वर्गांत जातांच त्याला शिंगें फुटलीं. तीं सात होतीं तसेंच त्याला सातचक्षु प्राप्त होऊन त्याला ख्रिस्त्यांच्या देवानें सात आत्मे बहाल केले. लेखक बुद्धिमान्, हें पुस्तक मानणारे बुद्धियान्, सर्वच बुद्धिमान् लोक खरे !

१००—आणि त्यानें पुस्तक घेतलें तेव्हां चार प्राणी व चोवीस वडील कोकराच्या पायां पडले, त्या सर्व वडीलाजवळ विणें व धुपानें भरलेलीं सोन्याचीं धुपाटणीं होतीं तीं पवित्रांच्या प्रार्थना आहेत. —प्र. क अ. ५ ओ. ८

**समीक्षकः**—या भारतभूमध्यें व इतरत्र ख्रिस्ती धर्मोपदेशक धर्मोपदेश करीत असतां, प्रॉटेस्टंट ख्रिस्ती मिशनरी मूर्तिपूजेचें खंडन करितात, हें योग्य असलें तरी त्यांचा स्वर्गमूर्ति पूजेनें गजबजलेला आहे याची वाट काय ? स्वर्गांत येशूच्या पाया पडणें, त्यापुढें धूपदीप जाळणें हें योग्य आहे काय ? येशू ख्रिस्त स्वर्गांत नसेल तेव्हां हे कोणाच्या पायां पडतील व कोणापुढें धूपदीप जाळतील ?

१०१—कोंकऱ्यानें सात शिक्क्यांपैकीं एक शिक्का फोडिला, तेव्हां मी पाहिलें, ती चार प्राण्यांतील एकाला गर्जनेसारख्या वाणीनें ये असें म्हणतांना ऐकिलें. तेव्हां मी पाहिलें तों ' पांढरा घोडा ' आणि त्यावर बसलेला कोणी एक असा दृष्टीस पडला. त्याच्याजवळ धनुष्य होतें व त्याला मुकुट दिला होता; तो जिंकीत व जिंकावयास निघाला. त्यानें दुसरा शिक्का फोडिला, तेव्हां दुसऱ्या प्राण्याला ये असें म्हणतांना ऐकिलें. तों दुसरा घोडा पुढें चालला, तो अग्निवर्ण होता आणि त्यावर बसलेला त्याला पृथ्वीची शांतिहरण करण्याचें काम सोंपविलें होतें, असें कीं लोक एकमेकांचा वध करतील; त्याला मोठी तलवार दिली होती, त्यानें तिसरा शिक्का फोडिला, तेव्हां मी तिसऱ्या प्राण्याला ये असें म्हणतांना ऐकिलें, तेव्हां मी पाहिलें तो 'काळा घोडा ' आणि त्यावर बसलेला कोणीएक दृष्टीस पडला, त्याच्या हातांत तागडी होती. त्यानें चवथा शिक्का फोडिला, तेव्हां मी चवथ्या प्राण्याला ये असें म्हणतांना ऐकिलें. तेव्हां मी पाहिलें तो फिक्का घोडा आणि त्यावर बसलेला कोणीएक दृष्टीस पडला, त्याचें नांव ' मृत्यु '.

—प्र. क. अ. ६ ओ. १ ते ५ व ७, ८

**समीः**—हिंदूंच्या पुराणांतील भाकडकथांना मागें टाकणाऱ्या अशा ह्या ख्रिस्त्यांच्या शुभवर्तमानी मिथ्या लीला होत, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. पुस्तकांची सीलबंदी काढतांच त्या पुस्तकांतून घोडे व त्यावरील स्वार पटापट बाहेर पडूं लागले. आजच्या ख्रिस्त्यांचे प्राचीन पूर्वज ज्या अर्थी ह्या बरळण्यावर विश्वस ठेवित होते, त्या अर्थी ते किती जंगली व अडाणी असावेत ह्याची सहच कल्पना होईल.

१०२—ते मोठ्यानें ओरडत म्हणाले, " हे प्रभो , जो तूं पवित्र व खरा आहेस तो तूं न्याय करीत नाहींस आणि पृथ्वीवर राहणाऱ्यांपासून आमच्या रक्ताचा सूड घेत नाहींस, हें किती वेळ चालणार ? " तेव्हां त्या प्रत्येकास एक एक शुभ्र झगा दिला आणि त्यांस असें सांगितलें कीं, तुम्ही तुमच्या सोबतीचे दास, तुमचे भाऊ तुम्हासारखे जिवें मारिले जाणार त्यांची संख्या पूर्ण होईपर्यंत आणखी थोडा वेळ स्वस्थ रहा. प्र. क. अ. ६ ओ. १०।११

**समीक्षकः**—जे कोणी ख्रिस्ती असतील त्यांना न्याय मिळविण्यासाठीं असे कुचंबत पडावें लागेल, परंतु जे वैदिक धर्मावलंबी आहेत त्यांचा न्याय होण्यास असा विलंब लागत नाहीं. ख्रिस्त्यांना विचारलें पाहिजे कीं, ईश्वराची कचेरी आजकाल बंद आहे काय ? सुट्टी असल्यामुळें न्यायाधीशहि निरुद्योगी बनले असतील काय ? ह्या प्रश्नांचीं उत्तरें

विचाऱ्यांना काय देतां येतील बरें ? ख्रिस्त्यांचा ईश्वर भलतीकडेच वहावतही जात असतो. ख्रिस्त्यांच्या सांगण्यावरून त्यांच्या शत्रूंचा सूड तो घेतो, आणि शिवाय ते खुनशीहि आहेत कारण मरणानंतरहि त्यांना त्रास देणाऱ्यांचा ते छळ करितात. अशा रीतीनें ख्रिस्त व ख्रिस्ती साम्राज्यांत शांति म्हणून नाहीं. मग तेथें दुःखांना काय पारावार ?

१०३—आणि 'अंजिराचें झाड' मोठ्या वाऱ्यानें हालविलें म्हणजे त्याची कच्ची फळें जशीं खालीं पडतात तसे 'आकाशांतील तारे' पृथ्वीवर पडले आणि 'आकाश गुंडाळणाऱ्या पुस्तकाप्रमाणें गुंडाळून निघून गेलें, आणि, सर्व डोंगर व बेटें आपल्या ठिकाणावरून सरलीं. —प्र. क. अ. ६ ओ. १३।१४

समीक्षकः—प्रकटीकरणकर्त्याला खगोल विद्या माहिती असती तर असली असंभव कथा त्यानें गायिली नसती. तारे हे खगोल असल्यामुळें ते पृथ्वीवर कधींतरी पडूं शकतील काय ? व सूर्याचें आकर्षण त्यांना इकडें तिकडें कसें हालूं देईल ? आकाश म्हणजे काय चटई आहे कीं त्यांची गुंडाळी करतां येईल ? आकाश साकार पदार्थ नसल्यामुळें त्याची घडी घालणें, गुंडाळी करणें वगैरे म्हणणें जंगली लोकांनाच शोभतें.

१०४—ज्यांवर शिक्का मारिला त्यांची संख्या मी ऐकिली, इस्राएल लोकांच्या सर्व वंशांपैकीं एकशें चवेचाळीस हजारांवर शिक्का मारिला, यहूदावंशापैकीं बारा हजारावर शिक्का मारिला. —प्र. क. अ. ७ ओ. ४।५

समीक्षकः—बायबलोक्त ईश्वर इस्राएलाचाच स्वामी आहे कीं सर्वांचा ? जर सर्वांचा असता तर त्या जंगल्याचीच तो मैत्री कां करतां ? त्यांच्याच सहाय्यार्थ तो धांवत जातो. इतरांची त्याला आठवणही होत नाहींसें दिसतें ! यावरून तो ईश्वर नव्हे आणि इस्राएल व यहूदा वंशोत्पन्न लोकांवर शिक्के मारणें ही शुद्ध अल्पज्ञता असून प्रकटीकरणकर्त्याची मिथ्या कल्पना आहे.

१०५—यामुळें ते देवाच्या सिंहासनासमोर आहेत आणि ते अहोरात्र त्याच्या देवळांत त्याची सेवा करितात, आणि 'सिंहासनावर बसलेला' त्यांवर आपला मंडप करील. —प्र. क. अ. ७ ओ. १५

समीक्षकः—ह्याला मूर्तिपूजा म्हणत नाहींत तर काय ? यारून ख्रिस्त्यांचा ईश्वर देहधारी मनुष्य असून एकदेशी नव्हे काय ? आणि तो रात्रीं देखील झोंपत नाहीं ? जर तो झोंपता तर रात्रीं त्याची पूजा कशी करीत असतील ? यदाकदाचित् तो सारी रात्र पूजा करून घेण्यासाठीं जागत असेल, असें समजूं किंवा त्याची झोपमोड होत असेल असें मानू; पण अशा तऱ्हेचीं जागरणें होत राहिल्यामुळें तो रोगग्रस्तहि झाला असेल.

१०६—मग दुसरा एक दूत येऊन 'वेदीपुढें उभा राहिला,' त्याजवळ सोन्याचें धुपाटणें होतें; आणि सर्व पवित्रांच्या 'प्रार्थनांत' मिळवून सिंहासनासमोरच्या सोन्याच्या वेदीवर ठेवण्याकरितां त्याजवळ बहुत 'धूप' दिला होता. आणि दूताच्या हातापासून धुपाचा धूर पवित्रांच्या 'प्रार्थनांसह' देवासमोर वर चढला. तेव्हां दूतानें धुपाटणें घेऊन त्यांत 'वेदीवरचा अग्नि भरून' पृथ्वीवर टाकिला, तों 'गर्जना, वाणी विजा' व कंप हीं झालीं.

—प्र. क. अ. ८ ओ. ७

समीक्षकः—पहा ! स्वर्गांतहि धूप, दीप, नैवेद्यादि थाटमाट आहे. हा थाटमाट आमच्या येथील बैराग्यांच्या थाटमाटांना खात्रीनें मागें टाकील ! गर्जना, वाणी विजा व कंप यांची उत्पत्ति कसकशी झाली, हें या जंगली लोकांपासून शिका.

१०७—पहिल्या दूतानें कर्णा वाजविला, तों रक्तमिश्रित 'गारा व अग्नि उत्पन्न होऊन त्यांची पृथ्वीवर' वृष्टि झाली आणि पृथ्वीचा तृतीयांश जळून गेला, व झाडांचा तृतीयांश जळून गेला व सर्व हिरवें गवत जळून गेलें.

प्र. क. अ. ८ ओ. ७

समीक्षकः—वाहवारे बायबली लीला ! कर्ण्याचा दुंदुभिनाद ऐकतांच एवढा प्रलय झाला आं ! धन्य असो ! असा ईश्वर, त्याचे ते दूत, कर्णा, व प्रलयवर्णन इत्यादि ह्या शुद्ध बालिश गोष्टी होत.

१०८—पांचव्या दूतानें कर्णा वाजविला, तों एक तारा आकाशांतून पृथ्वीवर पडलेला माझ्या दृष्टीस पडला, त्याजवळ अगाधकूपाची किल्ली दिली होती. त्यानें अगाधकूप उघडिला, तो त्यांतून मोठ्या 'भट्टीच्या धुरासारिखा धूर

बाहेर येऊन वर चढला; आणि कूपाच्या धुरानें 'सूर्य' व अंतराळ हीं 'अंधःकारमय' झालीं. त्या धुरांतून टोळ. निघून पृथ्वीवर उतरले; त्यांस पृथ्वीवरील विंचवांच्यासारखी शक्ति दिली होती. त्यांस असें सांगितलें होतें कीं, पृथ्वीवर गवताला व कोणत्याहि हिरवळीला व कोणत्याहि झाडाला' उपद्रव करूं नये, तर ज्या मनुष्यांच्या 'कपाळांवर' देवाचा 'शिक्का' नाहीं त्यांस मात्र करावा. आणि त्याकडे त्यांस जिवें मारण्याचें नाहीं तर पांच महिने पीडा करण्याचें दिलें होतें. त्यांची पीडा विंचू मनुष्याला कांटा मारितो त्याच्या पीडेसारखी होती. प्र. क. अ. ९ ओ. १ ते ५

**समीक्षकः**—कर्ण्याच्या आवाजानें जो तारा आकाशांतून पृथ्वीवर पडला तो दूतावर व त्याच स्वर्गावर पडला असेल काय ? या भूगोलावर तर कोठेंहि पडलेला नाहीं. अगाधकूपाची किल्ली व टोळ प्रलय करण्यासाठीं ईश्वरानें पाळले असतील. ज्यांच्या कपाळावर देवाचा शिक्का असल्याचा वास (?) त्या टोळांना येई त्या मनुष्यांना न चावण्याची ईश्वरानें आज्ञा दिली ! भोळ्या मनुष्यांना फसवून त्यांना येशूच्या कळपांत आणण्यासाठीं ह्या युक्त्याप्रयुक्त्या योजिल्या असाव्यांत एरवी असल्या हास्यास्पद धमक्या काय कामाच्या ? पण अशाप्रकारच्या धमक्या जंगली मुलूखांतच खपतील; आर्यावर्तांत त्यांची डाळ शिजणें कठीण आहे.

१०९—स्वारांच्या सैन्यांची संख्या वीस कोटी होती. —प्र. क. अ. ९ ओ. १६

**समीक्षकः**—स्वर्गामध्यें इतके घोडे कोठें राहत असतील ! कोठें चरत असतील ! कोठें त्यांची पागा असेल ? व इतक्या घोड्यांची लीद काय करीत असतील ? त्या लीदींचा दुर्गंध स्वर्गामध्यें सर्वत्र दरवळत असेल काय ? बस्स, असा स्वर्ग, असा ईश्वर, असलें धर्ममत या सर्वांवर आम्हीं सर्व आर्यांनीं तिलांजली देऊन टाकलेली आहे. सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या कृपेनें ख्रिस्त्यांवरील ह्या आपत्ति शीघ्र नाहींशा होवोत म्हणजे फार चांगले होईल.

११०—मी दुसरा एक बलवान् दूत स्वर्गांतून उतरतांना पाहिला; तो मेघवेष्टित असून त्याच्या डोक्यावर मेघधनुष्य होतें, त्याचें तोंड सूर्यासारिखें, व त्याचे पाय अग्निस्तंभासारिखे होते. त्याच्या हातीं उघडलेलें लहानसें पुस्तक होतें, त्यानें आपला उजवा पाय समुद्रावर व डावा पाय भूमीवर ठेवून तो सिंहगर्जनेप्रमाणें मोठ्यानें ओरडला. आणि तो ओरडला तेव्हां सात गर्जनांनीं आपापले शब्द काढले. —प्र. क. अ. १० ओ. १, २, ३

**समीक्षकः**—आमच्या अगस्ती ऋषीनें एका आचमनांत समुद्रप्राशन केला व तो ऋषी मुतला म्हणून समुद्र खारट झाला, अशाप्रकारच्या पुराणांतील कथा व भाट लोकांच्या गोष्टी यांच्यांपेक्षां आकाशांतील बापांच्या 'शुभवर्तमानां' तील भाकडकथा श्रेष्ठ आहेत कां कनिष्ठ आहेत, याचा विचार वाचकांनींच करावा.

१११—नंतर काठीसारिखा एक बोरूं कोणी एकानें मला दिला आणि म्हटलें; ऊठ आणि देवाचें देऊळ, वेदी व त्यांत उपासना करणारे यांचें माप घे. —प्र. क. अ. ११ ओ. १

**समीक्षकः**—येथें काय पण ख्रिस्त्यांच्या स्वर्गांत देखील देऊळें बनविलेलीं आहेत त्यांची मोजमापें होत असतात; हें एकप्रकारें ठीक आहे. जसा यांचा स्वर्ग तशा ह्यांच्या गोष्टी ! येथें देखील 'प्रभुभोजना' चे वेळीं येशूचे शरीरावयव, मांस व रक्त याची भावना करून हे खातात व देवालयांवर 'क्रॉस' रोवतात इत्यादि 'मूर्तिपूजेचा प्रकार होय.

११२—तेव्हां स्वर्गांतलें देवाचे देऊळ उघडलें, आणि 'त्याच्या देवळांत त्याच्या कराराचा कोश' दृष्टीस पडला, आणि 'विजा' व 'वाण्या' व 'गर्जना' व कंप व मोठ्या गारांचीं वृष्टि झाली. प्र. क. अ. ११ ओ. १९

**समीक्षकः**—स्वर्गामध्यें जें देवालय आहे तें सर्वदा बंद असतें कां कधींकधीं उघडतें ? परमेश्वराचेंहि देवालय असतें तर ? सर्वव्यापक असा जो वेदोक्त परमेश्वर आहे त्याचें देवालय असूं शकत नाहीं. परंतु ख्रिस्त्यांच्या साकार व एकदेशी आकाशांतील देवाचें देऊळ सर्वत्र असलेंच पाहिजे, मग तो स्वर्ग असो अथवा भूलोक असो व प्रत्येक ठिकाणीं टंटन् पूं पूं ची लीलाहि सर्वत्र असायचीच. ख्रिस्त्यांना स्वर्गांत 'कराराची पेटी' देखील पहावयास मिळत असेल पण तीपासून त्यांना काय फायदा होत असेल बरें ? खरी गोष्ट म्हणजे मोह दाखविण्यासाठीं ह्या गोष्टी रचलेल्या आहेत.

११३—नंतर स्वर्गांत मोठा चमत्कार दृष्टीस पडला; एक स्त्री दिसली. ती सूर्य पांघरलेली होती आणि तिच्या पायाखालीं चंद्र व तिच्या मस्तकावर बारा ताऱ्यांचा मुकुट होता. ती गरोदर होती आणि 'वेणा देऊन प्रसूतीच्या कष्टांनीं ओरडत होती.' स्वर्गांत दुसरा एक चमत्कार दृष्टीस पडला. पहा, एक मोठा अग्निपर्ण अजगर दिसला, त्याला सात डोकीं व 'दाहा शिंगें' होतीं, आणि त्याच्या डोक्यांवर सात मुकुट होते. त्याच्या शेपटानें 'आकाशांतील ताऱ्यांचा' तृतीयांश ओढून त्यांस 'पृथ्वीवर पाडिलें.' —प्र. क. अ. १२ ओ. १ ते ४

**समीक्षकः**—या लांबलचक गप्पा पहा ! ख्रिस्त्यांच्या स्वर्गांतील स्त्रियांहि दुःख वेदनांनीं ओरडत असतात तरी त्यांचें दुःख शमविण्यास कोणी समर्थ नसतो. त्या स्त्रीचें पांघरूण कसें विचित्र होतें ! सूर्य पांघरल्यावर तिच्या अंगाचा दाह कसा झाला नाहीं ? ज्याच्या शेपटीनें ताऱ्यांचा एक तृतीयांश पृथ्वीवर पाडिला ती शेपटी किती मोठी असेल ? पृथ्वी तर लहान आहे व तारे हे मोठमोठे गोल आहेत. त्यांचा एक तृतीयांश ह्या पृथ्वीवर मावूं शकणार नाहीं ! परंतु ताऱ्यांचा तृतीयांश जो पडला तो ह्या लेखकाच्या घरावरच पडला असावा व एवढ्या मोठ्या शेंपटीचा अजगर त्याच्या घरांतच राहत असावा; एवढेंच अनुमान ह्या प्रसंगीं करता येतें.

११४—तेव्हां स्वर्गांत लढाई चालली; 'मीखाएल' व त्याचे दूत अजगराशीं लढाई करण्यास निघालें आणि *त्यांशीं अजगर व त्याचे दूत लढलें.* —प्र. क. अ. १२ ओ. ७

**समीक्षकः**—जो कोणी ख्रिस्त्यांच्या स्वर्गांत जात असेल तेथेंहि त्याच्या मागें लढाई, झगडे हात धुवून पाठीस लागलेच आहेत. सौख्य म्हणून बिचाऱ्या ख्रिस्ती लोकांना कोठेंच नाहीं. अशा दुःखमय स्वर्गाला येथूनच ख्रिस्त्यांनीं रजा द्यावी. जेथें शांतिभंग व उपद्रव यांचें काहूर माजलेलें आहे असा स्वर्ग ख्रिस्त्यांनाच लखलाभ होवो, कारण तो सर्वथैव ख्रिस्त्यांनाच योग्य आहे.

११५—मोठा अजगर तर खालीं टाकला गेला, जो सर्व जगाला ठकविणारा 'दियाबल' व 'सैतान' म्हटलेला तो जुनाट ' साप ' हा खालीं पृथ्वीवर टाकला गेला व त्याचबरोबर त्याचे दूत टाकले गेले.— प्र. क. अ. १२ ओ. ९

**समीक्षकः**—जगाला ठकविणारा सैतान स्वर्गांमधील लोकांना ठकवीत नव्हता काय ? अशाला आजन्म बंदिवासांत ठेवणें अथवा ठार मारणें हें ईश्वराचें काम असतां त्याला पृथ्वीवर टाकलें. सैतान जगाला ठकविणारा आहे पण सैतानाला ठकविणारा कोण ? जर त्याला कोणी ठकविलें नसेल स्वतःच बहकला असेल तर बहकणारेही स्वतःच बहकत असतात त्यांना बहकाविण्याची जरूर नाहीं, असें कां मानूं नये ? ईश्वरानें त्याला बहकाविले असेल तर तो ईश्वरच नव्हे. ज्या अर्थीं ख्रिस्त्यांचा ईश्वरच खुद्द त्या सैतानाला भीत होता त्या अर्थीं सैतानच ईश्वरापेक्षां श्रेष्ठ ठरला. सैतान श्रेष्ठ नसता तर, तो एवढीं अघोर कृत्यें करीत असतानाहि ईश्वरानें त्याला शासन केलें नसतें काय ? जगांत सैतानाचें जितकें साम्राज्य आहे, त्याचा सहस्रांशहि ख्रिस्त्यांच्या ईश्वराचें राज्य नाहीं. यामुळें साम्राज्याधिपती सैतानाचें ईश्वर पारिपत्य करूं शकत नाहीं. यावरून हें सिद्ध होतें कीं, ज्याप्रमाणें आतांचे राज्याधिकारी डाकू, चोरादींना ताबडतोब दंड करितात त्याप्रमाणें ख्रिस्त्यांचा ईश्वर सैतानादि दुष्टांना दंड देऊं शकत नाहीं. मग वैदिक मताचा त्याग करून असल्या कपोलकल्पित ख्रिस्ती मताचा कोण निर्बुद्ध मनुष्य स्वीकार करील ?

११६—यास्तव 'स्वर्गानो,' व त्यांत वसणाऱ्यांनो 'उत्साह करा' पृथ्वी व समुद्र यांस हाय हाय ! कारण आपला काळ थोडा आहे असें समजून फार रागावलेला सैतान उतरून तुम्हांकडे गेला आहे. प्र. क. अ. १२ ओ. १२

**समीक्षकः**—ईश्वर फक्त एकाच ठिकाणचा स्वामी व रक्षक आहे काय ? पृथ्वी, मनुष्यांदि प्राण्यांचा तो स्वामी व रक्षक नाहीं काय ? जर भूमीचा तो रक्षक व राजा आहे तर सैतानाला तो मारूं शकत नाहीं काय ? सैतान बेलाशक सर्वांना पतित करीत आहे व ईश्वर तें सर्व निमूटपणें पाहत राहिला आहे. पण हूं कां चूं देखील करीत नाहीं यावरून एक निर्बल असा ईश्वर ख्रिस्त्यांचा आकाशांतील बाप व दुसरा एक समर्थ असा भूगोलावरील ख्रिस्त्यांचा सैतानरूपी परमेश्वर असे दोन ईश्वर स्पष्ट दृग्गोचर होत आहेत.

११७—त्याला 'मोठमोठ्या' व देवनिंदक 'गोष्टी बोलणारें तोंड' दिलें होतें; व बेचाळीस महिने त्याला आपलें काम चालविण्याचा अधिकार दिला होता. त्यानें देवाविरुद्ध निंदा करण्यास म्हणजे त्याचें नांव, त्याचा मंडप व स्वर्गांत राहणारे यांची निंदा करण्यास तोंड सोडिलें. त्याला 'पवित्रांशीं लढण्याचें व त्त्रांस जिंकण्याचें' दिलें होतें; आणि सर्व वंश व लोक व भाषा व राष्ट्रें यांवर अधिकार दिला होता. —प्र. क. अ. १३ ओ. ५, ६, ७

समीक्षक:—जो पृथ्वीवरील लोकांना भ्रष्ट व पतित करण्याच्या हेतूनें सैतानादींना पाठवितो व पवित्र मनुष्यांशीं युद्ध करण्यास लावतो तो व त्याचें काम हें शुद्ध गुंडाचा सरदार, याला शोभेसेंच आहे. ईश्वराचें नव्हें. असलीं कामें ईश्वराचीं वा त्याच्या भक्ताचीं होऊं शकत नाहींत.

११८—नंतर मीं पाहिलें, तों पहा कोकरा सियोन डोंगरावर उभा राहिलेला दृष्टीस पडला. त्याबरोबर त्यांचें गांव व त्याच्या बापाचें नांव 'कपाळावर' लिहिलेलें असें एकशें चवेचाळीस हजार होतें. प्र. क. अ. १४ ओ. १

समीक्षक:—पहा ! जेथें येशूचा बाप राहत होता तेथेंच सियोन पर्वतावर त्याचा मुलगाहि राहत होता परंतु तेथील जनसंख्या एक लक्ष चव्वेचाळीस हजार केली आहे ती कशी ? बरें हे एवढे एक लक्ष चव्वेचाळीस हजार लोकच स्वर्गवासी झाले काय ? बाकी कोट्यावधी ख्रिस्ती लोक असें आहेत कीं त्यांचा कपाळावर शिक्काच ठोकला गेला नाहीं ! मग काय हे बिनशिक्क्यांचे ख्रिस्ती आत्मे नरकांत गेले असें समजावयाचें काय ? सियोन पर्वतावरची सफर करून तेथें ख्रिस्त, त्याचा बाप व हें सैन्य वास्तव्य करीत आहे कीं नाहीं हें पाहण्याचें ख्रिस्त्यांचें कर्तव्य आहे. जर सर्व असतील तर ठीक आहे नाहींतर हे सर्व खोटें असें त्यांनीं समजावें. सियोन पर्वतावर हे लोक कोठून आले ? जर स्वर्गांतून असें म्हणणें असेल तर, काय ते पक्षी आहेत म्हणून पंखांच्या सहाय्यानें वर खालीं उड्डाण करीत असतात ? जर तो स्वस्थानापासून येत जात असतो म्हणाल तर एखाद्या जिल्हाधिकाऱ्याप्रमाणें तो झाला. आणि मग एक, दोन, तीन जरी ईश्वर मानले तरी त्यांची उणीव भासणारच; कारण कमीतकमी एकेका गोलाला एकेक ईश्वर तरी पाहिजेच. कारण एकदोन ईश्वर अनेक ब्रह्मांडामध्यें दौरा काढण्यास पूर्ण असमर्थ होतील.

११९—तेव्हां मी स्वर्गांतून झालेली वाणी ऐकिली, ती म्हणाली, लिही, प्रभूंत मरणारे आतांपासून धन्य आहेत; आत्मा म्हणतो, होय, ते आपल्या कष्टांचा विसावा पावतील; त्यांचीं कृत्यें त्यांबरोबर जातात.

—प्र. क. अ. १४ ओ. १३

समीक्षक:—सज्जनहो ऐका ! ख्रिस्त्यांचा ईश्वर म्हणतो कीं, 'त्यांचीं कृत्यें त्यांबरोबर जातात' अर्थात् ज्याच्या त्याच्या कर्मानुसार फल सर्वांना दिलें जातें. पण येशू सर्वांचीं पापें माफ करील असें ख्रिस्ती मिशनरी सांगतात. ईश्वर-वचन सत्य कीं ख्रिस्ती मिशनऱ्यांचें, हें बुद्धिमान लोकांनींच विचार करून ठरवावें. दोघेहि तर सत्य होऊं शकत नाहींत; यापैकीं एखादा तरी लबाड असला पाहिजे. आम्हांला काय ? पाहिजे तर ख्रिस्त्यांचा ईश्वर लबाड ठरो, नाहीं तर ख्रिस्त्यांचे मिशनरी लबाड ठरोत !

१२०—तेव्हां त्या दूतानें आपला विळा पृथ्वीवर चालविला आणि पृथ्वीच्या द्राक्षीचे घड तोडून क्रोधाच्या मोठ्या द्राक्षकुंडांत टाकिलें. आणि तें द्राक्षकुंड नगराबाहेर तुडविलें गेलें, त्यांतून रक्त वाहिलें, तें शंभर कोसपर्यंत घोड्यांच्या लगामांस पोंचें इतकें होतें. —प्र. क. अ. १४ ओ. १९, २०

समीक्षक:—पुराणकारांच्या गप्पाष्टकांचा पाडाव करण्याच्या हेतूनें जणू काय ख्रिस्ती भाटांनीं हीं गप्पाष्टकें झोडलीं असावींत ! क्रोधवश झाला असतां ख्रिस्त्यांचा ईश्वर अत्यंत कष्टी होत असे. त्याच्या कोपानें म्हणें कुण्डेंच कुण्डें भरलीं आहेत म्हणजे कोप जणूकाय पाणीच आहे. शेंकडों कोसपर्यंत रक्त वाहूंच शकत नाहीं कारण वायुस्पर्श होतांच तें घट्ट बनतें. मग वाहिलें कसें ? ह्या सर्व मिथ्या गोष्टी होत.

१२१—नंतर मी पाहिलें, तों 'साक्षीच्या मंडपाचें' स्वर्गांतील देऊळ उघडलें. —प्र. क. अ. १५ ओ. ५

समीक्षक:—सर्वज्ञ ईश्वराला साक्षी घेण्याचें व साक्षी घेण्यासाठीं खास मंडप बांधून ठेवण्याचें काय काम आहे ?

कारण सर्व गोष्टी त्याला कळणं स्वाभाविक आहे. परंतु तशी स्थिति नसल्यामुळेंच ख्रिस्त्यांचा ईश्वर म्हणजे केवळ एक अल्पज्ञ असा मनुष्यवत् प्राणी आहे, अशा वाटेल त्या गप्पा या 'शुभवर्तमानांत' भरलेल्या आहेत त्या कोठवर वर्णन कराव्यांत !

१२२—कारण तिच्या पापाचा ढीग स्वर्गापर्यंत पोहोंचला आहे. आणि तिच्या अधर्माची आठवण देवानें केली आहे ! 'जसें तिनें दिलें तसें तिला द्या. तिच्या कर्माप्रमाणें' तिला दुप्पट द्या. —प्र. क. अ. १८ ओ. ५।६

समीक्षक:—ख्रिस्त्यांच्या ईश्वराचा हा अन्याय पहा ! जो यथावत् आहे, व ज्यानें जसें कर्म केलें आहे त्याला तसें व तितकेंच पारितोषिक अथवा शासन मिळण्याला न्याय म्हणतात. कमजास्त देणें हा अन्याय असल्यामुळें ख्रिस्तांचा हा 'आकाशांतील बाप' मोठा अन्यायी दिसतो. अशा अन्यायकारी ईश्वराची उपासना करणारे न्यायी कसें असावेत.

१२३—'आपण आनंद' व 'उल्लास करूं. व त्यांचें गौरव करूं. कारण कोंकऱ्यांचें लग्न आलें आहे, आणि त्याच्या नवरीनें आपणाला सजविलें आहे. —प्र. क. अ. १९ ओ. ७

समीक्षक:—ख्रिस्त्यांचा स्वर्गांतील विवाह प्रसंगींचें आनंदवृत्त ऐका ! खुद्द ईश्वरानें आपल्या कोंकराचा म्हणजे येशू ख्रिस्ताचा विवाह स्वर्गांत लावला आहे. ख्रिस्त्यांना विचारलें पाहिजे कीं ख्रिस्ताचें श्वशूरगृह किती मोठें आहे ? त्याला सासू, सासरा, मेहूणे, मेहूण्या, किती आहेत ? संतती होऊन ख्रिस्ताला किती कन्या पुत्र आहेत ? त्याचा वीर्य-नाश झाल्यामुळें बल, बुद्धि, पराक्रम, आयु, इत्यादि सर्व जीर्ण होऊन आतांपर्यंत ख्रिस्तानें शरीरत्यागहि केला असेल ? कारण संयोगजन्य पदार्थांचा वियोग अवश्य झालाच पाहिजे. आमच्या ख्रिस्ती बंधूंनीं येशूवर विश्वास ठेवण्यांत भयंकर चूक केली आहे. ईश्वर त्यांना आतां तरी सद्बुद्धि देवो.

१२४—त्यानें 'दियावल' व 'सैतान' म्हटलेला जुनाट 'साप' अजगर धरिला गेला अणि हजार वर्षें बांधलेला राहण्यासाठीं बांधून त्याला अगाधकूपांत टाकिला आणि हजार वर्षें पूर्ण होईपर्यंत त्यानें राष्ट्रांस आणखी ठकवूंनये म्हणून धरून किल्लीनें बंद करून त्यावर शिक्का मारिला; त्यानंतर त्याला थोडावेळ सोडिला पाहिजे. —प्र. क. अ. २० ओ. २।३

समीक्षक:—पहा, कसें तरी करुन एकदाचें सैतानाला पकडलें व एक हजार वर्षेपर्यंत त्याला बंद करून ठेवलें. परंतु अखेर त्याला सोडलेच. सोडल्यावर त्याला पुन: मनुष्यजातीला भ्रष्ट करितां येणार नाहीं काय ? अशा दुष्टाला तर कायमचा कोंडून ठेवला पाहिजे अथवा त्याला मरणाची शिक्षा दिली पाहिजे. पण अगोदर असल्या सैतानाचें अस्तित्व म्हणजेच हा ख्रिस्त्यांचा नुसता भ्रम आहे. केवळ लोकांना त्याची धमकी द्यावी हाच यांत मुळीं त्यांचा उद्देश: जसें एखाद्या धूर्तानें कोणा एकाद्या भोळ्या मनुष्यास सांगावें कीं, 'चल, मी तुला असुक एका देवतेचें दर्शन करवून देतों म्हणून त्याला एकान्त स्थलीं न्यावें एकाद्या झाडास बांधून त्याचे डोळे वस्त्रानें बंद करावेत आणि म्हणावें कीं उघडूं नको, मी सांगेन तेव्हां उघड, मध्येंच उघडलेस तर तुझें डोळे जातील' तशीच असल्या धर्ममतवाल्यांची गोष्ट आहे. आमचा धर्म जर तुम्ही मानणार नाहीं तर तुम्ही अक्षय काळाच्या नरकांत जाल. जो यांचे मानीत नाहीं तो सैतानाच्या जाळ्यांत फसला असून प्रभू येशूची कृपा त्याजवर राहणार नाहीं ! तो धूर्त त्या समोर येऊन म्हणतों डोळे उघडा, व उघडल्यावर म्हणतो झांका मग आपण एखाद्या झाडींत लपून बसतो व नंतर तेथून बोलतो डोळे उघडा व दत्तांचें दर्शन घ्या. त्या निर्बुध्दानें पहावें व 'जय दत्त महाराज' म्हणावें. अशाच लीला ह्या धूर्तांच्या होत, म्हणून कोणी त्यांना फसूं नये.

१२५—'नंतर' मोठें पांढरें 'सिंहासन,' व त्यावर 'बसलेला' कोणी एक माझ्या दृष्टीस पडला, त्यांच्या तोंडापुढून 'पृथ्वी' व आकाश 'पळालीं' त्यांस ठिकाण सांपडलें नाहीं. आणि मी मेलेले लहान थोर सिंहासनापुढें उभे राहिलेले पाहिले. मग 'पुस्तकें उघडलीं गेलीं. तेव्हां दुसरें एक 'पुस्तक उघडलें गेलें, तें जीवनाचें' आणि त्या पुस्तकांत जें लिहिलें होतें त्यावरुन मेलेल्यांचा न्याय 'त्यांच्यां त्यांच्या कर्माप्रमाणें' ठरविला.

—प्र. क. अ. २० ओ. ११, १२

**समीक्षकः**—ही बालिश कथा ऐका ! आकाश आणि पृथ्वी पळतांना, वाचकहो, तुम्ही कधीं पाहिली आहे काय ? ते कसें पळूं शकतात ? व कशावर बसतात ? ज्याच्या तोंडापुढून पळाले त्याचें सिंहासन व तो स्थिर कसा व कोठें राहिला ? मेलेलीं मनुष्यें परमेश्वरासमोर उभीं राहिलीं त्यावेळीं तो परमेश्वर उभा होता कां बसला होता ? तेथील कोर्ट कचेऱ्या, दुकानें याप्रमाणें ईश्वराचा सर्व व्यवहार जमाखर्चाच्या पुस्तकाप्रमाणें होत असतो काय ? व सर्व जीवांची हकीगत ईश्वरानें स्वतः लिहिलेली आहे कां त्याच्या गुमास्त्यानें ? अशा गप्पा ठोकूनच अनीश्वराला ईश्वर व ईश्वराला अनीश्वर ह्या मतमतांतरवाल्या लोकांनीं बनविले आहे.

१२६—नंतर सात वाट्या हातीं घेतलेल्या शेवटल्या ' सात पीडांनीं ' भरलेल्या सात दूतांपैकीं एक दूत येऊन मजशीं बोलला; तो म्हणाला, ये. नवरी म्हणजे ' कोंकऱ्याची स्त्री ' ती मी तुला दाखवितों.

—प्र. क. अ. २१ ओ. ९

**समीक्षकः**—येशू ख्रिस्तानें स्वर्गांत कां होईना पण सुन्दर अशी स्त्री गांठली म्हणावयाची ! मौज मारीत असेल नाहीं बरें ? जे ख्रिस्ती लोक स्वर्गांत जात असतील त्यांनाहि बायका मिळत असतील, मुलेंबाळें होत असतील. तेथेंहि जनसंख्या वाढल्यावर अनेक प्रकारची रोगराई उत्पन्न होत असेल व स्वर्गांत लोक मरतहि असतील. अशा स्वर्गाला दुरूनच् हात जोडणें योग्य होईल.

१२७—नगरी ' चौकोनी ' होती; तिची जितकी रुन्दी होती तितकीच तिची लांबी होती; त्यानें नगरीचें माप बोरुनें घेतलें, तें बाराशें मैल झालें; तिची लांबी, रुन्दी व उंची समान होती. मग त्यानें तिच्या तटाचें माप घेतलें; तें मनुष्याच्या हातानें एकशें चवेचाळीस हात भरलें. मनुष्यांचा हात दूतांच्या हाता एवढाच. तिचा तट ' यास्फे ' पाषाणाचा होता ? आणि नगरी शुद्ध कांचेसारखें शुद्ध सोनेंच होती. नगरीच्या तटाचें ' पाये ' वेगवेगळया उंच पाषाणांनीं शृंगारले होते. पहिला पाया यास्फे, दुसरा नीळ, तिसरा शिवधातु, चवथा पांच, पांचवा गोमेद, सहावा सार्दी, सातवा लसणा, आठवा वैडूर्य, नवबा पुष्कराज, दाहावा सोनलसणी, अकरावा याकींथ, बारावा पद्मराग आणि बारा वेशी बारा मोत्यें होत्या, ऐकेक वेस एकेका मोत्याची होती. नगरींतील ' मार्ग ' पारदर्शक कांचेसारिखा शुद्ध सोनेंच होता.

—प्र. क. अ. २१ ओ. १६ ते २१

**समीक्षकः**—ख्रिस्त्यांच्या स्वर्गाची रम्य हकीगत श्रवण करा ! ख्रिस्ती लोक मरतात, जन्मतात तरी त्या सर्वांचा समावेश त्या एवढ्या स्वर्गनगरींतच होतो. तेथील पूर्व वस्ती व नवीन नवीन भरती यांना जागा कशी मिळते कोण जाणें. कारण त्या ठिकाणची वस्ती कमी होण्याचें तर कारण नाहीं. ती नगरी बहुमूल्य रत्नांची बनलेली आहे व सर्व सोन्याची बांधलेली आहे ! तिची लांबी रुंदी तर ठीक आहे परंतु उंची साडे सातशे कोस कशी काय आहे, हें आकाशांतील बापालाच माहित ! एका मोत्याची एक वेस कशी बनविली असेल हें आकाशांतील बापाच्या पुत्राला ठाऊक ! व मार्ग पारदर्शक कांचेसारखें शुध्द सोन्याचे व सोनें पारदर्शक पदार्थासारखें असतें ही माहिती पवित्र आत्म्याचीच असेल ! आणि ह्या सर्व बाष्कळ गप्पा प्रकटीकरणकर्त्याच्या अजब मेंदूंतील असतील ! ख्रिस्त्यानो ! अद्याप तरी तुम्ही हिंदूंच्या पुराणांना हंसू नका, कारण तुमचें हें ' शुभवर्तमान ' पुराणांचा बाप आहे.

१२८—'तींत कांहीं निषिद्ध' व अमंगळपणा व लबाडी करणारा यांचा ' प्रवेश होणारच नाहीं, तर 'कोंकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेल्यांचा मात्र होईल.'

—प्र. क. अ. २१ ओ. २७

**समीक्षकः**—असेंच आहे तर ख्रिस्ती लोक येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणारे सर्व स्वर्गात जातील, अशा ज्या थापा मारितात त्या सर्व खोट्याच काय ? जर असें आहे तर थापाडा प्रकटीकरणकर्ता व एकादा पापीहि स्वर्गात जाऊं शकत नाहीं' तर मग अनेक पापीजनांच्या पापानें युक्त असलेला येशू ख्रिस्त हे देखील स्वर्गांत गेले नसतील.

१२९—पुढें कांहींहि शापित असणार नाहीं तर तींत देवाचें व कोंकऱ्याचें सिंहासन असेल आणि त्याचे दास त्याची सेवा करतील. ते त्याचें मुख पाहतील व त्याचें नांव त्याच्या कपाळावर असेल तेथें रात्र नाहीं आणि त्यांस दिव्याच्या अथवा सूर्याच्या प्रकाशाची गरज नाहीं; कारण प्रभु देव त्यांवर प्रकाश पाडतो व ते युगानुयुगें राज्य करतील. प्र. क. अ. २२ ओ. ३, ४, ५

**समीक्षक:**—स्वर्गवास मौजेचा खरा ! ईश्वर व येशू सिंहासनावर निरंतर राहतील काय ? व त्यांचे दास अहोरात्र त्यांच्या तोंडाकडे बघत असतील काय ? ख्रिस्त्यानो, आतां एवढें सांगा कीं तुमच्या ईश्वराचें मुख युरोपियनाप्रमाणें गोरें आहे कां निग्रोप्रमाणें काळें आहे कां जपान्याप्रमाणें पिवळें आहे ? जेथें श्रेष्ठ कनिष्ठत्वाचें वातावरण आहे तो स्वर्ग दुःखमूलक होय ! जो मुखवाला आहे तो ईश्वर सर्वज्ञ, सर्वेश्वर होऊं शकत नाहीं.

१३०— पहा, 'मी' लवकर 'येतों 'आणि प्रत्येकाला त्यांच्या कर्माप्रमाणें देण्यास माझ्याजवळ वेतन' आहे. प्र. क. अ. २२ ओ. १२

**समीक्षक:**—प्रत्येकाला त्याच्या कर्मानुसार फल मिळतें, हें जर खरें आहे तर पापाचें क्षालन कधींहि होऊं शकणार नाहीं व जर ख्रिस्तविश्वासानें पापाचें क्षालन होतें तर वरील वाक्य खोटें ठरलें; सारांश, या बायबलांत परस्परविरुद्ध अशा असंबद्ध गोष्टी पुष्कळच असल्यामुळें तें सपशेल बनावट व खोटें आहे; म्हणून त्याला मानूं नये. आमच्या ख्रिस्ती मित्रांनीं लाखों गोष्टी खोट्यानाट्या अशा ह्या पुस्तकांत वर्णिल्या आहेत त्या कोठवर सांगाव्यात ? या तेराव्या समुल्लासांत त्यांतील थोड्याशा नमुन्यादाखल दाखविल्या आहेत', यावरून बुद्धिमान् लोक पुष्कळच समजतील. थोडासा भाग सोडून दिला म्हणजे बाकी येथून तेथून लबाडीचा बाजार, अशी स्थिति असल्याकारणानें खोट्याच्या संसर्गानें खरा भागहि शुद्ध राहूं शकत नाहीं, याकरितां बायबलासारखे त्याज्य ग्रंथ सोडून 'ईश्वरीयज्ञान वेद' याचा स्वीकार करुन स्वतःचें कल्याण करा.

**इति श्रीमद्दयानंदसरस्वतीस्वामिनिर्मिते सत्यार्थप्रकाशे सुभाषाविभूषितः कृश्चीनमतविषयः त्रयोदशः समुल्लासः सम्पूर्णः ॥**

# अनुभूमिका

हा समुल्लास फक्त मुसलमानांच्या धर्ममताविषयींच लिहिण्यांत येत आहे. म्हणजे या १४ व्या समुल्लासांत केवळ कुराणाचें परीक्षण करण्यांत येईल; अन्य ग्रंथाविषयीं लिहिण्याचें कारण नाहीं, कारण यद्यपि यांच्यामध्येंहि अनेक मतमतांतरें असल्यामुळें 'कुराणां' तील कांहीं शब्द व अर्थादि विषयांमध्यें त्यांच्यांत मतभेद असले तरी कुराणाचें प्रामाण्याविषयीं सर्वांचें एकमत आहे. अरबी भाषेंतील मूळ कुराण ग्रंथावर मौलवी लोकांनीं उर्दु मध्यें भाषांतरें केलेलीं आहेत. तथापि उर्दु तील जीं कुराणवचनें ह्या समुल्लासांत देवनागरी अक्षरांत किंवा आर्य भाषेंत[१] नमूद केलीं आहेत तीं अरबीभाषेच्या मोठमोठ्या विद्वानांकडून शुद्ध करवून छापलीं आहेत. इतकेंहि करून जर कोणी म्हणतील कीं, हा उर्दु अर्थ बरोबर नव्हे तर त्या सद्‌गृहस्थांचें उचित कर्तव्य हेंच आहे कीं, प्रथम त्यांनीं अरबीचें उर्दुमध्यें ज्या विद्वान् मौलवींनीं भाषांतर केलें आहे त्यांचें अगोदर खंडन करावें. पश्चात् ह्या समुल्लासावर जें काय त्यांना लिहावयाचें तें त्यांनीं लिहावें. मनुष्य जातीची उन्नत्ति व्हावी, तिनें सत्यासत्याच्या निर्णयार्थ सर्व मतांच्या स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून, त्यांतील दोषांचें खंडन व गुणांचे ग्रहण करावें, हेंच ह्या समुल्लास लिहिण्याचें माझें मुख्य प्रयोजन आहे. ह्या मतावर अथवा अन्या मतावर खोटे नाटे दोष लादावे अगर त्यांची अवास्तव स्तुति करावी हा माझा मुळींच उद्देश नाहीं. जें सत्य आहे तेंच सत्य व जें निंदनीय आहे तें असत्य होय. हें सत्यासत्य सर्वांना विदित व्हावें, यायोगें कोणीही कोणाचें असत्य चालूं देणार नाहीं व सत्य दाबून टाकूं शकणार नाहीं. सत्यासत्य विषय प्रकाशित झाल्यावरहि इच्छा असो वा नसो, कोणी मानो वा न मानो, कोणालाहि त्याजवर जुलुमजबरदस्ती करण्याचें कारण नाहीं. आणि सज्जनांची हीच रीत आहे कीं, स्वतःच्या व परक्यांच्या दोषांना दोष व गुणांना गुण समजून सद्‌गुणांचें ग्रहण व दोषांचा त्याग करावा. हट्ट आणि दुराग्रह असेल तो निर्मूल नाहींसा करावा व इतरांचा करण्यास झटावें कारण पक्षाभिमानानें जगांत कोणते अनर्थ झाले नाहींत ? हेंच सत्य आहे कीं, ह्या अनिश्चित क्षणभंगुर जीवनामध्यें दुसऱ्यांची हानि करून स्वतःचा फायदा करून घेणें हें मनुष्यपणाला सोडून आहे. यांत जें कांहीं विरुद्ध लिहिलें गेलें असेल तें सज्जनांनीं माझ्या निदर्शनास आणावें पश्चात् जर योग्य असेल तर तें अवश्य मानलें जाईल हा लेख हट्ट, दुराग्रह, ईर्ष्या, द्वेष, वादविवाद व विरोध नाहींसा व्हावा ह्या हेतूनें लिहिला आहे. विरोध वगैरे वाढविण्याकरितां नव्हे. कारण एकमेकांची हानि करण्याऐवजीं परस्परांना लाभदायक होईल, असें करणें, हेंच आमचें मुख्य कर्तव्य आहे. आतां ह्या चवदाव्या समुल्लासांत मुसलमानी मत सर्व सज्जनांसमक्ष विचारार्थ निवेदन करीत आहे. विचारांतीं इष्ट असल्यास त्याचें ग्रहण व अनिष्टाचा परित्याग त्यांनीं करावा.

अलमतिविस्तरेण बुद्धिमद्वर्य्येषु ॥
इत्यनुभूमिका.

---

१ स. प्र. च्या पूर्वीच्या मराठी आवृत्तींमधील कुराणांतील वचनें हिंदी भाषेंत होतीं. परंतु मराठी वाचकांना समजण्याकरतां ह्या आवृत्तींत त्याच वचनांचें मराठी भाषांतर डॉ. मौलवी हकीम सूफी मीर महंमद याकूब खान कृत (व कुराण प्रकाशक ऑफिस मुंबईनें १९१६ सालीं प्रसिद्ध केलेल्या) 'पवित्र कुराणाचें सुरस व सटीक मराठी भाषांतरां' तून उद्धृत केलें आहे.

# अथ चतुर्दशसमुल्लासारम्भः ॥

## अथ यवनमतविषयं समीक्षिष्यामहे ॥

१—परम दयाळू (आणि ) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें ( मी आरंभ करितों ).

—सूरतुल् फातेहा अ. १ आ. १

**समीक्षक:**—हें ' कुराण ' ईश्वरकृत आहे असें मुसलमान लोकांचें म्हणणें असते. पण ह्या वचनावरुन त्याचा बनविणारा कोणीतरी दुसरा असला पाहिजे हें स्पष्ट दिसतें. परमेश्वरानें तें बनविलें असतें तर ' परमदयाळू परमेश्वराच्या नांवानें ' म्हणजे ईश्वराचें नांव घेऊन आरंभ करतों असें न येतां ' आरंभ वास्ते उपदेश मनुष्यों के ' मनुष्यमात्रांना उपदेश करण्यासाठीं प्रारंभ करितों, असेंच आलें असतें. कार्यारंभीं तुम्ही ईश्वराचें नांव घेत जा असा जर मनुष्यांना तो उपदेश करितो असें म्हणावें तर तेंहि ठीक नाहीं, कारण पापमूलक कार्यारंभींहि ईश्वराचें नांव घेणें भाग पडल्यामुळें त्याचेंच नांव दूषित होणार आहे. जर ईश्वर क्षमाशील दयाळू आहे तर सृष्टीमध्यें मनुष्यांच्या सौख्यार्थ अन्य पशूपक्ष्यादि प्राणी यांना मारण्याची, त्यांचें मांस भक्षण करण्याची त्यानें आज्ञा कां दिली ? ते पशूपक्ष्यादि प्राणी निरपराधी व त्यानेंच बनविलेले नाहींत काय ? परमेश्वरानें सरसकट सर्व कार्यारंभीं म्हणण्यापेक्षां ' परमेश्वराचें नांवानें फक्त सत्कार्यांना आरंभ ' करा, असेंच म्हणावयास पाहिजे होतें. तें ज्या अर्थी सांगितलें नाहीं त्या अर्थी चोरी, व्यभिचार, मिथ्याभाषणादि अधार्मिक कार्यांनाहि आरंभ करावयाचा असला तर परमेश्वराचें नांव घेऊनच करावयाचा काय ? अशी निदान कुराणानुयायांची समजूत असल्यामुळेंच कसाई आदि मुसलमान गायी वगैरेंच्या मानावर सुरा ठेऊन 'बिसमिल्लाह् ' म्हणून कापीत असतात तें सर्वस्वी कुराणोक्त ईश्वरीयाज्ञेनुसार योग्य आहे असेंच आपणांस दिसून येईल. मुसलमानांचा ' खुदा ' दयाळू कोठें राहिला तें पहा, कारण त्याची दया पशूपक्षांवर राहिलेली नाहीं ! आणि जर या वचनाचा योग्य आशय मुसलमान लोक जाणत नसतील तर हें वचन व्यर्थ होय. जर मुसलमान याचा अर्थ चुकीचा करितात असें म्हणणें असेल तर बरोबर अर्थ कोणता आहे ?

२— सर्व स्तुति सकल जगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच ( योग्य ) आहे. (तो) परम दयाळू ( आणि ) कृपाळू ( आहे ) —सू. फा. अ. १ आ. २-३

**समीक्षक:**—कुराणाचा खुदा ( परमेश्वर ) संसाराचा पालनकर्ता व सर्वांवर दया करणारा व क्षमाशील जर असता तर अन्य मतावलंबी जन व पशूपक्षी यांना मुसलमानांच्या हातून मारण्याचें त्यानें कुराणाद्वारें फर्मान सोडलें नसतें. तो क्षमाशील आहे म्हणजे पाप्यांनाहि तो क्षमा करील काय ? असें असेल तर कुराण व पैगंबर यांना जे मानीत नाहींत ते काफर असून, अशा ' काफर लोकांची कत्तल करा ' असें त्यानें कां म्हटलें ? यावरून कुराण ईश्वरकृत दिसत नाहीं.

३—(तो शेवटच्या ) निर्णयाच्या दिवसाचा धनी ( आहे ). (हे परमेश्वरा ) तुझीच आम्ही भक्ति करित आहों; व तुझीच आम्ही मदत मागत आहों. तूं आम्हास सरळ मार्ग दाखीव. —सू. फा. अ. १ आ. ४,५,६

**समीक्षक:**-ईश्वर नित्य न्याय करीत नाहीं काय ? एकादा दिवसच न्यायासाठीं राखून ठेवला आहे काय ? यामुळें त्याची झोटिंगशाही विदित होते. त्याची भक्ति करणें व त्याचें साहाय्य मागणें हें उत्तमच होय. परंतु वाईट गोष्टी करीत असतांनाहि त्याचें सहाय्य मागावें कीं काय ? सत्य मार्ग एकच व तो फक्त मुसलमानांचाच काय ? किंवा इतरांचाहि आहे ? सत्याचा स्वीकार मुसलमान कां करीत नाहींत ? अधःपाताच्या सीध्या रस्त्याची तर त्यांना तळमळ लागली नसेल ना ? जर सत्य सर्वांचें एकच आहे तर मुसलमानी मतांतच विशेष तें काय राहिलें ? दुसऱ्याचें सत्यहि तें जर मानीत नसतील तर ते पक्षपाती होत.

४—( म्हणजे ) ज्या (लोकां) वर त्वा कृपा केली आहेस त्यांचा मार्ग ( दाखीव. ) पण ज्यांच्यावर ( तुझा ) कोप झालेला आहे त्यांचा ( मार्ग ) नको आणि आडमार्गी भटकणाऱ्यांचाहि नको. —सू. फा. अ. १ आ. ७

**समीक्षक:**—जर मुसलमान लोक पूर्वजन्म व पूर्वकृत पापपुण्य मानीत नाहींत, तर कोणावर दया करणें व कोणावर ती न करणें हा ईश्वराचा पक्षपात होय. कारण पापपुण्याखेरीज दुःख अथवा सुख देणें म्हणजे केवळ अन्याय होय. विनाकारण एखाद्यावर दया करणें अथवा त्यावर क्रोध करणें हें पण अस्वाभाविक आहे. तो दया व क्रोध करूं शकत नाहीं व एखाद्याचें जर पूर्वसंचित पुण्य आहे, पाप नाहींच तर मग त्यावर दया अथवा क्रोध करण्याचें त्याला काय कारण ? हें वचन परमेश्वरानें मनुष्याचें मुखांतून वदविलें कीं, सदा ह्याप्रमाणें तुम्ही म्हणत जा असें लिहिलें आहे ? व असें असेल तर ' अलिफ बे ' आदि अक्षरेंहि ईश्वरानेंच शिकविलीं काय ? जर तुम्ही म्हणाल कीं अक्षरज्ञानशिवाय ही सूरा कशी वाचतां येईल तर काय कंठानेंच वदविलें व वदवित गेला ? जर असें आहे तर सर्व कुराणच त्यानें कंठद्वारां शिकविलें असेल. यावरून ज्या पुस्तकांत पक्षपातयुक्त वर्णत आहे आहे तें पुस्तक ईश्वरकृत होऊं शकत नाहीं, असें समजलें पाहिजे. जसें, अरबी भाषेंत कुराण उरल्यामुळें अरबस्थ लोकांना त्याचें अध्ययन सुलभ झालें. पण अन्य बोलणाऱ्यांना त्याचा उपयोग काय ? यावरून ईश्वर पक्षपती ठरतो. ज्याप्रमाणें सर्व प्रादेशिक भिन्न भिन्न भाषांहून विलक्षण स्वतंत्र व सर्वसाधारण सृष्टिस्थ सर्व देशवासीयांवर न्यायदृष्टि बाळगून परमेश्वरानें संस्कृत भाषेंत वेद प्रकाशित केले तसें कुराण केलें असतें तर पक्षपाताचा दोष आला नसता.

५—हें ( असें ) पुस्तक ( होय कीं ) त्या ( ज्या ईश्वरवाणी होण्यां) त कसलाच संशय नाहीं. (तें परमेश्वराला भिऊन चालणाऱ्यांस सन्मार्गदर्शन ( होय ). ( म्हणजे ) जे लोक ( धर्मविषयक ) गैबी—इंद्रियातीत-गोष्टींवर विश्वास ठेवतात, व ( नित्य ) नमाज पढतात आणि जें कांहीं आम्ही देऊन ठेविलें आहे त्यांतून ( परमार्थांत ) खर्चेंच करितात; आणि ( हे पैगंबर ! ) जे लोक, तुला जें ( पुस्तक ) प्रकट करण्यांत आलें आहे त्यावर व तुझ्यापूर्वी जीं (पुस्तकें ) प्रकट झालीं आहेत त्यांजवर विश्वास ठेवतात; आणि परलोकींधीहि जे ( पूर्ण ) खातरी बाळगितात, असलेच लोक आपल्या पालनकर्त्याच्या सरळ मार्गावर होत; आणि हेंच ( अखेर आपल्या मनोरथयांत ) सफल होतील. ( हे पैगंबरा ! ) ज्या लोकांनीं ( इस्लाम स्विकारण्याचें ) नाकारिलें, त्यांना, त्यांना तूं (ईश्वरी शिक्षेचें ) भय दाखविलेस काय अगर न दाखविलेस काय सारखेंच; ते तर विश्वास धरणार नाहींत. परमेश्वरानें त्यांच्या अंतःकरणावर व त्यांच्या कानांवर मोहर लावली आहे, व त्यांच्या डोळयावर पडदा ( पडला ) आहे, आणि त्यांना ( परलोकीं ) मोठी शिक्षा ( होणें ) आहे.
—सूरतुल् बकर अ. २ अ. २ ते ७

**समीक्षक:**—आपल्या तोंडानेंच आपल्या पुस्तकाची प्रशंसा करणें ही ईश्वराची दांभिकता नव्हे काय ? परहेजगार म्हणजे धार्मिक लोक सन्मार्गी असतातच पण जे सन्मार्गी नाहींत त्याना हें कुराण सन्मार्ग दाखवूं शकत नाहीं, म्हणून तें कुचकामाचें होय ! पाप, पुण्य व पुरुषार्थ केल्याशिवाय ईश्वर आपल्या खजिन्यांतून खर्च करण्यास पैसा देतो काय ? जर देतो तर सर्वांना कां देत नाहीं ? व मग खास मुसलमान लोक तरी द्रव्य प्राप्तीसाठीं उद्योग कशाला करितात ? जर बायबल इंजिल वगैरेंवर विश्वास ठेवणें योग्य आहे तर मुसलमान कुराणावर जसा विश्वास ठेवितात तसा बायबलावर कां ठेवित नाहींत ? आणि ठेवित असतील तर कुराणाचें अस्तित्व कशाकरितां ? कुराणांत जास्त गोष्टी विवेदन केलेलें आहे, असें जर म्हणणें असेल तर पूर्वीच्या ग्रंथांत म्हणजे बायबलादि धर्मशास्त्रांत त्या गोष्टी निवेदन करण्यास ईश्वर विसरला असेल असाच याचा अर्थ नव्हे काय ? जर विसरला नसेल तर नवा ग्रंथ ' कुराण ' बनविण्याचें प्रयोजन तरी कोठें राहिलें ? बायबल व कुराण यांमधील कित्येक गोष्टी परस्पर सुसंगत व विसंगत अशा असल्याचें स्पष्ट दिसून येतें, हें असें कां ? ' वेद ' ग्रंथाप्रमाणें एकच पुस्तक ईश्वरानें न बनविता दोन चार कां बनविलीं ? न्यायदिनावरच विश्वास ठेवला पाहिजे दुसऱ्यावर नाहीं काय ? ख्रिस्ती व मुसलमान हेच तेवढे ईश्वरीय उपदेशानुसार वागणारे आहेत मग त्यांच्यांत कोणीहि पापी म्हणून औषधालासुद्धां मिळणार नाहीं काय ? अधर्मी असे ख्रिस्ती मुसलमानसुद्धां मुक्ति मिळवतील व दुसरे धार्मिक असतील तरीहि त्यांना स्वर्गप्राप्ति होऊं शकणार नाहीं हा केवढा घोर अन्याय ? व ही कुराणोक्त ईश्वराची बेबंदशाही आहे म्हणावयाची. जे मुसलमान नाहींत त्या सर्वांना ' काफर ' समजण्यांत यावें हा मुसलमानांच्या

न्यायाधीशानें निव्वळ एकपक्षीं न्याय दिलेला नाहीं काय ? जर परमेश्वरानेंच मनुष्यांच्या अंतःकरणावर व कानावर मोहर केलेली आहे तर तें पाप करणार नाहींत तर काय करतील ? पण त्यांच्याकडे कांहीं दोष नाहीं त्यांच्या पापाबद्दल सर्वस्वी जबाबदार त्यांच्या अंतःकरणावर मोहरा ठोकणारा कुराणोक्त 'अल्ला' च आहे ! तो अल्ला जबाबदार असतांहि पाप्यांना त्यांच्या अपराधाबद्दल शिक्षा करावयाला तो पुनः तयारच ! खासा न्याय व चोख न्यायाधीश तो असा असतो ! पाप्यांनीं जीं पापकर्मे केली असतील तीं त्यांनीं स्वतंत्रतेनें केलेलीं नाहींत मग त्यांना शिक्षा कां ?

६—यांच्या अंतःकरणांत (आधींच अविश्वासाचा) रोग होता, तशांत आतां (कुराण प्रकट करून) परमेश्वरानें त्यांचा (तो) रोग (आणखीही) वाढविला. —सू. ब. अ. २ आ. १०

**समीक्षकः**—विनाकारण ज्यांच्याठायीं रोग वाढविले त्या रोगी मनुष्यांना किती दुःख झालें असेल ? पण ह्या इस्लामीयांच्या दयाळू ईश्वराला दयेचा पाझर म्हणून फुटला असेल असें, वाचकहो, तुम्हाला वाटतें काय ? वाचकहो, तुम्हीच सांगा हें काम सैतानांचा गुरु अशा महासैतानालाच शोभणारें नाहीं काय ? कोणाच्या अंतःकरणावर मोहर ठोकणें, कोणाचे रोग वाढविणें, हें काम ईश्वराचें होऊं शकतें काय ? रोगवृद्धि होणें हें ज्याच्या त्याच्या निष्काळजी-पणावर, अपराधावर व पापावर अवलंबून आहे.

७—ज्या (परमेश्वरा) नें तुम्हासाठीं पृथ्वीला बिछाईत व आकाशाला छत बनविलें; —सू. ब. अ. २ आ. २२

**समीक्षकः**—बरें, आकाश कशाचा तरी छत होऊं शकतें काय ? ही अविद्याजनक गोष्ट असून शिवाय आकाशाला छत समजणें हें हास्यास्पदहि होय. जर कोणत्याहि प्रकारच्या पृथ्वीभागाला आस्मान मानावयाचें असेल तर ही ज्याच्या त्याच्या घरची गोष्ट आहे.

८—आणि आम्ही आपला सेवक (मोहंमद) यांस जें (कुराण) प्रकट केलें आहे त्या संबंधानें जर तुम्ही संशयांत असाल, (व समजत असाल कीं हें ईश्वरी पुस्तक नव्हे, पण मनुष्यानें रचलेलें आहे) आणि तुम्ही (आपल्या त्या दाव्यांत) खरे असाल; तर ह्या सारखाच एक अध्याय (सूरा तुम्हीहि रचून) आणा व परमेश्वराखेरीज तुम्ही आपले प्रत्यक्ष हिमाईतीहि बोलवून घ्या. मग जर तुम्ही (एवढी गोष्टहि) न करूं शकला व (ती) तुमच्यानें केव्हांहि करवणारच नाहीं, तर ज्या नरकाग्नीचें इंधण मनुष्यें व दगड होतील, त्याचें भय बाळगा, तो नास्तिकांकरितां (भडकवून) तयार ठेवलेला आहे. —सू. ब. अ. २ आ. २३, २४

**समीक्षकः**—कुराणांतील एकाहि सूरतेप्रमाणें सूरत बनणें अशक्य आहे काय ? अकबर बादशाहचे वेळीं मौलवी फैजीनें 'नुकते' शिवाय कुराण बनविलें नव्हतें काय ? स्वर्गीय आग ती कोणती असावी बरें ? त्या आगीला म्यावें व भौतिक आगीला भिण्याचें कारण नाहीं वाटतें ? भौतिक अग्निमुखांतहि जें कांहीं पडेल तें भक्षण करण्यास तो सज्जच असतो. कुराणामध्यें ज्याप्रमाणें काफर लोकांकरितां पत्थर तयार आहेत म्हणून सांगितलें त्याप्रमाणें म्लेंच्छासाठीं हिंदूच्या पुराणांत वर्णन केलेलें घोर नरककुंड तयार करून ठेवलेलें आहेत. मग यापैकीं कोणती गोष्ट खरी आहे तें तुम्हीच सांगा. आपापल्या म्हणण्याप्रमाणें दोघेहि स्वर्गगामी व कुराण पुराण अनुयायांच्या मताहून भिन्न ते सर्व नर-कगामी बनतात ! याकरितां ह्या दुराग्रही लोकांचे हे झगडे आमूलाग्र संपूर्णपणें खोटे आहेत. धार्मिकजन सुख पावतील व पापीजन दुःख भोगतील मग ते धार्मिक व पापीलोक हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे कोणीहि असोत, व तेंच सत्य आहे.

९—आणि (हे पैगंबर !) ज्या लोकांनीं विश्वास धरिला व चांगलीं कामेंहि केली, तूं त्यांना शुभवर्तमान ऐकीव कीं, त्यांच्यासाठीं अशा (स्वर्गीय) बागा आहेत कीं, ज्यांच्या खालून नद्या वाहत असतील. जेव्हां त्यांना त्यांतून एखादें फळ खावयास दिलें जाईल, तेव्हां ते म्हणतील कीं, आम्हांला जें पूर्वी दिलें होतें तेंच हें, आणि तेथें त्यांच्यासाठीं चोखी (व निर्मल) जोडवी असतील व ते त्या (बागां) त सदासर्वदा राहतील. —सू. ब. अ. २ आ. २५

**समीक्षकः**—कुराणांत वर्णिलेला हा स्वर्ग इह लोकांपेक्षां कोणत्या विशेष गोष्टींनीं उत्तम आहे बरें ? ज्या गोष्टी ह्या संसारांत आहेत त्याच गोष्टी मुसलमानांच्या स्वर्गांत आहेत ! हो, पण एक विशेष गोष्ट मुसलमानी स्वर्गांत आहे व ती म्हणजे येथें जसें पुरुष जन्मतात, मरतात येतात, व जातात त्याप्रमाणें स्वर्गीं नाहीं. परंतु येथील स्त्रिया सर्वकाळ यथें

राहूं शकत नाहींत. पण मुसलमानी स्वर्गीय लोकांत स्त्रिया, साधारण स्त्रिया नव्हेत, तर बीबिया म्हणजे उत्तमोत्तम सुंदर स्त्रिया सर्वकाळ वास करितात ! पण जोंपर्यंत न्यायाची रात्र येणार नाहीं तोंपर्यंत त्या बिचाऱ्या एकट्याच तळमळत पडणार एवढीच काय ती अडचण आहे. त्या अभागीनींचे हे कष्टप्रद दिवस कसे जात असतील ? समाधानाला जागा एवढीच कीं, त्यांच्यावर मुसलमानांच्या खुदाची मेहरबानी होत असेल ! आणि खुदाच्याच आश्रयानें त्या आपला कंटाळवाणा वेळ कंठीत असतील तर ठीक आहे ! हा मुसलमानी स्वर्गलोक गोकूळवासी गोसाव्यांच्या गोलोकाप्रमाणें व मंदिराप्रमाणें दिसतो, कारण यांच्या गोकुळांत पुरुषापेक्षां स्त्रियांचा मान जास्त असतो. ह्याचप्रमाणें खुदाच्या घरीं पुरुषापेक्षां स्त्रियांचा मानमरातब फार व त्यांच्यावर त्याचें प्रेमहि दांडगें दिसतें, कारण अल्लानें बिबींना स्वर्गांत जसें ठेऊन घेतलें आहे तसें पुरुषांना नाहीं ! सांगा, खुदाच्या हुकूमाशिवाय त्या स्वर्गांत राहूं शकतात काय ? जर हें वर्णन यथार्थ असेल तर खुदा स्त्रीलंपट बनण्याचा सम्भव आहे.

१०—आणि परमेश्वरानें आदमला सर्व (वस्तूंचीं) नावें शिकविलीं; नंतर त्यानें त्या वस्तूंना दूतांपुढें मांडून फर्माविलें कीं, जर तुम्ही (आपल्या दाव्यांत) खरें आहां, तर तुम्ही मला ह्या वस्तूंची नावें सांगा (पाहूं ?) (तेव्हां परमेश्वरानें आदमला) फर्माविलें कीं हे आदमा ! तूं दूतांस त्यां (वस्तूं) चीं नावें सांग . मग जेव्हां आदमनें दूतांस त्यां (वस्तूं) चीं नावें सांगितलीं, तेव्हां (परमेश्वरानें दूतांस उद्देशून) सांगितलें कीं, कां मी तुम्हांस सांगितलें नव्हतें कीं मी आकाशाचे व पृथ्वीचे गुप्त भेद जाणतो आणि जें काय तुम्ही (आतां) जाहीर करितां व जें काय तुम्ही (मनांत) लपवितां तें (सर्वही) मला माहीत आहे. —सू. ब. अ. २ आ. ३१, ३३

**समीक्षकः**—दूतांना असा धोका देऊन आपली प्रशंसा करून घेणें हें ईश्वराच्या थोरपणाला शोभतें काय ? ही शुद्ध दांभिकता असल्यामुळें तिला कोणीहि विद्वान् किंमत देणार नाहीं किंवा तीबद्दल अभिमान बाळगणार नाहीं. परंतु ईश्वर अशा तऱ्हेनेंच आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित करूं पाहतो काय ? अशा रीतीनें फक्त जंगली लोकच फसतील व त्यामध्येंच असली पाखंडे खपूं शकतील, ज्ञानी लोकांत त्यांची डाळ शिजणार नाहीं.

११—आणि आम्ही दूतांस फर्माविलें कीं तुम्ही आदमला नमन करा. तेव्हां सैतानखेरीज (सर्वांनींच) नमन केलें. त्यानें (मात्र) नाकारिले व तो शेखींत आला आणि नास्तिक बनून बसला. —सू. ब. अ. २ आ ३४

**समीक्षकः**—यावरून मुसलमानांचा ईश्वर अल्पज्ञ व कमकुवत आहे, हें स्पष्ट ठरतें. कारण बाबा आदमला सैतान नमस्कार करणार नाहीं हें जाणूनच त्यानें प्रथमच सैतानखेरीज सर्वांनीं नमस्कार करावा म्हणून सांगावयाचें होतें म्हणजे ऐनवेळीं अशी फजिती झाली नसती ! प्रथम असा मगरूर व दुष्ट सैतान उत्पन्नच कां केला ? बरें, उत्पन्न करूनहि त्याच्यापुढें ईश्वरानें इतकें दीन बनावें हें युक्त नव्हे. ज्यानें ईश्वराचा हुकूम अमान्य केला त्याचें पारिपत्य ह्या कुराणोक्त ईश्वराला कांहीं करता आलें नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे ! पहा, जेथें सैतानासारखा एकच काफर मुसलमानांच्या ईश्वराला पुरून उरला, तेथें ज्या ठिकाणीं मुसलमानांच्या कथनानुसार कोट्यावधि काफर बसत आहेत, त्या ठिकाणीं खुद्द मुसलमानांचा ईश्वर येऊन उतरला तरी त्याला अथवा त्याच्या अनुयायांना कोणीहि भिणार नाहीं, हें उघड आहे ! ईश्वर कधीं कधीं रोग वाढवतो, फसवितो पण ह्या विद्या त्यानें सैतानापासून शिकल्या असल्या पाहिजेत व सैतानानें खुदाजवळ , कारण खुदाखेरीज सैतानाचा योग्य सद्गुरु व वस्ताद दुसरा कोण असणार ?

१२—आणि आम्ही (आदमला) सांगितलें कीं, हे आदमा ! तूं व तुझी पत्नी (उभयतां) स्वर्गांत रहा व तेथें तुमच्या मर्जीस येईल तें खूप खा (प्या). पण ह्या (गव्हाच्या) वृक्षाजवळ फिरकूं नका. (असें कराल) तर तुम्ही (आपणच आपलें) नुकसान करून घ्याल. मग सैतानानें त्यांना तेथून फूस दिली व (अखेर) ज्यां (सुखां) त ते होते त्यापासून त्यांना अंतरविलें , आणि आम्ही फर्माविलें कीं, तुम्ही (सर्व) खालीं उतरा. तुम्ही एकमेकांचें शत्रू आहां. आणि पृथ्वींत तुझ्यासाठीं एक (खास) वेळपर्यंत राहण्याचें ठिकाण व (निर्वाहाचें) साधन आहे. मग आदमनें आपल्या पालनकर्त्यापासून (क्षमायाचनेचे कांहीं) शब्द शिकून घेतले.

—सू. ब. अ. २ आ. ३५, ३६, ३७

**समीक्षक:**—ईश्वराची चंचलता पहा ! आतांच आदमाला सहकुटुंब स्वर्गांत राहण्याचा आशीर्वाद दिला व लगेच पुन: अल्पावधींत त्यांची स्वर्गांतून हकालपट्टी केली. पुढें काय होणार याचें यथार्थ ज्ञान ह्या ईश्वराला असतें तर त्यानें अगोदर आशीर्वाद दिलाच नसता ! व सैतानालाहि त्यानें दंड केला असता. बरें तो वृक्ष कोणाकरितां त्यानें निर्माण केला होता ? स्वत: करितां कीं दुसऱ्यासाठीं ? दुसऱ्याकरितांच असेल तर मग प्रतिबंध करण्याचें कारण काय ? ह्यावरून हें सर्व काम ईश्वराचें किंवा ईश्वरीय पुस्तकांचें म्हणून होऊं शकत नाहीं. आदमसाहेब स्वर्गांत होते तोंपर्यंत त्यांनीं ईश्वराजवळ राहून कोणकोणत्या विषयांचें ज्ञान प्राप्त केलें व स्वर्गांतून त्यांची पृथ्वीवर रवानगी झाली पण ती कोणत्या वाहनांद्वारें ? स्वर्ग हा एखाद्या पर्वतावर आहे कां आकाशावर ? आदमाला व त्याच्या बायकोला स्वर्गांतून उड्डाण करतेवेळीं पक्ष्यांप्रमाणें पंखें फुटलीं होतीं काय ? किंवा वरून भूमिवर आदळून पडले ? आदमाचा पुतळा ईश्वरानें ज्या अर्थी मातीचा तयार केला होता त्या अर्थी स्वर्गांत माती होती तर ! ह्यावरून एवढें कळतें कीं, स्वर्गांत जेवढे म्हणून दूत वगैरे लोक आहेत ते सर्व प्रथम मातीचे तयार केले गेले, कारण मातीखेरीज शरीर व त्याचे भाग बनवितां येणार नाहींत व जर शरीरें मातीचीं आहेत तर ती केव्हांतरी नष्ट व्हावयाचींच ? मग अशा स्थितींत स्वर्गीय दूत वगैरे लोक मेले म्हणजे ते कोठें जातात ? जर त्यांना मरण नसेल तर जन्महि नसला पाहिजे. परंतु जन्म तेथें मृत्यु आहेच. हा जर निश्चित सिद्धांत आहे तर कुराणांत लिहिलें आहे कीं, स्वर्गांत सर्वकाल बीबिया राहात असतात हें सर्व खोटेंच ठरलें, कारण त्या मेल्याहि असतील व ह्या स्वर्गांत जाणारेहि सर्व मृत्यु पावत असतील.

१३—आणि ज्या दिवशीं कोणी मनुष्य दुसऱ्या कोणा मनुष्याच्या कांहींच कामा येणार नाहीं, व त्याच्या वतीनें ( कोणाचीच) शिफारस मान्य होणार नाहीं, आणि त्याच्यापासून (कोणा तऱ्हेची) कांहीं भरपाई घेतली जाणार नाहीं व लोकांना ( कोठूनहि ) कांहीं साहाय्य मिळणार नाहीं त्या ( पुनरुत्थानाचे ) दिवसाला तुम्ही भ्या.—सू. ब. अ. २ आ. ४८

**समीक्षक:**— चालू असलेल्या प्रत्येक दिवसास भिण्याचें कारण नाहीं काय ? वाईट काम करतेवेळीं दररोज भ्यालें पाहिजे. शिफारस जर मान्य करण्यांत येणार नाहीं तर मग पैगंबराची साक्ष अथवा वकिली अगर मध्यस्थी यामुळें ईश्वरापासून स्वर्गप्राप्ती करून घेतां येईल ही आशा सफल कशी होणार ? स्वर्गस्थ लोकांचा सहाय्यकर्ता परमेश्वर आहे व नरकस्थ लोकांचा नाहीं काय ? असें जर आहे तर तो ईश्वर पक्षपाती आहे.

१४—व ( तोंडून ) हित्तुन ( म्हणजे क्षमाक्षमा ) बोलत जा. म्हणजे आम्ही तुम्हांस तुमच्या पापांची क्षमा करूं, व जे ( आमचा ) हुकूम चांगला बजावतील त्यांना आम्ही अधिक ( पुण्यहि ) देऊं ( तें वेगळेंच ).

—सू. ब. अ. २ आ. ४८

**समीक्षक:**—ईश्वराचा हा उपदेश सर्वांना पतित बनविणारा आहे कीं नाहीं याचा विचार करा. पापाची क्षमा मागितल्यास ती खात्रीपूर्वक मिळते अशी पापी जनांची दृढभावना झाल्यामुळें ते कोणतीं म्हणून पापें करण्याचें सोडतील ? पापांची क्षमा करणारा परमेश्वर व हें परमेश्वराचें पुस्तक हे दोघेहि अन्यायी होत.

१५—जेव्हां मूसानें आपल्या लोकांसाठीं पाण्याची दरखास्त केली तेव्हां आम्ही फर्मावलें कीं ( हे मूसा ) तूं आपली काठी खडकावर मार, ( काठीं मारताक्षणीं ) त्या ( खडकां ) तून बारा झरे फुटून वाहूं लागले.

—सू. ब. अ. २ आ. ६०

**समीक्षक:**—ह्यापेक्षां असंभवनीय गप्पा दुसऱ्या कोणत्या असूं शकतील काय ? एक बडगा शिलेवर मारतांच त्यांतून बारा झरे उत्पन्न झाले ! कदाचित् शिला कोरून तीमध्यें पाणी भरलें असेल व बारा छिद्रें तिच्या पृष्ठभागीं पाडून ठेवली असतील तर कोण जाणें. एरवीं तर ही गोष्ट शक्य नाहीं.

१६—आम्ही मूसाला (तौरात) पुस्तक व निर्णायक नियमशास्त्र दिलें. आम्ही त्यांस म्हणालों कीं, तुम्ही माकडे बनून जा, ( कीं, जेथें जाल तेथें ) धुत्कारलें जाल. मग आम्ही या वृत्तांतांत जे लोक ह्याच्या (घडून येण्याच्या) वेळीं हजर होते व जे लोक ह्याच्या मागून येणार होते त्या (सर्वां) साठीं एक धडा घालून दिला आणि (तसाच परमेश्वराला) मिऊन चालणाऱ्यासाठीं एक बोध. —सू. ब. अ. २ आ. ५३, ६५, ६६

**समीक्षक**:—मूसाला जर पुस्तक दिलें होतें तर कुराण हें निरर्थक ठरलें, व त्याला चमत्कार करण्याचें सामर्थ्य दिलें हें बायबल व कुराणातहि सांगितलें आहे. पण ते माननीय म्हणतां येत नाहीं, कारण तसें असतें तर आतांहि ख्रिस्ती मुसलमानांनीं चमत्कार करून दाखविलें असतें. पण ज्याअर्थी त्यांना ते आतां करून दाखवता येत नाहीं त्याअर्थी पूर्वीहि त्यांनीं किंवा त्यांच्या पैगंबरांनीं व गुरूंनीं करून दाखविले नाहींत. अडाणी लोकासमक्ष ज्याप्रमाणें आजहि पोट भरण्याकरितां जादुगार, गारोडी वगैरे लोक चमत्कार करून दाखवितात त्याप्रमाणें त्या काळच्या जंगली लोकांना वश करण्यासाठीं स्वार्थी लोकांनीं कांहीं कापट्यनीतीचें प्रयोग केले असतील. ईश्वर व त्याचे भक्त आजहि विद्यमान आहेत, मग त्यांना त्यानें चमत्कार करण्याची शक्ति कां दिली नाहीं ? मूसाला जें पुस्तक दिलें त्यामध्यें घोडचुका आढळून आल्यामुळें महंमद साहेबांना नवीन ग्रंथ-कुराण-दुरुस्त करून ईश्वरानें दिलें काय ? केवळ भीति दाखविण्याकरितां तुम्ही निंदाई वानर व्हाल असा ईश्वरानें धाक दाखविला असेल तरीहि ईश्वर लबाड ठरतो व मनुष्यांचा छळ करणारा बनतो. अशा गोष्टी ईश्वराच्या व त्याच्या पुस्तकाच्या होऊं शकत नाहींत.

१७—अशाच तऱ्हेनें [ पुनरुत्थानाच्या दिवशीं [परमेश्वर मेलेल्यांस सजीव करील; आणि तो [जगांत] तुम्हांस आपल्या (सामर्थ्याच्या) निशाण्या दाखवितो कीं नवल नव्हे कीं तुम्ही समजाल (कीं पुनरुत्थानाचें घडून येणें सत्य आहे).
—मं. १ सि. १ सू. २ आ. ७३

**समीक्षक**:—मुड्यांना ईश्वर जिवंत करीत होता पण आता कां करीत नाहीं ? त्यांना आतां जिवंत केल्यावर बिचाऱ्यांना न्यायाच्या दिवसापर्यंत तरी थडग्यांत सडत पडावें लागणार नाहीं. आजकाल दौरा सुपुर्द आहे काय ? ईश्वराचीं चिन्हें एवढींच आहेत काय ? पृथ्वी, सूर्य, चंद्र हीं त्याच्या कृतीचीं चिन्हें नाहींत काय ? संपूर्ण सृष्टीमध्यें जीं जीं नानाविध चिन्हें दृग्गोचर होत आहेत ह्यावरून त्या जगच्चालकाची शक्ति व्यक्त होत नाहीं काय ?

१८—ते निरंतर स्वर्गांतच राहतील. —सू. ब. अ. २ आ. ८२

**समीक्षक**—एकहि जीव अनंत पाप करण्याचें सामर्थ्य बाळगीत नाहीं. अर्थात् त्याला सदैव नरकांत किंवा स्वर्गांत ठेवणें हें अन्यायाचें व अज्ञानाचें काम आहे. जर ईश्वर एखाद्याला सदैव स्वर्गांत अथवा नरकांत ठेवील तर तो ईश्वर अन्यायी व अज्ञानी होय. न्यायदिनीं सर्वांचा न्याय होणार असेल तर मनुष्याचीं पापपुण्यें समसमान असणें उचित होय, कारण जें कर्म सदैव होत नाहीं त्याचें फल मात्र सदैव अनंत कसें असूं शकेल ? जर मृत्युत्पत्ति ७।८ हजार वर्षांतील आहे असें प्रतिपादण्यांत येतें तर तिच्या उत्पत्तीपूर्वी ईश्वर स्वस्थ झोंपा घेत पडला होता काय ? आणि न्यायदिनानंतरहि तो रिकामटेकडा बनणार काय ? ह्या सर्व बालिश गोष्टी आहेत. परमेश्वर सदैव असून त्याची स्वाभाविक कर्में सदैव वर्तमान आहेत आणि ज्यांचीं जशीं पापपुण्यें असतील त्याला तशींच त्याबद्दल फलें मिळणें योग्य असल्यामुळें ईश्वर तशींच फलें देतो म्हणून ही कुराणाची न्यायदानरीति सर्वथैव खोटी आहे.

१९—आणि जेव्हां आम्ही तुम्हांपासून पक्के वचन घेतलें कीं तुम्ही आपला ( परस्परांचा ) रक्तपात करूं नये व आपल्या शहरांतून आपल्या लोकांस हद्दपार करूं नये. नंतर तुम्हां कबूल केलें व तुम्हां ( सांप्रत काळचे ) लोकांसही ( त्याची ) साक्ष पटतेच. तथापि तेच तुम्ही आहां कीं जे आपल्यास मारून टाकतां आणि ( तसेच ) आपल्यापैकीं कांहींना त्यांचा शहरांतून हद्दपार करतां. —सू. ब. अ. २ आ. ८४।८५

**समीक्षक**:—शपथ घेणें व घेण्याला लावणें अल्पज्ञतेचा प्रकार आहे अथवा सर्वज्ञतेचा ? जर परमेश्वर सर्वज्ञ आहे तर ह्या संसारी मनुष्यासारख्या त्याला भानगडी करण्याचें कांहीं कारण आहे काय ? आपापसांत रक्ताचे पाट न वाहविणें व स्वधर्मबंधूंना त्यांच्या गृहांतून हांकून न काढणें अर्थात् भिन्न मतावलंबी मनुष्याच्या रक्ताचा पाट वाहविणें व त्याला त्यांच्या स्वगृहांतून पिटाळून काढणें हा मिथ्याभिमान, मूर्खता व पक्षपातपणा नव्हे काय?हे लोक शपथेचा भंग करतील हें अगोदरच परमेश्वराला समजलें नव्हते काय ? यावरून विदित होतें कीं, मुसलमानांचा खुदा ख्रिस्त्यांच्या आकाशांतील बापाची बरीच साम्यता धारण करितो व हें कुराण स्वतंत्र पुस्तक नसून, थोड्याशा गोष्टी अपवादादाखल सोडल्यास,

बायबलाचीच आवृत्ति होय.

२०—ज्या लोकांनीं पुढच्या ( आयुष्या ) चे ऐवजीं ह्या जगाचें आयुष्य विकत घेतलें, ते हेच होत. तर ( पुनरुत्थानाचे दिवशीं) त्यांच्यावरून तर शिक्षा हलकी केली जाणार नाहीं व (कोठूनहि) त्यांना मदत पोहोंचणार नाहीं. —सू. ब. अ. २ आ. ८६

**समीक्षकः**—अशा तऱ्हेच्या ईर्ष्यास्पद व द्वेषमूलक गोष्टी ईश्वरीय होतील काय ? ज्या लोकांचीं पापें हलकीं केलीं जातील अथवा ज्यांना मदत दिली जाईल ते कोणते लोक आहेत ? जर ते पापीजन असतील तर त्यांच्या पापाबद्दल त्यांना शिक्षा करण्यापूर्वी त्यांची पापें हलकीं करणें अन्याय होणार आहे. जर शिक्षा देऊन हलकीं केलीं जातील तर या आयतामध्यें जें वर्णन आहे कीं त्यानांहि शिक्षा होऊन त्यांचीं पापें हलकीं होऊं शकतात; दंड देऊनहि जर पापें जशींच्या तशीं कायम राहतील तर तोहि अन्यायच होईल. धर्मात्म्याचीं पापें हलकीं होतील असें म्हणण्याचा उद्देश असेल तर त्याचीं पापचरणेंच मूलतः अंगदी थोडीं असतात तीं ईश्वराला आणखी हलकीं काय करतां येणार ! हा लेख विद्वानाचा नाहीं. वास्तविक सदैव कर्मानुसार धर्मात्म्यांना सुख व अधर्मात्म्यांना दुःख देणें हेंच ईश्वराचें कर्तव्य आहे.

२१—आणि अलबत आम्ही मूसाला ( तौरात ) पुस्तक दिलें; व त्याच्यामागून एकामागें एक (इतर) प्रेषितहि पाठविले. आणि मरयमचा पुत्र ईसा ( येशू ) यासहि आम्हीं ढळढळीत चमत्कार दिले व पवित्र आत्मा ( म्हणजे जिब्रील ) या द्वारें आम्ही त्याला पाठबळ दिलें. तर कां ( तुम्ही इतके दांड होऊन गेलां आहांत कीं ) जेव्हां जेव्हां तुम्हापाशीं कोणी प्रेषित-( पैगंबर ) तुमच्या जीवास नको नको होत असे हुकूम घेऊन आला. तेव्हां तेव्हां तुम्ही गर्वानें अडून बसलांत ? मग कांहींना तुम्हीं पाखंडी म्हटलेंत व कांहींस तुम्हीं जीवें मारूं लागलांत. —सू. ब. अ. २ आ. ८७

**समीक्षकः**—ज्या अर्थीं मोश्याला ईश्वरप्रणित ग्रंथ देण्यांत आला असें कुराणप्रतिपादित आहे त्या अर्थीं तोच मुसलमानांनीं मानणें आवश्यक आहे व ज्या ज्या गोष्टी त्यामध्यें दोषार्ह आहेत त्यांहि त्यांनीं निमूटपणें कबूल केल्या पाहिजेत. ' मौजिजे ' ( चमत्कार ) अर्थात् दैवीशक्तीबद्दल जें कथन आहे तें सर्वस्वी झूट आहे व भोळ्या मनुष्यांना स्ववश करण्याची ती एक अजब क्लृप्ति आहे. सृष्टिक्रमाविरुद्ध व अविद्याजनक गोष्टी पूर्वीं होत असत्या तर आजहि त्या ख्रिस्तांना व मुसलमानांना करुन दाखवितां आल्या असत्या पण जर त्या आज अशक्य आहेत तर पूर्वींहि त्या तशा नव्हत्या हें निःसंशय आहे.

२२ व लोक ह्याच्यापूर्वीं नास्तिकांविरुद्ध आपल्या जयाची प्रार्थना करीत होते; तर जेव्हां जें कांहीं ते जाणून ओळखून होते. तें त्यांच्यापाशीं येऊन चुकलें तेव्हां ते त्याची नाकारणी करूं लागलें. म्हणून नाकारणाऱ्यांस परमेश्वराचा शाप होय. —सू. ब. अ. २ आ. ८९

**समीक्षकः**—तुम्ही जसें अन्य मतावलंबीयांना काफर ( नास्तिक ) म्हणतां तसें तेहि तुम्हांला काफर म्हणत नाहींत काय ? आणि त्यांच्या मतानुसार ईश्वरहि तुमचा धिःकार करतो मग, मुसलमान बंधूंनों, तुम्हीच सांगा यांतील खरा कोण व खोटा कोण आहे तो ? विचारांतीं पाहूं गेल्यास सर्व मतमतांतरांमध्यें असत्याचा थोडा बहुत भाग आढळून येईल पण जें सत्य आहे तें मात्र सर्वांमध्यें एकसारखें व सर्वांना समान आहे. धार्मिक कलह, झगडे हीं सर्व मूर्खपणाचीं लक्षणें आहेत.

२३—तें विश्वासूंसाठीं सद्‌बोध व ( तारणाचें) शुभवर्तमान होय. जो कोणी परमेश्वराचा दुश्मन होय व त्याच्या दूतांचा व त्याच्या प्रेषितांचा व ( प्रामुख्यें करून ) जिब्रील ( दूता ) चा व मीकाएल ( दूता ) चा; तर खरोखरीच परमेश्वरहि अशा नास्तिकांचा दुश्मन होय. —सू. ब. अ. २ आ. १७,१८

**समीक्षकः**—ईश्वर ' लाशरीक ' आहे म्हणजे त्यामध्यें कोणी भागिदार नाहीं असें मुसलमानांचें म्हणणें असतें त्याला आपलें काम पार पाडण्यासाठीं कोणाचें सहाय्य घ्यावें लागत नाहीं. पण येथें पहावें तों फौजच फौज त्याच्या साहाय्यार्थ त्यानें गोळा केलेली आहे ती कोठून व कशाकरितां आणली ? जो कोणी मनुष्यांचा शत्रु तो ईश्वराचाहि शत्रुच काय ? जर असें असेल तर तें ठीक नव्हे, कारण ईश्वर कोणाचाहि शत्रु असणेंच शक्य नाहीं.

२४—परमेश्वर ज्याची इच्छितो त्याची आपल्या दयेसाठीं खास ( निवड ) करतो. —सू. ब. अ. २ आ. १०५ स. प्र. ८९.

**समीक्षकः**—जो योग्य व प्रमुखपणाला लायक नसेल त्यावरहि तो दया करुन त्याला स्वामी बनवितो काय ? अशी स्थिति असेल तर तो खुदा मोठा धांदलबाजच आहे म्हणावयाचा व मग अंगीं गुणसंचय व लायकी आणण्याचें तरी काय कारण ? खुदाच्या मेहरबानीवर कर्मफलें अवलंबून आहेत तर मोठीच अनवस्था उत्पन्न होणार असून कर्मोच्छेदप्रसंग येणारा आहे.

२५—(मुसलमानानों ! ) बहुतेक ग्रंथधारी लोक आपल्या मनांतल्या मात्सर्यामुळें अशी उत्कंठा बाळगितात कीं तुमच्या विश्वासधारणानंतरहि त्यांनीं तुम्हांस पुन्हां नास्तिक करुन टाकावेत. —सू. व. अ. २ आ. १०९

**समीक्षकः**—ईश्वर खरा ! तोच आपल्या कट्टया अनुयायांना चिथवीत आहे कीं, सांभाळा तुमची श्रद्धा काफर लोक डळमळवितील ! असा भित्रा ईश्वर व असे भित्रा इस्लामी लोक जगाला काय ज्ञान देतील ? ईश्वर असा उपदेश करील काय ?

२६—तर जेथेंहि कोठें तुम्हीं ( किब्ल्याकडे ) तोंड कराल, तेथेंच परमेश्वराचा सामना आहे.

—सू. ब. अ. २ आ. ११५

**समीक्षकः**—ही गोष्ट खरी आहे तर, मुसलमान लोक प्रार्थनेचे वेळीं काबा मशिदीकडे तोंड कां करितात ? जर म्हणाल कीं तिकडेच मुख करण्याची आम्हांला आज्ञा तर मग वरील आयतामध्यें सांगितलेली काय चेष्टा आहे ? एक आज्ञा खरी व दुसरी खोटी असते काय ? ईश्वराला मुख आहे तर तें एकाच वेळीं सर्व बाजूला असणें शक्य आहे काय ? आज्ञा सुसंगत नव्हे.

२७—( ही विचित्र ) आकाश व पृथ्वी यांचा तोच उत्पादक होय. आणि जेव्हां तो कोण एखाद्या कामाचा निश्चय करतो, तेव्हां तो त्याच्या संबंधानें फक्त एवढेंच फर्मावितो कीं, हो, व तें होऊन जातें —सू. ब. अ. २ आ. ११७

**समीक्षकः**—ईश्वरानें हुकूम दिला कीं ' हो ' पण तो कोणाला दिला व तो कोणी ऐकला ? आणि काय झालें ? कशापासून झालें ? जर सृष्टीपूर्वी ईश्वराशिवाय कांहींच नव्हतें असें बायबल व कुराण यांत सांगितलें आहे तर हें जग कशापासून बनविलें ? कोणतेंहि कार्य कारणाखेरीज होऊं शकत नाहीं. मग एवढ्या मोठ्या विश्वरूपी कार्याचें उपादान कारण कोणतें ? हा शुद्ध पोरकटपणाचा प्रकार आहे. ( पूर्वपक्षी ) नव्हे, नव्हे, ईश्वरेच्छेनें हें सर्व बनलें. ( उत्तरपक्षी ) तुमच्या इच्छेनें एखाद्या माशीचा पाय तरी बनूं शकतो काय ? जर नाहीं तर नुसत्या इच्छेनें हें ईश्वरानें उत्पन्न केलें हें कसें ? ( पूर्वपक्षी ) ईश्वर सर्वशक्तिमान् आहे त्याच्या इच्छानुसार तो सर्व कांहीं करतो. (उत्तरपक्षी) सर्वशक्तिमान् ह्याचा अर्थ काय ? ( पूर्वपक्षी ) वाटेल तें करण्याचें सामर्थ्य. ( उत्तरपक्षी ) काय ? ईश्वर दुसरा ईश्वरहि निर्माण करूं शकतो ? ( पूर्वपक्षी ) असें होऊं शकत नाहीं. (उत्तरपक्षी ) याकरितांच परमेश्वर आपल्या व दुसऱ्यांच्या गुण, कर्म व स्वभाव यांच्याविरुद्ध कांहींहि करूं शकत नाहीं. जगांतील कोणत्याहि वस्तूला बनवावयाचें तर तीन गोष्टीची आवश्यकता असतेः—एक बनविणारा उ. कुंभार; दुसरी, ज्याच्यापासून भांडें तयार करावयाचें तें साधन–माती. तिसरी गोष्ट, ज्याच्या सहाय्यानें भांडें तयार करावयाचें तें चक्र. या ठिकाणीं भांडें बनविण्यापूर्वी ज्याप्रमाणें कुम्भार, माती व चाक हीं होतीं त्याप्रमाणें जग बनविण्यापूर्वी जगताचें कारण प्रकृति व तिचे गुण, कर्म व स्वभाव हे असलेच पाहिजेत. यावरून ही कुराणोक्त फिलॉसफी असंभवनीय ठरत आहे.

२८—जेव्हां आम्ही ( काबा ) गृहाला लोकांचें पुण्यक्षेत्र व शांतिस्थान ठरविलें आणि (लोकांस आज्ञा केली कीं) इब्राहिमचे (ह्याच) जागेला तुम्ही नमाजाची जागा मुकर ठेवा. —सू. ब. अ.२ आ. १२५

**समीक्षकः**—काबा मशिदीपूर्वी ईश्वरानें पवित्र स्थान एकहि निर्माण केलेलें नव्हतें काय ? जर एखादें बनविलें होतें तर मग काब्याची जरूर काय ! जर बनविलें नव्हतें तर काबाच्यापूर्वी मुसलमानांच्या पूर्वजाकरितां पवित्र स्थान नव्हतेंच काय ? हो, कदाचित् ईश्वराला ह्या गोष्टीचें स्मरण कालांतरानें झालें असेल !

२९—आणि असा कोण आहे कीं जो इब्राहिमचे पंथास विमुख होईल ? परंतु ज्याची अक्कल मारली गेली असेल तोच. आणि आम्ही त्याला ह्या लोकींहि खरोखरच निवडून घेतलें होतें; व परलोकींहि तो पवित्र चरणी लोकांपैकींच होईल. —सू. ब. अ. २ आ. १३०

**समीक्षक**:—इब्राहिमदिन जे नाहींत ते सर्व मूर्ख होत, हें कसें संभवनीय आहे ! ईश्वरानें इब्राहिमालाच पसंत केलें याचें कारण काय ? धर्मात्मा म्हणून पसंत केलें असेल तर एकटा इब्राहिमच धर्मात्मा होता आणखी कोणीच नव्हते काय ? धर्मात्मा नसतांनाहि पसंत केला असेल तर ईश्वरानें अन्याय केला. धर्मात्मा असून त्याला जर पसंत केलें असेल तर ठीक आहे. कारण धर्मात्मेच ईश्वराला प्रिय असतात.

३०—तसेंच तोंड फिरवून फिरवून आकाशाकडे पाहाणें आम्हीं निरिक्षीतच आहों. जो किबला तूं चाहतोस त्याच्याकडे आम्हीं तुला वळण्याचा हुकूम देऊं; ( बरें ) तर ( आतां नमाज पडतांना ) आदर सन्मानाचे मशादी ( म्हणजे काब्या ) कडेस आपलें तोंड करीत जा; आणि ( मुसलमानानों ! तुम्हींहि ) जेथें कोठेंहि असाल, तेथें त्याच्याकडे आपलीं तोंडे करीत असा. —सू. ब. अ. २ आ. १४४

**समीक्षक**:—मूर्तिपूजेची ही छोटीसी नक्कलच नव्हे काय ? हुबेहुब तीच. ( पूर्वपक्षी ) आम्हीं मुसलमान लोक मूर्तिपूजक नसून मूर्तिभंजक आहों; काबा मशिदीला आम्हीं ईश्वर मानीत नाहीं. ( उत्तरपक्षी ) ज्यांना तुम्ही मूर्तिपूजक समजता ते त्या मूर्तिला ईश्वर मानीत नाहींत पण त्या साधनाद्वारें ते ईश्वरभक्ति करीत असतात; जर तुम्ही मूर्तिभंजक आहा तर काबा मशिद ही एक मूर्तिच आहे ती तोडून कां टाकीत नाहीं ? (पूर्वपक्षी) वाहवा ! काबा मशीदीकडे तोंड करून नमाज पाडण्याची आम्हांला जशी कुराणाज्ञा आहे तशी मूर्ति द्वारें ईश्वरोपासना करण्याची त्यांना आज्ञा नाहीं म्हणून ते मूर्तिपूजक होत; आम्हीं नाहीं. कारण ईश्वराज्ञा पालन करणें आमचें कर्तव्य आहे. ( उत्तरपक्षी ) ज्याप्रमाणें तुम्हाला कुराणामध्यें हुकूम आहे त्याप्रमाणें त्यांना पुराणांत मूर्तिपूजा करण्यास सांगितलें आहे, तुम्हीं जसें कुराणाला ईश्वरीय वचन मानतां तसें ईश्वराचे अवतार जे व्यासऋषि त्या व्यासांचीं वचनें म्हणून पौराणिक लोक पुराणांना ऋषिप्रणित समजतात ! तुमच्यांत व पुराणानुयायी लोकांत मूर्तिपूजक या नात्यानें यत्किंचितहि भिन्नभाव दिसत नाहीं ! उलट तुम्ही वडे मूर्तिपूजक ते छोटे मूर्तिपूजक एवढाच फार तर फरक ! ज्याप्रमाणें एखाद्या गृहस्थानें घरांत शिरलेलें मांजर बाहेर हांकून काढण्याचा प्रयत्न करावा तोच उंटानें त्या घरांत प्रवेश करावा असाच प्रकार महंमदसाहेबांनीं छोटी मूर्तिपूजा तर मुसलमानी मतांतून काढून टाकली परंतु पहाडसदृश जी काबा मशिद आहे ती सर्व मुसलमानांना पूजनीय म्हणून इस्लाम धर्मांत प्रविष्ट केली. ही मूर्तिपूजा मोठी कां लहान आहे तें आतां तुम्हीच सांगा ? याला उपाय एवढाच कीं, आम्हीं वैदिक लोक जसें एकेश्वरोपासक आहों तसें तुम्हीहि वेदानुयायी बनून मूर्तिपूजादि अनिष्ट गोष्टींचा त्याग करा म्हणजेच तुमचें कल्याण होईल अन्यथा नाहीं ? जोंपर्यंत तुम्ही ही मोठी मूर्तिपूजा सोडली नाहीं तोंपर्यंत दुसऱ्यांच्या छोट्या मूर्तिपूजेचें खंडन करताना तुम्हाला शरम वाटली पाहिजे व स्वतः मूर्तिपूजेच्या बालिश प्रकारापासून दूर राहून पवित्र बनले पाहिजे.

३१—जे लोक परमेश्वराचे मार्गांत जिवें मारले जातील त्यांना मेलेले म्हणूं नका. तर ते जिवंत होत.
—सू. ब. अ. २ आ. १५४

**समीक्षक**:—ईश्वरीय मार्गामध्यें मरणें मारणें ह्या गोष्टींची काय अवश्यकता आहे ? ही आज्ञा फक्त आपला तळीराम शांत करण्यासाठीं सांगितलेली आहे, असें उघड उघड कां सांगत नाहीं ? अशी आशा दाखविली म्हणजे लोक आपापसांत रक्तपात करतील, विजय मिळवतील, कत्तल करण्यास भिणार नाहींत, लूटमार करून राज्यें मिळवतील, धर्मप्रसार करतील व तद्वारें ऐश्वर्य प्राप्त होईल आणि मग विषयानन्द भोगतील; इतक्या गोष्टी साध्य करण्याकरितांच कदाचित् ही विपरीत कल्पना लढविली असेल !

३२—व (तसेंच) हें कीं परमेश्वर शिक्षेंतहि कडक आहे. सैतानाचे पदोपदीं चालूं नका. कारण तो बोलून चालून दुश्मन होय. तो तर तुम्हांस कुकर्म व निर्लज्जपणा ( चींच काय तीं कामें ) करावयास सांगील व हेंच ( इच्छिल ) कीं तुम्ही जाणत देखील नाहींत अशा ( नसत्या कुभांडाच्या ) गोष्टी तुम्ही ( आपल्याकडून ) परमेश्वरासंबंधीं व्यक्त कराव्या. —सू. ब. अ. २ आ. १६५, १६८, १६९

**समीक्षकः**—कठोर दुःखें देणारा दयाळू (?) खुद पापी व पुण्यात्मे यांवर दयाळू आहे कां फक्त मुसलमानांवरच त्याची दया आहे ? ईश्वर न्यायी असल्यामुळें सर्वांवरच तो दया करणारा आहे पण फक्त मुसलमानांवर असेल तर तो खुदा अन्यायी आहे. ईश्वर पक्षपात करीत नाहीं. जो धार्मिकावर दया करतो व अधार्मिकांना कठोर दुःखें भोगावयास लावतो त्याच्याजवळ इस्लाम गैरइस्लाम हा भेद नाहीं. सर्वांना भ्रष्ट करणारा मनुष्यमात्राचा शत्रु सैतान दयाळू खुदानें उत्पन्नच कशासाठीं केला ? मनुष्याची परीक्षा पहावी हा खुदाचा हेतु आहे असें म्हणाल तर कोण खरा व कोण खोटा आहे हें जाणण्यास खुदा सर्वज्ञ नाहीं काय ? ईश्वर सर्वांची बरी वाईट कर्में जाणतो व कोण फसेल याचीहि त्याला जाणीव आहे मग सैतानाचें काय काम ? मनुष्याला भ्रष्ट करणारा सैतान पण सैतानाला भ्रष्ट कोणी केलें ? ईश्वरानें केलें असें म्हणाल तर हा असला खुदा ईश्वर नसून सैतानाचा राजा महासैतान होय. जर सैतान आपोआप भ्रष्ट झाला असेल मर मनुष्यानांहि भ्रष्ट करण्यासाठीं सैतानाची जरूरी नाहीं; कारण कुसंगत व अविद्या यामुळें मनुष्य पतित बनतोच.

३३—त्यानें तर तुम्हांसाठीं फक्त मेलेलें ( जनावर ) व रक्त व डुकराचें मांस हीं निषिद्ध केली आहेत; व ( तसेंच ) परमेश्वराशिवाय अन्य कोणा ( चे अराधने ) स्तव जें ( बळी दिलें व) नामजाद केलें जाईल तें (जनावर).

—सू. ब. अ. २ आ. १७३

**समीक्षकः**—येथें विचारलें पाहिजे कीं, मुर्दा मग तो आपोआप मेलेला कां मारलेला समजावयाचा ? मरणें व मारणें यामध्यें भेद आहे पण प्रेतावस्था ह्यामध्यें कांहींच फरक नाहीं हें उघड आहे. डुकराचा निषेध केला पण मनुष्याचें मांस खाण्यास परवानगी आहे असा अर्थ घेणें अनुचित आहे काय ? जर उचित आहे तर मनुष्यानें मांस खाण्यास कुराणोक्त अल्लानें परवानगी दिलेली आहे काय ? ही परवानगी योग्य आहे काय ? आणखी परमेश्वराचें नांवावर शत्रू आदींना अत्यंत दुःख देऊन प्राणहत्या केली तरी चालेल हें सांगणें अल्लालाच शोभतें ईश्वराला नाहीं. ईश्वराला व त्याच्या नांवाला अशा कृतीनें कलंक लागतो. मुसलमानांच्या हातून दारुण दुःखें प्राप्त करून घेवण्याएवढा भयंकर अपराध पूर्वजन्म नाहीं तर, डुकराशिवाय सर्व प्राण्यांनीं केव्हां केला होता ? सर्व प्राण्यांवर ईश्वराची दया नाहीं फक्त डुकरावरच ती कां ? सर्व प्राण्यांना तो पुत्रवत् मानतो ना? ज्यापासून मनुष्यजातीचें अत्यंत हित होतें अशा गायी वगैरेंचा वध करण्यास मुसलमनांना ईश्वरानें सांगितल्यामुळें खुदाच जगाच्या अहितास कारणीभूत व हिंसारूप पापाचा वाटेकरी बनून कलंकित झाला आहे. असलीं अमंगल कृत्यें करण्यास सांगणारें तें पुस्तक ईश्वरीय नव्हें व तो ईश्वरहि नव्हे.

३४—( मुसलमानांनों ! ) उपासांचे रात्रींत तुम्हास आपल्या पत्न्यांपाशीं जाण्याची मुभा दिली गेली आहे. त्या तुमचा पदर होत व तुम्हीं त्यांचा पदर आहां. परमेश्वरानें पाहिलें कीं, तुम्ही (चोरी छपी त्यांचेपाशीं गेल्यानें ) खुद्द आपलेंच ( धार्मिक ) नुकसान करीत होता; म्हणून त्यानें तुमचा पश्चाताप मान्य केला व तुमच्या अपराधांची क्षमा केली. तर आतां ( उपासांत रात्रीचें समयीं ) तुम्ही त्यांचाशीं अंगसंग करा; आणि ( अंगसंगाचा परिणाम ) जी ( पुत्रप्राप्ती ) परमेश्वरानें तुम्हांसाठीं लिहून ठेवली आहे तिची आकांक्षा करा; ( व निवळ कामवृत्तीचें नादास) लागूं नका तुम्ही आणि खा व प्या, येथपर्यंत कीं (रात्रीचे) काळया धारेपासून प्रातःकाळची पांढरी धार तुम्हांस स्पष्ट दिसून येऊं लागेल. —सू. ब. अ. २ आ. १८७

**समीक्षकः**—जेव्हां मुसलमानी मत प्रचलित झालें असेल किंवा तत्पूर्वी पौराणिक मतानुयायी हिंदूपासून 'चान्द्रायण व्रताची' [ जें एक मासिक व्रत आहे. [ माहिती मिळवून नंतर हें चान्द्रायण-व्रत मुसलमानी मतांत सुरू झालें असावे असें यावरून सिद्ध होत आहे. या व्रतसमयीं मध्यान्हीं चंद्राच्या कला जसजशा कमी जास्त होतात तदनुसार घांस कमी जास्त करावे लागतात व ऐन मध्यान्हीं भोजन करण्यास सांगितलें आहे. पण ही योग्य माहिती ज्ञान न झाल्यामुळें चंद्र-दर्शन करून नंतर भोजन करावें हा प्रकार मुसलमानांनींहि रूढ केला. परंतु या व्रतामध्यें स्त्रीसमागमाचा त्याग करावा लागतो हें विशेष असतांना त्या उलट हे अल्लाचे पैगंबर महमदसाहेब आपल्या अनुयायांना फर्मावितात कीं, भक्तजनहो ! व्रतमयीं तुम्ही आपल्या स्त्रियांशीं खूब मदनोत्सव करा व रात्रीं पोटभर सपाटून खा. व्रताचा हा खास

उपयोग म्हणावयाचा दिवसभर उपवास करून रात्रीं पोटभर जेवणें सृष्टिक्रमाविरूद्ध आहे. भोजन करावयाचें तें दिवसाच केलें पहिजे रात्रीं नाहीं.

३५—आणि (मुसलमानांनों !) जे लोक तुम्हांशीं लढतील, तुम्हीहि परमेश्वराचें मार्गा (म्हणजे धर्मा) थे त्यांच्याशीं लढा. आणि (जे लोक तुम्हांशीं लढतात) त्यांना जेथें पावाल तेथें कत्तल करा; आणि फितुर (काफर राहाणें हें) कत्तलीपेक्षांहि अधिक भयंकर होय. आणि तुम्ही येथपर्यंत त्यांच्याशीं लढा कीं (मुलखांत) फंदफितुर (नांवासहि) राहाणार नाहीं; व (एका) परमेश्वराचाच हुकूम चालेल. तर जसा कहर त्यांनीं तुम्हांवर गुदरविला; तसाच कहर तुम्हीं त्यांच्यावर गुदरवा. —सू. ब. अ. २ आ. १९०, १९१, १९३, १९४

**समीक्षकः**—जर कुराणांत मुसलमानांच्या 'अल्ला' नें अशा प्रकारची आज्ञा दिली नसती तर त्यांनीं हिंदु, पारशी; ख्रिस्ती, वगैरे गैरइस्लामियांची देवालयें उध्वस्त केलीं नसती, इतरांवर त्यांनीं जुलूम केले नसते, आणि निरपराधी मुसलमानेतर जनतेशीं ते मित्रत्वानेंच वागले असते. मुसलमानी मताचें ग्रहण न करणारा 'काफर' होय व अशा 'काफर' लोकांची 'कत्तल' करणें हें 'अल्ला' ला प्रिय असून कत्तलीपेक्षां काफरता हें पाप आहे अशीच मुसलमानांची प्रामाणिक समजूत आहे. ती त्यांना यथाशास्त्र, यथान्याय व पुण्यप्रद वाटते. ह्या सर्वांचें मूळ बीज सदरहू कुराणविहित आज्ञेंत आहे. जो आमच्या धर्मास मानणार नाहीं त्याची आम्ही कत्तल करूं अशी प्रतिज्ञा व प्रतिज्ञेनुसार त्यांचें आचरण यांत विसंगत काय आहे ? या चुकीच्या धर्मकल्पनेमुळेंच त्यांनी अनेक धर्मयुद्धें (जिहाद) केलीं व लढतां लढतां त्यांनीं आपली कित्येक राज्यें नष्ट करून घेतलीं. चोराचा बदला चोरी नसल्यामुळें गैरइस्लामी जगतानें मुसलमानाशीं या न्यायानें (जशास तसें) वागणें फार अन्याय होईल, म्हणून मुसलमानेतर जनतेनें दुष्टात्मे व सज्जन या सर्वांशीं प्रेमानें वागणेंच श्रेयस्कर आहे. मुसलमानांना असल्या तऱ्हेची राक्षसी आज्ञा देणारा त्यांचा 'अल्ला' ईश्वर नव्हे. ती पालन करणारे विद्वान् नव्हेत आणि ही आज्ञा ज्या पुस्तकांत आहे तें कुराण ईश्वरोक्त नव्हे. ह्या सर्व गोष्टी स्वार्थी, ज्ञानरहित मनुष्यांच्या आहेत.

३६—परमेश्वर (कोण्याहि तऱ्हेनें) अत्याचार करणाऱ्यांना पसंत करीत नाहीं. अहो-मुसलमानांनों ! इस्लामांत तुम्ही पुरेपुरे दाखल व्हा. —सू. ब. अ. २ आ. १९०, २०८

**समीक्षकः**—झगडे, लढाया करणें हें मित्रत्वाचें लक्षण नव्हें. पण स्वतः आपणच अन्य मतावलंबीयांबरोबर धर्मयुद्धें करण्यास हा मुसलमानी खुदा प्रेरणा करीत आहे व अशा झगडाळू मुसलमानांशीं तो मैत्री करीत आहे ! मुसलमाना धर्मांत प्रवेश केल्यानेंच ईश्वर संतुष्ट राहतो तर तो असला मुसलमानांचा पक्षपाती परमेश्वर संपूर्ण जगाच्या परमेश्वराहून खास भिन्न आहे. यावरून मुसलमानांचें कुराण न ईश्वरकृत किंवा त्यांत सांगितलेला खुदा ईश्वर नाहीं, हें स्पष्ट दिसून येत आहे.

३७—आणि जर परमेश्वर इच्छिता तर तो तुम्हांस कष्टांत घालता. —सू. ब. अ. २ आ. २२०

**समीक्षकः**—कांहीं अपराध नसतांना उगांचच ईश्वर अनन्त काल पावेतों (रिजक) दण्ड देतो काय ? मग पापपुण्य करण्याचें कारण कोठें राहिलें ? केवळ ईश्वरेच्छेवर सुख दुःख अवलंबून आहे, या दृढ समजुतीनेंच मुसलमान लोक धर्मविमुख बनून यथेष्टाचार करण्यास प्रवृत्त होतात व कित्येक या कुरणोक्तीवर विश्वास न ठेवतां धर्मात्मे बनतात

३८—आणि (हे पैगंबरा ! लोक) तुला ऋतुस्नानाविषयीं विचारतात. तर (तूं त्यांना) समजावून दे कीं तो मल होय; तर विटाळांत तुम्हीं स्त्रियांपासून अलग राहा. आणि त्या चोख्या होईपर्यंत त्यांच्यापाशीं जाऊं नका. मग जेव्हां त्या नाहून धुवून घेतील तेव्हां जेथून परमेश्वरानें तुम्हांस सांगून दिलें आहे तेथून त्यांच्यापाशीं या. तुमच्या पत्न्या (जणुं काय) तुमचीं क्षेत्रें होत. तर तुम्ही आपल्या क्षेत्रांत जसे पाहिजे आहे तसें या. तुमच्या शपथांत ज्या निरर्थक (शपथा) होत त्यांबद्दल तर परमेश्वर तुम्हांस पकडणार नाहीं. —सू. ब. अ. २ आ. २२२, २२३, २२५

**समीक्षकः**—रजस्वलेचा स्पर्शहि होऊं देऊं नका हें जें सांगितलें आहे तें उत्तमच आहे परंतु इतर वेळीं वाटेल तेव्हां स्त्री-समागम करण्याची आज्ञा देणें म्हणजे पुरुषांना विषयासक्त बनविण्यासारखें आहे. व्यर्थ शपथेला ईश्वर मानीत

नाहा तर सर्व लोक व्यर्थ शपथ घेण्यास न कचरतां खोटें बोलतील व शपथेचाहि भंग करतील. मग ईश्वर खोट्याचा प्रवर्तक बनेल.

३९—कोण आहे कीं, जो परमेश्वराला दिलखुशीनें कर्ज देईल; कीं परमेश्वर त्याचें कर्ज त्याला अनेक पटीनीं वाढवून देईल ? —सू. ब. अ. २ आ. २४५

**समीक्षकः**—ईश्वराला उधार रक्कम घेऊन त्याला कर्जखोर बनण्याचें काय प्रयोजन आहे ? ज्यांनें संपूर्ण विश्व निर्माण केलें त्याला मनुष्यापासून कर्ज काढणें जरूर पडावें काय ? ईश्वराचा खजिना कोरडा ठणठणीत बनला आहे काय ? व्यापार, हुंडणावळ आदि रोजगारांत फसून त्याचें दिवाळें निघालें म्हणून त्याला मनुष्यापासून कर्जाऊ रक्कम घेणें भाग पडलें काय ? दामदुप्पट देण्याची तो कबुलायत करीत आहे यावरून मुसलमानांचा खुदा बडा शेटसावकार दिसतो ! असलें काम ज्याचें उत्पन्न थोडें व खर्च फार किंवा दिवाळखोर अगर चैनी अशा लोकांनाच करणें भाग पडतें. * ईश्वराला शोभत नाहीं.

४०—ह्यांच्यांत कोणीं असे होते कीं, ज्यांनीं ( विश्वासास ) नाकारिलें. आणि जर परमेश्वर इच्छिता, तर (हे लोक ) आपसांत न लढते, परंतु ईश्वर जें योजितो तें करितो. —सू. ब. अ. २ आ. २५३

**समीक्षकः**—ह्या ज्या लढाया होतात त्या सर्व ईश्वराच्या इच्छेनेंच काय ! जर अधर्म करावासा वाटला तर ईश्वर करूं शकतो तर ! असें असेल तर तो परमेश्वर नव्हे. कारण लढाया करणें हें भल्या मनुष्याचें काम नाहीं; मग तें ईश्वराचें कसें असेल ?

४१—जें कांहीं आकाशांत आहे व जें कांहीं पृथ्वींत आहे तें त्याचेंच होय. त्याच्या ( सत्तारूपी ) सिंहासनानें आकाश व पृथ्वी ( हीं सर्व ) व्यापलीं आहेत. —सू. ब. अ. २ आ. २५५

**समीक्षकः**—जें आकाश व भूमींत पदार्थ आहेत ते सर्व जीवांच्याकरितां परमेश्वरानें निर्माण केले आहेत, स्वतःकरितां नव्हेत, कारण तो पूर्ण तृप्त आहे त्याला कशाचीहि अपेक्षा नाहीं. आसमान व पृथ्वी ज्या ईश्वराच्या खुर्चीनें व्यापली आहे तो ईश्वर एकदेशी आहे.

४२—परमेश्वर सूर्य पूर्वेकडून उगवितो, तूं तो पश्चिमेकडून उगीव ( पाहूं ! ) यावर तो नास्तिक थक्क होऊन राहिला (तरीहि त्यानें विश्वास धरिला नाहीं) आणि परमेश्वर हटवादी लोकांस सुबुद्धि देत नसतो. —सू. ब. अ. २ आ. २५८

**समीक्षकः**—अल्लाचें हें अगाध ज्ञान पहा ! पूर्वेकडून पश्चिमेकडे किंवा पश्चिमेहून पूर्वेकडे सूर्य कधीं येत जात नाहीं. तो आपल्या परिघामध्येंच भ्रमण करतो. यावरून कुराणोक्त अल्लाला भूगोल अथवा खगोल यापैकीं एकाहि विद्येचें ज्ञान नाहीं हें उघड आहे. काफरांना-पाप्यांना जर मुसलमानांचा खुदा सन्मार्ग दाखवित नाहीं तर पुण्यवानांनाहि असल्या खुदाची मुळींच आवश्यकता नाहीं हें स्पष्ट आहे. कारण पुण्यात्मे सन्मार्गी असतातच, वस्तुतः ईश्वरानें पापी लोकांना सन्मार्गी चालविण्याकरितां शक्ति द्यावयास पाहिजे पण मुसलमानांच्या खुदाच्या शक्तीबाहेरचें हें काम असल्यामुळें कुराणोक्त ईश्वर या दृष्टीनें निरुपयोगी ठरतो.

४३—फर्माविलें कीं ( बरें ) तर चार पक्षी घे व त्यांस आपल्या ध्यानांत बरोबर ठेव (व त्यांचा चेंदा मेंदा कर;) तदनंतर एकेक डोंगरावर त्याचा एकेक तुकडा ठेवून दे; व मग त्यांना बोलीव, म्हणजे ते ( आपोआप ) तुजकडे दौड घालीत येतील. —सू. ब. अ. २ आ. २६०

**समीक्षकः**—भानुमतीप्रमाणेंच हाहि एक खेळ मुसलमानांचा खुदा खेळत आहे म्हणावयाचा ? वाहवा ? खुदाचें खुदापण यामध्येंच राहिलें आहे काय ? मूर्ख लोकच अशा खुदाच्या नादीं लागतील बुद्धिमान् जन कदापि न फसतां

---

* ही जी आयत आहे तिच्या भाष्यावरील टीकेंत असें लिहिलें आहे कीं, एक मनुष्य महंमद साहेबाकडे येऊन त्यांना विचारूं लागला कीं, पैगंबर महाराज, ईश्वर कर्ज कां मागत आहे ? महंमद साहेबांनीं सांगितलें कीं, स्वर्गामध्यें तुमची व्यवस्था करण्यासाठीं ! यावर त्या गृहस्थानें उत्तर दिलें, पैगंबर महाराज, आपण जामीन रहात असाल तर मी कर्ज देतो !! महंमद साहेब त्याला जामीन राहिले !! खूब, शाबास, ईश्वरावर भरवसा नव्हता पण त्याच्या दूतावर होता !!!

त्यापासून दूर राहून त्यावर कायमची तिलांजली सोडतील. असल्या बालचेष्टांनीं ईश्वराचें ईश्वरीयत्व व्यक्त न होतां क्षुद्रपणा मात्र दिसून येतो.

४४—तो ज्याला इच्छितो त्याला ( गोष्टीची ) समज देतो. —सू. ब. अ. २ आ. २६९

**समीक्षकः**—मर्जीनुसार वाटेल त्याला नीति देणें व वाटेल त्याला न देणें हें ईश्वराचेंच काम काय ? जो पक्षपात सोडून सर्वांना सदुपदेश-नीति देतो तोच खरा ईश्वर होय; दुसरा नाहीं.

४५—मग ( खोट्या वासनेबद्दल ) ज्याला तो इच्छील त्याला क्षमा करील व ज्याला इच्छील त्याला शिक्षा देईल. आणि परमेश्वर सर्व शक्तिमान होय. —सू. ब. अ. २ आ. २८४

**समीक्षक**—क्षमेला पात्र जो आहे त्यावर ती न करणें व जो अपात्र आहे त्यावर क्षमा करणें ही शुद्ध झोटिंगशाही नव्हे काय ? जर ईश्वर आपल्या मर्जीनुरूप वाटेल त्यास पापी व पुण्यात्मा बनवितो तर जीव हा केलेल्या पापपुण्याबद्दल जबाबदार नाहीं. ईश्वरानें त्याला पापी बनविलें म्हणून त्यानें पाप केलें किंवा पुण्यात्मा बनविलें म्हणून त्यानें पुण्य केलें. अर्थात् पापपुण्याचें फल जें दुःख व सुख त्यांचा भोक्ता ईश्वर ठरला, हें निःसंशय आहे. ज्याप्रमाणें सेनापतीच्या आज्ञेनें शत्रूचा पराजय केला किंवा स्वतःचा पाडाव करून घेतला असतां त्याबद्दल जबाबदार सेनापती असतो; त्याप्रमाणें जे पापी व पुण्यात्मे, ज्याच्या आज्ञेनें निर्माण होतात, त्यांच्या सर्व कर्मांचें प्रायश्चित ह्या कुराणोक्त अल्लाला ईश्वरानें दिलें पाहिजे.

४६—( हे पैगंबरा ! या लोकांस ) सांग कीं ( तुमची इच्छा असेल तर ) मी तुम्हांस ह्या ( इह लौकिक क्षणिक साधनां ) पेक्षांहि अत्युत्तम चीज दाखवून देऊं कां ? पालनकर्त्यासमीप ( स्वर्गाचे ) बाग होत कीं त्यांच्या खालून नद्या वाहत आहेत ( व ते ) त्यांत सदासर्वदा राहातील; आणि ( बागा व्यतिरिक्त ) शुचिर्भूत ( व चोख्या ) पत्न्या होत; आणि ( सर्वांत अति श्रेष्ठ अशी ) परमेश्वराची सुप्रसन्नता होय. आणि परमेश्वर सेवकां ( च्या बऱ्यावाईटां ) स पाहातो आहे. —सूरतु आले-इमरान अ. ३ आ. १५

**समीक्षकः**—वाचकहो ! याला 'स्वर्गलोक' म्हणावा किंवा 'वेश्यावन' म्हणावें याचा विचार तुम्हींच करा. आणि असा स्वर्ग निर्माण करणारा हा ईश्वर आहे अथवा स्त्रैण आहे हें तुम्हीच सांगा. असले अश्लील प्रकार ज्या पुस्तकांत वर्णिले आहेत तें पुस्तक ईश्वरप्रणित आहे असा कोणता बुद्धिमान प्रतिपादन करील ? ज्या बीबी स्त्रिया स्वर्गांत रहात आहेत त्यांचा जन्म तेथलाच आहे किंवा इहलोकांत जन्म घेऊन त्या स्वर्गवासी बनल्या आहेत ? जर त्यांचा जन्म येथील असेल तर त्यांना, त्यांच्या यजमानांना सोडून, न्यायदिनापूर्वीच वैकुण्ठामध्यें ह्या कुराणोक्त ईश्वरानें अगाऊच कां नेऊन ठेवल्या असतील बरें ? न्यायदिनींच सर्वांचा न्याय केला जाईल अशी दवंडी ज्यानें पिटविली त्यानें मुद्दाम त्या नियमाचा भंग कां केला ? जर तेथेंच जन्मल्या असतील तर न्यायदिनापर्यंत त्या विचाऱ्या तेथें निर्वाह कशावर करीत असतील ? त्यांच्याकरितां तेथें, बीबी लोकांच्या निर्वाहार्थ पुरुषहि असतील तर इहलोकांतील मुसलमान पुरुष मेल्यावर त्यांच्यासाठीं खुदानें आणखी एखादी बीबी स्त्रियांची पलटण रिझर्व्ह ठेवली आहे काय ? बीबींचा जसा सर्वकाळ वैकुंठांत निवास करण्याचा परवाना खुदानें दिला तसा पुरुषांना कां दिला नाहीं ? मुसलमानांचा खुदा या सर्व प्रकारावरुन अन्यायकारी व बेसमझदार दिसतो.

४७—परमेश्वरापाशीं ( मूळचा सत्य ) धर्म ( म्हटला ) तर केवळ इस्लामच होय. —सू.-इ. अ. ३ आ. १९

**समीक्षकः**—ईश्वर फक्त मुसलमानांचाच आहे इतरांचा नाहीं काय ? तेराशें वर्षांपूर्वी ईश्वरीय धर्म नव्हताच कीं काय ? कुराण ईश्वरानें बनविलें नसून कोणा ऐखाद्या पक्षपाती मनुष्यानें तें लिहिलें आहे. याला वरील वचनाचा मुख्य पुरावा आहे.

४८—प्रत्येक जणास जसें त्यानें ( जगांत ) केलें असेल तसें त्याला पुरें पुरें भरून दिलें जाईल; व लोकांवर ( कोण्या तऱ्हेचा ) जुलूम होणार नाहीं. ( हे पैगंबरा ! ) तूं ( तर ही) प्रार्थना कर कीं, हे परमेश्वरा ! (साऱ्या) राज्याचे मालका ! तूंच ज्याला इच्छितोस त्याला राज्य देतोस व तूंच ज्याच्यापासून इच्छितोस त्याच्यांपासून राज्य काढून घेतोस,

आणि तूंच ज्याला इच्छितोस त्याला इजतअब्रू देतोस व तूंच ज्याला इच्छितोस त्याला नमवितोस ( हरतऱ्हेचें हित व ) कल्याण तुझ्याच हातीं आहे. निःसंशय तूं सर्व शक्तिमान् आहेस. तूंच ( उन्हाळयांत ) रात्रीस ( घटवून ) दिवसांत सामील करतोस, आणि तूंच ( हिवाळयांत ) दिवसास ( घटवून) रात्रीत सामील करतोस; आणि तूंच निर्जिवांतून सजीव व तूंच सजीवांतून निर्जिव काढतोस, व तूंच ज्याला इच्छितोस त्याला बेसुमार देतोस. मुसलमानांस पाहिजे कीं त्यांनीं मुसलमानांना सोडून नास्तिकांस मित्र पत्करूं नये. आणि जो असें करील, तर त्याशीं व परमेश्वराशीं कांहीं संबंधच नाहीं. ( हे *पैगंबरा ! या लोकांस ) सांगून दे कीं जर तुम्हीं परमेश्वराशीं प्रीति ठेवता तर तुम्हीं माझें अनुकरण करा; म्हणजे पर*मेश्वरहि तुम्हांशीं प्रीति ठेवील व तुम्हांस तुमचें अपराध क्षमा करील आणि परमेश्वर क्षमाशील व दयाळू होय.

—सू. अ. आ. इ. आ. ३ आ. २५ ते २८,३१

**समीक्षकः**— जर प्रत्येकाला कर्मांचें पुरें पुरें फल देण्यांत येणार आहे तर मग क्षमा कशाबद्दल करण्यांत येणार आहे ? क्षमा करण्यांत येईल व पुरें पुरें फल देण्यांत येणार नाहीं, तर अन्याय होईल, उत्तमोत्तम कर्में केल्याखेरीज जर राज्यादि सौख्यें देण्यांत येतील तर तेंहि अन्यायाचें होईल, मृतांला जिवंत करणें व सजीवाला निर्जीव बनविणें शक्यच नाहीं, कारण ईश्वरीय व्यवस्था अभेद्य व अछेद्य आहे; तींत बदल म्हणून कधीं व्हावयाचा नाहीं. मुसलमानी धर्माचा पक्षपात पहा. जे मुसलमान नाहींत त्यांना काफर ठरविणें, काफरामध्येंहि जे सदाचारी, थोर सज्जन आहेत त्यांच्याशींहि मैत्री करण्यास प्रतिबंध करणें व जो दुराचारी, नीच, दुर्जन मुसलमान आहे त्याला मित्र म्हणून त्याशीं मैत्री ठेवण्यास फर्माविणें, हें ईश्वरीय गुणकर्मस्वभावाविरुद्ध होय ! यावरून हें कुराण, कुराणीय खुदा आणि मुसलमान लोक हे केवळ पक्षपाती, अविद्यासंपन्न ठरत आहेत व म्हणूनच मुसलमानसमाज आडदांड दिसत आहे. तुम्ही आपला पक्ष धरला तर खुदा तुमचा पक्ष धरील व तुमच्या हातून पक्षपातयुक्त पापकर्में झालीं तरी त्यांची तो क्षमा करील. ही आणखी एक महंमद साहेबांची विचित्र लीला पहा ! यावरून सिद्ध होतें कीं, महंमदसाहबोंचें अंतःकरण शुद्ध नव्हतें म्हणूनच आपला मतलब साधण्यासाठीं महंमद साहेबांनीं कुराण बनविलें व बनवून घेतलें असें स्पष्टपणें कळून येत आहे.

४९—आणि जेव्हां दूतांनीं ( मर्यमला ) सांगितलें कीं अगे मर्यम ! तुला परमेश्वरानें निवडलें व ( पापांच्या ) *( गंधापासूनहि ) तुला पाकसाफ राखिलें; आणि ( त्यामुळेंच ) तुला सकल जगांचे स्त्रियांवर ( श्रेष्ठत्व देऊन ) निवडून* काढलें.

—सू. आ इ. अ. ३ आ. ४२

**समीक्षकः**—सांप्रतकाळीं खुदाचे फरिश्ते ( ईश्वरीय दूत ) येत नाहींत आणि खुदाहि कोणाशीं कानगोष्टी करण्यास येत नाहीं मग ते पूर्वीच कसे येत होते ? जर म्हणाल कीं पूर्वीचीं मनुष्यें पुण्यवान होतीं आतांचीं तशीं कोठें आहेत ? हें म्हणणें सपशेल मिथ्या आहे. उलटपक्षीं ख्रिस्ती व मुसलमान मतें ज्या काळीं अस्तित्वांत आलीं, त्या काळीं त्या देशांत जंगली व विद्याहीन मनुष्यांचीच संख्या अधिक होती, म्हणूनच असलीं विद्याविरुद्ध मतमतांतरें त्या देशांत रूढ झालीं. आतांचे काळीं विद्वानांचें संख्याधिक्य असल्यामुळें असल्या मतांचा टिकाव लागत नाहीं पण उलट दिवसेदिवस अशीं जीं पोकळ धर्ममतें आहेत तीं लयास जात चाललीं आहेत; मग त्यांची वृद्धि होण्याचें नांवच नको.

५०—तो त्यांस मात्र इतकेंच फर्मावितो कीं हो, व तें होऊन जातें. आणि यहुद्यांनीं ( ईसाशीं ) डाव केला व परमेश्वरानें ( त्यांच्याशीं ) डाव केला; आणि डाव करणाऱ्यांत परमेश्वर ( सर्वांत ) उत्तम ( डाव करणार ) होय.

—सू. आ. इ. अ. ३ आ. ४७,५४

**समीक्षकः**—मुसलमान लोक ईश्वराशिवाय दुसरें कांहीं मानीतच नाहींत. मग या ठिकाणीं ईश्वरानें कोणत्या वस्तूला म्हटलें कीं, हो; व ती झाली ? याचें उत्तर सात जन्म गेले तरी मुसलमानांना देतां येणार नाहीं, कारण उपादानकारण असल्यावांचून कार्य होणें कधींच शक्य नाहीं. कारणाखेरीज कार्य होणें म्हणजे जणूं काय मातापित्याशिवायच माझें हें शरीर झालें असें म्हणण्यासारखेंच आहे. जो धोका देतो अर्थात् छळ व कपट करतो तो ईश्वर *कदापिहि होऊं शकत नाहीं. पण उत्तम मनुष्यहि असें काम करण्यास धजत नाहीं.*

५१—तुम्हांला कां इतकें पुरें नाहीं कीं तुमचा पालनकर्ता ( आकाशांतून ) तीन हजार दूत पाठवून तुमची मदत करील. —सू. आ. इ. अ. ३ आ. १२४

**समीक्षकः**—मुसलमानांना एकाकाळीं 'अल्ला' तीन हजार दूतांचें सैन्य मदतीला पाठवीत होता पण अलीकडे इस्लामी राज्यें बहुतेक नष्ट झालेलीं आहेत व होत आहेत तरी त्यांच्या सहाय्यार्थ तो दूतांची कुमक पाठवीत नाहीं यावरून केवळ मूर्ख लोकांना फसविण्याकरितांच ही अत्यंत अन्याययुक्त कथा रचलेली आहे, हें उघड आहे.

५२—नास्तिक लोकांवर आम्हांस विजयी कर. तुमचा ( खरा ) हितचिंतक परमेश्वर होय. व तो ( सर्व मदतगारांत ) उत्तम मदतगार होय. आणि परमेश्वराच्या मार्गांत जर तूम्हीं मारले जाल अगर मरून जाल तर परमेश्वराची क्षमा व दया लोक जी ( धन दौलत कांहीं काळ जगून ) गोळा करतात त्याहून उत्तम होय.

—सू. आ. इ. अ. ३ आ. १४७, १५०, १५७

**समीक्षकः**—जणूं काय परमेश्वर एखादा भोळा मनुष्य आहे म्हणून आपल्या धर्माहून भिन्न धर्मानुयायांना मारण्यासाठीं मुसलमान लोक ईश्वराची प्रार्थना भाकीत आहेत; व तो यांची प्रार्थना निमुटपणें ऐकतो ! जर मुसलमानांना जयश्रीची माळ घालणारा त्यांचा खुदा आहे तर मग त्यांचीं राज्यें नष्ट कां झालीं ? मुसलमानी खुदा पक्षांध बनून मुसलमानांचे सहाय्यार्थ धांवणारा असेल तर धर्मात्म्या पुरुषांना तो कधींहि उपासनीय होऊं शकणार नाहीं.

५३—आणि परमेश्वर असाहि नव्हे कीं तुम्हाला अदृष्ट गैबी गोष्ट कळवील .पण ( होय, ) परमेश्वर आपल्या पैगंबरांपैकीं ज्याला इच्छितो त्याला निवडून घेतो. तर तुम्हीं परमेश्वर व त्याचे पैगंबर यांजवर विश्वास ठेवा.

—सू. आ. इ. अ. ३ आ. १७९

**समीक्षकः**—जर मुसलमान लोक परमेश्वराशिवाय कोणावरहि श्रद्धा ठेवीत नाहींत किंवा परमेश्वराची बरोबरी करणारा दुसरा कोणीहि नाहीं असें मानीत आहेत तर मग पैगंबरसाहेबावर ईश्वराइतकीच तीव्र निष्ठा ठेवून त्याला (महंमद पैगंबराला) त्यांनीं प्रति ईश्वर कां बनवून ठेवलें आहे ? ईश्वरानें पैगंबरावर विश्वास ठेवा असें सांगितलें म्हणजे पैगंबर ईश्वरतुल्य ठरला. मग ईश्वर अद्वितीय आहे हें प्रतिपादण्यांत अर्थ काय ? महंमदसाहेब हे एक ईश्वराचे प्रेषित होते, असा याचा अर्थ समजावयाचा असेल तर असा प्रश्न उत्पन्न होतो कीं; महंमदसाहेबांना पाठविण्याची ईश्वराला कां आवश्यकता वाटली ? जर पैगंबराखेरीज ईश्वराला स्वकार्यें पार पाडतां येत नसतील तर तो ईश्वर असमर्थ ठरला.

५४—* ऐ ईमानवालो ! संतोष करो, परस्पर थामे रक्खो और लढाई में लगे रहो, अल्लाह से ड्रो कीं तुम छूटकरा पाओ ॥ —म. १ सि. ४ सू. ३ आ. १७८

**समीक्षकः**—हा कुराणप्रतिपादित खुदा व त्याचा पैगंबर हे दोघेहि लढाईबाज होते. लढाईची आज्ञा जो करतो तो शांततेचा पुरस्कर्ता मुळींच होऊं शकत नाहीं. नाममात्र ईश्वरावर विश्वास ठेवणारा मुक्त होईल कां ? किंवा अधर्मयुक्त लढाई करण्याचेवेळीं ईश्वराची भीति बाळगा म्हणणारा मुक्त होईल काय ? प्रथमपक्षीं भिणें न भिणें सारखेंच, द्वितीयपक्षीं म्यावयाचें असलें तर तें ठीक आहे.

५५—ह्या परमेश्वराच्या ( बांधीव ) मर्यादा होत. आणि जो परमेश्वर व त्याचा पैगंबर यांच्या हुकूमाप्रमाणें चालेल, (परलोकीं) त्याला परमेश्वर अशा बागांत (नेऊन) दाखल करील कीं ज्यांच्या खालून ( पाण्याचे ) पाट वाहत असतील. आणि हें मोठें सार्थक होय. आणि जो कोणी, परमेश्वर व त्याचा पैगंबर यांच्या हुकूमांचा अनादर करील व परमेश्वराच्या (बांधीव) मर्यादांचें उल्लंघन करील, त्याला परमेश्वर नरकाग्नींत ( नेऊन ) दाखल करील तो त्यांत निरंतर राहील; व त्याला फजितीची शिक्षा ( प्राप्त ) होईल. —सूरतु-न्निसा अ. ४ आ. १३, १४

---

* ह्या वचनाचें समाधानकारक मराठी भाषांतर सांपडत नसल्यामुळें तसेंच हिंदी वचन दिलें आहे. ह्याचा आशय दर्शविणारे मराठी भाषांतरांतील वचन पुढें दिलें आहे. (आहो मुसलमानांनो ! सहन करा, आपसांत मिळून मिसळून बळकट रहा; रहा परमेश्वराला भ्या कीं, ( अखेर ) तुम्ही सफल व्हाल. —सू. आ. इ. अ. ३ आ. २० हिंदी वचनांत 'लडाईमे लगे रहो' म्हणजे 'लढाईंत गुंतून रहा' असें जास्त शब्द आहेत.

समीक्षकः—ईश्वरानेंच महंमदसाहेबास पैगम्बर बनवून आपणामध्यें समाविष्ट करून त्याचा दर्जा स्वतःच्या बरोबरीचा केला आहे. व स्वर्गामध्यें देखील आपल्या दूतांना साथीदार मित्र म्हणून खुदानें ठेवून घेतलें. अशा तऱ्हेनें कुराणोक्त खुदा पैगम्बराधीन बनला असतांहि मुसलमान लोक त्या खुदाला पूर्ण स्वतंत्र समजतात. पूण असल्या परतंत्र ईश्वराला 'अद्वितीय' (लाशरीक) मानणें व्यर्थ होय. अशा गोष्टी ईश्वरोक्त पुस्तकामध्यें असू शकत नाहींत.

५६—परमेश्वर (कोणावर) अणुमात्रहि जुलूम करीत नाहीं; आणि (कोणाचें अणुमात्रहि) पुण्य असेल तर तो तें वाढवितो व आपल्याकडून मोठा मोबदला देतो. —सू. निसा अ. ४ आ. ४०

समीक्षकः—एक त्रसरेणुदेखील ईश्वर अन्याय करीत नाहीं; तर पुण्यवानांना दुप्पट फल कां देतो व मुसलमानांचा पक्षपात कां करतो ? वास्तविक दुप्पट या निम्मट फल देणें हा ईश्वराचा मोठा अन्याय आहे.

५७—जेव्हां ते तुझ्यापासून (उठून) बाहेर जातात, तेव्हां त्यांचातून कांहीं लोक रात्रीं (बसून बसून) आपण जें बोलतात त्याच्या उलट (भलभलत्या) मसलती करूं लागतात. आणि जसजशा मसलती रात्रीं (बसून बसून) ते करितात त्या परमेश्वर (आपल्या दूतांद्वारें) नोंदित जातो. परमेश्वरानें त्यांच्या कर्माच्या शासनार्थ त्यां (च्या बुद्धी) स पालथें केलें आहे; (म्हणूनच ते बहकून गेले आहेत.) कां तुम्ही हें इच्छितां कीं, ज्याला परमेश्वरानें बहकविलें आहे त्याला तुम्हीं सन्मार्गी लावावें [ आणि ज्याला परमेश्वर बहकवील, त्याच्यासाठीं तुमच्यांतून कोणी मार्ग काढील हें अशक्यच. —सू. नि. ४ आ.८१, ८८

समीक्षकः—ईश्वर मारवाड्याप्रमाणें जमाखर्चाच्या वह्यांवर प्रत्येकाच्या ? कर्माचा जमाखर्च लिहूनठेवीत असेल तर तो सर्वज्ञ नव्हे ! सर्वज्ञ आहे तर लिहून ठेवण्याचें कारण काय ? सैतानानें मनुष्य जातीला पापमार्गी लावलें असें मुसलमान म्हणत असतात, पण वरील वचनामध्यें ईश्वरहि मनुष्याला गुमराह करतो म्हणजे सन्मार्गापासून परावृत्त करतो असें म्हटलें आहे. मग सैतान व परमेश्वर यांत फरक काय राहिला ? हां, भेद आहे तो फक्त इतकाच कीं, ईश्वर हा बडा सैतान व सैतान हा ईश्वराचा कनिष्ट बंधु. मनुष्यांना जो परावृत्त करतो तो सैतान आहे अशी मुसलमानांची प्रतिज्ञा असते. त्यांच्या ह्या प्रतिज्ञेप्रमाणें ईश्वरहि सैतान ठरत आहे.

५८—आणि (लढाईपासून) आपले हात न आवरून घेतील, तर त्यांना धरा व जेथें तुम्हीं त्यांना पावाल तेथें त्यांना ठार करा. आणि कोणाहि मुसलमानास वाजवी नाहीं कीं त्यानें मुसलमानास (जिवें) मारून टाकावें; आणि जो मुसलमानाला चुकीनें (हि) मारून टाकील तर एक मुसलमान गुलाम मुक्त करणें. आणि जो मुसलमानास बुध्या (जिवें) मारून टाकील तर त्याची शिक्षा जहन्नम (म्हणजे नरकाग्नी) होय; कीं तो त्यांत नित्य राहील. आणि त्याच्यावर परमेश्वराचा गजब (सादर) होईल व त्याच्यावर परमेश्वराचा शाप उतरेल. —सू. निसा अ. ४ आ. ९१ ते ९३

समीक्षकः—जो मुसलमान नसेल त्याला जेथें पहाल तेथें ठार करा ही घोर अन्यायाची पक्षपातपूर्ण अशी ईश्वरीयाज्ञा पहा ? मुसलमानाला मारूं नका, चुकूनहि मुसलमानाचा वध झाल्यास पश्चाताप करा व प्रायश्चित घ्या. पण गैरइस्लामीयाला ठार करतेवेळीं मात्र मोबदला काय तर म्हणे स्वर्ग ! आग लागो असल्या ईश्वरीय ग्रंथाला व त्यांतील आज्ञांना. असलीं धर्मपुस्तकें, असले पैगंबर व असला ईश्वर ज्या समाजांत मान्य केला असेल त्या समाजाकडून जगाचें कोटकल्याणच होणार आहे ! बुद्धिमान लोकांनीं अशा तऱ्हेच्या घातकी धर्ममतापासून दोन हात दूरच राहणें बरें. ह्या असत्य मतांत न फसतां निःपक्षपात व सत्य अशा वेदोक्त मताचा सर्वांनीं स्वीकार करणेंच हितावह आहे. मुसलमानांच्या मतें गैरइस्लामीयाला ठार करणें स्वर्गप्राप्तीचें साधन व इतरांच्या मतें मुसलमानांना मारणें पुण्यप्रद अशा स्थितींत कोणाचें मत ग्राह्य मानावें याचा विचार वाचकांनींच करावा. यापेक्षां आर्यांचा मार्ग म्हणजे श्रेष्ठ व सदाचारी सज्जनांचा जो श्रेष्ठ मार्ग-वेदोक्त मार्ग-ह्याचाच सर्वांनीं निःसंकोचपणें अवलंब करावा व जे अनार्य, दस्यु, दुष्ट इत्यादि म्हणजे दुराचारी असतील त्यांच्या मार्गापासून परावृत्त व्हावें हेंच सर्वोत्तम होय.

*५९—आणि जो कोणी सरळमार्ग स्पष्ट दिसून आल्यावर पैगंबराचे उलट जाईल व मुसलमानांच्या मार्गाशिवाय (अन्यमार्गी) लागेल तर त्याला नरकाग्नींत (नेऊन) दाखल करूं.* —सू. नि अ. ४ आ. ११५

**समीक्षकः**—ईश्वर व त्याचा पैगंबर यांच्या पक्षपाती लीला कशा आहेत त्या पहा. आपण ईश्वराच्या नांवावर ह्या गोष्टी लोकांना उपदेशिल्या नाहींत तर आपलें मत वृद्धिंगत होणार नाहीं, लूटमार करण्यास सांपडणार नाहीं, चैन करावयास मिळणार नाहीं, हें महंमदसाहेबासारखे लोक पूर्णपणें समजत होते. यावरुन खात्री पटते ती एवढीच कीं, असले धर्मप्रचारक आपला मतलब सिद्ध करण्यांत पूर्ण तरबेज असतात, आणि म्हणूनच अशांची गणना 'अनाप्त' या लोकांत करण्यांस हरकत नाहीं. कारण ह्यांच्यासारख्यांचे प्रकार आप्त म्हणजे विद्वान्, जगत्कल्याणेच्छु जनांच्या हातून होणेंच शक्य नाहींत व विद्वान् लोकांपुढें अशांची डाळ शिजणेंहि अशक्य आहे.

६०—जो कोणी पमेश्वरास नाकारील व त्याच्या दूतांस व त्याच्या पुस्तकांस व त्याच्या पैगंबरास व शेवटल्या दिवसास; तर तो ( सन्मार्गाहून ) फारच दूर भटकून गेला. ज्या लोकांनीं विश्वास धरिला; पुन्हा (विश्वासास) नाकारिलें पुन्हा विश्वास धरिला; पुन्हा विश्वासास नाकारिलें, ( व नाकारणी ) नंतर ते नास्तिकपणांत वाढतच गेले; तर परमेश्वर त्यांना क्षमा करणार नाहीं व त्यांना ( सरळ ) मार्गहि दाखविणार नाहीं. —सू. न्नि. अ. ४ आ. १३६, १३७

**समीक्षकः**—वरील वचनावरुन ईश्वर स्वयंसमर्थ आहे अशी तुमची अद्याप समजून आहे काय ? एकदा ईश्वर स्वयंसमर्थ आहे असें सांगावें व एकदां त्याबरोबरच त्याचे साथीदार वा सहाय्यक आहेत असें मानावें हें परस्परविरुद्ध कथन नव्हे काय ? तीन वेळा क्षमा केल्यावर मग पुनः म्हणून क्षमा तो करणार नाहीं ना ? तीन वेळेस नास्तिकता बाळगल्यावर सन्मार्ग दाखवितो नंतर नाहीं. वारंवारदा नास्तिकता बाळगल्यावर ती फारच वाढेल अशी कदाचित् त्याला भीति पडली असेल ?

६१—परमेश्वर दांभिक व नास्तिक अशा सर्वांसहि नरकाग्नींत ( एके जागीं ) गोळा करुन सोडील. दांभिक लोक ( मुसलमानांस धोका दिल्यानें जणूं कीं, ) परमेश्वरास धोका देतात. आणि वास्तविक ( त्यांच्या पारिपत्यास्तव ) परमेश्वर त्यांनाच धोका देतो आहे. अहो मुसलमानांनों ! तुम्हीं मुसलमानांस सोडून नास्तिकांस मित्र पत्करूं नका.

—सू. न्नि. अ. ४ आ. १४०, १४२, १४५

**समीक्षकः**—मुसलमान तेवढे झाडून सर्व स्वर्गांत जातील अन्य लोक नरकांत पडतील याला प्रमाण काय ? वाहवा वाहवा ! जो वाईट लोकांच्या धोक्यांत सांपडतो व अन्य लोकांना धोक्यांत घालतो, अशा धोकेबाज ईश्वराला दुरुनच नमस्कार असो; कारण जो धोकेबाज आहे त्यानेंच असल्या ईश्वराशीं सख्य करावें व तसल्या ईश्वरानेंहि धोकेबाज लोकांवर कृपावृष्टि करावी हें स्वाभाविक आहे, कारण **यादृशी शीतला देवी तादृशः खरवाहनः**। अशास तसा भेटल्यास कार्य सुरळीत चालतें, ज्याचा ईश्वरच धोकेबाज तर त्या ईश्वराचे उपासक धोकेबाज कां नसावेत ? दुष्ट मुसलमानाशीं मित्रत्व इतर गैरमुस्लीम श्रेष्ठ महात्मा मनुष्य असला तरी त्याच्याशीं शत्रुत्व-धोकेबाजी करणें कोणालाहि उचित आहे काय ?

६२—अहो मनुष्यलोकहो ! ( हा ) पैगम्बर ( मोहंमद ) तुम्हांकडे तुमच्या पालनकर्त्याकडून सत्य (धर्म) घेऊन आला आहे; तर विश्वास धरा, आणि परमेश्वर ( सर्वांचा ) कर्ताहर्ता बस्स होय. —सू. न्नि. अ. ४ आ. १७०, १७१

**समीक्षक**—पैगम्बरवर विश्वास ठेवा असें सांगण्यानें पैगम्बर हा विश्वासापुरता तरी ईश्वराचा भागीदार बनला कां नाहीं ? ईश्वर एकदेशीं आहे व्यापक नाहीं म्हणूनच तर त्याला पैगम्बराची गरज लागते; असा पैगम्बरावलंबी ईश्वर,ईश्वर कधीं होऊं शकत नाहीं. कोठें ईश्वर सर्वव्यापक आहे म्हणून लिहावें व केव्हां तो पैगम्बरावलंबी आहे असें लिहावें यावरून कुराणरचनाहि एका व्यक्तीची नसून अनेकांची आहे हें उघड आहे.

६३—मेलेलें ( जनावर ) व रक्त व डुकराचें मांस आणि जें ( जनावर ) परमेश्वराचे शिवाय अन्य कोणास ( जबे करतेवेळीं ) नामनिर्दिष्ट केलें गेलें असेल तें व जें गुदमरून मेलें असेल तें व मार लागून मेलेलें व उंचीवरुन पडून मेलेलें व ( दुसऱ्या कोणा जनावराचें ) शिंग भोंसकून मेलेलें आणि ( तसेंच ) ज्या ( जनावरा ) स घातक श्वापदांनीं ( फाडून ) खाल्लें असेल तें ( जनावर ), हीं सर्व तुम्हांस शास्त्रनिषिद्ध होत.

—सूरतुल्–माईद अ. ५ आ.३

**समीक्षकः**—फक्त एवढेच पदार्थ हराम आहेत कां ? मग बाकीचे सर्व पशुपक्षी, किडे आदि मुसलमानांना सेवनीय

( हलाल ) समजावयाचें काय ? असें असेल तर ही मिथ्या कल्पना मनुष्याची आहे, ईश्वराची नव्हे म्हणून, हें वचन प्रमाण नव्हे.

६४—खुषदिलानें परमेश्वरास कर्ज देत राहाल; तर मी अवश्य तुमचीं पापें तुम्हांपासून दूर करीन, आणि जरूर तुम्हांस ( स्वर्गाच्या ) अशा बागांत नेऊन दाखल करीन. —सू. मा. अ. ५ आ. १२

**समीक्षकः**—वाहवा ! मुसलमानांच्या ईश्वराचें दिवाळें निघालें वाटतें. जर तो धनवान असता तर तो उधार कां मागतां ? आणि दुष्टांना स्वर्गाची लालूच दाखवून त्यांना त्यांचीं दुष्टकृत्यें नष्ट करविण्याचें आश्वासन कां देतां ? यावरून खात्री पटतें कीं, ईश्वराच्या नांवावर महंमदसाहेबांनीं आपला मतलब साधून घेतला असावा.

६५—परमेश्वर ज्याला इच्छील त्याला क्षमा करील व ज्याला त्याला इच्छील शिक्षा देईल. तुम्हास . अशा अशा देणग्या दिल्या कीं ज्या अलमदुनियेच्या लोकांपैकीं कोणासच दिल्या नाहींत. —सू. मा. अ. ५ आ. १८,२०

**समीक्षकः**—सैतान ज्याप्रमाणें वाटेल त्याला पापी बनवितो त्याप्रमाणें मुसलमानांचा ईश्वरहि सैतानी कामें करितो ! असें असल्यास मुसलमानी खुदा पापपुण्य करणारा ठरल्यामुळें तो स्वर्गनरकाच्या प्राप्तीचा अधिकारी बनतो. जसे सेनापतीच्या आधीन असलेल्या सैन्याच्या बऱ्या वाईट कृत्याची जबाबदारी सैन्यावर नसून सेनापतीवर असते त्याप्रमाणें जीव हा पराधीन असल्यामुळें बऱ्यावाईट कर्माचें फल सदरहू वचनानें त्यांस न मिळतां तें ईश्वरास मिळालें पाहिजे.

६६—तुम्हीं परमेश्वराची आज्ञा माना व पैगम्बराची आज्ञा माना. —सू. मा. अ ५ आ. ९२

**समीक्षकः**—ईश्वराच्या बरोबरीचा मान पैगम्बराचा आहे, तरी पुनः मुसलमानांचा खुदा ' लाशरीक ' म्हणजे स्वयंसमर्थ आहेच ! अशा स्थितींत तो सर्वसमर्थ मानणें व्यर्थ आहे.

६७—पूर्वीं जें झालें गेलें त्याची परमेश्वरानें माफी केली. आणि जो पुन्हां ( असें काम ) करील तर परमेश्वर त्याच्यापासून ( आज्ञाभंगाचा ) बदला घेईल. —सू. मा. अ. ५ आ. ९५

**समीक्षकः**— केलेल्या पापांची क्षमा करणें म्हणजे जणूं काय नवीन पापें करण्याची आज्ञा देण्याप्रमाणेंच आहे, व पापवृद्धि करणें होय. पाप क्षमा करण्याची गोष्ट ज्या पुस्तकांत आहे तें न ईश्वरकृत, न एखाद्या विद्वानाचें आहे. पण तें पुस्तक पापवर्धक आहे असें समजावें. पुढें होणाऱ्या पापांपासून दूर राहण्यासाठीं एखाद्यानें प्रार्थना करणें किंवा संयमनपूर्वक तीं न करणें, तीं न होईल अशी खबरदारी घेणें, पश्चात्ताप करणें हें उचित आहे परंतु त्यांतहि केवळ पश्चात्ताप करून भागत नाहीं कारण नुसता पश्चात्ताप व्यर्थ होय.

६८—आणि अशा मनुष्याहूनहि जास्त जालीम ( आणखी ) कोण होणार कीं जो परमेश्वरांवर खोटें कुभांड रचितो, अथवा असें प्रतिपादितो कीं मजकडे प्रकटीकरण आलें आहे, आणि वास्तविक पाहूं जातां, त्याजकडे कसलेंच कांहीं प्रकटिलें गेलें नाहीं ? आणि जो असें विधान करितो कीं ( कुरआन् ) जें ( तम्ही म्हणतां कीं, तें ) परमेश्वरानें प्रकट केलें आहे, ( म्हणाल तर ) तसलेंच मी आतां प्रकट करीन ? —सूरतुल-अन्आम् अ. ६ आ. ९४

**समीक्षकः**—आल्यावर ईश्वरापासून एक एक वचन उतरलें असें जेव्हां स्वतः महंमदसाहेब म्हणतात तेव्हां तत्पूर्वी दुसऱ्यावर तीं वचनें उतरत असलीं पाहिजेत असें ह्या गोष्टीनें स्पष्ट सिद्ध होतें. आपणाला लोकांनीं पैगम्बर मानावें म्हणूनच महंमदसाहेबांनीं आपल्यावर ईश्वरी वचनें उतरत आहेत असा कावा लढविला असावा व स्वतःची प्रतिष्ठा वाढवून घेतली असावी.

६९—आणि आम्हींच तुम्हांस ( म्हणजे तुमचा पिता ' आदम ' यास ) निर्मिलें व नंतर आम्हींच तुमचे ( म्हणजे तुमचा पिता ' आदम ' याचें ) रूप घडिलें. तदनतर आम्हीं दूतांस फर्माविलें कीं, तुम्ही ' आदम ' चे पुढें नमन करा; तेव्हांच ( सर्वांनीं ) नमन केलें. पण इब्लीस, हा नमन करणाऱ्यांत ( सामील ) झाला नाही. परमेश्वरानें इब्लीसला ) विचारिलें कीं जेव्हां मी तुला हुकूम दिला तेव्हां ( ' आदम ' चें पुढें ) नमण्यापासून तुला

कोणत्या वस्तूनें अटकाव केला ? तो बोलला, मी याच्यापेक्षां श्रेष्ठ आहे. (कांकीं) मला तूं अग्नीपासून निर्मिलेंस व त्याला मातींतून पैदा केलेंस (यावर परमेश्वरानें) फर्माविलें (कीं तुला ही शेखी आहे,) तर स्वर्गांतून खालीं उतर. कां तर तुला हें शोभत नाहीं की, तूं स्वर्गांत (राहून) शेखी मिरवावीस ! तो अर्ज करूं लागला कीं, ज्या दिवशीं (सर्व) लोक (पुन्हां जिवंत) उठवून उभे केले जातील त्या दिवसापर्यंतचा तूं मला अवकाश दे. (परमेश्वरानें) म्हटलें ( जा, मंजूर ) तूं अवकाश दिलेल्यांपैकीं आहेस. (यांवर सैतान) बोलला कीं जशी तूं माझी वाट मारली आहेस मीहि तसाच तुझ्या सरळ मार्गावर मनुष्य जातीस टपून बसेन तरच सई. आणि तूं बहुतेक मनुष्यजातीस (आपले) आभारी पावणार नाहींस. (परमेश्वरानें)फर्माविलें कीं स्वर्गांतून निघ, तुच्छ व बहिष्कृत झालेला (आहेस). मनुष्यमात्रांतून जो कोणी तुझें अनुकरण करील, मी निःसंशय तुम्हां सर्वांनीं जहन्नम भरून टाकीन. —सूरतुल. आअराफ. अ. ७ आ. ११ ते १८

**समीक्षकः**—आतां लक्षपूर्वक ऐका. ज्याची योग्यता एका चपराशापेक्षां जास्त नाहीं असा यःकश्चित् फरिश्ता ईश्वर व सैतान यांचेमधील झगड्यांत ईश्वराला म्याला नाहीं किंवा त्याला आपल्या बाजूला वळविण्यास ईश्वर समर्थ झाला नाही अथवा खुदा त्याचा आत्मा पवित्रहि करूं शकला नाहीं; उलट असला शिरजोर व पापी, ईश्वरावरहि मात करणारा जो फरिश्ता त्याला इस्लामी खुदा सोडून देतो आहे ! यापेक्षां खुदाची चूक ती कोणती असेल ? सैतान सर्वांना बहकावणारा व खुदा सैतानाला बहकविणारा म्हणून सैतानाचा महासैतान खुदा आहे हें सिद्ध झालें. कारण तूं मला बहकाविलेस असें खुद्द सैतानच ईश्वराला सांगतो आहे. यावरून कुराणोक्त ईश्वरांत पवित्रता मुळींच दृग्गोचर होत नाहीं इतकेंच काय पण सर्व पापांचें मूल कारण खुदाच ठरतो. असला ईश्वर मुसलमानांचाच होऊं शकतो, अन्य श्रेष्ठ विद्वज्जनांचा होऊं शकत नाहीं. शिवाय फरिश्त्याशीं मनुष्यवत् वार्तालाप करणारा देहधारी, अल्पज्ञ, न्यायरहित असा मुसलमानांचा खुदा असल्यामुळें विद्वान् लोक मुसलमानांचा इस्लामधर्म मान्य करीत नाहींत हें ठीकच आहे.

७०—(लोकांनों !) निःसंशय तुमचा पालनकर्ता हाच (असा) परमेश्वर होय कीं ज्यानें सहा दिवसांत आकाश व पृथ्वी हीं निर्माण केलीं; व मग तो (अर्श ऊर्फ) महासिंहासनारूढ झाला. (लोकांनों !) तुम्ही आपल्या पालनकर्त्याचा काकुळतीस येऊनच चुपचाप धांवा करीत जा. —सू. आ. अ. ७. आ. ५४, ५५

**समीक्षकः**—जो सहा दिवसांत जगत् बनवितो व सातव्या दिवशीं अर्श म्हणजे वर आकाशांत आराम घेतो तो ईश्वर सर्वशक्तिमान् व सर्वव्यापक कधींतरी असणें शक्य आहे काय ? ह्या प्रकारावरून त्याला ईश्वर मानणेंच चुकीचें आहे. ईश्वर काय बहिरा आहे म्हणून मोठमोठ्यानें त्याला पुकारण्याची जरूर आहे ? या सर्व अनीश्वरकृत गोष्टी आहेत. म्हणूनच कुराण हें ईश्वरकृत नव्हे. जर सहा दिवसांत जग बनवून सातव्या दिवशीं त्यानें आकाशांत विश्रांति घेतली म्हणजे त्याला थकवा आला कीं काय ? व सध्यां तो निद्रिस्थ आहे कां जागा आहे ? जर जागा असेल तर कांहीं कामधंदा करीत आहे कां मजेनें ऐषआराम करीत फिरत आहे ?

७१—देशांत फिसाद फैलावीत फिरूं नका. —सू. आ. अ. ७ आ. ७४

**समीक्षकः**—उपदेश तर उत्तम आहे परंतु याचे उलट दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं धर्मयुद्धें (जिहाद) करा, काफर लोकांचीं कत्तल करा अशा आज्ञा आहेत त्यांची वाट काय ? यांतील सत्य कोणतें ? यावरून महंमदसाहेब जेव्हां निबल झाले असतील तेव्हां त्यांना हा मार्ग सुचला असावा असें अनुमान निघतें, कारण भर तारुण्यांत खूप लढाया झगडे केले म्हणून यांत कांहीं तथ्यांश नाहीं.

७२—यावर 'मूसा' नें आपली काठी टाकून दिली; तों काय पाहतात कीं तो एक धडधडीत अजगर आहे. —सू. आ. अ. ७ आ. १०६

**समीक्षकः**—आतां या लिहिण्यावरून असल्या खोट्या गप्पा खुदा व महंमदसाहेबहि मानीत होते; ही एक गोष्ट निश्चित होते, असें जर असेल तर ते दोघेहि विद्वान् नव्हते, कारण डोळयांनीं पहाण्याचें व कानांनीं ऐकण्याचें काम दुसरें कोणी करूं शकत नाहींत म्हणून हें सर्व इन्द्रजाल होय.

७३—मग आम्ही त्यांच्यावर तुफान पाठविलें; व (तसेंच) टोळ, व उवा, व बेडूक आणि रक्त; (सारांश), सरतेशेवटी आम्ही त्यांच्यापासून (त्यांच्या खोडसाळपणाचा) बदला घेतलाच (घेतला); आम्हीं त्यांना समुद्रांत ठार करून टाकिलें. आणि आम्हीं बनी–इस्राएलांस समुद्रपार पोहोंचवून दिलें, आणि जीं (जीं) कर्में हे लोक करीत आले आहेत तीं (सर्व) निरर्थक होत. —सू. आ. अ. आ. १३३, १३६, १३८, १३९

**समीक्षक** :—आतां नीट लक्ष द्या. जसा एखादा पाखंडी कोणा एकाला धमकावितो व आपण तुला मारण्यासाठीं तुजवर सर्पास्त्र फेकलें म्हणतो त्याचप्रमाणें ही गोष्ट आहे. बरें जो इतका पक्षपातीं आहे कीं सबंध एक जातची जात बुडवितो व दुसरीला पैलतीरीं नेतो तो खुदा किती अधर्मी असावा ? जो अन्य मतावलंबी मनुष्यांना खोटे ठरवून स्वतःलाच खरा म्हणतो त्यापेक्षां लबाड दुसरा कोण असूं शकेल ? कारण कोणत्याहि मतांतील सर्वच मनुष्यें वाईट अगर चांगली असणें शक्य नसतें. ही एकतर्फी न्यायदानाची पद्धत महामूर्खाची आहे. तौरेत व जबूर प्रतिपादित धर्म ( यहुदी व ख्रिस्ती ) जो त्या लोकांचा होता तो संपूर्ण खोटा झाला काय ? जर त्यांचा दुसरा धर्म होता तर तो कोणता व खोटा कसा ? कुराणांत जो धर्म नाहीं असा तो धर्म होता काय ?

७४—मग जेव्हां त्याच्या पालनकर्त्यानें पर्वतावर (आपलें) जाज्वल्य स्वरूप प्रगट केलें, तेव्हां (भूकंप झाला व परमेश्वरानें) त्याला चकनाचूर केलें व 'मूसा' मूर्छित होऊन पडला. —सू. आ. अ. ७. आ १४३

**समीक्षकः**—जें पहाण्यांत येतें तें व्यापक असूं शकत नाहीं व असले चमत्कार खुदा पूर्वी करीत फिरत होता मग आतांच तो तसले चमत्कार कां दाखवीत नाहीं ? ह्या चमत्काराच्या गोष्टी सर्वथैव खोट्या असल्यामुळें त्या कोणी मान्य करूं नयेत.

७५—आणि ( हे पैगंबरा ! ) तूं आपल्या मनच्यामनींच नम्रतापूर्वक व भिऊन (भिऊन) मोठ्या शब्दानें नव्हे (तर मंद स्वरानें) सकाळ सांज आपल्या पालनकर्त्याचें स्मरण कर. —सू. आ. अ. ७ आ २०५

**समीक्षकः**—कुराणांत केव्हां ईश्वराला मोठ्यानें वारंवार पुकारा असें म्हटलें आहे. या ठिकाणीं सौम्यपणानें ईश्वराचें स्मरण करा म्हणून सांगितलें आहे. यांतलें खरें कोणतें ? व खोटें कोणतें ?जी एकीला विरोध करते ती गोष्ट प्रमत्त गीतवत् समजावी. जर यापैकीं एखादी चुकीची असेल तर तिचा अवश्य त्याग करावा.

७६—(हे पैगंबरा ! मुसलमान शिपाई) तुला लुटीचे मालाविषयीं प्रश्न करतात. (तर तूं त्यांना) सांगून दे कीं लुटीचा माल तर परमेश्वर व पैगंबर यांचा होय. म्हणून तुम्हीं परमेश्वरास भ्या. —सूरतुल्-अन्फाल् अ. ८ आ. १

**समीक्षकः**—ज्यांनीं लूटी कराव्यात, डाकूंचीं कामें करावीत, करवावींत, व पुनः खुदा, पैगंबर, ईमानवाले बनावें ही अत्यंत आश्चर्याची गोष्ट होय. ईश्वराचें भय दाखवतात व चौऱ्या निंद्य कर्मेंहि करीत राहतात आणि वर शिवाय 'उत्तम धर्म आमचा आहे' असें सांगतांना त्यांना लाजहि वाटत नाहीं. हट्ट सोडून सत्य वेदमताचा स्वीकार न करणें याहून अधिक वाईट गोष्ट ती कोणती ?

७७—आणि नास्तिकांचा मूलच्छेद करून टाकावा; मी लागोपाठ हजार देवदूतांनिशीं तुमची मदत करीन. मी लवकरच जे नास्तिक आहेत त्यांच्या अंतःकरणांत दहशत घालून टाकीन, (बरें) तर लगवा (या नास्तिकांचें) मानां— वंर व लगवा त्यांच्या (बोटांचे) पेरापेरांवर. —सू. अनू. अ. ८. आ. ७,९,१२

**समीक्षकः**—वाहवा ! जे मुसलमानधर्मीय नाहींत अशा काफर लोकांचें समूळ उच्चाटन करण्याची आज्ञा देणारे, त्यांची गर्दन छाटण्यास फर्मावणारे, त्यांच्या हातापायाचे तुकडे तुकडे करण्याचा उपदेश करणारे व सहाय्य देणारे खुदा व पैगंबर आमच्या लंकाधिपतीपेक्षां कोणत्या गोष्टींत कमी आहेत ? ही सारी उठाठेव कुराण लेखकाची आहे, ईश्वराची नव्हे. असा जर खुदा असेल तर ईश्वरानें त्याला आम्हापासून व आम्हाला त्याच्यापासून दूर ठेवावें.

७८—परमेश्वर विश्वासू-मुसलमानां बरोबर होय. तुम्हीं परमेश्वर व पैगंबर यांचा हुकूम (सावधान चित्तानें ऐका व ) मान्य करा. आहो मुसलमानांनों ! परमेश्वर व पैगंबर यांच्याशीं दगलबाजी करूं नका व आपल्याहि

अमानतींत दगलबाजी करूं नका; व परमेश्वर डाव चालवीत होता. आणि परमेश्वर, सर्व डाव कर्त्यांत उत्तम (डावकर्ता) होय. —सू. अन्. अ. ८ आ. १९, २४, २७, ३०

**समीक्षक:**—ईश्वर मुसलमानांचा पक्षपाती आहे काय ? असें असल्यास तो अधर्म करतो असें होइल. परंतु तसा तो नाहीं. ईश्वर सर्व सृष्टीचा आहे. पुकारल्याशिवाय ईश्वराला ऐकूं येत नाहीं काय ? व त्याच्याबरोबरचा मान पैगंबराला देणें हें अनुचित नव्हे काय ? चोर चोरी करतील म्हणून ईश्वराचा खजिना कोठें पुरलेला आहे ? पैगंबर व स्वत: ईश्वर याशिवाय इतर सर्वांची चोरी करण्यास कांहींच हरकत नाहीं काय ? असा उपदेश विद्वान् व धर्मनिष्ठ कसा करूं शकेल ? जो घमेंड बाळगतो व जो घमेंड बाळगणाऱ्याचा मित्र आहे तो खुदा कपटी व छळी व अधर्मी नव्हे काय ? ह्या सर्व स्थितिवरून पहातां कुराण हें ईश्वरीय नव्हे त्याचा कर्ता कोणी तरी कपटी व छळी असावा, त्याखेरीज असले प्रकार लिहिणें कसें संभवेल ?

७९—आणि नास्तिकांशीं लढत राहा; येथपर्यंत कीं, फंदफितुर (नांवास देखील बाकी) राहाणार नाहीं व धर्म सवर्स्वी परमेश्वराचाच होईल. आणि तुम्हीं हें जाणून ठेवा कीं, जी चीज तुम्हीं ( लढाईंत ) लुटून आणाल, तिचा पांचवा हिस्सा परमेश्वराचा व पैगंबराचा. —सू. अन्. अ. ८ आ. ३९, ४१

**समीक्षक:**—असा प्रकारच्या पद्धतशीर लुटी, लढाया, झगडे करून शांतताभंगकर्ता मुसलमानांच्या खुदाशिवाय दुसरा कोण आहे ? या धर्माची मजा पहा, ईश्वर व पैगंबर याकरितां सर्व जगाला लुटणें हें काम लटारूचें नव्हें काय ? विशेष आश्चर्य हें कीं, या अनीतिमूलक लुटींत खुद्द मुसलमानांच्या ईश्वराचा पांचवा हिस्सा व त्या प्रमाणेंच पैगंबराचाहि असावा ही आज्ञा म्हणजे कमालच होय ! चोरी लूट यामध्यें भागीदारी घेणें म्हणजे स्वतः डाकू बनणें व अशा लुटारू योद्धयांचा पक्षपात करणें ह्या गोष्टी खुदाच्या ईश्वरीयत्वाला बट्टा लावणाऱ्या आहेत ! अत्यंत सखेदाश्चर्याची गोष्ट म्हणजे असलें पुस्तक, असला खुदा व असा पैगंबर या जगतांत असल्या उलाढाली करून शांतताभंगाची पर्वा न करितां मनुष्य जातीला दु:ख देण्यासाठीं कसे व कोठून आले कोण जाणें ! असलीं मतामतांतरें जगतांत उत्पन्न न होतीं तर जग किती आनंदांत असतें बरें ?

८०—आणि (हे पैगंबरा !) तूं जर (अशा वेळीं नास्तिकांची स्थिति) पाहाशील तर ( फार बरें होईल कीं ) जेव्हां दूत (या) नास्तिकांचे प्राण हरण करतात (व) त्यांच्या तोंडांवर व पाठीवर (लाथाबुक्क्यांचा) प्राहार करीत जातात व (म्हणत जातात कीं घ्या,) धगधगीत नरकाग्नीची शिक्षा तर चाखा. आम्हीं त्यांना त्यांच्या पापकर्माबद्दल नष्ट करून टाकिलें आणि 'फिरऔन' चे लोकांस गर्क करून टाकिलें. जितकी तुमच्यानें होतां होईल तितकी नास्तिकांचे (सामन्या) साठीं तयारी ठेवा; —सू. अन्. अ. ८ आ. ५०, ५४, ६०.

**समीक्षक**—काय महाराज ? रशिया, रोम व इंग्लंड या राष्ट्रांनीं इजिप्तची दुर्दशा केली होती तेव्हां आपल्या खुदाचे फरिश्ते कोठें झोपले होते ? आणि जो अल्ला पूर्वकालीं आपल्या भक्तगणाच्या शत्रूंचा फडशा पाडीत होता तो अल्ला सांप्रतकालीं तसें कां करित नाहीं ? ह्यावरून वरील दर्पोक्तीचा सत्यांश कळण्यासारखा आहे. गैरमुसलमानांना दु:खदायक अशीं कर्मे तुम्ही करा म्हणून सांगणारा खुदा किती विद्वान्, धार्मिक व दयाळू आहे तें पहा. तरी आपला खुदा दयाळू व न्यायकारी आहे, असें मुसलमान म्हणतातच. पण अशा प्रकारच्या आज्ञा पाहिल्या म्हणजे दया व न्यायादि सद्गुणांपासून मुसलमानांचा खुदा फारच दूर आहे, असें कळेल.

८१—हे पैगंबरा ! परमेश्वर य मुसलमान लोक जे तुला अनुसरतात ते, तुला पुरे होत. हे पैगंबरा ! तूं मुसलमानास (नास्तिकाशीं) लढण्याचें प्रोत्साहन दे; कीं जर तुम्हां (मुसलमानां) पैकीं सहनशील (व करारी) असे वीसही असतील, तर ते दोनशें (नास्तिकां) वर जय पावतील; पण, (असो,) जें कांहीं तुम्हांस लुटींत मिळालें आहे तें हलालाचें व शुद्ध समजून खा; आणि परमेश्वरा (चे कोपा) स भीत राहा परमेश्वर क्षमाकर्ता (व) दयाळू होय.

—सू. अन्. अ. ८ आ. ६४, ६५, ६९

**समीक्षकः**–एकाचा पक्ष धरल्यानंतर मग तो अन्यायी असला तरी त्याची बाजू घेऊन त्याचेंच हित करणें ही गोष्ट न्याय, विद्वत्ता व धर्म यांना सोडून आहे. जो प्रजेमध्यें मारामाऱ्या रक्तपात लढाया करवितो, लूटी मिळवितो व लुटींतील माल हलाल (स्वीकारण्यास योग्य) समजतो त्याला क्षमावान्, दयाळू संबोधिणें नवल खरें; अशा गोष्टी साधारणता विद्वान् देखील करूं शकणार नाहीं. मग ईश्वराची तर गोष्टच नको. यावरून कुराण हें ईश्वरप्रणीत नव्हे.

८२—(आणि हे लोक) त्या बागांत सदासर्वदा राहातील. निःसंशय परमेश्वरासमीप (पुण्याईचें) मोठें प्रतिफल होय. अहो मुसलमानानों ! जर तुमचे बाप व तुमचे भाऊ विश्वासापुढें नास्तिकपणास प्रीय जाणतील; तर तुम्हीं त्यांना (आपले) स्नेही बनवूं नका. मग परमेश्वरानें आपल्या पैगबरावर व (तशीच) मुसलमानांवर आपल्याकडून शांति उतरली, आणि (तुमच्या कुमकेस दूतांची) अशीं सैन्यें पाठविलीं कीं, जीं तुम्हांला दिसून येत नव्हतीं; आणि (अखेर) नास्तिकांस त्यानें शिक्षा दिली. मग या पश्चात् परमेश्वर ज्याचा इच्छील त्याचा पश्चात्ताप मान्य करील. जे परमेश्वराला मानीत नाहींत, अशा (लोकां) शींहि तुम्हीं लढा. —सूरतु. तौबा. अ. ९ आ. २२, २३, २६, २७, २९

**समीक्षकः**–स्वर्गस्थ लोकांचे जवळ ईश्वर रहातो म्हणजे त्याच्या सर्वव्यापकत्वाला खो बसला व तो खुदा एकदेशी बनला. मग तो सृष्टिकर्ता व न्यायधीश राहूं शकणार नाहीं. आई बाप, बंधु, भगिनी यांना त्याग करण्याचा उपदेश करणें अन्याय आहे. ज्यावेळेस मातापितादि वडीलजन भलताच अयोग्य उपदेश करतील तर तो बेलाशक अमान्य करावा. पण त्यांची सेवा करण्यांत मात्र कधीं अंतर पडूं देऊं नये हेंच सुपुत्राचें कर्तव्य आहे. मुसलमानांचा खुदा पूर्वी त्यांच्याकरितां लष्कर पाठवीत होता पण आतां तें लष्कर कोठें गेलें हें खुदाच जाणें. त्याचप्रमाणें अगोदर काफरांना शासन करण्यास स्वतः उतरत असे. पण हल्लीं त्यानें काफर लोकांपुढें हात टेकलें असावेत. लढायाशिवाय काफरांना सन्मार्गावर आणण्यास खुदाच्या हातीं दुसरें साधनच नाहीं काय ? अशा खुदाला आम्ही सर्वकालची तिलांजली देतों, हा खुदा म्हणजे शुद्ध खुर्दा आहे.

८३—आणि आम्ही तुमच्याठायी या गोष्टीची वाट पाहातों आहों की, परमेश्वर तुम्हांला आपल्याकडून एखाद्या शिक्षेंत पिडो अगर आमच्या हातून (तुम्हांस एखादि शिक्षा देववो) ! —सू. तौ. अ. ९ आ. ५२

**समीक्षकः**—ईश्वराच्या पोलीस खात्यांत सर्व मुसलमानच तेवढे आहेत काय ? अन्यमतानुयायी लोकांना धरपकड करावयाचा अधिकार ह्या पोलीसांनाच फक्त अल्लानें देऊन ठेवला आहे वाटतें ! दुसरें कोट्यावधि मनुष्य ईश्वराला अप्रिय आहेत काय ? व मुसलमानांतील पापीहि खुदाला प्रिय असावा काय ? असें असल्यास 'अंधेर नगरी गवरगंड राजा' असाच राज्यकारभार ह्या इस्लामी खुदाचा आहे म्हणवयाचा ! आश्चर्य एवढेंच कीं, जे बुद्धिमान मुसलमान आहेत तेंहि ह्या निर्मूल आयुक्त धर्माला मानीत आहेत.

८४—विश्वासू पुरुष व विश्वासू स्त्रियांशीं परमेश्वरानें (स्वर्गीय) बागांचा वायदा केला आहे कीं, ज्यांच्या खालून (पाण्याचे) पाट वाहत असतील (व तीं) त्यांत नित्य राहातील; आणि (तसाच परमेश्वरानें त्यांच्याशीं) चिरकालिक निवासस्थानाचे बागांत छानदार (छानदार) घरांचा (वायदा केला आहे). आणि परमेश्वराची सुप्रसन्नता फारच थोर होय. हेंच मोठें सार्थक्य होय. एवंच ते त्या (सर्वां) वर हंसतात; पण परमेश्वर या (दांभिकां) वर हंसतो.

—सू. तौ अ. ९ आ. ७२, ७९

**समीक्षकः**—हें आपल्या मतलबासाठीं ईश्वराच्या नांवावर स्त्रीपुरुषांना लोभ दाखविण्यासारखें आहे असा लोभ दाखवला नसता तर महमदसाहेबांच्या जाळयांत ते आडकले नसते. अन्य सांप्रदायिकहि अशीच स्वर्गाची लालूच दाखवीत असतात. मनुष्य आपापसांत थट्टा मस्करी करतात पण तसें करणें ईश्वराला शोभत नाहीं, यावरून कुराण शुद्ध पोरखेळ आहे असें दिसतें.

८५—परंतु पैगंबर व ज्यांनीं त्याच्याबरोबर (परमेश्वरावर) विश्वास ठेविला आहे (या सर्वांनीं) आपलें धन व आपलें तनमन ( परमेश्वरावरचें मार्गांत ) अर्पून जिहाद-धर्मयुद्ध केलें; हेच लोक होत कीं, ज्यांना ( इहलोक व

परलोक या सर्वांचें ) श्रेय होय आणि परमेश्वरानें त्यांच्या अंतःकरणावर मोहर लावून दिली आहे; म्हणून हे ( लोक जिहादच्या खुब्या ) समजत नाहींत. —सू. तौ. अ. ९ आ. ८८, ९३

**समीक्षकः**—कशी मजा आहे ती पहा. जे महंमदसाहेबांवर श्रद्धा ठेवतात तेवढेच काय ते उत्तम व जे तसें करीत नाहींत ते झाडून सर्व लोक वाईट ! हा प्रकार अन्याय व पक्षपातद्योतक आहे असेंच नाहीं काय ? ईश्वरानेंच मोहर ठोकल्यावर मनुष्यांनीं केलेल्या पापांचा खरा अधिकारीं ईश्वरच बनला. कारण मनुष्यांच्या अंतःकरणावर मोहर ठोकणें हा घोर अन्याय आहे.

८६—( हे पैगंबरा ! हे लोक आपल्या मालाची जकात देतील तर ) त्यांचा मालाची जकात घेत जा, कीं ही ( जकात स्वीकारल्या ) नें तूं त्यांची ( पापासून अंतर्बाह्य ) शुद्धी करतोस; परमेश्वरानें मुसलमानांपासून त्याचें प्राण व त्यांची धनदौलत ( या वायद्यानें ) खरेदी घेतली आहे कीं, त्यांच्या ऐवजीं त्यांना स्वर्ग ( प्राप्ति ) होईल ( हे लोक तनमन व धन यांची पर्वा ना बाळगितां ) परमेश्वराचें मार्गांत लढतात, ( आणि ते लढतात ) तेव्हां ( शत्रूस ) मारून टाकतात व ( आपणहि वेळेस ) मारले जातात. —सू. तौ. अ. ६ आ. १०३, १११

**समीक्षकः**—वाहवा ! महंमदसाहेब, आपण तर गोकुळवासी गोसाव्यांची बरोबरी केली म्हणावयाची, यजमानाचा माल घेऊन त्यांना पवित्र करणें एवढच धंदा गोसाव्यांचा असतो. वाहवा खुदाजी ! आपण चांगला धंदा निर्माण केला. मुसलमानांद्वारें इतर गरीबगुरीबांची लूट करून स्वतःची तुंबडी भरणें हा आतट्ट्याबाचा सौदा आहे असें कोण म्हणेल ? एवढ्यावरच न थांबता त्या अनाथांना मारणारे निर्दय जन त्यांच्यावर दया व न्याय दाखवून त्यांना स्वर्गप्राप्ति करून देणें हें आपण आपल्या ईश्वरीयत्वांस बट्टा लावण्यासारखें कृत्य केलें आहे म्हणूनच बुद्धिमान् धार्मिक लोकांत आपण तिरस्कार्ह बनला आहे.

८७—अहो मुसलमानांनों ! तुम्ही आपल्या आसपासचे नास्तिकांशीं लढा; आणि त्यांना तुमच्यांत उग्रता ( व शौर्य ) आढळून आलें पाहिजें; आणि कां ( हे लोक इतकेहि ) अवलोकन करीत नाहींत कीं, प्रतिवर्षी एकदा किंवा दोनदां ते सकटांत तावून सुलाखून पाहिले जातात; यावरहि ते पश्चाताप करीत नाहींत व त्याना अद्लहि घडत नाहीं. —सू. तौ. अ. ९ आ. १२३, १२६

**समीक्षकः**—पहा, ही देखील एक विश्वासघाताचीं शिकवण मुसलमानांना खुदा शिकवीत आहे. तुम्ही शेजारी असा वा नोकर असा प्रसंगोचित शेजाऱ्यांशीं वा मालकांशीं लढाई करा व त्याचा घात करा अशी शिकवण आहे. या आज्ञेप्रमाणें मुसलमानांकडून असें पुष्कळ प्रकार घडलेले आहेत. आतां तरी मुसलमानांनीं असल्या कुराणोक्त बदसल्ल्यापासून दूर रहावें हेंच उत्तम होय.

८७—( लोकानों ! ) तुमचा पालनकर्ता तोच परमेश्वर होय कीं ज्यानें सहा दिवसांत आकाशास व पृथ्वीस निर्माण केलें. नंतर दिव्य सिंहासनावर तो विराजमान झाला, ( कीं तेथूनच ) प्रत्येक कामाची व्यवस्था लावीत राहातो. —सूरतो-यूनुस् अ. १० आ. ३.

**समीक्षकः**—आसमान आकाश एकच व ते न बनवितां अनादि आहे. तें बनविलें असें म्हणणें हेंच कुराण लेखकाच्या ठायीं वसत असलेल्या पदार्थविद्येच्या अज्ञानाचें प्रमाण होय. परमेश्वराला सृष्टि रचण्यास पूर्ण सहा दिवस खपावें लागलें हें खरें आहे तर मग 'माझ्या हुकमानें मी हो म्हटलें व सर्व कांहीं झालें' असें जें कुराणांत म्हटलें आहे त्याची वाट काय ? हें खरें असेल तर सहा दिवसांची सृष्ट्यु उत्पत्ति खोटी ठरली ! खुदा सर्वव्यापक असता तर वर आकाशीं तो निवास कां करतां ? सर्व कामाची वांटणी तो करून घेतो तर मनुष्यांप्रमाणेंच तो ठरला. कारण जो सर्वज्ञ आहे तो बसल्या बसल्या कां वाटणी करील ? यावरून ईश्वर म्हणजे काय हें न जाणणाऱ्या जंगली लोकांनीं हें पुस्तक रचलें आहे.

८९—आणि विश्वासू लोकांसाठीं सद्बोग व दया. —सूरतो. यूनुस्. अ. १० आ. ५७

समीक्षकः—ईश्वर फक्त मुसलमानांच आहे. इतरांचा नव्हे काय ? तो पक्षपाती आहे काय ? याखेरीज तो फक्त मुसलमानांवरच दया कां करतां ? मुसलमान म्हणजे ईश्वरावर ईमान ठेवणारे ईमानदार असा अर्थ असेल म्हणून त्यांना शिक्षेची जरूरी नाहीं व जे ईमानदार नाहींत त्यांना तो सदुपदेश करीत नाहीं म्हणून खुदाची विद्या व्यर्थ होय.

९०—त्यानें तुम्हां लोकांस पडताळून पाहावें कीं, तुमच्यांत कोणाचीं कृत्यें उत्तम होत ? आणि ( हे पैगंबरा !) जर तूं ( या लोकांस ) सांगशील कीं मेल्या पश्चात तुम्हीं ( सर्व पुन्हां जिवंत ) उठवून उमे केलें जाल.

—सूरतो-हूद अ. ११ आ. ७

समीक्षकः—जर कर्माची परीक्षा करतो तर सर्वज्ञ नाहीं. जर मरणानंतर उठवितो तर मध्यंतरी काय तो फिरतीवर असतो ? व मेलेला जीवंत होत नाहीं या नियमाचा भंग करणें हें खुदाला बट्टा लावण्यासारखें आहे.

९१—आणि हुकूम फर्मावला गेला कीं हे धरित्री ! तूं आपलें पाणी शोषून घे; आणि हे आभाळा ! तूं थांबून जा; आणि पाणी ( चढलेलें ) उतरून गेलें. आणि हे माझ्या बांधनांनों ! ही परमेश्वराची ( धाडलेली ) सांडणी तुहां-करितां (माझ्या पैगंबराची) एक निशाणी होय; तर तिला (ह्याच स्थितींत ) सुटी राहूं द्या, कीं परमेश्वराच्या जमिनीं-तून हवें तेथें चरत फिरेल. —सू. हू. अ. ११ आ. ४४, ६४

समीक्षकः—किती बालिशपणाची गोष्ट आहे ही ? पृथ्वी व आकाश कधीं कांहीं ऐकूं शकतात काय ? वाहवा ! खुदाजवळ ऊंटीण आहे तर मग ऊंटहि असेल आणि मग हत्ती, घोडे, गाढव आदि पशुहि असतीलच ? ऊंणणीकडून शेत उध्वस्त करणें हीं खुदाची केवढी चांगली गोष्ट आहे ? ऊंटीणीवर तो कधी स्वारीहि करतो काय ? असल्या गोष्टी म्हणजे शुद्ध पोरकटपणाच्या आहेत झालें.

९२—( आणि ) जोंपर्यंत आकाश व पृथ्वी कायम होत, तोंपर्यंत ते सदासर्वदा त्यांतच राहातील. आणि जे लोक सुदैवी होत ते स्वर्गांत असतील; आणि जोंपर्यंत आकाश व पृथ्वी कायम होत तोंपर्यंत बरोबर त्यांतच राहातील.

—सू. हू. अ. ११ आ. १०७, १०८

समीक्षकः—प्रलयांतीं न्यायासाठीं सर्व लोक स्वर्गांत व नरकांत जातील, तर मग आकाशाची व पृथ्वीची काय जरूरी आहे ? आणि जर स्वर्ग व नरक, आकाश व पृथ्वीच्या समाप्तीपर्यंत ते राहाणार असतील तर ते आत्मे सर्व-काळ स्वर्ग व नरकांत पडून राहातील हें विधान खोटें म्हटलें पाहिजे. असलीं विधानें अविद्वानाचीं असतात. ईश्व-राचीं वा विद्वानांचीं नव्हेत.

९३—एके काळीं ' यूसुफा ' नें आपला पिता ( 'याकूब' ) यास सांगितलें कीं हे माझ्या पित्या ! मी (स्वप्नांत) अकरा नक्षत्रें व सूर्य व चंद्र हीं पाहिलीं आहेत. —सूरतो-यूसुफ अ. १२ आ. ४ ते ५९

समीक्षकः—( ४ ते ४९ ) ह्या प्रकरणांत पितापुत्राचा संवाद आलेला आहे यावरून कुराण ईश्वरीय नव्हे पण मनुष्यांनी यांत मनुष्यांचा इतिहास वर्णन केला आहे.

९४—परमेश्वर असा ( परम समर्थ ) होय कीं ज्यानें आकाशाला कोणाहि आधारावांचून उंच बनवून उभें केलें की तें तुम्हीं ( लोक ) पाहातच आहां. नंतर तो महासिंहासनावर विराजमान झाला. आणि त्यानें सूर्य व चंद्र यांस नियंत्रित केलें आणि तोच ( असा परम समर्थ होय ) कीं ज्यानें पृथ्वीचा विस्तार केला (त्यानेंच ) आकाशांतून पाणी वर्षविलें. मग आपापल्या अंदाजाप्रमाणें ओढे वाहूं लागले; परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला विपुल निर्वाहसाधन देतो; आणि ( ज्याला इच्छितो त्याला ) हात राखून देतो. —सूरत्-रंअद अ. १३ आ. २, ३, १७, २५

समीक्षकः—मुसलमानांचा खुदा पदार्थविद्या मुळींच जाणत नव्हता. जर जाणत असतां तर गुरुत्वाकर्षण नसल्यानें आसमानाला खांबावर स्थिर केलें आहे अशी कथा तो कधींच न लिहिता. खुदा अशरुपीं एका ठिकाणीं राहात आहे तर मग तो सर्वशक्तिमान व सर्वव्यापक असूं शकत नाहीं. त्याप्रमाणें मेघविद्येचें ज्ञानहि खुदाला असतें तर आका-शांतून पाणी आणलें असें म्हटल्यावर पृथ्वीवरील पाणी वर चढविलें तेव्हां ते मेघरूप बनून नंतर जमिनीवर उतरतें असेंहि त्यानें सांगितलें असतें. चन्या याईट कामाशिवाय जर तो एखाद्याला सुख दुःख देतो तर खुदा म्हणजे शुद्ध पक्षपाती, अन्यायकारी व निरक्षर भट्ट होय.

९५—(तूं त्यांन ) सांगा कीं परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला मार्गाहून चळवितो आणि जो कोणी (त्याचेकडे) वळतो त्याला आपल्याकडे (पोहोंचण्याचा) मार्ग दाखवितो. —सू. रं. अ. १३ आ. २७

**समीक्षकः**—अल्लाच जर भ्रम उत्पन्न करतो तर मग त्याच्यांत व सैतानांत भेद तो कोणता ? सैतान दुसऱ्यांना बहकावितो म्हणून जर तो वाईट म्हणतात तर तींच कामें करणारा खुदा केवढा मोठा सैतान असला पाहिजे ? आणि लोकांना भलत्याच मार्गी नेणाऱ्या पापीष्टाला नरकवास मिळावयास नको काय ?

९६—आणि अशाच कारणानें आम्हीं कुराणास आरबी (भाषेचा) हुकूम म्हणून सादर केला आहे (कीं आरब-लोकांस हें सहज समजेल). आणि (हे पैगंबरा !) तुला ज्ञान होऊन चुकलें आहे त्या उपरांतहि, जर तूं त्यांच्या मनोवासनांस अनुसरशील तर (मग) परमेश्वरापुढें कोणी तुझा पुरस्कर्ता होणार नाहीं व कोणी बचावणाराहि होणार नाहीं कांहीं झालें तरी, (आमच्या आज्ञा) पोहोंचविणें हें तुझें काम होय व (त्यांच्यापासून) हिशेब घेणें हे आमचें. —सू. रं. अ. १३ आ. ३७, ४०

**समीक्षकः**—कोणत्या दिशेनें कुराण उतरलें ? खुदा वर राहत असल्यास तो एकदेशीय ठरला. ईश्वर म्हटला म्हणजे तो एकरस असाच सर्वत्र व्यापक असला पाहिजे. संदेश पोंहचता करण्याचें काम गड्याचें असतें. जो एकदेशी मनुष्यवत् असतो त्यालाच गड्यामाणसांची गरज लागते. हिशेब, घेणें, देणें, ही मनुष्यांचीं कामें होत, ईश्वराचीं नव्हेत. पण कुराणांत वर्णिलेला खुदा एकदेशी मनुष्यासारखा असल्यामुळें कुराण हें अल्पज्ञ मनुष्यानें लिहिलेलें पुस्तक आहे.

९७—सूर्य व चंद्र हेहि तुमच्या ताब्यांत करून दिले कीं दोन्हींहि चक्कर खात राहातात; कांहीं संशय नाहीं कीं मनुष्य मोठाच अन्यायी (व) अनुपकारी होय. —सूरतु-इब्राहीम अ. १४ आ. ३३, ३४

**समीक्षकः**—पृथ्वी अचल असून सूर्य चंद्र मात्र फिरतात हा अजब शोध आहे. पृथ्वी न फिरूं लागली तर २४ तासाऐवजीं कित्येक वर्षांचा दिवस व रात्र बनेल. निश्चयपूर्वक मनुष्य अन्यायी व पापी आहे तर त्याला कुराणाप्रमाणें शिक्षा करणें व्यर्थ होय. मग पापी मानवजातींत पुण्यात्मा कधींच कोणी असणार नाहीं. पण या जगांत पापी व पुण्यवान् असे लोक पहावयास मिळतात म्हणून असल्या गोष्टींनीं भरलेलें पुस्तक ईश्वरीय नव्हे.

९८—तर जेव्हां मी त्याला पूर्णपणें बनवून चूकेन व त्यांत आपल्या (स्वनिर्मित) आत्मा फुंकेन, तेव्हां तुम्हीं त्याच्यापुढें साष्टांग नमस्कार घालीत (भराभर पालथे) पडा. (सैतान) म्हणाला हे माझ्या पालनकर्त्या ! तूं जशी (मानवाखातर) माझी वाट मारलीस, (तसेंच) मीहि पृथ्वींत त्यांना (संसाराचें) उत्तम चित्र दाखवून या सर्वांस बहकवीन हरच सई. —सूरतुल् हिज्र अ. १५ आ. २९, ३९

**समीक्षकः**—जर ईश्वरानें आपला श्वास आदमसाहेबांच्या पुतळयांत फुंकून त्याला स्वतःप्रमाणें बनविलें म्हणजे आदम ईश्वररूप झाला. ईश्वरसदृश आदम नसतां तर त्याला नमस्कार करा, त्याची भक्ति करा असें ईश्वरानें सांगून त्याला आपले भागीदार कां करून घेतलें ? सैतानाला बहकविणारा खुदा जर आहे तर तो खुदा सैतानांचाहि परात्पर गुरु नव्हे काय ? तुम्ही मुसलमान लोक सैतानालाच लोकांना बहकवणारा मानता पण तुमच्या खुदानेंच सैतानाला बहकविलें. तूं जसें मला बहकविलेंस तसें मीहि लोकांना बहकवीन असें सैतानानें खुदाला बीजाविलें असतांनादेखील त्यानें सैतानाला कैद केलें नाहीं किंवा त्याला नामशेष कां केलें नाहीं ?

९९—आणि आम्ही प्रत्येक जनतेंत (कोणी ना कोणी) पैगंबर (या गोष्टीच्या समजविण्यासाठीं) पाठवीत राहिलों आहों, जेव्हां आम्ही कोणा वस्तूचा इरादा करतों, तेव्हां आमचें म्हणणें तिच्या संबंधानें फक्त एवढेंच असतें कीं, आम्ही तिला फर्मावितों कीं हो, आणि ती होऊन जाते. —सूरतु-न्नहल अ. १६ आ. ३६, ४०

**समीक्षकः**—जर सर्व जातीकरितां भिन्न भिन्न पैगंबर महात्मे पाठविले तर महंमदसाहेबाशिवाय इतरांना मानणारे सर्व लोक काफर कसें ? तेहि इतर पैगम्बरांच्याच सदुपदेशाप्रमाणें वागतात ना ? ही सर्वथा पक्षपातजन्य गोष्ट आहे. सर्वांना पैगंबर पाठविले तर आर्यावर्तामध्यें कोणता शेवटचा पैगम्बर पाठविला ? ईश्वर इच्छा करतो व सांगतो कीं,

पृथ्वी हो, तेव्हां ती होते. पृथ्वी जड असल्याकारणानें ती ऐकूं शकत नाहीं. आणि ईश्वराशिवाय भिन्न अशी प्रकृति जर तुम्ही मानीत नाहीं तर मग ईश्वरानें हुकूम कोणाला केला व काय झालें ! ह्या साऱ्या अविद्याजनक गोष्टी अडाणी लोकाखेरीज कोणीहि मानूं शकत नाहींत.

१००—आणि हे नास्तिक लोक ( दूतांस ) परमेश्वराच्या मुली ठरवितात. ( वाहवा ! ) परमेश्वर ( जो ) परम पवित्र (त्यांच्यासाठीं मुली ) आणि खुद्द आपणासाठीं; जी कांहीं आकांक्षा ते बाळगितात ती ( म्हणजे मुलगे ) ! (हे पैगम्बरा ! ) परमेश्वराची [म्हणजे आम्हांला आपली ] शपथ आहे कीं तुझ्यापूर्वींहि आम्ही ( भिन्न भिन्न ) जनतांकडे पैगंबर पाठविले.

—सू. न्न. अ. १६ आ. ५७, ६३

**समीक्षकः**—अल्ला बेटींचें काय करील ? बेटींची गरज एखाद्या पुरुषाला असते. बेटीच कां निवडलेले मुलगे कां नाहींत ? याचें काय कारण असावें सांगा. शपथ घेणें हें काम असत्यवादी लोकांचें असतें ईश्वराचें नव्हे. जे खोटे असतात तेच लोक आपलें म्हणणें सत्य आहे हें सिद्ध करण्यासाठीं शपथा घेतांना आपण जगांत पहातों. प्रामाणिक व सत्यवादी शपथ कशाला घेईल ?

१०१—हेच ते लोक होत कीं ज्यांच्या अंत.करणावर, व ज्यांच्या कानावर व ज्यांच्या डोळयावर परमेश्वरानें मोहर करून टाकली आहे; आणि हेच (पराकाष्ठेचे) वेफाम होत आणि प्रत्येकजणास त्यानें जें केलें सवरलें त्याचा भरपूर मोबदला दिला जाईल व लोकांवर (कोण्याहि तऱ्हेचा) जुलूम केला जाणार नाहीं.

—सू. न्न. अ. १६ आ. १०८, १११

**समीक्षकः**—खुदानेंच मनुष्यांच्या अंतःकरणावर व कानावर मोहर ठोकल्यामुळें विनाकारण ते बिचारे मारले गेले आहेत, कारण अल्लानेंच त्यांना पराधीन बनवून ठेवलें हा त्याचा केवढा मोठा अपराध आहे ? तरी पुनः आणखी ज्यानें जितकें केलें तितकेंच त्याला दिलें जाईल, कमजास्त नाहीं. असें तो म्हणतोच आहे. अपराधी जनानीं जे अपराध केले ते कांहीं स्वेच्छेनें नव्हेत ईश्वरीय प्रेरणेनें केलें मग त्या निरपराधी मनुष्यांना केलेल्या अपराधाबद्दल दंड न मिळतां वास्तवीक अल्लालाच मिळाला पाहिजे हें उचित होय. 'आणि पुरे पुरे फल देण्यांत येईल' तर मग क्षमा कोणत्या गोष्टींची करतो ! क्षमा करण्यांत येत असेल तर न्याय कोठें राहिला ! निर्बुद्ध बालकांच्या बालिश गप्पासारख्या कुराणोक्त खुदाच्या ह्या गोष्टी आहेत त्या ईश्वराच्या असूं शकत नाहींत.

१०२—आणि आम्ही नास्तिकासाठीं ' जहन्नम ' चा बंदीखाना ( तयार ) ठेवलाच आहे. आणि आम्ही हरेक माणसाचें ( बरें वाईट ) भाग्य त्याचें त्याच्या गळयांत घालून टाकलें आहे; ( म्हणजे ज्याचें प्रारब्ध त्याच्याबरोबर होय ); आणि पुनरुत्थानाचे दिवशीं आम्हीं ( त्याचा कर्म— ) लेख काढून त्याच्यापुढें ठेऊं ( व ) तो त्याला आपल्या रूबरू उघडलेला पाहील. आणि ' नूहा ' च्या मागून आम्हीं कित्येक पिढ्यांचा नाश करुन टाकितो.

—सूरतु-वनी-इस्रईल अ. १७ आ. ८, १३,१७

**समीक्षकः**—जर ' काफर ' शब्दाची व्याख्या कुराण, पगंबर, कुराणोक्त सातव्या अस्मानावरील खुदा, व नमाज वगैरेंना न मानणारा अशी असेल व अशा काफर लोकांसाठीं ' नरक ' असेल तर ती गोष्ट पक्षपाताची होय. कुराण मानणारे तेवढे स्वर्गाधिकारी व अन्य सर्व लोक दुर्जन म्हणून नरकप्राप्तीचे अधिकारी होत असें कधींतरी होऊं शकेल काय ? अत्यंत गमतीची बालकवत् बडबड म्हणजे प्रत्येकाच्या मानेमध्यें कर्म पुस्तक ( भाग्य ) बांधलेलें आहे ? आम्ही तर एकहि गृहस्थाच्या गळयांत कोणतेंहि कर्म पुस्तक अद्याप पाहिलेलें नाहीं. प्रत्येकास त्याचें यथायोग्य कर्मफल मिळतें असें या विधानाचें रहस्य असेल तर ठीक आहे; मग मनुष्याच्या अंतःकरणावर, कानावर, डोळयावर वगैरेवर मोहर ठोकणें, केलेल्या पापाबद्दल क्षमा न करणें हा काय खेळ खुदानें मांडला आहे ? व्यापायाच्या रोजकीर्दीप्रमाणें ईश्वरहि रोजकीर्द खतावणी लिहित असतो काय ? येथें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, जर पूर्वजन्मच नाहीं तर जीवाचीं कर्में कोठलीं ? व त्या कर्मांचि रेषा कोणती ? कर्मांशिवायच नोंद करून सुखदुःख देणें हा मोठा अन्याय होय.

कारण चांगल्या वाईट कर्माखेरीज सुखदुःख कसलें ? केवळ ईश्वराची मर्जी हेंच उत्तर असेल तर खुदा अन्यायी ठरतो. बरीं वाईट कर्मे केल्याशिवाय सुखदुःखरूप फलें न्यूनाधिक प्रमाणानें देणें त्यालाच अन्याय म्हणतात व हीं फलें कोण सांगणार ! ईश्वर आपली रोजकीर्द उघडून तोच सुनावणार किंवा त्याचा शिरेस्तेदार त्यांची सुनावणी करील ! दीर्घकालपावेतो जीवांना बिनाकारण शिक्षा करणारा खुदा मोठा अन्यायकारी आहे म्हणावयाचा असा खुदा ईश्वर असूं शकत नाहीं.

१०३—आम्हीं ' समूद ' ( चे लोकां ) ला सांढणीचा देखत चमत्कार दिला होता. आणि त्यांच्यांतून ज्यांना तूं आपल्या ( मोहक ) स्वरानें [ बहकवूं ] शकशील त्याना बहकीव; ( आणि बडें श्रेष्ठत्व तर त्या दिवसाचें होय कीं ) ज्या दिवशीं आम्हीं सर्व लोकांस त्यांच्या ( त्यांच्या ) पुढाऱ्यांसमवेत ( आपल्या समोर ) बोलावून हजर करूं. मग ज्यांचा ( कर्म ) लेख त्यांच्या उजव्या हातांत दिला जाईल. —सू. ब. इ. अ. १७ ५९, ६४, ७१

**समीक्षकः**—वाहवा, खुदाच्या ईश्वरीयत्वाच्या साश्चर्यमय चिन्हांपैकीं ' ऊंटीण ' एक चिन्ह आहे ! खुदानेंच सैतानाला बहकाविण्याची आज्ञा दिली मग खुदाच सैतानाचा सरदार व सर्व पापांचा उत्पादक ठरला. अशा खुदाला ईश्वर मानणें हें शुद्ध अज्ञत्व होय. न्यायाच्या दिवसापर्यंत अर्थात् प्रलयकालापर्यंत न्याय करणें करविणें यासाठीं पैगंबर व त्याचे अनुयायी यांना खुदा बोलवणार नाहीं; मग प्रलयकालपावेतों हें सर्व कोठें वास्तव्य करून राहाणार ? काय फिरतीवर राहाणार ? एकसारखें भ्रमण करीत राहणें हें दुःखदायक होय ! याकरितां शीघ्र न्याय करणें हेंच सुज्ञ न्यायाधीशाचें काम आहे. एरवीं एखाद्या न्यायाधीशानें सांगावें कीं चोर व सावकार हे जोंपर्यंत एकत्र मजसमोर येणार नाहीत तोंपर्यंत ५० वर्षे त्यांना मी अपराधी निरपराधी ठरवूं शकत नाहीं; अशांतलाच हा खुदाच्या घरच्या न्याय आहे म्हणावयाचा. एक खुशाल ५० वर्षे पावेतों फरारी होऊन भटकत राहीला आहे व एक त्यांचवेळीं पकडला गेला आहे व त्याचदिवशीं दोघां अपराध्यांनाहि शिक्षा ! खासें ! न्यायदान क्रिया पहाणें असल्यास वेद व मनुस्मृति पहा. त्यामध्यें क्षणमात्राचा विलंब नाहीं. प्रत्येकांना आपापल्या बऱ्यावाईट कर्माबद्दल यथायोग्य फल दिलें जातें. शिवाय पैगंबराच्या साक्षी पुराव्यानें अपराध्यांना शिक्षा द्यावयाची किंवा नाहीं हें ठरत नाहीं; कारण पैगंबराच्या साक्षीनें आरोपी दोषी व निर्दोषी ठरवणें म्हणजे ईश्वर अल्पज्ञ आहे असेंच सिद्ध होत नाहीं काय ? असलें पुस्तक ईश्वरकृत व त्यांतील उपदेश ईश्वरीय कधींतरी होईल काय ?

१०४—हेच लोक होत कीं ज्यांच्या राहाणासाठीं [ स्वर्गाच्या ] कायमच्या बागा होत; या लोकांच्या (हवेल्या) खालून पाण्याचे पाट वाहात असतील; तेथें त्यांना आलंकारार्थ सोन्याचीं कंकणें घातलीं जातील. आणि ते तलम रेशमाचीं व किनखाबाचीं हिरवीं ( हिरवीं ) वस्त्रें स्यालेले असतील; व ( तेथें सिंहासनावर टेंका ) लावून ( खुशाल बसलेले ) असतील. ( किती तरी ) उत्कृष्ट पुण्यफल हें ! आणि ऐषआरामाचे दृष्टीनें ( स्वर्गाची किती तरी ) उत्तम शय्या ही ! —सूरतुल्-कड्फ अ. १८ आ ६१

**समीक्षकः**—वाहवा, कसा आहे कुराणवर्णित स्वर्ग ! त्यांत बाग आहे, दागदागिने आहेत. कपडे, गाद्या, तक्के, वगैरे सर्व बादशाही थाटमाट परिपूर्ण आहेत ! एखाद्यानें विचार केला तर तेथील आराम-सुखसौख्यापेक्षां मुसलमानी स्वर्गांत अधिक कांहींच नसल्यामुळें तेथें जाण्याची बुद्धिमान लोक तरी ईच्छा बाळगणार नाहींत. येथल्यापेक्षां इस्लामी स्वर्गांत एक विशेष गोष्ट म्हणजे अन्याय ही होय. कर्मे मात्र सान्त पण त्यांचीं फलें भोगण्याची क्रिया अनन्त काल ! रोज मिष्टान्नें खाणाऱ्यांना अल्पकालांतच तीं आवडेनासी होऊं लागतात म्हणजे दुःखदायक बनतात. हाच न्याय मुसलमानी स्वर्गाला लावल्यास अनन्तकालचीं स्वर्गीय सुखें नित्याचरणानें अगर सहवासानें तीं दुःखदायीच होणार याकरितां महाकल्पपर्यंत मुक्तिसुख भोगून पुनर्जन्म प्राप्त होणें हाच सत्य सिद्धांत होय.

१०५—आणि ( ' आद ' व ' समूद ' च्या ) ह्या वस्त्या [कीं ज्या तुम्ही जरब लोक ' सिरीया ' देशाच्या मार्गावर ओसाड पडलेल्या पाहातां त्या ] जेव्हां त्यांनींहि शिरजोरी केली, तेव्हां आम्हीं त्यांचा संहार करून टाकला; आणि त्यांच्या संहाराचीहि आम्हीं एकवेळ मुक्रर केली होती. —सू. क. अ. १८ आ. ५९

**समीक्षक:**— सर्वच पापी जन असणें संभवनीय तरी आहे काय ? नंतर खुदा प्रतिज्ञा करतो यावरूनच त्याची अल्पज्ञता व्यक्त होते. प्रतिज्ञा कसली तर लोकांना मारण्याची ! खुदा दयाळू खरा !

१०६—आणि मुलगा (जो होता) तर त्याचे आईबाप उभयतांहि विश्वासू होते तर आम्हांस हा अंदेश कवाटला कीं, ( असे न व्हावें, मोठा होऊन ) त्यानें शिरजोरी व नास्तिकपणा करून त्या उभयतास इजा द्यावी. येथपर्यंत कीं, जेव्हां तो ( चालतां चालतां ) सूर्यास्त होण्याच्या जागीं पोहोंचला तेव्हां त्याला असें अढळलें कीं, सूर्य ( जणूं ) काळया काळया चिखलाच्या कुंडांत बुडतो आहे. त्या लोकांनीं ( आपल्या भाषेंत ) अर्ज केला कीं हें ' जुल्कर्नैनां ! ' ( या घाटाचे पलिकडे ) ' याजून ' व ' माजून ' ( यांचें राष्ट्र आहे; व ते लोक आमच्या ) देशांत येऊन नासाडी माजवितात. —सू. क. अ. १८ आ. ८०, ८६, ९४

**समीक्षक:**—ईश्वराचा हा किती असमंजसपणा आहे तो पहा ' संशय येतांच घाबरला कीं मुलांचे आईबाप माझ्या मार्गापासून परावृत्त होऊन विपरीत न बनोत. अशी स्थिति ईश्वराची कधीं होऊं शकते काय ? आणखी अविद्यापूर्ण स्थिति पहा; या पुस्तकाचा कर्ता एका सरोवरांत सूर्य बुडत असलेला पहात आहे व लगेच सकाळीं तो त्यांतून वर येतांना त्याला दिसतो आहे ! सूर्य हा पृथ्वीहून कितीतरी अधिक मोठा आहे. तो नदींत, सरोवरांत वा समुद्रांत कसा बुडूं शकेल ? यावरून कुराणकर्त्याचें भूगोल व खगोल विद्येचें ज्ञान व्यक्त होतें. केवळ कुराणकर्त्याचेंच नव्हे तर असल्या अविद्याजनक गोष्टीवर विश्वास ठेवणाऱ्याचेंहि ज्ञान दिसून येतें. जो ज्ञानी आहे त्याचा विश्वास क्षणभरहि असल्या मिथ्या गोष्टीवर बसणार नाहीं. ईश्वर हा पृथ्वीचा निर्माणकर्ता न्यायाधीश असा राजा आहे तथापि तो ह्या पृथ्वीवर खुशाल बंडाळी करूं देतो. ही गोष्ट ईश्वरीयत्वाचें विरुद्ध आहे., म्हणून हें पुस्तक जंगली लोकांनाच माननीय आहे विद्वानांना नाहीं.

१०७—आणि ( हे पैगम्बरा ! ) कुराणांत ' मर्यम ' ची गोष्टहि ( लोकांस) आठवून दे कीं जेव्हां ती आपल्या लोकांपासूनक एकीकडे होऊन पूर्वकडेस एका जागीं जाऊन बसली. आणि तिनें लोकांच्या पलिकडून गोषा करून घेतला. तों आम्हीं आपला आत्मा ( म्हणजे ' जिब्रील ' यास तिजकडे पाठविलें व तो सम्पूर्ण मनुष्याचें स्वरूप धारण करून तिजपुढें येऊन उभा राहिला. ती ( त्याला पाहून ) म्हणूं लागली कीं जर तूं ( परमेश्वराला ) भिऊन वागणार असशील तर मी तुजपासून परम दयाळू ( परमेश्वरा ) चा आश्रय रिघत्यें ( कीं तूं माझ्या समोरून निघून जा ), ('जिब्रीला' नें) म्हटलें कीं मी तर केवळ तुझ्या पालनकर्त्याचा पाठविलेला ( दूत ) आहे ( व ) यासाठीं ( आलों आहे ) कीं मी तुला एक पवित्र पुत्र अर्पण करावा. ती म्हणाली कीं, मला पुत्र होणार तरी कसा ? आणि वास्तविक पाहातां, ( लग्न संबंधाच्या नात्यानें ) मला कोणीहि पुरुषानें स्पर्श केला नाहीं व मी ( कधींच ) जारकर्मीहि नव्हत्यें. यावर 'मर्यम' ला ( आपोआपच पुत्राचा ) गर्भ राहिला व ती तो ( गर्भ ) घेऊन कोठें अलग दूरचे जागीं जाऊन बसली.

—सूरतु-मर्यम अ. १९ आ. १६ ते २० व २२

**समीक्षक:**—आतां बुद्धिमान जनांनीं विचार करावा कीं, देवदूत ( फरिश्ता ) हा देवाचा आत्मा आहे तर मग तो ईश्वराहून भिन्न नसला पाहिजे. मेरीसारख्या कुमारीला पुत्र होणें हा अन्याय तर खराच परंतु ईश्वराच्या हुकूमानें देवदूतानें तिला गर्भवती करणें हीहि गोष्ट ईश्वरीय न्यायाच्याविरुद्ध आहे. कारण कुमारी असल्यामुळें मर्यमला कोणाचाचें संग बाळगण्याची इच्छा नव्हती. या ठिकाणीं पुष्कळशा असभ्य गोष्टी वर्णन केलेल्या आहेत; त्या सर्वांचा उल्लेख करणें उचित नव्हे.

१०८—(हे पैगंबरा !) कां तूं (या गोष्टीचें) अवलोकन केलें नाहींस कीं आम्हीं सैतानांस नास्तिकांच्या मागें सोडून ठेविलें आहे की तें त्यांना फूस देऊन भडकवीत राहतात. —सूरत-मर्यम अ. १९ आ. ८३

**समीक्षक:**—ईश्वर जर लोकांना भ्रष्ट करण्याकरितां सैतानाला पाठवितो तर भ्रष्ट बनणाऱ्या लोकांचा त्यांत कोणता अपराध आहे ? ते लोक दंडार्ह नसून सैतानच आहे व ज्याच्या हुकमानें हें होते तो खुदा दंडनीय आहे. खुदा खरोखरच न्यायी असेल तर त्यानें आपणाहूनच नरकवास पत्करावा हें यथायोग्य आहे. जर न्याय व खुदा यांची फारकत झाली असेल तर तो अन्यायकारी आहे व अन्यायकारी म्हणजेच पापी होय.

१०९—आणि जो कोणी (पापापासून ) अनुतप्त होईल व विश्वास धरील व करील सुकृत्यहि व मग सन्मार्गावर ( कायमहि ) राहील तर त्या ( च्या पापां ) चाहि मी मोठा क्षमाकर्ता आहे. —सूरतु-त्वाहा अ. २० आ. ८२

**समीक्षकः**—तोबा करण्यानें पाप क्षमा केलें जातें हें जें कुराणोक्त वचन आहे तें सर्वांना पापी बनविण्यास मदत करणारें आहे. कारण त्यामुळें पाहीं जनांना पापें करण्यास उत्तेजन मिळतें. हें पुस्तक व त्याचा कर्ता पाप्यांना उत्तेजन देणारें असल्यामुळें तें परमेश्वरकृत नव्हे व तो कर्ता ईश्वर नव्हे.

११०—आणि आम्हींच पृथ्वींत भारी अचल ( पर्वत योग्य त्या त्या ठिकाणीं ) रोंविले कीं पृथ्वी लोकासहित ( कोणी एकीकडेस ) कलून पडूं नये. —सूरतुल् अंबिया अ. २१ आ. ३१

**समीक्षकः**—कुराणकर्त्याला पृथ्वीचें भ्रमण वगैरेचें ज्ञान असतें तर तो अशा गोष्टी न लिहिता. पर्वतांनीं धरून ठेवल्यामुळें ती हालत नाहीं, पर्वत नसते तर ती डळमळली असती इतके सांगूनहि भूकंपाच्यावेळीं ती हादरते याची वाट काय ?

१११—आणि त्या (' मर्यम ') बाईची (आठवण कर कीं) जिनें आपली लाज संभाळली; तर आम्हीं तिच्यांत* आपल्या आत्म्यांतून फुंकिलें. —सू. अं. अ. २१ आ. ९१

**समीक्षकः**—असल्या अश्लील गोष्टी ईश्वरीय पुस्तकांत ईश्वराच्या काय किंवा सभ्य मनुष्याच्या काय कोणा-कडूनहि लिहिल्या जाणेंच शक्य नाहींत. कारण साधारण वृत्तीच्या मनुष्याच्या दृष्टीनें जर त्या अश्लील आहेत तर मग परमेश्वराची गोष्ट कशाला ? असल्या वर्णनानें कुराण दूषित झालें आहे. जर हा प्रकार चांगला असता तर वेदाप्रमा-णेंच सर्वांनीं त्याची प्रशंसा केली असती.

११२—( हे वाचक-श्रोत्या ! ) कां तूं या गोष्टींकडे नजर केली नाहींस कीं जी ( सृष्टी ) पृथ्वींत आहे ती आणि सूर्य व चंद्र, व नक्षत्रें आणि पर्वत व झाडें, व चतुष्पाद जनावरें ( सर्वच तर ) परमेश्वरापुढें साष्टांग नमस्कार घाल—तात; ( व ) तेथें त्यांना सोन्याची कंकणें लेवविलीं जातील आणि ( हार वगैरेंच्या आकारानें ) मोती. आणि तेथें त्यांचा ( नेहमींचा ) पोषाकहि रेशमी असेल. आणि माझ्या ( या ) घराला प्रदक्षिणा करणारे व उभे राहाणारे व ओणवे होऊन नमन करणारे आणि साष्टांग नमस्कार घालणारे ( म्हणजे नमाज पढणारे ) यांजकरितां पाक साफ ठेव. नंतर आपला मळ उतरुन टाकावा व आपले नवस पूर्ण करावेत आणि पुरातन ( उपासनालय म्हणजे काय ' काब ' ) गृहाला प्रदक्षिणाहि घालावी. त्याजवर ( बळी देतेवेळीं ) त्यांनीं परमेश्वराचें नांव घ्यावें. —सूरतुल्-हज्ज अ. २२ आ. १८,२३,२६,२९,३४

**समीक्षकः**—जड वस्तुला ईश्वराचें ज्ञान नसल्यामुळें ती त्याला जाणूं शकत नाहीं मग त्याची भक्ति तरी ती कशी करूं शकेल ? हीं सर्व गप्पाष्टकें ईश्वराचीं खास नव्हेत. वाहवा, किती मजेदार स्वर्ग ! येथील राजे महाराजे यांना देखील जे राजवाडे, महाल, सोन्यामोत्याचे अलंकार, वस्त्रप्रावर्णें मिळणें दुर्लभ ते सर्व मुसलमानी स्वर्गांत मुक्तात्म्या-साठीं उपभोगार्थ तयार आहेत. स्वर्ग म्हणजे ईश्वराचें घर आहे काय ? तर मग तो त्या घरांतच वास्तव्य करीत असेल ? ह्यालाच मूर्तिपूजा म्हणतात. हे मूर्तिपूजक दुसऱ्यांच्या मूर्तिपूजेचें खंडन करितात. खुदा जर भेट घेतो, घरा-भोंवतीं फेऱ्या घालण्यास शिकवितो, आज्ञा देतो व पशू मारुन खाऊं घालतो तर मग असा खुदा व मंदिरांतील भैरव, दुर्गा आदि देव यांच्यामध्यें फरक कोठें राहिला ? दोघेहि सारखेच. इस्लामी खुदा हा मोठ्यांतला मोठा मूर्तिपूजक आहे कारण मूर्तीपेक्षां मशीद ही भली मोठी मूर्ति आहे. सारांश पुराणी व जैनी हे कनिष्ठ मूर्तिपूजक व खुदा आणि मुसलमान लोक हे बडे मूर्तिपूजक आहेत.

११३—मग पुनरुत्थानाच्या दिवशीं तुम्हीं ( सर्व ) उठवून उभे केले जाल. —सूरतुल् मोमीनून अ. २३ आ.१६

**समीक्षकः**—न्यायदिनापर्यंत प्रेतें कबरस्थानांत राहतील किंवा दुसरीकडे कोठें ? जर कबरस्थानांतच पडून राहतील तर त्यांच्या दुर्गंधीनें पुण्यवानांना फुकट उपद्रव सहन करावा लागेल. आणि व्यर्थ रोगोत्पत्ति केल्या कारणानें खुदा व मुसलमान पापाचे वांटेकरी बनतील.

---

* हिंदी वचनांत ' रक्षा की उसने अपने गुप्त लंगोटी ' असे शब्द आहेत.

११४—कीं ज्या दिवशीं त्यांच्याविरुद्ध यांच्या जीभा व यांचे हात व यांचे पाय, हे, यांच्या कर्माची साक्ष देतील. परमेश्वर ( तेजानेंच ) आकाश व पृथ्वीचा प्रकाश होय. त्याच्या प्रकाशाची उपमा अशी आहे कीं जशी एक मेहराब आहे ( व ) मेहराबींत एक दिवा ( ठेवलेला आहे, आणि ) दिवा एका कांचेच्या कंदिलांत आहे; आणि कंदिल ( इतका पारदर्शक चकचकीत आहे, ) जणूं कीं तो मोत्याप्रमाणें चकाकता असा एक ताराच होय. ( तो दिवा ) ' जैतून ' च्या एक आशिर्वादित झाडा ( च्या' तेला ) नें जाळला जातो कीं तें पूर्वेकडेसहि नाहीं व पश्चिमेकडेसहि नाहीं; त्याचें तेल ( इतके स्वच्छ आहे कीं ) जरी त्याला अग्निस्पर्शहि न करील तरीहि असें वाटतें कीं तें ( आपोआप ) प्रकाशूं लागेल. प्रकाशावर प्रकाश होय. परमेश्वर आपल्या प्रकाशाकडे ज्याला इच्छितो त्याला मार्ग दाखवितो.

—सूरतुन्नूर अ. २४ आ. २४,३५

समीक्षक:—हातपाय जड असल्यामुळें ते कधीं साक्ष देऊं शकत नाहींत. ही गोष्ट सृष्टिकर्माविरुद्ध आहे. दृष्टांत दिला आहे पण तो ईश्वराला सर्वस्वी विसंगत आहे. तो साकार पदार्थांना लागूं पडतो.

११५—आणि परमेश्वरानेंच सर्व [ चालत्या फिरत्या प्राण्यांस पाण्यापासून निर्माण केलें आहे. तर [ कित्येक ] त्यांतून असे होत कीं जे आपल्या पोटावर चालतात, आणि जो कोणी परमेश्वराचा हुकूम मानील; सांग कीं परमेश्वराचा हुकूम माना आणि पैगंबराचा हुकूम माना; पैगम्बराच्या कह्याप्रमाणें चाला; कदाचित तुम्हांवर दया केली जाईल. —सूरतुन्नूर अ. २४ आ. ४५,५२,५४,५६

समीक्षक:—कोणत्या जनावरामध्यें सर्व तत्वें दृग्गोचर होतात व तीं कोणत्या फिलॉसफीनें खुदाला ज्ञात झालीं कोण जाणें. पाण्यापासून खुदानें जनावर उत्पन्न केलें हें विचित्र होय. ईश्वराबरोबर त्याच्या दूताची आज्ञा मान्य करण्यास सांगितल्यावर दूत ईश्वराचा भागीदार बनला कां नाहीं ? असें आहे तर मग कुराणांत ईश्वराला ' लाशरीक कां म्हटलें आहे ?

११६—आणि ज्यादिवशीं आकाश एका ढगावरुन फाटून जाईल आणि ( त्यांच ढगांतून ) दूत घोळक्यांचे घोळके ( जमिनीवर ) उतारिले जातील. तर ( हे पैगंबरा ! ) तूं नास्तिकांचा कह्या मानूं नकोस आणि कुराण ( च्या प्रमाणा ) नें त्यांचा मोठ्या जोरानें झटून सामना कर. अशा लोकाचीं पापें, परमेश्वर सुकृत्यांत बदलून टाकील आणि जो कोणी पश्चाताप करील व ( त्या नंतर तो )सुकृत्यहि करील, तर तो खरोखरी परमेश्वराकडे वळतो.

—सूरतुल् फ़ुर्कान अ. २५ आ. २५,५२,७०,७१

समीक्षक:—आकाश वादळानें फाटून जाईल असें कधींतरी होईल काय ? आकाश कांहीं एखादा पदार्थ असेल तर तें छिन्न भिन्न होणें साहजिक आहे. मुसलमानांचें हें कुराण शान्तिभंग करुन झगडे तंटे वाढविणारें आहे म्हणून विद्वज्जनांच्या दृष्टीनें तें अमान्य बनलें आहे. पाप पुण्याची अदलाबदल होते. हाहि एक विचित्र न्याय आहे. तोबा करण्यानें पाप सुटतें व ईश्वर मिळतो तर कोणीहि पाप करण्यास भिणार नाहीं. ह्या सर्व गोष्टी अविद्यामूलक होत.

११७—आणि आम्हीं ' मूसा ' कडे आदेश पाठविला कीं तूं माझ्या सेवका (म्हणजे बनी इस्राएलां) स रातोरात घेऊन निघै; ( कारण ) तुमचा पाठलाग केला जाणार आहे. यावर ' फिरऔना' नें ( लोक समुदाय गोळा करण्यासाठीं ) शहरांत हलकारे पाठऊन दिले; ज्यानें मला पैदा केलें; मग तोच ( धर्म संसाराच्या विन्घ्नांत ) मला मार्ग दाखवितो; आणि जो मला खाऊं घालतो व जो मला ( पाणी ) पाजतो; आणि जो ( क्षमा कर्ता दयाळू होय व त्याच्यापासून ) मला तर आशा आहे कीं तो निर्णयाच्या दिवशीं मला माझे अपराध क्षमा करील.

—सूरतुश्शोअरा अ. २३ आ. ५२,५६,७८,७९,८२

समीक्षक:—ईश्वरानें मशिहाला धर्मशास्त्र पाठवलें होतें मग पुन: दाऊद, येशू व महंमदसाहेबयांना निरनिराळीं धर्मशास्त्रें कां पाठविलीं ? परमेश्वराची कृति सर्वदा एकसारखी व बिनचूक असते. कुराणापर्यंत धर्मशास्त्रें पाठवीत राहिला याचा अर्थ कुराणपूर्वीची सर्व धर्मपुस्तकें अपूर्ण, प्रमादयुक्त होतीं असें मानणें भाग आहे. जर कुराणापूर्वीचीं

तीन पुस्तकें प्रमाण असतील तर कुराण अप्रमाण ठरेल. चारीमध्यें परस्पर प्राय: विरोध आहे म्हणून त्यांना सर्वथैव प्रमाण मानणें हें शक्य नाहीं. जर ईश्वरानें जीव अर्थात् आत्मे उत्पन्न केले आहेत तर ते मरूनहि जात असतील म्हणजे त्यांचा अभावहि होत असेल ? मनुष्यादि प्राण्यांना परमेश्वर खाऊं पिऊं घालतो तर कोणालाहि रोगराई न झाली पाहिजे आणि सर्वांना त्यानें सारख्या प्रमाणांत खाण्यापिण्यास दिलें पाहिजे, पक्षपात बाळगून एकाला एक व दुसऱ्याला दुसरे म्हणजे राजा व कंगाल यांना श्रेष्ठ निकृष्ट प्रतीचें भोजन मिळतें तें न झालें पाहिजे. खुद्द परमेश्वर ज्यांना खाऊं पिऊं घालतो त्या मुसलमानांना रोग वगैरे मुळींच न व्हावेत. परंतु दयाळू खुदा मुसलमानांचे रोग निवारण करून त्यांना आरामहि देत नाहीं. यावरून खुदा तज्ञ असा वैद्य दिसत नाहीं. तो जर निष्णात वैद्य असता तर त्यानें मुसलमानांचे तरी निदान सर्व रोग बरे केलें असतें. जर तोच मारतो व जिवंत करतो तर त्यालाच त्याचें पाप पुण्य लागत असेल जर जन्मजन्मांतरांतील कर्मानुसार व्यवस्था करतो तर त्याचें हें कृत्य योग्यच होय. जर तो न्यायाच्या रात्रीं न्याय व पापांची क्षमा करितो तर तो खुदा पापवृद्धि करणारा बनून पापी बनेल. जर क्षमा करीत नसेल तर हें कुराणवचन खोटें म्हणावयाचे.

११८—तूंहि आम्हा सारखा मनुष्य आहेस, झालें, मग जर तूं खऱ्यापैकीं आहेस तर एखादा चमत्कार आणून दाखीव. ('सालेहा'ने) सांगितलें, ही सांडणी ( चमत्कार ) होय; पाणी प्यायाची ( एक दिवसाची ) पाळी इची. —सू. श्शा. अ. २६ आ. १५४, १५९

**समीक्षक**—पाषाणांतून ऊंटीण निघणें ह्या गोष्टींवर कोणी तरी विश्वास ठेवील काय ? ज्यांनीं ह्या गोष्टींवर विश्वास ठेवला ते लोक जंगली होते. उंटीणीची खूण देणें हाहि ईश्वराचा व्यवहार नसून एखाद्या जंगल्याचाच आहे ईश्वरप्रणीत जर कुराण असतें तर असल्या व्यर्थ गप्पा त्यांत आल्या नसत्या.

११९—हे 'मूसा' ! हा तर मी परमेश्वर आहे सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् आणि तूं आपली काठी (खालीं) टाकून दे; तर जेव्हां ( 'मूसा' नें ) पाहिले कीं काठी ( अशा तऱ्हेनें ) वळवळत आहे कीं जणू तो ( जिता ) सापच होय; तेव्हां त्यानें पाठ फिरवून पळ काढला व मागें (वळूनहि तर ) पाहिलें नाहीं. ( आम्ही अज्ञापिलें, ) हे 'मूसा' भिऊं नकोस. माझ्या हुजूरांत (येऊन) पैगंबर ( समाधान पावतात व ) भीत नाहींत. परमेश्वर (असा परमपवित्र होय कीं) त्याच्याशिवाय अन्य कोणी उपास्य नाहीं, ( आणि ) तोच महान 'अर्श' ( च्या सिंहासना ) चा मालक होय. ( आणि परमेश्वराच्या नांवानंतर ) हें कीं, माझ्यापुढें शिरजोरी करूं नका आणि आज्ञाधीन होऊन माझ्या हुजूर हजर व्हा. —सूरतु–न्नमल अ. २७ आ. ९, १०, २६,३१

**समीक्षकः**—बघा ही कात्मश्लाघा ! स्वतःच्या मुखानेंच अल्ला आपली स्तुति व थोरवी गात आहे आत्मस्तुति करणें हें श्रेष्ठ पुरुषाचें काम नव्हे. अशा प्रकारचा हा खुदा होता म्हणूनच तर जंगली लोकामध्यें इंद्रजाल पसरून त्यांना स्ववश केलें व त्यांचा ईश्वर बनला. धन्य तो खुदा व तें ईश्वरीय पुस्तक. आत्मस्तोम माजविणें अनुचित आहे पण तें खुदानें व त्याच्या महंमद पैगम्बरानें कुराणद्वारां माजविलें आहे. असल्या कितीतरी परस्परविरुद्ध गोष्टी कुराणांत भरलेल्या आहेत.

१२०—आणि (हें वाचका श्रोत्या ) ! तूं पर्वतास पाहून विचार करतोस कीं ते [आपल्या जागीं] जमून गेले आहेत [व हलू शकत नाहींत ]. पण [पुनरुत्थानाचे दिवशीं] हे ( पर्वत ) ढग चालतात तसें चालूं लागतील. हीहि परमेश्वराची कारागिरी (होय), कीं ज्यानें प्रत्येक वस्तु खूप भक्कम बनविली आहे. निःसंशय जें कांहींहि तुम्ही ( लोक ) करितां त्याशीं तो खूप वाकब होय. —सू. न्न. अ. २७ आ. ८८

**समीक्षक**—वादळाप्रमाणें डोंगर चालतात हा देखावा फक्त कुराणकर्त्याच्या देशांतच कदाचित् दृग्गोचर होत असेल अन्यत्र नाहीं. सैतानाच्या पुढाऱ्याला पकडणें अगर त्याला शिक्षा करणें हें क्षुद्र काम त्याला अद्याप करता येत नाहीं. खुदाच्या सामर्थ्याचा, दक्षतेचा व निष्काळजीपणाचा हाच जबरदस्त पुरावा काय ?

स. प्र. ९५.

१२१—म्हणून 'मूसा' नें त्या (च्या शत्रू ) स ठोसा मारला व ( तेथेंच ) त्याचें काम पुरें करून टाकिलें. (आणि 'मूसा' नें त्यावेळीं ) प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या ! (हा तर) मी आपल्यावर (मोठाच) जुलूम केला; तर तूं माझा अपराध क्षमा कर. सारांश परमेश्वरानें त्याचा अपराध क्षमा केला. ( आणि ) तो ( फारच ) क्षमाकर्ता [व] दयाळू होय. अणि [हे पैगंबरा !] तुझा पालनकर्ता जसें इच्छितो तसे लोक पैदा करतो व (त्यांच्यां-तून ज्याला इच्छितो त्याला ) निवडून घेतो. —सूरतुल्-कसस् अ. २८. आ. १५, १६, ६८

समीक्षक—आतां ख्रिस्ती व मुसलमानाचा देव बाप व त्याचे पैगंबर यांची दुसरी गोष्ट पहा. मशिहा पैगंबर मनुष्याची हत्या करतो व ईश्वर त्याला क्षमा करतो यावरून हे सर्व किती अन्यायी आहेत तें पहा. केवळ आपल्या इच्छेनें जसें वाटेल त्याप्रमाणें उत्पत्ति करतो काय ? त्यानें आपल्या लहरीप्रमाणें एकाला राजा, दुसऱ्याला कंगाल. तिसऱ्याला विद्वान्, इतरांना मूर्ख वगैरे निर्माण केलें आहे काय ? जर हें खरें असेल तर तें कुराण सत्य नव्हे व तो खुदाहि न्यायी नव्हे.

१२२—आणि आम्हीं माणसाला आपल्या आईबापाशीं चांगलें वर्तन करण्याची आज्ञा केली. आणि (हेंहि समजावून दिलें कीं ) जर आईबाप तुझ्यामागें ह्यासाठीं झटतील कीं तूं अशा एखाद्याला माझा जोडीदार मानावास कीं, ज्या (च्या ईश्वरी जोडीदार होण्या ) चें तुजपाशीं कोणतेंहि ज्ञान ( युक्त प्रमाण ) च नाहीं; तर ( या गोष्टींत ) तं त्यांच्या कह्या मानूं नकोस. तुम्हां [सर्वां] स मजकडे परतून येणें आहे; आणि आम्हीं 'नूहा' ला त्याच्या लोकांकडे (पैगंबर करून ) पाठविलें; तर तो पन्नास वर्षे कमी हजार वर्षे त्या (लोकां) त राहिला;

—सूरतुल्-अन्कबूत अ. २९ आ. ८-१४

समीक्षक—मातापित्याची सेवा करणें हें उत्तम आहे. त्याचप्रमाणें त्यांना प्रति ईश्वर न समजणें हेंहि यथायोग्य आहे पण आईबापांनीं जर मिथ्याभाषणादि करण्याची आज्ञा दिली तर ती मानली पाहिजे कीं काय ? याकरितां ह्या वचनाचा पूर्वार्ध योग्य असून उत्तरार्ध अनुचित आहे. नूह वगैरे पैगम्बरांना ईश्वर जगतांत पाठवतो तर मग इतर मनुष्यादिकांस कोण पाठवितो ? जर सर्वांनाच तो पाठवितो तर सगळेच पैगम्बर कां होत नाहींत ? पूर्वीच्या मनुष्यांची आयुष्यमर्यादा हजार वर्षांची होती मग सांप्रत कां नाहीं ?

१२३—परमेश्वरच सृष्टीस प्रथम निर्माण करतो व नंतरहि तोच ( याच तऱ्हेची ) सृष्टी वारवार * निर्मित राहातो; नंतर तुम्हीं (सर्व लोक) त्याच्याकडे पालटून नेले जाल. आणि ज्यादिवशीं (पुनरुत्थानाची] घटका कायम होईल त्यादिवशीं पापी लोक निराश होऊन जातील. मग ज्यांनीं विश्वास धरिला व चांगली कामेंहि केलीं, ते तर [स्वर्गाच्या] बागेंत असतील व आनंदी आनंद पावत असतील. आणि जर आम्ही (असा ) वारा चालवूं व हे लोक शेत पिवळें [ पडलेलें ] पाहातील, जे लोक समज बाळगीत नाहींत त्यांच्या मनांवर परमेश्वर अशाच तऱ्हेनें मोहर लावून टाकित असतो. —सूरतु-रूम अ. ३० आ. ११, १२,१५, ५१, ४९

समीक्षकः—ईश्वर सृष्टीची दोनदा उत्पत्ति करतो तिसऱ्यांदा नाहीं तर उत्पत्तीच्या पूर्वी व दुसऱ्या खेपेच्या शेवटीं तो स्वस्थ हात पाय जोडून बसत असेल ! व एकदोनदा उत्पत्ति केल्यावर त्याचें सामर्थ्य कमजोर बनून व्यर्थ जात असेल ! न्यायदिनीं पापी लोक निराश होतील हें योग्यच आहे. पण मुसलमानेतर जन म्हणजे पापी व तेच निराश पावतील, असा याचा अर्थ तर नव्हेना ? कारण कुराणामध्यें गैरइस्लामीयांनाच पापी म्हटलेलें आहे. जर बगी-च्यामध्यें ठेवणें, शृंगार घालणें इत्यादि गोष्टी मुसलमानी स्वर्गांत आहेत तर तो स्वर्ग पृथ्वीप्रमाणेंच आहे म्हणावयाचा व मग तेथें माळी, सोनार हेहि लोक असतील; कां खुदाच माळी सोनारादिकांचीं कामें करतो ? ज्यांच्या वांट्यास कमी दागदागिने येत असतील ते श्रीमंतांची चोरी करीत असतील; मग खुदा त्यांना नरकांतहि टाकीत असेल ! असें अस-ल्यास सर्वकालचा मोक्ष मुसलमानांना प्राप्त होईल हें जें कुराणवचन आहे ते खोटें बनेल. शेतकऱ्याच्या शेतीवरहि खुदाची दृष्टि आहे व ज्या अर्थी शेतकीचीं कामें खुदाला माहित आहेत तेव्हां तो शेतकरी असावा. बरें, त्याला सर्व विद्या

* हिंदी आयातांत 'बारंवार' या ठिकाणीं 'फिर दुसरीवार' 'नंतर दुसऱ्यावेळीं' असे शब्द आहेत.

ज्ञात आहेत असें जरी घटकाभर आपण मानलें तरी असल्या प्रकारची भीति घालणें म्हणजे शुद्ध घमेंड मिरवणें होय. ज्याप्रमाणें सैन्यानें प्राप्त केलेल्या जयपराजयाची जबाबदारी सेनापतीवर असते त्याप्रमाणें ज्यांच्या अंतःकरणावर खुदानें मोहर ठोकून त्यांना पापी बनविले त्या सर्व पापांची जबाबदारी खुदावर आहे पापी लोकांवर नाहीं.

१२४—हीं ( त्याच ) पुस्तका ( म्हणजे कुराणा) चीं महावाक्यें होत कीं ज्यांत बुद्धि (व शहाणपणा) च्या गोष्टी आहेत. त्यानेंच आकाशाला (जसें) तुम्हीं (लोक) पाहातां ( तसें ) स्तंभाविणा बनवून उभें केलें आहे आणि (त्यानेंच) पृथ्वींत (भारी अचल पर्वताचे ) नांगर टाकले आहेत कीं ती ( कोठें ) तुम्हांसह ( एकीकडे ) कलून पडूं नये. कां तूं या ( गोष्टीवर ) नजर केली नाहींस कीं परमेश्वरच रात्रीं ( च्या एका भागा) स दिवसांत दाखल करतो, आणि तोच दिवसाला रात्रींत दाखल करतो, कां तूं ( या गोष्टीचें ) अवलोकन केलें नाहींस कीं परमेश्वराच्याच कृपेनें गलबत समुद्रांत चालतें; कीं आपल्या ( परम सामर्थ्याच्या ) कित्येक निशाण्या तुम्हां लोकांस दाखवाव्या.

—सूरत्-लुक्मान् अ. ३१ आ. २, १०, २९, ३१

**समीक्षकः**—वाहवा ! किती विद्वत्ताप्रदर्शक हें धर्मपुस्तक ! आकाशाची उत्पत्ति कशी विद्वत्ताप्रचूर ! खांबावर तें स्थित असावें ही किती अजब शंका ! पृथ्वी स्थिर राहाण्यास पर्वतांची रचना आहे असें सांगणारें किती तें कुशलत्व ! ज्याला थोडी बहुत विद्या आहे तो देखील असले लेख लिहिणार नाहीं व असल्या गोष्टी मानणार नाहीं. आणखी विशेष मौजेचा शोध म्हणजे दिवस असेल तेव्हां रात्र नसेल व रात्र असल्यास दिवस नसेल. ह्या दोन स्थितीचा प्रवेश एकमेकींत करण्याबद्दल लिहिलें आहे. ह्यापेक्षां कुराणाचें अगाध ज्ञान तें कोणतें ? मनुष्य व क्रिया-कौशल्याच्या सहाय्यानें नौका चालतात कां ईश्वराच्या कृपेनें ? लोखंडाच्या व पाषाणाच्या नौका करुन त्या समुद्रांत आपोआप चालविल्या म्हणजे तत्काळ खुदाचें कौशल्य दिसून येईल. असल्या गोष्टीच कुराणाच्या कर्त्याची विद्वत्ता सांगण्यास पुरेशा आहेत.

१२५—आकाशापासून ( तों ) पृथ्वीपर्यंत तोच ( प्रत्येक ) कामाची व्यवस्था लावतो ; मग तुम्हां लोकांच्या ( इहलौकिक ) गणनेच्या ( अनुरोधानें ) हजार वर्षांच्या मुदतीचा एक दिवस होईल, हाच ( तर परमेश्वर अदृष्ट व दृष्ट्या सर्व ) गोष्टींचा ज्ञाता, परसमर्थ ( व ) दयाळू ( असा होय. ) ; व मग त्यानें त्या ( च्या पुतळ्या ) स दुरुस्त बनविलें व त्यांत आपल्या आत्म्यांतून फुंकिलें; सांग कीं; मृत्यूचा दूत ज्याला तुम्हांवर नमलेलें आहे तोच तुमचे प्राण हरण करतो आणि जर आम्हीं इच्छितों तर प्रत्येक मनुष्याला सुबुद्धि देतो; परंतु गोष्ट सिद्ध होऊनच राहिली कीं ' जिन्न ' दैवत व मनुष्यें या सर्वांनीहि मी ' जहन्नम ' —नरकाग्नि-भरून टाकीन.

—सूरत्-स्सिज्दा अ. ३२ आ.५, ६, ९, ११, १३

**समीक्षकः**—मुसलमानांचा खुदा मनुष्यवत् एकदेशी आहे याची आतां वाचकांना खात्री होईल. सर्वव्यापक असतां तर एकाद्या विशिष्ट स्थलाहून तो सर्व व्यवस्था कां पाहाता व चढणें, उतरणें ह्या क्रिया ईश्वराच्या नव्हेत. जरी त्यानें जगांत दूत पाठविले तरी त्याच्या सर्वज्ञतेला व सर्वव्यापकत्वाला बाघ आलाच. आपण आकाशींच लोंबकळत राहिला आहे व दूतांना इहलोकीं पाठवीत आहे ! दूतांनीं लांचलूचपत घेऊन एखादें काम बिघडविलें किंवा एकाद्या मुड्याला सोडून दिले तरी त्याचा तपास खुदाला कसा लागावा ? तपास तर जो सर्वज्ञ व सर्वव्यापक आहे त्यालाच लागेल. खुदा सर्वज्ञ व सर्वव्यापक असता तर मग दूत पाठविण्याची य खऱ्या खोट्याच्या संशोधनार्थ दूताच्या साक्षी पुराव्यांची त्याला जरूर काय ? एक हजार वर्षांमध्यें येणें जाणें वगैरेंची व्यवस्था करावी लागत असल्यामुळें सर्वशक्ति—मानहि तो नाहीं. जर मृत्यूचा स्वामी यम आहे तर यमाला मारणारा कोणता मृत्यु आहे ? जर तो नित्य आहे तर अमरपणाच्या दृष्टीनें तो ईश्वरतुल्य बनला. एक दूत एकाच वेळीं नरककुंड भरण्यासाठीं जीवांना दंड देऊं शकत नाहीं व त्यांना पापाशिवाय आपल्या मर्जीनें नरकांत लोटून त्यांचीं दुःखें पाहून खूष होतो तर वास्तविक दूतांच्या ह्या कृतीचा जबाबदार खुदा असल्याकारणानें तोच अन्यायी व निर्दयी होत आहे. अशा गोष्टी ज्या पुस्तकांत आहेत तें अन्यायी व निर्दयी मनुष्यकृत होय ईश्वरकृत नव्हे.

१२६—सांग कीं, जर तुम्हीं मृत्यु किंवा मारले जाण्या ( च्या भीती ) नें पळून जातां, तर ( हें पळून जाणें तुम्हांस केव्हांच ( कांहींहि ) फायदा देणार नाहीं. आहो पैगंबराच्या पत्न्यांनों ! तुमच्यांतून जी कोणी एखादी उघड उघड गैरशिस्त वर्तणूक करील तिला दुहेरी शिक्षा दिली जाईल. आणि परमेश्वरासमीप ही ( एक ) सोपीशी ( गोष्ट ) होय. —सूरतुल्-अहूजाद अ. ३३ आ. १६,३०

**समीक्षकः**—लडाईचेवेळीं कोणी पळून जाऊं नये व आपला विजय व्हावा, मृत्यूला कोणी भिऊं नये म्हणून हें महंमदसाहेबांनीं लिहून ठेवलें असावें. स्वतःचें ऐश्वर्य वाढावें आपल्या मताचा प्रसार व्हावा. स्त्रिया जर निर्लज्ज बनून आल्या नाहींत तर मग पैगम्बर साहेबांनीं निर्लज्ज बनून यावें काय ? स्त्रियांवर मात्र अंमल चालावा पैगम्बर साहेबावर मात्र तो चालूं नये हा न्याय कोठला ?

१२७—आणि आपल्या घरांत जमून [ बसलेल्या ] राहा. जों कोणी परमेश्वर व त्याचा पैगंबर यांचा आज्ञाभंग करील, तर तो खचित धडधडीत चुकींत पडून बहकला. मग जेव्हां ' जैद ' नें तिजकडून [ आपला ] हितसंबंध सोडून दिला [ म्हणजे तिला काडी मोडून दिली ] तेव्हां आम्हीं तुझ्याशीं तिचा विवाह लावून दिला; कीं जेणें करुन [ सर्व ] मुसलमानांचे दत्तक जेव्हां आपल्या स्त्रियाकडून हितसंबंध सोडून देतील तेव्हां मुसलमानास त्यांच्या [ सोडलेल्या ] स्त्रियां [ शीं लग्न करून घेण्यां ] त [ कोण्याहि तऱ्हेची ] अडचण राहूं नये. आणि परमेश्वराचा हुकूम तर पुरा होऊनच राहातो. परमेश्वरानें पैगम्बरासाठीं जी गोष्ट ठरवून दिली असेल ती [करण्यां] त पैगम्बरास कांहीं हरकत नाहीं. 'मोहंमद' तुमच्या पुरुषांतून कोणाचाहि बाप नाहीं; आणि कोणतीहि मुसलमान स्त्री जर ती आपल्या जिवाला पैगम्बरास अर्पण करुन टाकील. [ म्हणजे स्त्रीधनावाचून विवाहसंबंधांत येऊं इच्छिल, ] तर [ ही गोष्ट ] खास तुझ्यासाठींच होय. तूं आपल्या स्त्रियांतून जिला इच्छिशील [ व तिला आपल्यापासून ] अलग राखावेंस आणि जिला इच्छिशील [ तिला ] तूं आपल्याजवळ राखावेंस; तर [यांतहि ] तुजवर कांहीं पाप नाहीं. आहो मुसलमानांनों ! पैगम्बराच्या घरांत शिरत जाऊं नका. —सू. अ. अ. ३३ आ. ३३,३६,३७,३८,४०,५०,५१,५३

**समीक्षकः**—स्त्रीयांना घरामध्यें कैद्याप्रमाणें डांबून पुरुषांना मात्र पूर्ण स्वातंत्र्य ही गोष्ट किती अन्यायाची आहे बरें ? शुद्ध हवा शुद्ध प्रदेशामध्यें सहल करणें वगैरेंची उत्कंठा स्त्रियांच्या मनामध्यें कधीं उद्भूत होत नसेल काय ? या विषमतेमुळेंच मुसलमानांचीं मुलें दंगेखोर व विषयी होतात अल्ला व त्याचा पैगम्बर यांच्या आज्ञा परस्पर विसंगत आहेत कां सुसंगत ! जर सुसंगत असतील तर दोघांच्याहि पालन केल्या पाहिजेत हें उघड असतां त्या पालन केल्याच पाहिजेत हें सांगण्याची जरुर काय ? जर परस्परविरुद्ध असतील तर ह्यांतील एखादी सत्य व एखादी असत्य असली आहिजे. मग एक खुदा व दुसरा सैतान बनेल. तथापि तोहि ईश्वरतुल्य ठरेल. खुदा, पैगम्बर व कुराण यांची धन्य असो ! दुसऱ्यांचें अनहित करून स्वार्थ साधण्याची कला यांना खूप साधली आहे म्हणावयाची. महंमदसाहेब मोठे विषयी होते; तसे नसते तर सूनेला आपली अर्धांगी बनविण्यास त्यांनीं कशी आज्ञा दिली असती ? अशा गोष्टी करणारा खुदा पक्षपाती व अन्यायाचा न्याय ठरविणाराहि बनला. मानवसमाजातील जंगली मनुष्य असेल तर तो देखील पुत्राच्या पत्नीला आपली बायको करून घेत नाहीं. अशीच दुसरी अन्यायाची गोष्ट म्हणजे त्यानें नबीला विषयासक्तीचे बाबतींत कसलाच प्रतिबंध ठेवलेला नाहीं ? जर नबी कोणाचा बाप नव्हता तर जैद हा ( लेपालक ) दत्तक मुलगा कोणाचा होता ? आणि असें कां लिहिलें ? यांत केवळ मतलब एवढाच आहे कीं, कसेंतरी सूनेला घरधनीन बनवावें. सूनेला सोडलें नाहीं मग इतरांची कथा काय ! इतकी दक्षता घेतली तरी निंद्य प्रकार आदरार्ह ठरत नाहीं. एखाद्या अन्य स्त्रीनेंहि नबीवर खूष होऊन निका लावण्याची इच्छा बाळगली तर तीहि योग्य ठरेल काय ? आणखी नबीला वाटेल तेव्हां तो स्त्रीचा त्याग करूं शकेल पण महंमदसाहेबांचा स्त्रीपरिवार मात्र पैगम्बर दोषी असतील तरी त्यांना सोडूं शकत नाहीं. ही मोठ्या अधर्माची गोष्ट आहे ! पैगम्बराच्या घरांत ज्याप्रमाणें कामवासनेनें प्रेरित होऊन कोणी प्रवेश करतां कामा नये त्याप्रमाणें पैगम्बरानाहि कोणाच्याहि घरांत प्रवेश करणें युक्त नव्हे. नबीनें मात्र वाटेल त्यांच्या घरांत प्रवेश करावा व माननीय बनावें. ज्याचा

ताळयावर नसेल तोच कुराण ईश्वरप्रणीत मानील, महंमदसाहेबांना पैगम्बर समजेल व कुराणोक्त खुदाला परमेश्वर मानील.

१२८—आणि तुम्हांस हें शोभत नाहीं कीं तुम्हीं परमेश्वराच्या पैगम्बरास इजा द्यावी; आणि हेंहि (शोभत) नाहीं कीं, त्याच्यामागून कधींहि तुम्हीं त्याच्या स्त्रियांशीं विवाह करावा. परमेश्वरासमीप ही मोठी (गैर) गोष्ट होय. जे लोक परमेश्वर व त्याचा पैगम्बर यांस (कोण्याहि तऱ्हेची) इजा देतात त्यांच्यावर इहलोक व परलोक या ( दोहों ) त परमेश्वराचा शाप होय; आणि जे लोक मुसलमान पुरुष व मुसलमान स्त्रिया यांस त्यांनीं कांहीं कसूर केल्यावाचून (उगीच तोहमत लाऊन) इजा देतात, तर तें (खोटें) तुफ़ान व धडधडीत पाप यांचें ओझें (आपल्या मानेवर) लादून घेतात. ( मग ) त्यांची ही दशा होईल कीं, ( चोहोंकडून ) धुतकारलेले, जेथें मिळाले तेथें पकडले व मारून त्यांचे तुकडे तुकडे उडवून दिले. तर हे आमच्या पालनकर्त्या ! त्यांना दुप्पट शिक्षा दे आणि त्यांना (मोठ्यांन) मोठा शाप दे.

—सू.-अ. अ. ३३ आ. ५३, ५७, ५८, ६१, ६८

**समीक्षक**:—वाहवा; काय पण ईश्वर आपलें ईश्वरत्व धर्माच्या सहाय्यानें प्रकट करतो आहे. पैगंबराला कोणी दुःख देऊ नये हें खुदाचें सांगणें योग्य आहे पण इतरांनाहि पैगंबरानें दुःख देतां कामा नये हेंहि त्याबरोबरच खुदानें सांगावयास नको होतें काय ? कोणी दुःख देण्याचा प्रयत्न केल्यास अल्ला दुःखी होत असेल तर तो ईश्वर नव्हे. फक्त स्वतःला व पैगंबराला दुःख देणाऱ्यांचा निषेध करणें म्हणजे आम्हीं मात्र सर्वांना वाटेल तसें वागवूं, दुःख देऊं, त्याला कांहीं हरकत नाहीं असाच याचा अर्थ नव्हे काय ? 'आत्मवत् सर्व भूतेषु' या सिद्धांताप्रमाणें सर्वांशीं वागणें हेंच खुदा व पैगंबर यांचें कर्तव्य नव्हे काय ? मुसलमान स्त्रियांना दुःख देणें हें जितकें वाईट तितकेंच मुसलमानेतर स्त्रियांनाहि दुःख देणें हें वाईट आहे; असें नसल्यास तो पक्षपात झाला. संपूर्ण जगतांत हाहाःकार माजविणारे खुदा व नबी हे जसे आहेत तसे अन्य फारच थोडे लोक निर्दयी असतील. जेथें जेथें ते गैरईस्लाम लोक सांपडतील तेथें तेथें ते पकडावेत, मारावेत अशी आज्ञा हा खुदा देतो आहे. पण हाच न्याय जे मुसलमानेतर जन आहेत त्यांनी मुसलमानांना लागू केला तर मग कशी स्थिति होईल ? पैगम्बरादिकांची हिंसकता बघा. आपणापेक्षां इतरांना दुप्पट दुःखे दे अशी ते ईश्वराची प्रार्थना करीत आहेत यावरून त्याची पक्षपातता, मतलबसिंधुता, अधार्मिकता व्यक्त होत आहे म्हणूनच अद्यापिहि मुसलमान लोकांत बहुतेक शठ लोकांचाच भरणा जगास पहावयास सांपडतो. ज्ञानशून्य मनुष्य पशूकोटींतला असतो असें जें म्हणतात ते ठीक आहे.

१२९—आणि परमेश्वरच असा ( परम समर्थ ) होय कीं तो वारा चालवितो व वारा ढगांस उभारतो. मग ढगांस आम्ही अशा शहराकडे हांकून लावतों कीं, जें ( पाण्याच्या अभावामुळें ) ( मृत म्हणजे पडीत पडलेलें ) आहे. मग आम्ही पावसाद्वारें जमिनीस तिच्या मृत झाल्या पश्चात सजीव ( व टवटवीत ) करून टाकितों. अशाच प्रकारें (लोकांचेंहि पुनरुत्थानांत जिवंत ) उठणें होईल. कीं त्यानें आम्हांस आपल्या कृपेनें राहाण्याच्या ( अशा ) घरांत आणून उतरलें कीं येथें आम्हांला ( कोण्या तऱ्हेचे ) श्रम पोंहचत नाहींत व येथें आम्हांस ( कोण्यातऱ्हेचा ) थकवा लागत नाहीं.

—सूरतु–फातिर अ. ३५ आ. ९, ३५

**समीक्षक**:—खुदाची फिलासफि मोठी अजब आहे. वायूला पाठवितो व वायू वादळांना उत्पन्न करून त्यांना विखुरतो आणि वाऱ्यानें मुडदे जीवंत करून त्यांना चालवितो. ह्या ईश्वरीय गोष्टी होऊं शकतील काय ? ईश्वराची कामें सर्वकाळ एकसारखीच असतात. घरें बनविल्याशिवाय होत नाहींत. जें बनावट असतें तें सदैव राहूं शकत नाहीं. ज्याला शरीर असतें तें परिश्रमावांचून दुःखी बनतें व शरीरधारी रोगग्रस्त असा केव्हांतरी बनलाच पाहिजे. स्त्रीसमागमानें शरीर निरोगी कसें राहील ? मग अनेक स्त्रियांशीं विषयभोग केल्यानें त्या शरीराची किती दुर्दशा होत असेल बरें ? या दृष्टीनें मुसलमानांचें स्वर्गीय वास्तव्य हें देखील दुःखमूलकच होय.

१३०—कुराण ज्यांत (सर्वस्वी) शहाणपणाच्या गोष्टी होत त्याची शपथ, कीं (हे 'मोहंमद'!) कांहींच संशय नाहीं कीं (इतर) पैगंबरांपैकींच तूंहि (पैगंबर) आहेस. (आणि धर्माच्या) सरळ मार्गावर आहेस (हें कुराण) सामर्थ्यवान् (व ) दयाळू (परमेश्वरा) नें प्रकटिलें आहे.

—सूरतु यासीन अ. ३६ आ. २ ते ५

**समीक्षक**:—कुराण ईश्वरलिखित असतें तर तो कुराणाची शपथ कां वहाता ? नबी ईश्वरानें पाठविला असता तर तो सूनेवर मोहित झाला असता काय ? कुराणाचे अनुयायीच काय ते सन्मार्गावर आहेत असें म्हणणें शुद्ध बालिशपणाचें आहे; कारण सन्मार्गामध्यें सत्य मानणें; बोलणें; करणें, निःपक्ष असणें, न्यायाचरण करणें वगैरेंचा समावेश होतो. याचें उलट वागणें हाच तर कुराणचा उपदेश, मुसलमानांचा व्यवहार व खुदाचा स्वभाव आहे ! महंमद पैगंबरसाहेब या बाबतींत सर्वोत्तम असते तर ते सर्वांहून अधिक विद्वान् व शुभगुणयुक्त झाले नसते काय ? एखादी आई ज्याप्रमाणें आपल्या मुलाला वाईट म्हणत नाही त्याप्रमाणें ही गोष्ट आहे.

१३१—आणि (मग दुसऱ्यांदा) कर्णा फुंकला जाईल, तेव्हां एकदम (सारेचेसारेच) थडग्यांतून (निघून निघून) आपल्या पालनकर्त्याकडेच चालूं लागतील. व यांचे पायहि साक्ष देतील. त्याचें काम तर असें आहे कीं जेव्हां तो कोण्याहि वस्तूचा संकल्प करितो तेव्हां तो तिला केवळ (एवढेंच) सांगतो कीं हो, व ती होऊन जाते.

—सू.-या. अ. ३६ आ. ५१, ६५, ८२

**समीक्षक**:—आतां ह्या ऊटपटांग गोष्टी ऐका; पाय कधीं साक्ष देऊं शकतात काय ? खुदाशिवाय त्यावेळेस जवळ दुसरे कोण होते कीं त्याला त्यानें आज्ञा दिली ? व कोणी ऐकलें ? व काय बनलें ? जर अन्य काहीं नव्हतें तर हें खोटें ठरलें व जर होतें तर खुदाशिवाय दुसरें कांहींच नव्हतें व खुदानेंच सर्व कांहीं बनविलें हें असत्य होय.

१३२—यांच्यांत स्वच्छ मद्याचा पेला ( चौफेर ) फिरविला जात असेल ( तें मद्य ) पांढरें शुभ्र ( असून ) पिणारांस ( फार ) रुचि देईल. आणि यांच्यापाशीं खालीं नजर राखणाऱ्या मोठमोठ्या डोळयांच्या ( अप्सरा ) असतील. कीं जणूं त्या, ( शहामृगाचीं ) अंडी होत कीं तीं (सांभाळून) पडद्यांत ठेवलेलीं होत. आतां पुढें आम्हांला मरावयाचें नाहीं आणि कांहीं संशय नाहीं 'लूत' हा अर्थात् पैगम्बरापैकींच होय; कीं आम्हीं 'लूत' ला व त्याच्या (सर्व) कुटुंबाला (शिक्षेंतून) वांचवून घेतलें. पण ( त्याची ) म्हातारी (बायको कीं ती) मागें राहाणाऱ्यांत [राहून गेली होती]. मग [त्याच्या निघून गेल्यानंतर] आम्ही दुसऱ्यांच्या विध्वंस करून टाकिला.

—सूरतु-स्साफ्फात अ. ३७ आ. ४५, ४६, ४७, ४८, ४९, १३३ ते १३६

**समीक्षक**:—काय हो महाराज ! येथील मुसलमान लोक दारूला त्याज्य समजतात परंतु इस्लामी स्वर्गांत तर दारूच्या नद्याच नद्या वहात आहेत असें आपला खुदा सांगतो. स्वर्गांत कांहीं असो; पण या भूलोकीं तरी मुसलमानांना मद्यपान निषिद्ध होय अशी आज्ञा दिली हें ठीक केलें मग भूलोकाऐवजी स्वर्ग आणखी कां खराब असेना ! स्त्रियांच्या वास्तव्यानें स्वर्गांत कोणाचेंहि चित्त स्थिर राहत नसेल नाहीं ? व त्यापासून स्वर्ग मोठमोठ्या रोगाचे माहेर घर बनत असेल ? तेथें शरीरधारी लोक असतील तर ते मरतहि असतील व शरीरधारी नसतील तर मग सुंदर स्त्रिया कोणासाठीं व भोगविलास तरी कसले ? अशा स्थितींत स्वर्गवास व्यर्थच म्हणावयाचा. जर लूत हा पैगम्बर असेल तर बायबलामध्यें वर्णिलें आहे कीं त्यानें स्वकन्यांशीं समागम करून दोन मुलें उत्पन्न केलीं हें वर्णनहि तुम्ही सत्य मानतां कीं नाहीं ? जर सत्य म्हणत असाल तर अशाला पैगम्बर मानणें व्यर्थ होय आणि अशा लोकांनाहि खुदा मुक्ति देत असेल तर तो खुदाहि तसलाच असावा. म्हाताऱ्यांच्या गोष्टी सांगणारा व पक्षपात धरून दुसऱ्यांना मारणारा खुदा कदापि ईश्वर होऊं शकत नाहीं. असला खुदा मुसलमानांचींच घरें शोभिवंत करो.

१३३—सर्वकाल राहाण्याचा (स्वर्गाच्या) बागा कीं ज्यांचीं दारें त्यांच्यासाठीं [पहिल्यानेंच] उघडलेलीं असतील (आणि ते) त्यांत तक्ये लावून लावून बसतील; तेथे पुष्कळ मेवे व पेये मागवितील. आणि त्यांच्यापाशीं खालीं नजर राखणाऱ्या (पत्न्या) असतील, (व त्यांत मौज ही कीं त्या, त्यांच्या) समवयाच्याहि (असतील). तात्पर्य एकूणएक सर्वच दूतांनीं साष्टांग नमस्कार घातला. पण (एक) 'इब्लीस' (मात्र नमला नाहीं); कीं तो अभिमानांत येऊन गेला व नास्तिकांपैकीं होऊन बसला. परमेश्वरानें (' इब्लीस ' ला) पुसलें कीं हे ' इब्लीसा ' ! ज्या वस्तूला मी आपल्या हातांनीं बनविलें त्या (वस्तू ) स साष्टांग नमस्कार घालण्यापासून तुला कोणत्या वस्तूनें प्रतिबन्ध केला ? काय तू शेखींत येऊन गेलास अगर तूं (खरोखरीच) बड्या लोकांपैकीं आहेस ? तो म्हणाला मी त्याच्यापेक्षां फारच श्रेष्ठ आहे, मला

तू अग्नीतून बनविलेंस व त्याला तूं मातींतून बनविलेंस (परमेश्वरानें] सांगितलें तूं येथून निघ [ बाहेर हो ]; कीं, तूं घोंडमार करून करून पिटाळला जाशील आणि [शेवटच्या ] निर्णयाच्या दिवसापर्यंत तुझ्यावर माझा शाप [ पडत राहिल ]. ( तो ) बोलला, माझ्या पालनकर्त्या ! [सर्व लोक पुन्हां] उठवून उभे केले जातील त्या दिवसापर्यंत, मला तूं अवसर दे. [ परमेश्वरानें ] म्हटलें, (होय,) तुला त्या दिवसापावेतों अवसर आहे; कीं ज्याचा वेळ [ मलाच ] माहीत आहे. [तो ] म्हणाला, तर [मलाहि] तुझ्याच प्रतापाची शपथ आहे कीं या [ मानवां ] त जे तुझे निःसीम भक्त होत त्यांना सोडून या समस्त लोकांस मी बहकवून सोडीन तरच सई.

—सूरतु–सॉद अ. ३८ आ. ५० ते ५२, ७३ ते ८३

समीक्षकः—कुराणांत वर्णन केल्याप्रमाणें बागबगीचे, नद्या व इमारती खरोखरच असतील तर ह्या सर्वांचा नाश केव्हांतरी होईलच कारण जे पदार्थ संयोगमूलक आहेत ते संयोगापूर्वी अस्तित्वांत नव्हते अर्थात् ज्यांना आरंभ त्यांना शेवट या न्यायानें ते सर्व नाश पावतील. अशा रीतीनें स्वर्गच नामशेष बनल्यावर स्वर्गस्थ लोक तरी शिल्लक कोठें राहिले ? स्वर्गांत गादी, तक्के, मेवे, पेयें वगैरेंची रेलचेल आहे असें कुराण म्हणतें. असें म्हणण्याचें कारण एवढेंच कीं, अरबस्थानवासी जन निर्धन होते हे श्रीमंती चोचले त्यांना उपभोगण्यास कठीण होते म्हणून यांची लालूच दाखवून स्वमतांत त्यांना फसवून टाकलें आहे, जेथें स्त्रिया आहेत तेथें निरंतर सौख्य कसें वास करील ? आणि त्या स्त्रिया तेथें कोठून आल्या ? त्या प्रारंभापासून स्वर्गवासी आहेत काय ? नसतील तर त्या पुनः केव्हांतरी स्वस्थानीं जाणारच. त्या स्वर्गांतीलच असतील तर न्यायादिनापूर्वी त्या काय करीत होत्या ? केवळ मौजेनें तर त्यांनीं आपल्या आयुष्याचा व्यय केला नाहीं ना ! आतां आणखी गंमत आहे ती पहा. खुदाच्या तेजस्वीतेला दिपून सर्व दूतांनीं त्याला वंदन केलें व आदमलाहि सर्वांनीं नमस्कार केला परंतु सैतान मात्र तसाच निर्भयपणें उभा राहिला तेव्हां 'सैताना ! तूं गर्व बाळगूं नको कारण मी तुला माझ्या दोन्हीं हातांनीं निर्माण केलें आहे.' असें खुदा रागावून सैतानाला म्हणाला, यावरून पुष्कळ गोष्टी सिद्ध होतात पण शिवाय हेंहि कळून येतें कीं खुदाला दोन हात आहेत. असा दोन हाताचा मनुष्य म्हणे सर्वव्यापक व सर्वशक्तिमान असा जगन्नियंता परमेश्वर होता ! ' मी आदमहून श्रेष्ठ आहे,' असें सैतानानें ठीक उत्तर दिलें. या उत्तराचा खुदाला राग कां यावा ? आसमान हें खुदाचें घर आहे काय ? पृथ्वी नाहीं काय ? मग 'काबा' हें खुदाचें घर होय असें प्रथम कां सांगितलें ? ईश्वर स्वतःपासून व सृष्टीपासून अलग कसा राहूं शकतो ? ही सृष्टि परमेश्वराची आहे. स्वर्गाचा मक्तेदार कुराणाचा खुदा बनला आहे. खुदानें सैतानाचा धिःकार करून त्याला कैद केलें. मग सैतान म्हणाला, 'स्वामिन् मला न्यायदिनापर्यंत आपण कृपा करून मुक्त करा.' खुदानें त्याला मुक्त केलें. मुक्त होतांच सैतान खुदाला म्हणाला. 'मी आतां सर्व लोकांना भ्रष्ट करीन, ठिकठिकाणीं बंडे करीन,' खुदानें सांगितलें कीं, 'तूं असें करशील व जे तुझ्या उपदेशानें भ्रष्ट होतील' त्यांना व तुलाहि मी 'नरकांत टाकीन' ? सज्जनांनीं विचार करावा कीं सैतान हा स्वतःच पतित झाला किंवा त्याला पतित केला ? जर त्याला पतित केलें असेल तर पतित करणारा जो खुदा तोच महान् सैतान नव्हे काय ? सैतान स्वतःच पतित झाला असेल तर सर्व जीव स्वयंकृतीनेंच पतित बनतात त्याला सैतान पाहिजे कशाला ! सैतानाला मुक्त करून त्याला लोकांना भ्रष्ट करण्यास सोडलें म्हणजे सैतानाच्या ह्या निंद्य कामाचा वाटेकरी खुदाहि बनला. चोरी करण्यास चोराला उत्तेजन देऊन पुनः चौर्यकर्माबद्दल शिक्षा करणारा जो आहे त्याच्या अन्यायाला कांहीं पारावार आहे काय ?

१३४—परमेश्वर सर्व पापांची क्षमा करितो; तो निःसंशय (फारच) क्षमा (कर्ता) दयाळू होय. (ही) सारी पृथ्वी त्याचा एका मुठींत असेल आणि आकाश (हें पत्रांप्रमाणें) गुंडाळलेले त्याच्या उजव्या हातांत. आणि पृथ्वी आपल्या पालनकर्त्याच्या प्रकाशानें चकाकूं लागेल व (लोकाचें कर्माचें) पुस्तक (आणून समोर) ठेवलें जाईल, आणि पैगंबर व साक्षी हे हजर केले जातील; व लोकांचे दरम्यान (त्यांच्या मतभेदांचा) न्यायपुरःसर निवडा केला जाईल.

—सूरतु-ज्जुमर अ. ३९ आ. ५३, ६७, ६९

समीक्षकः—सर्व पापांची परमेश्वर क्षमा करीत असतां तर समग्र जग पापी बनविण्यास ईश्वरच जबाबदार बनला

असता व निष्ठुरहि बनला असता कारण दुष्टांवर दया करून त्याला क्षमा करणें म्हणजे त्याला अधिक दुष्टता करण्यास उत्तेजन देण्यासारखें व अनेक सज्जनांना त्यामुळें दुःखें देण्यासारखें अन्यायाचें कृत्य होय. परमेश्वर म्हणजे अग्निवत् प्रकाश आहे काय ? सर्वांच्या कर्मांची नोंदवुकें त्यानें कोठल्या रेकार्डांत सांठवून ठेवलीं आहेत ? व कोण कोण तीं लिहिण्याच्या कामावर नेमले आहेत ? पैगम्बरांच्या व साक्षीदारांच्या भरंवशावर खुदा न्याय करतो तर तो अल्पज्ञ व असमर्थ नव्हे काय ? जर तो अन्याय न करितां न्याय करतो तर प्रत्येकाच्या यथावत् कर्माप्रमाणें करीत असेल व तीं कामें पूर्वापर वर्तमान जन्मांचींच असणार मग क्षमा करणें, अंतःकरणावर मोहरा करणें. शिक्षा न करणें, सैतानाद्वारें भ्रष्ट करणें, इहलोकांतून परलोकांत परलोकाहून अन्य लोकलोकांतरांत भ्रमण करणें ( दौरासुपुर्द रखना ) ह्या सर्व गोष्टी म्हणजे केवळ मजेच्याच काय ?

१३५—(हा) लेखी फर्मान (अशा) परमेश्वराच्या हुजूरांतून सादर होत आहे (कीं जो) परम समर्थ (व सर्व) ज्ञानी (होय.) (तो) पापांचा क्षमाकर्ता व पश्चाताप स्वीकार्ता. सूरतुल्-मोमिन अ. ४० आ. २,३

**समीक्षक**—जे भोळेभाळे लोक असतील त्यांनीं कुराणावर विश्वास ठेवावा म्हणून ही थाप देण्यांत आली असावी. वास्तविक कुराणांत थोडासा सत्य भाग सोडल्यास बाकी असत्यानेंच तें भरलेलें आहे व थोडेसें सत्य आहे तेंहि असत्यांत वेमालूम मिश्र झाल्यामुळें टाकाऊ बनलें आहे. याकरितां कुराण, कुराणाचा खुदा व कुराणानुयायी पापवृद्धि करणारे व करविणारे होत. कारण पापांची क्षमा करणें हा अत्यंत अधर्म आहे परंतु ह्या कुराणवचनाप्रमाणें मुसलमान लोक निर्भयपणें पापें करण्यास व उपद्रव देण्यास मुळींच कचरत नाहीत.

१३६—त्यानंतर दोन दिवसांत त्यानें त्या (धुक्याच्या थरां) चीं सात आकाशें बनविलीं आणि प्रत्येक आकाशांत व्यवस्था त्यानें (दूतांस) सांगून दिली. येथपर्यंत कीं जेव्हां (सर्व) नरकावर येऊन गोळा होतील; तेव्हां त्यांचे कान व त्यांचे डोळे व त्यांच्या त्वचा त्यांच्या विरुद्ध ते जसजशीं कर्में करीत राहिले आहेत त्या (कर्मां) चीं साक्ष देतील. आणि हे लोक आपल्या त्वचांशीं पुसतील कीं (बरें,) तुम्ही आमच्या विरुद्ध कां म्हणून साक्ष दिली असेल ? ते उत्तर देतील कीं, ज्या परमेश्वरानें प्रत्येक वस्तूस वाचा फुटविली त्यानेंच आम्हांलाहि वाचा दिली; तोच ( परमेश्वर पुनरुत्थानांत ) मेलेल्यांचाहि सजीव कर्ता होय. —सुरतु–हामीम ( सिज्दः ) अ. ४१ आ. १२, २०, २१, ३९

**समीक्षक**:—शाबास, वाहवा, मुसलमानांनों ! तुम्ही आपल्या खुदाला सर्वशक्तिमान मानतां पण त्याला सात आकाशें निर्माण करण्यास दोन दिवस एकसारखे कावाडकष्ट करावे लागले तें कां ? ईश्वरानें कान, डोळे, क़ातडीं हीं सर्व जड निर्माण केलीं आहेत; तीं साक्ष देण्याचें काम कसें काय करतील ? साक्ष देणारीं तीं असतीं तर त्यांना त्यानें जड कां बनविलीं ? व आपल्या पूर्वापार नियमाविरुद्ध त्यानें हें कृत्य कसें केलें ? यापेक्षां आश्चर्यजनक मिथ्यावाद असा कीं, जेव्हां जीवाविषयीं साक्ष देतील तेव्हां 'तुम्ही आमच्याविषयीं साक्ष कां दिली ?' असें जीव आपापल्या कातड्यांना विचारूं लागतील; कातडें म्हणेल, 'खुदानें देवविली मी काय करूं' ? वाचकहो ! तर हें संभवनीय आहे काय ? एखाद्यानें म्हणावें कीं, आपण आज वंध्यापुत्रमुखदर्शन केलें त्यांतलाच हा प्रकार ! जर पुत्र आहे तर ती वंध्या कशी ? वंध्या असल्यास तिला पुत्र कसा झाला ? जसें वंध्यापुत्रत्व असंभवनीय तसें कातड्यानें साक्ष देणें असंभवनीय होय. जर प्रेतांना खुदा जिवंत करतो तर त्यांना प्रथम मारलेंच कां ? स्वतः खुदाच मृत होऊन कधींतरी पडतो काय ? जर नाहीं तर मृतावस्थेला तो वाईट कां समजतो ? व न्यायादिनापर्यंत मृतकजीव कोणत्या मुसलमानांच्या घरांत राहतात ? खुदानें विनाकारण जीवांच्या मागें 'पुनरपि जन्मं पुनरपि मरणम्' चें हें रहाटगाडगें (दौरासुपुर्द) कां लावलें ? त्यांचा शीघ्र न्याय कां केला नाहीं ? असलीं कृत्यें म्हणजे ईश्वराला काळिमा लावणारीं होत.

१३७—आकाश व पृथ्वीच्या (खजिन्यांच्या) किल्ल्या त्याच्याचपाशीं आहेत. तो ज्याची इच्छितो त्यांची अन्नसंपत्ति वाढवितो आणि (ज्याला इच्छितो त्याला) काटकसरीनें देतो. तो जें इच्छितो तें निर्माण करितो. ज्याला तो इच्छितो त्याला (निव्वळ) मुलींच देतो आणि ज्याला इच्छितो त्याला ( निव्वळ ) मुलगेच देतो. अथवा मुलगे व

मुळीं ( मिळून ) दोन्ही प्रकारची संतति तो त्यांस देतो. आणि ज्याला तो इच्छितो त्याला असा ( नामशेष ) करुन टाकितो कीं त्याला संतानच होत नाहीं. आणि कोणाहि मनुष्याची ताकद नाहीं कीं परमेश्वर त्याच्याशीं ( रुबरुं होऊन ) संभाषण करील; पण प्रकटीकरणाद्वारें अगर पडद्याच्यामागून ; अथवा तो कोणा दूतास ( त्याजपाशीं )पाठवितो.

—सूरतु–श्‍शूरा अ. ४२ आ. १२,४९ ते ५१

**समीक्षक**—खुदाजवळ किस्स्यांचीं घरेंचीं घरें भरलेलीं असतील कारण सर्व ठिकाणचीं कुलुपें त्याला उघडावी लागत असतील ! पापपुण्ये न करतांहि लहरीप्रमाणें वाटेल त्याला ऐश्वर्यसंपन्न बनविणें वाटेल त्याला त्रास देणें ही बालिशपणाची गोष्ट असून हा घोर अन्याय आहे. कुराणकर्त्याची चतुराई आतां कशी आहे ती पहा. तो काय वाटेल तें करुं शकतो मग दुसरा खुदाहि तो उत्पन्न करुं शकत असेल ? जर नसेल तर त्याच्या सर्व शक्तिमत्तेला ओहटी लागली असें समजावयाचें काय ? मनुष्यांना तो आपल्या इच्छेप्रमाणें कन्यापुत्र देतो; पण कोंबड्यां, मासे, डुकरे आदिकांना खंडोगणती पिलें होतात तीं कोण देतो ? आणि स्त्रीपुरुष समागमविना कां देत नाहीं ? आणि एखा–दीला वाझ बनवून दुःखित कां करतो ? वाहवा, काय खुदाचें तेज, त्याच्या पुढें कोणी भाषणहि करुं शकत नाहीं! हें सत्य असल्यास, देवदूत पैगंबर वगैरेंचीं ईश्वराबरोबर संभाषणें झालीं, खुदा त्यांच्याशीं असें असें बोलला वगैरे ज्या गप्पा ठिकठिकाणीं बायबलांत व कुराणांत लेखकांनीं मारल्या आहेत त्या केवळ आपला मतलब साधण्यासाठीं नसतील कशावरुन ? खुदा सर्वज्ञ सर्वव्यापक आहे असें जर कोणी म्हणेल तर मग त्याचें पडद्याआडून गोष्टी करणें, पोष्ट ऑफिसाप्रमाणें बातम्या मागविणें, दूताकडून जगांतील घडामोडीचें ज्ञान मिळविणें व्यर्थ होय. कुराणाप्रमाणें ईश्वर सर्वज्ञ व सर्वव्यापक नसून तो एक चलाखी करणारा कोणीतरी मनुष्य दिसतो म्हणून कुराण हें ईश्वरप्रणित नाहीं

१३८—आणि जेव्हां ' ईसा ' चमत्कार घेऊन आला. —सूरतु–ज्जुखरुफ अ. ४३ आ. ६३.

**समीक्षक**—येशू ख्रिस्ताचीं रवानगी जर खुदानेंच केली होती तर ख्रिस्तोपदेशाविरुद्ध कुराण खुदानें कां बनविलें ? कुराणाविरुद्ध बायबल व बायबलाविरुद्ध कुराण आहे म्हणून यांपैकीं एकहि ईश्वरकृत नव्हे.

१३९—याला धरा आणि ओढींत ओढींत याला नरकाग्नीच्या मधोमधपर्यंत घेऊन जा. आणि मोठ्या मोठ्या व काळ्या डोळयांच्या अप्सरांशीं आम्ही त्यांचे जोड लावून दिलेलें असतील.

—सूरतु–द्दूखान अ. ४४ आ. ४७, ५४

**समीक्षक**—वाहवा ! खुदा न्यायी असूनहि तो प्राण्यांना पकडतो व ओढतो. असा जो खुदा आहे त्या खुदाचे उपासक जे मुसलमान लोक तेहि जर अनाथ निर्बल अशांना पकडून ओढूं लागले तर त्यांत आश्चर्य कसलें ? तो संसारी मनुष्याप्रमाणें विवाह देखील लावतो म्हणजे जणूं काय तो मुसलमानांचा पुरोहितच आहे.

१४०—( मुसलमानांनों ! ) ( लढाईंत ) जेव्हां नास्तिकांशीं तुमची भेटाभेट होईल, तेव्हां ( बेलाशक त्यांच्या) माना उडवून टाका; येथपर्यंत कीं जेव्हां तुम्ही खूब त्यांचा जोर मोडून टाकाल, तेव्हां तुम्हीं त्यांच्या ( मुस्क्या बांधून ) टाका ( म्हणजे कैद करा ). आणि ( हे पैगंबरा ! ) तुझी ( ही ) वस्ति ( 'मक्का' ) जेथील लोकांनीं तुला (घरांतून) काढून लाविलें याहूनहि कित्येक वस्त्या फारच बलवत्तर होत्या, कीं आम्हीं त्याचा नाश करुन टाकिला व कोणीहि त्याच्या मदतीस उभा राहिला नाहीं. ज्या स्वर्गाचें अभिवचन ( परमेश्वराला ) भिऊन वागणाऱ्यांस दिलें जातें त्याची तऱ्हा अशी होय कीं, त्यांत ( अशा ) पाण्याच्या नद्या होत कीं ज्यांत ( नांवासहि ) वास नाहीं, व ( अशा )

---

१ ह्या आयतावरील ' तफसीरहुसेनी' च्या भाष्यामध्यें सांगितलें आहे कीं, महंमदसाहेब दोन पडद्याआड होते व तेथून त्यांनीं खुदाचा आवाज ऐकला. एक पडदा जरीचा व दुसरा शुभ्र मोत्यांचा होता आणि ह्या दोन पडद्यांतील अंतर ७० वर्षे चालण्यास पुरेल इतकें होतें. बुद्धिमान लोकांनींच ह्या गोष्टीचा विचार करुन ठरवावें कीं तो खुदा होता किंवा पडदानशीन स्त्री होती ? मुसलमानांनीं खुदाची दुर्दशा करुन टाकली आहे. वेद, उपनिषदांमध्यें वर्णिलेला परमात्मा कोणीकडे व पडद्याआड राहून संभाषण करणारा कुराणवर्णित खुदा कोणीकडे. खरी गोष्ट हीच कीं, अरब निवासी लोक अडाणी होते. त्यांना उत्तमोत्तम ईश्वरस्वरुपाचें ज्ञान कोठून असेल ?

दुधाच्या होत कीं, ज्यांची रुची ( मुळींच ) बददलीं नाहीं, आणि ( अशा ) मद्याच्या नद्या होत कीं जें सेवन करणाऱ्यांस फारच रुचिकर लागेल; व ( तशाच ) स्वच्छ ( व निर्मल ) मधाच्याहि नद्या होत; आणि त्यांना तेथें हरत-हेची फळफळावळ ( प्राप्त ) होईल व त्यांच्या पालनकर्त्याकडून क्षमा ( ती वेगळीच ).

—सूरतु–मोहंमद अ. ४७ आ. ४, १३, १५

**समीक्षक**:—या आज्ञेप्रमाणें कुराण, खुदा व मुसलमान लोक बंडखोर, दंगेखोर, तापदायक व स्वार्थी, दयाहीन बनले आहेत. या कुराणानुसार जर जगांतील मुसलमानेतर लोक मुसलमानाशीं वर्तन ठेवतील तर मुसलमानांच्या दु:खांना सीमा तरी राहील काय ? त्यावेळेस मुसलमानांची जी स्थिति होईल तिची कल्पना त्यांनीं केली म्हणजे आज आपण किती दु:ख देतो हें त्यांना कळेल. इस्लामी खुदाचा पक्षपात पहा. ज्यांनीं महंमद साहेबांना मानिलें नाहीं त्यांवर तो बहिष्कार घालतो, व मारतो ! ज्या ठिकाणीं शुद्ध पाणी, दूध, मद्य व मध यांच्या मोठमोठ्या नद्या आहेत तो इस्लामी स्वर्ग इहलोकापेक्षां कोणत्या दृष्टीनें श्रेष्ठ आहे ? दुधाच्या नद्या कधींतरी व कोठेंतरी असूं शकतात काय ? कारण अल्पकालांतच तें बिघडून जातें. अशा गोष्टीमुळेंच विद्वानांना कुराणमताविषयीं आदर वाटत नाहीं.

१४१—जेव्हां जमीन मोठ्या जोरानें हालूं लागेल; आणि पर्वत तुकडे, तुकडे होऊन जातील; कीं ( जशी ) धूळच उधडून पडलेली आहे. [ एक ] तर उजव्या हातावाले, तर उजव्या हातावाल्यांचें काय [ सांगणें ] ! आणि ( एक ) डाव्या हातावाले; तर डाव्या हातावाल्यांची काय [ तरी दुर्गत ] ! सुवर्णाच्या रत्नजडित तक्तांवर, ते एक-मेकांच्या समोरासमोर टेकून [ बसलेले ] असतील. त्यांच्यापाशीं (स्वर्गीय) तरुण मुलें जी नित्य (मुलेंच बनून) राहातील तीं ( शरबत वगैरे पाजण्यासाठीं ) आपखरे व तोटीदार तांबे घेऊन येत जात असतील; आणि ( अशा ) स्वच्छ मद्याचे पेलेहि, कीं ज्या ( च्या पिण्या ) नें त्यांचें डोकें दुखणार नाहीं व ते बरळणारहि नाहींत. आणि तसेच ज्या तऱ्हेचे मेवे ते पसंत करतील ( ते मेवे ); व ज्या प्रकारच्या पक्ष्यांचें मांसास त्यांची वांच्छा होईल ( तेंच मांस ), आणि ( या देणग्या खेरीज ) काळया कुळकुळीत मोठ्या डोळयांच्या अप्सरा ( असतील ); कीं ज्या जणूं घड्यांत ठेवलेल्या मोत्यांसारख्या [ सुंदर ] होत. आणि उंच उंच बिछायतीं [ च्या सुखां ] त [ मजे उडवीत ) असतील. या ( अप्सरा ) आम्हीं ( त्यांच्यासाठीं एकदम) बनवून उभ्या केल्या. आणि यांना (अशा ) बनविल्या ( किं या ) कुमाऱ्या होत ); ( आपल्या पतींस ) प्रिय व समान वयाच्या ( अशा होत ). आणि त्यानेंच पोटें भरावीं लागतील. तथापि मी ( उल्का ) नक्षत्रांच्या तुटण्याचीं शपथ वाहातो. —सूरतुल-वाकेअ अ. ५६ आ. ४ तें ६, ८, ९, १५ ते २३, ३४, ते ५३७, ३, ७५

**समीक्षक**—कुरानकर्त्याच्या विचित्र लीला आतां अवलोकन करा. पृथ्वी ही नेहमींच हालत असते तशी ती त्यावेळेसहि हालत असेल यावरून कुराणकर्ता पृथ्वी ही स्थिर आहे असें मानीत होता हें सिद्ध होतें ! बरें, पर्वतांना काय पक्षीवत् उडवून टाकील ? जरी बारीक बारीक तुकडे झाले तरी पण ते सूक्ष्म शरीरधारी राहाणारच मग त्यांचा पुनर्जन्म होणार नाहीं काय ? वाहवा, इस्लामी खुदा शरीरधारी आहे. एरवीं त्याच्या डाव्या उजव्या हाताकडे (लोकांना) उभे कसे राहतां येईल ? जर स्वर्गांत शयनार्थ तारेचे पलंग सज्ज आहेत तर ते बनविणारे सोनारादि कारागीर लोकहि तेथें असलेच पाहिजेत. पण त्या पळंगांत ढेकूण होऊन शयन करणाऱ्या दुर्दैवी लोकांना रात्रीच्या रात्री जागरणें करावीं लागत असतील त्याची वाट काय ? स्वर्गांत लोडाशीं टेकून तेथील निरुद्योगी लोकांची पोटें वाढलीं असतील नाहीं ? किंवा स्वर्गांतील कचेरी, कोर्टें, कारखानें वगैरेंमध्यें ते उद्योगधंदे करीत आहे काय ? उद्योगधंदे करीत असल्यास ठीक आहे नाहींतर रोग लागून बिचारे मृत्यूच्या दाढेंत सांपडत असतील ! काबाडकष्ट करून उपजीविका करीत असतील तर मग स्वर्गीय स्थिति व इहलोक यामध्यें अंतर काय ? काहींच नाहीं. तेथें मुलेंबाळें असतील, त्यांच्याबरोबर त्यांचे आईबापहि असतील व सासूसासरेहि असतील. ह्या सर्वांचें तें एक मोठें शहरच वसलें असेल व त्यांत मलमूत्रादिकानें रोगराई होत असेल ? मेवामिठाई खाल्यावर प्याल्यांतून पाणी पीत असतील व कपभर दारूहि पीत असतील. मग त्यांचीं डोकीं भणाणत असतील; व मग ते एकमेकांना कमजास्तहि बोलत असतील. यथेष्ट मेवामिठाई खाल्यावर जनावरें व पक्षी यांचें मांस खाण्यास मिळेल. हजारों पशूपक्षीं तेथें वधिले जात असतील व त्यांचीं हाडें पिसें सर्वत्र पडलेलीं असतील,

कसायांचीं दुकानें असतीलच ! वाहवा, वाहवा ! इस्लामी स्वर्गाचें वर्णन व प्रशंसा कोठवर करावी ? तो अरबस्थाना-पेक्षां सुंदर व वरचढ आहे ! मद्यमांस खावून पिचून उन्मत्त बनल्यावर सुंदरशा स्त्रिया आणि लौंडेहि स्वर्गांत रिझव्हें ठेवलें आहेत; नाहींतर स्वर्गीय वास्तव्य करणारे लोक दारूनें झिंगल्यावर व इतर मादक पदार्थ सेवनानें मस्तकांत गरमी चढून प्रमत्त बनल्यावर कसें होईल ? अनेक जोडपीं निजावयाचीं तर बिछानेहि मोठमोठे असतील ? खुदा स्वर्गात कुमारी उत्पन्न करतो म्हणून कुमारहि उत्पन्न करीत असेल ! कुमारींचीं लग्नें येथून स्वर्गांत जाणाऱ्या उमेदवाराशीं झालीं, हें खुदानें कुराणात लिहिलेंच आहे. पण जे स्वर्गीय कुमार आहेत त्यांच्यासाठीं कोणत्या कुमारी खुदानें रिझर्व्ह ठेवल्या आहेत, तें त्यानें सांगितलें नाहीं. त्यांचेहि विवाह येथून गेलेल्या उमेदवाराबरोबर कुमारीवत् तर तो लावून देणार नाहीं ना ? ह्या प्रश्नांचा निर्णय न केल्यामुळें खुदाची ही मोठीच चूक झालेली नाहीं काय ? परिपक्व अवस्थेच्या कुमारी पतीशीं संसार थाटीत असतील तर ठीकच आहे नाहींतर सगळीच मजा. पतिपत्नीमध्यें दुप्पट निदान दीडपट तरी वयाचें अंतर पाहिजे. मुसलमानांच्या स्वर्गाचें हें कुराणोक्त वर्णन झालें. आतां नरकाचें वर्णन ऐका. नरकवासी जन सिंहोड वृक्ष भक्षण करून राहतात. त्या वृक्षाला कांटे असतीलच. गरम पाणी प्यावयाला इत्यादि नरकवासाचीं दुःखें आहेत. शपथ घेणें हें काम बहुधा लबाडांचें असतें, सत्यवाद्यांचें नसतें. खुदा जर शपथ खातो तर तो लबाडाहून भिन्न असूं शकणार नाहीं.

१४२—जे लोक परमेश्वराच्या मार्गांत फळी बांधून लढतात त्या लोकांस तर परमेश्वर निःसंशय चहातो.

—सूरतु-स्सफ. अ. ६१ आ. ४

**समीक्षकः**—वाहवा, शाबास त्या खुदाची ! असल्या प्रकारचे उपदेश करून बिचाऱ्या अरबांना सर्वांशीं लढवून जगाचे शत्रू बनवून यांना दुःखें प्राप्त करावयास लावलीं. धर्माच्या झेंड्याखालीं उभे करून लढाया करविणाऱ्याला कोणता बुद्धिमान ईश्वर मानूं शकेल ? जो जातीजातीमध्यें विरोध वाढवितो तो सर्वांचाच दुःखदाता होय.

१४३—हे पैगंबरा ! ज्या ( वस्तू ) परमेश्वरानें तुझ्यासाठीं मुभा केल्या आहेत त्या, तूं आपल्या पत्न्यांची मर्जी संपादण्याकरितां ( आपल्याला ) कां म्हणून निषिद्ध करितोस ? आणि परमेश्वर क्षमाकर्ता व दयाळू होय. जर पैगंबर तुम्हां ( स्त्रियां ) स काडी मोडून देईल तर नव्हे कीं, त्याचा पालनकर्ता त्याला तुम्हांपेक्षां उत्तम पत्न्या तुमच्या बदलीं देईल; ( म्हणजे ) ईश्वराज्ञाधीन, विश्वासू, भक्तिपरायण, (परमेश्वराच्या सेवेंत) पश्चाताप कराणाऱ्या, उपासिका, उपोषण करणाऱ्या, विधवा व कुमारिका ( अशा ); —सूरतु-त्तहरीम्. अ. ६६ आ. १, ५

**समीक्षकः**—लक्षपूर्वक पाहिल्यास खुदा म्हणजे अन्य कोणी नसून तो महंमदसाहेबांच्या घरचा एक कारकून होता असें दिसेल. प्रथम आयतमध्यें दोन गोष्टींचा नामनिर्देश केलेला आहे. एक महंमदसाहेबांना सरबत आवडत होतें. त्यांना कित्येक बायका होत्या. त्यांच्यापैकीं एकीच्याकडे सरबत पिण्यास त्यांना थोडावेळ लागला, पण ही गोष्ट दुसरीस असह्य झाली. तिनें महंमद साहेबांची बरीच झडती घेतल्यावर महंमदसाहेब ताळयावर आले व आपण पुनः असें करणार नाहीं म्हणून त्यांनीं शपथ घेतली. दुसरी गोष्ट म्हणजे अनेक बायकांपैकीं ज्या रात्री ज्या बायकोची पाळी होती तिच्याकडें ते गेले असतां ती माहेरी गेल्याचें त्यांना आढळून आलें. त्या रात्रीं महंमदसाहेबांनीं पत्नीऐवजी एका दासीला बोलावून तिलाच पवित्र केलें ? बायकोला हें शुभवर्तमान समजतांच ती रागावली. तेव्हांहि मसंमदसाहेबांची घाव-रगुंडी होऊन त्यांनीं तिच्यापुढें नाकधुऱ्या काढून पुनः म्हणून असलें काम न करण्याची प्रतिज्ञा केली. झालें तें झालें ही गोष्ट कोणाला सांगूं नकोस असें बायकोला सांगून ठेविलें व बायकोनें तसें करण्याचें कबूल कलें, मग त्यांनीं हा प्रकार दुसऱ्या बायकोस निवेदन केला. ह्यानंतर ही आयत खुदानें पाठविली कीं, 'जी गोष्ट आम्ही तुजसाठीं अग्राह्य ठरविली आहे ती तूं कां करतोस !' बुद्धिमानांनीं विचार करावा कीं, ईश्वर केव्हांतरी कोणाच्या घरचीं भांडणें मिटवण्याचीं कामें करील काय ? यावरून महंमदसाहेबांचें आचरण कसें होतें त्याची कल्पना येईल. जो अनेक बायका ठेवतो तो ईश्वराचा भक्त किंवा पैगम्बर कसा असूं शकेल ? आणि पक्षपाती बनून एका स्त्रीचा अपमान करतो व दुसरीचा सन्मान करतो तो अधर्मी नव्हे काय ? अनेक स्त्रियांचा उपभोग घेऊनहि तृप्त न होतां दासी बटकीशी व्यवहार ठेवतो त्याला लाजलज्जा,

भय व धर्म कोठून असेल ? म्हटलें आहे कीं:–'**कामातुराणां न भयं न लज्जा**' जो कामी मनुष्य असतो त्याला अधर्मानें वागण्यास भय व लज्जा वाटत नसते. मुसलमानांचा खुदाहि महंतदसाहेबांच्या बायका व पैगंबर यांचे झगडे–बखेडे यांचा निकाल करणारा जणू सरपंचच बनलेला आहे. आतां कुराण हें विद्वान् रचित आहे किंवा अडाणी लोकांनीं आपला मतलब साधण्यासाठीं बनविलें आहे याचा विचारवंतांनींच आपल्या मनाशीं विचार करावा म्हणजे काय स्थिति आहे ती स्पष्ट कळेल. दुसऱ्या आयतवरून प्रतीत होतें कीं, महंमदसाहेबांवर त्याची एखादी बायको अप्रसन्न झाली असेल तेव्हां तिला धमकी देण्यासाठीं खुदा कळवितो कीं, तूं जर अशी गडबड करशील तर महंमदसाहेब तुझा त्याग करतील व मग पुरुषांना दुर्मिळ अशी सुंदर स्त्री आपण त्यांना देऊं. या गप्पावरून हेंच सिद्ध होतें कीं, ईश्वर वगैरे कोणीच कांहीं बोलत नव्हता. ह्या केवळ देशकालानुरूप आपलें प्रयोजन साध्य करणारे जे होते त्यांनीं ईश्वराच्या नांवावर असल्या थापा मारल्या आहेत. जे लोक हे प्रकार ईश्वरीय मानत असतील त्यांना आम्हीच काय पण सर्व बुद्धिमान हेंच उत्तर देतील कीं, तो ईश्वर नसून महंमदसाहेबांना बायका गांठून देणारा एक मध्यस्त असा म्हावी होता.

१४४—हे पैगंबरा ! नास्तिकांशीं (हातांनीं) व दांभिकांशीं ( वाचेनें ) धर्मयुद्ध करित राहा; आणि त्यांचावर सक्ती राख. —सू. त. आ. ६६. आ ९

**समीक्षकः**—इस्लामी खुदाची करामत पहा. अन्य मतवाल्याशीं लढण्यास तो मुसलमानांना व पैगंबराला उत्तेजन देत आहे. मग मुसलमानांची वृत्ति दंगेखोर कां नसावी ? परमात्मा मुसलमानावर कृपादृष्टि करो म्हणजे त्यांची बंडखोरवृत्ति लयास जाऊन ते सर्वांबरोबर मित्रत्वानें वागतील.

१४५—आणि आकाश फाटून जाईल व तें त्या दिवशीं फारच पोंचट (फुसफुशीत) होऊन जाईल. आणि त्याच्या किनाऱ्यांवर दूत असतील; आणि त्यादिवशीं तुझ्या पालनकर्त्याच्या सिंहासनास आठ (दूत) आपल्यावरती उचलून धरतील. त्यादिवशीं तुम्ही (परमेश्वरापुढें) रुजूं केले जाल. तुमचें कोणतेंच गूढ गुप्त राहाणार नाहीं. तर ज्याला त्याचें ( कर्म ) पत्र उजव्या हातांत दिलें जाईल, तो म्हणेल कीं घ्याहो ! ( हें ) माझें ( कर्म ) पत्रक तर वाचा. आणि त्याचें ( कर्म ) पत्रक त्याच्या डाव्या हातांत दिलें जाईल; तो म्हणेल, मला जर माझें ( कर्म ) पत्रक मिळालें नसतें तर बरें होतें ! —सूरतु–हाक्क अ. ६९ आ. १६ ते १९, २५

**समीक्षकः**—आकाश काय वस्त्र आहे म्हणून त्याचे तुकडे होतील ? जर परलोकाला आकाश म्हटलें असेल तर ही गोष्ट अविद्याजनक होय. कुराणोक्त खुदा सिंहासनावर बसतो व आठ भोयी त्याच्या सेवेला आहेत; ह्यावरून तरी खुदा शरीरधारी म्हणजे साकार आहे, हें समजण्यास आतां कसलाच संशय राहिला नाहीं. मागें पुढें येणें जाणें हेंहि मूर्तिमानालाच शक्य आहे. असा मूर्तिमान सर्वज्ञ सर्वव्यापक, सर्वशक्तिमान कसा असणार ? पुण्यात्म्यांचे उजवे हातीं तो पत्र देईल, वाचवयाला लावील व त्यांना स्वर्गांत रवाना करील आणि पाप्यांना त्यांच्या डाव्या हातामध्यें त्यांचें कर्मपत्र देईल, त्यांच्या कर्माची सुनावणी करील व त्यांना नरकांत पाठवील ही मात्र आश्चर्याची गोष्ट आहे. ह्या सर्वलीला बालकांना शोभणाऱ्या आहेत.

१४६—कीं ज्या ( पायऱ्यां ) च्या ( वाटां ) द्वारें देवदूत व आत्मा ( म्हणजे ' जिब्रील ' ) त्यच्याकडेस चढून जातात; ( पुनरुत्थानाच्या ) अशा एका दिवशीं ( ता घडून येईल ) कीं ज्याचा अंदाज पन्नास हजार वर्षांचा होईल. जेव्हां हे आपल्या थडग्यांतून निघून पडतील ( व ) असें धांवत असतील कीं जणूं कोणा निशाणाकडे धांवत चालले जात आहेत. —सूरतुल्-मआरिज अ. ७० आ. ४, ४३

**समीक्षकः**—दिवस पन्नास हजार वर्षांचा तर रात्रहि तितक्याच मुदतीची कां नाहीं ? एवढी मोठी रात्र नसेल तर दिवसहि तसा असणें शक्य नाहीं. पन्नास हजार वर्षेंपावेतों खुदा, देवदूत व कर्मपत्रवाले उभे राहतील, बसून असतील कां जागरण करतील ? यांपैकीं कोणतीहि त्यांची अवस्था राहिली तर खात्रीनें ते आजारी पडून मरतील. कबरस्थानांतील प्रेतें न्यायदानाच्यावेळीं ताडकन उठून खुदाच्या कचेरीकडे धांव घेणार आहेत काय ? कबरस्थानांत त्यांना वारंटें कशी काय पोंचतीं केलीं जातील ? पुण्यवान् व पापी जन ह्या सर्वांना इतका दीर्घकाल कबरीमध्यें डांबून ठेवणें उचित नव्हे.

आजकाल खुदाची कचेरी बंद असेल व खुदा आणि त्याचे देवदूत स्वस्थ बसले असतील, कां कांहीं कामें करीत आहेत ? आपल्या घरांत बसून खाणें, पिणें, नाच तमाशे पाहणें, ऐषआराम करणें हींच त्यांचीं कामें आहेत काय ? इतकी अंधेर नगरी अन्यत्र कोठेंहि नसेल व असल्या बालिश गोष्टीवर विश्वास ठेवणारे जंगलीहि कोणी नसतील.

१४७—आणि वास्तविक पाहातां, त्यानें तुम्हांस तऱ्हेतऱ्हेचे पैदा केलें. कां तुम्ही पाहिलें नाहीं कीं परमेश्वरानें एकावर एक कशीं सात आकाशें बनविलीं आहेत ? आणि त्यांत चंद्रलाहि बनविलें ( कीं तो एक ) प्रकाश ( होय ); आणि सूर्याला बनविलें (कीं तो एक प्रकाशित) दिवा (होय). —सूरतु-नूह अ. ७१ आ. १४ ते १६

**समीक्षकः**—खुदानें जीवांना उत्पन्न केलें असेल तर ते नित्य अमर कधींहि राहूं शकत नाहींत. मग स्वर्ग तरी सदैव कसा असेल ? जें उत्पन्न होतें तें नाहींसेंहि होतें. आसमान निराकार व विभु आहे. मग तें वर कसें निर्माण करूं शकला ? दुसऱ्या वस्तूचें नांव आकाश ठेवलें असेल तरी ते नांव व्यर्थ होय. वर खालीं आकाश व त्याच्या मध्यभागीं सूर्य चंद्र कधींहि राहणार नाहींत. मध्येंच असतील तर एक वरचा व एक खालचा पदार्थ तेवढाच प्रकाशित राहणार बाकीं सर्वत्र अंधःकार असला पाहिजे. पण असें दिसत नाहीं म्हणून हें सत्य नव्हे.

१४७—आणि मशीदी तर परमेश्वराच्याच (उपासने) साठीं होत. तर ( लोकांनों ! त्यांत ) परमेश्वराबरोबर (आणखी) कोणाचा धांवा करूं नका. —सूरतुल-जिन्न अ. ७२ आ. १८

**समीक्षकः**—हें सत्य आहे तर मग मुसलमान लोक 'लाइलाह इल्लिलाः महंमदरसूलल्लाः' हा कलमा म्हणून महंमदसाहेबांना ईश्वराचा भागीदार कां बनवितात ? असें कुराणविरुद्ध वर्तन कां ? जर तें कुराणाविरुद्ध नसेल तर हें खोटें म्हणावें लागेल. मशीद खुदाचें घर आहे म्हणजे मुसलमान मोठे मूर्तिपूजक बनले कारण पुराणानुयायी, जैनी हे लोक तांब्या पितळेच्या छोट्या देवादिकांच्या मूर्तींना मानतात म्हणून जर ते मूर्तिपूजक बनतात तर मशीदीला ईश्वर-गृह समजणारे मूर्तिपूजक नव्हेत काय ?

१४९—आणि सूर्य व चंद्र (दोन्हीं) एकत्र गोळा केले जातील, —सूरतुल-कियामत अ. ७५ आ. ९

**समीक्षकः**—सूर्य व चंद्र कधीं एकत्र होऊं शकतील काय ? पण ते एकत्र करूं पाहणारा किती असमंजस असावा ? सूर्य चंद्र एवढेच एकत्र करण्याचा हेतु काय ? बाकीचें सर्व लोकलोकांतर तसेंच राहूं देण्यांत कोणता मतलब आहे ? असल्या असंभवनीय गोष्टी परमेश्वरकृत कधींहि होऊं शकत नाहींत. ईश्वराच्या राहोत पण कोणा विद्वानाकडूनहि होणार नाहींत.

१५०—स्वर्गवास्यांपाशीं ( सेवेसाठीं ) मुलें येत जात असतील कीं; तीं नेहमी ( मुलेंच ) राहातील; तूं त्यांना पाहाशील, तर तूं ( अशी ) कल्पना करशील कीं, जणू तीं पसरलेलीं मोत्येंच ( होत. ) व त्यांना चांदीचीं कडीं लेवविलीं जातील; आणि त्याचा पालनकर्ता त्यांना पवित्र (शुद्धकारक) मद्य पाजवील.'-सूरतु-द्दह्र अ. ७६ आ. १९,२१

**समीक्षकः**—कांहो महाराज, मोत्याच्या रंगाचीं मुलें कोणत्या कार्यासाठीं तेथें ठेवण्यांत येतात ? तरुण लोकांचीं सवा व स्त्रीजन्य सेवा त्यांच्या मनाप्रमाणें होत नसावी ? आश्चर्य आहे कीं, मुलांशीं दुष्टजन निंद्य कर्म करतात याचें मूलकारण हेंच कुराणवाचन होय ! स्वर्गांतहि स्वामीसेवकभाव असल्यामुळें स्वामीवर्गाला आनंद व सेवकवर्गाला परि-श्रमानें अत्यंत कष्ट होत असतील असा पक्षपात कां ? खुदाच स्वतः मद्य पाजवील म्हणजे तो जर सेवकांचें काम करणारा आहे तर मग त्याचा मोठेपणा कोठें राहिला ? तेथें स्वर्गांत स्त्रीपुरुषसमागम व गर्भावस्था व बाळतपणेंहि होतात कीं नाहीं ! जर नसतील तर विषयसेवन व्यर्थ होय, सफल होत असेल तर ते जीव कोठून आले ? व खुदाची सेवा केल्या-शिवायच स्वर्गप्राप्ति त्यांना कशी झाली ? जर स्वर्गांतच त्यांची उत्पत्ति असेल तर ईमान न बाळगतां आणि खुदाची भक्ति न करतांहि त्यांना फुकटाफुकट स्वर्गप्राप्तीचा लाभ झाला म्हणावयाचा ! कांहींहि भक्ति न करितां फुकट स्वर्ग-सौख्याचा लाभ करून देणें ही अन्यायाची परमावधी होय.

१५१—(हा त्यांच्या कर्मांचा), पुरापुरा मोबदला (होय.) व (प्यावयास पवित्र मद्याचे) ओतप्रोत भरलेले पेले; त्या दिवशीं 'जिब्रील' व [इतर] दूत [ त्याच्या हुजुरांत] रांगे रांगेनें उभे राहातील.—सूरतु-नबअ अ. ७८ आ. २६, ३४, ३८

**समीक्षकः**—कर्मानुसार फळें मिळतात तर मग देवदूत व गोरीं मुलें जीं स्वर्गांत वास्तव्य करितात त्यांना कोणत्या जन्माचीं फळें मिळालीं आहेत ? प्यालेचे प्याले मद्यप्राशन केल्यावर तेथें कोण गोंधळ उडत असेल ? रूह हा देवदूतांचा मुख्य पुढारी आहे. पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं एखादी पलटण तयार करण्याचा खुदाचा बेत आहे काय ? व त्या पलटणीच्या हस्तें इतरांना खुदा शिक्षा करणार आहे काय ? खुदा त्यावेळीं उभा असेल कां बसलेला ? न्यायदिनापर्यंत खुदानें आपले देवदूत सैन्य गोळा करून सैतानाला पकडलें तर खुदाचें राज्य निष्कंटक बनणार नाहीं काय ?

१५२—ज्यावेळीं सूर्या (च्या प्रकाशपटला ) स गुंडाळलें जाईल. व जेव्हां तारे झडून पडतील, आणि ज्या वेळां पर्वत (आपल्या जागेवरून ) चालविले जातील; व जेव्हां आकाशाचें कातडें काढलें जाईल.

—सूरतुल्-त्तकवीर अ. ८१ आ. १ से ३, ११

**समीक्षकः**—कोण असमंजसपणाची कल्पना ही ? गोल सूर्यलोक कसा काय गुंडाळला जाईल ? व ताऱ्यांचें बोजकें कसें करतां येईल ? पर्वत निर्जीव असल्याकारणानें ते कसे चालूं शकतील ? आणि आकाश म्हणजे काय वृक्ष वा पशु आहे म्हणून त्याची साल काढण्यांत येईल ? जंगलीपणाचा व अज्ञानपणाचा पुरावा आणखी कोणता पाहिजे !

१५३—जेव्हां आकाश फाटून जाईल; व जेव्हां तारे झगडून पडतील. व जेव्हां समुद्रास ( त्याच्या मूळ जागेवरून उचलून दुसरीकडेस ) वाहविलें (१) जाईल; आणि जेव्हां थडगीं उखडून (२ ) टाकिलीं जातील;

—सुरतुल-इन्फितार अ. ८२ आ. १ ते ४

**समीक्षकः**—खूप आहे कुराणकर्त्याची फिलॉसफि आकाशाला कसे फाडतां येईल ? ताऱ्यांना कसें झाडतां येईल ! समुद्र काय लाकूड आहे म्हणून तो चिरतां येईल ! कबरीं काय प्रेतें आहेत कीं त्या जिवंत होतील ?

१५४—आकाश ज्यांत घुमट आहेत त्याची शपथ; तर हे महनीय कुराण होय. (व तें आमच्या येथें ) सुरक्षित पत्रक ('लौहे-महफूज' ) मध्यें (हुबेहुब लिहिलेलें आहे). —सूरतुल्-बुरूज अ. ८५ आ. १, २१, २२

**समीक्षकः**—कुराणकर्त्यानें भूगोल व खगोलविद्या शिकण्याची तसदी मुळींच घेतलेली दिसत नाहीं. एरवीं तो आकाशाला किल्ल्याचे बुरुज असें कां म्हणतां ! मेषादि राशींना तो बुरूज म्हणत असेल तर बाकीच्यांना कां म्हटलें नाहीं ? वास्तविक ते बुरूज नसून, तारे गोललोक आहेत. तें कुराण खुदाचे जवळ आहे. जसें हें कुराण खुदाची विद्वत्ता व कौशल्य दाखवितें त्याहून अधिक तें ओतप्रोत भरलेलें आहें.

१५५—निःसंशय, हे ( नास्तिक तर आपले ) डावपेंच लढवीत आहेत; आणि मीं ( आपले ) डावपेंच करीत आहे. सूरतु-त्तारिक अ. ८६ आ. १५, १६

**समीक्षकः**—मकर म्हणजे ठकपणा. खुदाहि ठकबाज आहे काय ! चोरीचें उत्तर चोरी व लबाडीचे उत्तर लबाडी हा सज्जनांचा धर्म आहे काय ! वाहवा धन्य कुराणकर्ता !

१५६—आणि (हे पैगम्बरा !) तुझा पालनकर्ता येऊन विराजमान होईल व दूत रांगारागांनीं (त्याच्यापुढें उभे राहातील); आणि त्या दिवशीं 'जहन्नम'-नरकाग्नि ( सर्वांच्या समक्ष ) आणून हजर केला जाईल.

सूरतुल्-फज्र अ. ८९ आ. २२, २३

**समीक्षकः**—ज्याप्रमाणें सेनाध्यक्ष आपल्या सैन्याची कवाईत करून घेतो त्याप्रमाणें हा खुदा आहे कीं नाहीं तें सांगा. नरक म्हणजे काय भांडें आहे कीं तें वाटेल तेथें नेऊन ठेवतां येईल ? भांड्याप्रमाणें असेल तर त्यांत असंख्य कैदी कसें मावतील ?

१५७—यावर परमेश्वराचा पैगम्बर ( 'सालेह' ) यानें त्यांस बजाविलें कीं, परमेश्वराचा" सांढणीला ( हात लावूं नका; ) आणि तिचें पाणीहि ( बंद करूं नका ) यावरहि त्यां लोकांनीं ' सालेहा ' ला पाखंडी म्हटलें आहे व

(१) हिंदी वचनांत 'चीर जावे ' म्हणजे 'चिरलें जाईल' असे शब्द आहेत.

(२) हिंदी वचनांत ' उठाई जावें ' म्हणजे 'उठविलें जाईल ' असे शब्द आहेत.

सांढणीला मारुन टाकिलें. तेव्हां त्यांच्या पालनकर्त्यानें त्यांच्या पापाबद्दल त्यांचा नाश केला;

—सूरतु-इशम्स अ. ९१ आ. १३, १४

**समीक्षक**—खुदाहि उंटणीवर बसून सहल करावयास निघतो काय ? एरवी उंटीण बाळगण्याचें त्याला कारण काय ? न्याय दिनापूर्वीच नियमभंग करुन तिला रोग कां लावला ? रोगी बनवून तिला दंड केला मग न्यायाच्या रात्रीं न्याय करणें व ती रात्र असणें हें मिथ्याच काय ? अरबदेशांत उंटाची पैदास विशेषतः असते, वाहनाचे इतर पशु जवळ जवळ नसतातच. यावरून कुराण कर्ता कोणी अरब गृहस्थ असावा असें सिद्ध होतें.

१५८—पाहा हो ! जर तो ( आपल्या कृत्यांपासून ) पराङ्मुख न होईल तर आम्ही त्याचें झुलूप धरुन फरफटत ओढूं; ( म्हणजे ) त्या लबाड पापी ( चंडाळा ) चें झुलूप ( तसेंच ) आम्हीहि ( आपल्या ) जलाद दूतांस ( त्याच्या पारिपत्यासाठीं ) बोलावून घेऊं. (१)

—सूरतुल्-अलक अ. ९६ आ. १५,१७,१८

**समीक्षक**—ओढाताण करणें हें हलक्या प्रतीच्या चपराशी लोकांचेंच काम असतें. पण इस्लामी खुदाहि तेंच काम करितो. मस्तक कधीं लबाड व अपराधी असतें काय ? जो दूताकडून स्वर्ग बंद करील तो ईश्वर कसा असूं शकेल ?

१५९—आम्ही कुराण ( च्या प्रथम प्रकटीकरणा ) ला ' कद्र ' च्या रात्रींत उतरिलें. आणि ( हे पैगंबरा ! ) तूं समजलास कीं ' कद्र ' ची रात्र म्हणजे काय ? त्या रात्रीं ( पुढील सालाच्या ) प्रत्येक व्यवस्थेसाठीं देवदूत व ' जिब्रील ' (२) हे आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेनें ( पृथ्वीवर ) उतरतात.

—सूरतुल्-कद्र. अ. ९७ आ. १, २, ४

**समीक्षक**—एका रात्रींत कुराण उतरलें म्हणजे एक एक आयतच उतरली असेल ना ? कां एकावेळेस एकदम संपूर्ण ? रात्र अंधेरी आहे कां चांदणी यांत विचारण्यासारखें काय आहे ? वर खालीं ईश्वराचें अगर कोणाचेंहि येणें जाणें नसतें, असें आम्ही यापूर्वी सांगितलें आहे पण येथें पुनः म्हटलें आहे कीं, ' खुदाचे हुकूमानें देवदूत व पवित्रात्मे संसार सुव्यवस्थित करण्याकरितां येतात;' म्हणून या सर्वांचें एखादें विशिष्ट स्थान असलें पाहिजे. असें असल्यास खुदाला सर्वव्यापक म्हणण्याचें कारण काय ? आतांपर्यंत फक्त खुदा, फरिश्ते व पैगंबर ह्या तिघांचीं वर्णनें आलीं पण यामध्यें एक नवीनच ' पवित्रात्मा ' चवथा उत्पन्न केलेला दिसतो ! ' पवित्रात्मा ' ही नवीन भानगड काय आहे हें खुदाच जाणें ख्रिस्त्यांची ' बाप, पुत्र: पवित्रात्मा' ही जशी त्रिपुटी आहे तशी इस्लामी त्रिपुटी, खुदा फरिश्ता, पैगंबर, ही असून शिवाय 'पवित्रात्मा' हें एक त्या त्रिपुटीचें पिल्लूच होय ! जर म्हणाल कीं आम्ही फरिश्ता, पैगंबर, पवित्रात्मा यांना खुदा समजत नाहीं तर मग पवित्रात्मा व खुदा हे पृथक् आहेत कीं, काय ? तसें असल्यास खुदाला पवित्रात्मा म्हणावें कीं नाहीं ? खुदा घोडे आदि जनवरांच्या व कुराण वगैरेच्या शपथा खातो पण शपथा खाणें हें भल्या लोकांचें काम नव्हे.

आतां या समुल्लासाचा उपसंहार लिहून कुराणस्वरूपाचें दिग्दर्शन बुद्धिमान् लोकांना करवितो म्हणजे त्याची यथार्थ कल्पना येईल.

माझ्यामतें हें पुस्तक न ईश्वरकृत, न विद्वान्रचित, न विद्यायुक्त असें आहे. या समुल्लासांत मी फक्त त्यांतील फारच थोड्या दोषांचें आविष्करण केलेलें आहे. याचें कारण लोकांनीं यांच्या भ्रमजालांत फसून आपल्या जन्माचें मातेरें करुन घेऊं नये. कुराणांत जें अल्पसें सत्य आहे तें वेदादि विद्यायुक्त पुस्तकांच्या अनुकूल असल्यामुळें मलाच काय पण इतर जे सत्यप्रिय, निःपक्षी बुद्धिमान्, विद्वज्जन त्यांनाहि ग्राह्यच आहे. अल्पसा सत्यांश सोडून दिल्यास बाकी सर्व अविद्यामूलक, भ्रमोत्पादक, मनुष्यांच्या आत्म्यांना पशूवत् बनवून सोडणारें, शांतताभंगकारक व उपद्रव माजवून मनुष्यामनुष्यांत द्रोह पसरविणारें व परस्परांना दुःखसागरांत बुडविणारें हें पुस्तक आहे. पुनरुक्ति दोषाचें कुराण म्हणजे जणूं भांडारच होय. परमेश्वरानें सर्व मनुष्यांवर कृपा करुन तो त्यांना एकमेकांशीं प्रेमानें व ऐक्यभावानें वागण्याची प्रेरणा करो व सर्वत्र सुखाभिवृद्धि होवो. मी ज्याप्रमाणें स्व व परमतदोष निःपक्षपणें प्रकाशित केला आहे त्याप्रमाणें जर सर्व विद्वान लोक करतील तर परस्पर वैमनस्य आहे तें नष्ट होऊन सर्व लोक एकाच सत्यमताचे अनुयायी बनून चोहोंकडे

(१) हिंदी वचनांत ' बुलावेंगे फरिश्ते दोजख के को ' म्हणजे ' दूताकडून स्वर्ग बंद करू ' असे शब्द आहेत.

(२) या ठिकाणीं हिंदी वचनांत ' फरिश्ते और पवित्रात्मा ' असे शब्द आहेत.

आनंदी आनंद नांदूं लागेल. कुराणाविषयीं मी ज्या उद्देशानें लिहिलें आहे तो उद्देश लक्षांत घेऊन सर्व समंजस धार्मिक सज्जनांनीं त्याकडे पहावें. यदाकदाचित् भ्रमानें अन्यथा कांहीं लिहिलें गेलें असेल तर तें शुद्ध करून घ्यावें.

आतां शेवटीं एकच गोष्ट सांगावयाची कीं, पुष्कळ मुसलमान असें म्हणत असतात व लिहितातहि कीं, आमच्या मताचा निर्देश अथर्ववेदामध्यें देखील आलेला आहे. याचें उत्तर अथर्ववेदांत मुसलमानी मताचें नांव निशाणहि कोठें नाहीं. ( प्रश्न ) तुम्ही संपूर्ण अथर्ववेद अवलोकन केला आहे काय ? जर पाहिला असेल तर ' अल्लोपनिषद ' वाचा म्हणजे त्यांत पुढीलप्रमाणें मुसलमानी मताचा स्पष्ट उल्लेख आलेला तुम्हाला दिसून येईल.

## अथाऽल्लोपनिषदं व्याख्यास्यामः

अस्माल्लां इल्ले मित्रावरुणा दिव्यानि धत्ते ॥ इल्लल्लेवरुणो राजा पुनर्दुदुः ॥ ह्या मित्रो इल्लां इल्लल्ले इल्लां वरुणो मित्रस्तेजस्कामः ॥ १ ॥ होतारमिन्द्रो होतारमिन्द्रमहासुरिन्द्राः ॥ अल्लोज्येष्ठं श्रेष्ठं परमं पूर्णं ब्रह्माणं अल्लाम् ॥ २ ॥ अल्लो रसूलमहामदरकबरस्य अल्लो अल्लाम् ॥३॥ आदल्लाबूकमेककम्॥ अल्लाबूक निरवातकम् ॥४॥ अल्ला सूर्य चन्द्र सर्व नक्षत्राः ॥५॥ अल्ला ऋषीणां सर्वदिव्यां इन्द्राय पूर्वं माया परममन्तरिक्षाः ॥६॥ अल्लः पृथिव्या अन्तरिक्षं विश्वरूपम् ॥७॥ इल्लाँ कबर इल्लाँ कबर इल्लां इल्लल्लेति इल्लल्लाः ॥८॥ ओम् अल्लाइल्लल्ला अनादिस्वरूपाय अथर्वणाश्यामा हुं ह्रीं जनान-पशुनसिद्धान् जलचरान् अदृष्टं कुरु कुरु फट् ॥९॥ असुरसंहारिणी हुं ह्रीं अल्लोरसूल महमदकबरस्य अल्लो अल्लाम् इल्लल्लेति इल्लल्लाः ॥१०॥

## इत्यल्लोपनिषत् समाप्ता ।

सदरहू उपनिषदांत ज्याअर्थीं महंमदसाहेबांना ' रसूल' देवानें पाठविलेला प्रेषित असें म्हटलें आहे त्याअर्थीं मुसलमानीमत वेदमूलक आहे. ( उत्तर ) जर अद्याप तुम्ही अथर्ववेद पाहिला नसेल तर आम्हांकडे या, व प्रथमाक्षरा पासून अंत्याक्षरापर्यंत नीट वाचून पहा किंवा एखाद्या अथर्ववेदी गृहस्थाकडे जा अथर्ववेद संहिता भागांतील वीसहि कांडांत तुमच्या पैगंबरांचें वा त्यांच्या मताचें नांवहि तुम्हास आढळणार नाहीं. हें अल्लोपनिषद मूळ अथर्ववेदांत नाहीं. त्याच्या गोपथ ब्राह्मणग्रंथांत नाहीं. अगर इतर कोणत्याहि शाखाग्रंथांत नाहीं. बहुधा हें उपनिषद अकबरबादशहाचे वेळीं एखाद्या अरबी व संस्कृत भाषा जाणणाऱ्या मनुष्यानें लिहिलें असावें, कारण वरील उताऱ्यांत अरबी व संस्कृत पदें लिहिलेलीं आढळून येतात.

( आस्मालां) इल्ले मित्रावरुणा दिव्यानि धत्ते) इत्यादिमध्यें (अस्माल्लां और इल्ले) हीं अरबी व ( मित्रा वरुणा दिव्यानि धत्ते ) हीं संस्कृत पदें आहेत. याचप्रमाणें सगळयामध्यें अरबी संस्कृतचें मिश्रण झालेलें आहे. यावरूनच त्याचा कर्ता कोण हें कळून येतें. बरें याचा अर्थ पाहूं गेल्यास तोहि कृत्रिम अयुक्त, वेद व व्याकरणरीति विरुद्ध आहे. या उपनिषदाप्रमाणें आणखी पुष्कळ उपनिषदें अनेक मतमतांतराभिमान्यांनीं आपापलीं मतें सिद्ध करण्यासाठीं बनविलीं आहेत उदा. स्वरोपनिषद नृसिंहतापनी,. रामतापनी, गोपालतापनी वगैरे. ( प्रश्न ) आजपर्यंत कोणीहि तुम्ही म्हणतात असें म्हटलें नाहीं तेव्हां तुमचेंच म्हणणें खरें कसें मानावें ? (उत्तर) तुमच्या मानण्या न मानण्यावर आमच्या म्हणण्याची सत्यासत्यता थोडीच अवलंबून आहे ? मी जसें ह्याला खोटें म्हणतो त्याप्रमाणें तुम्हीहि जेव्हां अथर्ववेद, गोपथादि शास्त्रें अवलोकन कराल, अर्थसंगती लावून शुध्दाशुद्ध पहाल तेव्हां तरी सप्रमाण मानाल कीं नाहीं ? ( प्रश्न ) पहा, आमचें मत किती उत्तम आहे. त्यायोगें सर्व प्रकारची सुखें व मुक्ति प्राप्त होईल . (उत्तर) प्रत्येक मतानुयायी असेंच म्हणतो कीं, माझें तेंच योग्य बाकीचीं मतें अयोग्य आमच्या मताशिवाय स्वर्ग मिळणार नाहीं कोणाचें मत खरें मानावें ? सत्यभाषण, अहिंसा, दया वगैरे शुभगुण सर्वमतांत उत्तम होत; बाकीचीं वादविवाद, ईर्ष्या, द्वेष, मिथ्याभाषणादि कर्मे सर्व मतांत निंद्य होत, असें तर आमचें मत आहे. आपणाला सत्यमत ग्रहण करण्याची इच्छा असेल तर वैदिकमताचा स्वीकार करावा.

**इति श्रीमद्दयानन्दसरस्वतीस्वामीकृते सत्यार्थप्रकाशे**
**सुभाषाविभूषिते यवनमतविषयेः**
**चतुर्दशसमुल्लासः सम्पूर्णः ।**

ओ ३ म् ।

# स्वमन्तव्यामन्तव्यप्रकाशः ॥

ज्याला सर्वतंत्र सिद्धान्त असें म्हणतां येतें व ज्याला **साम्राज्यधर्म** किंवा सार्वजनिकधर्म असें म्हणतात व जो अनादिकालापासून चालत आला आहे असें सर्वांनीं मानलें आहे, मानीत आहेत व मानतील त्याला **सनातनधर्म किंवा नित्यधर्म** असें अन्वर्थक नांव आहे. या धर्माचा कोणीहि विरोधी होऊं शकत नाहीं. जर कोणी अविद्यायुक्त जनांनीं किंवा पक्षाभिमानी मतमतांतरवाल्यांनीं त्याला अन्यथा जाणलें किंवां भासविलें तर त्याचा स्वीकार बुद्धिमान् लोकांनीं करूं नये; पण ज्याला सत्यवचनी, सत्यमानी, परोपकारी, निःपक्षपाती विद्वान् लोक मानतात तेंच सर्वांनीं मानावें व ज्याला ते मानीत नाहींत तें इतरांनींहि मानण्यास योग्य नाहीं. आतां जीं वेदादिशास्त्रांनीं व ब्रह्मयापासून तो जैमिनीमुनिपर्यंत सर्वांनीं मानलेलीं आहेत त्या ईश्वररचिततत्वांना मीहि मानीत असल्यामुळें त्यांना सर्वांच्या समोर स्पष्टपणानें मांडतो. जें तीनहि काळीं सर्वांना एकसारखे मानण्यास योग आहे, तें माझें मत आहे. नवीन कल्पना चालवावी व नवीन मत सुरू करावें अशी माझी मुळींच इच्छा नाहीं; पण जें सत्य आहे त्याला मानणें व मानण्यास लावणें आणि असत्य टाकणें व टाकण्यास लावणें मला इष्ट वाटतें. जर मी पक्षपात केला असता तर मी आर्यावर्तांतील प्रचलित मतांपैकीं एकाचा पुढारी बनून राहिलों असतो. आर्यावर्तामध्यें व अन्यदेशामध्यें ज्या धर्मयुक्त चालीरीति आहेत त्यांचा स्वीकार करावा व धार्मिक गोष्टींचा कधींहि त्याग करूं नये म्हणून माझा प्रयत्न आहे सत्यधर्माचा कोणीहि त्याग करूं नये असें मी इच्छीत आहे; कारण तशा धर्माचा त्याग करणें हें मनुष्यत्वाला शोभत नाहीं. जो मननशील आहे, जो आपल्या प्रमाणेंच अन्याचेंहि सुखःदुख हानिलाभ समजतो, जो अन्याय करणाऱ्या बलिष्टांनाहि भीत नाहीं व जो धर्मात्मा निर्बलांनाहि भीत असतो. इतकेंच नव्हें तर आपल्या सर्व सामर्थ्यानें धर्मात्म्यांचें रक्षण, त्यांची उन्नत्ति, त्यांना प्रिय आचरण करीत असतो, मग ते धर्मात्मे कितीहि अनाथ, निर्बल, गुणरहित स्थितीमध्यें असले तरी हरकत नाहीं; तसेंच जो अधर्मी चक्रवर्ती असो, सनाथ, बलिष्ठ व गुणयुक्त असो त्याचा नाश, अवनति व अप्रियाचरण सदोदित करीत असतो, अर्थात् जो होतां होईल तितकें करून अन्याय करणारांच्या बलाची हानि व न्याय करणाऱ्यांच्या बलाची उन्नत्ति सर्वप्रकारें करीत असतो, त्याला मनुष्य म्हणता येईल. अशा करण्यामध्यें त्याला कितीहि दारुण दुःख होवो, प्राणहि जावोत पण जो मनुष्यधर्मापासून च्युत होणार नाहीं तोच खरा मनुष्य होय. या विषयीं श्रीमान् महाराजा भर्तृहरी इत्यादिकांनीं जे श्लोक लिहिले आहेत ते येथें लिहिणें उपयुक्त आहेत, असें समजून लिहीत आहेः—

**निन्दन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु । लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ॥**
**अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा । न्याय्यात् पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ॥ १ ॥** भर्तृहरि

**न जातु कामान्न भयान्न लोभाद् धर्मं त्यजेज्जीविवस्यापि हेतोः ॥**
**धर्मो नित्यःसुखदुःखे त्वनित्ये, जीवो नित्यो हेतुरस्य त्वनित्यः ॥ २ ॥** महाभारते ।

**एक एव सुहृद्धर्मो निधनेऽप्यनुयाति यः । शरीरेण समं नाशं सर्वमन्यद्धि गच्छति ॥ ३ ॥** मनुः ॥

**सत्यमेव जयते नानृतं सत्येन पन्था विततो देवयानः । येनाक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत्सत्यस्य परमं निधानम् ॥ ४ ॥**

**न हि सत्यात्परो धर्मो नानृतात्पातकं परम् । नहि सत्यात्परं ज्ञानं तस्मात्सत्यं समाचरेत् ॥ ५ ॥** उ. नि. स. प्र. ९९.

या महाशयांच्या श्लोकांच्या अनुकूल सर्वांनीं निश्चय करावा हें योग्य आहे. आतां मी ज्या ज्या तत्त्वांना जसें जसें मानतों त्या त्या तत्त्वांचा तसा तसा उल्लेख संक्षेपानें येथें करतों. यांचें विशेष व्याख्यान या सत्यार्थप्रकाश नामक ग्रंथामध्यें त्या त्या प्रकरणामध्यें केलेलें आहे.

१. **ईश्वरः**—याचीं ब्रह्म. परमात्मादि नांवें आहेत व तो सच्चिदानंदादि लक्षणांनीं युक्त आहे. त्याचे गुण, कर्म व स्वभाव हे पवित्र आहेत. तो सर्वज्ञ, निराकार, सर्वव्यापक, अजन्मा, अनंत, सर्वशक्तिमान्, दयाळू, न्यायकारी, सर्व सृष्टीचा कर्ता, धारणकर्ता, हरणकर्ता आहे व सर्व जीवांना त्यांचा कर्मानुसार. सत्यन्यायानें फल देणारा आहे, इत्यादि लक्षणांनी युक्त असणाऱ्या त्या परमेश्वराला मी मानतों.

२. **वेदः**—विद्याधर्मयुक्त ईश्वरप्रणीत संहितामंत्रभागात्मक चार वेद आहेत. ते निर्भ्रांत असून स्वतः प्रमाण आहेत असें मी मानतों. ते स्वयं प्रमाण असल्यामुळें त्यांच्या प्रामाण्याबद्दल कोणत्याहि अन्यग्रंथांतील प्रमाणांची आवश्यकता नाहीं. ज्याप्रमाणें सूर्य किंवा दिवा हे आपल्या स्वरूपाचे स्वतःच प्रकाशक असून पृथिव्यादि अन्यपदार्थांचे प्रकाशकहि होतात त्याचप्रमाणें चार वेद हे आहेत. तसेंच चारहि वेदांचीं चार ब्राह्मणें, सहा अंगें, सहा उपांगें चार उपवेद व वेदांचे ११२७ शाखाग्रंथ या सर्वांतील जो भाग वेदानुकूल आहे तो सर्व प्रमाण आहे व त्यांमध्यें जेवढीं वचनें वेदविरुद्ध आहेत तेवढीं अप्रमाण आहेत असें मीं मानतों.

३. **धर्म व अधर्मः**—जो पक्षपातरहित, न्यायाचरण व सत्यभाषणादि युक्त ईश्वराज्ञारूप वेदांशीं अविरुद्ध आहे त्यालाच धर्म असें मी समजतों. व जो पक्षपातयुक्त. अन्यायाचरण व मिथ्याभाषणादि युक्त ईश्वराज्ञाभञ्जक, वेदविरुद्ध आहे त्याला मी अधर्म समजतों.

४. **जीवः**—जो इच्छा, द्वेष, सुख, ज्ञानादिगुणयुक्त, अल्पज्ञ व नित्य आहे त्याला मी जीव असें समजतों.

५. **जीव व ईश्वर यांचा संबंधः**—जीव व ईश्वर हे स्वरूपतः व वैधर्म्यानें भिन्न आहेत व ते व्याप्यव्यापकता व साधर्म्य यांनीं अभिन्न आहेत. ज्याप्रमाणें आकाशापासून मूर्तिमान् द्रव्य कधींहि भिन्न नव्हतें, नाहीं व नसणार व कधींहि तें मूर्तिमान् द्रव्य आकाशच नव्हतें, नाहीं व नसणार त्याचप्रमाणें परमेश्वर व जीव यांना व्यापक व्याप्य, उपास्य उपासक व पिता पुत्र या संबंधानें युक्त मी मानीत आहे.

६. **अनादिपदार्थः**—एक ईश्वर. दुसरा जीव व तिसरी प्रकृति हे तीन अनादि पदार्थ आहेत. यांपैकीं प्रकृति हें जगाचें उपादानकारण आहे. हे तीनहि पदार्थ नित्य आहेत. जे पदार्थ नित्य असतात त्यांचे गुणकर्मस्वाभावहि नित्य असतात.

७. **प्रवाहानें अनादिः**—जे संयोगाच्या योगानें द्रव्य, गुण व कर्म उत्पन्न होतात ते वियोगानन्तर राहत नसतात. पण ज्याच्या योगानें प्रथम संयोग होतो तें सामर्थ्य त्यांमध्यें अनादि आहे; म्हणून त्याचा पुनरपि संयोग होईल व वियोगहि होईल. संयोग, वियोग व मधली स्थिति या तिघांनाहि मी प्रवाहानें अनादि समजतों.

८. सृष्टिः—जी पृथक् पृथक् द्रव्यांपासून ज्ञान व युक्तिपूर्वक संयोग होऊन नानारूप बनलेली असते तिला सृष्टि असें म्हणतात.

९. सृष्टीचें प्रयोजनः—ईश्वराचे सृष्टीनिमित्त जे गुणकर्मस्वभाव आहेत ते सफल होणें हें सृष्टिचें प्रयोजन आहे. जसे नेत्र पाहण्यासाठीं आहेत त्याचप्रमाणें परमेश्वराच्या सृष्टिरचनेच्या शक्तीची सफलता सृष्टि निर्माण करण्यांत आहे व तिचें आणखीहि प्रयोजन आहे तें हें कीं, जीवांच्या कर्माचा भोग त्यांना यथावत् मिळावा.

१०. सृष्टिकर्ताः—या सृष्टीचा कर्ता पूर्वोक्त ईश्वर आहे व सृष्टिहि सकर्तृक आहे. सृष्टीची रचना पाहिल्यावरून व जड पदार्थांमध्यें आपोआप यथायोग्य बीजादिस्वरूप बनण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें सृष्टीचा ' कर्ता ' अवश्य असला पाहिजे.

११. **बन्धः**—बंधन सनिमित्तक आहे. तें अविद्या या निमित्तानें होतें. जें जें पापकर्म आहे व अज्ञानादि ईश्वरभिन्नोपासना वगैरें आहे तें सर्व दुःख देणारें आहे. म्हणून ज्याची इच्छा केली नसतांहि जें भोगावें लागतें त्याला 'बन्ध' असें म्हणतात.

१२. **मुक्तिः**—सर्व दुःखांतून सुटून व बन्धनरहित होऊन, सर्वव्यापक ईश्वरामध्यें व त्याच्या सृष्टीमध्यें स्वेच्छेनें संचार करण्याला मुक्ति असें म्हणतात. नियत समयपर्यंत मुक्तीच्या आनंदाचा भोग भोगल्यानन्तर पुनः संसारामध्यें यावें लागतें.

१३. **मुक्तीचें साधनः**—ईश्वरोपासना अर्थात् योगाभ्यास, धर्मानुष्ठान, ब्रह्मचर्यानें, विद्याप्राप्ति, आप्तविद्वानांची संगति, सत्यविद्या, सुविचार व पुरुषार्थ इत्यादि मुक्तीचीं साधनें आहेत.

१४. **अर्थः**—जो धर्मानें मिळविला जातो त्यालाच अर्थ असें म्हणतात व जो अधर्माच्या योगानें सम्पादन केला जातो त्याला 'अनर्थ' असें म्हणतात.

१५. **कामः**—जो धर्म व अर्थ यांच्या योगानें प्राप्त केला जातो त्याला काम असें म्हणतात.

१६. **वर्णाश्रमः**—गुणकर्मांच्या योग्यतेनें वर्णाश्रम आहे असें मी समजतों.

१७. **राजाः**—जो शुभगुणकर्मस्वभावयुक्त आहे, पक्षपात न करतां न्याय व धर्म यांचें सेवन करतो, प्रजेशीं पित्याप्रमाणें वर्तन करतो, प्रजेला पुत्रांप्रमाणें मानतो, त्यांची उन्नति करण्यांत व सुख वाढविण्यांत सदैव यत्न करीत असतो त्याला राजा असें म्हणतात.

१८. **प्रजाः**—जी पवित्रगुणस्वभावांना धारण करून, पक्षपातरहित, न्याय व धर्म यांचें सेवन करून, राजा प्रजा यांची उन्नति इच्छिणारी असते व राजाशीं द्रोह न करतां त्याच्याशीं पुत्रवत् वर्तन करते तिलाच प्रजा असें म्हणतात.

१९. **न्यायकारीः**—जो पूर्ण विचार करून व असत्याचा त्याग करून, सदैव सत्याचें ग्रहण करतो, अन्याय करणाऱ्याला निरुत्साह करून न्याय करणाऱ्यांची उन्नति करतो व आपल्या प्रमाणेंच सर्वांना सुख व्हावें असें इच्छितो, तो न्यायकारी होय. त्यालाच मीहि न्यायकारी असें समजतों.

२०. विद्वानांना '**देव.**' अविद्वानांना 'असुर,' पाप्यांना '**राक्षस**' व अनाचाऱ्यांना '**पिशाच**' असें मी मानतों.

२१. **देवपूजाः**—विद्वान्, माता, पिता, आचार्य, अतिथि, न्यायकारी, राजा, धर्मात्माजन, पतिव्रता स्त्री, पत्नीव्रत पति यांचा सत्कार करणें याला 'देवपूजा' असें म्हणतात, याहून विपरीतांची जी पूजा असते ती अदेवपूजा समजावी; म्हणून मी यांच्या मूर्तीला पूज्य व इतर पाषाणादि जड मूर्तीला अपूज्य समजतों.

२२. **शिक्षणः**—ज्याच्या योगानें विद्या, सभ्यता, धर्मात्मता, जितेन्द्रियता इत्यादि गुण वाढतील व अविद्यादि दोष सुटतील त्यालाच शिक्षण असें म्हणतात.

२३. **पुराणः**—जे ब्रह्मादिकांनीं बनविलेले ऐतरेयादि ब्राह्मणग्रन्थ आहेत त्यांनाच मी पुराण, इतिहास, कल्प, गाथा व नाराशंसीं असें मानतों, भागवतादि ग्रन्थांना नाहीं.

२४. **तीर्थः**—ज्याच्यायोगानें दुःखसागरांतून पार होता येतें अर्थात् जीं सत्यभाषण, विद्या, सत्संग, यमनियमादि, योगाभ्यास, पुरुषार्थ, विद्यादानादि शुभ कर्मे आहेत त्यांनाच मी तीर्थ असें समजतों, इतर जलस्थलादिकांना नाहीं.

२५. **प्रारब्धाहून पुरुषार्थ श्रेष्ठ आहे;** कारण त्याच्या योगानेंच संचित प्रारब्ध बनतें, पुरुषार्थामध्यें सुधारणा झाल्यानें सर्वांचा सुधार होतो व तो विघडल्यानें सर्व बिघडलें जातें. तात्पर्य प्रारब्धापेक्षां पुरुषार्थ श्रेष्ठ आहे.

२६. **मनुष्यः**—जो सर्वांशीं यथायोग्य वागतो व सुख, दुःख, हानि, लाभ वगैरे स्थितीमध्यें आपल्या प्रमाणेंच सर्वांशीं वागतो तोच श्रेष्ठ मनुष्य होय. याहून विपरीत जो वागतो त्याला कनिष्ठ मनुष्य असें मी समजतों.

२७. **संस्कारः**– ज्याच्या योगानें शरीर, मन व आत्मा उत्तम होऊं शकतात त्याला संस्कार असें म्हणतात. हे निषेकादि व स्मशानान्त सोळा प्रकारचे आहेत. ह्यांला कर्तव्य असें मी समजतों व शरीराचें दहन झाल्यानंतर मृताबद्दल कांहींएक कर्तव्य नाहीं असें मी मानतो.

२८. **यज्ञः**—ज्यामध्यें विद्वानांचा यथायोग्य सत्कार केला जातो, ज्यामध्यें शिल्प व रसायन या पदार्थविद्येच्या योगानें उपयोगी कृत्यें घडवून आणालीं जातात; ज्यामध्यें विद्यादि शुभगुणांचें दान होत असतें, अग्निहोत्रादि करून ज्यामध्यें वायु, वृष्टि, जल व औषधि इत्यादिकांची पवित्रता करून सर्व जीवांना सुखी केलें जातें, त्याला यज्ञ असें मी समजतों.

२९. श्रेष्ठांना **'आर्य'** व दुष्टांना **'दस्यु'** असें इतरांप्रमाणें मीहि समजतों.

३०. **आर्यावर्तः**—या भूमीमध्यें आदि सृष्टिपासून आर्यलोक निवास करीत आले आहेत म्हणून या भूमीचें नांव आर्यावर्त देश असें आहे. पण याची सीमा उत्तरेस हिमालय, दक्षिणेस विंध्याचल, पश्चिमेस अटक व पूर्वेस ब्रह्मपुत्रा नदी आहे. या चारांमध्यें जेवढा देश आहे त्यालाच आर्यावर्त असें म्हणतात. जे या देशामध्यें सदैव राहत असतात त्यांना आर्य असें म्हणतात.

३१. **आचार्यः**—जो सांगोपांग वेदविद्यांचा अध्यापक होऊन सत्याचरणाचें ग्रहण व मिथ्याचरणाचा त्याग करतो व करवितो त्याला आचार्य असें म्हणतात.

**शिष्यः**—जो सत्यशिक्षण व सत्यविद्या यांचें ग्रहण करण्यास योग्य धर्मात्मा असतो व ज्याला विद्या-ग्रहणाची उत्कट इच्छा असते व जो आचार्याचें प्रिय करतो त्याला शिष्य असें म्हणतात.

३३. **गुरुः**—माता व पिता यांना व जो सत्याचें ग्रहण करवून असत्याचा त्याग करवितो त्यालाहि गुरु असें म्हणतात.

३४, **पुरोहितः**—जो यजमानाचा हितकारी व सत्याचा उपदेश करणारा असतो त्याला पुरोहित असें म्हणतात.

३५. **उपाध्यायः**—जो वेदांचा एक भाग किंवा अंगे शिकवितो त्याला उपाध्याय म्हणतात.

३६. **शिष्टाचार**—धर्माचरणपूर्वक ब्रह्मचर्यानें विद्या ग्रहण करून, प्रत्यक्षादि प्रमाणांनीं सत्यासत्याचा निर्णय करून सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग करणें हा शिष्टाचार आहे व जो हा आचार आचरतो त्याला **'शिष्ट'** असें म्हणतात.

३७. **अष्टविध प्रमाणें**:—प्रत्यक्षादि जीं आठ प्रमाणें आहेत त्यांना मी मानतों.

३८. **आप्तः**—जो यथार्थवक्ता, धर्मात्मा व सर्वांच्या सुखासाठीं प्रयत्न करीत असतो त्याला मी आप्त असें म्हणतों.

३९. **परीक्षकः**—परीक्षा पांच प्रकारची आहे. जी ईश्वर, त्याचे गुणकर्मस्वभाव व वेदविद्या यांच्या योगानें होते ती पहिली परीक्षा समजावी. दुसरी प्रत्यक्षादि आठ प्रमाणांनीं होणारी, तिसरी सृष्टिक्रमावरून होणारी, चवथी आप्तांच्या व्यवहारावरून होणारी, व पांचवी आपल्या आत्म्याची पवित्रता व विद्या यांच्या योगानें होणारी या पांचहि परीक्षांच्या योगानें सत्यासत्याचा निर्णय करून सत्याचें ग्रहण व असत्याचा परित्याग करावा.

४० **परोपकार:**—ज्याच्या योगानें सर्व लोकाचे दुराचार सुटतील व दु:खें दूर होतील आणि श्रेष्ठाचार वाढून सुखाची अभिवृद्धि होईल त्याला परोपकार असें म्हणतात.

४१. **स्वतन्त्र व परतन्त्र:**—जीव आपलीं कामें करण्याला स्वतंत्र व केलेल्या कर्माचें फल भोगण्यास ईश्वराच्या व्यवस्थेनें परतंत्र आहे. त्याचप्रमाणें ईश्वरहि आपलीं सत्याचारादि सर्व कामें करण्यास स्वतंत्र आहे.

४२. **स्वर्ग:**—हें नांव सुखविशेष भोग व त्याच्या सामुग्रीची प्राप्ति यांना आहे.

४३. **नरक:**—हें नांव दु:खविशेष भोग व त्याच्या सामुग्रीची प्राप्ति यांना आहे.

४४. **जन्म:** शरीर धारण करून प्रकट होणें याला जन्म असें म्हणतात. मागचा, मधला व पुढचा असे तीन भेद आहेत.

४५. **मृत्यु:**—शरीराचा आत्म्यांशीं संयोग झाला म्हणजे त्याला जन्म असें म्हणतात व वियोगाला मृत्यु असें म्हणतात.

४६. **विवाह:**—नियमपूर्वक, उघडपणें, आपण इच्छा केल्यानंतर जें पाणिग्रहण केलें जातें त्याला विवाह असें म्हणतात.

४७. **नियोग:**—विवाहानंतर पति अथवा पत्नी यांचा मृत्यु झाला किंवा अन्य रीतीनें दोघांमध्यें कायमचा वियोग झाला, नपुंसकत्वादि स्थिर रोग असले तर आपत्कालीं स्त्री किंवा पुरुष यांनीं स्ववर्णातील किंवा आपणाहून उत्तम वर्णातील पुरुष किंवा स्त्रीशीं विधिपूर्वक नियुक्त होऊन संतानोत्पत्ति करण्याला नियोग असे म्हणतात.

४८. **स्तुति:**—गुणांचें कीर्तन, श्रवण किंवा ज्ञान यांना स्तुति असें म्हणतात, स्तुतीचें फल प्रीति आदिक आहे.

४९. **प्रार्थना:**—आपल्या सामर्थ्याची पराकाष्ठा केल्यानंतर ईश्वराकडून जें विज्ञानादि प्राप्त व्हावयाचें आहे त्यासाठीं ईश्वराची याचना करण्याला प्रार्थना म्हणतात हिचें निरभिमान हें फल आहे.

५०. **उपासना:**—जसे ईश्वराचे गुणकर्मस्वभाव पवित्र आहेत तसे आपले करणें, ईश्वराला सर्वव्यापक जाणून आपल्याला व्याप्य जाणणें, ईश्वराजवळ आपण व आपणाजवळ ईश्वर आहे असा योगाभ्यास करून निश्चय करणें व तो साक्षात् अनुभवणें, याला उपासना असें म्हणतात. हिचें फल ज्ञानाची उन्नति हें आहे.

५१. **सगुणनिर्गुणस्तुतिप्रार्थनोपासना:**—जे जे गुण परमेश्वरामध्यें आहेत त्यांनीं तो युक्त आहे असें मानणें व जे गुण त्याच्यांत नाहींत त्याहून त्याला पृथक मानणें व त्याची प्रशंसा करणें याला सगुणनिर्गुणस्तुति असें म्हणतात. शुभगुणांच्या ग्रहणाची इच्छा धरून दोषांचा त्याग करण्यासाठीं परमेश्वराचें सहाय्य मागणें याला सगुण-निर्गुणप्रार्थना असें म्हणतात; व परमेश्वराला सर्व शुभगुणांसहित मानणें व दोषांनीं विरहित मानणें व आपल्या आत्म्याला त्याच्यासाठीं व त्याच्या आज्ञेसाठीं अर्पण करणें ही सगुणनिर्गुणोपासना होय.

हे संक्षेपानें स्वसिद्धांत लिहिले आहेत. यांचीच विशेष व्याख्या या सत्यार्थप्रकाशाच्या दुसऱ्या प्रकरणामध्यें व ( ऋग्वेदादिभाष्यभूमिकाचें मराठी ) इत्यादि ग्रंथामध्यें लिहिलेली आहे. जी गोष्ट सर्वांच्या समोर माननीय ठरत आहे तिला मी मानतों. जसें सत्यभाषण करणें हें सर्वांना चांगलें वाटतें व मिथ्या भाषण कर-ण्याला सर्व लोक वाईट म्हणतात, असे जे सर्वमान्य सिद्धांत आहेत त्यांचा मी स्वीकार करतों. जे मतमतांतरांचे परस्परा-मध्यें झगडे आहेत त्यांना मी पसंत करीत नाहीं; कारण कीं, याच मतवाल्यांनीं आपआपल्या मतांचा प्रसार करून मनुष्याला फसवून परस्पर शत्रू बनविलें आहे; म्हणून या मतमतांतरांच्या झगड्यांचा नाश करून, सत्याचा प्रसार करून, सर्वांचें एकमत करून, परस्परांतील द्वेषभाव नाहींसा करून व परस्परांना दृढ प्रीतियुक्त करून, सर्वांना सर्वांकडून सुखाचा

लाभ पोंचावा यासाठीं माझा प्रयत्न आहे व असें करणें हा माझा अभिप्राय आहे. सर्वशक्तिमान् परमात्म्याची कृपा, त्याचें साहाय्य व आप्तजनांची सहानुभुति-यी-या योगानें हा सिद्धांत सर्वत्र भूगोलावर शीघ्र प्रवृत्त होईल, व त्याच्या योगानें सर्व लोक सहज धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांना सिद्ध करून सदैव उन्नत व आनंदयुक्त होत राहावेत हेंच माझें मुख्य प्रयोजन आहे.

अलमतिविस्तरेण बुद्धिमद्वर्येषु ॥

ओ३म् । शन्नो मित्रः शं वरुणः । शन्नो भवत्वर्य्यमा ॥ शन्न इन्द्रो बृहस्पतिः । शन्नो विष्णुरुरुक्रमः ॥ नमो ब्रह्मणे नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मावादिषम् । ऋतमवादिषम् सत्यमवादिषम् । तन्मामावीत् तद्वक्तारमावीत् । आवीन्माम् आवीद्वक्तारम् । ओ३म् शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्याणां परमविदुषां श्रीविरजानंदसरस्वती
स्वामिनां शिष्येण श्रीमद्दयानंदसरस्वतीस्वामिना विरचितः स्वमंत-
व्यामंतव्यसिद्धान्तसमन्वितः सुप्रमाणयुक्तः सुभाषाविभूषितः
सत्यार्थप्रकाशोऽयं ग्रन्थः सुपूर्तिमगमत् ॥


गायत्री महा मन्त्र

ओ३म् भूर्भुवः स्वः। तत्सवितुर्वरेण्यम्भर्गो
देवस्य धीमहि। धियो यो नः प्रचोदयात्॥

( यजुर्वेद अ॰ ३६ मं॰ ३ )

सच्चिदानन्द, सकल जगदुत्पादक, प्रकाशकों के प्रकाशक, परमात्मा के सर्वश्रेष्ठ, पापनाशक तेज का हम ध्यान करते हैं। वह परमेश्वर हमारी बुद्धि और कर्मों को उत्तम प्रेरणा करे।

योगेश टैक्सटाइल्स, कम्बल निर्माता पानीपत



॥ ओ३म् ॥

परोपकार और परहित में मान-अपमान और पराई निन्दा का परित्याग करना ही पड़ता है। इसके बिना सुधार नहीं हो सकता।

— महर्षि दयानन्द सरस्वती

वेद प्रचारक मण्डल

६०/१३ रामजस रोड, दिल्ली-५

गुरु विरजानन्द दण्डी
सन्दर्भ पुस्तकालय
पु परिग्रहण क्रमांक 577
दयानन्द महिला महा

ओ३म्

# आर्शीवाद

पूज्यपाद स्वामी सर्वानन्द जी महाराज (अध्यक्ष वैदिक यति मण्डल)

## *मराठी सत्यार्थ प्रकाश प्रकाशन समिति*

| | | |
|---|---|---|
| प्रधान | : | श्री रमेशचन्द श्री वास्तव (आर्य प्रतिनिधि सभा विदर्भ मध्य प्रदेश, नागपुर) |
| मन्त्री | : | श्री सत्यवीर शास्त्री ( नागपुर ) |
| कोषाध्यक्ष | : | श्री हरिश्चन्द्र राव आर्य ( नागपुर ) |
| पूर्व प्रधाना | : | माता कौशल्या देवी ( रायपुर ) |

श्री मणिलाल पुत्र श्री शिव नारायण भाई वीर जी वेलाणी (लुडवा कच्छ)
फर्म श्री स्वास्तिक टिम्बर सप्लार्यस, हरदा (म० प्र०)
श्री रतन सी वेलाणी, फर्म श्री टीक टिम्बर इन्डस्ट्रीज हरदा (म०प्र०)
श्री कल्याण जी वेलाणी (आर्य समाज घाटकोपर बम्बई)
स्वामी ओमानन्द सरस्वती (गुरुकुल झज्झर)
स्वामी सोमानन्द जी, वेद प्रचारक मण्डल, दिल्ली–५
लाला आदित्य प्रकाश आर्य (हलवाई हट्टा, पानीपत)
श्री पं० प्रियदत्त शास्त्री, गुँजोटी जिला उस्मानाबाद)
महात्मा प्रेम प्रकाश जी, आर्य कुटिया धूरी (पंजाब)
आचार्य सुभाष शास्त्री, गुरुकुल येडसी रामलिंग (जि० उस्मानाबाद)
ब्र० नन्द किशोर, एम. ए. विद्यावाचस्पति आचार्य सार्वदेशिक दयानन्द सन्यास वानप्रस्थ मण्डल ज्वालापुर (हरिद्वार)

गुरु विरजानन्द दण्डी
सन्दर्भ पुस्तकालय
पु परिग्रहण क्रमांक 577
दयानन्द महिला मह

## दानी महानुभावों की सूची

*

| | |
|---|---|
| लाला आदित्य प्रकाश आर्य | (पानीपत) |
| महात्मा प्रेम प्रकाश जी | (धुरी) |
| श्री कल्याण जी भाई वेलाणी | (बम्बई) |
| श्री मणिलाल भाई | (हरदा) |
| रतन सी वेलाणी | (हरदा) |
| माता दयावती बमाती, आर्यवान प्रस्थाश्रम | (ज्वालापुर) |
| रतिराम शर्मा, प्रधान सिलीगुड़ी | (बंगाल) |
| रणजीत मुनि जी, योगधाम | (ज्वालापुर) |
| मन्त्री आर्यसमाज | पिपलानी (भोपाल) |
| श्री कन्हैया लाल चौरासिया | आर्यसमाज (रायपुर) |
| श्री पं० कमलनारायण जी एम.ए. वेदाचार्य | (रायपुर) |

ओ३म्